श्रीशंकर

सार्थ

योगरत्नाकर

(मूळासह मराठी भाषांतर)

भाग २ रा

भिषजां साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥

—अष्टांगहृदय.

भाषांतरकार
वैद्यराज दत्तो बल्लाळ बोरकर, इसलामपूर.

संशोधक
परशुराम लक्ष्मण वैद्य
संस्कृत शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें

प्रकाशक
यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित
बुकसेलर आणि पब्लिशर, बुधवार पेठ, पुणें

सन १९१७

किंमत ३॥ रुपये

मुद्रक
अच्युत चिंतामण भट्ट, यशवंत छापखाना, कसबा पेठ, पुणें.

सार्थ योगरत्नाकर

भाग २ रा

अनुक्रमणिका

५१ क्र. ५८८२

श्रीशंकर.

सार्थ योगरत्नाकर.

भाग दुसरा.

वातरक्तनिदान.

कृतं तावत्समासेन वातव्याधिनिरूपणम् ।
वातव्याधिप्रसङ्गेन वातरक्तं निरूप्यते ॥ १ ॥

वातव्याधीचें निदान संक्षेपतः सांगितलें. आतां वातव्याधीच्या प्रसंगानें वातरक्ताचें निदान सांगतों.

लवणाम्लकटुक्षारस्निग्धोष्णाजीर्णभोजनैः ।
क्लिन्नशुष्काम्बुजानूपमांसपिण्याकमूलकैः ॥ २ ॥
कुलत्थमाषनिष्पावशाकादिपललेक्षुभिः ।
दध्यारनालसौवीरशुक्ततक्रसुरासवैः ॥ ३ ॥
विरुद्धाध्यशनक्रोधदिवास्वप्नप्रजागरैः ।
प्रायशः सुकुमाराणां मिथ्याहारविहारिणाम् ।
स्थूलानां सुखिनां चापि प्रकुप्येद्वातशोणितम् ॥ ४ ॥

खारट, आंबट, तिखट, क्षारयुक्त, स्निग्ध व उष्ण असें अन्न, अपक्व अन्न, शिळें व शुष्क असें मांस, जलचर व अनूप प्राण्याचें मांस, तिळकूट, मुळे, हुलगे, उडीद, पावटे, पालेभाज्या वगैरे, मांस, ऊंस, दहीं, कांजी, सौवीर, सूक्त, ताक, दारू, आसव, विरुद्ध अन्न खाणें, जेवणावर जेवण, राग, दिवसा झोंप घेणें व रात्रीं जागरण करणें अशा कारणांनीं मिथ्या आहारविहार करणाऱ्या सुकुमार, स्थूल व सुखी मनुष्यांचें प्रायः वातरक्त कुपित होतें.

संप्राप्ति.

हस्त्यश्वोष्ट्रैर्गच्छतोऽन्यैश्च वायुः
कोपं प्राप्तः कारणैः सेवितैः स्वैः ।

तीक्ष्णोष्णाम्लैः क्षारशाकादिभोज्यैः
संतापाद्यैर्भूयसा सेवितैश्च ॥ १ ॥
शीघ्रं रक्तं दुष्टिमायाति तच्च वायोर्मार्गं संरुणद्ध्याशु जातः ।
क्रुद्धोऽत्यर्थं मार्गरोधात्स वायुरत्युद्रिक्तं दूषयेद्रक्तमाशु ॥ २ ॥
कृत्स्नं रक्तं निर्दहत्याशु दुष्टं स्रस्तं शीघ्रं पादयोश्चीयते तु ।
तत्संपृक्तं वायुना दूषितेन तत्प्रावल्यादुच्यते वातरक्तम् ।
तद्वत्पित्तं दूषितेनासृजाऽक्तं श्लेष्मा दुष्टो दूषितेनासृजाऽक्तः ३
क्रुद्धो रुद्धगतिर्मरुत्प्रकुपितेनास्रेण संदूष्यते
प्राक्पादौ तदनु प्रधावति वपुःकण्ड्वर्तिसुप्त्यादयः ।
जायन्ते करपादसंधिषु मुहुर्वातास्रमेतत्कफे
क्रुद्धो दोषवदादिशेत्तु विषवत्कृत्स्नं वपुर्धावति ॥ ४ ॥
स्पर्शोद्विग्नौ तोदभेदप्रशोषस्वापोपेतौ वातरक्तेन पादौ ।
पित्तासृग्भ्यामुग्रदाहौ भवेतामत्यर्थोष्णौ रक्तशोथौ मृदू च ॥५॥
कण्डूमन्तौ श्वेतशीतौ सशोफौ पीनस्तब्धौ श्लेष्मदुष्टे च रक्ते ।
सर्वैर्दुष्टे शोणिते चापि दोषाः स्वं स्वं रूपं पादयोर्दर्शयन्ति ॥६

हत्ती, घोडे, उंट ह्यांजवर बसून प्रवास करण्यानें व दुसऱ्या स्वकारणानें कुपित झालेला वायु, त्याचप्रमाणें तीक्ष्ण, आंबट, उष्ण, खारट अशा प्रकारच्या भाज्या व भोज्य पदार्थ खाण्यानें व संतापादिकांचें फार सेवन केल्यानें रक्त त्वरित दुष्ट होऊन वायूचा मार्ग रोधून टाकतें. त्यामुळें वायु प्रकुपित होऊन प्रकुपित झालेल्या रक्ताला दूषित करतो आणि त्या रक्ताचा विदाह करतो. त्यामुळें तें दूषित झालेलें रक्त खालीं सरून पायांत सांठतें. दूषित वायूच्या योगानें संचित झालेल्या त्या रक्ताला वायूच्या प्राबल्यामुळें वातरक्त असें म्हणतात. त्याचप्रमाणें वायूच्या योगानें दूषित झालेलें पित्त व त्याचप्रमाणें वायूच्या योगानें दूषित झालेला कफ हे रक्ताशीं मिळतात. दूषित झालेल्या रक्तानें रुद्धगति झालेला वायु प्रथम पाय दूषित करतो. नंतर शरीरांत संचार करून कंडू, पीडा व बधिरता वगैरे विकार करतो. हें कफदोषामुळें हातपाय ह्यांच्या सांध्याच्या ठिकाणीं उद्भवतें. आणि दोषवशात् क्रुद्ध झालेला वायु विषाप्रमाणें सर्व शरीरांत संचार करतो. त्यामुळें पायाला स्पर्श सहन होत नाहीं, टोंचणी लागते, ते फुटतात,

सुकतात व बधिर होतात. पित्तानें रक्त दूषित झालें असतां पायाचा उग्र दाह होतो, ते अतिशय तापतात, पायाला लाल सूज येते व ते मृदु होतात. कफानें रक्त दूषित झालें असतां पायाला कंडू सुटते, ते पांढरे व गार होतात, सुजतात, ते लठ्ठ होतात व ताठतात. आणि त्रिदोषामुळें दूषित झालेल्या रक्तानें तिन्हीही दोष आपआपलीं लक्षणें पायाच्या ठिकाणीं दाखवितात.

वातरक्ताचें पूर्वरूप.

स्वेदोऽत्यर्थं न वा कार्ष्ण्यं स्पर्शाज्ञत्वं क्षतेऽतिरुक् ।
संधिशैथिल्यमालस्यं सदनं पिटिकोद्गमः ॥ १ ॥
जानुजङ्घोरुकट्यंसहस्तपादाङ्गसंधिषु ।
निस्तोदः स्फुरणं भेदो गुरुत्वं सुप्तिरेव च ॥ २ ॥
कण्डूः संधिषु रुग्दाहो भूत्वा नश्यति चासकृत् ।
वैवर्ण्यं मण्डलोत्पत्तिर्वातासृक्पूर्वलक्षणम् ॥ ३ ॥

वातरक्ताच्या पूर्व रूपांत घाम फार येतो अगर मुळींच येत नाहीं; अंग कृष्णवर्ण होतें, त्याला स्पर्श कळत नाहीं, व्रणामध्यें फार वेदना होतात, सांधे ढिले पडतात, आळस येतो, ग्लानि येते व अंगावर पुटकुळ्या येतात. गुडघे, पोटऱ्या, मांड्या, कंबर, खांदे, हात, पाय व शरीराचे सांधे ह्यांत टोंचल्याप्रमाणें पीडा होते. अंग फुरफुरतें, फुटल्याप्रमाणें वाटतें, तें जड होतें, बधिर होतें व अंगाला कंड सुटते, वरचेवर सांध्याच्या ठिकाणीं पीडा व दाह होऊन तो बंद होतो, अंगाचा वर्ण बदलतो व अंगावर मंडलें उठतात.

वातजाचें लक्षण.

वाताधिकेऽधिकं तत्र शूलस्फुरणतोदनम् ।
शोथस्य रौक्ष्यकृष्णत्वश्यावतावृद्धिहानयः ॥ १ ॥
धमन्यंगुलिसंधीनां संकोचोऽङ्गग्रहोऽतिरुक् ।
शीतद्वेषानुपशयौ स्तम्भवेपथुसुप्तताः ॥ २ ॥

वाताच्या आधिक्यानें शूल, फुरफुरणें, फोडल्याप्रमाणें पीडा, सूज, रूक्षपणा, त्वचेला काळसरपणा किंवा निळसरपणा, आणि ह्या लक्षणांची क्षणांत वृद्धि होणें किंवा क्षणांत ऱ्हास होणें हीं

लक्षणें होतात. तसेंच धमनी, अंगुलि व सांधे आंखडतात, अंग जखडल्याप्रमाणें वाटतें, अतिशय वेदना होतात, थंड उपचार नकोसे वाटतात व त्यानें फार त्रास होतो; अंग ताठतें, कांपतें व बधिर होतें.

रक्ताधिकाचें लक्षण.

रक्ते शोथोऽतिरुक्तोदस्ताम्रश्चिमिचिमायते ।
स्निग्धरूक्षैः शमं नैति कण्डूक्लेदसमन्वितः ॥ १ ॥

रक्ताधिक्यानें सूज, अतिशय वेदना, टोंचल्यासारखी पीडा, तांबूसपणा, चिमचिम वेदना व कंडू हीं लक्षणें होतात. आणि स्निग्ध व रुक्ष उपचारानें शमन होत नाहीं.

पित्ताधिकाचें लक्षण.

पित्ते विदाहः संमोहः स्वेदो मूर्छा मदस्तृषा ।
स्पर्शासहत्वं रुग्दाहः शोथपाकौ भृशोष्णता ॥ १ ॥

पित्ताधिक्यानें विदाह, मोह, घाम, मूर्च्छा, उन्माद, तहान, स्पर्श सहन न होणें, ठणका, दाह, सूज, अंगावर पुटकुळ्या उठणें व अत्यंत उष्णता हीं लक्षणें होतात.

कफाधिकाचें लक्षण.

कफे स्तैमित्यगुरुतासुप्तिस्निग्धत्वशीतताः ।

कफाधिक्यानें ओलसरपणा, जडत्व, बधिरपणा, स्निग्धपणा व शीतता हीं लक्षणें होतात.

द्वंद्वज व त्रिदोषजाचें लक्षण.

कण्डूर्मन्दा च रुग्द्वंद्वे सर्वलिंगं च संकरे ॥ १ ॥

द्वंद्वज वातरक्तामध्यें कंडू व मंद वेदना असतात. आणि त्रिदोषजामध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात.

पादयोर्मूलमास्थाय कदाचिद्धस्तयोरपि ।
आखोर्विषमिव क्रुद्धं तद्देहमनुसर्पति ॥ २ ॥

आरंभीं वातरक्त पायाच्या किंवा कधीं कधीं हाताच्या मुळाशीं उत्पन्न होऊन उपेक्षेनें उंदराच्या विषाप्रमाणें वाढून अंगावर पसरतें.

असाध्यत्व व याप्यत्व.

आजानु स्फुटितं यच्च प्रभिन्नं प्रस्रुतं च यत् ।

उपद्रवैश्च यज्जुष्टं प्राणमांसक्षयादिभिः ।
वातरक्तमसाध्यं स्याद्याप्यं संवत्सरोत्थितम् ॥ ३ ॥

गुडघ्यापर्यंत असलेलें, फुटलेलें, चिरा पडलेलं, वाहणारें व शक्तिक्षीणता व मांसक्षय वगैरे उपद्रवांनीं युक्त असें वातरक्त असाध्य समजावें. व एक वर्षापलीकडील कोणतेंही वातरक्त याप्य समजावें.

उपद्रव.

अस्वप्नारोचकश्वासमांसकोथशिरोग्रहाः ।
संमूर्च्छा मदरुक्तृष्णा ज्वरमोहप्रलेपकाः ॥ १ ॥
हिक्कापांगुल्यवीसर्पपाकतोदभ्रमक्लमाः ।
अंगुलीवक्रता स्फोटदाहमर्मग्रहार्बुदाः ॥ २ ॥
एतैरुपद्रवैर्युक्तं मोहेनैकेन वाऽपि यत् ।
वातरक्तमसाध्यं स्याद्यच्चातिक्रान्तवत्सरम् ॥ ३ ॥
अकृत्स्नोपद्रवं याप्यं साध्यं स्यान्निरुपद्रवम् ।
एकदोषानुगं साध्यं नवं याप्यं द्विदोषजम् ।
त्रिदोषजमसाध्यं स्याद्यस्य च स्युरुपद्रवाः ॥ ४ ॥

निद्रानाश, अरुचि, श्वास, मांस सडणें, डोकें दुखणें, मूर्च्छा, उन्मत्तपणा, वेदना, तहान, ज्वर, मोह, अंग लेपटल्यासारखें होणें, उचकी, पंगुत्व, विसर्प, पकता, टोचणी, भ्रम, थकवा, बोटें वांकडीं होणें, फोड, दाह, मर्मस्थळीं ओढ लागणें, गांठी उठणें, ह्या उपद्रवांनीं युक्त अगर एकट्या मोहानें युक्त असें वातरक्त असाध्य म्हणून समजावें. त्याचप्रमाणें ज्याला एक वर्ष लोटलें आहे तेंही असाध्य समजावें. ज्यामध्यें सर्व उपद्रव नाहींत तें याप्य, व ज्यामध्यें उपद्रव मुळींच नाहींत तें साध्य समजावें. तसेंच एकदोषजन्य व नवीन असें वातरक्त साध्य, द्विदोषामुळें होणारें याप्य, त्रिदोषापासून झालेलें असाध्य व ज्यामध्यें सर्व उपद्रव झाले आहेत तेंही असाध्य समजावें.

वातरक्ताची चिकित्सा.

वातरक्तं द्विधा ज्ञेयं गम्भीरोत्तानभेदतः ।
त्वङ्मांसाश्रयमुत्तानं गम्भीरं त्वन्तराश्रयम् ॥ १ ॥
कालातिक्रान्तमेतत्तु कष्टं भवति दुर्जरम् ।
विरेकास्थापनस्नेहैर्गम्भीरं तदुपाचरेत् ॥ २ ॥

उत्तानं लेपनाभ्यङ्गपरिषेकावगाहनैः ।
वाताधिकं वातरक्तं स्नेहाद्यैः समुपाचरेत् ॥ ३ ॥
रक्ताढ्यं रक्तमोक्षाद्यैः पित्ताढ्यं रेचनादिभिः ।
कफाढ्यं वमनाद्यैश्च प्रोक्तैरत्रौषधैर्भिषक् ॥ ४ ॥
संसर्गे संनिपाते च क्रियां मिश्रां समाचरेत् ।
वातरक्ते द्वित्रिलिंगे द्वित्रिहेतुसमुत्थिते ॥ ५ ॥
वातशोणितिनो रक्तं स्निग्धस्य बहुशो हरेत् ।
अल्पाल्पं रक्षता वायुं यथादोषं यथाबलम् ॥ ६ ॥
सर्वत्रासृक्स्रुतिः सूचीजलूकाशृंग्यलाबुभिः ।
शतधौतघृताभ्यंगो मेषीदुग्धावसेचनम् ॥ ७ ॥
रूक्षैर्वा मृदुभिः शस्तमसकृद्बस्तिकर्म च ।
न हि बस्तिसमं किंचिद्वातरक्ते चिकित्सितम् ॥ ८ ॥"

वातरक्त हें गंभीर व उत्तान ह्या भेदानें दोन प्रकारचें आहे. त्वचा व मांस ह्यांचा आश्रय करून असतें तें उत्तान व त्याच्याही अंतर्गत धातूंचा आश्रय करून असतें तें गंभीर. फार दिवस लोटल्यावर हें कष्टप्रद व बरें होण्यास फार फार कठीण असें होतें. गंभीर वातरक्तावर विरेचन व आस्थापन बस्ती, व स्नेहन हे उपचार करावे. व उत्तान वातरक्तावर लेप, अभ्यंग, परिषेक व अवगाहन हे उपचार करावे. वाताधिक वातरक्तावर स्नेहनादि उपचार करावे. रक्ताधिक वातरक्तावर रक्त काढणें आणि पित्ताधिकावर विरेचन हे उपचार करावे. त्याचप्रमाणें कफाधिक वातरक्तावर वमनादिक पुढें सांगितलेले उपचार करावे. द्विदोषांच्या व त्रिदोषांच्या कारणानें झालेले द्विदोषज व त्रिदोषज लक्षणांनीं युक्त अशा संसर्गजन्य व संन्निपातिक वातरक्तावर त्या त्या दोषानुरूप मिश्र चिकित्सा करावी. स्नेहन दिलेल्या वातरक्ती रोग्याचें दोषानुरूप व शक्त्यनुसार वाताचा प्रकोप न होईल अशा बेतानें बहुधा रक्त काढावें. सर्व ठिकाणीं रक्त काढावयाचें तें सुई, जळू, शिंग, भोपळा (रक्त काढण्याचा) इत्यादिकांनीं रक्त काढावें. शतधौतघृत अंगास लावावें व मेंढीचें दूध अंगावर शिंपावें. रूक्ष अथवा मृदु औषधांनीं वरचेवर बस्ती देणें प्रशस्त आहे. वातरक्तावर बस्तीसारखा उपचार नाहीं.

वासादि काढा.

वासागुडूचीचतुरंगुलानामेरण्डतैलेन पिबेत्कषायम् ।
क्रमेण सर्वांगजमप्यशेषं जयेदसृग्वातभवं विकारम् ॥ १ ॥

अडुळशाचीं पानें, गुळवेल व बाहव्याची शेंग ह्यांचा काढा एरंडेल घालून प्यावा. तो क्रमानें सर्वांगावरील निःशेष वातरक्ताच्या विकाराला जिंकतो.

नवकार्षिक काढा.

दार्वीगुडूचीकटुकोग्रगन्धामञ्जिष्ठनिम्बत्रिफलाकषायः ।
वातास्रमुच्चैर्नवकार्षिकाख्यो जयेच्च कुष्ठानखिलान्नराणाम्
पञ्चतिक्तकषायेण योजयेन्नवकार्षिकम् ॥ १ ॥

दारुहळद, गुळवेल, कुटकी, वेखंड, मंजिष्ठ, कडुनिंबाची साल, हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांचा काढा वाढलेलें वातरक्त व सर्व प्रकारचीं कुष्ठें ह्यांना जिंकतो.

गुडूच्यादि काढा.

वत्सादन्युद्भवः क्वाथः पीतो गुग्गुलुमिश्रितः ।
समीरेण समायुक्तं शोणितं संप्रणाशयेत् ॥ १ ॥

गुळवेलीचा काढा गुग्गुळ घालून प्यावा. तो वातरक्ताचा नाश करितो.

काश्मर्यादि काढा.

पित्तोत्तरे तु काश्मर्यद्राक्षारग्वधचन्दनैः ।
मधुकक्षीरकाकोलीयुक्तैः क्वाथं सुशीतलम् ।
शर्करामधुसंयुक्तं वातरक्ते पिबेन्नरः ॥ १ ॥

शिवणीचें मूळ, मनुका, बाहव्याची शेंग, चंदन, ज्येष्टमध व क्षीरकाकोली ह्यांचा काढा थंड झाल्यावर पित्तजन्य वातरक्तावर साखर व मध घालून प्यावा.

पटोलादि काढा.

पटोलत्रिफलाभीरुकटुकामृतसाधितम् ।
क्वाथं पीत्वा जयत्याशु सदाहं वातशोणितम् ॥ १ ॥

कडु पडवळ, त्रिफळा, शतावरी, कुटकी व गुळवेल ह्यांचा काढा प्यावा. तो दाहयुक्त वातरक्ताचा त्वरित नाश करतो.

कोकिलादि काढा.

कोकिलाक्षामृताक्राथं पिबेत्कोष्णं यथाबलम् ।
पथ्यभोजी त्रिसप्ताहान्मुच्यते वातशोणितात् ॥ १ ॥

तालिमखान्याच्या मुळ्या व गुळवेल ह्यांचा काढा यथाशक्ति तीन सप्तकें प्राशन करावा व पथ्य करावें. म्हणजे वातरक्तापासून पुरुष मुक्त होतो.

लघुमंजिष्ठादि काढा.

मंजिष्ठा त्रिफला तिक्ता वचा दारुनिशाऽमृता ।
निम्बश्चैषां कृतः क्राथो वातरक्तविनाशनः ।
पामाकपालिकाकुष्ठरक्तमण्डलाजिन्मतः ॥ १ ॥

मंजिष्ट, त्रिफळा, कुटकी, वेखंड, दारुहळद, गुळवेल व कडुनिंबाची साल ह्यांचा काढा वातरक्ताचा नाश करतो. तसेंच तो खरूज, कापालिक कुष्ट व रक्ताचीं मंडलें ह्यांचा नाश करितो.

बृहन्मंजिष्ठादि काढा.

मंजिष्ठामुस्तकुटजगुडूचीकुष्ठनागरैः ।
भार्गीक्षुद्रावचानिम्बनिशाद्वयफलत्रिकैः ॥ १ ॥
पटोलकटुकामूर्वाविडङ्गासनचित्रकैः ।
शतावरीत्रायमाणाकृष्णेन्द्रयववासकैः ॥ २ ॥
भृंगराजमहादारुपाठाखदिरचन्दनैः ।
त्रिवृद्वरुणकैरातबाकुचीकृतमालकैः ॥ ३ ॥
शाखोटकमहानिम्बकरञ्जातिविषाजलैः ।
इन्द्रवारुणिकानन्तासारिवापर्पटैः समैः ॥ ४ ॥
एभिः कृतं पिबेत्क्राथं कणागुग्गुलुसंयुतम् ।
अष्टादशसु कुष्ठेषु वातरक्तार्दिते तथा ॥ ५ ॥
उपदंशे श्लीपदे च प्रसुप्तौ पक्षघातके ।
मेदोदोषे नेत्ररोगे मंजिष्ठादिः प्रशस्यते ॥ ६ ॥

मंजिष्ट, नागरमोथे, कुडा, गुळवेल, कोष्ट, सुंठ, भारंगमूळ, रिंगणमूळ, वेखंड, बाळंतलिंबाची साल, हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कडुपडवळ, कुटकी, मोरवेल, वावडिंग, असाणा, चित्रकमूळ, शतावरी, त्रायमाण, पिंपळी, इंद्रजव, आडुळसा, माका, देवदार, पहाडमूळ, खैर, चंदन, तेड, वाय-

वर्णा, काडेचिराईत, बावच्या, बाहव्याची शेंग, सोहाडा, बकाण्या निंबाची साल, करंजाची साल, अतिविष, वाळा, कडु इंद्रावण, धमासा, उपलसरी व पित्तपापडा हीं सर्व औषधें समभाग घालून काढा करावा आणि तो गुग्गुळ घालून द्यावा. अठरा प्रकारचीं कुष्टें, वातरक्त, उपदंश, श्लीपद, बधिरता, पक्षाघात, मेदोरोग व नेत्ररोग ह्या विकारांवर हा मंजिष्ठादि काढा प्रशस्त आहे.

कैशोर गुग्गुळ.

त्रिफलायास्त्रयः प्रस्थाः प्रस्थैकममृता भवेत् ।
संक्षुद्य लोहपात्रे तु सार्धद्रोणाम्बुना पचेत् ॥ १ ॥
जलमर्धं शृतं ज्ञात्वा गृह्णीयाद्वस्त्रगालितम् ।
ततः क्वाथे क्षिपेच्छुद्धं गुग्गुलुं प्रस्थसंमितम् ॥ २ ॥
पुनः पचेदयस्पात्रे दर्व्या संघट्टयेन्मुहुः ।
सान्द्रीभूतं च तं ज्ञात्वा गुडपाकसमाकृतिम् ॥ ३ ॥
चूर्णीकृत्य ततस्तत्र द्रव्याणीमानि निक्षिपेत् ।
त्रिफला द्विपला ज्ञेया गुडूची पलिका मता ॥ ४ ॥
षडक्षं त्र्यूषणं प्रोक्तं विडङ्गं च पलार्धकम् ।
दन्ती कर्षमिता कार्या त्रिवृत्कर्षमिता स्मृता ॥ ५ ॥
ततः पिण्डीकृतं सर्वं घृतभाण्डे विनिक्षिपेत् ।
गुटिकाः शाणिकाः कृत्वा युञ्ज्याद्दोषाद्यपेक्षया ॥ ६ ॥
अनुपानं भिषग्दद्यात्कोष्णं नीरं पयोऽथवा ।
मंजिष्ठादिशृतं वाऽपि युक्तियुक्तमतः परम् ॥ ७ ॥
जयेत्सर्वाणि कुष्ठानि वातरक्तं त्रिदोषजम् ।
सर्वव्रणांश्च गुल्मांश्च प्रमेहपिटकास्तथा ॥ ८ ॥
प्रमेहोदरमन्दाग्निकासश्वयथुपाण्डुताः ।
हन्ति सर्वामयान्नित्यमुपयुक्तो रसायनः ॥ ९ ॥
कैशोरकाभिधानोऽयं गुग्गुलुः कान्तिकारकः ।
वासादिना नेत्रगदान्गुल्मादीन्वरुणादिना ॥ १० ॥
क्वाथेन खदिरस्यापि व्रणान्कुष्ठान्विनाशयेत् ।
अम्लं तीक्ष्णमजीर्णं च व्यवायं श्रममातपम् ।
मद्यं रोषं त्यजेत्सम्यग्गुणार्थी पुरसेवकः ॥ ११ ॥

हिरडा, बेहडा व आवळकाठी प्रत्येक चौसष्टचौसष्ट तोळे व गुळवेल चौसष्ट तोळे घेऊन कुटून लोखंडाच्या भांड्यांत पंधराशें छत्तीस तोळे पाणी घालून त्यांत तीं द्रव्यें टाकून अर्धें पाणी आटल्यावर

काढा वस्त्रगाळ करून घ्यावा. व त्यांत चौसष्ट तोळे शुद्ध गुग्गुळ घालून पुनः लोखंडाच्या भांड्यांत घालून कढवावा व वरचेवर पळीनें ढवळावें. गुडपाकाप्रमाणें घट्ट झाल्यावर त्यांत पुढील द्रव्यांचें चूर्ण घालावें. त्रिफळा आठ तोळे, गुळवेल चार तोळे; सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण सहा तोळे, वावडिंग दोन तोळे, दांतीमूळ एक तोळा, व तेड एक तोळा. ह्याप्रमाणें औषधांचें चूर्ण घालून तीन तीन माशांच्या गोळया करून तुपानें रावलेल्या मातीच्या भांड्यांत ठेवाव्या. आणि दोषांचा विचार करून योजना करून द्याव्या. ह्याला कोमट पाणी अथवा दूध हें अनुपान द्यावें. किंवा मंजिष्ठादि काढा अगर आपल्या विचाराप्रमाणें दुसरेंही अनुपान योजावें. हा सर्व कुष्ठें, त्रिदोषजन्य वातरक्त, सर्व व्रण, गुल्म, प्रमेहपीटिका, प्रमेह, उदर, अग्निमांद्य, खोकला, सूज, पांडुरोग ह्यांना जिंकतो. हा नित्य घेतला असतां सर्व रोगांचा नाश करतो. हा रसायन आहे. हा कैशोरक नांवाचा गुग्गुळ कांतिकारक आहे. वासादि गणाच्या काढ्यांतून दिला असतां हा नेत्ररोगांचा नाश करतो. वरुणादि गणाच्या काढ्यांतून दिला असतां गुल्मादिकांचा नाश करतो. खैराच्या काढ्यांतून दिला असतां व्रण व कुष्ठ ह्यांचा नाश करतो. आंबट व तीक्ष्ण पदार्थ, अजीर्ण होईपर्यंत खाणें, मैथुन, श्रम, ऊन, मद्य व राग हेही गुग्गुळ सेवन करणारानें वर्ज करावें.

अमृतादि गुग्गुळ.

प्रस्थमेकं गुडूच्याश्च सार्धप्रस्थं तु गुग्गुलोः ।
प्रत्येकं त्रिफलायाश्च तत्प्रमाणं विनिर्दिशेत् ॥ १ ॥
सर्वमेकत्र संक्षिप्य क्काथयेन्नल्वणेऽम्भसि ।
पादशेषं परिस्राव्य कषायं ग्राहयेद्भिषक् ॥ २ ॥
पुनः पचेत्कषायं तु यावत्सान्द्रत्वमाप्नुयात् ।
दन्तीव्योषविडङ्गानि गुडूचीत्रिफलात्वचः ॥ ३ ॥
ततश्चार्धपलं पूतं गृह्णीयाद्वा प्रति प्रति ।
कर्षं तु त्रिवृतायाश्च सर्वमेकत्र चूर्णयेत् ॥ ४ ॥
तस्मिन्सुसिद्धं विज्ञाय कोष्णं पात्रे विनिक्षिपेत् ।

ततश्चाग्निबलं दृष्ट्वा तस्य मात्रां प्रयोजयेत् ॥ ५ ॥
वातरक्तं तथा कुष्ठं गुदजानग्निसादनम् ।
दुष्टव्रणं प्रमेहं च आमवातभगंदरान् ॥ ६ ॥
खाञ्ज्याढ्यवाताऽश्वयथून्सर्वान्वातान्व्यपोहति ।
अश्विभ्यां निर्मितः पूर्वममृताद्यश्च गुग्गुलुः ॥ ७ ॥

चौसष्ट तोळे गुळवेल व शहाण्णव तोळे गुग्गूळ, हिरडा, बेहडा व आवळकाठी प्रत्येक शहाण्णव शहाण्णव तोळे या सर्वांचें एकत्र चूर्ण करून दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून तो गाळून घेऊन पुनः घट्ट होईपर्यंत कढवावा. नंतर दांतीमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंगें, गुळवेल, त्रिफळा, दालचिनी ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण दोन दोन तोळे व तेडाचें चूर्ण एक तोळा, सर्व एकत्र करून त्यांत मिसळून निवत आल्यावर भांड्यांत भरून ठेवावा आणि अग्निबल पाहून ह्याची योजना करावी. वातरक्त, कुष्ठ, मूळव्याध, अग्निमांद्य, दुष्ट व्रण, प्रमेह, आमवात, भगंदर, पंगुत्व, आढ्यवात, सूज व सर्व वात ह्यांचा नाश करतो. हा अमृतादि गुग्गुळ पूर्वी अश्विनीकुमारांनीं सांगितला आहे.

लघुमरिचादि तेल.

मरिचालशिलार्कपयःकलिनीविषमुष्टिविषामरनिम्बगणैः ।
कुटजं सचतुर्गुणगोम्बुशृतं किल तैलमसृक्पवनापहरम् ॥१॥

मिरें, हरताळ, मनशीळ, रुईचा चीक, कळलावी, कुचला, वचनाग, देवदार, बाळंतनिंबाची साल, नागरमोथे, कुडा ह्यांचा कल्क व चौपट गोमूत्र ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें वातरक्ताचा नाश करितें.

बृहन्मरिचादि तेल.

मरिचं त्रिवृता दन्ती क्षीरमार्कं शकृद्रसः ।
देवदारु हरिद्रे द्वे मांसी कुष्ठं सचन्दनम् ॥ १ ॥
विशाला करवीरं च हरितालं मनःशिला ।
चित्रकं लाङ्गली चापि विडंगं चक्रमर्दकम् ॥ २ ॥
शिरीषं कुटजो निम्बः सप्तपर्णोऽमृता स्नुही ।
शम्याको नक्तमालश्च खदिरः पिप्पली वचा ॥ ३ ॥
ज्योतिष्मती च पलिका विषस्य द्विपलं मतम् ।

आढकं कटुतैलस्य गोमूत्रं च चतुर्गुणम् ॥ ४ ॥
मृत्पात्रे लोहपात्रे वा शनैर्मृद्वग्निना पचेत् ।
एतत्तैलं विशेषेण नाशयेत्कुष्ठजान्व्रणान् ।
वातरक्तभवान्व्याधीन्पामाविस्फोटचर्चिकाम् ॥ ५ ॥

मिरें, तेड, दांतीमूळ, रुईचा चीक, गाईच्या शेणाचा रस, देवदार, हळद, दारुहळद, जटामांशी, कोष्ट, पांढरा चंदन, कवंडळ, कणेरीचें मूळ, हरिताळ, मनशीळ, चित्रक, कळलावी, वावडिंग, टाकळ्याचें बीं, शिरसाचें बीं, कुडा, कडू लिंबाची साल, सातवीण, गुळवेल, त्रिधारी निवडुंग, बाहव्याची साल, करंजाची साल, खैराची साल, पिंपळी, वेखंड व मालकांगोणी हीं औषधें चार चार तोळे व बचनाग आठ तोळे ह्यांचा कल्क करून त्यांत शिरसाचें तेल दोनशें छपन्न तोळे घालून तेलाच्या चौपट गोमूत्र घालावें. आणि मातीच्या भांड्यांत अगर लोखंडाच्या भांड्यांत मंदाग्नीनें तेल सिद्ध करावें. हें तेल विशेषतः कुष्टजन्यव्रणाचा नाश करितें. तसेंच वातरक्तासंबंधीं विकार, खरूज, फोड, विचर्चिका ह्यांचाही नाश करितें.

पिंडतेल.

मञ्जिष्ठासारिवासर्जयष्टीसिक्थपयोन्वितैः ।
पिण्डाख्यं साधयेत्तैलमभ्यङ्गाद्वातरक्तनुत् ॥ १ ॥

मंजिष्ठ, उपलसरी, राळ, ज्येष्ठमध व मेण ह्यांचा कल्क व दूध ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. ह्याला पिंडतेल म्हणतात. ह्याच्या अभ्यंगानें वातरक्ताचा नाश होतो.

सारिवादि तेल.

सारिवासर्जयष्ट्याह्वमधूच्छिष्टपयोन्वितैः ।
सिद्धमेरण्डजं तैलमभ्यंगाद्वातरक्तनुत् ॥ १ ॥

उपलसरीच्या मुळ्या, राळ, जेष्ठमध व मेण ह्यांचा कल्क व दूध ह्यांमध्यें एरंडतेल सिद्ध करावें; तें अंगास लावलें असतां वातरक्ताचा नाश करितें.

पद्मकाष्ठ तेल.

पद्मकोशीरयष्ट्याह्वरजनीक्वाथसाधितम् ।

स्यात्पिष्टैः सर्जमञ्जिष्ठावीराकाकोलिचन्दनैः ।
पद्मकाद्यमिदं तैलं वातासृग्दाहनाशनम् ॥ १ ॥

पद्मकाष्ठ, वाळा, जेष्ठमध व हळद ह्यांच्या काढ्यामध्यें राळ, मंजिष्ठ, शतावरी, काकोली व चंदन ह्यांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें. ह्याला पद्मकादि तेल म्हणतात. हें वातरक्त व दाह ह्यांचा नाश करितें.

गुडूच्यादि तेल.

गुडूचीक्वाथकल्काभ्यां तैलं लाक्षारसेन वा ।
सिद्धं मधूककाश्मर्यरसे वा वातरक्तनुत् ॥ १ ॥

गुळवेलीच्या काढ्यांत गुळवेलीचाच कल्क घालून तेल सिद्ध करावें; अगर लाखेचा काढा घालून सिद्ध करावें. किंवा जेष्ठमध व शिवण ह्यांच्या काढ्यानें सिद्ध करावें. तें वातरक्ताचा नाश करितें.

शताव्हादि तेल.

शताह्वया च कुष्ठेन मधुकेन नवेन वा ।
एकैकं साधितं तैलं वातरक्तरुजापहम् ॥ १ ॥

बडिशेप, कोष्ठ, अथवा ताजा जेष्ठमध ह्यांपैकीं प्रत्येकानें सिद्ध केलेलें तेल वातरक्तसंबंधीं पीडेचा नाश करितें.

अमृतादि घृत.

अमृताक्वाथकल्काभ्यां सक्षीरं विपचेद् घृतम् ।
वातरक्तं जयत्याशु कुष्ठं जयति दुस्तरम् ॥ १ ॥

गुळवेलीचा काढा व कल्क ह्यांमध्यें दुधासह तूप सिद्ध करावें. तें वातरक्ताला त्वरित जिंकतें आणि दुस्तर कुष्ठाचाही नाश करितें.

महातिक्त घृत.

भूनिम्बाम्बुदनिम्बवत्सककणात्रायन्त्यनन्तामृता-
तिक्ताभीरुफलत्रिकप्रतिविषामूर्वाविशालाजलैः ।
पाठापर्पटसारिवाद्वयनिशायुग्यष्टिकापद्मकैः
सोशीरैः सपटोलचन्दनवचाशम्याकसप्तच्छदैः ॥ १ ॥
इत्येभिर्गदितैर्जलाष्टगुणितैः प्रस्थं पचेत्सर्पिषो
गव्यस्याऽऽमलकीरसद्विगुणितं नाम्ना हि तिक्तं घृतम् ।
हन्त्येतद्गलगण्डमण्डलरुजं कण्डूं सपाण्ड्वामयां
शोफश्लीपदवातरक्तविकृतीः कुष्ठानि चाष्टादश ॥ २ ॥

—२ यो. र.

काडेचिराईत, नागरमोथे, कुडा, पिंपळी, त्रायमाण, धमासा, गुळवेल, कुटकी, शतावरी, त्रिफळा, अतिविष, मोरवेल व कवंडळ, ह्यांचा काढा आणि पहाडमूळ, पित्तपापडा, काळी व पांढरी उपलसरी, हळद, दारुहळद, जेष्टमध, पद्मकाष्ट, वाळा, कडूपडवळ, रक्तचंदन, वेखंड, बाहव्याची शेंग व सातविणीची साल, ह्यांचा कल्क व आठपट पाणी घालून चौसष्ट तोळे गाईचें तूप त्याच्या दुप्पट आवळ्याचा रस घालून पचन करावें. ह्याला महातिक्तकघृत म्हणतात. हें गालगुंड, मंडलकुष्ठाची पीडा, कंड, पांडुरोग, सूज, श्लीपद, वातरक्तसंबंधीं विकार व अठरा प्रकारचीं कुष्टें ह्यांचा नाश करितें.

छिन्नोद्भवाकषायेण सेव्यं शुद्धं शिलाजतु ।
पञ्चकर्मविशुद्धेन वातरक्तप्रशान्तये ॥ १ ॥

वातरक्त दूर होण्याकारितां वमनविरेचनादि पंचकर्मानें देहशुद्धि करून गुळवेलीच्या काढ्यांतून शुद्ध शिलाजित घ्यावा, म्हणजे वातरक्ताची शांति होते.

अमृतादि अवलेहिका.

अमृता कटुका शुण्ठी यष्टीकल्कं समाक्षिकम् ।
गोमूत्रपीतं जयति सकफं वातशोणितम् ॥ १ ॥

गुळवेल, कुटकी, सुंठ व जेष्टमध ह्यांचा गोमूत्रामध्यें कल्क करून मध घालून प्यावा. म्हणजे तो कफयुक्त वातरक्ताला जिंकतो.

गूडूचीयोग.

गुडूच्याः स्वरसं कल्कं चूर्णं वा क्वाथमेव च ।
प्रभूतकालमासेव्यं मुच्यते वातशोणितात् ॥ १ ॥

गुळवेलीचा स्वरस, कल्क, चूर्ण किंवा काढा पुष्कळ दिवसपर्यंत घ्यावा, म्हणजे वातरक्तापासून मुक्त होतो.

लेपन.

प्रपौण्डरीकमञ्जिष्ठादार्वीमधुकचन्दनैः ।
सितोपलैलासक्तुश्च मसूरोशीरपद्मकैः ॥ १ ॥
लेपो रुग्दाहवीसर्परागशोफनिवारणः ।
लेप्याः पिष्टास्तिलास्तद्वद्भृष्टाः पयसि निर्वृताः ॥ २ ॥

पुंडरीक वृक्षाची साल, मंजिष्ठ, दारुहळद, जेष्टमध, पांढरा चंदन, खडीसाखर, वेकदोडे, सातु, मसुरा, वाळा व पद्मकाष्ट ह्या औषधांचा लेप ठणका, दाह, विसर्प, लाली व सूज ह्यांचा नाश करतो. त्याचप्रमाणें शूळ (ठणका) दूर होण्याकरितां तीळ भाजून दुधांत वाटून त्यांचा लेप करावा.

क्षीरपिष्टामुमालेपमेरण्डस्य फलानि च ।
कुर्याच्छूलनिवृत्त्यर्थं शताह्वां वाधिकेऽनिले ॥ ३ ॥

किंवा जवस दुधांत वाटून त्यांचा लेप करावा. एरंड्यांतील मगज काढून दुधांत वाटून त्यांचा लेप करावा. वातदोष अधिक असेल तर बडिशेपेचा लेप करावा.

मूत्रक्षीरसुरासिद्धं घृतमभ्यञ्जने हितम् ।
सिद्धं समधुसूक्तं तु सेकाभ्यंगे कफोत्तरे ॥ ४ ॥

गोमूत्र, दूध व मद्य ह्यांच्यामध्यें सिद्ध केलेलें तूप अंगास लावण्यास हितकारक आहे. आणि मध व सूक्त (कांजीचाच एक प्रकार) ह्यांत सिद्ध केलेलें तूप कफाधिक वातरक्तांत प्रशस्त आहे.

गृहधूमवचाकुष्ठशताह्वारजनीद्वयम् ।
प्रलेपः शूलनुद्वातरक्ते वातकफोत्तरे ॥ ५ ॥

घरोसा, वेखंड, कोष्ट, बडिशेप, हळद व दारुहळद, ह्यांचा लेप कफाधिक वातरक्तसंबंधी शूळाचा नाश करतो.

उभे शताह्वे मधुकं विशालां बलां प्रियालं च कसेरुयुग्मम् ।
घृतं विदारीं च सितोपलां च कुर्यात्प्रदेहं पवने सरक्ते ॥ १ ॥

बाळंतशेप, बडिशेप, जेष्टमध, कवंडळ, चिकणामूळ, चारोळी, कचरा, नागरमोथे, तूप, भुईकोहाळा व खडीसाखर ह्यांचा वातरक्तावर लेप करावा.

सहस्रशतधौतेन घृतेन रुधिरोत्तरे ।
लेपनं चोष्मशीतेन घृतसर्जरसेन वा ॥२ ॥

रक्ताधिक वातरक्तावर शतधौत अथवा सहस्रधौत तुपानें लेप करावा. किंवा राळ व तूप मिश्र करून तें कोमट असतांना त्याचा लेप करावा.

आरनालाढके तैलं पादसर्जरसं शृतम् ।
प्रस्थस्थे निर्जिते तोये ज्वरदाहार्तिनुत्परम् ॥ ३ ॥

दोनशें छप्पन्न तोळे कांजीमध्यें सोळा तोळे राळ व चौसष्ट तोळे तेल घालून तें सिद्ध करावें. पाणी आटल्यावर तेल काढून घ्यावें. तें ज्वर, दाह व ठणका दूर करण्याविषयीं फार उत्तम आहे.

समधूच्छिष्टमञ्जिष्ठा ससर्जरससारिवा ।
पिण्डतैलं तथाऽभ्यंगाद्वातरक्तरुजापहम् ॥ ४ ॥

मेण, मंजिष्ठ, राळ व उपलसरी ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल अथवा पिंडतेल ह्यांचें अभ्यंग केलें असतां तें वातरक्तसंबंधी पीडा दूर करितें.

पंचामृत रस.

पारदं च क्रियाशुद्धं तत्तुल्यं शुद्धगन्धकम् ।
अभ्रकं तु द्वयोस्तुल्यं त्रिभिस्तुल्यस्तु गुग्गुलुः ॥ १ ॥
सर्वांशममृतासत्त्वं भावयेदौषधैः पृथक् ।
निर्गुण्डीगोक्षुरच्छिन्नाकोकिलाक्षांघ्रिजै रसैः ॥ २ ॥
सप्तवारं ततो युञ्ज्याद्वातरक्ते त्रिवल्लकम् ।
कोकिलाक्षस्य मूलानां पानीयमनुपाययेत् ॥ ३ ॥

संस्कारानें शुद्ध केलेला पारा व शुद्ध गंधक समभाग, अभ्रक दोन भाग, गुग्गुळ चार भाग आणि गुळवेलीचें सत्व आठ भाग ह्यांचा एकत्र खल करून निर्गुडी, गोखरू, गुळवेल, तालिमखान्याच्या मुळ्या ह्यांच्या रसाच्या सात सात भावना द्याव्या. नंतर हा पंचामृत रस तीन वालप्रमाणें वातरक्तावर द्यावा, आणि त्याजवर काटेकोळिस्त्याच्या मुळांचा काढा प्राशनार्थ द्यावा.

पथ्यापथ्य.

यवषष्टिकनीवारकलमारुणशालयः ।
गोधूमाश्चणका मुद्गास्तुवर्योऽपि मकुष्ठकाः ॥ १ ॥
अव्यजामहिषीणां च गवामपि पयांसि च ।
उपोदिका काकमाची वेत्राग्रं सुनिषण्णकम् ॥ २ ॥
वास्तुकं कारवेल्लं च तण्डुलीयं पटोलकम् ।
धात्रीफलं शृङ्गबेरं सूरणं श्वेतशर्करा ॥ ३ ॥
मृद्वीका वृद्धकूष्माण्डं नवनीतं नवं घृतम् ।
लावतित्तिरवर्तीकताम्रचूडाविविष्किराः ॥ ४ ॥
प्रतुदाः शुकदात्यूहकपोतचटकादयः ।

शशिनागरुदेवाह्वसरलस्नेहमर्दनम् ॥ ५ ॥
तिक्तं च पथ्यमुद्दिष्टं वातरक्तगदे नृणाम् ।

सातू, साठेसाळी, देवभात, कलमी साळी, तामसाळ, गहू, हरभरे, मूग, तुरी, मटक्या; मेंढी, शेळी, म्हैस व गाय ह्यांचें दूध; मयाळ, काकमाची (कांगोणी) वेताचे कोंब, कुरडु, चंदनबटवा, कारली, तांदुळजा व पडवळ ह्या भाजा; आवळे, आलें, सुरण, धुवा साखर, मनुका, जुना कोहाळा, ताजें लोणी व तूप, लावा, तित्तिर पक्षी, गांजिण पक्षी, कोंबडा व विष्किर प्राणी, प्रतुद जातीचे प्राणी, पोपट, पाणकावळा, होला व चिमण्या वगैरे पक्ष्यांचीं मांसें कापूर, अगर, देवदार व सरळ देवदार ह्या द्रव्यांनीं तयार केलेल्या तेलानें मर्दन करणें व कडू पदार्थ खाणें हें वातरक्तावर पथ्य सांगितलें आहे.

दिवास्वप्नाग्निसंतापव्यायामातपमैथुनम् ॥ ६ ॥
माषाः कुलत्था निष्पावाः कलायाः क्षारसेवनम् ।
अण्डजानूपमांसानि विरुद्धानि दधीनि च ॥ ७ ॥
इक्षवो मूलकं मद्यं ताम्बूलं कांजिकं तिलान् ।
कटूष्णं गुर्वभिष्यन्दि लवणानि च सक्तवः ।
एतानि वातरक्तेषु नैव युज्याद्भिषग्वरः ॥ ८ ॥

दिवसा निजणें, अग्नीचा शेक, व्यायाम ऊन घेणें, मैथुन, उडीद, हुलगे, पावटे, वाटाणे, क्षार सेवन करणें, अंडज व अनुप प्राण्यांचीं मांसें, विरुद्ध अन्नें, दहीं, ऊंस, मुळे, मद्य, तांबूल (विडा), कांजी, तीळ, तिखट, उष्ण, जड, अभिष्यंदी (स्रावी), मीठ, सातु हे पदार्थ वैद्यानें वातरक्तावर देऊं नयेत. (अर्थात् ते अपथ्यकारक आहेत.)

ऊरुस्तंभाचें निदान.

शीतोष्णद्रवसंशुष्कगुरुस्निग्धैर्निषेवितैः ।
जीर्णाजीर्णैस्तथाऽऽयाससंक्षोभस्वप्नजागरैः ॥ १ ॥
सश्लेष्ममेदःपवनमाममत्यर्थसंचितम् ।
अभिभूयेतरं दोषमूरू चेत्प्रतिपद्यते ॥ २ ॥
सक्थ्यस्थीनि प्रपूर्यान्तःश्लेष्मणा स्तिमितेन च ।
तदा स्तभ्नाति तेनोरू स्तब्धौ शीतावचेतनौ ॥ ३ ॥

परकीयाविव गुरू स्यातामतिभृशव्यथौ ।
ध्यानाङ्गमर्दस्तैमित्यतन्द्राछर्द्यरुचिज्वरैः ॥ ४ ॥
संयुतौ पादसदनकृच्छ्रोद्धरणसुप्तिभिः ।
तमूरुस्तम्भमित्याहुराढ्यवातमथापरे ॥ ५ ॥

थंड, उष्ण, पातळ, कोरडें, जड व स्निग्ध अन्न खाण्यानें; पक्वापक्व अन्न मिश्र करून खाण्यानें, तसेंच आयास, मन क्षुब्ध होणें, दिवसा निजणें व रात्रीं जागणें ह्या कारणांनीं कफासहवर्तमान मेद व आमासह वायु हे अतिशय संचित होऊन दुसऱ्या दोषांना मागें सारून मांड्यामध्यें आले तर कफानें मांडीचीं हाडें भरून जातात आणि त्यामुळें ताठतात. त्यांना हालचाल करितां येत नाहीं, त्या गार होतात व त्यांच्यामधील चैतन्य नष्ट होतें. त्या दुसऱ्याच्या आहेत कीं काय इतक्या जड वाटतात. त्या अत्यंत दुखतात. शिवाय काळजी, अंग दुखणें, अंग ओलसर होणें, तंद्रा, ओकारी, अरुचि व ज्वर हे विकार होतात. पाय गळल्याप्रमाणें होतात, ते मोठ्या कष्टानें उचलावे लागतात. ते बधिर होतात. ह्या रोगाला ऊरुस्तंभ म्हणतात व कित्येक आढ्यवात म्हणतात.

प्राग्रूपं तस्य निद्राऽतिध्यानं स्तिमितता ज्वरः ।
रोमहर्षोऽरुचिश्छर्दिर्जंघोर्वोः सदनं तथा ॥ ६ ॥

अतिशय झोंप येणें, काळजी, जडपणा, ज्वर, अंगावर कांटा येणें, अरुचि, ओकारी, आणि पोटऱ्या व मांड्या गळल्यासारख्या वाटणें हें उरुस्तंभाचें पूर्वरूप आहे.

वातशंकिभिरज्ञानात्तस्य स्यात्स्नेहनात्पुनः ।
पादयोः सदनं सुप्तिः कृच्छ्रादुद्धरणं तथा ॥ ७ ॥
जंघोरुग्लानिरत्यर्थं शश्वच्चादाहवेदनाः ।
पदं च व्यथते न्यस्तं शीतस्पर्शं न वेत्ति च ॥ ८ ॥
संस्थाने पीडने गत्यां चलने चाप्यनीश्वरः ।
अन्यस्येव हि संभग्नावूरू पादौ च मन्यते ॥ ९ ॥
ऊर्वोर्यथा च पारुष्यं तन्द्रा स्तैमित्यमंगरुक् ।
पादस्योद्धरणं कृच्छ्रात्तमूरुस्तम्भमादिशेत् ॥ १० ॥

हा वातप्रकोप आहे असें मानून जर ह्या ऊरुस्तंभावर स्नेहन उपचार केले तर रोग अधिक वाढतो. पाय जास्तच गळल्या-

सारखे होतात. ते बधिर होतात. ते वर उचलावयास फार आयास पडतात. पिंडऱ्या व मांड्या अतिशय गळल्यासारख्या होतात. त्यांत सतत दाह व वेदना असतात. पाऊल टाकलें असतां फार व्यथा होते. मांडीला शीत पदार्थाचा स्पर्श कळत नाहीं. मांडी उचलून ठेवण्यास, दडपण्यास चालण्यास, व हालविण्यास तो रोगी असमर्थ असतो. पाय व मांड्या अगदीं मोडल्यासारख्या होऊन त्या जणूं काय दुसऱ्याच्याच आहेत अशा वाटतात. मांड्या अतिशय दुखतात. त्यांना खरखरीतपणा असतो. ग्लानि, जडत्व, अंग दुखणें आणि कष्टानें पाय उचलणें हीं लक्षणें असलीं म्हणजे त्या रोगाला ऊरुस्तंभ असें म्हणावें.

यदा दाहार्तितोदार्तो वेपनः पुरुषो भवेत् ।
ऊरुस्तम्भस्तदा हन्यात्साधयेदन्यथा नवम् ॥ ११ ॥

ज्या वेळीं तो रोग दाह व टोचणी ह्यांनीं पीडित होतो व थरथर कापूं लागतो, त्या वेळीं तो ऊरुस्तंभ त्या रोग्याचा नाश करणार असें समजावें. परंतु हीं लक्षणें नसून तो नवीनच असेल तर तो बरा होतो.

ऊरुस्तंभाची चिकित्सा.

स्नेहासृक्स्राववमनबस्तिकर्म च रेचनम् ।
वर्जयेदाढ्यवातेषु तैश्च तस्य विरोधतः ॥ १ ॥
तस्मादत्र सदा कार्यं स्वेदलङ्घनरूक्षणम् ।
आममेव कफाधिक्यान्मारुतं परिरक्षता ॥ २ ॥
यत्स्यात्कफप्रशमनं न च मारुतकोपनम् ।
तत्सर्वं सर्वदा कार्यमूरुस्तम्भस्य भेषजम् ॥ ३ ॥
सर्वौषधक्रमः कार्यस्तत्राऽऽदौ कफनाशनः ।
पश्चाद्वातविनाशाय कृत्स्ना कार्या क्रिया यथा ॥ ४ ॥
रूक्षणाद्वातकोपश्चेन्निद्रानाशार्तिसूचकः ।
स्नेहस्वेदक्रमस्तत्र कार्यो वातामयापहः ॥ ५ ॥
प्रतारयेत्प्रतिस्रोतो नदीं शीतजलाशयाम् ।
सरश्चैवामलं शीतं स्थिरतोयं पुनः पुनः ॥ ६ ॥
तथा विशुष्केऽस्य कफे शान्तिमूरुग्रहो व्रजेत् ।
शरीरं बलमग्निं च कार्यैषा रक्षताऽऽमयम् ॥ ७ ॥

तेल लावणें, रक्त काढणें, वमन, बस्तिकर्म व रेचक हे उपचार ऊरुस्तंभाशीं विरुद्ध असल्यामुळें त्याजवर करूं नयेत. ऊरुस्तंभामध्यें आम व कफ अधिक असल्यामुळें वायूचें रक्षण करणाऱ्या वैद्यानें त्याजवर स्वेदन, लंघन व रूक्षण अशा प्रकारचे उपचार नेहमीं करावे. ह्या ऊरुस्तंभावर नेहमीं वाताचा प्रकोप न करणारी व कफनाशक अशी चिकित्सा करावी. ऊरुस्तंभावर प्रथमतः जी औषधयोजना करावयाची ती कफनाशक करावी. नंतर वातनाशाकरितां योग्य वाटेल तशी सर्व वातनाशक क्रिया करावी. रूक्ष उपचारानें जर वातप्रकोप झाला तर तो निद्रानाशजन्य पीडेचा सूचक असतो. तसें झालें असतां त्याजवर वातनाशक असा स्नेहस्वेदादि क्रम करावा. ऊरुस्तंभाच्या रोग्याला नदीच्या प्रवाहाच्या उलट पोहत न्यावें. थंड पाण्याच्या जलाशयांत किंवा ज्या सरोवराचें पाणी स्थिर, स्वच्छ व शीत आहे, त्यांत वरचेवर पोहावयास लावावें. ह्याप्रमाणें केल्यावर कफ शुष्क झाला असतां ऊरुस्तंभाची शांति होते. शरीर, बळ व अग्नि ह्यांच्याबद्दल योग्य खबरदारी घेऊन ही पोहण्याची क्रिया करावी.

पुनर्नवादि काढा.

पुनर्नवानागरदारुपथ्याभल्लातकच्छिन्नरुहाकषायः ।
दशांघ्रिमिश्रः परिपेय ऊरुस्तम्भेऽथवा मूत्रपुरप्रयोगः ॥ १ ॥

ऊरुस्तंभावर घेटुळीची मुळी, सुंठ, देवदार, हिरडेदळ, बिब्बे, गुळवेल व दशमुळें ह्यांचा काढा घ्यावा, अथवा गोमूत्रांतून शुद्ध गुग्गुळ घ्यावा.

ग्रंथिकादि काढा.

ग्रन्थिकारुष्करकृष्णानां क्वाथं क्षौद्रान्वितं पिबेत् ।
चव्याभयाग्निदारूणां कल्कं वा मधुसंयुतम् ॥ १ ॥

पिंपळमूळ, बिब्बा व पिंपळी ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. चवक, हिरडे, चित्रकमूळ व देवदार ह्यांचा कल्क मध घालून घ्यावा.

पिप्पल्यादि योग.

पिप्पलीं वर्धमानां वा माक्षिकेण गुडेन वा ।

ऊरुस्तम्भे प्रशंसन्ति गण्डीरारिष्टमेव च ॥ १ ॥

वर्धमानपिंपळी मध किंवा गुळाबरोबर द्यावी. अथवा गंडीरारिष्ट हें ऊरुस्तंभावर प्रशस्त आहे, असें म्हणतात.

त्रिफलादि चूर्ण.

त्रिफलाचव्यकटुकाग्रन्थिकं मधुना लिहेत् ।
ऊरुस्तम्भविनाशाय पुरं मूत्रेण वा पिबेत् ॥ १ ॥

त्रिफळा, चवक, कुटकी व पिंपळमूळ ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें अथवा ऊरुस्तंभाचा नाश होण्याकरितां गोमूत्राशीं गुग्गुळ द्यावा.

शिलाजितादि योग.

शिलाजतुं गुग्गुलुं वा पिप्पलीमथ नागरम् ।
ऊरुस्तम्भे पिबेन्मूत्रैर्दशमूलीरसेन वा ॥ १ ॥

शिलाजित अथवा गुग्गुळ, पिंपळी व सुंठ ह्यांच्या चूर्णासह गोमूत्राशीं किंवा दशमूळाच्या काढ्याशीं द्यावा.

पिप्पल्यादि कल्क.

पिप्पली पिप्पलीमूलं भल्लातकफलानि च ।
कल्कं मधुयुतं पीत्वा ऊरुस्तम्भात्प्रमुच्यते ॥ १ ॥

पिंपळी, पिंपळमूळ व बिब्बे ह्यांचा कल्क मधाशीं द्यावा. म्हणजे ऊरुस्तंभापासून मुक्त होतो.

त्रिफलादि योग.

लिह्याद्वा त्रिफलाचूर्णं क्षौद्रेण कटुकायुतम् ।
सुखाम्बुना पिबेद्वाऽपि चूर्णं षट्चरणं नरः ॥ १ ॥

त्रिफळा व कुटकी ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें, किंवा षट्चरणचूर्ण (वातव्याधिचिकित्सेमधील) ऊन पाण्याशीं द्यावें.

कुष्ठादि तेल.

कुष्ठं श्रीवेष्टकोदीच्यं सरलं दारु केशरम् ।
अजगन्धाऽश्वगन्धा च तैलं तैः सार्षपं पचेत् ।
सक्षौद्रं मात्रया तस्मादूरुस्तम्भार्दितः पिबेत् ॥ १ ॥

कोष्ठ, श्रीवेष्ट धूप, वाळा, सुरु (सरळ देवदार), देवदार, केशर, रानतुळस व अश्वगंध ह्या औषधांच्या कल्कानें मोहरीचें तेल सिद्ध करून तें ऊरुस्तंभानें पीडित अशा मनुष्यानें मधाशीं प्रमाणांत द्यावें.

अष्टकट्वर तेल.

बलाभ्यां पिप्पलीमूलनागरादष्टकट्वरः ।
तैलप्रस्थः समो दध्ना गृध्रस्यूरुग्रहापहः ॥ १ ॥
अष्टकट्वरतैले च तैलं सार्षपमुच्यते ।
पिप्पलीमूलनागरयोः प्रत्येकं द्विपलं स्मृतम् ॥ २ ॥

लहान व मोठ्या चिकण्याचे मुळाचा काढा, पिंपळमूळ व सुंठ आठ आठ तोळे, उटकटारीच्या मुळ्या सोळा तोळे ह्यांचा कल्क ह्यामध्यें चौसष्ट तोळे शिरसाचें तेल व तेलासमान दहीं घालून तेल सिद्ध करावें. तें गृध्रसी वात व ऊरुस्तंभ ह्यांचा नाश करतें. ह्या प्रयोगांत पिंपळमूळ व सुंठ हीं आठ आठ तोळे घ्यावीं.

स्वेदन, लेपन व सेचन.

सक्षारमूत्रस्वेदांश्च रूक्षानस्नेहनानि च ।
कुर्याद्दिह्याच्च मूत्राद्यैः करञ्जफलसर्षपैः ॥ १ ॥
मूलैर्वाऽप्यश्वगन्धाया मूलैरर्कस्य वा भिषक् ।
पिचुमन्दस्य वा मूलैरथ वा देवदारुणा ॥ २ ॥
क्षौद्रसर्षपवल्मीकमृत्तिकासंयुतैर्भिषक् ।
गाढमुत्सादनं कुर्यादूरुस्तम्भे प्रलेपनम् ॥ ३ ॥
दन्तीद्रवन्तीसुरसासर्षपैश्चातिबुद्धिमान् ।
तर्कारीसुरसाशिग्रुविल्ववत्सकनिम्बजैः ।
पत्रमूलफलैस्तोयैः शृतमुष्णाम्बुसेचनम् ॥ ४ ॥

गोमूत्र व क्षार ह्यांनीं युक्त व निस्नेह द्रव्यांनीं स्वेदन करावें. करंजाच्या बिया व शिरस गोमूत्रादिकांमध्यें वाटून त्यांचा लेप करावा. अश्वगंधाचें मूळ, रुईचें मूळ, कडूलिंबाचें मूळ किंवा देवद्वार ह्यांचें चूर्ण मोहऱ्या व मध ह्यांचा वारुळाच्या मातीशीं ऊरुस्तंभावर जाडसा लेप करावा. दांती, द्रवंती, तुळस व मोहऱ्या, ह्यांचीं किंवा टाकळी, तुळस, शेवगा, बेल, कुडा, बाळंतलिंब ह्यांचीं पानें, फळें व मुळें ह्यांच्या ऊन ऊन काढ्यानें सेचन करावें.

गुंजागर्भरस.

निष्कत्रयं शुद्धसूतं निष्कद्वादशगन्धकम् ।
गुञ्जाबीजं विषं निष्कं निम्बबीजं जया तथा ॥ १ ॥
प्रत्येकं निष्कमात्रं तु माषं जेपालबीजकम् ।
जातीजम्बीरधत्तुरकाकमाचीद्रवैर्दिनम् ॥ २ ॥

मर्द्य सर्वं वटीं कुर्याद् घृतैर्गुञ्जाद्वयं लिहेत् ।
गुञ्जागर्भो रसो नाम हिंगुसैन्धवसंयुतः ।
समण्डं दापयेत्पथ्यमूरुस्तम्भप्रशान्तये ॥ ३ ॥

पारा नऊ मासे, गंधक तीन तोळे, गुंजेच्या बिया व बचनाग तीनतीन मासे, बाळंतलिंबाचें बीं व भांग तीनतीन मासे व जेपाळबीज एक मासा ह्या सर्वांचा एकत्र खल करून जाई, जंबीर, निंबू, धोतरा व कांगोणी ह्यांच्या रसांत एक एक दिवस खल करून दोन दोन गुंजांच्या गोळ्या करून एक एक गोळी तूप, हिंग व सैंधव ह्यांशीं द्यावी. ह्याला गुंजागर्भरस म्हणतात. आणि त्याजवर ऊरुस्तंभाचे शांतीकरितां हुलग्याचे कढणाशीं पथ्याला घालावें.

पथ्यापथ्य.

रूक्षः सर्वविधिः स्वेदः कोद्रवा रक्तशालयः ।
यवाः कुलत्थाः श्यामाका उद्दालाश्च पुरातनाः ॥ १ ॥
सौभांजनं कारवेल्लं पटोलं वास्तुकं तथा ।
सुनिषण्णं काकमाची वेत्राग्रं तप्तवारि च ॥ २ ॥
जाङ्गलैरघृतैर्मांसैः शाकैश्चालवणैर्हितैः ।
एतत्पथ्यं समुद्दिष्टमूरुस्तम्भविकारिणाम् ॥ ३ ॥

स्वेद वगैरे सर्व विधि रूक्ष असावा. हारिख, तामसाळ, सातू, हुलगे, सावे, जुने रानहारिख, शेवगा, कारली, पडवळें, चंदनबटवा, कुरडू, वेताचे कोंब, ऊन पाणी, तूप न घातलेलीं जांगल प्राण्यांचीं मांसें व मिठावांचून अळणी भाज्या हितकारक आहेत. हें ऊरुस्तंभाच्या आजाराला पथ्य सांगितलें आहे.

गुरुशीतद्रवस्निग्धविरुद्धासात्म्यभोजनम् ।
विरेचनं च वमनं स्नेहनं रक्तमोक्षणम् ।
बस्तिं च न हितं प्राहुरूरुस्तम्भविकारिणाम् ॥ ४ ॥

जड, थंड, पातळ, स्निग्ध, परस्परविरुद्ध व संवय नसलेलें असें जेवण, विरेचन, वमन, स्नेहन, रक्त काढणें व बस्ति हे उपचार ऊरुस्तंभाच्या आजाराला हितकारक नाहींत.

आमवातनिदान.

विरुद्धाहारचेष्टस्य मन्दाग्नेर्निश्चलस्य च ।
स्निग्धं भुक्तवतो ह्यन्नं व्यायामं चापि कुर्वतः ॥ १ ॥

वायुना प्रेरितो ह्यामः श्लेष्मस्थानं प्रधावति ।
तेनात्यर्थं विदग्धोऽसौ धमनीः प्रतिपद्यते ॥ २ ॥
वातपित्तकफैर्भूयो दूषितः सोऽन्नजो रसः ।
स्रोतांस्यभिष्यन्दयति नानावर्णोऽतिपिच्छिलः ॥ ३ ॥
जनयत्यग्निदौर्बल्यं हृदयस्य च गौरवम् ।
व्याधीनामाश्रयो ह्येष आमसंज्ञोऽतिदारुणः ॥ ४ ॥
अजीर्णान्नरसो जातः क्रमशः संचितश्च यः ।
आमसंज्ञां स लभते शिरोगात्ररुजाकरः ॥ ५ ॥

गुणानें परस्परविरुद्ध असें अन्न खाणारा, विरुद्ध व्यायाम करणारा, मंदाग्नि व बसून राहणारा, स्निग्ध अन्न खाऊन लागलेंच व्यायाम करणारा, अशा मनुष्याचा संचित झालेला आमदोष वायूच्या योगानें प्रेरित होऊन कफाशयांत जातो. तेथें तो कफ त्या आमाला अतिशय दूषित करतो. त्यामुळें तो धमनींतून शिरतो. त्या ठिकाणीं पुनः तो वात पित्त व कफ ह्यांच्याकडून दूषित झालेला तो, अनेक वर्णांचा व बुळबुळीत असा अन्नरस स्रोतसांना भरून टाकतो. तो अग्निमांद्य व हृदयाचे ठिकाणीं जडत्व उत्पन्न करतो. हा सर्व व्याधींना आश्रयभूत असा असून ह्याला आम अशी संज्ञा आहे. हा अति भयंकर आहे. खाल्लेलें अन्न चांगलें पचन न झाल्यामुळें क्रमानें थोडा थोडा साठत जाणारा जो अन्नरस त्याला आम असें म्हणतात. हा मस्तक व सर्व शरीर ह्यांमध्यें पीडा करतो.

त्याचें रूप.

युगपत्कुपितावेतौ त्रिकसंधिप्रवेशकौ ।
स्तब्धं च कुरुतो गात्रमामवातः स उच्यते ॥ १ ॥

आम व वात हे दोष माकडह्याप्रमाणें एकदम कुपित झालेले हाड व सांधे ह्यांमध्यें शिरून सर्व अंग ताठवितात. ह्या विकाराला आमवात असें म्हणतात.

त्याचें लक्षण.

अङ्गमर्दोऽरुचिस्तृष्णा ह्यालस्यं गौरवं ज्वरः ।
अपाकः शूनताऽङ्गानामामवातस्य लक्षणम् ॥ १ ॥

अंग मोडून येणें, अरुचि, तहान, आळस, जडपणा, अन्न

पचन न होणें, व हात पाय वगैरे अवयवांना सूज असणें हें आमवाताचें लक्षण आहे.

मन्यापृष्ठकटीजानुत्रिकसंधीन्विकुंचयन् ।
सशब्दस्रस्तगात्रश्च आमवातः स उच्यते ॥ २ ॥

मान, पाठ, कंबर, गुडघे व माकडहाडाचा सांधा ह्यांचें आकुंचन होणें, शब्द होणें (अवयव मागें पुढें करतांना हाडें वाजणें) व अंग गळल्यासारखें होणें ह्या लक्षणांनीं युक्त अशा विकाराला आमवात असें म्हणतात.

जठरानलदौर्बल्यादविपक्वस्तु यो रसः ।
स आमसंज्ञको देहे सर्वदोषप्रकोपणः ॥ ३ ॥

अग्निमांद्यामुळें अपक्व राहिलेला जो अन्नरस त्याला आम अशी संज्ञा आहे. तो शरीरामध्यें सर्व दोष उत्पन्न करूं शकतो.

त्याचे उपद्रव.

स कष्टः सर्वरोगाणां यदा प्रकुपितो भवेत् ।
हस्तपादशिरोगुल्फत्रिकजानूरुसंधिषु ॥ १ ॥
करोति सरुजं शोफं यत्र दोषः प्रपद्यते ।
स देशो रुजतेऽत्यर्थं व्याविद्ध इव वृश्चिकैः ॥ २ ॥
जनयेत्सोऽग्निदौर्बल्यं प्रसेकारुचिगौरवम् ।
उत्साहहानिं वैरस्यं दाहं च बहुमूत्रताम् ॥ ३ ॥
करोति ग्रहणीदोषं विशेषादामसंज्ञकम् ।
अपक्वं सृजते चान्नं केवलं चाऽऽममेव च ॥ ४ ॥
कुक्षौ कठिनता शूलं तथा निद्राविपर्ययम् ।
तृट्छर्दिभ्रममूर्छाश्च हृद्ग्राहं विड्विबन्धनम् ।
जाड्यांत्रकूजमानाहं कष्टांश्चान्यानुपद्रवान् ॥ ५ ॥

तो आम जेव्हां प्रकुपित होतो, तेव्हां तो सर्व रोगांपेक्षांही कष्टदायक होतो, आणि हात, पाय, मस्तक, घोटे, माकडहाड, गुडघे व मांड्या ह्यांच्या सांध्याच्या ठिकाणीं ठणका व सूज उत्पन्न करतो. तसेंच हा आमदोष शरीरांत ज्या ज्या ठिकाणीं सांचतो त्या ठिकाणीं विंचवानें नांगी मारल्यासारख्या वेदना होतात. हा आम अग्निमांद्य, तोंडाला पाणी सुटणें, अरुचि, जडत्व, निरुत्साह, बेचवपणा, दाह व लघवी फार होणें हे विकार करतो; आणि

विशेषतः आमसंग्रहणी उत्पन्न करतो. त्यामुळें शौचावाटे अपक्व अन्न किंवा केवळ आमच पडतो. कुशी कठीण होतात. त्यांत शूल उत्पन्न होतो. झोंप येत नाहीं. तहान, ओकारी, श्रम, मूर्च्छा, हृदयामध्यें दाह, शौचास खडा होणें, जडत्व, आतड्यांत गुडगुडणें व पोट फुगणें हे विकार होतात आणि दुसरेही कष्टदायक विकार होतात.

पित्तादियुक्त आमवाताचें विशेष लक्षण.

पित्तात्सदाहरागं च सशूलं पवनानुगम् ।
स्तैमित्यं गुरुकण्डूकं कफजुष्टं तमादिशेत् ॥ १ ॥

पित्ताधिक आमवातामध्यें दाह व अंगाला लाली हे विकार असतात. वाताधिक आमवातामध्यें शूल (ठणका) असतो; आणि कफाधिक आमवातामध्यें अंग ताठणें, जडत्व व अंगाला कंड हीं लक्षणें होतात.

साध्यासाध्यलक्षण.

एकदोषानुगः साध्यो द्विदोषो याप्य उच्यते ।
सर्वदेहचरः शोथः स कृच्छ्रः सांनिपातिकः ।

एकदोषजन्य आमवात साध्य असतो. दोन दोषांनीं युक्त आमवात याप्य असतो आणि ज्या आमवातामध्यें सर्वांगाला सूज आलेली आहे असा त्रिदोषजन्य आमवात असाध्य समजावा.

आमवातचिकित्सा.

लंघनं स्वेदनं तिक्तदीपनानि कटूनि च ।
विरेचनं स्नेहपानं बस्तयश्चाऽऽममारुते ॥ १ ॥
रूक्षः स्वेदो विधातव्यो वालुकापोटलैस्तथा ।
उपनाहाश्च कर्तव्यास्तेऽपि स्नेहविवर्जिताः ॥ २ ॥

लंघन, स्वेदन, कडू, तिखट व दीपक औषधें, रेचक, तेल प्यावयास देणें व बस्ती हे उपचार आमवातावर करावे. वाळूच्या पुरचुंडया करून त्यानें रूक्ष स्वेदन करावें (शेकावें). पोटीसानें वगैरे शेकणें तें त्या पोटीसांत तेलतूप वगैरे न घालतां शेकावें.

रास्नापंचक काढा.

रास्नागुडूचिकैरण्डं देवदारु महौषधम् ।

पिबेत्सर्वांगगे वाते सामे संध्यस्थिमज्जगे ॥ १ ॥

रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार सुंठ ह्यांचा काढा संधी, अस्थि, मज्जा व सर्वांगसंचारी आमवातावर घ्यावा.

रास्नासप्तक काढा.

रास्नामृतारग्वधदेवदारुत्रिकण्टकैरण्डपुनर्नवानाम् ।
क्वाथं पिबेन्नागरचूर्णमिश्रं जंघोरुपृष्ठत्रिकपार्श्वशूली ॥ १ ॥

रास्ना, गुळवेल, बाहव्याची शेंग, देवदार, गोखरू, एरंडमूळ व पुनर्नवा ह्यांचा काढा ज्याच्या पोटऱ्या, मांड्या, पाठ, माकड-हाड व कुशी ह्यांमध्यें आमवातानें शूळ (ठणका) होत आहे त्यानें सुंठीचें चूर्ण घालून घ्यावा.

रास्नाद्वादश क्वाथ.

रास्ना शतावरी वासा गुडुच्यतिविषाऽभया ।
शुण्ठीदुरालभैरण्डदेवदारुवचाघनैः ॥ १ ॥
क्वाथः पीतो जयत्याशु आमवातं सुदारुणम् ।
कट्यूरुत्रिकजंघांघ्रिगुल्फजानुसमाश्रितम् ॥ २ ॥

रास्ना, शतावरी, अडुळसा, गुळवेल, अतिविष, बाळहिरडे, सुंठ, धमासा, एरंडमूळ, देवदार, वेखंड व नागरमोथे ह्यांचा काढा कंबर, मांड्या, माकडहाड, पोटऱ्या, बोटें, घोटे व गुडघे ह्यांच्या-मध्यें असलेल्या आमवाताला त्वरित जिंकतो.

शुंठ्यादि काढा.

शुण्ठीगोक्षुरकक्वाथः प्रातः प्रातर्निषेवितः ।
आमवाते कटीशूले पाचनो रुक्प्रणाशनः ॥ १ ॥

सुंठ व गोखरू ह्यांचा काढा नित्य सकाळीं सेवन केला असतां तो आमवात व कटिशूळ ह्या विकारांवर पाचन असून ठणका बंद करणारा आहे.

शठ्यादि काढा.

शठी शुंण्ठ्यभया चोग्रा देवाह्वाऽतिविषाऽमृता ।
कषाय आमवातस्य पाचनं रूक्षभोजिनाम् ॥ १ ॥

कचोरा, सुंठ, बाळहिरडे, वेखंड, देवदार, अतिविष व गुळवेल ह्यांचा काढा रूक्ष भोजन करणाऱ्याच्या आमाचें पाचन करतो.

पिप्पल्यादि काढा.

पिप्पली पिप्पलीमूलं चव्यचित्रकनागरम् ।
कथितं वारयत्येतदामवातं सुदारुणम् ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ व सुंठ ह्यांचा काढा भयंकर आमवाताचें निवारण करतो.

दशमूलादि योग.

दशमूलकषायमिश्रितं वा ललने विश्वकषायमिश्रितं वा ।
प्रपिबेत्कटिकुक्षिबस्तिशूले ध्रुवमेरण्डजमेकमेव तैलम् ॥

कंबर, कुशी व बस्ती ह्यांमध्यें होणाऱ्या शूळावर नुसतें एरंडतेल दशमूळांच्या किंवा सुंठीच्या काढ्यांतून प्यावें.

रास्नादिपंचदशकषाय.

रास्नामृतानागरदेवदारुपञ्चांघ्रियुग्मेन्द्रयवैः कषायः ।
एरण्डतैलेन समन्वितोऽयं भेत्ता भवेदामसमीरणस्य ॥ १ ॥

रास्ना, गुळवेल, देवदार, सुंठ, दशमुळें व इंद्रजव ह्यांचा काढा एरंडतेल घालून ध्यावा. तो आमवाताचें भेदन करतो.

महौषधादि काढा.

महौषधामृताभवः कषायकश्च सेवितः ।
हिनस्ति चाऽऽममारुतं चिराय संधिसंश्रितम् ॥ १ ॥

सुंठ व गुळवेल ह्यांचा काढा सेवन केला असतां तो फार दिवस संधिगत असलेल्या आमवाताचा नाश करतो.

भल्लातकादि चूर्ण.

भल्लाततिलपथ्यानां चूर्णं गुडसमन्वितम् ।
आमवातं कटिशूलं हन्याद्वा गुडनागरम् ॥ १ ॥

बिब्बे, तीळ व हिरडे ह्यांचें चूर्ण गुळाशीं ध्यावें; अगर सुंठीचें चूर्ण गुळाशीं ध्यावें. तें आमवात व कटिशूळ ह्यांचा नाश करितें.

अजमोदादि चूर्ण.

अजमोदा विडङ्गानि सैन्धवं देवदारु च ।
चित्रकः पिप्पलीमूलं शतपुष्पा च पिप्पली ॥ १ ॥
मरिचं चेति कर्षांशं प्रत्येकं कारयेद्बुधः ।
कर्षास्तु पञ्च पथ्याया दश स्युर्वृद्धदारकात् ॥ २ ॥
नागराच्च दशैव स्युः सर्वाण्येकत्र चूर्णयेत् ।

पिबेत्कोष्णजलेनैतच्चूर्णं श्वयथुनाशनम् ॥ ३ ॥
आमवातरुजं हन्ति संधिपीडां च गृध्रसीम् ।
कटिपृष्ठगुदस्थां च जंघयोश्च रुजं जयेत् ॥ ४ ॥
तूनीप्रतूनीविश्वाचीकफवातामयाञ्जयेत् ।
समेन वा गुडेनास्य वटकान्कारयेद् बुधः ॥ ५ ॥

अजमोदा, वावडिंगें, देवदार, सैंधेलोण, चित्रकमूळ, पिंपळमूळ, बडिशेप, पिंपळी व मिरें हीं औषधें प्रत्येक एक एक तोळा, हिरडे पांच तोळे, वरधारा दहा तोळे व सुंठ दहा तोळे ह्या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें आणि तें कोमट पाण्याशीं घ्यावें. तें सुजेचा नाश करितें. त्याचप्रमाणें आमवाताची पीडा, सांधे दुखणें, गृध्रसी, कंबर, पाठ, गुद व पोटऱ्या ह्यांतील ठणका; तूनी, प्रतूनी, विश्वाची हे वातविकार व कफवातात्मक रोग ह्यांचा नाश करितें. पाहिजे तर ह्या चूर्णांत समभाग गूळ घालून त्याच्या गोळ्या करून ठेवाव्या.

पंचसमचूर्ण.

शुण्ठी हरीतकी कृष्णा त्रिवृत्सौवर्चलं तथा ।
समभागानि सर्वाणि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ १ ॥
ज्ञेयं पञ्चसमं चूर्णमेतच्छूलहरं परम् ।
आध्मानजठरार्शोघ्नमामवातहरं स्मृतम् ॥

सुंठ, हिरडेदळ, पिंपळी, तेड व पादेलोण ह्यांचें समभाग चूर्ण करावें. ह्याला पंचसमचूर्ण म्हणतात. हें उत्तम शूळनाशक आहे. हें पोट फुगणें, उदर व मूळव्याध ह्यांचा नाश करतें व आमवाताचाही नाश करितें.

फलत्रिकादि चूर्ण.

त्रिफला नागरं चैव सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ।
मस्त्वारनालतक्रेण पयोमांसरसेन वा ।
आमवातं निहन्त्याशु श्वयथुं संधिसंस्थितम् ॥ १ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी व सुंठ ह्यांचें चूर्ण दह्यावरील निवळी, कांजी, ताक, दूध किंवा मांसरस ह्यांतून घ्यावें. तें आमवाताचा नाश करितें व सांध्याच्या ठिकाणीं असलेल्या सुजेचाही नाश करितें.

हिंग्वादि चूर्ण.

हिंगु चव्यं बिडं शुण्ठी कृष्णाऽजाजी सपुष्करम् ।
भागोत्तरमिदं चूर्णं पीतं वातामजिद्भवेत् ॥ १ ॥

हिंग, चवक, बिडलोण, सुंठ, काळें जिरें, पोखरमूळ, हीं औषधें उत्तरोत्तर क्रमवृद्धीनें घेऊन चूर्ण करावें. हें घेतलें असतां तें आमवाताला जिंकतें.

नागरादि चूर्ण.

कर्षं नागरचूर्णस्य काञ्जिकेन पिबेत्सदा ।
आमवातप्रशमनं कफवातविनाशनम् ॥ १ ॥

एक तोळा सुंठीचें चूर्ण नित्य कांजींतून घ्यावें. तें आमवाताला शमवितें व कफवाताचा नाश करितें.

पंचकोलादि चूर्ण.

पञ्चकोलकचूर्णं च पिबेदुष्णेन वारिणा ।
मन्दाग्निशूलगुल्मामकफारोचकनाशनम् ॥ १ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक व सुंठ ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें अग्निमांद्य, शूळ, गुल्म, आम, कफ व अरुचि ह्यांचा नाश करितें.

वैश्वानर चूर्ण.

मणिमन्थस्य भागौ द्वौ यवक्षारश्च तत्समः ।
त्रयोऽजमोदाभागाश्च नागराद्भागपञ्चकम् ॥ १ ॥
दश द्वौ च हरीतक्याः सूक्ष्मचूर्णं कृतं शुभम् ।
मस्त्वारनालमूत्रैश्च सुरयोष्णोदकेन वा ॥ २ ॥
पीतं जयेच्चाऽमवातं गुल्महृद्बस्तिजान् गदान् ।
प्लीहानमथ शूलादीनानाहं चार्शसां हितम्
वातानुलोमनमिदं चूर्णं वैश्वानरं स्मृतम् ॥ ३ ॥

सैंधव दोन भाग, जवखार दोन भाग, अजमोदा तीन भाग, सुंठ पांच भाग व हिरडे दहा भाग ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें; आणि तें दह्यावरील पाणी, कांजी, गोमूत्र, मद्य किंवा ऊन पाणी ह्यांजबरोबर घ्यावें. म्हणजे तें आमवातास जिंकतें; आणि गुल्म, हृद्रोग, बस्तींतील विकार, पांथरी, शूळ, पोट फुगणें, मूळव्याध, ह्यांचा नाश करितें. हें वैश्वानर नांवाचें चूर्ण वायूला मार्गावर आणणारें आहे.

चित्रकादि चूर्ण.

चित्रकं कटुका पाठा कलिङ्गातिविषामृताः ।
देवदारु वचा मुस्ता नागरातिविषाभयाः ॥
पिबेदुष्णाम्बुना नित्यं चूर्णमाममरुत्प्रणुत् ॥ १ ॥

चित्रक, कुटकी, पहाडमूळ, इंद्रजव, अतिविष, गुळवेल, देवदार, वेखंड, नागरमोथे, सुंठ, काळें अतिविष व हिरडेदळ ह्यांचें चूर्ण नित्य ऊन पाण्याशीं घ्यावें. तें आमवाताचा नाश करितें.

अलंबुषादि चूर्ण.

अलम्बुषागोक्षुरकौ त्रिफला नागराऽमृता ।
यथोत्तरं भागवृद्ध्या श्यामाचूर्णं च तत्समम् ॥ १ ॥
पिबेत्सुरामस्तुतक्रकाञ्जिकोष्णोदकेन वा ।
आमवातं जयत्याशु सशोफं वातशोणितम् ॥ २ ॥

गोरखमुंडी, गोखरू, हिरडा, वेहडा, आवळकाठी, सुंठ व गुळवेल हीं औषधें उत्तरोत्तर भागवृद्धीनें घेऊन चूर्ण करावें आणि आणि त्या चूर्णाच्या बरोबरीनें त्यांत तेडाचें चूर्ण मिसळावें; आणि तें चूर्ण मद्य, दह्यावरील पाणी, ताक, कांजी किंवा ऊन पाणी ह्यांजबरोबर घ्यावें. हें आमवात व सूजयुक्त वातरक्त ह्यांना त्वरित जिंकतें.

सिंहनादगुग्गुळ.

पलत्रयं कषायस्य[१] त्रिफलायाः सुचूर्णितम् ।
सौगन्धिकं पलं चैकं कौशिकस्य पलं तथा ॥ १ ॥
कुडवं चोरुबूकस्य तैलमादाय यत्नतः ।
पाचयेत्पाकविद्वैद्यः पात्रे लोहमये दृढे ॥ २ ॥
हन्ति वातं तथा पित्तं श्लेष्माणं खञ्जपंगुताम् ।
श्वासं सुदुर्जयं हन्ति कासं पञ्चविधं तथा ॥ ३ ॥
कुष्ठानि वातरक्तं च गुल्मशूलोदराणि च ।
आमवातं जयेदेतदपि वैद्यविवर्जितम् ॥ ४ ॥
एतदभ्यासयोगेन जरापलितवर्जितम् ।
सर्पिस्तैलरसोपेतमश्नीयाच्छालिषष्टिकम् ॥ ५ ॥

---

१ "पलत्रयं कषायस्य" ह्या ठिकाणीं सर्व प्रतींतून "पलयंच ताप्यस्य" असा पाठ असून तोच शुद्ध आहे. म्हणून त्याला धरून अर्थ लिहिला आहे.

सिंहनाद इति ख्यातो रोगवारणदर्पहा ।
वह्नेर्वृद्धिकरः पुंसां भाषितो दण्डपाणिना ॥ ६ ॥

बारा तोळे सुवर्णमाक्षीक, बारा तोळे त्रिफळ्याचें चूर्ण, शुद्ध गंधक चार तोळे, शुद्ध गुग्गुळ चार तोळे व एरंडतेल सोळा तोळे ह्याप्रमाणें जिन्नस घेऊन ते सर्व लोखंडाच्या भांड्यांत एकत्र करून पचन करावे; म्हणजे हा गुग्गुळ वात, पित्त व कफ ह्यांचा नाश करतो. लंगडेपणा, पांगळेपणा, दुर्धर श्वास, पांच प्रकारचा खोकला, कुष्ठ, वातरक्त, गुल्म, शूळ, उदर, आणि वैद्यांनीं असाध्य म्हणून सोडून दिलेला आमवात ह्यांचाही नाश करतो. हा सतत घेतला असतां अकालीं येणारी जरा दूर करतो. ह्याजवर तेल, तूप व मांसरस ह्यांजबरोबर साठेसाळीचा भात खावा. हा रोगरूपी हत्तीच्या गर्वाचा नाश करणारा व जठराग्नीला वाढविणारा सिंहनाद नांवाचा गुग्गुळ दंडपाणीनें सांगितला आहे.

दुसरा सिंहनादगुग्गुळ.

प्रत्येकं प्रस्थमेकं पुरत्रिफलमपां पाचयेत्सार्धराशौ
तुर्यांशे तत्र पूते पुनरमरवराव्योषमुस्ताग्निवेल्लैः ।
छिन्नोग्रामानकाशौरिपुशवारित्रिवृत्सूतगन्धैः पलार्धैः
साहस्रैर्दन्तिबीजैः कुटजवसुपलैः सिंहनादोऽनिलामे ॥

गुग्गुळ चौसष्ट तोळे आणि त्रिफळा चौसष्ट तोळे, ह्यांचा पंधराशें छत्तीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून तो गाळून घ्यावा. नंतर त्यांत देवदार, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, नागरमोथे, चित्रक, वावडिंग, गुळवेल, वेखंड, मालाकंद, सुरण, चवक, तेड, पारा व गंधक हीं औषधें दोन दोन तोळे घालावीं. जेपाळाच्या बिया मोजून एक हजार घेऊन शुद्ध करून त्यांतील अंकुर व वरील त्वचा काढून चूर्ण करून तेंहीं त्यांत घालावें; आणि इंद्रजव बत्तीस तोळे घालून पुनः पचन करून गोळ्या कराव्या. ह्याला सिंहनादगुग्गुळ असें म्हणतात. हा आमवातावर योजावा.

मल्लारसोनपिंड.

तुला क्षुण्णरसोनस्य तदर्धं लुञ्चितास्तिलाः ।

पात्रे तु गव्यतक्रस्य पिष्टद्रव्यैः समं क्षिपेत् ॥ १ ॥
त्र्यूषणं धान्यकं चव्यं चित्रकं गजपिप्पली ।
अजमोदा त्वगेला च ग्रन्थिकं च पलांशकम् ॥ २ ॥
शर्करायाः पलान्यष्टौ पञ्चाजाज्याः पलानि च ।
कृष्णाजाज्याश्च चत्वारि राजिकायास्तथैव च ॥ ३ ॥
पलप्रमाणं दातव्यं हिङ्गोर्लवणपञ्चकम् ।
आर्द्रकस्य च चत्वारि सर्पिषोऽष्टौ पलानि च ॥ ४ ॥
तिलतैलस्य तावन्ति शुक्तस्यापि च विंशति ।
सिद्धार्थकस्य चत्वारि द्विगुणं मधुकस्य च ॥ ५ ॥
एकीकृत्य दृढे भाण्डे धान्यराशौ निधापयेत् ।
द्वादशाहात्समुद्धृत्य प्रातः खादेद्यथाबलम् ॥ ६ ॥
सुरां सौवीरकं चाथ मधु वाऽपि पिबेन्नरः ।
जीर्णे यथेप्सितं भोज्यं दधिपिष्टकवर्जितम् ॥ ७ ॥
एकमासोपयोगेन सर्वव्याधिहरो भवेत् ।
अशीतिर्वातजा रोगाश्चत्वारिंशच्च पित्तजाः ॥ ८ ॥
विंशतिः श्लेष्मजास्तद्वन्नश्यन्ते तस्य सेवनात् ।
योनिशूलं प्रमेहांश्च कुष्ठोदरभगंदरान् ।
अर्शोगुल्मक्षयांश्चापि जयेद्रुचिबलप्रदः ॥ ९ ॥

चांगली सोलून कुटलेली लसूण चारशें तोळे त्याचप्रमाणें कुटलेले तीळ दोनशें तोळे, सुंठ, मिरें, पिंपळी, धने, चवक, चित्रक, गजपिंपळी, ओवा, दालचिनी, वेलदोडे व पिंपळमूळ हीं औषधें चार चार तोळे, साखर बत्तीस तोळे, जिरें वीस तोळे, काळें जिरें सोळा तोळे, मोहऱ्या सोळा तोळे, हिंग, सैंधेलोण, मीठ, पादेलोण, बिडलोण व बांगडखार किंवा सांबरलोण हीं औषधें चार तोळे व आलें सोळा तोळे ह्या सर्वांचें चूर्ण करून तें चूर्ण व लसूण व तीळ ह्यांचा कल्क एकत्र करून पांचशें बारा तोळे ताकांत मिसळावा. आणि त्यांत तूप बत्तीस तोळे, तिळाचें तेल बत्तीस तोळे, कांजी ऐशीं तोळे, पांढऱ्या मोहऱ्या सोळा तोळे व मध बत्तीस तोळे हे सर्व जिन्नस घालून ते एकत्र करून तुपानें राबलेल्या मडक्यांत ठेवून धान्याच्या राशींत बारा दिवस पुरून ठेवावे. नंतर काढून त्याची यथाशक्ति मात्रा प्रातःकाळीं सेवन करावी. आणि त्याजवर मद्य, कांजी किंवा थोडी मध प्राशन करावी. हें औषध

जिरल्यावर दहीं व पिठाचे पदार्थ वर्ज करून यथेच्छ भोजन करावें. एक महिना ह्याप्रमाणें हें औषध सेवन केलें असतां सर्व रोगांचा नाश होतो. ऐशीं प्रकारचे वातरोग, चाळीस प्रकारचे पित्तरोग आणि वीस प्रकारचे कफरोग ह्यांचाही नाश होतो. योनिशूळ, प्रमेह, कुष्ट, उदर, भगंदर, मूळव्याध, गुल्म व क्षय ह्यांनाही हा रसोनपिंड जिंकतो. हा रुचि व बल देणारा आहे.

एरंडयोग.

विशोध्यैरण्डबीजानि पिष्ट्वा तत्पायसं पिबेत् ।
आमवाते कटीशूले गृध्रस्यां चौषधं परम् ॥ १ ॥

एरंड्या फोडून मगज काढून तो (नारळाच्या पाण्यांत शिजवून) शुद्ध करून वाटून त्याची दुधांत खीर करून खावी. आमवात, कटीशूळ व गृध्रसी ह्यांजवर हें उत्तम औषध आहे.

एरण्डबीजमज्जा समविश्वशर्करासहितः ।
गुटीकृतः प्रभाते भुक्तः सामानिलं जयति ॥ २ ॥

एरंड्यांतील मगज त्याच्या समभाग सुंठ व साखर घालून एकत्र गोळी करून प्रातःकाळीं खावी. ती आमवाताला जिंकते.

आमवातगजेन्द्रस्य शरीरवनचारिणः ।
एक एवाग्रणीर्हन्ता एरण्डस्नेहकेसरी ॥ ३ ॥

देहरूप अरण्यांत संचार करणाऱ्या आमवातरूप हत्तीचा नाश करण्याविषयीं एरंडेल हाच एक धुरंधर सिंह आहे.

कटीतटनिकुञ्जेषु संचरन्वातकुञ्जरः ।
एरण्डतैलसिंहस्य गन्धमाघ्राय गच्छति ॥ ४ ॥

कंबरेमध्यें संचार करणारा वातरूपी हत्ती एरंडतेलरूप सिंहाचा वास येतांच आपलें स्थान सोडून निघून जातो.

शुंठीकल्क.

शुण्ठीकल्कं विनिष्पिष्य रसैरेरण्डमूलजैः ।
विपचेत्पुटपाकेन तद्रसः क्षौद्रसंयुतः ।
आमवातसमुद्भूतां पीडां जयति दुस्तराम् ॥ १ ॥

सुंठीचा कल्क एरंडमूळाच्या रसांत वाटून पुटपाकानें पक्व करून त्याचा पुनः रस काढून त्यांत मध घालून घ्यावा. तो आमवातजन्य दुस्तर पीडेला जिंकतो.

शुंठीघृत.

पुष्ट्यर्थं पयसा साध्यं दध्ना विण्मूत्रसंग्रहे ।
दीपनार्थं मतिमता मस्तुना च प्रकीर्तितम् ॥ १ ॥
सर्पिर्नागरकल्केन सौवीरं च चतुर्गुणम् ।
सिद्धमग्निकरं श्रेष्ठमामवातहरं परम् ॥ २ ॥

पुष्टतेची आवश्यकता असल्यास दुधाशीं, मलमूत्राचा अवरोध असल्यास दह्याशीं आणि अग्निप्रदीप्त होण्याकारितां दह्याच्या निवळीशीं सुंठीचा कल्क घालून तुपाच्या चौपट कांजी घालून तूप सिद्ध करून घ्यावें. तें अग्नि प्रदीप्त करणारें व आमवातनाशक आहे.

खंडशुंठ्यवलेह.

नागरस्य तुलामेकां घृतस्य पलविंशतिः ।
क्षीरद्रोणार्धके पक्त्वा खण्डस्यार्धं शतं क्षिपेत् ॥ १ ॥
व्योषं त्रिजातकं चैव केशरं पिप्पलीजटा ।
जोङ्गकं जातिपत्रीकं जातीफलकचोरकम् ॥ २ ॥
अश्मभेदस्ताम्रभस्म वङ्गभस्म तथैव च ।
स्वर्णमाक्षिकमभ्रं च तथा लोहत्रयं क्षिपेत् ॥ ३ ॥
एतान्पृथक्पलान्भागान्प्रत्येकं चूर्णितं क्षिपेत् ।
मन्दानलविपक्कं तु लेहवत्साधु साधयेत् ॥ ४ ॥
बल्यं वर्ण्यं तथाऽयुष्यं वलीपलितनाशनम् ।
आमवातप्रशमनं सौभाग्यकरमुत्तमम् ॥ १ ॥

सुंठीचें चूर्ण चारशें तोळे व तूप ऐंशी तोळे एकत्र करून पांचशें बारा तोळे दुधांत पचन करावें. शिजते वेळीं त्यांत पन्नास तोळे खडीसाखर घालावी. आणि सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, केशर, पिंपळमूळ, अगर, जायपत्री, जायफळ, गठोना, पाषाणभेद, ताम्रभस्म, वंगभस्म, सुवर्णमाक्षिक भस्म, अभ्रकभस्म, मंडूरभस्म, लोहभस्म व कांतभस्म हीं औषधें प्रत्येकीं चार चार तोळे घेऊन त्यांत घालावीं, आणि मंदाग्नीवर लेहासारखा पाक करावा. हा बलकारक, कांतिकारक, आयुष्यवर्धक, वलीपलितनाशक, आमवात-नाशक व सौभाग्यकारक आहे.

लेप.

शतपुष्पा वचा विश्वा श्वदंष्ट्रा वरुणत्वचः ।

पुनर्नवासदेवाह्वासटिमुण्डिनिकाः समाः ॥ १ ॥
प्रसारिणी च तर्कारी फलं च मदनस्य च ।
शुक्तकांजिकापिष्टास्तु सुखोष्णा लेपने हिताः ॥ २ ॥

बडीशेप, वेखंड, सुंठ, सराटे, वायवर्ण्याची साल, वसूची मुळी, देवदार, कचोरा, मुंडी, चांदवेल, टाकळीच्या मुळ्या, व गेळफळ ह्यांचें चूर्ण कांजींत वाटून ऊन करून त्याचा सोसेल असा ऊन ऊन लेप करावा.

आमवाताची पीडा.

अहिंस्राकेम्बुकामूलं शिग्रुवल्मीकमृच्चयैः ।
मूत्रपिष्टैश्च कर्तव्य उपनाहोऽनिलामाजित् ॥ १ ॥

फडेनिवडुंग, कोबीचें मूळ, शेवग्याची साल व वारुळाची माती हे जिन्नस एकत्र कुटून गोमूत्रांत कालवून त्याच्या पोटीसानें शेकावें; म्हणजे आमवाताची पीडा दूर होते.

पाणी.

आमवाताभिभूताय पीडिताय पिपासया ।
पञ्चकोलेन संसिद्धं पानीयं हितमुच्यते ॥ १ ॥

आमवातानें पीडलेल्या मनुष्याला तहान लागली असतां पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक व सुंठ ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें पाणी प्यावयास द्यावें. तें हितकारक आहे.

आमवातविध्वंसन रस.

प्रक्षिप्य गन्धं रसपादभागं कलाप्रमाणं च विषं समस्तात् ।
कृशानुतोयेन च भावयित्वा वल्लं ददीतास्य मरुत्प्रशान्त्यै ॥ १ ॥
अपस्मारे तथोन्मादे सर्वाङ्गव्यथनेऽपि च ।
एकाङ्गवाते सामे वा दंष्ट्राबन्धे हिमे तथा ।
देयोऽयं वल्लमात्रं तु सर्ववातनिवृत्तये ॥ २ ॥

पारा एक भाग, गंधक चतुर्थांश भाग आणि ह्या दोहोंच्या सोळापट शुद्ध बचनाग ह्यांचा एकत्र खल करून त्याला चित्रकाच्या काढ्याची भावना द्यावी, आणि एक वाल प्रमाणानें हा रस वातनाशार्थ द्यावा. अपस्मार, उन्माद, सर्वांगव्यथा, एकांगवात, आमवात, दांतखिळी बसणें, शैत्य ह्या विकारांत व सर्व वातविकार दूर

होण्याकरितां हा वालभर द्यावा. ह्याला आमवातविध्वंसन रस असें म्हणतात.

पथ्य व अपथ्य.

यवाः कुलत्थाः श्यामाकाः कोद्रवा रक्तशालयः ।
वास्तुकं शिग्रु वर्षाभूः कारवेल्लं पटोलकम् ॥ १ ॥
आर्द्रकं तप्तनीरं च लशुनं तक्रसंस्कृतम् ।
जाङ्गलानां तथा मांसं सामवातगदे हितम् ॥ २ ॥

जव, हुलगे, सावे, हरीक, तामसाळ, चंदनबटवा, शेवगा, वसु, कारलें, पडवळ, आलें, ऊन पाणी, लसूण, सुंठ, मिरें व सैंधव वगैरे पदार्थांनीं तयार केलेलें ताक व जांगल प्राण्यांचें मांस हे पदार्थ आमवातावर हितकारक आहेत.

दधिमत्स्यगुडक्षीरोपोदिकामाषपिष्टकम् ।
दुष्टनीरं पूर्ववातं विरुद्धान्यशनानि च ॥ ३ ॥
असात्म्यं वेगरोधं च जागरं विषमाशनम् ।
वर्जयेदामवातार्तो गुर्वभिष्यन्दकानि च ॥ ४ ॥

दहीं, मासे, गूळ, दूध, मयाळ, उडदाचें पीठ, वाईट पाणी, पूर्वेकडील वारा व विरुद्ध पदार्थांचें सेवन, असात्म्य अन्न, मलमूत्रादिकांचा वेग धारण करणें, जागरण, विषम भोजन; जड व कफकारक पदार्थ हे आमवातावर अपथ्यकारक आहेत; म्हणून ते वर्ज करावे.

आमवातचिकित्सा समाप्त झाल्यावर आमचे जवळचे हस्तलिखित प्रतींत पित्तव्याध्यधिकार व श्लेष्मव्याध्यधिकार अशीं दोन प्रकरणें दिलीं आहेत. तीं अशीं:—

पित्तव्याधीचें विप्रकृष्टनिदान.

कट्वम्लोष्णविदाहितीक्ष्णलवणक्रोधोपवासातप-
स्त्रीसंभोगतृषाक्षुधाभिहननव्यायाममद्यादिभिः ।
मध्ये चापि हि भोजनस्य जरता भुक्तेन मध्यंदिने
मध्यांशे रजनेर्निदाघशरदोः पित्तं करोत्यामयान् ।

तिखट, आंबट, उष्ण, विदाही, तीक्ष्ण व खारट पदार्थ खाण्यानें; राग, उपवास, ऊन, स्त्रीसंग ह्यांच्या अतिरेकानें; तहान व भूक मारल्यानें; व्यायाम, मद्य, दहीं, मांस वगैरे पदार्थांच्या अतिसेवनानें, जेवणाच्या मध्यस्थितींत,

अन्न पचन होत असतांना, त्याच्या मधल्या काळांत, दिवसाच्या व रात्रीच्या मधल्या काळांत, ग्रीष्मऋतूंत व शरदृतूंत पित्त हें रोग उत्पन्न करितें.

पित्तजन्यविकार.

अकालीं केस पिकणें, डोळे लाल होणें, लघवी लाल होणें, डोळे पिवळे होणें, लघवी पिवळी होणें, शौचास पिवळें होणें, नखें पिवळीं होणें, दांत पिवळे होणें, त्याचप्रमाणें शरीरालाही पिवळेपणा येणें, डोळयास अंधारी येणें, आसपासचे पदार्थ वगैरे पिवळे दिसणें, झोंप थोडी येणें, शोष फार असणें, तोंडाला लोखंडासारखा वास येणें, तोंडाला कडवटपणा किंवा आंबटपणा असणें, श्वासोच्छ्वास उष्ण असणें, करपट ढेकर येणें, घेरी येणें, चक्रवा, राग, दाह, उन्मत्तपणा, प्रकाश सहन न होणें, थंड पदार्थाची इच्छा होणें, समाधानी नसणें, चैन नसणें, खाल्लेले अन्नाचा विदाह होणें, जठराग्नि प्रखर होणें, रक्त पडणें, मल पातळ होणें, मल व मूत्र कढत होणें, मूत्रकृच्छ्र, शुक्र अल्प असणें, अंग कढत असणें, घाम, घामाला दुर्गंधी, शरीराची त्वचा विदीर्ण होणें, अंग गळल्यासारखें होणें व शरीरावर पुटकुळया किंवा फोड उठणें हे चाळीस पित्तव्याधि मुनींनीं सांगितले आहेत.

पित्तविकारांची सामान्य चिकित्सा.

कडू, गोड, तुरट व थंड असे पदार्थ, वारा घेणें, सावली, रात्र, एकांतवास, चांदणें, तळघरांत राहणें, कारंजांतील पाण्याचे तुषार, स्त्रियांचें आलिंगन, तूप व दूध खाणें, रेचक, सेक (औषधीय पाणी वगैरे अंगावर शिंपडणें), शीर तोडून रक्त काढणें, थंडगार उश्या लावणें, पित्तशामक आहार, विहार व पेय पदार्थ खाणें हे उपचार पित्ताला शमवितात.

हे गुणवति ! गुळवेलीचा रस खडीसाखरेशीं द्यावा. जसा मी तुझ्या पायांवर लोळून तुझा राग शांत करतों तसा तो पित्ताला दूर करितो.

क्षयचिकित्सेंतील द्राक्षादि चूर्ण किंवा सीतोपलाचूर्ण हें पित्तविकारावर फार चांगलें उपयोगीं पडतें. ज्वरचिकित्सेंतील मालिनीपूर्व वसंत, प्रवाळभस्म, किंवा मौक्तिक भस्मही पित्तविकारावर हितकारक आहे. महाचंद्रकला रस देखील ह्या पित्तविकारावर फार उत्तम आहे. आणि ज्वरचिकित्सेंत सांगितलेला शेवंतीपुष्पपाकही ह्या पित्तविकारावर चांगला हितकर आहे.

कफव्याधींचें विप्रकृष्टनिदान.

जड, गोड, आंबट, खारट वगैरे व स्निग्ध पदार्थ खाणें, अग्निमांद्य, पातळ पदार्थ व दहीं खाणें, दिवसा झोंप घेणें, थंड पदार्थांचें सेवन,

व्यायाम न करणें, वगैरे कारणांनीं, दिवसाच्या व रात्रीच्या प्रथम भागांत, जेवतांक्षणीं, अन्नपचनाच्या प्रथम काळीं व वसंतऋतूंत कफरोग उत्पन्न होतो.

कफदोषजन्य विकार.

तोंड गुळमट असणें, तोंड चिकट होणें, तोंडाला पाणी सुटणें, झोंप फार येणें, घशांत घुरघुरणें, तिखट पदार्थांची इच्छा होणें, उष्ण उपचार हवेसे वाटणें, बुद्धीला मंदत्व येणें, हालचाल कमी होणें, चैतन्य नसणें, आळस, तृप्तता (अन्नावर वांच्छा नसणें), अग्निमांद्य, मळ पुष्कळ होणें, मळ पांढरा होणें, मूत्र पुष्कळ होणें, मूत्राचा रंग पांढरा असणें, शुक्र वाढणें, स्तब्धता, जडत्व व थंडी वाजणें ह्याप्रमाणें हे वीस कफरोग मुनींनीं सांगितले आहेत.

कफरोगाची सामान्य चिकित्सा.

रूक्ष पदार्थ, क्षार (जवखारादि), तुरट पदार्थ, कडू व तिखट पदार्थ, व्यायाम, निष्ठीवन (कवल धरणें), धूर (धूम्रपान), उष्णता, अग्नीचा शेक, नस्य, वमन, स्वेद (वाफारा वगैरे), उपास, तहान आंवरून धरणें, वारा घेणें, मार्ग चालणें, कुस्ती खेळणें, जागरण, जलक्रीडा, स्त्रीसंग आणि कफनाशक असा आहार, विहार व पेय पदार्थ ह्यांचें सेवन करणें हे उपचार कफसंबंधीं रोगाचा नाश करतात.

ह्यांपैकीं जलक्रीडारूप व्यायाम हा कफजन्य ऊरुस्तंभ, मूढवात वगैरे विकारांत करावा. स्त्रीसंग हा कफजन्य स्थूलपणा व शुक्राधिक्य वगैरे विकारापुरताच समजावा.

ह्याशिवाय पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ व सुंठ ह्यांचा काढा अगर चूर्ण हें कफविकारावर हितकारक आहे. त्याचप्रमाणें रससिंदूर किंवा हेमगर्भही कफविकारावर हितकारक आहे.

शूलनिदान.

अनङ्गनाशाय हरस्त्रिशूलं मुमोच कोपान्मकरध्वजश्च ।
तमापतन्तं सहसा निरीक्ष्य भयार्दितो विष्णुतनुं प्रविष्टः ॥ १ ॥
स विष्णुहुंकारविमोहितात्मा पपात भूमौ प्रथितः स शूलः ।
स पञ्चभूतानुगतं शरीरं प्रदूषयत्यस्य हि पूर्वसृष्टिः ॥ २ ॥
शूलरोपणवत्पीडा यस्याकस्मात्प्रजायते ।
त्रिशूलसंभवं चैनं शूलमाहुः पुराविदः ॥ ३ ॥
शङ्कुस्फोटनवत्तस्य यस्मात्तीव्रा च वेदना ।
शूलासक्तस्य भवति तस्माच्छूलमिहोच्यते ॥ ४ ॥

(हारितांत म्हटलें आहे :—)मदनाचा नाश करण्याच्या हेतूनें शिवानें रागानें त्रिशूळ फेकला. तो आपल्या अंगावर पडत आहे असें पाहून मदनानें भयभीत होऊन विष्णूच्या शरीरांत प्रवेश केला. त्या वेळीं विष्णूच्या हुंकारानें मोहित झालेला तो त्रिशूळ पृथ्वीवर पडला. त्याला शूळ असें म्हणतात. तो ह्या पंचभूतात्मक देहाला पीडा देतो. अशी ह्याची उत्पत्ति आहे. ज्याच्या योगानें शरीरामध्यें शूल टोंचल्याप्रमाणें पीडा होते, अशा ह्या त्रिशूलापासून उत्पन्न झालेल्या रोगाला पूर्वीचे वैद्य शूळ असें म्हणतात. शूलपीडिताला ज्या अर्थी त्यापासून शंखानें फोडल्याप्रमाणें तीव्र वेदना होतात त्या अर्थी त्याला शूळ असें म्हटलें आहे.

शूळाची संख्या.

पृथग्दोषैः समस्तामद्वंद्वैः शूलोऽष्टधा भवेत् ।
सर्वेष्वेतेषु शूलेषु प्रायेण पवनः प्रभुः ॥ १ ॥

वातादि पृथक् दोषांनीं तीन प्रकार, सन्निपातापासून एक, आमदोषानें एक, आणि दोन दोन दोषांच्या संसर्गानें तीन मिळून शूळाचे आठ प्रकार आहेत. ह्या सर्व शूळांमध्यें प्रायः वात प्रधान असतो.

वातिक शूळाचें कारण व लक्षण.

व्यायामयानादतिमैथुनाच्च प्रजागराच्छीतजलातिपानात् ।
कलायमुद्गाढकिकोरदूषादत्यर्थरूक्षाध्यशनाभिघातात् ।
कषायतिक्तातिविरूढजान्नविरुद्धवल्लूरकशुष्कशाकात् ॥ १ ॥
विट्शुक्रमूत्रानिलवेगरोधाच्छोकोपवासादतिहास्यभाष्यात् ।
वायुः प्रवृद्धो जनयेद्धि शूलं हृत्पार्श्वपृष्ठत्रिकबस्तिदेशे ॥ १ ॥
जीर्णे प्रदोषे च घनागमे च शीते च कोपं समुपैति गाढम् ।
मुहुर्मुहुश्चोपशमप्रकोपौ विड्वातसंस्तम्भनतोदभेदैः ॥ १ ॥
संस्वेदनाभ्यञ्जनमर्दनाद्यैः स्निग्धोष्णभोज्यैश्च शमं प्रयाति ॥१॥

व्यायाम, मार्गक्रमण, अतिमैथुन, जागरण, थंड पाणी अतिशय सेवन करणें, वाटाणे, मूग, तुरी व हरीक हीं धान्यें व रूक्ष पदार्थ अतिशय खाणें, जेवणावर पुनः जेवण करणें, पोटावर आघात होणें. तुरट, कडू व मोड आलेले पदार्थ खाणें, विरुद्ध अन्न खाणें, वाळ-

लेलें मांस खाणें, वाळलेल्या भाज्या खाणें, मळ, मूत्र, शुक्र व वात ह्यांचा अवरोध करणें, शोक, उपास, अतिशय हसणें किंवा अतिशय बोलणें इत्यादि कारणांनीं वाढलेला वायु हृदय, पाठ, कुशी, माकडहाड व बस्ति ह्यांमध्यें शूळ उत्पन्न करितो. हा शूळ अन्न जिरलें असतां, प्रदोषकाळीं, पावसाळ्यांत व थंडीच्या दिवसांत अत्यंत वाढतो. हा वरचेवर थांबतो व पुनः उत्पन्न होतो. ह्याच्या योगानें मल व अधोवायु ह्यांचा अवरोध होतो, टोचल्याप्रमाणें किंवा फोडल्याप्रमाणें वेदना होतात. वाफारा दिल्यानें, तेल लावल्यानें, मर्दन केल्यानें, आणि स्निग्ध व उष्ण भोजन केल्यानें हा शूळ शांत होतो.

पित्तजन्य शूळाचें कारण व लक्षण.

क्षारातितीक्ष्णोष्णविदाहितैलनिष्पावपिण्याककुलत्थयूषैः ।
कट्वम्लसौवीरसुराविकारैः क्रोधानलायासरविप्रतापैः ॥ १ ॥
ग्राम्यातियोगादशनैर्विदग्धैः पित्तं प्रकुप्याऽऽशु करोति शूलम् ।
तृण्मोहदाहार्तिकरं हि नाभ्यां संस्वेदमूर्छाभ्रमशोषयुक्तम् ॥ १ ॥
मध्यंदिने कुप्यति चार्धरात्रे निदाघकाले जलदात्यये च ॥
शीते च शीतैः समुपैति शान्तिं सुस्वादुशीतैरपि भोजनैश्च ॥१॥

क्षार, अतिशय तीक्ष्ण द्रव्यें, विदाहकारक व तेलकट पदार्थ, पावटे, तिळकूट, हुलग्याचें कढण, तिखट व आंबट पदार्थ, मद्य किंवा त्याचे प्रकार ह्यांच्या सेवनानें व राग, विस्तवाचा शेक किंवा ऊन अतिशय घेणें, अति मैथुन करणें, विदाही अन्न खाणें ह्या कारणांनीं पित्त प्रकुपित होऊन नाभीचे ठिकाणीं शूळ उत्पन्न करितें. त्यामुळें तहान, मोह, दाह, पीडा, घाम, मूर्च्छा, भोंवळ व शोष हीं लक्षणें होतात. हा शूळ दोनप्रहरीं, मध्यरात्रीस, ग्रीष्मऋतूमध्यें व शरदृतूंत वाढतो आणि थंडीच्या दिवसांत, थंड पदार्थांच्या सेवनानें आणि थंड व गोड अशा भोजनानें शांत होतो.

कफजन्य शूळाचें कारण व लक्षण.

आनूपवारिजकिलाटपयोविकारै-
र्मांसेक्षुपिष्टकृशरातिलशष्कुलीभिः ।

अन्यैर्बलासजनकैरपि हेतुभिश्च
श्लेष्मा प्रकोपमुपगम्य करोति शूलम् ॥ १ ॥
हृल्लासकाससदनारुचिसंप्रसेकै-
रामाशये स्तिमितकोष्ठशिरोगुरुत्वैः ।
भुक्ते सदैव हि रुजं कुरुतेऽतिमात्रं
सूर्योदयेऽथ शिशिरे कुसुमागमे च ॥ २ ॥

जलचर प्राण्यांचें मांस, कढी, दुधाचे पदार्थ, मांस, ऊंस, पिठाचे पदार्थ, खिचडी, तीळ, करंज्या वगैरे पदार्थ अतिशय खाण्यानें त्याचप्रमाणें दुसऱ्याही कफकारक अशा कारणानें कफ प्रकुपित होऊन शूळ उत्पन्न करतो. त्यायोगानें हृदयांत, अस्वस्थता, खोकला, अंग गळल्यासारखें होणें, अरुचि, मळमळ, आमाशयांत स्तब्धता, व कोठ्याला व मस्तकाला जडत्व हीं लक्षणें होतात. जेवलें असतां सदोदित पोटांत दुखतें. त्याचप्रमाणें सूर्योदयाच्या वेळीं शिशिर ऋतूंत व वसंत ऋतूंत हा शूळ प्रकोप पावतो.

सन्निपातिक शूळाचें लक्षण.

सर्वेषु दोषेषु च सर्वलिंगं विद्याद्भिषक् सर्वभवं हि शूलम् ।
सुकष्टमेनं विषवज्रतुल्यं विवर्जनीयं प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १ ॥

सर्व दोषांपासून उत्पन्न होणाऱ्या शूळामध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें असतात. त्याला त्रिदोषजन्य शूळ म्हणावें. हा शूळ विषाप्रमाणें किंवा वज्राप्रमाणें अत्यंत कष्टदायक आहे. ह्याजवर उपचार करूं नये असें तज्ज्ञांचें मत आहे.

आमजन्य शूळलक्षण.

आटोपहृल्लासवमीगुरुत्वस्तैमित्यकानाहकफप्रसेकैः ।
कफस्य लिङ्गेन समानलिङ्गमामोद्भवं शूलमुदाहरन्ति ॥ १ ॥

पोटांत गुडगुडणें, हृदयांत अस्वस्थता, ओकारी, जडपणा, पोट स्तब्ध होणें, पोट फुगणें, थुंकींतून कफ पडणें, आणि कफजन्य शूळाच्या लक्षणाप्रमाणें लक्षणें असणें अशा शूळाला आमशूळ असें म्हणतात.

द्विदोषज शूळाचीं लक्षणें.

द्विदोषलक्षणैरेतैर्विद्याच्छूलं द्विदोषजम् ।
बस्तौ हृत्कण्ठपार्श्वेषु स शूलः कफवातिकः ॥ १ ॥

कुक्षौ हृन्नाभिमध्ये यः स शूलः कफपैत्तिकः ।
दाहज्वरकरो घोरो विज्ञेयो वातपैत्तिकः ॥ २ ॥

ह्या वर सांगितलेल्या लक्षणांपैकीं दोन दोन दोषांचीं मिश्र लक्षणें असलीं म्हणजे त्याला द्विदोषजन्य शूळ म्हणावें. त्यांत विशेषतः बस्ति, हृदय, कंठ व कुशी ह्यांमध्यें होणारा शूळ कफवातात्मक असतो. कुशी, हृदय व नाभि ह्यांमध्यें होणारा शूळ कफपित्तात्मक असतो. दाह व ज्वर करणारा भयंकर शूळ वातपित्तात्मक असतो.

अन्यग्रंथांतील मत.

वातात्मकं बस्तिगतं वदन्ति पित्तात्मकं चापि वदन्ति नाभ्याम् ।
हृत्पार्श्वकुक्षौ कफसंनिविष्टं सर्वेषु देशेषु च संनिपातात् ॥ १ ॥

बस्तीमध्यें होणारा शूळ वातापासून होतो. पित्तजन्य शूळ नाभीमध्यें होतो. हृदय, कुशी व बरगड्या ह्यांमध्यें होणारा कफजन्य असतो. आणि त्रिदोषजन्य शूळ सर्व ठिकाणीं होतो.

साध्यासाध्यलक्षण.

एकदोषोत्थितः साध्यः कृच्छ्रसाध्यो द्विदोषजः ।
सर्वदोषोत्थितो घोरस्त्वसाध्यो भूर्युपद्रवः ॥ १ ॥

एक दोषजन्य शूळ साध्य असतो. दोन दोषांपासून होणारा शूळ कष्टसाध्य असतो. आणि सर्व दोषांपासून होणारा व पुष्कळ उपद्रवांनीं युक्त असा शूळ असाध्य असतो.

उपद्रव.

वेदनातितृषा मूर्छा ह्यानाहो गौरवारुची ।
भ्रमो ज्वरः कृशत्वं च बलहानिस्तथैव च ॥
कासः श्वासश्च हिक्का च शूलस्योपद्रवाः स्मृताः ॥ १ ॥

वेदना, अतिशय तहान, मूर्च्छा, पोट फुगणें, जडत्व, अरुचि, भ्रम, ज्वर, कृशत्व, अशक्तपणा, खोकला, श्वास व उचकी हे शूळाचे उपद्रव आहेत.

शूळाची सामान्य चिकित्सा.

वमनं लंघनं स्वेदः पाचनं फलवर्तयः ।
क्षारश्चूर्णश्च गुटिकाः शस्यन्ते शूलशान्तये ॥ १ ॥

ओकारी, लंघन, स्वेद, पाचक औषधें, फलवर्ती (गुदांत औषधांचा काकडा ठेवणें), क्षारमिश्रित चूर्ण, गोळ्या वगैरे उपचार शूळ शमन होण्याकरितां प्रशस्त आहेत.

वातशूळचिकित्सा.

ज्ञात्वा तु वातजं शूलं स्नेहस्वेदैरुपाचरेत् ।
पायसैः कृशरापिण्डैः स्निग्धैर्वा पिशितोत्कटैः ॥ १ ॥
आशुकारी हि पवनस्तस्मात्तं त्वरया जयेत् ।
तस्य शूलाभिपन्नस्य स्वेद एव सुखावहः ॥ २ ॥

वातजन्य शूल आहे असें समजल्यावर त्याजवर स्नेहन व स्वेदन अशा प्रकारचे उपचार करावे. दूध, खिचडी व मांसयुक्त स्निग्ध आहार करावा. वायु हा त्वरित रोग उत्पन्न करणारा आहे, म्हणून त्याला त्वरित जिंकावा. ह्यासाठीं वातशूळानें पीडित मनुष्याला स्वेदन हेंच सुखावह आहे.

तिलकल्कस्वेद.

तुषवारिविनिष्पिष्टतिलकल्कोष्णपोटली ।
भ्रामिता जठरस्योर्ध्वं मुहुः शूलं विनाशयेत् ॥ १ ॥

धान्याच्या कोंड्याच्या पाण्यांत (कांजींत) तीळ वाटून त्याची पोथंडी करून ती ऊन करून ती वरचेवर पोटावरून फिरवावी. म्हणजे ती शूळाचा नाश करिते.

लेप व सेचन.

नाभिलेपाज्जयेच्छूलं मदनं काञ्जिकान्वितम् ।
बिल्वैरण्डतिलैर्वाऽपि पिष्टैरम्लेन पोटली ॥ १ ॥

गेळफळ कांजींत वाटून त्याचा बेंबीवर लेप करावा. तो शूळास जिंकतो. त्याचप्रमाणें बेलाचें मूळ, एरंडमूळ व तीळ कांजींत वाटून त्याची पुरचुंडी करून त्या पुरचुंडीनें शेकावें.

कुलत्थादि यूष.

वातात्मकं हन्त्यचिरेण शूलं स्नेहेन युक्तस्तु कुलत्थयूषः ।
ससैन्धवो व्योषयुतः सलावः सहिंगुसौवर्चलदाडिमाढ्यः १

सेंधेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, लावा पक्ष्याचें मांस, हिंग, पादे-

लोण व आंबट डाळिंबाचे दाणे घालून तेलाची फोडणी दिलेला हुलग्याचा यूष वातजन्य शूळाला त्वरित जिंकतो.

बलादि काढा.

बलापुनर्नवैरण्डबृहतीद्वयगोक्षुरैः ।
क्वाथः सहिंगुलवणः पीतो वातरुजं जयेत् ॥ १ ॥

चिकणामूळ, वसूची मुळी, एरंडमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ व गोखरू ह्यांचा काढा हिंग व सेंधेलोण घालून द्यावा. तो वातशूळाला जिंकतो.

नागरादि काढा.

नागरैरण्डयोः क्वाथः क्वाथ इन्द्रयवस्य वा ।
हिंगुसौवर्चलोपेतो वातशूलनिवारणः ॥ १ ॥

सुंठ व एरंडमूळ ह्यांचा काढा किंवा इंद्रजवाचा काढा हिंग पादेलोण घालून द्यावा. तो वातशूळाचें निवारण करतो.

करंजादि चूर्ण.

करञ्जसौवर्चलनागराणां सरामठानां समभागिकानाम् ।
चूर्णं कदुष्णेन जलेन पीतं समीरशूलं विनिहन्ति सद्यः ॥ १ ॥

करंजाची साल, पादेलोण, सुंठ, हिंग ह्यांचें समभाग चूर्ण कोमट पाण्याशीं द्यावें. तें वातशूळाचा त्वरित नाश करितें.

राजिकादि लेप.

राजिकाशिग्रुकल्कं च गोतक्रेण च पेषितम् ।
तेन लेपेन हन्त्याशु शूलं वातसमुद्भवम् ॥ १ ॥

मोहरी व शेवग्याची साल गाईच्या ताकांत वाटून त्यांचा लेप करावा. तो वातशूळाचा त्वरित नाश करतो.

हिंग्वादि लेप.

हिंगुतैलं सलवणं गोमूत्रेण विपाचितम् ।
नाभिस्थाने प्रदातव्यं यस्य शूलं सवेदनम् ॥ १ ॥

हिंग, तेल व मीठ हे जिन्नस गोमूत्रांत शिजवून त्यांचा, ज्याचा शूळ वेदनायुक्त आहे त्याच्या बेंबीवर लेप करावा.

गुडगुडयुक्त शूळावर.

तैलमेरण्डजं वाऽपि दशमूलस्य वारिणा ।
पीतं निहन्ति साटोपं हिंगुसौवर्चलान्वितम् ॥ १ ॥

दशमुळांच्या काढ्याशीं एरंडतेल, हिंग व सैंधेलोण घालून द्यावें. तें पोटांत गुडगुड वाजून होणाऱ्या शूळाचा नाश करितें.

पित्तशूळाची चिकित्सा.

वामयेत्पित्तशूलार्तं पटोलेक्षुरसादिभिः ।
पश्चाद्विरेचयेत्सम्यक्पित्तगुल्मविरेचनैः ॥ १ ॥

कडूपडवळ व उंसाचा रस इत्यादिकांच्या योगानें प्रथम पित्तशूळानें पीडित मनुष्याला ओकवावें. नंतर पित्तगुल्मावरील रेचकें देऊन कोठा शुद्ध करावा.

शतावर्यादि काढा.

शतावरी सयष्ट्याह्वा वाट्यालकुशगोक्षुरैः ।
शृतशीतं पिबेत्तोयं सगुडक्षौद्रशर्करम् ।
पित्तशूलास्रदाहघ्नं हिक्काज्वरवमिच्छिदम् ॥ १ ॥

शतावरी, जेष्टमध, लहान चिकण्याचें मूळ, दर्भाचें मूळ व गोखरूचें मूळ ह्यांचा काढा गूळ, साखर व मध घालून द्यावा. तो पित्तशूळ, रक्तसंबंधी दाह, उचकी, ज्वर व ओकारी ह्यांचा नाश करितो.

बृहत्यादि काढा.

बृहतीगोक्षुरैरण्डकुशकाशेक्षुवालकाः ।
पीताः पित्तभवं शूलं सद्यो हन्युः सुदारुणम् ॥ १ ॥

रिंगणमूळ, गोखरू, एरंडमूळ, दर्भाचें मूळ, कसईचें मूळ, ऊंस व वाळा ह्यांचा काढा द्यावा. तो भयंकर पित्तशूळाचा त्वरित नाश करतो.

त्रिफलादि काढा.

त्रिफलारग्वधक्काथः शर्कराक्षौद्रसंयुतः ।
रक्तपित्तहरो दाहपित्तशूलनिवारणः ॥ १ ॥

त्रिफळा व बाहव्याची शेंग ह्यांचा काढा मध व साखर घालून द्यावा. तो रक्तपित्त, दाह व पित्तशूळ ह्यांचा नाश करतो.

त्रिफलादि काढा.

त्रिफलारिष्टयष्ट्याह्वकटुकारग्वधैः शृतम् ।
पाययेन्मधुसंमिश्रं दाहशूलोपशान्तये ॥ १॥

त्रिफळा, लिंबाची साल, जेष्टमध, कुटकी व बाहव्याची शेंग ह्यांचा काढा दाह व शूळ शांत होण्याकरितां मध घालून द्यावा.

शतावरीस्वरस.

शतावरीरसं क्षौद्रयुक्तं प्रातः पिबेन्नरः ।
दाहशूलोपशान्त्यर्थं सर्वपित्तामयापहम् ॥ १ ॥

शतावरीचा रस मध घालून सकाळीं द्यावा. तो दाह व शूळ ह्यांची शांति करतो व सर्व पित्तविकारांचा नाश करतो.

धात्र्यादि योग.

धात्र्या रसं विदार्या वा त्रायन्तीगोस्तनाम्बुना ।
पिबेत्सशर्करं सद्यः पित्तशूलनिवारणम् ॥ १ ॥

आवळ्याचा रस अथवा भुईकोहळ्याचा रस त्रायमाणाचें चूर्ण, गाईचें दूध व साखर घालून द्यावा. तो पित्तजन्य शूळाचा त्वरित नाश करतो.

धात्रीचूर्णादि योग.

प्रलिह्यात्पित्तशूलघ्नं धात्रीचूर्णं समाक्षिकम् ।
सगुडां घृतसंमिश्रां भक्षयेद्वा हरीतकीम् ॥ १ ॥

आवळकाठीचें चूर्ण मधाशीं द्यावें किंवा हिरड्याचें चूर्ण तूप व गुळाशीं द्यावें. तें पित्तशूळाचा नाश करितें.

गुडादि योग.

गुडशालियवक्षीरं सर्पिर्दुग्धं विरेचनम् ।
जाङ्गलानि च मांसानि भेषजं पित्तशूलिनः ॥ १ ॥

गूळ, तांदूळ, सातु, दूध, तूप व दूध, रेचक औषध व जांगलप्राण्यांचें मांस हें पित्तशूळानें पीडित मनुष्याला औषध आहे.

कफशूळचिकित्सा.

शाल्यन्नं जांगलं मांसमरिष्टं कटुकं रसम् ।
मद्यानि जीर्णगोधूमं कफशूले प्रयोजयेत् ॥ १ ॥

साळीचा भात, जांगलमांस, अरिष्ट, तिखट पदार्थ, मद्य व जुने गहू ह्यांची कफशूळावर योजना करावी.

त्रिलवणादि चूर्ण.

लवणत्रयसंयुक्तं पञ्चकोलं सरामठम् ।
सुखोष्णेनाम्भसा पीतं कफशूलहरं परम् ॥ १ ॥

सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ, सुंठ व हिंग ह्यांचें चूर्ण कोमट पाण्याशीं द्यावें. तें कफशूळाचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

त्रिदोषशूळचिकित्सा.

शंखचूर्णं सलवणं सहिंगु व्योषसंयुतम् ।
उष्णोदकेन तत्पीतं हन्ति शूलं त्रिदोषजम् ॥ १ ॥

शंखभस्म, सैंधेलोण, हिंग, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. तें त्रिदोषजन्य शूळाचा नाश करितें.

मंडूरावलेह.

गोमूत्रसिद्धमण्डूरं त्रिफलाचूर्णसंयुतम्
विलिहन्मधुसर्पिर्भ्यां शूलं हन्ति त्रिदोषजम् ॥ २ ॥

गोमूत्रामध्यें तयार केलेला मंडूर त्रिफळ्याचें चूर्ण, तूप व मध ह्यांशीं द्यावा. तो त्रिदोषजन्य शूळाचा नाश करितो.

आमशूलचिकित्सा.

आमशूले क्रिया कार्या कफशूलविनाशिनी ।
शेषमामहरं सर्वं यद्यदग्निविवर्धनम् ॥ १ ॥

आमशूळावर सर्व उपचार कफशूळाप्रमाणें करावे आणि बाकी सर्व आहारविहारादिक आमनाशक, व जे जे अग्निवर्धक उपचार आहेत तेहि करावे.

चित्रकादि काढा.

चित्रकग्रन्थिकैरण्डशुण्ठीधान्यजलैः शृतम् ।
सहिंगुसैन्धवविडमामशूलहरं परम् ॥ १ ॥

चित्रकमूळ, पिंपळमूळ, एरंडमूळ, सुंठ व धने ह्यांचा काढा हिंग, सैंधेलोण व बिडलोण घालून द्यावा. तो आमशूळाचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

एरंडादि काढा.

एरण्डबिल्वबृहतीद्वयमातुलुङ्ग-
पाषाणभित्त्रिकटुमूलकृतः कषायः ।
सक्षारहिंगुलवणोरुबुतैलमिश्रः
श्रोण्यंसपृष्ठहृदयस्तनरुक्षु पेयः ॥ १ ॥

एरंडमूळ, बेलमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, महाळुंग, पाषाणभेद, सुंठ, मिरें, पिंपळी व पिंपळमूळ ह्यांचा काढा करून तो जवखार, हिंग, सेंधेलोण व एरंडतेल घालून दुंगण, खांदे, पाठ, हृदय व स्तन ह्यांच्यामध्यें शूळ होत असतां त्याजवर घ्यावा.

एरंडतैलादि योग.

एरण्डतैलं षड्भागं लशुनस्य तथाऽष्टकम् ।
एकं हिंगु त्रिसिन्धूत्थं सर्वमेकत्र मर्दयेत् ॥ १ ॥
त्रिनिष्कं भक्षयेच्चानु ह्यामशूलप्रशान्तये ।

एरंडेल सहा भाग, लसूण आठ भाग, हिंग एक भाग व सैंधव तीन भाग ह्या सर्वांचा एकत्र खल करून तें मिश्रण आमशूळ शांत होण्याकरितां नऊ मासे प्रमाणानें भक्षण करावें.

हिंगुत्रिगुणसैन्धवं तस्माच्च शुद्धतैलमैरण्डम् ।
तत्त्रिगुणरसोनरसं गुल्मोदावर्तकशूलघ्नम् ॥ २ ॥

हिंग एक भाग, सेंधेलोण तीन भाग, एरंडतेल नऊ भाग, आणि लसणीचा रस सत्तावीस भाग एकत्र करून तें मिश्रण घ्यावें. तें गुल्म, उदावर्त व शूळ ह्यांचा नाश करितें.

द्वंद्वजशूळचिकित्सा.

कंटकार्यादि काढा.

निदिग्धिकाबृहत्यौ च कुशकाशेक्षुवालकाः ।
श्वदंष्ट्रैरण्डमूलं च वारिणा सह पाचयेत् ।
पिबेत्सशर्करक्षौद्रं शूले पित्तानिलात्मके ॥ १ ॥

रिंगणमूळ, डोरलीमूळ, दर्भाचें मूळ, कसईचें मूळ, उंसाचें मूळ, वाळा, सराटे व एरंडमूळ ह्यांचा काढा मध व साखर घालून वातपित्तात्मक शूळावर घ्यावा.

पटोलादि काढा.

पटोलत्रिफलारिष्टामृतं क्षौद्रयुतं पिबेत् ।
पित्तश्लेष्मज्वरच्छर्दिदाहशूलोपशान्तये ॥ १ ॥

कडुपडवळ, त्रिफळा, कडुलिंबाची साल व गुळवेल ह्यांचा काढा करून तो कफपित्तात्मक ज्वर, ओकारी, दाह व शूळ ह्यांचें शमन होण्याकरितां मध घालून प्यावा.

द्राक्षादि काढा.

द्राक्षाटरूषयोः क्वाथः श्लेष्मपित्तरुजं जयेत् ।

मनुका व अडुळशाच्या मुळ्या ह्यांचा काढा कफपित्तजन्य शूळाला जिंकतो.

पित्तश्लेष्मोद्भवं शूलं विरेकवमनैर्जयेत् ॥ १ ॥

कफपित्तजन्य शूळ वमन व रेचन ह्या उपचारांनीं जिंकावा.

क्षाराबुयोग.

क्षारोदकं पिबेदुष्णं पिप्पलीलवणान्वितम् ।
वातश्लेष्मोद्भवं शूलं कुक्षिशूलं च नाशयेत् ॥ १ ॥

पिंपळीचें चूर्ण व सैंधेलोणाचें चूर्ण टाकून ऊन केलेलें पाणी प्यावें. तें वातकफजन्य व कुशींत होणारा शूळ ह्यांचा नाश करितें.

शूळावर साधारण उपचार.

त्रिफलादि विरेचन.

त्रिफलाक्वाथगोमूत्रक्षौद्रक्षीररसैः पृथक् ।
एरण्डतैलद्विगुणैर्हितं शूले विरेचनम् ॥ १ ॥

त्रिफळ्याचा काढा करून त्यांत गोमूत्र, मध, दूध किंवा मांसरस घालून पुनः त्यांत त्या काढ्याच्या दुप्पट एरंडेल घालून शूळरोगांत रेच होण्याकरितां द्यावा. तो हितकारक आहे.

बीजपूरादि स्वरस.

बीजपूररसः पानान्मधुक्षारयुतो जयेत् ।
पार्श्वहृद्बस्तिशूलानि कोष्ठवायुं च दारुणम् ॥ १ ॥

मध व क्षार (जवखार) घालून महाळुंगाचा रस प्यावा. तो बरगड्या, हृदय व बस्ती ह्यांतील शूळ व भयंकर कोष्ठवात ह्यांना जिंकतो.

पथ्यादि काढा.

पथ्यासशक्रयवपुष्करमूलयुक्तां
निष्क्वाथ्य हिंगुजटिलातिविषासमेताम् ।
पीत्वा सुखोष्णमथ वातकृतं सशूल-
मामोद्भवं कफकृतं च निहन्ति तूर्णम् ॥ १ ॥

बाळहिरडे, इंद्रजव, पोखरमूळ, वेखंड व अतिविष ह्यांचा काढा

हिंग घालून घ्यावा. तो वातजन्य शूल, आमशूळ व कफजन्य शूळ ह्यांचा नाश करतो.

मातुलुंगादि काढा.

मातुलुङ्गरसो वाऽपि शिग्रुक्काथस्तथा परः।
सक्षारो मधुना पीतः पार्श्वहृद्बस्तिशूलहा ॥ १ ॥

महाळुंगाचा रस अथवा शेवग्याच्या साळीचा काढा जवखार व मध घालून घ्यावा. तो बरगड्या, हृदय व बस्ती ह्यांतील शूळाचा नाश करतो.

दुसरा प्रकार.

मातुलुङ्गरसे सर्पिः सहिंगु लवणान्वितम्।
सुखोष्णं पाययेत्ताद्धि विड्विबन्धानुलोमनम् ॥
कुक्षिहृत्पार्श्वशूलेषु वेदना चोपशाम्यति ॥ १ ॥

महाळुंगाच्या रसांत तूप, हिंग व सेंधेलोण घालून कोमट करून पाजावें. तें मलबद्धतेचा नाश करितें, आणि त्याच्या योगानें कुशी, हृदय व बरगड्या ह्यांतील शूळ व वेदना शमन होतात.

बिल्वमूलमथैरण्डं चित्रकं विश्वभेषजम्।
हिंगुसैन्धवसंयुक्तं सद्यः शूलनिवारणम् ॥ २ ॥

बेलाचें मूळ, एरंडमूळ, चित्रकमूळ व सुंठ ह्यांचा काढा हिंग व सेंधेलोण घालून घ्यावा. तो तात्काळ शूळाचें निवारण करितो.

हरीतकीयोग.

मूत्रान्तः पाचितां शुष्कां लोहचूर्णसमन्विताम्।
सगुडामभयां दद्यात्सर्वशूलोपशान्तये ॥ १ ॥

हिरडे गोमूत्रामध्यें शिजवून वाळवावे. त्याचें चूर्ण लोहभस्म व गूळ ह्यांजबरोबर सर्व शूळांचें शमन होण्याकरितां द्यावें.

लोहत्रिफळायोग.

तीक्ष्णायश्चूर्णसंयुक्तं त्रिफलाचूर्णमुत्तमम्।
प्रयोज्यं मधुसर्पिभ्यां सर्वशूलनिवारणम् ॥ १ ॥

तिख्याचें भस्म व त्रिफळ्याचें चूर्ण तूप व मध यांशीं द्यावें. तें शूळाचें निवारण करितें.

चूर्ण.

तुंबरु-आदि चूर्ण.

चूर्णं तुम्बुरुरामठत्रिलवणक्षाराजमोदाभया-
वेल्लत्र्यूषणपुष्कराह्वयकृतं कुम्भत्रिभागान्वितम् ।
मन्दोष्णेन जलेन पीतमखिलं शूलं सगुल्मोदरा-
ध्मानाजीर्णविबन्धमामपवनानाहौ च शीघ्रं जयेत् ॥ १ ॥

चिरफळें, हिंग, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, जवखार, अजमोदा, हिरडे, वावडिंग, सुंठ, मिरें, पिंपळी व पोखरमूळ हीं औषधें एक एक भाग आणि तेड तीन भाग ह्यांचें चूर्ण करून तें कोमट पाण्याशीं द्यावें. हें सर्व शूल, गुल्म, उदर, पोटफुगी, अजीर्ण, मळाचा खडा धरणें, आमवायु व पोटाची स्तब्धता ह्यांना त्वरित जिंकतें.

द्विक्षारादि चूर्ण.

विश्वोरुबूकदशमूलयवाम्भसा तु
द्विक्षारहिंगुलवणत्रयपुष्कराणाम् ।
चूर्णं पिबेद् हृदयपृष्ठकटिग्रहाम-
पक्काशयार्तिभृशरुग्ज्वरगुल्मशूली ॥ १ ॥

सुंठ, एरंडमूळ, दशमुळें व सातु ह्यांच्या काढ्यांतून सज्जीखार, जवखार, हिंग, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण व पोखरमूळ ह्यांचें चूर्ण घ्यावें. तें हृदय, पाठ, कंबर, आमाशय व पक्काशय ह्यांमधील अत्यंत वेदना, ज्वर, गुल्म व शूळ ह्यांचा नाश करितें.

हिंग्वादि चूर्ण.

हिंग्वम्लत्रिपटूग्रषट्कटुशठीवृक्षाम्लदीप्याह्लकं
पाठाजाज्यजगन्धमूलहपुषाद्विक्षारसाराभयम् ।
हिध्माध्मानविबन्धवर्ध्मकसनश्वासाग्निसादारुचि-
प्लीहार्शोखिलशूलगुल्मगलहृद्रोगाश्मपाण्डुप्रणुत् ॥१॥

हिंग, आम्लवेतस, सेंधेलोण, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, कचोरा, आमसुलें, ओवा, धने, पहाडमूळ, जिरें, रानतुळशीचें मूळ, शेरणी, आंबट डाळिंब व हिरडे, ह्यांचें समभाग चूर्ण करावें. तें उचकी, पोट फुगणें, मळाचा खडा होणें, अंत्रवृद्धि, खोकला, श्वास, अग्निमांद्य, अरुचि, पांथरी,

मूळव्याध, सर्व शूळ, गुल्म गळा व हृदय ह्यांचे ठिकाणचा शूळ, मूतखडा व पांडुरोग ह्यांचा नाश करतें.

नाराचचूर्ण.

कर्षमात्रा भवेत्कृष्णा त्रिवृतं स्यात्पलोन्मितम् ।
खण्डात्पलं च विज्ञेयं चूर्णमेकत्र कारयेत् ॥ १ ॥
कर्षोन्मितं लिहेदेतत्क्षौद्रेणाऽऽध्माननाशनम् ।
गाढविट्कोदरकफपित्तशूलानि नाशयेत् ॥ २ ॥

पिंपळी एक तोळा, तेड चार तोळे, आणि खडीसाखर चार तोळे ह्यांचें एकत्र चूर्ण करावें; आणि त्यांतील एक तोळा चूर्ण मधाशीं द्यावें. तें पोट फुगणें, मलबद्धता, उदर, आणि कफपित्त जन्य शूळ ह्यांचा नाश करतें.

शंखवटी.

चिञ्चाक्षारं पञ्चपलं लवणानि पलं पलम् ।
संचूर्ण्य निक्षिपेत्प्रस्थद्वयैर्जम्बीरवारिभिः ॥ १ ॥
शंखं दशपलं तप्त्वा निक्षिपेत्सप्तवारतः ।
तत्समस्तं विशोष्याथ हिंगुव्योषं चतुष्पलम् ॥ २ ॥
बलिसूतविषाद्भागान्पलार्धं च पृथक्पृथक् ।
एतत्समस्तं संमर्द्य जम्बीराम्लैर्दिनत्रयम् ॥ ३ ॥
बदरास्थिप्रमाणेन वटिकां कारयेद् बुधः ।
एकैकां भक्षयेत्प्रातः कोष्णतोयं पिबेदनु ॥ ४ ॥
सर्वशूलं हरेद्गुल्ममजीर्णं परिणामजम् ।
अतिसारगदं हन्याद्ग्रहणीं च विशेषतः ॥ ५ ॥

चिंचेच्या टरफलांचा क्षार, सेंधलोण, पादेलोण, बिड· लोण, मीठ, सांबरलोण किंवा बांगडखार हीं औषधें चार चार तोळे, ह्यांचें चूर्ण करून त्यांत एकशें अठ्ठावीस तोळे लिंबाचा रस घालावा आणि चाळीस तोळे शंखाचे तुकडे घेऊन ते त्या रसांत तापवून सात वेळ विझवावे. नंतर तें सर्व औषध वाळवून त्यांत हिंग, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण चारचार तोळे व गंधक, पारा, बचनाग, हीं औषधें दोन दोन तोळे घालून ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा; आणि बोरांतील बीच्या आकाराच्या गोळ्या बांधाव्या. त्यांतील एक एक गोळी प्रातःकाळीं भक्षण करून त्याज-

वर ऊन पाणी द्यावें. हिला शंखवटी असें म्हणतात. ही सर्व शूल, गुल्म, अजीर्ण, परिणामशूल, अतिसार व विशेषतः संग्रहणी रोग ह्यांचा नाश करिते.

सूर्यप्रभावटी.

व्योषग्रन्थिवचाग्निहिंगुजरणद्वंद्वं विषं निम्बुक-
द्रावैरार्द्रकजै रसैर्विमृदितं तुल्यं मरीचोपमा ।
कर्तव्या वटिकाऽथ सा दिनमुखे भुक्ता कवोष्णाम्बुना
शूलं त्वष्टविधं निहंति सहसा सूर्यप्रभा नामतः ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, वेखंड, चित्रकमूळ, हिंग, जिरें, शहाजिरें व बचनाग ह्या सर्वांचें चूर्ण करून लिंबाचा रस व आल्याचा रस ह्यांत खल करून, मिऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्यांतील एक गोळी सकाळच्या प्रहरीं कोमट पाण्याबरोबर घ्यावी. ही सूर्यप्रभा नांवाची वटी अष्टविध शूळांचा नाश करिते.

खंडपिप्पलीलेह.

कणाचूर्णं तु कुडवं षट्पलं हविषस्तथा ।
पलषोडशकं खण्डं शतावर्याः पलाष्टकम् ॥ १ ॥
क्षीरप्रस्थद्वये सार्धं लेहीभूते तदुद्धरेत् ।
त्रिजातमुस्तधान्याकं शुण्ठीमांसीद्विजीरकम् ॥ २ ॥
अभयाऽऽमलकं चैव चूर्णं द्वादशकार्षिकम् ।
तदर्धं मरिचं भागं सारं खादिरमेव च ॥ ३ ॥
मधुत्रिपलसंयुक्तं खादेत्सिद्धं यथाबलम् ।
शूलारोचकहृल्लासच्छर्दिपित्ताम्लरोगनुत् ।
अग्निसंदीपनी हृद्या खण्डपिप्पलिका मता ॥ ४ ॥

पिंपळींचें चूर्ण सोळा तोळे, तूप चोवीस तोळे, खडीसाखर चौसष्ट तोळे व शतावरीचें चूर्ण बत्तीस तोळे, ह्या सर्वांचा एकशें अठ्ठावीस तोळे दुधांत लेहासारखा पाक करावा. नंतर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागरमोथे, धने, सुंठ, जटमांसी, जिरें, शहाजिरें, हिरडा व आवळकाठी ह्यांचें चूर्ण बारा तोळे; मिऱ्यांचें चूर्ण सहा तोळे व खैराचा कात सहा तोळे घालून ढवळून त्यांत बारा तोळे मध घालून ठेवावा आणि शक्तिमानाप्रमाणें सेवन करावा. म्हणजे शूळ, अरुची, मळमळणें, ओकारी व आम्लपित्त

ह्यांचा नाश करतो. हा खंडपिप्पली नांवाचा लेह हृदयाला हित-कारक व अग्निदीपक आहे.

घृत.

घृताच्चतुर्गुणो देयो मातुलुंगरसो दधि ।
शुष्कमूलककोलाम्लकषायो दाडिमाम्भसा ॥ १ ॥
विडंगलवणक्षारं पञ्चकोलयवानिभिः ।
पाठामूलककल्केन सिद्धं शूले घृतं मतम् ॥ २ ॥
हृत्पार्श्वशूलं वै श्वासं कासं हिक्कां तथैव च ।
वर्ध्मगुल्मप्रमेहार्शोवातव्याधींश्च नाशयेत् ॥ ३ ॥

तुपाच्या चौपट दहीं; व महाळुंगाचा रस, वाळलेले मुळे, बोरें, आम्लवेतस, ह्यांचा काढा व डाळिंबाचा रस हेही तुपाच्या चौपट; वावडिंग, सेंधेलोण, जवखार, चवक, चित्रक, पिंपळमूळ, पिंपळी, सुंठ, ओवा व पहाडमूळ ह्यांचा कल्क तुपाच्या चतुर्थांश घालून तूप सिद्ध करावें. तें शूळ, हृदय व बरगड्या ह्यांमधील शूळ, श्वास, खोकला, उचकी, वर्ध्म (बद), गुल्म, प्रमेह, मूळव्याध व वात-रोग ह्यांचा नाश करितें.

शूलगजकेसरी.

रसविषगन्धकपर्दक्षारेण सिन्धुपिप्पलीविश्वैः ।
अहिवल्ल्यम्बुविघृष्टः शूलेभहरिर्द्विगुञ्जोऽयम् ॥ १ ॥

पारा, बचनाग, गंधक, कवडीभस्म, जवखार, सेंधेलोण, पिंपळी व सुंठ ह्या सर्वांचा नागवेलीच्या पानाच्या रसांत खल करावा. ह्याला शूळगजकेसरी असें म्हणतात. हा दोन गुंजाप्रमाणानें द्यावा.

दुसरा प्रकार.

क्षारं कपर्दाविषसैन्धवौ च व्योषं च संमर्द्य भुजंगवल्ल्याः ।
रसेन गुञ्जाप्रमितः प्रदिष्टः समीरशूलेभहारिः प्रचण्डः ॥ १ ॥

जवखार, कवडीभस्म, बचनाग, सेंधेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांचा नागवेलीच्या पानाच्या रसांत खल करून एक एक गुंज या प्रमाणानें गोळ्या कराव्या. हा वातशूलनाशक शूलगजकेसरी मोठा पराक्रमी आहे.

पथ्यापथ्य.

पटोलं कारवेल्लं च वास्तुकं शिग्रुजं तथा ।
सामुद्रं लशुनं वाऽथ शालिः संवत्सरोषितः ॥ १ ॥
एरण्डतैलं सुरभीजलं च तप्ताम्बु जम्बीररसोऽपि कुष्ठम् ।
लघूनि च क्षाररजांसि चेति वर्गो हितः शूलगदार्दितेभ्यः॥२॥

पडवळ, कारलें, चंदनबटवा (किंवा चाकवत), शेवगा, मीठ, लसूण, एक वर्षाच्या जुन्या साळी, एरंडेल, स्वच्छ पाणी, तापविलेलें पाणी, लिंबाचा रस, कोष्ट, हलके पदार्थ व क्षारांचीं चूर्णें, हा शूळरोगानें पीडित मनुष्याला हितकारक वर्ग आहे.

विरुद्धान्यन्नपानानि जागरं विषमाशनम् ।
रुक्षतिक्तकषायाणि शीतलानि गुरूणि च ॥ ३ ॥
व्यायामं मैथुनं मद्यं वैदलं कटुकानि च ।
वेगरोधं शुचं क्रोधं वर्जयेच्छूलवान्नरः ॥ ४ ॥

विरुद्ध अशीं अन्नें व पिण्याचीं द्रव्यें, जागरण, वेळीं अवेळीं जेवणें, रूक्ष, कडू, तुरट, थंड व जड पदार्थ, व्यायाम, मैथुन, मद्य पिणें, द्विदळ धान्यें, तिखट पदार्थ, मलमूत्रादिकांचा वेग आवरून धरणें, शोक व राग ह्यांचा शूळरोगानें पीडित अशा मनुष्यानें त्याग करावा.

परिणामशूळ.

स्वैर्निदानैः प्रकुपितो वायुः संनिहितस्तदा ।
कफपित्ते समावृत्य शूलकारी भवेद्बली ॥ १ ॥

स्वकारणांनीं कुपित झालेला वायु कफ व पित्त ह्यांच्या स्थानांत शिरून त्यांना व्यापून स्वसामर्थ्यानें शूळ उत्पन्न करतो.

अन्य ग्रंथांतून.

बलासः प्रच्युतः स्थानात्पित्तेन सह मूर्छितः ।
वायुमादाय कुरुते शूलं जीर्यति भोजने ॥ १ ॥
कुक्षौ जठरपार्श्वेषु नाभ्यां बस्तौ स्तनान्तरे ।
पृष्ठमूलप्रदेशेषु सर्वेष्वेतेषु वा पुनः ॥ २ ॥
भुक्तमात्रेऽथ वा वान्ते जीर्णे चान्ने प्रशाम्यति ।
षष्टिकव्रीहिशालीनामोदनेन च वर्धते ।
तत्परीणामजं शूलं दुर्विज्ञेयं महागदम् ।

आहाररसवाहानां स्रोतसां दुष्टिहेतुकम् ॥ ४ ॥
केचिदन्नद्रवं प्राहुरन्ये तत्पक्तिदोषजम् ।
पक्तिशूलं वदन्त्येके केचिदन्नविदाहजम् ॥ ५ ॥

स्थानापासून भ्रष्ट झालेला कफदोष पित्ताशीं संयोग पावून वायूला घेऊन अन्न जिरत असतां शूळ उत्पन्न करतो. हा शूळ कुशी, पोटाच्या दोन्ही बाजू, नाभि, बस्ति, हृदय व माकडहाड ह्यांपैकीं कोणत्याहि ठिकाणीं अगर सर्व ठिकाणीं होतो. जेवल्याबरोबर, वांती झाल्यावर किंवा खाल्लें अन्न जिरल्यावर हा शूळ थांबतो. साठेसाळी, व्रीही जातींचें भात किंवा साळी ह्यांचें अन्न खाल्लें असतां हा शूळ अधिक होतो. ह्याला परिणामशूळ म्हणतात. हा मोठा जबरदस्त रोग असून ह्याची परीक्षा करणें फार कठीण आहे. अन्नवह स्रोतसें दूषित झाल्यामुळें हा शूळ उत्पन्न होतो. ह्या शूळाला कित्येक अन्नद्रवशूळ म्हणतात. कित्येक पक्तिदोषजन्य शूळ म्हणतात, कोणी पक्तिशूळ म्हणतात, आणि कित्येक अन्नविदाहजन्य शूळ म्हणतात.

सामान्य लक्षण.

भुक्ते जीर्यति यच्छूलं तदेव परिणामजम् ।
तस्य लक्षणमेतद्धि समासेन प्रकीर्त्यते ॥ १ ॥

खाल्लेलें अन्न जिरत असतां जो शूळ होतो, त्यालाच परिणामशूळ म्हणतात. त्याचें हें लक्षण संक्षेपानें सांगतों.

वातज परिणामशूळ.

आध्मानाटोपविण्मूत्रविबन्धारतिवेपनैः ।
स्निग्धोष्णोपशमं प्रायो वातिकं तद्वदेद्भिषक् ॥ १ ॥

पोट फुगणें, पोटांत गुडगुड वाजणें, मलमूत्राचा अवरोध होणें, अस्वस्थपणा व अंग कांपणें हीं लक्षणें ज्या शूळामध्यें असतात व जो स्निग्ध व उष्ण उपचारांनीं शमतो, त्याला वातजन्य परिणामशूळ म्हणतात.

पित्तज परिणामशूळ.

तृष्णादाहारुचिस्वेदकट्वम्ललवणोत्तरम् ।
शूलं शीतशमं प्रायः पैत्तिकं तद्वदेद्भिषक् ॥ १ ॥

तहान, दाह, अरुचि व अंगाला घाम येणें ह्या लक्षणांनीं युक्त; तिखट, आंबट, खारट पदार्थ खाल्ले असतां अधिक होणारा व शीत उपचारांनीं शमणारा अशा शूळाला पित्तजपरिणामशूळ म्हणतात.

कफज परिणामशूळ.

छर्दिहृल्लाससंमोहस्वल्परुग्दीर्घसंतति ।
कटुतिक्तोपशान्तं हि तच्च ज्ञेयं कफात्मकम् ॥ १ ॥

ओकारी, छातींत कळमळल्यासारखें होणें, मन व इंद्रियें ह्यांना भुलल्यासारखें वाटणें, वेदनांचा जोर कमी असणें व शूळ फार वेळ असणें ह्या लक्षणांनीं युक्त व तिखट व कडू पदार्थांनीं शांत होणारा, अशा ह्या शूळाला कफजन्य परिणामशूळ म्हणतात.

द्विदोषजन्य व त्रिदोषजन्य परिणामशूळ.

संसृष्टलक्षणं बुद्ध्वा द्विदोषं परिकल्पयेत् ।
त्रिदोषजमसाध्यं स्यात्क्षीणमांसबलानलम् ॥ १ ॥

दोन दोन दोषांचीं मिश्र लक्षणें आढळलीं म्हणजे त्याला द्विदोषज परिणामशूळ म्हणतात. त्रिदोषजन्य परिणामशूळ व ज्याचें बळ व मांस क्षीण झालें आहे व अग्नि मंद झाला आहे अशा मनुष्याचा परिणामशूळ असाध्य असतो.

अन्नद्रवशूळ.

जीर्णे जीर्यत्यजीर्णे च यच्छूलमुपजायते ।
तदप्यसाध्यं नित्यत्वादुक्तं वैद्यविशारदैः ॥ १ ॥
पथ्यापथ्यप्रयोगेण भोजनाभोजनेन वा ।
न शमं याति नियमात्सोऽन्नद्रव उदाहृतः ॥ २ ॥
अथायं प्रायेण त्रिदोषविकृतित्वादसाध्यः ।

अन्न जिरल्यावर, जिरत असतां, किंवा जिरण्यापूर्वीं जो शूळ होतो म्हणजे जो सतत केव्हांही असतो, तो देखील नित्यत्वामुळें असाध्यच आहे. तसेंच पथ्यानें अगर अपथ्यानें जेवल्यानें अगर उपास केल्यानें जो शूळ नियमानें रहात नाहीं, त्याला अन्नद्रवशूळ असें म्हणतात. हा शूळ प्रायः त्रिदोषांच्या बिघाडामुळें झालेला असतो. म्हणून असाध्य आहे.

आनाहो गौरवं छर्दिर्भ्रमस्तृष्णा ज्वरोऽरुचिः।
कृशत्वं बलहानिश्च वेदनाऽतिप्रवर्तते ॥ १ ॥
उपद्रवा दशैवैते शूले च परिणामजे।
सोपद्रवोऽप्यसाध्यः स्यात्कृच्छ्रेण निरुपद्रवः ॥ २ ॥

पोट फुगणें, जडत्व, ओकारी, भोंवळ, तहान, ज्वर, अरुचि, कृशत्व, अशक्तपणा व वेदनांचा अतिशय जोर हे दहा परिणामशूळाचे उपद्रव आहेत. ह्या उपद्रवांनीं युक्त असलेला परिणामशूळ तर असाध्य आहेच, तथापि तो उपद्रवरहित असेल तर कष्टानें साध्य होतो.

त्याची चिकित्सा.

लङ्घनं प्रथमं कुर्याद्वमनं च विरेचनम्।
बस्तिकर्म परं चात्र पक्तिशूलोपशान्तये ॥ १ ॥
वातजं स्नेहयोगेन पित्तजं रेचनादिना।
कफजं वमनाद्यैश्च पक्तिशूलमुपाचरेत्।
द्वंद्वजं स्नेहयोगेन तन्नियोगेण सर्वजम् ॥ २ ॥

परिणामशूळाच्या रोग्याला प्रथम उपास करावयास सांगून नंतर क्रमानें वमन विरेचन बस्ति हीं कर्में करावीं. परिणामशूळाचें शमन होण्याकरितां बस्तिकर्म फार उत्तम आहे. वातज परिणामशूळ तेलाचे उपचार करून शमवावा, पित्तज परिणामशूळावर रेचक द्यावें, व कफजन्य परिणामशूळावर वमन वगैरे उपचार करावे. द्वंद्वज परिणामशूळावर औषधी तेलें द्यावीं, आणि त्रिदोषजन्य शूळावर तिन्हीही दोषांचे उपचार करावे.

कल्क.

विष्णुक्रान्ताजटाकल्कः सिताक्षौद्रघृतैर्युतः।
परिणामभवं शूलं नाशयेत्सप्तभिर्दिनैः ॥ १ ॥

विष्णुक्रांतेच्या मुळ्यांचा कल्क खडीसाखर, तूप व मध ह्यांजबरोबर घ्यावा. तो सात दिवसांत परिणामशूळाचा नाश करतो.

शुण्ठीतिलगुडैः कल्कं दुग्धेन सह योजयेत्।
परिणामभवं शूलमामवातश्च नश्यति ॥ २ ॥

सुंठ, तीळ व गुळ ह्यांचा कल्क दुधाशीं घ्यावा; म्हणजे परिणामशूळ व आमवात ह्यांचा नाश होतो.

नागरतिलगुडकल्कं पयसा संसाध्य यः पुमानद्यात् ।
उग्रं परिणतिशूलं सप्ताहाज्जयति चावश्यम् ॥ ३ ॥

सुंठ, तीळ व गूळ ह्यांचा कल्क जो मनुष्य दुधाशीं भक्षण करतो, तो उग्र अशा परिणामशूळाला अवश्य जिंकतो.

शंखभस्मयोग.

शम्बूकजं भस्म पीतं जलेनोष्णेन तत्क्षणात् ।
पक्तिजं विनिहन्त्याशु शूलं विष्णुरिवासुरान् ॥ १ ॥

शंखभस्म ऊन पाण्याशीं घ्यावें, म्हणजे विष्णु ज्याप्रमाणें असुरांचा नाश करतो, त्याप्रमाणें तें तत्क्षणीं परिणामशूळाचा नाश करितें.

शंबूकादि वटी.

शम्बूकमूषणं चैव पञ्चैव लवणानि च ।
समांशां गुटिकां कृत्वा कलम्बुकरसेन च ॥ १ ॥
प्रातर्भोजनकाले वा भक्षयेच्च यथाबलम् ।
शूलाद्विमुच्यते जन्तुः सहसा परिणामजात् ॥ २ ॥

शंखभस्म, मिरें, सैंधलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ व सांबरलोण हीं औषधें समभाग घेऊन यांचा कळंबीच्या पाल्याच्या रसांत खल करावा, आणि गोळ्या कराव्या; आणि प्रातःकाळीं अथवा जेवणाच्या वेळीं शक्तिमानाप्रमाणें सेवन कराव्या. म्हणजे तो रोगी परिणामशूळापासून मुक्त होतो.

क्षीरमंडूर.

लोहकिट्टं पलान्यष्टौ गोमूत्रार्धाढके पचेत् ।
परिणामभवं शूलं सद्यो हन्ति न संशयः ॥ १ ॥

मंडूर बत्तीस तोळे घेऊन तो एकशें अठ्ठावीस तोळे गोमूत्रांत पचन करावा. तो परिणामशूळाचा त्वरित नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

तारमंडूर.

विडङ्गं चित्रकं चव्यं त्रिफला त्र्यूषणानि च ।
नवभागानि चैतानि लोहकिट्टसमानि च ॥ १ ॥
गोमूत्रं द्विगुणं दत्वा मूत्राद्विगुणको गुडः ।
शनैर्मृद्वग्निना पक्त्वा सुसिद्धं पिण्डतां गतम् ॥ २ ॥
स्निग्धभाण्डे विनिक्षिप्य भक्षयेत्कोलमात्रया ।

प्राङ्मध्यान्तक्रमेणैव भोजनस्य प्रयोजितः ॥ ३ ॥
योगोऽयं शमयत्याशु पक्तिशूलं सुदारुणम् ।
कामलां पाण्डुरोगं च शोथमेदोनिलार्शसाम् ।
शूलार्तानां कृपाहेतोस्तारया प्रकटीकृतः ॥ ४ ॥

वावडिंग, चित्रकमूळ, चवक, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरें व पिंपळी हीं औषधें नऊ भाग आणि मंडूर नऊ भाग घेऊन एकत्र करून त्यांत छत्तीस तोळे गोमूत्र व बहात्तर तोळे गूळ घालून मंदाग्नीवर सावकाश पचन करावा. गोळ्या होण्यासारखा झाला म्हणजे तुपानें रावलेल्या स्निग्ध भांड्यांत भरून ठेवावा, आणि रोज सहा मासे प्रमाणानें सेवन करावा. हा भोजनाच्या पूर्वीं, मध्यें व शेवटीं असा योजिला असतां तो त्वरित भयंकर परिणामशूळाला शमवितो. तसेंच कावीळ, पांडुरोग, सूज, मेदोरोग व वातजन्य मूळव्याध ह्यांचाही नाश करतो. शूळानें पीडित अशा मनुष्यावर कृपाळू होऊन हा तारेनें (जैनांची देवता) सांगितला आहे.

भीममंडूर.

यवक्षारकणाशुण्ठीकोलग्रन्थिकचित्रकात् ।
प्रत्येकं पलमादाय प्रस्थं लोहस्य किट्टतः ॥ १ ॥
शनैः पचेदयःपात्रे यावद्दर्वीप्रलेपनम् ।
दत्त्वाऽष्टगुणगोमूत्रं किट्टाच्छुद्धाद्विचक्षणः ॥ २ ॥
ततोऽक्षमात्रान्वटकान्योजयेत्सप्तरात्रतः ।
आदिमध्यावसानेषु भोजनस्योचितस्य वै ।
स भीमवटको ह्येष परिणामरुगन्तकः ॥ ३ ॥

जवखार, पिंपळी, सुंठ, मिरीं, पिंपळमूळ व चित्रक हीं औषधें प्रत्येकीं चार तोळे; मंडूर चौसष्ट तोळे व मंडुराच्या आठपट गोमूत्र घेऊन त्यांचा लोखंडाच्या भांड्यांत दाट होऊन पळीला लागेपर्यंत पाक करावा. नंतर एक एक तोळ्याच्या गोळ्या करून सात दिवस द्याव्या. योग्य वाटल्यास जेवणाच्या आधीं, मध्यें व शेवटींही ह्याची योजना करावी. हा भीममंडूर नांवाचा वटक परिणामशूळाचा नाश करतो.

शतावरीमंडूर.

संशोध्य चूर्णितं कृत्वा मण्डूरस्य पलाष्टकम् ।

शतावरीरसस्याष्टौ दध्नश्च पयसस्तथा ॥ १ ॥
पलान्यादाय चत्वारि तथा गव्यस्य सर्पिषः ।
विपचेत्सर्वमेकस्थं यावत्पिण्डत्वमाप्नुयात् ॥ २ ॥
सिद्धं तु भक्षयेन्मध्ये प्रान्ते भुक्तस्य चाग्रतः ।
वातात्मकं पित्तभवं शूलं च परिणामजम् ॥ ३ ॥
निहन्त्येव हि योगोऽयं मण्डूरस्य न संशयः ।
दुग्धे निर्वापणं कार्यं यद्वा बहुसुतारसे ॥ ४ ॥
अथवा चोभयोरेव लोहकिट्टस्य सप्तधा ।
रसो गन्धः शुभः पाके वार्तिः स्याद्यदि मर्दनात् ॥
तदा पाकं विजानीयान्मण्डूरस्य भिषग्वरः ॥ ५ ॥

बत्तीस तोळे मंडूर शुद्ध करून घ्यावा. नंतर त्यांत शतावरीचा रस, गाईचें दहीं, गाईचें दूध व तूप सोळा सोळा तोळे घालून सर्व एकत्र करून गोळा होईपर्यंत पचन करावें. सिद्ध झाल्यावर हा वटक जेवणाच्या आरंभीं, मध्यें व शेवटीं भक्षण करावा. वातजन्य व पित्तजन्य परिणामशूळाचा हा मंडूरवटक नाश करतो. प्रथम मंडूर दुधांत अथवा पुष्कळशा शतावरीच्या रसांत अगर दोहोंतही अग्नीवर तापवून सात सात वेळ बुडवून घ्यावा. तो पचन झाल्यावर त्याला रुचि व चांगला वास येऊं लागला व घोटतांना त्याच्या वातीसारख्या वळकट्या होऊं लागल्या, म्हणजे त्याचा उत्तम पाक झाला असें समजावें.

लोहगुग्गुळ.

त्रिफला मुस्तकं व्योषं विडङ्गं पौष्करं वचा ।
चित्रकं मधुकं चैव पलांशं श्लक्ष्णचूर्णितम् ॥ १ ॥
अयोभस्म पलान्यष्टौ गुग्गुलुस्तावदेव तु ।
सर्पिषा मेलयित्वाऽथ कर्षमात्रवटीकृतम् ॥ २ ॥
अद्यादनु पिबेत्कोष्णं वारि शूलाद्विमुच्यते ।
जीर्णान्नसंभवात्पाण्डोः कामलाया हलीमकात् ॥ ३ ॥

हिरडा, बेहडा, आंवळकाठी, नागरमोथे, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, पोखरमूळ, वेखंड, चित्रकमूळ, जेष्ठमध हीं औषधें प्रत्येकीं चार चार तोळे, लोहभस्म बत्तीस तोळे आणि गुग्गूळ बत्तीस तोळे यांचा तुपांत खल करून त्याच्या एक एक तोळ्याच्या गोळ्या कराव्या. आणि त्यांतील एक गोळी खाऊन वर कोमट पाणी प्यावें, म्हणजे

परिणामशूळ, पांडुरोग, कावीळ व हलीमक ह्या रोगांपासून रोगी मुक्त होतो.

विडंगादि मोदक.

विडङ्गतण्डुलं व्योषं त्रिवृद्दन्ती सचित्रकम् ।
सर्वाण्येतानि संहृत्य सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ १ ॥
गुडेन मोदकान्कृत्वा भक्षयेत्प्रातरुत्थितः ।
उष्णोदकानुपानेन दद्यादग्निविवर्धनम् ॥
जयेत्त्रिदोषजं शूलं परिणामसमुद्भवम् ॥ २ ॥

वावडिंगांतील तांदुळ (बीं), सुंठ, मिरें, पिंपळी, तेड, दांती-मूळ व चित्रकमूळ ह्या सर्वांचें बारीक चूर्ण करून त्याच्या गुळांत गोळ्या कराव्या आणि त्यांतील एक एक गोळी सकाळीं ऊन पाण्याशीं द्यावी. हा विडंगादि मोदक अग्निवर्धक असून त्रिदोषजन्य परिणाम-शूळाला जिंकतो.

एरंडादिभस्मयोग.

एरण्डवह्निशम्बूकवर्षाभूगोक्षुरं समम् ।
अन्तर्दग्ध्वा पिबेदद्भिरुष्णाभिः शूलशान्तये ॥ १ ॥

एरंडमूळ, चित्रकमूळ, शंखभस्म, वसूची मुळी व गोखरू ह्या सर्वांची अंतर्धूमपद्धतीनें राख करावी. आणि ती शूळ शांत होण्या-कारितां ऊन पाण्याशीं प्यावी.

पथ्यादि लोह.

पथ्यालोहरजः शुण्ठी तच्चूर्णं मधुसर्पिषा ।
परिणामभवं हन्ति वातपित्तकफात्मकम् ॥ १ ॥

हिरड्याचें चूर्ण, लोहभस्म व सुंठीचें चूर्ण हीं औषधें समभाग घेऊन तूप व मध यांशीं भक्षण करावीं. म्हणजे वात, पित्त व कफ-जन्य परिणामशूळाचा नाश होतो.

कृष्णादि लोह.

कृष्णाभयालोहचूर्णं विलिहन्मधुसर्पिषा ।
परिणामभवं शूलं सद्यो हन्ति सुदारुणम् ॥ १ ॥

पिंपळी, हिरडे व लोहभस्म ह्यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें. म्हणजे तें भयंकर परिणामशूळाचा त्वरित नाश करितें.

चतुःसमलोह.

गन्धं ताम्रं रसं लोहं प्रत्येकं मारितं पलम् ।
सर्वमेतत्समाहृत्य विपचेत्कुशलो भिषक् ॥ १ ॥
आज्ये पलद्वादशके दुग्धे शतपले वरे ।
पक्त्वा तत्र क्षिपेच्चूर्णं सुपूतं घनतां नयेत् ॥ २ ॥
विडङ्गत्रिफलावह्नित्रिकटूनां तथैव च ।
क्षिप्त्वा पलोन्मितानेतान्यथा संमिश्रतां नयेत् ॥ ३ ॥
ततः पिष्ट्वा शुभे भाण्डे स्थापयेच्च विचक्षणः ।
आत्मनः शोभने घस्रे पूजयित्वा रविं गुरुम् ॥ ४ ॥
घृतेन मधुना मर्द्य भक्षयेन्माषसंमितम् ।
अष्ट माषाः क्रमाद्यावन्मात्रां संस्तम्भयेत्ततः ॥ ५ ॥
अन्नपानं च दुग्धेन नारिकेलोदकेन वा ।
जीर्णशाल्यन्नमुद्गाश्च सितामांसरसादयः ॥ ६ ॥
रसानामविरुद्धानि पानान्नान्यपि भक्षयेत् ।
हृच्छूलं पार्श्वशूलं च सामवातं कटिग्रहम् ॥ ७ ॥
गुल्मशूलं च सर्वं च यकृत्प्लीहाविशेषतः ।
अग्निमान्द्यं क्षयः कुष्ठं श्वासकासविचर्चिकाः ॥
अश्मरी मूत्रकृच्छ्रं च योगेनानेन शाम्यति ॥ ८ ॥

शुद्ध गंधक, शुद्ध पारा, ताम्रभस्म व लोहभस्म हीं औषधें चार चार तोळे घेऊन, अठ्ठेचाळीस तोळे तूप व चारशें तोळे दूध ह्यांमध्यें पचन करावीं. आणि त्यांत वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चित्रकमूळ, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालून त्या पाकाला घनत्व आणावें (तो घट्ट करावा). नंतर घोटून उत्तम भांड्यांत ठेवावें. नंतर आपल्याला शुभ असा दिवस पाहून गुरु व सूर्य ह्यांची पूजा करून तूप व मध ह्यांतून तें एक मासाभर घ्यावें. ह्याप्रमाणें आठ मासेपर्यंत वाढवून पुरें करावें. ह्याजवर दुधाशीं अन्न खावें व नारळाचें पाणी प्यावें. जुन्या साळीचा भात, मुगाचें वरण, खडीसाखर, मांसरस, आणि रसाच्या योगेंकरून जे पदार्थ विरुद्ध नाहींत अशीं अन्य पदार्थांचीही भक्ष्यें खावीं. म्हणजे हृदयाचा शूळ, पार्श्वशूळ, आमवात, कंबर दुखणें, गुल्म, शूल व विशेषतः यकृत् व प्लीहा, अग्निमांद्य, क्षय, कुष्ठ

श्वास, खोकला, विचर्चिका, अश्मरी (मूतखडा) व मूत्रकृच्छ्र हे विकार ह्या चतुःसम लोहानें शांत होतात.

सामुद्राद्यचूर्ण.

सामुद्रं सैन्धवं क्षारौ रुचकं रोमकं बिडम् ।
दन्ती लोहरजः किट्टं त्रिवृत्सूरणकं समम् ॥ १ ॥
दधिगोमूत्रपयसा मन्दपावकपाचितम् ।
तद्यथाग्निबलं चूर्णं पिबेदुष्णेन वारिणा ॥ २ ॥
जीर्णेऽजीर्णे च भुञ्जीत मांसादि घृतसाधितम् ।
नाभिशूलं च हृच्छूलं गुल्मप्लीहकृतं च यत् ॥ ३ ॥
विद्रध्यष्ठीलजं हन्ति कफवातोद्भवं तथा ।
अन्नद्रवं जरयितुमजीर्णं ग्रहणीमपि ॥ ४ ॥
शूलानामपि सर्वेषामौषधं नास्त्यतः परम् ।
परिणामसमुत्थस्य विशेषेणान्तकं मतम् ॥ ५ ॥

मीठ, सैंधेलोण, जवखार, सज्जीखार, पादेलोण, सोरमीठ, बिडलोण, दांतीमूळ, लोहभस्म, मंडूर, तेड व सुरणाचा कांदा, हीं सर्व औषधें समभाग घेऊन दहीं, गोमूत्र व दूध हीं एकत्र करून त्यांत घालून मंद अग्नीवर पचन करावीं; आणि त्यांचें चूर्ण करून तें अग्निबळ पाहून ऊन पाण्याशीं प्यावें. खालेलें अन्न जिरलें असो अगर नसो, त्याजवर खुशाल तुपांत तळलेले मांसादि भक्ष्य पदार्थ खावे. हें चूर्ण नाभिशूळ, हृदयांतील शूळ, गुल्म व प्लीहा ह्यांच्यापासून होणारा शूळ, विद्रधि व अष्ठीला ह्यांपासून होणारा शूळ व कफवातजन्यशूळ ह्यांचा नाश करतें. अन्नद्रवशूळ, अजीर्ण, संग्रहणी व सर्व प्रकारचे शूळ ह्या रोगांना ह्यासारखें औषध नाहीं. हें चूर्ण विशेषतः परिणामशूळाचें नाशक आहे.

पिप्पल्ल्यादि योग.

समागधीगुडं सर्पिः प्रस्थं क्षीरं चतुर्गुणम् ।
पक्वं पीत्वा जयत्याशु पक्तिशूलं समुद्धतम् ॥ १ ॥

पिंपळीचें चूर्ण, गूळ व चौसष्ट तोळे तूप ह्यांत चौपट दूध घालून पक्व करून प्यालें असतां, तें वाढलेल्या परिणामशूळाला त्वरित जिंकतें.

त्रिपुरभैरव रस.

भागौ रसस्य भागश्च हेम्नः पिष्टं विधाय च ।
तथा द्वादशभागानि ताम्रपत्राणि लेपयेत् ॥ १ ॥
ऊर्ध्वाधो गन्धकं दत्त्वा पलमात्रं समन्ततः ।
क्षारस्य मृगशृङ्गस्य चूर्णं योज्यं समन्ततः ॥ २ ॥
सिञ्चेन्मत्स्याक्षिनीरेण रुद्ध्वा यामचतुष्टयम् ।
पचेच्छूलहरः सूतो भवेत्रिपुरभैरवः ॥ ३ ॥
माषो मध्वाज्यसंयुक्तो देयोऽस्य परिणामजे ।
अन्येष्वेरण्डतैलेन कटुत्रययुतो हितः ॥ ४ ॥

दोन भाग पारा व एक भाग सोनें ह्यांचा एकत्र खल करून बारा भाग तांब्याच्या पत्र्यास लेप करावा. नंतर त्या पत्र्याच्या खालीं, वर व भोंवतालीं चार तोळे गंधक घालून त्याच्या सभोंवार टाकणखाराचें व हरणाच्या शिंगाचें चूर्ण जळपिंपळीच्या अथवा चुक्याच्या रसांत कालवून द्यावें. नंतर मुखमुद्रा करून चार प्रहर पचन करावें. म्हणजे हा शूळनाशक त्रिपुरभैरव रस तयार होतो. ह्यांतील एक मासाभर रस तूप-मधाशीं परिणामशूळावर द्यावा आणि अन्य शूळावर एरंडतेल व सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांबरोबर द्यावा.

शूलदावानल.[1]

शुद्धसूतं विषं गन्धं पलांशं मर्दयेद् दृढम् ।
मरीचं पिप्पली शुण्ठी हिंगु सौवर्चलं द्वयम् ॥ १ ॥

---

१ पांढरा, तांबडा व पिवळा सोमल, मनशीळ, कलखापरी, हरताळ, मोरचूत, पारा, गंधक आणि हिंगूळ, हे सर्व जिन्नस शुद्ध करून समभाग घेऊन कांचनाच्या फुलाशीं तीन दिवस खल करावा; आणि शक्तिमानाप्रमाणें अनुपान योजून द्यावा. आहार मधुर करावा. म्हणजे अनेक प्रकारचे व्रण, भगंदर, गंडमाळा, शूळ व उदर ह्यांचा हा रामबाण रस नाश करतो, ह्यांत संशय नाहीं. [लेखी प्रतीवरून]

अन्नद्रवशूळाची चिकित्सा.

जोपर्यंत कडवड आंबट पित्तमिश्रित अन्न ओकून पाडलें नाहीं, तोंपर्यंत अन्नद्रवजन्य शूळ राहात नाहीं व स्वस्थता वाटत नाहीं. जरत्पित्त (आम्लपित्त) तयार झालें कीं त्वरित शूळ थांबतो. ह्या अन्नद्रवशूळांत प्रथम पित्त पडेपर्यंत वमन द्यावें. नंतर कफ पडेपर्यंत रेचक द्यावें. [पुढें प.]

पलाष्टकं पट्टूनां च चिञ्चाक्षारं पलाष्टकम् ।
सप्तवारं शङ्खभस्म जम्बीराम्ले निषेचयेत् ॥ २ ॥

आम्लपित्तावर जी चिकित्सा सांगितली आहे, तीच ह्या अन्नद्रवाख्य शूळावर करावी. आणि आम्लपित्तावर जें पथ्य सांगितलें आहे, तेंच ह्या-जवर करावें. आमाशय व पक्वाशय शुद्ध झाला असतां अन्नद्रवशूळ रहातो.

अन्नद्रवशूळाच्या रोग्यानें उडदाचे पिठांत मीठ घालून त्यांचे वडे करावे आणि ते तेलांत तळून तुपाशीं खावे.

अन्नद्रवशूळावर आवळकाठीच्या अगर जेष्ठमधाच्या चूर्णांतून लोहभस्म मध घालून द्यावें.

सांव्याचे तांदूळ, हरकाचे तांदूळ अगर राळयाचे तांदूळ घेऊन त्यांची खीर करून द्यावी. ती अन्नद्रवशूळावर हितकारक आहे.

सुरणाचा कांदा अगर कोहळा गुळांत पचन करून खावा. वाटाणे किंवा सातू भाजून त्यांचें पीठ, लाह्याचें पीठ अथवा हुलग्याचें पीठ दह्याशीं अगर दह्यांत शिजवून खावें.

हरबऱ्याचें पीठ अथवा हरकाचा भात गव्हाचा मंड, तूप, गूळ, साखर व दूध घालून कालवून शिजवून घ्यावा. तो हितकारक आहे.

अन्नद्रवशूळ हा जाणण्यास व चिकित्सा करण्यास मोठा बिकट रोग आहे. म्हणून तो शांत होण्याकरितां पराकाष्ठेचा प्रयत्न करावा.

अन्नद्रवशूळ व जरत्पित्त (आम्लपित्त) ह्या विकारामध्यें अग्नि मंद असतो, म्हणून त्या विकारांत मांसरहित अन्नपान करवावें.

वाटाणे, सातू , गहू, सावे, हारीक, चवळया, उडीद, हुलगे, राळे, दहीं मिसळलेलें दूध (दह्याच्या योगानें ज्याची गोडी लुप्त झाली आहे असें), गाईचें व म्हशीचें तूप; चंदनबटवा, कारलीं, करटोलीचीं फळें ह्या भाज्या; मोर, हरीण, रोहीजातीचे वगैरे मासे, पांढरा तित्तिर हे पदार्थ ह्या विकारांत प्रशस्त आहेत असें पूर्वींच्या ऋषींचें मत आहे.

गुडमंडूर.

गूळ [जुना], आवळकाठी व हिरडे ह्यांचें चूर्ण चार चार तोळे व बारा तोळे मंडूर ह्यांचा एकत्र खल करून तूप व मधाशीं एक तोळाप्रमाणें जेवणाच्या आधीं, मध्यें व शेवटीं घ्यावें. म्हणजे अन्नद्रवशूळ, आम्लपित्त, मोठा भयंकर शूळ, परिणामशूळ व एक वर्ष होऊन गेलेला असा शूळ ह्यांचा नाश होतो.

—भावप्रकाशांतून.

पलाष्टकं च संयोज्यं तत्सर्वं निम्बुकद्रवैः ।
दिनं मर्द्यं कोलमात्रं भक्षयेत्सर्वशूलनुत् ॥ ३ ॥
अजीर्णोदरमन्दाग्निमसाध्यमपि साधयेत् ।
शूलदावानलाख्योऽयं रसोऽजीर्णादिरोगहा ॥ ४ ॥

शुद्ध पारा, बचनाग व गंधक हीं प्रत्येक चार चार तोळे घेऊन त्यांचा खल करावा. नंतर त्यांत मिरें, पिंपळी, सुंठ, हिंग, पादेलोण व सैंधेलोण हीं प्रत्येक आठ आठ तोळे, बत्तीस तोळे मीठ, चिंचेच्या टरफलाचा क्षार बत्तीस तोळे, व शंख तापवून लिंबाच्या रसांत सात वेळ बुडवून तयार केलेलें शंखभस्म बत्तीस तोळे, ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत एक दिवस खल करावा; आणि सहा मासे प्रमाणें भक्षण करावा, म्हणजे हा रस सर्व शूळांचा नाश करतो. अजीर्ण, उदर व अग्निमांद्य हे रोग असाध्य असले तरी बरे होतात. हा शूळदावानल रस अजीर्णादि सर्व रोगांचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

माषादिशिम्बिधान्यानि मद्यानि वनिता हिमम् ।
आतपं जागरं क्रोधं शुचं संधानमम्लकम् ॥
वर्जयेत्पक्तिशूलार्तस्तथाऽजीर्णं तिलानपि ॥ १ ॥

उडीद वगैरे शेंगांतील धान्यें, मद्य, स्त्रीसंग, थंड पदार्थ, ऊन, जागरण, राग, शोक व कांजी वगैरे कुजवून आंबट बनलेले पदार्थ, अजीर्ण व तिळ ह्यांचें परिणामशूळाच्या रोग्यानें सेवन करूं नये.

उदावर्तनिदान.

वातविण्मूत्रजृम्भाश्रुक्षवोद्गारवमीन्द्रियैः ।
क्षुत्तृष्णोच्छ्वासनिद्राणां धृत्योदावर्तसंभवः ॥ १ ॥

अधोवायु, मळ, मूत्र, जांभई, अश्रु, शिंक, ढेकर, ओकारी,

---

१ वमन, घाम काढणें [वाफारा, स्वेद] लंघन, गुदांत वात घालणें, बस्ती, झोंप, ढाळक, पाचक औषध, एक वर्षाच्या जुन्या साळी, वाट्यमंड, तापविलेलें दूध, जांगल प्राण्यांच्या मांसाचे रस, पडवळ, शेवगा, कारलें, चंदनबटवा, हिंग, सुंठ, बिडलोण, बडिशेप, लसूण, लवंग, एरंडतेल, स्वच्छ पाणी, ऊन पाणी, लिंबाचा रस, कोष्ट, हलके पदार्थ व क्षारचूर्ण हा समुदाय शूळरोगानें पीडिताला हितकारक आहे. [ले. प्रतीवरून.]

शुक्र, भूक, तहान, श्वासोच्छ्वास व झोंप ह्यांचे वेग आवरून धरल्यानें उदावर्त रोग उत्पन्न होतो.

अपानवायूच्या अवरोधाचें लक्षण.

वातमूत्रपुरीषाणां सङ्गोऽध्मानं क्लमो ज्वरः ।
जठरे वातजाश्चान्ये रोगाः स्युर्वातनिग्रहात् ॥ २ ॥

अपान-वात, मूत्र व मळ ह्यांचा अवरोध, पोट फुगणें, थकवा; ज्वर आणि पोटांत इतर वातसंबंधीं विकार हीं लक्षणें अधोवायूच्या अवरोधामुळें होतात.

मलावरोधाचें लक्षण.

आटोपशूलौ परिकर्तिका च सङ्गः पुरीषस्य तथोर्ध्ववातः ।
पुरीषमास्याद्थवा निरेति पुरीषवेगेऽभिहते नरस्य ॥ ३ ॥

पोटांत गुडगुडणें, गुदामध्यें कातरल्यासारखी पीडा, मलाचा अवरोध, वाताची ऊर्ध्व गति होणें, अथवा वांती होऊन मुखावाटे मळ येणें हीं लक्षणें शौचाचा अवरोध केला असतां होतात.

मूत्रावरोधाचें लक्षण.

बस्तिमेहनयोः शूलं मूत्रकृच्छ्रं शिरोरुजा ।
विनामो वंक्षणानाहः स्याल्लिङ्गं मूत्रनिग्रहे ॥ ४ ॥

मूत्रद्वार व बस्ती ह्यांमध्यें शूळ, मूत्रकृच्छ्र (उन्हाळे लागणें) मस्तक दुखणें, अंग वाकणें व आडसंधीमध्यें बांधल्याप्रमाणें पीडा हीं लक्षणें मूत्रनिग्रहामुळें (मूत्रावरोधामुळें) होतात.

जांभईच्या अवरोधाचें लक्षण.

मन्यागलस्तम्भशिरोविकारा
जृम्भोपघातात्पवनात्मकाः स्युः ।
तथाऽक्षिनासावदनामयाश्च
भवन्ति तीव्राः सह कर्णरोगैः ॥ ५ ॥

मान व गळा ताठणें व मस्तक दुखणें, हे विकार जांभईचा रोध केल्यामुळें वातप्रकोप होऊन त्यापासून होतात. त्याचप्रमाणें नेत्ररोग, नासारोग, मुखसंबंधी रोग व तीव्र कर्णरोग हेही विकार जांभईच्या अवरोधामुळें होतात.

अश्रूच्या अवरोधाचें लक्षण.

आनन्दजं वाऽप्यथ शोकजं वा
नेत्रोदकं प्राप्तममुञ्चतो हि ।
शिरोगुरुत्वं नयनामयाश्च
भवन्ति तीव्राः सह पीनसेन ॥ ६ ॥

अतिशय आनंदामुळें किंवा शोकामुळें येणारे डोळ्यांतील अश्रु (पाणी) आवरून धरले असतां मस्तकाला जडत्व, डोळ्यांचे तीव्र विकार व पीनसरोग हीं लक्षणें होतात.

शिंकेच्या अवरोधाचें लक्षण.

मन्यास्तम्भः शिरःशूलमर्दितार्धावभेदकौ ।
इन्द्रियाणां च दौर्बल्यं क्षवथोः स्याद्विधारणात् ॥ ७ ॥

मान ताठणें, मस्तकशूळ, अर्दितवात, अर्धावभेदक (अर्धें मस्तक दुखणें) व इंद्रियांना अशक्तपणा हे विकार शिंकेच्या अवरोधामुळें होतात.

ढेकराच्या अवरोधाचें लक्षण.

कण्ठास्यपूर्णत्वमतीव तोदः कूजश्च वायोरथवाऽप्रवृत्तिः ।
उद्गारवेगेऽभिहते भवन्ति घोरा विकाराः पवनप्रसूताः ॥ ८ ॥

गळा व तोंड भरून आल्यासारखें वाटणें, घशांत अतिशय टोचल्यासारखें होणें, पोटांत वाजणें व श्वास बरोबर न चालणें हे व दुसरे भयंकर वातजन्य विकार ढेकर आवरून धरल्यानें होतात.

वांतीच्या अवरोधाचें लक्षण.

कण्डूकोठारुचिव्यंगशोथपाण्ड्वामयज्वराः ।
कुष्ठहल्लासवीसर्पाश्छर्दिनिग्रहजा गदाः ॥ ९ ॥

अंगाला खाज उठणें, अंगावर गांधी उठणें, अरुचि, वांग, सूज, पांडुरोग, ज्वर, कुष्ठ, हृदयांत पीडा व वीसर्प हे विकार वांतीचा वेग आवरून धरल्यामुळें होतात.

शुक्रावरोधाचें लक्षण.

मूत्राशये वै गुदमुष्कयोश्च शोफो रुजा मूत्रविनिग्रहश्च ।
शुक्राश्मरी तत्स्रवणं भवेच्च ते ते विकाराभिहते च शुक्रे ॥१०

मूत्राशय, गुद व अंडकोश ह्यांना सूज येणें, ठणका लागणें, लघवीचा अवरोध, शुक्रजन्य मुतखडा, शुक्राचा स्राव होणें व

त्या त्या इंद्रियांसंबंधीं अन्य विकार हीं लक्षणें शुक्राच्या अवरोधामुळें होतात.

भुकेच्या अवरोधाचें लक्षण.

तन्द्रांगमर्दावरुचिः श्रमश्च
क्षुधोऽभिघातात्कृशता च दृष्टेः ॥ ११ ॥

ग्लानि, अंग मोडून येणें, अरुचि, थकवा व दृष्टीला मंदपणा हीं लक्षणें भुकेच्या रोधामुळें होतात.

तहानेच्या अवरोधाचें लक्षण.

कण्ठास्यशोषः श्रवणावरोध-
स्तृष्णाभिघाताद् हृदयव्यथा च ॥ १२ ॥

तहानेचा अवरोध केला असतां घशाला व तोंडाला कोरड पडते, कान गच्च होतात, आणि छातींत दुखतें.

श्वासावरोधाचें लक्षण.

श्रान्तस्य निश्वासविनिग्रहेण
हृद्रोगमोहावथवाऽपि गुल्मः ॥ १३ ॥

श्रमामुळें जोरानें चालणाऱ्या श्वासोश्वासाचा अवरोध केला असतां हृद्रोग, मूर्च्छा किंवा गुल्म हे विकार होतात.

झोंपेच्या अवरोधाचें लक्षण.

जृम्भांगमर्दोऽक्षिशिरोतिजाड्यं
निद्राविघातादथवाऽपि तन्द्रा ॥ १४ ॥

जांभया येणें, अंग दुखणें, डोळे व डोकें ह्यांना जडत्व आणि ग्लानि हीं लक्षणें झोंपेच्या अवरोधामुळें होतात.

रूक्ष अन्नापासून होणारे विकार.

वायुः कोष्ठानुगो रूक्षकषायकटुतिक्तकैः ।
भोजनैः कुपितः सद्य उदावर्तं करोति च ॥ १५ ॥

रूक्ष, तुरट, तिखट व कडू अशा प्रकारचें अन्न सेवन केलें असतां कोठ्यांतील वायु प्रकुपित होऊन उदावर्तरोग उत्पन्न करतो.

त्याची संप्राप्ति.

वातमूत्रपुरीषाश्रुकफमेदोवहानि वै ।
स्रोतांस्युदावर्तयति पुरीषं चातिवर्तयेत् ॥ १६ ॥

ततो हृद्वस्तिशूलार्तो हृल्लासारतिपीडितः ।
वातमूत्रपुरीषाणि कृच्छ्रेण लभते नरः ॥ १७ ॥
श्वासकासप्रतिश्यायदाहमोहतृषाज्वरान् ।
वमिहिक्काशिरोरोगमनःश्रवणविभ्रमान् ।
बहूनन्यांश्च लभते विकारान्वातकोपजान् ॥ १८ ॥

वायु हा मूत्र, मळ व डोळ्यांतील पाणी वहाणारीं स्रोतसें व्यापून उदावर्त उत्पन्न करतो. त्यामुळें मळाचीही वरून प्रवृत्ति होते. ह्या उदावर्तापासून हृदय व बस्ति ह्यांमध्यें शूळ, मळमळणें व अस्वस्थपणा हे विकार होतात. आणि त्या मनुष्याला अधोवायूची प्रवृत्ति, मल व मूत्र हीं फार कष्टानें होतात. श्वास, खोकला पडसें, दाह, मूर्च्छा, तहान, ज्वर, ओकारी, उचकी, मस्तकासंबंधीं विकार, मानसिक विकार, कानाचे रोग आणि घेरी येणें वगैरे वातप्रकोपासंबंधीं दुसरे पुष्कळ विकार होतात.

असाध्य लक्षण.

तृष्णार्दितं परिक्लिष्टं क्षीणं शूलैरुपद्रुतम् ।
शकृद्वमन्तं मतिमानुदावर्तिनमुत्सृजेत् ॥ १९ ॥

ज्याला फार तहान लागली आहे, ज्याला फार क्लेश होत आहेत, जो फार क्षीण झाला असून शूळानें पीडित आहे, आणि ज्याला वांतींतून मळ पडत आहे, अशा उदावर्ताच्या रोग्याला असाध्य समजून सोडून द्यावें.

उदावर्तचिकित्सा.

सर्वेष्वेतेषु भिषजा चोदावर्तेषु कृत्स्नशः ।
वायोः क्रिया विधातव्याः स्वमार्गप्रतिपत्तये ॥ १ ॥
आस्थापनं मारुतजे स्निग्धस्विन्ने विशेषतः ।
पुरीषजे तु कर्तव्यो विधिरानाहकोदितः ॥ २ ॥

ह्या एकंदर सर्व उदावर्तावर जेणेंकरून वायु स्वमार्गावर येईल अशी क्रिया करावी. वातजन्य उदावर्तावर विशेषतः स्नेहन व स्वेदन केलेल्या रोग्याला आस्थापन बस्ति द्यावा; आणि मलावरोधामुळें होणाऱ्या उदावर्तावर आनाहरोगावर सांगितकेली क्रिया करावी.

सौवर्चलादियोग.

सौवर्चलाढ्यां मदिरां मूत्रे त्वभिहते पिबेत् ।

एलां वाऽप्यथ मस्त्वन्नं क्षीरं वाऽथ वराम्बु वा ॥ १ ॥

मूत्रजन्य उदावर्तामुळें मूत्र कोंडलें असतां, त्याजवर पादेलोण घालून स्वच्छ असें मद्य प्यावें; किंवा वेलदोड्यांचें चूर्ण, दह्यावरील पाणी घातलेलें अन्न, दूध किंवा त्रिफळ्याचा काढा घ्यावा.

उर्वारुबीजादि लेप.

उर्वारुबीजं तोयेन पिबेद्वा लवणान्वितम् ।
पञ्चमूलीशृतं क्षीरं द्राक्षारसमथापि वा ॥ १ ॥

वाळक्याचें बीं पाण्यांत वांटून अथवा मिठाबरोबर खावें. पंचमुळें (रिंगणमूळ, डोरलीमूळ, साळवण, पिठवण व गोखरू) घालून सिद्ध केलेलें दूध प्यावें, किंवा द्राक्षांचा रस प्यावा.

यवक्षारादि योग.

यवक्षारं सितायुक्तं पिबेद्वा मृद्धिकारसैः ।
वरीकूष्माण्डयोस्तोयं सितायुक्तं पिबेदथ ॥ १ ॥

साखरेशीं अथवा मनुकांच्या रसाशीं जवखार प्यावा. शतावरीच्या मुळ्यांचा रस प्यावा, अथवा कोहाळ्यांतील पाणी साखर घालून प्यावें.

मूषकविष्ठादिलेप.

मूषकस्य विशा लेपं बस्तेरुपरि वा चरेत् ।
किंशुकानां प्रलेपो वा कवोष्णो मूत्ररोधहा ॥ १ ॥

उंदराच्या लेंड्यांचा लेप बेंबीच्या खालच्या पोटावर करावा. किंवा पळसाच्या फुलांचा कोमटसा लेप करावा. तो मूत्रावरोधाचा नाश करितो.

पिष्ट्वा श्वदंष्ट्राफलमूषिकाविडैरुर्वारुबीजानि सकाञ्जिकानि ।
आलिप्यमानानि समानि बस्तौ मूत्रस्य निष्यन्दकराणि सद्यः ।
अत्र सर्वं प्रयुंजीत मूत्रकृच्छ्राश्मरीविधिम् ॥ २ ॥

गोखरू, उंदराच्या लेंड्या व वाळक्याचें बीं हीं औषधें समभाग घेऊन कांजींत वाटून त्यांचा बेंबीच्या खालील पोटावर लेप करावा; म्हणजे तात्काळ लघवी होते. ह्या मूत्रावरोधावर मूत्रकृच्छ्र व अश्मरी ह्यांजवरील उपचार करावे.

बाकीच्या उदावर्तांची चिकित्सा.

स्नेहस्वेदैरुदावर्तं जृंभाजं समुपाचरेत् ।

जांभईच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्तावर स्नेहन व स्वेदन वगैरे उपचार करावे.

अश्रुमोक्षोऽश्रुजे कार्यः स्निग्धस्विन्नस्य देहिनः ॥ १ ॥
मरीचाद्यंजनैर्धूमैरादित्याद्यवलोकनैः ।

डोळ्यांतील आसवांचा अवरोध केल्यामुळें होणाऱ्या उदावर्तावर स्नेहन व स्वेदन केलेल्या रोग्याच्या डोळ्यांत मिऱ्याचें वगैरे अंजन किंवा धुरी देऊन किंवा सूर्याकडे पहावयास लावून डोळ्यांतून पाणी जाऊं द्यावें.

क्षवजे क्षवयन्त्रेण घ्राणस्थेनाऽऽनयेत्क्षवम् ॥ २ ॥

शिंकेच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्ताच्या विकारावर क्षवयंत्र म्हणजे शिंक उत्पन्न करणारी शलाका नाकांत घालून शिंका आणाव्या.

उद्गारजे क्रमोपेतं स्नैहिकं धूममाचरेत् ।
भक्षयेद्रुचकं सार्द्रं खण्डं वा मथितान्वितम् ॥ ३ ॥

ढेकर आवरून धरल्यामुळें होणाऱ्या उदावर्तावर स्निग्ध असें धूम्रपान करावें. आल्याच्या तुकड्याबरोबर पादेलोण घ्यावें, किंवा ताकामध्यें बिडलोण घालून खावें.

वम्या वान्तं यथादोषं नस्यस्नेहादिभिर्जयेत् ।
बस्तिशुद्धिकरैः सिद्धं चतुर्गुणजलं पयः ॥ ४ ॥

वांतीच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्तावर पुनः दोषानुरूप वमन द्यावें आणि स्नेहन व नस्य इत्यादि उपचार करून तो उदावर्त जिंकावा.

आवारिनाशात्कथितं पीतवंतं प्रकामतः ।
रमयेयुः प्रिया नार्यः शुक्रोदावर्तिनं नरम् ॥ ५ ॥
तस्याभ्यङ्गोऽवगाहश्च मदिराश्चरणायुधाः ।
शालिः पयो निरूहाश्च हितं मैथुनमेव च ॥ ६ ॥

शुक्राच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्ताच्या रोग्याला बस्तिशुद्धिकारक अशीं औषधें व चौपट पाणी घातलेलें दुध सर्व पाणी आटेपर्यंत पचन करून तें दूध यथेच्छ पाजावें व कामासक्त होऊन प्रिय कामिनींशीं रत होण्यास सांगावें. त्या रोग्याला अभ्यंग (अंगाला

सुगंधी तेल लावण), अवगाहन (पाण्यांत बसणें), स्वच्छ मद्य, कोंबड्याचें मांस, शाली (तांदुळ), दूध, निरूहबस्ती व मैथुन हे उपचार पथ्यकारक आहेत.

क्षुद्विघाते हितं स्निग्धं रुच्यमल्पं च भोजनम् ।

भुकेच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्तावर स्निग्ध, रुचिकारक वं अल्प असें भोजन हितकारक आहे.

तृषाघाते पिबेन्मद्यं यवागूं स्वादुशीतलाम् ॥ ७ ॥

तहानेच्या अवरोधामुळें होणाऱ्या उदावर्तावर मद्य किंवा थंड व मधुर अशी कण्हेरी (यवागु) प्यावी.

रसेनाद्यात्तु विश्रान्तः श्रमश्वासार्दितो नरः ।

श्रमामुळें जलद चालणाऱ्या श्वासाचा अवरोध केल्यामुळें होणाऱ्या उदावर्तावर मांसरसाशीं भोजन करावें.

निद्राघाते पिबेद् दुग्धं माहिषं रजनीमुखे ॥ ८ ॥
तिलतैलेन संमृज्य भूतले शयनं चरेत् ।

झोंपेचा अवरोध केल्यामुळें होणाऱ्या विकारावर संध्याकाळीं म्हशीचें दूध प्यावें. तिळाचें तेल अंगास लावावें आणि जमिनीवर निजावें.

उदावर्तिनमभ्यक्तं स्निग्धगात्रमुपाचरेत् ।
वर्तिकास्थापनस्वेदबस्तिरेचनकर्मणा ॥ ९ ॥

अंगास तेल लावलेल्या व स्नेहनानें स्निग्ध गात्रें झालेल्या उदावर्ताच्या रोग्याला फलवर्ती (वात), आस्थापनबस्ती, घाम काढणें अनुवासन बस्ती व रेचक इत्यादि उपचार करावे.

सामान्यविधि

श्यामादि काढा

श्यामा दन्ती द्रवन्ती स्नुङ्महाश्यामाऽमृता त्रिवृत् ।
सप्तला शंखिनी श्वेता राजवृक्षः सबिल्वकः ॥ १ ॥
कंपिल्लकं करञ्जश्च हेमक्षीरीत्ययं गणः ।
सर्पिस्तैलरजःक्वाथकल्केष्वन्यतमेषु च ॥
उदावर्तोदरानाहविषगुल्मविनाशनः ॥ २ ॥

काळें निशोत्तर, दांतीमूळ, थोर दांतीमूळ, त्रिधारी निवडुग,

थोर काळें निशोत्तर, गुळवेल, पांढरें निशोत्तर, शिकेकाईचें मूळ, शंखाहुली, पांढरी गोकर्णी, बाहवा, बेलमूळ, कपिला, करंजाची साल व पिंवळ्या काटेधोतऱ्याच्या मुळ्या ह्या औषधांचा हा गण तूप, तेल, चूर्ण, काढा, कल्क किंवा दुसऱ्या अन्य तऱ्हेनें योजिला असतां उदावर्त, उदर, आनाह, विष व गुल्म ह्यांचा नाश करितो.

वाट्यादि यूष.

वाट्यायूषेण पिप्पल्या मूलकानां रसेन वा ।
भुक्त्वा स्निग्धमुदावर्तवातगुल्माद्विमुच्यते ॥ १ ॥

वाट्ययवांच्या यूषाशीं किंवा पिंपळीच्या मूळाच्या रसाशीं स्निग्ध आहार केला असतां तो रोगी उदावर्तापासून मुक्त होतो.

वाट्यादि योग.

वाट्यक्षीररसैः सेव्यं यच्च वातानुलोमनम् ।
वातघ्नैर्लवणाद्यैश्च रसाद्यैश्चान्नमाचरेत् ॥ १ ॥

वाट्ययवांच्या काढ्यांत सिद्ध केलेल्या दुधाबरोबर किंवा मांसरसाबरोबर वातानुलोमन करणारें असें अन्न खावें. वातनाशक अशा सैंधवादि लवणादिकांशीं किंवा मांसरसादिकांशीं अन्न खावें.

हरीतक्यादि चूर्ण.

हरीतकी यवक्षारः पीलूनि त्रिवृता तथा ।
घृतैश्चूर्णं त्विदं पेयमुदावर्तप्रशान्तये ॥ १ ॥

हिरडे, जवखार, पीलूचीं फळें व तेड, ह्यांचें चूर्ण उदावर्तनाशार्थ तुपाशीं द्यावें.

द्विरुत्तरचूर्ण.

हिंगुकुष्ठवचास्वर्जिबिडं चेति द्विरुत्तरम् ।
पीतं मद्येन तच्चूर्णमुदावर्तहरं परम् ॥ १ ॥

हिंग दोन तोळे, कोष्ट चार तोळे, वेखंड आठ तोळे, सज्जिखार सोळा तोळे व बिडलोण बत्तीस तोळे ह्याप्रमाणें चढतीं औषधें घेऊन चूर्ण करावें, व तें मद्याबरोबर घ्यावें. तें उदावर्ताचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

नाराचचूर्ण.

खण्डं पलं त्रिवृतासममुपकुल्याकर्षचूर्णितं सूक्ष्मम् ।
प्राग्भोजनस्य समधु विडालपदकं लिहेत्प्रातः ॥ १ ॥
एतद्गाढपुरीषे पित्ते कफे च विनियोज्यम् ।
स्वादुर्नृपयोग्योऽयं चूर्णो नाराचको नाम ॥ २ ॥

चार तोळे खडीसाखर, एक तोळा तेड व एक तोळा पिंपळी ह्यांचें चूर्ण प्रातःकाळीं जेवणापूर्वीं मधाशीं एक तोळा घ्यावें. हें मळाचा खडा होतो त्याजवर, कफावर व पित्तावर योजावें. हें चूर्ण गोड असल्यामुळें राजालाहि योग्य आहे. ह्याला नाराचचूर्ण म्हणतात.

हिंगु त्रिगुणसैन्धवं तस्माच्च शुद्धतैलमैरण्डम् ।
तत्त्रिगुणरसोनरसं गुल्मोदावर्तशूलघ्नम् ॥ ३ ॥

हिंग एक भाग, सैंधव तीन भाग, एरंडेल तेल नऊ भाग आणि लसणीचा रस सत्तावीस तोळे ह्यांचें मिश्रण गुल्म, उदावर्त व शूळ ह्यांचा नाश करितें.

लेप.

वल्मीकमृत्करञ्जस्य त्वङ्मूलफलपल्लवम् ।
सिद्धार्थं चेति पिष्टानां मूत्रेणाऽऽलेपनं हितम् ।
उदावर्तेषु सर्वेषु सम्यग्वातानुलेपनम्[१] ॥ १ ॥

वारुळाची माती, करंजाची साल, मुळ्या, फळें व पानें आणि मोहऱ्या हे सर्व जिन्नस गोमूत्रांत वाटून पोटावर लेप करावा. सर्व उदावर्तांवर वातानुलोमन क्रिया करणेंच योग्य आहे.

औषधी वाती.

मदनं पिप्पलीकुष्ठं वचा गौराश्च सर्षपाः ।
गुडक्षीरसमायुक्ता फलवर्तिः प्रशस्यते ॥ १ ॥

गेळफळ, पिंपळी, कोष्ट, वेखंड, पांढऱ्या मोहऱ्या, गूळ व दूध ह्या औषधांचा कल्क करून त्याचा फडक्याला लेप करून त्याची वात करून ती गुदांत ठेवावी.

---

१ "वातानुलेपन" ह्या ठिकाणीं "वातानुलोमन" हा लेखी प्रतींतील पाठ शुद्ध आहे. त्याप्रमाणें अर्थ केला आहे.

अगारधूमादि वात.

अगारधूमः पिप्पल्यो मदनं राजसर्षपाः ।
गोमूत्रपिष्टाः सगुडा फलवर्तिः प्रशस्यते ॥ १ ॥

घेरोसा, पिंपळी, गेळफळ, काळ्या मोहऱ्या व गूळ हीं द्रव्यें गोमूत्रांत वाटून त्यांचीही (वर सांगितल्याप्रमाणें) वात करावी. ती प्रशस्त आहे.

हिंग्वादि वात.

हिंगुर्माक्षिकसिन्धूत्थैः पक्त्वा वर्तिं सुवर्तिताम् ।
घृताभ्यक्तां गुदे दद्यादुदावर्तविनाशिनीम् ॥ १ ॥

हिंग, मध व सेंधेलोण हीं औषधें एकत्र करून थोडीं शिजवावीं. नंतर त्यांची वात करून तिला तूप लावून ती गुदांत ठेवावी. ती उदावर्ताचा नाश करते.

उदयमार्तंड रस.

हिंगूलं जयपालटङ्कणविषाण्यन्त्यार्धभागोत्तरं
सर्वं खल्वतले विमर्द्य मतिमान्गुञ्जाद्वयं वै ददेत् ।
मार्तण्डोदयको ज्वरादिसहिते यः सोदराध्मानके
पाण्ड्वाजीर्णगदेऽनुपानवशतः पथ्यं च तक्रौदनम् ॥१॥
व्योषेणाऽऽर्द्ररसेन तत्र सितया युक्तो ज्वरे दारुणे.
मान्द्ये गुल्मकफानले च पवने शूले च शोफोदरे ।
वातास्रे स्वरवर्णकुष्ठगुदजान्रोगानशेषाञ्जयेत् ॥ २ ॥

हिंगूळ अर्धा भाग, जयपाळ एक भाग, टाकणखार दीड भाग आणि बचनाग दोन भाग, ह्या सर्वांचा खल करून दोन गुंजा या प्रमाणानें देत जावा. ह्याला मार्तंडोदय रस असें म्हणतात. हा ज्वरादि उपद्रवांनीं युक्त अशा उदर, आध्मान, पांडुरोग व अजीर्ण ह्या विकारांत अनुपान योजून द्यावा. ह्याजवर ताक व भात हें पथ्य द्यावें. सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण, आल्याचा रस व खडीसाखर ह्यांतून भयंकर ज्वरावर द्यावा. हा अग्निमांद्य, गुल्म, कफजन्य अग्निमांद्य, वात, शूळ, शोफोदर (नाळगुद), वातरक्त, स्वरभेद, कुष्ट व मूळव्याध वगैरे सर्व रोगांना जिंकतो.

नाराचरस.

जेपालेन समैः सूतव्योषटंकणगन्धकैः ।

नाराचः स्याद्रसो ह्येष माषः सर्पिसितायुतः ।
हन्त्युदावर्तमानाहमुदराणि च गुल्मकम् ॥ १ ॥

पारा, गंधक, टाकणखार, सुंठ, मिरें व पिंपळी हीं औषधें समभाग आणि सर्वांच्या बरोबरीनें जयपाळ ह्यांचा एकत्र खल करावा. ह्याला नाराच रस असें म्हणतात. हा एका उडदाइतका तूपसाखरेशीं द्यावा. हा उदावर्त, आनाह, उदर व गुल्म ह्यांचा नाश करतो.

आनाहनिदान.

आमं शकृद्वा निचितं क्रमेण भूयो विबद्धं विगुणानिलेन ।
प्रवर्तमानं न यथास्वमेनं विकारमानाहमुदाहरन्ति ॥ १ ॥

क्रमानें संचित झालेला आम किंवा मळ पुनः विगुण झालेल्या वायूनें बद्ध होऊन साफ बाहेर पडत नाहीं, त्याला आनाह म्हणतात.

आमजन्य आनाहलक्षण.

तस्मिन्भवत्यामसमुद्भवे तु तृष्णाप्रतिश्यायशिरोविदाहाः ।
आमाशये शूलमथो गुरुत्वं हृत्स्तम्भनोद्गारविघातनं च ॥२

त्यामध्यें आम संचित होऊन आनाह रोग झाला असतां तहान, पडसें, डोक्याचा दाह, आमाशयांत शूळ, जडत्व, हृदय ताठणें आणि ढेकर न येणें हे विकार होतात.

मलसंचयानें होणाऱ्या आनाहाचें लक्षण.

स्तम्भः कटीपृष्ठपुरीषमूत्रे शूलोऽथ मूर्छा शकृतो वमिश्च ।

मलसंचयानें कंबर व पाठ ताठणें, मळ व मूत्र ह्यांचा अवरोध, आणि मळाची वांती हीं लक्षणें होतात.

श्वासश्च पक्वाशयजे भवन्ति तथाऽलसोक्तानि च लक्षणानि ॥३

पक्वाशयांत आनाह झाला असतां श्वास व अलसकाचीं सर्व लक्षणें होतात.

असाध्य लक्षण.

उदावर्तिनमप्येनमानाहिनमथापि वा ।
तृष्णोपद्रवसंयुक्तं तं त्यजेद्भिषजां वरः ॥ ४ ॥

उदावर्त झालेल्या अथवा आनाह झालेल्या रोग्याला तहान फार लागूं लागली असतां उपचार करूं नये.

आनाहचिकित्सा.

आनाहेऽपि प्रयुञ्जीत उदावर्तहरीं क्रियाम् ।

आनाह रोगावर देखील उदावर्तनाशक उपचार करावे.

त्यांत विशेष.

त्रिवृद्धरीतकीश्यामाः स्नुहीक्षीरेण भावयेत् ।
वटिका मूत्रपीतास्ताः श्रेष्ठास्त्वानाहभेदिकाः ॥ १ ॥

तेड, हिरडेदळ व पिंपळी ह्यांचा चूर्णाला त्रिधारी निवडुंगाच्या चिकाची भावना द्यावी आणि गोळ्या कराव्या. ह्यांतील एक गोळी गोमूत्राशीं घेतली असतां ती आनाहाचा उत्तम प्रकारें भेद करिते.

हिंगूग्रगन्धाविडशुण्ठ्यजाजीहरीतकीपुष्करमूलकुष्ठम् ।
भागोत्तरं चूर्णितमेतदिष्टं गुल्मोदरानाहविषूचिकासु ॥ १ ॥

हिंग, वेखंड, बिडलोण, सुंठ, जिरें, हिरडेदळ, पोखरमूळ व कोष्ट हीं सर्व औषधें उत्तरोत्तर एक एक भाग वाढत्या प्रमाणांत घेऊन चूर्ण करावें. हें चूर्ण गुल्म, आनाह, उदर व विषूचिका ह्यांजवर प्रशस्त आहे.

वचाभयाचित्रकयावशूकान्सपिप्पलीकातिविषान् सकुष्ठान् ।
उष्णाम्बुनाऽऽनाहविमूढवातान्पीत्वा जयेदाशु रसौदनाशी २

वेखंड, हिरडेदळ, चित्रकमूळ, जवखार, पिंपळी, अतिविष व कोष्ट ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें आनाह, मूढवात (मार्ग सुटल्यामुळें कोंडला जाऊन कोठ्यांत इतस्ततः संचार करणारा वायु) ह्यांना जिंकतो. ह्याजवर मांसरस व भात खावा.

राढधूमादि वात.

राढधूमबिडव्योषगुडमूत्रविपाचिता ।
गुदेऽङ्गुष्ठसमा वर्तिर्विधेयाऽऽनाहशूलनुत् ॥ १ ॥

गेळफळ, घरोसा, बिडलोण, सुंठ, मिरें, पिंपळी व गूळ हीं गोमूत्रांत पचन करून त्याची आंगठ्यासारखी वात करून ती गुदांत ठेवावी, ती आनाह व शूळ ह्यांची नाशक आहे.

विपाच्य मूत्राम्लरसेन दन्तीपिण्डीतकृष्णाबिडकृष्णधूमैः ।
वर्तिं करांगुष्ठनिभां घृताक्तां गुदे रुजानाहहरीं विदध्यात् ॥२॥

दांतीमूळ, गेळफळ, पिंपळी, बिडलोण, पादेलोण व घरोसा

ह्यांची हाताच्या आंगठ्याएवढी लठ्ठ वात करून ती तुपांत भिजवून गुदांत ठेवावी. ती आनाह व शूळ ह्यांचा नाश करिते.

पथ्यापथ्य.

विष्टम्भीनि विरुद्धानि कषायाणि गुरूणि च ।
उदावर्ते प्रयत्नेन वर्जयेत्सततं नरः ॥ १ ॥

मलाचें स्तंभन करणारीं द्रव्यें, विरुद्ध गुणाचीं द्रव्यें, तुरट द्रव्यें, व जड पदार्थ हे जिन्नस उदावर्तावर प्रयत्नेंकरून वर्ज करावे.

उदावर्ते हितं सर्वं पाचनं लंघनं तथा ।
आनाहे तु यथायोग्यं सेवयेन्मतिमान्नरः ॥ २ ॥

उदावर्तावर लंघनात्मक व पाचक असे सर्व उपचार हितकारक आहेत. आणि आनाहावर प्रकृतिमानादिकांचा योग्य विचार करून यथायोग्य आहार करावा.

गुल्मनिदान.

दुष्टा वातादयोऽत्यर्थं मिथ्याहारविहारतः ।
कुर्वन्ति पञ्चधा गुल्मं कोष्ठान्तर्ग्रन्थिरूपिणम् ॥ १ ॥

मिथ्या आहारविहारादिकांनीं अत्यंत प्रकुपित झालेले वातादि दोष कोठ्यामध्यें ग्रंथिरूप (गांठीसारखा) असा पांच प्रकारचा गुल्म उत्पन्न करितात.

त्यांचीं स्थानें व लक्षण.

तस्य पञ्चविधं स्थानं पार्श्वहृन्नाभिबस्तयः ।

दोन कुशी, हृदय, नाभि व बस्ति हीं त्यांचीं पांच स्थानें आहेत.

हृन्नाभ्योरन्तरे ग्रन्थिः संचारी यदि वाऽचलः ।
वृत्तश्चयापचयवान्स गुल्म इति कीर्तितः ॥ २ ॥

हृदय व नाभि ह्यांच्या मध्यंतरीं फिरणारा किंवा अचळ असा, वाटोळा, केव्हां लहान व केव्हां मोठा भासणारा असा जो गोळा होतो, त्याला गुल्म असें म्हणतात.

चरकांतील विशेष लक्षण.

तृष्णाज्वरपरीतश्च दाहस्वेदाग्निमार्दवैः ।
गुल्मिनामरुचौ चापि रक्तमेवावसेचयेत् ॥ ३ ॥

ज्याला गुल्म झाला आहे त्याला तहान, ज्वर, दाह, स्वेद,

अग्निमांद्य व अरुचि हीं लक्षणें होतात त्या वेळेस रक्त काढून टाकावें.

भट्टारहरिश्चंद्राचें मत.

स्त्रीणामावर्तजो गुल्मो न पुंसामुपजायते ।
अन्यस्त्वसृग्भवो गुल्मः स्त्रीणां पुंसां च जायते ॥ ४ ॥

आर्तवजन्य गुल्म स्त्रियांनाच होतो, पुरुषांना होत नाहीं. दुसरा जो केवळ रक्तजन्य गुल्म होतो, तो स्त्रियांना व पुरुषांना दोघांसही होतो.

निरूढमूलप्रभवो हि कोष्ठे स्थितः स्वतन्त्रः परसंश्रयो वा ।
स्पर्शोपलब्धः परिपिण्डितत्वाद्गुल्मो यथादोषमुपैति नाम ॥५॥

कोठ्यामध्यें स्वतंत्रपणानें किंवा दुसऱ्याच्या (एकाद्या अवयवादिकांच्या) आश्रयानें बद्धमूळ असा गांठीसारखा असल्यामुळें स्पर्शानें समजणारा जो गुल्म होतो, त्याला दोषानुरूप (वातगुल्म, पित्तगुल्म वगैरे) नांव प्राप्त होतें.

स व्यस्तैर्जायते दोषैः समस्तैरपि चोच्छ्रितैः ।
पुरुषाणां तथा स्त्रीणां ज्ञेयो रक्तेन चापरः ॥ ६ ॥

हा गुल्म वातादि पृथक् पृथक् दोषांनीं किंवा त्रिदोषापासूनही स्त्रियांना किंवा पुरुषांना होतो. याचप्रमाणें दुसरा रक्तापासूनही एक गुल्म होतो.

त्याचें पूर्वरूप.

उद्गारबाहुल्यपुरीषबन्धतृप्त्यक्षमत्वान्त्रविकूजनानि ।
आटोपमाध्मानमपक्तिशक्तिरासन्नगुल्मस्य वदन्ति चिह्नम् ॥

ढेकर फार येणें, मळाचा खडा होणें, अन्नावर इच्छा न होणें, अशक्तपणा, आंतड्यांत वाजणें, पोटांत गुडगुडणें, पोट फुगणें व अन्न पचन न होणें हीं लक्षणें गुल्म होण्यापूर्वीं होतात.

सर्व गुल्मांचें सामान्य लक्षण.

अरुचिः कृच्छ्रविण्मूत्रं वातांत्रात्प्रतिकूजनम् ।
आनाहं चोर्ध्ववातत्वं सर्वगुल्मेषु लक्षयेत् ॥ ८ ॥

अरुचि, मळ व मूत्र कष्टानें होणें, वातामुळें आंतड्यांत वाजणें, पोट स्तब्ध होणें व उर्ध्ववात (दम लागणें) हीं लक्षणें सर्व गुल्मांमध्यें असतात.

वातगुल्मलक्षण.

रूक्षान्नपानं विषमातिमात्रं विचेष्टनं वेगविनिग्रहश्च ।
शोकोऽभिघातोऽतिमलक्षयश्च निरन्नता चानिलगुल्महेतुः ॥ ९

रूक्ष अन्न खाणें व पिणें, विषम किंवा भुकेपेक्षां जास्त अन्न खाणें, अनियमित व्यायाम करणें, मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, शोक, पोटावर आघात होणें, अतिशय मलक्षय होणें, व उपास करणें ह्या कारणांनीं वातगुल्म होतो.

यः स्थानसंस्थानरुजाविकल्पं विड्वातसङ्गं गलवक्त्रशोषम् ।
श्यावारुणत्वं शिशिरज्वरं च सकुक्षिपार्श्वांसशिरोरुजं च १०
करोति जीर्णेऽभ्यधिकं प्रकोपं भुक्ते मृदुत्वं समुपैति यश्च ।
वातात्स गुल्मो न च तत्र रूक्षं कषायतिक्तं कटु चोपशेते ॥

वातगुल्माचें स्थान नियमित नसतें. त्याचा आकार व पीडा नियमित नसते. त्या गुल्मामुळें घसा व तोंड ह्यांना कोरड असते. मलमूत्रांचा अवरोध होतो. वायु सरत नाहीं, अंग काळसर तांबूस होतें. अंगावर कांटा येऊन ताप येतो. हृदय, कुशी, बरगड्या, खांदे व मस्तक हीं दुखतात. अन्न जिरलें असतां त्याचा अधिक प्रकोप होतो. आणि जेवल्यावर त्याला मृदुपणा येतो. ह्या लक्षणांनीं युक्त जो गुल्म त्याला वातगुल्म असें म्हणतात. ह्यामध्यें तुरट, कडू, व तिखट पदार्थ सोसत नाहींत.

पित्तगुल्मलक्षण.

कट्वम्लतीक्ष्णोष्णविदाहिरूक्षक्रोधातिमद्यार्कहुताशसेवा ।
आमाभिघातो रुधिरं च दुष्टं पित्तस्य गुल्मस्य निमित्तमुक्तम् ॥

तिखट, आंबट, तीक्ष्ण, उष्ण, विदाहकारक व रूक्ष असें अन्न खाणें, क्रोध, अतिशय मद्यपान, उन्हांत किंवा विस्तवापाशीं बसणें यांनीं, आम संचित झाल्यानें व रक्त दूषित झाल्यानें पित्तगुल्म होतो.

ज्वरः पिपासा वदनाङ्गरागः शूलं महज्जीर्यति भोजने च ।
स्वेदो विदाहो व्रणवच्च गुल्मः स्पर्शासहः पैत्तिकगुल्मरूपम् १२

पित्तगुल्म झाला असतां ताप येतो, तहान लागते, तोंडावर व अंगावर तांबूसपणा येतो. अन्न जिरतेवेळीं पोटांत अतिशय दुखतें. घाम व घशाशीं जळजळणें हीं लक्षणें होतात; व गुल्मास स्पर्श

केला असतां तो व्रणाप्रमाणें सहन होत नाहीं. हें पित्तगुल्माचें लक्षण आहे.

कफगुल्मलक्षण.

शीतं गुरु स्निग्धमचेष्टनं च संपूरणं प्रस्वपनं दिवा च।
गुल्मस्य हेतुः कफसंभवस्य सर्वश्च दुष्टो निचयात्मकस्य ॥१४

थंड, जड व स्निग्ध अन्न खाणें, व्यायाम न करणें, फार जेवणें, दिवसा झोप घेणें ह्या कारणानें कफगुल्म होतो. आणि तिन्हीही दोषांचीं कारणें झाल्यानें सान्निपातिक गुल्म होतो.

स्तैमित्यशीतज्वरगात्रसादहृल्लासकासारुचिगौरवाणि।
शैत्यं रुगल्पा कठिनोन्नतत्वं गुल्मस्य रूपाणि कफात्मकस्य ॥

अंग ओलसर असल्यासारखें वाटणें, थंडी वाजून ताप येणें, अंग गळल्यासारखें वाटणें, छातींत कलमलल्याप्रमाणें वाटणें, खोकला, अरुचि, जडत्व, थंडी वाजणें, गुल्मसंबंधीं वेदना कमी असणें, गुल्म कठीण व उंच असणें हीं कफगुल्माचीं लक्षणें आहेत.

द्वंद्वज गुल्मांचें कारण व लक्षण.

निमित्तलिङ्गान्युपलभ्य गुल्मे द्विदोषजे दोषबलाबलं च ॥
व्यामिश्रलिङ्गानपरांस्तु गुल्मांस्त्रीनादिशेदौषधकल्पनार्थम् १६

दोन दोषांनीं युक्त अशा गुल्मामध्यें कारणें व लक्षणें जाणून दोषांच्या बलाबलानुसार मिश्र लक्षणांवरून औषधयोजनेच्या सोईकरितां दुसरे तीन गुल्म (वातपित्तजन्य, कफपित्तजन्य व वातकफजन्य) कल्पावे.

त्रिदोषजगुल्माचें असाध्य लक्षण.

महारुजं दाहपरीतमश्मवद्घनोन्नतं शीघ्रविदाहि दारुणम्।
मनःशरीराग्निबलापहारिणं त्रिदोषजं गुल्ममसाध्यमादिशेत् ॥

सन्निपातिक गुल्मामध्यें अत्यंत पीडा असते. दाह होतो. गुल्माची गाठ, दगडाप्रमाणें कठीण, उंच, अत्यंत दाहकारक व फार मोठी असते. हा गुल्म मन, शरीर व जठराग्नि ह्यांची शक्ति हरण करतो. ह्या गुल्माला त्रिदोषज गुल्म असें म्हणतात. हा असाध्य आहे.

स्त्रियांच्या रक्तगुल्माची संप्राप्ति.

नवप्रसूताऽहितभोजना या या चाऽऽमगर्भं विसृजेदृतौ वा ।
वायुर्हि तस्याः परिगृह्य रक्तं करोति गुल्मं सरुजं सदाहम्

जिला प्रसूत होऊन फार थोडे दिवस झाले आहेत, अशा स्त्रीनें अपथ्यकारक भोजन केलें असतां किंवा जिचा अपुऱ्या महिन्यांत गर्भपात झाला आहे अगर जी ऋतुमती आहे, अशा स्त्रीनें अहितकारक अन्न खाल्लें असतां, त्या स्त्रीच्या गर्भाशयांतील वायु रक्ताला (आर्तवाला) घेऊन ज्यामध्यें शूळ व दाह आहे असा गुल्म उत्पन्न करितो.

ऋतावनाहारभयातपेन विरूक्षणैर्वेगविधारणैश्च ।
संस्तम्भनोल्लेखनयोनिदोषैर्गुल्मः स्त्रिया रक्तभवोऽभ्युपैति १९

ऋतुकाळीं उपास केल्यानें, भीति वाटल्यानें, ऊन घेतल्यानें, रूक्ष अन्न खाण्यानें, आर्तव बंद होण्याकरितां प्रयत्न केल्यानें, मुद्दाम ऋतुस्राव होण्याकरितां प्रयत्न केल्यानें किंवा योनिदोषामुळें स्त्रियांना रक्तगुल्म होतो.

त्याचें लक्षण.

पित्तस्य गुल्मेन समानलिङ्गं विशेषणं चाप्यपरं निबोध ।
यः स्पन्दते पिण्डित एव नाङ्गैश्चिरात्सशूलः समगर्भलिङ्गः ।
स रौधिरः स्त्रीभव एव गुल्मो मासे व्यतीते दशमे चिकित्स्यः॥

त्या रक्तगुल्मामध्यें पित्तगुल्माचीं लक्षणें असतात. शिवाय आणखी दुसरीं लक्षणें असतात तीं ऐका. जो गर्भाप्रमाणें अवयवानें न हालतां सर्व गोळाच एकदम फार वेळानें हालतो, तो हालतांना दुखतो. त्याचीं सर्व लक्षणें गर्भाप्रमाणें असतात. त्याला रक्तगुल्म असें म्हणतात. हा स्त्रियांनाच होतो. दहा महिने गेल्यावर ह्याजवर उपचार करावा.

असाध्य लक्षण.

संचितः क्रमशो गुल्मो महावास्तुपरिग्रहः
कृतशूलः शिरानद्धो यदा कूर्म इवोन्नतः ॥ २१ ॥
दौर्बल्यारुचिहृल्लासकासवम्यरतिज्वरैः ।
तृष्णातन्द्राप्रतिश्यायैर्युज्यते स न सिध्यति ॥ २२ ॥

वाढलेला गुल्म जेव्हां हळू हळू सर्व पोट व्यापतो, पोटांत मूळ करून राहतो (रक्तमांसादिकांत शिरतो), शिराजालांनीं व्याप्त होतो, आणि ज्या वेळीं तो कासवाच्या पाठीप्रमाणें उंच दिसूं लागतो, त्या वेळीं अशक्तपणा, अरुचि, हृदयांत अस्वस्थता, खोकला, ओकारी, मनाला अस्वस्थता, ज्वर, तंद्रा व पडसें ह्या लक्षणांनीं युक्त होतो. असा गुल्म साध्य होत नाहीं.

दुसरें असाध्य लक्षण.

गृहीत्वा सज्वरं श्वासच्छर्द्यतीसारपीडितम् ।
हृन्नाभिहस्तपादेषु शोथः कर्षति गुल्मिनम् ॥ २३ ॥
श्वासः शूलं पिपासाऽन्नविद्वेषो ग्रन्थिमूढता ।
जायते दुर्बलत्वं च गुल्मिनो मरणाय वै ॥ २४ ॥

ज्वर व श्वास ह्यांनीं युक्त, ओकारी व अतिसार ह्यांनीं पीडित, हृदय, नाभि, हात व पाय ह्यांना सूज ह्या लक्षणांनीं युक्त असा गुल्म रोग्याचा नाश करतो. श्वास, शूळ, तहान, अन्नद्वेष, गांठ नाहींशी होणें आणि अशक्तपणा हीं लक्षणें गुल्मरोग्याच्या मरणाला कारण होतात.

गुल्मचिकित्सा.

लङ्घनं दीपनं स्निग्धमुष्णं वातानुलोमनम् ।
बृंहणं च भवेदन्नं तद्धितं सर्वगुल्मिनाम् ॥ १ ॥
गुल्मिनामनिलशान्तिरुपायैः सर्वशो विधिवदाचरितव्या ।
मारुते तु विजितेऽन्यमुदीर्णं दोषमल्पमपि कर्म निहन्यात् ॥२॥

लंघन, दीपक, स्निग्ध, उष्ण, वातानुलोमन करणारें व पौष्टिक असें अन्न सर्व गुल्माच्या रोग्यांना हितकारक आहे. गुल्मरोग्याच्या वाताचें शमन होण्याकरितां सर्व प्रकारचे (वातनाशक) उपचार विधियुक्त करावे. वातदोष कमी झाल्यावर दुसरा दोष वाढलेला जरी असला तरी तो अल्प उपचारानेंदेखील नाश पावतो.

सुखोष्णा जाङ्गलरसाः सुस्निग्धा व्यक्तसैन्धवाः ।
कटुत्रिकसमायुक्ता हिताः पानेषु गुल्मिनाम् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण घालून बरेचसे सैंधव घातलेले व तेलाची किंवा तुपाची पुष्कळशी फोडणी देऊन चांगले स्निग्ध

केलेले सुखोष्ण असे जांगल मांसाचे रस गुल्मरोग्याला हितकारक असतात.

क्रिमिपिण्डेष्टकास्वेदान्कारयेत्कुशलो भिषक् ।
उपनाहाश्च कर्तव्याः सुखोष्णाः शाल्वणादयाः ॥ ४ ॥
गुल्मस्थाने रक्तमोक्षे बाहुमध्ये शिराव्यधः ।
स्वेदानुलोमनं चैव प्रशस्तं सर्वगुल्मिनाम् ॥ ५ ॥

कुशल वैद्यानें कृमिपिंड (गाढवाची लीद) किंवा विटकर ह्यांनीं स्वेदन करावें. सुखोष्ण असें शाल्वणादि उपनाह–(पोटिसाचें) स्वेदन करावें. गुल्मांतून रक्त काढावें. बाहूच्या ठिकाणीं शिरावेध करावा, आणि स्वेदन करावें व वाताचें अनुलोमन करणें हें सर्व गुल्मरोग्यांना हितावह आहे.

वातगुल्मचिकित्सा.

प्रागेव जायते गुल्मे सुस्निग्धं स्वेदितं नरम् ।
रेचितं स्नेहरेकैश्च निरूहैः सानुवासनैः ॥ ६ ॥
उपाचरेद्भिषक्प्राज्ञो मात्राकालविशेषतः ।

वातगुल्माच्या रोग्याला प्रथम स्नेहन व स्वेदन करून स्निग्ध रेचक द्यावें. नंतर निरूह बस्ती व अनुवासन बस्ती द्यावे; आणि त्यानंतर बलकालादिकांचा विचार करून उपचार करावा.

महाळुंगादियोग.

मातुलुङ्गरसे हिंगु दाडिमं बिडसैन्धवम् ।
सुरामण्डेन पातव्यं वातगुल्मरुजापहम् ॥ १ ॥

महाळुंगाच्या रसांत हिंग, आंबट डाळिंबाचे दाणे, बिडलोण व सैंधेलोण हीं औषधें घालून दारूच्या निवळीबरोबर तो प्यावयास द्यावा. हा वातगुल्मासंबंधीं पीडा दूर करितो.

बृहन्नागरादि चूर्ण.

नागरार्धपलं पिष्टं द्वे पले लुञ्चितस्य च ।
तिलस्यैकं गुडपलं क्षीरेणोष्णेन पाययेत् ॥
वातगुल्ममुदावर्तं योनिशूलं च नाशयेत् ॥ १ ॥

सुंठीचें चूर्ण दोन तोळे, तिळाचें चूर्ण आठ तोळे व गूळ चार तोळे एकत्र करून दूध उन करून त्यांतून प्यावयास द्यावें. हा

योग वातगुल्म, उदावर्त व योनिशूळ ह्यांचा नाश करतो.

हिंगुपंचक.

हिंगुसैन्धववृक्षाम्लराजिकानागरैः समैः ।
चूर्णं गुल्मप्रशमनं स्यादेतद्धिंगुपञ्चकम् ॥ २ ॥

हिंग, सैंधेलोण, आमसुलें, मोहऱ्या व सुंठ ह्यांचें चूर्ण गुल्मनाशक आहे. ह्याला हिंगुपंचक असें म्हणतात.

केतकीक्षारयोग.

स्वर्जिकाकुष्ठसहितः क्षारः केतकिसंभवः ।
पीतस्तैलेन शमयेद्वातगुल्मं सुदारुणम् ॥ ३ ॥

सज्जिखार व कोष्ट ह्यांच्या चूर्णासह केतकीचा क्षार तेलांतून द्यावा. तो दारुण वातगुल्माचें शमन करतो.

एरंडेल तेलादि योग.

पिबेदेरण्डतैलं वा वारुणीमण्डमिश्रितम् ।
तदेव तैलं पयसा वातगुल्मी पिबेन्नरः ॥ १ ॥

एरंडेल दारूच्या निवळींतून प्यावें, किंवा तें एरंडतेल वातगुल्म झालेल्या रोग्यानें दुधांतून प्यावें.

वृंदांतील हपुषादि घृत.

हपुषाजाजिपृथ्वीकापिप्पलीमूलचित्रकैः ।
क्षीरमूलककोलानां रसैश्च विपचेद् घृतम् ॥ १ ॥
वातगुल्मारुचिश्वासशूलानाहज्वरार्शसाम् ।
ग्रहणीयोनिदोषाणां घृतमेतन्निवारणम् ॥ २ ॥

शेरणी, जिरें, शहाजिरें, पिंपळमूळ व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण, दूध, मुळ्याचा रस व बोरांचा रस ह्यांमध्यें तूप पचन करावें. तें वातगुल्म, अरुचि, श्वास, शूळ, आनाह, ज्वर, मूळव्याध, संग्रहणी व योनिदोष ह्यांचें निवारण करितें.

चित्रकादि घृत.

चित्रकव्योषसिन्धूत्थपृथ्वीकाचव्यदाडिमैः ।
दीप्यकग्रन्थिकाजाजीहपुषाधान्यकैः समैः ॥ २ ॥
दध्यारनालबदरमूलकस्वरसैर्घृतम् ।
पक्त्वा पिबेद्वातगुल्मदौर्बल्याटोपशूलनुत् ॥ २ ॥

चित्रकमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, सैंधेलोण, शहाजिरें, चवक,

आंबट डाळिंब, ओवा, पिंपळमूळ, जिरें, शेरणी, व धने ह्यांचें चूर्ण, दहीं, कांजी, बोरांचा रस व मुळ्याचा रस ह्यांमध्यें तूप पचन करावें. तें वातगुल्म, अशक्तपणा, पोटांतील गुडगुड व शूळ ह्यांचा नाश करितें.

पथ्य.

तित्तिरांश्च मयूरांश्च कुक्कटान्क्रौञ्चवर्तिकान्।
सर्पिः शालिप्रपन्नांश्च वातगुल्मे च योजयेत् ॥ १ ॥
वातगुल्मप्रतीकारे प्रकुप्यति यदा कफः।
शस्तमुल्लेखनं तत्र चूर्णाद्याश्च कफापहाः ॥ २ ॥
यदि कुप्यति वा पित्तं विरेकस्तत्र भेषजम्।
दोषघ्नैरप्यशान्ते च गुल्मे शोणितमोक्षणम् ॥ ३ ॥

तित्तिर पक्षी, मोर, कोंबडा, करकोचा, व गांजीण पक्षी ह्यांचें मांस, तूप व जुने तांदूळ हें वातगुल्मावर पथ्य योजावें. वातगुल्मावर उपचार चालू असतां जर कफ प्रकुपित झाला, तर त्याजवर उल्लेखन (कर्षण) करावें व कफनाशक चूर्ण वगैरे द्यावीं. त्याचप्रमाणें जर पित्त प्रकुपित झालें तर त्याकरितां रेचक द्यावें. अशा दोषनाशक औषधांनीं जर गुल्म शांत झाला नाहीं तर रक्त काढावें.

पित्तगुल्मचिकित्सा.

पित्तगुल्मे त्रिवृच्चूर्णं पातव्यं त्रिफलाम्बुना।
विरेचनाय ससितं कम्पिल्लं च समाक्षिकम् ॥ १ ॥

पित्तगुल्मावर तेडाचें चूर्ण त्रिफळाच्या काढ्यांतून पाजावें; आणि रेच होण्याकरितां मध व खडीसाखरेबरोबर कपिला द्यावी.

द्राक्षादि योग.

द्राक्षाभयारसं गुल्मे पैत्तिके सगुडं पिबेत्।
सशर्करं वा विलिहेत्त्रिफलाचूर्णमुत्तमम् ॥ १ ॥

द्राक्षे व हिरडे ह्यांचा रस गूळ घालून पित्तगुल्मावर प्यावयास द्यावा. अथवा त्रिफळ्याचें चूर्ण साखरेशीं द्यावें. तेंही उत्तम आहे.

पथ्यादि चूर्ण.

रसेनाऽऽमलकेक्षूणां घृतपादं विपाचयेत्।
पथ्यायाश्च पिबेत्सर्पिस्तात्सिद्धं पित्तगुल्मनुत् ॥ १ ॥

आवळ्याचा रस, उंसाचा रस व हिरड्यांचा रस ह्यांमध्यें चवथाई तूप सिद्ध करावें. तें पित्तगुल्माचा नाश करितें.

द्राक्षादि घृत.

द्राक्षामधुकखर्जूरं विदारीं सशतावरीम् ।
परूषकाणि त्रिफलां साधयेत्पलसंमिताम् ॥ १ ॥
जलाढके पादशेषे रसमामलकस्य च ।
घृतमिक्षुरसं क्षीरमभयाकल्कपादिकम् ॥ २ ॥
साधयेत्तद् घृतं सिद्धं शर्कराक्षौद्रपादिकम् ।
प्रयोगः पित्तगुल्मघ्नः सर्वगुल्मविकारनुत् ॥ ३ ॥

द्राक्षें, जेष्टमध, खजूर, भुईकोहाळा, शतावरी, फालसा, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं औषधें चारचार तोळे घेऊन त्यांचा दोनशें-छप्पन्न तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. तो काढा आवळयाचा रस, उंसाचा रस व व दूध ह्यांमध्यें तुपाच्या चतुर्थांश हिरड्याचा कल्क घालून तूप सिद्ध करावें; आणि त्यांत त्या तुपाच्या चवथाई साखर व मध घालून योग्य त्या प्रमाणांत द्यावें. तें पित्तगुल्माचा नाश करितें व गुल्माचे सर्व विकार दूर करितें.

पथ्य.

शालिगोछागदुग्धं च पटोलं घृतमिश्रितम् ।
द्राक्षां परूषकं धात्रीं खर्जूरं दाडिमं सिताम् ॥
पथ्यार्थं पैत्तिके गुल्मे बलातोयं च योजयेत् ॥ १ ॥

तांदूळ, गाय व शेळी ह्यांचें दूध, तुपांत तळलेलें पडवळ, द्राक्षें, फालसा, आवळे, खजूर, डाळिंब व खडीसाखर हे पदार्थ पित्त-गुल्मावर पथ्याला द्यावे; आणि चिकणामूळ टाकून कढविलेलें पाणी द्यावें.

कफगुल्मचिकित्सा.

स्नेहोपनाहनस्वेदैस्तीक्ष्णस्रंसनबस्तिभिः
योगैश्च वातगुल्मोक्तैः श्लेष्मगुल्ममुपाचरेत् ॥ १ ॥

तेल पाजणें, पोटीसानें शेकणें, घाम काढणें, तीक्ष्ण व सारक बस्ती ह्या उपायांनीं व वातगुल्मावर सांगितलेल्या उपायांनीं कफ-गुल्माची चिकित्सा करावी.

तिलादि स्वेद.

तिलैरण्डातसीबीजसर्षपैः परिलिप्य च ।
श्लेष्मगुल्ममयस्पात्रैः सुखोष्णैः स्वेदयेद्भिषक् ॥ १ ॥

तीळ, एरंड्यांतील मगज, जवस व शिरस हीं औषधें वांटून त्यांचा गुल्मावर लेप करावा आणि कोखंडाचें भांडें तापवून त्यानें सोसेल असें शेकावें.

यवान्यादि चूर्ण.

यवानीं चूर्णितां तक्रे बिडेन लवणीकृताम् ।
श्लेष्मगुल्मे पिबेद्वातमूत्रवर्चोनुलोमनीम् ॥ १ ॥

ओंव्याचें चूर्ण ताकांत घालून त्याला रुची येण्याकरितां त्यांत बरेंचसें बिडलोण घालून कफगुल्मावर प्यावें. हा योग अधोवायु, मल व मूत्र ह्यांचें अनुलोमन करणारा आहे.

क्षीरषट्पलघृत.

पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकनागरैः ।
पलिकैः सयवक्षारैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ १ ॥
क्षीरप्रस्थेन तत्सर्पिर्हन्ति गुल्मं कफात्मकम् ।
ग्रहणीपाण्डुरोगघ्नं प्लीहकासज्वरापहम् ॥ २ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ व जवखार ह्यांचें चूर्ण चार चार तोळे आणि तूप चौसष्ट तोळे ह्यांत चौसष्ट तोळे दूध घालून तूप सिद्ध करावें. तें कफगुल्माचा नाश करितें. आणि संग्रहणी, पांडुरोग, पांथरी, कास व ज्वर ह्यांचाही नाश करितें.

मिश्रक स्नेह.

त्रिवृता त्रिफला दन्ती दशमूलं पलोन्मितम् ।
जले चतुर्गुणे पक्त्वा चतुर्भागावशेषिते ॥ १ ॥
सर्पिरेरण्डतैलं च क्षीरं चैकत्र साधयेत् ।
संसिद्धो मिश्रकस्नेहः सक्षौद्रः कफगुल्मनुत् ॥ २ ॥

तेड, हिरडा, बेहडा, आवळकाठी, दांतीमूळ व दशमुळें हीं औषधें चार चार तोळे घेऊन त्यांचा चौपट भाग पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. त्यांत तूप, एरंडेल व दूध मिसळून तूप सिद्ध करावें. ह्याला मिश्रक स्नेह म्हणतात. हा मधाबरोबर घेतला असतां कफगुल्माचा नाश करतो.

पथ्य.

कुलत्थाञ्जीर्णशालींश्च षष्टिकान्यवजाङ्गलान् ।
मद्यं तैलं घृतं तक्रं कफगुल्मे प्रयोजयेत् ॥ १ ॥

हुलगे, जुन्या साळी, साठे तांदूळ, सातू, जांगल प्राण्यांचें मांस, मद्य, तेल, तूप व ताक, हे पदार्थ कफगुल्मावर पथ्याला द्यावे.

त्रिदोषगुल्मचिकित्सा.

वरुणादिकषायस्तु गुल्मं दोषत्रयोत्थितम् ।
हन्ति हृत्पार्श्वशूलाढ्यं सोपद्रवमसंशयम् ॥ १ ॥

वरुणादि गणांतील (वायवर्णा, निळी, पिवळी कोरांटी, शतावरी, चित्रकमूळ, मोरवेल, बेलमूळ, मेढशिंगी, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, करंज, घाणेरा करंज, आघाडा, काळा शेवगा, पांढरा शेवगा, दर्भ व रुईचें मूळ ह्याला वरुणादि गण असें म्हणतात.) औषधांचा काढा त्रिदोषजन्य आणि हृदय व बरगडया ह्यांतील शूळांनीं व उपद्रवांनीं युक्त अशा गुल्माचा निःसंशय नाश करतो.

शार्ङ्गधरांतील वरुणादि काढा.

वरुणो बकपुष्पश्च बिल्वापामार्गचित्रकाः ।
अग्निमन्थद्वयं शिग्रुद्वयं च बृहतीद्वयम् ॥ १ ॥
सैरेयकत्रयं मूर्वा मेषशृंगी किरातकः ।
अजशृङ्गी च बिम्बी च करञ्जश्च शतावरी ॥ २ ॥
वरुणादिगणक्वाथः कफमेदोहरः स्मृतः ।
हन्ति गुल्मं शिरःशूलं तथाऽभ्यन्तरविद्रधीन् ॥ ३ ॥

वायवर्णा, बकुळीचीं फुलें, बेलमूळ, चित्रकमूळ, आघाड्याचें मूळ, पांढऱ्या व काळया टाकळीचें मूळ, काळा व पांढरा शेवगा, रिंगणमूळ व डोरलीमूळ, निळी, पिंवळी व पांढरी कोरांटी, मोरवेल, मेढशिंगी, काडे चिराईत, काकडाशिंगी, कडू तोंडली, करंज व शतावरी ह्यालाही वरुणादि गण असें म्हटलें आहे. ह्या औषधांचा काढा कफ व मेद ह्यांचा नाश करितो. तसाच तो गुल्म, मस्तकशूळ आणि अंतर्विद्रधि ह्यांचाही नाश करितो.

रक्तगुल्मावर उपचार.

पित्तवद्रक्तगुल्मिन्या नार्याः कार्यो यथाविधि ।
प्रस्निग्धस्विन्नकोष्ठाया योज्यं स्नेहविरेचनम् ॥ १ ॥

स्नेहन व स्वेदनानें जिचा कोठा मृदु झाला आहे, अशा स्त्रीला तेलाचें रेचन द्यावें. पित्तगुल्मावर जो विधि सांगितला आहे तोच विधि रक्तगुल्म झालेल्या स्त्रीस करावा.

शताह्वादि कल्क.

शताह्वाचिरिविल्वत्वग्दारुभार्गीकणोद्भवः ।
कल्कः पीतो जयेद् गुल्मं तिलक्काथेन रक्तजम् ॥ १ ॥

बडीशेप, काडेचिराईत, दालचिनी, देवदार, भारंगमूळ व पिंपळी ह्यांचा कल्क तिळाच्या काढ्याशीं प्यावा. तो रक्तगुल्माला जिंकतो.

तिळाचा काढा.

तिलक्काथो गुडघृतव्योषभार्गीरजोन्वितः ।
पानं रक्तभवे गुल्मे नष्टे पुष्पे च योषितः ॥ १ ॥

तिळाचा काढा, तूप, गूळ आणि सुंठ, मिरीं, पिंपळी व भारंगमूळ ह्यांचें चूर्ण घालून प्यावा. तो रक्तगुल्म व नष्टार्तव ह्यांना दूर करतो.

सुश्रुतांतील तिलमूलादि चूर्ण.

तिलमूलं च शिग्रुं च ब्रह्मदण्डीयमूलकम् ।
मधुयष्टीत्रिकटुकैर्युतं चूर्णमुपासयेत् ॥ १ ॥
पुष्परोधे वातगुल्मे स्त्रीणां सद्यः सुखावहम् ॥ १ ॥

तिळाचें मूळ, शेवग्याची साल, ब्रह्मदंडीचें मूळ, जेष्टमध, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण स्त्रियांचा वातगुल्म व पुष्पावरोध ह्यांजवर द्यावें. तें तात्काळ सुखावह होतें.

भारंग्यादि चूर्ण.

भार्गीकृष्णाकरञ्जत्वग्ग्रन्थिकामरदारुजम् ।
चूर्णं तिलानां क्काथेन रक्तगुल्मरुजापहम् ॥ १ ॥

भारंगमूळ, पिंपळी, करंजाची साल, पेखंड व देवदार ह्यांचें चूर्ण तिळाच्या काढ्यांतून द्यावें. तें रक्तगुल्माची पीडा दूर करितें.

दंत्यादि गुटिका.

दन्तीहिंगुयवक्षारालाबुबीजकणागुडाः ।
स्नुहीक्षीरेण गुटिका सर्वेषां कर्षमात्रिका ॥

भक्षिता रक्तगुल्मघ्नी रुधिरस्रावकारिणी ॥ १ ॥

दार्तीमूळ, हिंग, जवखार, कडुभोपळ्याचें बी, पिंपळी व गूळ ह्या सर्वांचा त्रिधारी निवडुंगाच्या रसांत खल करून १ तोळा प्रमाणाच्या गोळ्या कराव्या. या गुटिका सेवन केल्या असतां ती रक्तगुल्माचा नाश करितात व रक्ताचा स्राव करितात.

अर्कपुष्पयोग.

पक्कं तैलेऽर्कजं पुष्पं रुधिरस्रावकारि च ॥ १ ॥

रुईचीं फुलें तेलांत तळून खावीं. तीं स्त्रियांच्या रक्ताचा स्राव करितात.

पलाशक्षारघृत.

पलाशक्षारतोयेन सर्पिः सिद्धं पिबेद्वधूः ।

पळसाच्या क्षाराच्या पाण्यानें तूप सिद्ध करून तें रक्तगुल्मनाशार्थ स्त्रीनें प्यावें.

यस्मिन्नवसरे क्षारतोयसाध्यघृतादिषु ॥ १ ॥
फेनोद्गमस्य निर्वृत्तिर्नष्टदुग्धसमाकृतिः ।
स एव तस्य पाकस्य कालो नेतरलक्षणः ॥ २ ॥

ज्या वेळीं क्षाराच्या पाण्यांत तूप सिद्ध करावयाचें, त्या वेळीं त्या तुपावर फेस येण्याचें बंद झालें व तें फेस जिरलेल्या दुधासारखें स्वच्छ झालें म्हणजे तें तूप सिद्ध झालें म्हणून समजावें.

वृंदांतील मुंड्यादि घृत.

मुण्डीरोचनिकाचूर्णं शर्करामाक्षिकान्वितम् ।
विदधीतास्रगुल्मिन्यां मलसंरेचनाय च ॥ १ ॥
उष्णैर्वा भेदयेद्भिन्ने विधिर्वाऽसृग्दरो हितः ।
अतिप्रवृत्तमस्रं तु भिन्ने गुल्मे निवारयेत् ॥ २ ॥

गोरखमुंडी व वंशलोचन ह्यांचें चूर्ण मध व साखरेशीं रक्तगुल्म झालेल्या स्त्रीला मलाचे रेच होण्याकरितां द्यावें. किंवा उष्ण औषधें देऊन रक्तगुल्म फोडावा. तो फुटून गेल्यावर रक्त वाहणें बंद होण्याकरितां प्रदरावरील उपचार योजावे. गुल्म फुटल्यावर रक्त अतिशय जाऊं लागल्यास त्याचें निवारण करावें.

सामान्य विधि, चित्रकादि काढा.

चित्रकग्रन्थिकैरण्डशुण्ठीक्वाथः परं हितः ।
शूलानाहविबन्धेषु सहिंगुविडसैन्धवः ॥ १ ॥

चित्रकमूळ, पिंपळमूळ, एरंडमूळ व सुंठ, ह्यांचा काढा शूळ, आनाह, व मळाचा खडा होणें ह्या विकारांवर हिंग, सेंधेलोण व बिडलोण घालून द्यावा.

हिंग्वादि चूर्ण.

हिंगुग्रन्थिकधान्यजीरकवचाचव्याग्निपाठासटी
वृक्षाम्लं लवणत्रयं त्रिकटुकं क्षारद्वयं दाडिमम् ।
पथ्यापुष्करवेतसाम्लहपुषाजाज्यस्तदेभिः कृतं
चूर्णं भावितमेतदार्द्रकरसैः स्याद्बीजपूरस्य च ॥ १ ॥
आध्मानग्रहणीविकारगुदजान्गुल्मानुदावर्तकान्-
प्रत्याध्मानगदं तथाऽश्मरियुतं तूनीद्वयारोचकान् ।
ऊरुस्तम्भमतिभ्रमं च मनसो बाधिर्यमष्ठीलिकां
प्रत्यष्ठीलिकिकामथापहरते प्राक्पीतमुष्णाम्बुना ॥ २ ॥
हृत्कुक्षिवङ्क्षणकटीजठरान्तरेषु-
बस्तिस्तनांसफलकेषु च पार्श्वयोश्च ।
शूलानि नाशयति वातबलासजानि
हिङ्ग्वादि मान्द्यमिदमाश्विनसंहितायाम् ॥ ३ ॥

हिंग, पिंपळमूळ, धने, जिरें, वेखंड, चवक, चित्रकमूळ, पहाडमूळ, कचोरा, आमसुलें, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार, सज्जिखार, आंबट डाळिंब, हिरडे, पोखरमूळ, अम्लवेतस, शेरणी, व शहाजिरें, ह्यांचें चूर्ण करून त्याला आल्याचा रस, व महाळुंगाचा रस ह्यांची भावना द्यावी. आणि आध्मान, ग्रहणी, मूळव्याध, गुल्म, उदावर्त, प्रत्याध्मान, मूतखडा, तूनी, प्रतूनी, अरोचक, ऊरुस्तंभ, मतिभ्रम, मनाचे विकार, बहिरेपणा, व अष्ठीलिका ह्या विकारांवर हें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. तसेंच हृदय, कुशी, वंक्षणसंधी, कंबर, पोट, बस्ति, स्तन, खांदे, कुशी, ह्या ठिकाणच्या वातकफजन्य शूलांचाही तें नाश करितें. हें अग्निमांद्यनाशक हिंग्वादि चूर्ण अश्विनीकुमारसंहितेंत सांगितलें आहे.

वृंदांतील हिंगुनवक चूर्ण.

हिंगु पुष्करमूलानि तुम्बरूणि हरीतकी ।
श्यामा बिडं सैन्धवं च यवक्षारं महौषधम् ॥ १ ॥
यवक्काथोदकेनैतद् घृतभृष्टं तु पाययेत् ।
तेनास्य भिद्यते गुल्मः सशूलः सपरिग्रहः ॥ २ ॥

हिंग, पोखरमूळ, चिरफळें, हिरडेदळ, तेड, बिडलोण, सैंधव, जवखार व सुंठ ह्यांचें चूर्ण तुपांत तळून सातूच्या काढ्यांतून प्यावयास द्यावें. म्हणजे शूळ व विबंध ह्यांसुद्धां गुल्माचा नाश होतो.

भास्करलवणचूर्ण.

सामुद्रलवणं ग्राह्यमष्टकर्षमितं बुधैः ।
एवं सौवर्चलं ग्राह्यं विडसैन्धवधान्यकम् ॥ १ ॥
पिप्पलीपिप्पलीमूलं कर्षं जीरकपत्रकम् ।
नागकेसरतालीसमम्लवेतसकं तथा ॥ २ ॥
द्विकर्षमात्राण्येतानि प्रत्येकं कारयेद् बुधः ।
मरीचं जीरकं विश्वमेकैकं कर्षमात्रकम् ॥ ३ ॥
दाडिमस्य चतुष्कर्षं त्वगेला चार्धकर्षिका ।
एतच्चूर्णीकृतं सर्वं लवणं भास्कराभिधम् ॥ ४ ॥
शाणप्रमाणं देयं तु मस्तुतक्रसुरासवैः ।
वातश्लेष्मभवं गुल्मं प्लीहानमुदरं क्षतम् ॥ ५ ॥
अर्शांसि ग्रहणीं कुष्ठं विबन्धं च भगंदरम् ।
शोथं शूलं श्वासकासमामदोषं च हृद्रुजम् ॥ ६ ॥
मन्दाग्निं नाशयत्येतद्दीपनं पाचनं परम् ।
सर्वलोकहितार्थाय भास्करेणोदितं पुरा ॥ ७ ॥

मीठ आठ तोळे, पादेलोण आठ तोळे, बिडलोण आठ तोळे, सैंधेलोण आठ तोळे, धने आठ तोळे, पिंपळी, पिंपळमूळ, जिरें व तमालपत्र एक एक तोळा, नाकेशर, तालीसपत्र व आम्लवेतस हीं औषधें दोन दोन तोळे; मिरें, जिरें व सुंठ हीं औषधें एक तोळा, आंबट डाळिंबाचे दाणे चार तोळे व दालचिनी व वेलदोडे अर्धा अर्धा तोळा ह्या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. ह्याला भास्करलवणचूर्ण म्हणतात. हें तीन मासेपर्यंत दह्यावरील पाणी, ताक, मद्य किंवा आसव ह्यांतून द्यावें. म्हणजे वातकफात्मक गुल्म, पांथरी, उदर,

उरःक्षत, मूळव्याध, संग्रहणी, कुष्ठ, मलबद्धता, भगंदर, सूज, शूळ, श्वास, खोकला, आमदोष, हृद्रोग, व अग्निमांद्य ह्यांचा नाश करितें. हें उत्तम प्रकारचें पाचक व दीपक आहे. हें सर्व लोकांच्या हिताकरितां पूर्वी भास्करानें सांगितलें आहे.

क्षारद्वयादि चूर्ण.

क्षारद्वयानलव्योषनीलीलवणपञ्चकम् ।
चूर्णितं सर्पिषा पेयं सर्वगुल्मोदरापहम् ॥ १ ॥

जवखार, सज्जिखार, चित्रकमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, निळीचें बीं, सेंधेलोण, पादेलोण, मीठ, बिडलोण व बांगडखार ह्यांचें चूर्ण करून तें तुपाशीं चाटावें. हें सर्व गुल्मांचा नाश करितें व उदरांचाही नाश करितें.

अग्निमुखचूर्ण.

हिंगुभागो भवेदेको वचा च द्विगुणा भवेत् ।
पिप्पली त्रिगुणा ज्ञेया शृङ्गबेरं चतुर्गुणम् ॥ १ ॥
यवानिका पञ्चगुणा षड्गुणा च हरीतकी ।
चित्रकं सप्तगुणितं कुष्ठं चाष्टगुणं भवेत् ॥ २ ॥
एतद्वातहरं चूर्णं पीतमात्रं प्रसन्नया ।
पिबेद्दध्ना मस्तुना वा सुरया कोष्णवारिणा ॥ ३ ॥
उदावर्तमजीर्णं च प्लीहानमुदरं तथा ।
अङ्गानि यस्य शीर्यन्ते विषं वा येन भक्षितम् ।
अर्शोहरो दीपनश्च शूलघ्नो गुल्मनाशनः ॥ ४ ॥
कासं श्वासं निहन्त्याशु तथैव क्षयनाशनः ।
चूर्णो ह्यग्निमुखो नाम्ना न क्वचित्प्रतिहन्यते ॥ ५ ॥

हिंग एक भाग, वेखंड दोन भाग, पिंपळी तीन भाग, सुंठ चार भाग, ओवा पांच भाग, हिरडे सहा भाग, चित्रकमूळ सात भाग व कोष्ठ आठ भाग ह्यांचें चूर्ण करावें. हें मद्याशीं घेतलें असतां वाताचा नाश करितें. हें दह्याबरोबर, दह्याच्या पाण्याबरोबर, मद्याबरोबर किंवा ऊन पाण्याबरोबर द्यावें. उदावर्त, अजीर्ण, पांथरी, व उदर हे विकार ज्याला झाले आहेत, ज्याचे अवयव गळल्यासारखे वाटतात, ज्याच्या पोटांत विष गेलें आहे त्यानें ह्या चूर्णाचें सेवन करावें. हें

मूळव्याधीचा नाश करितें. हें दीपक व शूळनाशक आहे. गुल्म-नाशक आहे. तसेंच खोकला, श्वास व क्षय ह्यांचाही नाश करितें. हें अग्निमुख चूर्ण कोठेंही निरुपयोगी ठरत नाहीं.

कांकायन गुटिका.

यवानी जीरकं धान्यं मरिचं गिरिकार्णिका ।
अजमोदोपकुञ्ची च चतुःशाणाः पृथक् पृथक् ॥ १ ॥
हिंगुषट्शाणकं कार्यं शाणो लवणपंचकात् ।
त्रिवृच्चाष्टमितैः शाणैः प्रत्येकं कल्पयेत्सुधीः ॥ २ ॥
दन्ती शठी पौष्करं च विडंगं दाडिमं शिवा ॥
चित्रोऽम्लवेतसः शुण्ठी शाणैः षोडशाभिः पृथक् ॥ ३ ॥
बीजपूररसेनैषां गुटिकां कारयेद् बुधः ।
घृतेन पयसा चाम्लै रसैरुष्णोदकेन वा ॥ ४ ॥
पिबेत्काङ्कायनप्रोक्तां गुटिकां गुल्मनाशिनीम् ।
मद्येन वातिकं गुल्मं गोक्षीरेण च पैत्तिकम् ॥ ५ ॥
मूत्रेण कफगुल्मं च दशमूलैस्त्रिदोषजम् ।
उष्ट्रीदुग्धेन नारीणां रक्तगुल्मं निवारयेत् ॥ ६ ॥
हृद्रोगं ग्रहणीशूलं कृमीनर्शांसि नाशयेत् ॥ ७ ॥

ओवा, जिरें, धने, मिरें, गोकर्णीचें बीं, अजमोदा, काळें जिरें, हीं औषधें एक एक तोळा; हिंग दीड तोळा; सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ, सांबरलोण, हीं औषधें तीन तीन मासे; तेड दोन तोळे, दांतीमूळ, कचोरा, पोखरमूळ, वावडिंग, आंबट डाळिंबाचे दाणे, हिरडे, चित्रकमूळ, आम्लवेतस व सुंठ हीं औषधें दोन दोन तोळे ह्या औषधांचें चूर्ण करून महाळुंगाच्या रसांत खलून त्याच्या गोळ्या कराव्या आणि त्यांतील एक एक गोळी तूप, दूध, अगर लिंबाचा वगैरे आम्ल रस किंवा ऊन पाणी ह्या अनुपानाशीं द्यावी. कांकायन ऋषीनें सांगितली ही गुटिका गुल्मनाशक आहे. ही मद्या-बरोबर घेतली असतां वातगुल्माचा नाश करिते. गाईच्या दुधा-बरोबर घेतली असतां पित्तगुल्माचा नाश करिते. गोमूत्राशीं घेतली असतां कफगुल्माचा नाश करिते. दशमूळाच्या काढ्याशीं घेतली असतां त्रिदोषजन्य गुल्माचा नाश करिते. आणि उंटिणीच्या

दुधाशीं घेतली तर स्त्रियांच्या रक्तगुल्माचा नाश करिते. शिवाय हृद्रोग, संग्रहणी, शूळ, कृमि व मूळव्याध ह्यांचा नाश करिते.

चिंचाक्षारादिशंखवटी.

चिञ्चाक्षारं स्नुहीक्षारमर्कक्षारं पलं पलम् ।
द्विपलं शंखजं भस्म रामठं च पलार्धकम् ॥ १ ॥
लवणानि च सर्वाणि पलमात्राणि योजयेत् ।
क्षारद्वयं पलार्धं च सर्वमेकत्र योजयेत् ॥ २ ॥
जम्बीरकरसैर्मर्द्यमनलस्य दिनत्रयम् ।
भृङ्गराजस्य निर्गुण्ड्या मुण्ड्याश्चैव पृथक् द्रवैः ॥ ३ ॥
आर्द्रकस्य रसेनैव प्रत्येकं दिनमर्दितम् ।
बदरीबीजमात्रांस्तु वटकान्कारयेद्भिषक् ॥ ४ ॥
एकैकं भक्षयेत्प्रातः पञ्च गुल्मान्व्यपोहति ।
सर्वं शूलं निहन्त्याशु अजीर्णं च विषूचिकाम् ॥ ५ ॥
मन्दाग्निं नाशयेच्छीघ्रं पथ्यं तैलाम्लवर्जितम् ।
चिञ्चाशंखवटी नाम ग्रहणीरोगहृत्परा ॥ ६ ॥

चिंचेच्या टरफलाचा क्षार, त्रिधारी निवडुंगाचा क्षार व रुईचा क्षार प्रत्येक चार चार तोळे, शंखभस्म आठ तोळे, हिंग दोन तोळे, सर्व लवणें (मीठ, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, बांगडखार, सोरमीठ, सांबरलोण वगैरे) चार चार तोळे, जवखार व सज्जिखार दोन दोन तोळे ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत व चित्रकमूळाच्या काढ्यांत तीन तीन दिवस खल करावा. त्याचप्रमाणें माका, निर्गुडी, मुंडी, व आल्याचा रस ह्या प्रत्येकाच्या रसांत एक एक दिवस खल करावा. आणि बोरांतील बीएवढ्या गोळ्या कराव्या. त्यांतील एक एक गोळी प्रातःकाळीं भक्षण करावी. म्हणजे पांची गुल्मांचा ती नाश करिते. तसेंच सर्वशूळ, अजीर्ण, विषूचिका, व अग्निमांद्य ह्यांचाही त्वरित नाश करिते. ह्यांजवर तेलकट व आंबट वर्ज करावें. हिला चिंचाशंखवटी म्हणतात. ती संग्रहणीचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

वज्रक्षार.

सामुद्रं सैन्धवं काचं यवक्षारं सुवर्चलम् ।
टङ्कणं स्वर्जिकाक्षारं तुल्यं चूर्णं प्रकल्पयेत् ॥ १ ॥

अर्कक्षीरैः स्नुहीक्षीरैः शोषयेदातपे त्र्यहम् ।
अर्कपत्रं लिपेत्तेन रुद्ध्वा भाण्डपुटे पचेत् ॥ २ ॥
तं क्षारं चूर्णयित्वाऽथ त्र्यूषणं त्रिफलारजः ।
जीरकं रजनी वह्निर्नवकस्य समं ततः ।
क्षारार्धं योजयेत्सम्यगेकीकृत्य विचूर्णयेत् ॥ ३ ॥
वज्रक्षारमिमं शुद्धं स्वयं प्रोक्तं पिनाकिना ॥ ४ ॥
सर्वोदरेषु गुल्मेषु शूले शोफे च योजयेत् ।
अग्निमान्द्ये त्वजीर्णे च भक्षेन्निष्कद्वयं तथा ॥ ५ ॥
वाताधिके जलैः कोष्णैर्घृतैः पित्ताधिके हितः ।
कफे गोमूत्रसंयुक्त आरनालैस्त्रिदोषनुत् ॥ ६ ॥

मीठ, सैंधेलोण, बांगडखार, जवखार, पादेलोण, टाकणखार, व साज्जिखार ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें; आणि त्या चूर्णाला रुईच्या चिकाच्या व त्रिधारी निवडुंगाच्या चिकाच्या उन्हामध्यें तीन तीन भावना द्याव्या. नंतर त्याचा रुईच्या पानांला लेप करून तीं पानें एका मातीच्या शरावांत घालून मातकापड करून अग्निपुट द्यावें. नंतर तो क्षार काढून सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, जिरें, हळद व चित्रकमूळ, ह्यांचें समभाग चूर्ण क्षाराच्या निम्यानें त्यांत मिसळून एकत्र खलून ठेवावा. ह्याला वज्रक्षार असें म्हणतात. हा इंद्रानें सांगितला आहे. हा सर्व उदरें, सर्व गुल्म, सर्व शूळ व सूज ह्यांजवर योजावा. अग्निमांद्य व अजीर्ण ह्यांजवर देखील हा आठ मासेपर्यंत भक्षण करावा. हा वाताधिक रोगावर ऊन पाण्याशीं, पित्ताधिक रोगावर तुपाशीं, कफाधिक रोगावर गोमूत्राशीं आणि त्रिदोषजन्य विकारावर कांजीशीं दिला असतां त्या त्या विकारांचा नाश करितो.

योगसारांतील शंखद्राव.

प्रस्थं जम्बीरनीरं बदरपरिमितं काकतुण्डस्य मूलं
कर्षार्धं स्वर्जिकायास्त्रिपटुपलयुतं नव्यसारं पलार्धम् ।
तत्सर्वं सूर्यतापे मुनिदिनयुगुलं काचकूप्यां निधाय
हन्याद्गुल्मं सुतीव्रं जठरमलरुजं शंखकद्रावसंज्ञः ॥ १ ॥

लिंबाचा रस चौसष्ट तोळे, ढोरगुंजेचें मूळ (कोणाच्या मतें

१ हा शब्द लेखीप्रतीवरून घेतला आहे.

तांबड्या कावळीचें मूळ) बोराएवढें, सज्जिखार अर्धा तोळा, सैंधे-लोण, पादेलोण व बिडलोण हीं चार तोळे, नवसागर दोन तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण लिंबाच्या रसांत मिसळून कुपींत भरून सात दिवसपर्यंत उन्हांत ठेवावें. ह्याला शंखद्राव म्हणतात. हा तीव्र गुल्म व मळसंचयानें होणारा शूळ ह्यांचा नाश करतो.

दुसरा शंखद्राव.

फटकीपलमेकं च सैन्धवं पलमेव च ।
द्विपलं च यवक्षारं द्विपलं नवसागरम् ॥ १ ॥
चतुष्पलं सुराक्षारं पलार्धं कासिसं तथा ।
डमरूयन्त्रयोगेन चुल्यां वै बदरीन्धनैः ॥ २ ॥
साधयेल्लाघवाच्चूर्णं शङ्खद्रावरसं परम् ।
गुल्मादिसर्वरोगेषु देयः सर्वसुखप्रदः ॥ ३ ॥

तुरटी चार तोळे, सैंधेलोण चार तोळे, जवखार आठ तोळे, नवसागर आठ तोळे, सोरा सोळा तोळे, आणि हिराकस दोन तोळे हे सर्व जिन्नस एकत्र करून त्यांचा डमरुयंत्रानें बोरीच्या लाकडाच्या अग्नीनें अर्क काढावा. ह्याला शंखद्राव म्हणतात. हा सर्व गुल्मांवर द्यावा. हा सर्वांना सुखावह आहे.

तिसरा शंखद्राव.

सैन्धवं च यवक्षारं नव्यसारं तथैव च ।
प्रत्येकं द्विपलं ग्राह्यं सुराक्षारं चतुष्पलम् ॥ १ ॥
फटकीपलमेकं च पलार्धं कासिसं तथा ।
सर्वमेकत्र संयोज्य डमरूयन्त्रमध्यगे ॥ २ ॥
चुल्ल्यां प्ररोहयेत्तत्तु ज्वालयेत्खादिरेन्धनैः ।
द्रावितं तत्समादाय तेजोरूपं जलप्रभम् ॥ ३ ॥
द्रावयेदखिलान्धातून्वराटांश्च न संशयः ।
शङ्खद्रावरसो नाम गुल्मोदरहरः परः ॥ ४ ॥

सैंधेलोण, जवखार व नवसागर हे प्रत्येक आठ आठ तोळे, सोरा सोळा तोळे, पटकी चार तोळे, व हिराकस दोन तोळे, हें सर्व एकत्र करून डमरूयंत्रानें खैराच्या लांकडांनीं अग्नि देऊन

२ सोरा व जवखार एकत्र केल्यास त्यास नवसागर म्हणावें, असें लेखी प्रतींत लिहिलें आहे.

अर्क काढावा. हा प्रखर असतो. हा कवडी वगैरे सर्व धातूंचें द्रावण करितो. ह्यालाही शंखद्राव म्हणतात. हा गुल्म व उदर ह्यांच्या नाशाविषयीं फार उत्तम आहे.

क्रव्यादरस.

द्विपलं गन्धकं शुद्धं द्रावयित्वा विनिक्षिपेत् ।
पारदं पलमानेन मृतशुल्बायसी पुनः ॥ १ ॥
कर्षमानेन संमिश्र्य पञ्चांगुलदले क्षिपेत् ।
ततो विचूर्ण्य यत्नेन निक्षिप्याऽऽयसपात्रके ॥ २ ॥
चुल्ल्यां निवेश्य यत्नेन चालयेन्मृदुवह्निना ।
पात्रं पात्रं हि जम्बीररसं तत्र प्रचारयेत् ॥ ३ ॥
पञ्चकोलसमुद्भूतैः कषायैः साम्लवेतसैः ।
भावनाः खलु दातव्याः पञ्चाशत्प्रमितास्तथा ॥ ४ ॥
भृष्टटङ्कणचूर्णेन तुल्येन सह मेलयेत् ।
तदर्धपञ्चलवणैः सर्वसाम्यमरीचकैः ॥ ५ ॥
सप्तधा भावयेत्पश्चाच्चणकक्षारवारिणा ।
ततः संशोष्य संपेष्य कूपिकाभ्यन्तरे क्षिपेत् ॥ ६ ॥
अत्यन्तगुरुभोज्यानि गुरुमांसान्यनेकशः ।
भक्षयेत्कण्ठपर्यन्तं ततो देयो रसोत्तमः ॥ ७ ॥
चतुर्वल्लमितो देयस्तक्रैः सलवणैरपि ।
भुक्तं जीर्यति तत्क्षिप्रं जायते दीपनं परम् ॥ ८ ॥
रसः क्रव्यादनामाऽयं प्रोक्तो मन्थानभैरवैः ।
सिंहलक्षोणिपालाय भूरिमांसभुजे तथा ॥
ततः क्रव्यादयं प्रोक्तो दृढं प्रत्ययकारकः ॥ ९ ॥
कुर्याद्दीपनमुद्धतं पवनजे देहे परं शोषणं
तुन्दस्थौल्यनिबर्हणो गदहरो दुष्टव्रणार्तिप्रणुत् ।
कासश्वासविनाशनो ग्रहणिकाविध्वंसनः स्रंसनो
गुल्मप्लीहजलोदरोपशमनः क्रव्यादनामा रसः ॥१०॥
विश्वाहिंगुबिडैः सार्धं क्रव्यादो भक्षितो रसः ।
गुल्मानशेषान्प्लीहानं विद्रधीनपि नाशयेत् ॥ ११ ॥

आठ तोळे शुद्ध गंधक चुलीवर (लोखंडाच्या भांड्यांत) पातळ करून त्यांत चार तोळे पारा मिसळावा. आणि त्यांत पुनः ताम्रभस्म व लोहभस्म एकएक तोळा घालून सर्व एकत्र करून एरंडाच्या पानावर ओतावें. निवाल्यावर त्याचें पुनः लोखंडाच्या भांड्यांत

चूर्ण करावें. आणि तें भांडें चुलीवर ठेवून त्यांत लिंबाचा रस दोनशें छपन्न तोळे घालून आटवावा. ह्याप्रमाणें पिंपळी, पिंपळगूळ, चवक, चित्रक, सुंठ व आम्लवेतस ह्यांचा काढाही तितकाच घालून आटवावा. ह्याप्रमाणें पन्नास भावना द्याव्या. नंतर त्याच्याबरोबरीनें त्यांत टाकणखाराची लाही घालावी. आणि त्याच्या निम्यानें पंचलवणाचें (सैंधव, संचळ, बिडलोण, मीठ, व बांगडखार ह्यांचें) चूर्ण मिसळावें. आणि सर्वांच्या बरोबरीनें त्यांत मिरें घालावीं. नंतर त्या सर्वांचा हरभऱ्याच्या आंबेच्या रसांत सात दिवस खल करावा, आणि वाळवून पूड करून कुपींत भरून ठेवावी. अत्यंत जड असे खाण्याचे पदार्थ, तसेंच अनेक प्रकारचीं जड मांसें ह्यांचें आकंठ (गळ्यापाशीं येईपर्यंत) सेवन करून त्यांजवर हा रस चार वालपर्यंत ताक व मीठ ह्यांशीं द्यावा; म्हणजे खाल्लेलें सर्व त्वरित पचन होऊन पुनः अग्नि प्रदीप्त होतो (भूक लागते). हा क्रव्याद नांवाचा रस मंथानभैरवानें अत्यंत मांस भक्षण करणाऱ्या सिंहलद्वीपच्या राजाकरितां सांगितला. म्हणून ह्याला क्रव्यादरस असें म्हणतात. हा प्रत्यक्ष अनुभव देणारा आहे. हा उत्तम प्रकारचा दीपक आहे. वातबद्ध देहाला (स्थूल देहाला) शोषण करणारा आहे. मोठें पोट व स्थूळपणा ह्यांचा नाश करतो. हा रोगनाशक व दुष्टव्रणनाशक आहे. खोकला, श्वास व संग्रहणी यांचा नाशक असून स्रावी आहे. हा क्रव्याद रस गुल्म, पांथरी व जलोदर ह्यांचा नाशक आहे. हा क्रव्याद रस सुंठ, हिंग व बिडलोण ह्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाशीं सेवन केला असतां सर्व प्रकारचे गुल्म, पांथरी व विद्रधि (अंतर्विद्रधि) ह्यांचा नाश करतो.

गदनिग्रहांतील चविकासव.

चविकायास्तुलार्धं तु तदर्धं चित्रकस्य च ।
बाष्पिका पुष्करं मूलं षड्ग्रन्था हपुषा शठी ॥ १ ॥
पटोलमूलत्रिफलायवानीकुटजत्वचः ।
विशाला धान्यकं रास्ना दन्ती दशपलोन्मिता ॥ २ ॥
कृमिघ्नमुस्तमञ्जिष्ठादेवदारुकटुत्रिकम् ।

भागान्पञ्चपलानेतानष्टद्रोणेऽम्भसः पचेत् ॥ ३ ॥
द्रोणशेषे रसे पूते देयं गुडशतत्रयम् ।
धातक्या विंशतिपलं चातुर्जातं पलाष्टकम् ॥ ४ ॥
लवङ्गव्योषकक्कोलं पलिकानि प्रकल्पयेत् ।
निदध्यान्मासमेकं तु घृतभाण्डे सुसंस्कृते ॥ ५ ॥
चतुष्पलां पिबेन्मात्रां प्रातः पीतं नियच्छति ।
सर्वगुल्मविकारांश्च प्रमेहांश्चैव विंशतिम् ॥ ६ ॥
प्रतिश्यायं क्षयं कासमष्ठीलां वातशोणितम् ।
उदराण्यन्त्रवृद्धिं च चविकाख्यो महासवः ॥ ७ ॥

चवक दोनशें तोळे, चित्रकमूळ शंभर तोळे; बाफळी, पोखरमूळ, वेखंड, शेरणी, कचोरा, पडवळाचें मूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, ओवा, कुड्याची साल, थोर कौंडळाचें मूळ, धने, रास्ना, व दांतीमूळ हीं औषधें प्रत्येकीं चाळीस तोळे; वावडिंग, नागरमोथे, मंजिष्ठ, देवदार, सुंठ, मिरें व पिंपळीहीं औषधें वीस वीस तोळे घेऊन त्यांचा आठहजार एकशें ब्याण्णव तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. दहाशें चोवीस तोळे उरलेला काढा गाळून घेऊन त्यांत तीनशें तोळे गूळ घालावा. आणि धायटीचीं फुलें ऐंशीं तोळे; दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे व नाकेशर ह्या प्रत्येकाचें चूर्ण आठ आठ तोळे, लवंग, सुंठ, मिरें, पिंपळी व कंकोळ ह्यांचें चूर्ण चार चार तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून त्यांत घालून तुपानें रावलेल्या भांड्यांत भरून एक महिनाभर धान्यराशींत पुरून ठेवावा. नंतर काढून सोळा तोळे प्रमाणाची ह्याची मात्रा प्रातःकाळीं सेवन करावी. म्हणजे हें चविकासव सर्व प्रकारचे गुल्म, वीस प्रकारचे प्रमेह, पडसें, क्षय, खोकला, अष्ठीला, वातरक्त, सर्व प्रकारचीं उदरें व अंत्रवृद्धि ह्यांचा नाश करितें.

कुमारिकासव.

कुमार्याश्च रसद्रोणे गुडं पलशतं तथा ।
तुलांध्रिसंख्यां विजयां क्राथयेत्तज्जलार्मणे ॥ १ ॥
चतुर्थांशावशेषे तु पूते तस्मिन्निधापयेत् ।
मधुनश्चाऽऽढकं दत्वा धातक्या द्विपलाष्टकम् ॥ २ ॥
स्निग्धभाण्डे विनिक्षिप्य कल्कं चैव प्रदापयेत् ।

जातीफलं लवङ्गं च कंकोलं च कबाबकम् ॥ ३ ॥
जटिलाचव्यचित्रं च जातीपत्री सकर्कटम् ।
अक्षं पुष्करमूलं च प्रत्येकं च पलं पलम् ॥ ४ ॥
मृतं शुल्बं तथा लोहं शुक्तिमात्रं प्रदापयेत् ।
भूम्यां वा धान्यराशौ वा स्थापयेद्दिनविंशतिम् ॥ ५ ॥
तमुद्धृत्य पिबेन्मात्रां यथा चाग्निबलाबलम् ।
पञ्चकासं तथा श्वासं क्षयरोगं च दारुणम् ॥ ६ ॥
उदराणि तथाऽष्टौ च षडर्शांसि च नाशयेत् ।
वातव्याधिमपस्मारमन्यान्रोगान्सुदारुणान् ॥ ७ ॥
जाठरं कुरुते दीप्तं कोष्ठशूलं च नाशयेत् ।
गुल्माष्टकं नष्टपुष्पं नाशयेदेकपक्षतः ॥
कुमारिकासवो ह्येष बृहस्पतिविनिर्मितः ॥ ८ ॥

कोरफडीचा रस वीसशें आठ्ठेचाळीस तोळे, गूळ चारशें तोळे, व हिरडे शंभर तोळे ह्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत काढा करावा. तो चतुर्थांश उरल्यावर गाळून घ्यावा. नंतर त्यांत दोनशें छपन्न तोळे मध व चौसष्ट तोळे धायटीचीं फुलें घालून तुपानें राबलेल्या मातीच्या भांड्यांत (किंवा चिनीमातीच्या बरणींत) भरावा. नंतर पुनः जायफळ, लवंग, कंकोळ, कबाबचिनी, जटामांसी, चवक, चित्रक, जायपत्री, काकडशिंगी, बेहडेदळ व पोखरमूळ ह्यांचें चूर्ण चारचार तोळे, ताम्रभस्म दोन तोळे व लोहभस्म दोन तोळे हीं औषधें त्यांत घालून जमिनींत अगर धान्याच्या राशींत वीस दिवस पुरून ठेवावा. हें वीस दिवसांनंतर काढून अग्निबल पाहून द्यावें. म्हणजे पांच प्रकारचे खोकले, श्वास, भयंकर क्षय, आठ प्रकारचीं उदरें, सहा प्रकारची मूळव्याध, वातरोग, अपस्मार व दुसरे भयंकर रोग ह्यांचा तें नाश करितें. व अग्नि प्रदीप्त करितें. कोठ्यांतील शूळाचा नाश करितें. आठ प्रकारचे गुल्म व स्त्रियांचा नष्टार्तव विकार ह्यांचा पंधरा दिवसांत नाश करितें. हें कुमारिकासव बृहस्पतीनें सांगितलें आहे.

हिंग्वादि घृत.

हिंगुपुष्करमूलानि तुम्बरूणि हरीतकी ।
श्यामा बिडं सैन्धवं च यवक्षारं महौषधम् ॥ १ ॥

यवक्काथोदकेनैतद् घृतप्रस्थं विपाचयेत् ।
तेनास्य भिद्यते गुल्मः सशूलः सपरिग्रहः ॥ २ ॥

हिंग, पोखरमूळ, चिरफळें, हिरडे, तेड, बिडलोण, सैंधेलोण, जवखार व सुंठ ह्या औषधांचा कल्क व जवांचा काढा ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. त्या तुपाच्या योगानें शूळ व उपद्रव ह्यांसह गुल्माचें भेदन होतें.

दाधिक घृत.

बिडदाडिमसिन्धूत्थहुतभुग्व्योषजीरकैः ।
हिंगुसौवर्चलक्षारचुक्रवृक्षाम्लवेतसैः ॥ १ ॥
बीजपूररसोपेतैः सर्पिर्दधि चतुर्गुणम् ।
साधितं दाधिकं नाम्ना गुल्महृत्प्लीहनुत्परम् ॥ २ ॥

बिडलोण, आंबट डाळिंबाचे दाणे, सैंधव, चित्रकमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, जिरें, हिंग, पादेलोण, जवखार, चुका व आम्लवेतस ह्यांचा कल्क; महाळुंगाचा रस, तूप व तुपाच्या चौपट दहीं घालून तूप सिद्ध करावें. ह्याला दाधिक घृत असें म्हणतात. हें गुल्म व पानथरी ह्यांचा नाश करितें.

वृंदांतील त्रायमाणादि घृत.

जले दशगुणे साध्यं त्रायमाणं चतुष्पलम् ।
पञ्चभागान्वितं पूतं कल्कैः संयोज्य कार्षिकैः ॥ १ ॥
रोहिणी कटुका मुस्ता त्रायमाणा दुरालभा ।
द्राक्षा तामलकी वीरा जीवन्ती चन्दनोत्पलम् ॥ २ ॥
रसस्याऽऽमलकानां च क्षीरस्य च घृतस्य च ।
पलानि पृथगष्टाष्टौ सम्यग्दत्त्वा विपाचयेत् ॥ ३ ॥
पित्तगुल्मं रक्तगुल्मं विसर्पं पित्तजं ज्वरम् ।
हृद्रोगं कामलां कुष्ठं हन्यादेतद् घृतोत्तमम् ॥ ४ ॥

सोळा तोळे त्रायमाणाचा दसपट पाण्यांत द्वितीयांश काढा करावा. पांच भाग उरलेला काढा गाळून घेऊन त्यांत बाळहिरडे, कुटकी, नागरमोथे, त्रायमाण, धमासा, द्राक्षें, भुईआवळी, थोर शतावरी, हरणदोडी, चंदन व कमळ ह्या औषधांचा कल्क एकएक तोळा; व आवळ्याचा रस, दूध, तूप हीं प्रत्येक बत्तीस बत्तिस तोळे घालून तूप पचन करावें. हें त्रायमाणादि घृत पित्तगुल्म, रक्तगुल्म,

विसर्प, पित्तज्वर, हृद्रोग, कावीळ, कुष्ट ह्यांचा नाश करितें.

सामुद्रादिवर्ति.

वातवर्चोनिरोधेषु सामुद्रार्द्रकसर्षपैः ।
कृत्वा पायौ विधातव्या वर्तयो मरिचान्वितैः ॥ १ ॥

गुल्मरोगामध्यें अधोवायु व मल ह्यांचा अवरोध झाला असतां मीठ, आल्याचा रस, मोहऱ्या व मिरें ह्यांचा कल्क करून त्याची वात करून (तिला तूप लावून) ती गुदांत ठेवावी.

रसायनें, नाराचरस.

शुद्धसूतं समं गन्धं जेपालं त्रिफला समम् ।
त्रिकटु पेषयेत्क्षौद्रमिश्रं गुल्मं लिहन्हरेत् ।
उष्णोदकं पिबेच्चानु नाराचोऽयं रसोत्तमः ॥ १ ॥

शुद्ध पारा, गंधक, जेपाळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें व पिंपळी ह्या सर्वांचा एकत्र खल करून शक्तिमानाप्रमाणें मधाशीं चाटावयास द्यावा, व त्याजवर ऊन पाणी प्यावयास द्यावें. ह्याला नाराचरस म्हणतात. हा गुल्माचा नाश करतो.

वडवानळ रस.

शुद्धसूतं समं गन्धं मृतं ताम्राभ्रटङ्कणम् ।
सामुद्रं च यवक्षारं स्वर्जिसैन्धवनागरम् ॥ १ ॥
अपामार्गस्य च क्षारं पालाशं वत्सनाभकम् ।
प्रत्येकं सूततुल्यं स्याच्चणकाम्लेन मर्दयेत् ॥ २ ॥
हस्तिकन्याद्रवैश्चाहो आर्द्रयुक्तं पुटेल्लघु ।
माषैकं भक्षयेन्नित्यं रसोऽयं वडवानलः ॥
सर्वगुल्मं निहन्त्याशु ग्रहणीं च विशेषतः ॥ ३ ॥

शुद्ध पारा, गंधक, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, टाकणखाराची लाही, मीठ, जवखार, सज्जिखार, सैंधेलोण, सुंठ, आघाड्याचा क्षार, पळसाचा क्षार, व वचनाग हीं सर्व औषधें प्रत्येकीं पाऱ्याच्या समभाग घेऊन त्यांचा हरभऱ्याच्या आंबेमध्यें खल करावा. नंतर कुमारीच्या रसांत एक दिवस खल करून आल्याच्या रसांत खलून लघु पुट द्यावें. हा वडवानळ रस उडदाइतका नित्य सेवन करावा. हा सर्व गुल्मांचा नाश करतो व विशेषतः संग्रहणीचा नाश करतो.

गुल्मकुठाररस.

नागवङ्गाभ्रकं कान्तं समं ताम्रं समांशकम् ।
जम्बीरस्वरसैर्घृष्ट्वा वटी गुञ्जाप्रमाणिका ॥ १ ॥
मधुनाऽऽर्द्रकनीरेण क्षारयुग्मेन सेविता ।
अजीर्णमामं गुल्मं च हृत्पार्श्वोदरशूलके ।
नाम्ना गुल्मकुठारोऽयं सर्वगुल्मान्व्यपोहति ॥ १ ॥

नागभस्म, वंगभस्म, अभ्रकभस्म, व कांतभस्म हीं समभाग व सर्वांच्या समान ताम्रभस्म ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करून गुंजेएवढी गोळी करावी. आणि मध, आल्याचा रस, जवखार व सज्जिखार ह्यांचें चूर्ण ह्यांजबरोबर सेवन करावी. म्हणजे अजीर्ण, आम, गुल्म, हृदय, कुशी व पोट ह्यांमधील शूळ, ह्यांचा नाश करते. हा गुल्मकुठार नावांचा रस सर्व गुल्मांचा नाश करतो.

काश्यपसंहितेंतील मदेभसिंहसूतरस.

रसगन्धवराटताम्रशङ्खं विषवङ्गाभ्रककान्ततीक्ष्णमुण्डम् ।
अहिहिंगुलटङ्कणं समांशं सकलं तत्रिगुणं पुराणकिट्टम् ॥ १ ॥
पशुमूत्रविशोधितं सुभृष्टा त्रिफलाभृङ्गरजार्द्रकोत्थनीरैः ।
सुविशोष्य वरामृतालिवासास्वरसैरष्टगुणैः पुनर्नवोत्थैः ॥ २ ॥
पृथगग्निकृतं घनं विपाच्य गुटिका गुञ्जयुता निजानुपानैः ।
ज्वरपाण्डुतृषास्रपैत्त्यगुल्मक्षयकासस्वरमग्निसादमूर्छाः ॥ ३ ॥
पवनादिषु दुस्तराष्टरोगान्सकलं पित्तहरं मदावृतं च ।
बहुना किमसौ यथार्थनामा सकलव्याधिहरो मदेभसिंहः ॥४॥

पारा, गंधक, कवडीभस्म, ताम्रभस्म, शंखभस्म, बचनाग, वंगभस्म, अभ्रकभस्म, कांतभस्म, तिख्याचें भस्म, मुंडलोहाचें भस्म, नागभस्म, हिंगूळ, टाकणखाराची लाही हीं औषधें समभाग आणि गोमूत्रांत शुद्ध करून त्रिफळा, माका, आणि आल्याचा रस ह्यांतून भाजून काढलेला मंडूर त्यांच्या तिप्पट घेऊन सर्व एकत्र करून त्रिफळा, गुळवेल, माका, अडुळसा व वसु ह्या प्रत्येक वनस्पतीचा यथासंभव रस किंवा काढा त्या सर्वांच्या आठपट घालून अग्नीवर पचन करावें. रस आटून गोळ्या होण्यासारखा घट्ट झाल्यावर गुंजप्रमाणाच्या गोळ्या करून अनुपान योजून त्या द्याव्या. म्हणजे ज्वर, पांडुरोग, तहान,

रक्तपित्त, गुल्म, क्षय, खोकला, स्वरभेद, अग्निमांद्य, मूर्च्छा, वातव्याधि वगैरे दुस्तर आठ रोग ह्यांचा नाश करतो. सर्व पित्तविकार व मदयुक्त विकार ह्यांचा नाश करतो. फार काय सांगावें? हा सर्व रोगनाशक आहे. ह्याला मदेभसिंहसूत हें नांव अगदीं यथार्थ आहे.

प्रवाळपंचामृतरस.

प्रवालमुक्ताफलशङ्खशुक्तिकपर्दिकानां च समांशभागम् ।
प्रवालमात्रं द्विगुणं प्रयोज्यं सर्वैः समांशं रविदुग्धमेव ॥ १ ॥
एकीकृतं तत्खलु भाण्डमध्ये क्षिप्त्वा मुखे बन्धनमत्र योज्यम् ।
पुटं विदध्याददतिशीतले च उद्धृत्य तद्भस्म क्षिपेत्करण्डे ॥ २ ॥
नित्यं द्विवारं प्रतिपाकयुक्तं वल्लप्रमाणं हि नरेण सेव्यम् ।
आनाहगुल्मोदरप्लीहकासश्वासाग्निमांद्यान्कफमारुतोत्थान् ॥ ३
अजीर्णमुद्गारहृदामयघ्नं ग्रहण्यतीसारविकारनाशनम् ॥ ४ ॥
मेहामयं मूत्ररोगं मूत्रकृच्छ्रं तथाऽश्मरीम् ।
नाशयेन्नात्र संदेहः सत्यं गुरुवचो यथा ॥ ५ ॥
पथ्याश्रितं भोजनमादरेण समाचरेन्निर्मलचित्तवृत्त्या ।
प्रवालपंचामृतनामधेयो योगोत्तमः सर्वगदापहारी ॥ ६ ॥

प्रवाळ, मोतीं, शंख, मोत्याच्या शिंपा व कवड्या हीं औषधें समभाग, त्यांत प्रवाळ मात्र दुप्पट घ्यावा. सर्वांच्या समान त्यांत रुईचा चीक घालावा. आणि शरावसंपुटांत घालून संधिलेप करून गजपूट द्यावें. हें स्वांगशीत झाल्यावर काढून करंड्यांत भरून ठेवावें. आणि नित्य दोन वेळ एकएक वाल याप्रमाणें सेवन करावें. म्हणजे आनाहरोग, गुल्म, उदर, पांथरी, खोकला, श्वास, अग्निमांद्य व कफवातजन्य असे सर्व विकार, अजीर्ण, ढेकर येणें, हृद्रोग, संग्रहणी व अतिसार ह्या विकारांचा नाश होतो. त्याचप्रमाणें मेहरोग, मूत्ररोग, मूत्रकृच्छ्र, मूतखडा ह्यांचाही हा प्रवाळपंचामृत नाश करितो, ह्यांत संशय नाहीं. हें गुरूच्या वचनाप्रमाणें अगदीं सत्य आहे. हें औषध सेवन करीत असतां शुद्ध मनानें पथ्य भोजन करून असावें. हा प्रवाळपंचामृत नांवाचा रस सर्व रोगनाशक आहे.

—१० यो. र.

पथ्यापथ्यें.

संवत्सरसमुत्पन्नाः कलमा रक्तशालयः ।
खण्डं कुलत्थयूषश्च धन्वमांसरसः सुरा ॥ १ ॥
गवामजायाश्च पयो मृद्वीका च परूषकम् ।
तक्रमेरण्डतैलं च लशुनं बालमूलकम् ॥ २ ॥
पत्तुरो वास्तुकं शिग्रु मातुलुङ्गं हरीतकी ।
वातानुलोमनं चैव पथ्यं गुल्मे नृणां भवेत् ॥ ३ ॥

एक वर्षाच्या जुन्या साळी, तामसाळ, खडीसाखर, हुलग्याचें कढण, धन्व-(जांगल) देशांतील मांसाचा रस, मद्य, गाईचें किंवा शेळीचें दूध, मनुका, फालसा, ताक, एरंडतेल, लसूण, कोवळा मुळा, पत्तूर (जळपिंपळी), चंदनबटवा किंवा चाकवत, शेवग्याच्या शेंगा, महाळुंग, हिरडे आणि वातानुलोमन करणारे पदार्थ हें गुल्मावर पथ्य आहे.

माषादयः शिम्बिधान्ये शूकधान्ये यवादयः ।
वल्लूरं मूलकं मत्स्यं मधुराणि फलानि च ॥ ४ ॥
अधोवायुशकृन्मूत्रश्रमश्वासाश्रुधारणम् ।
वमनं जलपानं च गुल्मरोगी परित्यजेत् ॥ ५ ॥

उडीद वगैरे शेंगांतील धान्यें, सातू वगैरे शूकधान्यें, सुकें मांस, जून मुळा, मासे, गोड फळें; अधोवायु, मल, मूत्र, श्रमामुळें चालणारा श्वासोच्छ्वास, व अश्रु ह्यांचे वेग धारण करणें, ओकारी काढणें व पाणी पिणें, हे प्रकार गुल्मरोग्यानें अपथ्य म्हणून वर्ज करावे.

हृद्रोगनिदान.

अत्युष्णगुर्वम्लकषायतिक्तैः श्रमाभिघाताध्यशनप्रसङ्गैः ।
संचिन्तनैर्वेगविधारणैश्च हृदामयः पञ्चविधः प्रदिष्टः ॥ १ ॥

अतिशय उष्ण, जड, तुरट व कडू अन्न खाणें; श्रम, हृदयावर आघात होणें, जेवण करून पुनः त्याजवर जेवणें, चिंताग्रस्त असणें, मलमूत्र व श्रमजन्य श्वासोच्छ्वास इत्यादिकांचा वेग धारण करणें, ह्या कारणांनीं पांच प्रकारचा हृद्रोग होतो.

हृद्रोगाची संप्राप्ति.

दूषयित्वा रसं दोषा विगुणा हृदयं गताः ।

हृदि बाधां प्रकुर्वन्ति हृद्रोगं तं प्रचक्षते ॥ २ ॥

प्रकुपित झालेले वातादि दोष विगुण होऊन हृदयांत शिरून रसधातूला दूषित करून हृदयामध्यें वेदना उत्पन्न करितात. त्याला हृद्रोग असें म्हणतात.

वातिक हृद्रोगाचें लक्षण.

आयम्यते मारुतजे हृदयं तुद्यते तथा ।
निर्मथ्यते दीर्यते च स्फोट्यते पाट्यतेऽपि च ॥ ३ ॥

वातज हृद्रोगामध्यें हृदय आंत ओढल्याप्रमाणें वाटतें; हृदयांत सुया टोचल्याप्रमाणें, घुसळल्याप्रमाणें, व फोडल्याप्रमाणें पीडा होते. हृदयांत आरीनें भोकसल्याप्रमाणें किंवा कुऱ्हाडीनें फोडल्याप्रमाणें वाटतें.

पित्तजन्य हृद्रोगाचें लक्षण.

तृष्णोष्णदाहचोषाः स्युः पैत्तिके हृद्गदे क्रमः ।
धूमायनं च मूर्छा च स्वेदः शोषो मुखस्य च ॥ ४ ॥

तहान, उकडणें व दाह हीं लक्षणें पित्तजन्य हृद्रोगांत होतात. आणि हृदय भाजल्याप्रमाणें वाटतें, थकवा येतो, घशांतून धूर निघाल्यासारखें वाटतें, मूर्छा येते, घाम येतो, आणि तोंडाला कोरड पडते.

कफजन्य हृद्रोगाचें लक्षण.

गौरवं कफसंस्रावोऽरुचिः स्तम्भोऽग्निमार्दवम् ।
माधुर्यमपि चाऽऽस्यस्य बलासावतते हृदि ॥ ५ ॥

जडत्व, तोंडांतून कफाचा स्राव होणें, अरुचि, हृदय ताठल्याप्रमाणें होणें, अग्निमांद्य व तोंड गुळमट असणें हीं लक्षणें कफजन्य हृद्रोगामध्यें होतात.

त्रिदोषजन्य व कृमिजन्य हृद्रोगाचें लक्षण.

विद्यात्त्रिदोषमप्येवं सर्वलिङ्गहृदामयम् ।

ज्या हृद्रोगामध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात, त्याला त्रिदोषजन्य हृद्रोग म्हणावें.

त्रिदोषजे तु हृद्रोगे यो दुरात्मा निषेवते ॥ ६ ॥
तिलक्षीरगुडादींश्च ग्रन्थिस्तस्योपजायते ।

मर्मैकदेशे संक्लेदं रसश्चाप्युपगच्छति ॥ ७ ॥
तत्क्लेदात्क्रमयश्चास्य भवन्त्युपहतात्मनः ।
तीव्रार्तितोदं कृमिजं तद्दोषत्रयसंभवम् ॥ ८ ॥

जो मूर्ख मनुष्य त्रिदोषजन्य हृद्रोग झाला असतां तीळ, गूळ, व दूध हे पदार्थ खातो, त्याच्या हृदयांत मर्मस्थानीं गांठ होते; त्यापासून लस व ओलसरपणा उत्पन्न होतो. त्या ओलसरपणामुळें कृमि उत्पन्न होतात. त्यामुळें तीव्र वेदना व टोचणी हे विकार होतात. हा कृमिजन्य हृद्रोग त्रिदोषापासून होतो.

उत्क्लेदः ष्ठीवनं तोदः शूलं हृल्लासकस्तमः ।
अरुचिः श्यावनेत्रत्वं शोषश्च कृमिजे भवेत् ॥ ९ ॥

ह्या कृमिजन्य हृद्रोगामध्यें ओकारी, मळमळणें, हृदयांत टोचणें, दुखणें, हृदयांत अस्वस्थपणा, डोळ्यापुढें अंधेरी येणें, अरुचि, डोळ्याला काळसरपणा, आणि तोंडाला कोरड हीं लक्षणें होतात.

उपद्रव.

क्लोमः सादो भ्रमः शोषो ज्ञेयास्तेषामुपद्रवाः ।
क्रिमिजे कृमिजातीनां श्लैष्मिकाणां च ते मताः ॥ १० ॥

फुप्फुसाला अशक्तपणा, घेरी येणें, शोष, हे हृद्रोगाचे उपद्रव आहेत, आणि कफजन्य कृमीचे जे उपद्रव कृमिनिदानांत सांगितले आहेत तेच कृमिजन्य हृद्रोगामध्यें होतात.

हृद्रोगचिकित्सा, वातज हृद्रोग.

वातोपसृष्टे हृदये वामयेत्स्निग्धमातुरम् ।
द्विपञ्चमूलीक्वाथेन सस्नेहलवणेन वा ॥ १ ॥

वातजन्य हृद्रोगी मनुष्याला प्रथम स्नेहन देऊन नंतर वांति करवावी. किंवा दशमूळाचा काढा करून त्यांत तेल किंवा तूप व मीठ घालून तो देऊन त्यानें वमन करवावें.

पिप्पल्यादि चूर्ण.

पिप्पल्येला वचा हिंगु यवक्षारोऽथ सैन्धवम् ।
सौवर्चलमथो शुण्ठी दीप्यश्चेति विचूर्णितम् ॥ १ ॥
फलधान्याम्लकौलत्थदधिमद्यासवादिभिः ।
पाययेच्छुद्धदेहस्य वातहृद्रोगशान्तये ॥ २ ॥

पिंपळी, वेलदोडे, वेखंड, हिंग, जवखार, सैंधव, पादेलोण,

सुंठ व ओवा ह्यांचें चूर्ण, लिंबाचा रस, कांजी, हुलग्याचा काढा, दहीं, मद्य, किंवा आसव ह्यांतून वमनादिकांनीं देहशुद्धि झाल्यावर हृद्रोगाचें शमन होण्याकरितां द्यावें.

पुष्करमूळादि चूर्ण.

सपुष्कराख्यं फलपूरमूलं महौषधं शठ्यभया च कल्कः।
क्षीराम्लसर्पिर्लवणैर्विमिश्रः स्याद्वातहृद्रोगहरो नराणाम् ॥१॥

पोखरमूळ, महाळुंगाचें मूळ, सुंठ, कचोरा, हिरडे ह्यांचा कल्क दूध, कांजी, तूप व मीठ ह्यांशीं मिश्र करून घ्यावा. तो वातजन्य हृद्रोगाचा नाश करतो.

पित्तहृद्रोगचिकित्सा.

श्रीपर्णीं मधुकं क्षौद्रं सितागुडजलैर्वमेत्।
पित्तोपसृष्टे हृदये सिञ्चेत मधुरैः शृतैः ॥ १ ॥
शीताः प्रदेहाः परिषेचनं च तथा विरेको हृदि पित्तदुष्टे।
द्राक्षासिताक्षौद्रपरूषकैः स्याच्छुद्धे च पित्तापहमन्नपानम् ॥१

शिवणीची साल, जेष्टमध, ह्यांचा काढा करून त्यांत मध, साखर व गूळ घालून वांति होण्याकरितां द्यावा. पित्तज हृद्रोगामध्यें हृदयावर मधुर औषधांच्या काढ्यांनीं सेचन करावें. हृदय पित्तानें दूषित झालें असतां त्याजवर थंड लेप, थंड औषधांचे काढे शिंपडणें व रेचन हे उपचार करावे. ह्या उपचारांनीं देह शुद्ध झाल्यावर द्राक्षें, खडीसाखर, मध व फालसा ह्या औषधांनीं युक्त असें अन्न व पान करावें.

द्राक्षादि चूर्ण.

हारहूराहरीतक्योस्तुल्यं शर्करया रजः।
पीतं हिमाम्बुना हन्ति पित्तहृद्रोगमञ्जसा ॥ १ ॥

काळीं द्राक्षें व हिरडेदळ ह्यांचें चूर्ण समभाग साखरेशीं थंडपाण्यांतून घ्यावें. तें पित्तज हृद्रोगाचा त्वरित नाश करितें.

अर्जुनादि चूर्ण.

अर्जुनस्य त्वचा सिद्धं क्षीरं पित्तहृदार्तिजित्।
सितया पञ्चमूल्या वा बलया मधुकेन वा ॥ १ ॥

अर्जुनसादड्याची साल टाकून सिद्ध केलेलें दूध खडीसाखर

घालून द्यावें; किंवा लघु पंचमुळें टाकून अगर चिकणामूळ व जेष्ट-मध टाकून सिद्ध केलेलें दूध द्यावें. तें पित्तजन्य हृद्रोगाला जिंकतें.

वृंदांतील कसेरुकादि तूप.

कसेरुकाशैवलशृङ्गवेरप्रपौण्डरीकं मधुकं बिसं च ।
ग्रन्थिश्च सर्पिः पयसा पचेत्तैः क्षौद्रान्वितं पित्तहृदामयघ्नम् १

कचरा, शेवाळ, सुंठ, पुडरीक वृक्षाची साल, जेष्टमध, कमळांतील केशर व वेळूच्या गांठीं ह्यांचा कल्क व दूध ह्यांमध्यें तूप पचन करावें व तें मध घालून द्यावें. तें पित्तजन्य हृद्रोगाचा नाश करितें.

कफजन्य हृद्रोगचिकित्सा.

हृद्रोगे कफजे स्विन्नं सुवान्तं लङ्घितं नरम् ।
कफघ्नैर्भेषजैर्युज्याज्ज्ञात्वा दोषबलाबलम् ॥ १ ॥

कफजन्य हृद्रोगांत प्रथम रोग्याला स्वेदन, वमन व लंघन करवून नंतर दोषाच्या बलाबलाचा विचार करून कफनाशक औषधें द्यावीं.

त्रिवृतादि चूर्ण व काढा.

त्रिवृत्सटीबलारास्नाशुण्ठीपथ्याः सपौष्कराः ।
चूर्णिता वा शृता मूत्रे पातव्याः कफहृद्गदे ॥ २ ॥

तेड, कचोरा, चिकणामूळ, रास्ना, सुंठ, हिरडेदळ, पोखरमूळ, ह्यांचें चूर्ण अगर काढा गोमूत्रामध्यें करून कफजन्य हृद्रोगांत द्यावा.

एलादि चूर्ण.

सूक्ष्मैला मागधीमूलं पटोलं सर्पिषा सह ।
नाशयेदाशु हृद्रोगं कफजं सपरिग्रहम् ॥ १ ॥

बारीक वेलची, पिंपळमूळ व कडू पडवळ ह्यांचें चूर्ण तुपाबरोबर द्यावें. तें उपद्रवसहित कफजन्य हृद्रोगाचा नाश करितें.

त्रिदोषजन्य हृद्रोगाची चिकित्सा.

त्रिदोषजे लंघनमादितः स्यादन्नं तु सर्वेषु हितं विधेयम् ।
चूर्णानि सर्पींषि च वक्ष्यमाणान्यत्र प्रयोज्यानि भिषग्भिराशु १

त्रिदोषजन्य हृद्रोगावर प्रथमतः लंघन करवावें आणि सर्व दोषांना पथ्यकारक असें अन्न पथ्याला द्यावें. पुढें सांगितलेलीं चूर्णें व तुपें ह्यांचीही योजना करावी.

क्रमिजन्य हृद्रोगचिकित्सा.

हृद्रोगे क्रमिजे कार्यं लंघनं चापतर्पणम् ।
पश्चात्क्रमिहरं कर्म क्रमिरोगोक्तमाचरेत् ॥ १ ॥

क्रिमिजन्य हृद्रोगावर लंघन व कर्षण चिकित्सा करावी. नंतर क्रिमिरोगचिकित्सेंत सांगितलेले क्रिमिनाशक उपचार करावे.

क्रमिजे च पिबेन्मूत्रं विडङ्गामयसंयुतम् ।
हृदि स्थिताः पतन्त्येव ह्यसाध्याः क्रमयो नृणाम् ॥ २ ॥

क्रिमिजन्य हृद्रोगावर वावडिंग व कोष्ट ह्यांचें चूर्ण घालून गोमूत्र प्यावें, म्हणजे हृदयांतील असाध्य असे देखील क्रिमि पडतात.

हृद्रोगाची सामान्य चिकित्सा.

पवनारिजटा द्विपलाष्टगुणे सलिले पचिता यवजेन युतम् ।
कथनं हृदयोद्भवपार्श्वतटीकटिशूलविदारणसिंहनखम् ॥ १ ॥

आठ तोळे एरंडमुळाच्या आठपट पाणी घालून काढा करून तो जवखार घालून द्यावा. तो सिंहाच्या नखाप्रमाणें हृदय, बरगड्या व कंबर ह्या ठिकाणच्या शूळाचें विदारण करतो.

दशमूळादि काढा.

दशमूलकषायस्तु लवणक्षारसंयुतः ।
पीतो निहन्ति सहसा हृदामयमसंशयम् ॥ १ ॥

दशमुळांचा काढा जवखार व सैंधव घालून द्यावा. तो हृद्रोगाचा निःसंशय नाश करितो.

पुष्करादि काढा.

क्राथः कृतः पुष्करमातुलुङ्गपलाशपूतीकशठीसुराह्वैः ।
सनागराजाजिवचायवाह्वसक्षार उष्णो लवणेन पेयः ॥ १ ॥

पोखरमूळ, महाळुंगाचें मूळ, पळसाचें मूळ, करंजाची साल, कचोरा व देवदार ह्यांचा काढा करून त्यांत सुंठ, जिरें व वेखंड ह्यांचें चूर्ण जवखार व सैंधेलोण घालून ऊन ऊन प्राशन करावा.

हिंग्वादि चूर्ण.

हिङ्गूग्रगन्धाबिडविश्वकृष्णाकुष्ठाभयाचित्रकयावशूकम् ।
पिबेत्ससौवर्चलपुष्कराढ्यं यवाम्भसा शूलहृदामयघ्नम् ॥ १ ॥

हिंग, वेखंड, बिडलोण, सुंठ, पिंपळी, कोष्ट, हिरडेदळ, चित्र-

कमूळ, जवखार, पादेलोण व पोखरमूळ ह्यांचें चूर्ण सातूच्या काढ्यांतून प्यावें. तें शूळ व हृद्रोग ह्यांचा नाश करतें.

पुष्करादि चूर्ण.

चूर्णं पुष्करमूलस्य मधुना सह लेहयेत् ।
हृल्लासश्वासकासघ्नं हृदामयहरं परम् ॥ १ ॥

पोखरमुळाचें चूर्ण मधाशीं घ्यावें. तें हृदयांतील अस्वस्थता, श्वास व खोकला ह्यांचा नाश करितें. शिवाय हें हृद्रोगाचे नाशाविषयीं फार उत्तम आहे.

ककुभादि चूर्ण.

घृतेन दुग्धेन गुडाम्भसा वा पिबेत्सचूर्णं ककुभत्वचोत्थम् ।
हृद्रोगजीर्णज्वररक्तपित्तं जित्वा भवेयुश्चिरजीविनस्ते ॥ १ ॥

तूप, दूध किंवा गूळ व पाणी ह्यांतून अर्जुनसादड्याचें चूर्ण घेतलें असतां तें हृद्रोग, जीर्णज्वर व रक्तपित्त ह्यांना जिंकतें; आणि हें चूर्ण सेवन करणारे लोक फार दिवस जगतात.

एणशृंगभस्मयोग.

शरावसंपुटे दग्ध्वा शृंगं हारिणजं पिबेत् ।
गव्येन सर्पिषा पिष्टं हृच्छूलं नश्यति ध्रुवम् ॥ १ ॥

हरणाचें शिंग शरावसंपुटांत घालून भस्म करावें. हें भस्म गाईच्या तुपांतून घेतलें असतां निश्चयानें हृदयशूळाचा नाश होतो.

वृंदांतील कटुकादि चूर्ण.

पिष्ट्वा वा कटुका पेया सयष्टीका सुखाम्बुना ।
जीर्णज्वरं रक्तपित्तं हृद्रोगं च व्यपोहति ॥ १ ॥

किंवा कुटकीचें चूर्ण व ज्येष्टमधाचें चूर्ण एकत्र करून कोमट पाण्याशीं प्यावें. तें जीर्णज्वर, रक्तपित्त व हृद्रोग ह्यांचा नाश करितें.

घृतें, वल्लभघृत.

शतार्धमभयानां तु सौवर्चलपलद्वयम् ।
पचेत्कल्कैर्घृतप्रस्थं दत्त्वा क्षीरं चतुर्गुणम् ॥
घृतं वल्लभकं नाम्ना श्रेष्ठं हृद्रोगनाशनम् ॥ १ ॥

शंभर हिरडे आणि आठ तोळे पादेलोण ह्यांचा कल्क व चौपट दूध घालून एक प्रस्थ तूप सिद्ध करावें. ह्याला वल्लभघृत म्हणतात. हें हृद्रोगाच्या नाशाविषयीं श्रेष्ठ आहे.

यष्ट्यादि घृत.

यष्टीनागबलोदीच्यार्जुनैः सर्पिः सुसाधितम् ।
हृद्रोगक्षयपित्तास्रश्वासकासज्वरार्तिजित् ॥ १ ॥

ज्येष्टमध, थोर चिकणा, वाळा व अर्जुनसादडा ह्यांचा कल्क व काढा ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें हृद्रोग, क्षय, रक्तपित्त, श्वास, खोकला व ज्वर ह्यांना जिंकतें.

वृंदांतील पुनर्नवादि तेल.

पुनर्नवादारुसपञ्चमूलरास्नायवाङ्कोलकपित्थबिल्वम् ।
पक्त्वा जले तेन पचेच्च तैलमभ्यंगपानेऽनिलहृद्गदघ्नम् ॥१॥

वसु, देवदार, पंचमुळें (साळवण, पिठवण, रिंगणीमूळ, डोरलीमूळ व सराट्याचें मूळ) रास्ना, सातू, अकोलाचें मूळ, कवठ, व बेलफळ ह्यांचा काढा करून त्यांत तेल पचन करावें. तें अंगाला लावणें व पिणें अशा प्रकारानें उपयोगांत आणिलें असतां वातजन्य हृद्रोगाचा नाश करितें.

त्रिनेत्ररस.

रसगन्धाभ्रभस्मानि पार्थवृक्षत्वगम्बुना ।
एकविंशतिधा घर्मे भावितानि विधानतः ॥ १ ॥
माषमात्रमिदं चूर्णं मधुना सह लेहयेत् ।
वातजं पित्तजं श्लेष्मसंभूतं वा त्रिदोषजम् ।
कृमिजं चापि हृद्रोगं निहन्त्येव न संशयः ॥ २ ॥

पारा, गंधक व अभ्रकभस्म ह्यांचा अर्जुनसादड्याचे सालीच्या काढ्यांत एकवीस वेळ उनांत खल करावा; आणि त्यांतील एक उडदाइतकें चूर्ण मधाशीं चाटावें. म्हणजे वातजन्य, पित्तजन्य, कफजन्य, त्रिदोषजन्य किंवा क्रिमिजन्य हृद्रोगाचाही तें नाश करितें. ह्याला त्रिनेत्ररस असें म्हणतात.

हृदयार्णवरस.

सूतार्कगन्धं काथेन वराया मर्दयेद्दिनम् ।
काकमाच्या वटीं कृत्वा चणमात्रां तु भक्षयेत् ।
हृदयार्णवनामाऽयं हृद्रोगदलनो रसः ॥ १ ॥

पारा, गंधक व ताम्रभस्म ह्यांचा त्रिफळ्याच्या काढ्यांत एक

दिवस खल करावा. नंतर कांगोणीच्या (काकमाचीच्या) रसांत खल करून हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या आणि एक एक गोळी खावी. हा हृदयार्णव नांवाचा रस हृद्रोगाचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

शालिमुद्गा यवा मांसं जांगलं मरिचान्वितम् ।
पटोलं कारवेल्लं च पथ्यं प्रोक्तं हृदामये ॥ १ ॥

शाळी (साळीचे तांदूळ), मूग, सातु, मिरपूड घातलेलें जांगल मांस, पडवळ व कारलें हे जिन्नस हृद्रोगामध्यें पथ्यकारक आहेत.

तैलाम्लतक्रगुर्वन्नकषायश्रममातपम् ।
रोषं स्त्री नर्म चिन्तां वा भाष्यं हृद्रोगवांस्त्यजेत् ॥ २ ॥

तेल, आंबट पदार्थ, ताक, जड अन्न, तुरट पदार्थ, श्रम, ऊन घेणें, क्रोध, स्त्रीसेवन, कामसंबंधीं चिंतन आणि मोठ्यानें बोलणें ह्या गोष्टी हृद्रोगी मनुष्यानें वर्ज कराव्या.

उरोग्रहचिकित्सा.

अत्यभिष्यन्दिगुर्वन्नशुष्कपूत्यामिषाशनात् ।
सास्रं मांसं यकृत्प्लीह्नोः सद्यो वृद्धिं यदा गतम् ॥ १ ॥
उरोग्रहं तदा कुक्षौ कुरुतः कफमारुतौ ।
सस्तम्भं सज्वरं घोरं रूक्षं स्पर्शासहं गुरुम् ॥ २ ॥
आध्मानं कुक्षिहृत्कण्ठे वातविण्मूत्ररोधताः ।
तन्द्रारोचकशूलानि तस्य लिंगानि निर्दिशेत् ॥ ३ ॥

अतिशय अभिष्यंदी (कफकारक) व जड असें अन्न खाणें व सुकें व घाणेरडें मांस खाणें ह्या योगानें यकृत व पानथरी ह्या अवयवांतील रक्त व मांस जेव्हां एकदम वाढतें, त्या वेळीं वात व कफ हे प्रकुपित होऊन उरोग्रह उत्पन्न करतात. त्यामुळें हृदय ताठतें, भयंकर ज्वर येतो, हृदय रूक्ष होतें, त्याला स्पर्श सहन होत नाहीं व तें जड वाटतें. त्यामुळें पोट फुगणें, कुशी, हृदय व कंठ ह्यांचा रोध, अधोवायु, मळ व मूत्र यांचा अवरोध, ग्लानि, अरुचि व शूल हीं लक्षणें होतात.

उरोग्रहचिकित्सा.

अत्राऽऽशु स्वेदनं युक्त्या वमनं रक्तमोक्षणम् ।
तीक्ष्णैर्निरूहणं चैकं क्रमाल्लङ्घनमाचरेत् ॥ १ ॥

ह्या उरोग्रहावर त्वरित युक्तीनें स्वेदन, वमन व रक्तमोक्ष ह्या क्रिया कराव्या. तीक्ष्ण औषधांचा एक निरूह बस्ती द्यावा. आणि क्रमानें लंधन करवावें.

पुत्रजीवकशिग्रुत्वक्सूर्यावर्तबलोद्भवाः ।
रसा एकैकशः कोष्णा द्विशो वा रामठाश्रिताः ॥ २ ॥
सपञ्चलवणाः पेयास्त्रिवृद्गुडसुकाल्किताः ।
तन्निवृत्तौ यथालाभं मूत्रतैलसुरासवैः ॥ ३ ॥
चव्याम्लवेतसक्षाररसरामठसचित्रकान् ।
पिबेत्तैलारनालाभ्यामुरोग्रहानिवृत्तये ॥ ४ ॥

पुत्रजीव (पुत्रवंती नांवाच्या झाडाची साल), शेवग्याची साल, सूर्यफुलाचें झाड व चिकणा ह्या वनस्पतींपैकीं एकएका वनस्पतीचा अगर दोनदोन वनस्पतींचा रस, हिंग, सैंधव, संचळ, बिडलोण, मीठ, कांचलवण, नळीचें तेड व गूळ ह्यांचा कल्क घालून प्यावा. तो पचल्यावर गोमूत्र, तिळाचें तेल, मद्य किंवा आसव ह्यांपैकीं जें मिळण्यासारखें असेल त्यांत चवक, आम्लवेतस, जवखार, हिंग व चित्रकमूळ घालून तेल व कांजी ह्यांतून तें मिश्रण उरोग्रहाचें शमन होण्याकरितां द्यावें.

यो वा नरस्यात्र कृतस्य कर्मणो विधिर्विरुद्धो न भवेन्मनागपि ।
यथाबलं वीक्ष्य च शुद्धविग्रहं तथाविधं पथ्यमपि प्रयोजयेत् ॥५॥

किंवा जो कोणता एखादा उपचार केला असतां तो त्या रोग्याला थोडादेखील विरुद्ध होणार नाहीं अशा प्रकारचा उपचार शक्तिमानाप्रमाणें विचारपूर्वक करावा, आणि पथ्यही त्याचप्रमाणें योजावें.

मूत्रकृच्छ्र–(उन्हाळे) निदान.

व्यायामतीक्ष्णौषधरूक्षमद्यप्रसंगनृत्यद्रुतपृष्ठयानात् ।
अनूपमत्स्याध्यशनादजीर्णात्स्युर्मूत्रकृच्छाणि नृणामिहाष्टौ १

व्यायाम, तीक्ष्ण औषधें, रूक्ष पदार्थ व मद्य ह्यांचें सेवन, घोडा वगैरे जलद चालणाऱ्या वाहनांवर नित्य बसण्याचा प्रसंग असणें, अनूप देशांतील प्राण्याचें मांस किंवा मासे खाणें व जेवणावर पुनः

जेवणें ह्या कारणांमुळें व अजीर्णामुळें मनुष्याला आठ प्रकारचीं मूत्रकृच्छ्रें होतात.

मूत्रकृच्छ्राची संप्राप्ति.

पृथङ्मलाः स्वैः कुपिता निदानैः सर्वेऽथवा कोपमुपेत्य बस्तौ।
मूत्रस्य मार्गं परिपीडयन्ति यदा तदा मूत्रयतीह कृच्छ्रात् ॥ २ ॥

स्वकारणांनीं कुपित झालेले वातादि पृथक् दोष अथवा सर्व दोष बस्तींत शिरून मूत्रमार्ग दाबून टाकतात. त्यामुळें तो मनुष्य मोठ्या कष्टानें मुततो. म्हणून त्याला मूत्रकृच्छ्र असें म्हणतात.

वातजन्य मूत्रकृच्छ्र.

तीव्रा हि रुग्वङ्क्षणबस्तिमेढ्रे स्वल्पं मुहुर्मूत्रयतीह वातात् ॥ ३ ॥

वातज मूत्रकृच्छ्रामध्यें आडसंधी, बस्ती व शिस्न ह्यांमध्यें तीव्र वेदना होतात. आणि वरचेवर थोडें थोडें लघवीला होतें.

पित्तजन्य मूत्रकृच्छ्र.

पीतं सरक्तं सरुजं सदाहं कृच्छ्रं मुहुर्मूत्रयतीह पित्तात् ॥ ४ ॥

पित्तजन्य मूत्रकृच्छ्रांत पिवळें, लाल, वेदनायुक्त व दाहयुक्त असें मूत्र वरचेवर कष्टानें होतें.

कफजन्य मूत्रकृच्छ्र.

बस्तेः सलिंगस्य गुरुत्वशोफौ मूत्रं सपिच्छं कफमूत्रकृच्छ्रे ५

कफजन्य मूत्रकृच्छ्रांत बस्ती व लिंग ह्या ठिकाणीं जडत्व व सूज असते, आणि मूत्र बुळबुळीत होतें.

त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्र.

सर्वाणि रूपाणि च संनिपाताद्भवन्ति तत्कृच्छ्रतमं हि कृच्छ्रम् ६

त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्रांत सर्व दोषांचीं लक्षणें असतात. हें मूत्रकृच्छ्र फार कष्टप्रद असतें.

शल्यज मूत्रकृच्छ्र.

मूत्रवाहिषु शल्येन क्षतेष्वभिहतेषु च।
मूत्रकृच्छ्रं तदाघाताज्जायते भृशवेदनम्।
वातकृच्छ्रेण तुल्यानि तस्य लिंगानि निर्दिशेत् ॥ ७ ॥

मूत्रवह स्रोतसाला शल्य लागून क्षत झाल्यामुळें किंवा अभि-

घात झाल्यामुळें मूत्रकृच्छ्र उत्पन्न होतें. त्याचीं लक्षणें वातजन्य मूत्रकृच्छ्रासारखीं असतात.

मलजन्य मूत्रकृच्छ्र.

शकृतस्तु प्रतीघाताद्वायुर्विगुणतां गतः।
आध्मानं वातशूलं च मूत्रसंगं करोति च ॥ ८ ॥

मलाचा अवरोध केल्यामुळें संचित झालेल्या मळाचा दाब बसल्यामुळें बस्तींतील वायु विगुण होऊन मूत्रकृच्छ्र, आध्मान (पोट फुगणें) व वातामुळें होणाऱ्या वेदना हीं लक्षणें होतात.

मूतखड्यामुळें होणारें मूत्रकृच्छ्र.

अश्मरीषु तु तत्पूर्वं मुत्रकृच्छ्रमुदाहृतम् ॥ ९ ॥

मुतखडा होण्यापूर्वीं मूत्रकृच्छ्र होतेंच, म्हणून त्याला अश्मरीजन्य मूत्रकृच्छ्र म्हणतात.

शुक्रजन्य मूत्रकृच्छ्र.

शुक्रदोषैरुपहते मूत्रमार्गे विधारिते।
सशुक्रं मूत्रयेत्कृच्छ्राद्बस्तिमेहनशूलवान् ॥ १० ॥

वातादि दोषांनीं दूषित झालेलें शुक्र मूत्रमार्गांत शिरलें असतां कष्टानें व शुक्रमिश्र मूत्र होतें. त्यामुळें बस्ती व शिस्न ह्यांमध्यें कळा येतात.

अवांतर भेद.

अश्मरी शर्करा चैव तुल्यसंभवलक्षणे।
शर्कराया विशेषं तु शृणु कीर्तयतो मम ॥ ११ ॥
पच्यमानाऽश्मरी पित्ताच्छोष्यमाणा च वायुना।
विमुक्तकफसंधाना क्षरन्ती शर्करा मता ॥ १२ ॥
हृत्पीडा वेपथुः शूलं कुक्षौ वह्निश्च दुर्बलः।
तथा भवति मूर्छा च मूत्रकृच्छ्रं च दारुणम् ॥ १३ ॥

अश्मरी व शर्करा ह्यांची उत्पत्ति व लक्षणें सारखीं आहेत. शर्करेच विशेष लक्षण सांगतों ऐक. पित्तानें पक्व झालेली अश्मरी वायूनें शुष्क झाल्यामुळें व कफाचें बंधन नष्ट झाल्यामुळें झरूं लागते. तिला शर्करा म्हणतात. तिच्या योगानें हृदयांत दुखतें. अंग कापतें, कुशींत वेदना होतात. जठराग्नि मंद होतो, मूर्च्छा येते व भयंकर मूत्रकृच्छ्र होतें.

मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

वातज मूत्रकृच्छ्राचिकित्सा.

अभ्यञ्जनस्नेहनिरूहबस्तिस्वेदोपनाहोत्तरबस्तिसेकान् ।
स्थिरादिभिर्वातहरैश्च सिद्धान्दद्याद्रसांश्चानिलमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

वातजन्य मूत्रकृच्छ्रावर अंगास तेल लावणें, अनुवासन व निरूह बस्ती देणें, घाम काढणें, पोटीसानें शेकणें, उत्तरबस्ती देणें व औषधी कषाय अंगावर शिंपडणें वगैरे उपचार करावे. साळवण वगैरे वातनाशक औषधांनीं तयार केलेले मांसरस द्यावे.

अमृता नागरं धात्री वाजिगन्धा त्रिकण्टकम् ।
निष्क्वाथ्य प्रपिबेत्क्वाथं मूत्रकृच्छ्रे समीरजे ॥ २ ॥

गुळवेल, सुंठ, आवळकाठी, अश्वगंध व सराटे ह्यांचा काढा करून वातजन्य मूत्रकृच्छ्रावर द्यावा.

पित्तजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

सेकावगाहाः शिशिरप्रदेहाः श्रेष्ठो विधिर्बस्तिपयोविरेकाः ।

अंगावर औषधी काढा शिंपडणें, औषधी काढ्यांत बसणें, थंडगार लेप करणें, आणि बस्ती, दूध व विरेचन देणें, हा विधि पित्तजन्य मूत्रकृच्छ्रावर उत्तम आहे.

द्राक्षाविदारीक्षुरसैर्घृतं च कृच्छ्रेषु पित्तप्रभवेषु कार्याः ॥ १ ॥

द्राक्षें (मनुका), भुईकोहळा, व उंसाचा रस, ह्या औषधांनीं तयार केलेलें तूप पित्तजन्य मूत्रकृच्छ्रावर द्यावें.

तृणपंचमूळादि काढा.

कुशः काशः शरो दर्भ इक्षुश्चेति तृणोद्भवम् ।
पित्तकृच्छ्रहरं पञ्चमूलं बस्तिविशोधनम् ।
एतत्सिद्धं पयः पीतं मेढ्रगं हन्ति शोणितम् ॥ १ ॥

कुश (पांढरा दर्भ), काश (कसई गवत), शर (तिरकांडें), दर्भ (लहान पांढरा दर्भ) व उसाचें मूळ ह्यांना तृणपंचमूळ असें म्हणतात. हें पित्तजन्य मूत्रकृच्छ्राचा नाश करितें, व बस्तीचें शोधन करितें. ह्या तृणपंचमूळानें सिद्ध केलेलें दूध शिस्नावाटे पडणाऱ्या रक्ताचें स्तंभन करितें.

शतावर्यादि काढा.

शतावरीकाशकुशश्वदंष्ट्राविदारिशालीक्षुकसेरुकाणाम् ।
क्राथं सुशीतं मधुशर्कराभ्यां युक्तं पिबेत्पैत्तिकमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

शतावरी, कसई गवत, पांढरा दर्भ, सराटे, भुईकोहळा, साळीच्या मुळ्या, उसाच्या मुळ्या व कचरा ह्यांचा काढा, मध घालून पित्तजन्य मूत्रकृच्छ्रावर द्यावा.

हरीतक्यादि काढा.

हरीतकीगोक्षुरराजवृक्षपाषाणभिद्धन्वयवासकानाम् ॥
क्राथं पिबेन्माक्षिकसंप्रयुक्तं कृच्छ्रे सदाहे सरुजे विबन्धे ॥ १ ॥

हिरडेदळ, गोखरू, बाहव्याची शेंग, लकडीपाषाणभेद व धमासा, ह्यांचा काढा दाह, ठणका व मलावरोध ह्या विकारांनीं युक्त अशा मूत्रकृच्छ्रावर प्यावा.

उर्वारुबीजयोग.

उर्वारुबीजं मधुकं सदार्विं पित्ते पिबेत्तण्डुलधावनेन ।
दार्वीं तथैवाऽऽमलकीरसेन समाक्षिकां पित्तकृतेऽथ कृच्छ्रे ॥ १ ॥

वाळक्याचें बी, जेष्टमध व दारुदळद, ह्यांचें चूर्ण पित्तजन्य मूत्रकृच्छ्रावर तांदुळाच्या धुवणांतून प्यावें. त्याचप्रमाणें आवळ्याच्या रसांतून दारुहळदीचें चूर्ण मध घालून प्यावें.

वृंदांतील मंथादि योग.

मन्थं पिबेद्वा ससितं ससर्पिः शृतं पयो वाऽर्धसिताप्रयुक्तम् ।
धात्रीरसं चेक्षुरसं पिबेद्वा कृच्छ्रे सरक्ते मधुना विमिश्रम् ॥ १ ॥

मंथामध्यें[1] खडीसाखर व तूप घालून तो मंथ द्यावा. किंवा तापविलेलें दूध त्या दुधाच्या निम्म्यानें साखर घालून द्यावें. किंवा रक्तयुक्त मूत्रकृच्छ्रावर आवळ्याचा रस व उसाचा रस मिश्र करून त्यांत मध घालून प्यावा.

द्राक्षादि कल्क.

द्राक्षासितोपलाकल्कं कृच्छ्रघ्नं मस्तुना युतम् ।

---

१ साखर, द्राक्षाचा रस व उसाचा रस एकत्र करून घ्यावा. त्याला मंथ असें म्हणतात.

पिबेद्वा कामतः क्षीरमुष्णं गुडसमान्वितम् ॥ १ ॥

द्राक्षें व खडीसाखर ह्यांचा कल्क दह्यावरील पाण्यांतून द्यावा. किंवा दूध कढत करून तें गूळ घालून यथेच्छ प्यावें.

वृदांतील नारिकेलादि पेय.

नारिकेलजलं योज्यं गुडधान्यसमन्वितम् ।
सदाहं मूत्रकृच्छ्रं च रक्तपित्तं निहन्ति च ॥ १ ॥

नारळांतील पाणी धन्यांची पूड व गूळ घालून द्यावें. तें दाहयुक्त मूत्रकृच्छ्र व रक्तपित्त ह्यांचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

रक्तस्य नारिकेलस्य जलं कतकसंयुतम् ।
शर्करैलासमायुक्तं मूत्रकृच्छ्रहरं विदुः ॥ १ ॥

तांबड्या नारळांतील पाणी निवळीच्या बियाचें चूर्ण, वेलदोड्याच्या दाण्याचें चूर्ण व साखर घालून प्यावें. तें मूत्रकृच्छ्राचा नाश करितें.

शतावर्यादि चूर्ण.

शतावरीकाशकुशश्वदंष्ट्राविदारिकेक्षवामलककल्कसिद्धम् ।
सर्पिः पयो वा सितया विमिश्रं कृच्छ्रेषु पित्तप्रभवेषु योज्यम् ॥

शतावरी, कसईचें मूळ, पांढऱ्या दर्भाचें मूळ, कुश जातीच्या दर्भाचें मूळ, सराट्याचें मूळ, भुईकोहळा, ऊंस व आवळे ह्यांचा कल्क घालून तयार केलेलें तूप अथवा दूध पित्तजन्य मूत्रकृच्छ्रावर खडीसाखर घालून द्यावें.

कफजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

क्षारोष्णतीक्ष्णौषधमन्नपानं स्वेदो यवान्नं वमनं निरूहः ।
तक्रं च तिक्तोषणसिद्धतैलं बस्तिश्च शस्तः कफमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

क्षार, उष्ण व तीक्ष्ण पदार्थ, अशाच प्रकारचें अन्नपान, घाम काढणें, सातूचें अन्न, वमन, निरूहबस्ती, कडू पदार्थ, कडू व तिखट औषधांनीं सिद्ध केलेलें तेल आणि बस्ती हे उपचार मूत्रकृच्छ्रावर प्रशस्त आहेत.

मूत्रादि योग.

मूत्रेण सुरया वाऽपि कदलीस्वरसेन वा ।

कफकृच्छ्रविनाशाय सूक्ष्मां पिष्ट्वा त्रुटिं पिबेत् ॥ १ ॥

गोमूत्र, मद्य अथवा केळीचा रस ह्यांतून कफजन्य मूत्रकृच्छ्राचा नाश होण्याकरितां बारीक वेलदोड्याची पूड द्यावी.

वृंदांतील तक्रादि योग.

तक्रेण युक्तं सितवारुकस्य बीजं पिबेत्कृच्छ्रविघातहेतोः ।
पिबेत्तथा तण्डुलधावनेन प्रवालचूर्णं कफमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

कफजन्य मूत्रकृच्छ्राचा नाश होण्याकरितां कुरडूचें बीं ताकांत वाटून प्यावें. तसेंच तांदुळाच्या धुवणांतून प्रवाळाचें चूर्ण प्यावें.

त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

सर्वं त्रिदोषप्रभवे तु कृच्छ्रे यथाबलं कर्म समीक्ष्य कार्यम् ।
तत्राधिके प्राग्वमनं कफे स्यात्पित्ते विरेकः पवने तु बस्तिः ॥ १ ॥

त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्रावर शक्तिमान पाहून तिन्हींही दोषांवरची चिकित्सा करावी. त्यांत विशेषतः कफदोष अधिक असल्यास प्रथम वमन द्यावें. पित्तदोष अधिक असल्यास विरेचन द्यावें, आणि वातदोष अधिक असल्यास बस्ती द्यावा.

बृहत्यादि क्वाथ.

बृहतीधावनीपाठायष्टीमधुकलिङ्गकान् ।
पक्त्वा क्वाथं पिबेन्मर्त्यः कृच्छ्रे दोषत्रयोद्भवे ॥ १ ॥

रिंगणमूळ, डोरलीमूळ, पहाडमूळ, जेष्टमध व इंद्रजव ह्यांचा काढा करून त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्रावर द्यावा.

शतावर्यादि काढा.

शतावर्यास्तु मूलानां निष्क्वाथः ससितामधुः ।
मूत्रदोषं निहन्त्याशु वातपित्तकफोद्भवम् ॥ १ ॥

शतावरीच्या मुळयांचा काढा मध व खडीसाखर घालून घ्यावा. तो त्रिदोषजन्य मूत्रकृच्छ्राचा नाश करितो.

गुडदुग्धयोग.

गुडेन मिश्रितं दुग्धं कदुष्णं कामतः पिबेत् ।
मूत्रकृच्छ्रेषु सर्वेषु शर्करावातरोगनुत् ॥ १ ॥

किंचित् कढत दुधांत गूळ घालून तें सर्व मूत्रकृच्छ्रांवर प्यावें. तें मूत्रशर्करा व वात (उष्णवात) ह्यांचाही नाश करितें.

अभिघातजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

मूत्रकृच्छ्रेऽभिघातोत्थे वातकृच्छ्रक्रिया हिता ।
पञ्चवल्कलमृल्लेपः कवोष्णोऽत्र प्रशस्यते ॥ १ ॥

अभिघातानें झालेल्या मूत्रकृच्छ्रावर वातजन्य मूत्रकृच्छ्रावरील उपचार करावे. वड, पिंपळ, पिंपरणी, आंबा व जांभूळ ह्यांच्या झाडांच्या सालींच्या कल्काचा आणि मातीचा बेंबीच्या खालीं पोटावर कोंबटसा लेप करावा.

मंथादियोग.

मन्थं पिबेद्वा ससितं ससर्पिः शृतं पयो वाऽर्धसिताप्रयुक्तम् ।
धात्रीरसं चेक्षुरसं पिबेद्वाऽभिघातकृच्छ्रे मधुना विमिश्रम् ॥ १ ॥

मागें पित्तजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सेंत सांगितलेला मंथ खडीसाखर व तूप घालून प्यावा. किंवा तापविलेलें दूध त्याच्या निम्यानें खडीसाखर घालून द्यावें. किंवा आवळ्याचा अगर उसाचा रस मध घालून प्यावा.

शुक्रविबंधजन्य मूत्रकृच्छ्राची चिकित्सा.

कृच्छ्रे शुक्रविबन्धोत्थे शिलाजतु समाक्षिकम् ।
सक्षीरं ससितं सर्पिमद्वापि[1] प्रपिबेन्नरः ॥ १ ॥
शुक्रदोषविशुद्ध्यर्थं समदां प्रमदां श्रयेत् ।
तृणपञ्चकमूलेन सिद्धं सर्पिः पिबेदपि ॥ १ ॥

शुक्रविबंधापासून झालेल्या मूत्रकृच्छ्रावर गाईचें दूध, खडीसाखर व मध ह्यांतून किंवा गाईचें तूप ह्यांतून शिलाजित द्यावा. आणि शुक्रदोषाची शुद्धि होण्याकरितां तरुण स्त्रीशीं समागम करावा. कुश, काश, दर्भ, शर व ऊंस ह्या तृणपंचमूळानें सिद्ध केलेलें तूपही द्यावें.

लेहः शुक्रविबन्धोत्थे सशिलाजतुमाक्षिकः ।
बलाहिंगुयुतं क्षीरं सर्पिर्मिश्रं पिबेन्नरः ।
मूत्रदोषविशुद्ध्यर्थं शुक्रदोषहरं परम् ।

शुक्रविबंधजन्य मूत्रकृच्छ्रावर मधांतून शिलाजित द्यावा. चिकणामूळाचें चूर्ण व हिंग घातलेले दूधांत तूप मिसळून तें मूत्रदोषाची

---

[1] "सर्पिमद्वापि" ह्या ठिकाणीं "सर्पिर्गव्यं वा" हा लेखी प्रतींतिल पाठ शुद्ध आहे.

शुद्धि होण्याकरितां प्यावें. हें शुक्रदोषाची शुद्धि करण्याविषयीं फार उत्तम आहे.

मळविघातजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

स्वेदचूर्णक्रियाभ्यङ्गबस्तयः स्युः पुरीषजे ।
कृच्छ्रे तत्र विधिः कार्यः सर्वः शुक्रविबन्धजित् ॥ १ ॥

स्वेद (घाम काढणें), चूर्ण व अंगाला तेल लावणें हे प्रयोग मळजन्य मूत्रकृच्छ्रावर करावे आणि शुक्रविबंधजन्य मूत्रकृच्छ्रावर जे उपचार सांगितले आहेत ते सर्व येथें करावे.

गोक्षुरादि काढा.

काथो गोक्षुरबीजानां यवक्षारयुतः सदा ।
मूत्रकृच्छ्रं शकृज्जातं पीतः शीघ्रं निवारयेत् ॥ १ ॥

गोखरूच्या बियांचा काढा जवखार घालून प्यावा. तो मळजन्य मूत्रकृच्छ्राचा त्वरित नाश करितो.

अश्मरीजन्य मूत्रकृच्छ्रचिकित्सा.

अश्मरीजे मूत्रकृच्छ्रे स्वेदाद्या वातजित्क्रिया ।
पाषाणभेदक्काथस्तु कृच्छ्रमश्मरिजं जयेत् ॥ १ ॥

अश्मरीजन्य मूत्रकृच्छ्रावर स्वेदादि वातनाशक क्रिया करावी. लकडी पाषाणभेदाचा काढा अश्मरीजन्य मूत्रकृच्छ्राला जिंकतो.

एलोपकुल्यामधुकाश्मभेदकौन्तिश्वदंष्ट्रावृषकोरुबूकैः ।
शृतं पिबेदश्मजतुप्रगाढं सशर्करं साश्मरिमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

वेलदोडे, पिंपळी, ज्येष्टमध, लकडी-पाषाणभेद, रेणुकबीज, गोखरू, अडुळसा व एरंडमूळ ह्यांचा काढा शिलाजित व खडी-साखर घालून अश्मरीजन्य व मूत्रकृच्छ्रावर द्यावा.

सामान्य चिकित्सा, त्रिकंटकादि काढा.

त्रिकण्टकारग्वधदर्भकाशदुरालभापर्पटभेदपथ्याः ।
निघ्नन्ति पीता मधुनाऽऽश्मरीकां संप्राप्तमृत्योरपि मूत्रकृच्छ्रम् ॥

गोखरू, बाहव्याची शेंग, दर्भाचें मूळ, कसई गवताचें मूळ, धमासा, पित्तपापडा, पाषाणभेद व बाळहिरडे ह्यांचा काढा मध घालून द्यावा; तो अश्मरीचा (मूतखड्याचा) नाश करतो आणि मरणोन्मुख अशा मनुष्याच्या मूत्रकृच्छ्राचाही नाश करतो.

पाषाणभेदादि काढा.

पाषाणभेदस्त्रिवृता च पथ्या दुरालभा पुष्करगोक्षुरं च।
पलाशशृङ्गाटककर्कटीजबीजं कषायः सुनिरुद्धमूत्रे ॥ १ ॥

पाषाणभेद, तेड, बाळहिरडे, धमासा, पोखरमूळ, गोखरू, पळसाची साल, शिंगाडे व काकडीचें बी ह्यांचा काढा मूत्र अतिशय कोंडलें असतां त्याजवर द्यावा.

समूळ गोखरूचा काढा.

समूलगोक्षुरक्काथः सितामाक्षिकसंयुतः।
नाशयेन्मूत्रकृच्छ्राणि तथा चोष्णसमीरणम् ॥ १ ॥

मुळासकट गोखरूच्या झाडाचा काढा करून तो मध व खडीसाखर घालून द्यावा. तो मूत्रकृच्छ्र व उष्णवात ह्यांचा नाश करतो.

यवादि काढा.

यवोरुबूकस्तृणपञ्चमूलीपाषाणभेदैः सशतावरीभिः।
कृच्छ्रेषु गुल्मेष्वभयाविमिश्रैः कृतः कषायो गुडसंप्रयुक्तः ॥ १ ॥

सातू, एरंडमूळ, तृणपंचमुळें (दर्भ, कुश, काश, शर व ऊंस ह्यांचीं मुळें), पाषाणभेद व शतावरी ह्यांचा काढा मूत्रकृच्छ्र व गुल्म ह्यांजवर हिरड्याचें चूर्ण व गूळ घालून द्यावा.

एलादि काढा.

एलाश्मभेदकशिलाजतुपिप्पलीनां
चूर्णानि तण्डुलजलैर्लुलितानि पीत्वा।
यद्वा गुडेन सहितान्यवलेह्य धीमा-
नासन्नमृत्युरपि जीवति मूत्रकृच्छ्री ॥ १ ॥

वेलदोडे, पाषाणभेद, शिलाजित व पिंपळी ह्यांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांतून अगर गुळांतून घ्यावें; म्हणजे मूत्रकृच्छ्राचा आसन्नमृत्यु असा रोगी देखील जगतो.

क्षारांचे प्रयोग.

अङ्कोलतिलकाष्ठानां क्षारः क्षौद्रेण संयुतः।
दधिवार्यनुपानेन मूत्ररोधं नियच्छति ॥ १ ॥

अंकोलाच्या लाकडांचा क्षार व तिळाचा क्षार, मध व दह्याची निवळ ह्यांमधून घेतला असतां मूत्ररोधाचा नाश होतो.

सितातुल्यो यवक्षारः सर्वकृच्छ्रनिवारणः।
निदिग्धिकारसो वाऽपि सक्षौद्रः कृच्छ्रनाशनः ॥ २ ॥

जवखार साखरेशीं घ्यावा. किंवा रिंगणीचा रस मध घालून घ्यावा. म्हणजे सर्व मूत्रकृच्छ्राचा नाश होतो.

यवक्षारसमायुक्तं पिबेत्तक्रं च कामतः।
मूत्रकृच्छ्रविनाशाय तथैवाश्मरिनाशनम् ॥ ३ ॥

मूत्रकृच्छ्राचा नाश होण्याकरितां जवखार घालून ताक पाहिजे तितकें प्यावें. तें मूतखड्याचाही नाश करितें.

माषमेकं यवक्षारं कूष्माण्डस्वरसं पलम्।
शर्कराकर्षसंयुक्तं मूत्रकृच्छ्रनिवारणम् ॥ ४ ॥

जवखार एक मासा व कोहाळ्याचा रस चार तोळे ह्यांमध्यें तोळाभर साखर घालून तें मिश्रण घेतलें असतां मूत्रकृच्छ्राचें निवारण होतें.

दाडिमादियोग.

दाडिमाम्लयुतां हृद्यां शुण्ठीजीरकसंयुताम्।
पीत्वा सुरां सलवणां मूत्रकृच्छ्रात्प्रमुच्यते ॥ १ ॥

आंबट डाळिंबाचा रस, सुंठ, जिरें व मीठ ह्यांचें चूर्ण घालून मद्य प्यावें, म्हणजे मूत्रकृच्छ्रापासून मुक्तता होते.

वृंदांतील उर्वारुबीजकल्क.

उर्वारुबीजकल्कं च श्लक्ष्णं पिष्ट्वाऽक्षसंमितम्।
धान्याम्ललवणैः पेयं मूत्रकृच्छ्रविनाशनम् ॥ १ ॥

काकडीच्या बियांचा एक तोळा कल्क, कांजीमध्यें मीठ घालून त्यांतून घ्यावा. म्हणजे मूत्रकृच्छ्राचा नाश होतो.

त्रिफलादि कल्क.

त्रिफलायाः सुपिष्टायाः कल्कं कोलसमन्वितम्।
वारिणा लवणीकृत्य पिबेन्मूत्ररुजापहम् ॥ १ ॥

बारिक वाटलेला त्रिफळ्याचा कल्क सहा मासे घेऊन त्यांत पाणी व सैंधव घालून तो प्यावा. तो मूत्रकृच्छ्राचा नाश करतो.

एलादि कल्क.

पिबेन्मद्येन सूक्ष्मैलां धात्रीफलरसेन वा।
शितिवारकबीजं वा तक्रे श्लक्ष्णं च चूर्णितम् ॥ १ ॥

बारीक वेलदोड्याचें चूर्ण मद्यांतून किंवा आवळ्याच्या रसांतून घ्यावें, अगर कुरडूचें बी ताकांत वाटून प्यावें. म्हणजे मूत्रकृच्छ्राचें निवारण होतें.

हरिद्रादि योग.

हरिद्रागुडकर्षैकं चाऽऽरनालेन वा पिबेत् ।
वन्ध्याककर्कोटिकाकन्दं भक्षेत्क्षौद्रसितायुतम् ।
अश्मरीं हन्ति नो चित्रं रहस्यं हि शिवोदितम् ॥ १ ॥

हळद व गूळ एक तोळा कांजींतून प्यावा. किंवा वांझ कर्टोलीचा कांदा मध व साखरेशीं घ्यावा. तो अश्मरीचाही नाश करतो यांत आश्चर्य नाहीं. कारण हें गुप्त औषध शिवानें सांगितलें आहे.

योगसारांतील एलादि योग.

एलागोक्षुरयोश्चूर्णं शिशोर्देयं मधुप्लुतम् ।
मूत्रकृच्छ्रापहः क्वाथः पेयस्तन्मूलवारिणा ॥ १ ॥
गोक्षुरजस्तथा क्वाथो यवक्षारयुतः शुभः ।
सर्वकृच्छ्रविनाशाय शिलाजतुयुतोऽथ वा ॥ २ ॥

वेलदोड्याचे दाणे व गोखरू ह्यांचें चूर्ण लहान मुलाला मधाशीं द्यावें. किंवा गोखरूच्या मुळ्यांचा काढा द्यावा. तो मूत्रकृच्छ्रनाशक आहे. सर्व मूत्रकृच्छ्रांचा नाश होण्याकरितां गोखरूचा काढा जवखार किंवा शिलाजित घालून घ्यावा.

खर्जूरादि चूर्ण.

खर्जूरामलबीजानि पिप्पली च शिलाजतु ।
एलामधुकपाषाणं चन्दनोर्वारुबीजकम् ॥ १ ॥
धान्यकं शर्करायुक्तं पातव्यं ज्येष्ठवारिणा ।
अङ्गदाहं लिंगदाहं गुदवंक्षणशुक्रजम् ।
शर्कराश्मरिशूलघ्नं बल्यं वृष्यकरं परम् ॥ २ ॥

खजूर, आवळकाठींतील बी, पिंपळी, शिलाजित, वेलचीदाणे, जेष्ठमध, पांढरा चंदन, काकडीचें बी, धने व साखर ह्यांचें चूर्ण जेष्ठमधाच्या काढ्यांतून द्यावें. म्हणजे अंगदाह, लिंगदाह, गुद, आडसंधी व शुक्रसंबंधीं दाह, मूत्रशर्करा, मुतखडा व ठणका ह्यांचा नाश करितें. हें शक्तिवर्धक व कामोद्दीपक आहे.

इक्षुरसादि योग.

भृष्टेक्षुस्वरसं ग्राह्यमाखुविड्विहितं पिबेत् ।
नाशयेन्मूत्रकृच्छ्राणि सद्य एव न संशयः ॥ १ ॥

ऊंस निखाऱ्यावर भाजून त्याचा रस काढावा. आणि त्यांत उंदराची विष्टा घालून प्यावा. म्हणजे तो तत्काळ मूत्रकृच्छ्राचा नाश करितो.

कुटजयोग.

पिष्ट्वा गोपयसा श्लक्ष्णं कुटजस्य त्वचं पिबेत् ।
तेनोपशाम्यते क्षिप्रं मूत्रकृच्छ्रं सुदारुणम् ॥ १ ॥

कुडयाची साल गाईच्या दुधांत वाटून प्यावी. म्हणजे भयंकर मूत्रकृच्छ्राचा त्वरित नाश होतो.

त्रिकंटकादिघृत.

त्रिकण्टकैरण्डकुशाद्यभरुिककर्कारुकेक्षुस्वरसेन सिद्धम् ।
सर्पिर्गुडार्धांशयुतं प्रपेयं कृच्छ्रश्मरीमूत्रविघातहारि ॥ १ ॥

गोखरू, पांढरा दर्भ, शतावरी, काकडीचें बी व उंसाचा रस ह्यांमध्यें सिद्ध केलेलें तूप, त्याच्या अर्ध्या हिश्शानें गूळ घालून घ्यावें. तें मूत्रकृच्छ्र, मुतखडा, व मूत्राघात यांचा नाश करतें.

शतावरीघृत.

घृतप्रस्थं शतावर्या रसस्यार्धाढकं पचेत् ।
अजाक्षीरेण संयुक्तं चतुष्प्रस्थान्वितेन तु ॥ १ ॥
द्विगोक्षुरामृतानन्ताकाशकण्टकिनीरसान् ।
कुडवार्धं पृथग्दत्वा पिष्टैर्यष्टिकटुत्रयम् ॥ २ ॥
श्वदंष्ट्राफलिनीदुग्धाशिलाजत्वश्मभेदकैः ।

तूप चौसष्ट तोळे, शतावरीचा रस एकशेंअठ्ठावीस तोळे, शेळीचें दूध दोनशेंछप्पन्न तोळे; गोखरू, सराटे (बारीक गोखरू) गुळवेल, धमासा, पांढरा दर्भ व रिंगणी ह्या प्रत्येकाचा रस आठआठ तोळे; आणि जेष्ठमध, सुंठ, मिरें, पिंपळी, गोखरू, त्रायमाण (अभावीं मेंदी), दुधी, शिलाजित, पाषाणभेद, दालचिनी, वेलदोडे व तमालपत्र, ह्या औषधांचा कल्क प्रत्येकीं दोन दोन तोळे घेऊन सर्व एकत्र करून तूप पचन करावें. नंतर त्यांत साखर आठ तोळे व तुपाच्या

चवथाई मध घालून ठेवावें. हें शतावरी घृत सर्व मूत्रकृच्छ्र, मुत-खडा, मूत्रशर्करा व सर्व प्रकारचे मूत्रसंबंधी दोष ह्यांचा नाश करितें.

गोक्षुरादि गुग्गुळ.

त्रिसुगन्धान्वितैरर्धपलांशैः सघृतं पुनः ॥ ३ ॥
शर्कराद्विपलोपेतं क्षौद्रपादसमान्वितम् ।
हन्ति कृच्छ्राणि सर्वाणि मूत्रदोषाश्मशर्कराः ॥
सर्वकृच्छ्राणि हन्त्याशु एतच्छतावरीघृतम् ॥ ४ ॥

त्रिकण्टकानां कथितेऽष्टनिघ्ने पुरं पचेत्पाकविधानयुक्त्या ।
फलात्रिकव्योषपयोधराणां चूर्णं पुरेण प्रमितं प्रदद्यात् ॥ १ ॥
वटी प्रमेहं प्रदरं च मूत्राघातं च कृच्छ्रं च तथाऽश्मरीं च ।
शुक्रस्य दोषान्सकलांश्च वातान्निहन्ति मेघानिव वायुवेगः ॥ २ ॥

गोखरूचा अष्टमांश काढा करून त्यांत गुग्गुळ विधियुक्त पक्व करावा. नंतर सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व नागरमोथे ह्यांचें चूर्ण गुग्गुळाच्या समान घालून गोळ्या कराव्या. ही वटिका प्रमेह, प्रदर, मूत्राघात, मुत्रकृच्छ्र, मुतखडा, शुक्रदोष व सर्व प्रकारचे वातविकार ह्यांचा, वायु जसा मेघांचा नाश करतो, त्याप्रमाणें नाश करिते.

सेक व लेप.

पिष्ट्वा श्वदंष्ट्राफलमूलिकाबिडैर्वारुबीजानि सकाञ्जिकानि ।
आलिप्यमानानि समानि बस्तौ मूत्रस्य निष्यन्दकराणि सद्यः ॥१

फळामुळासह गोखरूचीं झाडें, बिडलोण व काकडीचें बीं हे जिन्नस समभाग घेऊन कांजींत वाटून त्यांचा ओटीपोटावर लेप करावा. म्हणजे तात्काळ लघवी होते.

बस्तावेरण्डतैलेन स्निग्धत्वे किंशुकोद्भवैः ।
स्विन्नपुष्पैः स्वेदसेकं मूत्रकृच्छ्रोपशान्तये ॥ २ ॥

मूत्रकृच्छ्रावर बेंबीखालील पोटावर एरंडेल तेल चोळून पळसाची फुलें पाण्यांत उकडून तें पाणी पोटावर शिंपावें व त्या फुलांनीं शेकावें.

कोष्णाखुविट्कल्कलेपो बस्तेरुपरि कृच्छ्रिणः ।
त्रपुसीबीजलेपो वा धारा वा किंशुकाम्भसः ॥ ३ ॥
ध्वजच्छिद्रे चेन्दुदानं दानं वा चटकाविशः ।
मेघनादशिफालेपः स्वेदो वा कर्कटाम्भसा ॥ ४ ॥

पातो वा कोष्णतैलस्य धारा वा कोष्णवारिणः ।
नवैते पादिका योगा मूत्रकृच्छ्रहरा मताः ॥ ५ ॥

मूत्रकृच्छ्र झालेल्या मनुष्याच्या पोटावर उंदराच्या लेंड्या ऊन पाण्यांत वाटून त्यांचा लेप करावा. अगर पळसाच्या फुलाच्या काढ्याची ऊन ऊन धार धरावी. मूत्रमार्गाच्या छिद्रांत कापूर अगर चिमण्यांची विष्ठा ठेवावी. तांदुळज्याच्या मुळ्या वाटून त्यांचा पोटावर लेप करावा. किंवा गोखरूच्या काढ्यानें पोटावर स्वेद द्यावा. तेल कोमट करून पोटावर ओतावें, अगर ऊन पाण्याची धार ओटीपोटावर धरावी. हे श्लोकचरणानें सांगितलेले नऊ योग मूत्रकृच्छ्रनाशक आहेत.

चंद्रकला रस.

प्रत्येकं कर्षमात्रं स्यात्सूतं ताम्रं तथाऽभ्रकम् ।
द्विगुणं गन्धकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥ १ ॥
मुस्तादाडिमदूर्वोत्थैः केतकीस्तनजद्रवैः ।
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटस्य च वारिणा ॥ २ ॥
रामशीतलिकातोयैः शतावर्या रसेन च ।
भावयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ॥ ३ ॥
तिक्तागुडूचिकासत्वं पर्पटोशीरमाधवी ।
श्रीगन्धं सारिवा चैषां समानं सूक्ष्मचूर्णितम् ॥ ४ ॥
द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ।
ततः पोताश्रयं कृत्वा वट्यः कार्याश्चणोपमाः ॥ ५ ॥
अयं चन्द्रकलानाम्ना रसेन्द्रः परिकीर्तितः ।
सर्वपित्तगदध्वंसी वातपित्तगदापहः ॥ ६ ॥
अन्तर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ।
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ॥ ७ ॥
कुरुते नाग्निमान्द्यं च महातापं ज्वरं हरेत् ।
भ्रममूर्छाहरश्चाऽऽशु स्त्रीणां रक्तं महास्रवम् ॥ ८ ॥
ऊर्ध्वाधो रक्तपित्तं च रक्तवान्ति विशेषतः ।
मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि नाशयेन्नात्र संशयः ॥ ९ ॥

पारा, ताम्रभस्म, व अभ्रकभस्म प्रत्येकीं एक एक तोळा आणि गंधक दोन तोळे घेऊन कज्जली करावी. नंतर नागरमोथे, डाळिंब, दूर्वा, केवड्याच्या पारंब्या, सहदेवी, कुमारी (कोवारफोड), पित्त-

पापडा, रामशीतालिका (मुंगुसवेल) व शतावरी ह्या प्रत्येक वनस्पतीच्या रसांत एक एक भावना द्यावी. आणि कुटकी, गुळवेलीचें सत्व, पित्तपापडा, वाळा, मालतीची फुलें, चंदन व उपलसरी, ह्यांचें चूर्ण करून त्याला द्राक्षांच्या काढ्याच्या सात भावना द्याव्या आणि मग तें चूर्ण त्यांत मिसळून हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्याला चंद्रकलारस असें म्हणतात. हा सर्व पित्तविकार व वातपित्तजन्य रोग ह्यांचा नाश करतो. अंतर्बाह्य होणाऱ्या महान दाहाचा नाश करणारा हा मोठा मेघच आहे. हा चंद्रकला रस विशेषतः ग्रीष्मऋतूंत व शरदृतूंत घेण्यास प्रशस्त आहे. हा अग्निमांद्य करित नाहीं. आणि मोठा दाह व ज्वर ह्यांना जिंकतो. श्रम, मूर्च्छा व स्त्रियांचा मोठा रक्तस्राव यांचा नाश करतो. ऊर्ध्वगामी व अधोगामी रक्तपित्त, रक्ताची ओकारी व विशेषतः सर्व मूत्रकृच्छ्रें ह्यांचा नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

रसरत्नप्रदीपांतील लघुलोकेश्वर रस.

रसभस्म च भागैकं चत्वारः शुद्धगन्धकम् ।
पिष्ट्वा वराटकान्पूर्याद्रसपादं च टङ्कणम् ॥ १ ॥
क्षीरेण पिष्ट्वा रुद्ध्वाऽऽस्यं भाण्डे रुद्ध्वा पुटे पचेत् ।
स्वांगशीतं विचूर्ण्याथ लघुलोकेश्वरो रसः ॥ २ ॥
चतुर्गुञ्जो घृतैर्देयो मरीचैकोनविंशतिः ।
जातिमूलपलं चैकमजाक्षीरेण पाचयेत् ॥
शर्कराभावितं चानु पीतं कृच्छ्रहरं परम् ॥ ३ ॥

पारदभस्म एक भाग व शुद्ध गंधक चार भाग ह्यांची कज्जली करून कवड्यांत भरावी आणि पारदभस्माच्या चतुर्थांश टाकणखार घेऊन दुधांत खलून त्यानें कवड्यांचीं तोंडें लिंपावीं. नंतर त्या कवड्या शरावसंपुटांत घालून संधिलेप करून गजपुटामध्यें आंच द्यावी. स्वांगशीत झाल्यावर काढून चूर्ण करावें. ह्याला लघुलोकेश्वर रस म्हणतात. हा एकोणीस मिऱ्यांचें चूर्ण व तूप ह्यांतून चार गुंजापर्यंत द्यावा. आणि त्याजवर जाईच्या मुळ्या चार तोळे घेऊन त्यांचा दुधांत काढा करून त्यांत साखर घालून प्यावा. हा योग उत्तम कृच्छ्रनाशक आहे.

वैक्रांतगर्भरस.

सूतं स्वर्णं च वैक्रान्तं मृतं तुल्यं च मर्दयेत् ।
चाण्डालीराक्षसीद्रावैर्द्वियामान्ते च गोलकम् ॥ १ ॥
शुष्कं रुद्ध्वा पुटे पाच्यं करीषाग्नौ महापुटे ।
माषैकं मधुना लेह्यं मूत्रकृच्छ्रप्रशान्तये ॥ २ ॥
वैक्रान्तगर्भनामाऽयं सर्वकृच्छ्रामयाञ्जयेत् ।
अपामार्गस्य मूलं तु तक्रे पिष्ट्वाऽनुपाययेत् ॥ ३ ॥

पारदभस्म, सुवर्णभस्म व वैक्रांतभस्म, हीं भस्में समभाग घेऊन शिवलिंगी व मोरमांसी (एकांगी मुरा) ह्यांच्या रसांत दोन प्रहर खल करून गोळा करावा. आणि शरावसंपुटांत घालून शेणकुटानें गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून हा मूत्रकृच्छ्राचें शमन होण्याकारितां उडदाइतका मधाशीं चाटावा. हा वैक्रांतगर्भ नांवाचा रस सर्व मूत्रकृच्छ्रांस जिंकतो. ह्याजवर आघाड्याचें मूळ ताकांत वाटून प्यावयास द्यावें.

लोहभस्मयोग.

अयोभस्म श्लक्ष्णपिष्टं मधुना सह योजितम् ।
मूत्रकृच्छ्रं निहन्त्याशु त्रिभिर्लेहैर्न संशयः ॥ १ ॥

लोहभस्म मधांतून तीन वेळ चाटलें असतां तत्काळ मूत्रकृच्छ्र शमतें ह्यांत संशय नाहीं.

रसादियोग.

रसवल्लं यवक्षारं सितातक्रयुतं पिबेत् ।
मूत्रकृच्छ्राण्यशेषाणि हन्यन्ते पानतो जवात् ॥ १ ॥

एक वाल रससिंदूर व जवखार ताक व साखर ह्यांतून द्यावा. हा प्राशन करितांच सर्व मूत्रकृच्छ्रें नाश पावतात.

पथ्यापथ्य.

पुरातना लोहितशालयश्च धन्वामिषं मुद्गरसः सिता च ।
तक्रं पयो गोश्च दधि प्रभूतं पुराणकूष्माण्डफलं पटोलम् ॥१ ॥
उर्वारुखर्जूरकनारिकेलं तण्डुलियं चाऽऽमलकं च सर्पिः ।
प्रतीरनीरं हिमवालुका च मित्रं नृणां स्यात्सति मूत्रकृच्छ्रे ॥ २

जुनी तामसाळ, जांगल प्राण्यांचें मांस, मुगाचें कढण, खडीसाखर, गाईचें पुष्कळसें दहीं, ताक, दूध, जुना कोहाळा, पडवळ,

काकडी, खजूर, नारळ, तांदुळजा, आवळे, तूप, वाहतें पाणी, थंड वाळवंट हें मूत्रकृच्छ्रावर पथ्यकारक आहे.

मद्यं श्रमं निधुवनंगजवाजियानं
सर्वं विरुद्धमशनं विषमाशनं च ।
ताम्बूलमत्स्यलवणार्द्रकतैलभृष्टं
पिण्याकहिंगुतिलसर्षपमूत्रवेगान् ॥
माषान्करीरमतितीक्ष्णविदाहिरूक्ष
मम्लं प्रमुञ्चतु जनः सति मूत्रकृच्छ्रे ॥ ३ ॥

मद्य, श्रम, मैथुन; हत्ती, घोडा ह्यांजवर बसणें, विरुद्ध भोजन, विषम भोजन, विडा, मासे, मीठ, आलें, तेलांत तळलेले पदार्थ, तिळकूट, हिंग, तीळ, मोहऱ्या, मूत्रवेग धारण करणें, उडीद, नेपती, अति तीक्ष्ण पदार्थ, विदाही पदार्थ व रूक्ष पदार्थ, आंबट पदार्थ हे मूत्रकृच्छ्ररोग्याला अपथ्यकारक आहेत.

मूत्राघातनिदान.

जायन्ते कुपितैर्दोषैर्मूत्राघातास्त्रयोदश ।
प्रायो मूत्रविघाताद्यैर्वातकुण्डलिकादयः ॥ १ ॥

प्रायः मूत्रादि वेगांचा अवरोध केल्यानें प्रकुपित झालेल्या वातादि दोषांनीं वातकुंडलिकादि तेरा प्रकारचे मूत्राघात होतात.

वातकुंडलिका.

रौक्ष्याद्वेगविघाताद्वा वायुर्बस्तौ सवेदनः ।
मूत्रमाविश्य चरति विगुणः कुण्डलीकृतः ॥ २ ॥
मूत्रमल्पाल्पमथवा सरुजं संप्रवर्तते ।
वातकुण्डलिकां तां तु व्याधिं विद्यात्सुदारुणम् ॥ ३ ॥

रूक्षपणामुळें किंवा मलमूत्रादिकांचा अवरोध केल्यामुळें प्रकुपित झालेला वायु बस्तीमध्यें वेदना करीत मूत्राशयांत शिरतो आणि चक्राकार भ्रमण करतो. त्यामुळें ठणका होत होत थोडें थोडें लघवीला होतें. ह्या भयंकर व्याधीला वातकुंडलिका म्हणतात.

अष्ठीलालक्षण.

आध्मापयन्बस्तिगुदं रुद्ध्वा वायुश्चलोन्नताम् ।
कुर्यात्तीव्रार्तिमष्ठीलां मूत्रमार्गनिरोधिनीम् ॥ ४ ॥

प्रकुपित झालेला वायु बस्ती व गुद ह्यांना फुगवून त्यांचा रोध करून तीव्र वेदना करणारी अष्ठीला उत्पन्न करतो. ही चल म्हणजे इकडे तिकडे हलणारी असते. ही मूत्रमार्गाचा रोध करिते.

वातबस्तिलक्षण.

वेगं विधारयेद्यस्तु मूत्रस्याकुशलो नरः ।
निरुणद्धि मुखं तस्य बस्तेर्बस्तिगतोऽनिलः ॥ ५ ॥
मूत्रसङ्गो भवेत्तेन बस्तिकुक्षिरुजाकरः ।
वातबस्तिः स विज्ञेयो व्याधिः कृच्छ्रप्रसाधनः ॥ ६ ॥

जो मूर्ख मनुष्य लघवी कोंडून धरतो, त्याच्या बस्तींतील वायु बस्तीचें तोंड बंद करतो. त्यामुळें लघवी कोंडते, कुशी व बस्ती ह्यामध्यें कळा होतात. ह्या विकाराला वातबस्ती असें म्हणतात. हा कष्टसाध्य आहे.

मूत्रातीतलक्षण.

चिरं धारयतो मूत्रं त्वरया न प्रवर्तते ।
मेहमानस्य मन्दं वा मूत्रातीतः स उच्यते ॥ ७ ॥

लघवी फार वेळ कोंडून धरली असतां लघवी करतांना जलद न होतां थोडी ती थोडी होते त्या विकाराला मूत्रातीत म्हणतात.

मूत्रजठरलक्षण.

मूत्रस्य वेगेऽभिहते तदुदावर्तहेतुकः ।
अपानः कुपितो वायुरुदरं पूरयेद्भृशम् ॥ ८ ॥
नाभेरधस्तादाध्मानं जनयेत्तीव्रवेदनम् ।
तन्मूत्रजठरं विद्यादुदबस्तिनिरोधनम् ॥ ९ ॥

मूत्रवेग धारण केल्यानें मूत्रावरोधजन्य उदावर्त उत्पन्न करणारा अपान वायु प्रकुपित होऊन नाभीच्या खालील पोट फुगवितो. त्यामुळें तीव्र वेदना होतात, आणि गुद व बस्ती ह्यांचा रोध होतो. ह्या विकाराला मूत्रजठर असें म्हणतात.

मूत्रोत्संगलक्षण.

बस्तौ वाऽप्यथ वा नाले मणौ वा यस्य देहिनः ।
मूत्रं प्रवृत्तं सज्जेत सरक्तं वा प्रवाहतः ॥ १० ॥
स्रवेच्छनैः शनैरल्पं सरुजं वाऽथ नीरुजम् ।
विगुणानिलजो व्याधिः स मूत्रोत्सङ्गसंज्ञितः ॥ ११ ॥

बस्तीमध्यें, मूत्रवाहक नळीमध्यें किंवा शिश्नाच्यां तोंडाशीं लघवी अडकून राहते. आणि जोरानें कुंथलें असतां रक्तमिश्रित मूत्र हळूहळू बाहेर येतें.त्यामध्यें वेदना होतात किंवा होतही नाहींत. ह्या वातवैगुण्यामुळें होणाऱ्या विकाराला मूत्रोत्संग असें म्हणतात.

मूत्रक्षयलक्षण.

रूक्षस्य क्लान्तदेहस्य बस्तिस्थौ पित्तमारुतौ ।
मूत्रक्षयं सरुग्दाहं जनयेतां तदाह्वयम् ॥ १२ ॥

कोठा रूक्ष असून जो थकला असेल अशा मनुष्याच्या बस्तीमधील वात व पित्त हे दोष प्रकुपित होऊन दाह व वेदना यांनीं युक्त मूत्रक्षय उत्पन्न करितात. ह्या विकाराला मूत्रक्षय असें म्हणतात.

मूत्रग्रंथिलक्षण.

अन्तर्बस्तिमुखे वृत्तः स्थिरोऽल्पः सहसा भवेत् ।
अश्मरीतुल्यरुग्ग्रन्थिः मूत्रग्रन्थिः स उच्यते ॥ १३ ॥

बस्तीच्या आंतल्या तोंडाला वाटोळी, स्थिर व लहान अशी एक गांठ उत्पन्न होते. त्यामुळें मुतखड्याप्रमाणें वेदना होतात. ह्या विकाराला मूत्रग्रंथि असें म्हणतात.

मूत्रं वातकफाद्दुष्टं बस्तिद्वारेषु दारुणम् ।
ग्रन्थिं कुर्यात्स कृच्छ्रेण सृजेन्मूत्रं तदावृतम् ॥ १४ ॥

वातकफदोषामुळें दूषित झालेलें मूत्र बस्तीच्या द्वारांत मूत्राची भयंकर गांठ उत्पन्न करितें. त्या गांठीमुळें मोठ्या कष्टानें लघवी होते. ह्या विकाराला मूत्रग्रंथि असें म्हणतात.

मूत्रशुक्रलक्षण.

मूत्रितस्य स्त्रियं यातो वायुना शुक्रमुद्धतम् ।
स्थानाच्च्युतं मूत्रयतः प्राक्पश्चाद्वा प्रवर्तते ।
भस्मोदकप्रतीकाशं मूत्रशुक्रं तदुच्यते ॥ १५ ॥

मूत्रवेगाचा अवरोध करून जो मैथुनास प्रवृत्त होतो त्याचें शुक्र वाताच्या प्रकोपामुळें स्थानापासून फेकलें जातें. त्यामुळें तें लघवीपूर्वीं किंवा नंतर बाहेर पडतें. त्याचा रंग पाण्यांत कालविलेल्या राखेसारखा होतो. त्या विकाराला मूत्रशुक्र असें म्हणतात.

उष्णवातलक्षण.

व्यायामाध्वातपैः पित्तं बस्तिं प्राप्यानिलावृतम् ।
बस्तिं मेढ्रं गुदं चैव प्रदहेत्स्रावयेदधः ॥ १६
मूत्रं हारिद्रमथवा सरक्तं रक्तमेव वा ।
कृच्छ्रात्पुनः पुनर्जन्तोरुष्णवातं वदन्ति तम् ॥ १७ ॥

अतिशय व्यायाम, मार्गक्रमण व ऊन घेणें ह्यामुळें पित्त बस्तींत शिरून वायुसहवर्तमान बस्ती, शिस्न व गुद ह्यांचा दाह करून अधो-भागीं स्राव करतें. त्यामुळें हळदीप्रमाणें, रक्तमिश्र, अथवा केवळ रक्तासारखें मूत्र मोठ्या कष्टानें वरचेवर होतें. त्याला उष्णवात असें म्हणतात.

मूत्रसादलक्षण.

पित्तं कफो द्वावपि वा संहन्येतेऽनिलेन चेत् ।
कृच्छ्रान्मूत्रं तदा रक्तं पीतं श्वेतं घनं सृजेत् ॥ १८ ॥
सदाहं रोचनाशङ्खचूर्णवर्णं भवेच्च तत् ।
शुष्कं समस्तवर्णं वा मूत्रसादं वदन्ति तम् ॥ १९ ॥

बस्तिगत असलेलें पित्त किंवा कफ अगर दोन्हीही दोष वायूनें शुष्क होऊन घट्ट झालें असतां मोठ्या कष्टानें दाहयुक्त, पिंवळें, तांबडें, पांढरें व दाट असें लघवीला होतें. तें जमीनीवर असतां गोरोचन किंवा शंख ह्यांच्या चूर्णासारखें दिसतें किंवा सर्व रंगांनीं मिश्र असें दिसतें. ह्या विकाराला मूत्रसाद असें म्हणतात.

विड्विघातलक्षण.

रूक्षदुर्बलयोर्वातादुदावृत्तं शकृद्यदि ।
मूत्रस्रोतोऽनुपद्येत विड्विसृष्टं तदा नरः ।
विड्गन्धं मूत्रयेत्कृच्छ्राद्विड्विघातं तमादिशेत् ॥ २० ॥

ज्याचा कोठा रूक्ष आहे, व जो दुर्बळ आहे, अशा मनुष्याचा मळ वातानें कोंडला जाऊन मलजन्य उदावर्त करितो. त्या वेळीं तो मळ मूत्रमार्गांत शिरतो. त्यामुळें मलमिश्र किंवा मलदुर्गंधीनें युक्त असें मूत्र होतें. ह्या विकाराला विड्विघात असें म्हणतात.

बस्तिकुंडललक्षण.

द्रुताध्वलङ्घनायासैरभिघातात्प्रपीडनात् ।
स्वस्थानाद्बस्तिरुद्वृत्तः स्थूलस्तिष्ठति गर्भवत् ॥ २१ ॥

शूलस्पन्दनदाहार्तो बिन्दुं बिन्दुं स्रवत्यपि ।
पीडितस्तु सृजेद् धारां संस्तम्भोद्वेष्टनार्तिमान् ॥ २३ ॥
बस्तिकुण्डलमाहुस्तं घोरं शस्त्रविषोपमम् ।

फार जलद मार्ग क्रमण केल्यानें, लंघनानें, श्रम केल्यानें, बस्तीवर आघात झाल्यानें, किंवा बस्ती दाबला गेल्यानें तो स्थानापासून वर उचलून गर्भाप्रमाणें मोठा दिसूं लागतो; आणि शूळ, हलणें व दाह ह्या विकारानें युक्त असतो. त्यामुळें थेंब थेंब लघवीला होतें. तो दाबला असतां लघवीची धार येते. बस्ती ताठल्याप्रमाणें होऊन वेटाळल्याप्रमाणें किंवा गोळा उठल्याप्रमाणें पीडा होते. अशा ह्या भयंकर शस्त्राप्रमाणें किंवा विषाप्रमाणें प्राणनाश करणाऱ्या व्याधीला बस्तिकुंडल असें म्हणतात.

पवनप्रबलं प्रायो दुर्निवारमबुद्धिभिः ॥ २३ ॥
तस्मिन्पित्तावृते दाहः शूलं मूत्रविवर्णता ।
श्लेष्मणा गौरवं शोफः स्निग्धं मूत्रं घनं सितम् ॥ २४ ॥

प्रायः वातदोषाच्या प्राबल्यानें होणारा हा बस्तिकुंडलरोग अप्रबुद्ध चिकित्सकाला दुर्निवार आहे. हा पित्तप्रकोपानें झाला असल्यास त्यामध्यें दाह, शूळ व मूत्राचा रंग बदलणें हे विकार होतात. आणि कफप्रकोपानें जडत्व, सूज, व मूत्र स्निग्ध, दाट व पांढरें होणें हीं लक्षणें होतात.

श्लेष्मरुद्धबिलो बस्तिः पित्तोदीर्णो न सिध्यति ।
अविभ्रान्तबिलः साध्यो न च यः कुण्डलीकृतः ।

कफानें बस्तीचें मुख रुद्ध झालेला किंवा पित्ताधिक असा बस्तिकुंडल रोग साध्य होत नाहीं. तेंच बस्तीचें तोंड मोकळें असून बस्ती जर वांकडा (कुंडलाकृति) झाला नसेल तर हा बस्तिकुंडलरोग साध्य होतो.

स्याद्वस्तौ कुण्डलीभूते तृण्मोहः श्वास एव च ॥ २५ ॥

बस्ती कुंडलीभूत (मुरडून वांकडा होणें) झाला असतां तहान, मोह व श्वास हे विकार होतात.

मूत्राघातचिकित्सा.

स्नेहस्वेदोपपन्नस्य हितं स्नेहविरेचनम् ।

दद्यादुत्तरबस्तिं च मूत्राघाते सवेदने ॥ १ ॥

स्नेहन व स्वेदन केलेल्या मूत्राघाताच्या रोग्याला स्निग्ध रेचक देणें हितावह आहे. आणि मूत्राघात विकार वेदनायुक्त असल्यास उत्तरबस्ती द्यावा.

नलादि काढा.

नलकुशकाशेक्षुशिफाक्वथितं प्रातः सुशीतलं ससितम् ।
पिबतः प्रयाति नियतं मूत्राघातः सवेदनः पुंसः ॥ १ ॥

देवनळ, कुश व काश जातींचे दर्भ आणि ऊस ह्यांच्या मुळांचा काढा करून तो थंड झाल्यावर त्यांत खडीसाखर घालून सकाळीं घ्यावा म्हणजे निश्चयानें वेदनायुक्त मूत्राघाताचें शमन होतें.

गोधावन्यादि काढा.

गोधावन्यामूलक्वथितं घृततैलगोरसोन्मिश्रम् ।
पीतं विरुद्धमचिराद्भिनत्ति मूत्रस्य संघातम् ॥ १ ॥

लकडच्या पाषाणभेदाच्या मुळांचा काढा करून तो दूध व तूप व तेल घालून घ्यावा. तो मूत्राघाताचें त्वरित भेदन करितो.

शार्ङ्गधरांतील वीरतर्वादि काढा.

वीरतरुर्वृक्षवृन्दा वासा सहचरद्वयम् ।
कुशद्वयं नलो गुन्द्रा बकपुष्पोऽग्निमन्थकः ॥ १ ॥
मूर्वा पाषाणभेदश्च स्योनाको गोक्षुरस्तथा ।
अपामार्गश्च कमलं ब्राह्मी चेति गणो वरः ॥ २ ॥
वीरतर्वादिरित्येष शर्कराश्मरिकृच्छ्रहा ।
मूत्राघातं वातरोगान्नाशयेदखिलानपि ॥ ३ ॥
पिबेच्छिलाजतु क्वाथे गणे वीरतरादिके ।
रसं दुरालभाया वा कषायं वासकस्य च ॥ ४ ॥

अर्जुनसादडा, बांडगुळ, अडुळसा, पिवळी व पांढरी कोरांटी लहान व मोठा दर्भ, देवनळ, नागरमोथा, बकुळीचीं फुलें टाकळीचें मूळ, मोरवेल, पाषाणभेद, टेटूमूळ, गोखरूचें मूळ, आघाड्याचें मूळ, कमळ व ब्राह्मी ह्याला वीरतर्वादि गण म्हणतात. ह्याचा काढा करून द्यावा. तो मूत्रशर्करा, मुतखडा, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात व सर्व वातरोग ह्यांचा नाश करतो. ह्या वीरतर्वादि काढ्यांतून

शिलाजित घ्यावा. धमाशाचा रस अथवा अडुळशाचा काढा द्यावा. (तोही मूत्राघाताचा नाश करतो).

दशमूलादि क्वाथ.

दशमूलीशृतं पीत्वा सशिलाजतुशर्करम् ।
वातकुण्डलिकाष्ठीलावातबस्तौ प्रमुच्यते ॥ १ ॥

दशमुळांचा काढा शिलाजित व साखर घालून घेतला असतां वातकुंडलिका, अष्ठीला व वातबस्ती ह्या रोगापासून रोगी मुक्त होतो.

गोक्षुरादि काढा.

पीतो गोकण्टकक्काथः सशिलाजतुकौशिकः ।
मूत्रकृच्छ्रान्मूत्रशुक्रान्मूत्रोत्सङ्गाद्विमुच्यते ॥ १ ॥

गोखरूचा काढा गुग्गुळ व शिलाजित घालून घेतला असतां मूत्रकृच्छ्र, मूत्रशुक्र व मूत्रोत्संग ह्यांपासून रोगी मुक्त होतो.

शिलाजतुयोग.

सशर्करं च ससितं लीढं सिद्धं शिलाजतु ।
निहन्ति मूत्रजठरं मूत्रातीतं च देहिनः ॥ १ ॥

साखर व कापूर ह्यांजबरोबर शिलाजित घ्यावा. तो मूत्रजठर व मूत्रातीत ह्यांचा नाश करतो.

त्रिकंटकादि योग.

त्रिकण्टकैरण्डशतावरीभिः सिद्धं पयो वातभवे च शूले ।
गुडप्रगाढं सघृतं पयो वा रोगेषु कृच्छ्रादिषु शस्तमेतत् ॥ १ ॥

गोखरू, एरंडमूळ व शतावरी ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध वातजन्य शूलावर द्यावें. तेंच दूध गुळ किंवा तूप घालून मूत्रकृच्छ्रादि रोगावर देण्यास प्रशस्त आहे.

निदिग्धिकादि योग.

निदिग्धिकायाः स्वरसं पिबेद्वा तक्रसंयुतम् ।
जले कुंकुमकल्कं वा सक्षौद्रमुषितं निशि ॥ १ ॥
शृतशीतपयोऽन्नाशी चन्दनं तण्डुलाम्बुना ।
पिबेत्सशर्करां श्रेष्ठामुष्णवाते सशोणिते ॥ २ ॥

किंवा मूत्राघातावर रिंगणीचा स्वरस ताकाशीं घ्यावा, अगर रात्रीच्या शिळ्या पाण्यांत केशराचा कल्क करून तो मध घालून घ्यावा.

तापवून थंड केलेलें दूध व भात हें पथ्य करून तांदुळाच्या धुव-णाशीं साखर घालून चंदन घ्यावा. रक्तयुक्त उष्णवातावर साख-रेशीं कृष्णागर किंवा शतावरीचा रस प्यावा.

वरीगोक्षुरभूधात्रीमलानां स्वरसं पलम् ।
माषमेकं यवक्षारं सौरं माषद्वयं तथा ॥ १ ॥
द्विगुञ्जं टङ्कणं क्षारं सर्वमेकत्र मेलयेत् ।
पिबेत्तत्तु विनाशाय मूत्राघाते सुदारुणे ॥ २ ॥

शतावरी, गोखरू, भुईआवळी ह्यांच्या मुळयांचा रस चार तोळे, जवखार एक मासा, सोरमीठ दोन मासे टाकणखार दोन गुंजा हें सर्व एकत्र करून भयंकर मूत्राघाताचा नाश होण्याकरितां प्यावें.

स्त्रीणामतिप्रसङ्गेन शोणितं यस्य सिच्यते ।
मैथुनोपरमश्चास्य बृंहणीयो विधिर्मतः ॥
ताम्रचूडवसातैलं हितं चोत्तरबस्तिषु ॥ १ ॥

अति स्त्रीसंगामुळें ज्याच्या इंद्रियांतून रक्त पडतें आहे, त्याला मैथुन वर्ज करवून पौष्टिक औषधें द्यावीं. आणि कोंबडयाची वसा (चर्बी) व तेल ह्यांची उत्तरबस्तीमध्यें योजना करावी.

स्वगुप्तादि चूर्ण.

स्वगुप्ताफलमृद्वीकाकृष्णेक्षुरसितारजः ।
समानमर्धभागानि क्षीरक्षौद्रघृतानि च ॥ १ ॥
सर्वं सम्यग्विमद्याक्षमात्रां लीढ्वा पयः पिबेत् ।
हन्ति शुक्रक्षयोत्थांश्च दोषान्वन्ध्यासुतप्रदम् ॥ २ ॥

कवचबीज, मनुका, काळया उंसाचें मूळ व निळीचें बी ह्यांचें चूर्ण सम प्रमाणांत करून त्या चूर्णाच्या निम्यानें त्यांत दूध, तूप व मध घालून सर्वांचें मर्दन करून त्यांतील एक तोळाभर औषध चाटावें व त्याजवर दूध प्यावें. हा योग शुक्रक्षयजन्य दोषांचा नाश करतो आणि वांझ बायकांना पुत्र देतो.

क्षौद्रार्धभागघृत.

क्षौद्रार्धभागः कर्तव्यो भागः स्यात्क्षीरसर्पिषोः ।

---

१ "अन्नाशी" ह्या ठिकाणीं "मांसी" असा पाठ आहे. त्याप्रमाणें पाहतां, जटामांसी व चंदन ह्यांचा कल्क तांदुळाच्या धुवणांतून घ्यावा, असा अर्थ होतो.

शर्करायाश्च चूर्णं च द्राक्षाचूर्णं च तत्समम् ॥ १ ॥
स्वयंगुप्ताफलं चैव तथैवेक्षुरकस्य च ।
पिप्पलीनां तथा चूर्णं समभागं प्रदापयेत् ॥ २ ॥
तदेकत्र मेलयित्वा खल्वेनोन्मथ्य च क्षणम् ।
तस्य पाणितलं चूर्णं लिहेत्क्षीरं ततः पिबेत् ॥ ३ ॥
एतत्सर्पिः प्रयुञ्जानः शुद्धदेहो नरः सदा ।
शुक्रदोषाञ्जयेत्सर्वानेवापि भृशदुर्जयान् ।
जयेच्छोणितदोषांश्च वन्ध्या स्त्री गर्भमाप्नुयात् ॥ ४ ॥

मध अर्धा भाग, दूध एक भाग, तूप एक भाग, खडीसाखर व मनुका ह्यांचें चूर्ण एक एक भाग; कवचबीज, तालिमखाना व पिंपळी ह्यांचें चूर्ण एक एक भाग ह्या सर्वांचा एकत्र खल करून त्यांतील एक तोळाभर चूर्ण चाटून त्यावर दूध प्यावें. वमनविरेचनादिकांनीं देहशुद्धि करून नंतर हें घृत सेवन करावें. हें घृत जे अत्यंत दुर्जय शुक्रदोष त्या सर्वांना जिंकतें. रक्तदोषाला जिंकतें. ह्याच्या सेवनानें वांझ स्त्रियांना गर्भ राहतो.

धान्यगोक्षुरादि घृत.

धान्यगोक्षुरकक्काथकल्कसिद्धं घृतं हितम् ।
मूत्राघातेषु कृच्छ्रेषु शुक्रदोषे च दारुणे ॥ १ ॥

धने व गोखरू ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें सर्व प्रकारचे मूत्राघात, मूत्रकृच्छ्र व भयंकर शुक्रदोष ह्यांजवर हितकारक आहे.

चित्रकादि घृत.

चित्रकं सारिवा चैव बला काला च सारिवा ।
द्राक्षाविशालापिप्पल्यस्तथा च त्रिफला भवेत् ॥ १ ॥
तथैव मधुकं दद्याद्दद्यादामलकानि च ।
घृताढकं पचेदेतैः कल्कैरक्षसमन्वितैः ॥ २ ॥
क्षीरद्रोणे जलद्रोणे तत्सिद्धमवतारयेत् ।
शीतं परिस्रुतं चैव शर्कराप्रस्थसंयुतम् ॥ ३ ॥
तुगाक्षीर्या च तत्सर्वं मतिमान्परिमिश्रयेत् ।
ततो मितं पिबेत्काले यथादोषं यथाबलम् ॥ ४ ॥
मूत्रग्रन्थिं मूत्रसादमुष्णवातमसृग्दरम् ।
विड्विघातं निहन्त्येतद्बस्तिकुण्डलिमप्यलम् ॥ ५ ॥

सर्पिरेतत्प्रयुञ्जाना स्त्री गर्भं लभतेऽचिरात् ।
अस्रदोषे योनिदोषे मूत्रदोषे तथैव च ॥
प्रयोक्तव्यमिदं सर्पिश्चित्रकाद्यं सदा बुधैः ॥ ६ ॥

चित्रकमूळ, थोर उपलसरीचें मूळ (अनंतमूळ), थोर चिकणामूळ, लहान चिकणामूळ, लहान उपलसरीचें मूळ, द्राक्षें, मोरमांसी (एकांगी मुरा), पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, ज्येष्ठमध व आवळे समभाग एकएक तोळा घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत दोनशें छप्पन्न तोळे तूप, वीसशें अठ्ठेचाळीस तोळे दूध व वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाणी घालून तूप सिद्ध करावें. नंतर त्या तुपांत चौसष्ट तोळे साखर व चौसष्ट तोळे वंशलोचन घालून ठेवावें. आणि शक्तिमानाप्रमाणें योग्यकाळीं सेवन करावें. म्हणजे मूत्रग्रंथि, मूत्रसाद, उष्णवात, प्रदर, विड्विघात व बस्तिकुंडलविकार ह्यांचा नाश होतो. ह्या घृताची योजना केली असतां स्त्रियांना गर्भधारणा होते. हें चित्रकादि घृत विद्वानांनीं रक्तदोष, योनिदोष, मूत्रदोष ह्या विकारांवर नेहमीं योजावें.

सदाभद्रादि चूर्ण.

सदाभद्राश्मभिन्मूलं शतावर्याश्च चित्रकम् ।
रोहिणीकोकिलाक्षौ च क्रौञ्चस्थूलं त्रिकण्टकम् ॥
श्लक्ष्णपिष्टाः सुरापीता मूत्राघातप्रबन्धनाः ॥ १ ॥

शिवणीचें मूळ, पाषाणभेदाचें मूळ, शतावरी, चित्रकमूळ, कुटकी, काटे कोळिस्त्याचें मूळ, कमळाक्ष व मोठे सराटे, ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून तें मद्याशीं सेवन करावें. तें मूत्राघाताचें नाशक आहे.

उशीरादि चूर्ण.

उशीरं वालकं पत्रं कुष्ठं धात्री च मौसली ।
एला हरेणुकं द्राक्षा कुङ्कमं नागकेसरम् ॥ १ ॥
पद्मकेसरकन्दं च कर्पूरं चन्दनद्वयम् ।
व्योषं मधुकलाजाश्च अश्वगन्धा शतावरी ॥ २ ॥
गोक्षुरं कर्कटाख्यं च जाती कंकोलचोरकम् ।
एतानि समभागानि द्विगुणाऽमृतशर्करा ॥ ३ ॥
मत्स्यण्डिकामधुभ्यां च प्रातरेव बुभुक्षितः ।

क्षयं च रक्तपित्तं च पाददाहमसृग्दरम् ॥ ४ ॥
मूत्राघातं मूत्रकृच्छ्रं रक्तस्रावं च नाशयेत् ।
अशीतिं वातजान्रोगान्विशेषान्मेहनुत्परम् ॥ ५ ॥

काळा वाळा, वाळा, तमालपत्र, कोष्ट, आवळकाठी, पांढरी मुसळी, वेलदोडे, रेणुकबीज, द्राक्षें, केशर, नाकेशर, कमळांतील केसर, कमळकंद, कापूर, पांढरा चंदन, तांबडा चंदन, सुंठ, मिरें, पिंपळी, जेष्टमध, भाताच्या (साळीच्या) लाह्या, अश्वगंध, शतावरी, गोखरू, काकडाशिंगी, जायपत्री, कंकोळ व गठोना हीं औषधें समभाग आणि दुप्पट पिठीसाखर ह्यांचें चूर्ण खडीसाखर किंवा साखऱ्या व मध ह्यांजबरोबर सकाळीं सेवन करावें. म्हणजे तें क्षय, रक्तपित्त, पाददाह (पायाची आग), रक्तप्रदर, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र, रक्तस्राव, ह्यांचा नाश करितें. हें चूर्ण ऐंशी प्रकारचे वातरोग व विशेषतः मेह नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

अश्मरीमूत्रकृच्छ्रेषु भेषजं यत्क्रिया च या ।
मूत्राघातेषु सर्वेषु कुर्यात्तत्सर्वमादरात् ॥ १ ॥
रसश्चन्द्रकलाख्यश्च कृच्छ्रघ्नो यः पुरेरितः ।
मूत्राघातेषु सर्वेषु स प्रयोज्यो विजानता ॥ २ ॥

मूतखडा व मूत्रकृच्छ्र ह्या विकारांवर जीं औषधें व ज्या क्रिया सांगितल्या आहेत, त्या सर्व, सर्व प्रकारच्या मूत्राघातांवर योजाव्या. मागें मूत्रकृच्छ्रावर जो मूत्रकृच्छ्रनाशक असा "चंद्रकला" नांवाचा रस सांगितला आहे तोही ह्याजवर विचारपूर्वक योजावा.

पथ्यापथ्य.

पुरातना लोहितशालयश्च मांसानि धन्वप्रभवाणि मद्यम् ।
तक्रं पयो दध्यपि माषयूषः पुराणकूष्माण्डफलं पटोलम् ॥१॥
ऊर्वारुखर्जूरकनारिकेलतालद्रुमाणामपि मस्तकानि ।
यथामलं सर्वमिदं च मूत्राघातातुराणां हितमादिशन्ति ॥ २ ॥

जुनी तामसाळ, जांगल प्राण्यांचें मांस, मद्य, ताक, दूध, दहीं, उडदाचें कढण, जुना कोहळा, पडवळ, काकडी, खजूर, नारळ व ताडांचीं फळें हें मूत्राघाताच्या रोग्याला दोषानुरूप पथ्य सांगितलें आहे.

विरुद्धाशनसर्वाणि व्यायामं मार्गशीलनम् ।
रूक्षं विदाहि विष्टम्भि व्यवायं वेगधारणम् ।
करीरं वमनं चापि मूत्राघाती विवर्जयेत् ॥ ३ ॥

सर्व प्रकारचें विरुद्ध अन्न खाणें, व्यायाम, मार्ग चालणें, रूक्ष, विदाही व अवष्टंभकारक पदार्थ, मैथुन व मलमूत्रादिकाचें वेगधारण, वेळूचे कोंब व वमन ह्यांचा मूत्राघाताच्या रोग्यानें त्याग करावा.

मूतखड्याचें निदान.

वातपित्तकफैस्तिस्रश्चतुर्थी शुक्रजाऽपरा ।
प्रायः श्लेष्माश्रयाः सर्वा ह्यश्मर्यः स्युर्यमोपमाः ॥ १ ॥

वात, पित्त व कफ ह्या तीन दोषांनीं तीन प्रकारच्या व शुक्रजन्य चवथी अशा चार प्रकारच्या अश्मरी (मूतखडे) आहेत. ह्या सर्व अश्मरी कफात्मक असून यमतुल्य पीडादायक आहेत.

संप्राप्ति.

विशोषयेद्बस्तिगतं सशुक्रं मूत्रं सपित्तं पवनः कफं वा ।
यदा तदाऽश्मर्युपजायते तु क्रमेण पित्तेष्विव रोचना गोः ॥ २ ॥

ज्या वेळीं वायु बस्तीमधील शुक्रमिश्रित किंवा पित्तमिश्रित मूत्राला अगर कफाला शुष्क करतो त्या वेळीं गाईचें पित्त शुष्क झाल्यामुळें जसा गोरोचनाचा खडा बनतो त्याप्रमाणें अनुक्रमें शुक्रजन्य, पित्तजन्य किंवा कफजन्य मूतखडा बनतो.

अनेकदोषत्व.

नैकदोषाश्रयाः सर्वास्त्वथाऽऽसां पूर्वलक्षणम् ।
बस्त्याध्मानं तथाऽऽसन्नदेशेषु परितोऽतिरुक् ॥ ३ ॥
मूत्रे च बस्तगन्धत्वं मूत्रकृच्छ्रं ज्वरोऽरुचिः ॥

ह्या सर्व अश्मरी (मूतखडे) त्रिदोषात्मक असतात. त्यांचें पूर्वरूप सांगतों. मुतखडा होण्यापूर्वीं बस्तीला फुगोटी असते आणि मुतखडा ज्या ठिकाणीं असतो त्या ठिकाणीं आसपास अतिशय वेदना असतात. मूत्राला बोकडाच्या मुताप्रमाणें घाण येते. मूत्रकृच्छ्र (उन्हाळे), ज्वर व अरुचि हीं लक्षणें होतात.

त्याचें सामान्य लक्षण.

सामान्यालिङ्गं रुङ्नाभिसीवनीबस्तिमूर्धसु ।
विशीर्णधारं मूत्रं स्यात्तया मार्गे निरोधिते ॥ ४ ॥

तद्व्यपायात्सुखं मेहेदच्छं गोमेदकोपमम् ।
तत्संक्षोभात्क्षते सास्रमायासाच्चातिरुग्भवेत् ॥ ५ ॥

सर्व मूतखड्यांमध्यें सामान्यतः नाभि, शिवण, बस्ती व मस्तक ह्या ठिकाणीं वेदना असतात. मूतखड्यानें मूत्रमार्ग आडविला असतां मुताची धार तुटक येते. आणि मूतखडा बाजूला झाला असतां मूत्र सुखानें साफ व गोमेद मण्याप्रमाणें स्वच्छ होतें. मूतखडा जाग्यावरून हलल्यास बस्तीमध्यें जखम होऊन त्यांतून रक्त निघतें. त्यामुळें कष्टानें रक्तमिश्र लघवी होते व अतिशय वेदना होतात.

वातजन्य मूतखडा.

तत्र वाताद्भृशं चाऽऽर्तो दन्तान्खादति वेपते ।
मृद्गाति मेहनं नाभिं पीडयत्यनिशं क्वणन् ॥ ६ ॥
सानिलं मुञ्चति शकृन्मुहुर्मेहति बिन्दुशः ।
श्यावारुणाश्मरी चास्य स्याच्चिता कण्टकैरिव ॥ ७ ॥

वातजन्य मूतखड्यामुळें रोगी आर्त होऊन लघवीचे वेळीं दांत खातो. थरथर कांपतो. शिस्नाचें मर्दन करतो. बेंबीचे ठिकाणीं चोळतो व एकसारखा कण्हतो. त्याला वायु सरत सरत शौचास होतें. वरचेवर थेंब थेंब लघवीला होतें. मूतखड्याचा रंग काळसर तांबूस असतो व त्याजवर कांटे असतात.

पित्तजन्य मूतखड्याचें लक्षण.

पित्तेन दह्यते बस्तिः पच्यमान इवोष्मवान् ।
भल्लातकास्थिसंस्थाना रक्तपीता तथाऽऽश्मरी ॥ ८ ॥

पित्तजन्य मूतखड्यामुळें बस्तीमध्यें क्षारानें भाजल्याप्रमाणें आग होते आणि मूतखडा बिब्यांतील बीच्या आकाराचा व तांबूस पिवळा असा असतो.

कफजन्य मूतखड्याचें निदान.

बस्तिर्निस्तुद्यत इव श्लेष्मणा शीतलो गुरुः ।
अश्मरी महती श्लक्ष्णा मधुवर्णाऽथ वा सिता ॥ ९ ॥
एता भवन्ति बालानां तेषामेव च भूयसा ।
आश्रयोपचयाल्पत्वाद्ग्रहणाहरणे सुखाः ॥ १० ॥

कफजन्य अश्मरीमुळें बस्तीमध्यें टोचल्यासारखी पीडा होते. बस्ती थंड व जड वाटते. मूतखडा मोठा, गुळगुळीत, मधाच्या रंगाप्रमाणें किंवा पांढरा असतो. हा कफजन्य मूतखडा फार करून बालकांना होतो. त्यांचें शरीरही लहान व बस्तीही लहान असल्यामुळें त्यांचा मूतखडा धरण्यास व काढण्यास फारसा त्रास पडत नाहीं.

शुक्राश्मरीलक्षण.

शुक्राश्मरी तु महतां जायते शुक्रधारणात् ।
स्थानाच्च्युतममुक्तं हि मुष्कयोरन्तरेऽनिलः ।
शोषयत्युपसंगृह्य शुक्रं तच्छुक्रजाश्मरी ॥ ११ ॥

शुक्राश्मरी हा रोग थोर मनुष्याला शुक्राचा वेग आवरून धरल्यामुळें होतो. स्थानापासून सुटलेलें शुक्र बाहेर न टाकतां आवरून धरलें असतां तें वृषण व शिश्न ह्यांमध्यें येतें. त्या ठिकाणीं तें वायूकडून शुष्क होतें. त्यामुळें त्याचा खडा बनतो. त्याला शुक्राश्मरी असें म्हणतात.

त्याचें लक्षण.

बस्तिरुङ्मूत्रकृच्छ्रत्वमुष्कश्वयथुकारिणी ।
तस्यामुत्पन्नमात्रायां शुक्रमेति विलीयते ॥ १२ ॥

बस्तीमध्यें पीडा, मूत्रकृच्छ्र, वृषणाला सूज, आणि स्थानापासून वरचेवर निघणारें शुक्र त्या शुक्राश्मरीजवळ येतें आणि त्यांत मिश्र होऊन सुकतें. अशा प्रकारें ती शुक्राश्मरी वाढत जाते.

शर्करालक्षण.

पीडिते त्ववकाशेऽस्मिन्नश्मर्येव च शर्करा ।
अणुशो वायुना भिन्ना सा तस्मिन्ननुलोमगे ॥ १३ ॥
निरेति सह मूत्रेण प्रतिलोमे विबध्यते ।
मूत्रस्रोतःश्रिता सा तु सक्ता कुर्यादुपद्रवान् ॥ १४ ॥

ती शुक्राश्मरी दाबली असतां पोकळीमध्यें शिरते. ती शुक्राश्मरी (किंवा दुसरी कोणतीहि अश्मरी) वायूकडून फुटली गेली आणि वायु अनुलोम स्थितींत (म्ह० मार्गावर) असला तर तिची बारीक रेव बनून ती मूत्राबरोबर बाहेर येते आणि तोच वायु प्रतिलोम

झाला तर बद्ध होऊन राहते. ती मूत्रवाहक स्रोतसांत शिरली असतां त्या ठिकाणीं चिकटून राहून उपद्रव करिते.

उपद्रव.

दौर्बल्यं सदनं कार्श्यं कुक्षिशूलमथारुचिः ।
पाण्डुत्वमुष्णवातं च तृष्णा हृत्पीडनं वमिः ॥ १५ ॥

दुर्बळपणा, ग्लानि, कृशत्व, कुशीमध्यें शूळ, अरुचि, शरीराला पांडुरता, ऊष्णवात, तहान, हृदयांत पीडा आणि ओकारी, हे उपद्रव यांत होतात.

मूतखड्याचें असाध्य लक्षण.

प्रशूननाभिवृषणं बद्धमूत्रं रुजावहम् ।
अश्मरी क्षपयत्याशु सिकता शर्करान्विता ॥ १६ ॥

नाभि व वृषण ह्यांना सूज, लघवी बंद होणें व वेदना ह्यांनीं युक्त असा मूतखडा किंवा त्याची बनलेली शर्करा अगर सिकता रोग्याला त्वरित मारते.

अप्सु स्वच्छास्वपि तथा निषिक्तासु घटेऽथ वा ।
कालान्तरेण पङ्कः स्यादश्मरीह भवेत्तथा ॥ १७ ॥

जरी स्वच्छ पाणी घागरींत भरून ठेविलें तरीही कालांतरानें त्यामध्यें जसा गांळ सांचतो, त्याचप्रमाणें मूतखडा बनतो.

मूतखड्याची चिकित्सा.

आदौ शूलः कुक्षिदेशे कटौ स्यात्पश्चाद्रोधो जायते मूत्रमुष्णम् ।
एतैर्लिङ्गैरश्मरीरोगचिह्नं ज्ञात्वा कुर्याद्भेषजाद्यैश्चिकित्साम् ॥ १ ॥

आधीं (मूतखडा होण्यापूर्वीं) कुशीमध्यें शूळ होतो; तशीच कंबर दुखते. नंतर मूत्राचा अवरोध होऊन लघवी कढत होते. ह्या लक्षणांवरून मूतखडा होण्याचें चिन्ह आहे असें जाणून औषधादिक उपचार करावे.

वातजन्य मूतखड्याची चिकित्सा.

वाताश्मरीपूर्वरूपे स्नेहपानं प्रशस्यते ॥ १ ॥

वाताश्मरीच्या पूर्व रूपामध्यें स्नेहपान करणें प्रशस्त आहे.

शुंठ्यादि काढा.

शुण्ठ्यग्निमन्थपाषाणभिच्छिग्रुवरुणक्षुरैः ।

अभयारग्वधफलैः क्वाथं कृत्वा विचक्षणः ॥ १ ॥
रामठक्षारलवणचूर्णं दत्त्वा पिबेन्नरः ।
वाताश्मरीं हन्ति कृच्छ्रं मान्द्यमग्नेश्च तद्रुजः ।
कट्युरुगुदमेढ्रस्थं वङ्क्षणस्थं च मारुतम् ॥ २ ॥

सुंठ, टाकळीमूळ, पाषाणभेद, शेवग्याची साल, वायवर्णा, गोखरू, हिरडा, बाहव्याची शेंग ह्यांचा काढा करून हिंग, जवखार व सैंधव ह्यांचें चूर्ण घालून प्यावा. तो वातजन्य मूतखडा, मूत्रकृच्छ्र, अग्निमांद्य व त्यासंबंधीं अन्य उपद्रव ह्यांचा नाश करतो; आणि कंबर, मांड्या, गुद, शिस्न व आडसंधी ह्या ठिकाणचा वात ह्यांचाहि नाश करतो.

वायवर्णादि काढा.

वरुणस्य त्वचं श्रेष्ठां शुण्ठीगोक्षुरसंयुताम् ।
क्वाथयित्वा शृतं तस्य यवक्षारगुडान्वितम् ।
पीत्वा वाताश्मरीं हन्ति चिरकालानुबन्धिनीम् ॥ १ ॥

वायवर्णाची साल, स्थलकमळिणीचा कंद, सुंठ व सराटे ह्यांचा जवखार व गूळ घालून काढा प्यावा; म्हणजे फार दिवसांच्या वातजन्य मूतखड्याचा नाश होतो.

वीरतर्वादि काढा.

वीरतर्वादिकः क्वाथः पूर्वोक्तो वातजाश्मरीम् ।
सद्यो हन्ति यवक्षारगुडयुक्तो न संशयः ॥ १ ॥

अर्जुनसादडा, पिवळा व निळा कोरांटा, दर्भ, बांडगूळ, गुंडासिनी गवत (किंवा भद्रमोथा), देवनळ, लहान व मोठा दर्भ, पाषाणभेद, ऐरणीचें मूळ, मोरवेल, थोर बकुळ, तांबडा आघाडा, टेटूमूळ, पांढरा कोरांटा, कमळ, ब्राह्मी व गोखरू ह्या औषधांच्या समुदायाला वीरतर्वादि गण असें म्हणतात. ह्या औषधांचा काढा करून त्यांत गूळ व जवखार घालून द्यावा. तो वातजन्य अश्मरीचा तत्काळ नाश करतो.

क्षारान्यवागूं पेयांश्च कषायाणि पयांसि च ।
भोजनार्थं प्रयोज्यानि वाताश्मरिजुषां नृणाम् ॥ २ ॥

जवखारादि क्षार, कण्हेरी, पेज, तुरट पदार्थ व दूध हे पदार्थ

वातजन्य मूतखड्याच्या रोग्याला पथ्यार्थ योजावें.

पित्तजन्य मूतखड्याची चिकित्सा.

पीत्वा पाषाणभित्क्वाथं सशिलाजतुशर्करम् ।
पित्ताश्मरीं निहन्त्याशु वृक्षमिन्द्राशनिर्यथा ॥ १ ॥

वज्रप्रहारानें (वीज पडली असतां) जसा वृक्ष नाश पावतो त्याप्रमाणें लकडी पाषाणभेदाचा काढा शिलाजित व साखर घालून घेतला असतां पित्ताश्मरीचा नाश होतो.

कफाश्मरीचिकित्सा.

क्वाथो निपीतः सक्षारः शिग्रुत्वग्वरुणत्वचोः ।
कफजामश्मरीं हन्ति शक्राशनिरिव द्रुमम् ॥ १ ॥

वीज ज्याप्रमाणें वृक्षाचा नाश करिते. त्याप्रमाणें शेवग्याची साल व अर्जुनसादड्याची साल ह्यांचा काढा जवखार घालून घेतला असतां तो कफजन्य मूतखड्याचा नाश करतो.

शुक्रजन्य मूतखड्याची चिकित्सा.

शुक्राश्मर्यां तु सामान्यो विधिरश्मरिनाशनः ॥ १ ॥

शुक्रजन्य अश्मरीवर सामान्यतः अश्मरीनाशक म्हणून जो विधि सांगितला आहे तो करावा.

कोहळ्याचा रस.

यवक्षारगुडोन्मिश्रं पिबेत्पुष्पफलोद्भवम् ।
रसं मूत्रविबन्धघ्नं शुक्राश्मरिविनाशनम् ॥ १ ॥

जवखार व गूळ घालून कोहळ्याच्या फुलाचा व फळाचा रस प्यावा. तो मूत्रावरोधाचा नाश करतो व शुक्रजन्य मूतखड्याचाही नाश करतो.

शतावर्यादि रस.

शतावरीमूलरसो गव्येन पयसा समः ।
पीतो निपातयत्याशु ह्यश्मरीं चिरजामपि ॥ १ ॥

शतावरीच्या मुळ्यांचा रस समभाग गाईचें दूध घालून प्यावा. तो फार दिवसांच्या मूतखड्याचा त्वरित पात करतो.

कुटजादि योग.

पिबतः कुटजं दध्ना पथ्यमन्नं च खादतः ।

निपतत्यचिरादस्य निश्चितं मेढ्रशर्करा ॥ १ ॥

दह्याशीं कुडयाच्या सालीचा कल्क प्राशन करावा व पथ्य-भोजन करावें म्हणजे थोडयाच दिवसांत मूत्रशर्करेचा नाश होतो.

कुटजकल्क.

अपि च कुटजमूलं धेनुदध्यस्तुपिष्टं
पिचुमितमवलीढं पातयत्यश्मरीकाम् ॥ १ ॥

कुडयाच्या मुळाचें चूर्ण गायीच्या दह्याच्या निवळींतून एक तोळ्यापर्यंत सेवन करावें. तें मूतखडयाचा पात करितें.

एरंडादि कल्क.

गन्धर्वहस्तबृहतीव्याघ्रीगोक्षुरकेक्षुरात् ।
मूलकल्कं पिबेद्दध्ना मधुरेणाश्मभेदनः ॥ १ ॥

एरंडमूळ, डोरलीमूळ, रिंगणमूळ, गोखरू व काटे कोळिस्त्याचें मूळ, ह्यांचा दह्यांत कल्क करून तो खडीसाखर घालून घ्यावा. तो मूतखडयाचें भेदन करतो.

पाषाणभेदादि काढा.

पाषाणभिद्वरुणगोक्षुरकोरुबूक-
क्षुद्राद्वयक्षुरकमूलकृतः कषायः ।
दध्ना युतो जयति मूत्रविबन्धशुक्र-
मुग्राश्मरीमपि च शर्करया समेताम् ॥ १ ॥

पाषाणभेद, वायवर्णा, गोखरू, एरंडमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, व काटे कोळिस्त्याचें मूळ ह्यांचा काढा दहीं घालून घ्यावा. तो मूत्रावरोध, उग्र शुक्राश्मरी व मूत्रशर्करा ह्यांचा नाश करतो.

एलादि काढा.

एलोपकुल्यामधुकाश्मभेदकौन्तीश्वदंष्ट्रावृषकोरुबूकैः ।
शृतं पिबेदश्मजतुप्रगाढं सशर्करे साश्मरिमूत्रकृच्छ्रे ॥ १ ॥

वेलदोडे, पिंपळी, जेष्टमध, पाषाणभेद, रेणुकबीज, गोखरू, आडुळसा व एरंडमूळ ह्यांचा काढा शिलाजित घालून शर्करायुक्त व मूतखडयानें युक्त अशा मूत्रकृच्छ्रामध्यें द्यावा.

शिग्रुमूलादि काढा.

क्वाथश्च शिग्रुमूलोत्थः कदुष्णोऽश्मरिपातनः ।
क्षीरान्नभुग्बर्हिशिखामूलं वा तण्डुलाम्बुना ॥ १ ॥

दूध व भाताचें पथ्य करून शेवग्याच्या मुळांचा काढा कोमट करून घ्यावा. तो मूतखड्याला पाडतो. किंवा मयूरशिखेचें मूळ तांदुळाच्या धुवणांतून घ्यावें. तेंही मुतखड्याला पाडतें.

शिलाजितादि योग.

अश्मर्यां चाश्मरीकृच्छ्रे शिलाजतु समाक्षिकम् ।
यवक्षारं गोक्षुरं च खादेद्वा चाश्मरीहरम् ॥ १ ॥

मुतखड्याच्या विकारावर किंवा मुतखड्यापासून होणाऱ्या मूत्रकृच्छ्रावर शिलाजित मधांतून घ्यावा किंवा गोखरूचें चूर्ण व जवखार घ्यावा. तो अश्मरीनाशक आहे.

त्रपुसीबीजादि योग.

त्रपुसीबीजं पयसा पीत्वा वा नारिकेरजं कुसुमम् ।
दृढमूत्रशर्करावान्भवति सुखी कतिपयैर्दिवसैः ॥ १ ॥

तवशाचें (थोर काकडीचें) बीं दुधांतून घ्यावें किंवा नारळीच्या कोक्यांतील दाणे दुधांत वाटून घ्यावे. असें कांहीं दिवस केलें असतां मूत्रशर्करा रोग ज्याच्या अंगीं खिळला आहे तो त्यापासून मुक्त होऊन सुख पावतो.

राजमार्तंडांतील गोपाळकर्कट्यादि योग.

गोपालकर्कटीमूलं पिष्टं पर्युषिताम्भसा ।
पीयमानं त्रिरात्रेण पातयत्यश्मरीं हठात् ॥ १ ॥

शिळ्या पाण्यांत गोपाळकाकडीचें मूळ वाटून तीन दिवस घेतलें असतां निश्चयानें मुतखड्याचें पतन होतें.

शृंगवेरादि योग.

शृंगवेरयवक्षारपथ्याकालीयकान्वितम् ।
आजं दधि भिनत्त्युग्रामश्मरीमाशु पातयेत् ॥ १ ॥

सुंठ, जवखार, हिरडेदळ, कृष्णागर ह्यांचें चूर्ण शेळीच्या दह्याशीं चाटावें. तें उग्र अशा मूतखड्याला फोडून पाडतें.

अर्कपुष्पीकल्क.

गव्येन पिष्टा पयसाऽर्कपुष्पी निपीयमानाऽनुदिनं प्रभाते ।
विदार्य वीर्येण निजेन तीव्रामप्यश्मरीं या कुरुते सदाहाम् १

सूर्यफुलाच्या वेलीचें मूळ गाईच्या दुधांत वाटून प्रत्यहीं घ्यावें,

म्हणजे ती आपल्या वीर्यानें दाहयुक्त अशा तीव्र मूतखड्याचें भेदन करिते.

त्रिकंटकादि योग.

त्रिकण्टकस्य बीजानां चूर्णं माक्षिकसंयुतम् ।
अविक्षीरेण सप्ताहं पिबेदश्मरिभेदनम् ॥ १ ॥

गोखरूचें चूर्ण मधासह मेंढीच्या दुधांतून प्यावें. तें अश्मरीचें भेदन करितें.

हरिद्रादि योग.

यः पिबेद्रजनीं सम्यक्सगुडां तुषवारिणा ।
तस्याऽऽशु चिररूढाऽपि यात्यस्तं मेढ्रशर्करा ॥ १ ॥

जो मनुष्य हळदीचें चूर्ण गुळासहवर्तमान कांजींतून पितो, त्याची फार दिवसांची मूत्रशर्करा लयास जाते.

तिलादिक्षारयोग.

तिलापामार्गकदलीपलाशयवसंभवः ।
क्षारः पेयोऽविमूत्रेण शर्करास्वश्मरीषु च ॥ १ ॥

तीळ, अघाडा, केळ, पळस व सातूचें कांड ह्यांचा क्षार दूध व मेंढीचें मूत ह्यांजबरोबर मूत्रशर्करा व अश्मरी ह्यांजवर द्यावा.

तिलक्षारयोग.

क्षारो निपीतस्तिलनालजातः समाक्षिकक्षीरयुतास्त्रिरात्रम् ।
हन्त्यश्मरीं सिन्धुविमिश्रितं वा निपीयमानं रुचकं प्रयत्नात् ॥१॥

तिळांच्या कांडाचा क्षार दूध व मध ह्यांतून घ्यावा. किंवा सैंधेलोण अगर पादेलोण घ्यावें. तें मूतखड्याचा नाश करितें.

वरुणादि घृत.

वरुणस्य तुलां क्षुण्णां जलद्रोणे विपाचयेत् ।
पादशेषं परिस्राव्य घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ १ ॥
वारुणी कदली बिल्वं तृणजं पञ्चमूलकम् ।
अमृता त्वश्मजं देयं बीजं च त्रपुसस्य च ॥ २ ॥
शतपर्वा तिलक्षारः पलाशक्षार एव च ।
यूथिकायाश्च मूलानि कार्षिकाणि समावपेत् ॥ २ ॥
अस्य मात्रां पिबेज्जन्तुर्देशकालाद्यपेक्षया ।
जीर्णे चानुपिबेत्पूर्वमजीर्णेन तु मस्तुना ।

अश्मरीं शर्करां चैव मूत्रकृच्छ्रं च नाशयेत् ॥ ४ ॥

वायवर्ण्याची साल चारशें तोळे कुटून तिचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. तो गाळून घेऊन त्यांत पुनः वायवर्ण्याची साल, केळीचा गड्डा, तृणपंचमूळ (कसई, लहान व मोठा दर्भ, ऊंस, देवनळ), बेलाचें मूळ, गुळवेल, लकडीपाषाणभेद, काकडीचें बीं, काळ्या दूर्वांच्या मुळ्या, तिळाचा क्षार, पळसाचा क्षार, जुईचें मूळ, ह्यांचा कल्क एक एक तोळा घालून तूप सिद्ध करावें. आणि देशकालादिकांचा विचार करून शक्तिमानाप्रमाणें मात्रा योजावी. हें तूप जिरल्यावर त्याजवर सर्व कांहीं पेय पदार्थ प्यावे. पण जिरलें नाहीं तर दह्याच्या निवळीशीं घ्यावें. हें वरुणादि घृत मूतखडा, मूत्रशर्करा व मूत्रकृच्छ्र ह्यांचा नाश करितें.

पाषाणभेदपाक.

अश्मभेदात्प्रस्थमेकं चूर्णितं वस्त्रगालितम् ।
गव्ये दुग्धाढके क्षिप्त्वा पाचयेन्मृदुवह्निना ॥ १ ॥
दर्व्या संमर्दयेत्तावद्यावद्घनतरं भवेत् ।
एला लवङ्गमगधा यष्टी मध्वमृताऽभया ॥ २ ॥
कौन्ती श्वदंष्ट्रा वृषकं शरपुङ्खा पुनर्नवा ।
यावशूको निलम्बी च मांसी सप्ताङ्गुलात्पलम् ॥ ३ ॥
वङ्गं लोहं तथाऽभ्रं च कर्पूरं पर्पटं सटी ।
पत्रेभकेसरं त्वकच संशुद्धं च शिलाजतु ॥ ४ ॥
पृथगर्धपलं चूर्णं चूर्णिता सितशर्करा ।
सार्धप्रस्थमिता ग्राह्या दुग्धे वै लेह्यतां नयेत् ॥ ५ ॥
सर्वं तन्निक्षिपेत्तत्र स्वाङ्गशीतलतां नयेत् ।
मधुनः प्रस्थकं दद्यात्स्निग्धभाण्डे विनिक्षिपेत् ॥ ६ ॥
कर्षार्धं भक्षयेत्प्रातस्तीक्ष्णं तैलादिकं त्यजेत् ।
पश्चाश्मरीभेदनः स्यान्मूत्रकृच्छ्रं खुडं तथा ॥ ७ ॥
मूत्राघातान्प्रमेहांश्च नाशयेन्मधुमेहताम् ।
अधोगं रक्तपित्तं च बस्तिकुक्षिगदं तथा ॥ ८ ॥
तीव्राश्मरीपरीतानां विशेषेण हितं हि तत् ।
प्रथमात्रिणा विरचितं च्यवनाय निवेदितम् ॥ ९ ॥

---

१ "चानु पिबेत्पूर्व–" ह्या ठिकाणीं "चानु पिबेत्सर्व–" असा पाठभेद आहे. त्याला धरून अर्थ केला आहे.

पाषाणभेदाचें वस्त्रगाळ केलेलें चूर्ण चौसष्ट तोळे घेऊन तें दोनशें छप्पन्न तोळे गाईच्या दुधांत मंदाग्नीवर पळीनें ढवळीत ढवळीत घट्ट होईपर्यंत पचन करावें. नंतर वेलदोडे, लवंग, पिंपळी, जेष्टमध, गुळवेल, हिरडेदळ, रेणुकबीज, गोखरू, अडुळसा, उन्हाळी, वसूची मुळी, जवखार, निळंबीचें बी (निळीचें बी), जटामांसी, सप्तांगुळ (सातवीण), हीं औषधें चार चाळ तोळे; वंगभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, कापूर, पित्तपापडा, कचोरा, तमालपत्र, नाकेशर, दालचिनी व शुद्ध शिलाजित हीं औषधें दोनदोन तोळे आणि शहाण्णव तोळे खडीसाखर ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण त्या दुधांत घालून लेहासारखा पाक करावा. तो थंड झाल्यावर त्यांत मध चौसष्ट तोळे घालावा. आणि स्निग्ध भांड्यांत भरून ठेवावा. आणि अर्धा तोळा प्रमाणें भक्षण करून त्याजवर तीक्ष्ण पदार्थ व तेल वर्ज करावें. म्हणजे पांच प्रकारचे मूतखडे, मूत्रकृच्छ्र, खुड्डवात, मूत्रघात, प्रमेह, मधुमेह, अधोगत रक्तपित्त, बस्ती व कुशी ह्यांचे रोग, ह्यांचा नाश करतो. हा विशेषतः तीव्र मूतखड्यानें पीडलेल्या मनुष्याला हितकारक आहे. हा पाषाणभेदपाक प्रथम अत्रीनें तयार करून च्यवनाला सांगितला.

रसायनें.

पाषाणवज्रक रस.

शुद्धसूतं त्रिधा गन्धं द्रावैः श्वेतपुनर्नवैः ।
मर्दयित्वा दिनं खल्वे रुद्ध्वा तद्भूधरे पचेत् ॥ १ ॥
पाषाणभेदचूर्णं तु समयुक्तं द्विमाषकम् ।
भक्षयेदश्मरीं हन्ति रसः पाषाणवज्रकः ॥ २ ॥
गोपालकर्कटीमूलक्वाथं तदनु पाययेत् ॥ ३ ॥

शुद्ध पारा एक भाग व शुद्ध गंधक तीन भाग ह्यांची कज्जली करून तिचा पांढऱ्या वसूच्या रसांत एक दिवस खल करावा आणि

२ "सप्तांगुला" ह्या ठिकाणीं "सप्तांगुलोत्पलं" असा पाठभेद आहे. त्याप्रमाणें उत्पल–कमळ घ्यावें लागतें व सर्व औषधें पुढें सांगितल्याप्रमाणें दोन दोन तोळे घ्यावीं लागतात.

शरावसंपुटांत घालून मुखमुद्रा करून त्याचें भूधरपुटांत पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून त्यांत त्याच्या समान पाषाणभेदाचें चूर्ण घालून दोन मासे प्रमाणानें सेवन करावा. हा पाषाणवज्रक नांवाचा रस मूतखड्याचा नाश करतो. ह्याजवर गोपाळ-काकडी-च्या मुळांचा काढा अनुपानार्थ द्यावा.

त्रिविक्रम रस.

ताम्रभस्म त्वजाक्षीरे पाच्यं तुल्ये घृते पचेत् ।
तत्ताम्रं शुद्धसूतं च गन्धकं च समं समम् ॥ १ ॥
निर्गुण्ड्युत्थद्रवैर्मर्द्य दिनं तद्गोलमाहरेत् ।
यामैकं वालुकायन्त्रे पाच्यं योज्यं द्विगुञ्जकम् ॥ २ ॥
बीजपूरस्य मूलं तु सजलं चानुपाययेत् ।
रसस्त्रिविक्रमो नाम्ना सिकतां चाश्मरीं जयेत् ॥ ३ ॥

ताम्रभस्म समभाग शेळीच्या दुधांत व तुपांत पचन करावें. तें ताम्र, शुद्धपारा व शुद्ध गंधक समभाग घेऊन त्यांचा निर्गुडीच्या रसांत एक दिवस खल करावा. नंतर गोळा करून त्याचें वालुका यंत्रांत एक प्रहर पचन करावें. नंतर हा रस दोन गुंजांप्रमाणें योजावा. ह्याजवर महाळुंगाचें मूळ पाण्यांत उगाळून प्यावयास द्यावें. हा त्रिविक्रम नांवाचा रस मुतखडा व मूत्राश्मरी ह्यांना जिंकतो.

पथ्य.

कुलित्था मुद्गगोधूमा जीर्णशालियवा हिताः ।
धन्वामिषं तण्डुलीयं जीर्णकूष्माण्डकं फलम् ।
आर्द्रकं यावशूकश्च पथ्यमश्मरिरोगिणाम् ॥ १ ॥

हुलगे, मूग, गहू, जुन्या साळी व सातु हीं धान्यें हितकारक आहेत. तसेंच जांगलमांस, तांदुळाचें धुवण, जुना कोहळा, आलें, जवखार, हे पदार्थ मुतखड्याच्या रोग्याला पथ्यकारक आहेत.

प्रमेहनिदान.

आस्यासुखं स्वप्नसुखं दधीनि ग्राम्योदकानूपरसाः पयांसि ।
नवान्नपानं गुडवैकृतं च प्रमेहहेतुः कफकृच्च सर्वम् ॥ १ ॥

नेहमीं बसून राहणें, झोप घेणें, दहीं, ग्राम्य प्राण्यांचें मांस, जल-चर प्राण्यांचें मास, अनूपदेशांतील प्राण्यांच्या मांसाचा रस, दूध

नवीन धान्याचें अन्नपान, गुळाचे पदार्थ आणि सर्व कफकारक पदार्थ हे सर्व पदार्थ प्रमेहाला कारण आहेत.

ग्रंथांतरांतील.

मूत्राघाताः प्रमेहाश्च शुक्रदोषास्तथैव च ।
मूत्रदोषाश्च ये वाऽपि बस्तौ चैव भवन्ति हि ॥ २ ॥

मूत्राघात, प्रमेह, शुक्रदोष, तसेंच मूत्रसंबंधीं सर्व दोष हे सर्व रोग बस्तीमध्यें होतात.

प्रमेहाची संप्राप्ति.

मेदश्च मांसं च शरीरजं च क्लेदं कफो बस्तिगतः प्रदूष्य ।
करोति मेहान्समुदीर्णमुष्णैस्तान्येव पित्तं परिदूष्य चापि ॥३॥
क्षीणेषु दोषेष्ववकृष्य बस्तौ धातून्प्रमेहान्कुरुतेऽनिलश्च ॥ ४॥

बस्तीमध्यें असणारा कफदोष मेद, मांस व शरीरजन्य क्लेद ह्यांना दूषित करून प्रमेह उत्पन्न करतो. तसेंच उष्ण उपचारादिकांनीं प्रकुपित झालेलें पित्त त्याच मेदादिकांना दूषित करून पित्तजन्य प्रमेह उत्पन्न करितें. आणि कफ व पित्त क्षीण झाल्यामुळें प्रकुपित झालेला वायुदेखील मेदमांसादिकांना ओढून बस्तींत आणून वातजन्य प्रमेह उत्पन्न करतो.

क्रमानें साध्यासाध्यत्व.

साध्याः कफोत्था दश पित्तजाः षड्
याप्या न साध्याः पवनाच्चतुष्कः ।
समक्रियत्वाद्विषमक्रियत्वान्-
महात्ययत्वाच्च यथाक्रमं ते ॥ ५ ॥

कफजन्य दहा प्रमेहांवर समान गुणाची चिकित्सा करतां येते; म्हणून ते साध्य आहेत. पित्तजन्य सहा प्रमेहांवर चिकित्सा विषम करावी लागते, म्हणून ते याप्य आहेत; आणि वातजन्य चार प्रमेह मज्जादि मोठ्या धातूंच्या आश्रयानें होतात व त्यांजवरही विषम चिकित्साच करावी लागते, म्हणून ते असाध्य असतात.

ग्रंथांतरांतील.

ज्वरे तुल्यर्तुदोषत्वं प्रमेहे तुल्यदूष्यता ।
रक्तगुल्मे पुराणत्वं सुखसाध्यत्वहेतवः ॥ ६ ॥

ज्वराला ऋतु व दोष ह्यांच्या गुणांत साम्य असणें, प्रमेहांत दोष व दूष्य (रक्तादि धातु) ह्यांमध्यें साम्य असणें आणि रक्तगुल्म जुना होणें हीं लक्षणें त्या त्या रोगाचें सुखसाध्यत्वसूचक आहेत.

प्रमेहसाध्यत्व.

या वातमेहान्प्रति पूर्वमुक्ता
वातोल्बणानां विहिता क्रिया सा ।
वायुर्हि मेहेष्वतिकर्षितेषु
करोति मेहान्प्रति नास्ति चिन्ता ॥ ७ ॥

वातजन्य मूत्रविकारावर मागें जी क्रिया सांगितली आहे ती सर्व वातजन्य प्रमेहांवर योग्य अशी आहे. अतिशय वाढलेल्या मूत्र-विकारांतील वायु प्रमेह उत्पन्न करतो. म्हणून त्यासंबंधानें काळजी करण्याचें कारण नाहीं.

प्रमेहांतील दोष व दूष्यें.

कफः सपित्तः पवनश्च दोषो
मेदोऽस्रशुक्राम्बुवसालसीकाः ।
मज्जा रसौजः पिशितं च दूष्यं
प्रमेहिणां विंशतिरेव मेहाः ॥ ८ ॥

कफ, पित्त व वात हे दोष आहेत; आणि मेद, रक्त, शुक्र, शरीरांतील जल, धातु, वसा, लस, मज्जा, रसधातु, ओज व मांस हीं दूष्यें आहेत. ह्यांच्या संयोगामुळें वीस प्रकारचे प्रमेह होतात.

दूष्यसंग्रह.

वसा मांसं शरीरस्य क्लेदः शुक्रं च शोणितम् ।
मेदो मज्जालसीकौजः प्रमेहे दूष्यसंग्रहः ॥ ९ ॥

वसा, मांस, शरीरसंबंधी क्लेद (ओलसरपणा–जलधातु) शुक्र, रक्त, मेद, मज्जा, लस व ओज हीं प्रमेहांतील दूष्यें आहेत.

प्रमेहाचें पूर्वरूप.

दन्तादीनां मलाढ्यत्वं प्राग्रूपं पाणिपादयोः ।
दाहश्चिक्कणता देहे तृट् स्वाद्वास्यं च जायते ॥ १० ॥

दांत वगैरे इंद्रियांचे ठिकाणीं मळ फार असतो. हातापायाची आग होते. अंगाला चिकटपणा असतो. तहान लागते व तोंडाला गुळमटपणा असतो. हे विकार प्रमेहाच्या पूर्वरूपांत होतात.

सामान्य लक्षण.

सामान्यं लक्षणं तेषां प्रभूताविलमूत्रता ।
दोषदूष्याविशेषेऽपि तत्संयोगविशेषतः ॥ ११ ॥

लघवीचे वेळीं पुष्कळ व गढूळ मूत्र होणें हें सर्व प्रमेहांचें सामान्य लक्षण आहे.

मूत्रवर्णादिभेदेन भेदो मेहेषु कल्प्यते ।
सम्यग्भेदं परीक्ष्याऽऽदौ क्रिया कार्या भिषग्वरैः ॥ १२॥

मूत्रवर्णाच्या भेदादिकांवरून प्रमेहाचे भेद केले जातात. त्या भेदांचें चांगलें ज्ञान झाल्यावर वैद्यानें त्यांची चिकित्सा करावी.

दकमेहस्तथा चक्षुः सान्द्रमेहः सुराभिधः ।
पिष्टप्रमेहः शुक्राख्यः सिकता शीतकः शनैः ॥ १३ ॥
लालामेहस्तथा क्षारो नीलमेहोऽथ कालकः ।
हारिद्रमेहमाञ्जिष्ठौ रक्तमेहस्तथाऽपरः ॥ १४ ॥
षोडशोऽथ वसामेहो मज्जामेहश्च कीर्तितः ।
क्षौद्रमेहस्तथा हस्ती मेहानां विंशतिः क्रमात् ॥ १५ ॥

उदकमेह, इक्षुमेह, सांद्रमेह, सुरामेह, पिष्टमेह, शुक्रमेह, सिकतामेह, शीतमेह, शनैर्मेह, लालामेह, क्षारमेह, नीलमेह, कालमेह, हारिद्रमेह, मांजिष्ठमेह, सोळावा रक्तमेह, वसामेह, मज्जामेह, क्षौद्रमेह व हस्तिमेह असे वीस प्रकारचे मेह आहेत.

(उदकमेहादि दहा मेह कफजन्य आहेत.)

उदकमेह.

अच्छं बहु सितं शीतं निर्गन्धमुदकोपमम् ।
मेहत्युदकमेहेन किंचिदाविलपिच्छिलम् ॥ १६ ॥

उदकमेहामध्यें—स्वच्छ, पुष्कळ, पांढरें, थंड, पाण्यासारखें, गंधरहित, किंचित् गढूळ व बुळबुळित असें मूत्र होतें.

इक्षुमेह.

इक्षो रसमिवात्यर्थं मधुरं चेक्षुमेहतः ॥

इक्षुमेहामुळें—पुष्कळ व उसाच्या रसासारखें मधुर असें मूत्र होतें.

सांद्रमेह.

सान्द्री भवेत्पर्युषित्तं सान्द्रमेहेन मेहति ॥ १७ ॥

शिळें झालें असतांना घट्ट होईल अशा प्रकारचें मूत्र सांद्र-मेहामध्यें होतें.

सुरामेह.

सुरामेही सुरातुल्यमुपर्यच्छमधो घनम् ॥

सुरामेह झालेला रोगी सुरेप्रमाणें वर स्वच्छ व खालीं दाट अशा तऱ्हेचें मुततो.

पिष्टमेह.

संहृष्टरोमा पिष्टेन पिष्टवद्बहुलं सितम् ॥ १८ ॥

पिष्टमेही रोग्याला लघवीचे वेळीं अंगावर कांटा येतो, आणि तो पिठासारखें पुष्कळ व पांढरें मुततो.

शुक्रमेह.

शुक्राभं शुक्रमिश्रं वा शुक्रमेही प्रमेहति ॥

शुक्रमेही रोगी शुक्रासारखें किंवा शुक्रमिश्र असें मुततो.

सिकतामेह.

मूत्राणून्सिकतामेही सिकतारूपिणो मलान् ॥ १९ ॥

सिकतामेहामध्यें कफादि दोषांचे वाळूसारखे कण लघवींतून पडतात.

शीतमेह.

शीतमेही सुबहुशो मधुरं बहुशीतलम् ॥

शीतमेही मनुष्य मधुर, पुष्कळ व अतिशय थंड असें मुततो.

शनैर्मेह.

शनैः शनैः शनैर्मेही मन्दं मन्दं प्रमेहति ॥ २० ॥

शनैर्मेही मनुष्याला हळुहळू व थोडी थोडी लघवी होते.

लालामेह.

लालातन्तुयुतं मूत्रं लालामेहेन पिच्छिलम् ॥ १ ॥

लालामेहामध्यें लाळेप्रमाणें बुळबुळीत व तारयुक्त असें लघवीस होतें.

(पुढील सहा पित्तमेह आहेत.)

क्षारमेह.

गन्धवर्णरसस्पर्शैः क्षारेण क्षारतोयवत् ॥ २१ ॥

क्षारमेहामध्यें जी लघवी होते तिला रुचि, गंध, वर्ण व स्पर्श हे क्षाराच्या पाण्यासारखे असतात.

नीलमेह व कालमेह.

नीलमेहेन नीलाभं कालमेही मषीनिभम् ॥

नीलमेहामध्यें निळया रंगाची लघवी होते व कालमेहामध्यें शाईसारखी काळी लघवी होते.

हारिद्रमेह.

हारिद्रमेही कटुकं हरिद्रासंनिभं दहत् ॥ २२ ॥

हारिद्रमेहाचा रोगी हळदीसारखें पिवळें मुततो. त्याचें मूत तिखट असतें व लघवी होतांना जळजळ होते.

मांजिष्ठमेह.

विस्रं माञ्जिष्ठमेहेन मंजिष्ठासलिलोपमम् ।

मांजिष्ठमेहामध्यें मंजिष्ठाच्या काढयाच्या रंगासारखें व दुर्गंध-युक्त असें लघवीला होतें.

रक्तमेह.

विस्रमुष्णं सलवणं रक्ताभं रक्तमेहतः ॥ २३ ॥

रक्तमेहामध्यें रक्ताप्रमाणें लाल, दुर्गंधयुक्त, खारट व उष्ण असें मूत्र होतें.

वसामेह.

वसामेही वसामिश्रं वसाभं मूत्रयेन्मुहुः ॥

वसामेही मनुष्य वसेप्रमाणें व वसामिश्र असें वरचेवर मुततो.

मज्जामेह.

मज्जाभं मज्जमिश्रं वा मज्जमेही मुहुर्मुहुः ॥ २४ ॥

मज्जामेही मनुष्य मज्जेसारखें किंवा मज्जेनें मिश्र असें वरचे-वर मुततो.

क्षौद्रमेह.

कषायं मधुरं रूक्षं क्षौद्रमेहेन मेहति ॥

क्षौद्रमेहाचा रोगी क्षौद्रमेहानें तुरट, मधुर व रूक्ष असें मुततो.

हस्तिमेह.

हस्ती मत्त इवाजस्रं मूत्रं वेगविवर्जितम् ।

सलसीकं विबद्धं च हस्तिमेही प्रमेहति ॥ २५ ॥

हस्तिमेही मनुष्य लसीनें युक्त, वेगरहित, एकसारखें व अडखळत अडखळत असें मुततो.

कफजन्य मेहाचे उपद्रव.

अविपाकोऽरुचिच्छर्दिर्निद्रा कासः सपीनसः ।
उपद्रवाः प्रजायन्ते मेहानां कफजन्मनाम् ॥ २६ ॥

अपचन, अरुचि, ओकारी, झोप, खोकला व पीनसरोग हे कफजन्य मेहाचे उपद्रव आहेत.

पित्तजन्य मेहाचे उपद्रव.

बस्तिमेहनयोस्तोदो मुष्कावदरणं ज्वरः ।
दाहस्तृष्णा क्लमो मूर्च्छा विड्भेदः पित्तजन्मनाम् ॥२७॥

बस्ती व शिश्न ह्यांमध्यें टोचणी असणें, अंडाची त्वचा विदीर्ण होणें (फाटणें), ज्वर, दाह, तहान, थकवा, मूर्छा व मळ पातळ होणें हे उपद्रव पित्तजन्य मेहामध्यें होतात.

वातजन्य मेहाचे उपद्रव.

वातजानामुदावर्तः कण्ठहृद्ग्रहलोलताः ।
शूलमुन्निद्रता शोषः कासः श्वासश्च जायते ॥ २८ ॥

उदावर्त, घसा व छाती आवळल्यासारखी होणें, मधुरादि रसांविषयीं इच्छा होणें, शूळ, झोंप न येणें, तहान, श्वास व खोकला हे उपद्रव वातजन्य मेहामध्यें होतात.

मेहाचें असाध्य लक्षण.

यथोक्तोपद्रवाविष्टमतिप्रस्रुतमेव च ।
पिटिकापीडितं गाढं प्रमेहो हन्ति मानवम् ॥ २९ ॥

वर सांगितलेले त्या त्या दोषांचे उपद्रव ज्यास झाले आहेत, ज्याला लघवी फारच होत आहे, जो प्रमेहपीटिकांनीं पिडला आहे व ज्याचा प्रमेहरोग अंगांत फार दिवस मुरलेला आहे, असा प्रमेह रोग त्या रोग्याला मारतो.

मूर्छाछर्दिज्वरश्वासकासवीसर्पगौरवैः ।
उपद्रवैरुपेतो यः प्रमेही दुष्प्रतिक्रियः ॥ ३० ॥

मूर्च्छा, ओकारी, ज्वर, श्वास, कास, विसर्प व जडत्व ह्या उपद्र-

वांनीं युक्त जो प्रमेहरोग तो चिकित्सा करण्यास फार कठीण आहे.

नराणां दृश्यते मेहः स्त्रीणां किं तु न दृश्यते ।
अन्नपानविशेषेण दोषदूष्यक्रमेण च ॥ ३१ ॥

अन्नपानादिकांच्या फरकामुळें व दोष व दूष्य ह्यांचा क्रम निराळा असल्यामुळें प्रमेहाचे विकार पुरुषाला झालेले दिसून येतात, पण तसे ते स्त्रियांना झालेले आढळत नाहींत.

रजः प्रवर्तते यस्मान्मासि मासि विशोधयेत् ।
सर्वान्धातूंश्च दोषांश्च न प्रमेहन्त्यतः स्त्रियः ॥ ३२ ॥

प्रतिमासीं स्त्रियांना नियमित रजःस्राव होतो, त्यामुळें त्यांचे सर्व धातु व दोष शुद्ध होतात. म्हणून स्त्रियांना प्रमेह होत नाहीं.

जातः प्रमेही मधुमेहिना वा
साध्यो न रोगः स हि बीजदोषात् ।
ये चापि केचित्कुलजा विकारा
भवन्ति तांश्च प्रवदन्त्यसाध्यान् ॥ ३३ ॥

मधुमेही मनुष्यापासून जन्मलेल्या मनुष्यास झालेला प्रमेह बीजदोषामुळें साध्य होत नाहीं. तसेंच ह्या प्रमेहाप्रमाणें कुलपरंपरेनें जे दुसरे विकार होतात तेही असाध्य असतात.

मधुमेही मनुष्याचें लक्षण.

सर्व एव प्रमेहास्तु कालेनाप्रतिकारिणः ।
मधुमेहत्वमायान्ति तदाऽसाध्या भवन्ति हि ॥ ३४ ॥

जर प्रतिकार केला नाहीं तर सर्वच प्रमेह मधुमेहत्व पावतात; आणि त्यांना मधुमेहत्व आलें म्हणजे ते असाध्य होतात.

अन्य ग्रंथांतून.

गुल्मी च मधुमेही च राजयक्ष्मी च यो नरः ।
अचिकित्स्या भवन्त्येते बलमांसपरिक्षयात् ॥ ३५ ॥

गुल्म, मधुमेह व राजयक्ष्मा ह्या प्रत्येक विकाराचा रोगी अशक्त व मांसहीन झाला असतां ते सर्व असाध्य होतात.

मधुमेहो मधुसमो जायते स किल द्विधा ।
क्रुद्धे धातुक्षयाद्वायौ दोषावृतपथेऽथवा ॥ ३६ ॥

धातुक्षीणता किंवा कफपित्तादिकांनीं वाताचा मार्ग रुद्ध होणें ह्या दोन कारणांनीं लघवींत मधाची उत्पत्ति होते.

आवृतो दोषलिङ्गानि सोऽनिमित्तं प्रदर्शयन्।
क्षीणः क्षणात्क्षणात्पूर्णो भजते कृच्छ्रसाध्यताम् ॥ ३७ ॥

ह्या दोषांनीं मार्ग आडविल्यामुळें होणाऱ्या मधुमेहांत ज्या दोषानें मार्ग रुद्ध झाला असेल त्या दोषाचीं लक्षणें कारणावांचून दिसून येतात. हा मधुमेह क्षणांत कमी होतो व क्षणांत अधिक होतो. हा कष्टसाध्य आहे.

मधुमेह म्हणण्याचें कारण.

मधुरं यच्च मेहेषु प्रायो मध्विव मेहति।
सर्वेऽपि मधुमेहाख्या माधुर्याच्च तनोरतः ॥ ३८ ॥

ज्या अर्थी मधुमेहामध्यें मधाप्रमाणें मधुर लघवी होते व शरीरालाही मधुरत्व येतें, त्या अर्थी त्यांना मधुमेह असें म्हणतात.

प्रमेहिणो यदा मूत्रमनाविलमपिच्छिलम्।
विशदं तिक्तकटुकं तदाऽऽरोग्यं प्रचक्षते ॥ ३९ ॥

प्रमेहाच्या रोग्याला निर्मळ, बुळबुळितपणा नाहीं अशी स्वच्छ, कडु व तिखट अशी लघवी होऊं लागली म्हणजे त्याचा प्रमेह बरा झाला म्हणून समजावें.

प्रमेहपीटिका.

प्रमेहिणां प्रजायन्ते पिटिकाः सर्वसंधिषु।
शराविका कच्छपिका जालिनी विनतालजी।
मसूरिका सर्षपिका पुत्रिणी च विदारिका ॥ १ ॥
विद्रधिश्चेति पिटिकाः प्रमेहोपेक्षया दश।
संधिमर्मसु जायन्ते मांसलेषु च धामसु ॥ २ ॥

प्रमेही मनुष्याच्या सर्व सांध्यांच्या ठिकाणीं पुळ्या होतात; प्रमेहाची उपेक्षा केली असतां शराविका, कच्छपिका, जालिनी, विनता, अलजी, मसूरिका, सर्षपिका, पुत्रिणी, विदारिका व विद्रधि अशा दहा प्रकारच्या पुळ्या सांध्यांच्या मर्मस्थानीं किंवा मांसल जागीं होतात.

शराविका.

अन्तोन्नता च तद्रूपा निम्नमध्या शराविका।

कडा उंच असून मध्यें खोलगट असणारी शरावाच्या आकाराची जी पुळी होते तिला शराविका असें म्हणतात.

सर्षपिका.

गौरसर्षपसंस्थाना तत्प्रमाणा च सर्षपी ॥ ३ ॥

पांढऱ्या शिरसासारखी दिसणारी व तेवढ्याच आकाराची जी पुळी होते, तिला सर्षपिका असें म्हणतात.

कच्छपिका.

सदाहा कूर्मसंस्थाना ज्ञेया कच्छपिका बुधैः ।

दाहयुक्त व कासवाच्या पाठीच्या आकाराची जी पुळी होते, तिला कच्छपिका असें म्हणावें.

जालिनी.

जालिनी तीव्रदाहा तु मांसजालसमावृता ।
अवगाढरुजोत्क्लेदा पृष्ठे वाऽप्युदरेऽपि वा ॥ ४ ॥

तीव्र दाह, मांस व शिराजाल ह्यांनीं युक्त जी पुळी होते, तिला जालिनी असें म्हणतात. ही पुळी फार खोलपर्यंत असते. तिला ठणका फार असतो व ओलसरपणा असतो. ही पुळी पोटावर किंवा पाठीवर होते.

विनता व पुत्रिणी.

महती पिटिका नीला सा बुधैर्विनता स्मृता ।
महत्यल्पाचिता ज्ञेया पिटिका साऽपि पुत्रिणी ॥ ५ ॥

जी पुळी मोठी व नीलवर्ण असते, ती विनता नांवाची पुळी आहे असें समजावें. एक मोठी पुळी असून तिच्या सभोंवार आणखी बारीक बारीक पुष्कळ पुळ्या असतात तिला पुत्रिणी असें म्हणतात.

मसूरिका.

मसूरदलसंस्थाना विज्ञेया तु मसूरिका ।

जी पुळी मसुरीच्या डाळीच्या आकाराची असते, ती मसूरिका नांवाची पुळी आहे असें जाणावें.

अलजी.

रक्तासिता स्फोटवती विज्ञेया त्वलजी बुधैः ॥ ६ ॥

काळसर तांबूस व फोडांनीं व्याप्त अशी जी पीटिका होते, तिला अलजी असें म्हणतात.

विदारिका.

विदारीकन्दवद्वृत्ता कठिना च विदारिका ।

जी पुळी बेंदरीच्या कांद्याप्रमाणें वाटोळी व कठीण असते, तिला विदारिका म्हणावें.

विद्रधिका.

विद्रधेर्लक्षणैर्युक्ता ज्ञेया विद्रधिका तु सा ॥ ७ ॥

जी पुळी करटाच्या लक्षणांनीं युक्त असते, तिला विद्रधिका असें म्हणतात.

पुळ्या उत्पन्न होण्याचें कारण.

ये यन्मया स्मृता मेहास्तेषामेतास्तु तन्मयाः ।
विना प्रमेहमप्येता जायन्ते दुष्टमेदसः ॥ ८ ॥
तावच्चैता न लक्ष्यन्ते यावद्वस्तुपरिग्रहः ।

जे प्रमेह ज्या दोषांनीं युक्त असे असतील, त्या प्रमेहांमध्यें त्या दोषांनीं युक्त अशा ह्या पुळ्या होतात. शिवाय ज्याचा मेद दूषित झाला आहे त्यालाही ह्या पुळ्या प्रमेहावांचूनही होतात. ह्या पुळ्या जोंपर्यंत शरीराची विशिष्ट जागा व्यापीत नाहींत तोंपर्यंत लक्षांत येत नाहींत.

गुदे हृदि शिरस्यंसे पृष्ठे मर्मसु चोत्थिताः ।
सोपद्रवा दुर्बलाग्नेः पिटिकाः परिवर्जयेत् ॥ ९ ॥

गुद, हृदय, मस्तक, खांदे, पाठ व मर्मस्थान ह्या ठिकाणीं झालेल्या, उपद्रवानें युक्त व ज्याचा जठराग्नि मंद आहे अशा मनुष्यास झालेल्या ह्या पुळ्या वर्ज कराव्या.

पुळ्यांचे उपद्रव.

तृट्कासमांससंकोचमोहहिक्कामदज्वराः ।
विसर्पो मर्मसंरोधः पिटिकानामुपद्रवाः ॥ १ ॥

तहान, खोकला, मांसक्षय, मूर्च्छा, उचकी, उन्नतपणा, ज्वर, विसर्प, मर्मस्थान आखडणें हे ह्या पुळ्यांचे उपद्रव आहेत.

प्रमेह बरा झाल्याचें लक्षण.

प्रमेहिणां यदा मूत्रमनाविलमपिच्छिलम् ।
विशदं कटुतिक्तं च तदाऽऽरोग्यं प्रचक्षते ॥ १ ॥

प्रमेहाच्या रोग्याला निर्मळ, बुळबुळित नसलेलें, स्वच्छ, तिखट व कड असें मूत्र होऊं लागलें म्हणजे तो बरा झाला असें समजावें.

हारिद्रवर्णं रुधिरं च मूत्रं विना प्रमेहस्य तु पूर्वरूपैः ।
यो मेहयेत्तं न वदेत्प्रमेहं रक्तस्य पित्तस्य स हि प्रकोपः ॥ २ ॥

प्रमेहाचीं पूर्व रूपें न होतां जर पिंवळी व तांबडी लघवी होईल, तर त्याला प्रमेह म्हणूं नये; तो रक्तपित्ताचा प्रकोप आहे असें समजावें.

प्रमेहाची चिकित्सा.

दश षट् चापि चत्वारः कफपित्तसमीरजाः ।
साध्या याप्या असाध्यास्ते प्रमेहाः क्रमशो नृणाम् ॥ १ ॥

कफ, पित्त, व वात ह्या दोषांच्या प्रकोपानें अनुक्रमें दहा, सहा व चार प्रकारचे प्रमेह होतात. ते क्रमानें साध्य, याप्य व असाध्य असे आहेत.

कफमेहाची चिकित्सा.

हरीतकीकट्फलमुस्तलोध्राः पाठाविडङ्गार्जुनधन्वयासाः ।
उभे हरिद्रे तगरं विडङ्गं कदम्बशालार्जुनदीप्यकाश्च ॥ १ ॥
दार्वी विडङ्गं खदिरो धवश्च सुराह्वकुष्ठार्जुनचन्दनानि ।
दार्व्यग्निमन्थौ त्रिफला सपाठा पाठा च मूर्वा च तथा श्वदंष्ट्रा ॥२
यवान्युशीराण्यभयागुडूचीजम्बूशिवाचित्रकसप्तपर्णाः ।
पादैः कषायाः कफमेहिनां ते दशोपदिष्टा मधुसंप्रयुक्ताः ॥ ३ ॥

बाळहिरडे, कायफळ, नागरमोथे व लोध्र; पहाडमूळ, वावडिंग, अर्जुनसादडा, व धमासा; हळद, दारुहळद, तगर व वावडिंग; कळंबाची साल, सागवान, अर्जुनसादडा, व ओवा; दारुहळद, वावडिंग, खैराची साल व धावडा; देवदार, कोष्ट, अर्जुनसादडा व पांढरा चंदन; दारुहळद, टाकळीमूळ, त्रिफळा व पहाडमूळ; पहाडमूळ, मोरवेल व गोखरू; ओवा, वाळा, बाळहिरडे व गुळवेल; जांभळीची साल, आवळकाठी, चित्रकमूळ व सातवीण, हे श्लोकाच्या एक एक चरणामध्यें सांगितलेले दहा काढे कफजन्य मेहावर मध घालून द्यावे.

जलप्रमेहेक्षुरसप्रमेहे सान्द्रप्रमेहे च सुराप्रमेहे ।
पिष्टप्रमेहेऽपि च शुक्रमेहे क्रमादमी स्युः सिकताप्रमेहे ।

शीतप्रमेहे च शनैःप्रमेहे लालाप्रमेहेऽपि सुखाय तेषाम् ॥ ४ ॥

जलप्रमेह, इक्षुप्रमेह, सांद्रप्रमेह, सुराप्रमेह, पिष्टप्रमेह, शुक्रप्रमेह, सिकताप्रमेह, शीतप्रमेह, शनैःप्रमेह, व लालाप्रमेह ह्यांजवर क्रमानें वरील काढे दिले असतां सुखकारक होतील.

सुश्रुतांतील.

तत्रोदकमेहिनां पारिजातकषायं पाययेत् । इक्षुमेहिनां निम्बकषायम् । सान्द्रमेहिनां सप्तपर्णकषायम् । सुरामेहिनां शाल्मलीकषायम् । पिष्टमेहिनां हारिद्राद्रिकषायम् । शुक्रमेहिनां दूर्वाशैवलप्लवकारञ्जकसेरुककषायम्, ककुभचन्दनकषायं वा । सिकतामेहिनां निम्बकषायम् । शीतमेहिनां पाठागोक्षुरकषायम् । शनैर्मेहिनां त्रिफलागुडूचीकषायम् । लालामेहिनां त्रिफलारग्वधकषायं पाययेत् ॥ १ ॥

उदकमेही मनुष्याला पारिजातकाचा काढा प्यावयास द्यावा. इक्षुमेह्याला कडू निंबाचा काढा, सांद्रमेह्याला सातविणीचा काढा, सुरामेही मनुष्याला काटेशवरीच्या सालीचा काढा, पिष्टमेह्याला हाळद व दारूहाळद ह्यांचा काढा, शुक्रमेही मनुष्याला दुर्वा, शेवाळ (न कुजलेलें), क्षुद्रमोथा, करंजाची साल व कचरा ह्या औषधांचा काढा, किंवा अर्जुनसादडा व चंदन ह्यांचा काढा द्यावा. सिकतामेह्याला कडू निंबाच्या सालीचा काढा, शीतमेह्याला पहाडमूळ व गोखरू ह्यांचा काढा, शनैर्मेह्याला त्रिफळा व गुळवेल ह्यांचा काढा, लालामेह्याला त्रिफळा व बाहव्याची शेंग ह्यांचा काढा प्यावयास द्यावा.

पित्तमेहचिकित्सा.

उशीरलोध्रासुरचन्दनानामुशीरमुस्तामलकाभयानाम् ।
पटोलनिम्बामलकामृतानां मुस्ताभयामुष्ककवृक्षकाणाम् ॥ १॥
लोध्राम्बुकालीयकधातकीनां विश्वार्जुनानां मिशिसोत्पलानाम् ।
मञ्जिष्ठहारिद्रकनीलक्षारमुष्णाख्यरक्ते क्रमशः कषायाः ॥ २ ॥

वाळा, लोध्र, हळद व चंदन ह्यांचा काढा; वाळा, नागरमोथे, आवळकाठी व हिरडे ह्यांचा काढा; कडू पडवळ, कडूलिंब, आवळकाठी व गुळवेळ ह्यांचा काढा; नागरमोथे, बाळहिरडे,

मोखा व पांढऱ्या कुड्याची साल ह्यांचा काढा; लोध्र, वाळा, दारुहळद व धायटीची फुलें ह्यांचा काढा; सुंठ, अर्जुनसादडा, बडिशेप व कमळ ह्यांचा काढा, हे काढे अनुक्रमें मांजिष्टमेह, हारिद्रकमेह, नीलमेह, क्षारमेह, कालमेह व रक्तमेह ह्यांजवर योजावे.

सुश्रुतांतील.

माञ्जिष्ठमेहिनां मञ्जिष्ठाचन्दनकषायं पाययेत् ।
हारिद्रमेहिनां राजवृक्षकषायम् ।
नीलमेहिनां सालसारादिकषायमश्वत्थकषायं वा ।
क्षारमेहिनां त्रिफलाकषायम् ।
कालमेहिनां न्यग्रोधादिकषायम् ।
शोणितमेहिनां गुडूचितिन्दुकास्थि-
काश्मर्यखर्जूरकषायं मधुमिश्रं पाययेत् ।

मांजिष्ट मेहावर मंजिष्ट व रक्तचंदन ह्यांचा काढा द्यावा. हारिद्रमेहावर बाहव्याच्या शेंगेचा काढा द्यावा. नीलमेहावर सागवानाच्या सालीचा अथवा पिंपळाच्या सालीचा काढा द्यावा. क्षारमेहावर त्रिफळ्याचा काढा द्यावा. कालमेहावर न्यग्रोधादि गणांतील औषधांचा (वड, पिंपळ, लोध्र, शाबरलोध्र, जांभूळ, रानजांभूळ, अर्जुनसादडा, पारोसा पिंपळ, कायफळ, पिंपरणी, आंबा, वेत, खिरणीचा वृक्ष, पळस, नांदरुखी, बोर, कळंब, टेंभुरणी, जेष्टमध व मोहाचा वृक्ष ह्याला न्यग्रोधादि गण म्हणतात. ह्या औषधांचा) काढा द्यावा. रक्तमेहावर गुळवेल, टेंभुरणीचें बी, शिवणीचें मूळ, व खजूर ह्यांचा काढा मध घालून द्यावा.

वातमेहचिकित्सा.

अग्निमन्थकषायं तु वसामेहे प्रयोजयेत् ।
पाठाशिरीषदुःस्पर्शमूर्वाकिंशुकातिन्दुकैः ॥ १ ॥
कपित्थेन भिषक्कुर्यात्क्काथं हस्तिप्रमेहके ।
पूगारिमेदयोः क्काथः सक्षौद्रः क्षौद्रमेहिनाम् ॥ २ ॥
छिन्नावाह्निकषायेण पाठाकुटजरामठम् ।
तिक्तकुष्ठं च संचूर्ण्य सर्पिर्मेहे पिबेन्नरः ॥ ३ ॥

टाकळीचे मूळाचा काढा वसामेहावर योजावा. पहाडमूळ, शिरसाची साल, धमासा, मोरवेल, पळस, टेंभुरणी व कवठ ह्यांचा

काढा हस्तिमेहावर योजावा. सुपारी व खैर ह्यांचा काढा मध घालून क्षौद्रमेहावर द्यावा. गुळवेल व चित्रकमूळ ह्यांचा काढा पहाडमूळ, कुडा, हिंग, कुटकी व कोष्ट ह्यांचें चूर्ण घालून सर्पिर्मेहावर (मज्जामेहावर) प्यावा.

सुश्रुतांतील.

अत ऊर्ध्वमसाध्येष्वपि योगान्यापनार्थं वक्ष्यामः ।
वसामेहिनामग्निमन्थकषायं शिंशपाकषायं वा ।
सर्पिर्मेहिनां कुष्ठकुटजपाठाहिंगुकटुरोहिणी-
कल्कं गुडूचीचित्रककषायेण पाययेत् ।
क्षौद्रमेहिनां खदिरकदरक्रमुककषायम् ।
हस्तिमेहिनां तिन्दुककपित्थशिरीषपलाश-
पाठामूर्वादुःस्पर्शकषायं मधुमिश्रम् ।
हस्त्यश्वशूकरखरोष्ट्रास्थिक्षारं चेति ॥ १ ॥

आतां ह्यापुढें असाध्य असे जे वातजन्य प्रमेह त्यांचें यापन (पीडा दूर करणें) होण्याकरितां उपाय सांगतों. ते असे—वसा मेहावर ऐरणीच्या मुळाचा काढा, अथवा शिसव्याचा काढा; सर्पिर्मेहावर (मज्जामेहावर) कोष्ट, कुडा, पहाडमूळ, हिंग व कुटकी ह्यांचें चूर्ण घालून गुळवेल व चित्रकमूळ ह्यांचा काढा पाजावा. क्षौद्रमेहावर खैर, श्वेत खैर व सुपारी ह्यांचा काढा; हस्तिमेही मनुष्याला टेंभुरणी, कवठ, शिरसवृक्ष, पळस, पहाडमूळ, मोरवेल व धमासा ह्यांचा काढा मधमिश्र करून द्यावा. आणि हत्ती, घोडा, डुकर, गाढव, उंट, ह्यांचा हाडाचा क्षार द्यावा.

द्वंद्वज प्रमेहाचिकित्सा.

कम्पिल्लसप्तच्छदशालजानि विभीतरोहीतककौटजानि ।
पुष्पाणि दध्नश्च विचूर्णितानि क्षौद्रेण लिह्यात्कफपित्तमेहे ॥ १ ॥

कपिला, सातवीण, अर्जुनसादडा, बेहडा, रक्तरोडा व कुडा ह्यांचीं फुलें दह्यांत वाटून मध घालून कफपित्तजन्य मेहावर द्यावीं.

हरीतकीकट्फलमुस्तलोध्रकुचन्दनोशीरकृतः कषायः ।
क्षौद्रेण युक्तः कफवातमेहं निहन्ति पीतारजसा च पीतः ॥१॥

हिरडा, कायफळ, नागरमोथे, लोध्र, रक्तचंदन व वाळा ह्यांचा

काढा मध व हळदीचें चूर्ण घालून घेतला असतां कफवातप्रमेहाचा नाश करितो.

विडङ्गरजनीद्वंद्वखदिरोशीरपूगजः ।
क्वाथः पीतः प्रगे हन्ति मेहं पित्तानिलोद्भवम् ॥ ३ ॥

वावडिंग, हळद, दारुहळद, खैर, वाळा, व सुपारी ह्यांचा काढा प्रातःकाळीं प्यावा. तो वातपित्तजन्य प्रमेहाचा नाश करितो.

क्वाथः खर्जूरकाश्मर्यतिन्दुकास्थ्यमृताकृतः ।
सुहिमः पीतमात्रस्तु सक्षौद्रो रक्तमेहहा ॥ ४ ॥

खजूर, खारीक, टेंभुरणीच्या फळांतील बीं व गुळवेल ह्यांचा काढा थंड झाल्यावर त्यांत मध घालून घ्यावा. तो रक्तजन्य प्रमेहाचा नाश करतो.

त्रिफलादि काढा.

फलत्रिकं दारुनिशाविशालामुस्तं च निष्काथ्य निशांशकल्कम् ।
पिबेत्कषायं मधुसंप्रयुक्तं सर्वप्रमेहेषु चिरोत्थितेषु ॥ १ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, दारुहळद, कवंडळाची मुळी व नागरमोथे ह्यांचा काढा फार दिवसांच्या सर्व प्रमेहांवर हळदीचें चूर्ण व मध घालून द्यावा.

विडंगादि काढा.

विडङ्गरजनीयष्टीनागरागोक्षुरैः कृतः ।
कषायो मधुना हन्ति प्रमेहान्दुस्तरानपि ॥ १ ॥

वावडिंग, हळद, जेष्टमध, सुंठ, व गोखरू ह्यांचा काढा मध घालून दुस्तर अशा प्रमेहावर द्यावा.

पळसाच्या फुलांचा काढा.

पलाशतरुपुष्पाणां क्वाथः शर्करया युतः ।
निषेवितः प्रमेहाणि हन्ति नानाविधान्यपि ॥ १ ॥

पळसाच्या फुलांचा काढा साखर घालून घेतला असतां नाना प्रकारच्या प्रमेहांचा नाश करतो.

वृंदांतील त्रिफलादि काढा.

त्रिफलादारुदार्व्यब्दक्वाथः क्षौद्रेण मेहहा ।
कुटजासनदार्व्यब्दफलत्रयभवोऽथवा ॥ १ ॥

हिरडा, बेहडा आवळकाठी, देवदार, नागरमोथे व दारुहळद ह्यांचा काढा मध घालून घेतला असतां प्रमेहाचा नाश करतो. किंवा कुड्याची साल, असाणा, दारुहळद, नागरमोथे, हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तोही प्रमेहाचा नाश करतो.

वृंदांतील गुडूच्यादि काढा.

गुडूच्याः स्वरसः पेयो मधुना सर्वमेहजित् ।
निशाकल्कयुतो धात्रीरसो वा माक्षिकान्वितः ॥ १ ॥

गुळवेलीचा अंगरस मध घालून प्यावा. तो सर्व प्रमेहांचा नाश करतो. अथवा आवळ्याचा रस हळद व मध घालून घ्यावा; तोहि सर्व प्रमेहांचा नाश करतो.

भूधात्र्यादियोग.

भूधात्री च त्रिगद्याणं मरीचानां च विंशतिः ।
असाध्यान्साधयेन्मेहान्सप्तरात्रान्न संशयः ॥ १ ॥

भुईआवळीचा पाला दीडतोळा आणि मिरें वीस एकत्र वाटून त्यांचा कल्क करून घ्यावा. म्हणजे असाध्य अशा प्रमेहाचादेखील सात दिवसांत नाश होतो, ह्यांत संशय नाहीं.

कतकबीजयोग.

कर्षप्रमाणं कतकस्य बीजं तक्रेण पिष्ट्वा सह माक्षिकेण ।
प्रमेहजालं विनिहन्ति सद्यो रामो यथा रावणमाहवे तु ॥ १ ॥

एक तोळा निवळीच्या बिया ताकांत वाटून मध घालून प्यावा. जसा राम युद्धामध्यें रावणाचा नाश करतो त्याप्रमाणें तो प्रमेहसमूहाचा त्वरित नाश करतो.

आकुल्यादियोग.

आकुलीमुकुलं धात्रीहरिद्रामधुना लिहेत् ।
विंशतिं च प्रमेहाणां हन्ति सत्यं न संशयः ॥ १ ॥

अंकोलाच्या कळ्या, आवळकाठी व हळद ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटावें. हें खरोखर वीस प्रकारच्या प्रमेहांचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं.

निशात्रिफळायोग.

द्विनिशात्रिफलायुक्तं रात्रौ पर्युषितं जलम् ।
प्रभाते मधुना पीतं मेहमूलं निकृन्तति ॥ १ ॥

हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा व आवळकाठी हे जिन्नस रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं तें पाणी मध घालून घ्यावें. तें मेहमूळाचें छेदन करितें.

त्रिफलाकल्क.

सजलं त्रिफलाकल्कमातपे धारयेत्त्र्यहम् ।
तद्भाण्डे दोलिकायन्त्रे चणकान्मुष्टिमात्रकान् ॥ १ ॥
अहोरात्रोषितान्खादेद्वर्धमानं दिने दिने ।
असाध्यं साधयेन्मेहं सिद्धयोग उदाहृतः ॥ २ ॥

त्रिफळ्याच्या चूर्णांत पाणी घालून तीन दिवस उन्हांत ठेवावें. नंतर एक फडक्याच्या पुरचुंडींत मूठभर हरभरे बांधून ती पुरचुंडी दोलायंत्राच्या पद्धतीनें त्या भांड्यांत अहोरात्र भिजत ठेवून दुसरे दिवशीं सकाळीं ते हरभरे खावे. अशा रीतीनें हरभऱ्याचें प्रमाण वाढवीत न्यावें. म्हणजे असाध्य अशा प्रमेहाचा देखील नाश होतो. हा सिद्धयोग आहे.

सालमुस्तयोग.

सालमुस्तककम्पिल्लकल्कमक्षसमं पिबेत् ।
धात्रीरसेन सक्षौद्रं सर्वमेहहरं परम् ॥ १ ॥

अर्जुनसादडा, नागरमोथे व कपिला ह्यांचा एक तोळाभर कल्क आवळ्याचा रस व मध ह्यांतून घ्यावा. तो सर्व मेहांचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

त्रिफळादिचूर्णयोग.

मधुना त्रिफलाचूर्णमथ वाऽश्मजतूद्भवम् ।
लोहजं वाऽभयोत्थं वा लिह्यान्मेहनिवृत्तये ॥ १ ॥

प्रमेह दूर होण्याकरितां त्रिफळ्याचें चूर्ण, शिलाजिताचें चूर्ण, लोहाचें भस्म अगर हिरड्याचें चूर्ण मधाबरोबर चाटावें.

न्यग्रोधादि चूर्ण.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थस्योनाकारग्वधासनम् ।

आम्रं कापित्थं जम्बुश्च प्रियालं ककुभं धवम् ॥ १ ॥
मधूकं मधुकं लोध्रं वरुणं पारिभद्रकम् ।
पटोलं मेषशृङ्गी च दन्ती चित्रकपाटली ॥ २ ॥
करञ्जं त्रिफला शक्रभल्लातकफलानि च ।
एतानि समभागानि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ ३ ॥
न्यग्रोधाद्यमिदं चूर्णं मधुना सह लेहयेत् ॥
फलत्रयरसं चानु पिबेन्मूत्रं विशुध्यति ॥ ४ ॥
एतेन विंशतिर्मेहा मूत्रकृच्छ्राणि यानि च ।
वेगेन प्रशमं यान्ति पिटिका न च जायते ॥ ५ ॥

वड, उंबर, पिंपळ, दिंडा, वाहवा, असाणा, आंबा, कवठ, जांभूळ, चारोळी, अर्जुनसादडा व धावडा ह्यांच्या साली; जेष्टमध, मोहाचें झाड, लोध्र, वायवर्णा, कडुनिंब, ह्यांच्या साली; कडुपडवळ, मेढशिंगी, दांतीमूळ, चित्रकमूळ, पाडळमूळ, करंजाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, इंद्रजव, बिब्बे, हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचें सूक्ष्म चूर्ण करावें. हें न्यग्रोधादि चूर्ण मधाबरोबर घ्यावें व त्याजवर त्रिफळ्याचा रस (अगर काढा) घ्यावा. म्हणजे मूत्र स्वच्छ होतें. वीस प्रकारचे प्रमेह व सर्व मूत्रकृच्छ्रें बरीं होतात, आणि प्रमेहसंबंधीं पुळया होत नाहींत.

कर्कटीबीजादि चूर्ण.

कर्कटीबीजसिन्धूत्थत्रिफलासमभागिकम् ।
पीतमुष्णाम्भसा चूर्णं मूत्ररोधं निवारयेत् ॥ १ ॥

काकडीचें बीं, सैंधव, हिरडा, बेहडा, आवळकाठी ह्यांचें समभाग चूर्ण ऊन पाण्याबबोबर प्यावें, म्हणजे तें मूत्रावरोधाचें निवारण करितें.

गोक्षुरादि गुटी.

त्रिकटुत्रिफलातुल्यं गुग्गुलुं च समांशकम् ।
गोक्षुरकाथसंयुक्तां गुटिकां कारयेद्‍ बुधः ॥ १ ॥
देशकालबलापेक्षी भक्षयेच्चानुलोमिकाम् ।
न चात्र परिहारोऽस्ति कर्म कुर्याद्यथेप्सितम् ॥ २ ॥
प्रमेहान्वातरोगांश्च वातशोणितमेव च ।
मूत्राघातं मूत्रदोषं प्रदरं चानु नाशयेत् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांचें चूर्ण समभाग घेऊन त्याच्या समान गुग्गुळ घालावा व त्याच्या गोखरूच्या काढ्यांत गोळ्या कराव्या आणि देशकाल व बलाबल ह्यांचा विचार करून द्याव्या. ह्या वातानुलोमन करितात; ह्यांजवर पथ्यापथ्याचा नियम नाहीं. इच्छेनुरूप वागावें. ही गोक्षुरादि गुटिका, प्रमेह, वातविकार, वातरक्त, मूत्राघात, मूत्रदोष व प्रदर ह्यांचा त्वरित नाश करिते.

चंद्रप्रभा गुटिका.

वेल्लव्योषफलत्रिकं त्रिलवणं द्विक्षारचव्यानिल-
श्यामापिप्पलिमूलमुस्तकसटीमाक्षीकधातुत्वचः।
षड्ग्रन्थामरदारुवारणगणाभूनिम्बदन्तीनिशा-
पत्रैलातिविषापिचुप्रतिमिता लोहस्य कर्षाष्टकम् ॥ १ ॥
त्वक्क्षीरी पलिका पुराद्दश पलान्यष्टौ शिलाजन्मनो
मानात्कर्षसमा कृतेति गुटिका संयोज्य सर्वं भिषक्।
तत्रैव प्रतिवासरं सह घृतक्षौद्रेण लिह्यादिमां
तक्रं मस्तु च गोघृतं मधुरसं पश्चात्पिबेन्मात्रया ॥ २ ॥
अर्शांसि प्रदरं ज्वरं च विषमं नाडीव्रणानश्मरी-
कृच्छ्रं विद्रधिमग्निमान्द्यमुदरं पाण्ड्वामयं कामलाम्।
यक्ष्माणं सभगंदरं सपिटिकां गुल्मप्रमेहारुची
रेतोदोषमुरक्षतं कफमरुत्पित्तार्तिमुग्रां जयेत् ॥ ३ ॥
वृद्धं संजनयेद्युवानमसमोजस्कं बलं वर्धये-
देतस्यां न निषिद्धमन्नमसकृन्नाध्वागमो मैथुनम्।
विख्याता गुटिकेयमश्चितरा चन्द्रप्रभा नामतः
सान्द्रानन्दकरी तनोति च रुचिं चन्द्रेण तुल्यां तनौ ॥४॥

वावडिंग, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, जवखार, साज्जिखार, चवक, चित्रकमूळ, तेड, पिंपळमूळ, नागरमोथे, कचोरा, सुवर्णमाक्षिकभस्म, दालचिनी, वेखंड, देवदार, गजपिंपळी, काडेचिराईत, दांतीमूळ, हळद, तमालपत्र, वेलदोडे व अतिविष हीं औषधें एक एक तोळा; लोहभस्म आठ तोळे; वंशलोचन चार तोळे, गुग्गुळ चाळीस तोळे; व शिळाजीत बत्तीस तोळे, ह्या सर्वांचा (त्रिफळ्याच्या काढ्यांत)

खल करून एक एक तोळ्याची गोळी करावी. आणि ती प्रतिदिवशीं तूप व मधाशीं घ्यावी. आणि त्याजवर ताक, दह्यावरील पाणी, गाईचें तूप व मधुर रस योग्य प्रमाणानें प्यावे. म्हणजे मूळव्याध, प्रदर, ज्वर विषमज्वर, नाडीव्रण, मुतखडा, उन्हाळे, करट, अग्निमांद्य, उदर, पांडुरोग, कावीळ, राजयक्ष्मा, भगंदर, प्रमेहाच्या पुळ्या, गुल्म, प्रमेह, अरुचि, शुक्रदोष, उरःक्षत, कफ, वात व पित्त ह्यांचे उग्र विकार ह्यांना जिंकते. पुष्टि आणते, तारुण्य देते, अतिशय ओजोवृद्धि करिते, आणि शक्ति वाढविते. हिच्यावर मैथुन व मार्गक्रमण वर्ज करावें. हिला अन्नाचा निषेध नाहीं. ही अत्यंत श्रेष्ठ गुटिका चंद्रप्रभा नांवानें प्रख्यात आहे. ही अत्यंत आनंददायक व चंद्राप्रमाणें कांति देणारी आहे.

पूगपाक, योगरत्नावलींतील.

हेमाम्भोधरचन्दनं त्रिकटुकं धात्री प्रियाला कटु-
र्लज्जालुत्रिसुगन्धजीरकयुगं शृङ्गाटकं वंशजम् ।
जातीकोशलवंगधान्यबहुलाः प्रत्येकमक्षोन्मिताः
पूगस्याष्टपलं विचूर्ण्य च पयःप्रस्थत्रये संपचेत् ॥ १ ॥
गोसर्पिः कुडवं सितार्धकतुलाधात्रीवरीद्यञ्जली
मन्दाग्नौ विपचेद्भिषक्शुभदिने सुस्निग्धभाण्डे क्षिपेत् ।
तं खादेत्तु यथाग्नि वासरमुखे मेहांश्च जीर्णज्वरं
पित्तं साम्लमसृक्स्रुतिं च गुदजान्वक्त्राक्षिनासासु च ॥२॥
मन्दाग्निं च विजित्य पुष्टिमतुलां कुर्याच्च शुक्रप्रदो
योगो गर्भकरः परं गदहरः स्त्रीणामसृग्दोषजित् ॥ ३ ॥

नाकेशर, नागरमोथे, चंदन, सुंठ, मिरें, पिंपळी, आवळकाठी, चारोळी, लघु कावळीच्या मुळ्या, लाजाळु, दालचिनी, तमालपत्र, वेलची, जिरें, शहाजिरें, शिंगाडे, वंशलोचन, जायफळ, लवंग, धने व बडिशेप हीं औषधें एक एक तोळा व सुपारी बत्तीस तोळे ह्यांचें चूर्ण करून एकशें ब्याणव तोळे दुधांत पचन करावें. गाईचें तूप सोळा तोळे, साखर दोनशें तोळे, आवळकाठी सोळा तोळे व शतावरी सोळा तोळे ह्या सर्वांचा विधियुक्त रीतीनें पाक करावा, व चांगल्या भांड्यांत भरून ठेवावा. हा पूगपाक अग्निबलाच्या

मानानें प्रातःकाळीं सेवन करावा. म्हणजे प्रमेह, जीर्णज्वर, आम्ल-पित्त, रक्तप्रदर, मूळव्याध, मुखरोग, नेत्ररोग, नासारोग व अग्निमांद्य ह्यांना जिंकून शरीर अत्यंत पुष्ट करतो. हा योग गर्भकारक, शुक्रप्रद, रोगनाशक व स्त्रियांच्या आर्तवासंबंधीं दोषाला जिंकणारा आहे.

अश्वगंधपाक.

पलान्यष्टावश्वगन्धां विपाच्य गोदुग्धे षट्शेरके मन्दवह्नौ ।
दर्वीलेपो यावदास्ते सुपक्वश्चातुर्जातं क्षिप्य कर्षप्रमाणम् ॥ १ ॥
जातीजातं केशरं वंशसत्त्वं मोचं मांसी चन्दनं कृष्णसारम् ।
पत्रीकृष्णापिप्पलीमूलदेवपुष्पं कङ्कोलालिकाक्षोटसारम् ॥ २ ॥
भल्लीबीजं शृंगटं गोक्षुराख्यं सिन्दूराभ्रं नागवंगं च लोहम् ।
कर्षार्धार्धं सर्वचूर्णं प्रकल्प्य संशोष्याथो शर्करापक्वपाके ॥ ३ ॥
पक्त्वा शीतं कारयेदश्वगन्धापाकोऽयं वै हन्ति मेहानशेषान् ।
ज्वरं जीर्णं शोषगुल्मान्विकारान्पैत्तान्वाताञ्शुक्रवृद्धिं करोति ४
पुष्टिं दद्यादग्निसंदीपनोऽयं कान्तिं कुर्यात्सौमनस्यं नराणाम् ५

बत्तीस तोळे अश्वगंधाचें चूर्ण, सहा शेर (चारशें ऐशीं तोळे) गाईच्या दुधांत मंदाग्नीवर पचन करावें. तें पळीला चिकटण्याइतकें दाट झाल्यावर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलदोड्याचे दाणे व नाकेशर ह्यांचें चूर्ण एक एक तोळा घालावें. जायपत्री, जायफळ, केशर, वंशलोचन, मोचरस, जटामांसी, पांढरा चंदन, कृष्णागर, पत्री, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, कंकोळ, कोहिलीचें बी, अक्रोडांतील बिया, बिब्यांतील गोडंब्या, शिंगाडे, गोखरू, रससिंदूर, अभ्रकभस्म व नागभस्म ह्या सर्वांचें चूर्ण अर्धा अर्धा तोळा घालून साखरेमध्यें पाक करावा. हा अश्वगंध पाक सर्व मेहांचा नाश करतो. जीर्णज्वर, शोष (क्षय), गुल्म, वातजन्य व पित्तजन्य रोग ह्यांचा नाश करून धातुवृद्धि करतो. हा पुष्टि देतो, अग्नि प्रदीप्त करतो, कांती देतो व मनाला सुप्रसन्नता देतो.

---

१ लेखी प्रतींत "कंकोल्लांगलिका" असा पाठ आहे. तोच शुद्ध आहे, म्हणून त्याला अनुसरून अर्थ केला आहे.

सालमपाक.

क्षीरे द्रोणयुते ससालकुडवं मन्दाग्निना पाचितं
यावत्पाकमुपाव्रजेत्परहितं प्रस्थं गुडं निक्षिपेत् ।
चातुर्जातलवंगजातिफलकैर्मुस्तातुगाधान्यकैः
शुण्ठीमागधिकोषणाश्वमभयालोहैश्च मिश्रीकृतम् ॥ १ ॥
हृद्रोगक्षयशोषमारुतगदान् हिक्कास्वसृक्शोषणे
विंशन्मेहशिरोविकारशमनो रोगानशेषाञ्जयेत् ॥ २ ॥

दहाशें चोवीस तोळे दुधामध्यें अर्जुनसादडयाचें चूर्ण घालून शिजवावें. दाट झाल्यावर त्यांत चौसष्ट तोळे गूळ घालून दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नाकेशर, लवंग, जायफळ, नागरमोथे, वंशलोचन, धने, सुंठ, पिंपळी, मिरीं, अश्वगंध, हिरडे व लोहभस्म ह्यांचें चूर्ण (एकतोळा) त्यांत घालावें. आणि पाक करावा. हा सालम अथवा साल-(अर्जुनसादडयाचा)-पाक हृद्रोग, क्षय, शोष, वात, उचकी, रक्तक्षय, वीस प्रकारचे मेह व मस्तकरोग ह्यांचा नाश करतो व सर्व रोगांना जिंकतो.

द्राक्षापाक.

द्राक्षादुग्धसिता पृथक्परिमिता प्रस्थेन संपाचिता
युक्त्या वैद्यवरेण चूर्णमधुना देयं पलार्धं पृथक् ।
चातुर्जातकटुत्रयं मृगमदं लोहाभ्रकं केशरं
पत्री जातिफलं मृगांकरजतं कुस्तुम्बरी चन्दनम् ॥ १ ॥
सम्यग्जातरसं प्रभातसमये सेव्यं द्विकर्षोन्मितं
स्निग्धं शुक्रकरं प्रमेहशमनं पित्तामयध्वंसनम् ।
मूत्राघातविबन्धकृच्छ्रशमनं रक्तार्तिनेत्रार्तिहृ-
त्पादे पाणितले विदाहशमनं सौख्यप्रदं प्राणिनाम् ॥ २ ॥

द्राक्षें (मनुका), दूध व खडीसाखर प्रत्येकीं चौसष्ट चौसष्ट तोळे घेऊन त्यांचा पाक करावा. नंतर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलची, नाकेशर, सुंठ, मिरें, पिंपळी, कस्तुरी, लोहभस्म, अभ्रकभस्म, केशर, जायपत्री, जायफळ, कापूर, रौप्यभस्म, धने व चंदन (पांढरा) ह्यांचें चूर्ण दोन दोन तोळे घालून पाक उत्तम तयार झाला म्हणजे रोज सकाळीं दोन दोन तोळे प्रमाणें खावा. हा पाक स्निग्ध, धातुवर्धक, प्रमेहनाशक, पित्तविकारनाशक; मूत्राघात, मूत्रावरोध,

मूत्रकृच्छ्रनाशक, रक्तविकार व नेत्रविकार ह्यांचें हरण करणारा, हातापायाच्या दाहाची शांति करणारा आणि प्राण्याला सुखदायक असा आहे.

लोध्रासव.

लोध्रं शटीं पुष्करमूलमेलां मूर्वां विडंगं त्रिफलां यवानीम्।
चव्यं प्रियंगु क्रमुकं विशालां किराततिक्तं कटुरोहिणीं च ॥१॥
भार्गीं नतं चित्रकपिप्पलीनां मूलं सकुष्ठातिविषां सपाठाम्।
कलिंगकान् केसरमिन्द्रसाह्वं नखं सपत्रं मरिचं प्लवं च ॥ २ ॥
द्रोणेऽम्भसः कर्षसमानि पक्त्वा पूते चतुर्भागजलावशेषे।
रसेऽर्धभागं मधुनः प्रदाय पक्षं विधेयो घृतभाजनस्थः ॥ ३ ॥
लोध्रासवोऽयं कफपित्तमेहान्क्षिप्रं निहन्याद्विपलप्रयोगात्।
पांड्वामयार्शोस्यरुचिग्रहण्या दोषं किलासं विविधं च कुष्ठम् ४

लोध्र, कचोरा, पोखरमूळ, वेलदोडे, मोरवेल, वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, ओवा, चवक, गव्हला, सुपारी, कडुवृंदावनाचें मूळ, काडेचिराईत, कुटकी, भारंगमूळ, तगर, चित्रकमूळ, पिंपळमूळ, कोष्ट, अतिविष, पहाडमूळ, इंद्रजव, नाकेशर, कुडयाची साल, नखला, तमालपत्र, जिरें व नागरमोथे हीं औषधें प्रत्येकीं एक एक तोळा घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा. व त्या काढ्यांत त्याच्या निम्म्यानें मध घालून तुपानें राबलेल्या मातीच्या भांडयांत भरून पंधरा दिवस पुरून ठेवावें. नंतर काढून आठ तोळे प्रमाणें ह्याची योजना करावी. म्हणजे कफपित्तजन्य मेहाचा त्वरित नाश करितें. पांडुरोग, मूळव्याध, अरुचि, संग्रहणी, किलासकुष्ट व नाना प्रकारचें कुष्ठ ह्यांचाही नाश करितें.

सिंहामृतघृत.

कण्टकार्या गुडूच्याश्च संहरेच्च शतं शतम्।
संकुट्योलूखले विद्वांश्चतुर्द्रोणेऽम्भसः पचेत् ॥ १ ॥
तेन पादावशेषेण घृतप्रस्थं विपाचयेत्।
त्रिकटुत्रिफलाराम्नाविडंगान्यथ चित्रकम् ॥ २ ॥
काश्मर्याणां च मूलानि पूतिकस्य त्वचस्य च।
कुट्टयेदिति सर्वाणि श्लक्ष्णपिष्टानि कारयेत् ॥ ३ ॥

अस्य मात्रां पिबेत्प्रातः शालिभिः पयसा हितैः ।
प्रमेहं मधुमेहं च मूत्रकृच्छ्रं भगंदरम् ॥ ४ ॥
आलस्यं चान्त्रवृद्धिं च कुष्ठरोगं विशेषतः ।
क्षयं चापि निहन्त्येतन्नाम सिंहामृतं घृतम् ॥ ५ ॥

रिंगणमूळ व गुळवेल शंभर शंभर तोळे घेऊन कुटून चार हजार शहाणव तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत चौसष्ट तोळे तूप व सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडे, बेहडे, आवळकाठी, रास्ना, वावडिंगें, चित्रकमूळ, शिवणीचें मूळ, करंजाची साल व दालचिनी ह्यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें व तें प्रातःकाळीं सेवन करून वर दूधभात खावा. म्हणजे प्रमेह, मधुमेह, मूत्रकृच्छ्र, भगंदर, आळस, अंत्रवृद्धि, कुष्टरोग व क्षय ह्यांचा तें नाश करितें. ह्याला सिंहामृत घृत म्हणतात.

हरिद्रादि तेल.

निशारसं चतुष्प्रस्थं द्विप्रस्थक्षीरसंयुतम् ।
कुष्ठाश्वगन्धालशुननिशापिप्पलिकल्कितम् ।
विपक्वं तिलजप्रस्थं मेहानां विंशतिं जयेत् ॥ १ ॥

हळदीचा काढा दोनशें छप्पन्न तोळे, दूध एकशें अठ्ठावीस तोळे, व कोष्ट, अश्वगंध, लसूण, हळद व पिंपळी ह्यांचा कल्क घालून तिळाचें तेल सिद्ध करावें. हें वीस प्रकारच्या मेहांचा नाश करितें.

लेपन.

क्षीरमौदुम्बरं यत्नाद्वाकुचीं च प्रयोजयेत् ।
पिटिकासु समस्तासु लेपनं संप्रशान्तये ॥ १ ॥

प्रमेहाच्या सर्व प्रकारच्या पुळ्या बऱ्या होण्याकरितां उंबराचा चीक व बावच्या ह्यांचा लेप करावा.

रसायनें.

हरिशंकर रस.

सूताभ्रमामलजलैः सप्तवारं विभावयेत् ।
हरिशंकरसंज्ञः स्याद्रसः सर्वप्रमेहनुत् ॥ १ ॥

रससिंदूर व अभ्रकभस्म ह्यांचा आवळ्याच्या रसांत सात दिवस खल करावा. म्हणजे हरिशंकर रस तयार होतो. हा सर्व प्रमेहाचा नाश करतो.

मेघनादरस.

सूतं कान्तं गन्धतीक्ष्णं ताप्यं व्योषं फलत्रिकम् ।
शिलाजतुशिलांकोलबीजं रात्रिकपित्थकम् ॥ १ ॥
त्रिःसप्तकृत्वो भृङ्गाद्भिर्भावयेन्निष्कसंज्ञकः ।
मधुना मेघनादोऽयं सर्वमेहान्विनाशयेत् ॥ २ ॥

पारा, कांतभस्म, गंधक, सुवर्णमाक्षीक, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, शिलाजित, मनशीळ, अंकोलाचें बीं, हळद, कवठ हीं औषधें समभाग एकत्र करून त्याला माक्याच्या रसाच्या एकवीस भावना द्याव्या; नंतर तो तीन मासे प्रमाणानें मधाबरोबर खावा. हा मेघनादरस सर्व प्रमेहांचा नाश करतो.

महानिम्बस्य बीजानि पेषयेत्तण्डुलाम्बुना ।
सघृतान्यचिराद्धन्युः पानान्मेहांश्चिरोत्थितान् ॥ ३ ॥

बकाण्या लिंबाच्या बिया तांदुळाच्या धुवणांत वाटून तुपाबरोबर खाव्या. म्हणजे त्या फार दिवसाच्या प्रमेहाचा त्वरित नाश करतात.

मेहकुंजरकेसरीरस.

रसगन्धायसाभ्राणि नागवङ्गौ सुवर्णकम् ।
वज्रकं मौक्तिकं सर्वमेकीकृत्व विचूर्णयेत् ॥ १ ॥
शतावरीरसेनैव गोलकं शुष्कमातपे ।
बद्ध्वा शुष्कं तमुद्धृत्य शरावे सुदृढे क्षिपेत् ॥ २ ॥
संधिलेपं मृदा कुर्याद्दत्वायां गोमयाग्निना ।
पुटेद्यामचतुःसंख्यमुद्धृत्य स्वाङ्गशीतलम् ॥ ३ ॥
श्लक्ष्णखल्वे विनिक्षिप्य गोलं तं मर्दयेद् दृढम् ।
देवब्राह्मणपूजां च कृत्वा धृत्वाऽथ कूपिके ॥ ४ ॥
खादेद्वल्लद्वयं प्रातः शीतं चानु पिबेज्जलम् ।
अष्टादश प्रमेहांश्च जयेन्मासोपयोगतः ॥ ५ ॥
तुष्टिं तेजो बलं वर्णशुक्रवृद्धिं च दारुणम् ।
अग्नेर्बलं वितनुते मेहकुञ्जरकेसरी ।
दिव्यं रसायनं श्रेष्ठं नात्र कार्या विचारणा ॥ ६ ॥

पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, नागभस्म, वंगभस्म, सुवर्णभस्म, हिऱ्याचें भस्म व मौक्तिकभस्म ह्या सर्वांचा एकत्र खल करावा. आणि शेवरीच्या रसानें मर्दन करून गोळा करून उन्हांत वाळवावा. नंतर शरावसंपुटांत घालून संधिलेप करून खळग्या-

मध्यें गाईच्या शेणामध्यें चार प्रहर अग्नि द्यावा; आणि स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. आणि खलांत घालून बारीक खल करून देवब्राह्मणादिकांची पूजा करून कुपींत भरून ठेवावा. हा रोज प्रातःकाळीं दोन वालप्रमाणें सेवन करून त्यावर थंड पाणी प्यावें. हा एक महिनाभर सेवन केला असतां अठरा प्रकारच्या प्रमेहांचा नाश करतो. समाधानी, तेज, बळ, कांति व अत्यंत शुक्रवृद्धि देतो. हा मेहकुंजर केसरी नांवाचा रस जठराग्नीची शक्ति वाढवितो. हें श्रेष्ठ असें दिव्य रसायन आहे, ह्याबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं.

पंचलोहरसायन.

मृताभ्रकान्तलोहानां नागवंगौ विशोधितौ।
यथोत्तरं भागवृद्ध्या खल्वमध्ये विनिक्षिपेत् ॥ १ ॥
तलपोटेन वाराह्या शतावर्या हिमाम्बुना।
भावनाऽत्र प्रकर्तव्या यामं यामं पृथक्पृथक् ॥ २ ॥
चणमात्रां वटीं कृत्वा नवनीतेन सेवयेत्।
प्रातरुत्थाय विधिना सर्वमेहकुलान्तकः ॥ ३ ॥
शाल्यन्नं सपटोलं च तण्डुलीयकवास्तुकम्।
मत्स्याक्षीमुद्गयूषं च अपक्वकदलीफलम् ॥ ४ ॥
अर्शांसि ग्रहणीदोषं मूत्रकृच्छ्राश्मरीप्रणुत्।
कामलापाण्डुशोफांश्च अपस्मारक्षतक्षयान्।
रक्तकासविनाशे स्यात्पञ्चलोहरसायनम् ॥ ५ ॥

अभ्रकभस्म, कांतभस्म, लोहभस्म, शुद्ध केलेलें शिसें, शुद्ध केलेलें वंग, ह्यांचें भस्म हे जिन्नस उत्तरोत्तर भागवृद्धीनें घेऊन खलांत घालून ताडाचें मूळ किंवा देवनाळाचा गड्डा, डुकरकंद, शतावरी व वाळा ह्यांच्या रसाच्या एक एक प्रहर प्रहर भावना द्याव्या. नंतर हरभऱ्याएवढी गोळी करून ती लोण्याबरोबर प्रातःकाळीं सेवन करावी. हा मेहांतकरस सर्व मेहांचा नाश करतो. याजवर साळीचा भात, पडवळ, तांदुळजाची भाजी, चाकवत, चुका, मुगाचें कढण, केळीचें हिरवें (न पिकलेलें) फळ हे पदार्थ पथ्याला खावे. म्हणजे मूळव्याध, संग्रहणी, मूत्रकृच्छ्र, मुतखडा ह्यांचा नाश

करितो. तसेंच कावीळ, पांडुरोग, सूज, अपस्मार, उरःक्षत, क्षय, रक्तपित्त व खोकला ह्यांचाही नाश करितो; ह्याला पंचलोहरसायन असें म्हणतात.

मेहारि रस.

वंगभस्म मृतं सूतं तुल्यं क्षौद्रे विमर्दयेत् ।
द्विगुञ्जो लेहयेन्नित्यं हन्ति मेहांश्चिरंतनान् ॥ ६ ॥

वंगभस्म व रससिंदूर दोनी समभाग घेऊन मधांत खल करावा. आणि नित्य दोन गुंजा द्यावा. हा फार दिवसांच्या मेहांचा नाश करतो.

चंद्रकला वटी.

एला सकर्पूरसिता सधात्री जातीफलं केसरशाल्मली च ।
सूतेन्द्रवंगायसभस्म सर्वमेतत्समानं परिभावयेच्च ॥ १ ॥
गुडूचिकाशाल्मलिकाकषायैर्निष्कार्धमानं मधुना ततश्च ।
बद्धा वटीं चन्द्रकलेतिसंज्ञां सर्वप्रमेहेषु नियोजयेत्ताम् ॥ २ ॥

वेलदोडे, कापूर, मनशीळ, आवळकाठी, जायफळ, नाकेशर, सावरीची साल, पारदभस्म, वंगभस्म व लोहभस्म हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांना गुळवेल व शेवरी ह्यांच्या काढ्याच्या भावना द्याव्या. नंतर त्याच्या दीड दीड माशाच्या गोळ्या कराव्या, आणि त्या सर्व प्रमेहांवर मधाशीं योजाव्या.

वंगेश्वर रस.

रसमेकं त्रयो वंगं वंगसाम्यं तु गन्धकम् ।
मर्दयेद्दिनमेकं तु कुमार्याः स्वरसे बुधः ॥ १ ॥
संस्थाप्य गोलकं भाण्डे रोधयेत्सुदृढं मुखम् ।
पाचयेद्वालुकायन्त्रे दिनमेकं दृढाग्निना ॥ २ ॥
स्वांगशीतलमादाय संपूज्य द्विजदेवताः ।
पिप्पलीमधुना युक्तं सर्वमेहेषु योजयेत् ॥ ३ ॥
क्षीरान्नं योजयेत्पथ्यमम्ललवणवर्जितम् ।
रसो वंगेश्वरो नाम सर्वमेहनिकृन्तनः ॥ ४ ॥

पारा एक भाग, शुद्ध वंग तीन भाग, शुद्ध गंधक तीन भाग ह्यांचा कोरफडीच्या रसांत एक दिवस खल करावा. नंतर गोळा करून भांड्यांत घालून तोंड बंद करावें; आणि वालुकायंत्रांत एक

दिवस पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून देवब्राह्मणांची पूजा करून त्याची मध व पिंपळीशीं सर्व मेहांवर योजना करावी. ह्याजवर दूधभाताचें पथ्य करावें. आंबट पदार्थ व मीठ वर्ज करावें. ह्याला वंगेश्वर रस म्हणतात. हा सर्व प्रमेहांचा नाश करितो.

महावंगेश्वर.

वङ्गं कान्तं च गगनं हेमपुष्पं समं समम् ।
कुमारीरसतो भाव्यं सप्तवारं भिषग्वरैः ॥ १ ॥
एष वङ्गेश्वरो नाम प्रमेहान्विंशतिं जयेत् ।
मूत्रकृच्छ्रं सोमरोगं पाण्डुरोगं महाश्मरीम् ॥
रसायनमिदं श्रेष्ठं नागार्जुनविनिर्मितम् ॥ २ ॥

वंगभस्म, कांतभस्म, अभ्रकभस्म व धोतऱ्याचें बीं हीं औषधें समभाग घेऊन त्याला सात दिवस कोरफडीच्या रसाच्या भावना द्याव्या. हा वंगेश्वर रस वीस प्रकारच्या प्रमेहांला जिंकतो. मूत्रकृच्छ्र, सोमरोग, पांडुरोग व मोठा मूतखडा ह्यांचाही नाश करतो. हें श्रेष्ठ रसायन नागार्जुनानें सांगितलें आहे.

वंगभस्माचा प्रयोग व गुण.

वङ्गं शिलाजतुयुतं तु मतं प्रमेहे धातुक्षये दुर्बलनष्टशुक्रयोः ।
अभ्रेण युक्तं तु सुतप्रदं स्याज्जातीफलार्ककरहाटलवंगयुक्तम् ॥ १
शाल्मलीत्वग्रसोपेतं सक्षौद्ररजनीरजः ।
वङ्गभस्म हरेन्मेहान्पञ्चानन इव द्विपान् ॥ २ ॥
गुडूचीसारमधुना वंगभस्म प्रमेहनुत् ।
नागभस्म तथैवापि सर्वमेहविनाशनम् ॥ ३ ॥
पयो गवां सखण्डकं त्रिकण्टवंगवल्लकं
प्रमेहभल्लकं परं बुधा वदन्ति सादरम् ॥ ४ ॥

प्रमेह, धातुक्षय, दुर्बलता व नष्टशुक्रता ह्यांजवर वंगभस्म शिलाजिताबरोबर द्यावें, असें म्हणतात. अभ्रकभस्म, जायफळ, ताम्रभस्म, सुवर्ण व लवंग ह्यांजबरोबर वंगभस्म द्यावें. तें पुत्रदायक आहे. शेवरीच्या सालीचा रस, मध व हळदीचें चूर्ण ह्यांजबरोबर वंगभस्म घेतलें असतां सिंह जसा हत्तीचा नाश करतो, त्याप्रमाणें हें प्रमेहाचा नाश करतें. गुळवेलीचें सत्व व मध ह्यांजबरोबर वंगभस्म द्यावें. तेंही प्रमेहाचा नाश करितें. त्याचप्रमाणें नागभस्मही प्रमेह-

नाशक आहे. गाईचें दूध, खडीसाखर, सराट्याचें चूर्ण ह्यांशीं वंग-भस्म दोन वाल घ्यावें. तें प्रमेहाचें नाशक आहे, असें सुज्ञ आदर-पूर्वक म्हणतात.

वंगाचे गुण.

तिक्तकं सलवणं च भेदकं पाण्डुजन्तुशमनं सुशीतलम् ।
मेहदाहशमनं च कान्तिदं वंगमाहुरिति मारुतापहम् ॥ १ ॥

वंगभस्म कडु, खारट, भेदक (मलभेदक), पांडुरोग, जंतु-नाशक, फार थंड, प्रमेह व दाह ह्यांचा नाश करणारें, कांतिदायक व वातनाशक आहे.

अभ्रकाचा योग.

निश्चन्द्रमभ्रकं भस्म सवराजनीरजः ।
मधुना लीढमचिरात्प्रमेहान्विनिवर्तयेत् ॥ १ ॥

निश्चंद्र अभ्रकभस्म त्रिफळा, हळदीचें चूर्ण व मध ह्यांशीं घ्यावें. म्हणजे रोगी प्रमेहापासून मुक्त होतो.

नागभस्मयोग.

शुद्धस्य च मृतस्याहे रजो वल्लमितं लिहेत् ।
सनिशामलकक्षौद्रं सर्वमेहप्रशान्तये ॥ १ ॥

सर्व प्रमेहांची शांति होण्याकरितां एक वाल नागभस्म आवळ-काठीचें चूर्ण, हळदीचें चूर्ण व मध ह्यांजबरोबर घ्यावें.

गंधकयोग.

गन्धकं गुडसंयुक्तं कर्षं भुक्त्वा पयः पिबेत् ।
विंशतिस्तेन नश्यन्ति प्रमेहाः पिटिका अपि ॥ १ ॥

एक तोळाभर गंधक गुळाशीं खाऊन वर दूध घ्यावें. म्हणजे त्या योगानें वीस प्रमेह व प्रमेहपीटिकाहि दूर होतात.

शिलाजतुयोग.

शिलाजतुरसं पीत्वा प्रातः क्षीरसितायुतम् ।
मुच्यते सर्वमेहेभ्यस्त्रिसप्तदिवसैर्नरः ॥ १ ॥

प्रातःकाळीं दूध व खडीसाखरेशीं शिलाजित घ्यावा. ह्याप्रमाणें एकवीस दिवस केलें असतां रोगी सर्व प्रमेहांपासून मुक्त होतो.

सुवर्णमाक्षिकभस्मयोग.

माक्षिकं मधुना लीढं मेहं हरति सर्वथा ।
गुडूचीसत्त्वसंयुक्तं पित्तमेहं व्यपोहति ॥ १ ॥

माक्षिक मधाशीं घ्यावें. तें मेहाचा सर्वथैव नाश करितें. गुळवेलीचें सत्व व मध ह्यांशीं घ्यावें. तें पित्तप्रमेहाचा नाश करितें.

वसंतकुसुमाकर रस.

पृथग्द्वौ हाटकं चन्द्रं त्रयो वंगाहिकान्तजम् ।
चत्वारः सूतमभ्रं च प्रवालं मौक्तिकं तथा ॥ १ ॥
भावना गव्यदुग्धेक्षुवासाश्रीह्रिजलैर्निशा ।
मोचकन्दरसैः सप्त क्रमाद्भाव्यं पृथक्पृथक् ॥ २ ॥
शतपत्ररसेनैव मालत्याः कुसुमैस्तथा ।
पश्चान्मृगमदैर्भाव्यः सुसिद्धो रसराड् भवेत् ॥ ३ ॥
कुसुमाकरविख्यातो वसन्तपदपूर्वकः ।
वल्लद्वयमितः सेव्यः सिताज्यमधुसंयुतः ॥ ४ ॥
वलीपलितहृन्मेध्यः कामदः सुखदः सदा ।
मेहघ्नः पुष्टिदः श्रेष्ठः परं वृष्यो रसायनम् ॥ ५ ॥
आयुर्वृद्धिकरं पुंसां प्रजाजननमुत्तमम् ।
क्षयकासतृषोन्मादश्वासरक्तविषार्तिजित् ॥ ६ ॥
सिताचन्दनसंयुक्तमम्लपित्तादिरोगजित् ।
शुक्रपाण्ड्वामयाञ्शूलान्मूत्राघाताश्मरीं हरेत् ॥ ७ ॥
योगवाहि त्विदं सेव्यं कान्तिश्रीबलवर्धनम् ।
सुसात्म्यमिष्टभोजी च रमयेत्प्रमदाशतम् ॥ ८ ॥
मदनं मदयेन्मदमुज्ज्वलयन्प्रमदानिवहानतिविह्वलयन् ।
सुरतैः सुखदैर्गतिविच्यवनैर्भवसारजुषामयमेव सुहृत् ॥९॥

सुवर्णभस्म दोन भाग, रौप्यभस्म दोन भाग, वंगभस्म तीन भाग, नागभस्म तीन भाग, कांतभस्म तीन भाग, पारदभस्म चार भाग, अभ्रकभस्म चार भाग, प्रवाळभस्म चार भाग आणि मौक्तिकभस्म चार भाग ह्यांचा एकत्र खल करून गाईचें दूध, उसाचा रस, अडुळशाचा रस, चंदन, वाळा, काळा वाळा, हळद, केळीच्या कांद्यांचा रस ह्यांच्या रसानें अनुक्रमें वेगवेगळ्या सात भावना द्याव्या. शेवतीं, मालतीची फुलें ह्यांच्या रसाच्याही सात सात भावना द्याव्या. नंतर कस्तुरीच्या पाण्याच्या

सात भावना द्याव्या. म्हणजे हा रसराज तयार होतो. हा वसंत कुसुमाकर ह्या नांवानें विख्यात आहे. हा दोन वालप्रमाणें तूप, खडीसाखर व मध ह्यांजबरोबर घ्यावा. हा वलिपलितनाशक, बुद्धिवर्धक, कामोत्पत्ति करणारा, नेहमीं सुखदायक, प्रमेहनाशक, पौष्टिक, श्रेष्ट, अतिशय वृष्य, रसायन, आयुष्यवर्धक, संतति दायक, क्षय, खोकला, तहान, उन्माद, श्वास, रक्तपित्त व विष-बाधा ह्यांना जिंकतो. साखर व चंदन ह्यांशीं घेतला असतां आम्ल-पित्त वगैरे रोगांना जिंकतो. शरीराची पांडुरकी (रक्तहीनता) पांडुरोग, मूत्राघात व अश्मरी ह्यांचा नाश करतो. हा योगवाही आहे. ह्याचें सेवन करावें; म्हणजे कांति, लक्ष्मी व बल हीं वाढ तात. ह्याजवर उत्तम प्रकारचें प्रकृतीला मानवणारें असें भोजन करावें. म्हणजे शेंकडों स्त्रियांशीं समागम करितां येतो. ह्याचें सेवन करणारा मनुष्य मदनालाही कमीपणा आणील. मदोन्मत्त होऊन प्रमदांनाही विव्हळ करील. सुरति व सुखदपणा ह्या गुणांनीं हा संसारी मनुष्याचा मित्र आहे.

जलजामृत रस.

तवक्षीरं शिला धातुर्वङ्गं कुण्डलिसत्त्वकम् ।
मेहारिबीजसंयुक्तं विदारीजीवनीरसैः ॥ १ ॥
भावयेत्तत्त्रिवारं तु सितोपलसमन्वितम् ।
जलजामृतविख्यातो रसोऽयं मेहकृच्छ्रनुत् ॥ २ ॥

तवकील, शिलाजित, वंगभस्म, गुळवेलीचें सत्व, पांढऱ्या गोकर्णीचें बीं व खडीसाखर ह्यांचा एकत्र खल करून भुईकोहाळा व हरणदोडी ह्यांच्या रसाच्या तीन तीन भावना द्याव्या. हा जलजामृत नावांचा रस म्हणुन प्रख्यात आहे. हा प्रमेह व मूत्रकृच्छ्र ह्यांचा नाश करतो.

प्रमेहपिटिकानां तु प्राक्कार्यं रक्तमोक्षणम् ।
पाटनं तु विपक्वानां तासां पाने प्रशस्यते ॥ ३ ॥
क्वाथो व्रणघ्नोऽत्र बस्तिर्मूत्रैस्तीक्ष्णैर्विरेचनम् ।
व्रणप्रतिक्रिया सर्वा कार्याऽत्रापि भिषग्वरैः ॥ ४ ॥

प्रमेह पीटिकांतील प्रथम रक्त काढावें. आणि ज्या पिकल्या

असतील त्या फोडाऱ्या. अशा प्रकारच्या प्रमेहपीटिकांवर व्रणकाढा द्यावा. गोमूत्रादिकांचा बस्ती द्यावा. तीक्ष्ण औषधांनीं विरेचन द्यावें आणि व्रणावरील सर्व उपचार करावे.

पथ्यापथ्य.

श्यामाककोद्रवोद्दालगोधूमचणकाढकी।
शालिमुद्गकुलित्थाश्च मेहिनां देहिनां हिताः ॥ १ ॥
मेदोघ्ना बद्धमूत्राश्च समाः सर्वेषु धातुषु।
यवास्तस्मात्प्रशस्यन्ते मेहेषु च विशेषतः ॥ २ ॥
तिक्तशाकं पटोलानि जाङ्गलामिषजा रसाः।
सैन्धवं मरिचं चैव मेहिनामाहरेद्भिषक् ॥ ३ ॥

सावे, हरीक, रानहरीक, गहू, हरभरे, तुरी, साळी, मूग, हुलगे हीं धान्यें प्रमेहाच्या रोग्याला हितकारक आहेत. सातु हे मेहनाशक मूत्रबद्धक आणि सर्व धातूंना समान असल्यामुळें विशेषतः ते प्रमेहावर प्रशस्त आहेत. कडुभाज्या, पडवळ, जांगलमांसांचे रस, सैंधव व मिरें हे पदार्थही मेहावर प्रशस्त आहेत.

सदाऽऽसनं दिवा निद्रा नवान्नानि दधीनि च।
मूत्रवेगं धूमपानं स्वेदं शोणितमोक्षणम् ॥ ४ ॥
सौवीरकं सुरा सूक्तं तैलं क्षारं घृतं गुडम्।
अम्लेक्षुरसपिष्टान्नानूपमांसानि वर्जयेत् ॥ ५ ॥

नेहमीं बसून राहणें. दिवसा झोंप घेणें, नवें अन्न (नवीं धान्यें), दहीं, मूत्राचा वेग धारण करणें, धूम्रपान, घाम काढणें, रक्त काढणें, सौवीर, सुरा, सूक्त वगैरे मद्याचे भेद, तेल, क्षार, तूप, गूळ, आंबट पदार्थ, ऊंस, उंसाचा रस, पिठाचें अन्न व अनूप मांस हे पदार्थ प्रमेही मनुष्यानें वर्ज करावे.

बहुमूत्ररोगनिदान.

कार्श्यं स्वेदोऽङ्गगन्धः करपदरसनानेत्रकर्णोपदेहः
कासः शैथिल्यमङ्गेऽरुचिरपि पिटिकाः कण्ठताल्वोष्ठशोषः।
दाहः शीतप्रियत्वं धवलिमतनुता श्रान्तता पीतमूत्रं
मूत्रस्था मक्षिकाद्याश्चिरमपि बहुमूत्राख्यरोगे प्रवृद्धे ॥ १ ॥

कृशत्व, अंगाला घाम येणें, अंगाला दुर्गंधी, हात, पाय, जीभ,

डोळे व कान हे अवयव लेपटल्यासारखे (ओलसर चिकट) वाटणें, खोकला, अंगाला शिथिलपणा, अरुचि, अंगावर पुळ्या उठणें, गळा, टाळा व ओठ ह्यांना कोरड, दाह, थंड पदार्थांची इच्छा, अंगाला पांढुरपणा, थकवा, लघवी पिवळी होणें हीं लक्षणें बहुमूत्र-प्रमेहामध्यें होतात. आणि बहुमूत्ररोग फार वाढला असतां त्या रोग्याच्या मुतावर माशा फार वेळ बसतात.

वाग्भटांतील आधार.

स्वेदोऽङ्गगन्धः शिथिलत्वमङ्गे शय्यासनस्वप्नसुखाभिलाषः ।
हृन्नेत्रजिह्वाश्रवणोपदेहो घनांगता केशनखातिवृद्धिः ॥ १ ॥
शीतप्रियत्वं गलतालुशोषो माधुर्यमास्ये करपाददाहः ।
भविष्यतो मेहगणस्य लिङ्गं मूत्रेऽभिधावन्ति पिपीलिकाश्च ॥२॥

घाम, आंगाला दुर्गंधी, अंगाला शिथिलपणा, बसणें, निजणें व झोंप घेणें ह्यांविषयीं अतिशय इच्छा, हृदय, नेत्र, जीभ, कान हे अवयव लेपटल्यासारखे होणें, अंग जड होणें, केस व नखें अतिशम वाढणें, थंड पदार्थ प्रिय वाटणें, गळा, टाळा ह्यांना कोरड, तोंडाला गोडपणा, हातापायाची आग आणि मुताला मुंग्या लागणें हीं लक्षणें प्रमेह होण्यापूर्वीं होतात.

दृष्ट्वा प्रमेहं मधुरं सपिच्छं मधूपमं स्याद् द्विविधो विचारः ।
संतर्पणाद्वा कफसंभवः स्यात्क्षीणेषु दोषेष्वनिलात्मको वा ॥३॥

मधाप्रमाणें मधुर व बुळबुळीत लघवी पाहून हा प्रमेह पौष्टिक आहारादिकांनीं कफ वाढल्यामुळें झाला आहे कां दोष क्षीण झाल्यामुळें वात वाढल्यामुळें झाला आहे, असे दोन विचार मनांत येतात.

सपूर्वरूपाः कफपित्तमेहाः क्रमेण ये वातकृताश्च मेहाः ।
साध्या न ते पित्तकृतास्तु याप्याः साध्यास्तु मेदो यदि नातिदुष्टम्

सर्व प्रकारच्या पूर्वरूपानें युक्त असे कफजन्य व पित्तजन्य मेह तसेंच क्रमानें वातमेहाच्या स्वरूपाला जाणारे मेह हे साध्य होत नाहींत. पित्तजन्य मेह याप्य असतात. आणि ज्या मेहांमध्यें मेद फार दुष्ट झाला नाहीं असे मेह साध्य होतात.

बहुमूत्राची चिकित्सा.

त्रिफलावेणुपत्राब्दपाठामधुयुतैः कृतः ।
कुम्भयोनिरिवाम्भोधिं बहुमूत्रं तु शोषयेत् ॥ १ ॥

त्रिफळा, वेळूचीं पानें, नागरमोथे, पहाडमूळ, ह्यांचा काढा मध घालून घेतला असतां तो, अगस्तीनें जसा समुद्र आटविला त्याप्रमाणें बहुमूत्राला आटवितो.

तारकेश्वर रस.

मृतं सूतं मृतं वंगं मृतं लोहाभ्रकं समम् ।
मर्दयेन्मधुना सार्धं रसोऽयं तारकेश्वरः ।
माषैकं लेहयेत्क्षौद्रैर्बहुमूत्रापनुत्तये ॥ १ ॥

पारदभस्म, वंगभस्म, लोहभस्म व अभ्रकभस्म हीं भस्में समभाग घेऊन त्यांचा मधांत खल करावा. ह्याला तारकेश्वर रस म्हणतात. बहुमूत्राचा नाश होण्याकरितां हा एक मासाभर मधाशीं चाटावा.

आनंदभैरववटी.

विषोषणकणाटङ्कहिंगुलैः समचूर्णकः ।
आनन्दभैरवस्यास्य गुञ्जाऽतीसारमेहनुत् ॥ १ ॥

बचनाग, मिरें, पिंपळी, टाकणखाराची लाही, हिंगूळ, ह्यांचें समभाग चूर्ण करावें, ह्याला आनंदभैरववटी म्हणतात. हा एक गुंजभर अतिसार व मेह ह्यांचा नाश होण्याकरितां द्यावा.

मेदोरोगनिदान.

अव्यायामदिवास्वप्नश्लेष्मलाहारसेविनः ।
मधुरोऽन्नरसः प्रायः स्नेहान्मेदो विवर्धते ॥ १ ॥
मेदसाऽऽवृतमार्गत्वात्पुष्यन्त्यन्ये न धातवः ।
मेदस्तु चीयते तस्मादशक्तः सर्वकर्मसु ॥ २ ॥

व्यायाम न करणारा, दिवसा झोप घेणारा व कफकारक आहार करणारा अशा मनुष्याच्या खाल्लेल्या अन्नाचा रस मधुर होतो. आणि त्याच्या स्निग्धत्वामुळें प्रायः मेद वाढतो. त्या मेदानें स्रोतसें भरून टाकल्यामुळें अन्य धातूंचें पोषण होत नाहीं. त्यामुळें शरीरांत मेदच वाढून राहतो. आणि त्या कारणानें मेदस्वी मनुष्य सर्व कर्मांविषयीं अशक्त होतो.

मेदस्वी मनुष्याचें लक्षण.

क्षुद्रश्वासतृषामोहस्वप्नक्रथनसादनैः ।
युक्तः क्षुत्स्वेददौर्गन्ध्यैरल्पप्राणोऽल्पमैथुनः ॥ २ ॥

क्षुद्रश्वास, तहान, मोह, झोंप फार येणें, उच्छ्वासाचा अवरोध, ग्लानि, भूक लागणें आणि अंगाला घाम व दुर्गंधी येणें, हीं लक्षणें मेदस्वी मनुष्याला होतात. तो अशक्त होतो व त्याच्यानें फार मैथुन करवत नाहीं.

मेदस्तु सर्वभूतानामुदरेष्वेव तिष्ठति ।
अत एवोदरे वृद्धिः प्रायो मेदस्विनो भवेत् ॥ ३ ॥
मेदसाऽऽवृतमार्गत्वात्कोष्ठे वायुर्विशेषतः ।
चरन्संधुक्षयत्यग्निमाहारं शोषयत्यपि ॥ ४ ॥
तस्मात्स शीघ्रं जरयत्याहारं कांक्षयत्यपि ।
विकारांश्चाश्नुते घोरान्कांश्चित्कालव्यतिक्रमात् ॥ ५ ॥
एतावुपद्रवकरौ विशेषादग्निमारुतौ ।
एतौ हि दहतः स्थूलं वनं दावानलो यथा ॥ ६ ॥
मेदस्यतीव संवृद्धे सहसैवानिलादयः ।
विकारान्दारुणान्कृत्वा नाशयन्त्याशु जीवितम् ॥ ७ ॥

मेद हा सर्व प्राण्यांच्या पोटांतच असतो, ह्यास्तव मेदस्वी मनुष्याच्या उदराची प्रायः वृद्धि होते. मेदस्वी मनुष्याच्या वायूचा मार्ग रोधून टाकल्यामुळें वायु कोठ्यांत संचार करीत अग्नीला प्रदीप्त करतो. आणि आहाराला शोषून टाकतो. त्यामुळें तो आहाराचें लवकर पचन करतो व पुनः आहाराची इच्छा करतो. आहार मिळण्यास उशीर झाला असतां भयंकर विकार उत्पन्न करतो. ह्याप्रमाणें मेदस्वी मनुष्याला उपद्रव करणारे वायु व जठराग्नि हे दावाग्नि जसा अरण्य दग्ध करून टाकतो, त्याप्रमाणें त्या स्थूळ (मेदस्वी) मनुष्याचा नाश करून टाकतात. मेदाची अतिशय वृद्धि झाली असतां वातादि दोष अकस्मात् भयंकर विकार उत्पन्न करून जीविताचा त्वरित नाश करितात.

स्थूलाचें लक्षण.

मेदोमांसातिवृद्धत्वाच्चलस्फिगुदरस्तनः ।
अयथोपचयोत्साहो नरोऽतिस्थूल उच्यते ॥ ८ ॥

स्थूले स्युर्दुस्तरा रोगा विसर्पाः सभगंदराः ।
ज्वरातिसारमेहार्शःश्लीपदापचिकामलाः ॥ ९ ॥

मेद व मांस अतिशय वाढल्यामुळें त्या स्थूल मनुष्याचे कुले, पोट व स्तन हीं चालतांना लटलट हालतात. अंग बेढब दिसतें. त्याला हुशारीही असावी तशी नसते. अशा मनुष्याला अतिस्थूल म्हणतात. अशा प्रकारच्या स्थूल मनुष्याला विसर्प, भगंदर, ज्वर, अतिसार, प्रमेह (मधुमेह), मूळव्याध, श्लीपद, अपची (एक-प्रकारच्या गांठी) व कावीळ असे भयंकर रोग होतात.

कृशलक्षण.

शुष्कस्फिगुदरग्रीवो धमनीजालसंततः ।
त्वगस्थिशोषोऽतिकृशः स्थूलपर्वा नरः स्मृतः ॥ १० ॥

कुले, पोट, मान हीं शुष्क होतात. त्याच्या अंगावरील शिरा दिसूं लागतात. त्वचा व हाडें शुष्क झाल्यामुळें अति कृश मनुष्याचीं पेरें मोठीं दिसतात.

मेदोरोगचिकित्सा.

क्षौद्रेण त्रिफलाक्वाथः पीतो मेदोहरः स्मृतः ।
शीतीभूतं तथोष्णाम्बु मेदोहृत्क्षौद्रसंयुतम् ॥ १ ॥
उष्णं भक्तस्य मण्डं वा पिबेत्कृशतनुर्भवेत् ।

त्रिफळ्याचा काढा मध घालून घ्यावा. तो मेदाचा नाश करतो. त्याचप्रमाणें तापवून थंड केलेलें पाणी मध मिसळून घ्यावें. तेंही मेदनाशक आहे. अथवा कढत कढत भाताची पेज घ्यावी म्हणजे शरीर सडपातळ होतें.

सचव्यजीरकव्योषहिंगुसौवर्चलानलाः ॥ २ ॥
मधुना सक्तवः पीता मेदोघ्ना वह्निदीपनाः ।
क्षारं वा तालपत्रस्य हिंगुयुक्तं पिबेन्नरः ।
मेदोवृद्धिविनाशाय भक्तमण्डसमन्वितम् ॥ ३ ॥

चवक, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, पादेलोण व सातू ह्याचें चूर्ण मधाशीं घ्यावें. हें अग्निदीपक व मेदनाशक आहे. किंवा मेदोवृद्धीचा नाश होण्याकरितां ताडाच्या पानाचा क्षार भाताच्या पेजेंतून हिंग घालून घ्यावा.

हरीतकीलोध्रमरिष्टपत्रपूतत्वचो दाडिमवल्कलं च ।
एषोऽङ्गरागः कथितोऽङ्गनानां जम्ब्वाः कषायश्च नराधिपानाम् ४

हिरडे, लोध्र, बाळंतलिंबाची पानें, करंजाची साल, डाळिंबाची साल ह्यांचें चूर्ण व जांभळीच्या सालीचा काढा ह्यांचें उटणें राजे लोक व स्त्रिया ह्यांच्याकरितां सांगितलें आहे. (हें अंगाचा दुर्गंध नाहींसा करितें.)

फलत्रिकं त्रिकटुकं सतैललवणान्वितम् ।
षण्मासादुपयोगेन कफमेदोनिलापहम् ॥ ५ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं व पिंपळी ह्यांचें चूर्ण एरंडेल तेल व सैंधव ह्यांजबरोबर सहा महिनेपर्यंत घ्यावें. तें कफ, मेद व वात ह्यांचा नाश करितें.

गुडूचीभद्रमुस्तानां प्रयोगस्त्रैफलस्तथा ।
तक्रारिष्टप्रयोगश्च प्रयोगो माक्षिकस्य च ॥ ६ ॥

गुळवेल व नागरमोथे ह्यांचें चूर्ण, त्रिफळ्याचें चूर्ण आणि तक्रारिष्ट ह्यांचे प्रयोग किंवा मधाचा प्रयोग मेदनाशक आहे.

त्र्यूषणादि लोह.

त्र्यूषणं त्रिफला चव्यं चित्रकं बिडमौद्भिदम् ।
बाकुची सैन्धवं चैव सौवर्चलमयोरजः ॥ १ ॥
माषमात्रमतश्चूर्णं लिहेदाज्यमधुप्लुतम् ।
अतिस्थौल्यमिदं चूर्णं निहन्त्यग्निविवर्धनम् ॥ २ ॥
मेदोघ्नं मेहकुष्ठघ्नं श्लेष्मव्याधिनिबर्हणम् ।
नाऽऽहारे नियमश्चात्र विहारे वा विधीयते ।
त्र्यूषणाद्यमिदं चूर्णं रसायनमनुत्तमम् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चवक, चित्रक, बिडलोण, सोरमीठ, बावच्या, सैंधव, पादेलोण, लोहभस्म, ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें; आणि तें एक मासाभर चूर्ण तूप व मध ह्यांशीं घ्यावें. हें अति स्थूलपणाचा नाश करितें, व अग्नीचें दीपन करितें. तसेंच मेह, मेद, कुष्ट, व कफ विकार ह्यांचा नाश करितें. ह्याजवर आहारविहारादिकांचा नियम नाहीं. हें त्र्यूषणादि चूर्ण उत्तम रसायन आहे.

नवकगुग्गुलु.

व्योषाग्निमुस्तात्रिफलाविडङ्गैर्गुग्गुलुं समम् ।
खादन्सर्वाञ्जयेद् व्याधीन्मेदःश्लेष्मामवातजान् ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रकमूळ, नागरमोथे, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व वावडिंग ह्यांचें चूर्ण व त्या चूर्णाबरोबरीनें गुग्गुळ घेऊन सर्वांचा एकत्र खल करुन गोळ्या करून ठेवाव्या. हा गुग्गुळ सेवन केला असतां तो मेद, कफ, व आमवातजन्य व्याधि ह्यांचा नाश करतो.

लेप व उटणीं.

हितो मोचरसो युक्तश्चूर्णैरुदधिफेनजैः ।
प्रलेपेन निहन्त्याशु देहदौर्गन्ध्यमुत्कटम् ॥ १ ॥

मोचरस व समुद्रफेन ह्यांचें चूर्ण अंगास लावावें. तें देहाच्या अत्यंत दुर्गंधीचा नाश करितें.

वासादलरसालेपाच्छङ्खचूर्णावचूर्णितात् ।
बिल्वपत्ररसो वाऽपि गात्रदौर्गन्ध्यनाशनः ॥ २ ॥

अडुळशाचा रस व शंखाचें चूर्ण अंगास लावावें, अथवा बेला-च्या पानाचा रस अंगास लावावा; तो अंगाची दुर्गंधी दूर करतो.

हरीतकीं तु संपिष्य गात्रमुद्वर्तयेन्नरः ।
पश्चात्स्नानं प्रकुर्वीत देहस्वेदप्रशान्तये ॥ ॥

अंगाचा घाम जाण्याकरितां हिरड्याचें चूर्ण अंगास लावून नंतर स्नान करावें.

चन्द्रांशुशीतलं लोध्रं शिरीषोशीरकेसरैः ।
उद्वर्तनं भवेद्ग्रीष्मे स्वेदोद्गमनिवारणम् ॥ ४ ॥

कापूर, कंकोळ, लोध्र, शिरसाचें बी, वाळा, व नाकेशर, ह्यांच्या चूर्णाची उटी ग्रीष्म ऋतूंत अंगास लावावी. ती घामाच्या उत्पत्तीचें निवारण करिते.

बब्बूलस्य दलैः सम्यग्वारिणा परिपेषितैः ।
गात्रमुद्वर्तयेत्पश्चाद्धरीतक्या सुपिष्टया ॥ ५ ॥
भूय उद्वर्तनं कृत्वा पश्चात्स्नानं समाचरेत् ।
प्रस्वेदान्मुच्यते क्षिप्रं ततस्त्वेवं समाचरेत् ॥ ६ ॥

बाभळीचीं पानें पाण्यांत वाटून अंगास लावावीं, नंतर वारंवार

हिरड्याचें चूर्ण लावावें, आणि त्यानंतर स्नान करावें. म्हणजे अंगाला घाम येण्याचा बंद होतो.

जम्बूदलार्जुनतरुप्रसवैः सकुष्ठै
रुद्वर्तनं प्रकुरुते प्रतिवासरं यः।
प्रस्वेदबिन्दुकणिकानिकरानुषङ्गाद्-
दुर्गन्धिता वपुषि तस्य पदं धत्त ॥ ७ ॥

जांभळीचीं पानें अर्जुनसादड्याचीं फुलें, व कोष्ट ह्यांची उटी प्रतिदिवशीं जो अंगास लावतो, त्याच्या शरीराला घामाचा थेंब किंवा दुर्गंधी स्पर्शदेखील करीत नाहीं.

शिरीषलामज्जकहेमलोध्रैस्त्वग्दोषसंस्वेदहरः प्रघर्षः।
प्रियंगुलोध्राभयचन्दनानि शरीरदौर्गन्ध्यहरः प्रदिष्टः ॥ ८ ॥

शिरसाचीं फुलें, वाळा, नाकेशर, व लोध्र ह्यांचें चूर्ण अंगास लावावें. तें त्वचेचा दोष व घाम ह्यांचा नाश करितें. गव्हला, लोध्र, हिरडे, व चंदन ह्यांचा लेप शरीराची दुर्गंधी नाहींशी करितो.

वृंदांतील त्रिफलादि तेल.

त्रिफलातिविषामूर्वात्रिवृच्चित्रकवासकैः।
निम्बारग्वधषड्ग्रन्थासप्तपर्णनिशाद्वयैः ॥ १ ॥
गुडूचीन्द्रयवाकृष्णाकुष्ठसर्षपनागरैः।
तैलमेभिः समं पक्वं सुरसादिरसप्लुतम् ॥ २ ॥
पानाभ्यञ्जनगण्डूषनस्यबस्तिषु योजितम्।
स्थूलतालस्यकण्ड्वादि जयेत्कफकृतान्गदान् ॥ ३ ॥

त्रिफळा, अतिविष, मोरवेल, तेड, चित्रकमूळ, अडूळसा, बाळंतलिंबाचा पाला, बाहव्याचा पाला, अतिविष, सातविणीची साल, हळद, दारुहळद, गुळवेल, इंद्रजव, पिंपळी, कोष्ट, शिरस, व सुंठ ह्यांचा कल्क समभाग आणि सुरसादि गणांतील औषधांचा

१. काळी व पांढरी तुळस, काळा पांढरा अजवला, वावडिंग, मरवा, उंदीरकानी, कायफळ, कासाविंदा, काळे शिरस, नाय, भारंगी, मधुमाधवी, कांगोणी, मुंडी, बकाणानिंब, रोहिस गवत, व निर्गुडी ह्या औषधांच्या समुदायाला सुरसादि गण म्हणतात.

रस घालून तेल पचन करावें; आणि तें पिणें, अंगास लावणें, चुळा भरून टाकणें, नस्य व वस्ती ह्यांमध्यें योजावें. हें स्थूळपणा, आळस, कंडू, इत्यादि कफजन्य रोगांस जिकतें.

महासुगंधी तेल.

चन्दनं कुंकुमोशीरं प्रियंगुं शठिरोचनम् ।
तुरुष्कागुरुकस्तुरीकर्पूरो जातिपत्रिका ॥ १ ॥
जातीकङ्कोलपूगानां लवङ्गस्य फलानि च ।
नलिकानलदं कुष्ठं हरेणुतगरं प्लवम् ॥ २ ॥
नखं व्याघ्रनखं स्पृक्का बालो दमनकं तथा ।
प्रपौण्डरीकं कर्चूरं समांशैः शाणमात्रकैः ॥ ३ ॥
महासुगन्ध इत्येतत्तैलप्रस्थेन साधयेत् ।
प्रस्वेदमलदौर्गन्ध्यकण्डूकुष्ठहरं परम् ॥ ४ ॥
अनेनाभ्यक्तगात्रस्तु वृद्धः सप्ततिकोऽपि वा
युवा भवति शुक्राढ्यः स्त्रीणामत्यन्तवल्लभः ॥ ५ ॥
सुभगो दर्शनीयश्च गच्छेद्वै प्रमदाशतम् ।
वन्ध्याऽपि लभते गर्भं षण्ढोऽपि पुरुषायते ॥
अपुत्रः पुत्रमाप्नोति जीवेच्च शरदां शतम् ॥ ६ ॥

चंदन, केशर, वाळा, गव्हला, कचोरा, गोरोचन, शिलारस, कृष्णागर, कस्तुरी, कापूर, जायपत्री, जायफळ, कंकोळ, सुपारी, लवंग, गुलछबु, वाळा, कोष्ट, रेणुकबीज, तगर, नागरमोथे, नखला, वाघनख, पाच, पीतवाळा, दवणा, पुंडरीकवृक्षाची साल, व कचोरा हीं औषधें तीनतीन मासे घ्यावीं; आणि चौसष्ट तोळे तिळाचें तेल एकत्र करून विधियुक्त तेल पचन करावें. ह्या तेलाला महासुगंधी तेल म्हणतात. हें घाम, मळ, दुर्गंधी, कंडू व कुष्ट ह्यांचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे. ह्या तेलानें नित्य अभ्यंग करणारा मनुष्य सत्तर वर्षांचा म्हातारा असला तरी तरुणाप्रमाणें होतो. त्याच्या शुक्राची वृद्धि होते. तो स्त्रियांना फार प्रिय होतो. तो सुंदर व देखणा होतो व शंभर स्त्रियांशीं गमन करूं शकतो. वांझेला पुत्र होतात व षंढाला पुरुषत्व येतें. निपुत्रिकाला पुत्रप्राप्ति होते व तो शंभर वर्षें वांचतो.

रसायनें.

रसभस्मयोग.

रसभस्म वल्लमात्रं लीढ्वा मधुना पिबेदनु क्षौद्रम् ।
कोष्णाम्बुना समेतं स्थौल्यं मेदःकृतं जयति ॥ १ ॥

पाऱ्याचें भस्म मधाशीं चाटून त्याजवर कोमट पाणी मध घालून प्यावें. तें मेदामुळें आलेल्या स्थूलपणाला जिंकतें.

त्रिमूर्तिरस.

सूतगन्धमयोभस्म सम संमेल्य भावयेत् ।
निर्गुण्डीपत्रतोयेन मुसलीकन्दवारिणा ॥ १ ॥
ततः सिद्धममुं माषमात्रं रसमनुत्तमम् ।
लोध्रक्षौद्रेण चाश्नीयाच्चूर्णमेषां पिचून्मितम् ॥ २ ॥
षट्कटु त्रिफला पञ्चलवणावल्गुजस्य तत् ।
मेदःशोथाग्निमान्द्यामवातश्लेष्मगदप्रणुत् ॥ ३ ॥

पारा, गंधक, लोहभस्म हीं औषधें समभाग घेऊन निर्गुडीच्या पाल्याच्या रसाची व मुसळीच्या कंदाच्या रसाची भावना देऊन खल करावा; म्हणजे हा त्रिमूर्तिरस तयार होतो. हा एक मासाभर रस लोध्राचें चूर्ण व मध ह्यांजबरोबर घ्यावा. आणि त्यावर सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, बांगडखार, मीठ व बावच्यांचें बीं ह्यांचें चूर्ण एक तोळाभर खावें; म्हणजे मेद, सूज, अग्निमांद्य, आमवात व कफरोग ह्यांचा नाश करतो.

वडवाग्निरस.

शुद्धसूतं मृतं ताम्रं तालं बोलं समं समम् ।
अर्कक्षीरैर्दिनं मर्द्य क्षौद्रैर्लेह्यं द्विगुञ्जकम् ॥ १ ॥
वडवाग्निरसो नाम स्थौल्यं तुन्दं नियच्छति ।
पलं क्षौद्रं पलं तोयमनुपानं पिबेत्सदा ॥ २ ॥

शुद्ध पारा (रससिंदूर), ताम्रभस्म, तालकभस्म, रक्तबोळ हीं औषधें समभाग घेऊन यांचा रुईच्या रसांत एक दिवस खल करून त्यांपैकीं दोन गुंजा रस मधाशीं चाटावा. हा वडवाग्नि नांवाचा रस स्थूलपणा व दोंद ह्यांचा नाश करतो. ह्याजवर चार तोळे मध व चार तोळे पाणी मिसळून नेहमीं प्यावें.

पथ्यापथ्य.

पुराणशालयो मुद्गकुलत्थोद्दालकोद्रवाः ।
लेखना बस्तयश्चैव सेव्या मेदस्विना सदा ॥ १ ॥
श्रमचिन्ताव्यवायाध्वक्षौद्रजागरणप्रियः ।
हन्त्यवश्यमतिस्थौल्यं यवश्यामाकभोजनः ॥ २ ॥
अस्वप्नं च व्यवायं च व्यायामं चिन्तनानि च ।
स्थौल्यमिच्छन्परित्यक्तुं क्रमेणैवं प्रवर्धयेत् ॥ ३ ॥

जुन्या साळी, मूग, हुलगे, रानहरीक, हरीक, कर्षण करणारे बस्तीचे योग ह्यांचें मेदस्वी मनुष्यानें नेहमीं सेवन करावें. श्रम करणें, चिंता, मैथुन, मार्ग चालणें, मध, जागरण करणें, सातु व सावे ह्यांचें अन्न खाणें ह्या गोष्टी अति स्थूलपणाचा अवश्य नाश करतात. म्हणून ज्याला स्थूलपणा जावा अशी इच्छा असेल त्यानें जागरण, व्यायाम, मैथुन, काळजी ह्या गोष्टी क्रमानें वाढवाव्या.

---

१ कृशत्वाचें कारणः–वारा घेणें, रूक्ष अन्नपान करणें, लंघन, मित भोजन, वमन-विरेचनादिकांचा अतियोग, शोक, मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, जागरण, नेहमीं रोगी असणें, नेहमीं असमाधान, व्यायाम, अल्प भोजन, भीति, धनादिकांची चिंता हीं कृशत्वाचीं कारणें आहेत.

अति कृश मनुष्याला होणारे रोगः—पांथरी, खोकला, क्षय, श्वास, गुल्म, मूळव्याध, उदरें आणि संग्रहणी आदिकरून हे रोग कृश मनुष्याला लवकर जडतात.

एखादा कृश मनुष्य अति बलवान असतो त्याचें कारणः—गर्भसंभवसमयीं शुक्रभाग अधिक व मेद कमी झाला असतां जन्मणारा प्राणी कृश असूनही महाबलाढ्य होतो.

स्थूलालादेखील बल नसतें त्याचें कारणः—गर्भसंभवकाळीं मेद अधिक व शुक्र कमी अशी गर्भधारणा झाली असतां जन्मणारा प्राणी हीनबल पहाण्यांत येतो.

कृशत्वाची चिकित्साः—रूक्षान्नादि कारणानें कृश झालेल्या मनुष्याला पौष्टिक, शक्तिवर्धक, वृष्य व वाजीकरण असें औषध योजावें.

कृशत्वाचें असाध्य लक्षणः—जो जन्मापासूनच कृश, किडकिडीत अंगाचा व अशक्त असतो त्याला औषध नाहीं.

उदरनिदान.

रोगाः सर्वेऽपि मन्देऽग्नौ सुतरामुदराणि तु ।
अजीर्णान्मलिनैश्चान्नैर्जायन्ते मलसंचयात् ॥ १ ॥

अजीर्णामुळें व दोषप्रकोपकारक अन्नें खाण्यानें दोषसंचय होऊन अग्निमांद्य होतें. त्या अग्निमांद्यामुळें बहुधा सर्वच रोग होतात. त्यांत विशेषतः उदरें होतात.

अन्य ग्रंथांतील.

अतिसञ्चितदोषाणां पापं कर्म च कुर्वताम् ।
उदराण्युपजायन्ते मन्दाग्नीनां विशेषतः ॥ २ ॥

पाप करणाऱ्या मंदाग्नि मनुष्यांचे वातादि दोष अतिशय संचित झाले असतां त्यांना उदरें होतात.

संप्राप्ति.

रुद्धाः स्वेदाम्बुवाहीनि दोषाः स्रोतांसि संचिताः ।
प्राणाग्न्यपानान्संदूष्य जनयन्त्युदरं नृणाम् ॥ ३ ॥

संचित झालेले दोष स्वेदवाहक व जलवाहक स्रोतसांचा रोध करून प्राणवायु, अपानवायु व जठराग्नि ह्यांना दूषित करून मनुष्याला उदर उत्पन्न करितात.

सुश्रुतांतील.

तत्पूर्वरूपं बलवर्णकांक्षावलीविनाशो जठरेऽपि राज्यः ।
जीर्णापरिज्ञानविदाहवत्यो बस्तौ रुजः पादगतश्च शोफः ॥ ४ ॥

शक्ति व कांति कमी होणें, पोटावर वळ्या पडण्याचें बंद होऊन शिरा दिसूं लागणें, अन्न जिरलेलें न समजणें, घशाशीं जळजळणें, ओटीपोटांत दुखणें व पायास सूज येणें हीं लक्षणें उदर होण्यापूर्वीं होतात.

उदराचें सामान्य लक्षण.

आध्मानं गमनेऽशक्तिर्दौर्बल्यं दुर्बलाग्निता ।
शोफः सदनमंगानां संगो वातपुरीषयोः ॥ ५ ॥
दाहस्तन्द्रा च सर्वेषु जठरेषु भवन्ति हि ।

पोट फुगणें, चालण्यास शक्ति नसणें, अशक्तपणा, अग्निमांद्य, अंगाला सूज, ग्लानि, अधोवायु व मल ह्यांचा अवरोध, अंगाचा दाह, डोक्यावर झापड, हीं लक्षणें सर्व उदरांमध्यें असतात.

निर्जल उदराचें लक्षण.

सर्वं त्वतोयमरुणमशोफं नातिभारिकम् ।
गवाक्षितं शिराजालैः सदा गुडगुडायते ॥ ६ ॥

पाणी झालें नाहीं अशा सर्व उदररोगांत शरीराचा वर्ण तांबूस असतो; अंगावर सूज नसते; पोट फार जड आहे असें वाटत नाहीं; अंगावर सर्वत्र शिरांचीं जाळीं दिसूं लागतात, आणि पोटांत गुडगुड आवाज होतो.

उदरांची संख्या.

पृथग्दोषैः समस्तैश्च प्लीहबद्धक्षतोदकैः ।
संभवन्त्युदराण्यष्टौ तेषां लिंगं पृथक् शृणु ॥ ७ ॥

वातादि पृथक दोषांनीं तीन, त्रिदोषामुळें एक, प्लीहोदर, बद्धोदर, क्षतोदर, व जलोदर हीं चार, मिळून आठ उदरें होतात. त्यांचीं पृथक् लक्षणें ऐक.

वातोदरलक्षण.

तत्र वातोदरे शोफः पाणिपन्नाभिकुक्षिषु ।
कुक्षिपार्श्वोदरकटीपृष्ठरुक्पर्वभेदनम् ॥ ८ ॥
शुष्ककासोऽङ्गमर्दोऽधो गुरुता मलसंग्रहः ।
श्यावारुणत्वगादित्वमकस्माद्वृद्धिह्रासवत् ॥ ९ ॥
सतोदभेदमुदरं तनुकृष्णशिराततम् ।
आध्मातदृतिवच्छब्दमाहतं प्रकरोति च ।
वायुश्चात्र सरुक्शब्दो विचरेत्सर्वतोगतिः ॥ १० ॥

वातोदरामध्यें हात, पाय, बेंबी व कुशी ह्यांना सूज, कुशी, पार्श्वभाग, पोट, कंबर, व पाठ ह्यांत वेदना, हाडाचीं पेरें फुटल्यासारखीं वाटणें, कोरडा खोकला, अंग मोडून येणें, शरीराच्या खालचा भाग जड वाटणें, शौचास न होणें, त्वचा, डोळे, नखें, काळीं किंवा तांबडीं होणें, पोट एकाएकीं मोठें किंवा लहान होणें, पोटांत टोचल्यासारखी किंवा फोडल्यासारखी पीडा होणें, पोटाची त्वचा पातळ व काळ्या शिरांनीं व्याप्त असणें, हीं लक्षणें होतात; व पोट वाजविलें असतां वायूनें फुगलेल्या भात्याप्रमाणें आवाज होतो. आणि पोटांमध्यें गुडगुड शब्द करीत वायु सर्वत्र फिरत असतो.

पित्तोदरलक्षण.

पित्तोदरे ज्वरो मूर्च्छा दाहस्तृट् कटुकास्यता ।
भ्रमोऽतिसारः पीतत्वं त्वगादावुदरं हरित् ॥ ११ ॥
पीतताम्रशिरानद्धं सस्वेदं सोष्म दह्यते ।
धूमायते मृदुस्पर्शं क्षिप्रपाकं प्रदूयते ॥ १२ ॥

पित्तोदरांत–ताप, मूर्च्छा, दहा, तहान, तोंडाला कडवटपणा, भ्रम, अतिसार, त्वचा, नखें ह्यांना पिवळटपणा, पोटावर हिरवटपणा, पोट पिवळ्या व तांबूस शिरांनीं व्यापणें, पोटाला घाम येणें, तें हाताला कढत लागणें, पोटाची आग होणें, त्यांतून धूर निघाल्यासारखें वाटणें, स्पर्श केला असतां मऊ लागणें, हीं लक्षणें होतात. पोट दुखतें व त्याचा लवकर पाक होतो म्हणजे जलोदर होतें.

कफोदरलक्षण.

श्लेष्मोदरेऽङ्गसदनं स्वापः श्वयथुगौरवम् ।
निद्रोत्क्लेशोऽरुचिः श्वासः कासः शुक्लत्वगादिता ॥ १३ ॥
उदरं स्तिमितं स्निग्धं शुक्लराजीततं महत् ।
चिराभिवृद्धिकठिनं शीतस्पर्शं गुरु स्थिरम् ॥ १४ ॥

कफोदरांत अंग गळल्यासारखें होणें, अंग बधिर होणें, सूज, जडत्व, अतिशय झोंप, अरुचि, श्वास, खोकला, त्वचा, नखें हीं पांढरीं होणें, पोट स्तब्ध होणें, व तुळतुळीत दिसणें, पोटावर पांढऱ्या शिरा दिसणें, हीं लक्षणें होतात. ह्या कफोदराची वाढ होण्याला फार दिवस लागतात. पोट कठीण होतें, तें गार लागतें, तें जड व स्थिर असतें.

सन्निपातोदराचें लक्षण.

स्त्रियोऽन्नपानं नखरोममूत्रविडार्तवैर्युक्तमसाधुवृत्ताः ।
यस्मै प्रयच्छन्त्यरयो गरांश्च दुष्टाम्बुदूषीविषसेवनाद्वा ॥ १५ ॥
तेनाऽऽशु रक्तं कुपिताश्च दोषाः कुर्युः सुघोरं जठरं त्रिदोषम् ।
तच्छीतवातातपदुर्दिनेषु विशेषतः कुप्यति दह्यते च ।
स चातुरो मूर्छति संप्रसक्तं पाण्डुः कृशः शुष्यति तृष्णया च ॥
दूष्योदरं कीर्तितमेतदेव प्लीहोदरं कीर्तयतो निबोध ।

पुरुषानें आपल्याला वश व्हावें ह्या हेतूनें दुर्वर्तनी स्त्रिया त्याला

अन्नामधून नखें, केस व आर्तवादि मळ खाण्यास घालतात. त्या योगानें, शत्रूनें विष घातल्यानें, वाईट पाणी किंवा दूषीविष खाण्यांत आल्यानें, रक्त व वातादि दोष कुपित होऊन भयंकर सन्निपातोदर उत्पन्न करितात. तें उदर—गार वारा सुटतो त्या वेळीं व आकाश ढगांनीं व्याप्त असतें त्या वेळीं वाढतें. दाह उत्पन्न करितें. त्यामुळें रोगी वरचेवर मूर्छित होतो. त्याच्या अंगाचा वर्ण पांढरा होतो तो कृश होतो. आणि तहानेनें कासाविस होतो. हें दूष्योदराचें लक्षण सांगितलें. आतां प्लीहोदर सांगतों तें समजून घे.

प्लीहोदर व यकृतोदरलक्षण.

विदाह्यभिष्यन्दिरतस्य जन्तोः प्रदुष्टमत्यर्थमसृक्कफश्च ॥ १७ ॥
प्लीहाभिवृद्धिं कुरुतः प्रवृद्धौ प्लीहोत्थमेतज्जठरं वदन्ति ।
तद्वामपार्श्वे परिवृद्धिमेति विशेषतः सीदति चाऽऽतुरोऽत्र १८
मन्दज्वराग्निः कफपित्तलिङ्गैरुपद्रुतः क्षीणबलोऽतिपाण्डुः ।

विदाही, अभिष्यंदी, असे पदार्थ नेहमीं खाणाऱ्या मनुष्याचें रक्त व कफदोष कुपित होऊन वाढले असतां ते पोटांतील डाव्या बाजूची प्लीहा (पांथरी) वाढवितात. त्याला प्लीहोदर असें म्हणतात. तें डाव्या बाजूस वाढतें. ह्या उदरांत विशेषतः रोगी म्लान होतो. ह्यामध्यें बारीकज्वर व अग्निमांद्य असतें आणि कफजन्य व पित्तजन्य उदराचीं लक्षणें होतात. रोगी अशक्त व पांढरा फटफटीत होतो.

सव्यान्यपार्श्वे यकृति प्रदुष्टे ज्ञेयं यकृद्दाल्युदरं तदेव ॥ १९ ॥

उजव्या बाजूस यकृत वाढलें असतां तें यकृद्दाली उदर आहे असें समजावें.

प्लीहा निर्वेदनः श्वेतकठिनः स्थूल एव च ।
महापरिग्रहः शीतश्लेष्मसंभव इष्यते ॥ २० ॥

जी पांथरी वेदनारहित, पांढरी, कठीण, मोठी, पुष्कळ जागा व्यापणारी, शीत असते ती कफजन्य आहे असें समजावें.

सज्वरः सपिपासश्च स्वेदनस्तीव्रवेदनः ।
पीतगात्रो विशेषेण प्लीहा पैत्तिक उच्यते ॥ २१ ॥

जी ज्वरयुक्त, तृषायुक्त, जिच्या योगानें अंगाला किंवा पोटाला

घाम येतो, तीव्र वेदना असतात, व शरीर पिवळें होतें; ती पांथरी पित्तजन्य आहे असें समजावें.

नित्यमानद्धकोष्ठश्च नित्योदावर्तपीडितः ।
वेदनाभिः परीतश्च प्लीहा वातिक उच्यते ॥ २२ ॥

ज्या प्लीहेमुळें पोट नेहमीं फुगतें, ज्यांत उदावर्ताची पीडा होते, व जी वेदनांनीं व्याप्त असते, ती पांथरी वातजन्य आहे असें म्हणतात.

क्लमोऽतिदाहः संमोहो वैवर्ण्यं गात्रगौरवम् ।
रक्तोदरं भ्रमो मूर्छा ज्ञेयं रक्तजलक्षणम् ।

थकवा, अत्यंत दाह, मूर्च्छा, अंगाचा वर्ण बदलणें, अंगाला जडत्व, पोट आरक्तवर्ण असणें हीं लक्षणें रक्तजन्य पांथरीमध्यें होतात.

त्रयाणामपि रूपाणि प्लीह्यसाध्ये भवन्ति हि ॥ २३ ॥

पांथरी असाध्य झाली असतां तीमध्यें तिन्ही दोषांचीं लक्षणें असतात.

पांथरींतील दोष.

उदावर्तरुजानाहैर्मोहतृड्दहनज्वरैः ।
गौरवारुचिकाठिन्यैर्विद्यात्तत्र मलान्क्रमात् ॥ २४ ॥

उदावर्त, वेदना, पोट फुगणें; मूर्च्छा, तहान, दाह; ज्वर, जडत्व, अरुचि व काठिणपणा ह्या तीन प्रकारच्या लक्षणांवरून अनुक्रमें वातादि दोषांचा संबंध जाणावा.

बद्धगुदाचें लक्षण.

यस्यांत्रमन्नैरुपलेपिभिर्वा बालाश्मभिर्वा पिहितं यथावत् ।
संचीयते तस्य मलः सदोषः शनैः शनैः संकरवच्च नाड्याम् ५
निरुध्यते तस्य गुदे पुरीषं निरेति कृच्छ्रादपि चाल्पमल्पम् ।
हृन्नाभिमध्ये परिवृद्धिमेति तस्योदरं बद्धगुदं वदन्ति ॥ २६ ॥

चिकट अन्न किंवा बारीक खडे ह्यांच्या योगानें ज्याचीं आंतडीं चोंदतात, त्याचा मल वातादि दोषांसह, केरसुणीनें थोड्या थोड्या सांठविलेल्या केराप्रमाणें आंतड्यामध्यें हळुहळू सांठतो, त्यामुळें गुदांत मळ दाटून बसतो व मोठ्या कष्टानें थोडथोडा बाहेर पडतो. त्याला बद्धगुदोदर असें म्हणतात. हें उदर हृदय व नाभि ह्यांमध्यें

वाढतें. ह्याला बद्धोदर असें म्हणतात. त्याच्या योगानें दाह, ज्वर, तहान, भ्रम, खोकला, श्वास, मांड्या गळणें, हृदय, नाभि व मस्तक ह्यांचे ठिकाणीं वेदना, मलाचा अवरोध, अरुचि व वांति हीं लक्षणें होतात. गति रुद्ध झाल्यामुळें मूढ झालेला वायु पोटांत संचार करतो. पोटावर निळ्या, तांबूस व स्थिर अशा शिरा उभ्या राहतात. पोटावर रोमांच उभे राहतात. हें उदर प्रायः नाभीच्यावर गोपुच्छाकृति असतें.

क्षतोदर.

एतद्बद्धोदरं तेन स्युर्दाहज्वरतृड्भ्रमाः ।
कासश्वासोरुसदनं रुग्हृन्नाभिशिरस्सु च ॥ २७ ॥
मलसङ्गोऽरुचिश्छर्दिरुदरं मूढमारुतम् ।
स्थिरनीलारुणशिरारोमराजिविराजितम् ।
नाभेरुपरि च प्रायो गोपुच्छाकृति जायते ॥ २८ ॥
शल्यं तथाऽन्नोपहितं यदन्त्रं भुक्तं भिनत्त्यागतमन्यथा वा ।
तस्मात्स्रुतोऽन्त्रात्सलिलप्रकाशः स्रावः स्रवेद्वै गुदतस्तु भूयः २९
नाभेरधश्चोदरमेति वृद्धिं निस्तुद्यतेऽतीव विदाल्यते च ।
एतत्परिस्राव्युदरं प्रदिष्टं दकोदरं कीर्तयतो निबोध ॥ ३० ॥

सुई वगैरे एखादें शल्य अन्नांतून पोटांत जाऊन वांकडेंतिकडें होऊन आंतड्याच्या त्वचेंत शिरून आंतड्यास छिद्र पाडतें, तसेंच अतिशय जांभया आल्यानें किंवा अतिशय जेवल्यानें आंतड्यास ताण बसून त्याला भोंक पडतें; आणि त्यांतून पाण्यासारखा स्राव होऊन तो गुदावाटे बाहेर पडतो. हें उदर नाभीच्या खालीं वाढतें. त्यामुळें पोटांत टोचल्याप्रमाणें किंवा फोडल्याप्रमाणें वेदना होतात हें परिस्रावी उदर सांगितलें. आतां जलोदर सांगतों तें जाण.

जलोदर.

यः स्नेहपीतोऽप्यनुवासितो वा वान्तो विरिक्तोऽप्यथवा निरूढः ।
पिबेज्जलं शीतलमाशु तस्य स्रोतांसि दुष्यन्ति हि तद्वहानि ॥ ३१
स्नेहोपलिप्तेष्वथ वाऽपि तेषु दकोदरं पूर्ववदभ्युपैति ।
स्निग्धं महत्तत्परिवृत्तनाभि समाततं पूर्णमिवाम्बुना च ॥ ३२ ॥
यथा दृतिः क्षुभ्यति कम्पते च शब्दायते चापि दकोदरं तत् ३३

स्नेहपान, अनुवासनबस्ती, वमन, विरेचन अथवा निरूहबस्ती हे प्रयोग ज्यानें करून घेतले आहेत त्यानें अतिशय थंड पाणी प्राशन केलें असतां त्याचीं जलवाहक स्रोतसें दूषित होतात. अथवा तीं तेलानें माखलेलीं असल्यास त्यांतून अन्नरस घसरून खालीं येतो, व नाभीच्या खालीं सांचून राहून पूर्वीप्रमाणें जलोदर उत्पन्न करतो. ह्या उदरामध्यें पोट तुळतुळित दिसतें. व तें नाभीच्या सभोंवार मोठें होतें. ह्यामध्यें वेदना असतात, आणि पाण्यानें भरलेल्या पखालीप्रमाणें उदर क्षुब्ध होतें, खळबळतें, हालतें व त्यांत गुडगुड शब्द होतो. ह्याला जलोदर म्हणतात.

साध्यासाध्यत्व.

जन्मनैवोदरं सर्वं प्रायः कृच्छ्रतमं मतम् ।
बलिनस्तदजाताम्बु यत्नात्साध्यं नवोत्थितम् ॥ ३४ ॥

सर्वच उदरें उत्पत्तीबरोबरच कष्टसाध्य आहेत. तथापि बलवान् मनुष्याचें, पाणी न झालेलें, व नूतन असें उदर फार प्रयासानें साध्य होतें.

अशोथमरुणाभासं सशब्दं नातिभारिकम् ।
सदा गुडगुडायुक्तं शिराजालगवाक्षितम् ॥ ३५ ॥
नाभिं विष्टभ्य वायुस्तु वेगं कृत्वा प्रणश्यति ।
हृद्वंक्षणकटीनाभिगुदं प्रत्येकशूलिनः ॥ ३६ ॥
कर्कशं सृजते वातं नातिमन्दे च पावके ।
लालास्यविरसे वाऽल्पे मूत्रेऽल्पे संहते विशि ॥ ३७ ॥
अजातोदकमित्येतैर्युक्तं विज्ञाय लक्षणैः ।

पोट सूजेनें रहित असून तांबूस रंगाचें दिसणें, वाजविलें असतां नाद न निघणें, पोट अतिशय जड नसणें, पोटांत नेहमीं गुडगुड शब्द होणें, एखाद्या खिडकीला लावलेल्या जाळीप्रमाणें शिरांच्या जाळ्यानें व्यापलेलें दिसणें, वायु नाभीच्या सभोंवार फिरून गुदापर्यंत येऊन नाहींसा होणें, हृदय, जांघसंधी, कंबर, बेंबी व गुद ह्या प्रत्येकामध्यें वेदना होणें, वायु जोरानें सरकणें, जठराग्नि फार मंद नसणें, लाळेनें तोंड बेचव होणें, मूत्र थोडें होणें व शौचास अवरोध होणें, हीं लक्षणें ज्या उदरांत असतात, त्याला

अजातोदक (पाणी न झालेलें) उदर म्हणतात.

कुक्षेर्वृद्धिश्चातिमात्रं शिरान्तर्धानमेव च ।
दकपूर्णदृतिक्षोभस्पर्शं जातोदकं भवेत् ॥ ३८ ॥

पोटाच्या कुशी अतिशय फुगणें, पोटावरील शिरा दिसेनाशा होणें, पोट पाण्यानें भरलेल्या पखालीप्रमाणें हलणें व हातास लागणें अशा उदराला जातोदक (पाणी झालेलें) उदर असें म्हणतात.

असाध्य लक्षण.

पक्षाद्बद्धगुदं तूर्ध्वं सर्वं जातोदकं तथा ।
प्रायो भवत्यभावाय च्छिद्रांत्रमुदरं नृणाम् ॥ ३९ ॥

बद्धगुदोदर पंधरा दिवसांपुढें असाध्य होतें. तसेंच पाणी झालेलें उदरही बहुतकरून असाध्य होतें. आणि छिद्रांत्रोदरही पंधरा दिवसांनीं बहुवा असाध्य होतें.

दुसरें असाध्य लक्षण.

शूनाक्षं कुटिलोपस्थमुपक्लिन्नतनुत्वचम् ।
बलशोणितमांसाग्निपरिक्षीणं च वर्जयेत् ॥ ४० ॥
पार्श्वभंगान्नविद्वेषशोफातीसारपीडितम् ।
विरिक्तं चाप्युदरिणं पूर्यमाणं विवर्जयेत् ॥ ४१ ॥

ज्याच्या डोळ्याला सूज आली आहे, ज्याचें गुह्येंद्रिय सुजेमुळें वांकडें झालें आहे, ज्याच्या अंगाची त्वचा ओलसर व पातळ झाली आहे; ज्याचें बळ, रक्त व मांस हीं क्षीण झालीं आहेत, असा उदराचा रोगी असाध्य म्हणून सोडून द्यावा. बरगड्या मोडून येणें, अन्नद्वेष, सूज, अतिसार ह्यांनीं पीडित, आणि रेचक देऊन रे झाल्यावर ज्याचें पोट फुगतें आहे, असा उदराचा रोगी असाध्य समजून सोडून द्यावा.

उदरचिकित्सा,-आठ उदरें.

पृथग्दोषैः समस्तैश्च प्लीहबद्धक्षतोदकैः ॥ १ ॥
तत्र पृथग्दोषैर्वातपित्तकफैः संनिपातेनैकम् । प्लीहोदरं बद्धोदरं क्षतोदरं जलोदरमिति संज्ञा भवन्ति । तेष्वसाध्यं बद्धगुदं परिस्रावि च । षडवशिष्टानि कृच्छ्रसाध्यानि । सर्वाण्येव च प्रत्याख्यायोपक्रमेत् । तेष्वाद्यश्चतुर्वर्गो भेषजसाध्यः । उत्तरः शस्त्रसाध्यः ।

कालप्रकर्षात्सर्वाण्येव शस्त्रसाध्यानि भवन्ति वर्जयितव्यानि । इति सुश्रुत

वातादि पृथक् दोषांनीं तीन; त्रिदोषामुळें एक, प्लीहोदर, बद्धोदर, क्षतोदर व जलोदर हीं चार; मिळून आठ उदरें आहेत. त्यांत बद्धगुदोदर व परिस्रावी उदर हीं दोन असाध्य आहेत. बाकीचीं सहा कष्टसाध्य आहेत. सर्वच उदरें अत्यंत कष्टसाध्य समजून चिकित्सा करावी. त्या आठ उदरांपैकीं पहिलीं चार औषधानें साध्य होतात. व पुढचीं चार शस्त्रसाध्य आहेत. कालावधीनें सर्वच उदरें शस्त्रसाध्य होतात. तीं सोडावीं, असें सुश्रुतांत म्हटलें आहे.

वातोदराची चिकित्सा.

उपक्रमेद्भिषग्दोषबलकालविशेषवित् ।
स्थिरादिसर्पिषः पानं स्नेहं स्वेदं विरेचनम् ॥ १ ॥
वेष्टनं वाससा ग्लानौ शाल्वणेनोपनाहनम् ।
पेया यूषरसान्नं च योज्यं वातोदरे क्रमात् ॥ २ ॥

दोष, बल, काल ह्यांचा विचार करून वातोदराची चिकित्सा करावी. सालवणादि घृत प्राशन करणें, स्नेहन, स्वेदन, विरेचन, वस्त्रानें गुंडाळणें, ग्लानि आली असतां शाल्वण, स्वेद, पेज, यूष, मांसरस व अन्न ह्यांची क्रमानें वातोदरांत योजना करावी.

एरंडतेलादि योग.

एरण्डतैलं दशमूलमिश्रं गोमूत्रयुक्तं त्रिफलारजो वा ।
निहन्ति वातोदरशोथशूलं क्काथः समूत्रो दशमूलजश्च ॥ १ ॥

दशमूळाच्या काढ्यांत एरंडेल किंवा त्रिफळ्याचें चूर्ण घालून गोमूत्रांतून द्यावें, अथवा दशमूळांचा काढा गोमूत्र घालून द्यावा. तो वातोदर, सूज व शूळ ह्यांचा नाश करतो.

दशमूलादि योग.

दशमूलकषायेण क्षीरवृत्तिः शिलाजतु ।
सद्यो वातोदरी क्षीरमौष्ट्रमाजं च केवलम् ॥ १ ॥

वातोदरी रोग्यानें दुधावर राहून दशमूळांच्या काढ्यांतून शिलाजित द्यावा. दूध केवळ उंटिणीचें व शेळीचें द्यावें.

कुष्ठादि चूर्ण.

कुष्ठं दन्ती यवक्षारं व्योषं त्रिलवणं वचाम् ।
अजाजीं दीप्यकं हिंगु स्वर्जिकां चव्यचित्रके ।
शुण्ठीं चोष्णाम्भसा पीत्वा वातोदररुजापहाम् ॥ १ ॥

कोष्ट, दातीमूळ, जवखार, सुंठ, मिरें, पिंपळी, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, वेखंड, जिरें, ओवा, हिंग, साज्जिखार, चवक, चित्रक व सुंठ ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर घ्यावें. तें वातोदराची पीडा दूर करतें.

वृंदांतील समुद्रादि चूर्ण.

सामुद्रसौवर्चलसैन्धवानि क्षारो यवानामजमोदभागः ।
सपिप्पलीचित्रकशृंगबेरं हिंगु विडंगं च समानि कुर्यात् ॥ १ ॥
एतानि चूर्णानि घृतप्लुतानि भुञ्जीत पूर्वं कवलान्प्रशस्तान् ।
वातोदरं गुल्ममजीर्णभुक्तं वातप्रकोपं ग्रहणीं च दुष्टाम् ॥ २ ॥
अर्शांसि दुष्टानि च पाण्डुरोगं भगदरं चापि निहन्ति सद्यः ॥३॥

मीठ, पादेलोण, सेंधेलोण, जवखार, अजमोदा, पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, हिंग, आणि वावडिंग हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करावें. ह्यांचें चूर्ण व तूप ह्यांजबरोबर प्रथम अन्नाचे कांहीं घास घ्यावे, म्हणजे तें वातोदर, गुल्म, अजीर्णान्न, वाताचा प्रकोप, दुष्ट संग्रहणी, मूळव्याध, पांडुरोग, भगंदर ह्यांचा त्वरित नाश करितें.

दशमूलादि घृत.

दशमूलीकषायेण रास्नानागरदारुभिः ।
पुनर्नवाभ्यां च घृतं सिद्धं वातोदरापहम् ॥ १ ॥

दशमूळांचा काढा, रास्ना, सुंठ, देवदार, पांढरा व तांबडा पुनर्नवा ह्यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. हें वातोदराचा नाश करितें.

पित्तोदरचिकित्सा.

पित्तोदरे च बलिनं पूर्वमेव विरेचयेत् ।
पयसा त्रिवृताकल्केनोरुबूकशृतेन वा ॥ १ ॥
सातलात्रायमाणाभ्यां शृतेनाऽऽरग्वधेन च ।
घृतं पित्तोदरे पेयं मधुरौषधसाधितम् ॥ २ ॥

पित्तोदराचा रोगी बलवान असल्यास त्याला प्रथम विरेचन द्यावें. अथवा दूध, तेल व एरंडमूळ ह्यांच्या कल्कानें सिद्ध केलेलें घृत; शिकेकाईचें मूळ, त्रायमाण व वाहव्याची शेंग ह्यांनीं सिद्ध केलेलें घृत, अथवा मधुर औषधांनीं सिद्ध केलेलें घृत पित्तोदरामध्यें प्राशन करावें. कोष्ठशुद्धि होण्याकरितां तेल व त्रिफळा ह्यांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें.

स्यात्त्रिवृत्त्रिफलासिद्धं सर्पिष्पानं विशुद्धये ।
पृश्निपर्णीबलाव्याघ्रीलाक्षानागरसाधितम् ।
क्षीरं पित्तोदरं हन्ति जठरं कतिभिर्दिनैः ॥ ३ ॥

पिठवण, चिकणामूळ, रिंगणमूळ, लाख, सुंठ ह्यांनीं सिद्ध केलेलें दूध कांहीं दिवस प्यावें. तें पित्तोदराचा नाश करितें.

कफोदरचिकित्सा.

श्लेष्मोदरिणं तु पिप्पल्यादिसिद्धेन सर्पिषा स्नेहं पीत्वा स्नुहीक्षीरानुलोम्यत्रिकटुकमूत्रतैलमुस्तादिकाथेनाऽऽस्थापयेदनुवासयेच्च यवकिट्टसर्षपामलकबीजैश्चोपनाहयेदुदरम्। भोजयेच्चैनं त्रिकटुकप्रगाढेन कुलित्थयूषेण पयसा वा स्वेदयेच्चाभीक्ष्णम् ।

व्योषयुक्तं कुलित्थाम्बु पयो वा भोजने हितम् ।
गोमूत्रारिष्टपानैश्च चूर्णायस्कृतिभिस्तथा ।
सक्षीरतैलपानैश्च शमयेत्तु कफोदरम् ॥ १ ॥

कफोदराच्या रोग्याला पिपल्यादि गणांतील औषधांनीं सिद्ध केलेल्या तुपानें स्नेहपान करवून त्रिधारी निवडुंगाचा चीक, वातानुलोमक औषधें, सुंठ, मिरें, पिंपळी, गोमूत्र, तेल व मुस्तादि[1]-गणांतील औषधांच्या काढ्यानें आस्थापनबस्ती द्यावा. आणि जवखार, मोहऱ्या, आवळ्याचें बीं ह्यांच्या पोटीसानें पोट शेकावें. ह्या कफोदराच्या रोग्याला सुंठ, मिरें व पिंपळीचें चूर्ण घालून तयार केलेल्या हुलग्याच्या कढणानें किंवा दुधानें जेवूं घालावें. पुष्कळ घाम काढावा. जेवणामध्यें सुंठ, मिरें व पिंपळी घातलेलें हुलग्याचें

---

१ पिप्पल्यादि व मुस्तादि गणांतील औषधें वाग्भट सू. स्था. अ. पंधरा यामध्यें पहावीं.

सार अथवा दूध जेवणामध्यें हितकारक आहे. गोमूत्र, अरिष्ट हें प्यावयास देणें; चूर्ण व अयस्कृति देणें व दूध पि करून देणें, ह्या योगानें कफोदराचें शमन करावें.

दूष्योदर व त्रिदोषोदर यांची चिकित्सा.

सांनिपातोदरे कार्य एष एव क्रियाविधिः ।
हरीतक्यभयाकल्कभावितं मूत्रमम्बुना ॥ १ ॥
पीतं सर्वोदरप्लीहमेहार्शःकृमिगुल्मनुत् ।
सप्तलाशङ्खिनीसिद्धं घृतं चात्र विशोधनम् ॥ २ ॥
दन्तीद्रवन्तीफलजं तैलं दूष्योदरी पिबेत् ।

त्रिदोषजन्य उदरावर हाच (वर सांगितलेला तिन्हीही दोषांचा) विधि करावा. हिरडे व बाळहिरडे ह्यांचा कल्क घालून सिद्ध केलेलें गोमूत्र अथवा पाणी द्यावें. हें सर्व उदरें, गुल्म, मूळव्याध, पांथरी, मेह व कृमि ह्यांचा नाश करितें. शिकेकाई व सांखवेल ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप ह्या त्रिदोषजन्य उदरांत शोधनार्थ द्यावें. दांती व द्रवंती ह्याच्या फळांचें तेल दूष्योदराच्या रोग्यानें प्यावें.

नागरत्रिफलाप्रस्थं घृतं तैलं तथाऽऽढकम् ॥ ३ ॥
मस्तुना साधयित्वा तु पिबेत्सर्वोदरापहम् ।
कफमारुतसंभूतं गुल्मं चैव प्रशामयति ॥ ४ ॥

सुंठ, हिरडा, बेहडा व आवळकाठी हीं औषधें चौसष्ट तोळे; तेल व तूप दोनशें छपन्न तोळे घेऊन दह्यावरील पाणी घालून तूप सिद्ध करावें. तें सर्व उदरांचा नाश करितें आणि कफवातजन्य गुल्माचाही नाश करितें.

पांथरी व यकृत यांची चिकित्सा.

स्नेहस्वेदविकारादि विधेयं प्लीहरोगिणाम् ।
वामबाहौ च मोक्तव्या कूर्पराभ्यन्तरे शिरा ॥ १ ॥
विध्येत्प्लीहविनाशाय यकृन्नाशाय दक्षिणे ।
मणिबन्धे समुत्पन्नवामांगुष्ठसमीरिताम् ।
दहेच्छिरां शरेणाऽऽशु वैद्यः प्लीहप्रशान्तये ॥ २ ॥

पांथरीच्या रोग्याला अनेक प्रकारचे स्नेहस्वेदादि प्रयोग करावे. डाव्या बाहूच्या ठिकाणीं असणाऱ्या शिरेचा किंवा कोपरामध्यें

२. याचा प्रकार वाग्भट, चिकित्सास्थानांत पहावा.

असणाऱ्या शिरेचा वेध करावा. यकृन्नाशार्थ उजव्या बाजूची त्या त्या ठिकाणची शीर छेदावी. डाव्या अंगठ्याची मनगटाचे ठिकाणीं असणारी शीर डागावी.

सावरीच्या फुलांचा काढा.

सुस्विन्नं शाल्मलीपुष्पं निशापर्युषितं नरः ।
राजिकाचूर्णसंयुक्तं दद्यात्प्लीहोपशान्तये ॥ १ ॥

रात्रीं शेवरीचीं फुलें शिजवून तीं सकाळीं मोहरीचें चूर्ण घालून खाण्यास द्यावीं.

उन्हाळीच्या मुळयांचा कल्क.

शरपुंखामूलकल्कः पीतस्तक्रेण नाशयत्यचिरात् ।
बहुतरकालसमुत्थं प्लीहानं रूढमवगाढम् ॥ १ ॥

उन्हाळीच्या मुळयांचा ताकांत कल्क करून द्यावा. तो फार दिवसांच्या वाढलेल्या पांथरीचा नाश करतो.

लवणादि ताक.

लवणं रजनी राजी प्रत्येकं पलपञ्चकम् ।
चूर्णितं निक्षिपेद्भाण्डे शततक्रपलान्विते ॥ १ ॥
त्रिदिनं मुद्रितं रक्षेत्पश्चात्पञ्चपलं तदा ।
प्लीहानं नाशयेत्पीत्वा त्रिसप्ताहं न संशयः ॥ २ ॥

मीठ, हळद, मोहऱ्या हीं औषधें प्रत्येक वीस वीस तोळे घेऊन चारशें तोळे ताकांत टाकावीं; आणि तें भांडें तोंड बांधून तीन दिवस तसेंच ठेवावें. नंतर त्यांतील वीस तोळे ताक प्यावें. याप्रमाणें एकवीस दिवस केलें असतां पांथरीचा नाश होतो.

शंखनाभिचूर्ण.

सुपक्वजम्बीररसेन शंखनाभीरजः पीतमवश्यमेव ।
कर्षप्रमाणं शमयेदवश्यं प्लीहामयं कूर्मसमानमाशु ॥१॥

चांगल्या पिकलेल्या लिंबाच्या रसामध्यें एक तोळाभर शंखभस्म टाकून प्यावें. तें कासवाच्या पाठीसारख्या जाड पांथरीचा त्वरित नाश करितें.

यवान्यादि चूर्ण.

यवानिकाचित्रकयावशूकषड्ग्रन्थदन्तीमगधोद्भवानाम् ।

प्लीहानमेतद्विनिहन्ति चूर्णमुष्णाम्बुना मस्तुसुरासवैर्वा ॥ १ ॥

ओवा, चित्रकमूळ, जवखार, पिंपळमूळ, दांतीमूळ व पिंपळी ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं किंवा दह्याची निवळी, मद्य अगर आसव ह्यांजबरोबर द्यावें. तें पांथरीचा नाश करितें.

कुष्ठादिचूर्ण.

कुष्ठं वचा शृङ्गवेरं चित्रकं कौटजं फलम्।
पाठा चैवाजमोदा च पिप्पल्यः समचूर्णिताः ॥ १ ॥
ततो बिडालपदकं पिबेदुष्णेन वारिणा।
प्लीहोदरमुदावर्तं सर्वमेतेन शाम्यति ॥ २ ॥

कोष्ठ, वेखंड, आलें, चित्रकमूळ, इंद्रजव, पहाडमूळ, ओवा व पिंपळी ह्यांचें समभाग चूर्ण करावें, आणि त्यांतील एक तोळाभर चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. म्हणजे पांथरी, उदर व उदावर्त हे सर्व विकार बरे होतात.

लघुहिंग्वादि चूर्ण.

हिंगु त्रिकटुकं कुष्ठं यवक्षारोऽथ सैन्धवम्।
मातुलुङ्गरसेनैव प्लीहशूलहरं परम् ॥ १ ॥

हिंग, सुंठ, मिरें, पिंपळी, कोष्ट, जवखार व सैंधव ह्यांचें चूर्ण महाळुंगाच्या रसाशीं द्यावें. तें प्लीहा व शूळ यांचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

वायुः प्लीहानमुद्धृत्य कुपितो यस्य तिष्ठति।
शूलैः परितुदन्पार्श्वे प्लीहा तस्य प्रवर्धते ॥ २ ॥

वायु हा पांथरीला वर उचलून धरतो, व कुशींत शूळ व टोचणी लावून राहतो. त्यामुळें पांथरी वाढते.

सिंध्वादिचूर्ण.

सिन्धुमगधाग्निचूर्णं शिग्रुशिफाजाजिकासमं पीतम्।
प्रबलमपि योगराजः प्लीहानं नाशयत्याशु ॥ १ ॥

सैंधव, पिंपळी, चित्रकमूळ, चुना, शेवग्याची मुळी व जिरें ह्यांचें चूर्ण घेणें. हा श्रेष्ठ योग पांथरीचा त्वरित नाश करतो.

विडंगादि चूर्ण.

विडङ्गानि यवानी च चित्रकं चेति तत्समम्।
द्विगुणं देवदारुं च नगरं सपुनर्नवम् ॥ १ ॥

त्रिवृद्भागाश्च चत्वारस्तत्सर्वं कल्कपेषितम् ।
क्षीरेणोष्णेन पातव्यं श्रेष्ठं प्लीहविनाशनम् ॥ २ ॥
अथ वैतानि चूर्णानि गवां मूत्रेण पाययेत् ।
उदरीभूतमप्येवं प्लीहानं संप्रणाशयेत् ॥ ३ ॥

वावडिंग, ओवा, चित्रकमूळ हीं समभाग; देवदार दोन भाग, सुंठ दोन भाग, वसूची मुळी दोन भाग, तेड चार भाग ह्या सर्वांचें चूर्ण करून कढत दुधाशीं द्यावें. तें पांथरीचा त्वरित नाश करितें. अथवा हें चूर्ण गोमूत्रांतून प्यावें. तें उदराच्या स्वरूपाला गेलेल्या पांथरीचाही नाश करितें.

वज्रक्षार.

सौवर्चलं यवक्षारं सामुद्रं काचसैन्धवम् ।
टङ्कणं स्वर्जिकाक्षारं तुल्यमेकत्र चूर्णयेत् ॥ १ ॥
अर्कदुग्धैः स्नुहीदुग्धैर्भावयेदातपे त्र्यहम् ।
ऊर्ध्वाधस्थैः क्रमात्तस्य तत्तुल्यैरर्कपल्लवैः ॥ २ ॥
भाण्डे संस्थाप्य मृल्लिप्ते रुद्ध्वा गजपुटे पचेत् ।
स्वाङ्गशीतं तु संचूर्ण्य चूर्णमेषां तु मेलयेत् ॥ ३ ॥
त्र्यूषणं च विडङ्गं च राजिकां त्रिफलामपि ।
चव्यं च हिंगुसंभृष्टं तक्रेणाद्याद्यथाबलम् ॥ ४ ॥
वज्रक्षाराभिधं चूर्णमुदराणि विनाशयेत् ।
शोथं गुल्मं तथाऽष्ठीलां मन्दाग्निमरुचिं तथा ।
प्लीहानं यकृदाल्याख्यमुदरं च विशेषतः ॥ ५ ॥

पादेलोण, जवखार, मीठ, बांगडखार, सेंधेलोण, टाकणखार व सज्जिखार हे समभाग घेऊन त्याला रुईचा चीक व त्रिधारी निवडुंगाचा चीक ह्यांच्या उन्हामध्यें तीन तीन भावना द्याव्या. नंतर एका गाडग्यांत तें चूर्ण थोडें पसरून वर रुईचें पान घालून त्यावर पुन्हा तें चूर्ण पसरावें. ह्याप्रमाणें थरावर थर देऊन त्या गाडग्यास मातीनें संधिलेप करून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून त्याचें चूर्ण करावें. नंतर सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, मोहऱ्या, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, चवक व हिंग ह्यांचें चूर्ण समभाग मिसळून ठेवावें आणि शक्तिमानाप्रमाणें ताकांतून द्यावें. हें वज्रक्षार नांवाचें चूर्ण उदरांचा नाश करितें. तसेंच सूज, गुल्म, अष्ठीला, अग्नि-

मांद्य, अरुचि, पांथरी आणि विशेषतः यकृत ह्यांचा नाश करितें.

वृंदांतील शुक्तिक्षारादियोग.

पातव्यो युक्तितः क्षारः क्षीरेणोदधिशुक्तिजः।
पयसा वा प्रयोक्तव्याः पिप्पल्यः प्लीहशान्तये ॥ १ ॥

पांथरीचा नाश होण्याकरितां समुद्रांतील शिंपांचा क्षार दुधांतून द्यावा; अगर दुधांतून पिंपळ्या द्याव्या.

क्षारादि योग.

क्षारं वा बिडकृष्णाभ्यां पूतिकस्याम्बुनि शृतम्।
यकृत्प्लीहप्रशान्त्यर्थं पिबेत्प्रातर्यथाबलम् ॥ १ ॥

करंजाच्या सालीचा क्षार करंजाच्या काढ्यांत शिजवून बिडलोण व पिंपळी घालून यकृत व पांथरी ह्यांचें शमन करण्याकरितां प्रातःकाळीं प्यावा.

सौभांजनादि योग.

सौभाञ्जनकनिर्यूहं सैन्धवाग्निकणान्वितम्।
पलाशक्षारयुक्तं वा यवक्षारं प्रयोजयेत् ॥ १ ॥

शेवग्याच्या सालीचा काढा सेंधेलोण, चित्रकमूळ, पिंपळी ह्यांचें चूर्ण अगर पळसाचा क्षार घालून किंवा जवखार घालून द्यावा.

लशुनादि योग.

लशुनं पिप्पलीमूलमभयां चैव भक्षयेत्।
पिबेद्गोमूत्रगण्डूषं प्लीहरोगविमुक्तये ॥ १ ॥

लसूण, पिंपळमूळ, व हिरडा ह्यांचें चूर्ण पांथरीपासून मोकळें होण्याकरितां खावें व एक घोटभर गोमूत्र प्यावें.

रोहीतकादि कल्क.

रोहीतकाभयाकल्कं भावितं मूत्रमम्बुना।
पीतं सर्वोदरप्लीहमेहार्शःक्रमिगुल्मनुत् ॥ १ ॥

रक्तरोडा व बाळहिरडे ह्यांचा गोमूत्रांत कल्क करून प्यावा. तो सर्व उदरें, पांथरी, प्रमेह, मूळव्याध, कृमि व गुल्म ह्यांचा नाश करतो.

द्रवंतीनागवटी.

तिलैरण्डद्रवन्तीनां क्षारो भल्लातकं कणा।
एषां भागं समं कृत्वा तत्तुल्यं तु गुडं मतम् ॥ १ ॥

खादेदग्निबलं ज्ञात्वा पावकस्य विवृद्धये ।
जयेत्प्लीहानमत्युग्रं यकृद्गुल्मं तथैव च ॥ २ ॥

तीळ, एरंड, व द्रवंती ह्यांच्या काष्ठांचा क्षार, बिब्बे, पिंपळी, हीं औषधें समभाग घेऊन त्या सर्वांबरोबर गूळ घालावा आणि गोळ्या कराव्या. ही वटिका अग्निबलाच्या मानानें जठराग्नीची वाढ होण्याकरितां भक्षण करावी. ही अत्यंत उग्र अशी पांथरी, यकृत् व गुल्म ह्यांना जिंकते.

शिग्रुकाथ.

शोफं प्लीहोदरं हन्ति पिप्पलीमरिचान्वितः ।
अम्लवेतससंयुक्तः शिग्रुकाथः ससैन्धवः ॥ १ ॥

शेवग्याच्या सालीचा काढा करून त्यांत पिंपळी, मिरें, आम्लवेतस ह्यांचें चूर्ण व सैंधव घालून प्यावा. तो सूज, पांथरी, व उदर ह्यांचा नाश करतो.

क्षाराची भावना दिलेली पिंपळी.

पलाशक्षारतोयेन पिप्पली परिभाविता ।
गुल्मप्लीहार्तिशमनी वह्निदीप्तिकरी मता ॥ १ ॥

पिंपळीला पळसाच्या क्षाराच्या पाण्याची भावना द्यावी. ही क्षारभावित पिंपळी गुल्म व पांथरी ह्यांचा नाश करिते व अग्नि प्रदीप्त करते.

अग्निमुख लवण.

चित्रकत्रिवृतादन्तीत्रिफलारुचकैः समैः ।
यावन्त्येतानि चूर्णानि तावन्मात्रं तु सैन्धवम् ॥ १ ॥
भावयित्वा स्नुहीक्षीरैः स्नुकाण्डे प्रक्षिपेत्ततः ।
मृत्पङ्केनानुलिप्याथ प्रक्षिपेज्जातवेदसि ॥ २ ॥
सुदग्धं च ततो ज्ञात्वा शनैर्वैद्यः समुद्धरेत् ।
तक्रेण पीतं तच्चूर्णं यकृत्प्लीहोदरापहम् ।
एतदग्निमुखं नाम्ना लवणं वह्निवर्धनम् ॥ ३ ॥

चित्रकमूळ, तेड, दांतीमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व पादेलोण, हीं औषधें समभाग आणि सर्वांच्या बरोबर सैंधेलोण, ह्यांच्या चूर्णाला त्रिधारी निवडुंगाच्या चिकाची भावना देऊन

तें त्रिधारी निवडुंगाच्या कांडांत भरून त्यावर मातीचा लेप करून तें विस्तवांत टाकावें आणि चांगलें भाजलें म्हणजे त्यांतील चूर्ण हळूच काढून घ्यावें. हें चूर्ण ताकाशीं प्यावें. हें यकृत, पांथरी व उदर ह्यांचा नाश करतें. हें अग्निमुख नांवाचें लवण अग्निवर्धक आहे.

चित्रकादि घृत.

चित्रकस्य तुलाक्वाथे घृतप्रस्थं विपाचयेत् ।
आरनालं तु द्विगुणं दधिमण्डं चतुर्गुणम् ॥ १ ॥
पञ्चकोलकतालीसं क्षारौ च पटुपञ्चकम् ।
यवान्यौ द्वे च जरणे मरीचं चाक्षसंमितम् ॥ २ ॥
एतैर्युक्त्या घृतं सिद्धं मात्रया च पिबेत्प्रगे ।
प्लीहशोफोदरार्शोघ्नं विशेषादग्निदीपनम् ॥ ३ ॥

चित्रकमूळाच्या चारशें तोळे काढ्यांत चौसष्ट तोळे तूप, तुपाच्या दुप्पट कांजी व चौपट दह्याची निवळ घालून सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, तालीसपत्र, जवखार, सज्जिखार, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ, व बांगडखार, ओवा, अजमोदा, जिरें, शहाजिरें, ह्या औषधांचा कल्क तोळा तोळा घालावा; आणि तूप सिद्ध करावें; आणि तें प्रातःकाळीं योग्य प्रमाणांत घ्यावें. हें पांथरी, सूज, उदर, व मूळव्याध ह्यांचा नाश करितें. हें विशेषतः अग्निदीपक आहे.

महारोहितक घृत.

रोहीतकात्पलशतं संक्षुद्य बदराढकम् ।
साधयित्वा जलद्रोणे चतुर्भागावशेषिते ॥ १ ॥
घृतप्रस्थं समावाप्य च्छागक्षीरं चतुर्गुणम् ।
तस्मिन्द्रव्याणि सर्वाणि प्रदद्यात्कार्षिकाणि च ॥ २ ॥
व्योषं फलत्रिकं हिंगु यवानीं तुम्बरुं बिडम् ।
विडङ्गं चित्रकं चैव हपुषा चविकं वचा ॥ ३ ॥
अजाजी कृष्णलवणं दाडिमं देवदारु च ।
पुनर्नवा विशाला च यवक्षारं सपौष्करम् ॥ ४ ॥
एतैर्घृतं विपक्वं तु विदध्याद्दृढभाजने ।
पाययेच्च पलं मात्रां रसयूषपयोम्बुभिः ॥ ५ ॥
यकृत्प्लीहोदरं शूलमग्निमांद्यं च नाशयेत् ।
कुक्षिशूलं पार्श्वशूलं कटिशूलमरोचकम् ॥ ६ ॥

विबन्धशूलं शमयेत्पाण्डुरोगं सकामलम् ।
छर्द्यतीसारशमनं तन्द्राज्वरनिवारणम् ॥
महारोहीतकं नाम्ना प्लीहघ्नं तु विशेषतः ॥ ७ ॥

रक्तरोडच्याची साल चारशें तोळे; बोरें चौसष्ट तोळे ह्यांचा वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत चौसष्ट तोळे तूप, तुपाच्या चौपट शेळीचें दूध आणि सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हिंग, ओवा, चिरफळें, बिडलोण, वावडिंग, चित्रकमूळ, शेरणी, चवक, वेखंड, जिरें, पादेलोण, आंबट डाळिंब, देवदार, वसूची मुळी, कवंडळाची मुळी, जवखार व पोखरमूळ हीं औषधें एक एक तोळा घालून तूप सिद्ध करावें; आणि चांगल्या भांड्यांत भरून ठेवावें. आणि तें चार तोळे प्रमाणें मांसरस, यूष, दूध, किंवा पाणी ह्यांजबरोबर घ्यावें. हें यकृत्, पांथरी, उदर, शूळ, अग्निमांद्य, कुशींतील शूळ, बरगड्यांतील शूळ, कटीशूळ, अरुचि, मलावरोधजन्य शूळ, पांडुरोग, कावीळ, ओकारी, अतिसार, तंद्रा, व ज्वर ह्यांचा नाश करितें. हें महारोहितक नांवाचें घृत विशेषतः पांथरीनाशक आहे.

यकृत्चिकित्सा.

प्लीहोद्दिष्टाः क्रियाः सर्वा यकृतः संप्रकल्पयेत् ।
कार्यं च दक्षिणे बाहौ तत्र शोणितमोक्षणम् ॥ १ ॥
पिप्पलीकल्कसंयुक्तं घृतं क्षीरं चतुर्गुणम् ।
पक्त्वा पिबेद्यथावह्नि यकृद्दाल्युदरापहम् ॥ २ ॥

पांथरीवर सांगितलेले सर्व उपचार यकृतावर करावे. उजव्या बाहूची शीर तोडावी. पिंपळीचा कल्क, तूप व तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें, आणि अग्निबल पाहून सेवन करावें. तें यकृताचा नाश करितें.

बद्धगुदाची चिकित्सा.

स्विन्ने बद्धोदरे योज्यो बस्तिस्तीक्ष्णैस्तु भेषजैः ।
सतैललवणैश्चापि निरूहश्चानुवासनम् ॥ १ ॥
उदावर्तहरं सर्वं प्रकर्तव्यं चिकित्सितम् ।
वर्तयो विविधाश्चात्र पायौ शस्ताः प्रकीर्तिताः ॥ २ ॥

तीक्ष्णैर्विरेचनं चात्र शस्यते तु विशेषतः ।
वातहन्ता विधिः सर्वो विधातव्यो विजानता ॥ ३ ॥

बद्धगुदोदराच्या रोग्याला स्वेदन देऊन तीक्ष्ण औषधांचा बस्ती द्यावा. तेल व मीठ हीं द्रव्यें असलेले व अनुवासन व निरूह बस्ती द्यावे. उदावर्तनाशक सर्व चिकित्सा करावी. अनेक प्रकारच्या वाती गुदामध्यें घालणें प्रशस्त आहे. विशेषतः तीक्ष्ण रेचक देणें प्रशस्त आहे. विद्वान वैद्यानें ह्या बद्धगुदोदरांत सर्व वातनाशक क्रिया करावी.

क्षतोदर व जलोदर यांचीं चिकित्सा.

छिद्रांत्रबद्धसंज्ञेषु जठरेषु प्रयोगवित् ।
लब्धानुज्ञो भिषक्कुर्यात्पाटनं व्यधनक्रियाम् ॥ १ ॥
तथा जातोदकं सर्वमुदरं व्यधयेद्भिषक् ।

क्षतोदर व बद्धोदर ह्या रोगामध्यें शस्त्रक्रिया जाणणाऱ्या वैद्यानें राजाची व रोग्याच्या आप्तांची अनुज्ञा घेऊन शस्त्रक्रिया करावी. त्याचप्रमाणें पाणी झालेल्या सर्व उदरांवरही शस्त्रक्रिया करावी.

ज्ञातींश्च सुहृदो दारान्ब्राह्मणान्नृपतिं गुरुम् ॥ २ ॥
अनुज्ञाप्य भिषग्वर्यो विदध्यात्संशयं ध्रुवम् ।
सुवेष्टितं त्वधो नाभेर्वामतश्चतुरंगुलात् ॥ ३ ॥
अंगुल्युदरमात्रं तु व्रीहिवक्त्रेण भेदयेत् ।
नाडीमुभयतोद्वारां संयोज्यापहरेज्जलम् ॥ ४ ॥
न चैकस्मिन्दिने सर्वं दोषं त्वपहरेत्तथा ।
कासश्वासौ ज्वरस्तृष्णा गात्रभङ्गश्च वेपथुः ॥ ५ ॥
अतिसारश्च सुतरां पूर्यते जठरं ततः ।
तृतीयपञ्चमाद्येषु दिवसेष्वल्पशः पुनः ॥ ६ ॥
स्रावयेदुदकं तैललवणाभ्यां दहेद् व्रणम् ।
बध्नीयाद्विषतो दोषे रक्तं प्राक्प्रतिपूर्य च ॥ ७ ॥
संवेष्टयेद्गाढतरं कौशेयादिकचर्मणा ।
जलोदरेऽम्बु विस्राव्यं जातं जातं विरेचनैः ॥ ८ ॥
विरिक्तजठराध्मानं स्नेहाद्यैर्बस्तिभिर्जयेत् ।
निशृतां लङ्घितां पेयामस्नेहलवणां पिबेत् ॥ ९ ॥
अतः परं तु षण्मासान्क्षीरवर्ती भवेन्नरः ।
त्रीन्मासान्पयसा पेयं पिबेत्त्रींश्चापि योजयेत् ॥ १० ॥

सकोरदूषश्यामाकपयसा लवणं लघु।
नरः संवत्सरेणैव जयेदाशु जलोदरम्॥ ११ ॥

उदररोग्याच्या आप्तेष्टांना व ब्राम्हण, राजा व गुरु ह्यांना असें सांगावें कीं, हा रोगी औषधोपचारांनीं बरा होणें शक्य नसून शस्त्रक्रिया केली असतां कदाचित् जगण्याचा संभव आहे. मग त्यांनीं परवानगी दिल्यावर त्याला बेंबीच्या खालीं वस्त्रानें चांगलें वेष्टन करून बेंबीच्या खालीं डाव्या बाजूस चार अंगुळावर एक बोटभर जागेंत व्रीहिमुख शस्त्रानें पोट चिरावें. आणि द्विमुख नळीनें पाणी काढून घ्यावें. एकाच दिवशीं सर्व पाणी (दोष) काढूं नये. कारण त्यामुळें वातानें पुनः उदर भरतें; आणि खोकला, श्वास, ताप, तहान, अंग मोडणें, कांपरें व अतिसार हे विकार होतात. म्हणून तिसरे दिवशीं, पांचवे दिवशीं, अशा क्रमानें थोडेंथोडें पाणी काढावें आणि तेल व मीठ ह्यांच्या योगानें जखम भाजून काढावी. दोष निघून गेल्यावर जखम शिवून रेशमी वस्त्रानें किंवा चामड्यानें बांधावी. जलोदरामध्यें जसें जसें पाणी उत्पन्न होईल तसें तसें तें रेचक देऊन काढून टाकावें. रेच झाल्यावर पोट फुगल्यास तें स्नेहपान व बस्ती यांनीं जिंकावें. चांगली शिजविलेली व हलकी अशी पेज, स्निग्ध नसलेली, मीठ घालून प्यावी. त्यानंतर सहा महिनेपर्यंत रोग्यानें दुधावर रहावें. तीन महिनेपर्यंत दूध पिऊन रहावें व पुढें तीन महिने दुधाबरोबर हरीक व सावे ह्याचें अन्न मीठ घालून खावें, ह्याप्रमाणें एक वर्षभर केलें असतां मनुष्य उदराला जिंकतो.

सर्व उदरांवर सामान्य उपचार.

उदराणां मलाढ्यत्वाद्बहुशः शोधनं हितम्।
क्षीरेणैरण्डजं तैलं पिबेन्मूत्रेण वा सकृत्॥ १ ॥
ज्योतिष्मत्याः पिबेत्तैलं पयसा वा दिने दिने।
मूत्राण्यष्टावुदरिणां सेके पाने च योजयेत्॥ २ ॥

उदरें हीं दोषयुक्त असल्यामुळें त्यांना बहुधा शोधन हितकारक आहे. म्हणून दुधाबरोबर किंवा गोमूत्राबरोबर वरचेवर एरंडेल प्यावें. अथवा करडकांगोणीचें तेल रोजच्यारोज दुधांतून

घ्यावें. गोमूत्रादि आठ प्रकारचीं मूत्रें उदराच्या रोग्याला पिण्याकरितां व अंगावर शिंपडण्याकरितां योजावीं.

देवदार्व्यादि लेप.

देवदारुपलाशार्कहस्तिपिप्पलिशिग्रुकैः ।
साश्वगन्धैः सगोमूत्रैः प्रदिह्यादुदरं शनैः ॥ १ ॥

देवदार, पळस, रुई, गजपिंपळी, शेवग्याची साल व अश्वगंध हीं औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचा उदरावर लेप करावा.

रोहितकादि योग.

रोहीतकाभयाशुण्ठीः पिबेन्मूत्रेण शक्तितः ।
सर्वोदरहरं प्लीहमेहार्शःक्रिमिगुल्मनुत् ॥ १ ॥

रक्तरोडा, सुरवरी हिरडा, व सुंठ हीं औषधें गोमूत्रांत उगाळून शक्तीप्रमाणें प्यावीं. तीं सर्व उदरें, प्रमेह, पांथरी, मूळव्याध, क्रमि व गुल्म ह्यांचा नाश करितात.

विशालादि योग.

विशालाशंखिनीदन्तीत्रिवृत्रिफलकात्रयम् ।
निशा विडङ्गं कम्पिल्लं मूत्रेणोदरवान्पिबेत् ॥ १ ॥

कडुवृंदावनाचें मूळ, सांखवेल, दांतीमूळ, तेड, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, हळद, वावडिंग आणि कापिला, ह्यांचें चूर्ण गोमूत्रांतून उदरी मनुष्यानें प्यावें.

दुग्धादि योग.

पयो वा चव्यदन्त्यग्निविडङ्गव्योषकल्कितम् ।
पेयं वा शृङ्गबेराम्बु कषायो दारुवह्निजः ।
चव्यविश्वसमुत्थो वा पेयो जठरशान्तये ॥ १ ॥

चवक, दांतीमूळ, चित्रकमूळ, वावडिंग, सुंठ, मिरें व पिंपळी, ह्यांचें चूर्ण घालून दूध प्यावें. अथवा आल्याचा रस प्यावा. किंवा देवदार व चित्रकमूळ ह्यांचा काढा प्यावा. अथवा उदराचें शमन होण्याकरितां चवक व सुंठ ह्यांचा काढा वरील चूर्ण घालून द्यावा.

सुश्रुतांतील.

हरीतकीसहस्रं वा गोमूत्रेण पयोऽनुपः ।
सहस्रं पिप्पलीनां वा स्नुक्क्षीरेण सुभावितम् ॥ १ ॥

पिप्पलीवर्धमानं वा क्षीराशी वा शिलाजतु ।
तद्वद्वा गुग्गुलं क्षीरं तुल्यार्द्रकरसं तथा ।
चित्रकामरदारुभ्यां कल्कं क्षीरेण वा पिबेत् ॥ २ ॥

दुधावर राहून हजार हिरडे गोमूत्राबरोबर खावे किंवा त्रिधारी निवडुंगाची भावना दिलेल्या पिंपळ्या हजार खाव्या. वर्धमान पिंपळी घ्यावी, किंवा दुधावर राहून शिलाजित घ्यावा. त्याचप्रमाणें गुग्गुळ, दूध व आल्याचा रस समभाग घालून घ्यावा. किंवा चित्रक-मूळ व देवदार ह्यांचा कल्क दुधाशीं घ्यावा.

वर्धमान पिंपळी.

त्रिभिरथ परिवृद्धं पञ्चभिः सप्तभिर्वा
दशभिरथ विवृद्धं पिप्पलीवर्धमानम् ।
यदि पिबति युवा यस्तस्य न श्वासकास-
ज्वरजठरगुदार्शोवातरक्तक्षयाः स्युः ॥ १ ॥

तीन, पांच, सात, अगर दहा, अशा क्रमवृद्धीनें जो तरुण मनुष्य वर्धमान पिंपळी घेतो, त्याला श्वास, खोकला, ज्वर, उदर, मूळव्याध, वातरक्त व क्षय हे रोग होत नाहींत.

देवद्रुमादि योग.

देवद्रुमं शिग्रुमसूरकं च गोमूत्रपिष्टामथवाऽश्वगन्धाम् ।
पीत्वाऽऽशु हन्यादुदरं प्रवृद्धं क्रमीन्सशोफानुदरं च दूष्यम् १

देवदार, शेवग्याचें मूळ, व मसुरा हीं औषधें गोमूत्रांत वाटून प्यावीं. अथवा अश्वगंध दुधांत वाटून प्यावा, म्हणजे तो वाढलेल्या उदराचा नाश करतो. तसेंच क्रमि, सूज व दूष्योदर ह्यांचाही नाश करतो.

पटोलादिचूर्ण.

पटोलमिंद्ररजनीविडङ्गत्रिफलात्वचः ।
काम्पिल्लकं नीलिनीं च त्रिवृतां चेति चूर्णयेत् ॥ १॥
षडाद्यान्कार्षिकानन्त्यांस्त्रींश्च द्वित्रिचतुर्गुणान् ।
कृत्वा चूर्णं ततो मुष्टिं गवां मूत्रेण वा पिबेत् ॥ २ ॥
विरिक्तो मृदु भुञ्जीत भोजनं जाङ्गलै रसैः ।
मण्डं पेयां च पीत्वा वा सव्योषं षडहं पयः ॥ ३ ॥
शृतं पिबेत्ततश्चूर्णं पिबेदेवं पुनः पुनः ।

हन्ति सर्वोदराण्येतच्चूर्णं जातोदकान्यपि ॥
कामलां पाण्डुरोगं च श्वयथुं चापकर्षति ॥ ४ ॥

पडवळ, इंद्रजव, हळद, वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, दालचिनी, कपिला, निळीचें बी, व तेड ह्यांपैकीं पहिलीं सहा औषधें एक एक तोळा; आवळकाठी व दालचिनी हीं औषधेंही एक एक तोळा; आणि शेवटचीं तीन म्हणजे–कपिला, निळीचें बीं व तेड हीं औषधें क्रमानें दोन तोळे, तीन तोळे व चार तोळे ह्या प्रमाणांत घ्यावीं; आणि त्यांचें चूर्ण करून त्या चूर्णापैकीं चार तोळे चूर्ण गोमूत्रांतून घ्यावें. रेच झाल्यावर जांगलप्राण्यांच्या मांसरसाबरोबर हलकें अन्न खावें. अथवा सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण घालून केलेला मंड अगर पेज घ्यावी. नंतर तापविलेलें दूध प्यावें व पुनः चूर्ण घ्यावें. ह्याप्रमाणें सहा दिवस क्रम ठेवावा. हें चूर्ण पाणी झालेला देखील सर्व उदरें नाहींशीं करतें. आणि कावीळ, पांडुरोग, सूज ह्यांचाही नाश करितें.

नारायणचूर्ण.

यवानी हपुषा धान्यं त्रिफला सोपकुञ्चिका ।
कारवी पिप्पलीमूलमजगन्धा शठी वचा ॥ १ ॥
शताह्वा जीरकं व्योषं स्वर्णक्षीरी सचित्रकम् ।
द्वौ क्षारौ पुष्करं मूलं कुष्ठं लवणपञ्चकम् ॥ २ ॥
विडङ्गं च समांशानि दन्तीभागत्रयं तथा ।
त्रिवृद्विशाले द्विगुणे सातला स्याच्चतुर्गुणा ॥ ३ ॥
एष नारायणो नाम चूर्णो रोगगणापहः ।
तक्रेणोदरिभिः पेयो गुल्मिभिर्बदराम्बुना ॥ ४ ॥
आनद्धवाते सुरया वातरोगे प्रसन्नया ।
दधिमण्डेन विट्सङ्गे दाडिमाम्बुभिरर्शसि ॥ ५ ॥
परिकर्ते च वृक्षाम्लैरुष्णाम्बुभिरजीर्णके ।
भगंदरे पाण्डुरोगे कासे श्वासे गलग्रहे ॥ ६ ॥
हृद्रोगे ग्रहणीरोगे कुष्ठे मन्दानले ज्वरे ।
दंष्ट्राविषे मूलविषे गरले कृत्रिमे विषे ।
यथार्हं स्निग्धकोष्ठेन पेयमेतद्विरेचनम् ॥ ७ ॥

ओवा, शेरणी, धणे, हिरडा, बेहडा, आवळकाठी, शहाजिरें,

बडिशेप, पिंपळमूळ, रानतुळसीचें बी, कचोरा, वेखंड, बाळंतशेप, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी, काटेघोतऱ्याची मुळी, चित्रकमूळ, जवखार, सज्जिखार, पोखरमूळ, कोष्ट, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ, बांगडखार, व वावडिंग हीं औषधें समभाग; दांतीमूळ तीन भाग, तेड व कडूवृंदावनाची मुळीं ही औषधें २।२ भाग व शिकेकाईचें मूळ चार भाग, ह्यांचें चूर्ण करावें. हें नारायणचूर्ण रोगसमुदायाचा नाश करितें. उदराच्या रोग्यांनीं हें ताकाशीं घ्यावें. गुल्माच्या रोग्यांनीं बोराच्या काढ्यांतून घ्यावें. आनाहवातावर मद्याशीं घ्यावें. वातरोगांत मद्याच्या निवळींतून घ्यावें. मलावरोधावर दह्यावरील पाण्यातून द्यावें. मूळव्याधीवर डाळिंबाच्या पाण्यांतून द्यावें. गुदांत कातरल्यासारखें होतें त्याजवर आमसुलाच्या पाण्यांतून द्यावें. अजीर्णावर ऊन पाण्यांतून घ्यावें. ह्याशिवाय, भगंदर, पांडुरोग, खोकला, श्वास, गलरोग, हृद्रोग, संग्रहणी, कुष्ठ, अग्निमांद्य, ज्वर, जंगमविष, स्थावरविष, कृत्रिमविष (गर) ह्या विकारांवर कोठा स्निग्ध करून हें विरेचन घ्यावें.

क्षारद्वयचूर्ण.

क्षारद्वयानलव्योषनीलीलवणपञ्चकम् ।
चूर्णितं सर्पिषा पेयं सर्वगुल्मोदरापहम् ॥ १ ॥

जवखार, सज्जिखार, चित्रकमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, निळंबीचें बीं व पंचलवणें, ह्यांचें चूर्ण करून तुपाशीं घ्यावें. तें सर्व गुल्मांचा व उदरांचा नाश करितें.

वृंदांतील शुक्तिक्षारयोग.

सामुद्रशुक्तिकाक्षारो यवक्षारः ससैन्धवः ।
गोदध्ना संप्रयुज्येत सर्वोदरविनाशनः ॥ १ ॥

समुद्रांतील शिंपीचें भस्म, जवखार व सेंधेलोण, ह्यांचें चूर्ण गाईच्या दह्याशीं घ्यावें. तें सर्व उदरांचा नाश करितें.

उंटिणीच्या दुधाचा योग.

उष्ट्रीक्षीरं पिबेज्जीर्णे निरन्नो जठरामयी ।
पक्षं मासमृतुं वाऽपि न च पानीयमाचरेत् ॥ १ ॥

पंधरा दिवस, महिनाभर अगर दोन महिने उदराच्या रोग्यानें नुसतें उंटिणीचें दूध पिऊन राहावें. अन्न किंवा पाणी कांहीं देखील खाऊं नये.

बिंदुघृत.

अर्कक्षीरं पले द्वे तु स्नुहीक्षीरं पलानि षट्।
पथ्या कम्पिल्लकं श्यामा शम्याकं गिरिकर्णिका ॥१॥
नीलिनी त्रिवृता दन्ती शङ्खिनी चित्रकं तथा।
एतेषां पलिकैर्भागैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २ ॥
अथास्य मलिने कोष्ठे बिन्दुमात्रं प्रदापयेत्।
यावदस्य पिबेद्बिन्दून् तावद्वेगान्विरिच्यते ॥ ३ ॥
कुष्ठं गुल्ममुदावर्तं श्वयथुं सभगंदरम्।
शमयत्युदराण्यष्टौ वृक्षमिन्द्राशनिर्यथा।
एतद्बिन्दुघृतं नाम येनाभ्यक्तो विरिच्यते ॥ ४ ॥

रुईचा चीक आठ तोळे, त्रिधारी निवडुंगाचा चीक चोवीस तोळे, हिरडे, कपिला, तेड, बाहव्याची शेंग, गोकर्णीची मुळी, निळीचें बी, तांबडें निशोत्तर, दांतीमूळ, सांखवेल, चित्रकमूळ, ह्यांचा कल्क चार चार तोळे घालून तूप सिद्ध करावें. हें तूप दोषयुक्त कोठ्यावर एक थेंबभर द्यावें. ह्याचे जितके थेंब ध्यावे तितके रेच होतात. कुष्ट, गुल्म, उदावर्त, सूज, भगंदर, व आठ प्रकारचीं उदरें ह्यांचा नाश करितें. वीज पडल्यानें जसा वृक्षाचा नाश होतो. त्याप्रमाणें, हें पोटावर लावल्यानेंही रेच होतात असें हें बिंदुघृत आहे.

योगतरंगिणींतील नाराचघृत.

त्रिफला चित्रको दन्ती बृहती कण्टकारिका।
स्नुही चार्कविडंगानि घृतस्य कुडवं पचेत् ॥ १ ॥
तस्य मृद्वग्निसिद्धस्य कर्षार्धं पाययेन्नरम्।
शोथगुल्मोदरानाहप्लीहोदरजलोदरान्।
नाशयत्युल्बणानेतान्सर्पिर्नाराचसंज्ञितम् ॥ २ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, चित्रकमूळ, दांतीमूळ, रिंगणमूळ; डोरलीमूळ, त्रिधारी निवडुंगाचा चीक, रुईचा चीक व वावडिंग ह्यांचा कल्क व काढा ह्यांमध्यें सोळा तोळे तूप सिद्ध करावें व तें

अर्धा तोळा घ्यावें. म्हणजे सूज, गुल्म, उदर, पोट फुगणें, पांथरी, उदर, जलोदर, ह्या अत्यंत वाढलेल्या रोगांचाही हें नाराचघृत नाश करितें.

त्रिवृतादिघृत.

पयस्यष्टगुणे सर्पिः प्रस्थं स्नुकपयसः पलम् ।
त्रिवृता पलकल्केन सिद्धं जठरगुल्मनुत् ॥ ३ ॥

चौसष्ट तोळे तूप, पांचशें बारा तोळे दूध, त्रिधारी निवडुंगाचा चीक चार तोळे आणि तेंडाचा कल्क चार तोळे घालून तूप तयार करावें. तें उदर व गुल्म ह्यांचा नाश करितें.

पंचमूलादिघृत.

द्वे पञ्चमूल्यौ त्रिवृता निकुम्भः ससप्तलं चित्रकशिग्रुमूलम् ।
करञ्जबीजं त्रिफलागुडूचीमेरण्डमूलं मदयन्तिका च ॥ १ ॥
पाठां सभार्गीं सुषवीं सतिक्तां सरोहिषां यासकुचेलिकां च ।
पृथक्समाहृत्य पलं जलस्य द्रोणे पचेत्तच्चतुरंशशेषे ।
घृतं विपक्वं सकषाययुक्तं निहन्ति पीतं सकलोदराणि ॥ २ ॥

दशमुळें, तेड, दांतीमूळ, शिकेकाईचें मूळ, चित्रकमूळ, शेवग्याचें मूळ, करंजाचें बी, त्रिफळा, गुळवेल, एरंडमूळ, मोगरीचें मूळ, पहाडमूळ, भारंगमूळ, कारलीचें मूळ, कुटकी, रोहिसगवत, धमासा, पहाडमूळ, हीं औषधें चार चार तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा आणि त्यांत तूप शिजवून घ्यावें. तें सर्व उदरांचा नाश करितें.

हिंग्वादिघृत.

हिंग्वा रसोनार्द्रकशिग्रुपथ्याषड्ग्रथिदन्तीदशमूलतोयैः ।
द्विक्षारपञ्चोषणकल्कपादैः सिद्धं घृतं तज्जठरे प्रशस्तम् ॥ १ ॥

हिंग, लसून, आलें, शेवग्याची साल, हिरडेदळ, पिंपळमूळ, दांतीमूळ, व दशमुळें ह्यांचा काढा, जवखार, सुंठ, मिरें, पिंपळी चवक आणि चिकत्रमूळ ह्यांचा कल्क घालून तूप तयार करावें. तें उदरांवर प्रशस्त आहे.

तक्रपान.

वातोदरी पिबेत्तक्रं पिप्पलीलवणान्वितम् ।

शर्करामरिचोपेतं स्वादु पित्तोदरी पिबेत् ॥ १ ॥
यवानीसैन्धवाजाजीव्योषयुक्तं कफोदरी ।
संनिपातोदरी तक्रं त्रिकटुक्षारसैन्धवैः ॥ २ ॥
बद्धोदरी तु हपुषा दीप्यकाजाजिसैन्धवैः ।
पिबेच्छिद्रोदरी तक्रं पिप्पलीक्षौद्रसंयुतम् ।
त्र्यूषणक्षारलवणैर्युक्तं तु सलिलोदरी ॥ ३ ॥

वातोदराच्या रोग्यानें पिंपळीचें चूर्ण व सैंधव घालून ताक प्यावें; पित्तोदराच्या रोग्यानें साखर व मिऱ्याची पूड घालून गोड ताक प्यावें. कफोदराच्या रोग्यानें ओवा, सैंधव, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण घालून ताक प्यावें. सान्निपातिक उदराच्या रोग्यानें सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार व सैंधव ह्यांचें चूर्ण घालून ताक प्यावें. बद्धोदराच्या रोग्यानें शेरणी, ओवा, जिरें व सैंधव ह्यांजबरोबर प्यावें. छिद्रोदराच्या रोग्यानें पिंपळीचें चूर्ण व मध घालून ताक प्यावें. सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार व सैंधव घालून तयार केलेलें ताक जलोदराच्या रोग्यानें प्यावें.

शोफोदरचिकित्सा.

हरीतकीनागरदेवदारुपुनर्नवाछिन्नरुहाकषायः ।
सगुग्गुलुर्मूत्रयुतश्च पेयः शोफोदराणां प्रवरः प्रयोगः ॥ १ ॥

हिरडे, सुंठ, देवदार, वसू व गुळवेल ह्यांचा काढा, गुग्गुळ व गोमूत्र घालून प्यावा. हा प्रयोग शोफोदराच्या रोग्याला उत्तम आहे.

पुनर्नवानिम्बपटोलशुण्ठीतिक्ताभयादार्व्यमृताकषायः ।
सर्वाङ्गशोफोदरकासशूलश्वासान्वितं पाण्डुगदं निहन्ति ॥२॥

वसूची मुळी, कडुनिंबाची साल, कडू पडवळ, सुंठ, कुटकी, बाळहिरडे, दारुहळद व गुळवेल ह्यांचा काढा सर्वांगाची सूज, खोकला, शूळ व श्वास ह्यांसुद्धां पांडुरोगाचाही नाश करतो.

पुनर्नवादार्व्यभयागुडूचीः पिबेत्समूत्रा महिषाक्षयुक्ताः ।
त्वग्दोषशोफोदरपाण्डुरोगस्थौल्यप्रसेकोर्ध्वकफामयेषु ॥ ३ ॥

वसूची मुळी, दारुहळद, गुळवेल ह्यांचा काढा गोमूत्र व गुग्गुळ घालून त्वचेचे रोग, शोफोदर, पांडुरोग, स्थूळपणा, मळमळणें व मानेचवरील कफरोग ह्यांजवर द्यावा.

गोमूत्रयुक्तं महिषीपयो वा क्षीरं गवां वा त्रिफलाविमिश्रम् ।
क्षीरान्नभुक्केवलमेव गव्यं मूत्रं पिबेद्वा श्वयथूदरेषु ॥ ४ ॥

शोफोदरावर गोमूत्र घालून म्हशीचें दूध प्यावें. अथवा गाईचें दूध त्रिफळ्याच्या काढ्यांतून प्यावें, अथवा दूधभात खाऊन नुस्तें गोमूत्र प्यावें.

सप्ताहं माहिषं मूत्रं पयसा चाम्बुवर्जितम् ।
पिबेदौष्ट्रं पयो मासं श्वयथूदरनाशनम् ॥ ५ ॥

पाणी न पितां दुधावर राहून शोफोदरावर सात दिवसपर्यंत म्हशीचें मूत प्यावें. किंवा एक महिनाभर उंटिणीचें दूध प्यावें. तें शोफोदराचा नाश करितें.

बिल्वाग्निचव्यार्द्रकशृंगबेरक्काथेन कल्केन च सिद्धमाज्यम् ।
सच्छागदुग्धं ग्रहणीगुदोत्थशोफाग्निसादारुचिहृद्वरिष्ठम् ॥ ६ ॥

बेलाचें मूळ, चवक, चित्रकमूळ, आलें, सुंठ ह्यांच्या काढ्यानें व कल्कानें सिद्ध केलेलें तूप शेळीच्या दुधाशीं घ्यावें; तें संग्रहणी, मूळव्याध, सूज, अग्निमांद्य व अरुचि ह्यांच्या नाशाविषयीं फार उत्तम आहे.

रसायनें, नाराचरस.

भृष्टटङ्कणतुल्यं तु मरिचं च रसं समम् ।
गन्धकं पिप्पली शुण्ठी द्वौ द्वौ भागौ विचूर्णयेत् ॥ १ ॥
सर्वतुल्यं क्षिपेद्दन्तीबीजं सर्वमकल्मषम् ।
द्विगुञ्जं रेचनं चैतदुदराणि व्यपोहति ॥ २ ॥

टाकणखाराची लाही, मिरें व पारा एकेक भाग; गंधक, पिंपळी, सुंठ, दोन दोन भाग व सर्वांच्या बरोबरीनें शुद्ध जेपाळ ह्यांचा खल करून ठेवावा. हा नाराच रस दोन गुंजा द्यावा. तो उदराचा नाश करतो.

इच्छाभेदी रस.

शुण्ठीमरीचसंयुक्ता रसगन्धकटङ्कणाः ।
जेपालस्त्रिगुणः प्रोक्तः सर्वमेकत्र मर्दितम् ॥ १ ॥
इच्छाभेदी रसो ह्यस्य द्विगुञ्जां ससितां पिबेत् ।
यावच्च चूलकाः पीतास्तावद्वेगैर्विरिच्यते ।
तक्रोदनं च दातव्यं पथ्यमत्र विजानता ॥ २ ॥

सुंठ, मिरें, पारा, गंधक व टाकणखार हीं औषधें समभाग, शुद्ध जेपाळ तीन भाग ह्यांचा एकत्र खल करावा. हा इच्छाभेदी रस दोन गुंजा साखरेशीं घ्यावा. ह्याजवर पाण्याचे जितके घोट घ्यावे तितके रेच होतात. ह्याजवर ताक व भात पथ्याला द्यावा.

जलोदरारि.

पिप्पलीमरिचं ताम्रं काञ्चनीचूर्णसंयुतम् ।
स्नुहीक्षीरैर्दिनं मर्द्यं तुल्यं जेपालबीजकम् ।
निष्कं भुक्तं विरेकेण सत्यं हन्ति जलोदरम् ॥ १ ॥

पिंपळी, मिरें, ताम्रभस्म व हळद हीं औषधें समभाग घेऊन त्रिधारी निवडुंगाच्या रसांत एक दिवस खल करावा. नंतर त्याच्या समान त्यांत शुद्ध जेपाळ खलून ठेवावा. हा तीन मासेपर्यंत द्यावा. हा खरोखर जलोदराचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

दोषैः कुक्षौ हि संपूर्णे वह्निर्मन्दत्वमृच्छति ।
तस्माद्भोज्यानि योज्यानि दीपनानि लघूनि च ॥ १ ॥
शालिषष्टिकगोधूमयवनीवारभोजनम् ।
विरेकास्थापनं श्रेष्ठं सर्वेषु जठरेषु च ॥ २ ॥

कुशी दोषांनीं भरल्या असतां अग्नि मंद होतो. ह्यासाठीं हलकीं अन्नें पथ्याला द्यावीं. साळी, साठ्यासाळी, गहू, देवभात व सातू ह्यांचें अन्न, रेचक व निरूहबस्ती हें सर्व उदरावर पथ्य सांगितलें आहे.

संहितेंतील पथ्यापथ्य.

विरेचनं लङ्घनमब्दसंभवाः कुलत्थमुद्गारुणशालयो यवाः ।
मृगा द्विजा जाङ्गलसंज्ञयान्विताः पेया सुरा माक्षिकसीधुसैन्धवाः
तक्रं रसोनोरुबुतैलमार्द्रकं शालिं च शाकं कुलकं कटिल्लकम् ।
पुनर्नवा शिग्रुफलं हरीतकी ताम्बूलमेला यवशूकमायसम् ॥२॥
अजागवोष्ट्रीमहिषीपयो जलं लघूनि तीव्राणि च दीपनान्यपि ।
यथामलं पथ्यगणोऽयमाश्रितः सखा नृणां स्यादुदरामये सति ३

विरेचन, लंघन, एक वर्षाचे जुने हुलगे, मूग, जुन्या साळी, सातू, जांगल देशांतील मृगांचें व पक्ष्यांचें मांस घालून तयार केलेली पेज, मद्य, मध, सीधू, सैंधव, ताक, लसूण, एरंडतेल, आलें,

साळी, पडवळ, कारली ह्यांच्या भाज्या; वसू, शेवग्याच्या शेंगा, हिरडा, विडा, वेलदोडे, जवखार, लोहभस्म, शेळी, गाय, उंटिण व म्हैस ह्यांचें दूध, हलकें पाणी, तीव्र व दीपक पदार्थ, हा दोषानुरूप पथ्यवर्ग सांगितला आहे. ह्याचा आश्रय केला असतां हा उदररोगांत मित्रासारखा आहे.

अम्बुपानं दिवास्वापं गुर्वभिष्यन्दि भोजनम् ।
व्यायामं चाध्वयानं च जठरी परिवर्जयेत् ॥ ४ ॥

पाणी पिणें, दिवसा निजणें, जड व कफकारक पदार्थ खाणें, व्यायाम व मार्ग चालणें ह्या गोष्टी उदराच्या रोग्यानें वर्ज कराव्या.

शोथनिदान.

शोथाचें संप्राप्तिपूर्वक रूप.

रक्तपित्तकफान्वायुर्दुष्टो दुष्टान्बहिः शिराः ।
नीत्वा रुद्धगतिस्तैर्हि कुर्यान्मांसत्वगाश्रयम् ।
उत्सेधं संहतं शोफं तमाहुर्निचयादतः ॥ १ ॥
सर्वं हेतुविशेषैस्तु रूपभेदान्नवात्मकम् ।
दोषैः पृथग्द्वयैः सर्वैरभिघाताद्विषादपि ॥ २ ॥

स्वकारणानें कुपित झालेला वायु, कुपित झालेल्या रक्तपित्त व कफ ह्या दोषांना बाह्य शिरांत नेतो. त्यामुळें त्याचा मार्ग बंद होऊन तो कोंडला जातो. नंतर तो त्वचा व मांस ह्यांचा आश्रय करून वर उचललेली उंच अशी सूज उत्पन्न करतो. ही रक्तासह तिन्हीही दोषांच्या समुदायानें होते. म्हणून याला त्रिदोषात्मक असें म्हणतात. सर्व प्रकारची सूज निरनिराळ्या कारणभेदानें व निरनिराळ्या स्वरूपानें नऊ प्रकारची आहे. वातादि तीन दोषांनीं तीन, दोन दोन दोषांच्या संयोगानें तीन, सर्व दोषांपासून एक, अभिघातानें एक व विषामुळें एक; मिळून सुजेचे हे नऊ प्रकार आहेत.

सुजेचें पूर्वरूप.

तत्पूर्वरूपं दवथुः शिरायामोऽङ्गगौरवम् ॥ ३ ॥

अंगाचा दाह होणें, शिरा ताठणें, व अंगाला जडत्व हीं लक्षणें सूज येण्यापूर्वीं होतात.

कारण.

शुद्ध्यामयाभक्तकृशाबलानां क्षाराम्लतीक्ष्णोष्णगुरूपसेवा।
दध्याममृच्छाकविरोधिदुष्टगरोपसृष्टान्ननिषेवणं च ॥ ४ ॥
अर्शांस्यचेष्टा न च देहशुद्धिर्मर्माभिघातो विषमा प्रसूतिः।
मिथ्योपचारः प्रतिकर्मणां च निजस्य हेतुः श्वयथोः प्रदिष्टः ५

वमनविरेचनादि देहशुद्धीच्या उपायानें, ज्वरादि रोगांमुळें किंवा उपासामुळें कृश झालेल्या मनुष्यानें खारट, आंबट, तिखट, उष्ण, व जड असे पदार्थ खाल्ले तर, दहीं, अपक्व अन्न, माती, पालेभाज्या, विरुद्ध अन्न, दूषित अन्न व संयोगजन्य विष ज्यामध्यें आहे असें अन्न खाल्लें तर सूज उत्पन्न होते. त्याचप्रमाणें मूळव्याध, व्यायाम न करणें, वमनविरेचनादिकांची आवश्यकता असून तीं न घेतल्यानें, मर्माचे ठिकाणीं कांहीं इजा झाल्यानें, विषम प्रसूतीमुळें व वमनविरेचनादिकांच्या मिथ्यायोगामुळें सूज उत्पन्न होते.

त्याचें सामान्य लक्षण.

सगौरवं स्यादनवस्थितत्वं सोत्सेधमूष्माऽथ शिरातनुत्वम्।
सलोमहर्षं च विवर्णता च सामान्यलिङ्गं श्वयथोः प्रदिष्टम् ॥ ६ ॥

अंगाला जडत्व, अस्वस्थपणा, त्वचा फुगणें, दाह होणें, शिरा ताठणें, अंगावर रोमांच उभे राहणें, व अंगाचा वर्ण बदलणें, हें सुजेचें सामान्य लक्षण आहे.

वातशोथाचें लक्षण.

चलस्तनुत्वक्परुषोऽरुणोऽसितः प्रसुप्तिहर्षार्तियुतोऽनिमित्ततः।
प्रशाम्यति प्रोन्नमति प्रपीडितो दिवा बली च श्वयथुः समीरणात्॥

वातजन्य सूज चंचळ असते, तींत त्वचा पातळ होते; सूज खरखरीत असते, तिचा रंग तांबूस काळसर असतो; त्वचा बधिर असते; तिजवर शहारे येतात; वेदना होतात; सूज कारणावांचून उतरते, दाबली असतां पुनः वर येते व दिवसा जास्त होते.

पित्तजन्य शोथ.

मृदुः सगन्धोऽसितपीतरागवाञ्ज्वरभ्रमस्वेदतृषामदान्वितः।
य उष्यते स्पर्शरुगक्षिरागकृत्सपित्तशोफो भृशदाहपाकवान् ॥८॥

पित्तजन्य सूज मऊ, दुर्गंधी, काळसर व पिवळट असते. तिच्या-

मुळें भ्रम, ताप, घाम, तहान, उन्माद हे विकार होतात. ती कढत असते. तिला स्पर्श केला असतां ठणका लागतो, डोळे लाल होतात, अत्यंत दाह होतो, सुजेवर बारीक बारीक पुटकुळ्या उठतात, व ती पिकते.

कफजन्य शोथ.

गुरुः स्थिरः पाण्डुररोचकान्वितः प्रसेकनिद्रावमिवह्निमान्द्यकृत्।
सकृच्छ्रजन्मप्रशमो विपीडितो न चोन्नमेद्रात्रिबली कफात्मकः ९

कफजन्य सूज जड, स्थिर व पांढुरकी अशी असते. तीमुळें अरुचि, मळमळ, झोंप, ओकारी व अग्निमांद्य हे विकार होतात. ही उत्पन्न होण्यास व बरी होण्यास फार दिवस लागतात. ही दाबली असतां त्या ठिकाणीं खोलगट खळगा पडतो. व हिला रात्रीं विशेष जोर असतो.

शूयन्ते यस्य गात्राणि स्पन्दन्निव रुजन्निव।
पीडितोत्युन्नमति च वातशोफं तमादिशेत्॥ १०॥
यश्चाप्यरुणवर्णाभः शोफो नक्तं प्रणश्यति।
स्नेहोष्णमर्दनाभ्यां च प्रणश्येत्स च वातिकः॥ ११॥

ज्याचे अवयव कांपतात, ठणकतात, सुजतात व सूज दाबली असतां पुनः वर येते, त्या सुजेला वातजन्य सूज म्हणतात. तसेंच जी सूज तांबूस असते व रात्रीं कमी होते, व तेलानें मर्दन केल्यानें व शेकण्यानें कमी होते, तिलाही वातजन्य सूज म्हणतात.

यः पीतः सज्वरार्तिः स्याद्दूयते च विदह्यते।
स्विद्यते क्लिद्यते गन्धिः स पैत्तः श्वयथुः स्मृतः॥ १२॥
यः पीतमुखवर्णत्वक्पूर्वमध्यात्प्रसूयते।
तनुत्वचातिसारी च स पैत्तः श्वयथुः स्मृतः॥ १३॥

जी सूज ज्वर व ठणका ह्यांनीं युक्त असते, पिवळी असते, दुखते, कढत लागते, जिला घाम येतो, जी ओलसर असते, जिला घाण येते, ती सूज पित्तजन्य समजावी. ज्या सुजेमुळें तोंड, अंगाचा वर्ण व त्वचा हीं पिवळीं होतात, मध्यभागाला आधीं सूज येते, जिच्यामुळें त्वचा पातळ असते व अतिसार होतो, ती सूज देखील पित्तजन्य समजावी.

द्विदोषजन्य सूज.

निदानाकृतिसंसर्गाच्छ्वयथुः स्याद्विदोषजः ।

दोन दोषांचीं कारणें व लक्षणें ह्यांनीं युक्त जी सूज ती द्विदोषज समजावी.

सन्निपातज सूज.

सर्वाकृतिः संनिपाताच्छोफो व्यामिश्रहेतुजः ॥ १४ ॥

सान्निपातिक सुजेमध्यें तिन्हीही दोषांचीं कारणें व लक्षणें समान असतात.

अभिघातेन शस्त्रादिच्छेदभेदक्षतादिभिः ।
हिमानिलोदध्यनिलैर्भल्लातकपिकच्छुकैः ॥ १५ ॥
रसैः शूकैश्च संस्पर्शाच्छ्वयथुः स्याद्विसर्पवान् ।
भृशोष्मा लोहिताभासः प्रायशः पित्तलक्षणः ॥ १६ ॥

शरीरावर आघात झाल्यानें किंवा शस्त्रादिकांनीं तोडल्यानें, फोडल्यानें किंवा क्षत केल्यानें, समुद्रावरील वारा लागल्यानें, बिब्याचें तेल लागल्यानें किंवा कुहिलीचीं कुसें लागल्यानें जी सूज येते ती पसरणारी, तांबूस, दाहयुक्त व बहुधा पित्तजन्य शोथाच्या लक्षणांनीं युक्त अशी असते.

विषजन्य लक्षण.

विषजः सविषप्राणिपरिसर्पणमूत्रणात् ।
दंष्ट्रादन्तनखाघातादविषप्राणिनामपि ॥ १७ ॥
विण्मूत्रशुक्रोपहतमलवद्वस्त्रसंकरात् ।
विषवृक्षानिलस्पर्शाद्गरयोगावचूर्णनात् ॥
मृदुश्चलोऽवलम्बी च शीघ्रो दाहरुजाकरः ॥ १८ ॥

विषारी प्राणी अंगावर सरपटत गेल्यानें, ते अंगावर मुतल्यानें, निर्विष प्राण्यांचे देखील दांत, नखें व दाढा लागल्यानें, विषारी प्राण्यांचें मलमूत्रशुक्र लागून मळीण झालेल्या वस्त्राच्या संसर्गानें, किंवा विषारी वृक्षावरील वारा वगैरे अंगास लागल्यानें, तसेंच विषमिश्र द्रव्य अंगास चोळल्यानें जी सूज येते, तिला विषजन्य सूज म्हणतात. ती मऊ व चंचळ असते, खालीं लोंबतेशी वाटते, आणि तिच्यामध्यें दाह व ठणका असतो.

ज्या ठिकाणीं दोष सूज आणतात तीं स्थानें.

दोषाः श्वयथुमूर्ध्वं हि कुर्वन्त्यामाशयस्थिताः ॥ १९ ॥
पक्वाशयस्था मध्ये तु वर्चस्थानगतास्त्वधः ।
कृत्स्नदेहमनुप्राप्ताः कुर्युः सर्वसरं तथा ॥ २० ॥

आमाशयांत असलेले दोष शरीराच्या ऊर्ध्व भागांत सूज उत्पन्न करितात. पक्वाशयांतील दोष शरीराच्या मध्यभागीं सूज आणतात. मलाशयांतील दोष शरीराच्या खालच्या भागांत सूज आणतात. व सर्व देहांत संचार करणारे दोष सर्वांगाला सूज उत्पन्न करितात.

यो मध्यदेशे श्वयथुः स कष्टः सर्वगश्च यः ।
अर्धांगेऽरिष्टभूतः स्याद्यश्चोर्ध्वं परिसर्पति ॥ २१ ॥

जी सूज शरीराच्या मध्यभागी असते, व जी सर्वांगाला येते, ती कष्टसाध्य असते. जी सूज खालच्या अर्ध्या अंगावर उत्पन्न होऊन वर चढते, ती अरिष्टकारक समजावी.

उपद्रव आणि अरिष्ट ह्यांच्या योगानें असाध्यत्व.

श्वासः पिपासा छर्दिश्च दौर्बल्यं ज्वर एव च ।
यस्य चान्नेऽरुचिर्नास्ति शोथिनं परिवर्जयेत् ॥ २२ ॥
ऊर्ध्वगामी नरं पद्भ्यामधोगामी स्त्रियं मुखात् ।
उभयोर्बस्तिसंजातः शोफो हन्ति न संशयः ॥ २३ ॥

श्वास, तहान, ओकारी, दुर्बळपणा, ज्वर व अरुचि हीं लक्षणें ज्याला होतात, तो असाध्य म्हणून सोडावा. पायाकडून वर जाणारी सूज पुरुषांना मारते, व तोंडाकडून खालीं जाणारी सूज स्त्रियांना मारिते. बस्तीच्या ठिकाणीं होणारी सूज दोघांनाही मारिते, ह्यांत संशय नाहीं.

स्थानपरत्वें असाध्यत्व.

अनन्योपद्रवकृतः शोथः पादसमुद्भवः ।
पुरुषं हन्ति नारीं तु मुखजो गुह्यजो द्वयम् ॥ २४ ॥

दुसऱ्या कोणत्याही रोगावांचून आलेली पायावरील सूज पुरुषाला मारिते. तोंडावर आलेली स्त्रियांना मारिते. आणि गुह्यस्थानीं आलेली उभयतांना मारिते.

उपद्रव.

श्वासः पिपासा दौर्बल्यं ज्वरच्छर्दिररोचकाः ।
हिक्कातिसारकासाश्च शोथिनं क्षपयन्ति हि ॥ २५ ॥

श्वास, तहान, अशक्तपणा, ज्वर, ओकारी, अरुचि, उचकी, अतिसार, व खोकला हीं लक्षणें सुजेऱ्या रोग्याला मारतात.

अन्य ग्रंथांतून.

पादप्रवृत्तः श्वयथुर्नृणां यः प्राप्नुयान्मुखम् ।
वक्त्रादधस्ताद्यो याति बस्तिं तस्य न सिध्यति ॥ १ ॥

पायापासून उत्पन्न होऊन तोंडाकडे जाणारी जी सूज ती मनुष्याला मारिते. त्याचप्रमाणें तोंडाकडून बस्तीकडे जी सूज जाते तीही साध्य होत नाहीं.

क्षीरपाणीनेंही म्हटलें आहेः

ऊर्ध्वगामी नरं पद्भ्यामधोगामी मुखात्स्त्रियम् ।
उभयोर्बस्तिसंजातः शोथो हन्ति न संशयः ॥ २ ॥

पायाकडून वर जाणारी सूज पुरुषांना व तोंडाकडून खालीं जाणारी स्त्रियांना आणि बस्तीच्या ठिकाणीं होणारी दोघांनाही मारिते ह्यांत संशय नाहीं.

सुजेची चिकित्सा.

निदानदोषार्तिविपर्ययक्रमैरुपाचरेत्तं बलकालदोषवित् ।
अथाऽऽमजं लङ्घनपाचनक्रमैर्विशोधनैरुल्बणदोषमादितः ॥ १
शिरोगतं शीर्षविरेचनैरधोविरेचनैरूर्ध्वमतस्तथोर्ध्वम् ।
उपाचरेत्स्नेहभवं विरूक्षणैः स्नेहस्तु रूक्षेण विरूक्ष्यते ध्रुवम् २

रोग्याचें बल, काल व दोष जाणणाऱ्या वैद्यानें सुजेचें निदान, दोष, पीडा व विपर्यास ह्यांच्या क्रमाला अनुसरून चिकित्सा करावी. आमजन्य सूजेवर क्रमानें लंघनपाचनादि क्रिया करावी, आणि दोषप्रकोपादिकांनीं होणारी सूज शोधनादि उपायानें जिंकावी. मस्तकाची सूज शिरोविरेचनानें जिंकावी. शरीराच्या खालच्या भागाची सूज रेचक देऊन जिंकावी. वरच्या भागाची सूज वमन देऊन जिंकावी. स्निग्धपणामुळें येणारी सूज रूक्ष उपचारांनीं जिंकावी. कारण रुक्षपणानें स्निग्धत्व निश्चयानें नाहींसें होतें.

विबद्धविट्कानिलजे निरूहणं घृतं तु पित्तानिलजे सतिक्तकम् ।
शोथेन मूर्छावति दाहकर्षिते विशोधनीयं तु समुन्नमिष्यते ॥ ३ ॥
कफोत्थितं क्षारकटूष्णसंयुतैः समूत्रतक्रैस्तु च युक्तिभिर्हरेत् ॥ ४ ॥
मुखतो जायते शोथः स्त्रीणां पुंसां च पादतः ।
असाध्यौ द्वावपि प्रोक्तौ तयोः पुण्यान्निवर्तनम् ॥ ५ ॥

मलबद्धता व वातजन्य सुजेवर निरूहबस्ती द्यावा. वातपित्तजन्य सुजेवर कडू औषधांनीं तयार केलेलें तूप द्यावें. सुजेमुळें मूर्च्छा व अतिशय दाह होत असल्यास शोधनीय उपचार करावे. कफजन्य सूज खारट, तिखट, उष्ण अशीं औषधें, गोमूत्र व ताक इत्यादिकांनीं युक्तीनें जिंकावी. स्त्रियांना तोंडाकडून येणारी सूज व पुरुषांना पायाकडून येणारी सूज असाध्य असते. ह्या दोन्हीही प्रकारांतून दोघेही पुण्यप्रतापानेंच बरे होतात.

सुजेची वातादिभेदानें विशेष चिकित्सा.

शोथे वातोत्थितं पूर्वं मासार्धं त्रिवृतं पिबेत् ॥ १ ॥
तैलमैरण्डजं वाऽपि मलबन्धेऽपि तन्मतम् ।
शाल्यन्नं पयसा युक्तं रसैर्वाऽपि प्रयोजयेत् ।
स्वेदाभ्यंगांश्च वातघ्नान्सेकलेपांश्च कल्पितान् ॥ २ ॥

वातजन्य सुजेवर प्रथम पंधरा दिवसपर्यंत तेडाचा काढा घ्यावा; किंवा एरंडेल तेल घ्यावें. मलबंधावरही हाच उपाय करावा. दुधाबरोबर किंवा मांसरसाबरोबर साळीचा भात खाण्यास द्यावा. वातनाशक असे स्वेद, अभ्यंग, शिंपडण्याचीं औषधें व लेप योजावे.

शुंठ्यादि काढा.

शुण्ठीपुनर्नवैरण्डपञ्चमूलशृतं जलम् ।
वातिके श्वयथौ पेयं भुक्तपाकेऽपि तन्मतम् ॥ १ ॥

सुंठ, वसूची मुळी, एरंडमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, सराटेमूळ, साळवण, पिठवण, ह्यांचा काढा वातजन्य सुजेवर प्यावा. हा पाचकही आहे.

बीजपूरजटाहिंस्रादेवदारुमहौषधम् ।
रास्नाग्निमन्थलेपोऽयं वातशोथविनाशनः ॥ १ ॥

महाळुंगाचें मूळ, जटामांसी, देवद्वार, सुंठ, रास्ना व टाकळीचें

मूळ ह्यांचा लेप वातजन्य सुजेचा नाशक आहे.

पित्तजन्य सुजेवर.

क्षीराशिनः पित्तकृतेऽतिशोफे त्रिवृद्गुडूचीत्रिफलाकषायम् ।
पिबेद्गवां मूत्रविमिश्रितं वा फलत्रिकाच्चूर्णमथाक्षमात्रम् ॥ १ ॥

तेड, गुळवेळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, ह्यांचा काढा पित्तजन्य सुजेवर प्यावा, अथवा त्रिफळ्याचें चूर्ण गोमूत्र घालून द्यावें.

पटोलादि काढा.

पटोलत्रिफलारिष्टदार्वीक्काथः सगुग्गुलुः ।
हन्ति पित्तभवं शोथं तृष्णाज्वरसमन्वितम् ॥ १ ॥

कडुपडवळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, लिंबाची साल, दारुहळद, ह्यांचा काढा गुग्गुळ घालून घ्यावा. तो पित्तजन्य सूज, तहान व ज्वर ह्यांचा नाश करतो.

कफजन्य सुजेवर.

पुनर्नवाविश्वत्रिवृद्गुडूचीशम्याकपथ्यासुरदारुकल्कम् ।
शोफे कफोत्थेऽक्षसमं समूत्रं क्काथं पिबेद्वाऽप्यथ चैव तेषाम् ॥१॥

वसूची मुळी, सुंठ, तेड, गुळवेल, बाहव्याची शेंग, हिरडेदळ, व देवदार ह्यांचा कल्क गोमूत्रांतून कफजन्य सुजेवर द्यावा, अथवा त्याच औषधांचा काढा द्यावा.

पुनर्नवावलेह.

पुनर्नवामृतादारुदशमूलरसाढके ।
आर्द्रकस्य रसप्रस्थे गुडस्य च तुलां पचेत् ॥ १ ॥
तत्सिद्धं व्योषपत्रैलात्वक्पत्रैः कार्षिकैः पृथक् ।
चूर्णीकृतैर्लिहेच्छीते मधुनः कुडवं क्षिपेत् ॥ २ ॥
लेहः पुनर्नवो नाम श्लेष्मशोफनिषूदनः ।
श्वासकासारुचिहरो बलपुष्ट्यग्निवर्धनः ॥ ३ ॥

वसूची मुळी, गुळवेल, देवदार व दशमुळें ह्यांचा काढा दोनशें छप्पन्न तोळे, आल्याचा रस चौसष्ट तोळे, व गूळ चारशें तोळे ह्यांचा लेह तयार करावा. नंतर त्यांत सुंठ, मिरें, पिंपळी, तमालपत्र, वेलदोडे, दालचिनी, व तालीसपत्र ह्यांचें चूर्ण एक एक तोळा व मध सोळा तोळे घालून ठेवावा. हा पुनर्नवावलेह कफजन्य सुजेचा

नाश करितो. हा श्वास, खोकला व अरुचि ह्यांचा नाश करणारा, बलवर्धक, पौष्टिक व अग्निवर्धक आहे.

आरग्वधादि तेल.

कफोत्थेऽत्र पिबेत्तैलं सिद्धमारग्वधादिना ।
मन्देऽग्नौ स्तिमिते कोष्ठे स्रोतोरोधेऽरुचावपि ॥
क्षारमूत्रासवारिष्टचूर्णं तक्रेण योजयेत् ॥ १ ॥

आरग्वधादि[1] गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें तेल ह्या कफजन्य सुजेवर द्यावें. तसेंच तें अग्निमांद्य, कोठ्याची स्तब्धता, स्रोतसांचा रोध व अरुचि ह्यांजवरही प्यावयास द्यावें. क्षार, गोमूत्र, आसव, अरिष्ट, व ताकांतून चूर्ण ह्यांचीही योजना करावी.

त्रिदोषजन्य व मिश्र सुजेवर.

मिश्रे मिश्रक्रमं कुर्यात्सर्वजे सर्वमेव तु ॥

मिश्रदोषजन्य सुजेवर मिश्रदोषांची चिकित्सा करावी व त्रिदोषजन्य सुजेवर तिन्हीही दोषांची चिकित्सा करावी.

पिप्पल्यादि चूर्ण.

पिप्पल्यजाजी गजपिप्पली च
निदिग्धिकानागरचित्रकैश्च ।
रजन्ययः पिप्पलिमूलपाठा
मुस्तं च चूर्णं सुखतोयपीतम् ॥
कल्कश्च भूनिम्बमहौषधाभ्यां ।
हन्यात्रिदोषं चिरजं च शोफम् ॥ १ ॥

पिंपळी, जिरें, गजपिंपळी, रिंगणमूळ, सुंठ, चित्रकमूळ, हळद, लोहभस्म, पिंपळमूळ, पहाडमूळ, नागरमोथे, ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें, आणि काडेचिराईत व सुंठ ह्यांचा कल्क द्यावा. तो त्रिदोषजन्य व फार दिवसांच्या सुजेचा नाश करतो.

आर्द्रकरसयोग.

रसस्तथैवाऽऽर्द्रकनागरस्य ।
पेयोऽथ जीर्णे पयसाऽन्नमद्यात् ॥
शिलाह्वयं वा त्रिफलारसेन ।
हन्यात्रिदोषं श्वयथुं प्रसह्य ॥ १ ॥

---

१. आरग्वधांतील औषधें वाग्भट, सूत्रस्थान, अध्याय पंधरामध्यें पहावीं.

आस्याचा रस आणि त्याचप्रमाणें सुंठीचा काढा प्यावा, व तो जिरल्यावर दुधाशीं जेवावें. अथवा शिलाजित त्रिफळ्याच्या काढ्यांतून घ्यावा. तो अत्यंत वाढलेल्या त्रिदोषजन्य सुजेचा नाश करितो.

आगंतुक व विषजन्य सुजेवर.

शोफे चाऽऽगन्तुजे कुर्यात्सेकलेपादिशीतलम् ।
भल्लातकभवे शोफे सतिला कृष्णमृत्तिका ॥ १ ॥
नवनीततिलालेपादथ दुग्धं तिलान्वितम् ॥
यष्टिदुग्धतिलैर्लेपो नवनीतेन संयुतः ॥
शोफमारुष्करं हन्ति चूर्णं शालदलस्य वा ॥ २ ॥

आगंतुक सुजेवर शीतळ असे लेप व शिंपडण्याचीं औषधें योजावीं. बिब्बा उतला असेल त्या ठिकाणीं तीळ व काळी माती ह्यांचा लेप करावा. लोणी व तीळ किंवा दूध आणि तीळ वाटून लावावे. जेष्टमध, दूध व तीळ ह्यांचा लोण्यांतून लेप करावा. तो बिब्ब्याच्या सुजेचा नाश करतो. अथवा सागाचीं पानें वाटून लावावीं. तीं बिब्ब्याची सूज नाहींशी करितात.

सामान्य उपचार.

बेलाचा स्वरस.

बिल्वपत्ररसः पीतः शोषणः श्वयथौ रुजि ।
विट्सङ्गे चैव दुर्नाम्नि विषूच्यां कामलास्वपि ॥ १ ॥

सूज, मलबद्धता, मूळव्याध, विषूचिका, व कामला (कावीळ) ह्या रोगांवर बेलाचा रस मिऱ्याची पूड घालून द्यावा.

भूनिंबादि कल्क.

भूनिम्बविश्वकल्कं जग्ध्वा पीतः पुनर्नवाक्वाथः ॥
अपहरति नियतमाशु श्वयथुं सर्वाङ्गजं नृणाम् ॥ २ ॥

काडेचिराईत व सुंठ ह्यांचा कल्क चाटून त्याजवर वसूच्या मुळीचा काढा घ्यावा. तो मनुष्याच्या सर्वांगाच्या सुजेचा नाश करितो.

काढे, पथ्यादि काढा.

पथ्यामृताभार्गिपुनर्नवाग्निदार्वीनिशादारुमहौषधानाम् ।
क्वाथो निपीतोदरपाणिपादवक्त्राश्रितं हन्त्यचिरेण शोफम् ॥

हिरडेदळ, भारंगमूळ, पुनर्नवा, चित्रकमूळ, दारुहळद, हळद, देवदार व सुंठ ह्यांचा काढा प्याला असतां तो उदर, हातपाय व तोंड ह्या ठिकाणच्या सुजेचा तत्काळ नाश करितो.

त्रिफलादि काढा.

त्रिफलाक्काथपानं हि महिषीसर्पिषा सह ।
हन्ति शोफं प्रमेहं च नाडीव्रणभगंदरम् ॥ १ ॥

त्रिफळ्याचा काढा म्हशीचें तूप घालून प्यावा. तो सूज, प्रमेह, नाडीव्रण व भगंदर ह्यांचा नाश करितो.

सिंहास्यादि काढा.

सिंहास्यामृतभण्टाकीकाथं पीत्वा समाक्षिकम् ।
कृच्छ्रशोथं जयेज्जन्तुः कासं श्वासं ज्वरं वमिम् ॥ १ ॥

अडुळसा, गुळवेल व डोरलीमूळ ह्यांचा काढा मध घालून प्यावा. तो कष्टसाध्य अशी सूज, खोकला, श्वास, ज्वर, व ओकारी ह्यांना जिंकतो.

पिप्पल्यादि चूर्ण.

कृष्णाग्निविश्वघनजीरककण्टकारी-
पाठानिशाकरिकणामगधाजटानाम् ॥
चूर्णं कवोष्णसलिलेन विलोड्य पीतं
नातः परं श्वयथुरोगहरं नराणाम् ॥ १ ॥

पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, नागरमोथे, जिरें, रिंगणमूळ, पहाडमूळ, हळद, गजपिंपळी, पिंपळमूळ ह्यांचें चूर्ण कोमट पाण्याशीं प्यावें. ह्यासारखें मनुष्याच्या सुजेचा नाश करणारें दुसरें औषध नाहीं.

गुडादि चूर्ण.

गुडपिप्पलिशुण्ठीनां चूर्णं श्वयथुनाशनम् ।
आमाजीर्णप्रशमनं शूलघ्नं बस्तिशोधनम् ॥ १ ॥

गूळ, पिंपळी व सुंठ ह्यांचें चूर्ण सूज व आमाजीर्ण ह्यांचें नाशक, शूळनाशक व बस्तिशोधक आहे.

दुसरा प्रकार.

गुडात्पलत्रयं ग्राह्यं शृङ्गबेरं पलत्रयम् ।
शृङ्गबेरसमा कृष्णा लोहकिट्टायसो पलम् ॥ २ ॥

चूर्णमेतत्समुद्दिष्टं सर्वश्वयथुनाशनम् ।

गूळ बारा तोळे, सुंठ बारा तोळे, पिंपळी बारा तोळे, मंडूर व लोहभस्म हीं चार तोळे ह्यांचें चूर्ण सर्व प्रकारच्या सुजेचा नाश करितें.

पुनर्नवादि चूर्ण.

पुनर्नवा दार्व्यमृता पाठा विश्वश्वदंष्ट्रिका ।
रजन्यौ द्वे बृहत्यौ च पिप्पल्यश्चित्रकं वृषः ॥ १ ॥
समभागानि संचूर्ण्य गवां मूत्रेण वा पिबेत् ।
बहुप्रकारं श्वयथुं सर्वगात्रावसारिणम् ॥
हन्ति चाऽऽशूदराण्यष्टौ व्रणांश्चैवोद्धतानपि ॥ २ ॥

वसूची मुळी, दारुहळद, गुळवेल, पहाडमूळ, सुंठ, सराटे, हळद, दारुहळद, रिंगणमूळ, डोरलीमूळ, पिंपळी, चित्रकमूळ व अडुळसा, ह्यांचें समभाग चूर्ण करून गोमूत्राशीं प्यावें. हें सर्वांगाला येणाऱ्या अनेक प्रकारच्या सुजेचा नाश करितें. आठ प्रकारचीं उदरें आणि वाढलेले व्रण ह्यांचाही नाश करितें.

विडंगादि चूर्ण.

विडङ्गदन्तीकटुकात्रिवृच्चित्रकदारवः ।
व्योषः सकृष्णा त्रिफला समा देया ह्ययोरजः ।
द्विगुणं तत्पिबेच्चूर्णं पयसा शोफशान्तये ॥ १ ॥

वावडिंग, दांतीमूळ, कुटकी, तेड, चित्रकमूळ, देवदार, सुंठ, मिरें, पिंपळी, गजपिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं औषधें समभाग आणि लोहभस्म दोन भाग ह्यांचें चूर्ण सूज बरी होण्याकरितां दुधाशीं द्यावें.

गुडार्द्रकयोग.

गुडार्द्रकं वा गुडनागरं वा गुडाभयां वा गुडपिप्पलीं वा ।
कर्षाभिवृद्ध्या त्रिपलप्रमाणं खादेन्नरः पथ्यमथापि मासम् ॥१
शोफप्रतिश्यायगलास्यरोगान्सश्वासकासारुचिपीनसादीन् ।
जीर्णज्वरार्शोग्रहणीविकारान्हन्यात्तथाऽन्यानपि वातरोगान् ॥२॥

गूळ व आलें, गूळ व सुंठ, गूळ व हिरडेदळ, किंवा गूळ व पिंपळी एकत्र करून एक एक तोळाप्रमाणें वाढत्या प्रमाणावर घेत बारा तोळेपर्यंत वाढवावीं. हीं औषधें घेतांना एक महिनाभर (दूध भाताचें) पथ्य करावें. म्हणजे सूज, पडसें, गळ्याचे व तोंडाचे

रोग, श्वास, खोकला, अरुचि, पीनस, जीर्णज्वर, मूळव्याध व संग्रहणी ह्यांचा नाश करितात. आणि दुसऱ्याही वातरोगांचा नाश करितात.

पुनर्नवादि योग.

पुनर्नवामूलकदेवदारुच्छिन्नोद्भवाचित्रकमूलसिद्धाः।
रसा यवागूश्च पयांसि यूषाः शोफे प्रदेया दशमूलगर्भाः १

वसूची मुळी, मुळा, देवदार, गुळवेल व चित्रकमूळ, ह्यांच्या काढ्यांत तयार केलेले मांसरस, कण्हेरी, दूध व कढणें (यूष) हे पदार्थ दशमुळांचें चूर्ण अगर काढा घालून पथ्यास द्यावे.

दूध.

क्षीरं शोफहरं दारुवर्षाभूनागरैः शृतम्।
पेयं वा चित्रकव्योषत्रिवृद्दारुप्रसाधितम्॥ १॥

देवदार, वसूची मुळी व सुंठ ह्यांनीं सिद्ध केलेलें दूध प्यावें. तें सुजेचें नाशक आहे. अथवा चित्रकमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, तेड व देवदार ह्यांनीं सिद्ध केलेलें दूध प्यावें. तेंही सुजेचा नाश करितें.

आल्याचा रस.

आर्द्रकस्य रसः पीतः पुराणगुडमिश्रितः।
अजाक्षीराशिनः शीघ्रं सर्वशोथहरो भवेत्॥ १॥

आल्याचा रस जुना गूळ घालून प्यावा, आणि शेळीचे दुधावर रहावें, म्हणजे सर्व प्रकारच्या सुजेचा नाश होतो.

गोमूत्रमंडूर.

गोमूत्रसिद्धमण्डूरं सुरभीरसभावितम्।
माणकार्द्रककन्दानां रसेष्वपि च भावयेत्॥ १॥
त्रिफलाकटुचव्यानां चूर्णं पाणितलद्वयम्।
क्षिपेत्सुसिद्धे पाके तु मधुनश्च पलद्वयम्॥ २॥
निहन्ति सर्वजं शोफं सर्वाङ्गं च विशेषतः।

मंडूर गोमूत्रांत शिजवून त्याला तुळशीच्या रसाची भावना द्यावी. तसेंच मानकंद व आलें ह्यांच्याही रसाची भावना द्यावी. (म्हणजे त्या त्या रसांत मंडूर शिजवावा). नंतर त्यांत त्रिफळा, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक ह्यांचें दोन दोन तोळे चूर्ण घालून चांगलें

शिजल्यावर त्यांत मध आठ तोळे घालून ठेवावा. हा गोमूत्रमंडूर सर्व अंगावरील सर्व प्रकारच्या सुजेचा नाश करितो.

कंसहरीतकी.

द्विपञ्चमूलस्य पचेत्कषाये कंसेऽभयानां च शतं गुडाच्च ।
लेहे सुसिद्धे च विनीय चूर्णं व्योषत्रिसौगन्ध्यमुपस्थिते च ॥१
प्रस्थार्धमात्रं मधुनः सुशीते किंचिच्च चूर्णादपि यावशूकात् ।
एकाभयां प्राश्य ततश्च लेहाच्छुक्तिर्निहन्ति श्वयथुं प्रवृद्धम् । २
कासज्वरारोचकमेहगुल्मप्लीहत्रिदोषोदरपांडुरोगान् ।
कार्श्यामवातानसृगम्लपित्तवैवर्ण्यमूत्रानिलशुक्रदोषान् ॥ ३ ॥
दशमूलं हरीतक्या तुल्यकंसहरीतकी ।
मानं तेनात्र तत्रस्थं चरके प्राह जैज्जटः ॥ ४ ॥

दोनशें छपन्न तोळे दशमुळांच्या काढ्यांत शंभर हिरडे व शंभर तोळे गूळ घालून पाक करावा. लेहासारखा झाल्यावर त्यांत सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र व वेलची ह्यांचें चूर्ण व मध बत्तीस तोळे घालून शिवाय किंचित् जवखाराचें चूर्ण घालावें. आणि रोज त्यांतील एक हिरडा खावा, व दोन तोळे लेह चाटावा. हा वाढलेल्या सुजेचा नाश करतो. तसेंच खोकला, ज्वर, अरुचि, प्रमेह, गुल्म, पांथरी, त्रिदोषजन्य उदर, पांडुरोग, कृशत्व, आमवात, रक्तपित्त, अम्लपित्त, विवर्णता, मूत्रदोष, वातदोष व शुक्रदोष ह्यांचा नाश करतो. दशमुळांचा काढा करतांना दशमुळें हिरड्याच्या समान घ्यावीं, असें चरकाच्या टीकेंत जेज्जटानें सांगितलें आहे.

दशमूळ–हरीतकी.

दशमूलीकषायस्य कंसे पथ्याशतं गुडात् ।
तुलां पचेद्घने तत्र व्योषक्षारचतुष्पलम् ॥ १ ॥
त्रिजातं तु सुवर्णांशं प्रस्थार्धं मधुनो हिमे ॥
दशमूलहरीतक्यः शोफान्घ्नन्ति सुदुस्तरान् । २ ॥

दशमुळांच्या पांचशें बारा तोळे काढ्यांत चारशें तोळे गूळ व शंभर हिरडे घालून लेह तयार करावा. नंतर त्यांत सुंठ, मिरें,

पिंपळी व जवखार ह्यांचें चूर्ण चार तोळे घालून दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे ह्यांचें चूर्ण एक तोळाभर घालावें. व लेह थंड झाल्यावर त्यांत बत्तीस तोळे मध घालून ठेवावा. ही दशमूळहरीतकी दुस्तर अशा सूजेचा नाश करिते.

पुनर्नवासव.

पुनर्नवे द्वे तु पले सपाठा दन्ती गुडूची सह चित्रकेण ।
निदिग्धिका च त्रिफला विपक्का द्रोणावशेषे सलिले ततस्तम्
पूत्वा रसे द्वे च शतं पुराणं गुडं मधुप्रस्थयुतं सुशीतम् ।
मासं निदध्याद् घृतभाजनस्थं पल्ले यवानां परतश्च मासम् २
चूर्णीकृतैरर्धपलांशकैस्तैर्हेमत्वगेलामरिचाम्बुपत्रैः ।
गन्धान्वितं क्षौद्रयुतं प्रदिग्धं जीर्णे पिबेद् व्याधिबलं समीक्ष्य॥
हृत्पाण्डुरोगश्वयथुं प्रवृद्धं प्लीहभ्रमारोचकमेहगुल्मान् ।
भगंदरार्शोजठराणि कासश्वासग्रहण्यामयकुष्ठकण्डूः ॥ ४ ॥
शाखानिलं बद्धपुरीषतां च हिक्कां तु कासं च हलीमकं च ।
क्षिप्रं जयेद्वर्णबलायुरोजस्तेजोन्वितो मांसरसांश्च भुक्त्वा ॥५॥

तांबड्या व पांढऱ्या वसूची मुळी आठ आठ तोळे; पहाडमूळ, दांतीमूळ, गुळवेल, चित्रकमूळ, रिंगणमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी हे जिन्नसही आठ आठ तोळे, ह्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. तो गाळून घेऊन त्यांत दोनशें तोळे गूळ व बत्तीस तोळे मध घालून तुपानें रावलेल्या भांड्यांत घालून एक महिनाभर दोन पल्ले सातूच्या राशींत पुरून ठेवावा. त्यामध्यें नागकेशर, दालचिनी, तमालपत्र, मिरें व वाळा ह्यांचें चूर्ण पुरून ठेवण्यापूर्वीं घालावें. नंतर हें आसव काढून जीर्ण झाल्यावर रोगाच्या बळाच्या मानानें प्राशन करावें; म्हणजे–हृद्रोग, पांडुरोग, वाढलेली सूज, पांथरी, भ्रम, अरुचि, प्रमेह, गुल्म, भगंदर, मूळव्याध, उदर, खोकला, श्वास, संग्रहणी, कुष्ठ, कंडू, हातापायांतील वात, मलबद्धता, उचकी, खोकला, हलीमक ह्यांना जिंकतें. आणि वर्ण, बळ, आयुष्य व तेज ह्यांना वाढवितें; ह्याजवर मांसरस खावा.

सर्व सुजेवर वासासव.

वासकस्य तुले द्वे तु द्विद्रोणेऽपां विपाचयेत् ।
द्रोणार्धशेषं तं ज्ञात्वा पूते शीते प्रदापयेत् ॥ १ ॥
गुडस्यैकां तुलां तत्र धातक्यास्तु पलाष्टकम् ।
क्षिपेच्चूर्णीकृतं तस्मिंस्त्वगेलापत्रकेसरम् ॥ २ ॥
कङ्कोलव्योषतोयानि पालिकान्युपकल्पयेत् ।
निदध्याद् घृतभाण्डे तु पक्षादूर्ध्वं ततः पिबेत् ॥
वासकासव इत्येष सर्वश्वयथुनाशनः ॥ ३ ॥

आठशें तोळे अडुळशाचा वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. तो थंड झाल्यावर गाळून घेऊन त्यांत चारशें तोळे गूळ, बत्तीस तोळे धायटीचीं फुलें आणि दालचिनी, तमालपत्र, वेलदोड्याचे दाणे, नाकेशर, कंकोळ, सुंठ, मिरें, पिंपळी व वाळा ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालून तुपानें राबलेल्या मातीच्या भांड्यांत घालून पंधरा दिवस पुरून ठेवावें. हें वासकासव सर्व प्रकारच्या सुजेचा नाश करितें.

दार्व्यादियोग.

पिबेदुष्णाम्बुना दारुपथ्याशुण्ठीपुनर्नवाः ।
विडंगातिविषावासाविश्वदारूषणानि च ।
वर्षाभूश्रृंगवेराभ्यां कल्कं वा सर्वशोफनुत् ॥ १ ॥

देवदार, हिरडे, सुंठ व वसूची मुळी ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर घ्यावें. वावडिंग, अतिविष, अडूळशाचें मूळ, सुंठ, देवदार व मिरें ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. किंवा वसूची मूळी व सुंठ यांचा कल्क घ्यावा. तो सर्व प्रकारच्या सुजेचा नाश करितो.

तक्रादियोग.

तक्रं पिबेद्वा गुरुभिन्नवर्चाः सव्योषसौवर्चलमाक्षिकं च ।

ज्या सुजेच्या रोग्याला जडत्व व मळ पातळ होणें हे विकार होतात, त्यानें सुंठ, मिरें, पिंपळी, पादेलोण व मध घालून ताक प्यावें.

विड्वातसङ्गे पयसा रसैर्वा प्रागुष्णमद्यादुरुबूकतैलम् ॥१॥

अधोवायु व मळ ह्यांचा अवरोध असेल, तर कढत दुधांतून किंवा मांसरसांतून एरंडेल घ्यावें.

पुनर्नवादि घृत.

पुनर्नवापत्ररसालमूलं संक्षुद्य तोयार्मणशेषसिद्धम् ।
चतुर्थभागेन घृतं विपक्कं प्रस्थं तु तत्कल्कपलाष्टकेन ॥ १ ॥
संसेवितं वातबलासरोगान्सर्वांश्च शोफानतिदुस्तरांश्च ।
गुल्मोदरप्लीहगुदोद्भवांश्च निहन्ति वह्निं कुरुतेऽपि पुंसाम् २

घेटोळीचीं पानें व आंब्याचें मूळ अर्धवट कुटून त्याचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत काढा करावा. नंतर त्या काढ्यांत चौसष्ट तोळे तूप व बत्तीस तोळे वरील दोन्ही औषधांचा कल्क घालून तूप तयार करावें. हें सेवन केलें असतां वातकफजन्य रोग सर्व प्रकारची दुस्तर सूज, गुल्म, उदर, पांथरी व मूळव्याध यांचा नाश करितें, आणखी अग्नि प्रदीप्त करितें.

पंचमूलादि तेल.

पञ्चमूलं सलवणं सरलं देवदारु च ।
हस्तिकर्णी पलाशस्य फलानि निचुलस्य च ॥ १ ॥
पलांशं काकनासा च गुडूची देवपुष्पकम् ।
अहिंस्रा श्रेयसी हिंस्रा बस्तगन्धा पुनर्नवा ॥ २ ॥
कायस्था च वयःस्था च दारुका जटिला जटा ।
अलम्बुषोरुबूकं च प्रपुन्नाटं सनागरम् ॥ ३ ॥
शिग्रु गोधावनी भार्गी तर्कारी पौष्करी जटा ।
एतैः सिद्धं यथालाभं तैलमभ्यञ्जनैस्त्रिभिः ।
निहन्त्युदीर्णं श्वयथुं जन्तोर्वातकफात्मकम् ॥ ४ ॥

सालवण, पिठवण, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, गोखरूचें मूळ, सेंधेलोण, सरळ देवदार, देवदार, कासाळू, पळासाची साल, कडू लिंबाचीं फळें, कावळीचें मूळ (काकनासा), गुळवेल, लवंग, निवडुंगाचें मूळ, गजपिंपळी, जटामावशी, रानतुळस, घेंटोळीची मुळी, हिरडे, आवळकाठी, तेल्या देवदार, शेवलिंगीचें मूळ, जटामावशी, गोरखमुंडी, एरंडमूळ, टाकळ्याचें मूळ, सुंठ, शेवग्याची साल, पाषाणभेद, भारंगमूळ, टाकळीचें मूळ, पोखरमूळ, हीं औषधें यथालाभ घेऊन तेल सिद्ध करावें. ह्या तेलाचें तीन वेळ मर्दन केलें असतां वातकफजन्य दुस्तर सुजेचा नाश होतो.

शुष्कमूलादि तेल.

शुष्कमूलकवर्षाभूदारुरास्नामहौषधैः ।
पक्कमभ्यञ्जनं तैलं समूलं शोफनाशनम् ॥ १ ॥

वाळलेल्या मुळ्याच्या काचऱ्या, वसूची मुळी, देवदार, रास्ना, व सुंठ, यांचा कल्क करुन तेल सिद्ध करावें. तें आंगास लाविलें असतां सुजेचा समूळ नाश होतो.

सेक, लेप, स्वेद वगैरे.

पुनर्नवादि लेप.

पुनर्नवादारुशुण्ठीसिद्धार्थं शिग्रुमेव च ।
पिष्ट्वा चैवाऽऽरनालेन प्रलेपः सर्वशोथजित् ॥ १ ॥

वसूची मुळी, देवदार, सुंठ, मोहऱ्या व शेवग्याची साल, हीं औषधें कांजींत वाटून त्यांचा लेप करावा. तो सर्व सुजेचा करतो.

कृष्णादि लेप.

कृष्णा पुराणपिण्याकशिग्रुत्वक्सिकतातसी ।
प्रलेपो मर्दने युंज्यात्सुखोष्णो मूत्रकल्कितः ॥ १ ॥

पिंपळी, जुनी पेंड, शेवग्याची साल, साखऱ्या व जवस हीं औषधें गोमूत्रांत वाटून ऊन करून त्यांचा लेप करून मर्दन करावें.

दार्वादि लेप.

दारुगुग्गुलुशुण्ठीनां कल्को मूत्रेण शोफजित् ।
गोमूत्रस्य च योगो वा क्षिप्रं श्वयथुनाशनः ॥ १ ॥

देवदार, गुग्गुळ, सुंठ, ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. तो सुजेचा नाश करतो. किंवा नुसत्या गोमूत्राचा योगही नाशक आहे.

अर्कादि काढा.

सेकस्तथाऽर्कवर्षाभूनिम्बक्वाथेन शोफजित् ।
गोमूत्रेणापि कुर्वीत सुखोष्णेनावसेचनम् ।
सौवर्चलसमं घृष्टं सर्षपैश्च प्रलेपनम् ॥ १ ॥

रुई, वसूची मुळी व लिंबाची साल, ह्यांचा काढा करून सुजेवर शिंपावा. तो सुजेचा नाश करतो. ऊन ऊन गोमूत्रही सुजेवर शिंपावें. मोहऱ्या व पादेलोण वाटून त्यांचा सुजेवर लेप करावा.

न्यग्रोधादि लेप.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षवेतसकवल्कलैः ।
ससर्पिष्कैः प्रलेपः स्याच्छोफनिर्वारणः परः ॥ १ ॥

वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी व वेत ह्यांच्या सालीचा कल्क व तूप एकत्र करून त्याचा लेप करावा. तो सूज नाहींशी करण्याविषयीं फार उत्तम आहे.

गव्हाची पोळी.

गोधूमकणिकायुक्ता निर्गुण्डीपत्रचूर्णिका ।
पोलिका तिलतैलेन युक्ता शोथविनाशनी ॥ १ ॥

गव्हाचीकणीक व निर्गुडीच्या पानांचें चूर्ण ह्यांची पोळी करून तींत तिळाचें तेल घालून द्यावी. तीही सूजेचा नाश करिते.

पुनर्नवादि स्वेद.

पुनर्नवाग्निनिर्गुण्डीपलितैरण्डजैर्दलैः ।
सहचरैर्जलं तप्तं तत्स्वेदः शोफहा मतः ॥ १ ॥

घेटुळीची मुळी, चित्रकमूळ, निर्गुडीचा पाला, गुग्गुळ, एरंडाचीं पानें व कोरांटी ह्या औषधी टाकून पाणी कढवून त्या पाण्यानें शेकावें.

कुटजादि स्वेद.

कुटजार्कशिरीषाणां विदुलैरण्डनिम्बजैः ।
पत्रैर्युक्तं जलं तप्तं तत्स्वेदो दुष्टशोफहृत् ॥ १ ॥

कुड्याचीं पानें, रुईचीं पानें, शिरसाचीं पानें, जलवेताचीं पानें, एरंडाचीं पानें, व लिंबाचीं पानें टाकून पाणी तापवावें व तें सूजेवर शिंपावें. त्यानें दुष्ट सुजेचा नाश होतो.

बिभीतकादि लेप.

बिभीतकानां फलमध्यलेपः सर्वेषु दाहार्तिहरः प्रशस्तः ।

बेहड्याच्या फळांतील बियांचा लेप सर्व प्रकारच्या सुजेंतील दाह शांत करितो.

यष्ट्याह्वमुस्तैः सकपित्थमूत्रैः सचन्दनैस्ततिपाटिकासु लेपः ॥१॥

ज्येष्ठमध, नागरमोथे, कवठाचा पाला व चंदन हीं औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचा सुजेवरील पुटकुळ्यांवर लेप करावा.

रसायनें, शोथारि.

हिंगुलं जयपालं च मरिचं टङ्कणं कणाम् ।
संमर्द्यः वल्लः सघृतः सर्वशोफहरः परः ॥ १ ॥

हिंगुळ, जेपाळ, मिरें, टाकणखार व पिंपळी हीं सर्व औषधें समभाग घेऊन खल करावा. आणि त्यांतून एक वालभर औषध तुपाशीं द्यावें. हा शोथारि सर्व प्रकारच्या सुजेचा नाश करितो.

श्वयथुघाती रस.

रसगन्धकलोहकणात्रिवृतामरिचामरदारुनिशात्रिफलात् ।
दलितं मृदुगोसलिलेन पिबेदनुरूपममुं श्वयथूदरहम् ॥ १ ॥

पारा, गंधक, लोह, पिंपळी, तेड, मिरें, देवदार, हळद, हिरडा, बेहडा व आवळकाठी, ह्या सर्वांचा एकत्र खल करून हें औषध शक्तिमानाप्रमाणें गोमूत्रांतून द्यावें. हा श्वयथुहारी रस शोथोदराचा नाश करितो.

देयो ह्युदयमार्तण्डस्त्रैलोक्याडम्बरोऽथ वा ।
अग्निकुमारको वाऽत्र देयः शोफविनाशनः ॥ १ ॥

शोथोदरावर उदयमार्तंडरस द्यावा; त्रैलोक्याडंबररस द्यावा, अथवा अग्निकुमाररस द्यावा. तोही शोथनाशक आहे.

पथ्यापथ्य.

पुरातनाः शालियवाः कुलत्था मुद्गाश्च गोधाऽपि च शल्लकोऽपि ।
भुजंगभुक्तित्तिरिताम्रचूडलावादयो जाङ्गलविष्किराश्च ॥ १ ॥
कूर्मोऽपि शृङ्गी प्रपुराणसर्पिस्तक्रं सुरा माक्षिकमासवश्च ।
निष्पावकाठिल्लकरक्तशिग्रूरसोनकर्कोटकबालमूलम् ॥ २ ॥
पुनर्नवं गृञ्जनकं पटोलं वेत्राग्रधात्रीफलमूलकानि ।
यथामलं पथ्यमिदं प्रयुक्तं शोफामयं सत्वरमुच्छिनत्ति ॥ ३ ॥

जुन्या साळी, सातू, हुलगे, मूग, हीं धान्यें, घोरपड, साळई, तित्तिर पक्षी, कोंबडा, व लावा वगैरे जांगल व विष्कीर (पायानें उकरणारे) प्राणी, कासव, शृंगी जातीचा मासा, फार दिवसांचें जुनें तूप, ताक, मद्य, मध, आसव, पावटे, कर्टुलें, तांबडा शेवगा, लसूण, कारली, कोवळा मुळा, घेटुळी, तांबडा मुळा, पडवळ, वेताचे कोंब, आवळकाठी, आवळे व मुळे; ह्या दोषानुरूप पथ्यकारक पदार्थांची योजना केली असतां सुजेचा त्वरित नाश होतो.

ग्राम्यानूपं पिशितलवणं शुष्कशाकं नवान्नम् ।
गौडं पिष्टं दधि सकृशरं निर्झरं मद्यमम्लम् ॥
धाना वल्लूरमांसं बह्वशनमथवा गुर्वसात्म्यं विदाहि
स्वप्नं रात्रौ श्वयथुगदवान्वर्जयेन्मैथुनं च ॥ ४ ॥

ग्राम्य व अनूप प्राण्यांचें मांस, मीठ, वाळलेल्या भाज्या, नवें अन्न, गुळाचे व पिठाचे पदार्थ, दहीं, खिचडी, झऱ्याचें पाणी, मद्य, आंबट पदार्थ, भाजलेलें धान्य, सुकें मांस, अतिशय जेवण, जड व ज्याची सवय नाहीं असें अन्न, विदाही पदार्थ, रात्रीं झोप घेणें व मैथुन ह्या गोष्टी सूज असलेल्या रोग्यानें वर्ज कराव्या.

वृंदांतील पथ्यापथ्य.

पुराणयवशाल्यन्नं दशमूलोपसाधितम् ।
अल्पमल्पकटुस्नेहं भोजनं शोफिनां हितम् ॥ १ ॥

जुने सातू, दशमुळांच्या काढ्यांत केलेला साळीचा भात, किंचित् आंबट किंचित् तिखट व किंचित् स्निग्ध असें जेवण सुजेच्या मनुष्याला पथ्यकारक आहे.

पिष्टान्नमुष्णं लवणानि मद्यं मृदं दिवा स्वप्नमजाङ्गलं च ।
पयो गुडं तैलमथो गुरूणि शोफं जिघांसुः परिवर्जयेत ॥ १ ॥

पिठाचें अन्न, उष्ण पदार्थ, सर्व प्रकारचीं लवणें, मद्य, माती, दिवसा निजणें, जांगल मांसाखेरीज इतर मांसें, दूध व गूळ, तेल व जड पदार्थ, हे जिन्नस सूज बरी व्हावी अशी इच्छा करणाऱ्या मनुष्यानें वर्ज करावे.

अंडवृद्धि, अंत्रवृद्धि व वर्ध्मरोगाचें निदान.

त्याची संप्राप्ति.

क्रुद्धो रुद्धगतिर्वायुः शोथशूलकरश्चरन् ।
मुष्कौ वंक्षणतः प्राप्य फलकोशाभिवाहिनीः ॥
प्रपीड्य धमनीर्वृद्धिं करोति फलकोशयोः ॥ १ ॥

कुपित झालेला वायु अधोगामी होऊन सूज व ठणका उत्पन्न करीत अडसंधीमधून अंडांत शिरतो. आणि अंडकोशाच्या शिरांना पीडित करून अंडकोशाची वृद्धि करतो. त्यामुळें अंडकोश मोठा होतो.

वृद्धीचे प्रकार.

दोषास्रमेदोमूत्रांत्रैः स वृद्धिः सप्तधा गदः ।
मूत्रांत्रजावप्यनिलाद्धेतुभेदस्तु केवलः ॥ २ ॥

वातज वृद्धि, पित्तज वृद्धि व कफज वृद्धि असे दोषभेदानें तीन; रक्त, मेद व मूत्र ह्यांपासून तीन आणि अंत्रवृद्धि एक वृद्धीचे मिळून सातप्रकार आहेत. त्यांपैकीं मूत्रजवृद्धि व अंत्रवृद्धि हे रोग जरी वातजन्य आहेत तरी त्याला कारण वेगळें असल्यामुळें त्यांचे प्रकार वेगळे केले आहेत.

वातज वृद्धीचें लक्षण.

वातपूर्णदृतिस्पर्शो रूक्षो वातादहेतुरुक् ।

वातजन्य अंडवृद्धीमध्यें वृषण वायूनें भरलेल्या भात्याप्रमाणें हातास लागतो. तो रूक्ष असतो व कारणावांचून दुखतो.

पित्तजन्य वृद्धीचें लक्षण.

पक्वोदुम्बरसंकाशः पित्ताद्दाहोष्मपाकवान् ॥ ३ ॥

पित्तामुळें वाढ झालेला अंडकोश पिकलेल्या उंबराप्रमाणें तांबूस, कढत व दाहयुक्त असतो; व त्याजवर बारीक बारीक फोड येतात.

कफजन्य वृद्धीचें लक्षण.

कफाच्छीतो गुरुः स्निग्धः कण्डूमान्कठिनोऽल्परुक् ॥

कफामुळें वाढलेला अंडकोश थंड, जड व स्निग्ध असतो; त्याला खाज उठते व त्यांत ठणका कमी असतो.

कृष्णस्फोटावृतः पित्तवृद्धिलिङ्गश्च रक्तजः ॥

रक्तजन्य वृद्धीमध्यें वाढलेला अंडकोश काळ्या पुळ्यांनीं व्यापलेला व पित्तजन्य अंडवृद्धीच्या लक्षणांनीं युक्त असतो.

मेदजन्य अंडवृद्धीचें लक्षण.

कफवन्मेदसा वृद्धिर्मृदुस्तालफलोपमः ॥ ४ ॥

मेदामुळें मोठा झालेला अंडकोश कफजन्य अंडवृद्धीच्या लक्षणांनीं युक्त, मऊ व पिकलेल्या ताडाच्या फळासारखा निळसर असतो.

मूत्रजन्य वृद्धिलक्षण.

मूत्रधारणशीलस्य मूत्रजः स तु गच्छतः ।

अम्भोभिः पूर्णदृतिवत्क्षोभं याति सरुङ् मृदुः ॥ ५ ॥
मूत्रकृच्छ्रमधस्तात्स्याच्चालयन्फलकोशयोः ॥

नेहमीं मूत्राचा वेग आंवरून धरणाऱ्या मनुष्याला मूत्रजन्य अंडवृद्धिरोग होतो. त्यामुळें चालूं लागलें असतां पाण्यानें भरलेल्या पखालीप्रमाणें अंडकोश हालतो; मऊ लागतो, आणि त्यांत वेदना होतात. अंडकोश खालीं लोंबू लागतो व त्यामुळें मूत्रकृच्छ्रविकार उत्पन्न होतो.

अंत्रज वृद्धिलक्षण.

वातकोपिभिराहारैः शीततोयावगाहनैः ॥ ६ ॥
धारणेरणभाराध्वविषमाङ्गप्रवर्तनैः ।
क्षोभणैः कुपितोऽन्यैश्च क्षुद्रांत्रावयवं यदा ॥ ७ ॥
पवनो विगुणीकृत्य स्वनिवेशादधो नयेत् ।
कुर्याद्वंक्षणसंधिस्थो ग्रंन्थ्याभं श्वयथुं तदा ॥ ८ ॥

वातप्रकोपकारक आहारानें, थंड पाण्यांत बुड्या मारण्यानें, मल-मूत्रादिकांचे वेग धारण केल्यानें, किंवा नसते वेग बळेंच उपस्थित केल्यानें, वाकडे तिकडे अंगविक्षेप केल्यानें, बळवानाशीं झोंबी खेळल्यानें, तिरकमठा वगैरे ओढण्यानें किंवा वाताचा क्षोभ करणाऱ्या अन्य कारणानें, वायु कुपित होऊन ज्या वेळीं लहान आंतड्याच्या एखाद्या भागात शिरून तें आकुंचित करून किंवा दुमडून खालीं नेतो, त्या वेळीं तो अडसंधींमध्यें गाठीप्रमाणें सूज उत्पन्न करतो. त्याला अंत्रवृद्धि किंवा अंतर्गळ असें म्हणतात.

उपेक्षेचा परिणाम.

उपेक्ष्यमाणस्य च मुष्कवृद्धिमाध्मानरुक्स्तम्भवतीं स वायुः ।
प्रपीडितोऽन्तःस्वनवान्प्रयाति प्राध्मापयन्नेति पुनश्च मुक्तः ॥९॥

फुगोटी, ठणका व ताठरपणा ह्यानीं युक्त असलेल्या अंडवृद्धीची उपेक्षा केली असतां, अंड दाबला असतां वायु शब्द करीत व आंतड्यांत शिरतो, व सोडला असतां पुनः फुगतो.

यस्यान्त्रावयवैः श्लेष्मा मुष्कयोर्याति संचयात् ।
अन्त्रवृद्धिरसाध्योऽयं वातवृद्धिसमाकृतिः ॥ १० ॥

ज्याचा संचित झालेला कफ आंतड्यांतून अंडांत उतरतो, तो

अंत्रवृद्धिरोग असाध्य असतो. त्याचीं लक्षणें वातजन्यवृद्धीप्रमाणें असतात.

बदाचें निदान.

अत्यभिष्यन्दिगुर्वन्नसेवनान्निचयं गतः।
करोति ग्रन्थिवच्छोथं दोषो वंक्षणसंधिषु॥
ज्वरशूलाङ्गसादाढ्यं तं वर्ध्ममिति निर्दिशेत्॥ १॥

अतिशय अभिष्यंदी व जड असें अन्न खाण्यानें संचित झालेला दोष अंडसंधीचे ठिकाणीं गांठीसारखी सूज उत्पन्न करतो. त्यामुळें ज्वर, सूज व अंग गळणें हे विकार होतात. त्याला वर्ध्म म्हणजे वळ किंवा बद असें म्हणतात.

वातवृद्धीची चिकित्सा.

सक्षीरं वा पिबेत्तैलं मासमेरण्डसंभवम्।
गुग्गुलूरुबुतैलं वा गोमूत्रेण पिबेन्नरः॥
वातवृद्धिं निहन्त्याशु चिरकालानुबन्धिनीम्॥ १॥

एक महिनाभर एरंडेल तेल दुधाशीं द्यावें, अथवा गुग्गुळ व एरंडेल गोमूत्रांतून द्यावें. तें फार दिवसांच्या वातजन्य अंडवृद्धीचा नाश करितें.

पित्तजन्य वृद्धीची चिकित्सा.

चन्दनं मधुकं पद्ममुशीरं नीरमुत्पलम्।
क्षीरपिष्टैः प्रदेहः स्यात्पित्तवृद्धिरुजापहः॥ १॥
पञ्चवल्कलकल्केन सघृतेन प्रलेपनम्।
पानं वाऽपि कषायस्य पित्तवृद्धौ प्रशस्यते॥ २॥

चंदन, जेष्टमध, कमळ, वाळा, निळें कमळ, हीं औषधें दुधांत वाटून त्यांचा लेप करावा. तो पित्तजन्य वृद्धीचा नाश करतो. वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी व आंबा ह्यांच्या साली यांचा तुपांत कल्क करून तो लावावा (लेप करावा); अथवा त्यांचा काढा करून प्यावा. तो पित्तवृद्धीवर प्रशस्त आहे.

कफवृद्धीची चिकित्सा.

कफवृद्धौ मूत्रपिष्टैरुष्णवीर्यैः प्रलेपनम्।
पातव्यो मूत्रसंयुक्तः कषायः पीतदारुणः॥ १॥

त्रिकटुत्रिफलाकाथं सक्षारलवणं पिबेत् ।
कफवातात्मकोपघ्नं विरेकात्कफवृद्धिजित् ॥ २ ॥

कफजन्य वृद्धीवर उष्णवीर्य औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचा लेप करावा आणि दारुहळदीचा काढा गोमूत्रांतून प्यावा. सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा व आवळकाठी, ह्यांचा काढा जवखार व सैंधेलोण घालून प्यावा. तो कफवाताचा नाश करतो व रेचक असल्यामुळें कफवृद्धीला जिंकतो.

रक्तवृद्धीची चिकित्सा.

अविदाहि च भैषज्यं कर्तव्यं रक्तपैत्तिके ।
सर्वं पित्तहरं कार्यं रक्तजे रक्तमोक्षणम् ॥ १ ॥
मुहुर्मुहुर्जलौकाभिः शोणितं रक्तजे हरेत् ।
शीतमालेपनं सर्वं पाको रक्ष्यः प्रयत्नतः ॥ २ ॥
त्रिवृतं प्रपिबेत्क्षौद्रशर्करासहितं मुहुः ।
पित्तग्रन्थिक्रमं कुर्यादामे पक्वे च रक्तजे ॥ ३ ॥

रक्तपित्तजन्य सुजेवर अविदाही (शीतळ) औषध योजावें. रक्तजन्य सुजेवर पित्तनाशक चिकित्सा करावी व रक्त काढावें. रक्तजन्य सुजेला जळवा लावून रक्त काढावें, आणि शीतळ लेप करावे. सूज पिकूं नये अशी खबरदारी घ्यावी. वरचेवर तेडाचा काढा मध व खडीसाखर घालून घ्यावा. अपक्व किंवा पक्व सुजेवर पित्तग्रंथीवरील उपचार करावे.

मेदोवृद्धीची चिकित्सा.

स्विन्नं मेदःसमुत्थानं लेपयेत्सुरसादिना ।
शिरोविरेचनद्रव्यैः सुखोष्णैर्मूत्रसंयुतैः ॥ १ ॥

मेदापासून झालेल्या सुजेचें स्वेदन करून पोटिसानें शेकून सुरसादि गणांतील औषधांनीं व शिरोविरेचन द्रव्यांचा गोमूत्रांत कल्क करून त्यानें सुखोष्ण असा लेप करावा.

षड्डूषण गुग्गुल.

षड्डूषणं क्षौद्रसमं गुग्गुलुं गव्यसर्पिषा ।
प्रयुक्तं कुट्टय भुञ्जीत यथाग्नि दिवसानने ॥
कटुतिक्तकषायाशी मेदोवृद्धिप्रणाशनम् ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चवक आणि चित्रक ह्यांचें

चूर्ण समभाग व सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ घेऊन सकाळच्या प्रहरीं गाईचें तूप व मधाशीं खावा. निर्वात स्थानीं राहून तिखट, कडू, तुरट असें अन्न खावें, म्हणजे मेदोवृद्धीचा नाश होतो.

मूत्रजन्य व अंत्रजन्य वृद्धीवर.

संस्वेद्य मूत्रप्रभवं वस्त्रखण्डेन वेष्टयेत् ।
सीवन्याः पार्श्वतोऽधस्ताद्विध्येद्व्रीहिमुखेन वै ॥ १ ॥
मुष्ककोशमगच्छन्त्यामन्त्रवृद्धौ विचक्षणः ।
वातवृद्धिक्रमं कुर्याद्दाहस्तत्राग्निना हितः ॥ २ ॥
शङ्खोपरि च कर्णान्ते त्यक्त्वा सीवनिमादरात् ।
व्यत्यासाद्वा शिरां विध्येदन्त्रवृद्धिनिवृत्तये ॥ ३ ॥
तैलमेरण्डजं पीतं बलासिद्धं पयोन्वितम् ।
आध्मानशूलोपचितामंत्रवृद्धिं जयेन्नरः ॥ ४ ॥

मूत्रजन्य अंडवृद्धीचें स्वेदन करून त्याला एक फडकें गुंडाळावें. आणि शिवणीच्या बाजूस खालीं व्रीहिमुख शस्त्रानें वेध करावा. आंतडें अंडामध्यें उतरल्यामुळें झालेल्या अंडवृद्धीवर वातवृद्धीवरील उपचार करावे. आणि आंखाच्या कानाच्या कडेला शिवण सोडून डाग द्यावा. डाग देणें तो उजवे बाजूस अंडवृद्धि असल्यास डाव्या बाजूस, व डाव्या बाजूस अंडवृद्धि असल्यास उजव्या बाजूस असा उलट क्रमानें द्यावा. चिकणामूळ टाकून सिद्ध केलेलें दूध एरंडेल घालून प्यावें. तें आध्मान व शूल ह्यांनीं युक्त अंडवृद्धीचा नाश करितें.

रास्नायष्ट्यमृतैरण्डबलागोक्षुरसाधितः ।
काथोऽन्त्रवृद्धिं हन्त्याशु रुबुतैलेन मिश्रितः ॥ ५ ॥

रास्ना, जेष्टमध, गुळवेल, एरंडमूळ, चिकणामूळ, व गोखरू ह्या औषधांचा काढा करून एरंडेल घालून प्यावा. तो अंत्रवृद्धीचा नाश करतो.

पिप्पली जीरकं कुष्ठं बदरं शुष्कगोमयम् ।
काञ्जिकेन प्रलेपोऽयमंत्रवृद्धिविनाशनः ॥ ६ ॥

पिंपळी, जिरें, कोष्ट, बोरें, गाईच्या शेणाचा गोवर हीं औषधें कांजींत वाटून त्यांचा लेप करावा. तो अंत्रवृद्धीचा नाश करितो.

देवदारुमिशीवासाटाकलीमूलसैन्धवैः ।

क्षौद्रयुक्तैश्च तैलेपो वृद्धिमंत्रभवां जयेत् ॥ ७ ॥

देवदार, वडिशेप, अडुळसा, टाकळीचें मूळ, सैंधेलोण ह्या औषधांचा मधांत कल्क करून लेप करावा. तो अंत्रवृद्धीला जिंकतो.

अंडवृद्धीची चिकित्सा.

तैलं नारायणं योज्यं पानाभ्यञ्जनबस्तिषु ।
गोमूत्रैरण्डतैलाभ्यां रसगन्धककज्जलीम् ॥ १ ॥
पीत्वा निहन्ति सहसा वृद्धिं वृषणसंभवाम् ।

अंडवृद्धीच्या विकारांत पिण्याकरितां, अंगास लावण्याकरितां व बस्तीमध्यें नारायण तेलाचा उपयोग करावा. गोमूत्र व एरंडेल ह्यांमधून पारा व गंधक ह्यांची कज्जली द्यावी. ती वृषणवृद्धीचा नाश करिते.

फलत्रिकोद्भवं क्वाथं गोमूत्रेणैव पाययेत् ॥
वातश्लेष्मकृतं हन्ति शोथं वृषणसंभवम् ॥ २ ॥

त्रिफळ्याचा काढा गोमूत्र घालून प्यावा. तो वातकफजन्य अंडशोथाचा (अंडवृद्धीचा) नाश करतो.

प्लक्षाक्षबीजशुण्ठीनिर्गुण्डीनां मिथः समैश्चूर्णैः ।
घृतमधुसहिता पिण्डी न क्षमते मुष्कवृद्धिकथाम् ॥ ३ ॥
वचासर्षपकल्केन प्रलेपः शोफनाशनः ।
दार्वीचूर्णं गवां मूत्रैर्निपीतं मुष्कवृद्धिजित् ।
आर्द्रकस्य रसः क्षौद्रयुक्तो वृषणवातजित् ॥ ४ ॥

पिंपरणीची साल, बेहड्यांतील बी, सुंठ, व निर्गुंडी ह्यांचें समभाग चूर्ण करून तूप व मधाशीं द्यावें. म्हणजे अंडवृद्धीचा नाश होतो. वेखंड व मोहऱ्या ह्यांचा कल्क सुजेचा नाश करितो. दारुहळदीचें चूर्ण गोमूत्राशीं द्यावें; तें वृषणवृद्धीचा नाश करितें. आल्याचा रस मधाशीं द्यावा; तो वृषणवाताचा नाश करितो.

सामान्य उपचार.

मांस्यादि घृत.

मांसी कुष्ठं पत्रकैला रास्ना शृङ्गी च चित्रकम् ।
कृमिघ्नमश्वगन्धा च शैलेयं कटुरोहिणी ॥ १ ॥
सैन्धवं तगरं चैव कुटजातिविषैः समैः ।
एतैश्च कार्षिकैः कल्कैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २ ॥

वृषमुण्डीतकैरण्डनिम्बपत्रभवं रसम् ।
कण्टकार्याश्चापि दुग्धं प्रस्थं प्रस्थं विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
सिद्धमेतद् घृतं पीतमंत्रवृद्धिं व्यपोहति ।
वातवृद्धिं पित्तवृद्धिं मेदोवृद्धिमथापि वा ।
मूत्रवृद्धिं च हन्त्येतत्सर्पिराशु न संशयः ॥ ४ ॥

जटामांसी, कोष्ट, तमालपत्र, वेलदोडे, रास्ना, काकडशिंगी, चित्रकमूळ, वावडिंग, अश्वगंध, धोंडफूल, कुटकी, सैंधेलोण, तगर कुडा व अतिविष हीं औषधें एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क; अडुळसा, गोरखमुंडी, एरंड, बाळंतलिंबाचीं पानें वं रिंगणी ह्यांचा रस एक एक प्रस्थ व दूध एक प्रस्थ घालून एक प्रस्थ (चौसष्ट तोळे) तूप सिद्ध करावें. हें तूप प्राशन केलें असतां अंत्रवृद्धीचा नाश होतो. त्याचप्रमाणें वातवृद्धि, पित्तवृद्धि, मेदोवृद्धि व मूत्रवृद्धि ह्यांचाही तें नाश करितें.

पुनर्नवादि तेल.

पुनर्नवाऽमृतादारु सक्षारं लवणत्रयम् ।
कुष्ठं सटी वचा मुस्तं रास्ना कट्फलपुष्करम् ॥ १ ॥
यवानी हपुषा शिग्रुः शताह्वा चाजमोदिका ।
विडङ्गातिविषायष्टीपञ्चकोलकसंयुतैः ॥ २ ॥
एतैरक्षसमैः कल्कैस्तैलप्रस्थं विपाचयेत् ।
गोमूत्रं द्विगुणं देयं काञ्जिकं च तथैव च ॥ ३ ॥
पुनर्नवाद्यमेतत्तु बस्तौ पाने तथोत्तमम् ।
कटयूरुपृष्ठमेढ्रेषु कुक्षौ च वृषणाश्रितम् ॥
कफवातोद्भवं शूलमंत्रवृद्धिविनाशनम् ॥ ४ ॥

घेटुळीचें मूळ, गुळवेल, देवदार, जवखार, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, कोष्ट, कचोरा, वेखंड नागरमोथे, रास्ना, कायफळ, पोखरमूळ, ओवा, शेरणी, शेवगा, बडिशेप, अजमोदा, वावडिंग, अतिविष, जेष्टमध, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ व सुंठ ह्या औषधांचा कल्क एक एक तोळा, तेल चौसष्ट तोळे, गोमूत्र एकशें अठ्ठावीस तोळे, व कांजी एकशें अठ्ठावीस तोळे एकत्र करून तेल सिद्ध करावें. हें पुनर्नवादि तेल प्राशन करण्याकरितां व बस्ती देण्याकरितां प्रशस्त आहे. हें कंबर, मांड्या, पाठ, शिस्न, कुशी

व अंड ह्यांमधील कफवातजन्य शूळ व अंत्रवृद्धि ह्यांचा नाश करितें.

बिल्वादि चूर्ण.

मूलं बिल्वकपित्थयोररलुकस्याग्नेर्बृहत्योर्द्वयोः
श्यामापूतिकरञ्जशिग्रुकतरोर्विश्वौषधारुष्करम् ।
कृष्णाग्रन्थिकवेल्लपञ्चलवणं क्षाराजमोदान्वितं
पीतं काञ्जिककोष्णतोयमथितैश्चूर्णीकृतं वर्ध्मजित् ॥१॥

बेल, कवठ, टेंटु, चित्रक, रिंगणी, डोरली, काळें निशोत्तर, बाणेरा करंज, शेवगा ह्यांचें मूळ, सुंठ, बिब्बा, पिंपळी, पिंपळमूळ, वावडिंग, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ, बांगडखार, जवखार, व ओवा, ह्यांचें चूर्ण करून तें कांजी, ऊन पाणी किंवा ताक ह्यांजबरोबर घ्यावें. तें वर्ध्म-(वळ) रोगाचा नाश करितें.

भृष्टश्चैरण्डतैलेन कल्कः पथ्यासमुद्भवः ।
कृष्णासैन्धवसंयुक्तो वर्ध्मरोगहरः परः ॥ १ ॥

पिंपळी व सेंधेलोण ह्यांचें चूर्ण घालून तयार केलेला हिरड्याचा कल्क एरंडेलांत तळून खावा. तो वर्ध्मरोगाचा नाश करितो.

श्वदंष्ट्रासिन्धुविश्वाब्ददारुक्रिमिहराश्मभित् ।
लोध्रचूर्णं घृतेनाद्याद्वातवर्ध्महरं परम् ॥ २ ॥

गोखरू, सैंधव, सुंठ, नागरमोथे, देवदार, वावडिंग, पाषाणभेद, व लोध्र ह्यांचें चूर्ण तुपाशीं घ्यावें. तें वातजन्य वर्ध्मरोगाचा नाश करितें.

सैन्धवं मदनं कुष्ठं शताह्वा निचुलं वचा ।
ह्रीबेरं मधुकं भार्गी देवदारु सनागरम् ॥ ३ ॥
कट्फलं पौष्करं मेदा चविका चित्रकं सटी ।
विडङ्गातिविषे श्यामा हरेणुर्नीलिनी स्थिरा ॥ ४ ॥
बिल्वाजमोदा रास्ना च दन्ती कृष्णा च तैः समैः ।
साध्यमेरण्डजं तैलं तैलं वा कफवातनुत् ॥ ५ ॥
वर्ध्मोदावर्तगुल्मार्शःप्लीहमेहाढ्यमारुतान् ।
आनाहमश्मरीं चैव हन्यात्तदनुवासनात् ॥ ६ ॥

सेंधेलोण, गेळफळ, कोष्ट, बडीशेप, जलवेत, वेखंड, वाळा, जेष्ठमध, भारंगमूळ, देवदार, सुंठ, कायफळ, पोखरमूळ, मेदा, चवक, चित्रकमूळ, कचोरा, वावडिंग, अतिवीष, नळीचें तेल, रेणुक-

बीज, निळीचें बी, पिटवण, बेल, अजमोदा, रास्ना, दांतीमूळ, व पिंपळमूळ, ह्यांच्या कल्कानें एरंडेल किंवा तिळाचें तेल सिद्ध करावें. तें कफवातनाशक आहे. वर्ध्म, उदावर्त, गुल्म, मूळव्याध, पांथरी, प्रमेह, आढ्यवात, पोट फुगणें, ह्यांचा नाश करितें; आणि ह्या तेलाचा अनुवासन बस्ती दिला असतां मूतखड्याचाही नाश करतो.

अजाजी हपुषा कुष्ठं गोमयं बदरान्वितम् ।
काञ्जिकेन तु संपिष्टं कुर्याद्वर्ध्मप्रलेपनम् ॥ १ ॥

जिरें, शेरणी, कोष्ट, गाईचें शेण, बोरें, ह्यांचा कांजीमध्यें कल्क करून त्यांचा वर्ध्मावर लेप करावा.

सद्योमृतस्य काकस्य मलेन परिलेपनम् ।
वर्ध्मरोगः प्रयात्याशु रविणा तिमिरं यथा ॥

नुकत्याच मेलेल्या कावळ्याच्या मलाचा लेप करावा. सूर्य जसा अंधकाराचा नाश करतो, तसा तो वर्ध्माचा नाश करतो.

पक्वेऽत्र दारणं कृत्वा प्रकर्तव्या व्रणक्रिया ॥ २ ॥

वर्ध्म (बद) पिकला असतां फोडून नंतर व्रणावरील चिकित्सा करावी.

कुरंडचिकित्सा.

यः पित्तदोषेण कुरण्डरोगो भवेच्छिशोर्दक्षिणमुष्कभागे ।
तस्योर्ध्वभागं श्रवणस्य विध्येद्वामस्य वामप्रभवेऽपरस्य ॥ १ ॥

पित्तदोषामुळें मुलाच्या अंडामध्यें कुरंडरोग होतो. त्यासाठीं त्या मुलाच्या कानाच्या वर वेध करावा. उजवीकडे असल्यास डावीकडे व डावीकडे असल्यास उजवीकडे कानाच्या वर वेध करावा.

एरंडतेलादि योग.

एरण्डतैलसंमिश्रं कासीसं सैन्धवं पिबेत् ।
वस्त्रेण वृषणं बद्धं कुरण्डज्वरनाशनम् ॥ १ ॥

एरंडेल तेलांत हिराकस व सैंधव घालून पाजावें व वस्त्रानें अंड बांधावें. म्हणजे कुरंडक व त्यापासून येणारा ज्वर ह्यांचा नाश होतो.

इंद्रवारुण्यादि योग.

इन्द्रवारुणिकामूलं तैलं पुष्करजं तथा ।
संमर्द्य च सगोदुग्धं पिबेज्जन्तुः कुरण्डजे ॥ १ ॥

कडु इंद्रावणाचें मूळ व पोखरमूळ ह्यांनीं सिद्ध केलेलें तेल कुरंडकावर चोळावें व गाईच्या दुधांतून पाजावें.

सैंधवादि लेप.

संचूर्णितं सैन्धवमाज्ययुक्तं संमर्द्य तोयस्थितमेव सोष्णम् ।
मुहुर्मुहुर्यः कुरुते प्रलेपं विलीयते तस्य कुरण्डरोगः ॥ १ ॥

तुपांत सैंधव घालून कुरंडकावर चोळावें व ऊन पाण्यांत बसवावें. ह्याप्रमाणें वरचेवर करणाराचा कुरंडरोग नाहींसा होतो.

गवां घृतेन संयुक्तं क्षिपेत्सैन्धवचूर्णकम् ।
पिबेत्सप्तदिनं यावत्तावल्लेपः कुरण्डजे ॥ १ ॥

गाईच्या तुपांत सैंधलोण घालून तें सात दिवस प्राशन करावें व तितके दिवस त्याचा लेप करावा.

तण्डुलवारिविमिश्रं घृतपुरसंज्ञं यदुच्यते लोके ।
तन्मूलपिष्टलेपं कुरण्डगलगण्डयोः कुर्यात् ॥ २ ॥

करंजाच्या मुळाचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांत कालवून त्याचा कुरंडकावर व गालगुंडावर लेप करावा.

ईश्वरीमूलमेरण्डमूलं मूषकचर्म च ।
प्रलेपः स्यात्कुरण्डानां रोगविच्छेदकारकः ॥ ३ ॥

शिवलिंगीचें मूळ व एरंडमूळ ह्यांचा लेप करून त्याजवर उंदराचें कातडें बांधावें. तो कुरंडरोगाचा नाश करतो.

सुपेषितं ब्राह्मणयष्टिकाया मूलं समं तण्डुलधावनेन ।
निहन्ति लेपाद्गलगण्डमालां कुरण्डमुख्यानखिलान्विकारान् ॥४॥

ब्रह्मदंडीचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून त्याचा लेप करावा. तो गालगुंड, गंडमाळा व कुरंडरोग इत्यादिकांचा नाश करतो.

वातारितैलमृदितं सुरवारुणीजं
मूलं नरः पिबति यो मसृणं विचूर्ण्य ।
गव्ये निधाय पयसि त्रिदिनावसाने
तस्य प्रणश्यति कुरण्डकृतो विकारः ॥ ५ ॥

इंद्रावणीचे मूळाचें चूर्ण एरंडतेलांत खलून गाईच्या दुधांतून तीन दिवस पिणाऱ्या मनुष्याचा कुरंडसंबंधीं विकार नाहींसा होतो.

गोमूत्रसिद्धां रुबुतैलभृष्टां हरीतकीं सैन्धवचूर्णयुक्ताम् ।
खादेन्नरः कोष्णजलानुपानान्निहन्ति कुरण्डमतीव वृद्धम् ॥६॥

हिरडे व सैंधव ह्यांचें चूर्ण एरंडतेलांत तळून गोमूत्रांतून घ्यावें; म्हणजे फार दिवसांचा वाढलेला कुरंडरोग दूर होतो.

शम्बूकोदरनिहितं गव्यं सप्ताहमातपे सर्पिः ।
स्थितमपहरति कुरण्डं सैन्धवचूर्णान्वितं लेपात् ॥ ७ ॥

गाईचें तूप शंखांत भरून सात दिवस उन्हांत ठेवावें. नंतर त्यांत सैंधव घालून त्याचा लेप करावा. तो कुरंडकाचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

संशोधनं बस्तिरसृग्विमोक्षः स्वेदः प्रलेपोऽरुणशालयश्च ।
एरण्डतैलं सुरभीजलं च धन्वामिषं शिग्रुफलं पटोलम् ॥ १ ॥
पुनर्नवागोक्षुरकाग्निमन्थं ताम्बूलपथ्यारसनारसोनम् ।
वान्त्यङ्गनागृञ्जनकं मधूनि कौम्भं घृतं तप्तजलं च तक्रम् ॥ २ ॥
अर्धेन्दुवद्वङ्क्षणयोश्च दाहो व्यत्यासतो बाहुशिराव्यधश्च ।
यथामयं शस्त्रविधिश्च वर्गः स्याद्ध्र्मवृद्ध्यामयिनां सुखाय ॥३॥

वमनविरेचन वगैरे संशोधन उपचारबस्ती, रक्तकाढणें, स्वेदन, लेप, तामसाळ, एरंडेल, स्वच्छ पाणी, जांगलमांस, शेवग्याचें बी, पडवळ, वसू, गोखरू, टाकळी, विडा, हिरडा, रास्ना, लसूण, वमन, स्त्रीसंग, तांबडा मुळा, मध, मातीच्या घागरींतील तूप, ऊन पाणी, ताक, अंडसंधीच्या ठिकाणीं अर्धचंद्राकृति डाग, विरुद्ध-बाजूच्या बाहूच्या शिरांचा वेध आणि रोगानुरूप शस्त्रक्रिया, हा पथ्यवर्ग वर्ध्मवृद्धीच्या रोग्यांना सुखावह आहे.

आनूपमांसानि दधीनि माषाः पिष्टानि दुष्टान्नमुपोदिका च ।
गुरूणि शुक्रोत्थितवेगरोधाः स्युर्वर्ध्मवृद्ध्यामयिनामभित्राः ॥४

अनूप देशांतील प्राण्यांचें मांस, दहीं, उडीद, पिष्टान्न, दूषित अन्न, मयाळ, जड पदार्थ, शुक्राचा वेग धारण करणें हे वर्ध्म व वृद्धीच्या रोग्याला अपथ्यकारक आहे.

वृंदांतील.

वेगाहार्ति पृष्ठयानं व्यायामं मैथुनं तथा ।
अत्याशनमथाध्वानमुपवासं परित्यजेत् ॥ १ ॥

मल, मूत्र व शुक्र इत्यादिकांचे वेग धारण करणें, घोड्यावर वगैरे

१. उत्तरहिंदुस्थानांत कातड्याच्या मोठमोठ्या बुदल्यांतून तूप असतें, तें अपथ्यकारक आहे म्हणून हें सांगितलें आहे.

पृष्ठयानावर बसणें, व्यायाम, मैथुन, अतिशय खाणें, मार्ग चालणें, व उपास हे वर्धम व वृद्धीच्या रोग्यानें वर्ज करावे.

गाळगुंड, गंडमाळा, अपची, ग्रंथि व अर्बुद ह्यांचें निदान.

गालगुंड इत्यादिकांचें निदान.

निबद्धः श्वयथुर्यस्य मुष्कवल्लम्बते गले ।
महान्वा यदि वा ह्रस्वो गलगण्डं तमादिशेत् ॥ १ ॥
महान्तं शोथमल्पं वा हनुमन्यागलाश्रयम् ।
लम्बन्तं मुष्कवद् दृष्ट्वा गलगण्डं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

ज्याच्या गळ्याला अंड बांधल्याप्रमाणें लोंबणारी लहान किंवा मोठी सूज येते, तिला गालगुंड असें म्हणतात.

गालगुंडाची संप्राप्ति.

वातः कफश्चापि गले प्रदुष्टो मन्ये तु संश्रित्य तथैव मेदः ।
कुर्वन्ति गण्डं क्रमशः स्वलिङ्गैः समन्वितं तं गलगण्डमाहुः ॥२॥

वात, कफ व मेद हे गळ्यामध्यें दूषित होऊन मानेचा आश्रय करून अनुक्रमें वातजन्य, कफजन्य, व मेदोजन्य अशा त्या त्या लक्षणांनीं युक्त गांठी उत्पन्न करितात. त्याला गालगुंड असें म्हणतात.

वातजन्य गलगंडनिदान.

तोदान्वितः कृष्णशिरावनद्धः श्यावारुणो वा पवनात्मकस्तु ।
पारुष्ययुक्तश्चिरवृद्ध्यपाको यदृच्छया पाकमियात्कदाचित् ॥ ३॥
वैरस्यमास्यस्य च तस्य जन्तोर्भवेत्तथा तालुगलप्रशोषः ।

वातजन्य गाळगुंड काळसर, तांबूस, काळ्या शिरांनीं व्याप्त असून त्यांत टोचणी असते. तो फार वेळानें वाढतो. खरखरीत असतो. तो पिकत नाहीं. कदाचित् आपोआप पिकतो. त्यामुळें तोंड बेचव असतें. टाळ्याला व गळ्याला कोरड असते.

कफजन्य गालगुंडाचें निदान.

स्थिरः सवर्णो गुरुरुग्रकण्डूः शीतो महांश्चापि कफात्मकस्तु ॥४॥
चिराभिवृद्धिं भजतेऽचिराद्वा प्रपच्यते मन्दरुजः कदाचित् ।
माधुर्यमास्यस्य च तस्य जन्तोर्भवेत्तथा तालुगलप्रलेपः ॥ २ ॥

कफजन्य गालगुंड जड, अत्यंत कंडुयुक्त, त्वचेसारख्या वर्णाचा, थंड व मोठा असतो. तो फार वेळानें सावकाश पिकतो, क्वचित् फार दिवसांनींही पिकतो. आणि त्यांत थोडा ठणका असतो. त्या मनुष्याच्या तोंडाला गुळमटपणा असतो आणि टाळा व गळा ह्यांना चिकटपणा असतो.

मेदोजन्य गालगुंडाचें निदान.

स्निग्धो गुरुः पाण्डुरनिष्टगन्धो मेदोभवः कण्डुयुतोऽल्परुक्च।
प्रलम्बतेऽलाबुवदल्पमूलो देहानुरूपक्षयवृद्धियुक्तः ॥ ६ ॥
स्निग्धास्यता तस्य भवेच्च जन्तोर्गलेऽनुशब्दं कुरुतेऽतिमात्रम्।

मेदोजन्य गालगुंड दिसण्यांत स्निग्ध, जड, पांढुरक्या रंगाचा, दुर्गंधयुक्त असा असून त्यांत थोडा ठणका व कंडू असतो. तो कडू भोपळ्याप्रमाणें लोंबत्यासारखा वाटतो. तो मुळाशीं लहान असून त्या मनुष्याचें शरीर जसें वाढेल किंवा कमी होईल त्याप्रमाणें तो वाढतो व कमी होतो. त्या मनुष्याचें तोंड नेहमीं बुळबुळीत असतें, आणि त्याच्या घशांत वाजतें.

असाध्य लक्षण.

कृच्छ्राच्छ्वसन्तं मृदुसर्वगात्रं संवत्सरातीतमरोचकार्तम्।
क्षीणं च वैद्यो गलगण्डयुक्तं भिन्नस्वरं चापि विवर्जयेद्धि ॥ ७ ॥

ज्याचे सर्व अवयव मृदु झाले आहेत व ज्याला एक वर्ष लोटलें आहे असा, कष्टानें श्वासोच्छ्वास करणारा, अरुचीनें पिडलेला, क्षीण झालेला व ज्याचा स्वर बिघडला आहे असा गालगुंडाचा रोगी वैद्यानें असाध्य म्हणून सोडावा.

गंडमालांचें निदान.

कर्कन्धुकोलामलकप्रमाणैः कक्षांसमन्यागलवङ्क्षणेषु।
मेदःकफाभ्यां चिरमन्दपाकैः स्याद्गण्डमाला बहुभिश्च गण्डैः ॥१॥

कफ व मेद हे दूषित होऊन काख, खांदा, मान, गळा व अंडसंधी ह्या ठिकाणीं फार दिवसांनीं सावकाश पिकणाऱ्या अशा अनेक गांठी उत्पन्न करितात. त्यांना गंडमाला असें म्हणतात.

भोजाचें मत.

वातपित्तकफा वृद्धा मेदश्चापि समन्वितम्।

जङ्घयोः कण्डरां प्राप्य मत्स्याण्डसदृशान्बहून् ॥ १ ॥
कुर्वन्ति ग्रन्थींस्तांस्तेभ्यः पुनः प्रकुपितोऽनिलः ।
तान्दोषानूर्ध्वगो वक्षःकक्षामन्यागलाश्रितः ॥ २ ॥
नानाप्रकारान्कुरुते ग्रन्थीन्सा त्वपची इव ।
अपची कण्ठमन्यासु कक्षावंक्षणसंधिषु ॥
गण्डमालां विजानीयादपचीतुल्यलक्षणाम् ॥ ३ ॥

वाढलेले वात, पित्त व कफ हे दोष मेदासहवर्तमान जंघेच्या कंडरामध्यें शिरून माशांच्या अंड्याच्या आकाराच्या अनेक गांठी उत्पन्न करितात. त्या गांठींतील प्रकुपित झालेला वायु त्या दोषांना वर नेऊन हृदय, काख, मान व गळा ह्यांचा आश्रय करून नाना प्रकारच्या अपचीसारख्या गांठी उत्पन्न करतो. त्याच अपची, गळा, मान, काख व अडसंधी ह्या ठिकाणीं झाल्या असतां त्यांना गंड-माळा म्हणतात. ह्यांचीं लक्षणें अपचीप्रमाणेंच असतात.

अपचीचें लक्षण.

ते ग्रन्थयः केचिदवाप्तपाकाः स्रवन्ति नश्यन्ति भवन्ति चान्ये ।
कालानुबन्धं चिरमादधाति सैवापचीति प्रवदन्ति केचित् ॥ १ ॥

त्या गांठींपैकीं कांहीं पिकतात, कांहीं वाहतात व कांहीं नाहींशा होतात. असा क्रम फार दिवस चालला म्हणजे त्या गंडमाळांना अपची असें म्हणतात.

त्यांचें साध्यासाध्यत्व.

साध्याः स्मृताः पीनसपार्श्वशूलकासज्वरच्छर्दियुतास्त्वसाध्याः ॥

अपची साध्य आहे; तथापि पीनस, कुशी किंवा बरगड्या दुखणें, खोकला व ओकारी हे विकार झाले तर ती असाध्य होते.

ग्रंथींचें निदान.

वातादयो मांसमसृक्प्रदुष्टाः संदूष्य मेदश्च तथा शिराश्च ।
वृत्तोन्नतं विग्रथितं तु शोथं कुर्वन्त्यतो ग्रन्थिरिति प्रदिष्टः ॥ १ ॥

वात, पित्त व कफ हे दोष अत्यंत वाढून मांस, रक्त, मेद व शिरा यांना दूषित करून वाटोळा, उंच व कठीण असा शोथ उत्पन्न करितात. त्याला ग्रंथि असें म्हणतात.

वातज ग्रंथिनिदान.

आयम्यते वृश्चति तुद्यते च प्रत्यस्यते मथ्यति भिद्यते च ।
कृष्णो मृदुर्बस्तिरिवाऽऽततश्च भिन्नः स्रवेच्चानिलजोऽस्रमच्छम् २

वातज ग्रंथीमध्यें गांठ ताणल्यासारखी होते. गांठींत तोडल्याप्रमाणें वाटतें, टोंचणी लागते, उचलून टाकल्याप्रमाणें वाटतें, घुसळल्याप्रमाणें वाटतें, पिंजल्याप्रमाणें वाटतें व फोडल्याप्रमाणें वाटतें. गांठ काळसर व मऊ असते, भात्याप्रमाणें फुगीर दिसते व फुटली असतां तीमधून स्वच्छ रक्त वाहतें.

पित्तजन्य ग्रंथिलक्षण.

दंदह्यते धूप्यति चूष्यते च पापच्यते प्रज्वलतीव चापि ।
रक्तः स पीतोऽप्यथ वाऽपि पित्ताद्भिन्नः स्रवेदुष्टमतीव चास्रम् ॥३

पित्तजन्य गांठ विस्तवाप्रमाणें धगधगीत असते. तीमधून धूर निघाल्याप्रमाणें वाटतें, तिला ओढ लागते, ती पिकते, जळजळते, पित्तामुळें गांठ तांबूस पिंवळी अशी असते. आणि ती फुटली म्हणजे तीमधून दुष्ट रक्त वाहतें.

कफज ग्रंथिलक्षण.

शीतो विवर्णोऽल्परुजोऽतिपाण्डुः पाषाणवत्संहननोपपन्नः ।
चिराभिवृद्धिश्च कफप्रकोपाद्भिन्नः स्रवेच्छुक्लघनं च पूयम् ॥ ४ ॥

कफापासून झालेली गांठ थंड, त्वचेच्या रंगाची व किंचित् ठणका असलेली अशी असते, तिला अतिशय खाज असते, ती दगडासारखी कठीण असते, ती फार मोठी असते, ती फार उशीरानें वाढते आणि फुटली म्हणजे पांढरा व घट्ट पू वाहतो.

मेदोजन्य ग्रंथिलक्षण.

शरीरवृद्धिक्षयवृद्धिहानिः स्निग्धो महान्कंडुयुतोऽल्परुक्च ।
मेदःकृतो गच्छति चात्र भिन्ने पिण्याकसर्पिःप्रतिमं च मेदः ॥ ५ ॥

मेदोजन्य गांठ शरीर जसें पुष्ट किंवा कृश होईल त्याप्रमाणें मोठी किंवा लहान होते. ती तुळतुळीत व मोठी असते. तिला खाज फार असते. तीमध्यें ठणका कमी असतो. ती गांठ फुटली तर तिळाच्या चटणीसारखा किंवा घट्ट तुपासारखा मेद तिच्यांतून वाहतो.

भोजाचें मत.

मेदो वायुर्यदा मांसे निक्षिपेदथवा त्वचि ।
तत्र मेदोभवो ग्रन्थिः श्यावो भवति पाण्डुरः ॥ १ ॥
कृशः कृशे महान्स्थूले ग्रन्थिश्छिन्नश्च पीडितः ।
तिलकल्कनिभः स्रावो घृतवच्चास्य जायते ॥ २ ॥

वायु ज्या वेळीं मेदाला मांसांत किंवा त्वचेमध्यें नेतो त्या वेळीं काळसर पांढरी अशी मेदाची गांठ होते. रोगी कृश असला तर ती लहान असते व स्थूळ असल्यास मोठी असते. ती फुटली असतां तिळाच्या कल्काप्रमाणें किंवा तुपाप्रमाणें मेदाचा स्राव होतो.

शिराजन्य ग्रंथीची संप्राप्ति.

व्यायामजातैरबलस्य तैस्तैराक्षिप्य वायुस्तु शिराप्रतानम् ।
संकुच्य संपीड्य विशोष्य चापि ग्रन्थिं करोत्युन्नतमाशु वृत्तम् ॥
ग्रन्थिः शिराजः स तु कृच्छ्रसाध्यो भवेद्यदि स्यात्सरुजश्चलश्च १

अशक्त मनुष्यानें श्रमाचीं अनेक कामें केलीं असतां कुपित झालेला वायु शिराजालांना ओढून धरून त्यांचा संकोच करून त्यांची गांठ बनवितो. आणि त्यांना थोड्या अवकाशांत शुष्क करून उंच व वाटोळी अशी गांठ उत्पन्न करतो. ती गांठ चंचल व दुखणारी असेल तर कष्टानें साध्य होते.

तिचें असाध्य लक्षण.

स चारुजश्चाप्यचलो महांश्च मर्मास्थिजश्चापि विवर्जनीयः ॥ १ ॥

ती शिराजन्य गांठ जर न दुखणारी व न हलणारी असेल, तसेंच फार मोठी व न हलणारी असेल तर असाध्य म्हणून सोडावी.

भोजाचें मत.

पञ्चैतानरुजो ग्रन्थीन्मर्मजानचलांस्त्यजेत् ।
कपोलगलमन्यासु दुश्चिकित्स्याश्च संधिषु ॥ १ ॥

ह्या पांची गांठी मर्मस्थानीं झाल्या असतील व त्या अचल असून त्यांत ठणका नसेल तर असाध्य आहेत. तसेंच गळा, मान, गाल व सांधे ह्या ठिकाणच्याही गांठी चिकित्सा करण्यास बिकट अशा आहेत.

अर्बुदें (आवाळु) यांची संप्राप्ति.

गात्रप्रदेशे क्वचिदेव दोषाः संमूर्छिता मांसमसृक्प्रदूष्य ।
वृत्तं मृदुं मन्दरुजं महान्तमनल्पमूलं चिरवृद्धिपाकम् ॥
कुर्वन्ति मांसोच्छ्रयमत्यगाधं तदर्बुदं शास्त्रविदो वदन्ति॥ १ ॥

शरीराच्या कोणत्याही भागीं प्रकुपित झालेले वातादि दोष मांस व रक्त ह्यांना दूषित करून वाटोळा, स्थिर, थोडा ठणका असणारा, मोठा होणारा, ज्याचीं मुळें फार खोल गेलीं आहेत असा, फार दिवसपर्यंत सावकास वाढणारा, फार दिवसांनीं पिकणारा, आणि अतिशय खोल भागांतून ज्यांची उत्पत्ति आहे असा मांसाचा गोळा उत्पन्न करितात. त्याला वैद्यशास्त्रवेत्ते अर्बुद-अवाळु असें म्हणतात.

त्यांची संख्या.

वातेन पित्तेन कफेन चापि रक्तेन मांसेन च मेदसा च ।
तज्जायते तस्य च लक्षणानि ग्रन्थेः समानानि सदा भवन्ति २

वातानें, पित्तानें व कफानें अशीं तीन, रक्तानें, मांसानें, व मेदानें एक एक, मिळून सहा प्रकारचीं अर्बुदें होतात. त्यांचीं लक्षणें नेहमीं गांठीसारखींच असतात.

रक्तज अर्बुदाचीं लक्षणें.

दोषाः प्रदुष्टा रुधिरं शिराश्च संकुच्य संपीड्य गतास्त्वपाकम्
सास्रावमुन्नह्यति मांसपिण्डं मांसांकुरैराचितमाशु वृद्धिम् ॥३
कुर्वन्त्यजस्रं रुधिरप्रवृत्तिमसाध्यमेतद्रुधिरात्मकं तु ।
रक्तक्षयोपद्रवपीडितत्वात्पाण्डुर्भवेदर्बुदपीडितस्तु ॥ ४ ॥

प्रकुपित झालेले वातादि दोष रक्त व शिरा ह्यांचा संकोच करून आणि त्यांना दाबून किंचित् स्रावयुक्त असा मांसाचा गोळा वर उचलून आणतात. हा लवकर वाढतो व त्याजवर मांसाचे अंकुर असतात. त्यांतून सारखें रक्त वहात असतें. ह्याला रक्तार्बुद असें म्हणतात. हें असाध्य आहे. ह्यामध्यें रक्ताचा क्षय फार होतो. त्या उपद्रवामुळें तो रोगी पांढरा फटफटीत दिसतो.

मांसज अर्बुदाची संप्राप्ति.

मुष्टिप्रहारादिभिरर्दितेऽङ्गे मांसं प्रदुष्टं जनयेत्तु शोथम् ।

अवेदनं स्निग्धमनन्यवर्णमपाकमश्मोपममप्रचाल्यम् ॥
प्रदुष्टमांसस्य नरस्य गाढमेतद्भवेन्मांसपरायणस्य ॥ १ ॥

मुष्टिप्रहारादिकांनीं पीडित झालेल्या ठिकाणचें मांस दूषित होऊन वेदनारहित, तुरतुळीत, त्वचेच्या वर्णाचा, न पिकणारा, दगडाप्रमाणें कठीण व अचल असा शोथ उत्पन्न करितें. त्याला मांसार्बुद असें म्हणतात. नित्य मांस खाणारा व ज्याचें मांस बिघडलें आहे त्याला हें होतें.

ह्याचें असाध्यत्व.

मांसार्बुदं त्वेतदसाध्यमुक्तं साध्येष्वपीमानि विवर्जयेत्तु ।
संप्रस्रुतं मर्मणि यच्च जातं स्रोतःसु वा यच्च भवेदचाल्यम् ॥१॥

हें मांसार्बुद असाध्य आहे. साध्य अर्बुदांमध्यें सुद्धां स्रवणारीं, मर्मस्थानीं झालेलीं, नाकादि स्रोतसांचे ठिकाणीं झालेलीं व अचल अशीं अर्बुदें असाध्य म्हणून सोडावीं.

यज्जायतेऽन्यत्खलु पूर्वजाते ज्ञेयं तदध्यर्बुदमर्बुदज्ञैः ।

पूर्वीं झालेल्या अर्बुदावर आणखी जें दुसरें अर्बुद होतें त्याला वैद्य अध्यर्बुद असें म्हणतात.

यद्द्वंद्वजातं युगपत्क्रमाद्वा द्विरर्बुदं तच्च भवेदसाध्यम् ॥ ३ ॥

जीं दोन अर्बुदें एकदम किंवा एकामागून एक अशीं जवळ जवळ उत्पन्न होतात, त्याला द्विरर्बुद असें म्हणतात. आणि हें असाध्य आहे.

भोजाचें मत.

अर्बुदे त्वर्बुदं जातं द्वंद्वजं चानुजं च यत् ।
द्विरर्बुदमिति ज्ञेयं तच्चासाध्यं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

जें अर्बुदावर अर्बुद होतें तें, जीं दोनीही अर्बुदें एकदम होतात तीं, आणि एकामागून एक अशीं दोन अर्बुदें होतात तीं; ह्या सर्वांना द्विरर्बुद असें म्हणतात. तें असाध्य आहे.

अर्बुदें न पिकण्याचें कारण.

न पाकमायान्ति कफाधिकत्वान्मेदोबहुत्वाच्च विशेषतस्तु ।
दोषस्थिरत्वाद्ग्रथनाच्च तेषां सर्वार्बुदान्येव निसर्गतस्तु ॥ १ ॥

सर्व अर्बुदें निसर्गतः गांठीसारखीं असून त्यांतील दोष स्थिर

असतात आणि विशेषतः त्यांत कफ व मेद अधिक असतो. त्यामुळें तीं पिकत नाहींत.

गालगुंडांची चिकित्सा.

स्वेदोऽनिलोत्थे गलगण्ड आदौ नाड्यानिलघ्नौषधपत्रपिण्डैः ।
स्वेदोपनाहौ कफसंभवेऽपि कृत्वा क्रमं श्लेष्महरं विदध्यात् १

वातजन्य गालगुंडावर प्रथम नाडीस्वेद द्यावा. किंवा वातनाशक अशा झाडांच्या पानांच्या लुगदीनें शेकावें. कफजन्य गालगुंड असलें तरी त्याजवर स्वेदन व पोटीस बांधणें या क्रिया करून नंतर कफनाशक उपचार करावे.

वातजन्य गालगुंडावर.

निचुलं शिग्रुमूलानि दशमूलमथापि च ।
आलेपनं वातगण्डे सुखोष्णं संप्रशस्यते ॥ १ ॥

कडूलिंबाचें मूळ, शेवग्याचीं मुळें व दशमुळें यांचा सुखोष्ण असा लेप करावा.

कफजन्य गालगुंडावर.

देवदारु विशालां च कफगण्डे प्रलेपनम् ।
छर्दनं शीर्षरेकश्च सर्वो रेचनिको हितः ॥ १ ॥

देवदार व कडुवृंदावनाचें मूळ यांचा कफजन्य गालगुंडावर लेप करावा. वमन, शिरोविरेचन वगैरे सर्व शोधन उपचार कराव.

मेदोजन्य गालगुंडावर.

मेदःसमुत्थेऽत्र यथोपदिष्टां विध्येच्छिरां स्निग्धतनोर्नरस्य ।

मेदोजन्य गालगुंडावर प्रथम शरीर स्निग्ध करून जसें सांगितलें असेल त्याप्रमाणें शीर[1] तोडावी.

श्यामासुधालोहपुरीषदन्तीरसाञ्जनैश्चापि हितः प्रलेपः ॥ १ ॥

पिंपळी, चुना, लोहकिट्ट, दांतीमूळ व रसांजन यांचा लेप, करावा. तोही हितकारक आहे.

सामान्य उपचार.

तण्डुलोदकपिष्टेन मूलेन परिलेपितः ।

---

१. जिभेच्या दोन बाजूस बारा बारा शिरा आहेत. त्यांपैकीं दोन मोठ्या असतात. त्यांपैकीं एक शीर तोडावी.

हितः कर्णे पलाशस्य गलगण्डः प्रशाम्यति ॥ १ ॥

पळसाची मुळी तांदुळाच्या धुवणांत वाटून तिचा कानाखालीं लेप करावा, म्हणजे गालगुंडाचा नाश होतो.

जलकुम्भीकजं भस्म पक्त्वा गोमूत्रगालितम् ।
पिबेत्कोद्रवतक्राशी गलगण्डनिवृत्तये ॥ २ ॥

गालगुंड दूर होण्याकरितां शेवाळाची राख करून ती गोमूत्रांत शिजवून प्यावी आणि हरकाचा भात व ताक खावें.

महिषीमूत्रविमिश्रं लोहमलं संस्थितं घटे मासम् ।
अन्तर्धूमविदग्धं मधुना गलगण्डनाशनं लीढम् ॥ ३ ॥

लोखंडाचें कीट म्हशीच्या मुतांत कालवून एक महिनाभर भांड्यांत झांकून ठेवावें. नंतर त्या भांड्याचें तोंड बंद करून अंतरधूमानें पचन करावें, आणि मधाशीं चाटावें. तें गालगुंडाचा नाश करितें.

सूर्यावर्तरसोनाभ्यां गलगण्डोपनाहनम् ।
स्फोटास्रावैः शमं याति गलगण्डो न संशयः ॥ ४ ॥

निळा माका व लसूण ह्यांची लुगदी करून त्याचें पोटीस बांधावें म्हणजे त्यावरील फोड फुटून त्यांतून स्राव होऊन गालगुंड नाहींसें होतें, यांत संशय नाहीं.

सर्षपाः शिग्रुबीजानि शणबीजातसीयवाः ।
मूलकस्य च बीजानि तक्रेणाम्लेन पेषयेत् ॥ ५ ॥
गण्डानि ग्रन्थयश्चैव गण्डमालास्तथैव च ।
लेपनात्तेन शाम्यन्ति विलयं यान्ति वाऽचिरात् ॥ ६ ॥

शिरस, शेवग्याचें बीं, तागाचें बीं, जवस, सातु व मुळ्याचें बीं हीं आंबट ताकांत वाटून लेप करावा; म्हणजे गालगुंड, गंडमाळा व गांठी बसतात किंवा लवकरच नाहींशा होतात.

जीर्णकर्कारुकरसो बिडसैन्धवसंयुतः ।
नस्येन तरुणं हन्ति गलगण्डं न संशयः ॥ ७ ॥

पिकलेल्या काकडीच्या रसांत बिडलोण व सेंधेलोण घालून त्याचें नस्य करावें; म्हणजे अत्यंत वाढलेल्या गालगुंडाचा नाश होतो.

श्वेतापराजितामूलं प्रातः पिष्ट्वा पिबेन्नरः ।

सर्पिषा नियताहारो गलगण्डप्रशान्तये ॥ ८ ॥

गालगुंड बरें होण्याकरितां पांढऱ्या निर्गुडीचें मूळ तुपांत उगाळून चाटावें; आणि नियमित आहार करावा.

तिक्तालाबुफले पक्के सप्ताहमुषितं जलम् ।
गलगण्डं निहन्त्याशु पानात्पथ्यानुशीलिनः ॥ ९ ॥

पिकलेल्या कडू भोपळ्यांत पाणी भरून सात दिवस ठेवावें, आणि तें पिऊन पथ्य करावें; म्हणजे गालगुंडाचा नाश होतो.

अमृतादि तेल.

तैलं पिबेच्चामृतवल्लिहिंगुनिम्बाभयावृक्षकपिप्पलीभिः ।
सिद्धं बलाभ्यां च सदेवदारु हिताय नित्यं गलगण्डरोगे ॥१॥

गुळवेल, हिंग, बाळंतलिंबाची साल, हिरडा, कुड्याची साल, पिंपळी, चिकणामूळ, करंडीचें मूळ व देवदार ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करावें व तें नित्य प्राशन करावें. तें गालगुंडावर हितकारक आहे.

तुंबीतेल.

विडङ्गक्षारसिन्धूत्थरास्नाग्निव्योषदारुभिः ।
कटुतुम्बीफलरसैः कटुतैलं विपाचितम् ।
चिरोत्थमपि नस्येन गलगण्डं विनाशयेत् ॥ १ ॥

वावडिंग, जवखार, सेंधेलोण, वेखंड, रास्ना, चित्रकमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, देवदार, ह्यांचा कल्क व कडू भोपळ्याच्या फळाचा रस ह्यांमध्यें मोहरीचें तेल पचन करावें. ह्याचें नस्य केलें असतां फार दिवसाच्या गालगुंडाचा नाश होतो.

वेधाची क्रिया.

जिह्वाधः पार्श्वयोर्मूलाच्छिरा द्वादश कीर्तिताः ।
तासां स्थूले शिरे द्वे च छिन्द्यात्ते च शनैः शनैः ॥ १ ॥
बडिशेनैव संगृह्य कुशपत्रेण बुद्धिमान् ।
स्रुते रक्ते व्रणे तस्मिन्दद्यात्सगुडमार्द्रकम् ॥ २ ॥
भोजनं चानभिष्यन्दि यूषः कौलत्थ इष्यते ।
यवमुद्गपटोलादि कटुरूक्षं तु भोजनम् ।
छर्दिं च रक्तमुक्तिं च गलगण्डे प्रयोजयेत् ॥ ३ ॥

जिभेच्या खालीं मुळाच्या दोन्ही बाजूंस बारा बारा शिरा आहेत. त्यांपैकीं ज्या दोन मोठ्या शिरा, त्या बडिशानें (गळानें) ओढून धरून कुशपत्र नांवाच्या शस्त्रानें हळूहळू छेदाव्या. त्यांतून रक्त गेल्यावर त्याजवर आलें व गूळ ह्यांची लुगदी बसवावी. अनभिष्यंदी (ज्यापासून स्राव होत नाहीं असें) अन्न खावें व हुलग्याचें कढण प्यावें. तें प्रशस्त आहे. सातू, मूग, पडवळ, वगैरे तिखट व कडू पदार्थ यांनीं युक्त असें भोजन करावें. गालगुंडावर वमन व रक्तमोक्ष ह्यांची योजना करावी.

गंडमाला व अपची ह्यांची चिकित्सा.

ब्रह्मदण्डीयमूलं तु पिष्टं तण्डुलवारिणा ।
स्फुटितां हन्ति लेपेन गण्डमालां न संशयः ॥ १ ॥

उटकटारीचें मूळ तांदळाच्या धुवणांत उगाळून लावावें, म्हणजे फुटलेल्या गंडमाळांचा नाश होतो, ह्यांत संशय नाहीं.

निजद्रवेण संपिष्टं मुण्डीमूलं प्रलेपयेत् ।
गण्डमाला क्षयं याति तद्रवं च पिबेत्पलम् ॥ २ ॥

मुंडीचें मूळ तिच्याच रसांत उगाळून त्याचा लेप करावा आणि तिचाच रस चार तोळेपर्यंत प्यावा, म्हणजे गंडमालेचा क्षय होतो.

काञ्चनारत्वचः क्काथः शुण्ठीचूर्णेन नाशयेत् ।
गण्डमालां तथा क्काथः क्षौद्रेण वरुणत्वचः ॥ ३ ॥

कांचनाच्या सालीचा काढा सुंठीचें चूर्ण घालून प्यावा; किंवा वायवर्ण्याच्या सालीचा काढा मध घालून प्यावा. तो गंडमालेचा नाश करतो.

जलेन पेषयेत्तुल्यं काञ्चनीचित्रकं विषम् ।
सप्ताहं लेपयेद्यस्य यदि स्याद्गण्डमालिका ॥
स्फुटन्ती नात्र संदेहो स्फोटे लेपमिमं कुरु ॥ ४ ॥

कांचनाची साल, चित्रकमूळ व बचनाग, हीं औषधें पाण्यामध्यें समान उगाळून, गंडमाला झाल्या असल्यास त्यांना सात दिवस लेप करावा. म्हणजे त्या फुटतात, ह्यांत संशय नाहीं. त्या फुटल्यावर त्यांजवर खालील लेप करावा.

आरग्वधशिफां पिष्ट्वा सम्यक्तण्डुलवारिणा ।

तेन नस्यप्रलेपाभ्यां गण्डमालां समुद्धरेत् ॥ ५ ॥

वाहव्याचे मूळाचें चूर्ण करून तांदुळाच्या धुवणांत कालवून त्याचा लेप करावा, व त्याचेंच नस्य करावें; म्हणजे गंडमालांचा नाश होतो.

त्रिफळादि गुग्गुळ.

षट्पलं त्रिकटु ज्ञेयं त्रिफलाऽत्र पलद्वयम् ।
काञ्चनारत्वचाचूर्णं योजयेद् द्वादशं पलम् ॥ १ ॥
गुग्गुलुः सर्वतुल्यः स्यात्सर्वमेकत्र कुट्टयेत् ।
क्षौद्रं पलशतं देयं गुटिकां कर्षसंमिताम् ।
भक्षयेद्गण्डमालार्तो गलग्रन्थिं च नाशयेत् ॥ २ ॥

चोवीस तोळे सुंठ, मिरें, पिंपळीचें चूर्ण; हिरडा, बेहडा, आंवळकाठीचें चूर्ण आठ तोळे; कांचनाच्या सालीचें चूर्ण अठ्ठेचाळीस तोळे; व गुग्गुळ सर्वांच्या बरोबर घालून एक एक तोळ्याची गोळी करावी; आणि ती गंडमाळा झालेल्या रोग्यानें भक्षण करावी. म्हणजे गंडमालांचा नाश होतो.

कांचनार गुग्गुल.

पलानां दशकं ग्राह्यं काञ्चनारत्वचो बुधैः ।
षट्पला त्रिफला ग्राह्या व्योषं ग्राह्यं पलत्रयम् ॥ १ ॥
पलैकं वरुणस्यापि त्वगेलापत्रकं तथा ।
कर्षकर्षमितं ग्राह्यं सर्वाण्येकत्र चूर्णयेत् ॥ २ ॥
सर्वं चूर्णमिदं यावत्तावन्मात्रस्तु गुग्गुलुः ।
संमर्द्य गुटिकाः कार्याः शाणमात्रास्ततो बुधः ॥ ३ ॥
एकैकां भक्षयेत्प्रातर्बुद्धिमांश्च सदा नरः ।
गण्डमालां जयेदुग्रामपचीमर्बुदानि च ॥ ४ ॥
ग्रन्थीन्व्रणां सगुल्मांश्च कुष्ठानि च भगंदरम् ।
अनुपाने प्रयोक्तव्यः क्वाथो मुण्डीसमुद्भवः ।
क्वाथो वा खदिरस्याथ पथ्याक्वाथोऽथ चाल्पकः ॥ ५ ॥

कांचनाची साल चाळीस तोळे; हिरडा, बेहडा, आंवळकाठी, चोवीस तोळे; सुंठ, मिरें, पिंपळी, प्रत्येकीं चार चार तोळे; वायवरणाची साल चार तोळे; व दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, हीं औषधें एक एक तोळा या सर्वांचें चूर्ण करावें. आणि त्या चूर्णाच्या बरोबरीनें त्यांत गुग्गुळ घालून खलून तीन

तीन माशांची गोळी करावी; आणि सकाळीं एक एक खावी. म्हणजे उग्र गंडमाला, अपची, व अर्बुदें यांचा नाश होतो. गांठी, गुल्म, कुष्ठ, व भगंदर यांचा नाश होतो. याला अनुपानाकरितां थोडासा मुंडीचा, व खैराचा अथवा हिरड्याचा काढा द्यावा.

अजमोदादि तेल.

अजमोदा च सिन्दूरं हरितालं निशाद्वयम् ।
क्षारद्वयं फेनयुतं सार्धकं सरलोद्भवम् ॥ १ ॥
इन्द्रवारुण्यपामार्गकदलीकन्दकैः समैः ।
एभिः सार्षपकं तैलमजामूत्राष्टयोजितम् ॥ २ ॥
मृद्वग्नौ पाचयेदेतत्स्नुह्यर्कक्षीरसंयुतम् ।
अजमोदादिकं तैलं गण्डमालां व्यपोहति ॥ ३ ॥
आमां विदग्ध्वा तु पचेत्पक्वां चैव विशोधयेत् ।
रोपणं मृदुभावं च तैलेनानेन कारयेत् ॥ ४ ॥

अजमोदा, शेंदूर, हरताळ, हळद, दारुहळद, जवखार, साजिखार, समुद्रफेस, दवणा, विशेष धूप (सुरूचा डीक), कडु इंद्रावणीचें मूळ, आघाड्याचें मूळ व केळीचा कांदा, यांचा कल्क करून त्यांत शिरसाचें तेल, आठपट शेळीचें मूत आणि रुईचा व त्रिधारी निवडुंगाचा चीक घालून पचन करावें. हें अजमोदादि तेल गंडमालेचा नाश करितें. अपक्व किंवा अर्धवट अशा गंडमालेच्या गांठींना हें पिकवितें, पिकलेल्यांचें शोधन करतें. गंडमालेचे व्रण भरून आणणें व त्यांना मृदुत्व आणणें या क्रिया या तेलानें कराव्या.

निर्गुंडीतेल.

निर्गुण्डीस्वरसेनाथ लाङ्गलीमूलकल्कितम् ।
तैलं नस्येन हन्त्याशु गण्डमालां सुदुस्तराम् ॥ १ ॥

निर्गुंडीचा रस व कळलावीचा कल्क ह्यानें सिद्ध केलेल्या तेलानें नस्य करावें. तें दुस्तर गंडमालांचा त्वरित नाश करितें.

चिचुंद्रीतेल.

छुच्छुन्दर्या विपक्वं तु क्षणात्तैलवरं ध्रुवम् ।
अभ्यङ्गान्नाशयेन्नृणां गण्डमालां सुदारुणाम् ॥ १ ॥

चिचुंदरीच्या योगानें तेल पचन करावें. त्याच्या अभ्यंगानें

दुस्तर गंडमाळांचा नाश होतो.

गुंजातेल.

गुञ्जामूलफलैस्तैलं तोयद्विगुणितं पचेत् ।
तस्याभ्यङ्गेन शमयेद्गण्डमालां सुदारुणाम् ॥ १ ॥

गुंजेचें मूळ व फळें ह्यांचा कल्क व दुप्पट पाणी घालून तेल सिद्ध करावें. तें लावलें असतां दुस्तर गंडमाळा दूर होतात.

गंधकादि योग.

गन्धकं टङ्कणं सिन्धुकाञ्चनीनवसारकम् ।
सौवर्चलं यवक्षारं काचं रक्तं सुवर्चलम् ॥ १ ॥
सितं रक्तं च पाषाणं मूषकोत्थं नियोजयेत् ।
जेपालबीजमज्जा च सर्वं जम्बीरपीडितम् ॥ २ ॥
शस्त्रैश्छित्त्वा प्रदातव्यं वेष्टयमेरण्डपत्रकैः ।
एवं त्र्यहात्स्फुटन्त्यत्र दध्यन्नं बन्धयेत्ततः ॥ ३ ॥
गण्डमालाग्रन्थ्यपच्यो बहिर्निर्यान्ति नान्यथा ।

शुद्ध गंधक, टाकणखाराची लाही, सेंधेलोण, हळद, नवसागर, पादेलोण, जवखार, कांच, हिंगूळ, सज्जिखार, पांढरा व तांबडा सोमल आणि जैपाळाच्या बियांतील मगज, ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा. नंतर गंडमाळावर फासणी टाकून त्यांत तें औषध भरावें आणि तीन दिवसपर्यंत एरंडाचें पान बांधून ठेवावें. ह्याप्रमाणें केलें असतां गंडमाळा फुटतात. त्या फुटल्यावर त्याजवर दहीभात बांधावा. ह्यानें गंडमाळा, गांठी व अपची बाहेर पडतात.

अभिमन्त्र्य सिते सायं रवौ प्रातः समाहरेत् ॥ ४ ॥
पेटारीमूलकं धूपैर्धूपयित्वाऽथ खण्डयेत् ।
चतुर्दशगुणैः सूत्रैर्बद्ध्वा ग्रन्थिं गले स्थितम् ॥ ५ ॥

शुद्ध पक्षांतील शनिवारीं संध्याकाळीं आमंत्रण करून (अक्षत टाकून) रविवारीं प्रातःकाळीं (सूर्योदयाच्यापूर्वी) पेटारीचें (करंडीचें मूळ) पुढील मंत्रपूर्वक आणून त्याला धूप दाखवून त्याचे तुकडे करावे; आणि चौदा पदराच्या सुतांत ते तुकडे गाठवून गळ्यांत बांधावे.

मंत्र.

ॐ गुडं प्रसाहि तिरि तिरि चित्रपुटकभुगनाङ्गते
पापटगालापरदशमूलवासुकालदेपालरेदं गुरुप्रसादात् ।

ह्या वरील मंत्रानें धूप द्यावा.

गंधकादि लेप.

गन्धकं सूतकं तुल्यमर्कक्षीरं ससैन्धवम् ।
पिष्ट्वा च काञ्चनीमूलं लेपोऽयं गण्डमालिके ॥ १ ॥

गंधक व पारा समभाग व रुईचा चीक, सैंधेलोण व हळकुंड ह्यांचा गंडमाळेवर लेप करावा.

जेपालपत्रवटी.

पिष्ट्वा जेपालपत्राणि स्वरसेन ततो वटी ।
छायाशुष्का ततो लेपाद्गण्डमाला विनश्यति ॥ १ ॥

जेपाळाचीं पानें त्याच्याच रसांत वाटून गोळ्या कराव्या आणि सावलींत वाळवाव्या. ह्या गोळीचा लेप केला असतां गंडमाळांचा नाश होतो.

भल्लातकादि लेप.

भल्लातकासीसहुताशदन्तीमूलं गुडस्नुग्रविदुग्धदिग्धैः ।
लेपान्वितैर्गच्छति गण्डमाला समीरवेगादिव मेघमाला ॥१॥

बिब्बे, हिराकस, चित्रकमूळ, दांतीमूळ, गूळ, त्रिधारी निवडुंगाचा चीक व रुईचा चीक, ह्यांचा एकत्र खल करून त्यांचा गंडमाळेवर लेप करावा. म्हणजे वाऱ्यानें जशी मेघमाळा नाहींशी होते, तशा गंडमाळा नाहींशा होतात.

गंडमालाकंडनरस.

कर्षसूतं शुद्धमस्य गन्धकं त्वर्धमुत्तमम् ।
सार्धकर्षं ताम्रभस्म मृतं किट्टं त्रिकर्षकम् ॥ १ ॥
व्योषं षट्कर्षतुलितमक्षार्धं सैन्धवं सितम् ।
काञ्चनारत्वचश्चूर्णं पलत्रयमितं क्षिपेत् ॥ २ ॥
पलत्रयं गुग्गुलोश्च शुद्धस्य समुपाहरेत् ।
एतद्युक्त्या तु संमेल्य दृढं सुरभिसर्पिषा ॥ ३ ॥
गण्डमालाकण्डनोऽयं रसो माषत्रयात्मकः ।
मुक्तो निहन्ति गण्डानि गण्डमालां च दारुणाम् ॥ ४ ॥

शुद्ध पारा एक तोळा, शुद्ध गंधक अर्धा तोळा, दीड तोळा ताम्रभस्म, तीन तोळे मंडूरभस्म, सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण सहा तोळे, सैंधव अर्धा तोळा, कांचनाच्या सालीचें चूर्ण बारा तोळे, व गुग्गुळ बारा तोळे, ह्याचा युक्तीनें एकत्र खल करून तीन माशांची गोळी करून गाईच्या तुपांतून घ्यावी. म्हणजे दारुण गंडमाळा व गांठी ह्यांचा नाश होतो.

अपचीचिकित्सा.

अलम्बुषायाः स्वरसः पीतो द्विपलमात्रया।
अपचीगण्डमालानां कामलायाश्च नाशनः ॥ १ ॥
नवकार्पासिकामूलं तण्डुलैः सह योजितम्।
पक्त्वा च पोलिकां खादेदपचीनाशनाय च ॥ २ ॥

लाजाळूचा रस आठ तोळे प्राशन करावा. तो अपची, गंडमाला व कामला ह्यांचा नाश करतो. कापशीचें नवें मूळ व तांदूळ ह्यांचें पीठ करून त्याची भाकर करून ती अपचीचा नाश होण्याकारितां खावी.

सौभांजनं देवदारु कांजिकेन तु पेषितम्।
कोष्णं प्रलेपतो हन्यादपचीमतिदुस्तराम् ॥ ३ ॥

शेवग्याची साल, देवदार, ह्यांचा कांजींतून कोमटसा लेप करावा. तो दुस्तर अपचीचा नाश करतो.

सर्षपारिष्टपत्राणि दन्त्या भल्लातकैः सह।
छागमूत्रेण संपिष्टमपचीघ्नं विलेपनम् ॥ ४ ॥

मोहऱ्या, लिंबाचीं पानें, दांतीमूळ, बिब्बे ह्यांचा शेळीच्या मूतांतून लेप करावा; तो अपचीचा नाशक आहे.

अश्वत्थकाष्ठनिचुलं गवां दन्तं च दाहयेत्।
वराहमज्जसंयुक्तं भस्म हन्त्यपचीव्रणान् ॥ ५ ॥

पिंपळाचें लाकूड, लिंबाचें लाकूड व गाईचा दांत ह्यांची राख करून ती डुकराच्या चर्बीतून लावावी; ती अपचीच्या व्रणाचा नाश करिते.

मणिबन्धोपरिष्टाद्वा कुर्याद्रेषात्रयं भिषक्।
अंगुलान्तरितं सम्यगपचीविनिवृत्तये ॥ ६ ॥

अपचीचा नाश होण्याकरितां मनगटाच्या वर एकएक बोटाच्या अंतरानें तीन रेषा (बिब्याच्या तेलानें) काढाव्या.

चंदनादि तेल.

चन्दनं साभया लाक्षा वचा कटुकरोहिणी ।
एतत्तैलं श्रृतं पीतं समूलामपचीं जयेत् ॥ १ ॥

चंदन, हिरडेदळ, लाख, वेखंड व कुटकी ह्यांच्या कल्कानें व काढ्यानें तेल पचन करावें व तें प्यावें; तें मुळासकट अपचीचा नाश करितें.

व्योषादि तेल.

व्योषं विडङ्गं मधुकं सैन्धवं देवदारु च ।
तैलमेभिः श्रृतं नस्यात्कृच्छ्रामप्यपचीं जयेत् ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, जेष्टमध, सैंधेलोण व देवदार ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें आणि त्याचें नस्य करावें. तें अपचीला जिंकतें.

ग्रंथिचिकित्सा.

ग्रन्थिष्वामेषु कुर्वीत भिषक्शोथप्रतिक्रियाम् ।
पक्कानापाट्य संशोध्य रोपयेद्व्रणभेषजैः ॥ १ ॥

अपक्क ग्रंथीवर (गांठीवर) सुजेवरील चिकित्सा करावी. पक्क झालेल्या गांठी फोडून त्यांचें शोधन करावें व व्रणरोपक औषधांनीं त्या भरून आणाव्या.

हिंस्रा सरोहिण्यमृताऽथ भार्गी स्योनाकबिल्वागुरुकृष्णगन्धाः ।
गोमूत्रपिष्टाः सह तालपत्र्या ग्रन्थौ विधेयोऽनिलजे प्रलेपः ॥ २ ॥

जटामांसी, कुटकी, गुळवेल, भारंगमूळ, टेंटुमूळ, बेलमूळ, अगर, शेवग्याची साल व उंदीरकानी ह्यांचा गोमूत्रांत वाटून वातजन्य गांठीवर लेप करावा.

जलायुकाः पित्तकृते हिताः स्युः क्षीरोदकाभ्यां परिषेचनं च ।
द्राक्षारसेनेक्षुरसेन चापि चूर्णं पिबेद्वाऽपि हरीतकीनाम् ॥ ३ ॥

पित्तजन्य गांठीवर जळवा लावाव्या; त्या हितकारक आहेत. आणि दूध व पाणी त्याजवर शिंपावें. किंवा द्राक्षाच्या रसांतून किंवा उंसाच्या रसांतून बाळहिरड्यांचें चूर्ण घ्यावें.

मधूकजम्ब्वर्जुनवेतसानां त्वग्भिः प्रदेहानवचारयेच्च ।
हृतेषु दोषेषु यथानुपूर्वं ग्रन्थेर्भिषक्श्लेष्मसमुत्थितेषु ॥ ४ ॥

मोहाची साल, जांभळीची साल, अर्जुनसादड्याची साल आणि वेताची साल ह्यांचा लेप कफजन्य गाठीवर करावा; किंवा कफजन्य गांठींतील दोष (जळवा वगैरेंनीं) काढून टाकून पूर्वी सांगितल्या-प्रमाणें (शोधन-रोपणादि) उपचार करावे.

अमर्मजातं शमप्रयातं तत्पक्वमेवापहरेद्विचार्य ।
देहस्थिते वासासि सिद्धकर्म सद्यः क्षतोक्तं च विधिं विदध्यात् ५

मर्म सोडून झालेली गांठ बरी झाली नाहीं तर ती पक्व झाल्या-वर विचार करून फोडून काढावी, आणि ताबडतोब व्रणावरील चिकित्सा करावी.

शस्त्रेण चोत्कृत्य सुपक्वमाशु प्रक्षालयत्पथ्यतमैः कषायैः ।
संशोधनैस्तं च विशोधयेत्तु क्षारोत्तरैः क्षौद्रघृतप्रगाढैः ॥ ६ ॥
सिञ्चेच्च तैलं त्वपचारणीयं विडङ्गपाठारजनीविपक्वम् ।

पक्व झालेली गांठ शस्त्रानें फोडून हितकारक अशा औषधांच्या काढ्यानें धुवावी; व तूप, मध, क्षार वगैरे घातलेल्या शोधक औष-धांनीं तिचें शोधन करावें. आणि वावडिंग, पहाडमूळ व हळद ह्यांनीं सिद्ध केलेल्या अपचारण तेलानें सिंचन करावें.

मेदःसमुत्थे तिलकल्कदिग्धेः कृत्वोपरिष्टाद्द्विगुणं पटान्तम् ॥७॥
हुताशतप्तेन मुहुः प्रमृज्याल्लोहेन धीमान्न च वर्धिताय ।
प्रलिप्तदर्व्या त्वथ लाक्षया वा प्रतप्तयाऽऽश्च्योतनमस्य कार्यम्८
निपात्य वा शस्त्रमपोह्य मेदो दहेत्सुपक्वं त्वथ वा विदार्य ।
प्रक्षाल्य मूत्रेण तिलैः सुपिष्टैः सुवर्चलाढ्यैर्हरितालमिश्रैः ॥ ९ ॥
ससैन्धवैः क्षौद्रघृतप्रगाढैः क्षारोत्तरैरेनमभिप्रशोध्य ।
तैलं विदध्याद्विकरञ्जगुञ्जावंशावलेख्विगुदमूत्रसिद्धम् ॥ १० ॥

मेदापासून झालेल्या गांठीवर तिळाच्या कल्काची वडी ठेवून त्याजवर फडकें बांधावें. मोठ्या झालेल्या गांठीवर अग्नीवर ताप-विलेल्या लोखंडाच्या सळीनें वरचेवर डागावें किंवा पळीला लाख लावून ती तापवून तिचे थेंब गाठीवर पाडावे. अथवा शस्त्रानें छेदन करून त्यांतील मेद काढून टाकावा, आणि डाग द्यावा. किंवा गाठ पिकली असल्यास फोडून डाग द्यावा; फुटलेल्या

गाठीची जखम गोमूत्रानें धुवून काढून तिळाचा कल्क, सज्जिखार, हरताळ, सैंधेलोण, मध, तूप व जवखार हीं औषधें एकत्र करून त्याचें मलम करावें व त्यानें शोधन करावें. आणि करंज, चोपडा करंज, गुंजा, वंशलोचन, तिरकांडें व हिंगण्यांतील मगज, ह्यांचा कल्क व गोमूत्र ह्यांमध्यें तिळाचें तेल सिद्ध करून त्याची पट्टी द्यावी; (असें राजमार्तंडांत सांगितलें आहे.)

विष्णुक्रान्ता च पेटारी काञ्जिकेन सुपेषिता।
कालस्फोटं हरेल्लेपाद् दुष्टग्रन्थिषु का कथा॥ १॥

विष्णुकांत व करंडीचें मूळ दोन्ही कांजींत वाटून त्यांचा लेप करावा म्हणजे काळपुळीही जाते. मग अन्य ग्रंथींची कथा काय?

पुत्रजीवस्य मज्जानं जले पिष्ट्वा प्रलेपयेत्।
कालस्फोटं विषस्फोटं सद्यो हन्यात्सवेदनम्॥ २॥
कक्षाग्रन्थिं कर्णग्रन्थिं गलग्रन्थिं च नाशयेत्।
राजिकालशुनं पेष्यं लेपो हृद्गलगन्थिकाः।
गन्धोऽर्कदुग्धतालेन जेपालेन च नाशयेत्॥ १॥

पुत्रवंतीचें बीं पाण्यांत वाटून त्याचा लेप करावा; म्हणजे काळपुळी, विषारी फोड व त्यांच्या वेदना ह्यांसह त्यांचा नाश होतो. हा लेप काखेंतील गाठ (काखमांजरी), गळ्याला होणारी गाठ (गंडमाळा) व कानाजवळ होणारी गाठ ह्यांचा नाश करतो. मोहऱ्या व लसूण वाटून त्याचा लेप करावा; तो गंडमाळांचा नाश करतो. गंधक, रुईचा चीक, हरताळ व जेपाळ ह्यांचा लेप करावा, म्हणजे गाठींचा नाश होतो.

अर्बुद--(अवाळूची) चिकित्सा.

ग्रन्थ्यर्बुदानां न यतो विशेषः प्रदेशहेत्वाकृतिदोषदूष्यैः।
ततश्चिकित्सेद्भिषगर्बुदानि विधानविद्ग्रन्थिचिकित्सितेन॥ १॥

गांठी व अर्बुदें ह्यांचीं स्थानें, कारणें, आकार, दोष व दूष्यें हीं एकच आहेत; त्यांत ज्या अर्थीं विशेष भेद नाहीं, त्या अर्थीं त्यांजवर ग्रंथीचीच चिकित्सा करावी.

वातार्बुदं क्षीरघृताम्लसिद्धैरुष्णैः सतैलैरुपनाहयेत्तु।
कुर्याच्च मुख्यान्युपनाहनानि सिद्धैश्च मांसैरथ वेसवारैः॥ २॥

वातार्बुदावर दूध, तूप, आंबट व उष्ण पदार्थ ह्यांनीं तयार केलेल्या पोटिसानें शेकावें. मुख्यतः मांस व वेसवार (मसाला) ह्यांनीं तयार केलेलीं पोटिसें बांधावीं.

स्वेदं विदध्यात्कुशलश्च नाड्या शृङ्गेण रक्तं बहुशो हरेच्च ।
वातघ्ननिर्यूहपयोम्लभागैः सिद्धां शताह्वां त्रिवृतां पिबेद्वा ॥ ३ ॥

नाडिकास्वेद करावा. बहुधा तुंबडी लावून रक्त काढावें. वातनाशक काढे, दूध व अम्ल रस ह्यांतून बडिशेप किंवा निशोत्तर ह्यांचें चूर्ण द्यावें.

स्नेहोपनाहा मृदवस्तु पथ्याः पित्तार्बुदे क्राथविरेचनं च ।
विकृष्य सौदुम्बरशाकगोजीपत्रैर्भृशं क्षौद्रयुतैः प्रलिम्पेत् ॥ ४ ॥

पित्तजन्य अर्बुदावर मृदु तेलें व पोटिसें बांधावीं; आणि मृदुकाढे व विरेचनें द्यावीं. त्यांचें कर्षण करून (खरडून) त्याजवर उंबराचीं पानें व पाथरीचीं पानें वाटून त्यांत मध घालून त्याचा लेप द्यावा.

शुद्धस्य जन्तोः कफजेऽर्बुदे च रक्ते च सिक्ते स्रवतोऽर्बुदं यत् ।
मेदःकृते मांसकृतेऽपि कार्यं व्रणोदितं सर्वचिकित्सितं च ॥ ५ ॥

कफजन्य, रक्तजन्य, व मांसजन्य अर्बुदांतील रक्त काढून रोग्याला वमन व विरेचन देऊन शुद्ध करून व्रणावरील सर्व उपचार करावे, असें राजमार्तंडांत म्हटलें आहे.

लिप्तं यवक्षारविडङ्गबीजं गन्धोपलैः स्यान्मसृणीकृतैर्यत् ।
रक्तेन मिश्रैः सरठस्य सद्यस्तदर्बुदं शाम्यति नान्यथैतत् ॥ १ ॥

जवखार, वावडिंग व गंधक हे जिन्नस सरड्याच्या रक्तांत लोण्यासारखे बारीक खलून त्यांचा अर्बुदावर लेप करावा; म्हणजे तें त्वरित शमतें.

उपोदकरसाभ्यक्ता तत्पत्रपरिवेष्टिता ।
प्रणश्यत्यचिरान्नृणां पिटिकार्बुदजातयः ॥ २ ॥

मयाळीचा रस लावून वर तिच्याच पानानें वेष्टण करावें, म्हणजे अर्बुदाच्या जातीच्या पुळ्या लवकरच नाश पावतात.

उपोदिका काञ्जिकतक्रपिष्टा तयोपनाहो लवणेन सार्धम् ।
दष्टोऽर्बुदानां प्रशमाय कैश्चिद्दिने दिने रात्रिषु मर्मजानाम् ॥ ३ ॥

मर्मस्थानीं झालेल्या आवाळूवर तें बरें होण्याकारितां मयाळ कांजींत किंवा ताकांत वाटून त्यांत मीठ घालून तिचें पोटीस करून कांहीं दिवस व रात्रीं बांधिलेलें पाहिलें आहे.

गन्धशिलाविश्वौषधविडङ्गनागभस्मभिः समैश्चूर्णम् ।
कृकलासरक्तयुक्तं लेपात्सद्योऽर्बुदध्वंसि ॥ ४ ॥

गंधक, मनशीळ, सुंठ, वावडिंग, नागभस्म ह्यांचें समभाग चूर्ण सरड्याच्या रक्तांत खलून लेप करावा; तो तत्काळ आवाळूचा नाश करितो.

स्नुहीगण्डीरिकास्वेदो नाशयेदर्बुदानि च ।
लवणेनाथ वा स्वेदः सीसकेन तथैव च ॥ ५ ॥

त्रिधारी निवडुंगाचें कांडें उकडून त्यानें शेकावें. तो आवाळूचा नाश करतो. तसेंच मिठाच्या पुरचुंडीनें अथवा शिसें तापवून त्यानें स्वेदन करावें (शेकावें).

हरिद्रालोध्रपत्तङ्गगुडधूमो मनःशिला ।
मधुप्रगाढो लेपोऽयं मेदोर्बुदहरः परः ॥
एतामेव क्रियां कुर्यादशेषे शर्करार्बुदे ॥ ६ ॥

हळद, लोध्र, पतंग, गूळ, घरोसा व मनशीळ ह्यांचा मधांतून लेप करावा; तो मेदोजन्य अर्बुदाचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे. हीच क्रिया सर्व प्रकारच्या शर्करार्बुदांवरही करावी.

पथ्यापथ्य.

पुराणघृतपानं च जीर्णलोहितशालयः ।
यवा मुद्गाः पटोलं च रक्तशिग्रुः कटिल्लकम् ॥ १ ॥
शालिं च शाकं वेत्राग्रं रूक्षाणि च कटूनि च ।
दीपनानि च सर्वाणि गुग्गुलुश्च शिलाजतु ॥ २ ॥
गलगण्डे गण्डमालापचीग्रन्थ्यर्बुदान्तरे ।
यथादोषं यथावस्थं पथ्यमेतत्प्रकीर्तितम् ॥ ३ ॥

जुनें तूप पिणें, जुनी तामसाळ, सातू, मूग, पडवळ, तांबडा शेवगा, कर्टोली, शालिंच नांवाची शाक, वेताचे कोंब, रूक्ष व तिखट पदार्थ, सर्व अग्निदीपक पदार्थ, गुग्गुळ, शिलाजित हे जिन्नस दोषानुरूप व अवस्थानुरूप गालगुंड, गंडमाळा, अपची, ग्रंथी, व अर्बुद ह्यांजवर पथ्याला द्यावे.

दुग्धेक्षुविकृतीः सर्वा मांसं चानूपसंभवम् ।
पिष्टान्नमम्लं मधुरं गुर्वभिष्यन्दकारि च ॥ ४ ॥
गलगण्डं गण्डमालापचीग्रन्थ्यर्बुदामयान् ।
चिकित्सन्नगदंकारो यशोऽर्थी परिवर्जयेत् ॥ ५ ॥

दूध, काकवी, गूळ वगैरे उंसाचे पदार्थ, अनूप देशांतील मांस, पिठाचें अन्न, आंबट व मधुर पदार्थ, जड व अभिष्यंदी पदार्थ, हे पदार्थ गालगुंड, गंडमाळा, अपची, ग्रंथी व अर्बुद ह्या रोगांवर यश इच्छिणाऱ्या वैद्यानें देऊं नयेत.

श्लीपदाचें निदान.

मेदोमांसाश्रयं शोफं पादयोः श्लीपदं वदेत् ।
स्वलिंगदर्शिभिर्दोषैस्त्रेधा स्याच्च कफोत्तरम् ॥ १ ॥

मेद व मांस ह्यांच्या आश्रयानें पायाला जी सूज येते, तिला श्लीपद म्हणतात. हें कफप्रधान अशा त्या त्या दोषांच्या लक्षणानुसार तीन प्रकारचें आहे.

त्याची संप्राप्ति.

यः सज्वरो वंक्षणजो भृशार्तिः शोफो नृणां पादगतः क्रमेण ।
तच्छ्लीपदं स्यात्करकर्णनेत्रशिश्नोष्ठनासास्वपि केचिदाहुः ॥२॥

ज्वर व अत्यंत पीडायुक्त अशी जी सूज अंडसंधींमध्यें होऊन क्रमानें पायाकडे जाते, तिला श्लीपद (वारुळ) असें म्हणतात. हें हात, कान, डोळे, शिश्न, ओठ व नाक ह्या ठिकाणीं देखील होते, असें कित्येक म्हणतात.

वातजन्य श्लीपदाचें लक्षण.

वातजं कृष्णरूक्षं तु स्फुटितं तीव्रवेदनम् ।
अनिमित्तरुजं तस्य बहुशो ज्वर एव च ॥ ३ ॥

वातजन्य श्लीपद काळसर, रुक्ष, चिरा पडलेलें, तीव्र वेदनांनीं युक्त, कारणावांचून दुखणारें व बहुधा ज्वरयुक्त असें असतें.

पित्तजन्य श्लीपदलक्षण.

पित्तजं पीतसंकाशं दाहज्वरयुतं मृदु ॥

पित्तजन्य श्लीपद पिवळें, दाह व ज्वरयुक्त आणि मऊ असतें.

कफजन्य श्लीपदलक्षण.

श्लैष्मिकं स्निग्धवर्णं च श्वेतं पाण्डु गुरु स्थिरम् ॥ ४ ॥

कफजन्य श्लीपद तुळतुळीत, पांढुरकें किंवा पिवळट रंगाचें जड व स्थिर असतें.

ह्याचें असाध्य लक्षण.

वल्मीकमिव संजातं कण्टकैरिव संचितम् ॥
सर्वात्मकं महत्तच्च वर्जनीयं विशेषतः ॥ ५ ॥

जें श्लीपद वारुळाप्रमाणें पुष्कळ वाढलेलें, कांट्यांनीं व्यापलेलें, एक वर्षाहून जास्त दिवसांचें आणि जें फार मोठें असतें तें असाध्य म्हणून सोडून द्यावें.

श्लीपदांत कफाचें प्राधान्य.

त्रीण्येतानि विजानीयाच्छ्लीपदानि कफोच्छ्रयात् ॥
गुरुत्वं च महत्त्वं च यस्मान्नास्ति कफाद्विना ॥ ६ ॥

ह्या तिन्हींही श्लीपदांमध्यें कफाचें आधिक्य फार असतें; कारण जडत्व व महत्त्व हे गुण कफावांचून नसतात.

श्लीपद होण्याला कारण.

पुराणोदकभूयिष्ठाः सर्वर्तुषु च शीतलाः ॥
ये देशास्तेषु जायन्ते श्लीपदानि विशेषतः ॥ ७ ॥

ज्या ठिकाणीं पावसाचें पाणी फार दिवस सांचून राहातें व सर्व ऋतूंमध्यें हवा थंड असते अशा देशांत विशेषतः श्लीपदें होतात.

असाध्य लक्षण.

यच्छ्लेष्मलाहारविहारजातं पुंसः प्रकृत्या च कफात्मकस्य ॥
सस्रावमत्युन्नतसर्वलिङ्गं सकण्डुरं श्लेष्मयुतं विवर्ज्यम् ॥ ८ ॥

जें श्लीपद कफप्रकृतीच्या मनुष्याला कफकारक आहारविहारांपासून होतें, तसेंच जें कफाधिक्यानें होतें, जें स्रावी व कंडुयुक्त असून अतिशय उंच वाढलेलें असतें व सर्व लक्षणांनीं युक्त असतें तें असाध्य म्हणून सोडावें.

श्लीपदाची चिकित्सा.

लंघनालेपनस्वेदरेचनै रक्तसेचनैः ॥
प्रायः श्लेष्महरैरुष्णैः श्लीपदं समुपाचरेत् ॥ १ ॥

लंघन, लेप, स्वेदन, रेचन, रक्त काढणें, हे उपचार व प्रायः

कफनाशक व उष्ण अशा क्रियांनीं श्लीपदाची चिकित्सा करावी.

स्नेहस्वेदोपनाहांश्च श्लीपदेऽनिलजे भिषक् ॥
कृत्वा गुल्फोपरि शिरां विध्येत्तु चतुरंगुले ॥ २ ॥

वातजन्य श्लीपदावर स्नेहनस्वेदन व पोटीस बांधणें ह्या क्रिया करून घोट्याच्या वर चार बोटांवर शीर तोडावी.

गुल्फस्याधः शिरां विध्येच्छ्लीपदे पित्तसंभवे ॥
पित्तघ्नीं च क्रियां कुर्यात्पित्तार्बुदविसर्पवत् ॥ ३ ॥

पित्तजन्य विसर्पावर घोट्याच्या खालीं शीर तोडावी; आणि पित्तनाशक व पित्तार्बुद व पित्तविसर्प ह्यांजवरील क्रिया करावी.

मञ्जिष्ठामधुकं रास्नामहिंस्रां सपुनर्नवाम् ॥
पिष्ट्वाऽऽरनालैर्लेपोऽयं पित्तश्लीपदशान्तये ॥

मंजिष्ट, जेष्ठमध, रास्ना, जटामांसी व वसूची मुळी हे जिन्नस कांजींत वाटून त्यांचा पित्तजन्य श्लीपद बरें होण्याकरितां लेप करावा.

शिरां सुविदितां विध्येदंगुष्ठे श्लेष्मश्लीपदे ॥ ४ ॥

कफजन्य श्लीपदावर शिरा जाणणाऱ्या वैद्यानें अंगठ्यामध्यें शीर तोडावी.

सिद्धार्थसौभाञ्जनदेवदारुविश्वौषधैर्मूत्रयुतैः प्रलेपयेत् ।
पुनर्नवानागरसर्षपाणां कल्केन वा काञ्जिकमिश्रितेन ॥ ५ ॥

मोहऱ्या, शेवग्याची साल, देवदार व सुंठ ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. किंवा घेटुळी, सुंठ व शिरस ह्यांचा कांजींतून लेप करावा.

धत्तूरैरण्डनिर्गुण्डीवर्षाभूशिग्रुसर्षपैः ॥
प्रलेपः श्लीपदं हन्ति चिरोत्थमपि दारुणम् ॥ ६ ॥

धोतऱ्याची मुळी, एरंडमूळ, निर्गुडीचें मूळ, वसूची मुळी, शेवग्याची साल व शिरस ह्यांचा लेप फार दिवसांच्या दारुण विसर्पाचा नाश करितो.

हितश्च लेपने नित्यं चित्रको देवदारु च ॥
सिद्धार्थशिग्रुकल्को वा सुखोष्णो मूत्रपेषितः ॥ ७ ॥

चित्रक व देवदार हीं औषधें नित्य लेप करण्याला हितकारक आहेत; किंवा मोहऱ्या व शेवग्याची साल ह्यांचा गोमूत्रांतून सुखोष्ण असा लेप करावा.

प्रपिबेद्वाऽऽभयाकल्कं मूत्रेणान्यतमेन वा ॥

पिबेदेवं गुडूचीं च नागरं भद्रदारु वा ॥ ८ ॥
पिबेत्सर्षपतैलेन श्लीपदानां निवृत्तये ॥
पूतीकरञ्जच्छदजं रसं वाऽपि यथाबलम् ॥ ९ ॥
अनेनैव विधानेन पुत्रजीवकजं रसम् ॥
प्रयुञ्जीत भिषक्प्राज्ञः कालसात्म्यविभागतः ॥ १० ॥
पलाशमूलस्वरसं पिबेद्वा तैलेन तुल्यं सितसर्षपाणाम् ।
मूत्रेण पथ्यामरदारुविश्वं सगुग्गुलु श्लीपदिभिर्निषेव्यम् ॥११॥

गोमूत्रांतुन किंवा दुसऱ्या योग्य अनुपानांतून हिरड्याचा कल्क घ्यावा. अथवा त्याचप्रमाणें गुळवेल, सुंठ, व देवदार ह्यांचा कल्क श्लीपदशांतीकारितां शिरसाच्या तेलांतून घ्यावा. अथवा घाणेऱ्या करंजाचा रस शक्तिमानाप्रमाणें प्यावा. ह्याच विधीनें पुत्रवंतीच्या पानाचा रस देशकालादिकांचा विचार करून द्यावा. किंवा पळसाच्या मुळाचा स्वरस पांढऱ्या शिरसाच्या समभाग तेलांतून प्यावा. श्लीपदाच्या रोग्यानें हिरडा, देवदार, सुंठ, व गुग्गुळ ह्यांचा कल्क गोमूत्रांतून घ्यावा.

वृद्धदारकचूर्णं वा मूत्रसौवीरकादिभिः ।
शीलितं श्लीपदं हन्ति कृच्छ्रं संवत्सरोषितम् ॥ १२ ॥

वरधारेचें चूर्ण गोमूत्र किंवा कांजी इत्यादिकांतून बरेच दिवस घेतलें असतां एक वर्ष होऊन गेलेल्या कष्टसाध्य श्लीपदाचाही नाश करितें.

पिप्पल्यादि चूर्ण.

पिप्पली त्रिफला दार्वी नागरं सपुनर्नवम् ।
भागैर्द्विपलिकैस्तेषां तत्समं वृद्धदारकम् ॥ १ ॥
काञ्जिकेन तु तच्चूर्णं पिबेत्कर्षप्रमाणतः ।
जीर्णे वा परिहीनं स्याद्भोजनं सर्वकामिकम् ॥ २ ॥
श्लीपदं वातरोगांश्च प्लीहगुल्ममरोचकम् ।
अग्निं च कुरुते घोरं भस्मकं च प्रयच्छति ॥ ३ ॥

पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, दारूहळद, सुंठ, वसूची मुळी, हीं औषधें आठ आठ तोळे व त्या सर्वांच्या बरोबर वरधारा ह्यांचें चूर्ण करून तें एक तोळा प्रमाण कांजींतून घ्यावें. तें जिरल्यावर किंवा थकवा आलासें वाटल्यास इच्छेनुरूप भोजन करावें. म्ह-

णजे श्लीपद, वातरोग, पांथरी, गुल्म, अरुची, ह्यांचा नाश करित आणि ह्यानें भस्मकरोगाप्रमाणें घोर असा अग्नि प्रदीप्त होतो.

कृष्णादि मोदक.

कृष्णाचित्रकदन्तीनां कर्षमर्धपलं पलम् ।
विंशतिश्च हरीतक्यो गुडस्य च पलद्वयम् ।
मधुना सह संयुक्तं श्लीपदं हन्ति दारुणम् ॥ १ ॥

पिंपळी, चित्रकमूळ, दांतीमूळ हीं औषधें अनुक्रमें एक तोळा, दोन तोळे व चार तोळे अशा प्रमाणें घ्यावीं. हिरडे वीस व गूळ आठ तोळे घेऊन गोळ्या करून एकएक गोळी मधाशीं द्यावी.

विडंगादि तेल.

विडङ्गसारिवार्केषु नागरे चित्रके तथा ।
भद्रदार्वेलकाख्येषु सर्वेषु लवणेषु च ।
तैलं पक्वं पिबेद्वाऽपि श्लीपदानां निवृत्तये ॥ १ ॥

वावडिंग, उपलसरी, रुईचें मूळ, सुंठ, चित्रकमूळ, देवदार, वेलदोडे व सेंधेलोण, पादेलोण वगैरे लवणें ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करून तें श्लीपदाच्या निवृत्तीकरितां लावावें अथवा प्यावें.

सौरेश्वर घृत.

सुरसा देवकाष्ठं च त्रिफला त्रिकटुर्गजा ।
लवणानि च सर्वाणि विडङ्गान्यथ चित्रकम् ॥ १ ॥
चविका पिप्पलीमूलं गुग्गुलुं हपुषा वचा ।
यवाग्रजः सपाठश्च चव्येलं वृद्धदारकः ॥ २ ॥
कल्कैश्च कार्षिकैरेभिर्घृतप्रस्थं विपाचयेत् ।
दशमूलकषायेण धान्ययूषद्रवेण च ॥ ३ ॥
दधिमण्डसमायुक्तं प्रस्थं प्रस्थं पृथक् पृथक् ।
पक्वं स्यादुद्धृतं कल्कात्पिबेत्कर्षत्रयं हविः ॥ ४ ॥
श्लीपदं कफवातोत्थं मांसरक्ताश्रितं च यत् ।
मेदःश्रिताभिघातोत्थं हन्यादेव न संशयः ॥ ५ ॥
अपचीगलगण्डानि अन्त्रवृद्धिं तथाऽर्बुदम् ।
नाशयेद् ग्रहणीदोषं श्वयथुं गुदजान्यपि ॥ ६ ॥
परमग्निकरं हृद्यं कोष्ठक्रिमिविनाशनम् ।
घृतं सौरेश्वरं नाम श्लीपदं हन्ति सेवितम् ॥ ७ ॥
जीवकेन घृतं ह्येतद्रोगानीकविनाशनम् ।

यवान्नं कूर्ममांसं च कटुतैलं च योजयेत् ।
श्लीपदानां प्रशान्त्यर्थं मांसान्तं दाहमग्निना ॥ ८ ॥

तुळस, देवदार, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, गजपिंपळी, सर्व लवणें, वावडिंगें, चित्रकमूळ, चवक, पिंपळमूळ, गुग्गुळ, शेरणी, वेखंड, जवखार, पहाडमूळ, कचोरा, वेलदोडयाचे दाणे व वरधारा ह्यांचा कल्क तोळा तोळा; तूप चौसष्ट तोळे, दशमुळांचा काढा, धन्याचा काढा व दह्यावरील निवळ हीं चौसष्ठ चौसष्ट तोळे घालून तूप पचन करावें; आणि तें काढून घेऊन तीन तीन तोळे सेवन करावें. तें कफवातजन्य श्लीपद, मांस व रक्त ह्यांच्या आश्रयानें होणारें श्लीपद, मेदाश्रित श्लीपद व अभिघातानें होणारें श्लीपद ह्यांचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं. अपची, गालगुंड, अंत्रवृद्धि, अर्बुद, संग्रहणी, सूज, व मूळव्याध ह्यांचाही नाश करितें. हें अग्निदीपक, हृद्य व कोठ्यांतील कृमींचें नाशक आहे. हें सौरेश्वर नांवाचें घृत सेवन केलें असतां श्लीपदाचा नाश करितें. हें तूप जीवकाच्या कल्कांतून घेतलें असतां रोगसमुदायाचा नाश करतें. ह्याजवर सातूचें अन्न, कासवाचें मांस व मोहरीचें तेल हे पदार्थ पथ्याला योजावे. श्लीपदाच्या नाशाकरितां मांसाच्या शेवटापर्यंत डाग द्यावा.

गन्धर्वतैलभृष्टां हरीतकीं गोजलेन यः पिबति ।
श्लीपदबन्धनमुक्तो भवत्यसौ सप्तरात्रेण ॥ ९ ॥

एरंडेलांत हिरडे तळून गोमूत्रांतून जो खाईल तो सात दिवसांमध्यें श्लीपदापासून मुक्त होतो.

गुडूच्यादि लेप.

गुडूचीकटुकाशुण्ठीदेवदारुविडङ्गकम् ।
पिष्ट्वा गोमूत्रसंयुक्तं लेपाच्छ्लीपदनाशनम् ॥ १ ॥

गुळवेल, कुटकी, सुंठ, देवदार व वावडिंग ह्यांचें चूर्ण घेऊन गोमूत्रांत लेप करावा; हें श्लीपदाचें नाशक आहे.

धान्याम्लादि लेप.

धान्याम्लं तैलसंयुक्तं कफवातविनाशनम् ।

---

१. सर्षपतैलं इति पाठांतरम् शुद्धम् ।

दीपनं चाऽऽमदोषघ्नं मेदःश्लीपदनाशनम् ॥ १ ॥

कांजीमध्यें तेल मिसळून घ्यावें. तें कफवाताचा नाश करितें. तें दीपक, आमदोषनाशक व मेद व श्लीपद ह्यांचें नाशक आहे.

पिण्डारकतरुसंभवबन्धूकशिफा जयति सर्पिषा पीता।
श्लीपदमुग्रं नियतं बद्धा सूत्रेण जङ्घायाम् ॥ २ ॥

पेंढरीच्या झाडावरील दुपारीच्या झाडाचें मूळ तुपांतून घ्यावें; तें श्लीपदाला जिंकतें. तेंच मूळ सुतांत बांधून कंबरेला बांधावें. तें निश्चयानें उग्र श्लीपदाचा नाश करितें.

संपिष्टमारनालेन रुचिकामूलवल्कलम्।
प्रलेपाच्छ्लीपदं हन्ति बद्धमूलमपि दृढम् ॥ ३ ॥

रुईचें मूळ कांजींत वाटून त्याचा लेप करावा; तो बद्धमूळ अशा श्लीपदाचा नाश करितो.

यवान्नं कटुतैलं च कूर्ममांसं च योजयेत्।
श्लीपदानां प्रशान्त्यर्थं मांसान्ते दाहमग्निना ॥ ४ ॥
पादकण्डूहरं कुर्यान्नवनीतेन माक्षिकम्।
पाददाहहरं खादेत्तिलाद्विगुणबाकुचेः।
चूर्णं तु मधुसर्पिर्भ्यां कर्षमार्तिप्रशान्तये ॥ ५ ॥

सातूचें अन्न, मोहरीचें तेल, कासवाचें मांस हें श्लीपदाच्या शांतीकरितां योजावें, व मांसाच्या तळापर्यंत डाग द्यावा. लोण्यांत मध घालून पायांस मर्दन करावें. तें पायाच्या कंडूचा नाश करितें. पायाची आग शांत होण्याकरितां व पीडा दूर होण्याकरितां एकपट तीळ व दुप्पट बावच्या ह्यांचें चूर्ण एक तोळा प्रमाण घेऊन तूप व मधाशीं खावें.

पथ्यापथ्य.

पुरातनाः षष्टिकशालयश्च यवाः कुलत्था लशुनं पटोलम्।
वार्ताकसौभाञ्जनकारवेल्लं पुनर्नवामूलमुपोदिका च ॥ १ ॥
एरण्डतैलं सुरभीजलं च कटूनि तिक्तानि च दीपनानि।
एतानि पथ्यानि भवन्ति पुंसां रोगे सति श्लीपदनामधेये ॥

जुन्या साठ्यासाळी, जव, हुलगे, लसूण, पडवळ, वांगें, शेवगा, कारलें, वसू, मयाळ, एरंडेल, स्वच्छ पाणी व तिखट, कडू व दीपक औषधें हे पदार्थ श्लीपदरोग झाला असतां पथ्यकारक आहेत.

पिष्टान्नं दुग्धविकृति गुडमानूपमामिषम् ।
स्वाद्वम्लं पारियात्रं च सिन्धुविन्ध्यनदीजलम् ।
पिच्छिलं गुर्वभिष्यन्दि श्लीपदी परिवर्जयेत् ॥

पिठाचे पदार्थ, दुधाचे पदार्थ, गूळ, अनूप देशांतील मांस, गोड व आंबट पदार्थ, पारियात्र (विंध्याद्रीचा पश्चिमभाग), सिंधु देश व विंध्य पर्वतांतील नद्यांचें पाणी व बुळबुळीत, जड व अभिष्यंदी पदार्थ श्लीपदाच्या रोग्यानें वर्ज करावे.

विद्रधीचें (करटाचें) निदान.

त्वग्रक्तमांसमेदांसि प्रदूष्यास्थिसमाश्रिताः ।
दोषाः शोफं शनैर्घोरं जनयन्त्युच्छ्रिता भृशम् ॥ १ ॥

अस्थीच्या आश्रयानें असलेले दोष कुपित होऊन त्वचा, रक्त, मांस व मेद ह्यांना दूषित करून हळूहळू अत्यंत उंच व भयंकर सूज उत्पन्न करितात.

त्याची संख्या व लक्षणें.

महामूलं रुजावन्तं वृत्तं वाऽप्यथ वाऽयतम् ।
स विद्रधिरिति ख्यातो विज्ञेयः षड्विधश्च सः ॥ १ ॥
पृथग्दोषैः समस्तैश्च क्षतेनाप्यसृजा तथा ।
षण्णामपि च तेषां तु लक्षणं संप्रचक्षते ॥ २ ॥

ह्या सुजेचीं मुळें फार खोल गेलेलीं असतात. तीमध्यें ठणका असतो. हा सुजेचा गोळा वाटोळा किंवा लांबट असतो. ह्याला विद्रधि असें म्हणतात. हा वातादि पृथक् दोषानें तीन प्रकारचा, सर्व दोषांपासून एक, क्षतापासून एक व रक्तापासून एक, मिळून ह्या विद्रधीचे सहा प्रकार आहेत. ह्यांचें लक्षण आतां सांगतों.

वातजन्य विद्रधिलक्षण.

कृष्णोऽरुणो वा विषमो भृशमत्यर्थवेदनः ।
चित्रोत्थानप्रपाकश्च विद्रधिर्वातसंभवः ॥ १ ॥

काळा, तांबूस, अतिशय लहान किंवा मोठा, अत्यंत वेदनायुक्त अनेक तऱ्हेच्या आकारानें उत्पन्न होणारा व अनियमित रीतीनें पिकणारा असा विद्रधि वातजन्य असतो.

पित्तजन्य विद्रधिलक्षण.

पक्वोदुम्बरसंकाशः पीतो वा ज्वरदाहवान् ।

क्षिप्रोत्थानप्रपाकश्च विद्रधिः पित्तसंभवः ॥ १ ॥

पिकलेल्या उंबराप्रमाणें तांबूस किंवा निळसर, ज्वर व दाह यांनीं युक्त, लवकर उत्पन्न होणारा, व लवकर पिकणारा, असा जो विद्रधि तो पित्तजन्य असतो.

कफजन्य विद्रधिलक्षण.

शरावसदृशः पाण्डुः शीतः स्निग्धोऽल्पवेदनः ।
चिरोत्थानप्रपाकश्च विद्रधिः कफसंभवः ॥ १ ॥

शरावाच्या आकाराचा, पांढुरका, थंड, तुळतुळीत, मंद वेदनांनीं युक्त व सावकासपणें पिकणारा असा जो विद्रधि तो कफजन्य असतो.

तनुपीतसिताश्चैषामास्रावाः क्रमशः स्मृताः ।

वातजन्य विद्रधीमधून पातळ, पित्तजन्य विद्रधीमधून पिवळा, व कफजन्य विद्रधीमधून पांढरा असा स्राव होतो.

सान्निपातजन्य विद्रधीचें लक्षण.

नानावर्णरुजास्रावो घाटालो विषमो महान् ।
विषमं पच्यते चापि विद्रधिः सान्निपातिकः ॥ १ ॥

सन्निपातापासून होणाऱ्या विद्रधीमधील सूज अनेक रंगाची असते. तींत नाना प्रकारच्या पीडा होतात. नाना प्रकारचे स्राव होतात. तो अतिशय मोठा व उंच वाढून वर टोंक आल्यामुळें घाटीसारखा दिसतो. तो मोठा व विषम असून कदाचित् पिकतो व कदाचित् पिकतहि नाहीं.

अभिघातजन्य विद्रधीची संप्राप्ति.

तैस्तैर्भावैरभिहते क्षते वाऽपथ्यकारिणः ।
क्षतोष्मा वायुविसृतः सरक्तं पित्तमीरयेत् ॥ १ ॥
ज्वरस्तृष्णा च दाहश्च जायन्ते तस्य देहिनः ।
आगन्तुर्विद्रधिर्ह्येष पित्तविद्रधिलक्षणः ॥ १ ॥

काष्ठपाषाणादिकांचा आघात होऊन जखम झालेल्या मनुष्यानें अपथ्य केल्यामुळें किंवा शस्त्रादिकानें क्षत झालें असतां अपथ्य केल्यामुळें, त्या क्षतांतील उष्णतेनें कुपित झालेला वात पसरून रक्तासह पित्ताला कोपवितो. त्यामुळें ताप, तहान आणि दाह हीं

लक्षणें होतात. त्याला आगंतुक विद्रधि म्हणतात. त्यांत पित्तविद्रधीचीं लक्षणें असतात.

रक्तजन्य विद्रधीचें लक्षण.

कृष्णस्फोटावृतः श्यावस्तीव्रदाहरुजा ज्वरः ।
पित्तविद्रधिलिङ्गस्तु रक्तविद्रधिरुच्यते ॥ १ ॥

काळ्या फोडांनीं व्यापलेला, काळसर रंगाचा, अत्यंत दाह व ठणका ह्यांनीं युक्त, आणि ज्यामध्यें ज्वर व पित्त विद्रधींचीं लक्षणें असतात, त्याला रक्तविद्रधि असें म्हणतात.

उक्ता विद्रधयो ह्येते तेष्वसाध्यस्तु सर्वजः ॥

याप्रमाणें विद्रधि सांगितले; या सर्व विद्रधींमध्यें सर्व दोषांपासून झालेला विद्रधि असाध्य असतो.

अभ्यन्तरानतस्तूर्ध्वं विद्रधीन्संप्रचक्षते ।।

खालच्या भागांत व वरच्या भागांत होणारे असे अंतर्विद्रधि सांगतों.

अंतर्विद्रधीचें कारण.

गुर्वसात्म्यविरुद्धान्नशुष्कसंसृष्टभोजनात् ॥ १ ॥
अतिव्यवायव्यायामवेगाघातविदाहिभिः ॥
पृथक्संभूय वा दोषाः कुपिता गुल्मरूपिणम् ॥
वल्मीकवत्समुन्नद्धमन्तः कुर्वन्ति विद्रधिम् ॥ २ ॥

जड, सवईचें नाहीं असें, विरुद्ध असणारें व मिश्र असें, अन्न खाण्यापासून हे उत्पन्न होतात. अतिशय मैथुन करणें, अतिशय श्रम करणें, मलमूत्रांचा अवरोध करणें आणि विदाही पदार्थ खाणें अशा कारणांनीं कुपित झालेले वेगवेगळे वातादि दोष गांठीसारखा आणि वारुळाप्रमाणें उंच वाढणारा असा शरीराच्या आंतील भागामध्यें विद्रधि उत्पन्न करितात.

त्यांचीं स्थानें.

गुदे बस्तिमुखे नाभ्यां कुक्षौ वंक्षणयोस्तथा ॥
वृक्कयोः प्लीह्नि यकृति क्लोम्नि वाऽप्यथवा हृदि ॥ १ ॥

गुद, बस्तीचें तोंड, नाभिप्रदेश, दोन्ही कुशी, अडसंधी, मूत्रपिंड, प्लीहा, यकृत, क्लोम व हृदय हीं त्यांचीं स्थानें आहेत.

त्यांचें लक्षण.

एषामुक्तानि लिङ्गानि बाह्यविद्रधिलक्षणैः ॥
अधिष्ठानविशेषेण लक्षणानि निबोध मे ॥ १ ॥

ह्यांचीं लक्षणें बाह्य विद्रधीप्रमाणेंच असतात. स्थानभेदानें त्यांचीं विशेष लक्षणें सांगतों.

गुदे वातनिरोधस्तु बस्तौ कृच्छ्राल्पमूत्रता ॥
नाभ्यां हिध्मा तु साटोपः कुक्षौ मारुतकोपनम् ॥ २ ॥
कटीपृष्ठग्रहस्तीव्रो वंक्षणस्थे तु विद्रधौ ॥
वृक्कयोः पार्श्वसंकोचः प्लीह्नि श्वासनिरोधनम् ॥ ३ ॥
सर्वाङ्गप्रग्रहस्तीव्रो हृदि कासश्च जायते ।
श्वासो यकृति हिक्का च पिपासा क्लोमजेऽधिका ॥ ४ ॥

गुदामध्यें होणाऱ्या विद्रधीच्या योगानें वायूचा अवरोध होतो. बस्तीमुखाजवळ झालेल्या विद्रधीनें कष्टानें थोडें थोडें लघवीला होतें. नाभिप्रदेशांत विद्रधि झाला असतां उचकी व पोटांत गुडगुडणें हे विकार होतात. वंक्षणसंधीमध्यें विद्रधि झाला असतां कंबर व पाठ जखडल्यासारखी होऊन तीव्र वेदना होतात. मूत्रपिंडामध्यें विद्रधि झाला असतां दोन्ही कुशींचा संकोच होतो. प्लीहेमध्यें विद्रधि झाला असतां श्वासोच्छ्वासाचा अवरोध होतो. हृदयामध्यें झालेल्या विद्रधीनें सर्व अंग जखडल्यासारखें होऊन खोकला येतो. यकृतामध्यें झालेल्या विद्रधीनें श्वास व उचकी लागते आणि क्लोमामध्यें झालेल्या विद्रधीनें तहान लागते.

स्राव.

नाभेरुपरिजाः पक्वा यान्त्यूर्ध्वमितरे त्वधः ॥
अधःस्रुतेषु जीवेत्तु स्रुतेषूर्ध्वं न जीवति ॥ १ ॥

नाभीच्या वर होणारे विद्रधि पिकून फुटले असतां त्यांचा स्राव वरील मार्गानें होतो व नाभीच्या खालीं होणाऱ्या विद्रधींचा स्राव अधोमार्गानें होतो. अधोमार्गानें स्राव झाला तर रोगी वांचतो आणि वरील मार्गानें झाला तर रोगी वांचत नाहीं.

हारीताचें मत.

ऊर्ध्वं प्रपन्नेषु मुखान् नराणां प्रवर्ततेऽसृक्सहितो हि पूयः ॥
अधः प्रपन्नेषु च पायुमार्गाद्वाभ्यां प्रवृत्तिस्त्विह नाभिजे च १॥

नाभीच्या वर होणाऱ्या विद्रधींचा स्राव मुखावाटे होतो. नाभीच्या खालीं होणाऱ्या विद्रधीचा स्राव गुदावाटे होतो. आणि नाभीमध्यें होणाऱ्या विद्रधीचा स्राव उभय मार्गानें होतो.

स्रावाच्या संबंधानें साध्यासाध्यत्व.

हृन्नाभिबस्तिवर्ज्या ये तेषु भिन्नेषु बाह्यतः ॥
जीवेत्कदाचित्पुरुषो नेतरेषु कदाचन ॥ १ ॥

हृदय, नाभि व बस्ती ह्या ठिकाणचे विद्रधि खेरीज करून बाकीच्या ठिकाणचे विद्रधि बाहेरून फुटले तर रोगी कदाचित् वांचतो. ह्याखेरीज इतर ठिकाणचे विद्रधि बाहेरून फुटले असतां रोगी वांचत नाहीं.

भोजानें म्हटलें आहे.

असाध्यो मर्मजो ज्ञेयः पक्वोऽपक्वश्च विद्रधिः ॥
संनिपातोत्थितोऽप्येवं पक्व एव तु बस्तिजः ॥ १ ॥
त्वग्जो नाभेरधो यश्च साध्यो नोपरि नाभिजः ॥ २ ॥

पक्व असो अगर अपक्व असो, नाभीच्या वर होणारा विद्रधि असाध्य असतो. त्याचप्रमाणें सन्निपातज विद्रधि व बस्तीमध्यें होणारा पक्व विद्रधिही असाध्य असतो. नाभीच्या खालीं त्वचेच्या आश्रयानें होणारा विद्रधि साध्य असतो व वर होणारा साध्य नसतो.

पुनः साध्यासाध्यत्व.

साध्या विद्रधयः पञ्च विवर्ज्यः सांनिपातिकः ॥

सन्निपातिक विद्रधि खेरीज करून बाकीचे पांच विद्रधि साध्य आहेत. म्हणून सन्निपातज विद्रधीवर उपचार करूं नयेत.

आमपक्वविदग्धत्वं तेषां शोथवदादिशेत् ॥ १ ॥

आम, पक्व व विदग्ध अशा विद्रधीच्या तीन अवस्था आहेत. ह्या व्रणशोथाप्रमाणें जाणाव्या.

आध्मानवद्धनिष्यन्दं छर्दिहिक्कातृषान्वितम् ॥
रुजाश्वाससमायुक्तं विद्रधिर्नाशयेन्नरम् ॥ १ ॥

ज्याचें पोट फुगलें आहे, लघवी बंद झाली आहे व ओकारी, उचकी, व तहान ह्या विकारांनीं युक्त व ठणका व श्वास ह्यांनीं पिडलेला अशा मनुष्याचा विद्रधि त्याचा नाश करतो.

आमो वा यदि वा पक्को महान्वा यदि वेतरः ॥
सर्वो मर्मोत्थितत्वात्तु विद्रधिः कष्ट उच्यते ॥ २ ॥
हृन्नाभिबस्तिजः पक्को वर्ज्यो यश्च त्रिदोषजः ॥
मुष्टिप्रमाणो गुल्मस्तु विद्रधिस्तु ततः परम् ॥ ३ ॥
गुल्मस्तिष्ठति कोष्ठेषु विद्रधिर्मांसशोणिते ॥
विद्रधिः पच्यते तस्माद्गुल्मश्चात्र न पच्यते ॥ ३ ॥

अपक्व अथवा पक्व, मोठा अगर लहान असा जरी विद्रधि असला तरी तो मर्माच्या ठिकाणीं झाला असल्यास कष्टसाध्य असतो. हृदय, नाभि व बस्ती ह्या ठिकाणीं झालेला पक्व विद्रधि व सन्निपातज विद्रधि असाध्य समजावा. गुल्म हा मुठीप्रमाणें (मुटक्यासारखा) असतो व विद्रधि ह्याहून वेगळा असतो. गुल्म हा कोठ्यांत असून विद्रधि मांस व शोणित ह्यांच्या आश्रयानें असतो. विद्रधि पिकतो व गुल्म पक्व होत नाहीं असा हा दोहोंमध्यें भेद आहे.

स्तनविद्रधिनिदान.

एवमेव स्तनशिराः संवृता वाऽथ योषिताम् ॥
सूतानां गर्भिणीनां च संभवेच्छ्वयथुर्घनः ॥ १ ॥
स्तनः स्त्रियः सदुग्धो वा बाह्यविद्रधिलक्षणः ॥
नाडीनां सूक्ष्मवक्त्रत्वात्कन्यानां न स जायते ॥ २ ॥

ह्याचप्रमाणें स्त्रियांच्या स्तनाच्या शिरा गुंतल्यामुळें प्रसूत झालेल्या किंवा गर्भार असलेल्या स्त्रियांच्या स्तनाच्या ठिकाणीं कठीण अशी सूज उत्पन्न होते. तसेंच स्त्रियांच्या स्तनांत दूध सांठून राहिलें असल्यानेंही वरीलप्रमाणें सूज येते. ती बाह्य विद्रधीच्या लक्षणांनीं युक्त असते. नाड्यांचीं तोंडें सूक्ष्म असल्यामुळें हा मुलींना होत नाहीं.

विद्रधीची चिकित्सा.

रसालफलतुल्यो यः शोफो बाह्योऽथ वाऽऽन्तरः ॥
पृथग्दाहरुजानाहकारको विद्रधिः स्मृतः ॥ १ ॥

शरीराच्या बाह्यभागीं किंवा अंतर्भागीं आंब्याच्या फळासारखी जी सूज येते, ती दाह, ठणका व स्तब्धता ह्या विकारांनीं युक्त असते. तिला विद्रधि असें म्हणतात.

जलौकापातनं शस्तं सर्वस्मिन्नेव विद्रधौ ॥
मृदुर्विरेको लध्वन्नं स्वेदः पित्तोत्तरं विना ॥ २ ॥

सर्व विद्रधींला जळवा लावून रक्त काढणें इष्ट आहे. मृदु विरेचन, हलकें अन्न व पित्तविद्रधीवांचून इतरांला स्वेद हे उपचार करावे.

वातजन्य विद्रधीवर.

व्याघ्रीमूलककल्कैस्तु वसातैलघृतान्वितैः ॥
सुखोष्णो बहुलो लेपः प्रयोज्यो वातविद्रधौ ॥ १ ॥

रिंगणमुळाचा कल्क करून त्यांत चर्बी, तेल व तूप घालून सुखोष्ण असा जाडसा लेप वातविद्रधीवर करावा.

स्वेदोपनाहाः कर्तव्याः शिग्रुमूलसमन्विताः ॥

शेवग्याच्या मूळाचें चूर्ण घालून त्याचें पोटीस बांधावें व त्यानें शेकावें.

पुनर्नवादारुविश्वदशमूलाभयाम्भसा ॥
गुग्गुल्वेरण्डतैलं वा पिबेन्मारुतविद्रधौ ॥ २ ॥

वसूची मुळी, देवदार, सुंठ, दशमुळें व बाळहिरडे, ह्यांच्या काढ्यांतून गुग्गुळ अथवा एरंडेल तेल वातविद्रधीवर प्यावें.

पित्तजन्य विद्रधीवर.

पैत्तिके सारिवालाजामधुकैः शर्करायुतैः ॥
प्रदिह्यात्क्षीरपिष्टैर्वा पयस्योशीरचन्दनैः ॥ १ ॥
पिबेद्वा त्रिफलाक्वाथं त्रिवृत्कल्काक्षसंयुतम् ॥
पञ्चवल्कलकल्केन घृतमिश्रेण लेपनम् ॥ २ ॥

पित्तजन्य विद्रधीवर उपलसरी, लाह्या, जेष्टमध व साखर ह्यांचा दुधांतून लेप करावा. किंवा दुधी, वाळा व चंदन ह्यांचा दुधांतून लेप करावा. अथवा त्रिफळ्याचा काढा, एक तोळा तेढाचा कल्क घालून प्यावा. पंचवल्कलांच्या कल्कांत तूप घालून लेप करावा.

कफजन्य विद्रधीवर.

त्रिफलाशिग्रुवरुणदशमूलाम्भसा पिबेत् ॥
गुग्गुलुं मूत्रसंयुक्तं विद्रधौ कफसंभवे ॥ १ ॥

त्रिफळा, शेवगा, वायवर्णा व दशमुळें ह्यांच्या काढ्यांतून गोमूत्र घालून गुग्गुळ द्यावा.

इष्टकासिकतालोहाश्वशकृत्तुषपांशुभिः ॥
मूत्रैरुष्णैश्च सततं स्वेदयेच्छ्लेष्मविद्रधौ ॥ २ ॥

वीट, वाळू, लोखंड, घोड्याच्या लेंड्या, कोंडा, धूळ व गोमूत्र ह्यांनीं कफविद्रधीचें स्वेदन करावें.

रक्तजन्य व आगंतुक विद्रधीवर.

विद्रधौ कुशलः कुर्याद्रक्तागन्तुनिमित्तजे ॥
पित्तविद्रधिवत्कुर्यात्क्रियां निरवशेषतः ॥ १ ॥

रक्तज व आगंतुक विद्रधीवर कुशल वैद्यानें पित्तजन्य विद्रधीवरील सर्व चिकित्सा करावी.

सामान्य चिकित्सा.

शिग्रुदीप्यवरुणाद्वियामिनीकुञ्जराशनकृतः कषायकः ॥
बोलचूर्णसहितोऽन्तरुत्थितं विद्रधिं विदलयेदसंशयम् ॥ १ ॥

शेवग्याची साल, ओवा, वायवरण्याची साल, हळद, दारुहळद, पिंपळाची साल ह्यांचा काढा बोळाचें चूर्ण घालून द्यावा. तो अंतर्विद्रधीचा निःसंशय नाश करतो.

वरुणादि काढा.

कासीससैन्धवशिलाजतुहिंगुचूर्ण-
मिश्रीकृतो वरुणवल्कलजः कषायः ॥
अभ्यन्तरोत्थितमपक्वमतिप्रमाणं
नृणामयं जयति विद्रधिमुग्रशोफम् ॥ १॥

हिराकस, सेंधेलोण, मनशीळ, लाख व हिंग ह्यांचें चूर्ण घालून वायवर्ण्याच्या सालीचा काढा घ्यावा. तो फार मोठ्या व अपक्व अशा अंतर्विद्रधीचा व उग्र सुजेचा नाश करतो.

पांढऱ्या वसूचा काढा.

श्वेतवर्षाभुवो मूलं मूलं च वरुणस्य च ।
जलेन क्वथितं पीतमपक्वं विद्रधिं जयेत् ॥ १ ॥

पांढरी वसू व वायवर्ण्याची मुळी ह्यांचा काढा अपक्व विद्रधीचा नाश करतो.

यवादि लेप.

यवगोधूममुद्गैश्च सिद्धपिष्टैः प्रलेपयेत् ।
विलीयते क्षणेनैवमपक्वश्चैव विद्रधिः ॥ १ ॥

सातू, गहूं व मूग ह्यांचें पीठ शिजवून त्याचा लेप करावा. म्हणजे अपक्क विद्रधीचा क्षणांत नाश होतो.

दशमूलादि काढा.

दशमूली छिन्नरुहा पथ्या दारुपुनर्नवा ।
ज्वरविद्रधिशोफेषु शिग्रुविश्वयुतो हितः ॥ १ ॥

दशमुळें, गुळवेल, हिरडेदळ, देवदार व वसूची मुळी, ह्यांचा काढा शेवग्याच्या सालीचें चूर्ण व सुंठीचें चूर्ण घालून ज्वर, विद्रधि व सूज ह्यांजवर द्यावा.

वरुणादि काढा.

वरुणादिगणक्काथमपक्के मध्यविद्रधौ ।
ऊषकादिप्रतीवापं पिबेत्संशमनाय वै ॥ १ ॥

वायवर्णा वगैरे वरुणादि गणांतील औषधांचा काढा करून त्यांत ऊषकादि गणांतील औषधांचें चूर्ण घालून अपक्व असा अंतर्विद्रधि शांत होण्याकारितां प्यावा.

मानकमूळादि योग.

शमयति मानकमूलं क्षौद्रयुतं तण्डुलाम्भसा पीतम् ।
अन्तर्भूतं विद्रधिमुद्धतमाश्वेव मनुजस्य ॥ १ ॥

मालाकंदाचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून मध घालून प्यावें. तें मनुष्याच्या फार मोठ्या अंतर्विद्रधीचा त्वरित नाश करितें.

हरीतकीचूर्ण.

हरीतकीसैन्धवधातकीनां रजो घृतक्षौद्रयुतं प्रयुक्तम् ।
निहन्ति लीढं ध्रुवमेव पुंसामन्तर्भवं विद्रधिमुग्ररूपम् ॥ १ ॥

हिरडा, सेंधेलोण, व धायटीचीं फुलें ह्यांचें चूर्ण तूप व मधाशीं द्यावें. तें उग्र अशा अंतर्विद्रधीचा नाश करितें.

सौभांजनादि योग.

सौभाञ्जनकनिर्यूहो हिंगुसैंधवसंयुतः ।
अचिराद्विद्रधिं हन्ति प्रातःप्रातर्निषेवितः ॥ १ ॥

---

१. ह्या दोनी गणांतील औषधें सार्थ वाग्भट सू. स्था. अध्याय पंधरामध्यें पहावीं.

शेवग्याच्या सालीचा काढा हिंग व सैंधव घालून रोज प्रातःकाळीं प्यावा. तो विद्रधीचा त्वरित नाश करतो.

शिग्रुमूलं जले धौतं दरापिष्टं प्रलेपयेत् ।

शेवग्याचें मूळ पाण्यांत उगाळून त्यांत बचनागाचें चूर्ण घालून लेप करावा.

तद्रसं मधुना पीत्वा हन्त्यन्तर्विद्रधिं नरः ॥ २ ॥

शेवग्याच्या मुळाचा रस मध घालून प्यावा. तो अंतर्विद्रधीचा नाश करतो.

त्रिफलागुग्गुळ.

त्रीणि पलानि फलत्रितयस्य द्वे तु पले तुलिते मगधायाः ।
पञ्च पलानि भवन्ति पुरस्य स्यात्स फलत्रिकगुग्गुलुयोगः ॥ १
पक्वेषु विद्रधिषु पूयमतिस्रवत्सु
नाडीषु च व्रणगदेषु भगंदरेषु ।
स्याद्गण्डमालिषु फलत्रिकगुग्गुलुः स्यात्
पथ्यं फलत्रिकपुरे घृतभोजनं च ॥ २ ॥

त्रिफळा बारा तोळे, पिंपळी आठ तोळे, आणि वीस तोळे गुग्गुळ ह्यांचा एकत्र खल करावा. ह्याला त्रिफलागुग्गुलु असें म्हणतात. पू वाहणारा पक्व विद्रधि, नाडीव्रण, व्रण, भगंदर व गंडमाळा ह्या विकारांवर हा द्यावा. ह्याजवर पथ्याला तूप विशेष खावें.

वरुणादिघृत.

सिद्धं वरुणादिगणेन विधिना तत्कल्कपाचितं सर्पिः ।
अन्तर्विद्रधिमुग्रं मस्तकशूलं हुताशमान्द्यं च ॥ १ ॥

वरुणादि गणांतील औषधांचा कल्क व काढा ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें उग्र असा अंतर्विद्रधि, मस्तकशूळ, अग्निमांद्य, पांच प्रकारचे गुल्म ह्यांचा, पाणी जसें अग्नीला विझवितें त्याप्रमाणें नाश करितें. हें प्रातःकाळीं जेवणाच्या वेळीं व संध्याकाळींही द्यावें.

रसगंधकयोग.

वरुणादिकषायेण रसगन्धककज्जलीम् ।
भुक्त्वा निहन्ति माषैकां बाह्यमन्तश्च विद्रधिम् ।
अपक्वे त्वेतदुद्दिष्टं पक्वे तद्व व्रणवत्क्रिया ॥ १ ॥

पारा व गंधक ह्यांची कज्जली करून ती वरुणादि गणांतील

औषधांच्या काढ्यांतून एक मासभर द्यावी. ही योजना अपक्क विद्रधीकरितां करावी. पक्क विद्रधीवर व्रणाप्रमाणें क्रिया करावी.

पथ्यापथ्य.

आमस्थे रेचनं चैव लेपः स्वेदोऽस्रमोक्षणम् ।
जीर्णाः श्यामाककलमाः कुलत्था लशुनानि च ॥ १ ॥
रक्तशिग्रुश्च निष्पावः कारवेल्लं पुनर्नवा ।
श्रीपर्णं चित्रकं क्षौद्रं शोथोक्तानि च सर्वशः ॥ २ ॥

अपक्क विद्रधीवर रेचक, लेप, स्वेद, रक्तमोक्ष, जुने सावे, जुन्या साळी, हुलगे, लसूण, तांबडा शेवगा, पावटे, कारलीं, वसु, थोर ऐरण, चित्रकमूळ, मध आणि व्रणशोथावरील सर्व पथ्यविधि योजावा.

पक्वावस्थे शस्त्रकर्म पुराणा रक्तशालयः ।
घृतं तैलं मुद्गरसो विलेपी धन्वजा रसाः ॥ ३ ॥
शालिशाकं च कदली पटोलं हिमवालुका ।
चन्दनं तप्तशीताम्बु सर्वं चापि व्रणोदितम् ॥ ४ ॥

पक्क विद्रधीवर शस्त्रकर्म, जुनी तामसाळ, तूप, तेल, मुगाचें कढण, कण्हेरी, जांगल मांसाचा रस, तांदुळजा, केळ, पडवळ, जलब्राह्मी, चंदन, तापवून गार केलेलें पाणी, आणि व्रणावरील सर्व पथ्य हीं योजावीं.

नराणां विद्रधौ व्याधौ यथावस्थं यथाबलम् ।
पथ्यान्येतानि सर्वाणि निर्दिष्टानि महर्षिभिः ॥ ५ ॥

ऋषींनीं विद्रधीवर अवस्थानुरूप व बलानुरूप हा पथ्यविधि सांगितला आहे.

शोफिनां यान्यपथ्यानि व्रणिनामपि यानि च ।
क्रमादामे च पक्के च विद्रधौ वर्जयेन्नरः ॥ ६ ॥

व्रणशोथावर व व्रणावर जो अपथ्यकारक वर्ग सांगितला आहे तोच क्रमानें अपक्क व पक्कविद्रधीवर वर्ज करावा.

व्रणशोथनिदान–पूर्वरूप.

एकदेशोत्थितः शोफो व्रणानां पूर्वलक्षणम् ॥ १ ॥

शरीराच्या कोणत्याही एका ठिकाणीं विनाकारण सूज आली तर तें व्रणाचें पूर्वरूप आहे म्हणून समजावें.

त्याची संख्या.

षड्विधः स्यात्पृथक्सर्वशोणितागन्तुभेदतः ॥ १ ॥

हा व्रणशोथ वातादि भेदांनीं तीन, सर्व दोषांपासून एक, रक्तज एक व आगंतुक एक मिळून सहा प्रकारचा आहे.

त्यांचें लक्षण.

शोफाः षडेते विज्ञेयाः प्रागुक्तैः शोफलक्षणैः ।
विशेषः कथ्यते चैषां पक्वापक्वविनिश्चये ॥ १ ॥

पूर्वीं शोथनिदानामध्यें सांगितलेल्या लक्षणावरून ह्या साही शोथांची परीक्षा करावी. फक्त त्यांच्या पक्वापक्वतेचें ज्ञान होण्याकरितां जीं विशेष लक्षणें आहेत तीं येथें सांगतों.

विषमं पच्यते वातात्पित्तोत्थश्चाचिराच्चिरम् ।
कफजः पित्तवच्छोफो रक्तागन्तुसमुद्भवः ॥ २ ॥

वातदोषानें व्रणाचा पाक विषम होतो. पित्तानें व्रण लवकर पिकतो. कफानें उशीरानें पिकतो. रक्तज व आगंतुक व्रणाचा पाक पित्तज व्रणाप्रमाणें होतो.

मन्दोष्मताल्पशोफत्वं काठिन्यं त्वक्सवर्णता ।
मन्दवेदनता चैव शोफानामामलक्षणम् ॥ ३ ॥

अपक्व व्रणाची सूज फार कढत लागत नाहीं. ती कठीण असते. तिचा रंग त्वचेच्या रंगासारखा असतो. व तिजमध्यें वेदना मंद असतात.

दह्यते दहनेनेव क्षारेणेव विपच्यते ।
पिपीलिकागणेनेव दश्यते छिद्यते तथा ॥ ४ ॥
भिद्यते चैव शस्त्रेण दण्डेनेव च ताड्यते ।
पीड्यते पाणिनेवान्तः सूचीभिरिव तुद्यते ॥ ५ ॥
सोषचोषो विवर्णः स्यादङ्गुल्येवावपीड्यते ।
आसने शयने स्थाने शान्तिं वृश्चिकविद्धवत् ॥ ६ ॥
न गच्छेदाततः शोफो भवेदाध्मातबस्तिवत् ।
ज्वरस्तृष्णाऽरुचिश्चैव पच्यमानस्य लक्षणम् ॥ ७ ॥

व्रण पिकूं लागला म्हणजे त्या ठिकाणीं विस्तवानें भाजल्यासारखी आग होते. क्षाराच्या लेपानें जशा वेदना होतात, तशा वेदना होतात. व्रणामध्यें मुंग्या चावल्याप्रमाणें वेदना होतात. तोडल्या-

सारखें वाटतें. कुऱ्हाडीनें दोन तुकडे करावे किंवा काठीनें मारावें अशा वेदना होतात. हातानें जोरानें दाबावें किंवा सुयांनीं टोचावें अशा वेदना होतात. आग होते. विस्तवानें भाजल्याप्रमाणें वाटतें. सुजेचा रंग बदलतो. आंत बोटें ठेवून दाबावें अशा वेदना होतात. निजतांना, बसतांना किंवा उठतांना विंचू चावल्याप्रमाणें वेदना होतात व चैन पडत नाहीं. ती सूज फुगलेल्या बस्तीप्रमाणें ताणते. आणि ज्वर, तहान व अरुचि हीं लक्षणें असतात.

वेदनोपशमः शोफो लोहितोऽल्पो न चोन्नतः ।
प्रादुर्भावो वलीनां च तोदः कण्डूर्मुहुर्मुहुः ॥ ८ ॥
उपद्रवाणां प्रशमो निम्नता स्फुटनं त्वचाम् ।
बस्ताविवाम्बुसंचारः स्याच्छोफेऽङ्गुलिपीडिते ॥ ९ ॥
पूयस्य पीडयत्येकमन्तमन्ते च पीडिते ।
भक्ताकाङ्क्षा भवेच्चैव शोफानां पक्वलक्षणम् ॥ १० ॥

व्रण पिकल्यावर त्यांतील दाह वगैरे वेदना बंद होतात. सुजेला तांबूस वर्ण येतो. व सूज थोडी कमी होते. ती बसल्यासारखी दिसते. त्या सुजेवर सुरकुत्या दिसतात. वरचेवर आंत टोचल्यासारखें होतें. वरचेवर आंत खाजतें. व्रण पिकत असतांना ज्या पीडा होतात म्हणून वर सांगितलें आहे, त्या सर्व शांत होतात. सूज खोलगट दिसूं लागते किंवा बोटानें दाबलें तर तिच्यावर खळगा पडतो. वरील त्वचेला भेगा पडतात. पाण्यानें भरलेला बस्ती बोटानें दाबला असतां त्यांतील पाणी जसें इकडे तिकडे सरतें, त्याप्रमाणें सूज दाबली असतां तिजमधील पू इकडे तिकडे सरतो, आणि सुजेच्या एका बाजूला दाबलें तर तिच्या मधील पू दुसऱ्या बाजूस सरतो. व अन्न खाण्याची इच्छा होऊं लागते. हें व्रणाची सूज पिकल्याचें लक्षण आहे.

नर्तेऽनिलाद्रुङ् न विना च पित्तं दाहः कफं चापि विना न पूयः ।
तस्माद्धि सर्वे परिपाककाले दोषैस्त्रिभिर्यान्ति गदा विपाकम् ॥ ११
कालान्तरेणाभ्युदितं तु पित्तं कृत्वा वशे वातकफौ प्रसह्य ।
पचत्यतः शोणितमेष पाको मतः परेषां विदुषां द्वितीयः ॥ १२ ॥
कफजेषु च शोथेषु गम्भीरं पाकमेत्यसृक् ।

पक्वलिङ्गं ततः स्पष्टं यतः स्याच्छोथशीतता।
त्वक्सावर्ण्यं रुजोऽल्पत्वं घनस्पर्शत्वमश्मवत् ॥ १३ ॥
कक्षं समासाद्य यथैव वह्निर्वातेरितः संदहति प्रसह्य।
तथैव पूयोऽप्यविनिःसृतो हि मांसं शिरास्नायु च खादतीह ॥ १४

वायूवांचून ठणका नसतो, पित्तावांचून पक्वदशा येत नाहीं, व कफावांचून पू होत नाहीं; म्हणून सर्व रोग त्यांच्या परिपाकाच्या वेळीं तिन्हीही दोषांच्या योगानें विपाकावस्थेप्रत जातात. कालांतरानें वाढलेलें पित्त प्रकुपित होऊन वात व कफ ह्यांना हीनबल करून दूष्य व कर्मभूत असें जें रक्त त्याचें पचन करितें; आणि त्यापासून पू होतो. विद्वान लोक ह्याला दुसऱ्या प्रकारचा पाक म्हणतात. कफजन्य व्रणशोथामध्यें रक्ताचा पाक खोल होतो, म्हणून सुजेला थंडपणा आला म्हणजे, त्वचेसारखा वर्ण आला म्हणजे, ठणका कमी झाला म्हणजे व सूज दगडासारखी कठीण असली म्हणजे तें रक्ताचा पाक झाल्याचें स्पष्ट चिन्ह समजावें. गवताच्या गंजीवर पडलेला विस्तव वाऱ्याचें साह्य मिळतांच जसा ती गंजी जाळून टाकतो, त्याप्रमाणें व्रणामध्यें झालेला पू जर काढून टाकला नाहीं, तर तो मांस, शिरा व स्नायु यांना खाऊन टाकतो.

आमं विपच्यमानं च सम्यक्पक्वं च यो भिषक्।
जानीयात्स भवेद्वैद्यः शेषास्तस्करवृत्तयः ॥ १५ ॥

अपक्व, पच्यमान व पक्व अशा व्रणाच्या तिन्हीही अवस्था जो जाणतो, त्यालाच वैद्य म्हणावें; बाकीचे केवळ चोर समजावेत.

यश्छिनत्त्याममज्ञानाद्यश्च पक्वमुपेक्षते।
श्वपचाविव मन्तव्यौ तावनिश्चितकारिणौ ॥ १६ ॥

अज्ञानामुळें जो वैद्य अपक्व व्रणाचें छेदन करतो, व पक्व व्रण फोडण्याची उपेक्षा करतो, त्या दोघांनाही अंत्यज असें समजावें.

द्विधा व्रणः परिज्ञेयः शारीरागन्तुभेदतः।
दोषैराद्यस्ततोऽन्यश्च शस्त्रादिक्षतसंभवः ॥ १७ ॥

शारीरिक व आगंतुक असे व्रणाचे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं पहिला शारीरिक व्रण वातादि दोषांच्या बिघाडामुळें होतो, आणि दुसरा आगंतुक व्रण शस्त्रादिकांच्या आघातानें होतो.

वातज व्रणलक्षण.

स्तब्धः कठिनसंस्पर्शो मन्दस्रावो महारुजः ।
तुद्यते स्फुरति श्यावो व्रणो मारुतसंभवः ॥ १८ ॥

वातजन्य व्रण ताठर, हाताला कठीण लागणारा, मंदस्रावी व अतिशय ठणकणारा असतो. त्यांत टोचणी फार असते, तो फुरफुरतो व त्याचा वर्ण काळसर असतो.

पित्तजन्य व्रणलक्षण.

तृष्णामोहज्वरक्लेददाहदुःखावदारणैः ।
व्रणं पित्तकृतं विद्याद्गन्धैः स्रावैश्च पूतिकैः ॥ १९ ॥

तहान, मूर्च्छा, ताप, व्रणाला ओलसरपणा, दाह, व्रण कुजणें, त्याला चिरा पडणें आणि त्यांतून दुर्गंधयुक्त स्राव होणें हीं लक्षणें पित्तजन्य व्रणामध्यें असतात.

कफज व्रणलक्षण.

बहुपिच्छो गुरुः स्निग्धः स्तिमितो मन्दवेदनः ।
पाण्डुवर्णोऽल्पसंक्लेदश्चिरपाकी कफव्रणः ॥ २० ॥

कफजन्य व्रण फारच बुळबुळीत, जड व स्निग्ध असतो; ओलसर लागतो, त्यांत मंद वेदना असतात, तो पांढुरका दिसतो, त्यांतून थोडा स्राव होतो व तो फार उशीरां पिकतो.

रक्तज व्रणलक्षण.

रक्तो रक्तस्रुती रक्ताद्द्वित्रिजः स्यात्तदन्वयः ।

रक्तजन्य व्रण तांबडालाल असून त्यांतून रक्त वाहतें. आणि द्विदोषज व त्रिदोषज व्रण त्या त्या दोन किंवा तीन दोषांच्या लक्षणांनीं युक्त असतात.

त्वङ्मांसजः सुखे देशे तरुणस्यानुपद्रवः ॥ २१ ॥
धीमतोऽभिनवः काले सुखे साध्यः सुखं व्रणः ।

त्वचेच्या किंवा मांसाच्याच आश्रयानें होणारा, मर्मस्थान सोडून झालेला, तरुण मनुष्यास झालेला, व उपद्रवरहित असा व्रण विचारशील मनुष्यास हेमंत किंवा शिशिर ऋतूंत झाला असतां सुखसाध्य होतो.

गुणैरन्यतमैर्हीनस्ततः कृच्छ्रो व्रणः स्मृतः ॥ २२ ॥

वर सांगितलेल्या गुणांपैकीं कांहीं गुण कमी असल्यास तो व्रण कष्टसाध्य होतो.

सर्वैर्विहीनोऽसाध्यस्तु तथैवोपद्रवान्वितः ।

वरील सर्वच गुण त्यांत नसतील तर तो व ज्यामध्यें पुष्कळ उपद्रव आहेत तो व्रण असाध्य होतो.

पूतिः पूयातिदुष्टासृक्स्राव्युत्सङ्गी चिरं स्थितः ॥ २३ ॥
दुष्टव्रणोऽतिगन्धादिः शुद्धलिङ्गविपर्ययः ।

घाणेरडा, अतिशय पू वाहणारा, ज्यांतून नासकें रक्त वाहातें आहे असा, आंतून पोकळ असून वर उचललेला, फार दिवस राहिलेला, ज्याला अतिशय घाण येते व जो पुढें सांगितलेल्या शुद्ध व्रणाच्या उलट लक्षणांनीं युक्त असतो तो व्रण दुष्ट समजावा.

जिह्वातलाभः सुश्लक्ष्णः स्निग्धो विगतवेदनः ॥ २४ ॥
सुव्यवस्थो निरास्रावः शुद्धो व्रण इति स्मृतः ।

जिभेच्या वर्णाचा, अतिशय मृदु, गुळगुळित, ज्यांत वेदना कमी आहेत असा, सुव्यस्थित, व ज्यांतून स्राव होत नाहीं असा व्रण शुद्ध असतो.

कपोतवर्णप्रतिमा यस्यान्ताः क्लेदवर्जिताः ॥ २५ ॥
स्थिराश्च पिटिकावन्तो रोहतीति तमादिशेत् ।

ज्या व्रणाचे कांठ पारव्याच्या रंगासारखे दिसतात, व ते ओलसर नसतात. जो स्थिर असून ज्यावर बारीक पुटकुळ्या येतात, असा व्रण भरत आहे असें समजावें.

रूढवर्त्मानमग्रन्थिमशूनमरुजं व्रणम् ॥ २६ ॥
त्वक्सवर्णं समतलं सम्यग्रूढं तमादिशेत् ।

ज्या व्रणांतील मार्ग (शिरांचीं छिद्रें) भरून आलीं आहेत, आंतील गांठ मोडली आहे, सूज नाहींशी झाली आहे, ठणका बंद झाला आहे, व ज्याच्यावर त्वचेच्या वर्णाप्रमाणें वर्ण आला आहे, असा व्रण चांगला भरून आला आहे असें समजावें.

कुष्ठिनां विषजुष्टानां शोषिणां मधुमेहिनाम् ॥ २७ ॥
व्रणाः कृच्छ्रेण सिध्यन्ति येषां चापि व्रणे व्रणाः ।

कुष्ठी, द्वेषीविषानें पीडलेले, क्षयरोगी व मधुमेही अशा रो-

ज्यांचे व्रण कष्टानें साध्य होतात. त्याप्रमाणें पूर्वी होऊन बरा झालेल्या व्रणावर पुनः व्रण झाला असतां तो लवकर साध्य होत नाहीं.

वसां मेदोऽथ मज्जानं मस्तुलुंगं च यः स्रवेत् ॥ २८ ॥
आगन्तुजो व्रणः सिध्येन्न सिध्येद्दोषसंभवः ।

ज्या व्रणांतून वसा, मेद, मज्जा व मस्तुलुंग (मस्तकांत उत्पन्न होणारा तुपासारखा एक स्निग्ध पदार्थ) हे वाहतात, तो व्रण आगंतुक नसल्यास साध्य होत नाहीं.

मद्यागुर्वाज्यसुमनःपद्मचन्दनचम्पकैः ॥ २९ ॥
सगन्धा दिव्यगन्धाश्च मुमूर्षूणां व्रणाः स्मृताः ।

मद्य, अगर (कृष्णगुरु), तूप, फुलें, कमळ, चंदन, चाफा, ह्यांच्यासारखा वास ज्या व्रणास येतो, किंवा अद्भुत, पारिजातकाच्या फुलासारखा ज्यास वास येतो, तो व्रण प्राणनाशक समजावा.

ये च मर्मसु संभूता भवन्त्यत्यर्थवेदनाः ।
दह्यन्ते चान्तरत्यर्थं बहिःशीताश्च ये व्रणाः ॥ ३० ॥
प्राणमांसक्षयश्वासकासारोचकपीडिताः ।
प्रवृद्धपूयरुधिरा व्रणा येषां च मर्मसु ॥ ३१ ॥
क्रियाभिः सम्यगारब्धा न सिध्यन्ति च ये व्रणाः ।
वर्जयेदेव तान्वैद्यः संरक्षन्नात्मनो यशः ॥ ३२ ॥

मर्मस्थानीं झालेले नसूनही ज्यांत अतिशय वेदना होतात, आंत अत्यंत दाह होत असतां जे बाहेरून थंड असतात, तसेंच अभ्यंतरीं अतिशय थंड असून बाहेरून ज्यांचा अतिशय दाह होतो, ज्यामध्यें शक्ति व मांस हीं क्षीण झालीं आहेत, जे श्वास, खोकला व अरुचि ह्यांनीं युक्त आहेत, जे मर्मस्थानीं झालेले असून ज्यांतून पू व रक्त हीं फार वाहताहेत ते, आणि सशास्त्र उपचार चालू असतांही जे बरे होत नाहींत ते व्रण यश मिळविण्याची इच्छा करणाऱ्या वैद्यानें सोडावे.

व्रणशोथाची चिकित्सा.

आदौ विम्लापनं कुर्याद्द्वितीयमवसेचनम् ।
तृतीयमुपनाहं च चतुर्थी पाटनक्रिया ॥ १ ॥
पञ्चमं शोधनं कार्यं षष्ठं रोपणमिष्यते ।

एते क्रमा व्रणस्योक्ताः सप्तमं वैकृतापहम् ॥ २ ॥

व्रणाला आधीं विम्लापन करावें, नंतर अवसेचन करावें. तिसऱ्या वेळीं उपनाहन करावें (पोटीस बांधावें). चवथ्या वेळीं पाटन (फाडणें) करावें. पांचवें शोधन कर्म, सहावें रोपण (व्रण भरून आणणें) कर्म, आणि सातवें विकाराचा नाश करणें; असे हे सात उपचार क्रमानें करावे.

मृदुत्व आणणें.

अभ्यज्य स्वेदयित्वा तु वेणुनाड्या शनैःशनैः ।
विम्लापनार्थं गृह्णीत तलेनांगुष्ठकेन वा ॥ १ ॥

व्रणाच्या सुजेला तेल लावून वेळूच्या फुंकणीनें हळूहळू शेकावें आणि त्या सुजेला मृदुपणा येण्याकरितां तळहातानें किंवा अंगठ्यानें मर्दन करावें.

रक्त काढणें.

रक्तावसेचनं कुर्यादादावेव विचक्षणः ।
शोफे महति संवृद्धे वेदनावति वा व्रणे ॥ १ ॥
यो न याति शमं लेपात्स्वेदसेकापतर्पणैः ।
सोऽपि नाशं व्रजत्याशु शोथः शोणितमोक्षणात् ॥ २ ॥
एकतश्च क्रियाः सर्वा रक्तमोक्षणमेकतः ।
रक्तं हि विक्रियां याति तन्मोक्षे याति विक्रिया ॥ ३ ॥

व्रणाची सूज फार मोठी असून वेदना फार असतील तर विचक्षण वैद्यानें त्या सुजेंतील रक्त काढावें. जी व्रणाची सूज (व्रण) लेप, स्वेद, सेचन व अपतर्पण इत्यादिकांनीं बरी होत नाहीं, ती सूज देखील रक्त काढल्यानें त्वरित नाश पावते. व्रणावरील उपचाराच्या सर्व क्रिया एकीकडे व रक्तमोक्ष एकीकडे, इतकें रक्तमोक्षाचें महत्व आहे. कारण व्रणाच्या सुजेमध्यें रक्त हेंच विकार करणारें आहे, म्हणून तें काढून टाकलें असतां विकार नाहींसा होतो.

लेप.

मातुलुंगाग्निमन्थौ च सुरदारु महौषधम् ।
अहिंस्रा चैव रास्ना च प्रलेपो वातशोथहा ॥ १ ॥

१. गृण्हीयात् इत्यत्र मृद्गीयात् इति पाठांतरं शुद्धम् ।

कल्कः काञ्जिकसंपिष्टः स्निग्धः शाखोटकत्वचः ।
सुपर्ण इव नागानां वातशोथविनाशनः ॥ २ ॥

महाळुंगाचें मूळ, टाकळीमूळ, देवदार, सुंठ, जटामांसी आणि रास्ना ह्यांचा लेप वातजन्य व्रणाच्या सुजेचा नाश करतो. सोहाड्याची साल कांजींत वाटून तिचा स्निग्ध असा (तूप घालून) लेप करावा. गरुड जसा नागाचा नाश करतो त्याप्रमाणें तो व्रणाच्या सुजेचा नाश करतो.

दूर्वा च नलमूलं च मधुकं चन्दनं तथा ।
शीतलैश्च गणैः सर्वैः प्रलेपः पित्तशोफजित् ॥ ३ ॥

दुर्वांच्या मुळ्या, देवनळाचें मूळ, जेष्टमध, चंदन व सर्व शीतळ औषधें ह्यांचा लेप करावा. तो पित्तजन्य व्रणाच्या सुजेचा नाश करतो.

अजगन्धाऽश्वगन्धा च काला सरलया सह ।
कम्पिल्लका च शृंगी च प्रलेपः श्लेष्मशोथहा ॥ ४ ॥

रानतुळस, अश्वगंध, निळंबीची मुळी, सरळ देवदार, कपिला व काकडशिंगी ह्यांचा लेप कफजन्य सुजेचा नाश करतो.

कृष्णा पुराणपिण्याकं शिग्रुत्वक्सिकता शिवा ।
मूत्रपिष्टः सुखोष्णोऽयं प्रलेपः श्लेष्मशोथहा ॥ ५ ॥

पिंपळी, जुनी पेंड, शेवग्याची साल, साखर व हिरडेदळ ह्यांचा गोमूत्रांतून सुखोष्ण असा लेप करावा. तो कफजन्य व्रणाच्या सुजेचा नाश करतो.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षवेतसशेलुभिः ।
चन्दनद्वयमंजिष्ठायष्टीसूरणगैरिकैः ॥ ६ ॥
शतधौतघृतोन्मिश्रैर्लेपो रक्तप्रसादनः ।
दाहपाकरुजास्रावशोफनिर्वापणः परः ॥ ७ ॥
आगन्तुजे रक्तजे च एष लेपोऽतिपूजितः ॥ ८ ॥

वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी, वेत, भोकर, रक्तचंदन, पांढरा चंदन, मंजिष्ट, जेष्टमध, सुरण व सोनकाव ह्यांचा शतधौत घृतामध्यें कल्क करून लेप करावा. तो रक्ताला शुद्ध करतो. व दाह, पुटकुळ्या, ठणका, स्राव व सूज ह्यांचा नाश करतो. आगंतुक व्रणा-

वर व रक्तजन्य व्रणावर हा लेप फार चांगला आहे.

कटुतैलान्वितैर्लेपः सर्पनिर्मोकभस्मभिः ।
चयः शाम्यति गण्डस्य प्रकोपः स्फुटति द्रुतम् ॥ ९ ॥

सापाची कात जाळून तिचा मोहरीच्या (कडू) तेलांतून लेप करावा. तो सुजेमध्यें संचित झालेल्या दोषांचें शमन करतो (सूज बसवितो); आणि ते दोष क्षुब्ध झाले असल्यास त्वरित फोडून बाहेर काढतो.

न रात्रौ लेपनं दद्याद्दत्तं च पतितं तथा ।
न च पर्युषितं नैव शुष्यमाणं च धारयेत् ॥ १० ॥
शुष्यमाणमुपेक्षेत प्रदेहं पीडनं प्रति ।
न चापि मुखमालिम्पेत्तेन दोषः प्रसिच्यते ॥ ११ ॥

सुजेवर रात्रीं लेप देऊं नये. सुजेवर दिलेला लेप (वडी) पडला असतां पुनः तोच देऊं नये. शिळा लेप देऊं नये. दिलेला लेप वाळला असतां तो तसाच राखूं नये. जो व्रण सुकत चालला आहे त्याजवर लेप बांधूं नये. लेपानें व्रणाचें तोंड बंद करूं नये कारण त्यामुळें दोष सांठून राहतो.

न प्रशाम्यति यः शोफः प्रलेपादिविधानतः ।
द्रव्याणि पाचनीयानि दद्यात्तत्रोपनाहने ॥ १२ ॥

जी व्रणाची सूज लेपादि विधीनें बरी होत नाहीं, तिजवर व्रणाला पक्व करणाऱ्या द्रव्यांचें पोटीस बांधावें.

पोटीस.

सतिलाः सातसीबीजा दध्यम्लैः सक्तुपिण्डकाः ।
सकिण्वकुष्ठलवणाः शस्ताः स्युरुपनाहने ॥ १ ॥
तैलेन सर्पिषा वाऽपि द्वाभ्यां सक्तुकपिण्डका ।
सुखोष्णः शोथपाकार्थमुपनाहः प्रशस्यते ॥ २ ॥

तीळ व जवस आंबट दहीं इत्यादिकांत वाटून त्यांत किण्वक (सुराबीज), कोष्ट व मीठ ह्यांचें चूर्ण घालून त्याची वडी करून बांधावी. सातूच्या पिठांत तूप अथवा तेल अगर दोन्हीही घालून सूज पिकण्याकरितां पोटीस बांधावें.

फाडणें.

अन्तःपूयेष्ववक्त्रेषु तथैवोत्सङ्गवत्स्वपि ।

गतिमत्सु च रोगेषु भेदनं शस्तमुच्यते ॥ १ ॥

ज्यामध्यें पू झाला असून ज्याला तोंड पडलें नाहीं, ज्यानें आंत मध्यें मार्ग केला आहे व जो उंच वाढला आहे (असा व्रण फुटला नाहीं तर) तो फोडणें प्रशस्त आहे.

बलावृद्धासहक्षीणभीरूणां योषितामपि ।
मर्मोपरि च जातेषु पक्के शोफे च दारुणे ॥ २ ॥
चिरिबिल्वोऽग्निको दन्ती चित्रको हयमारकः ।
कपोतकङ्कगृध्राणां मलं लेपेन दारणम् ॥ ३ ॥

बाल, वृद्ध, असह (नाजूक मनुष्य), अशक्त, भित्रा मनुष्य व स्त्रिया ह्यांना झालेला व्रणशोथ आणि मर्मावर झालेला पक्क असा दारुण व्रणशोथ करंज, बिब्बा, दांतीमूळ, चित्रकमूळ, कणेरीची मुळी व पारवा, बगळा व गिधाड ह्यांची विष्टा ह्यांचा लेप करून फोडावा.

सर्जिकायावशूकाद्याः क्षारा लेपेन दारणाः ।
हेमकान्त्यास्तथा लेपो व्रणे परमदारणः ॥ ४ ॥

साज्जिखार, जवखार वगैरे क्षारांचा लेप केला असतां ते व्रणाला फोडतात. त्याचप्रमाणें दारुहळदीचा लेपही व्रणाचें भेदन करण्याविषयीं फार चांगला आहे.

शणमूलकशिग्रूणां फलानि तिलसर्षपाः ।
सक्तवः किण्वमतसी प्रदेहः पाचनः स्मृतः ॥ ५ ॥

तागाचें बी, मुळ्याचें बीं, शेवग्याचें बीं, तीळ, शिरस, सातु, सुराबीज व जवस ह्यांचा लेप व्रणाला पिकवितो.

दन्तीचित्रकमूलत्वक्स्नुह्यर्कपयसीगुडः ।
भल्लातकास्थिकासीससैन्धवैर्दारणः स्मृतः ॥ ६ ॥

दांतीमूळ, चित्रकमूळ, दालचिनी, निघारी निवडुंग व रुईचा चीक, गूळ, बिब्यांतील गोटंब्या, हिराकस व सेंधेलोण ह्यांचा लेप व्रणाला फोडतो.

हस्तिदन्तो जले घृष्टो बिन्दुमात्रः प्रलेपितः ।
अत्यन्तकठिने चापि शोफे पाचनभेदनः ॥ ७ ॥

हत्तीचा दांत पाण्यांत उगाळून त्याचा अत्यंत कठीण अशा सुजेवर एक ठिपका दिला असतां तो त्या सुजेला पिकवून फोडतो.

यवगोधूमचूर्णं च सक्षारं दारणं पृथक् ।

सातू व गहू ह्या प्रत्येकाचें पीठ क्षारमिश्र करून त्याचें पोटीस बांधलें असतां व्रणाचें भेदन होतें.

हरिद्राभस्मचूर्णाभ्यां प्रलेपो दारणः परः ।

हळदीची राख व चुना ह्यांचा लेप व्रणाची सूज फोडण्याविषयीं फार उत्तम आहे.

अजाविट्क्षारमृज्जश्च प्रलेपो व्रणदारणः ॥ ८ ॥

शेळीच्या लेंड्यांचा क्षार व सोरमीठ ह्यांचा लेप व्रणाचें भेदन करतो. (हा फोडण्याचा प्रकार सांगितला.)

ततः प्रक्षालने क्वाथः पटोलीनिम्बपत्रजः ।
अविशुद्धे विशुद्धे तु न्यग्रोधदित्वगुद्भवः ॥ १ ॥

व्रण फुटल्यावर अशुद्ध असल्यास तो धुण्याकरितां लिंबाचा पाला व कडु पडवळ ह्यांचा काढा घ्यावा. शुद्ध असल्यास तो धुण्याकरितां न्यग्रोधादि गणांतील औषधांचा काढा घ्यावा.

पञ्चमूलीद्वयं वाते न्यग्रोधादिश्च पैत्तिके ।

वातजन्य व्रण धुण्याकरितां दशमुळांचा काढा योजावा. पित्तजन्य व्रण धुण्याकरितां न्यग्रोधादि गणांतील औषधांचा काढा योजावा.

आरग्वधादिको योज्यः कफजे सर्वकर्मसु ॥ २ ॥

कफजन्य व्रणामध्यें सर्व कार्यांत आरग्वधादि गणांतील औषधांचा काढा योजावा.

शोधन व रोपण विधि.

तिलसैन्धवयष्ट्याह्वनिम्बपत्रनिशायुतैः ।
त्रिवृन्मधुयुतैः पिष्टैः प्रलेपो व्रणशोधनः ॥ १ ॥

तीळ, सेंधेलोण, जेष्टमध, कडुलिंबाचीं पानें, नळीचें तेड व मध ह्यांचा लेप व्रणाचें शोधन करतो.

तिलकल्कः सलवणो द्वे हरिद्रे त्रिवृद् घृतम् ।
मधुकं निम्बपत्राणि लेपः स्याद्व्रणशोधनः ॥ २ ॥

तिळाचा कल्क, मीठ, हळद, दारुहळद, नळीचें तेड, तूप,

---

१. हे गण सार्थ वाग्भट, सूत्रस्थान अ. पंधरामध्यें पहावें.

जेष्टमध व कडुनिंबाचीं पानें ह्यांचा लेप व्रणाचें शोधन करतो.

निम्बकोलकपत्राणां लेपः स्याद् व्रणशोधनः ।

कडुनिंबाचीं पानें व बोराचीं पानें यांचा लेप व्रणाचें शोधन करतो.

निम्बपत्रतिलैः कल्को मधुना व्रणशोधनः ॥ ३ ॥

कडुनिंबाचीं पानें व तीळ ह्यांचा मधामध्यें केलेला कल्क व्रणाचें शोधन करतो.

निम्बपत्रं तिला दन्ती त्रिवृत्सैन्धवमाक्षिकम् ।
दुष्टव्रणप्रशमनो लेपः शोधनरोपणः ॥ ४ ॥

कडुनिंबाचीं पानें, तीळ, दांतीमूळ, नळीचें तेड, व मध ह्यांचा कल्क दुष्ट व्रणाचें शमन करतो. हा व्रणाचें शोधन व रोपण करणारा आहे.

अभयात्रिवृतादन्तीलांगलीमधुसैन्धवैः ।
सुषवीपत्रधत्तूरकर्ममोटकुठेरिकाः ॥ ५ ॥
पृथगेते प्रलेपेन गम्भीरव्रणशोधनाः ।

हिरडे, तेड, दांतीमूळ, कळलावी, मध, सेंधेलोण, कारलीचीं पानें, धोतऱ्याचीं पानें, बाभळ व आजवला ह्या प्रत्येकाचा लेप खोल गेलेल्या व्रणाचें शोधन करणारा आहे.

निम्बपत्रमधुभ्यां तु युक्तः संशोधनः स्मृतः ॥ ६ ॥
एकं वा सारिवामूलं सर्वव्रणविशोधनम् ।

कडुनिंबाचा पाला व मध ह्यांचा कल्क उत्तम व्रणशोधक आहे. किंवा एकटें उपलसरीचें मूळ (अनंतमूळ) सर्व व्रणांचें शोधन करितें.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थकदम्बप्लक्षवेतसाः ॥ ७ ॥
करवीरार्ककटुकाकषायो रोपणे हितः ॥ ८ ॥

वड, उबंर, पिंपळ, कळंब, पिंपरणी, वेत, कणेर, रुई व कुटकी ह्यांचा काढा व्रणाचें रोपण करण्याविषयीं हितकारक आहे.

सप्तदलदुग्धकल्कः शमयति दुष्टव्रणं प्रलेपेन ।

सातविणीच्या सालीचा दुधांत कल्क करून त्याचा व्रणावर लेप करावा. तो दुष्ट व्रणाचा नाश करतो.

मधुयुक्ता शरपुङ्खा सर्वव्रणरोपिणी कथिता ॥ ९ ॥

उन्हाळीचा मधाशीं लेप करावा. तो सर्व व्रणाला भरून आणतो म्हणून सांगितलें आहे.

पञ्चवल्कलचूर्णैर्वा शुक्तिचूर्णसमायुतैः ।
धातकीलोध्रचूर्णैर्वा निःस्रावा हन्ति ते व्रणाः ॥ १० ॥

पंचवल्कलें व शिंपा ह्यांचें चूर्ण किंवा धायटीचीं फुलें व लोध्र यांचें चूर्ण व्रणावर टाकावें. तें व्रणाचा नाश करितें.

निम्बपत्रघृतक्षौद्रदार्वीमधुकसंयुता ।
वर्तिस्तिलानां कल्को वा शोधयेद्रोपयेद् व्रणम् ॥ ११ ॥

कडूलिंबाचीं पानें, तूप, मध, दारुहळद, आणि जेष्टमध ह्यांची वात अथवा तिळाचा काढा व्रणाचें शोधन व रोपण करतो.

निम्बशम्याकजात्यर्कसप्तपर्णाश्वमारकाः ।
कृमिघ्ना मूत्रसंयुक्ताः सेकलेपनधावनैः ॥ १२ ॥

बाळंतलिंब, बाहवा, जाई, रुई, सातवीण व कणेर, ह्यांचा गोमूत्रासह व्रण धुण्यांत, त्यावर लेप करण्यांत व शिंपडण्यांत उपयोग करावा. तो व्रणांतील कृमींचा नाश करतो.

करञ्जारिष्टनिर्गुण्डीरसो हन्याद् व्रणक्रिमीन् ।
लशुनेनाथ वा दद्याल्लेपनं कृमिनाशनम् ॥ १३ ॥

करंज, निंब व निर्गुडी ह्यांचा रस व्रणांतील कृमींचा नाश करतो. अथवा लसुणीचा लेप करावा; तोही कृमीचा नाश करतो.

निम्बपत्रवचाहिंगुसर्पिर्लवणसैन्धवैः ।
धूपनं कृमिरक्षोघ्नं व्रणकण्डूरुजापहम् ॥ १४ ॥

कडुनिंबाचीं पानें, वेखंड, हिंग, तूप, मीठ व सेंधेलोण ह्यांचीं धुरी व्रणांतील कृमी, कंडू, ठणका व राक्षसबाधा ह्यांचा नाश करिते.

ये क्लेदपाकस्रुतिगन्धवन्तो व्रणा महान्तः सरुजाः सशोथाः ।
प्रयान्ति ते गुग्गुलुमिश्रितेन पीतेन शान्तिं त्रिफलाजलेन ॥ १५॥

जे व्रण ओलसरपणा, पुटकुळ्या, स्राव व दुर्गंधी ह्यांनीं युक्त असून फार मोठे, अत्यंत ठणकणारे व सुजेनें युक्त असे असतात, ते त्रिफळ्याच्या काढ्यांतून गुग्गुळ घेतल्यानें शांत होतात.

गुग्गुलवटक.

त्रिफलाचूर्णसंयुक्तो गुग्गुलुर्वटकीकृतः ।
निषेवितो विबन्धघ्नो व्रणशोधनरोपणः ॥ १ ॥

गुग्गुळ व त्रिफळ्याचें चूर्ण समभाग एकत्र करून गोळ्या करून

त्या सेवन कराव्या. त्या मलबद्धतानाशक आणि व्रणाचें शोधन व रोपण करणाऱ्या आहेत.

विडंगादि गुग्गुळ.

विडंगत्रिफलाव्योषचूर्णं गुग्गुलुना समम् ।
सर्पिषा वटकान्कुर्यात्खादेद्वा हितभोजनः ।
दुष्टव्रणापचीमेहकुष्ठनाडीविशोधनः ॥ १ ॥

वावडिंगें, त्रिफळा, सुंठ, मिरें, पिंपळी, व सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ घेऊन गोळ्या करून तुपाशीं खाव्या व पथ्य करावें. म्हणजे हा विडंगादि गुग्गुळ दुष्ट व्रण अपची, प्रमेह, कुष्ठ, व नाडीव्रण ह्यांचें शोधन करितो.

अमृतादि गुग्गुळ.

अमृतापटोलमूलत्रिकटुत्रिफलाकृमिघ्नानाम् ।
कृत्वा समभागचूर्णं तत्तुल्यो गुग्गुलर्योज्यः ॥ १ ॥
प्रतिवासरमेकैकां गुटिकां खादेत्तथाऽक्षपरिमाणाम् ।
जेतुं व्रणवातास्रं गुल्मोदरपाण्डुशोथादीन् ॥ २ ॥

गुळवेल, कडुपडवळ, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व वावडिंग ह्या सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ घेऊन एक एक तोळ्याच्या गोळ्या करून व्रण, वातरक्त, गुल्म, उदर, पांडुरोग, व सूज हे विकार जिंकण्याकरितां रोज एक एक गोळी खावी.

जात्यादि घृत.

जातीपत्रपटोलनिम्बकटुकादार्वीनिशासारिवा-
मंजिष्ठाभयतुत्थसिक्थमधुकैर्नक्ताह्वबीजान्वितैः ।
सर्पिः सिद्धमनेन सूक्ष्मवदना मर्माश्रिताः स्राविणो
गम्भीराः सरुजो व्रणाः सगतिकाः शुध्यंति रोहन्ति च ॥

जाईचीं पानें, कडुपडवळ, कडुनिंबाची साल, कुटकी, दारुहळद, हळद, उपळसरी, मंजिष्ठ, हिरडेदळ, मोरचूत, मेण, जेष्ठमध व करंजाचें बी, ह्यांच्या काढ्यानें व कल्कानें तूप सिद्ध करावें. ह्या तुपानें सूक्ष्म छिद्राचे, मर्मावर झालेले, स्रवणारे, खोल गेलेले, ठणका असलेले व आंत गति असलेले असे व्रण शुद्ध होतात व भरून येतात.

स्वर्जिकादि घृत.

स्वर्जिका च यवक्षारः कम्पिल्लं च हरेणुका ।

टङ्कणं श्वेतखदिरं तुत्थं चूर्णं च गोघृतैः ॥ १ ॥
सर्वं समांशं संचूर्ण्य मर्दयेत्प्रहरं दृढम् ।
स्वर्जिकाद्यमिदं सर्पिः सर्वव्रणहरं परम् ॥
रोपणं कृमिकण्डूघ्नं सवर्णकरणं परम् ॥ २ ॥

साजिखार, जवखार, कपिला, रेणुकबीज, टाकणखार, पांढरा कात, व मोरचूत, ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करून त्याचा गाईच्या तुपांत एक प्रहरपर्यंत खल करावा. हें स्वर्जिकादि तूप सर्व व्रणांचें नाशक, व्रणाला भरून आणणारें, व्रणांतील कृमि व कंडू यांचें नाशक असून व्रणाचा डाग नाहींसा करितें.

मनशिलादि लेप.

मनःशिला समञ्जिष्ठा सक्षारा रजनीद्वयम् ।
प्रलेपः सघृतक्षौद्रस्त्वग्विशुद्धिकरः स्मृतः ॥ १ ॥

मनशीळ, मंजिष्ट, जवखार, हळद व दारुहळद ह्यांचा गाईचें तूप व मध ह्यांतून लेप करावा. तो त्वचेची शुद्धि करतो (व्रणाचा डाग नाहींसा करतो.)

पारदादि मलहर.

रसगन्धकयोश्चूर्णं तत्समं मुर्दशङ्खकम् ।
सर्वतुल्यं तु कम्पिल्लं किंचित्तुत्थसमन्वितम् ॥ १ ॥
सर्वं संभेलयेद्दत्वा घृतं सर्वाच्चतुर्गुणम् ।
पिचुप्लुतं प्रदातव्यं दुष्टव्रणविशोधनम् ॥ २ ॥
नाडीव्रणहरं चैव सर्वव्रणनिषूदनम् ।
ये व्रणा न प्रशाम्यन्ति भेषजानां शतेन च ॥
अनेन ते प्रशाम्यन्ति सर्पिषा स्वल्पकालतः ॥ ३ ॥

पारा एक भाग व गंधक एक भाग ह्यांची कज्जली, तिच्या बरोबरीनें म्हणजे दोन भाग मुरदाडशिंगी, सर्वांच्या बरोबरीनें कपिला, किंचित् मोरचुताची लाही व ह्या सर्वांच्या चौपट तूप घालून मलम तयार करावें; आणि तें कापसाला लावून व्रणावर ठेवावें. हें दुष्ट व्रणाची शुद्धि करितें. नाडीव्रणाचा व सर्व व्रणांचा नाश करितें. शेंकडों औषधोपचारानें जे व्रण बरे होत नाहींत, ते ह्या तुपानें (मलमानें) थोड्याच काळांत बरे होतात.

दुसरा पारदादि मलहर.

रसगन्धकसिन्दूररालकम्पिल्लमुर्डकम् ।
तुत्थं खादिरकं चूर्णं सर्वं घृतचतुर्गुणम् ॥ १ ॥
युक्त्या संमेल्य पिचुना व्रणे देयं विजानता ।
सर्वव्रणप्रशमनं घृतमेतन्न संशयः ॥ २ ॥

पारा, गंधक, शेंदूर, राळ, कपिला, मुरडशेंग, मोरचूत व कात हीं औषधें समभाग व तूप सर्वांच्या चौपट घेऊन युक्तीनें मलम करून कापसाला लावून व्रणांत भरावें. हें तूप (मलम) सर्व व्रणांचें नाशक आहे, ह्यांत संशय नाहीं.

अयोरजादि लेप.

अयोरजः सकासीसं त्रिफला कुसुमानि च ।
प्रलेपः कुरुते दार्व्या सद्य एव नवां त्वचम् ॥ १ ॥

लोहभस्म, हिराकस, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, धायटीचीं, फुलें व दारुहळद ह्यांचा लेप व्रणावर नवी त्वचा लवकर आणतो.

सद्योव्रणनिदान.

नानाधारामुखैः शस्त्रैर्नानास्थाननिपातितैः ।
भवन्ति नानाकृतयो व्रणास्तांस्तान्निबोध मे ॥ १ ॥

नानाप्रकारच्या धारांचीं व नानाप्रकारच्या तोंडांचीं शस्त्रें अनेक ठिकाणीं लागून त्यांच्यापासून नानाप्रकारच्या आकाराचे व्रण होतात. ते सर्व सांगतों.

त्यांचे सहा प्रकार.

छिन्नं भिन्नं तथा विद्धं क्षतं पिच्चितमेव च ।
घृष्टमाहुस्तथा षष्ठं तेषां वक्ष्यामि लक्षणम् ॥ २ ॥

छिन्न, भिन्न, विद्ध, क्षत, पिच्चित्, व घृष्ट असे सद्योव्रणाचे सहा प्रकार आहेत. त्यांचें आतां लक्षण सांगतों.

तिर्यक्छिन्नं ऋजुर्वाऽपि व्रणो यस्त्वायतो भवेत् ।
गात्रस्य पातनं तद्धि च्छिन्नमित्यभिधीयते ॥ ३ ॥

जो व्रण आडवा सरळ किंवा लांबट असा होतो व ज्यापासून शरीराचा कांहीं भाग तुटून पडतो, त्याला छिन्न (छेदनामुळें झालेला) व्रण म्हणतात.

शक्तिकुन्तेषुखड्गाग्रविषाणैराशयो हतः ।
यत्किंचित्प्रस्रवेत्तद्धि भिन्नलक्षणमुच्यते ॥ ४ ॥

भाला, बाण, तलवार, शिंग इत्यादिकांनीं कोठा वगैरे आशय फुटला असतां त्यांतून स्राव होतो, त्याला भिन्न व्रण असें म्हणतात.

स्थानान्यामाग्निपक्वानां मूत्रस्य रुधिरस्य च ।
हृदुन्डुकः फुप्फुसश्च कोष्ठ इत्यभिधीयते ॥ ५ ॥

आमाशय, अग्न्याशय, पक्वाशय, मूत्राशय, रक्ताशय, हृदय, उंडुक, फुप्फुस ह्यांना कोष्ठ असें म्हणतात.

तस्मिन्भिन्ने रक्तपूर्णे ज्वरो दाहश्च जायते ।
मूत्रमार्गगुदास्येभ्यो रक्तं घ्राणाच्च गच्छति ॥ ६ ॥
मूर्च्छाश्वासस्तृषाऽऽध्मानमभक्तच्छन्द एव च ।
विण्मूत्रवातसङ्गश्च स्वेदस्रावोऽक्षिरक्तता ॥ ७ ॥
लोहगन्धित्वमास्यस्य गात्रे दौर्गन्ध्यमेव च ।
हृच्छूलं पार्श्वयोश्चापि विशेषं चात्र मे शृणु ॥ ८ ॥

कोठा फुटून रक्तानें भरला असतां ज्वर व दाह हे उत्पन्न होतात. मूत्रमार्ग, गुद, तोंड व नाक यांमधून रक्त वाहूं लागतें. मूर्च्छा, श्वास, तहान, पोट फुगणें, अन्नावर वांच्छा नसणें, मळ, मूत्र व वायु ह्यांचा अवरोध, घाम येणें, डोळे लाल होणें, तोंडाला लोखंडाप्रमाणें घाण येणें, अंगाला दुर्गंधी, हृदय व बरगड्या ह्यांमध्यें दुखणें हीं लक्षणें होतात. (आशयपरत्वें) विशेष लक्षणें होतात, तीं ऐकः—

आमाशयस्थे रुधिरे रुधिरं छर्दयत्यपि ।
आध्मानमतिमात्रं च शूलं च भृशदारुणम् ॥ ९ ॥

आमाशयामध्यें रक्त सांठलें असतां रक्ताची वांती होते, पोट अत्यंत फुगतें व अतिशय शूळ होतो.

पक्वाशयगते चापि रुजा गौरवमेव च ।
अधःकाये विशेषेण शीतता च भवेदिह ॥ १० ॥

पक्वाशयामध्यें रक्त सांठलें असतां देखील शूळ होतो. अंग जड होतें, आणि शरीराचा खालचा भाग विशेष गार होतो.

सूक्ष्मास्यशल्याभिहतं यदङ्गं त्वाशयं विना ।
उत्तुण्डितं निर्गतं वा तद्विद्धमिति निर्दिशेत् ॥ ११ ॥

बारीक टोकांचें शस्त्र आशयावांचून शरीराच्या इतर भागांत घुसून आंत अडकून राहिलें असतां त्याला उत्तुंडित (विद्ध) व्रण म्हणतात. शस्त्र (शल्य) घुसलेलें निघून जाऊन जी जखम होते तिला निर्गतविद्ध असें म्हणतात.

नातिच्छिन्नं नातिभिन्नमुभयोर्लक्षणान्वितम् ।
विषमं व्रणमङ्गे यत्तत्क्षतं तु विनिर्दिशेत् ॥ १२ ॥

जी जखम अतिशय भिन्न झालेली नसते, म्हणजे शरीराचा एखादा भाग अजिबात तुटत नाहीं, किंवा अतिशय भोसकलाही जात नाहीं, पण दोघांचीं मिश्र लक्षणें ज्यांत असतात व जखम वांकडीतिकडी असते त्याला क्षत असें म्हणतात.

प्रहारपीडनाभ्यां तु यदङ्गं पृथुतां गतम् ।
सास्थि तत्पिच्चितं विद्यान्मज्जरक्तपरिप्लुतम् ॥ १३ ॥

दगड, काठी इत्यादिकांचा घाव लागून किंवा ठेचून अगर चेंगरून शरीराचा एखादा भाग पसरून चपटा होतो. आणि त्यांतून रक्त व मांस बाहेर येतें. त्याला पिच्चित व्रण असें म्हणतात.

घर्षणादभिघाताद्वा यदङ्गं विगतत्वचम् ।
ऊषास्रावान्वितं तच्च घृष्टमित्यभिधीयते ॥ १४ ॥

कांहीं खरडल्यानें किंवा आघात झाल्यानें अंग खरडून त्याजवरील साल (त्वचा) निघून जाते, त्यामुळें त्या ठिकाणीं आग होऊन रक्त निघतें. त्याला घृष्ट व्रण असें म्हणतात.

श्यावं सशोफं पिटिकान्वितं च मुहुर्मुहुः शोणितवाहिनं च ।
मृदून्नतं बुद्बुदतुल्यमांसं व्रणं सशल्यं सरुजं वदन्ति ॥ १५ ॥

जो व्रण दिसण्यांत निळसर असून ज्यांला सूज असते, ज्यावर बारीक बारीक पुळया येतात, ज्यांतून वरचेवर रक्त वाहातें, जो मऊ व वर उचललेला असतो, ज्यावर बुडबुड्याप्रमाणें मांस येतें, आणि ज्यांत सलल्याप्रमाणें पीडा होते, त्या व्रणांत शल्य आहे असें समजावें.

त्वचोऽतीत्य शिरादीनि भित्त्वा च परिहृत्य वा ।
कोष्ठे प्रतिष्ठितं शल्यं कुर्यादुक्तानुपद्रवान् ॥ १६ ॥

त्वचा फाडून तिच्यापलीकडील शिरांचा भेद करून किंवा त्यांना

आंत ओढून जें शल्य कोठ्यांत राहतें, तें देखील सांगितलेले उपद्रव करितें.

तत्रान्तर्लोहितं पाण्डुशीतपादकराननम् ।
शीतोच्छ्वासं रक्तनेत्रमानद्धं परिवर्जयेत् ॥ १७ ॥

ज्याचें कोठ्यांतील रक्त बाहेर न जातां आंत सांठून राहिलें आहे, अंग पांढुरकें झालें आहे, हात, पाय व तोंड हीं गार झालीं आहेत, तोंडानें शीत श्वास येत आहे, डोळे लाल झाले आहेत व पोट फुगलें आहे, अशा व्रणी मनुष्याला असाध्य म्हणून सोडावें.

भ्रमः प्रलापः पतनं प्रमोहो विचेष्टनं ग्लानिरथोष्णता च ।
स्रस्ताङ्गता मूर्छनमूर्ध्ववातस्तीव्रा रुजो वातकृताश्च तास्ताः १८
मांसोदकाभं रुधिरं च गच्छेत्सर्वेन्द्रियार्थोपरमस्तथैव ।
दशार्धसंख्येष्वपि विक्षतेषु सामान्यतो मर्मसु लिङ्गमुक्तम् १९

भ्रम, बडबड, कारणावांचून पडणें, मूर्च्छा, हातपाय अस्ताव्यस्त टाकणें, ग्लानि, उकडणें, अंग गळणें, मूर्च्छा, उर्ध्ववात (वर दम लागणें) वातामुळें तीव्र वेदना, जखमेंतून मांस धुतलेल्या पाण्याप्रमाणें पाणी येणें, व सर्व इंद्रियें आपआपल्या कामास असमर्थ होणें हीं लक्षणें पांचही मर्माचे ठिकाणीं जखम झाली असतां होतात.

सुरेन्द्रगोपप्रतिमं प्रभूतं रक्तं स्रवेत्तत्क्षतजश्च वायुः ।
करोति रोगान्विविधान्यथोक्ताञ्छिरासु विद्धास्वथ वा क्षतेषु २०

शिरांचा वेध झाला असतां त्यांतून इंद्रगोप किड्याच्या रंगाप्रमाणें तांबडें व पुष्कळ रक्त वाहतें. त्यामुळें शिरामध्यें किंवा क्षतांमध्यें कुपित झालेला वायु अनेक प्रकारच्या वातजन्य पीडा उत्पन्न करितो.

कौब्जं शरीरावयवावसादः क्रियास्वशक्तिस्तुमुला रुजश्च ।
चिराद्व्रणो रोहति यस्य चापि तं स्नायुविद्धं पुरुषं व्यवस्येत् ॥ २१

कुबडेपणा, अंग व अवयव गळल्यासारखें होणें, एकादें काम करण्यास असमर्थता, अत्यंत वेदना आणि व्रण भरून येण्यास फार दिवस लागणें हीं लक्षणें स्नायु विद्ध झाल्यानें होणाऱ्या व्रणांत होतात.

शोफाभिवृद्धिस्तुमुला रुजश्च बलक्षयः पर्वसु भेदशोफौ ।
क्षतेषु संधिष्वचलाचलेषु स्यात्सर्वकर्मोपरमश्च लिङ्गम् ॥ २२ ॥

चल किंवा अचल सांध्यांचा वेध झाला असतां, सुजेची वाढ होते, वेदना फार होतात, शक्ति क्षीण होते, हाडांचीं पेरें फुटतात व सुजतात, व कोणतेंही काम करण्याविषयीं उमेद नसते.

घोरा रुजो यस्य निशादिनेषु सर्वास्ववस्थासु न चैति शान्तिम् ।
भिषग्विपश्चिद्विदितार्थसूत्रस्तमस्थिविद्धं मनुजं व्यवस्येत् ॥ २३ ॥

हाडाचा वेध झाला असतां रात्रंदिवस भयंकर वेदना होतात. व कोणत्याही स्थितीमध्यें शांतपणा वाटत नाहीं, असें शास्त्रज्ञ वैद्य म्हणतात.

यथास्वमेतानि विभावयेच्च लिङ्गानि मर्मस्वभिताडितेषु ।

मर्माचे ठिकाणीं अभिघात होऊन वेध झाला असतां वर सांगितलेलीं लक्षणें त्या त्या मर्माच्या अनुरोधानें होतात.

पाण्डुर्विवर्णश्च सुखं न वेत्ति यो मांसमर्मण्यभिताडितश्च ॥ २४॥

मांसमर्माचा वेध झाला असतां स्पर्श कळत नाहीं, शरीर पांढें फटफटीत होतें किंवा शरीराचा वर्ण बदलतो, आणि व्रणाचे ठिकाणीं स्पर्श झालेला कळत नाहीं.

मर्माश्रितं व्रणं प्राप्य वायुर्यः सर्वदेहगः ।
वेगैरायामयेद्देहं व्रणायामं तु तं त्यजेत् ॥ २५ ॥

सर्व देहांत संचार करणारा वायु मर्मस्थानीं झालेल्या व्रणाचे ठिकाणीं येऊन वेगानें सर्व शरीर ताठवितो. त्याला व्रणायाम असें म्हणतात.

विसर्पः पक्षघातश्च शिरास्तम्भोऽपतानकः ।
मोहोन्मादव्रणरुजो ज्वरतृष्णाहनुग्रहाः ॥ २६ ॥
कासश्छर्दिरतीसारो हिक्का श्वासः सवेपथुः ।
षोडशोपद्रवाः प्रोक्ता व्रणिनां व्रणचिन्तकैः ॥ २७ ॥

विसर्प, पक्षाघात, शिरा ताठणें, अपतानक, मूर्च्छा, उन्माद, व्रणामध्यें वेदना, ताप, तहान, हनुग्रह, खोकला, ओकारी, अतिसार, उचकी, श्वास व अंग कांपणें हे व्रणाचे सोळा उपद्रव आहेत. असें व्रणासंबंधीं विचार करणाऱ्या वैद्यांनीं सांगितलें आहे.

सद्योव्रणचिकित्सा.

बुद्ध्वाऽऽगन्तुव्रणं वैद्यो घृतक्षौद्रसमन्विताम् ।
शीतां क्रियां चरेदाशु रक्तपित्तोष्मनाशिनीम् ॥ १ ॥
क्रुद्धे सद्योव्रणे युंज्यादूर्ध्वं चाऽधश्च शोधनम् ।
लंघनं च बलं ज्ञात्वा भोजनं चास्रमोक्षणम् ॥ २ ॥

वैद्यानें आगंतुक व्रणाची नीट परीक्षा करून रक्त, पित्त व उष्णता यांचे नाशक व ज्यांत तूप व मध मिश्र केले आहेत असे शीत उपचार त्वरित करावे. आगंतुक व्रण (सद्योव्रण) विकोपास गेल्यास वमन व विरेचन द्यावें. आणि शक्तिमानाप्रमाणें लंघन व भोजन करवावें व व्रणांतील रक्त काढावें.

घृष्टे विदलिते चैव सुतरामिष्यते विधिः ।
तयोरल्पं स्रवत्यस्रं पाकस्तेनाऽऽशु जायते ॥ ३ ॥

खरडून किंवा ओरबडून त्वचा विदीर्ण झाली असतां त्या जखमेंतून रक्त फार जात नाहीं, त्यामुळें ती जखम लवकर पिकते. म्हणून त्याजवर जलद उपचार करावे.

छिन्ने भिन्ने तथा विद्धे क्षते चासृगतिस्रवेत् ।
रक्तक्षयात्तत्र रुजः करोति पवनो भृशम् ॥ ४ ॥
स्नेहपानपरीषेकलेपस्वेदोपनाहनम् ।
कुर्वीत स्नेहबस्तिं च मारुतघ्नौषधैः शृतैः ॥ ५ ॥

छिन्न, भिन्न, विद्ध, व क्षत ह्या जातीच्या जखमांतून अतिशय रक्त वाहतें. त्यामुळें रक्ताचा क्षय होतो. आणि रक्ताचा क्षय झाल्याकारणानें वात वाढून तो जखमेंत अतिशय ठणका उत्पन्न करतो. ह्यासाठीं तेल पिणें, जखमेवर तेल शिंपडणें, लेप, शेकणें, व पोटीस बांधणें ह्या क्रिया कराव्या आणि वातनाशक अशा औषधांनीं सिद्ध केलेल्या तेलाचे बस्ती द्यावे.

अन्य ग्रंथांतून म्हटलें आहे.

छिन्ने भिन्ने तथा विद्धे क्षते सद्यो भिषग्वरः ।
पट्टसूत्रेण संस्वेदं कुर्याद् व्रणविशारदः ॥ १ ॥
मुहुर्मुहुर्यथा दुःखं न प्राप्नोति व्रणी नरः ।
अथवा दीप्यलवणपोटल्या स्वेदयेन्मुहुः ॥ २ ॥
संतप्तया तप्तलोहपात्रसंयोगतः क्रमात् ।

दुष्टं रक्तं स्थितं चापि शृङ्ग्यलाब्वादिभिर्हरेत् ॥ ३ ॥

छिन्न, भिन्न, विद्ध, व क्षत ह्या जातीचे व्रण (जखमा) झाले असतां चतुर वैद्यानें वस्त्रानें बांधून, व्रणी मनुष्याला दुःख होणार नाहीं अशा बेतानें, वरचेवर स्वेदन करावें. किंवा ओवा व मीठ ह्यांची पोटली करून ती तापलेल्या कोखंडाच्या भांड्यांत ठेवून ती ऊन झाल्यावर तिनें वरचेवर शेकावें. नासकें रक्त साखळून राहिलें असल्यास तुंबडीनें किंवा भोपळ्यानें तें काढून टाकावें.

सद्यःक्षतव्रणं वैद्यः सशूलं परिषेचयेत् ।
यष्टीमधुकमिश्रेण नातिशीतेन सर्पिषा ॥ ४ ॥
कषायमधुराः शीताः क्रियाः सर्वास्तु योजयेत् ।
सद्योव्रणानां सप्ताहात्पश्चात्पूर्वोक्तमाचरेत् ॥ ५ ॥
चिकित्सितं तु तत्सर्वं सामान्यव्रणनाशनम् ।

ज्या आगंतुक व्रणामध्यें ठणका आहे त्याजवर प्रथम ७ दिवसपर्यंत जेष्टमधाचा कल्क घातलेल्या व फार थंड नाहीं अशा तुपानें सिंचन करावें, आणि तुरट, मधुर, व थंड असे सर्व उपचार करावे. ह्याप्रमाणें सात दिवस केल्यावर मग पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शोधनरोपणादि सामान्य व्रणचिकित्सेंत सांगितलेले व्रणनाशक उपचार करावे.

आमाशयस्थे रुधिरे वमनं पथ्यमुच्यते ।
पक्वाशयस्थे देयं च विरेचनमसंशयम् ॥ ६ ॥

आमाशयांत रक्त सांठलें असल्यास वमन देणें हितकारक आहे. आणि पक्वाशयांत रक्त सांठलें असल्यास रेचक देणें निःसंशय हितकारक आहे.

वंशत्वगादि काढा.

क्वाथो वंशत्वगेरण्डश्वदंष्ट्राश्मभिदा कृतः ।
हिंगुसैन्धवसंयुक्तः कोष्ठस्थं स्रावयेदसृक् ॥ १ ॥

कळकाची साल, एरंडमूळ, सराटे व पाषाणभेद ह्यांचा काढा हिंग व सैंधव घालून द्यावा. तो कोठ्यांत सांठलेल्या रक्ताला बाहेर सोडतो.

यवादि काढा.

यवकोलकुलत्थानां निःस्नेहेन रसेन च ।
भुञ्जीतान्नं यवागूं वा पिबेत्सैन्धवसंयुताम् ॥ १ ॥

सातू, बोरें व हुलगे ह्यांचें सार किंवा कढण तूप किंवा तेल न घालतां घेऊन त्याजबरोबर जेवावें; किंवा त्यांची कण्हेरी करून सैंधेलोण घालून ध्यावी.

गौरादिघृत.

गौरा हरिद्रा मञ्जिष्ठा मांसी मधुकमेव च ।
प्रपौण्डरीकं ह्रीबेरं नतं मुस्तं च चन्दनम् ॥ १ ॥
जाती निम्बपटोलं च करञ्जं कटुरोहिणी ।
मधूच्छिष्टं मधूकं च महामेदा तथैव च ॥ २ ॥
पञ्चवल्कलतोयेन घृतप्रस्थं विपाचयेत् ।
एतद्गौरादिकं सर्पिः सर्वव्रणविशोधनम् ॥ ३ ॥
आगन्तुकाश्च सहजाः सुचिरोत्थाश्च ये व्रणाः ।
नाडीव्रणश्च विषमो नश्यत्येव न संशयः ॥ ४ ॥

गोरोचन, हळद, मंजिष्ट, जटामांशी, जेष्टमध, पुंडरीक वृक्षाची साल, वाळा, तगर, नागरमोथे, चंदन, जाईचीं पानें, कडुनिंबाचीं पानें, कडू पडवळ, करंजाची साल, कुटकी, मेण, मोहाचीं फुलें, महामेदा आणि वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी व आंबा ह्यांच्या साली, ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें चौसष्ट तोळे तूप तयार करावें. हें गौरादिघृत सर्व व्रणांचें शोधन करितें. आगंतुकव्रण, शारीरव्रण, फार दिवसांचे जुनाट व्रण, नाडीव्रण व विषमव्रण ह्यांचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं.

तिक्तादिघृत.

तिक्तासिक्थनिशायष्टीनक्ताह्वफलपल्लवैः ।
पटोलमालतीनिम्बपत्रैर्वर्ण्यं शृतं घृतम् ॥ १ ॥

कुटकी, मेण, हळद, जेष्टमध, करंजाचीं फळें व पानें, पडवळ, मालतीचीं फुलें व कडुनिंबाचीं पानें ह्यांचा कल्क व काढा ह्यांमध्यें तूप तयार करावें. तें वर्ण चांगला करितें, म्हणजे व्रणाचा डाग घालवितें.

जात्यादि तेल.

जातीनिम्बपटोलानां नक्तमालस्य पल्लवाः।
सिक्थकं मधुकं कुष्ठं द्वे निशे कटुरोहिणी ॥ १ ॥
मञ्जिष्ठा पद्मकं लोध्रमभया नीलमुत्पलम्।
तुत्थकं सारिवा बीजं नक्तमालस्य च क्षिपेत् ॥ २ ॥
एतानि समभागानि पिष्ट्वा तैलं विपाचयेत्।
विषव्रणसमुत्पत्तौ स्फोटेषु च सकच्छुषु ॥ ३ ॥
कण्डूविसर्परोगेषु कीटदष्टेषु सर्वथा।
सद्यःशस्त्रप्रहारेषु दग्धविद्धक्षतेषु च ॥ ४ ॥
नखदन्तक्षते देहे दुष्टमांसावघर्षणे।
म्रक्षणार्थमिदं तैलं हितं शोधनरोपणम् ॥ ५ ॥

जाई, कडुनिंब, कडु पडवळ व करंज ह्यांचीं पानें, मेण, जेष्टमध, कोष्ट, हळद, दारुहळद, कुटकी, मंजिष्ट, पद्मकाष्ठ, लोध्र, हिरडे, निळें कमळ, मोरचूद, उपळसरी व करंजाचें बीं हीं औषधें समभाग घेऊन विधियुक्त तेल पचन करावें. हें जात्यादि तेल विषासंबंधी व्रण, फोड, खरूज, कंड, विसर्प, किड्यांनीं चावल्यामुळें झालेली जखम, आगंतुक व्रण, दग्धव्रण (भाजून झालेली जखम), विद्धव्रण, क्षतव्रण, नखें व दांत ह्यांनीं झालेले व्रण व खरडल्यामुळें मांस दूषित होऊन झालेले व्रण ह्यांजवर माखण्याकरितां हितकारक असून शोधन व रोपण आहे.

विपरीतमल्ल तेल.

सिन्दूरकुष्ठविषहिंगुरसोनचित्र-
बाणांघ्रिलाङ्गलिककल्कविपक्वतैलम्।
प्रासादमण्डनयुतश्चसतुत्थफेनः
क्लिन्नव्रणप्रशमने विपरीतमल्लः ॥ १ ॥
खड्गाभिघातगुरुगण्डमहोपदंशनाडीव्रणव्रणविचर्चिककुष्ठपामाः॥
एतान्निहन्ति विपरीतकमल्लनाम तैलं यथेष्टशयनाशनभोजनस्य २

शेंदूर, कोष्ट, बचनाग, हिंग, लसूण, चित्रकमूळ, तिरकांड्याचें मूळ व कळलावी ह्यांचा कल्क व काढा ह्यांत तेल सिद्ध करावें. व हरताळ, मोरचूत व समुद्रफेंस किंवा अफू मिश्र करून मलम तयार करावें. ओल्या (पू असलेल्या) व्रणावर लावण्याकरितां हा योग

सांगितला आहे. ह्याला विपरीतमल्ल असें म्हणतात. तरवारीचा घाव, मोठ्या गांठी, मोठा उपदंश, नाडीव्रण, शारीर व्रण, विचर्चिका, कुष्ट, खरूज, ह्या विकारांचा हें विपरीतमल्ल तेल, यथेच्छ मनुष्य आहारादिक करीत असतांही नाश करितें.

दूर्वादि तेल.

दूर्वास्वरससंसिद्धं तैलं कम्पिल्लकेन वा ।
दार्वीत्वचश्च कल्केन प्रधानं व्रणरोपणम् ॥ १ ॥

दूर्वांचा स्वरस अथवा कपिला किंवा दारुहळद ह्यांचा कल्क ह्यानें तेल सिद्ध करावें. तें व्रणाचें रोपण करणारें आहे.

सप्तविंशतिगुग्गुल.

त्रिकटुत्रिफलामुस्ताविडङ्गामृतचित्रकम् ।
पटोलं पिप्पलीमूलं हपुषा सुरदारु च ॥ १ ॥
तुम्बरुः पुष्करं चव्यं विशाला रजनीद्वयम् ।
विडं सौवर्चलं क्षारं सैन्धवं गजपिप्पली ॥ २ ॥
यावन्त्येतानि सर्वाणि तावद्द्विगुणगुग्गुलुः ।
कोलप्रमाणां वटिकां भक्षयेन्मधुना सह ॥ ३ ॥
कासं श्वासं तथा शोफमर्शांसि च भगंदरम् ।
हृच्छूलं पार्श्वशूलं च कुक्षिबस्तिगुदे रुजम् ॥ ४ ॥
अश्मरीं मूत्रकृच्छ्रं च अन्त्रवृद्धिं तथा क्रमीन् ।
चिरज्वरोपसृष्टानां क्षतोपहतचेतसाम् ॥ ५ ॥
आनाहं च तथोन्मादं कुष्ठान्युदराणि च ।
नाडीदुष्टव्रणान्सर्वान्प्रमेहाञ्श्लीपदं तथा ॥ ६ ॥
सप्तविंशतिको नाम गुग्गुलुः प्रथितो महान् ।
धन्वन्तरिकृतो ह्येष सर्वरोगनिषूदनः ॥ ७ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, वावडिंग, गुळवेल, चित्रकमूळ, कडु पडवळ, पिंपळमूळ, शेरणी, देवदार, चिरफळें, पोखरमूळ, चवक, कडुवृंदावनाचें मूळ, हळद, दारुहळद, बिडलोण, पादेलोण, जवखार, सैंधेलोण व गजपिंपळी; हीं सर्व औषधें समभाग व सर्वांच्या दुप्पट गुग्गुळ घेऊन, सर्वांचा खल करून सहा सहा माशांची गोळी करावी, आणि मधाशीं खावी; म्हणजे खोकला, श्वास, सूज, मूळव्याध, भगंदर, हृदयांतील शूळ,

बरगड्यांतील शूळ, कुशी, बस्ती व गुद ह्या ठिकाणचा शूळ; मूतखडा, मूत्रकृच्छ्र, अंत्रवृद्धि, कृमि, फार दिवसांच्या ज्वरानें पीडलेले, व्रणानें पीडलेले, आनाहरोग, उन्मादरोग, कुष्ठ, आठ उदरें, नाडीव्रण, दुष्ट व्रण, सर्व प्रमेह आणि श्लीपद ह्या विकारांवर हा श्रेष्ठ सप्तविंशतिगुग्गुल सांगितला आहे. धन्वंतरीनें तयार केलेला हा गुग्गुळ सर्व रोगांचा नाश करतो.

अपथ्य.

व्रणे श्वयथुरायासात्स च रागश्च जागरात्।
तौ च रुक् दिवास्वापात्ते च मृत्युश्च मैथुनात् ॥ १ ॥

व्रणाच्या आजारांत श्रम केले असतां सूज वाढते. आणि जागरणामुळें लाली येते. दिवसा निजण्यानें सूज व लाली हे दोन्ही विकार होऊन शिवाय ठणका लागतो; आणि मैथुनामुळें तर हे चारी विकार होऊन शिवाय मृत्यु येतो.

अम्लं दधि च शाकं च मांसमानूपवारिजम्।
क्षीरं गुरूणि चान्नानि व्रणी च परिवर्जयेत् ॥ २ ॥

आंबट पदार्थ, दहीं, भाज्या, आनूप देशांतील जलचरांचें मांस, दूध व जड अन्न हे पदार्थ व्रणी मनुष्यानें वर्ज करावे.

अग्निदग्धव्रणनिदान.

तत्र स्निग्धं रूक्षं वाऽऽश्रित्य द्रव्यमग्निर्दहति। अग्निसंतप्तो हि स्नेहः सूक्ष्ममार्गानुसारित्वात्त्वगादीननुप्रविश्याऽऽशु दहति। तस्मात्स्नेहदग्धेऽधिका रुजो भवन्ति। तत्र प्लुष्टं दुर्दग्धं सम्यग्दग्धमतिदग्धमिति चतुर्विधं भवत्यग्निदग्धम्। तत्र विवर्णमात्रं प्लुष्यते तत्प्लुष्टम्। यत्रोत्तिष्ठन्ति स्फोटास्तीव्रदाहवेदनाश्चिरोच्चापशाम्यन्ति तद् दुर्दग्धम्। सम्यग्दग्धमवगाढं तालफलवर्णं सुस्थितं पूर्वलक्षणयुक्तं च। अतिदग्धं तु त्वङ्मांसावलम्बनगात्रविश्लेषणं शिरास्नायुसंध्यस्थिव्यापादनमतिमात्रवेदनाज्वरदाहपिपासामूर्च्छाश्वासोपद्रवा भवन्ति। इति प्लुष्टादिभेदेनाग्निदग्धश्चतुर्विधो व्रणो भवति।

स्निग्ध किंवा रूक्ष द्रव्याच्या आश्रयानें अग्नि जाळतो. अग्नीच्या उष्णतेनें तापलेलें तेल सूक्ष्ममार्गांतून (छिद्रांतून) शिरतें. त्यामुळें त्वचेच्या छिद्रांतून शरीरांत जलद प्रवेश करून तो त्वचा, मांस

इत्यादिकांना जाळतो. त्यामुळें तापलेल्या तेलानें अंग भाजलें असतां अधिक पीडा होते. त्या अग्निदग्ध व्रणाचे प्लुष्ट, दुर्दग्ध, सम्यग्दग्ध व अतिदग्ध असे चार प्रकार आहेत. त्यांत त्वचेचा रंग बदलेपर्यंतच अंग भाजतें, त्याला प्लुष्ट असें म्हणतात. ज्या भाजण्यामुळें त्वचेवर फोड येतात, तीव्र दाह व वेदना होतात, आणि त्या फार वेळानें कमी होतात, त्याला दुर्दग्ध असें म्हणतात. ज्या भाजण्यानें अंग खोलपर्यंत भाजतें व ताडाच्या फळाप्रमाणें अंग फुगतें व अंगाचा रंगही त्या फळासारखाच होतो, त्याला सम्यग्दग्ध असें म्हणतात. ह्यांमध्यें वरील दुर्दग्ध व्रणाचीं लक्षणें असतात. ज्या वेळीं अतिशय भाजतें तेव्हां त्वचा व मांस लोंबू लागतें, अवयवांचा आंतील भाग मोकळा पडतो. स्नायु, सांधे व हाडें हीं दग्ध झाल्यामुळें अत्यंत वेदना होतात. आणि ज्वर, दाह, तहान, मूर्च्छा, श्वास हे विकार होतात. ह्याप्रमाणें प्लुष्ट वगैरे भेदानें अग्निदग्ध व्रणाचे चार प्रकार आहेत.

अग्निदग्धाची चिकित्सा.

प्लुष्टस्याग्निप्रतपनं कार्यमुष्णं तथौषधम् ।
शीतामुष्णां च दुर्दग्धे क्रियां कुर्यात्ततः पुनः ॥ १ ॥
घृतालेपनसेकांस्तु शीतानेवास्य कारयेत् ।
अतिदग्धे विशीर्णानि मांसान्युद्धृत्य शीतलाम् ॥ २ ॥
क्रियां कुर्याच्चूर्णकाले शालितण्डुलकण्डनैः ।
तिन्दुक्यास्त्वक्कषायैर्वा घृतमिश्रैः प्रलेपयेत् ॥ ३ ॥
सम्यग्दग्धे तुगाक्षीरीप्लक्षचन्दनगैरिकैः ।
सामृतैः सर्पिषा युक्तैरालेपं कारयेद्भिषक् ॥ ४ ॥

प्लुष्टावर (पोळलेल्यावर) विस्तवानें शेकून उष्ण उपचार करावे. दुर्दग्धावर शीत व उष्ण असे उपचार करावे; थंडगार तूप लावावें व थंडगार काढ्यांनीं वगैरे सिंचन करावें. अतिदग्ध व्रणांतील जळकें मांस काढून थंड उपचार करावे. लेप लावते वेळीं तांदुळाचा कोंडा व टेंभुरणीच्या सालीचा काढा ह्यांचा एकत्र कल्क करून त्यांत तूप घालून लेप करावा. सम्यग्दग्धावर वंशलोचन, पिंपरणीची साल, चंदन, सोनकाव व गुळवेल ह्यांच्या चूर्णांत तूप घालून

त्याचा लेप करावा.

पथ्यादि लेप.

पथ्याकर्दमजीरकमधुसिक्थकसर्जमिश्रितं लेपात् ।
गव्यं घृतमपहरति च पावकजनितं व्रणं सद्यः ॥ १ ॥

हिरडेदळ, चिखल, जिरें, मेण, व राळ ह्या औषधांचें गाईच्या तुपांत मलम करून त्याचा लेप करावा. तो अग्निदग्ध व्रणाचा त्वरित नाश करतो.

अन्तर्धूमकुठेरको दहनजं लेपान्निहन्ति व्रण-
मश्वत्थस्य विशुष्कवल्कलभवं चूर्णं तथा गुण्ठनात् ।

घेरोसा, अजवला व चित्रकमूळ ह्यांच्या चूर्णाचा लेप करावा. तो अग्निदग्ध व्रणाचा नाश करतो. त्याचप्रमाणें पिंपळाच्या सालीचें चूर्ण व्रणावर दडपावें, म्हणजे त्यानेंही व्रणाचा नाश होतो.

अभ्यङ्गाद्विनिहन्ति तैलमखिलं गण्डूपदैः साधितां
पिष्ट्वा शाल्मलितूलकैर्जलगतां लेपात्तथा वालुकाम् ॥२॥

गांडूळांचा (दानव्यांचा) कल्क घालून तयार केलेलें तेल लावलें असतां तें अग्निदग्ध व्रणाचा नाश करितें. त्याचप्रमाणें पाण्यांतील (बारीक) वाळू शेवरीच्या कापसाशीं वाटून तिचा लेप करावा. तो अग्निदग्ध व्रणाचा नाश करतो.

दग्धयवभस्मचूर्णं तिलतैलाक्तं प्रलेपनादचिरात् ।
हरति शिखिदाहदग्धं भूयोऽभ्यङ्गाद्व्रणं चाऽऽशु ॥ ३ ॥

सातू जाळून त्यांची राख करून ती तिळाचे तेलांत खलून तिचा वरचेवर लेप करावा. तो अग्निदग्ध व्रणाचा त्वरित नाश करतो.

मधूच्छिष्टादि तेल.

मधूच्छिष्टं समधुकं लोध्रं सर्जरसं तथा ।
मूर्वाचन्दनमञ्जिष्टाः पिष्ट्वा सर्पिर्विपाचयेत् ।
सर्वेषामपि दग्धानां व्रणरोपणमुत्तमम् ॥ १ ॥

मेण, जेष्टमध, लोध्र, राळ, मोरवेल, रक्तचंदन व मंजिष्ट ह्यांचें चूर्ण करून तिळांचे तेलांत कढवावें. हें तेल सर्व अग्निदग्ध व्रणांला भरून आणण्याविषयीं फार उत्तम आहे.

पटोली तेल.

सिद्धं कषायकल्काभ्यां पटोल्याः कटुतैलकम् ।
दग्धव्रणरुजास्रावदाहविस्फोटनाशनम् ॥ १ ॥

कडु पडवळाचा कल्क व काढा ह्यामध्यें शिरसेल पचन करावें. तें अग्निदग्ध व्रणांतील ठणका, स्राव, दाह व फोड ह्यांचा नाश करितें.

चंदनादि तेल.

चन्दनं वटशुङ्गाश्च मञ्जिष्ठा मधुकं तथा ।
प्रपौण्डरीकं दूर्वा च पतङ्गं धातकी तथा ॥ १ ॥
एतैस्तैलं विपक्तव्यं गोक्षीरेण समायुतम् ।
अग्निदग्धव्रणे श्रेष्ठं तत्क्षणाद्रोपणं परम् ॥ २ ॥

रक्तचंदन, वडाचे अंकुर, मंजिष्ट, जेष्टमध, पुंडरीक वृक्षाची साल, दूर्वा, पतंग, धायटीचीं फुलें ह्यांचा कल्क, काढा व गाईचें दूध ह्यांमध्यें तिळाचें तेल पचन करावें. हें अग्निदग्ध व्रणावर फार उत्तम आहे. हें क्षणांत व्रणाचें रोपण करतें.

लांगली घृत.

उभे हरिद्रे मञ्जिष्ठा मधुकं लोध्रकट्फलम् ।
कम्पिल्लकमुभे मेदे लाङ्गलीमूलमेव च ॥ १ ॥
पिप्पली त्रिफला चैव निम्बपत्रं च कार्षिकम् ।
कपिलाया घृतं प्रस्थं पचेत्तद्विगुणं पयः ॥ २ ॥
पलद्वयं च सिक्थस्य सिद्धे पूते च दापयेत् ।
लाङ्गलीकं घृतं नाम व्रणानां रोपणं परम् ॥ ३ ॥
अग्निदग्धे विसर्पे च कीटलूताव्रणेषु च ।
चिरोत्थेषु च दुष्टेषु नाडीमर्माश्रितेषु च ॥ ४ ॥

हळद, दारुहळद, मंजिष्ट, जेष्ठमध, लोध्र, कायफळ, कपिला, मेदा, महामेदा, कळलावीचें मूळ, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी व कडुनिंबाचीं पानें हीं औषधें तोळा तोळा, कपिला गाईचें तूप चौसष्ट तोळे व दूध एकशें अठ्ठावीस तोळे घालून तूप पचन करावें. तें तयार झाल्यावर त्यांत आठ तोळे मेण घालून ठेवावें. हें लांगली घृत उत्तम व्रणरोपक आहे. हें अग्निदग्ध व्रण, विसर्प, कीटलूता (कोळी इत्यादिकांच्या विषानें झालेले व्रण), फार दिवसांचे दुष्ट व्रण, नाडीव्रण व मर्मस्थानचे व्रण ह्यांजवर लावावें.

अग्निदग्धव्रणे देयं धातकीचूर्णमुत्तमम् ।
अतसीतैलसंमिश्रं वह्निदग्धव्रणापहम् ॥ ५ ॥

धायटीच्या फुलांचें चूर्ण जवसाच्या तेलांतून लावावें. तें अग्निदग्धव्रणाचा नाश करितें.

अन्तर्धूमविदग्धं त्रिफलाचूर्णं विमिश्रितं तैलैः ।
क्षौमैः शीघ्रं शमयत्यग्निव्रणमाशु लेपेन ॥ ६ ॥

हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांच्या चूर्णाची अंतर्धूम राख करून ती जवसाच्या तेलांतून लावावी. म्हणजे अग्निदग्धव्रणाचा त्वरित नाश होतो.

पित्तविद्रधिवीसर्पशमनं लेपनादिकम् ।
अग्निदग्धव्रणे सम्यक्प्रयुञ्जीत विचक्षणः ॥ ७ ॥

पित्तजन्य विद्रधि, व विसर्प ह्यांजवरीलही लेप वगैरे उपचार अग्निदग्धव्रणावर करावे.

सुधा पुरातनी दध्नो वारिणा परिपेषिता ।
लेपनं तैलदग्धस्य विस्फोटव्याधिनाशनम् ॥ ८ ॥

जुनाट चुना दह्यांवरील निवळींत वाटून तेलानें भाजलेल्या ठिकाणीं लावावा. तो फोडांचा नाश करतो.

अक्षिस्थेषु च कर्तव्यमिदमाश्च्योतनं हितम् ।
शेलुत्वक्त्रिफलादार्वीक्वाथो रोचनया युतः ।

डोळा भाजला असतां भोकरीची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी व दारुहळद ह्यांचा काढा करून त्यांत गोरोचन घालून त्यानें सिंचन करावें.

स्नुह्यर्कक्षीरसिक्तेऽक्षिण गव्यं सर्पिर्निषेचयेत् ॥ ९ ॥

निवडुंग (शेंड) व रुई ह्यांचा चीक डोळ्यांत उडाला असतां गाईचें तूप डोळ्यांत घालावें.

भग्नव्रणनिदान.

भग्नं समासाद् द्विविधं हुताश काण्डे च संधौ च हि तत्र संधौ ।
उत्पिष्टविश्लिष्टविवर्तितं च तिर्यक्प्रतिक्षिप्तमधश्च षोढा ।

हे अग्निवेशा! भग्न हें दोन प्रकारचें आहे. एक कांडभग्न व दुसरें संधिभग्न. त्यांत उत्पिष्ट, विश्लिष्ट, विवर्तित, तिर्यग्गत, क्षिप्त व

अधःक्षिप्त असे संधिभग्नाचे सहा प्रकार आहेत.

प्रसारणाकुञ्चनवर्तनोग्रारुक्स्पर्शविद्वेषणमेतदुक्तम् ॥ १ ॥
सामान्यतः संधिगतस्य लिङ्गमुत्पिष्टसंधेः श्वयथुः समन्तात् ।

हात किंवा पाय पसरते वेळीं, आंखडते वेळीं किंवा स्थिर असला तरी देखील अतिशय ठणका लागतो, आणि स्पर्श केला असतां सहन होत नाहीं. हें संधिभग्नाचें सामान्य लक्षण आहे. उत्पिष्ट संधिभग्नामध्यें आसपास सूज असते आणि विशेषेंकरून रात्रीं फार ठणका असतो.

विशेषतो रात्रिभवा रुजश्च विश्लिष्टजे तौ च रुजा च नित्यम् ॥ १

विश्लिष्ट संधिभग्नामध्यें वरील उत्पिष्ट संधिभग्नाचीं दोन्ही लक्षणें असून ठणका मात्र सारा वेळ असतो.

विवर्तिते पार्श्वरुजश्च तीव्रास्तिर्यग्गते तीव्ररुजो भवन्ति ।

विवर्तित संधिभग्नामध्यें सांध्याच्या व हाडाच्या दोन्ही बाजूंस तीव्र वेदना असतात. तिर्यक् संधिभंगामध्यें तीव्र वेदना होतात.

क्षिप्तेऽतिशूलं विषमं च सक्थ्नोः क्षिप्ते त्वधोरुग्विघटश्च संधेः ॥ ३

ऊर्ध्वक्षिप्त संधिभग्नामध्यें अत्यंत ठणका असून हाडें कमीजास्त होतात. आणि अधःक्षिप्तामध्यें ठणका व सांध्यामध्यें बिघाड हीं लक्षणें होतात.

काण्डे त्वधः कर्कटकाश्च कर्णविचूर्णितं पिच्चितमास्थितं च ।
काण्डेषु भग्नं ह्यतिपातितं च मज्जागतं च स्फुटितं च वक्रम् ॥४॥
छिन्नं द्विधा द्वादशधा च काण्डे स्रस्ताङ्गता शोथरुजाऽतिवृद्धिः ।

कर्कटक, अश्वकर्ण, विचूर्णित, पिच्चित, अस्थिच्छलित, कांडभग्न, अतिपातित, मज्जागत, स्फुटित, वक्र आणि दोन प्रकारचे छिन्न, मिळून कांडभग्नाचे बारा प्रकार आहेत.

संपीड्यमाने भवतीह शब्दः स्पर्शासहस्पन्दनतोदशूलः ॥ ५ ॥
सर्वास्ववस्थासु न शर्मलाभो भग्नस्य काण्डे खलु चिह्नमेतत् ।

अंग गळल्यासारखें होणें, सूज व ठणका अतिशय वाढणें, मोडलेल्या ठिकाणीं दाबलें असतां आवाज होणें, स्पर्श न सोसणें कांपरें, टोचणी, ठणका लागणें आणि कोणच्याही स्थितींत स्वस्थता नसणें हीं लक्षणें सर्व कांडभग्नामध्यें असतात.

भग्नं तु काण्डे बहुधा प्रयाति समासतो नामभिरेव तुल्यम् ॥ ६ ॥

कांडभग्न हें पुष्कळ प्रकारचें आहे. तथापि तें ज्या ज्या ठिकाणीं होईल त्याला अनुसरून तशीं तशीं नांवें त्यास द्यावीं.

अल्पाशिनोऽनात्मवतो जन्तोर्वातात्मकस्य च ।
उपद्रवैर्वा जुष्टस्य भग्नं कृच्छ्रेण सिध्यति ॥ ७ ॥

थोडें अन्न खाणारा, इंद्रियें ताब्यांत न ठेवणारा, आणि वातप्रकृति असलेला, अशा मनुष्याचें किंवा मागें सांगितलेल्या ज्वरादि उपद्रवांनीं युक्त अशा मनुष्याचें भग्न (मोडलेलें हाड) मोठ्या कष्टानें साध्य होतें.

भिन्नं कपालं कट्यां तु संधिमुक्तं तथा च्युतम् ।
जघनं प्रतिपिष्टं तु वर्जयेच्च विचक्षणः ॥ ८ ॥

कमरेचें कपालास्थि फुटलें असतां, सांध्यापासून हाड सुटलें असतां किंवा निखळून पडलें असतां, तसेंच जघनास्थींचा चूर झाला असतां चाणाक्ष वैद्यानें त्याजवर उपचार करूं नये.

असंश्लिष्टकपालं च ललाटे चूर्णितं च यत् ।
भग्नं स्तनान्तरे शङ्खे पृष्ठे मूर्ध्नि च वर्जयेत् ॥ ९ ॥

ललाटास्थींचा चूर झाला किंवा तीं फुटून अगदीं वेगळीं झालीं तर, व दोन स्तनामध्यें, पाठीमध्यें, दोन्ही आंखावर किंवा डोक्यावर हाडाचा भंग झाला तर तो असाध्य म्हणून समजावा.

सम्यक्संहितमप्यस्थि दुर्निक्षेपनिबन्धनात् ।
संक्षोभाद्वाऽपि यद् गच्छेद्विक्रियां तच्च वर्जयेत् ॥ १० ॥

हाडें चांगलीं जुळल्यानंतर (त्यांचा एकजीव होण्यापूर्वीं) तीं अव्यवस्थितपणानें ठेवलीं तर किंवा चांगलीं बांधलीं नाहींत तर अथवा त्यांना धक्का वगैरे लागून त्यांचा क्षोभ होऊन तीं विकृत झालीं तर तीं केव्हांही बरीं होत नाहींत.

तरुणास्थीनि नम्यन्ते भिद्यन्ते नलकानि तु ।
कपालानि विभिद्यन्ते स्फुटन्ति रुचकानि च ॥ ११ ॥

तरुणास्थि (नाक, कान व डोळे ह्यांचीं हाडें) वांकतात. नलकास्थि (नळ्या) फुटतात. कपालास्थींचे (गुडघे, ढुंगण वगैरे

ठिकाणच्या हाडाचे) तुकडे होतात. रुचकास्थीच्या (दांतांच्या) कपऱ्या निघतात (फुटतात).

मोडलेल्या हाडाची चिकित्सा.

भग्नान्युपचरेद्धीमान्सेकलेपनबन्धनैः ।
शीतलैरेव विविधैः प्रयोगैश्च समीरितैः ॥ १ ॥
तत्रातिशिथिले बन्धे संधिस्थैर्यं न जायते ।
गाढेनापि त्वगादीनां शोफो रुक्पाक एव च ॥ २ ॥
तस्मात्साधारणं बन्धं भग्ने शंसन्ति तद्विदः ।

मोडलेल्या हाडावर काढे वगैरे शिंपडणें, लेप करणें, बांधणें आणि पुढें सांगितलेले अनेक शीतल प्रयोग हे उपचार करावे. त्यांत बंधन जर फार ढिलें असेल तर सांध्याला बळकटी येत नाहीं. आणि तें जर फार घट्ट असलें तर त्वचेला सूज, ठणका व पाक (पिकणें) हे विकार होतात. म्हणून बंधन हें फार ढिलें अगर घट्ट नसून मध्यम असावें, असें तज्ञ म्हणतात.

आदौ भग्नं विदित्वा तु सेचयेच्छीतलाम्बुना ॥ ३ ॥
पङ्केनाऽऽलेपनं कुर्याद्बन्धनं च कुशान्वितम् ।
अवनामितमुन्नाम्येदुन्नतं चावपीडयेत् ॥ ४ ॥
क्षिप्तं द्विधाऽपि च स्थाने संस्थाप्य विधिमाचरेत् ।
आलेपनार्थं मञ्जिष्ठामधुकं चाम्लपेषितम् ॥ ५ ॥
शतधौतघृतोन्मिश्रं शालिपिष्टं च लेपनम् ।
न्यग्रोधादिकषायं तु शीतलं परिषेचने ॥ ६ ॥
पञ्चमूलीविपक्वं तु क्षीरं दद्यात्सवेदने ।

प्रथम मोडलेल्या हाडाची चांगली परीक्षा करून त्याजवर थंड पाणी शिंपडावें. व त्याजवर चिखलाचा लेप करावा. आणि दर्भानें (गवतानें) वेष्टण करून बांधावें. जें हाड वांकलें असेल त्याला वर उचलून सरळ करून घ्यावें. आणि जें वर उचललें असेल त्याला दाबून खालीं बसवावें. दोन्हीही क्षिप्त नांवाच्या भग्नाचीं हाडें स्वस्थानीं बसवून नंतर बंधनादि उपचार करावे. आणि मंजिष्ट व जेष्टमध ह्यांचें चूर्ण आम्लरसांत वाटून लेप करावा. शतधौत-घृता-मध्यें तांदुळाचें पीठ मळून त्याचा लेप करावा. न्यग्रोधादि गणां-

तील काढ्यानें त्यावर सेचन करावें. व वेदना फार असल्यास पंच-मूळांनीं सिद्ध केलेलें दूध द्यावें.

मूलं शृगालच्छिन्नायाः पीत्वा मांसरसेन तु ॥ ७ ॥
चूर्णीकृत्य तु सप्ताहादस्थिभङ्गमपोहति ।

पिटवणीच्या मूळाचें चूर्ण करून तें मांसरसांतून ७ दिवस घ्यावें. म्हणजे रोगी अस्थिभंगापासून मुक्त होतो.

आभाचूर्णं मधुयुतमस्थिभङ्गे त्र्यहं पिबेत् ॥ ८ ॥
पीत्वा चास्थि भवेत्सम्यग्वज्रसारनिभं दृढम् ।

अस्थिभंगावर बाभळीच्या सालीचें चूर्ण मधांतून तीन दिवस घ्यावें; म्हणजे हाडें वज्राप्रमाणें बळकट होतात.

गृष्टिक्षीरं ससर्पिष्कं मधुरौषधसाधितम् ॥ ९ ॥
शीतलं लाक्षया युक्तं प्रातर्भग्ने पिबेन्नरः ।

पाडशा गाईचें दूध मधुर औषधांनीं सिद्ध करून थंड झाल्यावर त्यांत तूप व लाखेचें चूर्ण घालून हाड मोडलें असतां रोज सकाळीं घ्यावें.

सघृतं चास्थिसंधानं लाक्षागोधूममर्जुनम् ॥ १० ॥
संधिमुक्तेऽस्थिभग्ने च पिबेत्क्षीरेण मानवः ।

लाख, गहू व अर्जुनसादड्याची साल ह्यांचें चूर्ण तुपांतून घ्यावें; तें मोडलेल्या हाडाला सांधतें.

रसोनमधुलाक्षाज्यसिताकल्कं सुमिश्रितम् ।
छिन्नभिन्नच्युतास्थीनां संधानमचिराद्भवेत् ॥ ११ ॥

सांधा निखळलेल्या अस्थिभग्नावर लसूण, मध, लाख, तूप व खडीसाखर ह्यांचा कल्क दुधांतून घ्यावा. तो छिन्नभिन्न झालेल्या व सांध्यापासून सुटलेल्या हाडाला त्वरित सांधतो.

लाक्षागुग्गुळ.

लाक्षास्थिसंहृत्ककुभाश्वगन्धाचूर्णीकृता नागबलाः पुरश्च ।
संभग्नमुक्तास्थिरुजं निहन्यादङ्गानि कुर्यात्कुलिशोपमानि ॥ १ ॥

लाख, हाडसंधीची साल, अर्जुनसादड्याची साल, अश्वगंध नागबला व गुग्गुळ ह्यांचें चूर्ण मोडलेल्या व निखळलेल्या हाडाला सांधतें व अवयव वज्रासारखे बळकट करितें.

सव्रणस्य तु भग्नस्य व्रणः सर्पिर्मधूत्तरैः।
प्रतिसार्यः कषायैस्तु शेषं भग्नवदाचरेत्।
वातव्याधिविनिर्दिष्टं स्नेहं तत्रापि योजयेत्॥ २॥

ज्या भग्नामध्यें जखम आहे अशा भग्नांतील जखमेचें व्रणचिकित्सेंत सांगितलेल्या काढ्यांनीं व तूप आणि मध ह्यांनीं प्रतिसारण करून बाकीचे उपचार भग्नाप्रमाणें करावे. वातव्याधींत सांगितलेलीं तेलेंही ह्याजवर योजावीं.

वल्लिजभस्मादि योग.

वल्लिजं भस्म मधुना पातव्यं हितभोजिना।
संधिभङ्गेऽस्थिभङ्गे च विशेषेण प्रशस्यते॥ १॥

संधिभंग व अस्थिभंग ह्यांजवर पथ्य करून प्रवाळभस्म मधाशीं घ्यावें. तें प्रशस्त आहे.

आभादि गुग्गुळ.

आभाफलत्रिकव्योषैः सर्वैरेतैः समांशकैः।
तुल्यं गुग्गुलुना योज्यं भग्नसंधिप्रसाधकम्॥ १॥

बाभळीची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या बरोबरीनें त्यांत गुग्गुळ मिसळून योग्य प्रमाणांत द्यावा. तो मोडलेल्या हाडाला सांधतो.

गोधूमप्रयोग.

ईषद्विदग्धगोधूमचूर्णं पीतं समाक्षिकम्।
कटिसंधिषु भग्नेषु भुग्नेष्वस्थिषु पूजितम्॥ १॥
अविदाहिभिरन्नैश्च पिष्टकैः समुपाचरेत्।
मांसं मांसरसं क्षीरं सर्पिर्यूषं च मुद्गजम्॥ २॥

गहू किंचित जाळून त्यांचें चूर्ण करून तें मधाशीं द्यावें. तें कंबर मोडणें, सांधे मोडणें आणि हाडें मोडणें, ह्यांजवर फार चांगलें आहे. विदाह न करणारीं अन्नें व पिठें, मांस, मांसरस, दूध, तूप, मुगाचें कढण आणि पौष्टिक अन्नपान हें संधिभग्नावर पथ्य द्यावें.

बृंहणं चान्नपानं च संधिभग्नाय दापयेत्।
लवणं कटुकं क्षारं साम्लं मैथुनमातपम्॥ ३॥
व्यायामं च न सेवेत भग्नो रूक्षान्नमेव च।

मीठ, तिखट, क्षार, अम्लपदार्थ, मैथुन, ऊन, व्यायाम व रूक्ष अन्न हीं संधिभग्नाच्या रोग्यांनीं सेवन करूं नयेत.

बालानां तरुणानां च भग्नान्याशु भवन्ति वै ।
समीचीनानि वृद्धानां भग्नानां न विशेषतः ॥ ४ ॥

बाल व तरुण ह्यांचीं मोडलेलीं हाडें लवकर सांधतात. वृद्ध मनुष्यांचीं मोडलेलीं हाडें विशेषतः चांगलीं सांधलीं जात नाहींत.

नाडीव्रणनिदान.

यः शोफमाममतिपक्वमुपेक्षतेऽज्ञो
यो वा व्रणं प्रचुरपूयमसाधुवृत्तः ।
अभ्यन्तरं प्रविशति प्रविदार्य तस्य
स्थानानि पूर्वविहितानि ततः स पूयः ॥ १ ॥
तस्यातिमात्रगमनाद्गतिरिष्यते तु
नाडीव यद्वहति तेन मता तु नाडी ॥ २ ॥

जो अविचारी वैद्य पक्व झालेल्या व्रणशोथाची अपक्व समजून उपेक्षा करतो, किंवा व्रणांत अतिशय पू झाला असतां तो काढून टाकण्याची हयगय करतो, त्या मनुष्याच्या व्रणांतील तो पू पूर्वीं सांगितलेल्या त्वचा, मांस, शिरा, स्नायु, संधि, अस्थि, कोष्ठ व मर्में इत्यादि व्रणाच्या स्थानांचें विदारण करून आंत प्रवेश करतो. तो आंत फार खोलपर्यंत गेल्यावर त्या पुवाची एक बारीक नळी-प्रमाणें जी वाट तयार होते, तिला नाडी म्हणतात.

नाडीव्रणांची संख्या.

दोषैस्त्रिभिर्भवति सा पृथगेकशश्च
संमूर्च्छितैरपि च शल्यनिमित्ततोऽन्या ।

वातादि तीन दोषांपासून तीन, सर्व दोषांपासून एक, आणि शल्यजन्य एक, मिळून नाडीव्रणाचे पांच प्रकार आहेत.

वातजन्य नाडीव्रणाचें लक्षण.

तत्रानिलात्परुषसूक्ष्ममुखी सशूला
फेनानुविद्धमधिकं स्रवति क्षपासु ॥ १ ॥

त्यांत वातजन्य नाडीव्रण कठीण, बारीक तोंडाचा आणि शूल-युक्त असतो, त्यांतून फेसाळ स्राव होतो, आणि तो व्रण रात्रीं फार वाहतो.

पित्तजन्य नाडीव्रणाचें लक्षण.

पित्तात्तु तृड्ज्वरकरी भ्रमदाहयुक्ता
पीतं स्रवत्यधिकमुष्णमहःसु चापि ॥ १ ॥

पित्तजन्य नाडीव्रणामध्यें तहान, ज्वर, भ्रम आणि दाह, हे विकार होतात. व्रणांतून पिवळा व उष्ण असा स्राव होतो. आणि ह्या व्रणांतून दिवसा फार स्राव होतो.

कफजन्य नाडीव्रणाचें लक्षण.

ज्ञेया कफाद् बहुघनाऽर्जुनपिच्छिलास्रा
स्तब्धा सकण्डुररुजा रजनीप्रवृद्धा ॥ १ ॥

कफजन्य नाडीव्रणांतून अतिशय घट्ट, पांढरा व बुळबुळीत स्राव होतो. हा व्रण दडस असतो, त्याला खाज असते व ठणका नसतो. आणि व्रणांतून रात्रीं स्राव फार होतो.

द्विदोषज नाडीव्रणाचें लक्षण.

दोषद्वयाभिहितलक्षणदर्शनेन
तिस्रो गतीर्व्यतिकरप्रभवास्तु विद्यात् ॥ १ ॥

ज्या नाडीव्रणांत दोन दोषांचीं लक्षणें दिसून येतील, त्याला द्विदोषज नाडीव्रण म्हणावें.

त्रिदोषज नाडीव्रण.

दाहज्वरश्वसनमूर्छनवक्त्रशोषा
यस्यां भवन्त्यभिहितानि च लक्षणानि ।
तामादिशेत्पवनपित्तकफप्रकोपा-
द्धोरां गतिं त्वसुहरामिव कालरात्रिम् ॥ २ ॥

दाह, ज्वर, श्वास, मूर्च्छा, व तोंडाला कोरड हीं लक्षणें ज्या नाडीव्रणांत होतात तो कालरात्रीसारखा प्राणहरण करणारा भयंकर नाडीव्रण त्रिदोषजन्य समजावा.

शल्यजन्य नाडीव्रणलक्षण.

नष्टं कथंचिदनुमार्गमुदीरितेषु
स्थानेषु शल्यमचिरेण गतिं करोति ।
सा फेनिलं मथितमुष्णमसृग्विमिश्रं
स्रावं करोति सहसा सरुजा च नित्यम् ॥ १ ॥

कोणत्याही कारणानें व्रणामध्यें अदृश्य होऊन राहिलेलें शल्य

नाडीव्रण उत्पन्न करितें (त्याच व्रणाचा नाडीव्रण करितें), घुसळ-ण्यासारखा फेसाळ, उष्ण व रक्तमिश्र स्राव होतो व ठणका लागतो त्याला शल्यजन्य नाडीव्रण म्हणतात.

नाडी त्रिदोषप्रभवा न सिध्येच्छेषाश्चतस्रः खलु यत्नसाध्याः २

त्रिदोषजन्य नाडीव्रण साध्य होत नाहीं. बाकीचे चार नाडीव्रण कष्टसाध्य आहेत.

नाडीव्रणचिकित्सा.

नाडीनां गतिमन्वीक्ष्य शस्त्रेणोत्पाट्य कर्मवित् ।
सर्वं व्रणक्रमं कुर्याच्छोधनारोपणादिकम् ॥ १ ॥

नाडीव्रणाची गति कशा प्रकारची आहे तें पाहून, शस्त्रानें ती काढून टाकावी, आणि नंतर शोधन, रोपण वगैरे व्रणावरील सर्व उपचार करावे.

कृशदुर्बलभीरूणां नाडी मर्माश्रिता तु या ।
क्षारसूत्रेण संछिद्यान्न शस्त्रेण कदाचन ॥ २ ॥

कृश, दुर्बल, भित्रे अशा मनुष्यांचा मर्माश्रित नाडीव्रण असला तर त्या व्रणाच्या छिद्राच्या शेवटपर्यंत क्षार लावलेलें सूत घालून छिद्र मोठें करून द्यावें. त्याजवर शस्त्रक्रिया केव्हांही करूं नये.

नाडीं वातकृतां साधु पाटितां लेपयेद्भिषक् ।
प्रत्यकपुष्पीफलयुतैस्तिलैः पिष्टैः प्रलेपयेत् ॥ ३ ॥

वातजन्य नाडीव्रण चांगल्या रीतीनें फाडून काढून तीळ व पांढऱ्या आघाड्याचें बीं एकत्र वाटून त्यांचा लेप करावा.

पैत्तिकीं तिलमंजिष्ठानागदन्तीनिशाह्वयैः ।

पित्तजन्य नाडीव्रणावर तीळ, मंजिष्ठ, नागदवण (नागाळी) व हळद ह्यांचा लेप करावा.

श्लैष्मिकीं तिलयष्ट्याह्वनिकुम्भारिष्टसैन्धवैः ॥ ४ ॥

कफजन्य नाडीव्रणावर तीळ, जेष्टमध, दांतीचें बीं, लिंबाचीं पानें व सैंधव ह्यांचा लेप करावा.

शल्यजां तिलमंजिष्ठामध्वाज्यैर्लेपयेन्मुहुः ।

शल्यज नाडीव्रणावर तीळ, मंजिष्ठ, मध व तूप ह्यांचा वरचेवर लेप करावा.

आरग्वधनिशाकोलचूर्णाज्यक्षौद्रसंयुता ।
सूत्रवर्तिर्व्रणे योज्या शोधिनी गतिनाशिनी ॥ ५ ॥

बाहव्याची साल, हळद, व बोरें ह्यांचें चूर्ण करून तें तूप मधांत कालवून सुताच्या वातीस लावून ती वात व्रणांत घालावी. ती व्रणाचें शोधन करते व गति बंद करिते.

जात्यर्कशम्याककरंजदन्तीसिन्धूत्थसौवर्चलयावशूकैः ।
वर्तिः कृता हन्त्यचिरेण नाडीः स्नुक्क्षीरपिष्टा सह सैन्धवेन ६

जाई, रुई, बाहवा, करंज व दांती ह्यांचीं मुळें, सैंधव, पादेलोण व जवखार ह्यांचें चूर्ण करून त्याची वात व्रणांत घालावी, ती नाडीव्रणाचा त्वरित नाश करिते. त्याचप्रमाणें सेंधेलोण त्रिधारी निवडुंगाच्या चिकांत खलून त्याची वात व्रणांत घालावी; तीही नाडीव्रणाचा नाश करिते.

समूलपत्रां निर्गुण्डीं पीडयित्वा रसं हरेत् ।
तेन सिद्धं समं तैलं नाडीदुष्टव्रणापहम् ॥ ७ ॥

मुळें व पानें ह्यांसुद्धां निर्गुडीचा रस काढून त्यांत समभाग तेल घालून तें सिद्ध करावें. तें दुष्ट नाडीव्रणाचा नाश करितें.

गुग्गुलुत्रिफलाव्योषैः समांशैश्चाऽऽज्ययोजितैः ।
नाडीं दुष्टव्रणं चापि जयेदपि भगंदरम् ॥ ८ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें, व पिंपळी ह्यांच्या चूर्णाच्या समान गुग्गुळ घेऊन एकत्र खलून तो तुपांतून घ्यावा. तो दुष्ट नाडीव्रणाचा नाश करतो व भगंदरालाही जिंकतो.

सर्व व्रणांवरील पथ्यापथ्य.

यवषष्टिकगोधूमपुराणाः सितशालयः ।
मसूरतुवरीमुद्गयूषश्च मधुशर्करा ॥ १ ॥
विलेपी लाजमण्डश्च जाङ्गला मृगपक्षिणः ।
घृतं तैलं पटोलं च वेत्राग्रं बालमूलकम् ॥ २ ॥
वार्ताकं कारवेल्लं च कर्कोटं तण्डुलीयकम् ।
एतत्पथ्यं नरैः सेव्यं यथावस्थं यथामलम् ।
व्रणशोथे व्रणे सद्योव्रणे नाडीव्रणेऽपि च ॥ ३ ॥

जुने सातू, साठ्या साळी, गहूं, पांढऱ्या साळी, मसुरा, तुरी व मूग ह्यांचीं कढणें, मधाची साखर, कापशी, लाजामंड, जांगल

देशांतील पशु व पक्षी ह्यांचें मांस, तूप, तेल, पडवळ, वेताचे कोंब, कोवळे मुळे, वांगीं, कारलीं, करटोली व तांदुळजा हे पदार्थ व्रणशोथ, व्रण, सद्योव्रण व नाडीव्रण यांवरही अवस्थेला व दोषाला अनुसरून पथ्याकरितां सेवन करावे.

रूक्षाम्लशीतं लवणं व्यवायमायासमुच्चैः परिभाषणं च ।
प्रियासमालोकनमह्नि निद्रां प्रजागरं चङ्क्रमणं नितान्तम् ॥ ४ ॥
शोकं विरुद्धाशनमम्बुपानं ताम्बूलशाकानि च पत्रवन्ति ।
अजाङ्गलं मांसमसात्म्यमन्नं विवर्जयेत्संततमप्रमत्तः ॥ ५ ॥

रूक्ष, आंबट, थंड व खारट पदार्थ, मैथुन, श्रम, मोठ्यानें बोलणें, आवडत्या स्त्रीचें अवलोकन, दिवसा निजणें, रात्रीचें जागरण, अतिशय हिंडणें, शोक, दूध व मासे अशा प्रकारचें विरुद्ध भोजन, पाणी पिणें, विडा, पालेभाज्या, जांगल देशांतील प्राण्यांच्या मांसांखेरीज दुसरें मांस व असात्म्य अन्न हें व्रणी मनुष्यानें सावधगिरीनें वर्ज करावें.

भगंदरनिदान.

गुदस्य द्व्यंगुले क्षेत्रे पार्श्वतः पिटिकाऽऽर्तिकृत् ।
भिन्ना भगंदरो ज्ञेयः स च पञ्चविधो मतः ॥ १ ॥

गुदाच्या आसपास दोन बोटें प्रदेशामध्यें एका बाजूस अतिशय ठणकणारी अशी एक पुटकुळी उत्पन्न होते. ती फुटली म्हणजे तिला भगंदर असें म्हणतात. हा रोग पांच प्रकारचा आहे.

त्यांची संख्या.

वातपित्तकफैस्त्रेधा चतुर्थः सांनिपाततः ।
उन्मार्गगः पञ्चमः स्यादेवं पञ्चविधो मतः ॥ २ ॥

वात, पित्त व कफ ह्या तीन दोषांपासून तीन, सन्निपातज एक आणि उन्मार्गगामी एक मिळून पांच प्रकारचे भगंदर आहेत.

त्याचें पूर्वरूप.

कटीकपालनिस्तोददाहकण्डूरुजादयः ।
भवन्ति पूर्वरूपाणि भविष्यति भगंदरे ॥ ३ ॥

कंबर व कपाळ दुखणें, गुदामध्यें दाह, कंडू व ठणका हीं लक्षणें भगंदर होण्यापूर्वीं होतात.

वातज भगंदराचें (शतपोनकाचें) लक्षण.

कषायरूक्षैरतिकोपितोऽनिलस्त्वपानदेशे पिटिकां करोति सा ।
उपेक्षणात्पाकमुपैति दारुणं रुजा च भिन्नाऽरुणफेनवाहिनी ॥ ४ ॥
तत्राऽऽगमो मूत्रपुरीषरेतसां व्रणैरनेकैः शतपोनकं वदेत् ।

तुरट व रूक्ष पदार्थांच्या सेवनानें अतिशय प्रकुपित झालेला वायु गुदद्वाराचे ठिकाणीं एक बारीक फोड उत्पन्न करतो. त्याची उपेक्षा केली असतां तो पिकून फुटतो. त्यांत ठणका असतो. त्यामधून तांबूस व फेसाळ असा स्राव होतो. त्यांतून मलमूत्र व रेत हीं येतात. ह्या भगंदराला अनेक छिद्रें पडतात, म्हणून त्याला शतपोनक म्हणतात.

पित्तज (उष्ट्रशिरोधर) भगंदरलक्षण.

प्रकोपणैः पित्तमतिप्रकोपितं करोति रक्तां पिटिकां गुदार्तिदाम् ।
तदाशुपाकां हिमपूयवाहिनीं भगंदरं तूष्ट्रशिरोधरं वदेत् ॥ ५ ॥

पित्त वाढविणाऱ्या अशा आहारादिकांनीं पित्त वाढून तें गुदद्वाराचे ठिकाणीं तांबूस पुटकुळी उत्पन्न करितें. तिच्या योगानें गुदांत पीडा होते. ती लवकर पिकते, तिजमधून कढत पू वाहतो. ह्या भगंदराला उष्ट्रशिरोधर असें म्हणावें.

कफजन्य (परिस्रावी) भगंदरलक्षण.

कण्डूयनो घनस्रावी कठिनो मंदवेदनः ।
श्वेतावभासः कफजः परिस्रावी भगंदरः ॥ ६ ॥

ज्या भगंदरांत कंडू असते, अतिशय दाट असा पू वाहतो, पुळी अतिशय कठीण असते, तिला थोडा ठणका असतो व ती पांढुरकी असते, त्या कफजन्य भगंदराला परिस्रावी भगंदर म्हणतात.

सन्निपातज (शंबूकावर्त) लक्षण.

बहुवर्णरुजः स्रावाः पिटिका गोस्तनोपमाः ।
शम्बूकावर्तवन्नाडी शम्बूकावर्तको मतः ॥ ७ ॥

जी पुळी गाईच्या स्तनाच्या आकाराची असते, आणि तिच्यामधून अनेक तऱ्हेच्या रंगांचा स्राव होतो, तिला ठणका फार असतो, तिचा नाडीव्रण शंखाच्या भोवऱ्याप्रमाणें गेलेला असतो, त्याला शंबूकावर्त असें म्हणतात.

उन्मार्गगामी भगंदरलक्षण.

क्षतागतिः पायुगता विवर्धते ह्युपेक्षणात्सा क्रमिभिर्विदीर्यते ।
प्रकुर्वते मार्गमनेकधा मुखैर्व्रणैस्तदुन्मार्गि भगंदरं वदेत् ॥ ८ ॥

गुदाजवळ झालेल्या व्रणाचा उपेक्षेनें नाडीव्रण होतो. त्याचीही उपेक्षा केल्यानें त्यांत किडे उत्पन्न होऊन ते गुदास अनेक छिद्रें पाडतात त्यामुळें अनेक तोंडांचे नाडीव्रण होतात. त्याला उन्मार्गगामी भगंदर असें म्हणतात.

असाध्य लक्षण.

घोराः साधयितुं दुःखाः सर्व एव भगंदराः ।
तेष्वसाध्यस्त्रिदोषोत्थः क्षतजश्च विशेषतः ॥ ९ ॥

सर्वच भगंदर साध्य होण्याला फार कठीण आहेत. तथापि त्यांत त्रिदोषजन्य भगंदर असाध्य आहे. आणि क्षतजन्य भगंदर तर विशेषेंकरून असाध्य आहे.

वातमूत्रपुरीषाणि क्रमयः शुक्रमेव च ।
भगंदराः स्रवन्तस्तु नाशयन्ति तमातुरम् ॥ १० ॥

ज्या भगंदरामध्यें कृमि झाले आहेत व ज्यांतून अधोवायु, मळमूत्र किंवा शुक्र हीं येतात, तो भगंदर रोग्याला मारतो.

भगंदरचिकित्सा.

गुदपिटिकायामादौ कुर्याद्रक्तावसेचनं मतिमान् ।
जलसदनाभिरशेषं सा पाकं न प्रयाति यथा ॥ १ ॥
अपानमार्गपिटिकां दहेत्स्वर्णशलाकया ।
अग्निप्रतप्तया पश्चात्कुर्यादग्निव्रणक्रियाम् ॥ २ ॥
पिटिकानामपक्वानामपतर्पणपूर्वकम् ।
कर्म कुर्याद्विरेकान्ते भिन्नानां वक्ष्यते क्रिया ॥ ३ ॥

बुद्धिमान वैद्यानें आधीं भगंदराच्या पुळींतील रक्त काढावें. आणि त्यांतून लस निघून जाऊन ती पिकणार नाहीं अशी क्रिया करावी. सोन्याची सळई विस्तवांत तापवून तिनें भगंदराची पुळी डागावी; आणि त्यानंतर अग्निदग्ध व्रणावरील चिकित्सा करावी. भगंदराची पुळी अपक्व असतांना रक्त काढून नंतर रेचक वगैरे उपचार करावे. आतां फुटलेल्या भगंदराच्या क्रिया सांगतों.

एतासां पाटनक्षारवह्निदाहादिकं क्रमम् ।

विधाय व्रणवत्कार्यं यथादोषं यथाक्रमम् ॥ ४ ॥

फुटलेल्या भगंदराच्या पुळ्यांचे व्रण क्षार व डाग देणें इत्यादिकांनीं मोठे करून नंतर व्रणावरील शोधनरोपणादि उपचार करावे.

वटपत्रादिलेप.

वटपत्रेष्टिकाशुण्ठीगुडूचीसपुनर्नवाः ।
सुपिष्टाः पिटिकावक्त्रे लेपः शस्तो भगंदरे ॥ १ ॥

वडाचीं पानें, जुनें विटकर, सुंठ, गुळवेल व घेटुळी, हीं औषधें एकत्र वाटून त्याचा भगंदरावर लेप करावा. तो प्रशस्त आहे.

खदिरत्रिफलाक्वाथो महिषीघृतसंयुतः ।
विडङ्गचूर्णयुक्तश्च भगंदरविनाशनः ॥ २ ॥

खैराची साल, हिरडा, बेहडा व आवकाठी, ह्यांचा काढा म्हशीचें तूप व वावडिंगाचें चूर्ण घालून घ्यावा. तो भगंदराचा नाश करतो.

त्रिफलारससंयुक्तं बिडालास्थिप्रलेपनम् ।
भगंदरं निहन्त्याशु दुष्टव्रणहरं परम् ॥ ३ ॥

मांजराचें हाड त्रिफळ्याच्या काढ्यांत उगाळून त्याचा लेप करावा. तो भगंदराचा त्वरित नाश करतो, आणि दुष्ट व्रणाचाही नाश करतो. हा फार उत्तम आहे.

शुनोऽस्थि भूलता तक्रैः पेषिता खररक्तयुक् ।
लेपो भगंदरं हन्यान्नरास्थ्नां तैलमेव च ॥ ४ ॥

कुत्र्याचें हाड, व गांडूळ (दानवें) ताकांत वाटून त्यांत गाढवाचें रक्त मिसळून लेप करावा. तो भगंदराचा नाश करतो. त्याचप्रमाणें मनुष्याच्या हाडाचें तेलही भगंदराचा नाश करितें.

कुष्ठं त्रिवृत्तिला दन्ती मागधी सैन्धवं मधु ।
रजनीत्रिफलातुत्थैर्हितं स्याद् व्रणरोपणम् ॥ ५ ॥

कोष्ट, नळीचें तेड, तीळ, दांतीमूळ, पिंपळी, सेंधेलोण, मध, हळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व मोरचूत ह्यांचा लेप व्रण भरून आणण्याला हितकारक आहे.

तिलत्रिवृन्नागदन्तीमाञ्जिष्ठाद्यैः ससैन्धवैः ।
सक्षौद्रैश्च प्रलेपोऽयं भगंदरकुलान्तकृत् ॥ ६ ॥

तीळ, तेड, नागदवणी, मंजिष्ट, सेंधेलोण व मध ह्यांचा लेप भगंदरांचा नाश करतो.

रसाञ्जनं हरिद्रे द्वे मंजिष्ठानिम्बपल्लवाः ।
त्रिवृत्तेजोवतीदन्तीकल्को नाडीव्रणापहः ॥ ७ ॥

रसांजन, हळद, दारुहळद, मंजिष्ठ, कडुनिंबाचा पाला, तेड, मालकांगोणी, व दांतीमूळ ह्यांचा कल्क नाडीव्रणाचा (भगंदराचाही) नाश करतो.

तिलाभयालोध्रमरिष्टपत्रं निशावचाकुष्ठमगारधूमः ।
भगंदरे नाड्युपदंशयोश्च दुष्टव्रणे शोधनरोपणोऽयम् ॥ ८ ॥

तीळ, हिरडेदळ, लोध्र, लिंबाचा पाला, निशा, वेखंड, कोष्ट, व घरोसा, ह्यांचा लेप भगंदर, नाडीव्रण, उपदंशाचे व्रण (गर्मीचे व्रण) व दुष्ट व्रण, ह्यांचें शोधन व रोपण करतो.

नवकार्षिक गुग्गुळ.

त्रिफलापुरकृष्णानां त्रिपञ्चैककर्षयोजिता गुटिका ।
कुष्ठभगंदरनाडीदुष्टव्रणशोधिनी कथिता ॥ १ ॥

हिरडा, बेहडा व आवळकाठी प्रत्येक एक एक तोळा, गुग्गुळ पांच तोळे व पिंपळी एक तोळा ह्यांच्या गोळ्या कराव्या. ही गुटिका कुष्ठ, भगंदर व नाडीव्रण ह्यांचें शोधन व रोपण करिते.

जंबूकप्रकार.

जम्बूकस्याऽऽमिषं भुक्त्वा प्रकारैर्व्यंजनादिभिः ।
अजीर्णवर्जी मासेन मुच्यते तु भगंदरात् ॥ १ ॥

अनेक प्रकारच्या चटण्या कोशिंबिरींतून एक महिनापर्यंत रोज कोल्ह्याचें मांस खावें व अजीर्ण होऊं देऊं नये. म्हणजे भगंदरांपासून मनुष्य मुक्त होतो.

सप्तविंशतिक गुग्गुळ.

त्रिकटुत्रिफलामुस्तं विडङ्गामृतचित्रकम् ।
चव्यैले पिप्पलीमूलं हपुषा सुरदारु च ॥ १ ॥
तुम्बरं पुष्करं चव्यं विशाला रजनीद्वयम् ।
बिडं सौवर्चलं क्षारं सैन्धवं गजपिप्पली ॥ २ ॥
यावन्त्येतानि द्रव्याणि तावद्द्विगुणगुग्गुलुः ।
कोलप्रमाणगुटिकां भक्षयेन्मधुना सह ॥ ३ ॥
कासं श्वासं तथा शोफमर्शांसि च भगंदरम् ।
हृच्छूलं पार्श्वशूलं च कुक्षिबस्तिगुदे रुजम् ॥ ४ ॥

अश्मरीं मूत्रकृच्छ्रं च अन्त्रवृद्धिं तथा कृमीन् ।
चिरज्वरोपसृष्टानां क्षयोपहतचेतसाम् ॥ ५ ॥
आनाहं च तथोन्मादं सकुष्ठान्युदराणि च ।
नाडीदुष्टव्रणान्सर्वान्प्रमेहं श्लीपदं तथा ।
सप्तविंशतिको ह्येष सर्वरोगनिषूदनः ॥ ६ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, नागरमोथे, वावडिंग, गुळवेल, चित्रकमूळ, चवक, वेलदोडे, पिंपळमूळ, शेरणी, देवदार, चिरफळें, पोखरमूळ, चवक, कडुवृंदावनाचें मूळ, हळद, दारुहळद, बिडलोण, पादेलोण, जवखार, सैंधेलोण, गज-पिंपळी, हीं द्रव्यें समभाग आणि ह्या सर्वांच्या दुप्पट गुग्गुळ ह्यांचा खल करून सहा सहा माशांची गोळी करावी, व ती मधाशीं खावी. म्हणजे खोकला, श्वास, सूज, मूळव्याध, भगंदर, हृदयाचा शूळ, पार्श्वशूळ, कुशी, बस्ती व गुद ह्यांमधील शूळ, मुतखडा, मूत्र-कृच्छ्र, अंत्रवृद्धि, व कृमि, ह्यांचा नाश करिते. तसेंच फार दिवसांचा ज्वर, क्षय, आनाह, उन्माद, कुष्ठ, आठ उदरें, नाडीव्रण, दुष्टव्रण, सर्व प्रमेह, श्लीपद, ह्यांचा हा सप्तविंशतिगुग्गुळ नाश करतो. हा सर्वरोगनाशक आहे.

करवीरादि तेल.

करवीरनिशादन्तीलाङ्गलीलवणाग्निभिः ।
मातुलुङ्गार्कपयसा पचेत्तैलं भगंदरे ॥ १ ॥

कणेर, हळद, दांतीमूळ, कळलावी, सैंधेलोण, चित्रकमूळ; ह्यांचा कल्क आणि महाळुंगाचा रस व रुईचा चीक ह्यांमध्यें तेल शिजवून तें भगंदरावर योजावें.

विष्यंदन तेल.

चित्रकार्कौ त्रिवृत्पाठे मलयूहयमारकौ ।
सुधां वचां लाङ्गलिकां हरितालं सुवर्चिकाम् ॥ १ ॥
ज्योतिष्मतीं च संहृत्य तैलं धीरो विपाचयेत् ।
एतद्विष्यन्दनं नाम तैलं दद्याद्भगंदरे ।
शोधनं रोपणं चैव सवर्णकरणं तथा ॥ १ ॥

चित्रकमूळ, रुईचा चीक, तेड, पहाडमूळ, चंदन, कणेरीचें मूळ,

चुना, वेखंड, कळलावी, हरताळ, साजिखार, मालकांगोणी, ह्यांचा कल्क व काढा ह्यामध्यें तेल पचन करावें. ह्याला विष्यंदन तेल असें म्हणतात. हें भगंदरावर योजावें. हें शोधन व रोपण करितें, आणि व्रणाचा डाग घालवितें.

निशातेल.

निशार्कक्षीरसिन्धवाग्निपुरलाङ्गलिवत्सकैः ।
सिद्धमभ्यञ्जने तैलं भगंदरविनाशनम् ॥ १ ॥

हळद, रुईचा चीक, सेंधेलोण, चित्रकमूळ, गुग्गुळ, कळलावी व कुडा ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें. तें लावलें असतां भगंदराचा नाश करतें.

पथ्यापथ्य.

आमे संशोधनं लेपो लङ्घनं रक्तमोक्षणम् ।
पक्वे पुनः शस्त्रविधिस्तथा क्षाराग्निकर्म च ॥ १ ॥

भगंदर अपक्व आहे तोंपर्यंत रक्त काढणें, शोधन, लेप व लंघन हे उपचार पथ्यकारक आहेत. तो भगंदर पिकल्यावर शस्त्र, क्षार व अग्निकर्म (डाग देणें) हें पथ्यकारक आहे.

सर्वत्र शालयो मुद्गा विलेपी जांगलो रसः ।
पटोलं शिग्रुवेत्राग्रं धत्तूरो बालमूलकम् ॥ २ ॥
तिलसर्षपयोस्तैलं तिक्तवर्गो घृतं मधु ।
एतत्पथ्यं नरैः सेव्यं यथादोषं भगंदरे ॥ ३ ॥

सर्व प्रकारच्या भगंदरांवर जुन्या साळी, मूग, आटवल, जांगल प्राण्यांच्या मांसाचा रस, पडवळ, शेवगा, वेताचे कोंब, धोतरा कोवळामुळा, तीळ व शिरस ह्यांचें तेल, कडू पदार्थ, तूप व मध, हें भगंदरावर दोषानुरूप पथ्य करावें.

व्यायामं मैथुनं युद्धं पृष्ठयानं गुरूणि च ।
संवत्सरं परिहरेद्यावद् दृढव्रणो नरः ॥ ४ ॥

व्यायाम, मैथुन, युद्ध (कुस्ती), घोडे वगैरे पाठाळ वाहन, व जड पदार्थ, ह्यांचा एक वर्षभर म्हणजे व्रणाच्या जागेला बळकटी येईपर्यंत त्याग करावा.

उपदंशाचें कारण.

हस्ताभिघातान्नखदन्तघातादधावनादृत्यतिसेवनाद्वा ।
योनिप्रदोषाच्च भवन्ति शिश्ने पञ्चोपदंशा विविधापचारैः ॥ १॥

हाताचा आघात झाल्यानें, नखें किंवा दांत लागून व्रण झाल्यानें कधवीनंतर किंवा मैथुनानंतर शिस्न न धुतल्यानें, अति मैथुनानें, योनिदोषामुळें किंवा दुसऱ्या अनेक कारणांनीं शिस्नाचे ठिकाणीं पांच प्रकारचे उपदंश होतात.

वातज उपदंशलक्षण.

सतोदभेदस्फुरणैः सकृष्णैः स्फोटैर्व्यवस्येत्पवनोपदंशम् ॥

शिस्नावर काळे फोड (चट्टे) असून त्यांत टोचणी व ठणका असतो आणि शिस्न फुरफुरतें, त्याला वातजन्य उपदंश म्हणतात.

पित्तज व कफज उपदंशलक्षण.

पीतैर्बहुक्लेदयुतैः सदाहैः पित्तेन रक्तैः पिशितावभासैः ॥ २ ॥

पित्तोपदंशामध्यें फोड पिवळ्या रंगाचे व अतिशय ओलसर असतात. ते दाह, रक्त व मांस ह्यांनीं युक्त असतात.

सकण्डुरैः शोफयुतैर्महद्भिः शुक्लैर्व्रणैः स्रावयुतैः कफेन ॥

कफजन्य उपदंशामध्यें सूज व मोठे मोठे फोड येतात. त्यांना कंड असते, आणि त्यांतून पांढरा व दाट असा स्राव होतो.

सन्निपातज उपदंशलक्षण.

नानाविधस्रावरुजोपपन्नमसाध्यमाहुस्त्रिमलोपदंशम् ॥ ३ ॥

सन्निपातिक उपदंशांतून नानाप्रकारचे स्राव होतात व ठणका असतो. हा त्रिदोषजन्य उपदंश असाध्य आहे.

असाध्य लक्षण.

विशीर्णमांसं कृमिभिः प्रजग्धं मुष्कावशेषं परिवर्जयेच्च ।

ज्या उपदंशामध्यें लिंगापासून मांस गळूं लागलें आहे, कृमींनीं खाल्ल्यामुळें लिंग सडून जाऊन अंड शिल्लक राहिलें आहे, तो उपदंश असाध्य म्हणून सोडून द्यावा.

संजातमात्रे न करोति मूढः क्रियां नरो यो विषये प्रसक्तः ॥४॥
कालेन शोफक्रिमिदाहपाकैः प्रशीर्णशिश्नो म्रियते स तेन ॥५॥

जो मूर्ख मनुष्य विषयासक्त होऊन उपदंश होतांच त्याजवर

उपचार करीत नाहीं, त्याचें शिस्न कालांतरानें पिकतें, सुजतें, त्याचा दाह होतो. त्यांत किडे पडतात, त्यामुळें शिस्न गळून पडतें व रोगी मरण पावतो.

लिंगार्श.

अंकुरैरिव संघातैरुपर्युपरि संस्थितैः ।
क्रमेण जायते वर्तिस्ताम्रचूडशिखोपमा ॥ १ ॥
कोशस्याभ्यन्तरे संधौ सर्वसंधिगताऽपि वा ।
सवेदना पिच्छिला च दुश्चिकित्स्या त्रिदोषजा ॥ २ ॥
लिङ्गवर्तिरिति ख्याता लिङ्गार्श इति चापरे ।

लिंगावर मांसाचे अंकुर एकावर एक असे जमून येतात. आणि क्रमानें ते कातड्याच्या आंत, मण्यावर, मण्याच्या संधीवर किंवा सर्व सांध्यांवर कोंबड्याच्या डोक्यावरील तुऱ्याप्रमाणें पसरतात. ह्यांत वेदना असतात व ओलसरपणा असतो. हे त्रिदोषापासून होतात. हे चिकित्सा करण्यास फार कठीण आहेत. यांना कित्येक लिंगवर्ति किंवा लिंगार्श असें म्हणतात.

मेढ्रसंधौ व्रणाः केचित्केचित्सर्वाश्रयास्तथा ॥ ३ ॥
कुलत्थाकृतयः केचित्केचित्पद्मदलोपमाः ।
रुजानाहार्तिबहुलास्तृष्णाक्लेदसमन्विताः ।
स्त्रीणां पुंसां च जायन्ते उपदंशाश्च दारुणाः ॥ ४ ॥

कित्येक उपदंशाचे व्रण लिंगाच्या सांध्यामध्यें होतात व कित्येक सर्वत्र असतात. कित्येक हुलग्याप्रमाणें असतात व कित्येक कमळाच्या पाकळीप्रमाणें असतात. त्यांत ठणका, ताठरपणा व पीडा हे विकार फार असतात. ह्यांत तहान असते व क्लेश फार होतात. हे भयंकर उपदंश स्त्रिया व पुरुष ह्या दोघांनाही होतात.

उपदंशचिकित्सा.

स्निग्धस्विन्नस्य तस्यादौ ध्वजमध्ये शिराव्यधः ।
जलौकापातनं वा स्यादूर्ध्वाधः शोधनं तथा ॥ १ ॥
सद्योऽपहृतदोषस्य रुक्शोफावुपशाम्यतः ।
पाको रक्ष्यः प्रयत्नेन शिश्नक्षयकरश्च सः ॥ २ ॥

उपदंशाच्या रोग्याला प्रथम स्नेहन व स्वेदन करून लिंगाची

शीर तोडून रक्त काढावें, किंवा जळवा लावून रक्त काढावें; आणि वमनविरेचन देऊन कोठा शुद्ध करावा. दोष काढून टाकल्याबरोबर सूज व ठणका कमी होतो; शिस्न न पिकेल अशी खबरदारी घ्यावी. कारण तें पिकलें असतां शिस्नाचा नाश होतो.

काढा.

पटोलनिम्बत्रिफलाकिरातैः क्वाथं पिबेद्वा खदिरासनाभ्याम् ।
सगुग्गुलुं वा त्रिफलायुतं वा सर्वोपदंशापहरः प्रयोगः ॥ १ ॥
गैरिकाञ्जनमञ्जिष्ठामधुकोशीरपद्मकैः ।
सचन्दनोत्पलैः स्निग्धैः पेयः पित्तोपदंशहा ॥ २ ॥

कडुपडवळ, बाळंतलिंबाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व काडेचिराईत ह्यांचा काढा गुग्गुळ घालून अथवा खैर व असाणा ह्यांच्या सालीचा काढा गुग्गुळ अथवा त्रिफळ्याचें चूर्ण घालून प्यावा. हा प्रयोग सर्व उपदंशांचा नाश करतो. सोनकाव, रसांजन, मंजिष्ट, जेष्टमध, वाळा, पद्मकाष्ट, चंदन, व कमळ ह्यांचा काढा स्निग्ध पदार्थ (तेल किंवा तूप) घालून प्यावा. तो पित्तोपदंशाचा नाश करतो.

लेप.

सपौण्डरीकैर्मधुकरास्नाकुष्ठपुनर्नवैः ।
सरलागुरुभद्राख्यैर्लेपो वातोपदंशहा ॥ १ ॥

पुंडरीकाची साल, जेष्टमध, रास्ना, कोष्ठ, वसूची मुळी, देवदार, अगर व नागरमोथे ह्यांचा लेप वातजन्य उपदंशाचा नाश करतो.

बब्बूलदलचूर्णेन दाडिमत्वग्रजोऽथ वा ।
गुण्डनं लिङ्गदेशस्य लेपः पूगफलेन वा ॥ २ ॥

बाभळीच्या पानांचें अथवा डाळिंबाच्या सालीचें चूर्ण लिंगाभोंवतीं गुंडाळावें किंवा सुपारीचा लेप करावा.

वटप्ररोहार्जुनजम्बुपथ्या लोध्रं हरिद्रासहितः प्रलेपः ।
सर्वोपदंशेष्ववरोहणार्थं चूर्णं च तज्जं विमलाञ्जनेन ॥३॥

वडाचे अंकुर, अर्जुनसादड्याची साल, जांभळीची साल, हिरडेदळ, लोध्र व हळद ह्यांचा लेप उपदंशाचें व्रण भरून येण्याकरितां करावा. आणि ह्या औषधांचें चूर्ण रसांजनाशीं मिळवून लावावें.

दहेत्कटाहे त्रिफलां तां मषीं मधुसंयुताम् ।
कृत्वोपदंशलेपोऽयं सद्यो रोपयति व्रणम् ॥ ४ ॥

कढईंत त्रिफळ्याची राख करून ती मधांतून लावावी. ती उपदंशाच्या व्रणांना त्वरित भरून आणते.

त्वचो दारुहारिद्रायाः शङ्खनाभी रसाञ्जनम् ।
लाक्षागोमयनिर्यासस्तैलं क्षौद्रं घृतं पयः ॥ ५ ॥
एभिः सुपिष्टैर्द्रव्यांशैरुपदंशं प्रलेपयेत् ।
व्रणाश्च तेन शाम्यन्ति श्वयथुर्दाह एव च ॥ ६ ॥

दारुहळदीची साल, शंखाच्या आंतील गड्डा, रसांजन, लाख, गाईच्या शेणाचा रस, तेल, मध, तूप व दूध ह्या सर्वांचा खल करून त्याचा उपदंशाच्या व्रणावर लेप करावा. म्हणजे उपदंशाचे व्रण, सूज व दाह हीं शांत होतात.

नीलोत्पलानि कुमुदं पद्मसौगन्धिकानि च ।
उपदंशेषु चूर्णानि प्रदेहोऽयं प्रशस्यते ॥ ७ ॥

निळें कमळ, चंद्रविकासी कमळ व सुगंधी कमळ ह्यांचें चूर्ण करून उपदंशावर लेप करावा. तो प्रशस्त आहे.

रसांजनं शिरीषेण पथ्यया च समन्वितम् ।
सक्षौद्रं लेपनं योज्यं सद्यो रोपयति व्रणम् ॥ ८ ॥

रसांजन, शिरसाची साल, व हिरडेदळ, ह्यांचा मधांत लेप करावा. तो उपदंशाच्या व्रणाला त्वरित बरा करतो.

गोपीचन्दनतुत्थे च समभागेन मर्दयेत् ।
कज्जली जलसंयुक्ता व्रणानां लेपने हिता ॥ ९ ॥

गोपीचंदन व मोरचुताची लाही दोन्ही समभाग घेऊन त्यांचा खल करून कज्जली करावी. ती उपदंशाच्या व्रणावर लेप करण्याला फार हितकारक आहे.

मोचापूगविभूतिं च कोलत्वक्शङ्खजीरकम् ।
पिष्ट्वोपदेशे लेपोऽयं पयसा पानमेव च ।
नाशयेदुष्णतां तूर्णं शुष्कान्कुर्याद् व्रणानपि ॥ १० ॥

मोचरस व सुपारी ह्यांची राख, बोरीची साल व शंखजिरें ह्यांचें चूर्ण करून उपदंशावर लेप करावा; व तें दुधांतून प्यावयास द्यावें. हें उष्णतेचा त्वरित नाश करितें व व्रणांना शुष्क करितें.

पारदादि लेप.

पारदं गन्धकं तालं दरदं च मनःशिलाम् ।
पृथक्कर्षं द्विकर्षं च मुद्दारं सङ्गजीरकम् ॥ १ ॥
विधाय कज्जलीं श्लक्ष्णां मर्दयेत्सुरसारसैः ।
छायाशुष्कां ततः कृत्वा पुनरुन्मत्तजद्रवैः ॥ २ ॥
विमर्द्याथ वटी कार्या उपदंशे प्रयोजयेत् ।
गोघृतेन प्रलेपोऽयं व्रणनां रोपणे हितः ॥ ३ ॥

पारा, गंधक, हरताळ, हिंगूळ, मनशीळ, हीं औषधें एक एक तोळा व मुरदाडशिंगी व शंखजिरें दोन दोन तोळे ह्यांची कज्जली करून तुळशीच्या रसांत खल करून सावलींत वाळवावी. आणि पुनः धोत्र्याच्या पानांच्या रसांत खल करून गोळ्या कराव्या, आणि उपदंशावर योजाव्या. ह्या गोळीचा उपदंशाच्या व्रणावर गाईच्या तुपांतून लेप करावा. तो व्रणांना भरून आणतो.

स्वरस.

आम्रत्वचं विनिष्पीड्य निगृह्य स्वरसं पलम् ।
चतुष्पलं त्वजाक्षीरं संयुक्तं प्रपिबेत्प्रगे ॥ १ ॥
एवं मुनिदिनं कुर्यादुपदंशे व्रणे हितम् ।
तथा क्षीरं तथा जीर्णं गोधूमं पथ्यमाचरेत् ॥ २ ॥

आंब्याची साल ठेचून चार तोळा रस काढावा आणि तो सोळा तोळे शेळीच्या रसांतून प्रातःकाळीं प्यावा. ह्याप्रमाणें सात दिवस करावें. हा प्रयोग उपदंश व व्रण ह्यांजवर हितकारक आहे. ह्याज-वर दूध व गव्हाची रोटी हें पथ्य करावें.

जातीप्रवालस्वरसं पलार्धं धेनोर्घृतं सर्जरसेन युक्तम् ।
पिबेत्प्रगे पञ्चविधोपदंशे क्षाराद्दते गोधुमसर्पिपथ्यम् ॥ ३ ॥

जाईच्या पानांचा रस दोन तोळे घेऊन त्यांत गाईचें तूप व राळ मिळवून पांच प्रकारच्या उपदंशांवर प्रातःकाळीं प्यावा. आणि ह्याजवर तूप, गव्हाची रोटी असें अळणी पथ्य करावें.

व्रण धुण्याचा प्रकार.

निम्बार्जुनाश्वत्थकदम्बशालजम्बूवटोदुम्बरवेतसाद्भिः ।
प्रक्षालनालेपघृतानि कुर्याच्चूर्णं च पित्तास्रभवोपदंशे ॥ १ ॥

बाळंतलिंबाची साल, अर्जुनसादड्याची साल, पिंपळ, कळंब,

साग, जांभूळ, वड, उंबर व वेत ह्यांच्या सालीचा काढा करून त्यानें उपदंशाचे व्रण धुवावे; आणि त्यांजवर तूप लावून त्याच सालींचें चूर्ण टाकावें. हा प्रयोग पित्तजन्य उपदंशावर करावा.

त्रिफलायाः कषायेण भृङ्गराजरसेन वा ।
व्रणप्रक्षालनं कुर्यादुपदंशप्रशान्तये ॥ २ ॥

उपदंशाचे व्रण बरे होण्याकरितां त्रिफळ्याच्या काढ्यानें अथवा माक्याच्या रसानें व्रण धुवावे.

अश्वत्थोदुम्बरप्लक्षवटवेतसजः शृतः ।
व्रणशोथोपदंशानां नाशनः क्षालनात्स्मृतः ॥ ३ ॥

पिंपळ, उंबर, पिंपरणी, वड व वेत ह्यांच्या सालींचा काढा करून प्रक्षालनार्थ घ्यावा. तो उपदंशाचे व्रण व त्यांची सूज ह्यांचा नाश करतो.

जयाजात्यश्वमारार्कशम्याकानां दलैः पृथक् ।
कृतं प्रक्षालने क्वाथं मेढ्रपाके प्रयोजयेत् ॥ ४ ॥

जासवंद, जाई, कणेर, रुई व बाहवा ह्या प्रत्येकाच्या पाल्याचा काढा शिस्न पिकलें असतां तें धुण्याकरितां योजावा.

उपदंशावर लिंगलेप.

रसकर्पूरगद्याणं मर्दयेत्खदिराम्बुना ।
प्रक्षालयेद्वारिणा च शुष्के लेपस्तु वारिणा ॥ १ ॥
लिङ्गलेपो व्रणं हन्ति त्रिदिनान्नात्र संशयः

रसकापूर अर्धा तोळा घेऊन खैराच्या काढ्यांत खलावा. आणि पाण्यानें व्रण धुऊन कोरडा करून त्याजवर लेप करावा. ह्यानें तीन दिवसांत व्रण बरे होतात, ह्यांत संशय नाहीं.

उपदंशव्रणावर पूगादि लेप.

पूगं सुदग्धमेकं तु रसगन्धकहिंगुलम् ।
खदिरं तुत्थकं चैव मर्दयेन्निम्बुनीरकैः ॥ १ ॥
समभागानि सर्वाणि गुटिकां कारयेद्बुधः ।
उपदंशे घृतैर्लेपस्त्रिदिनाद्व्रणरोपणः ॥ २ ॥

एका सुपारीची राख, पारा, गंधक, हिंगूळ, कात व मोरचुताची लाही, हीं औषधें समभाग घेऊन लिंबाच्या रसांत खल करून गोळी

करावी. आणि उपदंशावर तुपांतून लेप करावा. तो तीन दिवसांत व्रणाचा नाश करतो.

उपदंशाच्या चट्ट्यांवर लेप.

जातीफलविडङ्गानि रसकं देवपुष्पकम् ।
समभागानि सर्वाणि नवनीतेन मर्दयेत् ।
स्फोटानामुपदंशानां व्रणशोधनरोपणः ॥ ३ ॥

जायफळ, वावडिंग, कलखापरी व लवंग हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा लोण्यांत खल करून लेप करावा. तो उपदंशाच्या चट्ट्याचें शोधन व रोपण करतो.

घृतें.

भूनिम्बनिम्बत्रिफलापटोलकरञ्जजातीखदिरासनानाम् ।
शृतैश्च कल्कैर्घृतमाशु पक्कं सर्वोपदंशापहरं प्रदिष्टम् ॥ १ ॥

काडेचिराईत, निंबाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कडुपडवळ, करंजाची साल, जाईचा पाला, खैर व असाणा ह्यांचा कल्क व काढा ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें सर्व उपदंशांचा नाश करितें, म्हणून सांगितलें आहे.

करञ्जनिम्बार्जुनशालजम्बूवटादिभिः कल्ककषायसिद्धम् ।
सर्पिर्निहन्यादुपदंशदोषं सदाहपाकं स्रुतिरागयुक्तम् ॥ २ ॥

करंज, कडुनिंब, अर्जुनसादडा, सागवान, जांभूळ व वड ह्यांचा कल्क व काढा ह्यामध्यें तूप सिद्ध करावें. तें ज्यामध्यें दाह, पाक, स्राव व लाली हे विकार आहेत अशा उपदंशांचा नाश करितें.

अगारधूमादि तेल.

अगारधूमो रजनी सुरा किण्वं च तैस्त्रिभिः ।
भागोत्तरैः पचेत्तैलं कण्डूशोथरुजापहम् ।
शोधनं रोपणं चैव सवर्णकरणं तथा ॥ १ ॥

घेरोसा एक भाग, हळद दोन भाग, आणि सुराबीज तीन भाग ह्याप्रमाणें जिन्नस घेऊन तेल सिद्ध करावें. तें कंडू, सूज व ठणका ह्यांचा नाश करितें. हें शोधन व रोपण करणारें व व्रणाचा डाग घालविणारें आहे.

चोपचिन्यादि चूर्ण.

कुडवं चोपचिन्याश्च शर्करायाः पलं तथा ।
पिप्पली पिप्पलीमूलं मरिचं देवपुष्पकम् ॥ १ ॥
आकल्लं क्षुरकं शुण्ठी जन्तुघ्नं च वराङ्गकम् ।
पृथक्कोलमितं ग्राह्यमेतच्चूर्णीकृतं शुभम् ॥ २ ॥
सर्वमेकत्र संयोज्यं कर्षार्धं प्रतिवासरम् ।
भक्षयेन्मधुसर्पिर्भ्यां युक्तं पथ्यं समाचरेत् ॥ ३ ॥
शाल्योदनं तथा सूपस्तुवरीणां घृतं मधु ।
गोधूमः सैन्धवं शिग्रुर्बिम्बी कोशातकीफलम् ॥ ४ ॥
आर्द्रकं जलमन्दोष्णं हितमत्र प्रकीर्तितम् ।
पञ्चोपदंशरोगाणां प्रमेहाणां तथैव च ।
व्रणानां वातरोगाणां कुष्ठानां च विनाशनम् ॥५ ॥

चोपचिनी सोळा तोळे, खडीसाखर चार तोळे, पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, लवंग, अक्कलखारा, गोखरू, सुंठ, वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं प्रत्येकीं अर्धा अर्धा तोळा, ह्या सर्वांचें चूर्ण करून रोज अर्धा तोळा चूर्ण तूप व मध ह्यांतून द्यावें. आणि योग्य तें पथ्य करावें. साळीचा भात, तुरीचें वरण, तूप, मध, गहू, सैंधेलोण, शेवगा, तोंडलीं, दोडके, आलें व कोमट पाणी हें ह्याजवर पथ्य सांगितलें आहे. हें चूर्ण पांच प्रकारचे उपदंश, प्रमेह, व्रण, वातरोग व कुष्ठ ह्यांचा नाश करितें.

चोपचिनी-पाक.

चोपचिन्युद्भवं चूर्णं पलद्वादशमेव च ।
पिप्पली पिप्पलीमूलं मरिचं नागरं त्वचम् ॥ १ ॥
आकल्लकं लवङ्गं च प्रत्येकं कर्षसंमितम् ।
शर्करासमचूर्णं च पाचयेत्सर्वमेकतः ॥ २ ॥
मोदकं कारयेत्तत्तु कर्षं कर्षं प्रमाणतः ।
सायं प्रातर्निषेव्यस्तु पथ्यं पूर्वोक्तचूर्णवत् ॥ ३ ॥
उपदंशे व्रणे कुष्ठे वातरोगे भगंदरे ।
धातुक्षयकृते कासे प्रतिश्याये च यक्ष्मणि ।
सर्वान्रोगान्निहन्त्याशु ततः पुष्टिकरो भवेत् ॥ ४ ॥

चोपचिनीचें चूर्ण अठ्ठेचाळीस तोळे व पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, सुंठ, दालचिनी, अक्कलखारा, लवंग, हीं प्रत्येकीं एकएक तोळा

ह्याप्रमाणें औषधें घेऊन त्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या समान साखर घेऊन तिचा पाक करून त्यांत तें चूर्ण घालून एक एक तोळ्याचे लाडू बांधावे. आणि रोज सकाळीं व संध्याकाळीं एक एक लाडू खावा, आणि वरील चूर्णाप्रमाणें पथ्य करावें. म्हणजे उपदंश, व्रण, कुष्ट, वातरोग, भगंदर, धातुक्षयामुळें होणारा खोकला, पडसें व क्षय ह्या सर्व रोगांचा नाश करतो, व शरीर पुष्ट करतो.

बाळहिरड्याचा प्रयोग.

बालपथ्यापलैकं च तुत्थं शाणमितं तथा ।
निम्बुद्रवेण संमर्द्य दृढं सप्तदिनानि वै ॥ १ ॥
गुटिकां चणकप्रायां छायाशुष्कां तु कारयेत् ।
शीतोदकानुपानेन नित्यमेकां प्रदापयेत् ॥ २ ॥
घस्त्राणामेकविंशत्या मुच्यते तूपदंशतः ।
शालिगोधूममुद्गाश्च गोसर्पिः पथ्यमीरितम् ॥ ३ ॥

बाळहिरडे चार तोळे आणि मोरचुताची लाही तीन मासे ह्यांचा लिंबाच्या रसांत सात दिवस खल करावा. आणि हरभऱ्याएवढ्या गोळ्या करून सावलींत वाळवाव्या. ह्यांतील एक गोळी रोज थंड पाण्याशीं द्यावी. ह्याप्रमाणें एकवीस दिवस ह्या गोळ्या घ्याव्या, म्हणजे उपदंशापासून रोगी मुक्त होतो. ह्याजवर साळी, गहू, मूग व गाईचें तूप हें पथ्य सांगितलें आहे.

रसगंधक कज्जली.

कर्षमात्रो रसः शुद्धो द्विकर्षो गन्धकस्तथा ।
विधिवत्कज्जलीं कृत्वा तां च गोघृतसंयुताम् ॥ १ ॥
माषमात्रां प्रतिदिनं दद्यादेवं त्रिसप्तकम् ।
गोधूमान्नं घृतं पथ्यं कारयेल्लवणं विना ।
उपदंशापहः श्रेष्ठो योगोऽयं मुनिभिः स्मृतः ॥ २ ॥

शुद्ध पारा एक तोळा व शुद्ध गंधक दोन तोळे ह्यांची विधियुक्त कज्जली करून ती एक मासा याप्रमाणें गाईच्या तुपांतून एकवीस दिवस द्यावी. आणि मिठावांचून गव्हाचें अन्न व तूप खावें. हा योग उत्तम उपदंशनाशक आहे, असें मुनींचें मत आहे.

महाक्षारवटी.

महाक्षारमाकल्लकं खादिरं च क्रमाद्वर्धितं वारिणा पिष्टमेतत् ।
निषेवेत माषप्रमाणं घृतेन महारोगनिघ्नं व्रणेषु व्रणघ्नम् ॥ १ ॥
गोधूमं गोघृतं पथ्यं मन्दं लवणमाचरेत् ।
द्विवारं ग्राहयेन्नित्यमुपदंशनिवृत्तये ॥ २ ॥

महाक्षार (सोरा किंवा सावण), अक्कलकारा व कात हीं तीन औषधें अनुक्रमें एक, दोन, तीन अंश प्रमाणांत घेऊन चूर्ण करून तें चूर्ण एक मासाप्रमाणें तुपांतून द्यावें. हें महान रोगाचें नाशक आहे. व्रणावर दिलें असतां व्रणाचा नाश करितें. ह्याजवर गहू व गाईचें तूप हें पथ्य करावें आणि मीठ थोडें खावें.

सर्व उपदंशांवर रसघृत.

शुद्धं रसं पिचुमितं द्विबलिं प्रमर्द्य
सर्वद्विभागनवनीतमपि प्रमर्द्य ।
वस्त्रे प्रलिप्य पिचुमन्दविपर्णशाखां
संवेष्टयेन्नतमुखीं परिदीय वर्तिम् ॥ १ ॥
तस्या घृतं स्रवति काचमये च पात्रे
धृत्वाऽहिवल्लिदलसाकमिदं प्रदेयम् ।
सर्वोपदंशकरिकेसरिणं व्रणघ्नं
पट्वादिकं रसघृते च विवर्जनीयम् ॥ २ ॥

शुद्ध पारा एक तोळा व शुद्ध गंधक दोन तोळे ह्यांची कज्जली करून तीमध्यें सहा तोळे लोणी (तूप) घालून पुनः खल करावा. आणि त्याचा एका फडक्याला लेप करून तें फडकें एका कडुलिंबाच्या पत्र रहित ताज्या ढाप्याला गुंडाळावें. नंतर तो ढापा पेटवून खालीं तोंड करून धरावा, आणि त्यांतून गळणारें तूप कांचेच्या भांड्यांत धरावें आणि विड्याच्या पानास लावून द्यावें. हें सर्व उपदंशांचा व व्रणाचा नाश करितें. ह्याला उपदंश-करि-केसरी-रसघृत असें म्हणतात. ह्याजवर मीठ वगैरे वर्ज करावें.

पथ्यापथ्य.

दिवा निद्रां मूत्रवेगं गुर्वन्नं मैथुनं गुडम् ।
आयासमम्लं तक्रं च वर्जयेदुपदंशवान् ॥ १ ॥

दिवसा झोंप घेणें, मूत्रवेगाचा अवरोध, जड अन्न, मैथुन, गूळ,

आयास, आंबट पदार्थ व ताक हे पदार्थ उपदंशावर वर्ज करावे.

द्विपलं चिक्कणं पूगं द्विकर्षं सिन्धुसस्यकम् ।
कर्कारुत्वक्कर्षमिता भृष्टमेतत्त्रिकं भवेत् ॥ २ ॥
जम्भोदरगतं तुत्थं पुटपाकविधानतः ।
पक्कं चणकमानं तु सर्वमेतत्सुखल्वके ॥ ३ ॥
जम्बीरसलिलैर्मर्द्यं गाढं सिद्धं दिनत्रयात् ।
उपदंशं चन्द्रकं च व्रणं पूतिप्रमेहकम् ॥ ४ ॥
पृदाकुवीरुच्छदनलिप्तं प्सातं निवारयेत् ।
शर्करासहितं पथ्यं गोधूमान्नं घृतप्लुतम् ॥ ५ ॥

आठ तोळे चिकणी सुपारी, दोन तोळे समुद्रफळ व एक तोळा, काकडीची साल हीं तिन्हीही औषधें भाजून घ्यावीं आणि ईड-निंबाच्या पोटांत घालून पुटपाकाच्या विधीनें पक्क करून काढलेला मोरचूत हरभऱ्याएवढा त्यांत घालून सर्वांचा लिंबाच्या रसांत तीन दिवस खल करावा. आणि विड्याच्या पानाला लावून द्यावें. म्हणजे उपदंश, तत्संबंधीं चट्टे, व्रण व पू-पर्मा ह्यांचा नाश करतें. ह्याजवर गव्हाचें अन्न, तूप व साखर पथ्याला खावें.

पलमात्रे कटुतैले ह्यक्षं सिक्थं च कर्षमेव पृथक् ।
कम्पिल्लकं विरोजा सिन्दूरः सौरकं चैव ॥ ६ ॥
मुर्दाडकं च सर्वं पित्तलपात्रे विपाचितं शिखिना ।
मन्दं पचेत्प्रमथ्य स्वपाणिनोद्धृत्य तत्सिद्धम् ॥ ७ ॥
सितवस्त्रे संलिप्य व्रणोपरि स्थापयेत्सम्यक् ।
क्षतभूदेशं सर्वं सशूकदोषं फिरङ्गजं हन्यात् ॥ ८ ॥
शस्त्रकृतं नखजातं दन्तजमाशु व्रणं शिखिजम् ।
दृष्ट्वा प्रत्ययमेतत्प्रकाशितं बालबोधाय ॥ ९ ॥

चार तोळे कडू तेलांत (मोहरीच्या अथवा शिरसाच्या तेलांत दोन तोळे मेण घालावें आणि कपिला, विरोजा (गंधाविरोजा) शेंदूर, सौरक (सुरूचा डीक;- रुमामस्तकी-) व मुर्दाडशिंगी हीं औषधें एक एक तोळा घालून पितळेच्या भांड्यांत मंदाग्नीवर किंचित् पचन करून घोटून सारखें करून द्यावें. आणि तें पांढऱ्या फडक्याला लिंपून त्याची व्रणावर पट्टी द्यावी. हें मलम सर्व प्रकारचे व्रण, शुक्रदोषजन्यव्रण, फिरंगोपदंशजन्यव्रण, त्याचप्रमाणें शस्त्र, नख,

दांत व बाण लागून झालेले व्रण ह्यांचा नाश करितें. ह्याचा अनुभव घेऊन सामान्य वैद्यांना कळण्याकरितां मीं हें प्रगट केलें आहे.

शूकदोषनिदान; त्याची संप्राप्ति.

अक्रमाच्छेफसो वृद्धिं योऽभिवाञ्छति मूढधीः ।
व्याधयस्तस्य जायन्ते दश चाष्टौ च शूकजाः ॥ १ ॥

अयोग्य उपयांनीं शिस्न मोठें होण्याची इच्छा करणारा जो मूर्ख मनुष्य असतो, त्याला दुष्ट जलजंतूच्या लेपानें अठरा प्रकारचे शूकदोष होतात.

सर्षपिका लक्षण.

गौरसर्षपसंस्थाना शूकदुर्भग्नहेतुका ।
पिटिका श्लेष्मवाताभ्यां ज्ञेया सर्षपिका तु सा ॥ २ ॥

दुष्ट जलजंतूंचा वाईट रीतीनें लेप केल्यानें शिस्नावर पांढऱ्या शिरसाच्या आकाराच्या पुळ्या कफवातापासून होतात. त्यांना सर्षपिका असें म्हणतात.

अष्ठीलिकालक्षण.

कठिनैर्विषमैर्भुग्नैर्वायुनाऽष्ठीलिका भवेत् ।

अप्रशस्त शूकलेपानें लिंगावर वायूपासून एक कठीण गांठ होते, तिला अष्ठीलिका म्हणतात.

ग्रथितलक्षण.

शूकैर्यत्पूरितं शश्वद्ग्रथितं नाम तत्कफात् ॥ ३ ॥

वरचेवर सतत शूकलेप करण्यानें कफापासून लिंगावर गाठी उत्पन्न होतात, त्यांना ग्रथित असें म्हणतात.

कुंभिकालक्षण.

कुम्भिका रक्तपित्तोत्था जाम्बवास्थिनिभा शुभा ॥

शूकजन्य रक्तपित्ताच्या प्रकोपानें लिंगावर जांभळाच्या बीप्रमाणें काळसर अशी गाठ येते, तिला कुंभिका म्हणतात.

अलजी.

तुल्यजां त्वलजीं विद्याद्यथोक्तां च विचक्षणैः ॥ ४ ॥

प्रमेहपीटिकानिदानांतील अलजीप्रमाणें शूकदोषापासून एक

पुळी होते, तिचीं लक्षणें त्या अलजीसारखींच असतात, म्हणून तिलाही अलजीच म्हणतात.

मृदित.

मृदितं पीडितं यत्तु संरब्धं वातकोपतः ॥

शूकदोषांत लिंगाचें अतिशय मर्दन केल्यानें वायूचा कोप होऊन तें सुजतें. त्याला मृदित असें म्हणतात.

संमूढपीटिका.

पाणिभ्यां भृशसंमूढे संमूढपीटिका भवेत् ॥ ५ ॥

हातानें लिंग आतिशय चोळवटलें असतां वातप्रकोपामुळें लिंगावर एक बिनतोंडाची पुळी होते. तिला संमूढपीटिका असें म्हणतात.

अवमंथ.

दीर्घा बह्वयश्च पिटिका दीर्यन्ते मध्यतस्तु याः ।
सोऽवमन्थः कफासृग्भ्यां वेदनारोमहर्षकृत ॥ ६ ॥

कफ व रक्त ह्यांच्या प्रकोपानें लिंगावर लांबट व मध्यें चिरलेल्या अशा पुळ्या होतात, त्यांना वेदना असतात. व अंगावर काटा येतो त्यांना अवमंथ असें म्हणतात.

पुष्करिकालक्षण.

पिटिकाभिश्चिता या तु पित्तशोणितसंभवा ।
पद्मकर्णिकसंस्थाना ज्ञेया पुष्करिका च सा ॥ ७ ॥

शूकदोषजन्य प्रकुपित रक्तपित्तापासून बारीक बारीक पुळ्यांनीं व्याप्त अशी एक पुळी होते. ती कमळांतील गुच्छाप्रमाणें दिसते, म्हणून तिला पुष्करिका असें म्हणतात.

स्पर्शहानि.

स्पर्शहानिं तु जनयेच्छोणितं शूकदूषितम् ।
वातपित्तकृतो ज्ञेयस्त्वपाको ज्वरदाहकृत् ॥ ८ ॥

शूकलेपानें दूषित झालेलें रक्त लिंगावरील त्वचेचें स्पर्शज्ञान नष्ट करितें. त्याला स्पर्शहानि असें म्हणतात. हीमध्यें पाक नसतो. ही वातपित्तापासून होते. हिच्यामुळें ज्वर व दाह हीं लक्षणें होतात.

उत्तमा.

मुद्गमाषोपमा रक्ता रक्तपित्तोद्भवा च सा ।
व्याधिरेषोत्तमा नाम शूकाजीर्णनिमित्तजः ॥ ९ ॥

अतिशय शूकलेपानें कुपित झालेल्या रक्तपित्तापासून तांबूस अशा मुगाच्या किंवा उडदाच्या आकाराच्या पुटकुळ्या लिंगावर उठतात, त्यांना उत्तमा असें म्हणतात.

शतपोनक.

छिद्रैरणुमुखैर्लिङ्गं चितं यस्य समन्ततः ।
वातशोणितजो व्याधिः स ज्ञेयः शतपोनकः ॥ १० ॥

शूकदोषामुळें प्रकुपित झालेल्या वातरक्तापासून लिंगावर अनेक बारीक बारीक छिद्रें पडतात, त्याला शतपोनक असें म्हणतात.

त्वक्पाक.

वातपित्तकृतो ज्ञेयस्त्वक्पाको ज्वरदाहकृत् ॥

वातपित्तापासून लिंगावरील त्वचा पिकते, त्यामुळें ज्वर व दाह हीं लक्षणें होतात. त्याला त्वक्पाक म्हणतात.

शोणितार्बुद.

कृष्णैः स्फोटैः सरक्ताभिः पिटिकाभिर्निपीडितम् ॥ ११ ॥
यस्य वास्तुरुजश्चोग्रा ज्ञेयं तच्छोणितार्बुदम् ॥

शूकलेपानें दूषित झालेल्या रक्तापासून लिंगावर काळ्या, तांबड्या अशा बारीक पुटकुळ्या येतात. त्या ठिकाणीं सूज असते व व्रण होणाऱ्या ठिकाणीं अतिशय ठणका असतो. त्या विकाराला शोणितार्बुद असें म्हणतात.

मांसार्बुद.

मांसदोषेण जानीयादर्बुदं मांससंभवम् ॥ १२ ॥

शुकलेपानें दूषित झालेल्या मांसापासून मांसार्बुद होतें.

मांसपाक.

शीर्यन्ते यस्य मांसानि यस्य सर्वाश्च वेदनाः ।
विद्यात्तं मांसपाकं तु सर्वदोषकृतं भिषक् ॥ १३ ॥

शूकलेपानें दूषित झालेल्या मांस नासून लिंगापासून गळून पडतें, त्यामुळें सर्व प्रकारच्या वेदना होतात. त्याला मांसपाक असें म्हण-

तात. हा त्रिदोषापासून होतो.

विद्रधि.

विद्रधिं संनिपातेन यथोक्तमभिनिर्दिशेत् ॥

शूकलेपामुळें त्रिदोषापासून लिंगावर एक विद्रधि होतो त्याचीं लक्षणें (विद्रधिनिदानांतील) सन्निपातज विद्रधीसारखीं असतात.

तिलकालक.

कृष्णानि चित्राण्यथवा शूकानि सविषाणि तु ॥ १४ ॥
पातितानि पचन्त्याशु मेढ्रं निरवशेषतः ॥
कालानि भूत्वा मांसानि शीर्यन्ते यस्य देहिनः ।
संनिपातसमुत्थांश्च तान्विद्यात्तिलकालकान् ॥ १५ ॥

काळ्या अथवा चित्रविचित्र रंगांच्या विषारी जलशूकांच्या लेपानें त्वरित सर्व लिंग पिकतें आणि त्यांतील मांस काळें होऊन गळून पडतें. ह्या त्रिदोषजन्य व्याधीला तिलकालक असें म्हणतात.

शूकदोषाचें असाध्य लक्षण.

तत्र मांसार्बुदं यत्तु मांसपाकश्च यः स्मृतः ।
विद्रधिश्च न सिध्यन्ति ये च स्युस्तिलकालकाः ॥ १६ ॥

ह्या शूकदोषजन्य व्याधींपैकीं मांसार्बुद, मांसपाक, विद्रधि, आणि तिलकालक हे व्याधि साध्य होत नाहींत.

शूकदोष चिकित्सा.

हितं च सर्पिषः पानं पथ्यं चापि विरेचनम् ।
हितः शोणितमोक्षश्च शूकरोगेषु देहिनाम् ॥ १ ॥

शूकदोषाच्या रोग्याला तूप पाजून रेचक द्यावें व रक्त काढावें. तें हितकारक आहे.

उल्लिख्य सार्षपीं तालपत्रेणाथ प्रलेपयेत् ।
त्रिकटुत्रिफलालोध्रैर्गोमूत्रपरिपेषितैः ॥ २ ॥
क्रियेयमवमन्थेऽपि रक्तं शोध्यं तथोभयोः ।

तालपत्र नांवाच्या शस्त्रानें सर्षपिका खरडून काढून तिजवर सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व लोध्र हीं औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचा लेप करावा. अवमंथावर हाच उपचार करावा; व दोहोंतीलही रक्त काढावें.

अष्ठीलायां हृते रक्ते श्लेष्मग्रन्थिक्रियां चरेत् ॥ ३ ॥

कुम्भिकायां हरेद्रक्तं पकायां शोधिते व्रणे ।
तिन्दुकत्रिफलालोध्रैर्लेपस्तैलं च रोपणम् ॥ ४ ॥

अष्ठीलेंतील रक्त काढून कफग्रंथीवरील उपचार करावे. कुंभिकेंतील रक्त काढावें. ती पिकली असेल तर तिचें शोधन करून टेंभुरणी, हिरडा, बेहडा व आवळकाठी आणि लोध्र ह्यांचा तेलांतून लेप करून रोपण करावें.

अलज्यां हृतरक्तायां पूर्व एव क्रियाक्रमः।

अलजींतील रक्त काढून मागें प्रमेहपीटिकेंतील चिकित्सेंत अलजीवर जे उपचार सांगितले आहेत ते करावे.

स्वेदयेद्ग्रथितं पश्चान्नाडीस्वेदेन बुद्धिमान् ॥ ५ ॥
सुखोष्णैरुपनाहैश्च व्रणोक्तैरुपनाहयेत् ।

फुंकणी तापवून तिनें ग्रथिताचें स्वेदन करावें. नंतर सोसेल असें ऊन ऊन पोटीस बांधावें.

उत्तमाख्यां तु पिटिकां संस्वेद्य बडिशोद्धृताम् ॥ ६ ॥
कल्कचूर्णैः कषायाणां क्षौद्रयुक्तैरुपाचरेत् ।

उत्तमा नांवाची पुळी गळानें ओढून धरून तिचें स्वेदन करावें. नंतर कल्क, चूर्ण व काढे ह्यांचा मधासह उपयोग करावा.

क्रमः पित्तविसर्पोक्तः पुष्करीमूढयोर्हितः ॥ ७ ॥

संमूढपीटिका व पुष्करिका ह्यांजवर पित्तविसर्पावरील उपचार करावे.

त्वक्पाके स्पर्शहानौ च सेचयेन्मृदितं पुनः ।
बलातैलेन कोष्णेन मधुरैश्चोपनाहयेत् ॥ ८ ॥

त्वक्पाक, स्पर्शहानि व मृदित ह्यांजवर कोमट बलातेल शिंपून मधुर औषधांनीं उपनाहन करावें.

रसक्रिया विधातव्या लिखिते शतपोनके ।
पृथक्पर्ण्यादिभिः सिद्धं तैलं देयमनन्तरम् ॥ ९ ॥

शतपोनक खरडून काढून त्याजवर रसक्रिया करावी. आणि पिठवण वगैरे औषधांनीं सिद्ध केलेलें तेल नंतर त्याजवर लावावें.

रक्तविद्रधिवच्चापि क्रिया शोणितजेऽर्बुदे ।
मांसार्बुदे प्रकुर्वीत क्रियां सद्योव्रणोदिताम् ॥ १० ॥
त्रिफलागुग्गुलं चापि विशेषेणावचारयेत् ।

शोणितार्बुदावर रक्तविद्रधीवरील उपचार करावे आणि मांसार्बुदावर सद्योव्रणावरील उपचार करावे. आणि विशेषतः त्रिफलादि गुग्गुळ द्यावा.

मांसपाके वटाद्यस्य गणस्य विधिवत्कृतैः ॥ ११ ॥
कषायचूर्णकल्कैश्च सेकोद्धूलनलेपनम् ।

मांसपाकावर वटादि गणांतील औषधांचें विधियुक्त केलेले काढे, चूर्ण व कल्क ह्यांचें सिंचन, उध्दूलन वगैरे क्रिया करावी.

विद्रधौ विधिवत्कार्यं रक्तविद्रधिभेषजम् ॥ १२ ॥
वरुणादिकषायस्य पानप्रक्षालने हितम् ।

विद्रधीवर रक्तविद्रधीवरील उपचार विधियुक्त करावे. ह्याजवर वरुणादि गणांतील काढा धुण्याला व पिण्याला हितकारक आहे.

तिलकालं समुल्लिख्य क्षुरेण लघुपाणिना ॥ १३ ॥
भिषजाऽथात्र कर्तव्यः सद्योव्रणविधिर्मतः ।

तिलकालक वस्तऱ्यानें हलक्या हातानें खरडून काढून त्याजवर वैद्यानें सद्योव्रणावरील उपचार करावे.

मांसार्बुदं मांसपाकं विद्रधिं तिलकालकम् ।
प्रत्याख्याय प्रकुर्वीत भिषक् तेषां प्रतिक्रियाम् ॥ १४ ॥

मांसार्बुद, मांसपाक, विद्रधि, व तिलकालक, ह्यांजवर ते बरे होणार नाहींत असें सांगून चिकित्सा करावी.

कुष्ठनिदान.

विरोधीन्यन्नपानानि द्रवस्निग्धगुरूणि च ।
भजतामागतांछर्दिवेगांश्चान्यान्प्रतिघ्नताम् ॥ १ ॥
व्यायाममग्निसंतापमतिभुक्त्वा निषेविणाम् ।
शीतोष्णलंघनाहारान्क्रमं त्यक्त्वा निषेविणाम् ॥ २ ॥
घर्मश्रमभयार्तानां द्रुतं शीताम्बुसेविनाम् ।
अजीर्णाध्यशिनां चैव पञ्चकर्मापचारिणाम् ॥ ३ ॥
नवान्नदधिमत्स्याम्ललवणातिनिषेविणाम् ।
माषमूलकपिष्टान्नतिलक्षीरगुडाशिनाम् ॥ ४ ॥
व्यवायं चाप्यजीर्णेऽन्ने निद्रां च भजतां दिवा ।
विप्रान्गुरून्धर्षयतां पापं कर्म च कुर्वताम् ॥ ५ ॥
पाप्मभिः कर्मभिः सद्यः प्राक्तनैः प्रेरिता मलाः ।

वातादयस्त्रयो दोषास्त्वग्रक्तं मांसमम्बु च ॥ ६ ॥
दूषयन्ति स कुष्ठानां सप्तको द्रव्यसंग्रहः ।
त्वचः कुर्वन्ति वैवर्ण्यं दुष्टाः कुष्ठमुशन्ति तत् ।
अतः कुष्ठानि जायन्ते सप्त चैकादशैव तु ।

विरुद्ध, पातळ, स्निग्ध व जड अन्न खाणारा, ओकारीचा व मलमूत्रादिकांचा वेग धारण करणारा, अतिशय जेवण होतांच अतिशय श्रम करणारा, किंवा अग्नीचा शेक घेणारा, थंड, उष्ण, लंघन व आहार ह्यांचे क्रम सोडून सेवन करणारा, कडक उन्हांतून येऊन अतिशय श्रम करून किंवा अतिशय भयभीत होऊन तत्काळ थंड पाणी पिणारा, अजीर्णावर जेवणारा, वमनादि पंचकर्मे करून अपथ्य करणारा, नवें धान्य, दहीं, मासे, आंबट पदार्थ व मीठ अतिशय खाणारा, उडीद, मुळे, पिठाचें अन्न, तीळ, क्षार व गूळ सेवन करणारा, अन्न जिरलें नसून मैथुन करणारा, दिवसा झोंप घेणारा, ब्राह्मण, देव वगैरे पूज्यांचा अपमान करणारा, आणि पापकर्म करणारा, अशा मनुष्याच्या पूर्वार्जित पापकर्मामुळें प्रेरित झालेले हे वातादि तिन्ही दोष त्वचा, रक्त, मांस व जलधातु ह्यांना दूषित करतात. शरीरांतील हेच सात पदार्थ कुष्ठ उत्पन्न करितात. हीं द्रव्यें दूषित झालीं म्हणजे त्वचेला विवर्णता आणून दोष कुष्ठ उत्पन्न करितात. म्हणून सात महाकुष्ठें व अकरा क्षुद्र कुष्ठें अशीं एकंदर अठरा कुष्ठें उत्पन्न होतात.

कुष्ठानि सप्तधा दोषैः पृथग्द्वंद्वैः समागतैः ॥ ८ ॥
सर्वेष्वपि त्रिदोषत्वं व्यपदेशोऽधिकत्वतः ।

वातादि पृथक् दोषांनीं तीन, दोनदोन दोषांच्या संयोगानें तीन व त्रिदोषापासून एक, मिळून कुष्ठाचे सात प्रकार मानतात. सर्व कुष्ठें जरी त्रिदोषात्मक आहेत, तरी त्यांत जो दोष अधिक असतो त्या दोषानें तें कुष्ठ उत्पन्न होतें, असें समजतात.

अतिश्लक्ष्णखरस्पर्शः स्वेदास्वेदौ विवर्णता ॥ ९ ॥
दाहः कण्डूस्त्वचि स्वापस्तोदः कोठोन्नतिः श्रमः ।
व्रणानामधिकं शूलं शीघ्रोत्पत्तिश्चिरस्थितिः ॥ १० ॥
रूढानामतिरूक्षत्वं निमित्तेऽल्पेऽपि कोपनम् ।

रोमहर्षोऽसृजः कार्ष्ण्यं कुष्ठलक्षणमग्रजम् ॥ ११ ॥

ज्या ठिकाणीं कुष्ठ उत्पन्न व्हावयाचें असतें, त्या ठिकाणची त्वचा अतिशय गुळगुळीत किंवा अतिशय खरखरीत होते. त्या ठिकाणीं अतिशय घाम येतो किंवा मुळींच येत नाहीं, त्वचेचा रंग बदलतो. या ठिकाणीं दाह होतो, कंड सुटते, त्वचा बधिर होते, तिच्यामध्यें सुया टोचल्यासरखी टोंचणी लागते, मोठमोठ्या गांधी उठतात, थकवा वाटतो; त्या ठिकाणीं व्रण लवकर होतात व उशीरा बरे होतात; त्यांना ठणका फार असतो. जे व्रण भरले आहेत (बरे झाले आहेत) त्या जागीं अतिशय रूक्षपणा असतो. ते व्रण थोड्याशा अपथ्यानें देखील प्रकुपित होतात. अंगावर काटा येतो आणि रक्ताला काळसरपणा येतो. हें कुष्ठाचें पूर्वरूप आहे.

कापालकुष्ठ.

कृष्णारुणं कपालाभं यद्रूक्षं परुषं तनु ।
कापालं तोदबहुलं तत्कुष्ठं विषमं स्मृतम् ॥ १२ ॥

जें काळ्या किंवा तांबूस खापराप्रमाणें असतें, तसेंच जें रूक्ष व खरखरीत असतें, आणि ज्यांत त्वचा पातळ होऊन टोचणी फार असते त्या कुष्ठाला कापालकुष्ठ म्हणतात. हें चिकित्सा करण्यास फार कठीण आहे.

उदुंबरकुष्ठ.

रुग्दाहरागकण्डूभिः परितं रोमपिञ्जरम् ।
उदुम्बरफलाभासं कुष्ठमौदुम्बरं वदेत् ॥ १३ ॥

ठणका, दाह, लाली व कंडू ह्यांनीं व्याप्त असून ज्यावरील केस पिंगट रंगाचे होतात व जें उंबराच्या फळाप्रमाणें लाल दिसतें, त्याला औदुंबर कुष्ठ असें म्हणतात.

मंडलकुष्ठ.

श्वेतं रक्तं स्थिरं स्त्यानं स्निग्धमुत्सन्नमण्डलम् ।
कृच्छ्रमन्योन्यसंयुक्तं कुष्ठं मण्डलमुच्यते ॥ १४ ॥

पांढरें, तांबूस, कठीण, ओलसर, गुळगुळित, व ज्याचीं मंडळें वर उचललीं आहेत, तीं एकमेकांस लागलीं आहेत, असें जें कुष्ठ त्याला मंडलकुष्ठ असें म्हणतात. हें कष्टसाध्य आहे.

ऋष्यजिव्हकुष्ठ.

कर्कशं रक्तपर्यन्तमन्तःश्यावं सवेदनम् ।
यदृष्यजिह्वासंस्थानमृष्यजिह्वं तदुच्यते ॥ १५ ॥

कर्कश, तांबड्या कडा असलेलें, मध्यें काळसर रंगाचें, वेदनायुक्त आणि रोही जातीच्या हरिणाच्या जिभेप्रमाणें दिसणारें असें जें कुष्ठ, त्याला ऋष्यजिव्ह कुष्ठ असें म्हणतात.

पुंडरीक कुष्ट.

सुश्वेतं रक्तपर्यन्तं पुण्डरीकदलोपमम् ।
रक्तान्तर्दाहकण्ड्वाढ्यं चितं पद्ममिवांबुभिः ।
सोत्सेधं च सरागं च पुण्डरीकं प्रचक्षते ॥ १६ ॥

मध्यें पांढरी त्वचा असून सभोंवार लाल कडा—कोरा—असलेलें, पांढऱ्या कमळाच्या पाकळीप्रमाणें दिसणारें, लाल, अंतर्दाही व कंड ह्यांनीं व्याप्त, पाण्यांत बुडलेल्या कमळासारखें ओलसर, वर उचललेलें व तांबूस असें जें कुष्ठ त्याला पुंडरीक कुष्ट म्हणतात.

सिध्मकुष्ट.

सितं ताम्रं तनु च यद्रजो घृष्टं विमुञ्चति ।
प्रायश्चोरसि तत्सिध्ममलाबुकुसुमोपमम् ॥ १७ ॥

पांढरें, तांबूस, पसरणारें, घासलें असतां कोंडा सुटणारें आणि बहुधा छातीवर होणारें जें कुष्ट त्याला सिध्मकुष्ट (शिबें) असें म्हणतात. हें दुध्या भोपळ्याच्या फुलासारखें दिसतें.

काकणंतिक कुष्ट.

पूर्वं रक्तं च कृष्णं च काकणन्तीफलोपमम् ।
सदाहमस्पर्शसहं सपाकं तीव्रवेदनम् ॥ १८ ॥
यत्काकणन्तिकावर्णं सपाकं तीव्रवेदनम् ।
त्रिदोषलिङ्गं तत्कुष्ठं काकणं नैव सिध्यति ॥ १९ ॥

जें कुष्ट प्रथम तांबूस व काळसर, गुंजेच्या फळासारखें असतें, त्यांत दाह असून स्पर्श सहन होत नाहीं, त्याजवर फोड असतात व तीव्र वेदना असतात, तसेंच जें गुंजेच्या रंगाचें असतें, त्याला काकणंतिक कुष्ट असें म्हणतात. हें त्रिदोषात्मक असतें व हें साध्य होत नाहीं.

अकरा क्षुद्रकुष्टें;-चर्मकुष्ठ लक्षण.

अस्वेदनं महावास्तु यन्मत्स्यशकलोपमम् ।
तदेककुष्ठं चर्माख्यं बहुलं हस्तिचर्मवत् ॥ २० ॥

घाम नसललें, मोठी जागा व्यापणारें, माशाच्या अंगावरील खवल्याप्रमाणें दिसणारें अशा एका कुष्टाला चर्मकुष्ट असें म्हणतात. हें हत्तीच्या कातड्यासारखें जाड असतें.

किट्टिभकुष्ट.

श्यावं किणखरस्पर्शं परुषं किटिभं मतम् ।

काळसर रंगाचें, व्रणाच्या घट्ट्याप्रमाणें कठीण, खरखरीत व रूक्ष असें जें कुष्ट त्याला किट्टिभकुष्ट असें म्हणतात.

वैपादिककुष्ठ.

वैपादिकं पाणिपादस्फुटनं तीव्रवेदनम् ॥ २१ ॥

वैपादिक कुष्ठामध्यें हातपाय फुटतात व तीव्र वेदना होतात.

अलसककुष्ठ.

कण्डूमद्भिः सरागैश्च गण्डैरलसकं वदेत् ।

अलसक कुष्ट कंडुयुक्त असून त्यांत लाल गाठी उठतात.

दद्रुमंडल कुष्ट.

सकण्डूरागपिटिकं दद्रुमण्डलमुद्गतम् ॥ २२ ॥

कंडू, लाली व पुटकळ्या ह्यांनीं युक्त कुष्ठास दद्रुमंडल म्हणतात.

चर्मदलकुष्ठलक्षण.

रक्तं सशूलं कण्डूमत्सस्फोटं दलयत्यपि ।
तच्चर्मदलमाख्यातमस्पर्शसहमुच्यते ॥ २३ ॥

जें कुष्ठ लाल रंगाचें, शूळयुक्त, कंडुयुक्त, फोडांनीं व्याप्त असें असून ज्याची त्वचा विदलित होते व ज्याला स्पर्श सहन होत नाहीं, त्याला चर्मदलकुष्ट असें म्हणतात.

पामाकुष्ट (खरूज)

सूक्ष्मा बह्व्यः पीटिकाः स्राववत्यः
पामेत्युक्ताः कण्डुमत्यः सदाहाः ।

बारीक बारीक फोड उठून ते फुटून वाहतात. त्यांत कंडू व दाह हीं लक्षणें असतात. त्याला पामा असें म्हणतात.

सैव स्फोटैस्तीव्रदाहैरुपेता
ज्ञेया पाण्योः कच्छुरुग्रा स्फिजोश्च ॥ २४ ॥

तीच पामा (खरूज) तीव्र दाह व फोड ह्यांनीं युक्त अशी हाताला व ढुंगणाला झाली असतां तिला कच्छु असें म्हणतात.

विस्फोट कुष्ट.

स्फोटाः श्यावारुणाभासा विस्फोटाः स्युस्तनुत्वचः ।

तांबूस व काळसर रंगाचे जे फोड येतात, त्यांला विस्फोट म्हणतात. ह्यांतील फोडांची त्वचा पातळ असते.

रकसा कुष्ट.

कण्डूचिता या पिटिका शरीरे संस्राव्यमाणा रकसोच्यते सा ॥२५

कंडुयुक्त अशा ज्या पुटकळ्या अंगावर उठतात व त्या फुटून स्रवतात, त्यांना रकसा असें म्हणतात.

शतारु कुष्ट.

रक्तं श्यावं सदाहार्तिं शतारुः स्याद्बहुव्रणम् ।

तांबडे, काळे, दाह व वेदना यांनीं युक्त असे जे अनेक व्रण होतात, त्याला शतारु कुष्ठ असें म्हणतात.

विचर्चिका कुष्ट.

सकण्डूः पिटिका श्यावा बहुस्रावा विचर्चिका ॥ २६ ॥

कंडुयुक्त व काळसर अशा पुटकळ्या उत्पन्न होऊन त्यांतून स्राव होतो, त्याला विचार्चिका असें म्हणतात.

पाण्डुरं श्वित्रमित्युक्तं सस्रावं कण्डुसंयुतम् ।

कंडु व स्राव ह्यांनीं युक्त जें पांढरें कुष्ट त्याला श्वित्र म्हणतात.

अनग्निदग्धजं साध्यं श्वित्रं वर्ज्यमतोऽन्यथा ॥ २७ ॥

अग्नीनें भाजल्याविरहित जें श्वित्र तें साध्य आहे. त्यावांचून इतर असाध्य आहे. तें वर्ज करावें.

कुष्टांतील दोषांचीं लक्षणें.

खरं श्यावारुणं रूक्षं वातकुष्ठं सवेदनम् ।

खरखरीत, काळसर, तांबूस व रूक्ष हीं लक्षणें वातजन्य कुष्टामध्यें होतात.

पित्तात्प्रकुपितं दाहरागस्रावान्वितं मतम् ॥ २८ ॥

दुर्गंधी, दाह, काली व स्राव हीं लक्षणें पित्तजन्य कुष्ठांत होतात.

कफात्क्लेदि घनं स्निग्धं सकण्डूशैत्यगौरवम् ।

ओलसरपणा, जाडपणा, स्निग्धपणा, कंडू, शीतता व जडत्व हीं लक्षणें कफजन्य कुष्ठामध्यें असतात.

द्विलिङ्गं द्वंद्वजं कुष्ठं

दोन्हीही दोषांचीं लक्षणें द्वंद्वज कुष्ठामध्यें असतात.

त्रिलिङ्गं सांनिपातिकम् ।
स्पर्शहानिः सस्वेदत्वमीषत्कण्डूश्च जायते ॥ २९ ॥

त्रिदोषजन्य कुष्ठामध्यें तिन्ही दोषांचीं लक्षणें असून स्पर्श न कळणें, घाम असणें व किंचित् कंडू हीं लक्षणें असतात.

सप्तधातुगत कुष्ठाचीं लक्षणें.

त्वक्स्थे वैवर्ण्यमङ्गेषु कुष्ठे रौक्ष्यं च जायते ।
त्वक्स्वापो रोमहर्षश्च स्वेदस्यापि प्रवर्तनम् ॥ ३० ॥

त्वचाश्रित कुष्ठानें अंगाचा रंग बदलतो, त्या ठिकाणीं रूक्षपणा येतो, त्वचा बधिर होते, शहारे येतात व त्वचेला फार घाम येतो.

रक्तगत लक्षण.

कण्डूर्विपूयकश्चैव कुष्ठे शोणितसंश्रिते ।

कुष्ट रक्ताश्रित असेल तर कंडू व पू हीं लक्षणें असतात.

मांसगत लक्षण.

बाहुल्यं वक्त्रशोषश्च कार्कश्यं पिटिकोद्गमः ॥ ३१ ॥
तोदः स्फोटः स्थिरत्वं च कुष्ठे मांससमाश्रिते ।

मांसगत कुष्ट झालें असतां तोंडाला अतिशय कोरड, कुष्ठाच्या जागीं कर्कशपणा, बारीक पुटकळ्या, कुष्ठाच्या जागीं टोचल्यासारखी पीडा हीं लक्षणें होतात. आणि कुष्ठावर फोड येतात व ते फार दिवस राहतात.

मेदोगत लक्षण.

दौर्गन्ध्यं गात्रदोषश्च पूयोत्थकृमयस्तथा ॥ ३२ ॥
गात्राणां भेदनं चापि कुष्ठे मेदःसमाश्रिते ।

दुर्गंधी, गात्रें मळिण होणें, पुवामध्यें कृमि होणें, व अंग फुटणें, हीं लक्षणें मेदोगत कुष्ठामध्यें होतात.

कौण्यं गतिक्षयोऽङ्गानां संभेदः क्षतसर्पणम् ॥ ३३ ॥
मेदःस्थानगते लिङ्गं प्रागुक्तानि तथैव च ।

कुष्ट मेदोगत झालें असतां हात गळणें, चालतां न येणें, अंग फुटणें, कुष्टाचे व्रण पसरणें, हीं व वर सांगितलेली दुर्गंधी इत्यादि लक्षणें होतात.

अस्थि व मज्जागत कुष्टलक्षण

नासाभङ्गोऽक्षिरागश्च क्षतेषु क्रिमिसंभवः ।
स्वरोपघातश्च भवेदस्थिमज्जासमाश्रिते ॥ ३४ ॥

अस्थि व मज्जा ह्या धातूंचा आश्रय कुष्टानें केला असतां नाक गळतें, डोळे काल होतात, कुष्टाच्या व्रणामध्यें कृमि होतात व स्वर बदलतो.

शुक्रगत कुष्ठ लक्षण.

दंपत्योः कुष्ठबाहुल्याद्दुष्टशोणितशुक्रयोः ।
यदपत्यं तयोर्जातं ज्ञेयं तदपि कुष्ठितम् ॥ ३५ ॥

स्त्रीपुरुषांना कुष्ट झाल्यामुळें तें वाढून शुक्र किंवा आर्तव ह्यांत गेल्यावर तें शुक्रार्तवांना दूषित करितें. तेव्हां रसादि मज्जागत कुष्टांचीं सर्व लक्षणें होतात. आणि त्यांना संतती झाली तर ती देखील कुष्टी होते.

कुष्टाचें साध्यासाध्यत्व.

साध्यं त्वग्रक्तमांसस्थं वातश्लेष्माधिकं च यत् ।
मेदोगं द्वंद्वजं याप्यं वर्ज्यं मज्जास्थिसंश्रितम् ॥ ३६ ॥

त्वचा, रक्त व मांस ह्या धातूंपर्यंत गेलेलें व वातकफजन्य असें कुष्ठ साध्य असतें. मेदोगत असलेलें द्वंद्वज कुष्ठ याप्य असतें. मज्जा व अस्थि ह्यांच्या आश्रयानें असलेलें कुष्ठ असाध्य समजून वर्ज करावें.

दुसरें असाध्य लक्षण.

कृमिकृद्दाहमन्दाग्निसंयुक्तं यत्त्रिदोषजम् ।
प्रभिन्नं प्रस्रुताङ्गं च रक्तनेत्रं हतस्वरम् ॥ ३७ ॥
पञ्चकर्मगुणातीतं कुष्ठं हन्तीह कुष्ठिनम् ।

कृमि झालेलें, तहान, दाह, व अग्निमांद्य ह्यांनीं युक्त, जें त्रिदो-

षजन्य कुष्ठ तें व फुटलेलें, स्रवणारें, ज्यामध्यें डोळे आरक्तवर्ण होतात तें, ज्यांत रोग्याचा स्वर बदलला आहे तें आणि वमनविरेचनादि पंचकर्मांचा ज्याला गुण येत नाहीं किंवा शोधनलेपनादि पांच कर्मांचा ज्याला गुण येत नाहीं, तें कुष्ठ रोग्याचा नाश करितें.

चिकित्सेकरितां कुष्ठांतील दोषप्राधान्य.

वातेन कुष्ठं कापालं पित्तादौदुम्बरं कफात् ।
मण्डलाख्यं विचर्ची च ऋष्याख्यं वातपित्तजम् ॥ ३८ ॥
चर्मैककुष्ठकिटिभसिध्मालसविपादिकाः ।
वातश्लेष्मोद्भवाः श्लेष्मपित्ताद्दद्रुशतारुषी ॥ ३९ ॥
पुण्डरीकं सविस्फोटं पामा चर्मदलं तथा ।
सर्वैः स्यात्काकणं पूर्वं त्रिकं दद्रु सकाकणम् ॥ ४० ॥
पुण्डरीकमृष्यजिह्वं महाकुष्ठानि सप्त तु ।

कापाल कुष्ठ वातदोषापासून होतें. औदुंबरकुष्ठ पित्तदोषापासून होतें. मंडलकुष्ठ कफदोषानें होतें. विचर्चिका व ऋष्यजिव्ह हीं वातपित्तापासून होतात. चर्मकुष्ठ, किट्टिभकुष्ठ, सिध्मकुष्ट, अलसक व विपादिका हीं कुष्ठें वातकफापासून होतात. दद्रु, शतारु, पुंडरीक, विस्फोटक, पामा व चर्मदल हीं कुष्ठें कफपित्तापासून होतात. आणि काकणकुष्ठ सर्व दोषांपासून होतें. ह्यां पैकीं पहिलीं तीन (कपाल, औदुंबर व मंडळ) आणि दद्रु, काकण, पुंडरीक व ऋष्यजिव्ह हीं चार मिळून सात महाकुष्ठें आहेत.

श्वित्र.

कुष्ठैकसंभवं श्वित्रं किलासं दारुणं च यत् ।
निर्दिष्टमपरिस्रावि त्रिधातूद्भवसंश्रयम् ॥ १ ॥

कुष्ठ उत्पन्न होण्याला जीं कारणें सांगितलीं आहेत त्याच कारणांनीं श्वित्र (पांढरें कुष्ट) व दारुण किलास (तांबडें कुष्ट) हीं उत्पन्न होतात. ह्यांतून स्राव होत नाहीं हें रक्त, मांस व मेद ह्या तीन धातूंच्या आश्रयानें असतें व ह्यांत तिन्ही दोष असतात.

वाताद्रूक्षारुणं पित्तात्ताम्रं कमलपत्रवत् ।
सदाहं लोमविध्वंसि कफाच्छ्वेतं घनं गुरु ॥ २ ॥
सकण्डुरं क्रमाद्रक्तमांसमेदःसु चाऽऽदिशेत् ।
वर्णेनैवेदृगुभयं कृच्छ्रं तच्चोत्तरोत्तरम् ॥ ३ ॥

वातापासून होणारें श्वित्र रूक्ष व तांबूस असतें. पित्तापासून होणारें तांबड्या कमळाच्या पाकळीप्रमाणें तांबूस असतें. त्याची आग होते व त्या ठिकाणचे केस जातात. कफापासून होणारें कुष्ट पांढरें, जाड व जड असतें व त्याला खाज सुटते. हें अनुक्रमें रक्त, मांस व मेद ह्या धातूंच्या आश्रयानें होतें. दोष व धातु ह्यांच्या संबंधानें दोन्ही प्रकारच्या श्वित्रांत वर सांगितल्याप्रमाणें वर्ण असतात. हें उत्तरोत्तर कष्टसाध्य आहे.

साध्यासाध्यलक्षण.

अशुक्लरोमाबहुलमसंसृष्टमथो नवम् ।
अनग्निदग्धजं साध्यं श्वित्रं वर्ज्यमतोऽन्यथा ॥ ४ ॥

ज्या श्वित्रावरील केस पांढरे झाले नाहींत, जें पातळ आहे, ज्याचीं मंडळें एकमेकांस लागलेलीं नाहींत, जें नवीन आहे व जें अग्नीनें भाजल्यामुळें झालेलें नाहीं तें साध्य समजावें. ह्यावांचून इतर श्वित्र असाध्य समजावें.

गुह्यपाणितलोष्ठेषु जातमप्यचिरंतनम् ।
वर्जनीयं विशेषेण किलासं सिद्धिमिच्छता ॥ ५ ॥

गुह्य भाग, तळहात व ओठ ह्या ठिकाणीं झालेलें किलास नांवाचें कुष्ट जरी थोड्या दिवसांतील असलें, तरी यश इच्छिणाऱ्या वैद्यानें तें विशेषतः वर्ज करावें.

कुष्टादि संसर्गजन्य रोग.

स्पर्शैकाहारशय्यादिसेवनात्प्रायशो गदाः ।
सर्वे संचारिणो नेत्रत्वग्विकारा विशेषतः ॥ ६ ॥

स्पर्श, आहार, शय्या इत्यादिकांच्या सहवासानें प्रायः सर्वच रोग संक्रामक (संसर्गानें दुसऱ्यास होणारे) आहेत. त्यांत नेत्ररोग व त्वचेचे विकार हे विशेषतः संसर्गजन्य आहेत.

प्रसङ्गाद्गात्रसंस्पर्शान्निःश्वासात्सहभोजनात् ।
सहशय्यासनाच्चापि वस्त्रमाल्यानुलेपनात् ॥ ७ ॥
कुष्ठं ज्वरश्च शोषश्च नेत्राभिष्यन्द एव च ।
औपसर्गिकरोगाश्च संक्रामन्ति नरान्नरम् ॥ ८ ॥

नित्य सान्निध्यादिकांच्या प्रसंगानें, देहस्पर्शानें, श्वासोच्छ्वास

एकत्र झाल्यानें, एकत्र जेवणानें, शेजारीं निजण्यानें, एकत्र बसण्यानें, वस्त्र पांघरण्यानें, फुलांच्या वासानें किंवा गंधादिकांच्या लेपानें कुष्ट, ज्वर, क्षय, नेत्ररोग, उपदंशादि दुसरे औपसर्गिक रोग हे एकापासून दुसऱ्यास होतात.

मरणं यदि कुष्ठेन पुनर्जातस्य तद्भवेत् ।
नातो निन्द्यतरो रोगो यथा कुष्ठं प्रकीर्तितम् ॥ ९ ॥

कुष्टरोगानें जर मरण आलें, तर पुनः जन्मास आल्यावर तें होतें. हें कुष्ट जसें निंद्य आहे, तसा दुसरा कोणताहि रोग नाहीं.

कुष्ठचिकित्सा.

वातोत्तरेषु सर्पिर्वमनं श्लेष्मोत्तरेषु कुष्ठेषु ।
पित्तोत्तरेषु मोक्षो रक्तस्य विरेचनं विहितम् ॥ १ ॥
प्रभूतं वा जलौकाभिः शृङ्गालाबुशिराव्यधैः ।
स्निग्धस्य मोक्षयेद्रक्तं दुष्टं कुष्ठे पुनःपुनः ॥ २ ॥
स्रुते रक्ते हृते दोषे स्नेहैः संशमितेऽनिले ।
रसायनानि प्राश्याश्च प्रशस्ताः कुष्ठिनां मताः ॥ ३ ॥

वातदोषप्रधान कुष्ठावर तूप योजावें. कफदोषप्रधान कुष्टावर वमन योजावें, आणि पित्तदोषप्रधान कुष्टावर रक्त काढणें व विरेचन हे उपचार विहित आहेत. कुष्टाच्या रोग्याला तूप वगैरे पाजून स्निग्ध करून कुष्टाच्या जागीं जळवा लावून किंवा तुंबडीनें, भोपळ्यानें अगर शीर तोडून वरचेवर रक्त काढावें. रक्त काढून व वमनादिकांनीं दोष नाहींसे करून, स्नेहनानें वाताचें शमन झाल्यावर कुष्टाच्या रोग्याला च्यवनप्राश्यादि रसायनें द्यावीं. तीं प्रशस्त आहेत.

वमन.

यववासापटोलानां निम्बस्य फलिनीत्वचः ।
कषायो मधुना पीतो वान्तिकृन्मदनान्वितः ॥ १ ॥

सातु, अडुळसा, कडु पडवळ, कडुनिंब व काळ्या उंबराची साल ह्यांचा काढा गेळफळाचें चूर्ण व मध घालून द्यावा. त्यानें वांती होते.

विरेचन.

विरेचनं प्रयोक्तव्यं त्रिवृद्दन्तीफलत्रिकैः ।

षष्ठे मासे शिरामोक्षं प्रतिमासं विरेचनम्।
प्रतिपक्षं च वमनं कुष्ठे लेपं त्र्यहाच्चरेत् ॥ १ ॥

नळीचें तेल, दांतीमूळ, हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांचें विरेचन द्यावें. सहा सहा महिन्यांनीं कुष्टांतून रक्त काढावें. प्रत्येक महिन्याला कुष्टाच्या रोग्याला विरेचन द्यावें. प्रत्येक पंधरवड्याला वमन द्यावें आणि तीन तीन दिवसांनीं लेप द्यावा.

लेप.

पथ्याकरञ्जसिद्धार्थनिशावल्गुजसैन्धवैः।
विडंगसहितैः पिष्टैर्लेपमात्रेण कुष्ठजित् ॥ १ ॥

हिरडा, करंजाची साल, मोहऱ्या, हळद, बावच्या, सेंधेलोण व वावडिंग ह्यांच्या चूर्णाचा लेप कुष्ठाला जिंकतो.

एलाकुष्ठविडंगानि शताह्वा चित्रकं बला।
दन्ती रसाञ्जनं चेति लेपः कुष्ठविनाशनः ॥ २ ॥

वेलदोडे, कोष्ट, वावडिंग, बडिशेप, चित्रकमूळ, चिकणामूळ, दांतीमूळ व रसांजन ह्यांचा लेप कुष्टाचा नाश करतो.

मनःशिलाले मरिचानि तैलमार्कं पयः कुष्ठहरः प्रदेहः।

मनशीळ, हरताळ, मिरें, मोहरीचें तेल व रुईचा चीक ह्यांचा लेप कुष्टनाशक आहे.

करञ्जबीजैडगजं सकुष्ठं गोमूत्रपिष्टश्च परः प्रदेहः ॥ ३ ॥

कंरजाचें बीं, टाकळ्याचें बीं व कोष्ट, ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. हा फार उत्तम आहे.

बलिवेल्लाग्निभल्लातदन्तीशम्याकनिम्बकैः।
काञ्जिकैः पेषितैर्लेपः श्वेतकुष्ठविनाशकृत् ॥ ४ ॥

गंधक, वावडिंग, चित्रकमूळ, बिब्बे, जेपाळ, बाहव्याची साल व कडुनिंबाची साल हीं औषधें कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो पांढऱ्या कोडाचा नाश करतो.

श्वेतकरवीरमूलं कुटजकरञ्जत्वचो दार्व्याः।
सुमनःप्रवालयुक्तो लेपः कुष्ठापहः सिद्धः ॥ ५ ॥

पांढऱ्या कणेरीचें मूळ, कुडयाची साल, करंजाची साल, दारु-हळद व जाईचीं पानें ह्यांचा लेप कुष्टनाशाविषयीं प्रसिद्ध आहे.

शैलेयकम्पिल्लकयष्टिसाह्वसौराष्ट्रिकासर्जरसोत्पलानि ।
शिला च चूर्णो नवनीतयुक्तः कुष्ठे स्रवत्यभ्यधिकः प्रदिष्टः ॥ ६

शिलाजित, कपिला, जेष्टमध, तुरटी, राळ, कमळ, मनशीळ व चुना ह्यांचा स्रवणाऱ्या कुष्टावर लोण्यांतून लेप करावा. तो फार चांगला आहे.

रसगन्धकयोः पिष्टं कटुतैलेन भृंगजैः ।
द्रवैः संमर्द्य तल्लेपात्सर्वकुष्टं विनश्यति ॥ ७ ॥

पारा व गंधक ह्यांची कज्जली करून ती मोहरीच्या तेलांत खलून माक्याच्या रसांत मिसळून लावावी, म्हणजे सर्व कुष्टांचा नाश होतो.

काढे.

गुडूचीत्रिफलादार्वीक्वाथ उष्णैश्च वारिभिः ।
त्वग्दोषव्रणशोफघ्नः पीतो मासं सगुग्गुलुः ॥ १ ॥

गुळवेल, त्रिफळा, दारुहळद ह्यांचा काढा गुग्गुळ घालून एक महिनाभर घ्यावा व ऊन पाणी प्यावें. म्हणजे तो त्वचेचे रोग, व्रण व सूज ह्यांचा नाश करितो.

खदिरत्रिफलानिम्बपटोलामृतवासकैः ।
अष्टकोऽयं जयेत्कुष्ठकण्डूविस्फोटकानपि ॥ २ ॥

खैराची साल, सुंठ, मिरें, पिंपळी, कडुनिंबाची साल, कडुपडवळ, गुळवेल व अडुळसा ह्या आठ औषधांचा काढा कुष्ट, कंडु व फोड ह्यांना जिंकतो.

महाकषाय.

शुण्ठीनिम्बकिराततिक्तककणापाठाहरिद्राद्वयं
त्रायन्ती त्रिफलाऽमृताऽब्जकटुका वासा वचा बाकुची ।
मञ्जिष्ठाऽतिविषादुरालभमहानिम्बाग्निषड्ग्रन्थिका ।
व्याधिघ्ना गजचिर्भिटा सकुटजा भार्गी समुस्ता यवा ॥ १
मूर्वा चैव पटोलपत्रसहिता रक्तं तथा चन्दनं
श्यामा पर्पटसारिवा कृमिहरा गायत्रिकासंयुता ।
गोमूत्रेण महाकषायमरुणोद्भूतं पिबेद्यः पुमां-
स्तस्याष्टादश यान्ति नाशमचिरात्कुष्ठानि दुष्टान्यपि ॥ २ ॥

सुंठ, कडुलिंबाची साल, काडेचिराईत, पिंपळी, पहाडमूळ, हळद, दारुहळद, त्रायमाण, हिरडा, बेहडा, आवळकाठी, गुळ-

वेल, कमळ, कुटकी, अडुळसा, वेखंड, बावची, मंजिष्ट, अतिविष, धमासा, निंबाची साल, चित्रकमूळ, पिंपळमूळ, बाहव्याची शेंग, घोडेवृंदावन, कुड्याची साल, भारंगमूळ, नागरमोथे, मोरवेल, कडुपडवळाचीं पानें, रक्तचंदन, तेड, पित्तपापडा, उपळसरी, वावडिंग व खैराची साल ह्यांचा काढा गोमूत्र घालून सकाळीं जो घेतो त्याचीं दुष्ट अशीं अठरा प्रकारचीं कुष्टें लवकरच नाश पावतात.

नवककषाय.

त्रिफला निम्बपटोलं मंजिष्ठा रोहिणी वचा रजनी ।
एष कषायोऽभ्यस्तो निहन्ति कफपित्तजं कुष्ठम् ॥ १॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, बाळंतलिंबाची साल, कडुपडवळ, मंजिष्ट, कुटकी, वेखंड व हळद ह्यांचा काढा सतत कांहीं दिवस द्यावा. तो कफपित्तजन्य कुष्टाचा नाश कारितो.

खैराचें पाणी.

प्रलेपोद्वर्तनस्नानपानभोजनकर्मसु ।
शीलितं खादिरं वारि सर्वत्वग्दोषनाशनम् ॥ १ ॥

लेप करणें, उटी लावणें, स्नान, पिणें व जेवण करणें, इत्यादि कामांत खैराचा काढा नेहमीं वापरावा. तो सर्व त्वचेच्या रोगांचा नाश करतो.

दह्यमानाद्धृतः कुम्भे समूलखदिराद्रसः ।
साज्यधात्रीरसक्षौद्रो हन्यात्कुष्ठं रसायनम् ॥ २ ॥

मुळासकट खैराचे तुकडे करून ते एका गाडग्यांत भरून उकडून त्यांचा रस काढावा आणि त्यांत आवळ्याचा रस तूप व मध घालून द्यावा तो कुष्टाचा नाश करतो; व तो रसायनही आहे.

निंबादि कल्क.

निम्बपत्रशतं पिष्ट्वा निम्बामलकमेव च ।
विडङ्गबाकुचीकल्कं पिबेदाकुष्ठनाशनम् ॥ १ ॥

कडुलिंबाचीं शंभर पानें वाटून त्यांत आवळकाठी, वावडिंग व बावच्या घालून कल्क करून तो कुष्टाचा नाश होईपर्यंत द्यावा.

पंचनिंबचूर्ण.

पिचुमन्दफलं पुष्पं त्वक्पत्रं मूलमेव च ।
पञ्चैतानि च सूक्ष्माणि समचूर्णानि कारयेत् ॥ १ ॥
अष्टभागावशेषेण खदिरासनवारिणा ।
भावयित्वा तु संयोज्य द्रव्याण्येतानि दापयेत् ॥ २ ॥
चित्रकोऽथ विडङ्गानि व्याधिघातकशर्कराः ।
भल्लातकहरीतक्यौ शुण्ठ्यामलकगोक्षुराः ॥ ३ ॥
चक्रमर्दकबाकूचीपिप्पलीमरिचं निशा ।
लोहचूर्णसमायुक्तं समभागं प्रमाणतः ॥ ४ ॥
भावयेद्भृङ्गराजेन पुनः शुष्काणि कारयेत् ।
निम्बार्धचूर्णमेतेषामेकीकृत्य निधापयेत् ॥ ५ ॥
बिडालपदमात्रं तु सर्पिषा पयसाऽपि वा ।
प्रातः प्रातर्निषेवेत खदिरासनवारिणा ॥ ६ ॥
परिहारो न चात्रास्ति पञ्चनिम्बेऽवतिष्ठति ।
मासमात्रप्रयोगेण कुष्ठं हन्ति रसायनम् ॥ ७ ॥
त्वग्दोषनीलिकाव्यङ्गं तथैव तिलकालकान् ।
अष्टादशविधं कुष्ठं सप्त चैव महाक्षयान् ।
सर्वव्याधिविनिर्मुक्तो जीवेद्वर्षशतं सुखी ॥ ८ ॥

कडुनिंबाचीं फळें, फुलें, साल, पानें व मुळें हीं समभाग घेऊन त्यांचें बारीक चूर्ण करावें. आणि खैर व असाणा ह्यांचा अष्टमांश काढा करून त्याची त्या चूर्णाला भावना द्यावी. नंतर चित्रकमूळ, वावडिंग, बाहव्याचें मूळ, खडीसाखर, बिब्बे, हिरडे, सुंठ, आवळकाठी, गोखरू, टाकळ्याचें बीं, बावची, पिंपळी, मिरें, हळद व लोहभस्म ह्यांचें समभाग चूर्ण करून त्याला माक्याच्या रसाची भावना देऊन वाळवावें. आणि वरील निंबादि चूर्णाच्या निम्यानें त्यांत हें चूर्ण मिसळून ठेवावें. नंतर हें चूर्ण रोज सकाळीं दुधांतून, तुपांतून अथवा खैर व असाणा ह्यांच्या काढ्यांतून घ्यावें. ह्याजवर पथ्याचा नियम नाहीं. हें पंचनिंबचूर्ण एक महिनाभर घेतलें असतां कुष्ठाचा नाश करितें. हें रसायन आहे. त्वचेचे रोग, नीलिका (तीळ), वांग, तिलकालक, अठरा कुष्ठें, व सात क्षय, ह्यांचा नाश करितें. ह्या चूर्णाच्या सेवनानें मनुष्य सर्व व्याधींपासून मुक्त होऊन सुखानें शंभर वर्षे वांचतो.

सर्षपादि चूर्ण.

सर्षपकरञ्जरजनीदारुनिशादारुमंजिष्ठाः ।
त्रिफलाशटीपटीरश्वेतामूर्वाप्रियंगुकाश्चापि ॥ १ ॥
त्रिकटुत्रिगन्धकेसरलाक्षाश्चैषां कृतं रजः श्लक्ष्णम् ।
उद्धूलनेन रक्तजपित्तजवातोत्थितं वाऽपि ॥
निस्तोदभेदपिटिकं कुष्ठं स्फुटनं विनाशयति ॥ २ ॥

शिरस, करंजाची साल, हळद, दारुहळद, देवदार, मंजिष्ठ, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, कचोरा, खैराची साल, पांढऱ्या गोकर्णीचें मूळ अथवा वेखंड, मोरवेल, गव्हला, सुंठ, मिरें, पिंपळी, वेलचीदाणे, तमालपत्र, दालचिनी, नाकेशर, व लाख ह्यांचें चूर्ण अंगास फासावें. म्हणजे तें रक्तजन्य, पित्तजन्य अथवा वातजन्य टोंचणी, ठणका व पुटकुळ्या ह्यांनीं युक्त अशा कुष्ठाचा नाश करितें.

विडंगादि चूर्ण.

विडङ्गत्रिफलाकृष्णाचूर्णं लीढं समाक्षिकम् ।
हन्ति कुष्ठं कृमीन्मेहान्नाडीदुष्टभगंदरान् ॥ १ ॥

वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी व पिंपळी ह्यांचें चूर्ण कुष्ठ, कृमि, मेह, नाडीव्रण, व दुष्ट भगंदररोग ह्यांचा नाश करतें.

सर्वांगसुंदरी गुटिका.

भल्लातकसहस्रैकं त्रिफलावारिणि क्षिपेत् ।
द्रोणमात्रे पचेत्तावद्यावत्पादावशेषितम् ॥ १ ॥
शर्करायाः दश पलान्येकं बाकुचिकापलम् ।
तथैवात्रैव देयानि पलानि दश गुग्गुलोः ॥ २ ॥
खदिरारिष्टमंजिष्ठाबीजकं चेन्द्रवारुणी ।
चित्रकं द्वे हरिद्रे च देवदारु हरीतकी ॥ ३ ॥
भार्गी वचेति सर्वेषां प्रत्येकं च पलार्धकम् ।
प्रक्षिप्य गुटिका कार्या नाम्ना सर्वांगसुन्दरी ॥ ४ ॥
प्रत्यहं भक्षयेत्कुष्ठी त्वेतां बदरमात्रया ।
सर्वाण्येवोग्रकुष्ठानि शीघ्रमेव व्यपोहति ॥ ५ ॥

एक हजार बिब्बे (फोडून) दहाशें चोवीस तोळे त्रिफळ्याच्या काढ्यांत टाकून त्यांचा चतुर्थांश काढा करावा. नंतर साखर चाळीस तोळे, बावच्या चार तोळे, गुग्गुळ चाळीस तोळे, खैर,

कडुलिंब, मंजिष्ट, असाणा, कडुवृंदावन, चित्रक, हळद, दारुहळद, देवदार, हिरडे, भारंगमूळ व वेखंड ह्या प्रत्येकाचें चूर्ण दोन दोन तोळे घालून बोराएवढी गोळी करावी. आणि रोज एकएक गोळी घ्यावी. म्हणजे ही सर्वांगसुंदरी नांवाची गुटिका सर्व प्रकारच्या उग्र कुष्ठांचा त्वरित नाश करिते.

त्रिफलागुटिका.

त्रिफलारुष्करलोहैः सावल्गुजभृंगलांगलीव्योषैः ।
सगुडैर्वराहकन्दैः पलिकैरेकत्र संमिश्रैः ॥ १ ॥
गुटिकां प्रकल्प्य खादेदेकैकामक्षसंमितां प्रातः ।
कुष्ठं दद्रुकिलासं जित्वा वर्षेण सर्वथा पलितम् ॥
जीवति वर्षशतं वै दीप्तहुताशो युवेव सोत्साहः ॥ २ ॥

हिरडा, बेहडा, आवळकठी, बिब्बे, लोहभस्म, बावच्या, माका, कळलावी, सुंठ, मिरें, पिंपळी, गूळ व डुकरकंद हीं औषधें चार चार तोळे घेऊन सर्वांचा एकत्र खल करून एक एक तोळ्याची गोळी करून रोज प्रातःकाळीं एक एक गोळी खावी. ह्याप्रमाणें एक वर्षपर्यंत ह्या गोळ्या खाव्या. म्हणजे तो मनुष्य कुष्ठ, दद्रु, किलास व पलित (केंस पांढरे होणें) ह्यांना जिंकून अग्नीसारखा तेजस्वी व तरुण असा होत्साता शंभर वर्षें वांचतो.

एकविंशतिक गुग्गुळ.

चित्रकत्रिफलाव्योषमजाजीकारवीवचाः ।
सैन्धवातिविषा कुष्ठं चव्यैलायावशूकजम् ॥ १ ॥
विडङ्गान्यजमोदा च मुस्तान्यमरदारु च ।
यावन्त्येतानि सर्वाणि तावन्मात्रस्तु गुग्गुलुः ॥ २ ॥
संकुट्य सर्पिषा सार्धं गुटिकां कारयेद्भिषक् ।
प्रातर्भोजनकाले वा भक्षयेत्तु यथाबलम् ॥ ३ ॥
हन्त्यष्टादशकुष्ठानि कृमिदुष्टव्रणानपि ।
ग्रहण्यर्शोविकारांश्च मुखामयगलग्रहान् ॥ ४ ॥
गृध्रसीमथ भग्नं च गुल्मं चापि नियच्छति ।
व्याधीन्कोष्ठगतांश्चान्याञ्जयेद्विष्णुरिवासुरान् ॥ ५ ॥

चित्रकमूळ, त्रिफळा, सुंठ, मिरें, पिंपळी, जिरें, बडिशेप, वेखंड, सेंधेलोण, अतिविष, कोष्ठ, चवक, वेलदोडे, जवखार,

वावडिंग, अजमोदा, नागरमोथे व देवदार हीं सर्व औषधें समभाग, आणि त्या सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ, ह्या सर्वांचा तुपांत खल करून गोळ्या कराव्या, आणि रोज प्रातःकाळीं किंवा भोजनकाळीं अग्निबळ पाहून भक्षण कराव्या. म्हणजे ही गुटिका अठरा कुष्ठें, दुष्टव्रण, कृमि, संग्रहणी, मूळव्याध, मुखरोग, गलरोग, गृध्रसी, भग्न (मोडलेलें हाड) व गुल्म ह्यांचा नाश करिते, आणि विष्णु असुरांना जिंकतो त्याप्रमाणें कोठ्यांतील दुसऱ्याही विकारांना जिंकते.

त्रिफलामोदक.

त्रैफलस्य तु चूर्णस्य पलानि दश पञ्च च ।
सप्त चैव विडङ्गानां लोहचूर्णं पलद्वयम् ॥ १ ॥
शतं भल्लातकानां च पलानि दश बाकुची ।
शिलाजतु पलार्धं तु द्वे पले गुग्गुलोस्तथा ॥ २ ॥
पलं पुष्करमूलस्य पलार्धं त्रिवृतस्य च ।
सचित्रकं समरिचं पिप्पली विश्वभेषजम् ॥ ३ ॥
त्वक्पत्रं कुंकुमं मुस्ता कार्षिकानुपकल्पयेत् ।
यावन्त्येतानि चूर्णानि तावत्खण्डं प्रदापयेत् ॥ ४ ॥
पालिकान्मोदकान्कृत्वा प्रातरुत्थाय नित्यशः ।
एकैकं भक्षयेत्प्राज्ञो यथेष्टं चात्र भोजनम् ॥ ५ ॥
कुष्ठान्यष्टादशापीह प्लीहगुल्मभगंदरान् ।
अशीतिं वातजान्रोगांश्चत्वारिंशच्च पैत्तिकान् ॥ ६ ॥
विंशतिं श्लैष्मिकांश्चापि संसृष्टान्सांनिपातिकान् ।
शालक्यगतरोगांश्च शिरोक्षिभ्रूगतांस्तथा ॥ ७ ॥
कण्ठतालुगतांश्चापि जिह्वायामुपजिह्वकम् ।
ऊर्ध्वजत्रुगते रोगे भुक्तस्योपरि दापयेत् ॥ ८ ॥
शारीरे दापयेत्पूर्वमौदरे मध्यभोजने ।
निर्दिष्टरोगाञ्शमयेत्क्रियमाणं रसायनम् ॥ ९ ॥

हिरडा, बेहडा व आवळकठी ह्यांचें चूर्ण साठ तोळे, वावडिंगें अठ्ठावीस तोळे, लोहभस्म आठ तोळे, बिब्बे चारशें तोळे, बावच्या चाळीस तोळे, शिलाजित दोन तोळे, गुग्गुळ आठ तोळे, पोखरमुळाचें चूर्ण चार तोळे, तेड दोन तोळे, चित्रकमूळ, मिरें, पिंपळी, सुंठ, दालचिनी, तमालपत्र, नागरमोथे व केशर हीं औषधें एक

एक तोळा घेऊन, ह्या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. आणि त्या सर्व चूर्णाच्या बरोबरीनें त्यांत खडीसाखरेची पूड मिसळून चार चार तोळ्याचे लाडू बांधावे, आणि रोज प्रातःकाळीं उठल्यावर एक एक लाडू खावा; आणि त्याजवर यथेच्छ भोजन करावें. म्हणजे अठरा प्रकारचीं कुष्ठें, पांथरी, भगंदर, ऐशीं वातरोग, चाळीस पित्तरोग, वीस प्रकारचे कफरोग, द्वंद्वज व सान्निपातिक रोग, शालक्यतंत्रांतील (कर्णनासादि) रोग, मस्तक, नेत्र व भुवया ह्यांचे रोग, गळा, टाळा व जीभ ह्यांचे रोग व उपजिव्हक (पडजिभेचे) रोग, ह्यांचा नाश करतात. मानेच्या वरच्या रोगावर देणें असल्यास जेवल्यावर द्यावें. शारीरिक विकाराकरितां जेवणापूर्वीं द्यावें. व पोटांतील विकाराकरितां जेवणाच्या मध्यंतरीं द्यावें. हें रसायन वर सांगितलेल्या रोगांना शमवितें.

भल्लातकावलेह.

निम्बगोपारुणा कट्वी त्रायन्ती त्रिफला घनम्।
पर्पटा वल्गुजानन्ता वचा खदिरचन्दनम् ॥ १ ॥
पाठा शुण्ठी शटी भार्गी वासा भूनिम्बवत्सकम्।
श्यामेन्द्रवारुणी मूर्वा विडङ्गातिविषानलम् ॥ २ ॥
हस्तिकर्णामृताब्दाह्वं पटोलं रजनीद्वयम्।
कृष्णारग्वधसप्ताह्वशिरीषं चोच्चटाफलम् ॥ ३ ॥
मञ्जिष्ठा लाङ्गली रास्ना नक्तमालः पुनर्नवा।
दन्ती बीजकसारश्च भृङ्गराजकुरण्टकम् ॥ ४ ॥
एतान्द्विपलिकान्भागाञ्जलद्रोणे विपाचयेत्।
अष्टभागावशिष्टं च कषायमवतारयेत् ॥ ५ ॥
भल्लातकसहस्राणि क्षिपेच्छित्त्वाऽर्मणेऽम्भसि।
चतुर्भागावशिष्टं तु कषायमवतारयेत् ॥ ६ ॥
तौ कषायौ समादाय वस्त्रपूतौ तु कारयेत्।
एकीकृत्य कषायौ तौ पुनरग्नावधिश्रयेत् ॥ ७ ॥
गुडस्यैकतुलां दत्त्वा लेहवत्साधयेद्भिषक्।
भल्लातकसहस्रस्य तत्र बीजानि दापयेत् ॥ ८ ॥
त्रिकटु त्रिफला मुस्तं विडङ्गं चित्रकं तथा।
चन्दनं सैन्धवं कुष्टं दीप्यकं च पलं पलम् ॥ ९ ॥
चातुर्जातं च संचूर्ण्य घृतभाण्डे निधापयेत्।

सौगन्धिकस्य दातव्यं चूर्णं पलचतुष्टयम् ॥ १० ॥
महाभल्लातको ह्येष महादेवेन निर्मितः ।
प्राणिनां तु हितार्थाय नाशयेच्छीघ्रमेव च ॥ ११ ॥
श्वित्रमौदुम्बरं दद्रुमृष्यजिह्वं सकाकणम् ।
पुण्डरीकं च चर्माख्यं विस्फोटं रक्तमण्डलम् ॥ १२ ॥
कच्छूं कापालिकं कुष्ठं पामां चापि विपादिकाम् ।
वातरक्तमुदावर्तं पाण्डुरोगं वमिं कृमीन् ॥ १३ ॥
अर्शांसि षट्प्रकाराणि श्वासं कासं भगंदरम् ।
अनुपानेन दातव्यं छिन्नातोयेन तं भिषक् ॥ १४ ॥
भोजने न सदा योज्यमुष्णं चाम्लं विशेषतः ।
अन्यान्यपि च कुष्ठानि नाशयेन्नात्र संशयः ॥ १५ ॥

कडुनिंबाची साल, उपलसरी, अतिविष, कुटकी, त्रायमाण, त्रिफला, नागरमोथे, पित्तपापडा, बावच्या, धमासा, वेखंड, खैराची साल, चंदन, पहाडमूळ, सुंठ, कचोरा, भारंगमूळ, अडुळसा, काडेचिराईत, कुडा, नळीचें तेड, कडू वृंदावन, मोरवेल, वावडिंग, अतिविष, चित्रकमूळ, कासाळू, गुळवेल, मोठे नागरमोथे, कडूपडवळ, हळद, दारुहळद, पिंपळी, बाहव्याची शेंग, सातविणीची साल, शिरसाची साल, गुंजा, मंजिष्ठ, कळलावी, रास्ना, करंज, घेटुळीची मुळी, दांतीमूळ, असाण्याचा नार, माका, व कोरांटीचें मूळ, हीं सर्व औषधें आठ आठ तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. नंतर हजार बिब्बे घेऊन त्यांचे तुकडे करून त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. मग ते दोन्हीही काढे वस्त्रांतून गाळून घेऊन एकत्र करून पुन्हा अग्नीवर ठेवावे. आणि त्यांत चारशें तोळे गूळ व एक हजार बिब्यांतील बिया काढून घालून लेह करावा. नंतर सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकठी, नागरमोथे, वावडिंग, चित्रकमूळ, चंदन, सैंधेलोण, कोष्ठ, ओवा, दालचिनी, तमालपत्र, नागकेशर व वेलदोडे ह्यांचें चूर्ण चार चार तोळे त्यांत घालून तो तुपानें रावलेल्या भांड्यांत ठेवावा. आणि त्यांत सोळा तोळे रोहिसगवताचें चूर्ण अथवा शुद्ध गंधकाचें चूर्ण घालावें.

हा महाभल्लातक नांवाचा लेह प्राणिमात्रांच्या हिताकरितां महादेवानें सांगितला आहे. हा अवलेह श्वित्र, औदुंबर, दद्रु, ऋष्यजिव्ह, काकण, पुंडरीक, चर्मकुष्ट, विस्फोटक, रक्तमंडल, कष्टसाध्य असें कापालिक कुष्ट, खरूज. विपादिका, वातरक्त, उदावर्त, पांडुरोग, ओकारी, कृमि, मूळव्याधीचे सहा प्रकार, श्वास, खोकला, व भगंदर ह्यांचा त्वरित नाश करतो. हा अवलेह गुळवेलीच्या काढ्याच्या अनुपानाशीं घ्यावा. हा अवलेह घेत असतां विशेषतः आंबट व उष्ण पदार्थ नेहमीं खाऊं नयेत. हा अवलेह दुसऱ्या कुष्टांचा देखील नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

शशांकलेखादि लेह.

शशाङ्कलेखा सविडङ्गसारा सपिप्पलीका सहुताशमूला ।
सायोमला सामलका सतैला सर्वाणि कुष्ठानि निहन्ति लीढा १

बावच्या, वावडिंगांतील तांदूळ (बीं), पिंपळी, चित्रकमूळ, मंडूर, व आवळकाठी, ह्यांचें चूर्ण शिरसाच्या तेलांतून चाटावें. तें सर्व कुष्टांचा नाश करितें.

धात्री अवलेह.

धात्र्यक्षपथ्यासविडंगवह्निभल्लातकावल्गुजलोहभृंगैः ।
भागाभिवृद्धैस्तिलतैलमिश्रैः सर्वाणि कुष्ठानि निहन्ति लेहः ॥ १

आवळकाठी, बेहडा, हिरडा, वावडिंग, चित्रकमूळ, बिब्बे, बावच्या, लोहभस्म व माका हीं औषधें क्रमानें वाढत्या प्रमाणांत घेऊन चूर्ण करून तिळाच्या तेलांतून चाटावें. तें सर्व कुष्ठांचा नाश करितें.

घृतें;–षट्पल घृत.

निम्बं पटोलदार्व्यौ दुरालभां तिक्तरोहिणीं त्रिफलाम् ।
कुर्यादर्धपलांशान्पर्पटकं त्रायमाणां च ॥ १ ॥
सलिलाढकसिद्धानां रसेऽष्टभागस्थिते पूते ।
चन्दनकिराततिक्तकमागधिकात्रायमाणं च ॥ २ ॥
मुस्तं वत्सकबीजं कल्कीकृत्यार्धकार्षिकान्भागान् ।
नवसर्पिषश्च षट्पलमेतत्सिद्धं घृतं पेयम् ॥ ३ ॥
कुष्ठज्वरगुल्मार्शोग्रहणीपाण्डवामयान्हन्ति ।
पामाविसर्पपिटिकाकण्डूगण्डव्रणान्सिद्धम् ॥ ४ ॥

कडुनिंबाची साल, कडुपडवळ, दारुहळद, धमासा, कुटकी, त्रिफळा, पित्तपापडा व त्रायमाण हीं औषधें प्रत्येकीं दोन दोन तोळे घेऊन त्यांचा दोनशें छपन्न तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. आणि तो गाळून घेऊन त्यांत रक्तचंदन, काडेचिराईत, पिंपळी, त्रायमाण, नागरमोथे व इंद्रजव हीं औषधें अर्धा अर्धा तोळा घेऊन त्यांचा कल्क व चोवीस तोळे ताजें तूप घालून तूप सिद्ध करावें. व तें प्यावें. तें कुष्ट, ज्वर, गुल्म, मूळव्याध, संग्रहणी, पांडुरोग, खरूज, विसर्प, पुटकुळया, कंडु, गांठी व व्रण ह्यांचा नाश करितें.

पंचतिक्तक घृत.

निम्बं पटोलं व्याघ्रीं च गुडूचीं वासकं तथा।
कुर्याद्दशपलान्भागानेकैकस्य सुकुट्टितान्॥ १॥
जलद्रोणे विपक्तव्यं यावत्पादावशेषितम्।
घृतप्रस्थं पचेत्तेन त्रिफलागर्भसंयुतम्॥ २॥
पञ्चतिक्तमिति ख्यातं सर्पिः कुष्ठविनाशनम्।
अशीतिं वातजान्रोगांश्चत्वारिंशच्च पैत्तिकान्॥ ३॥
विंशतिं श्लैष्मिकांश्चैव पानादेवापकर्षति।
दुष्टव्रणकृमीनर्शः पञ्च कासांश्च नाशयेत्॥ ४॥

कडुनिंबाची साल, कडुपडवळ, रिंगणमूळ, गुळवेळ व अडुळसा हीं प्रत्येकीं चाळीस चाळीस तोळे घेऊन चांगलीं कुटून त्यांत दहाशें चाळीस तोळे पाणी घालून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्यांत चौसष्ट तोळे तूप व त्रिफळ्याचा कल्क तुपाच्या चतुर्थांश घालून तूप सिद्ध करावें. हें पंचतिक नांवाचें घृत कुष्ठाचें नाशक आहे. हें प्यालें असतां ऐंशी प्रकारचे वातरोग, चाळीस प्रकारचे पित्तरोग व वीस प्रकारचे कफरोग ह्यांचा नाश करितें. तसेंच दुष्टव्रण, कृमि, मूळव्याध व पांच प्रकारचे खोकले ह्यांचाही नाश करितें.

महातिक्तक घृत.

सप्तच्छदं प्रतिविषां शम्याकं तिक्तरोहिणीं पाठाम्।
मुस्तामुशीरं त्रिफलां पटोलं पिचुमन्दपर्पटकम्॥ १॥
धन्वयवासकचन्दनमुपकुल्यापद्मकरजन्यौ च।
षड्ग्रन्थां सविशालां शतावरीं सारिवे चोभे॥ २॥
वत्सकबीजं वासां मूर्वाममृतां किराततिक्तं च।

कल्कान्कुर्यान्मतिमान्यष्ट्याह्वं त्रायमाणं च ॥ ३ ॥
कल्कस्य चतुर्थभागो जलमष्टगुणं रसोऽमृतफलानाम् ।
द्विगुणो घृतात्प्रदेयस्तत्सर्पिः प्राशयेत्सिद्धम् ॥ ४ ॥
कुष्ठानि रक्तपित्तं प्रबलान्यर्शांसि रक्तवाहीनि ।
वीसर्पमम्लपित्तं वातासृक्पाण्डुरोगं च ॥ ५ ॥
विस्फोटकान्सपामानुन्मादं कामलां ज्वरं कण्डुम् ।
हृद्रोगगुल्मपिटिकां भगंदरं गण्डमालां च ॥ ६ ॥
हन्यादेतत्सद्यः पीतं काले यथाबलं सर्पिः ।
योगशतैरप्यजितान्महाविकारान्महातिक्तम् ॥ ७ ॥

सातविणीची साल, अतिविष, बाहव्याची शेंग, कुटकी, पहाड-मूळ, नागरमोथे, वाळा, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कडुपडवळ, कडुनिंबाची साल, पित्तपापडा, धमासा, रक्तचंदन, पिंपळी, पद्म-काष्ट, हळद, दारुहळद, वेखंड, कडु वृंदावनाचें मूळ, शतावरी, पांढरी व काळी उपलसरी, इंद्रजव, अडुळसा, मोरवेल, काडेचिराईत, जेष्टमध व त्रायमाण ह्यांचा कल्क करून त्या कल्काच्या चतुर्थांश पाणी व आठपट आवळ्याचा रस त्यांत घालावा; आणि कल्काच्या दुप्पट तूप घालून तूप सिद्ध करावें. आणि तें प्यावें. म्हणजे सर्व कुष्टें, रक्तपित्त, प्रबळ व रक्त वाहणारे मूळव्याधीचे मोड, विसर्प, अम्लपित्त, वातरक्त, पांडुरोग, विस्फोटक, खरूज, उन्माद, कावीळ, ज्वर, कंडु, हृद्रोग, गुल्म, प्रमेहाच्या पुळ्या, भगंदर, व गंडमाळा ह्या रोगांचा नाश करितें. हें महातिक्तक घृत योग्य वेळीं व शक्तीप्रमाणें घेतलें असतां शेकडों उपायांनीं बरे न झालेले असे मोठमोठे विकार दूर करितें.

महाखादिरघृत.

खदिरस्य तुलाः पञ्च शिंशपासनयोस्तुले ।
तुलार्धं सर्व एवैते करञ्जारिष्टवेतसाः ॥ १ ॥
पर्पटः कुटजश्चैव वृषः कृमिहरस्तथा ।
हरिद्रे कृतमालश्च गुडूची त्रिफला त्रिवृत् ॥ २ ॥
सप्तपर्णश्च संक्षुण्णो दशद्रोणे तु वारिणि ।
अष्टभागावशेषं तु कषायमवतारयेत् ॥ ३ ॥
धात्रीरसं च तुल्यांशं सर्पिषश्चाऽऽढकं पचेत् ।

महातिक्तककल्कैस्तु यथोक्तैः पलसंमितैः ॥ ४ ॥
निहन्ति सर्वकुष्ठानि पानाभ्यङ्गनिषेवणात् ।
महाखदिरमित्येतत्परं कुष्ठविकारनुत् ॥ ५ ॥

खैराची साल दोन हजार तोळे, शिसवा व असाणा ह्या प्रत्येकाची साल चारशें चारशें तोळे, करंजाची साल, निंबाची साल, वेत, पित्तपापडा, कुड्याची साल, अडुळसा, वावडिंग, हळद, दारुहळद, बाहव्याची साल, गुळवेल, हिरडा, बेहडा, आवळकठी, नळीचें तेड व सातवीण हीं औषधें प्रत्येकीं दोनशें दोनशें तोळे घेऊन कुटून सर्वांचा दहा द्रोण (दहा हजार दोनशें चाळीस तोळे) पाण्यांत अष्टमांश काढा करून तो काढून घेऊन त्यांत त्या काढ्याइतका आवळ्याचा रस व तूप दोनशें छपन्न तोळे घालून वरील काढ्याच्या औषधापैकीं प्रत्येक औषधाचा चार चार तोळे कल्क घालून तूप सिद्ध करावें. हें तूप पिणें व अंगास लावणें अशा तऱ्हेनें उपयोगांत आणावें, म्हणजे सर्व कुष्ठांचा नाश करितें. हें महाखादिर नांवाचें घृत उत्कृष्ट प्रकारचें कुष्ठनाशक आहे.

करवीरादि तेल.

शुभ्रस्य करवीरस्य रसो वेल्लं च चित्रकम् ।
त्रिभिश्च पाचितं तैलमभ्यंगात्कुष्ठजातिनुत् ॥ १ ॥

पांढऱ्या कणेरीच्या मुळ्यांचा रस, वावडिंग व चित्रकमूळ ह्यांचा कल्क ह्यामध्यें तेल सिद्ध करावें. तें तेल लावलें असतां सर्व कुष्ठांचा नाश करितें.

वज्रतेल.

सप्तपर्णकरञ्जार्कमालतीकरवीरजाः ।
मूलं स्नुहीशिरीषाभ्यां चित्रकास्फोटयोरपि ॥ १ ॥
करञ्जबीजं त्रिफलां त्रिकटुं रजनीद्वयम् ।
सिद्धार्थकं विडंगं च प्रपुन्नाटं च संहरेत् ॥ २ ॥
मूत्रपिष्टैः पचेत्तैलमेभिः कुष्ठविनाशनम् ।
अभ्यंगाद्वज्रकं नाम नाडीदुष्टव्रणापहम् ॥ ३ ॥

सातवीण, करंज, रुई, मालती, कणेर, त्रिधारी निवडुंग, शिरस, चित्रक व रानमोगरी, ह्यांच्या मुळांचा काढा आणि करंजाचें बी,

हिरडा, बेहडा, भावळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, हळद, दारुहळद, मोहऱ्या, वावडिंग व टाकळ्याचें बी, हीं औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचा कल्क ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. हें वज्रक नांवाचें तेल अंगास लवलें असतां कुष्ट, नाडीव्रण व दुष्टव्रण ह्यांचा नाश करितें.

मंजिष्ठादि तेल.

मञ्जिष्ठारुग्निशाचक्रमर्दारग्वधपल्लवैः ।
तृणकस्वरसे सिद्धं तैलं कुष्ठहरं परम् ॥ १ ॥

मंजिष्ट, कोष्ट, चित्रक, हळद, टाकळा, व बाहव्याचीं पानें, व रोहिस गवत ह्याचा रस काढून त्यांत तेल सिद्ध करावें. तें उत्तम प्रकारचें कुष्टनाशक आहे.

खैराचें आसव.

खदिरस्य तुलार्धं तु तत्तुल्यं देवदार्वपि ।
वराया विंशतिर्दार्व्याः पलानां पंचविंशतिः ॥ १ ॥
वाकुच्या द्वादश पलान्यष्टद्रोणेऽम्भसः पचेत् ।
द्रोणशेषे कषाये तु पूतशेषे विनिक्षिपेत् ॥ २ ॥
धातक्या विंशतिपलं माक्षिकस्य शतद्वयम् ।
शर्करायास्तुलामेकां चूर्णानीमानि दापयेत् ॥ ३ ॥
कङ्कोलकं लवंगं च एलाजातीफलत्वचम् ।
केशरं मरिचं पत्रं पलिकान्युपकल्पयेत् ॥ ४ ॥
पिप्पलीनां तु कुडवं स्थापयेद्घृतभाजने ।
मासादूर्ध्वं पिबेन्मात्रामनपेक्ष्य बलाबलम् ॥ ५ ॥
सर्वकुष्ठहरो ह्येष पाण्डुहृद्रोगकासनुत् ।
कृमिग्रन्थ्यर्बुदग्रन्थिगुल्मप्लीहोदरान्तकृत् ।
एष वै खदिरारिष्टः कृष्णात्रेयेण पूजितः ॥ ६ ॥

खैराची साल दोनशें तोळे, देवदार दोनशें तोळे, त्रिफळा ऐशीं तोळे, दारुहळद शंभर तोळे व बावच्या अठ्ठेचाळीस तोळे, ह्यांचा आठ द्रोण (आठ हजार एकशें ब्याण्णव तोळे) पाण्यांत अष्टमांश काढा करावा. तो गाळून घेऊन त्यांत धायटीचीं फुलें वीस तोळे, मध आठशें तोळे, साखर चारशें तोळे, आणि कंकोळ, लवंग, वेलदोडे, जायफळ, दालचिनी, केशर, मिरें, तमालपत्र, हीं औषधें चार चार तोळे व पिंपळी सोळा तोळे ह्यांचें चूर्ण घालून

तुपानें राबलेल्या मातीच्या भांड्यांत घालून एक महिनाभर ठेवून नंतर शक्तिमानाप्रमाणें सेवन करावें. हें खदिरासव सर्व कुष्ट-रोगांचा नाश करितें; आणि पांडुरोग, हृद्रोग, खोकला, कृमि, गाठी, आवाळू, गुल्म, पांथरी, व उदर ह्यांचाही नाश करितें. या खदिरारिष्टाची कृष्णात्रेयानें स्तुति केली आहे.

कनकारिष्ट.

खदिरकषायं द्रोणं सर्पिष्कुम्भे निधापयेन्मध्ये ।
पलिकामात्रान्क्षेप्यान्कृत्वा तानेव सूक्ष्मचूर्णं तु ॥ १ ॥
त्रिफला त्रिकटुकरजनीकनकत्वग्बाकुची गुडूची च ।
सविडंगमत्र मधुपलशतद्वयं प्रक्षिपेत्सर्वम् ॥ २ ॥
धातक्याश्च पलान्यष्टौ क्वाथेऽस्मिन्प्रदेयानि ।
प्रातः प्रातस्तु पिबेन्नाशयति चिरोत्थितं कुष्ठम् ॥ ३ ॥
मासेन सर्वरोगान्विनिहन्ति च सर्वशोफमेहांश्च ।
निर्जितकासश्वासो गुदकीलभगंदरैर्मुक्तः ।
कनकारिष्टं प्रपिबन्भवति पुमान्कनककान्तिश्च ॥ ४ ॥

दहाशें चोवीस तोळे खैराच्या सालीचा काढा तुपानें राबलेल्या मडक्यांत भरून त्यांत हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, हळद, पळसाची साल, बावच्या, गुळवेल, व वावडिंग ह्यांचें चूर्ण चार चार तोळे व मध आठशें तोळे घालून धायटीचें चूर्ण बत्तीस तोळे घालावें. हें कनकारिष्ट नित्य प्रातःकाळीं सेवन करावें. हें फार दिवसांच्या कुष्टाचा नाश करितें. हें महिनाभर सेवन केलें असतां सर्व रोग, सर्व मेह, सर्व प्रकारची सूज, खोकला, श्वास, मूळव्याधीचे मोड, व भगंदर ह्यांपासून रोगी मुक्त होतो. व हें कनकारिष्ट सेवन करणारा मनुष्य शरीरानें सुवर्णासारख्या कांतीचा होतो.

दद्रुचिकित्सा.

कासमर्दकमूलानि सौवीरेण तु पेषयेत् ।
दद्रुकिट्टिभकुष्ठानि जयेदेतत्प्रलेपनात् ॥ १ ॥

कासविंद्याचीं मुळें कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो किटिभकुष्ट व दद्रु ह्यांना जिंकतो.

बीजानि वा मूलकसर्षपाणां लाक्षारजन्यौ प्रपुनाटबीजम् ।
श्रीवेष्टकं व्योषविडंगकुष्टं पिष्ट्वा च मूत्रेण विलेपनं स्यात् ।
दद्रूणि सिध्मं किटिभानि पामां कापालकुष्ठं विषमं च हन्युः २

मुळ्याचें बी, शिरस (मोहऱ्या), लाख, हळद, दारुहळद, टाकळ्याचें बी, विशेषधूप (गंधाबिरोजा), सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग व कोष्ट, ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. म्हणजे तो दद्रु (नायटे), शिबें, किटिभ कुष्ट, खरूज, व कष्टसाध्य असें कापाल-कुष्ठ ह्यांचा नाश करितो.

आरग्वधस्य पत्राणि आरनालेन पेषयेत् ।
दद्रुकिट्टिभकुष्ठानि हन्ति सिध्ममसंशयम् ॥ ३ ॥

बाहव्याचीं पानें कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो दद्रु, किटिभकुष्ट व शिबें ह्यांचा नाश करतो.

प्रपुन्नाटस्य बीजानि धात्री सर्जरसः स्नुही ।
सौवीरपिष्टं दद्रूणामेतदुद्वर्तनं परम् ॥ ४ ॥

टाकळ्याचें बी, आवळकाठी, राळ व त्रिधारी निवडुंगाचा चीक ह्यांचा कांजीतून नायट्यावर लेप करावा. तो फार चांगला आहे.

दूर्वाभयासैन्धवचक्रमर्दकुठेरकाः काञ्जिकतक्रपिष्टाः ।
त्रिभिः प्रलेपैरपि बद्धमूलं दृढं च कण्डूं च विनाशयन्ति ॥ ५ ॥

दूर्वा, हिरडे, सैंधेलोण, टाकळ्याचें बी, रानतुळशीचें बी, हीं औषधें कांजींत वाटून त्यांचा लेप करावा. हा लेप तीन वेळ केला असतां अंगाला खिळलेली अशी कंडू नाश पावते.

विडंगैडगजाकुष्ठनिशासिन्धूत्थसर्षपैः ।
धान्याम्लपिष्टैर्लेपोऽयं दद्रूकुष्ठनिषूदनः ॥ ६ ॥

वावडिंग, टाकळ्याचें बी, कोष्ट, हळद, सैंधेलोण व मोहऱ्या हीं औषधें कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो दद्रुकुष्टाचा नाश करतो.

लघुमरिचादि तेल.

मरिचालशिलाब्दार्कपयोऽश्वारिजटात्रिवृत् ।
शकृद्रसविशालारुग्निशायुग्दारुचन्दनैः ॥ १ ॥
कटुतैलं पचेत्प्रस्थं ह्यक्षे विषपलान्विते ।
सगोमूत्रं तदभ्यंगाद्दद्रुश्वित्रविनाशकृत् ॥ २ ॥

मिरें, हरताळ, मनशीळ, नागरमोथे, रुईचा चीक, पांढऱ्या

कणेरीच्या मुळ्या, तेल, गाईच्या शेणाचा रस, कडू वृंदावन, कोष्ट, हळद, दारुहळद, देवदार व रक्तचंदन ह्यांच्या कल्कामध्यें चौसष्ट तोळे शिरसेल, चार तोळे बचनाग, दोन बिब्बे व गोमूत्र घालून तेल पचन करावें. हें तेल लावलें असतां दद्रु (नायटे) व श्वित्र (पांढरें कोड) ह्यांचा नाश होतो.

दरदादि लेप.

दरदगन्धकपारदपिप्पलीविषविडङ्गनिशाग्निमरीचकम् ।
अभयशुण्ठिघनाब्धिकबाकुचीकटुनृपद्रुममेडगजान्वितम् ॥ १॥
सममिदं खलु निम्बरसैर्युतं हरति दद्रुजकण्डुविसर्पकान् ।
हरति लूतभगंदरमण्डलं तनुविलिप्तमहो क्षणतो नृणाम् ॥ २॥

हिंगूळ, गंधक, पारा, पिंपळी, बचनाग, वावडिंग, हळद, चित्रकमूळ, मिरें, हिरडा, सुंठ, नागरमोथे, समुद्रफेस, बावच्या, कापूर, बाहव्याची साल व टाकळ्याचें बी ह्यांचें चूर्ण करून त्याचा लिंबाच्या रसांतून पातळसा लेप करावा. तो दद्रु, कंडु, विसर्प, लूताविष, भगंदर व मंडलकुष्ट ह्यांचा क्षणांत नाश करितो.

गजकर्णचिकित्सा.

सूतगन्धकयोः पिष्ट्वा कज्जलिकां विधाय च ।
म्रक्षणेन विमर्द्याथ करित्वग्लेपने हितम् ॥ १ ॥

पारा व गंधक ह्यांची कज्जली करून ती लोण्यांत खलून लावावी. ती गजकर्णावर हितकारक आहे.

कबाबगौरीगदतुत्थजीरवल्लीभवं कर्षमिदं पृथक्च ।
शिलाबली तौ रविकर्षसंख्यौ सार्धौ विभागः किल पारदस्य२
कर्षैश्च विंशत्प्रमितैर्घृतस्य सर्वं विमर्द्य किल ताम्रपात्रे ।
ततोऽङ्गलेपात्रिदिनं च तीव्रां हरेच्च रोगी गजकर्णपामाम् ॥ ३॥

नाकेशर, हळद, कोष्ट, मोरचूत, जिरें व मिरें हीं औषधें तोळा तोळा, मनशीळ व गंधक बारा बारा तोळे, पारा बारा तोळे आणि तूप वीस तोळे हीं सर्व औषधें तांब्याच्या भांड्यांत खलून मलम तयार करावें. ह्याचा तीन दिवस लेप करावा, म्हणजे गजकर्ण व खरूज हीं दूर होतात.

गुंजाचित्रकशङ्खभस्मरजनीदूर्वाभयालांगली-

स्नुक्सिन्धूत्थकुमारिकाजलधरार्कक्षीरधूमेशजैः ।
वल्गूएडगजाविडंगमरिचक्षौद्रैश्च खारीयुतैः
कार्यं वै गजचर्मदद्रुरकसाकण्डुघ्नमुद्वर्तनम् ॥ ४ ॥

गुंजा, चित्रकमूळ, शंखभस्म, हळद, दूर्वा, हिरडे, कळलावी, त्रिधारी निवडुंगाचा चीक, सेंधेलोण, कोरफडीचा चीक (काळा-बोळ), नागरमोथे, रुईचा चीक, घरोसा, पारा, बावच्या व टाकळा ह्यांचें बी, वावडिंग, व मिरें हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा मधांतून लेप करावा. तो गजकर्ण, दद्रु, रकसा, व कंडु ह्यांचा नाश करतो.

आरग्वधदलैः पिष्टैर्लेपः काञ्जिकयुक्कृतः ।
करित्वग्दद्रुकुष्ठानि हन्ति पामां विचर्चिकाम् ॥ ५ ॥

बाहव्याचीं पानें कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो गजकर्ण, दद्रु, कुष्ट, खरूज व विचर्चिका ह्यांचा नाश करतो.

किटिभचिकित्सा.

चक्राङ्कबीजं त्वक्क्षीरभावितं मूत्रसंयुतम् ।
रविवेतसकन्दं च लेपनं किटिभापहम् ॥ १ ॥

वासनवेलीचें (भुईपाडळीचें किंवा निवळीच्या वेलीचें) बी आणून त्याचें चूर्ण करून त्याला रुईच्या चिकाची भावना देऊन तें चूर्ण आणि रुई व वेत ह्यांचा गड्डा ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. तो किटिभकुष्टाचा नाश करतो.

पिप्पलीपूतिकायस्थाकुष्ठगोपित्तचित्रकैः ।
लेपं सम्यक्प्रशंसन्ति किटिभघ्नं चिकित्सकाः ॥ २ ॥

पिंपळी, करंजाची साल, हिरडे, कोष्ट, गाईचें पित्त (गोरो-चन) व चित्रक ह्यांचा लेप किटिभाचा नाशक आहे, म्हणून वैद्य त्याची प्रशंसा करितात.

गोमूत्रवारिसंपिष्टैः शिलाकासीसतुत्थकैः ।
लेपः किटिभवीसर्पकुष्ठनाशाय पूजितः ॥ ३ ॥

मनशीळ, हिराकस व मोरचूत ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. तो किटिभ कुष्ट, विसर्प व कुष्ट यांचे नाशाविषयीं फार श्रेष्ठ आहे.

शिब्याची चिकित्सा.

धात्रीफलं सर्जरसो यावशूकास्त्विदं त्रयम् ।

सौवीरपेषितं सर्वं सिध्मशूलविदारणम् ॥ १ ॥

आवळकाठी, राळ व जवखार ह्यांचा कांजींतून लेप करावा. तो शिबें व त्याची पीडा ह्यांचा नाश करतो.

शिखरीरसे सुपिष्टं मूलकबीजं प्रलेपतः सिध्मम् ।
क्षारेण कदल्या वा रजनीमिश्रेण नाशयति ॥ २ ॥

मुळ्याचें बी आघाड्याच्या रसांत वाटून त्याचा किंवा केळीचा क्षार व हळद ह्यांचा लेप शिब्याचा नाश करतो.

कुष्ठं मूलकबीजं प्रियङ्गवः सर्षपा दुरालम्भा।
एतत्केसरपिष्टं निहन्ति चिरकालजं सिध्मम् ॥ ३ ॥

कोष्ट, मुळ्याचें बी, गव्हला, शिरस, धमासा, व नाकेशर ह्यांचें चूर्ण लेपानें फार दिवसांचे शिब्याचा नाश करितें.

गन्धपाषाणमिश्रेण यवक्षारेण लेपितम् ।
सिध्मं नाशमुपैत्याशु कटुतैलयुतेन च ॥ ४ ॥

गंधक व जवखार ह्यांचा कडुतेलांतून लेप करावा, म्हणजे शिबें लवकर बरें होतें.

कासमर्दकबीजानि मूलकानां तथैव च ।
गन्धपाषाणमिश्राणि सिध्मानां परमौषधम् ॥ ५ ॥

कासविंद्याचें बीं, मुळ्याचें बीं व गंधक ह्यांचा लेप हें शिब्यावर फार उत्तम औषध आहे.

बीजं मूलकजं निम्बपत्राणि सितसर्षपान् ।
गृहधूमं च संपिष्य जलेनाङ्गं प्रलेपयेत् ॥ ६ ॥
उद्वर्त्य नवनीतेन क्षालयेदुष्णवारिणा ।
त्र्यहादनेन सिध्मानि शाम्यन्त्याशु शरीरिणाम् ॥ ७ ॥

मुळ्याचें बीं, बाळंतनिंबाचा पाला, पांढऱ्या मोहऱ्या व घरोसा हीं औषधें पाण्यांत वाटून त्याचा लेप करावा. नंतर त्याजवर लोणी लावून उन पाण्यानें धुवावें. ह्याप्रमाणें तीन दिवस केलें असतां शिबें लवकर बरें होतें.

लाक्षा श्रीवेष्टकं कुष्ठं हरिद्रा गौरसर्षपाः ।
व्योषं मूलकबीजानि प्रपुन्नाटफलानि च ॥ ८ ॥
एतान्यत्र प्रदिष्टानि कुष्ठेषूद्वर्तनं परम् ।
सिध्मानां किटिभानां च दद्रूणां च विशेषतः ॥ ९ ॥

लाख, गंधाबिरोजा, कोष्ट, हळद, पांढऱ्या मोहऱ्या, सुंठ, मिरें, पिंपळी, मुळ्याचें बीं व टाकळ्याचें बीं, ह्या औषधांचा लेप कुष्ठावर व विशेषतः शिबें, किटिभकुष्ट व दद्रु ह्यांजवर फार चांगला आहे.

कार्पासिकापत्रविमिश्रकाकजंघाकृतो मूलकबीजयुक्तः ।
तक्रेण लेपः क्षितिपुत्रवारे सिध्मानि सद्यो नयति प्रणाशम १०

देवकापशीचीं पानें, काकजंघेचें मूळ व मुळ्याचें बीं ह्यांचा मंगळवारीं ताकांतून लेप करावा, म्हणजे शिबें लवकर बरें होतें.

गोमूत्रेणाथ तक्रेण जीर्णसौवीरकेण वा ।
पिष्टमूलकबीजानां लेपनात्सिध्मनाशनम् ॥ ११ ॥

गोमूत्रांतून, ताकांतून अथवा जुन्या कांजींतून मुळ्याचें बीं वाटून त्याचा लेप करावा. तो शिब्याचा नाश करितो.

विपादिकाचिकित्सा.

धत्तूरबीजकल्केन माणकक्षारवारिणा ।
कटुतैलं विपक्वं तु द्रुतं हन्याद्विपादिकाम् ।

धोतऱ्याच्या बियांचा कल्क व मानकंदाच्या (अथवा मुळ्याच्या) क्षाराचें पाणी ह्यांमध्यें मोहरींचें तेल पचन करावें. तें विपादिकेचा नाश करितें.

मुण्डीरसेन संसिद्धं घृतं हन्ति विपादिकाम् ॥ १ ॥

मुंडीच्या रसांत तूप सिद्ध करावें. तें विपादिकेचा नाश करितें.

खरूज, कंडू, इसब, विस्फोट, गजकर्ण व विचर्चिका ह्यांची चिकित्सा.

सिन्दूरजीरद्वयरात्रियुग्ममनःशिलावालिजगन्धकानाम् ।
रसान्वितानां घृतयोजितानां पामा व्रजेद्दूरतरं त्रिलेपात् ॥१॥

शेंदूर, जिरें, शहाजिरें, हळद, दारुहळद, मनशीळ, मिरें, गंधक व पारा ह्यांचे तुपांत मलम करून लावावें. ह्याचा तीन वेळ लेप केला असतां खरूज दूर होते.

सैन्धवं चक्रमर्दं च सर्षपं पिप्पलीं तथा ।
सेचयेदारनालेन पामाकण्डूविनाशनम् ॥ २ ॥

सेंधेलोण, टाकळ्याचें बीं, पांढऱ्या मोहऱ्या व पिंपळी ह्यांचा कांजींतून लेप करावा. तो खरूज व कंडू ह्यांचा नाश करितो.

जीरकतेल.

जीरकस्य पलं पिष्ट्वा सिन्दूरार्धपलं तथा।
कटुतैलं पचेदाभ्यां सद्यः पामाहरं परम्।
वृद्धवैद्योपदेशेन पाच्यं तैलं पलाष्टकम् ॥ १ ॥

जिऱ्याचें चूर्ण चार तोळे व शेंदूर दोन तोळे ह्या दोहोंच्या कल्कानें बत्तीस तोळे तेल वृद्ध वैद्यांच्या उपदेशाप्रमाणें सिद्ध करावें. हें कुष्ठाचा त्वरित नाश करितें.

बृहत्सिंदूरादि तेल.

सिन्दूरं चन्दनं मांसी विडंगं रजनीद्वयम्।
प्रियंगुं पद्मकं कुष्ठं मञ्जिष्ठां खदिरं वचाम् ॥ १ ॥
जात्यर्कत्रिवृतानिम्बकरञ्जं विषमेव च।
कृष्णाचित्रकलोध्रं च प्रपुन्नाटं च संहरेत् ॥ २ ॥
श्लक्ष्णपिष्टानि सर्वाणि योजयेत्तैलमात्रया।
अभ्यंगेन प्रयोज्यं तद्वर्णकृत्कुष्ठनाशनम् ॥ ३ ॥
पामां विचर्चिकां कच्छूं विसर्पं विषमेव च।
रक्तपित्तोत्थितान्हन्ति रोगानेवंविधान्बहून्।
सिन्दूराद्यमिदं तैलमश्विभ्यां निर्मितं पुरा ॥ ४ ॥

शेंदूर, चंदन, जटामांशी, वावडिंग, हळद, दारुहळद, गव्हला, पद्मकाष्ट, कोष्ट, मंजिष्ट, खैर, वेखंड, जाईचा पाला, रुईचा चीक, तेड, कडुनिंबाचा पाला, करंजाची साल, बचनाग, पिंपळी, चित्रकमूळ, लोध्र व टाकळ्याचें बीं ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करावें, आणि अंगास लावावें. तें कुष्ठाचा नाश करितें व अंगाचा वर्ण चांगला करितें. तसेंच खरूज, विचर्चिका, कच्छु, विसर्प, विषजन्य (फोड) आणि रक्तपित्तजन्य (त्वचेचे) अनेक रोग ह्यांचा नाश करितें. हें सिंदूरादितेल पूर्वी अश्विनीकुमारांनीं तयार केलें.

बृहन्मरिचादि तेल.

मरिचं त्रिवृता दन्ती क्षीरमार्कं शकृद्रसः।
देवदारु हरिद्रे द्वे मांसी कुष्ठं सचन्दनम् ॥ १ ॥
विशाला करवीरं च हरितालं मनःशिला।
चित्रको लांगली चव्यं विडंग चक्रमर्दकम् ॥ २ ॥
शिरीषकुटजौ निम्बः सप्तपर्णोऽमृता स्नुही।

शम्याको नक्तमालोऽब्दः खदिरः पिप्पली वचा ॥ ३ ॥
जोतिष्मती च पलिका विषस्य द्विपलं भवेत् ।
आढकं कटुतैलस्य गोमूत्रं च चतुर्गुणम् ॥ ४ ॥
मृत्पात्रे लोहपात्रे वा शनैर्मृद्वग्निना पचेत् ।
पक्त्वा तैलं वरं ह्येतन्म्रक्षयेत्कोठकव्रणान् ॥ ५ ॥
पामाविचर्चिकाकण्डूदद्रुविस्फोटकानि च ।
वलयः पलितं छाया नीला व्यंगं तथैव च ।
अभ्यङ्गेन प्रणश्यन्ति सौकुमार्यं च जायते ॥ ६ ॥

मिरें, तेड, दातीमूळ (अथवा जेपाळ), रुईचा चीक, गाईच्या शेणाचा रस, देवदार, हळद, दारुहळद, जटामांसी, कोष्ट, चंदन, कडू वृंदावन, कणेरीच्या मुळ्या, हरताळ, मनशीळ, चित्रकमूळ, कळलावी, चवक, वावडिंग, टाकळ्याचें बीं, शिरसाची साल, कुड्याची साल, कडुनिंबाची साल, सातवीण, गुळवेल, त्रिधारी निवडुंगाचा चीक, बाहव्याचा पाला, करंजाची साल, खैराची साल, पिंपळी, वेखंड, व मालकांगोणीचें बीं, हीं औषधें चार चार तोळे; बचनाग आठ तोळे, मोहरीचें तेल दोनशें छप्पन्न तोळे व गोमूत्र तेलाच्या चौपट ह्या सर्वांचें मिश्रण करून मातीच्या अगर लोखंडाच्या भांड्यांत मंदाग्नीवर सावकाश तेल पचन करावें. आणि अंगास लावावें. म्हणजे कोठ (गांधी), व्रण, खरूज, विचर्चिका, कंडू, दद्रु, विस्फोटक, सुरकुत्या, पलित (केसाचा पांढरेपणा) छाया (अंगाचा बदललेला वर्ण व नीळ (नीलिका) ह्यांचा नाश होतो, व शरीरहि सुकुमार होतें.

माहेश्वरघृत.

कृत्वा कज्जलिकां रवौ कुनटिका द्वे जीरके द्वे निशे
गोदन्तोषणनाग एडगजिका बाकुश्चिका सर्पिषा ।
लोहे लोहविमर्दितं दृढतरं माहेश्वराख्यं घृतं
कण्डूकुष्ठविचर्चिकादिशमनं पामाहरं लेपनात् ॥ १ ॥

पारा व गंधक ह्यांची कज्जली तांबडी व पांढरी राळ, मनशीळ, जिरें, शहाजिरें, हळद, दारुहळद, गोदंती, हरताळ, मिरें, बचनाग, टाकळ्याचें बी व बावची ह्या सर्वांचा एकत्र खल

करून तूप घालून लोखंडाच्या भांड्यांत लोखंडाच्याच पात्रानें खलून मलम तयार करावें. ह्याला माहेश्वरघृत म्हणतात. ह्याचा लेप केला असतां तो कंडू, कुष्ट, विचर्चिका, व खरूज इत्यादिकांचा नाश करितो.

मांसीचन्दनशम्याककरञ्जारिष्टसर्षपम् ।
यष्टीकुटजदार्वीभिर्हन्ति कड्डूमयं गणः ॥ २ ॥

जटामांशी, चंदन, बाहव्याचा पाला, करंजाची साल, कडुलिंबाचा पाला, पांढऱ्या मोहऱ्या, जेष्टमध, कुड्याची साल व दारुहळद हा गण कंडुनाशक आहे.*

अवल्गुजं कासमर्दं चक्रमर्दं निशायुतम् ।
मणिमन्थेन तुल्यांशं मस्तुकाञ्जिकपेषितम् ।
कण्डूं कच्छूं जयत्युग्रां सिद्ध एष प्रयोगराट् ॥ ३ ॥

बावच्या, कासविंद्याचें बी, टाकळ्याचें बी, हळद, सेंधेलोण हीं औषधें समभाग घेऊन कांजींत किंवा दह्याच्या पाण्यांत वाटून त्यांचा अंगास लेप करावा, म्हणजे उग्र अशी खरूज व कंडू बरी होते. हा प्रयोगराज सिद्ध आहे.

कोमलसिंहास्यदलं सनिशं सुरभीजलेन संपिष्टम् ।
दिवसत्रयेण नियतं शमयति कच्छूं विलेपनतः ॥ ४ ॥

अडुळशाचीं कोवळीं पानें व हळद तुळशीच्या रसांत अगर गोमूत्रांत वाटून तीन दिवस लेप करावा, म्हणजे खरजेचा नाश होतो.

हरिद्राकल्कसंयुक्तं गोमूत्रस्य पलद्वयम् ।
पिबेन्नरः कामचारी कच्छूपामाविनाशनम् ॥ ५ ॥

आठ तोळे गोमूत्रांत हळदीचें चूर्ण घालून प्यावें. तें कच्छु व खरूज ह्याचा नाश करितें. ह्यांवर पथ्य करण्याचें कारण नाहीं.

गन्धपाषाणचूर्णं तु कटुतैलेन योजितम् ।

---

* जीरा मीरा मनशीक पारा तुथ्य सुगंधक सिंदूरतीला सम
जीवकर घीवस माना तिस्ते (तिस्ते) पारा बजी रजाणा.

नयनसुख ग्रंथांतील जीरकादियोगः–जिरें, मिरें, मनशीळ, पारा, मोरचूत, गंधक, शेंदूर व तीळ हीं सर्व समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून तुपांत खलून मलम तयार करावें. (आनंदाश्रमांतील प्रतीवरून.)

–३४ यो. र.

लेपनादथ पानाद्वा कच्छूपामाविनाशनम् ॥ ६ ॥

शुद्ध गंधकाचें चूर्ण मोहरीच्या तेलांतून चाटावें; व खरजेस लावावें. तें कच्छु व पामा ह्यांचा नाश करितें.

सिंदूरादि तेल.

सिन्दूरगुग्गुलुरसांजनासिक्थतुत्थैः
कल्कीकृतैः कटुकतैलमिदं सुपक्वम् ।
कच्छूं स्रवत्पिटिकिकामथ वाऽपि शुष्का-
मभ्यञ्जनेन सकृदुद्धरति प्रसह्य ॥ १ ॥

शेंदूर, गुग्गुळ, रसांजन, मेण व मोरचूत ह्यांचा कल्क करून त्यानें मोहरीचें तेल सिद्ध करावें. हें लावलें असतां ओली किंवा वाळलेली खरूज व कच्छु ह्यांचा नाश होतो.

अर्कतैल.

अर्कपत्र रसे पक्वं रजनीकल्कसंयुतम् ।
कटुतैलं हरेत्तूर्णं पामाकच्छुविचर्चिकाः ॥ १ ॥

रुईच्या पानाच्या रसांत हळदीचा कल्क घालून मोहरीचें तेल सिद्ध करावें. तें खरूज, कच्छु व विचर्चिका ह्यांचा त्वरित नाश करतें.

राजिकागुडयुक्तेन सैन्धवेन प्रलेपितम् ।
विजलं चर्मणा बद्धं नाशं चर्मदलं व्रजेत् ॥ २ ॥

मोहऱ्या, गूळ व सैंधेलोण ह्यांचा पाण्यावांचून लेप करावा. व त्याजवर कातडें बांधावें. म्हणजे चर्मदल कुष्ठाचा नाश होतो.

रसायनें;-विजयेश्वर रस.

शुद्धतालं मृतं सूतं तुल्यं ताभ्यां चतुर्गुणम् ।
भर्जित्वा विजया योज्या सर्वतुल्यं गुडं क्षिपेत् ॥ १ ॥
श्वेतकुष्ठहरं निष्कं रसोऽयं विजयेश्वरः ।
दार्वीखदिरनिम्बानां क्वाथं तदनु पाययेत् ॥ २ ॥

शुद्ध हरताळ व पारदभस्म हीं दोन्हीं समभाग व ह्या दोहोंच्या चौपट भाजलेली भांग आणि सर्वांच्या बरोबरीनें गूळ ह्यांच्या गोळ्या कराव्या. हा विजयेश्वर नांवाचा रस तीन मासेप्रमाणें द्यावा. हा श्वेतकुष्ठाचा नाश करतो. ह्याजवर दारुहळद, बाळंत लिंबाची साल व खैराची साल ह्यांचा काढा अनुपानार्थ द्यावा.

पांढऱ्या कुष्टाची चिकित्सा.

श्वित्रिणो हृतदोषस्य हृतरक्तस्य वासकृत् ।
खदिराम्बुयवान्नानां तृप्तस्य मलयूरसः ॥
सगुडः शस्यते पाने यवागूमण्डभोजिनः ॥ १ ॥

ज्याला श्वित्र आहे त्याचे दोष काढून टाकून अथवा वरचेवर रक्त काढून, खैराचा काढा व सातूचें अन्न खाऊन तृप्त झाल्यावर बावच्यांचा काढा गूळ घालून प्यावयास द्यावा. यवागू व मंड सेवन करणाऱ्या मनुष्याला तो प्रशस्त आहे.

खदिरामलककषायं बाकुचिबीजान्वितं पिबेन्नित्यम् ।
शङ्खेन्दुकुन्दधवलं श्वित्रं हन्तीह तच्चित्रम् ॥ २ ॥

खैराची साल व आवळकाठी ह्यांचा काढा नित्य घ्यावा. तो कुंदाचें फूल, चंद्र किंवा शंख ह्यासारखे पांढरे दिसणाऱ्या कोडाचा नाश करतो, हें आश्चर्य आहे.

शिलापामार्गभस्मितलेपाच्छ्वित्रं विनाशयेत् ।
किं पुनर्यदि युज्येत धनंजयजटात्वचा ॥ ३ ॥

मनशीळ व आघाड्याची राख ह्यांचा लेप पांढऱ्या कोडाचा नाश करितो. मग त्यांत चित्रकाच्या मुळाची साल घातल्यावर तो नाश करील ह्यांत आश्चर्य कसलें?

त्रिफला नीलिनीपत्रं लोहचूर्णं रसाञ्जनम् ।
श्वेतगुंजा दन्तिदन्तभस्म तुत्थं च मार्कवम् ॥ ४ ॥
मेषीदुग्धेन संपिष्य स्थापयेल्लोहभाजने ।
दिनमेकं ततो लिम्पेन्मुहुः श्वित्रेष्वनुक्रमात् ॥
श्वित्राण्यनेन लेपेन निजवर्णं त्यजन्ति वै ॥ ५ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, निळीचीं पानें, लोहभस्म, रसांजन, पांढऱ्या गुंजा, दंतीबीज (जेपाळ), गाईच्या दांताची राख, मोरचूत व माका, यांचा मेंढीच्या दुधांत खल करून तें मिश्रण लोखंडाच्या भांड्यांत ठेवावें. आणि त्याचा कुष्ठावर क्रमानें वरचेवर लेप करावा. ह्या लेपानें पांढरें कुष्ठ आपला वर्ण सोडतें.

सायोरजःकृष्णतिलाञ्जनानि सावल्गुजान्यामलकानि दग्ध्वा ।
पिष्टानि भृङ्गस्य सकृद्रसेन हन्यात्किलासं परिघृष्टलेपात् ॥६॥

लोहभस्म, काळे तीळ, रसांजन किंवा काळा सुरमा, बावच्या व

आवळकाठी ह्यांची राख करून माक्याच्या रसांत खलून त्याचा लेप करावा, म्हणजे किलास कुष्टाचा (तांबड्या कोडाचा) नाश होतो.

विषतेल.

नक्तमालो हरिद्रे द्वे अर्क तगरमेव च ।
करवीरवचाकुष्ठमास्फोता रक्तचन्दनम् ॥ १ ॥
मालती सप्तपर्णं च मञ्जिष्ठा सिन्धुवारिका ।
एषामर्धपलान्भागान्विषस्य द्विपलं भवेत् ॥ २ ॥
चतुर्गुणे गवां मूत्रे तैलप्रस्थं विपाचयेत् ।
श्वित्रविस्फोटकिटिभकीटलूताविचर्चिकाः ॥ ३ ॥
कण्डूकच्छ्रुविकाराश्च ये व्रणा विषदूषिताः ।
विषतैलमिदं नाम सर्वव्रणविशोधनम् ॥ ४ ॥

करंजाची साल, हळद, दारुहळद, रुईचा चीक, तगर, कणेरीच्या मुळ्या, वेखंड, कोष्ट, कांचनाची साल, रक्तचंदन, मालती, सातविणीची साल, मंजिष्ट व निर्गुडी हीं औषधें दोनदोन तोळे व बचनाग चार तोळे ह्यांच्या करकानें चौसष्ट तोळे तेल चौपट गोमूत्र घालून पचन करावें. तें श्वित्र, विस्फोट, किटिभकुष्ट, कीट, व लूत ह्यांचेमुळें होणारा त्वचेचा विकार, विचर्चिका, कंडु (कोरडी खरूज), कच्छु व विषदोषजन्य व्रण ह्यांचा नाश करितें. हें विषतेल नांवाचें तेल सर्व प्रकारच्या व्रणांचें शोधन करितें.

ज्योतिष्मती तेल.

मयूरकक्षारजले सप्तकृत्वः परिश्रुतम् ।
सिद्धं ज्योतिष्मतीतैलमभ्यङ्गाच्छ्वित्रनाशनम् ॥ १ ॥

मोराच्या पंखाच्या क्षाराच्या पाण्यांत किंवा मोरचुताच्या पाण्यांत सात वेळ मालकांगोणीचें तेल पचन करावें. तें अंगास लाविलें असतां श्वेतकुष्टाचा नाश करितें.

शशिलेखा वटी.

शुद्धसूतं समं गन्धं तुल्यं च मृतताम्रकम् ।
मर्दितं बाकुचीकाथैर्दिनैकं वटकीकृतम् ॥ १ ॥
निष्कमात्रां सदा खादेच्छ्वित्रघ्नीं शशिलेखिकाम् ।
बाकुचीतैलकर्षैकं सक्षौद्रमनुपाययेत् ॥ २ ॥

शुद्ध पारा व शुद्ध गंधक समभाग, त्या दोहोंसमान ताम्रभस्म

ह्यांचा बावचीच्या काढ्यांत एक दिवस खल करावा, आणि तीन माशांची गोळी करावी; आणि रोज एक एक गोळी खावी. ही शशिलेखा वटी श्वित्रनाशक आहे. ह्या गोळीवर बावचीचें तेल एक तोळा मध घालून प्यावें.

पथ्यापथ्य.

अन्नपानं हितं कुष्ठे न त्वम्ललवणोषणम् ।
दधिदुग्धगुडानूपतिलमाषांस्त्यजेत्तराम् ॥ १ ॥

आंबट व खारट असें अन्नपान कुष्टरोगांत हितकारक नाहीं. दहीं, दूध, गूळ, अनूप देशांतील प्राण्यांचें मांस, तीळ व उडीद हे पदार्थ अगदीं खाऊ नयेत.

शीतपित्त, उदर्द व कोठ ह्यांचें निदान.

शीतमारुतसंस्पर्शात्प्रदुष्टौ कफमारुतौ ।
पित्तेन सह संभूय बहिरन्तर्विसर्पतः ॥ १ ॥

अंगाला गार वारा लागल्यानें कफ व वात दूषित होऊन स्वकारणानें कुपित झालेल्या पित्तासह अंतर्बाह्य संचार करितात.

त्याचें पूर्वरूप.

पिपासारुचिहृल्लासदाहसादाङ्गगौरवम् ।
रक्तलोचनता तेषां पूर्वरूपमिति स्मृतम् ॥ २ ॥

तहान, अरुचि, मळमळणें, अंगाचा दाह होणें, अंग गळल्यासारखें होणें, अंग जड होणें व डोळे लाल होणें हीं लक्षणें शीतपित्त होण्यापूर्वीं होतात.

लक्षण.

वरटीदंष्ट्रसंस्थानः शोफः संजायते बहिः ।
सकण्डूतोदबहुलश्छर्दिज्वरविदाहवान् ॥ ३ ॥
उदर्दमिति तं विद्याच्छीतपित्तमथापरे ।
वाताधिकं शीतपित्तमुदर्दस्तु कफाधिकः ॥ ४ ॥

शीतपित्तानें गांजणी चावल्यासारख्या गांधी उठतात, अंग खाजतें, अतिशय टोंचल्यासारखें होतें, आणि ओकारी, ताप व अंगाचा दाह हे विकार होतात. ह्याला उदर्द असें म्हणतात. यास च कित्येक शीतपित्त असें म्हणतात. पण शीतपित्तांत वात अधिक

असतो आणि उदर्दामध्यें कफ अधिक असतो.

उदर्दाचा धर्मभेद.

सोत्सङ्गैश्च सरागैश्च कण्डूमद्भिश्च मण्डलैः ।
शैशिरः कफजो व्याधिरुदर्दः परिकीर्तितः ॥ ५ ॥

थंडीमुळें कफाचा प्रकोप होऊन मध्यें खोलगट व कडेला उचललेलीं अशीं तांबडीं लाल मंडळें अंगावर उठतात, त्यांना उदर्द असें म्हणतात.

कोठाचें लक्षण.

असम्यग्वमनोदीर्णपित्तश्लेष्मान्ननिग्रहैः ।
आरनालैश्च शुक्तैश्च आसुरीलवणेन च ॥ १ ॥
वर्षाकाले प्रकुप्येत्स तथा दुष्टैश्च कारणैः ।
मण्डलानि सकण्डूनि रागवन्ति बहूनि च ॥ २ ॥
उत्कोठः सानुबन्धश्च कोठ इत्याभिधीयते ॥ ३ ॥

वमनाच्या औषधानें बरोबर वमन न झाल्यामुळें, कफ पित्त व अन्न ह्यांच्या उलटीचा वेग आवरून धरला असतां किंवा पावसाळ्यांत कांजी, सूक्त, मोहऱ्या व मीठ हे पदार्थ फार खाल्ले असतां किंवा दुसऱ्या दूषित कारणांनीं उदर्दाचा प्रकोप होतो. त्यामुळें कंडुयुक्त तांबडीं लाल व पुष्कळ अशीं मंडळें अंगावर उठतात. त्यांना उत्कोठ असें म्हणतात. आणि तीं मंडळें उत्पन्न होऊन क्षणांत नाहींशीं होणारी नसलीं तर त्यांना कोठ असें म्हणतात.

शीतपित्तादिकांची चिकित्सा.

अभ्यङ्गः कटुतैलेन स्वेदश्चोष्णेन वारिणा ।
तथाऽऽशु वमनं कार्यं पटोलारिष्टवासकैः ॥ १ ॥
त्रिफलापुरकृष्णाभिर्विरेकश्च प्रशस्यते ।
सर्पिः पीत्वा महातिक्तं कार्यं शोणितमोक्षणम् ॥
सक्षारसिन्धुतैलैश्च गात्राभ्यङ्गं प्रकल्पयेत् ॥ २ ॥

अंगाला मोहरीचें तेल लावून ऊन पाण्याचा वाफारा द्यावा. तसेंच कडुपडवळ, कडुलिंबाची साल व अडुळसा ह्यांच्या काढ्यानें वमन द्यावें. हिरडा, बेहडा, आवळकटी, पिंपळी व गुग्गुळ ह्या औषधांनीं रेचक द्यावें. महातिक्तघृत (मागें कुष्ठचिकित्सेंत सांगि-

तळेलें) पिऊन रक्त काढावें, जवखार व सैंधलोण तेलांत घालून तें तेल अंगास लावावें.

गम्भारिकाफलं पक्वं शुष्कमुत्स्वेदितं पुनः ॥
क्षीरेण शीतपित्तघ्नं खादितं पथ्यसेविना ॥ ३ ॥
यष्टी मधूकपुष्पं च सरास्नं चन्दनद्वयम् ।
निर्गुण्डी सकणाक्वाथं शीतपित्तहरं पिबेत् ॥ ४ ॥

शिवणीचीं पिकून वाळलेलीं फळें दुधांत शिजवून खावीं व पथ्य करावें. तीं शीतपित्तनाशक आहेत. जेष्टमध, मोहाचीं फुलें, रास्ना, पांढरा व तांबडा चंदन, निर्गुडी व पिंपळी ह्यांचा काढा प्यावा. तो शीतपित्तनाशक आहे.

अमृतारजनीनिम्बधन्वयासैः पृथक्शृतम् ।
प्राणिनां प्राणदं चैतच्छीतपित्ते समाचरेत् ॥ ५ ॥

गुळवेल, हळकुंड, बाळंतनिंबाची साल व धमासा ह्या प्रत्येक औषधाचा, प्राण्यांना जीवन देणारा काढा शीतपित्तावर द्यावा.

सगुडं दीप्यकं यस्तु खादेत्पथ्यान्नभुङ् नरः ।
तस्य नश्यति सप्ताहादुदर्दः सर्वदेहजः ॥ ६ ॥

जो मनुष्य पथ्य करून ओवा व गूळ खातो, त्याच्या उदर्दाचा सात दिवसांत नाश होतो.

यवानीं पाययेद्वाऽपि सव्योषां क्षीरसंयुताम् ।
पिप्पलीवर्धमानं वा लशुनं वा प्रयोजयेत् ॥ ७ ॥

शीतपित्तावर सुंठ, मिरीं, पिंपळी व दूध ह्यांशीं ओवा खावा. वर्धमानपिंपळी द्यावी, अथवा लसूण सेवन करावी.

अग्निमन्थभवं मूलं पिष्टं पीतं च सर्पिषा ।
शीतपित्तोदर्दकोठान्सप्ताहादेव नाशयेत् ॥ ८ ॥

टाकळ्याच्या मुळाचें चूर्ण करून तें तुपाशीं द्यावें. तें शीतपित्त, उदर्द व कोठ ह्यांचा सात दिवसांत नाश करितें.

निम्बस्य पत्राणि सदा घृतेन धात्रीविमिश्राण्यथ वा प्रयुञ्ज्यात्
विस्फोटकोठक्षतशीतपित्तं कण्ड्वस्रपित्तं सकलं निहन्यात् ॥ ९ ॥

कडुनिंबाचीं पानें तुपाशीं अथवा आवळकठीशीं द्यावीं. तीं विस्फोट, कोठ, व्रण, शीतपित्त, कंडु व रक्तपित्त ह्यांचा सर्वांचा नाश करतात.

कुष्ठं हरिद्रे सुरसं पटोलं निम्बाश्वगन्धे सुरदारु शिग्रुः ।
ससर्षपं तुम्बरुधान्यकं त्वक्चाण्डावचूर्णानि समानि कुर्यात् १०
तैस्तक्रपिष्टैः प्रथमं शरीरं तैलाक्तमुद्वर्तयितुं यतेत ।
तथा सकण्डूः पिटिकाः सकोठाः कुष्ठानि शोफश्च शमं व्रजन्ति ११

कोष्ट, हळद, दारुहळद, तुळस, कडुपडवळ, कडुनिंबाचा पाला, अश्वगंध, देवदार, शेवग्याची साल, पांढऱ्या मोहऱ्या, चिरफळें, धने व दालचिनी ह्यांचें समभाग चूर्ण करून ठेवावें, आणि प्रथम अंगाला तेल माखून त्याजवर हें चूर्ण ताकांतून लावावें. म्हणजे कंडू, पुटकुळया, कोठ, कुष्ट व सूज ह्यांची शांति होते.

ससैन्धवेन कुष्ठेन सर्पिषा लेपमाचरेत् ।
सुरसास्वरसैर्वाऽथ लेपयेत्परमौषधम् ॥ १२ ॥

सैंधेलोण व कोष्ट ह्यांचे चूर्णाचा तुपांतून लेप करावा; अथवा तुळशीच्या पाल्याचा रस लावावा. हें फार उत्तम औषध आहे.

सिद्धार्थरजनीकुष्ठप्रपुन्नाटतिलैः सह ।
कटुतैलेन संमिश्रमेतदुद्वर्तनं हितम् ॥ १३ ॥
शीतपित्ते उदर्दे च तथा कोठाभिधे गदे ।

मोहऱ्या, हळद, कोष्ट, टाकळयाचें बीं व तीळ ह्यांचें चूर्ण मोहरीच्या तेलांतून अंगास लावावें. तें शीतपित्त, उदर्द व कोठ ह्यांजवर हितकारक आहे.

कृमिदद्रुहरः कार्यः शीतपित्तेऽखिलः क्रमः ॥ १४ ॥

शीतपित्तावर कृमि व दद्रु यांचा नाशक सर्व क्रिया करावी.

स्निग्धस्विन्नस्य संशुद्धिमादौ कोष्ठे समाचरेत् ।
ततः कुष्ठहरः सर्वो विधेयो विधिरादरात् ॥ १५ ॥

शीतपित्तावर प्रथम स्नेहन व स्वेदन करून कोठा शुद्ध होण्याकरितां वमनविरेचनादि क्रिया करावी. नंतर कुष्टनाशक सर्व क्रिया करावी.

पथ्यापथ्य.

शालिमुद्गकुलत्थांश्च कारवेल्लमुपोदिकाम् ।
वेत्राग्रं तप्तनीरं च पित्तश्लेष्महराणि च ॥ १ ॥
शीतपित्तोदर्दकोठरोगिणां पथ्यमीरितम् ।

साळी, मूग, हुलगे, कारलीं, मयाळ, वेताचे कोंब, ऊन पाणी

व पित्तकफनाशक पदार्थ हें शीतपित्त, उदर्द व कोठ ह्यांजवर पथ्य सांगितलें आहे.

स्नानमातपमम्लं च गुर्वन्नं च विवर्जयेत् ॥ २ ॥

स्नान, ऊन घेणें, आंबट पदार्थ व जड पदार्थ हे वर्ज करावे.

अम्लपित्तनिदान.

विरुद्धदुष्टाम्लविदाहिपित्तप्रकोपिपानान्नभुजो विदग्धम् ।
पित्तं स्वहेतूपचितं पुरा यत्तदम्लपित्तं प्रवदन्ति सन्तः ॥ १ ॥

विरुद्ध, दुष्ट, आंबट, विदाही आणि पित्ताचा प्रकोप करणारें असें अन्नपान करणाऱ्या मनुष्याचें स्वकारणांनीं संचित झालेलें पित्त प्रकुपित होतें, त्याला अम्लपित्त असें म्हणतात.

त्याचें लक्षण.

अविपाकक्लमोत्क्लेशतिक्ताम्लोद्गारगौरवैः ।
हृत्कण्ठदाहारुचिभिश्चाम्लपित्तं वदेद्भिषक् ॥ २ ॥

अपचन, थकवा, छातींत ढवळल्यासारखें होणें, आंबट व कडवट असे ढेंकर येणें, अंगाला जडत्व, हृदय व घसा ह्यांमध्यें जळजळ आणि अरुचि हीं लक्षणें झालीं असतां अम्लपित्त झालें आहे असें समजावें.

त्याची अधोगति.

तृड्दाहमूर्च्छाभ्रममोहकारि प्रयात्यधो वा विविधप्रकारम् ।
हृल्लासकोठानलसादहर्षस्वेदाङ्गपीतत्वकरं कदाचित् ॥ ३ ॥

तहान, दाह, मूर्च्छा, घेरी येणें व मोह हे विकार अधोगत अम्लपित्तामध्यें होतात. हें अनेक प्रकारांनीं केव्हां तरी अधोमार्गानें जातें. वरील विकारांखेरीज पोटांत कळमळणें, अंगावर गांधी उठणें, अग्निमांद्य, अंगावर शहारे येणें, घाम येणें व अंगाला पिवळेपणा, हीं लक्षणें होतात.

ऊर्ध्वगति.

वांतं हरित्पीतकनीलकृष्णमारक्तरक्ताभमतीव चाम्लम् ।
मांसोदकाभं त्वतिपिच्छिलाच्छं श्लेष्मानुयातं विविधं रसेन ॥ ४ ॥
भुक्ते विदग्धेऽप्यथ वाऽप्यभुक्ते करोति तिक्ताम्लवमिं कदाचित् ।
उद्गारमेवंविधमेव कण्ठे हृत्कुक्षिदाहं शिरसो रुजं वा ॥ ५ ॥

उर्ध्वगत अम्लपित्तामध्यें हिरवें, पिवळें, निळें, काळसर, तांबूस, रक्ताप्रमाणें लाल, अतिशय आंबट, मांस धुतलेल्या पाण्या-प्रमाणें काळसर, तांबूस, अतिशय बुळबुळीत, स्वच्छ, कफमिश्रित, खारट व आंबट अशा अनेक रसांनीं युक्त असें पित्त वांतींत पडतें. खाल्लेलें अन्न पचत असतां घशाशीं जळजळतें. अन्न खाल्लें अगर न खाल्लें तरी एखादे वेळीं आंबट कडवट अशी वांती होते. व तशाच प्रकारचे ढेंकर येतात. हृदय, कंठ व कुशी यांमध्यें दाह होतो अगर डोकें दुखतें.

कफपित्तजन्य अम्लपित्त.

करचरणदाहमौष्ण्यं महतीमरुचिं ज्वरं च कफपित्तम् ।
जनयति कण्डूमण्डलपिटिकाचितगात्ररोगचयम् ॥ ६ ॥

ह्या अम्लपित्तामध्यें कफपित्त हे दोष हातापायांची आग, उष्णता, अरुचि व ज्वर हे विकार उत्पन्न करितात. शिवाय अंगाला कंडू सुटते, गांधी उठतात, अंग पुटकुळ्यांनीं व्याप्त होतें आणि दुसरेही अनेक विकार होतात.

रोगोऽयमम्लपित्ताख्यो यत्नात्संसाध्यते नवः ।
चिरोत्थितो भवेद्याप्यः कष्टसाध्यः स कस्यचित् ॥ ७ ॥

हा अम्लपित्तरोग नवीन असला तर मोठ्या प्रयासानें साध्य होतो. तो फार दिवसांचा झाला तर व्याप्य होतो. तो एखाद्या मनुष्याचा कष्टानें साध्य होतो.

अम्लपित्तांत वातकफांचा संबंध.

सानिलं सानिलकफं सकफं तच्च लक्षयेत् ।
दोषलिङ्गेन मतिमान्भिषङ्मोहकरं हि तत् ॥ ८ ॥

वातयुक्त, वातकफयुक्त, किंवा कफयुक्त असे अम्लपित्ताचे तीन प्रकार आहेत. त्यांची दोषाच्या लक्षणानुसार चांगली परीक्षा करावी. कारण ह्यांच्या ऊर्ध्व व अधोगमनानें ओकारी किंवा अति-सार ह्यांचा भास होऊन वैद्याला भ्रांति उत्पन्न होते.

वाताधिक अम्लपित्ताचें लक्षण.

कम्पप्रलापमूर्छाचिमिचिमिगात्रावसादशूलानि ।
तमसो दर्शनविभ्रमप्रमोहहर्षा अनिलयुते ॥ ९ ॥

अंग कापणें, बडबडणें, मूर्च्छा, अंगांत मुंग्या येणें, अंग गळल्यासारखें होणें, पोटांत दुखणें, डोळ्यापुढें अंधेरी येणें, भ्रांति व अंगावर रोमांच हे विकार वातयुक्त अम्लपित्तामध्यें होतात.

कफाधिक अम्लपित्ताचें लक्षण.

कफनिष्ठीवनगौरवजडतारुचिशीतसादवमिलेपाः ।
दहनबलसादकण्डूनिद्राचिह्नं कफानुगते ॥ १० ॥

कफ पडणें, अंगाला जडत्व, अरुचि, थंडी वाजणें, अंग गळल्यासारखें होणें, ओकारी, कफानें तोंड लेपटल्यासारखें होणें, अग्निमांद्य, अशक्तपणा, अंगाला कंडू व झोप फार येणें हीं लक्षणें कफाधिक अम्लपित्तामध्यें होतात.

वातकफयुक्त अम्लपित्ताचें लक्षण.

उभयमिदमेव चिह्नं मारुतकफसंभवे भवत्यम्ले ।
कट्वम्ललवणरसासेवितकोपं भजत्येव ।
तिक्ताम्लकटुकोद्गारवमिहृत्कण्ठदाहकृत् ॥ ११ ॥

वातजन्य व कफजन्य अम्लपित्ताचीं मिश्र लक्षणें वातकफयुक्त अम्लपित्तामध्यें होतात. हें अम्लपित्त तिखट, आंबट व खारट पदार्थ सेवन केल्यानें प्रकोप पावतें. ह्यामध्यें कडू, आंबट व तिखट असे ढेकर येतात, ओकारी येते आणि छातींत व घशांत जळजळतें.

कफपित्तयुक्त अम्लपित्ताचें लक्षण.

भ्रमो मूर्छाऽरुचिच्छर्दिरालस्यं च शिरोरुजा ।
प्रसेको मुखमाधुर्यं श्लेष्मपित्तस्य लक्षणम् ॥ १२ ॥

भ्रम, मूर्च्छा, अरुचि, ओकारी, आळस, मस्तक दुखणें, मळमळणें व तोंड गुळमट असणें हें कफपित्ताधिक अम्लपित्ताचें लक्षण आहे.

अम्लपित्ताची चिकित्सा.

अम्लपित्ते तु वमनं पटोलारिष्टवारिणा ।
कारयेन्मदनक्षौद्रसिन्धुयुक्तं ततो भिषक् ।
विरेचनं त्रिवृच्चूर्णं मधुना त्रिफलाद्रवैः ॥ १ ॥
कृतवमनविरेकस्यापि दोषोपशान्ति-
र्भवति न यदि कार्यो रक्तमोक्षश्च युक्त्या ।

कृतशिशिरविलेपस्याम्लपित्तघ्नभक्ष्यौ-
दनसमुदिततृप्तेर्वातरक्षा च कार्या ॥ २॥

अम्लपित्तावर प्रथम कडू पडवळ व बाळंतनिंबाची साल ह्यांच्या काढ्यांत गेळफळाचें चूर्ण, मध व सैंधेलोण घालून वमन करवावें. नंतर हिरडा, बेहडा, आवळकाठी यांच्या काढ्यांत नळीच्या तेलाचें चूर्ण घालून रेचक द्यावें. ह्याप्रमाणें वमन व विरेचन देऊनही जर दोषांचें शमन झालें नाहीं, तर युक्तीनें रक्त काढावें. आणि त्याच्या अंगाला थंडगार लेप करून अम्लपित्तनाशक असे खाण्याचे पदार्थ व अन्न पथ्यास घालावें. आणि त्याचा वात वाढूं देऊं नये.

लक्ष्मणोत्सवांतील चिकित्सा.

ज्वलन्तमिव चाऽऽत्मानं मन्यते योऽम्लपित्तवान्।
तस्य संशोधनं पूर्वं कार्यं पश्चाच्च भेषजम् ॥ १ ॥
पूर्वं तु वमनं कार्यं पश्चान्मृदु विरेचनम्।
कृतवान्तिविरेकस्य सुस्निग्धस्यानुवासनम् ॥ २ ॥
आस्थापनं चिरोत्थेऽस्मिन्देयं दोषाद्यपेक्षया।
दोषसंसर्गजे कार्यमौषधाहारकल्पनम् ॥ ३ ॥

ज्या अम्लपित्ताच्या रोग्याच्या अंगाचा अतिशय दाह होतो, त्याला प्रथम शोधन देऊन नंतर औषध द्यावें. शोधन देतांना प्रथम वमन द्यावें व नंतर रेचक द्यावें. वमनविरेचन झाल्यानंतर त्याला स्नेहन देऊन अनुवासन बस्ती द्यावा. फार दिवसाचें अम्लपित्त असेल तर दोषांच्या अनुरोधानें निरूह बस्ती द्यावा. द्वंद्वज अम्लपित्तावर योग्य औषध व आहार ह्यांची योजना करावी.

ऊर्ध्वदेहस्थितं वान्त्याऽप्यधःस्थं रेचनैर्हरेत्।
पाचनं तिक्तबहुलं पथ्यं च परिकल्पयेत् ॥ ४ ॥
विकारान्यवगोधूमकृतांस्तीक्ष्णविवर्जितान्।
भक्षयेल्लाजसक्तूंश्च सिताक्षौद्रयुतान्पिबेत् ॥ ५ ॥

ऊर्ध्वगामी अम्लपित्त वांतीनें व अधोगामी अम्लपित्त रेचनानें जिंकावें. ज्यामध्यें कडू पदार्थ पुष्कळ आहेत अशा प्रकारचें पाचक पथ्य योजावें. सातू व गहू यांचीं अनेक पक्वान्नें तिखट न घालतां करून खावीं. लाह्यांचें पीठ खडीसाखर व मध घालून खावें.

वृंदांतील चिकित्सा.

अम्लपित्ते प्रयोक्तव्यः कफपित्तहरो विधिः।
गुडकूष्माण्डकं चैव तथा खण्डामलक्यपि ॥ १ ॥
गुडक्षीरकणासिद्धं सर्पिरत्र प्रयोजयेत्।
सवाते सविबन्धेऽस्मिन्हिता कंसहरीतकी ॥ २ ॥

अम्लपित्तावर कफपित्तनाशक योजना करावी. गूळ व कोहाळा (किंवा गुडकूष्मांडलेह) आणि खडीसाखर व आवळकाठी (किंवा खंडामलकलेह) योजावा. गूळ, दूध व पिंपळी ह्यांनीं सिद्ध केलेलें तूप योजावें. वातयुक्त व मलावरोधयुक्त अम्लपित्तावर कंसहरीतकी योजावी.

काढे.

यवकृष्णापटोलानां क्वाथं क्षौद्रयुतं पिबेत्।
नाशयेदम्लपित्तं च ह्यरुचिं च वमिं तथा ॥ १ ॥

सातू, पिंपळी व पडवळ ह्यांचा काढा मध घालून प्यावा. तो अम्लपित्त, अरुचि व वांति ह्यांचा नाश करतो.

निस्तुषयववृषधात्रीक्वाथं त्रिसुगन्धिमधुयुतं पीत्वा।
अपहरति चाम्लपित्तं यदि भुङ्क्ते मुद्गयूषेण ॥ २ ॥

निस्तुष (कोंडा काढून टाकलेले) सातू, अडुळसा व आवळकाठी ह्यांचा काढा दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे ह्यांचें चूर्ण घालून व मध मिसळून प्यावा आणि त्याजवर मुगाच्या कढणाशीं जेवावें. म्हणजे अम्लपित्ताचा नाश होतो.

गुडूचीचित्रकारिष्टपटोलैः क्वथितं पिबेत्।
क्षौद्रयुक्तं निहन्त्येतच्छर्दिं पित्ताम्लसंभवाम् ॥ ३ ॥

गुळवेल, चित्रकमूळ, कडुनिंबाची साल व पडवळ ह्यांचा काढा मध घालून प्यावा. तो अम्लपित्तजन्य ओकारीचा नाश करतो.

भूनिम्बनिम्बत्रिफलापटोलवासामृतापर्पटमार्कवाणाम्।
क्वाथो हरेत्क्षौद्रयुतोऽम्लपित्तं चित्तं यथा वारवधूकटाक्षः ॥ ४ ॥

काडेचिराईत, बाळंतनिंबाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पडवळ, अडुळसा, गुळवेल, पित्तपापडा व माका ह्यांचा काढा मध घालून द्यावा. ज्याप्रमाणें वारांगनांचा नेत्रकटाक्ष

कामी जनांचे चित्तार्चे हरण करतो, त्याप्रमाणें तो अम्लपित्तार्चे हरण करतो.

पटोलत्रिफलानिम्बक्वाथं क्षौद्रयुतं पिबेत् ।
अम्लपित्तं हरेच्छर्दिदाहशूलकफान्वितम् ॥ ५ ॥

पडवळ, हिरडा, बेहडा व आवळकाठी आणि कडुनिंबाची साल ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो ओकारी, दाह, शूळ व कफ ह्यांसह अम्लपित्ताचा नाश करतो.

कण्टकार्यमृतावासाकषायं मधुसंयुतम् ।
अम्लपित्तं जयेत्पीत्वा श्वासं कासं वमिं ज्वरम् ॥ ६ ॥

रिंगणमूळ व गुळवेल ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो श्वास, खोकला, ओकारी, व ज्वर ह्यांसह अम्लपित्ताचा नाश करतो.

चित्रकैरण्डमूलानि यवाश्च सयवासकाः ।
जलेन क्वथितं पीतं कोष्ठदाहाम्लपित्तजित् ॥ ७ ॥

चित्रकमूळ, एरंडमूळ, सातू, व धमासा ह्यांचा काढा कोठ्यांतील दाह व अम्लपित्त ह्यांना जिंकतो.

एलादि चूर्ण.

एलातुगाचोचशिवाभयानां सग्रन्थिपाटीरदलाह्लकानाम् ।
चूर्णं सितातुल्यमपाकरोति प्रौढाम्लपित्तं दिवसास्यभुक्तम् १

वेलदोडे, वंशलोचन, दालचिनी, आवळकाठी, हिरडे, पिंपळमूळ, चंदन, तमालपत्र व धने ह्यांचें समभाग चूर्ण साखर घालून प्रातःकाळीं घेतलें असतां वाढलेल्या अम्लपित्ताचा नाश करितें.

त्रिकटुकादि चूर्ण व लेह.

त्रिकटुकसकण्टकारीपर्पटवारिकुटजबीजानाम् ।
सौराष्ट्रिकापटोलीत्रायन्तीदारुमूर्वाणाम् ॥ १ ॥
तिक्तामृणालमलयजकलिङ्गकेलाकिराततिक्तानाम् ।
सवचातिविषाकेसरदीप्यकमधुशिग्रुबीजानाम् ॥ २ ॥
चूर्णं पटघृष्टमिदं पीतं शिशिरेण वारिणा प्रातः ।
क्षौद्रेण चाथ लीढं प्रायेणाधोगतं हन्ति ।
अतिविषममम्लपित्तं पथ्यभुजो वासरैः कैश्चित् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, रिंगणमूळ, पित्तपापडा, वाळा, इंद्रजव, तुरटी, पडवळ, त्रायमाण, देवदार, मोरवेल, कुटकी, कमळ, चंदन,

इंद्रजव, वेलदोडे, काडेचिराईत, वेखंड, अतिविष, नाकेशर, ओवा, व गोडया शेवग्याचें वीं ह्या औषधांचें समभाग चूर्ण करून तें वस्त्रगाळ करून प्रातःकाळीं थंड पाण्यांतून द्यावें. हें मधाशीं घेतलें असतां बहुतेक अधोगत अम्लपित्ताचा नाश करितें; आणि असेंच इ कांहीं दिवस घेतलें असतां कष्टसाध्य अशा अम्लपित्ताचाही नाश करितें.

द्राक्षादि गुटिका.

द्राक्षापथ्ये समे कृत्वा तयोस्तुल्यां सितां क्षिपेत् ।
संकुट्याक्षद्वयमितां तत्पिण्डीं कारयेद्भिषक् ॥ १ ॥
तां खादेदम्लपित्तार्तो हृत्कण्ठदहनापहाम् ।
तृण्मूर्छाभ्रममन्दाग्निनाशिनीमामवातहाम् ॥ २ ॥

मनुका व हिरडेदळ समभाग आणि दोहोंच्या समान खडीसाखर हीं औषधें एकत्र कुटून दोन तोळ्यांची गोळी करावी आणि ती अम्लपित्ताच्या रोग्यानें खावी. ती छातींतील व घशांतील जळजळ दूर करिते. त्याचप्रमाणें तहान, मूर्च्छा, घेरी, अग्निमांद्य, व आमवात ह्यांचाही ती नाश करिते.

अभयादि अवलेह.

अभया पिप्पली द्राक्षा सिता धन्वयवासकम् ।
मधुना कण्ठहृद्दाहमूर्छाश्लेष्माम्लपित्तनुत् ॥ १ ॥

हिरडेदळ, पिंपळी, द्राक्षें, खडीसाखर व धमासा, ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटावें. तें घसा व छाती ह्यांमधील दाह, मूर्च्छा, कफ व अम्लपित्त ह्यांचा नाश करितें.

योगरत्नावलींतील खंडपिप्पलीलेह.

पिप्पल्याः कुडवं चूर्णं घृतस्य कुडवद्वयम् ।
पलषोडशकं खण्डाच्छतावर्याः पलाष्टकम् ॥ १ ॥
शिवायाः स्वरसस्यापि पलषोडशकं मतम् ।
क्षीरप्रस्थद्वये साध्ये लेहीभूतेऽत्र निक्षिपेत् ॥ २ ॥
त्रिजातकाभयाजाजीधान्यमुस्तशिवातुगाः ।
एतेषां कार्षिकं चूर्णं कर्षार्धं कृष्णजीरकम् ॥ ३ ॥
नागरं नागकं जातीफलं समरिचं हिमम् ।
दत्वा पलत्रयं क्षौद्रं स्निग्धभाण्डे विनिक्षिपेत् ॥ ४ ॥

प्रातर्यथाबलं लिह्यादम्लपित्तप्रशान्तये ।
हृल्लासारोचकच्छर्दिपिपासादाहनाशनम्
शूलहृद्रोगशमनं हृद्यं चेदं रसायनम् ॥ ५ ॥

पिंपळीचें चूर्ण सोळा तोळे, तूप बत्तीस तोळे, खडीसाखर चौसष्ट तोळे, शतावरी बत्तीस तोळे, आवळ्याचा रस चौसष्ट तोळे आणि दूध एकशें अठ्ठावीस तोळे ह्यांचा लेहासारखा पाक करावा. नंतर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलची, हिरडे, जिरें, धने, नागरमोथे, आवळकठी व वंशलोचन ह्या औषधांचें चूर्ण एकएक तोळा; शहाजिरें, सुंठ, नाकेशर, जायफळ, मिरीं व वाळा ह्यांचें चूर्ण अर्धा अर्धा तोळा आणि मध बारा तोळे घालून तो तुपानें रावलेल्या भांड्यांत भरून ठेवावा; आणि अम्लपित्ताची शांति होण्याकरितां रोज सकाळीं शक्तिमानाप्रमाणें सेवन करावा. म्हणजे मळमळ, अरुचि, ओकारी, तहान, दाह, शूळ व हृद्रोग ह्यांचा नाश होतो; हा लेह हृद्य व रसायन आहे.

नारिकेलखंडपाक.

कुडवमितमिह स्यान्नारिकेलं सुपिष्टं
पलपरिमितसर्पिःपाचितं तुल्यखण्डम् ।
निजपयसि तदेतत्प्रस्थमात्रे विपक्वं
कुडवमथ सुशीते शाणमात्रं क्षिपेच्च ॥ १ ॥
धान्याकपिप्पलिपयोदतुगाद्विजीरैः
साकं त्रिजातमिभकेसरवाह्निचूर्ण्यं ।
हन्त्यम्लपित्तमरुचिं क्षयमस्रपित्तं
शूलं वमिं सकलपौरुषकारि पुंसाम् ॥ २ ॥

वाटलेला नारळ (ओलें खोबरें) सोळा तोळे घेऊन तो चार तोळे तुपांत तळून काढावा. नंतर सोळा तोळे खडीसाखरेचा नारळाच्या सोळा तोळे दुधांत पाक करावा. आणि त्यांत धने, पिंपळी, नागरमोथे, वंशलोचन, जिरें, शहाजिरे, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे व नाकेशर ह्या औषधांचें चूर्ण तीन तीन मासे घालून ठेवावा. हा नारिकेलखंडपाक अम्लपित्त, अरुचि, क्षय, रक्तपित्त, शूळ, व ओकारी ह्यांचा नाश करतो व सामर्थ्य वाढवितो.

गुडादि मोदक.

गुडपिप्पलिपथ्याभिस्तुल्याभिर्मोदकः कृतः ।
पित्तश्लेष्महरः प्रोक्तो मन्दाग्नित्वं च नाशयेत् ॥ १ ॥

गूळ, पिंपळी व हिरडे हीं समभाग घेऊन त्याच्या गोळ्या कराव्या. ह्या कफपित्त व अग्निमांद्य ह्यांचा नाश करितात.

खंडकूष्मांडपाक.

कूष्माण्डस्य रसो ग्राह्यः पलानां शतमात्रकः ।
रसतुल्यं गवां क्षीरं धात्रीचूर्णं पलाष्टकम् ॥ १ ॥
लघ्वग्निना पचेत्तावद्यावद्भवति पिण्डितम् ।
धात्रीतुल्या सिता योज्या पलार्धं लेहयेदनु ।
खण्डकूष्माण्डकं ख्यातमम्लपित्तं नियच्छति ॥ २ ॥

कोहाळ्याचा रस चारशें तोळे, गाईचें दूध चारशें तोळे, आवळकठीचें चूर्ण बत्तीस तोळे ह्या सर्वांचें मिश्रण करून चुलीवर ठेवून मंदाग्नीवर खव्याप्रमाणें घट्ट होईपर्यंत शिजवावें. नंतर त्यांत बत्तिस तोळे खडीसाखर घालून तो रोज दोन दोन तोळेप्रमाणें सेवन करावा. हा खंडकूष्मांड नांवाचा पाक अम्लपित्ताचा नाश करितो.

मधुपिप्पलीयोग.

पिप्पली मधुसंयुक्ता अम्लपित्तविनाशिनी ।
जम्बीरस्वरसः पीतः सायं हन्त्यम्लपित्तकम् ॥ १ ॥

पिंपळी मधाशीं घ्यावी; ती अम्लपित्ताचा नाश करिते. अथवा संध्याकाळीं लिंबाचा रस घ्यावा, तोही अम्लपित्ताचा नाश करतो.

पिप्पलीघृत.

पिप्पलीक्वाथकल्केन घृतं सिद्धं मधुप्लुतम् ।
पिबेत्प्रातः समुत्थाय अम्लपित्तनिवृत्तये ॥ १ ॥

पिंपळीच्या काढ्यांत तूप सिद्ध करून तें अम्लपित्ताचा नाश होण्याकरितां मधाशीं घ्यावें.

द्राक्षादि घृत.

द्राक्षाभयाशक्रपटोलपत्रैः सोशीरधात्रीयवचन्दनैश्च ।
त्रायन्तिकापद्मकिरातधान्यैः कल्कैः पचेत्सर्पिरुपेतमेभिः ॥ १ ॥
भुञ्जीत मात्रां सह भोजनेन सर्वं तु पाने ह्यमृतोपमं च ॥ २ ॥

द्राक्षें, हिरडे, इंद्रजव, पडवळाचीं पानें, वाळा, आवळकठी,

सातू, चंदन, त्रायमाण, पद्मकाष्ठ, काडेचिराईत व धने ह्या औषधांच्या कल्कानें तूप सिद्ध करावें, आणि तें जेवतांना खावें. ह्याजवर कांहींही खाल्लें तरी तें अमृताप्रमाणें गुणकारकच होतें.

शतावरीघृत.

शतावरीमूलकल्के घृतं प्रस्थं पयः समम् ।
पचेन्मृद्वग्निना सम्यक्क्षीरं दत्वा चतुर्गुणम् ॥ १ ॥
नाशयेदम्लपित्तं च वातपित्तोद्भवान्गदान् ।
रक्तपित्तं तृषां मूर्छां श्वासं संतापमेव च ॥ २ ॥

शतावरीच्या मुळांच्या कल्कामध्यें चौसष्ट तोळे तूप व तुपाबरोबरीनें शतावरीचा रस आणि तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें तें अम्लपित्त व वातपित्तजन्य रोग ह्यांचा नाश करितें. त्याचप्रमाणें रक्तपित्त, तहान, मूर्च्छा, श्वास व दाह ह्यांचा नाश करितें.

नारायणघृत.

जले दशगुणे काथ्यं पिप्पलीनां पलाष्टकम् ।
पादशेषं हरेत्काथं काथतुल्यं घृतं क्षिपेत् ॥ १ ॥
अम्लपित्तहरं श्रेष्ठं घृतं नारायणं महत् ।

बत्तीस तोळे पिंपळीचा दसपट पाण्यांत चतुर्थांश काढा करावा, आणि त्या काढ्यांत काढ्यासमान तूप घालून तें सिद्ध करावें. हें नारायणघृत अम्लपित्ताच्या नाशाविषयीं फार उत्तम आहे.

गुडक्षीरकणासिद्धं सर्पिश्चात्रापि योजयेत् ॥ २ ॥

गूळ, दूध व पिंपळी ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप देखील ह्या अम्लपित्तावर योजावें.

रसायनें;—लीलाविलास रस.

शुद्धसूतं समं गन्धं मृतताम्राभ्ररोचनम् ।
तुल्यांशं मर्दयेद्यामं रुद्ध्वा लघुपुटे पचेत् ॥ १ ॥
अक्षधात्रीहरीतकीः क्रमवृद्ध्या विपाचयेत् ।
जलेनाष्टगुणेनैव ग्राह्यमष्टावशेषकम् ॥ २ ॥
अनेन भावयेत्पूर्वं पक्वसूतं पुनः पुनः ।
पञ्चविंशतिवारं च तावता भृङ्गजद्रवैः ॥ ३ ॥
शुष्कं तच्चूर्णितं खादेत्पञ्चगुञ्जमधुप्लुतम् ।
रसो लीलाविलासोऽयमम्लपित्तं नियच्छति ॥ ४ ॥

शुद्ध पारा, गंधक, ताम्रभस्म, अभ्रकभस्म व वंशलोचन किंवा गोरोचन हीं औषधें समभाग घेऊन एक प्रहरभर खलून गाडग्यांत घालून त्याचें तोंड बंद करून गजपुट द्यावें. नंतर बेहडे, आवळकाठी व हिरडे हे एक, दोन, तीन अशा प्रमाणांत घेऊन त्यांचा आठपट पाण्यांत अष्टमांश काढा करून त्या काढ्याच्या त्या रसायनाला पंचवीस भावना द्याव्या. नंतर माक्याच्या रसाच्या पंचवीस भावना द्याव्या. शुष्क झाल्यावर हा पांच गुंजांप्रमाणें मधाशीं द्यावा. हा लीलाविलास नांवाचा रस अम्लपित्ताचा नाश करतो.

रसामृत.

त्रिकटु त्रिफला मुस्ता विडङ्गश्चित्रकं तथा ।
एषां संचूर्णितानां तु प्रत्येकं तु पलं भवेत् ॥ १ ॥
कर्षद्वयं गन्धकस्य तदर्धं पारदस्य च ।
बिडालपदमात्रं तु लिह्यात्तन्मधुसर्पिषा ॥ २ ॥
शीतोदकं चानु पिबेत्क्रमाद्गव्यं पयस्तथा ।
अम्लपित्तमग्निमान्द्यं परिणामरुजं तथा ।
कामलां पाण्डुरोगं च हन्यादेतद्रसामृतम् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकठी, नागरमोथे, वावडिंग व चित्रक हीं औषधें चार चार तोळे; शुद्ध गंधक दोन तोळे व शुद्ध पारा एक तोळा, ह्या सर्वांचा खल करून एक तोळा प्रमाणें तूप व मधाशीं द्यावें. व त्याजवर थंड पाणी किंवा गाईचें दूध प्यावें. म्हणजे अम्लपित्त, अग्निमांद्य, परिणामशूळ, कावीळ व पांडुरोग ह्यांचा हा रसामृतयोग नाश करतो.

सूतशेखर रस.

शुद्धं सूतं मृतं स्वर्णं टङ्कणं वत्सनागकम् ।
व्योषमुन्मत्तबीजं च गन्धकं ताम्रभस्मकम् ॥ १ ॥
चातुर्जातं शङ्खभस्म बिल्वमज्जा कचोरकम् ।
सर्वं समं क्षिपेत्खल्वे मर्द्यं भृङ्गरसैर्दिनम् ॥ २ ॥
गुञ्जामात्रां वटीं कृत्वा द्विगुञ्जे मधुसर्पिषी ।
भक्षयेदम्लपित्तघ्नो वान्तिशूलामयापहः ॥ ३ ॥
पञ्च गुल्मान्पञ्च कासान्ग्रहण्यामयनाशनः ।
त्रिदोषोत्थातिसारघ्नः श्वासमन्दाग्निनाशनः ॥ ४ ॥

उग्रहिकामुदावर्तं देहयाप्यगदापहः ।
मण्डलान्नात्र संदेहः सर्वरोगहरः परः ।
राजयक्ष्महरः साक्षाद्रसोऽयं सूतशेखरः ॥ ५ ॥

शुद्ध पारा, सुवर्णभस्म, टाकणखाराची लाही, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, धोतऱ्याचें बीं, गंधक, ताम्रभस्म, दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर, शंखभस्म, बेलफळांतील गर व कचोरा ह्या सर्वांचा माक्याच्या रसांत एक दिवस खल करावा, आणि एक एक गुंजेच्या गोळ्या करून एक एक गोळी दोन गुंजा तूप व मध ह्यांतून द्यावी. ही अम्लपित्तनाशक असून वांति व शूळ ह्यांचा नाश करिते. त्याचप्रमाणें पांच प्रकारचे गुल्म, पांच प्रकारचे खोकले, संग्रहणी, त्रिदोषजन्य अतिसार, श्वास, अग्निमांद्य, उग्र अशी उचकी व उदावर्त, वगैरे याप्य असे शारीरिक रोग ह्यांचा नाश करिते. हा रस एक मंडळ (बेचाळीस दिवस) सेवन केला असतां सर्व रोगांचा नाश करतो. हा सूतशेखर रस साक्षात् राजयक्ष्म्याचा नाश करितो.

पथ्यापथ्य.

यवगोधूममुद्गाश्च पुराणा रक्तशालयः ।
जलानि तप्तशीतानि शर्करा मधु सक्तवः ॥ १ ॥
कर्कोटकं कारवेल्लं रम्भापुष्पं च वास्तुकम् ।
वेत्राग्रं वृद्धकूष्माण्डं पटोलं दाडिमं तथा ॥ २ ॥
पानान्नानि समस्तानि कफपित्तहराणि च ।
अम्लपित्तामये नित्यं सेवितव्यानि मानवैः ॥ ३ ॥

जव, गहूं, मूग, जुनी तामसाळ, तापवून गार केलेलें पाणी, साखर, मध, सातू, कर्टोली, कारलीं, केळफूल, चंदनबटवा, वेताचे कोंब, पिकलेला कोहाळा, पडवळ, डाळिंब आणि कफपित्तनाशक सर्व अन्नपानें हे पदार्थ नित्य अम्लपित्तावर सेवन करावे.

वमिवेगं तिलान्माषान्कुलत्थांस्तिलभक्षणम् ।
अविदुग्धं च धान्याम्लं लवणाम्लकटूनि च ।
गुर्वन्नं दधि मद्यं च वर्जयेदम्लपित्तवान् ॥ ४ ॥

वांतीचा वेग धारण करणें, तीळ, उडीद, हुलगे, तिळाचे

पदार्थ, मेंढीचें दूध, कांजी, मीठ, आंबट पदार्थ, तिखट पदार्थ, जड अन्न, दहीं व मद्य हे पदार्थ अम्लपित्ताच्या रोग्यानें वर्ज करावे.

विसर्पनिदान.

लवणाम्लकटूष्णादिसंसेवादोषकोपतः ।
विसर्पः सप्तधा ज्ञेयः सर्वतः परिसर्पणात् ॥ १ ॥

खारट, आंबट व उष्ण इत्यादि पदार्थांचें सतत सेवन केलें असतां वातादि दोषांचा प्रकोप होऊन सात प्रकारचा विसर्प होतो. हा सर्वत्र पसरतो, म्हणुन ह्याला विसर्प असें म्हणतात.

त्यांची संख्या.

वातिकः पैत्तिकश्चैव कफजः सांनिपातिकः ।
चत्वार एते वीसर्पा वक्ष्यन्ते द्वंद्वजास्त्रयः ॥ २ ॥
आग्नेयो वातपित्ताभ्यां ग्रन्थ्याख्यः कफवातजः ।
यस्तु कर्दमको घोरः स पित्तकफसंभवः ॥ ३ ॥

वातजन्य, पित्तजन्य, कफजन्य व सन्निपातजन्य हे चार; आणि द्वंद्वज तीन, म्हणजे वातपित्तापासून अग्निविसर्प, कफवातापासून ग्रंथिविसर्प आणि कफपित्तापासून घोर असा कर्दमविसर्प, असे एकंदर सात विसर्प आहेत.

रक्तं लसीका त्वङ्मांसं दूष्यं दोषास्त्रयो मलाः ।
विसर्पाणां समुत्पत्तौ विज्ञेयाः सप्त धातवः ॥ ४ ॥

रक्त, लस, त्वचा, मांस हीं चार दूष्यें व वातादि तीन दोष हे सात धातु विसर्पाच्या उत्पत्तीला कारण आहेत.

वातिक विसर्प.

तत्र वातात्परीसर्पो वातज्वरसमव्यथः ।
शोफस्फुरणनिस्तोदभेदायामार्तिहर्षवान् ॥ ५ ॥

वातजन्य विसर्पामध्यें वातज्वराप्रमाणें पीडा होते. शिवाय सूज, अंग स्फुरणें, टोचणी, अंग फुटल्याप्रमाणें वाटणें, थकवा व अंगावर रोमांच येणें हीं लक्षणें होतात.

पित्तज विसर्प.

पित्ताद्द्रुतगतिः पित्तज्वरलिङ्गोऽतिलोहितः ।

पित्तजन्य विसर्प जलद पसरणारा असून त्यांत पित्तज्वराचीं सर्व लक्षणें व लाली हीं असतात.

कफज विसर्प.

कफात्कण्डूयुतः स्निग्धः कफज्वरसमानरुक् ॥ ६ ॥

कफापासून होणारा विसर्प कंडुयुक्त, स्निग्ध व कफज्वराच्या लक्षणांनीं युक्त असा असतो.

सन्निपातिक विसर्प.

संनिपातसमुत्थश्च सर्वलिङ्गसमन्वितः ।

सान्निपातिक विसर्पामध्यें सर्व दोषांचीं लक्षणें होतात.

स चात्रान्तर्बहिर्भेदाद्विसर्पः पठितो द्विधा ॥ ७ ॥

हा विसर्प आंतील व बाहेरील अशा भेदानें दोन प्रकारचा आहे.

मर्मोपतापात्संमोहादयनानां विघट्टनात् ।
तृष्णादियोगाद्वेगानां विषमं च प्रवर्तनात् ॥ ८ ॥
विद्याद्विसर्पमन्तर्जमाशु चाग्निबलक्षयात् ।
अतो विसर्पणाद्बाह्यमन्यं विद्यात्सुलक्षणैः ॥ ९ ॥

मर्मस्थानीं आघात होणें, मूर्च्छा, नाक, कान वगैरे द्वारांचें स्फुरण, तहान, मलमूत्राचे विषम वेग येणें आणि जठराग्नि एकदम मंद होणें, हीं लक्षणें झालीं असतां अंतर्गत विसर्प आहे म्हणून समजावें. ह्याच्या उलट लक्षणें बाह्य विसर्पामध्यें असतात. तीं त्या त्या दोषांच्या लक्षणावरून जाणावीं.

द्वंद्वज विसर्प.

वातपित्ताज्ज्वरच्छर्दिमूर्छातीसारतृड्भ्रमैः ।
अस्थिभेदाग्निसदनतमकारोचकैर्युतः ॥ १० ॥
करोति सर्वमङ्गं च दीप्ताङ्गारावकीर्णवत् ।
यं यं देशं विसर्पश्च विसर्पति भवेत्स सः ॥ ११ ॥
शांताङ्गारासितो नीलो रक्तो वाऽऽशु च चीयते ।
अग्निदग्ध इव स्फोटैः शीघ्रगत्वाद् द्रुतं च सः ॥ १२ ॥
मर्मानुसारी वीसर्पः स्याद्वातोऽतिबलस्ततः ।
व्यथेताङ्गं हरेत्संज्ञां निद्रां च श्वासमीरयेत् ॥ १३ ॥
हिध्मां च स गतोऽवस्थामीदृशीं लभते न ना ।
क्वचिच्छर्मारतिग्रस्तो भूमिशय्यासनादिषु ॥ १४ ॥

चेष्टमानस्ततः क्लिष्टो मनोदेहश्रमोद्भवाम् ।
दुष्प्रबोधोऽश्नुते निद्रां सोऽग्निर्वीसर्प उच्यते ॥ १५ ॥

वातपित्तापासून होणाऱ्या विसर्पामध्यें ज्वर, ओकारी, मूर्च्छा, अतिसार, तहान, घेरी येणें, हाडें फुटल्यासारखीं वाटणें, अग्निमांद्य, डोळ्यापुढें अंधेरी, व अरुचि हीं लक्षणें होतात. सर्व अंगावर निखारे पसरल्याप्रमाणें वाटतें. ज्या ज्या ठिकाणीं विसर्प पसरेल ती ती जागा विझलेल्या कोळशाप्रमाणें काळी, निळी, किंवा तांबडी होते. त्या ठिकाणीं त्वरित सूज येते. अग्नीनें भाजल्या-प्रमाणें त्याजवर फोड येतात. हा शीघ्रगति असल्यामुळें त्वरित हृदयादि मर्माला जाऊन भिडतो. त्यामुळें वातदोष अतिशय बलवान होऊन सर्व अंगामध्यें व्यथा उत्पन्न करतो. बेशुद्धपणा आणतो. झोप नाहींशी करतो. श्वास उत्पन्न करतो. उचकी आणतो. त्यामुळें त्याला किंचित्देखील सुख वाटत नाहीं. जमीन, बिछाना, बैठक इत्यादि ठिकाणीं अगर कोठेंही त्याला समाधानी वाटत नाहीं. त्यामुळें धडपडत असतां त्याला फार क्लेश होतात. मन व शरीर ह्यांच्या अत्यंत श्रमामुळें जागें होण्याला अत्यंत कठीण अशी काळनिद्रा त्याला लागते. ह्या विसर्पाला अग्निविसर्प असें म्हणतात.

कफवातजन्य ग्रंथिविसर्प.

कफेन रुद्धः पवनो भित्त्वा तं बहुधा कफम् ।
रक्तं वा वृद्धरक्तस्य त्वक्शिरास्नायुमांसगम् ॥ १६ ॥
दूषयित्वा च दीर्घाणुवृत्तस्थूलखरात्मनाम् ।
ग्रन्थीनां कुरुते मालां रक्तानां तीव्ररुग्जराम् ॥ १७ ॥
श्वासकासास्यवैरस्यशोषहिध्मावमिभ्रमैः ।
मोहवैवर्ण्यमूर्छाङ्गभङ्गाग्निसदनैर्युताम् ॥ १८ ॥
इत्ययं ग्रन्थिवीसर्पः कफमारुतकोपजः ॥

कफानें मार्ग अडवून धरल्यामुळें कोंडून राहिलेला वायु त्या कफा-चा किंवा वाढलेल्या रक्ताचा भेद करून त्वचा, शिरा, स्नायु, व मांस ह्यांमध्यें शिरून त्यांना दूषित करून लांबट, बारीक, वाटोळ्या, मोठ्या, कठीण व तांबूस अशा गाठींच्या माळा उत्पन्न करतो. त्यांत तीव्र वेदना असतात आणि अतिशय ज्वर असतो. शिवाय श्वास,

खोकला, तोंडाला बेचवपणा, शोष, उचकी, ओकारी, भ्रम, अंगाचा रंग बदलणें, मूर्च्छा, अंग मोडून येणें, व अग्निमांद्य हीं लक्षणें होतात. या कफवातजन्य विसर्पाला ग्रंथिविसर्प असें म्हणतात.

कफपित्तजन्य कर्दमविसर्प.

कफपित्ताज्ज्वरः स्तम्भो निद्रा तंद्रा शिरोरुजा ॥ १९ ॥
अङ्गावसादविक्षेपप्रलापारोचकभ्रमाः ।
मूर्छाग्निहानिर्भेदोऽस्थ्नां पिपासेन्द्रियगौरवम् ॥ २० ॥
आमोपवेशनं लेपः स्रोतसां स च सर्पति ।
प्रायेणाऽऽमाशयं गृह्णन्नेकदेशं न चातिरुक् ॥ २१ ॥
पिटकैरवकीर्णोऽतिपीतलोहितपाण्डुरैः ।
स्निग्धोऽसितो मेचकाभो मलिनः शोथवान्गुरुः ॥ २२ ॥
गम्भीरपाकः प्राज्योष्मा स्पृष्टः क्लिन्नोऽवदीर्यते ।
पङ्कवच्छीर्णमांसश्च स्पष्टस्नायुशिरागणः ॥ २३ ॥
शवगन्धिः स वीसर्पः कर्दमाख्यमुशन्ति तम् ।
अग्निकर्दमको घोरः स पित्तकफसंभवः ॥ २४ ॥

कफपित्तजन्य कर्दमविसर्पामध्यें ज्वर, अंग ताठणें, झोप, डोळ्यांवर झडप, डोकें दुखणें, अंग गळणें, हातपाय इकडे तिकडे टाकणें, बडबड, अरुचि, घेरी येणें, मूर्च्छा, अग्निमांद्य, हाडें फुटल्यासारखें वाटणें, तहान, इंद्रियांना जडत्व, मळाबरोबर आमांश पडणें, आणि स्रोतसें कफानें लेपटणें हीं लक्षणें होतात. हा विसर्प बहुधा आमाशयाच्या आश्रयानें एक बाजू व्यापतो. ह्यामध्यें वेदना फार नसतात. विसर्पाच्या जागीं अतिशय पिवळ्या, तांबड्या, किंवा पांढऱ्या पुटकुळ्या उठतात. हा विसर्प स्निग्ध, शाईसारखा काळा, मळीण, सुजलेला, आणि जड किंवा मोठा असतो. हा आंतून पिकलेला असतो. व फार धगधगीत असतो. त्याला स्पर्श केला असतां तो ओलसर लागतो आणि चिघळतो. त्याचें मांस चिखलाप्रमाणें कुजून गळूं लागतें. त्यांतील शिरा व स्नायु स्पष्ट दिसूं लागतात आणि त्याला शवाप्रमाणें घाण येते. याला कर्दमविसर्प असें म्हणतात. हा कफपित्तापासून होणारा अग्निकर्दम नांवाचा विसर्प फार भयंकर आहे.

क्षतज विसर्प.

बाह्यहेतोः क्षतात्क्रुद्धः सरक्तं पित्तमीरयेत् ।
विसर्पं मारुतः कुर्यात्कुलत्थसदृशैश्चितम् ।
स्फोटैः शोथज्वररुजादाहाढ्यं श्यावलोहितम् ॥ २५ ॥

शस्त्रादिकांच्या आघातादि बाह्य कारणांनीं कुपित झालेला व्रणाश्रित वायु रक्तासह पित्ताला घेऊन व्रणामध्यें विसर्प उत्पन्न करतो. त्यामुळें त्याजवर हुलग्याप्रमाणें फोड येतात, सूज येते; आणि ज्वर, ठणका व दाह हीं लक्षणें होतात. ह्यांतील रक्त काळें होतें. ह्याला क्षतज विसर्प असें म्हणतात.

विसर्पाचे उपद्रव.

ज्वरातिसारवमथुत्वङ्मांसदरणक्लमाः ।
अरोचकाविपाकौ च विसर्पाणामुपद्रवाः ॥ २६ ॥

ज्वर, अतिसार, ओकारी, विसर्पाची त्वचा व मांस विदीर्ण होणें, थकवा, अरुचि व अपचन हे सर्व विसर्पाचे उपद्रव आहेत.

साध्यासाध्यत्व.

सिध्यन्ति वातकफपित्तकृता विसर्पा
सर्वात्मकः क्षतकृतश्च न सिद्धिमेति ।
पित्तात्मकोऽञ्जनवपुश्च भवेदसाध्यः
कृच्छ्राश्च मर्मसु भवन्ति हि सर्व एव ॥ २७ ॥

वातजन्य, पित्तजन्य, व कफजन्य हे विसर्प साध्य असतात. त्रिदोषजन्य व क्षतजन्य विसर्प असाध्य असतात. ज्या पित्तजन्य विसर्पामध्यें अंग काजळाप्रमाणें काळें होतें, तो असाध्य असतो. आणि मर्मांच्या आश्रयानें होणारे सर्वच विसर्प कष्टसाध्य असतात.

विसर्पचिकित्सा.

पूर्वमेव विसर्पेषु कुर्याल्लङ्घनरूक्षणे ।
विरेकवमनालेपसेचनासृग्विमोक्षणैः ।
उपाचरेद्यथादोषं विसर्पानविदाहिभिः ॥ १ ॥

विसर्पावर प्रथम लंघन व रूक्षण क्रिया करावी. विदाह न करणारे असे रेचक, वमन, लेप, सिंचन व रक्तमोक्ष हे उपचार करावे.

विरेचन.

त्रिफलारससंयुक्तं सर्पिस्त्रिवृतया सह ।

प्रयोक्तव्यं विरेकार्थं विसर्पज्वरशान्तये ॥
त्रिवृद्धरीतकीभिर्वा विसर्पे शोधनं हितम् ॥ १ ॥

विसर्पजन्य ज्वराची शांति होण्याकरितां त्रिफळ्याच्या काढ्यांत तेडाचें चूर्ण व तूप घालून रेचक द्यावें. किंवा तेड व हिरडा ह्यांचें रेचक द्यावें. तें विसर्पावर हितकारक आहे.

वमन.

पटोलपिचुमन्दाभ्यां पिप्पल्या मदनेन वा ।
विसर्पे वमनं शस्तं तथा चेन्द्रयवैः सह ॥ १ ॥

कडुपडवळ व कडुलिंब ह्यांचें किंवा गेळफळ व पिंपळी ह्यांचें विसर्पावर वमन द्यावें. तसेंच इंद्रजवाच्या चूर्णाचेंही वमन द्यावें.

श्लैष्मिकेऽत्र वमिः कार्या पूर्वं रेचनकं ततः ।
मदनं मधुकं निम्बवत्सकस्य फलानि च ।
एतैर्वमिर्विधातव्या विसर्पे कफसंभवे ॥ २ ॥

कफजन्य विसर्पामध्यें प्रथम वमन देऊन नंतर रेचक द्यावें. गेळफळ, जेष्टमध, कडुनिंबाची साल व इंद्रजव ह्या औषधांचें वमन कफजन्य विसर्पामध्यें द्यावें.

लेप.

रास्ना नीलोत्पलं दारु चन्दनं मधुकं बला ।
पिष्टाऽऽज्यक्षीरवांल्लेपो वातवीसर्पनाशनः ॥ १ ॥

रास्ना, निळें कमळ, देवदार, चंदन, जेष्टमध व चिकणामूळ, ह्याचें चूर्ण करून तें तूप व दूध ह्यांत कालवून त्याचा लेप करावा. तो वातजन्य विसर्पाचा नाश करतो.

प्रपौण्डरीकमञ्जिष्ठापद्मकोशीरचन्दनैः ।
सयष्टीन्दीवरैः पैत्ते क्षीरपिष्टैः प्रलेपनम् ॥ २ ॥

पुंडरीक वृक्षाची साल, मंजिष्ट, पद्मकाष्ट, वाळा, चंदन, जेष्टमध व कमळ हीं औषधें दुधांत वाटून त्यांचा पित्तजन्य विसर्पावर लेप करावा.

कसेरुशृङ्गाटकपद्मगुञ्जाः सशैवलाः सोत्पलकर्दमाश्च ।
वस्त्रान्तराः पित्तकृते विसर्पे लेपा विधेयाः सघृताः सुशीताः॥ ३

कचरा, शिंगाडे, कमळ, गुंजा, शेवाळ व कमळाच्या गड्ड्या-

खालील चिखल, हीं औषधें तुपांत वाटून त्यांचा फडक्यावर थंडसा लेप करून तो पित्तजन्य विसर्पावर द्यावा.

गायत्रीसप्तपर्णाब्दवासारग्वधदारुभिः ।
कुटन्नटैर्भवेल्लेपो विसर्पे श्लेष्मसंभवे ॥ ४ ॥

खैराची साल, सातविणीची साल, नागरमोथे, अडुळसा, बाहव्याचा पाला, देवदार व टेटुमूळ, ह्या औषधांचा लेप कफजन्य विसर्पावर करावा.

त्रिफलापद्मकोशीरसमंगाकरवीरकम् ।
नलमूलमनन्ता च लेपः श्लेष्मविसर्पहा ॥ ५ ॥

त्रिफळा, पद्मकाष्ट, वाळा, मंजिष्ट, कणेरीच्या मुळ्या, देवनळाचें मूळ, उपलसरीचें मूळ, ह्यांचा लेप कफजन्य विसर्पाचा नाश करतो.

सर्पिषा शतधौतेन कृतो लेपो मुहुर्मुहुः ।
निहन्ति सर्ववीसर्पं सर्पं पतगराडिव ॥ ६ ॥

शंभर वेळ धूवून टाकलेल्या तुपाचा लेप वरचेवर करावा. तो गरुड जसा सर्पाचा नाश करतो, त्याप्रमाणें विसर्पाचा नाश करतो.

दशांगलेप.

शिरीषयष्टीनतचन्दनैलामांसीहरिद्राद्वयकुष्ठवालैः ।
लेपो दशांगः सघृतः प्रयोज्यो विसर्पकुष्ठव्रणशोथहारी ॥ १ ॥

शिरसाची साल, जेष्टमध, तगर, चंदन, वेलदोडे, जटामांसी, हळद, दारुहळद, कोष्ट व वाळा हा दशांगलेप तुपांतून लावावा. तो विसर्प, कुष्ट, व्रण, व सूज ह्यांचा नाश करतो.

मांस्यादि लेप.

मांसी सर्जरसो लोध्रं मधुकं सहरेणुकम् ।
मूर्वा नीलोत्पलं पद्मं शिरीषकुसुमानि च ।
एतैः प्रदेहः कथितो वन्हिवीसर्पनाशनः ॥ १ ॥

जटामांशी, राळ, लोध्र, जेष्टमध, रेणुकबीज, मोरवेल, निळें कमळ व शिरसाचीं फुलें, ह्या औषधांचा लेप अग्निविसर्पाचा नाश करतो.

शतधौतघृतविमिश्रः कल्कस्त्वकपञ्चकस्य लेपेन ।
बहुदाहकरमुच्चैरग्निविसर्पं विनाशयति ॥ २ ॥

वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी व नांदरूख ह्यांच्या साली शत-धौत घृतांत वाटून त्यांचा लेप करावा. तो अत्यंत दाहकारक अशा अग्निविसर्पाचा नाश करतो.

न्यग्रोधपादो गुञ्जा च कदलीगर्भ एव च ।
एतैर्ग्रन्थिविसर्पघ्नो लेपो धौताज्यसंयुतः ॥ ३ ॥

वडाच्या पारंब्या, गुंजा व केळीचें काल, ह्यांचा शतधौत घृतां-तून लेप करावा. तो ग्रंथिविसर्पाचा नाश करतो.

शतधौतघृतोन्मिश्रः शिरीषत्वग्रजःकृतः ।
लेपः शमयति क्षिप्रं विसर्पं कर्दमाभिधम् ॥ ४ ॥

शिरसाच्या सालीचा शतधौत घृतांतून लेप करावा. तो कर्दम-विसर्पाचा त्वरित नाश करितो.

काढे.

कनीयःपञ्चमूलस्य यववल्कलकस्य वा ।
कषायः पित्तवीसर्पे पाने सेकेऽपि शस्यते ॥ १ ॥

लघु पंचमुळाचा काढा किंवा सातूच्या कोंब्याचा काढा पित्त-जन्य विसर्पावर सिंचन करण्याला व प्राशन करण्याला प्रशस्त आहे.

पटोलादि काढा.

कुलकवृषकिराततारिष्टतिक्ताक्षपथ्या-
मलकमलयजानां कौशिकाढ्यः कषायः ।
सकलगदसमुत्थं हन्ति वीसर्पमुग्रं
ज्वरवमिविषदाहभ्रान्तितृष्णारुजाभिः ॥ १ ॥

पडवळ, अडुळसा, काडेचिराईत, कडुलिंबाची साल, कुटकी, बेहडा, हिरडा, आवळकाठी व रक्तचंदन, ह्यांचा काढा गुग्गुळ घालून घ्यावा. तो सर्व दोषांपासून होणारा विसर्प, ज्वर, ओकारी, विषबाधा, दाह, भ्रांति, व तहान ह्यांनीं युक्त अशा विसर्पाचा नाश करितो.

गुडूच्यादि काढा.

अमृतवृषपटोलं निम्बकल्कैरुपेतं
त्रिफलखदिरसारं व्याधिघातं च तुल्यम् ।
कथितमिदमशेषं गुग्गुलोः पादयुक्तं
हरति विषविसर्पान्कुष्ठसंघातमाशु ॥ १ ॥

गुळवेल, अडुळसा, कडुनिंबाची साल, त्रिफळा, खैराचा कात, बाहव्याची शेंग ह्यांच्या काढ्यांत चतुर्थांश गुग्गुळ घालून द्यावा. तो विष, विसर्प व सर्व कुष्ठें ह्यांचा नाश करतो.

भूनिंबादि काढा.

भूनिम्बवासाकटुकापटोलं फलत्रिकं चन्दननिम्बसिद्धः ।
विसर्पदाहज्वरशोफकण्डूविस्फोटतृष्णावमिनुत्कषायः ॥ १

काडेचिराईत, अडुळसा, कुटकी, पडवळ, त्रिफळा, रक्तचंदन, व निंबाची साल ह्यांचा काढा विसर्प, दाह, ज्वर, सूज, कंड, विस्फोट, तहान व ओकारी ह्यांचा नाश करतो.

दुरालभादि योग.

दुरालभा पर्पटकं गुडूची विश्वभेषजम् ।
निशापर्युषितं दद्यात्तृष्णावीसर्पशान्तये ॥ १ ॥

धमासा, पित्तपापडा, गुळवेल व सुंठ हीं औषधें रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं तें पाणी तहान व विसर्प शमण्यास द्यावें.

दुसरा पटोलादि काढा.

पटोलं पिचुमन्दं च दार्वीं कटुकरोहिणीम् ।
यष्ट्याह्वं त्रायमाणां च दद्याद्वीसर्पशान्तये ॥ १ ॥

पडवळ, कडुनिंबाची साल, दारुहळद, कुटकी, जेष्टमध व त्रायमाण ह्यांचा काढा विसर्पनाशाकरितां द्यावा.

मुस्तादि काढा.

मुस्तारिष्टपटोलानां क्वाथः सर्वविसर्पनुत् ।
धात्रीपटोलमुद्गानामथवा घृतसंयुतः ॥ १ ॥

नागरमोथे, कडुलिंबाची साल व पडवळ ह्यांचा काढा सर्व विसर्पांचा नाश करतो. अथवा आवळकाठी, पडवळ व मूग ह्यांचा काढा तूप घालून द्यावा. तोही विसर्पाचा नाश करतो.

घृतें;–गौरादि घृत.

द्वे हरिद्रे स्थिरा मूर्वा सारिवा चन्दनद्वयम् ।
मधुकं मधुपर्णी च पद्मकं पद्मकेसरम् ॥ १ ॥
उशीरमुत्पलं मेदा त्रिफला पंचवल्कलम् ।
कल्कैरक्षसमैरेभिर्घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २ ॥
विषवीसर्पविस्फोटकीटलूताव्रणापहम् ।

गौराद्यमिति विख्यातं सर्पिः श्लेष्ममरुत्प्रणुत् ॥ ३ ॥

हळद, दारुहळद, पिटवण, मोरवेल, उपलसरी, पांढरा व तांबडा चंदन, जेष्टमध, गुळवेल, पद्मकाष्ट, कमळाचें केशर, वाळा, पांढरें कमळ, मेदा, त्रिफळा, वड, पिंपळ, पिंपर्णी व नांदरूख ह्यांची साल, ह्या औषधांचा एक एक तोळा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें विष, विसर्प, विस्फोट, कृमि, लूता, व व्रण ह्यांचा नाश करितें. हें गौरादि घृत कफवाताचा नाश करितें.

वृषादि घृत.

वृषखदिरपटोलपत्रनिम्बैः सममसृतामलकीकषायकल्कैः ।
घृतमभिनवमेतदाशु पक्वं जयति सदाऽस्रविसर्पकुष्ठगुल्मान् ॥ १

अडुळसा, खैराची साल, पडवळाचीं पानें, कडुनिंबाचा पाला, गुळवेल व आवळकाठी ह्यांच्या कल्कानें व काढ्यानें ताजें तूप सिद्ध करावें. तें रक्तविसर्प, कुष्ट व गुल्म ह्यांचा नाश करितें.

दूर्वादि घृत.

दूर्वावटोदुम्बरजम्बुसालसप्तच्छदाश्वत्थकषायकल्कैः ।
सिद्धं विसर्पज्वरदाहपाकविस्फोटशोफान्विनिहन्ति सर्पिः ॥१॥

दूर्वा, वड, उंबर, जांभूळ, सागवान, सातवीण व पिंपळ ह्यांच्या कल्कानें व काढ्यानें सिद्ध केलेलें तूप विसर्प, ज्वर, दाह, पुटकुळ्या विस्फोट व सूज ह्यांचा नाश करितें.

करंजादि तेल.

करंजसप्तच्छदलांगलीकास्नुह्यर्कदुग्धानलभृंगराजैः ।
तैलं निशामूत्रविषैर्विपक्वं विसर्पविस्फोटविचर्चिकाघ्नम् ॥ १ ॥

करंजाची साल, सातविणीची साल, कळलावी, त्रिधारी निवडुंग व रुई ह्यांचा चीक, चित्रकमूळ, माका, हळद व बचनाग ह्यांचा कल्क व गोमूत्र ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें विसर्प, विस्फोट व विचर्चिका ह्यांचा नाश करितें.

मंजिष्ठाभया योग.

मञ्जिष्ठा कुटजो मुस्ता गुडूची रजनीद्वयम् ।
कण्टकारी वचा शुण्ठी कुष्ठारिष्टपटोलकम् ॥ १ ॥
नागी विडङ्गका माची मोरटा प्लक्षदारुकम् ।

कालिङ्गभृङ्गत्रायन्तीपाठाकाश्मीरिका बलिः ॥ २ ॥
गायत्री त्रिफला तिक्ता सारिवा नक्तमालकः ।
वासोशीरमहावृक्षसोमराजीप्रियंगुकाः ॥ ३ ॥
चन्दनं पर्पटानन्ता विशाला त्रिवृता जलम् ।
कटुत्रिकं खुरासानं पलमेकं पृथक्पृथक् ॥ ४ ॥
द्वाविंशतिपलां पथ्यां जलद्रोणे विपाचयेत् ।
अष्टावशेषः कर्तव्यः क्वाथः सद्भिषजा ततः ॥ ५ ॥
वस्त्रपूता शिवा कार्या तीक्ष्णलोहेन वेधयेत् ।
मधुमध्ये विनिक्षिप्य दिनत्रिःसप्तसंख्यया ॥ ६ ॥
विनष्टं मधु संत्यज्य मधु श्रेष्ठं पुनः क्षिपेत् ।
ततः सुस्वादसंपन्नां प्रभाते भक्षयेच्छिवाम् ॥ ७ ॥
विसर्पान्नाशयेत्सर्वान्कुष्ठान्यष्टादशापि च ।
खुडं पामां च कण्डूं च दद्रुविस्फोटविद्रधीन् ।
अन्यांस्त्वग्दोषजान्रोगांस्तथा रक्तसमुद्भवान् ॥ ८ ॥

मंजिष्ट, कुड्याची साल, नागरमोथे, गुळवेल, हळद, दारुहळद, रिंगणमूळ, वेखंड, सुंठ, कोष्ट, कडुलिंबाची साल, कडुपडवळ, कळलावी, वावडिंग, कावळी, मोरवेल, पिंपर्णीची साल, देवदार, इंद्रजव, माका, त्रायमाण, पहाडमूळ, शिवणमूळ, गंधक, गायत्री (खैराची साल), तिफळा, कुटकी, उपळसरी, करंजाची साल, अडुळसा, वाळा, तिधारी निवडुंग, बावच्या, गव्हला, चंदन, पित्तपापडा, धमासा, कडुवृंदनाच्या मुळ्या, तेड, काळा वाळा, सुंठ, मिरें, पिंपळी, व खुरासनी ओवा, हीं औषधें चार चार तोळे व हिरडे अठ्यायशीं तोळे ह्या औषधांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. व त्यांतील हिरडे काढून ते फडक्यानें पुसून पोलादी सुईनें (टोंचणीनें) टोंचावे. आणि ते एकवीस दिवसपर्यंत मधांत बुडवून ठेवावे. एकवीस दिवसांनंतर त्यांतील बिघडलेला मध काढून टाकून दुसरा चांगला मध त्यांत घालावा. नंतर ते हिरडे चांगले गोड झाले म्हणजे रोज सकाळीं खावे. हा मंजिष्टाभया योग सर्व विसर्प व अठरा प्रकारचीं कुष्टें ह्यांचा नाश करतो. खुड्डवात, खरूज, कंडू, दद्रु (नायटे), विस्फोट व विद्रधि त्याचप्रमाणें त्वचेचे रोग व रक्तजन्य रोग ह्यांचा नाश करितो.

त्रिदोषघ्नीं क्रियां कुर्याद्विसर्पे द्वंद्वसंभवे ।
रसायनानि कुष्ठेषु सर्पींषि काथनानि च ।
चूर्णादीन्यपि सर्वाणि विसर्पेष्वपि तान्यलम् ॥ १ ॥

द्वंद्वज विसर्पावर त्रिदोषनाशक क्रिया करावी; आणि कुष्टावर जीं जीं रसायनें, तूप, काढे व चूर्णे इत्यादि उपचार सांगितले आहेत, ते ते सर्व विसर्पावर करावे.

पथ्यापथ्य.

विरेको वमनं लेपो लंघनं रक्तमोक्षणम् ।
पुराणयवगोधूमकंगुषष्टिकशालयः ।
मुद्गा मसूराश्चणकास्तुवर्यो जाङ्गलो रसः ॥ १ ॥
नवनीतं घृतं द्राक्षा दाडिमं कारवेल्लकम् ।
वेत्राग्रं कुलकं धात्री खदिरो नागकेसरम् ॥ २ ॥
द्राक्षा शिरीषकर्पूरं चन्दनं तिललेपनम् ।
यथादोषं पथ्यमिदं सेवितव्यं विसर्पिभिः ॥ ३ ॥

रेचक, वमन, लंघन, लेप, रक्तमोक्ष, जुने सातु, गहू, राळे, साठेसाळी, मूग, मसुरा, हरभरे, तुरी, जांगल मांसांचे रस, लोणी, तूप, द्राक्षें, डाळिंब, कारलीं, वेताचे कोंब, पडवळ, आवळे, खैर, नागकेशर, मनुका, शिरस, कापूर, चंदन, तिळाचा लेप, हे पथ्य पदार्थ विसर्पाच्या रोग्यानें दोषानुरूप सेवन करावे.

व्यायाममह्नि शयनं सुरतं प्रवातं
क्रोधं शुचं वमनवेगविधारणं च ।
गुर्वन्नपानमखिलं लशुनं कुलित्थान्
माषांस्तिलान्सकलमांसमजाङ्गलं च ।
स्वेदं विदाहिलवणाम्लकटूनि मद्य-
मर्कप्रभामपि विसर्पगदी त्यजेच्च ॥ ४ ॥

व्यायाम (श्रम), दिवसां निजणें, मैथुन, सोसाट्याचा वारा, अन्नपान, क्रोध, शोक, ओकारीचा वेग आवरून करणें, सर्व तऱ्हेचें जड अन्नपान, लसूण, हुलगे, उडीद, तीळ, जांगल मांसावांचून इतर मांस, घाम काढणें, विदाही पदार्थ, मीठ व आंबट पदार्थ, तिखट पदार्थ, मद्य, सूर्याचें ऊन, हे पदार्थ विसर्पाच्या रोग्याला अपथ्य-कारक आहेत, म्हणून त्याज्य करावे.

विस्फोटनिदान.

कट्वम्लतीक्ष्णोष्णविदाहिरूक्षक्षारैरजीर्णाध्यशनातपैश्च ।
तथर्तुदोषेण विपर्ययैश्च कुप्यन्ति दोषाः पवनादयस्तु ॥१॥
त्वचमाश्रित्य ते रक्तमांसास्थीनि प्रदूष्य च ।
घोरान्कुर्वन्ति विस्फोटान्सर्वाञ्ज्वरपुरःसरान् ॥ २ ॥

तिखट, आंबट, तीक्ष्ण, उष्ण, विदाही, रूक्ष व खारट असे पदार्थ सेवन केल्यानें, अपक्व अन्न खाण्यानें, अजीर्णावर जेवण केल्यानें, अतिशय ऊन घेण्यानें, ऋतुदोषानें किंवा हवेचा विपयार्स झाल्यानें वातादि दोष प्रकुपित होऊन त्वचेचा आश्रय करून रक्त, मांस व हाडें ह्यांना दूषित करून प्रथम ज्वर उत्पन्न करितात; व नंतर सर्व अंगावर भयंकर असे विस्फोटक म्हणजे फोड उत्पन्न करितात.

त्यांचें रूप.

अग्निदग्धनिभाः स्फोटाः सज्वरा रक्तपित्तजाः ।
क्वचित्सर्वत्र वा देहे विस्फोटा इति संस्मृताः ॥ ३ ॥

रक्त व पित्त ह्यांच्या प्रकोपामुळें शरीराच्या एकाद्या भागावर किंवा सर्व भागांवर विस्तवानें भाजल्याप्रमाणें फोड येतात, त्यांत ज्वर असतो. त्यांना विस्फोटक असें म्हणतात.

वातज विस्फोटाचें लक्षण.

शिरोरुक्शूलभूयिष्ठज्वरतृट्पर्वभेदनम् ।
सकृष्णवर्णता चेति वातविस्फोटलक्षणम् ॥ ४ ॥

डोकें दुखणें, अत्यंत शूळ (सर्व अंग ठणकणें), ज्वर, तहान, हातापायाचीं पेरीं फुटल्याप्रमाणें वाटणें आणि फोडांचा रंग काळसर असणें हें वातविस्फोटाचें लक्षण समजावें.

पित्तज विस्फोटाचें लक्षण.

ज्वरदाहरुजास्रावपाकतृष्णाभिरन्वितम् ।
पीतलोहितवर्णं च पित्तविस्फोटलक्षणम् ॥ ५ ॥

ज्वर, दाह, ठणका, फोडांतून स्राव होणें, फोड पिकणें, तहान आणि फोडांचा रंग पिवळा किंवा तांबडा असणें, हीं लक्षणें पित्तविस्फोटापासून होतात.

कफज विस्फोटलक्षण.

छर्द्यरोचकजाड्यानि कण्डूकाठिन्यपाण्डुताः ।
अवेदनश्चिरात्पाकी स विस्फोटः कफात्मकः ॥ ६ ॥

ओकारी, अरुचि, जडत्व, कंडु, फोडांना कठीणपणा, फोडांचा रंग पांढरा असणें, फोडांत ठणका नसणें व फोड फार वेळानें पिकणें, हीं लक्षणें कफजन्य विस्फोटामध्यें होतात.

कफपित्तजन्य विस्फोट.

कण्डूर्दाहो ज्वरश्छर्दिरेतैस्तु कफपैत्तिकः ॥ ७ ॥

कंडु, दाह, ज्वर व ओकारी हीं लक्षणें कफपित्तजन्य विस्फोटामध्यें होतात.

वातपित्तजन्य विस्फोट.

वातपित्तकृतो यस्तु कुरुते तीव्रवेदनाम् ।

वातपित्तजन्य विस्फोटापासून तीव्र वेदना होतात.

कफवातजन्य विस्फोट सांगतो.

कण्डूस्तैमित्यगुरुभिर्जानीयात्कफवातिकम् ॥ ८ ॥

कंडु, मंदपणा, व जडत्व हीं लक्षणें कफवातजन्य विस्फोटामध्यें होतात.

त्रिदोषजन्य विस्फोट.

मध्ये निम्नोन्नतोऽन्ते च कठिनोऽल्पप्रपाकवान् ।
दाहरोगतृषामोहच्छर्दिमूर्छारुजो ज्वरः ।
प्रलापो वेपथुस्तन्द्रा सोऽसाध्यस्तु त्रिदोषजः ॥ ९ ॥

सान्निपातिक विस्फोट मध्यें खोलगट असून कडेला उचललेले असतात. ते कठीण, किंचित पिकणारे व तांबडे असतात. त्यामुळें दाह, तहान, भ्रांति, ओकारी, मूर्च्छा, ठणका, ज्वर, बडबड, अंग कापणें, व डोळ्यावर झापड हीं लक्षणें होतात. हा त्रिदोषजन्य विस्फोट असाध्य आहे

रक्तज विस्फोट.

रक्ता रक्तसमुत्थाना गुञ्जाविद्रुमसंनिभाः ।
वेदितव्यास्तु रक्तेन पैत्तिकेन च हेतुना ॥ १० ॥
न ते सिद्धिं समायान्ति सिद्धैर्योगवरैरपि ।

रक्तदोषजन्य विस्फोटकाचे फोड गुंजा किंवा पोंवळीं ह्यांच्यासारखे लाल असतात. हे रक्त व पित्तदोष यांमुळें होतात. हे अनुभवसिद्ध अशा शेंकडों उपायांनीं देखील साध्य होत नाहींत.

एकदोषोत्थितः साध्यः कृच्छ्रसाध्यो द्विदोषजः ॥ ११ ॥
सर्वरूपान्वितो घोरस्त्वसाध्यो भूर्युपद्रवः ॥ १२ ॥

एकदोषजन्य विस्फोटक साध्य असतो. द्विदोषजन्य कष्टसाध्य असतो व सर्व दोषांपासून होणारा भयंकर सान्निपातिक विस्फोट पुष्कळ उपद्रवांनीं युक्त व असाध्य असतो.

हिक्का श्वासोऽरुचिस्तृष्णा चाङ्गमर्दो हृदि व्यथा ।
विसर्पज्वरहृल्लासविस्फोटानामुपद्रवाः ॥ १३ ॥

उचकी, श्वास, अरुचि, तहान, अंग मोडून येणें, छातींत दुखणें, विसर्प, ज्वर व मळमळ हे विस्फोटाचे उपद्रव आहेत.

विस्फोटचिकित्सा.

तत्राऽऽदौ लंघनं कार्यं वमनं पथ्यभोजनम् ।
यथादोषं बलं वीक्ष्य प्रोक्तं युक्तं च रेचनम् ॥ १ ॥

विस्फोटक रोगामध्यें प्रथम लंघन करावें, वमन द्यावें व पथ्य भोजन करावें आणि दोषानुरूप योग्य असें रेचन द्यावें, असें सांगितलें आहे.

काढे;—द्विपंचमूळादि काढा.

द्विपञ्चमूलीं रास्नां च दार्व्युशीरं दुरालभाम् ।
सामृतं धान्यकं मुस्तां क्राथयित्वा शृतं पिबेत् ।
विस्फोटं वातसंभूतं निहन्त्येतन्न संशयः ॥ १ ॥

दशमुळें, रास्ना, दारुहळद, वाळा, धमासा, गुळवेल, धने व नागरमोथे, ह्यांचा काढा करून घ्यावा. हा वातजन्य विस्फोटाचा नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

द्राक्षादि काढा.

द्राक्षाकाश्मर्यखर्जूरपटोलारिष्टवासकैः ।
कटुकालाजदुःस्पर्शैः क्राथः शर्करया युतः ।
विस्फोटं पित्तजं हन्ति सोपद्रवमसंशयम् ॥ १ ॥

द्राक्षें, शिवणीचें फळ, खजूर, पडवळ, बाळंतलिंबाची साल,

अडुळसा, कुटकी, भाताच्या लाह्या व धमासा ह्यांचा काढा साखर घालून द्यावा. तो उपद्रवासह विस्फोट रोगाचा नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

भूनिंबादि काढा.

भूनिम्बनिम्बवासाश्च त्रिफलेन्द्रयवासकाः ।
पिचुमन्दः पटोली च क्वाथमेषां सशर्करम् ।
पीत्वा विमुच्यते नूनं कफविस्फोटकान्नरः ॥ १ ॥

काडेचिराईत, कडुनिंबाची साल, अडुळसा, त्रिफळा, इंद्रजव, धमासा, कढीनिंब (गोडा निंब) व पडवळ ह्यांचा काढा घेतला असतां कफजन्य विस्फोटकापासून रोगी मुक्त होतो.

द्वादशांग काढा.

किराततिक्तकारिष्टयष्ट्याह्वाम्बुदपर्पटैः ।
पटोलवासकोशीरत्रिफलाकौटजैः शृतम् ॥ १ ॥
द्वादशाङ्गं नरः पीत्वा विस्फोटेभ्यो विमुच्यते ।
द्वंद्वजेभ्यस्त्रिदोषोत्थाद्रक्तजाच्च हिताशनः ॥ २ ॥

काडेचिराईत, कडुनिंबाची साल, जेष्टमध, नागरमोथे, पित्तपापडा, पडवळ, अडुळसा, वाळा, त्रिफळा व इंद्रजव, ह्यांचा हा द्वादशांगी काढा पथ्य करून घेतला असतां द्वंद्वज, त्रिदोषज व रक्तज विस्फोटापासून मनुष्य मुक्त होतो.

अमृतादि काढा.

अमृतवृषपटोलं मुस्तकं सप्तपर्णं
खदिरमसितवेत्रं निम्बपत्रे हरिद्रे ।
शृतमिति स विसर्पान्कुष्ठविस्फोटकण्डू-
रपनयति मसूरीं शीतपित्तज्वरं च ॥ १ ॥

गुळवेल, अडुळसा, पडवळ, नागरमोथे, सातवीण, काळा खैर, वेत, कडुनिंबाचीं पानें, हळद व दारुहळद, ह्यांचा काढा विसर्प, कुष्ट, विस्फोटक, कंडु, मसूरिका व शीतपित्तज्वर ह्यांचा नाश करतो.

पटोलादि काढा.

पटोलामृतभूनिम्बवासारिष्टकपर्पटैः ।
खदिराब्दयुतैः क्वाथो विस्फोटज्वरशान्तये ॥ १ ॥

पडवळ, गुळवेल, काडेचिराईत, अडुळसा, कडुलिंबाची साल, पित्तपापडा, खैर व नागरमोथे, ह्यांचा काढा विस्फोटज्वराच्या शांती-करितां द्यावा.

निंबादि काढा.

निम्बत्वक्खादिरः सारो गुडूची शक्रजोऽथ वा।
क्वाथो माक्षिकसंयुक्तो विस्फोटादिज्वरापहः ॥ १ ॥

कडुनिंबाची साल, खैराचा कात, गुळवेल व इंद्रजव ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो विस्फोटादिक ज्वरांचा नाश करतो.

भूनिंबादि काढा.

भूनिम्बवासाकटुकापटोलं फलत्रिकं चन्दननिम्बसिद्धः।
विसर्पदाहज्वरशोफकण्डूविस्फोटतृष्णावमिनुत्कषायः ॥ १ ॥

काडेचिराईत, अडुळसा, कुटकी, पडवळ, त्रिफळा, रक्तचंदन, व बाळंतनिंब ह्यांचा काढा विसर्प, दाह, ज्वर, सूज, कंडू, विस्फोटज्वर, तहान व वांति ह्यांचा नाश करतो.

पद्मघृत.

पद्मकं मधुकं लोध्रं नागपुष्पस्य केशरम्।
हरिद्रे द्वे विडङ्गानि सूक्ष्मैला तगरं तथा ॥ १ ॥
कुष्ठं लाक्षा पत्रकं च सिक्थकं तुत्थमेव च।
तोयेनाऽऽलोड्य तत्सर्वं घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २ ॥
यांश्च रोगान्निहन्त्याद्धि तान्निबोध महामुने।
सर्पकीटाखुदष्टेषु नाडीदुष्टविसर्पिषु ॥ ३ ॥
विविधेऽपि च विस्फोटे लूतामूत्रक्षतेषु च।
नाडीषु गण्डमालासु प्रभिन्नासु विशेषतः ॥
आस्तीकविहितं धन्यं पद्मकं तु महद् घृतम् ॥ ४ ॥

पद्मकाष्ठ, जेष्टमध, लोध्र, नाकेशर, हळद, दारुहळद, वावडिंग, बारीक वेलदोडे, तगर, कोष्ट, लाख, तमालपत्र, मेण व मोरचूत, ह्यांत पाणी घालून चौसष्ट तोळे तूप सिद्ध करावें. हें कोणत्या रोगांचा नाश करतें तें ऐकः-साप, किडे व दुष्ट उंदीर चावल्यानें झालेले व्रण, नाडीव्रण, विसर्प, नानाप्रकारचे विस्फोट, लूतांचे दंश मूत्रजन्य व्रण, प्रमेहपीटिका व विशेषतः फुटलेल्या गंडमाळा ह्यांचा नाश करितें. हें पद्मक नांवांचें महाघृत आस्तिकानें सांगितलेलें आहे.

पंचतिक्तघृत.

पटोलसप्तच्छदनिम्बवासाफलत्रिकच्छिन्नरुहाविपक्रम् ।
तत्पञ्चतिक्तं घृतमाशु हन्यात्रिदोषविस्फोटविसर्पकण्डूः ॥ १ ॥

कडुपडवळ, सातवीण कडुनिंबाची साल, अडुळसा, त्रिफळा व गुळवेल, ह्यांच्या काढ्यानें किंवा कल्कानें तूप सिद्ध करावें. हें त्रिदोषजन्य विस्फोट, विसर्प व कंडू ह्यांचा नाश करितें.

चंदनादि लेप.

चन्दनं नागपुष्पं च तण्डुलीयकवारिणा ।
शिरीषवल्कलं जाती लेपः स्याद्दाहनाशनः ॥ १ ॥

चंदन व नाकेशर ह्यांचा तांदुळाच्या धुवणांतून लेप करावा. अथवा शिरसाची साल व जाईचा पाला ह्यांचा लेप करावा. तोहि दाहशांति करतो.

पथ्यापथ्य.

क्षुधिते लंघिते वान्ते जीर्णशालियवादिभिः ।
मुद्गाढकीमसूराणां रसैर्वा विश्वसंयुतैः ॥ १ ॥
सुनिषण्णकवेत्राग्रतण्डुलीयकठिल्लकैः ।
कुलकाभीरुकैरेभिः सपर्पटसतीनकैः ॥ २ ॥
टङ्कारवेल्लैः कुसुमैर्निम्बपल्लवबिल्वजैः ।
तिक्तयूषसमायुक्तैर्भोजनं संप्रयोजयेत् ॥ ३ ॥

विस्फोटकाच्या रोग्याला लंघन व वमन हे उपचार करवून भूक लागली असतां जुन्या साळी, मूग, तुरी, मसुरा, सुंठीचें चूर्ण घातलेला मांसरस, कुर्डु, वेताचे कोंब, तांदुळजा, कारळी, पडवळ, शतावरी, पित्तपापडा, वाटाणे, कारलीं, कडुलिंबाचीं फुलें, पानें व बेलाचीं पानें ह्यांचे कडू असे यूष करून त्याबरोबर जेवूं घालावें.

तिलान्माषान्कुलित्थांश्च लवणाम्लकटूनि च ।
विदाहि रूक्षमुष्णं च विस्फोटी परिवर्जयेत् ॥ ४ ॥

तीळ, उडीद, हुलगे, मीठ व आंबट, तिखट, विदाहकारक, रूक्ष व उष्ण पदार्थ हें विस्फोटाच्या रोग्यानें वर्ज करावें.

नारूचें निदान;–पूर्वरूप.

शाखासु कुपितो दोषः शोथं कृत्वा विसर्पवत् ।
भिनत्ति तत्क्षते तत्र सोष्मा स्नायुं विशोष्य च ॥ १ ॥

कुर्यात्तन्तुनिभं जीवं वृत्तं श्वेतद्युतिं बहिः ।
शनैः शनैः क्षताद्याति छेदात्कोपमुपैति सः ॥ २ ॥
तत्पाताच्छोफशान्तिः स्यात्पुनः स्थानान्तरे भवेत् ।
स स्नायुकेति विख्यातः क्रियोक्ता तु विसर्पवत् ॥ ३ ॥
बाह्वोर्यदि प्रमादेन जंघयोस्त्रुट्यति क्वचित् ।
संकोचं खञ्जतां चैव च्छिन्नतन्तुः करोत्यसौ ॥ ४ ॥

हातपाय वगैरे अवयवांतून कुपित झालेला दोष विसर्पासारखी सूज उत्पन्न करतो व ती फोडतो. त्या क्षतामधील उष्णतेसह तो दोष त्या ठिकाणच्या स्नायूला शुष्क करून सुताप्रमाणें वाटोळा व पांढरा जीव उत्पन्न करतो. तो त्या सुजेमधून थोडा थोडा बाहेर येतो. व तो तुटला असतां विकोपास जातो. क्षतामधून तो संपूर्ण बाहेर पडला असतां सूज नाहींशी होते. पण तो पुनः दुसरीकडेही होतो. ह्याला स्नायुक (नारू) असें म्हणतात. जर कदाचित् हा हातांत किंवा पायाच्या पिंढरींत होऊन तुटला, तर तो हात किंवा पाय आखडून लंगडेपणा येतो.

वातेन श्यावरूक्षः सरुगथ दहनान्नीलपीतः सदाहोऽ-
थ श्वेतः श्लेष्मणा स्यात्पृथुगरिमयुतोऽथ द्विदोषो द्विलिङ्गी ।
रक्तेनाऽऽरक्तकान्तिः समधिकदहनोऽथाखिलैः सर्वलिंगो
रोगोऽसावष्टधेत्थं मुनिभिरभिहितः स्नायुकस्तन्तुकीटः ॥५॥

वातानें होणारा नारू काळसर व रूक्ष असतो आणि ठणकतो. पित्तानें होणारा नारू निळा-पिवळा असून दाहयुक्त असतो. कफदोषानें होणारा मोठा, जड व पांढरा असतो. द्विदोषानें होणाऱ्या नारूमध्यें त्या त्या दोनदोन दोषांचीं लक्षणें असतात. रक्तानें होणारा नारू तांबडा व पित्तदोषाच्या लक्षणानें युक्त असतो. आणि त्रिदोषजन्य नारूमध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात. ह्याप्रकारें नारू आठ प्रकारचा आहे, असें मुनींनीं सांगितलें आहे.

नारूची चिकित्सा.

स्नेहस्वेदप्रलेपादि कर्म कुर्याद्यथामलम् ।

नारूवर दोषानुरूप स्नेहन, स्वेदन व लेप इत्यादि क्रिया करावी.

अहिंस्रामूलगोमूत्रकल्काल्लेपस्तु वातजे ॥ १ ॥
पञ्चवल्कलकल्केन हितो लेपोऽत्र पित्तजे ।

श्लेष्मजे स्नायुके लेपः प्रशस्तः काञ्चनारजः ॥ २ ॥
तद्वाभ्यां द्वंद्वजे लेपः सर्वैस्तैः सर्वजे हितः ।
रक्तजे स्नायुके लेपो वटप्लक्षत्वचो हितः ।
विसर्पोक्ताः क्रियाः सर्वाः स्नायुके तु हिता मताः ॥ ३ ॥

वातज नारूवर फणीनिवडुंगाची मुळी गोमूत्रांत वाटून लावावी. पित्तजन्य नारूवर पंचवल्कलांचा कल्क लावावा, आणि कफजन्य नारूवर कांचनाच्या सालीचा लेप करावा. द्विदोषज नारूवर त्या त्या दोन दोषांवरील औषधांचा लेप करावा. आणि त्रिदोषज नारूवर तिन्हीही दोषांवरील औषधांचा लेप करावा. रक्तजन्य नारूवर वड व पिंपरणी ह्यांच्या सालींचा लेप करावा. विसर्पावर जी जी क्रिया सांगितली आहे ती ती सर्व नारूवर उपयुक्त आहे.

बब्बूलबीजादि लेप.

बब्बूलबीजं गोमूत्रपिष्टं हन्ति प्रलेपनात् ।
स्नायुकानि समस्तानि सशोथानि सरुञ्जि च ॥ १ ॥

बाभळीचें बी गोमूत्रांत वाटून लेप केला असतां तो सूज आणि ठणका ह्यांसह सर्व नारूंचा नाश करतो.

शिग्रुमूलादि लेप.

शिग्रुमूलदलैः पिष्टैः काञ्जिकेन ससैन्धवैः ।
लेपः स्नायुकरोगाणां शमनः परमः स्मृतः ॥ १ ॥

शेवग्याचें मूळ व पानें सेंधेलोणासह कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो नारूचें शमन करण्याविषयीं फार उत्तम आहे.

सुधया सह लोणारं जलेनाऽऽलोड्य लेपयेत् ।
अनेन तु प्रयोगेण त्रिदिनादेव नश्यति ॥ २ ॥

चुना व बिडलोण ह्यांचा पाण्यांतून लेप करावा. तो तीन दिवसांत नारूचा नाश करतो.

पातालगरुडीमूलं पिबेत्स्नायुकनाशनम् ।
तिलपिण्याकलेपो वा ह्यारनालेन पेषितः ॥ ३ ॥

वासनवेलीचें मूळ पाण्यांत वांटून प्यावें; तें नारूचा नाश करतें. अथवा तिळाची पेंड कांजींत वाटून तिचा लेप करावा; तीही नारूचा नाश करिते.

तक्रेण वाऽथ तैलेन ह्यश्वगन्धां प्रलेपयेत् ।
श्वेतविष्णुक्रान्तया वा शिग्रुमूलेन वा पुनः ॥ ४ ॥
पुंमूत्रैः काञ्चनीं पिष्ट्वा लेपः स्नायुकजिद्भवेत् ।

ताकांतून अथवा तेलांतून अश्वगंधाचा लेप करावा. किंवा पांढऱ्या विष्णुक्रांताच्या मुळांचा अथवा शेवग्याच्या मुळ्यांचा लेप करावा. तसेंच कांचनाची साल मनुष्याच्या मुतांत वाटून तिचा लेप करावा. तो नारूला जिंकतो.

वार्ताकमूलं पुंमूत्रैः पत्रैर्वाऽश्वत्थजैश्च वा ।
सुतप्तैर्बन्धयेच्छीघ्रं शमयेत्स्नायुकं गदम् ॥ ५ ॥

वांग्याचें मूळ मनुष्याच्या मुतांत वाटून अथवा पिंपळाच्या पानाशीं वाटून ऊन करून बांधावें. तें नारूचें शमन करितें.

रामठादि योग.

रामठं टङ्कणं क्षारं प्रत्येकं शाणसंमितम् ।
चूर्णयित्वा सप्तदिनं खादेत्संध्याद्वये नरः ।
अनेन योगराजेन स्नायुको नश्यति ध्रुवम् ॥ १ ॥

हिंग व टाकणखार तीन तीन मासे घेऊन त्याचें चूर्ण करून सात दिवसपर्यंत सकाळ संध्याकाळ खावें; म्हणजे निश्चयानें नारूचा नाश होतो.

अतिविषादि चूर्ण.

अतिविषमुस्तकभार्गीविश्वौषधपिप्पलीबिभीतानाम् ।
चूर्णं तन्तुकमिघ्नं पुंसामुष्णेन वारिणा पीतम् ॥ १ ॥

अतिविष, नागरमोथे, भारंगमूळ, सुंठ, पिंपळी व बेहडे यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं प्यावें. तें नारूचा नाश करितें.

कुष्ठादि कल्क.

कुष्ठरामठशुण्ठीभिः कल्कं शिग्रुसमन्वितम् ।
पानलेपनयोगेन तन्तुकीटविनाशनम् ॥ १ ॥

कोष्ट, हिंग, सुंठ व शेवग्याची साल ह्यांचा कल्क करून प्यावा व त्याचा लेप करावा; म्हणजे नारूचा नाश होतो.

गव्यं सर्पिस्त्र्यहं पीत्वा निर्गुण्डीस्वरसं त्र्यहम् ।
पीत्वा स्नायुकमत्युग्रं हन्त्यवश्यं न संशयः ॥ २ ॥

गाईचें तूप तीन दिवस पिऊन निर्गुंडीच्या पाल्याचा रस तीन

दिवस प्यावा. तो अतिशय उग्र अशा नारूचा नाश करतो, यांत संशय नाहीं.

मूलं सुषव्या हिमवारिपिष्टं पानाद्दिनान्ते तु गदं प्रचण्डम् ।
शान्तिं नयेत्सव्रणमाशु पुंसां गन्धर्वगन्धश्च घृतेन पीतः ॥ ३ ॥

लहान कारलीचें मूळ पाण्यांत वाटून तें संध्याकाळीं प्यावें. तें प्रचंड नारूचा जखमेसह नाश करितें. त्याचप्रमाणें कस्तुरी तुपांतून द्यावी. तीही प्रचंड नारूचा नाश करिते.

पारावतपुरीषस्य मधुना कल्कितस्य च ।
गिलिता गुटिका हन्ति स्नायुकामयमुद्धतम् ॥ ४ ॥

पारव्याची विष्ठा मधांतून चाटावी; ती वाढलेल्या नारूचा नाश करिते.

निम्बशम्याकजात्यर्कसप्तपर्णाश्वमारकाः ।
क्रिमिघ्ना मूत्रसंयुक्ताः सेकलेपनधावनैः ॥ ५ ॥

कडुनिंब, बाहवा, जाई, रुई, सातवीण व कणेर या औषधांचा गोमूत्रांतून लेपांत, धुण्यांत व शिंपडण्यांत उपयोग करावा. तो नारूचा नाश करतो.

वृन्ताकं भर्जितं भाण्डे कृत्वा दध्ना सहोपरि
बन्धयेत्स्नायुको बहिः पतति । एवं सप्तदिनं कार्यम् ॥

वांगें भांड्यांत भाजून दह्यांत कालवून वर बांधावें. याप्रमाणें सात दिवस करावें, म्हणजे नारू बाहेर पडतो.

शणबीजचूर्णं भागमेकं, गोधूमपिष्टं भागमेकं,
द्वयमेकीकृत्य घृतेन पक्तव्यं गुडेन भक्षयेत् ।
एवं त्रिदिनं कार्यं । स्नायुको नश्यति ॥

तागाच्या बियांचें पीठ एक भाग व गव्हाचें पीठ एक भाग हीं दोन्ही एकत्र मिसळून तुपांत भाजून गुळाशीं खावीं. याप्रमाणें तीन दिवस करावें, म्हणजे नारू बरा होतो.

मसूरिकानिदान.

कट्वम्ललवणक्षारविरुद्धाध्यशनाशनैः ।
दुष्टनिष्पावशाकाद्यैः प्रदुष्टैः पवनोदकैः ॥ १ ॥
क्रूरग्रहेक्षणाच्चाऽपि देहे दोषाः समुद्धताः ।
जनयन्ति शरीरेऽस्मिन्दुष्टरक्तेन संगताः ।

मसूराकृतिसंस्थानाः पिटिकाः स्युर्मसूरिकाः ॥ २ ॥

तिखट, आंबट, खारट व क्षार ह्यांचें अतिशय सेवन करणें, विरुद्ध अन्न खाणें, पावटे, भाज्या वगैरे वावडे पदार्थ खाणें, दूषित वायु व दूषित पाणी ह्यांचें सेवन करणें, व अनिष्ट ग्रहांची दृष्टि, ह्या कारणांनीं सर्व देहांत कुपित झालेले वातादि दोष दूषित रक्ताशीं मिळून मसुरेच्या आकाराच्या पुटकुळ्या उत्पन्न करितात. त्यांना मसूरिका असें म्हणतात.

पूर्वरूप.

तासां पूर्वं ज्वरः कण्डूर्गात्रभङ्गोऽरुचिर्भ्रमः।
त्वचि शोथः सवैवर्ण्यो नेत्ररागस्तथैव च।

मसूरिका होण्यापूर्वीं ज्वर येतो; अंगाला कंडु सुटते; व अंग दुखतें. आणि अरुचि, भ्रम, अंगाची त्वचा सुजणें, वर्ण बदलणें व डोळे लाल होणें हीं लक्षणें होतात.

वातज मसूरिकालक्षण.

स्फोटाः कृष्णारुणा रूक्षास्तीव्रवेदनयाऽन्विताः।
कठिनाश्चिरपाकाश्च भवन्त्यनिलसंभवाः ॥ ४ ॥
संध्यस्थिपर्वणां भेदः कासकम्पारतिभ्रमाः।
शोथस्ताल्वोष्ठजिह्वानां तृष्णा चारुचिसंयुता ॥ ५ ॥

वातजन्य मसूरिकेचे फोड काळसर तांबूस व रूक्ष असून त्यांत तीव्र वेदना असतात. ते कठीण असून फार उशिरानें पिकतात. त्यामुळें सांधे व हाडें दुखतात. खोकला येतो, अंग कांपतें, अस्वस्थपणा असतो, घेरी येते, टाळा, ओठ व जीभ ह्यांना कोरड असते, तहान लागते आणि तोंड बेचव होतें.

पित्तज मसूरिकालक्षण.

रक्ताः पीताः सिताः स्फोटाः सदाहास्तीव्रवेदनाः।
मृदवोऽचिरपाकाश्च पित्तकोपसमुद्भवाः ॥ ६ ॥
विड्भेदश्चांगमर्दश्च दाहस्तृष्णाऽरुचिस्तथा।
मुखपाकोऽक्षिपाकश्च ज्वरस्तीव्रः सुदारुणः ॥ ७ ॥

पित्तजन्य मसूरिकेचे फोड तांबूस, पिवळे व पांढरे असे असतात. त्यांचा अतिशय दाह होतो. त्यांत तीव्र वेदना असतात.

ते मृदु असून लवकर पिकतात. त्यामुळें शौचास पातळ होणें, अंग मोडून येणें, दाह, तहान, अरुचि, तोंड येणें, नेत्रविकार आणि तीव्र ज्वर हीं लक्षणें होतात.

रक्तज मसूरिकालक्षण.

रक्तजायां भवन्त्येते विकाराः पित्तलक्षणाः ।

रक्तज मसूरिकेमध्यें वर सांगितलेले सर्व पित्तविकार होतात.

कफजन्य मसूरिकालक्षण.

कफप्रसेकः स्तैमित्यं शिरोरुग्गात्रगौरवम् ॥ ८ ॥
हल्लासश्चारुचिर्निद्रा तन्द्राऽऽलस्यसमन्विता ।
श्वेताः स्निग्धा भृशं स्थूलाः कण्डूरा मन्दवेदनाः ।
मसूरिकाः कफोत्थाश्च चिरपाकाः प्रकीर्तिताः ॥ ९ ॥

कफजन्य मसूरिकेमध्यें थुंकीतून कफ पडणें, अंग ओलसर असणें, डोकें दुखणें, अंग जड होणें, छातींत उचंबळल्यासारखें होणें, अरुचि, झोप येणें, डोळ्यांवर झांपड व आळस हीं लक्षणें होतात. मसूरिकेचे फोड पांढरे, स्निग्ध व फार मोठे असतात. त्यांत कंड असून वेदना मंद असतात. आणि हे फोड फार उशीरानें पिकतात.

सन्निपातज मसूरिकालक्षण.

नीलाश्चिपिटविस्तीर्णा मध्ये निम्ना महारुजाः ।
प्रभूताश्चिरपाकाश्च पूतिस्रावास्त्रिदोषजाः ॥ १० ॥

त्रिदोषजन्य मसूरिकेचे फोड निळ्या रंगाचे, चापट, पसरट व मध्यें खोलगट असे असून त्यांत वेदना फार असतात. ह्या मसूरिकेचे फोड पुष्कळ असतात. ते फार उशीरानें पिकतात व त्यांतून दुर्गंधि पू वाहतो.

चर्मपीटिका.

कण्ठरोधोऽरुचिस्तन्द्राप्रलापारुचिसंयुताः ।
दुश्चिकित्स्याः समुद्दिष्टाः पिटिकाश्चर्मसंज्ञिताः ॥ ११ ॥

घसा बसणें, अरुचि, ग्लानि, बडबड व अस्वस्थता हीं लक्षणें ज्या मसूरिकांमध्यें असतात त्यांना चर्मपीटिका असें म्हणतात. ह्या दुश्चिकित्स्य आहेत.

रोमांतिका.

रोमकूपोन्नतिसमा रागिण्यः कफपित्तजाः ।
कासारोचकसंयुक्ता रोमान्त्यो ज्वरपूर्विकाः ॥ १२ ॥

रोमरंध्राच्या आकाराच्या, वर उचललेल्या तांबूस रंगाच्या पुरळासारख्या पुटकुळ्या कफपित्तापासून होतात. त्यांत खोकला व अरुचि हे विकार असून त्या होण्यापूर्वीं ज्वर येतो. त्यांना रोमांतिका असें म्हणतात.

सप्तधातुगत मसूरिकांचें लक्षण.

रसगत मसूरिका.

तोयबुद्बुदसंकाशास्त्वग्गतास्तु मसूरिकाः ।
स्वल्पदोषाः प्रजायन्ते भिन्नास्तोयं स्रवन्ति च ॥ १ ॥

त्वचेच्या म्हणजे रसधातूच्या आश्रयानें होणाऱ्या मसूरिका पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें दिसतात. त्यांत दोष अल्प असतात, आणि त्या फुटल्या म्हणजे त्यांतून पाणी जातें.

रक्तगत मसूरिका.

रक्तस्था लोहिताकाराः शीघ्रपाकास्तनुत्वचः ।
साध्या नात्यर्थदुष्टाश्च भिन्ना रक्तं स्रवन्ति च ॥ २ ॥

रक्ताच्या आश्रयानें होणाऱ्या मसूरिका लाल रंगाच्या असतात. त्या लवकर पिकतात. त्यांची त्वचा पातळ असते. त्या फार दूषित नसल्या तर साध्य होतात. त्या फुटल्या तर त्यांतून रक्त येतें.

मांसगत मसूरिका.

मांसस्थाः कठिनाः स्निग्धाश्चिरपाकास्तनुत्वचः ।
गात्रशूलोऽरतिः कण्डूतृष्णाज्वरसमन्विताः ॥ ३ ॥

मांसाच्या आश्रयानें होणाऱ्या मसूरिका कठीण व स्निग्ध असून फार उशीरानें पिकतात. त्यांची त्वचा जाड असते. ह्यांच्या योगानें अंग ठणकतें. तहान लागते. अंग खाजतें. ज्वर येतो, आणि चैन पडत नाहीं. ("मूर्च्छादाहतृषान्विताः" असा पाठभेद आहे, त्याचा अर्थः—"मूर्च्छा, दाह व तृषा हीं लक्षणें असतात," असा आहे.)

मेदोगत मसूरिकेचें लक्षण.

मेदोजा मण्डलाकारा मृदवः किंचिदुन्नताः ।
घोरज्वरपरीताश्च स्थूलाः स्निग्धाः सवेदनाः ॥

संमोहारतिसंतापाः कश्चिदाभ्यो विनिस्तरेत् ॥ ४ ॥

मेदापासून होणाऱ्या मसूरिका मंडलाकार असून मृदु व किंचित उचललेल्या असतात. त्यांमुळें भयंकर ताप येतो. त्या स्थूळ, स्निग्ध व वेदनायुक्त असतात. त्यांपासून इंद्रियें व मन हीं मोहित होतात. ह्यांतून कचित् एखादा रोगी बरा होतो.

अस्थि व मज्जागतांचें लक्षण.

क्षुद्रा गात्रसमा रूक्षाश्चिपिटाः किंचिदुन्नताः ।
मज्जोत्था भृशसंमोहवेदनारतिसंयुताः ॥ ५ ॥
छिन्दन्ति मर्मधामानि प्राणानाशु हरन्ति च ।
भ्रमरेणेव विद्धानि कुर्वन्त्यस्थीनि सर्वतः ॥ ६ ॥

अस्थि व मज्जा ह्यांच्या आश्रयानें झालेल्या मसूरिका बारीक, अंगासरशा, रूक्ष, चापट व किंचित् उचललेल्या असतात. ह्यांच्या योगानें इंद्रियें व मन हीं मोहित होतात. ह्यांत वेदना असतात व मन अस्वस्थ असतें. ह्या मर्मभेद करितात व त्वरित प्राणहरण करितात. अस्थिगत मसूरिकांमध्यें सर्व हाडें भुंग्यानें पोखरल्याप्रमाणें दुखतात.

शुक्रगत मसूरिकांचें लक्षण.

पक्वाभाः पिटिकाः स्निग्धाः श्लक्ष्णाश्चात्यर्थवेदनाः ।
स्तैमित्यारतिसंमोहदाहोन्मादसमन्विताः ॥ ७ ॥
शुक्रजायां मसूर्यां तु लक्षणानि भवन्ति हि ।
निर्दिष्टं केवलं चिह्नं दृश्यते न तु जीवितम् ॥ ८ ॥

शुक्रगत मसूरिकांचे फोड स्निग्ध, तुळतुळीत व अत्यंत वेदनायुक्त असून त्यांत मंदपणा, अस्वस्थपणा, इंद्रियें व मन ह्यांना मोह, दाह व उन्मत्तपणा हीं लक्षणें होतात. शुक्रगत मसूरिकांचें हें लक्षण सांगितलें आहे एवढेंच; पण ह्यांतून रोगी वाचेल असें नाहीं.

साध्यासाध्य लक्षण.

दोषमिश्राश्च सप्तैता द्रष्टव्या दोषलक्षणैः ।

ह्या सातही प्रकारच्या मसूरिका ज्या ज्या दोषांच्या लक्षणांनी युक्त असतील त्या त्या दोषांनीं त्या झाल्या आहेत म्हणून समजावें.

त्वग्गता रक्तजाश्चैव पित्तजाः श्लेष्मजास्तथा ॥ १ ॥

श्लेष्मपित्तकृताश्चैव सुखसाध्या मसूरिकाः ।
एता विनाऽपि क्रियया प्रशाम्यन्ति शरीरिणाम् ॥ २ ॥

त्वचागत (रसगत), रक्तगत, पित्तजन्य, कफजन्य व कफपित्तजन्य मसूरिका सुखसाध्य होतात. ह्या उपचारावांचूनहि बऱ्या होतात.

वातजाः वातपित्तोत्थाः श्लेष्मवातकृताश्च याः ।
कृच्छ्रसाध्या मतास्तस्माद्यत्नादेता उपाचरेत् ॥ ३ ॥
अतोऽन्यास्तु विनिर्दिष्टा यास्तु सम्यक्क्रियां विना ।
न सिध्यन्ति यतस्तस्मात्तास्तु यत्नादुपाचरेत् ॥ ४ ॥

वातजन्य, वातपित्तजन्य, व कफवातजन्य मसूरिका कष्टसाध्य आहेत. म्हणून त्याजवर प्रयत्नानें उपचार करावे. तसेंच ह्या दुसऱ्या ज्या योग्य उपचारावांचून बऱ्या होण्यासारख्या नसतील त्यांजवर प्रयत्नानें उपचार करावा.

असाध्याः संनिपातोत्थास्तासां वक्ष्यामि लक्षणम् ।
प्रवालसदृशाः काश्चित्काश्चिज्जम्बूफलोपमाः ॥ ५ ॥
लोहजालनिभाः काश्चिदतसीफलसंनिभाः ।
आसां बहुविधा वर्णा जायन्ते दोषभेदतः ॥ ६ ॥
कासो हिक्का प्रमोहश्च ज्वरस्तीव्रः सुदारुणः ।
प्रलापश्चारतिर्मूर्च्छा तृष्णा दाहोऽतिघूर्णता ॥ ७ ॥
मुखेन प्रस्रवेद्रक्तं तथा घ्राणेन चक्षुषा ।
कण्ठे घुर्घुरकं कृत्वा श्वसित्यत्यर्थदारुणम् ॥ ८ ॥
मसूरिकाभिभूतस्य यस्यैतानि भिषग्वरः ।
लक्षणानीह दृश्यन्ते न दद्यात्तत्र भेषजम् ॥ ९ ॥
मसूरिकाभिभूतो यो भृशं घ्राणेन निःश्वसेत् ।
स भृशं त्यज्यति प्राणांस्तृष्णार्तो वायुदूषितः ॥ १० ॥

सन्निपातजन्य मसूरिका असाध्य आहेत. त्यांचें लक्षण सांगतों:— त्यापैकीं कित्येक पोवळ्याप्रमाणें असतात, कित्येक जांभळाच्या फळासारख्या असतात, कित्येक लोखंडाच्या जाळ्यासारख्या असतात व कित्येक जवसाच्या बोंडाप्रमाणें असतात. ह्यांचे दोषपरत्वें अनेक रंग होतात. खोकला, उचकी, तीव्र ज्वर, अत्यंत भ्रांति, बडबड, अस्वस्थपणा, मूर्च्छा, तहान, दाह, अतिशय गडबडा लोळणें, तोंड, नाक, व डोळे ह्यांतून रक्त पडणें, घशांत घुरघुर व अतिशय श्वास, हीं लक्षणें ज्या मसूरिकेच्या रोग्याला झालेलीं दिसतील

त्याला औषध देऊं नये. जो मसूरिकेचा रोगी नाकानें फार श्वास टाकतो तो व वातानें ज्याला अतिशय तहान लागली आहे तो त्वरित प्राणास मुकतो.

मसूरिकान्ते शोथः स्यात्कूर्परे मणिबन्धके ।
तथांऽसफलके वाऽपि दुश्चिकित्स्यः सुदारुणः ॥ ११ ॥

मसूरिका बऱ्या झाल्यावर कोपर, मनगट किंवा दंड ह्या ठिकाणीं मोठी सूज येते. ती उपचारांनीं देखील बरी होण्यास फार कठीण आहे.

मसूरिकाचिकित्सा.

मसूरिकायां कुष्ठोक्ता लेपनादिक्रिया हिता ।
पित्तश्लेष्मविसर्पोक्ता क्रिया वाऽत्र प्रशस्यते ॥ १ ॥

कुष्ठावर जे जे लेप सांगितले आहेत, ते अथवा कफपित्तजन्य विसर्पावर जे उपचार सांगितलें आहेत ते ह्या मसूरिका रोगांवर प्रशस्त आहेत.

सर्वासां वमनं पूर्वं पटोलारिष्टवासकैः ।
कषायश्च वचावत्सयष्ट्याह्वफलकल्कितैः ॥ २ ॥
सक्षौद्रं पाययेद्ब्राह्मीरसं वा हिलमोचकम् ।
वान्तस्य रेचनं देयं शमनं त्वबले नरे ॥
उभाभ्यां हृतदोषस्य विशुष्यन्ति मसूरिकाः ॥ ३ ॥

सर्व मसूरिकांवर प्रथम कडुपडवळ, कडुनिंब व अडुळसा ह्यांचा काढ्याचें वमन द्यावें. वेखंड, इंद्रजव व जेष्टमध ह्यांचा काढा गेळफळाचा कल्क घालून वमनार्थ द्यावा. ब्राह्मीचा रस अथवा जलब्राह्मीचा रस मध घालून द्यावा. ज्याला वमन झालें आहे त्याला रेचन द्यावें. अशक्त मनुष्य असेल तर त्याला शामक औषध द्यावें. वमन व रेचन ह्या दोन्हीही उपचारांनीं ज्याचे दोष काढून टाकले आहेत त्याच्या मसूरिका शुष्क होतात.

वेणुत्वगादि धूप.

वेणुत्वक्सुरसालाक्षाकार्पासास्थिमसूरिकाः ।
यवपिष्टं विषं सर्पिर्वचा ब्राह्मी सुवर्चला ॥ १ ॥
धूपनार्थं यथालाभं धूपमेनं प्रयोजयेत् ।

आदावयं प्रयोक्तव्यो नश्यन्त्यस्मान्मसूरिकाः ॥
न गृह्णन्ति विषं केचिद्यथालाभं श्रुतेरिह ॥ २ ॥

वेळूची साल, तुळस, लाख, कापसाच्या सरक्या, मसूरा, सातूचें पीठ, बचनाग, तूप, वेखंड, ब्राह्मीचा पाला व सूर्यफुलाची वेल ह्या सर्व औषधींपैकीं ज्या मिळतील त्या घेऊन धुरी द्यावी. ही धुरी प्रथम द्यावी. हिनें मसूरिका दूर होतात. "यथालाभ" असें श्लोकांत म्हटलें आहे, म्हणून कित्येक ह्या धुरीमध्यें विष म्हणजे बचनाग घेत नाहींत.

श्वेतचंदनादि योग.

श्वेतचन्दनकल्काढ्यं हिलमोचाभवं द्रवम् ।
पिबेन्मसूरिकारम्भे नैम्बं वा केवलं रसम् ॥ १ ॥

मसूरिकाच्या आरंभीं जलब्राह्मीच्या रसांत चंदनाचा कल्क घालून प्यावा. अथवा केवळ कडुनिंबाच्या पाल्याचा रस प्यावा.

गुडूची मधुकं द्राक्षा मोरटं दाडिमैः सह ।
पाककाले प्रदातव्यं भेषजं गुडसंयुतम् ॥
तेन कुप्यति नो वायुः पाकं यान्ति मसूरिकाः ॥ २ ॥

गुळवेल, जेष्टमध, द्राक्षें, मोरवेल, व डाळिंब ह्यांचा कल्क मसूरिका पिकण्याच्या सुमारास द्यावा. म्हणजे वायूचा प्रकोप न होतां मसूरिका पिकतात.

बृहत्पटोलादि काढा.

पटोलं सारिवा मुस्तं पाठा कटुकरोहिणी ।
खदिरः पिचुमन्दश्च बला धात्री विकङ्कतः ॥
एषां कषायपानं तु हन्ति वातमसूरिकाम् ॥ १ ॥

पडवळ, उपलसरी, नागरमोथे, पहाडमूळ, कुटकी, खैराची साल, बाळंतलिंबाची साल, चिकणामूळ, आवळकाठी व वेहेकळ, ह्यांचा काढा प्यावा. तो वातजन्य मसूरिकांचा नाश करतो.

दशमूलादि काढा.

द्वे पञ्चमूल्यौ रास्ना च धात्र्युशीरं दुरालभा ।
सामृतं धान्यकं मुस्तं जयेद्वातमसूरिकाम् ॥ १ ॥

दशमुळें, रास्ना, आवळकाठी, वाळा, धमासा, गुळवेल, धने

व नागरमोथे, ह्यांचा काढा वातजन्य मसूरिकांना जिंकतो.

न्यग्रोधादि लेप.

न्यग्रोधप्लक्षमञ्जिष्ठाशिरीषोदुम्बरत्वचाम् ।
ससर्पिष्कं मसूर्यां तु वातजायां प्रलेपनम् ॥ १ ॥

वड, पिंपरणी, मंजिष्ठ, शिरस व उंबर ह्यांच्या साली तुपांत उगाळून त्यांचा वातजन्य मसूरिकांवर लेप करावा.

शोधनं पित्तजायां न कार्यं वैद्येन जानता ।
तत्राऽऽदौ तर्पणं कार्यं लाजाचूर्णैः सशर्करैः ॥ २ ॥
आदावेव मसूर्यां तु पित्तजायां प्रयोजयेत् ।
निम्बादिकथितं तेन प्रशाम्यति मसूरिका ॥ ३ ॥

शहाण्या वैद्यानें पित्तजन्य मसूरिकांवर शोधन देऊं नये. त्यांजवर (पित्तजन्य मसूरिकांवर) लाह्याचें पीठ व साखर ह्यांचें तर्पण औषध द्यावें. शिवाय पित्तजन्य मसूरिकांवर प्रथम ' निंबादि काढा ' द्यावा. त्यानें मसूरिकांचें शमन होतें.

निंबादि काढा.

निम्बः पर्पटकं पाठा पटोलं चन्दनद्वयम् ।
वासा दुरालभा धात्री सेव्यं कटुकरोहिणी ॥ ४ ॥
एतेषां कथितं शीतं सितया मधुरीकृतम् ।
मसूरिकां पित्तकृतां हन्ति रक्तोत्तरामपि ॥ ५ ॥

बाळंतलिंबाची साल, पित्तपापडा, पहाडमूळ, पडवळ, पांढरा व तांबडा चंदन, अडुळसा, धमासा, आवळकाठी, काळा वाळा, व कुटकी ह्यांचा काढा खडीसाखर घालून गोड करून द्यावा. तो पित्तजन्य व रक्तजन्य मसूरिकांचा नाश करतो.

द्राक्षादि काढा.

द्राक्षाकाश्मर्यखर्जूरपटोलारिष्टवासकैः ।
लाजामलकदुस्पर्शैः कथितं शर्करान्वितम् ॥
मसूरिकां पित्तकृतां रक्तजां च विनाशयेत् ॥ १ ॥

द्राक्षें, शिवणीचीं फळें, खारीक, पडवळ, कडुलिंबाची साल, अडुळसा, भाताच्या लाह्या, आवळकाठी व धमासा, ह्यांचा काढा खडीसाखर घालून द्यावा. तो पित्तजन्य व रक्तजन्य मसूरिकांचा नाश करतो.

पंचमूलादि काढा.

बृहतः पञ्चमूलस्य वृषपत्रयुतस्य च ।
कषायः शमयेत्पीतः कफोत्थां तु मसूरिकाम् ॥ १ ॥
वृषपत्ररसं दद्यात्पानार्थं मधुसंयुतम् ।
कफजायां मसूर्यां तु कठिनायां विशेषतः ॥ २ ॥

मोठ्या पंचमूळांचा अडुळशाच्या पानांसह काढा करावा. तो कफजन्य मसूरिकांचा नाश करतो. कफजन्य व विशेषतः कठीण अशा मसूरिकांवर अडुळशाचा रस मध घालून पिण्यास द्यावा.

खदिरारिष्टपत्रैश्च शिरीषोदुम्बरत्वचाम् ।
कुर्याल्लेपं कफोत्थायां मसूर्यां भिषगुत्तमः ॥ ३ ॥

कफजन्य मसूरिकांवर खैराची साल, बाळंतलिंबाचा पाला, शिरसाची साल व औदुंबराची साल ह्यांचा लेप करावा.

दुरालभादि काढा.

दुरालभा पर्पटकं पटोलं कटुरोहिणी ।
पिबेन्मसूर्यामेतेषां क्वाथं पित्तकफात्मनि ॥ ४ ॥

धमासा, पित्तपापडा, पडवळ व कुटकी, ह्यांचा काढा कफपित्तजन्य मसूरिकेवर प्यावा.

गुडूच्यादि योग.

गुडूचीपर्पटानन्ताकटुकाक्कथितं पिबेत् ।
वातपित्तमसूर्यां तु घोरोपद्रवभाजि च ॥ १ ॥

गुळवेल, पित्तपापडा, धमासा व कुटकी ह्यांचा काढा भयंकर उपद्रवयुक्त अशा वातपित्तजन्य मसूरिकांवर द्यावा.

नागरादि काढा.

नागरमुस्तगुडूचीधान्यकभार्गीवृषैः कृतः क्वाथः ।
वातश्लेष्ममसूरीं दूरीकुरुतेऽनुपानतः सत्यम् ॥ १ ॥

सुंठ, नागरमोथे, गुळवेल, धने, भारंगमूळ व अडुळसा ह्यांचा काढा घेतला असतां तो कफवातजन्य मसूरिकांना दूर करतो.

निंबादि काढा.

निम्बः पर्पटकं पाठा पटोलं कटुरोहिणी ।
वासा दुरालभा धात्री ससेव्यं चन्दनद्वयम् ॥ १ ॥
एष निम्बादिकः क्वाथः पीतः शर्करयाऽन्वितः ।

मसूरीं सर्वजां हन्ति ज्वरवीसर्पसंयुताम् ॥ २ ॥

बाळंतनिंबाची साल, पित्तपापडा, पहाडमूळ, पडवळ, कुटकी, अडुळसा, धमासा, आवळकाठी, काळा वाळा, व तांबडा व पांढरा चंदन हा निंबादि काढा साखर घालून द्यावा. तो ज्वर व विसर्प ह्यांसह त्रिदोषजन्य मसूरिकेचा नाश करतो.

कांचनारादि काढा.

काञ्चनारत्वचः क्वाथस्ताप्यचूर्णावचूर्णितः ।
निर्गत्यान्तः प्रविष्टां तु मसूरीं बाह्यतो नयेत् ॥ १ ॥

कांचनाच्या सालीचा काढा सुवर्णमाक्षिकाचें चूर्ण घालून द्यावा. तो अंतर्गत झालेल्या मसूरिकांना बाहेर काढतो.

पटोलादि काढा.

पटोलकुण्डलीमुस्तावृषधन्वयवासकैः ।
भूनिम्बनिम्बकटुकापर्पटैश्च शृतं जलम् ॥ १ ॥
मसूरीं शमयेदामां पक्कां चैव विशोधयेत् ।
नातः परतरं किंचिच्छीतलाज्वरशान्तये ॥ २ ॥
दाहे ज्वरे विसर्पे च व्रणे पित्ताधिकेऽपि च ।

पडवळ, गुळवेल, नागरमोथे, अडुळसा, धमासा, काडेचिराईत, कडुनिंबाची साल, कुटकी व पित्तपापडा ह्यांचा काढा अपक्क मसूरिकांचें शमन करतो, आणि पक्क मसूरिकांचें शोधन करतो. शीतलाज्वरशांतीसाठीं ह्यासारखें दुसरें औषध नाहीं. दाह, ज्वर, विसर्प व पित्ताधिक व्रण ह्यांजवरही हा काढा द्यावा.

मसूर्यो रक्तजा नाशं यान्ति शोणितमोक्षणैः ॥ ३ ॥

रक्तजन्य मसूरिका, रक्त काढलें असतां बऱ्या होतात.

धात्रीफलं समधुकं क्वथितं मधुसंयुतम् ।
मुखे कण्ठे व्रणे जाते गण्डूषार्थं प्रशस्यते ॥ ४ ॥

तोंडांत व घशांत व्रण झाले असतां आवळकाठी व जेष्टमध ह्यांचा काढा मध घालून गुळण्या करण्यास द्यावा.

अक्ष्णोः सेकं प्रशंसन्ति गवेधुमधुकाम्बुना ।

डोळ्यांत मसूरिका झाल्या असल्यास जेष्टमध व कसईचें बी ह्यांच्या काढ्यांत मध घालून तें डोळ्यावर शिंपडावें.

मधुकं त्रिफला मूर्वा दार्वीत्वङ्‌ नीलमुत्पलम् ॥ ५ ॥

उशीरलोध्रमञ्जिष्ठाः प्रलेपाश्चोतने हिताः ।
नश्यन्त्यनेन दृग्जाता मसूर्यो न भवन्ति च ॥ ६ ॥

जेष्टमध, हिरडा, बेहडा, आवळकाठी, मोरवेल, दारुहळदीची साल, निळें कमळ, वाळा, लोध्र, मंजिष्ट, हीं औषधें डोळ्यावर लेप करण्यास व पोथंडी करण्यास फार चांगलीं आहेत. ह्या प्रयोगानें डोळ्यांत झालेल्या मसूरिका बऱ्या होतात व पुनः होत नाहींत.

अंजन.

शम्बूकमांसस्वरसेन नेत्रे समञ्जयेत्तेन मसूरिकाभ्यः ।
न जायते तत्र भयं भवन्ति नैताः प्रजातास्तु शमं प्रयान्ति ॥१॥

शिंपांतील किड्यांच्या मांसाचा रस काढून त्याचें अंजन करावें, म्हणजे मसूरिकांपासून भीति नसते. यामुळें मसूरिका होत नाहींत; आणि झाल्या असल्या तर त्या बऱ्या होतात.

प्रलेपं चक्षुषोर्दद्याद्वहुवारस्य वल्कलैः ।
पञ्चवल्कलचूर्णेन क्लेदिनीमवधूलयेत् ॥ १ ॥
भस्मना केचिदिच्छंति केचिद्गोमयरेणुना ।

भोकरीच्या झाडाच्या सालीचा डोळ्यावर लेप करावा. ज्या मसूरिका चिघळल्या असतील त्यांजवर पंचवल्कलाचें (वड, पिंपळ, पिंपरणी, नांदरूख व आंबा ह्यांच्या सालीचें) चूर्ण टाकावें. यांचें भस्म टाकावें असें कित्येक म्हणतात व गाईच्या शेणाचा गोवर (चूर) टाकावा असें कित्येक म्हणतात.

निम्बातिमुक्तकास्फोताबिम्बीवेतसवल्कलम् ॥ २ ॥
शृतशीतं प्रयोक्तव्यं मसूरीव्रणधावने ।
रालहिंगुरसोनैश्च धूपयेत्ता मसूरिकाः ।
कृमयो न पतन्त्यत्र जाताः शाम्यन्ति ते लघु ॥ ३ ॥

कडुनिंबाची साल, मधुमाधवी, तोंडली, वेताची साल हीं औषधें टाकून शिजविलेलें पाणी मसूरिकेचे व्रण धुण्याकरितां द्यावें. त्या व्रण झालेल्या मसूरिकांना राळ, हिंग, व लसूण ह्यांची धुरी द्यावी. म्हणजे त्यांत किडे होत नाहींत; आणि झालेच असले तर त्वरित नाश पावतात.

शीतला (मसूरिकांचा एक भेद.)

देव्या शीतलया क्रान्ता मसूर्येव हि शीतला ।

ज्वर एव यथा भूताधिष्ठितो विषमज्वरः ॥ १ ॥
सा च सप्तविधा ख्याता तासां भेदान्प्रचक्ष्महे ।

शीतला देवीच्या योगानें येणाऱ्या ज्या देवी (शीतला) त्या देखील मसूरिकाच होत. त्या आल्या असतां भूताभिषंग विषमज्वरासारखा ज्वर येतो. त्या शीतला देवी सात प्रकारच्या आहेत. त्यांचे भेद सांगतों.

ज्वरपूर्वा बृहत्स्फोटैः शीतला बृहती भवेत् ॥ २ ॥
सप्ताहान्निःसरत्येषा सप्ताहात्पूर्णतां व्रजेत् ।
ततस्तृतीये सप्ताहे शुष्यति स्खलति त्वचम् ॥ ३ ॥
तासां मध्ये यदा काश्चित्पाकं गत्वा स्रवन्ति च ।
तत्रावधूलनं कुर्याद्वनगोमयभस्मना ॥ ४ ॥
निम्बसत्पत्रशाखाभिर्मक्षिकामपसारयेत् ।
जलं च शीतलं दद्याज्ज्वरेऽपि न तु तप्तकम् ॥ ५ ॥
स्वापयेत्तं स्थले पूते रम्ये रहसि शीतले ।
नाशुचिः संस्पृशेत्तं तु न च तस्यान्तिकं व्रजेत् ॥ ६ ॥
बहवो भिषजो नात्र भेषजं योजयन्ति हि ।
केचित्प्रयोजयन्त्येव मतं तेषामथो ब्रुवे ॥ ७ ॥

पूर्वी ज्वर येऊन जिच्यामध्यें मोठे फोड येतात, त्या शीतलेला बृहती असें म्हणतात. ह्या सात दिवसपर्यंत येत असतात. पुढच्या सात दिवसांमध्यें पूर्ण होतात. नंतर पुढील तिसऱ्या सात दिवसांत त्या सुकतात. व त्यांच्या खपल्या पडतात. त्यांतील कांहीं देवी (फोड्या) जर पिकल्या व वाहूं लागल्या तर त्यांजवर गाईच्या शेणाची राख टाकावी, आणि कडुलिंबाच्या पानाच्या ढाळ्यानें माशा वाराव्या. ह्या देवींमध्यें जरी ज्वर असला तरी थंड पाणीच प्यावयास द्यावें; ऊन पाणी देऊं नये. या देवी आलेल्या रोग्याला पवित्र, रम्य व शीतळ अशा एकांत स्थळीं निजवावें. अपवित्र मनुष्यानें त्याला शिवूं नये व त्याजवळ कोणी जाऊं नये. बहुतेक वैद्य ह्याजवर औषधोपचार करीत नाहींत. जे कित्येक ह्याजवर औषधोपचार करितात त्यांचें मत सांगतों.

ये शीतलेन सलिलेन विपिष्य सम्यक्
चिञ्चोत्थबीजसहितां रजनीं पिबन्ति ।

तेषां भवन्ति न कदाचिदपीह देहे
पीडाकरो जगति शीतलिकाविकारः ॥ ८ ॥

जे लोक चिंचोका व हळद थंड पाण्यांत वाटून पितात, त्यांना पीडाकारक असा शितला देवीचा आजार केव्हांही होत नाहीं.

मोचारसेन सहितं सितचन्दनं ये
वासारसेन मधुकं मधुकेन वाऽथ ।
आदौ पिबन्ति सुमनास्वरसेन मिश्रं
ते नाप्नुवन्ति भुवि शीतलिकाविकारम् ॥ ९ ॥

पांढऱ्या शेवरीच्या रसांतून पांढरा चंदन, अडुळशाच्या रसांतून जेष्टमध अथवा जाईच्या पाल्याच्या रसांतून जेष्टमधाचें चूर्ण जे पितात, त्यांना शीतला देवीचा आजार होत नाहीं.

शीतलासु क्रिया कार्या शीतलारक्षया सह ।
बध्नीयान्निम्बपत्राणि परितो भवनान्तरे ॥ १० ॥
कदाचिदपि नो कार्यमस्पृश्यस्य प्रवेशनम् ।

शीतला देवी (फोड्या; मसूरिका) झाल्या असल्यास "शीतलाष्टक" स्तोत्राचा पाठ चालू ठेवून औषधोपचार करावे. घरा भोंवतीं कडुलिंबाच्या पानांचे ढाळे बांधावे; आणि अस्पर्श (अपवित्र) मनुष्याला त्या घरांत जाऊं देऊं नये.

स्फोटेष्वधिकदाहेषु रक्षारेणूत्करो हितः ॥ ११ ॥
तेन ते शोषमायान्ति प्रकोपं न भजन्ति च ।

पिकलेल्या फोडांचा अतिशय दाह होत असल्यास त्यांजवर गाईच्या शेणाचें भस्म व पित्तपापड्याचें चूर्ण टाकावें. म्हणजे ते सुकतात व पुनः वाढत नाहींत.

चन्दनं वासको मुस्तं गुडूची द्राक्षया सह ।
एषां शीतकषायस्तु शीतलाज्वरनाशनः ॥ १२ ॥

पांढरा चंदन, अडुळसा, नागरमोथे, गुळवेल व मनुका ह्यांचा 'शीतकषाय' करून द्यावा. तो शीतला ज्वराची शांति करतो.

जपहोमोपहारैश्च दानस्वस्त्ययनार्चनैः ।
विप्रगोशंभुगौरीणां पूजनैस्ताः शमं नयेत् ॥ १३ ॥
स्तोत्रं च शीतलादेव्याः पठेच्छीतलिनोऽन्तिके ।
ब्राह्मणः श्रद्धया युक्तस्तेन शाम्यन्ति शीतलाः ॥ १४ ॥

जप, होम, नैवेद्य, दान, पुण्याहवाचन, पूजन, ब्राह्मण, गाई,

महादेव व देवी ह्यांची पूजा वगैरे कर्मानें त्यांची शांति करावी. ज्याला देवी आल्या आहेत त्याच्याजवळ बसून शीतळा देवीच्या स्तोत्राचा पाठ श्रद्धापूर्वक ब्राह्मणाकडून करवावा. म्हणजे या देवी बऱ्या होतात.

शीतलेचे भेद.

कफमारुतसंभूतः कोद्रवो नामतो गदः।
अपाकः कोद्रवाकारः सूचीनिस्तोदकारकः ॥ १ ॥
जलशूक इवाङ्गेषु विध्यतीव विशेषतः।
सप्ताहाद्वा दशाहाद्वा शान्तिं याति विनौषधैः ॥ २ ॥
यदि वा भेषजं दद्यात्खदिराष्टकनिर्मितम्।
कषायं हि तदा दद्यात्कोद्रवस्य प्रशान्तये ॥ ३ ॥

कफवातापासून कोद्रव (गोवर) नांवाचा एक रोग होतो. त्यांत न पिकणारे, हरीक धान्याच्या आकाराचे सुईनें टोंचल्यासारखी पीडा करणारे फोड येतात. पाण्यांतील विषारी जंतु अंगाला लागल्यानें जशी पीडा होते, तशी ह्यानें पीडा होते. हा विकार सात किंवा दहा दिवसांत औषधावांचून बरा होतो. जर औषध द्यावयाचेंच असेल तर त्याचे शांतीकरितां खदिराष्टकाचा काढा द्यावा.

खदिरत्रिफलानिम्बपटोलामृतवासकः।
अष्टकोऽयं जयेत्कुष्ठकण्डूविस्फोटकानि च ॥ ४ ॥
विसर्पपामाकिटिभं शीतपित्तसूरिके।

खैराची साल, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, बाळंत निंबाची साल, पडवळ, गुळवेल व अडुळसा, ह्याला खदिराष्टक म्हणतात. ह्याचा काढा कुष्ट, कंडु, विस्फोटक, विसर्प, खरूज, किटिभ कुष्ट, शीतपित्त, व मसूरिका ह्यांना जिंकतो.

काश्चिद्विनाऽपि यत्नेन सुखं सिध्यन्ति शीतलाः ॥ ५ ॥
दुष्टाः कष्टतराः काश्चित्काश्चित्सिध्यन्ति वा न वा।
काश्चिन्नैव तु सिध्यन्ति यत्नतोऽपि चिकित्सिताः ॥ ६ ॥

कित्येक देवी यत्नावांचूनही बऱ्या होतात. कित्येक दूषित असल्या म्हणजे अत्यंत कष्टदायक होतात. कित्येक झाल्या तर साध्य होतात अगर होत नाहींत. आणि कित्येक तर मोठ्या प्रयत्नानें उपचार करूनही साध्य होत नाहींत.

पथ्यापथ्य.

जीर्णाः षष्टिकशालयोऽपि चणका मुद्गा मसूरा यवाः
सर्वेऽपि प्रतुदाः कपोतचटकापृष्ट्याह्वदात्यूहकाः ।
कर्कोटं कदलं च शिग्रु कुलकं द्राक्षाफलं दाडिमं
मेध्यं बृंहणमन्नपानमखिलं कोलानि मांसो रसः ॥ १ ॥
अक्ष्णोः सेकविधौ गवेधुमधुकोद्भूतं सुशीतोदकं
शम्बूकोदरकोशनीरमपि वा कर्पूरचूर्णानि वा
पक्वो मुद्गरसोऽपि जाङ्गलरसः शालिश्च शाकं घृतं
धूपो गोमयभस्मगुण्ठनमथो शेषा व्रणोक्तक्रियाः ॥ २ ॥
इत्थं सर्वदशा विभागविहितं पथ्यं यथादोषतः
संयुक्तं मुदमातनोति नितरां नृणां मसूरीगदे ॥ ३ ॥

जुने साठे तांदूळ, हरभरे, मूग, मसूरा, सातू, चोंचीनें टोंचून भक्ष्य मिळविणाऱ्या सर्व प्राण्यांचें मांस, कवडा, चिमणी, चितळ-पक्षी, चातकपक्षी, कटोंली, केळ, शेवगा, पडवळ, द्राक्षें, डाळिंब, बुद्धिवर्धक व पौष्टिक असें अन्नपान, बोरें व मांसरस, हे पदार्थ खाण्यास द्यावे. डोळ्यांवर शिंपडण्याकरितां कसईचें बीं व जेष्टमध ह्यांचा थंडगार काढा, किंवा शिंपांमधील किड्यांच्या मांसाचा रस अथवा कापूर द्यावा. मुगाचें कढण, जांगल मांसाचा रस, शालिंच नांवाची भाजी (बंगाल प्रांतांत प्रसिद्ध आहे), तूप, धुरी, गाईच्या शेणाची राख फोडावर फेकणें, आणि व्रणावरील बाकीच्या क्रिया हें दोषानुरूप पथ्य योजावें. तें मसूरिकेच्या आजारांत सुख देतें.

वातं स्वेदं श्रमं तैलं गुर्वन्नं क्रोधमातपम् ।
कट्वम्लं वेगरोधं च मसूरीगदवांस्त्यजेत् ॥ ४ ॥

वारा, घाम काढणें, श्रम, तेल, जड अन्न, रागावणें, ऊन घेणें, तिखट व आंबट पदार्थ व मलमूत्रादिकांचा वेग आवरून धरणें हे प्रकार मसूरिका झालेल्या रोग्यानें वर्ज करावे.

क्षुद्ररोग निदान.

समासेन चतुश्चत्वारिंशत्क्षुद्ररोगा भवन्ति तद्यथा ।

क्षुद्ररोग चवेचाळीस आहेत. ते असेः—

अजगल्लिका.

स्निग्धा सवर्णा ग्रथिता नीरुजा मुद्गसन्निभा ।

कफवातोत्थिता ज्ञेया बालानामजगल्लिका ॥ १ ॥

लहान मुलांना कफवातापासून, न दुखणाऱ्या, मुगासारख्या वर्णाच्या व स्निग्ध अशा गांठी होतात, त्यांना अजगल्लिका म्हणतात.

यवप्रख्या.

यवाकारा सुकठिना ग्रथिता मांससंश्रिता ।
पिटिका श्लेष्मवाताभ्यां यवप्रख्येति सोच्यते ॥ २ ॥

कफवातापासून जवासारख्या, मांसाच्या आश्रयानें होणाऱ्या व अतिशय कठीण अशा गांठी होतात, त्यांना यवप्रख्या असें म्हणतात.

अंधालजी.

घनामवक्त्रां पिटिकामुन्नतां परिमण्डलाम् ।
अन्धालजीमल्पपूयां तां विद्यात्कफवातजाम् ॥ ३ ॥

कठीण, बिनतोंडाची, उचललेली, वाटोळी अशी एक गांठ कफवातापासून होते. तिजमधून थोडा पू येतो तिला अंधालजी म्हणतात.

विवृता.

विवृतास्यां महादाहां पक्वोदुम्बरसंनिभाम् ।
विवृतामिति तां विद्यात्पित्तोत्थां परिमण्डलाम् ॥ ४ ॥

पित्तदोषामुळें, पिकलेल्या उंबराप्रमाणें दिसणारी, वाटोळी, अत्यंत दाहयुक्त व पसरट तोंडाची जी पुळी होते, तिला विवृता म्हणतात.

कच्छपिका.

ग्रथिताः पञ्च वा षड् वा दारुणाः कच्छपोन्नताः ।
कफानिलाभ्यां संभूता ज्ञेयाः कच्छपिका बुधैः ॥ ५ ॥

कफवातापासून, कासवाच्या पाठीसारख्या पांच किंवा सहा गांठी एके ठिकाणीं होतात, त्यांना कच्छपिका म्हणतात. त्या फार कठीण असतात.

वारूळ.

ग्रीवांसकक्षकरपाददेशे संधौ गले वा त्रिभिरेव दोषैः ।
ग्रन्थिः सवल्मीकवदक्रियाणां जातः क्रमेणैव गतः स वृद्धिम् ६
मुखैरनेकैः स्रुतितोदवद्भिर्विसर्पवत्सर्पति चोन्नताग्रैः ।
वल्मीकमाहुर्भिषजो विकारं निष्प्रत्यनीकं चिरजं विशेषात् ७

मान, खांदा, काख, हात, पाय, सांधे किंवा गळा ह्या ठिकाणीं तिन्ही दोषांपासून वारुळासारखी वाढणारी एक गांठ होते. तिजवर

उपचार केले नाहींत तर ती हळूहळू वाढूं लागते. आणि तिला पुष्कळ तोंडें पडून तीं वाढूं लागतात. ती गांठ विसर्पाप्रमाणें पसरते व उंच वाढते. हिला वैद्य वल्मीक (वारूळ) असें म्हणतात. ह्याजवर उपचार चालत नाहींत. हें जुनें झालें तर असाध्यच होतें.

इंद्रवृद्धा.

पद्मकर्णिकवन्मध्ये पिटिकां पिटिकाचिताम् ।
इन्द्रवृद्धां तु तां विद्याद्वातपित्तोत्थितां भिषक् ॥ ८ ॥

वातपित्तापासून कमळांतील कर्णिकेप्रमाणें मध्यें एक गांठ होऊन तिजवर अनेक बारीक बारीक गांठी होतात. तिला इंद्रवृद्धा असें म्हणतात.

गर्दभिका.

मण्डलं वृत्तमुत्सन्नं सरक्तं पिटिकाचितम् ।
रुजाकरीं गर्दभिकां तां विद्याद्वातपित्तजाम् ॥ ९ ॥

वातपित्तामुळें एक वाटोळें, वर उचललेलें, तांबडें लाल व बारीक बारीक पुटकुळ्यांनीं युक्त असें मंडळ होतें. त्यांत ठणका फार असतो. त्याला गर्दभिका असें म्हणतात.

पाषाणगर्दभ.

वातश्लेष्मसमुद्भूतः श्वयथुर्हनुसंधिजः ।
स्थिरो मन्दरुजः स्निग्धो ज्ञेयः पाषाणगर्दभः ॥ १० ॥

वातपित्तापासून हनुवटीच्या सांध्याच्या ठिकाणीं एक सूज येते. ती स्थिर असून तींत वेदना कमी असतात. व ती तुळतुळीत असते. तिला पाषाणगर्दभ म्हणतात.

पनसिकालक्षण.

कर्णस्याभ्यन्तरे जातां पिटिकामुग्रवेदनाम् ।
स्थिरां पनसिकां तां तु विद्यादन्तःप्रपाकिनीम् ॥ ११ ॥

कानाच्या आंत अत्यंत वेदनायुक्त अशी गांठ होते. ती स्थिर व आंतून पिकणारी असते. तिला पनसिका असें म्हणतात.

जालगर्दभ.

विसर्पवत्सर्पति यः शोफस्तनुरपाकवान् ।
दाहज्वरकरः पित्तात्स ज्ञेयो जालगर्दभः ॥ १२ ॥

पित्तदोषानें विसर्पासारखी पसरणारी, पातळ व न पिकणारी अशी सूज येते. तिचा दाह होतो व त्यामुळें ज्वर येतो. ह्या विकाराला जालगर्दभ असें म्हणतात.

इरिवेल्लिका.

पिटिकामुत्तमाङ्गस्थां वृत्तामुग्ररुजाज्वराम् ।
सर्वात्मिकां सर्वलिंगां जानीयादिरिवेल्लिकाम् ॥ १३ ॥

अत्यंत वेदनायुक्त, तीव्र ज्वरकारक व वाटोळी अशी एक गांठ मस्तकावर येते. ही त्रिदोषापासून होते, आणि त्रिदोषाचीं सर्व लक्षणें हिजमध्यें असतात. हिला इरिवेल्लिका असें म्हणतात.

कक्षा व गंधनाम्नी.

बाहुकक्षांसपार्श्वेषु कृष्णस्फोटां सवेदनाम् ।
पित्तप्रकोपसंभूतां कक्षामिति विनिर्दिशेत् ॥ १४ ॥

बाहु, बरगड्या, खांदे व काखा ह्या ठिकाणीं पित्तप्रकोपापासून वेदनायुक्त व काळ्या फोडांनीं व्यापलेली अशी एक गांठ होते. तिला कक्षा (काखमांजरी) असें म्हणतात.

एकामेतादृशीं दृष्ट्वा पिटिकां स्फोटसंनिभाम् ।
त्वग्गतां पित्तकोपेन गन्धनाम्नीं प्रचक्षते ॥ १५ ॥

कांखेमध्यें त्वचेच्या ठिकाणी काळ्या फोडासारखी एकच गाठ पित्तप्रकोपामुळें होते. तिला गंधनाम्नी असें म्हणतात.

अग्निरोहिणीलक्षण.

कक्षाभागेषु ये स्फोटा जायन्ते मांसदारणाः ।
अन्तर्दाहज्वरकरा दीप्तपावकसंनिभाः ॥ १६ ॥
सप्ताहाद्वा दशाहाद्वा पक्षाद्वा घ्नन्ति मानवम् ।
तामग्निरोहिणीं विद्यादसाध्यां संनिपातजाम् ॥ १७ ॥

काखेच्या आसपास मांसविदारण करणारे जे फोड येतात, त्यामुळें अभ्यंतरीं दाह होतो. वेदना व ज्वर हीं लक्षणें होतात. फोडाच्या ठिकाणीं अग्नीनें भाजल्याप्रमाणें आग होते. त्यायोगें सात, दहा किंवा पंधरा दिवसांत रोगी मरतो. तिला अग्निरोहिणी असें म्हणतात. ती सर्व दोषांपासून होते. ही असाध्य आहे.

चिप्यलक्षण.

नखमांसमधिष्ठाय वातः पित्तं च देहिनाम् ।
कुर्वाते दाहपाकौ च तं व्याधिं चिप्यमादिशेत् ॥ १८ ॥

वात व पित्त हे दोष मनुष्याच्या नखांतील दोषांचा आश्रय करून त्या ठिकाणीं दाह उत्पन्न करितात. त्यामुळें नख पिकतें. त्याला चिप्य (नखुडें) असें म्हणतात.

कुनखलक्षण.

अभिघातात्प्रदुष्टो यो नखो रूक्षासितः खरः ।
भवेत्तं कुनखं विद्यात्कुलीरमिति संज्ञितम् ॥ १९ ॥

नखावर कशाचा तरी आघात झाल्यानें नख काळें व रूक्ष होतें. त्याला कुलीर किंवा कुनख असें म्हणतात.

अनुशयीचें लक्षण.

गम्भीरामल्पसंरम्भां सवर्णामुपरि स्थिताम् ।
पादस्यानुशयीं तां तु विद्यादन्तःप्रपाकिनीम् ॥ २० ॥

खोल असणारी, किंचित् सुजलेली, त्वचेच्या वर्णाची, वर उचललेली, व आंत पिकलेली अशी पायावर जी गांठ येते, तिला अनुशयी असें म्हणतात.

विदारिकालक्षण.

विदारीकन्दवद्वृत्ता कक्षावंक्षणसंधिषु ।
विदारिका भवेद्रक्ता सर्वजा सर्वलक्षणा ॥ २१ ॥

भुईकोहळ्याचे कांद्याप्रमाणें वाटोळी व तांबूस अशी एक गांठ काखेंत किंवा अडसंधीमध्यें होते, तिला विदारिका असें म्हणतात. ही त्रिदोषापासून होते. त्रिदोषाचीं सर्व लक्षणें हिजमध्यें असतात.

शर्करा व शर्करार्बुद यांचें लक्षण.

प्राप्य मांसं शिरास्नायूर्मेदः श्लेष्मा तथाऽनिलः ।
ग्रन्थिं करोत्यसौ भिन्नो मधुसर्पिर्वसानिभम् ॥ २२ ॥
स्रवत्यास्रावमत्यर्थं तत्र वृद्धिं गतोऽनिलः ।
मांसं विशोष्य ग्रथितां शर्करां जनयेत्ततः ॥ २३ ॥
दुर्गन्धि क्लिन्नमत्यर्थं नानावर्णं ततः शिराः ।
स्रवन्ति सहसा रक्तं तं विद्याच्छर्करार्बुदम् ॥ २४ ॥

कफ व वात हे मेद, मांस, शिरा व स्नायु ह्यांचा आश्रय करून एक गांठ उत्पन्न करितात. ती फुटली म्हणजे मध, तूप किंवा चर्बी ह्यांच्यासारखा तिच्यामधून स्राव होतो. त्यामुळें मेद व मांस क्षीण होऊन वायु प्रकुपित होतो आणि मांसाला शुष्क करून तो शर्करा उत्पन्न करितो. त्या शर्करेंतील शिरांतून दुर्गंधयुक्त, बुळबुळीत व अनेक रंगाचें रक्त अकस्मात् वाहूं लागतें. ह्याला शर्करार्बुद असें म्हणतात.

पाददारीचें लक्षण.

परिक्रमणशीलस्य वायुरत्यर्थरूक्षयोः ।
पादयोः कुरुते दारीं सरुजां तलसंश्रिताम् ॥ २५ ॥

नेहमी पायीं प्रवास करणाऱ्या मनुष्याच्या दोन्हीं पायांतील वायु प्रकुपित होऊन पायाला रूक्षपणा आणतो. त्यामुळें पायाच्या तळव्याला भेगा पडतात व ठणकतात. त्यांना पाददारी असें म्हणतात

कदराचें लक्षण.

शर्करोन्मथिते पादे क्षते वा कण्टकादिभिः ।
ग्रंथिः कोलवदुत्सन्नो जायते कदरं तु तत् ॥ २६ ॥

काटा वगैरे बोंचून पायाला क्षत पडलें असतां, त्यांत वाळूचा खडा शिरला असतां, किंवा आंत काटा तसाच राहिला असतां तो त्या ठिकाणीं बोराप्रमाणें गांठ उत्पन्न करितो. तिला कदर म्हणजे कुरूप असें म्हणतात.

चिखल्याचें लक्षण.

क्लिन्नांगुल्यन्तरौ पादौ कण्डूदाहरुजान्वितौ ।
दुष्टकर्दमसंस्पर्शादलसं तं विभावयेत् ॥ २७ ॥

घाणेरड्या चिखलांतून हिंडल्यानें पायाच्या बोटांमध्यें ओलसरपणा उत्पन्न होतो; आणि त्या ठिकाणीं कंड सुटून आग होते व ठणका लागतो. त्याला अलस (चिखल्या) असें म्हणतात.

इंद्रलुप्ताचें लक्षण.

रोमकूपानुगं पित्तं वातेन सह मूर्च्छितम् ।
प्रच्यावयति रोमाणि ततः श्लेष्मा सशोणितः ॥ २८ ॥

रुणाद्धि रोमकूपांस्तु ततोऽन्येषामसंभवः ।
तदिन्द्रलुप्तं खालित्यं रुजेति च विभाव्यते ॥ २९ ॥

रोमकूपांचा आश्रय करून राहिलेलें पित्त वायूसह प्रकोप पावतें. त्यामुळें त्या ठिकाणचे केस गळतात. ते गळले असतां कफ हा रक्तासह रोमरंध्राचीं तोंडें बंद करितो. त्यामुळें त्या ठिकाणीं पुनः केस येत नाहींत. त्याला इंद्रलुप्त किंवा खालित्य किंवा रुजा असें म्हणतात.

दारुणालक्षण.

दारुणा कण्डरा रूक्षा केशभूमिः प्रजायते ।
कफमारुतकोपेन विद्याद्दारुणकं तु तत् ॥ ३० ॥

कफवातापासून केस येण्याची जागा कठीण होऊन खाजते व ती रूक्ष होऊन त्या ठिकाणीं भेगा पडतात. त्याला दारुण अथवा दारणा असें म्हणतात.

अरुंषिकालक्षण.

अरूंषि बहुवक्त्राणि बहुक्लेदीनि मूर्धनि ।
कफासृक्कृमिकोपेन तानि विद्यादरुंषिकाम् ॥ ३१ ॥

कफ, रक्त व कृमि ह्यांचा प्रकोपामुळें डोक्यामध्यें एक प्रकारचे सूक्ष्म व्रण होतात. त्यांना बारीक बारीक अशीं पुष्कळ छिद्रें असतात. त्यांतून लस वाहते. त्यांना अरुंषिका (खवडे) असें म्हणतात.

पलिताचें लक्षण.

क्रोधशोकश्रमकृतः शरीरोष्मा शिरोगतः ।
पित्तं च केशान्पचति पलितं तेन जायते ॥ ३२ ॥
वातिकं विषमं रूक्षं पीतं पित्तात्सितं कफात् ।
सर्वरूपान्वितं विद्यात्संनिपातसमुत्थितम् ॥ ३३ ॥

क्रोध, शोक, व श्रम ह्यांपासून उत्पन्न झालेली उष्णता व पित्त मस्तकांत शिरून केस पिकवितात, त्याला पलित म्हणतात. वातानें पिकणारे केस विषम व रूक्ष दिसतात. पित्तदोषामुळें पिवळे व कफानें पांढरे होतात. तिन्हीही दोषांच्या पलितामध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें असतात.

यौवनपीटिकालक्षण.

शाल्मलीकण्टकप्रख्याः कफमारुतरक्तजाः ।
जायन्ते पिटिका यूनां विज्ञेया मुखदूषिकाः ॥ ३४ ॥

कफ, वात व रक्त ह्यांपासून शेवरीच्या कांट्यासारख्या पुटकुळ्या तरुण मनुष्याच्या तोंडावर येतात. त्यांना यौवनपीटिका किंवा तारुण्यपीटिका असें म्हणतात.

पद्मिनीकंटक.

कण्टकैराचितं वृत्तं कण्डूमत्पाण्डुमण्डलम् ।
पद्मिनीकण्टकप्रख्यैस्तदाख्यं ककवातजम् ॥ ३५ ॥

कांट्यांनीं व्यापलेलें, वाटोळें, कंडुयुक्त व पांढरें असें एक मंडळ उठतें. त्याला पद्मिनीकंटक असें म्हणतात. हें कफवातापासून होतें.

जतुमणी.

सममुत्सन्नमरुजं मण्डलं कफरक्तजम् ।
सहजं लक्ष्म चैकेषां लक्ष्यो जतुमणिस्तु सः ॥ ३६ ॥
कृष्णः स्निग्धो जतुमणिर्ज्ञेयो वातोत्तरैस्त्रिभिः ।
अरुजं त्वपरे रक्तं लक्ष्मेत्याहुर्भिषग्वराः ॥ ३७ ॥

जन्मतःच एखाद्याच्या अंगावर कफरक्तापासून, न ठणकणारें, स्निग्ध व किंचित वर उचललेलें एक मंडळ असतें. त्याला जतुमणी अगर लक्ष्म (लांसें) असें म्हणतात. हा त्रिदोषात्मक आहे, असें चरकानें म्हटलें आहे. तें असें:-काळा व स्निग्ध असा जो जतुमणी तो वाताधिक त्रिदोषापासून झालेला असतो. व ठणकणारा व तांबूस असा जो जतुमणी त्याला लक्ष्म असें वैद्य म्हणतात.

माष (मस)

अवेदनं स्थिरं चैव यस्मिन्गात्रे प्रदृश्यते ।
माषवत्कृष्णमुत्सन्नमनिलान्माषमादिशेत् ॥ ३८ ॥
वातेरिते त्वचि यदा दूष्येते कफमेदसी ।
श्लक्ष्णं मृदु सवर्णं च कुर्यात्तं माषकं वदेत् ॥ ३९ ॥

वेदनारहित, स्थिर, उडदाप्रमाणें काळसर, व किंचित वर उचललेला असा जो डाग दिसतो, त्याला माष (मस) असें म्हणतात. तसेंच भोज म्हणतोः—वाताच्या योगानें त्वचेच्या ठिकाणीं दूषित

झालेले कफ व मेद स्निग्ध, मृदु व उडदाप्रमाणें काळें मंडळ उत्पन्न करितात. त्याला माषक असें म्हणतात.

तिलकालक.

कृष्णानि तिलमात्राणि नीरुजानि समानि च ।
वातपित्तकफोद्रेकात्तान्विद्यात्तिलकालकान् ॥ ४० ॥

तिन्हीही दोषांच्या प्रकोपामुळें त्वचेवर तिळासारखे काळे, न दुखणारे व स्निग्ध डाग उत्पन्न होतात. त्यांला तिलकालक (तीळ) असें म्हणतात.

न्यच्छ.

महद्वा यदि वा चाल्पं श्यावं वा यदि वाऽसितम् ।
नीरुजं मण्डलं गात्रे न्यच्छमित्यभिधीयते ॥ ४१ ॥

मोठें अथवा लहान, निळें अथवा काळें आणि वेदनारहित असें जें मंडळ अंगावर उठतें, त्याला न्यच्छ असें म्हणतात.

वांगाचें लक्षण.

क्रोधायासप्रकुपितो वायुः पित्तेन संयुतः ।
मुखमागत्य सहसा मण्डलं विसृजत्यतः ॥ ४२ ॥
नीरुजं तनुकं श्यावं मुखव्यङ्गं तमादिशेत् ॥

राग व श्रम ह्यांनीं कुपित झालेला वायु पित्तासह तोंडावर येऊन पातळ, वेदनारहित व निळ्या रंगाचें मंडळ उत्पन्न करितो. त्याला व्यंग (वांग) असें म्हणतात.

नीलिका.

कृष्णमेवंगुणं गात्रे मुखे वा नीलिकां विदुः ॥ ४३ ॥

वांगाप्रमाणेंच अंगावर किंवा तोंडावर काळे डाग उठतात, त्यांना नीलिका असें म्हणतात.

परिवर्तिका.

मर्दनात्पीडनाद्वाऽपि तथैवाप्यभिघाततः ।
मेढ्रचर्म यदा वायुर्भजते सर्वतश्चरन् ॥ ४४ ॥
तदा वातोपसृष्टत्वाच्चर्म तत्परिवर्तते ।
सवेदनं सदाहं च पाकं च व्रजति कचित् ॥ ४५ ॥
मणेरधस्तात्कोशस्तु ग्रन्थिरूपेण लम्बते ।
सरुजां वातसंभूतां विद्यात्तां परिवर्तिकाम् ॥

सकण्डूः कठिना चापि सैव श्लेष्मसमुत्थिता ॥ ४६ ॥

लिंगाचें मर्दन केल्यानें, रगडल्यानें किंवा कांहीं आघात झाल्यानें त्वचेंतील वायु कुपित होऊन लिंगाच्या त्वचेंत सर्वत्र संचार करतो. त्यामुळें लिंगाची त्वचा दुरमडून मागें सरते. त्यामुळें क्वचित ती-मध्यें ठणका व दाह होतो. कदाचित ती पिकते. मण्याच्या खालीं गांठीप्रमाणें कोंबूं लागते व तिच्यामध्यें ठणका असतो. ही वातापासून होते. हिला परिवर्तिका असें म्हणतात. तिजमध्यें कंडू असून ती कठीण असली तर ती कफापासून झाली आहे असें समजावें.

अवपाटिकालक्षण.

अल्पीयःखां यदा हर्षाद्बलाद्गच्छेत्स्त्रियं नरः ।
हस्ताभिघातादपि वा चर्मण्युद्वर्तिते बलात् ॥ ४७ ॥
मर्दनात्पीडनाद्वाऽपि शुक्रवेगविघाततः ।
यत्रावपाट्यते चर्म तां विद्यादवपाटिकाम् ॥ ४८ ॥

अल्पभगा स्त्रीशीं बलात्कारानें समागम केल्यानें, हाताच्या अभिघातानें किंवा बळेंच कातडें मागें सारल्यानें लिंग चोळवट-ल्यानें, चेंगरल्यानें किंवा शुक्रवेगाचा अवरोध करण्याचा प्रयत्न केल्यानें लिंगाची त्वचा फाटते. त्याला अवपाटिका असें म्हणतात.

निरुद्धप्रकश.

वातोपसृष्टे मेढ्रे वै चर्म संश्रयते मणिम् ।
मणिश्चर्मावनद्धस्तु मूत्रस्रोतो रुणद्धि च ॥ ४९ ॥
निरुद्धप्रकशे तस्मिन्मन्दधारमवेदनम् ।
मूत्रं प्रवर्तते जन्तोर्मणिर्विव्रियते न च ॥
निरुद्धप्रकशं विद्यात्सरुजं वातसंभवम् ॥ ५० ॥

वातदोषानें शिस्नावरील त्वचा सुजून मणी झाकून जातो. त्यामुळें मूत्रमार्गाचा रोध होऊन मूत्राची धार बारीक येते. त्यांत वेदना नसतात. मणी चामड्यांतून बाहेर येत नाहीं. ह्याला निरुद्ध-प्रकश असें म्हणतात. ह्यांत वेदना असतात. हा वातापासून होतो.

सन्निरुद्धगुदाचें लक्षण.

वेगसंधारणाद्वायुर्विहतो गुदसंस्थितः ।
निरुणद्धि महत्स्रोतः सूक्ष्मद्वारं करोति च ॥ ५१ ॥

मार्गस्य सौक्ष्म्यात्कृच्छ्रेण पुरीषं तस्य गच्छति ।
संनिरुद्धगुदव्याधिमेवं विद्यात्सुदुस्तरम् ॥ ५२ ॥

मलमूत्रादिकांचा वेग धारण केल्यानें वायु विगुण होऊन गुदाच्या आश्रयानें महास्रोताचा रोध करून मलद्वार सूक्ष्म करतो. त्यामुळें मोठ्या कष्टानें शौचास होते. ह्या दुस्तर व्याधीला सन्निरुद्धगुद असें म्हणतात.

अहिपूतनलक्षण.

शकृन्मूत्रसमायुक्तेऽधौतेऽपाने शिशोर्भवेत् ।
स्विन्ने वाऽस्नाप्यमानेऽस्य कंडू रक्तकफोद्भवा ॥ ५३ ॥
कण्डूयनात्ततः क्षिप्रं स्फोटः स्रावश्च जायते ।
एकीभूतं व्रणं घोरं तं विद्यादहिपूतनम् ॥ ५४ ॥

लहान मुलाला मलमूत्र झाल्यावर त्याचें मलद्वार न धुतल्यानें, किंवा तें घामानें सतत ओलसर राहिल्यानें किंवा त्याला वरचेवर न्हाऊं न घातल्यानें त्याच्या मलद्वाराच्या ठिकाणीं खाज सुटून फोड येतात. त्यांतून लस वाहूं लागते. पुढें ते फोड चरून त्यांचा एकच व्रण होतो. ह्या घोर विकाराला अहिपूतन असें म्हणतात.

वृषणकच्छू.

स्नानोत्सादनहीनस्य मलो वृषणसंश्रितः ।
यदा प्रक्लिद्यते स्वेदात्कण्डूं जनयते तदा ॥ ५५ ॥
कण्डूयनात्ततः क्षिप्रं स्फोटः स्रावश्च जायते ।
प्राहुर्वृषणकच्छूं तां श्लेष्मरक्तप्रकोपजाम् ॥ ५६ ॥

स्नान करतांना सर्व अंग चोळून मळ न काढणाऱ्या मनुष्याच्या वृषणाचे ठिकाणीं मळ सांठून राहतो. तो घामामुळें भिजला म्हणजे वृषणाला कंडू सुटते. त्या वेळीं खाजविल्यानें वृषणावर त्वरित पुटकुळ्या उठतात आणि फुटून त्यांतून लस वाहते. ह्याला वृषण-कच्छू असें म्हणतात. हें कफ व रक्त ह्यांच्या प्रकोपामुळें होतें.

गुदभ्रंशाचें लक्षण.

प्रवाहणातिसाराभ्यां निर्गच्छति गुदं बहिः ।
रूक्षदुर्बलदेहस्य तं गुदभ्रंशमादिशेत् ॥ ५७ ॥

जो अशक्त असून ज्याचा कोठा रूक्ष आहे, त्याला अतिसार

झाल्यानें व फार कुंथण्यानें गुद (अंग) बाहेर येतें. त्याला गुदभ्रंश असें म्हणतात.

वराहदंष्ट्र (डुकरदाढ).

सदाहो रक्तपर्यन्तस्त्वक्पाकी तीव्रवेदनः ।
कण्डूमाञ्ज्वरकारी च स स्यात्सूकरदंष्ट्रकः ॥ ५८ ॥

दाहयुक्त व सभोंवार लाल असलेला, ज्याची त्वचा पिकली आहे असा, तीव्र वेदनायुक्त व खाजणारा एक व्रण होतो. त्यांत ज्वर असतो. त्याला वराहदंष्ट्र असें म्हणतात.

क्षुद्ररोगचिकित्सा.

तत्राजगल्लिकामामां जलौकाभिरुपाचरेत् ।
शुक्तिसौराष्ट्रिकाक्षारकल्कैश्चाऽऽलेपयेन्मुहुः ॥ १ ॥
कठिनां क्षारयोगैश्च द्रावयेदजगल्लिकाम् ।
श्यामालाङ्गलिकामूर्वाकल्कैरपि विलेपयेत् ।
पक्कां व्रणविधानेन यथोक्तेन प्रसाधयेत् ॥ २ ॥

अपक्क अजगल्लिकेंतील प्रथमतः जळवा लावून रक्त काढावें. शिंप, तुरटी, जवखार ह्यांचा वरचेवर त्यांजवर लेप करावा. कठिण अजगल्लिका क्षारांचे लेप करून फोडावी. तेड, कळलावी व मोरवेल ह्यांच्या कल्काचाहि लेप करावा. आणि पिकलेल्या अजगल्लिकेची पक्क व्रणाप्रमाणें चिकित्सा करावी.

यवप्रख्या व अंधालजी यांची चिकित्सा.

अन्धालजीं यवप्रख्यां पूर्वं स्वेदैरुपाचरेत् ।
मनःशिलादेवदारुकुष्ठकल्कैः प्रलेपयेत् ॥ १ ॥
पक्कां व्रणविधानेन यथोक्तेन प्रसाधयेत् ॥ १ ॥

अंधालजी व यवप्रख्या ह्यांना प्रथम स्वेदन करावें. (पोटीस बांधावें) मनशीळ, देवदार व कोष्ट ह्यांचा लेप करावा. त्या पिकलेल्या असल्यास पक्क व्रणाप्रमाणें चिकित्सा करावी.

विवृत्ता, इंद्रवृद्धा, गर्दभिका, व जालगर्दभ यांची चिकित्सा.

विवृत्तामिन्द्रवृद्धां च गर्दभीं जालगर्दभम् ।
पैत्तिकस्य विसर्पस्य क्रियया साधयेद्भिषक् ॥ १ ॥
पाके तु रोपयेदाज्यैः पक्वैर्मधुरभेषजैः ।
नीलीपटोलमूलाभ्यां साज्याभ्यां लेपनं हितम् ॥

जालगर्दभरूपं तु सद्यो हन्ति सवेदनम् ॥ २ ॥

विवृता, ईंद्रवृद्धा, गर्दभिका व जालगर्दभ ह्यांच्यावर पित्त व विसर्पाची चिकित्सा करून तें बरें करावें. तें पक्क झालें असल्यास मधुर औषधांनीं सिद्ध केलेल्या तुपानें त्यांचें रोपण करावें. जालगर्दभावर निळीचें मूळ व पडवळीचें मूळ हीं तुपांत उगाळून त्याचा लेप करावा. तो त्याजवर हितकारक असून वेदनासहित जालगर्दभाचा त्वरित नाश करतो.

कच्छपिकाचिकित्सा.

कच्छपीं स्वेदयेत्पूर्वं तत एभिः प्रलेपयेत् ।
कल्कीकृतैर्निशाकुष्ठशिलातालकदारुभिः ॥
तां पक्कां साधयेच्छीघ्रं भिषग्व्रणचिकित्सया ॥ १ ॥

कच्छपीचें प्रथम स्वेदन करून नंतर तीवर हळद, कोष्ट, मनशीळ, हरताळ, व देवदार ह्यांचा लेप करावा; आणि ती पिकली म्हणजे तिजवर पक्क व्रणाची चिकित्सा करून लवकरच ती बरी करावी.

वल्मीकचिकित्सा.

शस्त्रेणोत्कृत्य वल्मीकं क्षाराग्निभ्यां प्रसाधयेत् ।
विधानेनार्बुदोक्तेन शोधयित्वा च रोपयेत् ॥ १ ॥
वल्मीकं तु भवेद्यस्य नातिवृद्धममर्माणि ।
तत्र संशोधनं कृत्वा शोणितं मोक्षयेद्भिषक् ॥ २ ॥

वल्मीक शस्त्रानें खरडून काढून त्याजवर क्षारानें किंवा अग्नीनें डाग द्यावा. आणि अर्बुदावरील उपचारांनीं त्याचें शोधन करून तें भरून काढावें. ज्याचें वारूळ फार वाढलेलें नसून जें मर्मावर झालेलें नाहीं, त्याला शोधन देऊन वारुळांतून रक्त काढावें.

कुलत्थकानां मूलैश्च गुडूच्या लवणेन च ।
आरग्वधस्य मूलैश्च दन्तिमूलैस्तथैव च ॥ ३ ॥
श्यामामूलैः सपललैः सक्तुमिश्रैः प्रलेपयेत् ।
सुस्निग्धैश्च सुखोष्णैश्च भिषक्तमुपनाहयेत् ॥ ४ ॥

हुलग्याचें मूळ, गुळवेल, मीठ, बाहव्याचें मूळ, दांतीमूळ, उपळसरीचें मूळ, मांस, व सातूचें पीठ, ह्यांचा लेप करावा; आणि स्निग्ध व सुखोष्ण अशा (ह्याच) औषधांचें पोटीस बांधावें.

मनःशिलादि तेल.

मनःशिलालभल्लातसूक्ष्मैलागुरुचन्दनैः ।
जातीपल्लवकल्कैश्च निम्बतैलं विपाचयेत् ॥ १ ॥
वल्मीकं नाशयेत्तद्धि बहुच्छिद्रं बहुव्रणम् ।
पाणिपादोपरिष्टात्तच्छिद्रैर्बहुभिरावृतम् ।
वल्मीकं यत्सशोफं स्याद्वर्ज्यं तद्धि विजानता ॥ २ ॥

मनशीळ, हरताळ, बिब्बे, बारीक वेलदोडे, अगर, चंदन व जाईचा पाला ह्यांच्या कल्कानें बाळंतनिंबाचें तेल सिद्ध करावें. हें अनेक व्रणांच्या व अनेक छिद्रांच्या वारुळाचा नाश कारितें. हात व पाय ह्यांवर झालेलें, फार छिद्रें पडलेलें व सूज असलेलें असें वारूळ वर्ज करावें.

पाषाणगर्दभचिकित्सा.

सुरदारुशिलाकुष्ठैः स्वेदयित्वा प्रलेपयेत् ।
कफमारुतशोथघ्नो लेपः पाषाणगर्दभे ॥ १ ॥

ह्या पाषाणगर्दभावर देवदार, मनशीळ व कोष्ट ह्या औषधांच्या पोटीसानें शेकावें व ह्याच औषधांच्या कल्काचा लेप करावा. आणि कफ, वात व सूज यांचा नाशक लेप करावा.

पनसिकाचिकित्सा.

भिषक्पनसिकां पूर्वं स्वेदनैरपतर्पणैः ।
जयेद्विदारिवल्लेपैः शिग्रुदेवद्रुमोद्भवैः ॥ १ ॥

पनसिकेवर प्रथम स्वेदन व अपतर्पण करून विदारिकेप्रमाणें शेवग्याची साल व देवदार ह्यांचा लेप करून ती जिंकावी.

इरिवेल्लिकाचिकित्सा.

पैत्तिकस्य विसर्पस्य या चिकित्सा प्रकीर्तिता ।
तथैव भिषगेतां च चिकित्सेदिरिवेल्लिकाम् ॥ १ ॥

पित्तविसर्पावर जी चिकित्सा सांगितली आहे, तीच इरिवेल्लिकेवरही करावी.

कक्षा व गंधमाला ह्यांची चिकित्सा.

कक्षां च गन्धनां तां च चिकित्सेत चिकित्सकः ।
पैत्तिकस्य विसर्पस्य क्रियया पूर्वमुक्तया ॥ १ ॥

कक्षा व गंधमाला ह्यांजवर पूर्वी पित्तविसर्पावर सांगितलेले उप-

चार करावे.

अग्निरोहिणीचिकित्सा.

पित्तवीसर्पविधिना साधयेदग्निरोहिणीम् ।
रोहिण्यां लंघनं कुर्याद्रक्तमोक्षणरूक्षणम् ॥ १ ॥
शरीरस्य च संशुद्धिं तां तु वृद्धां परित्यजेत् ॥ २ ॥

पित्तविसर्पावरील उपचार करून अग्निरोहिणी बरी करावी. रोहिणीवर लंघन, रक्तमोक्ष व रूक्ष उपचार करावे. वमन व विरेचनादिकांनी शरीरशुद्धि करावी. आणि ही फार वाढली असल्यास वर्ज करावी.

चिप्प्य व कुनख ह्यांची चिकित्सा.

चिप्प्यं रुधिरमोक्षेण शोधनेनाप्युपाचरेत् ।
गतोष्माणमथैनं तु सेचयेदुष्णवारिणा ॥ १ ॥
शस्त्रेणापि यथायोग्यमुच्छिद्य स्रावयेत्ततः ।
व्रणोक्तेन विधानेन रोपयेत्तु विचक्षणः ॥ २ ॥
स्वरसेन हरिद्रायाः पात्रे कृष्णायसेऽभयाम् ।
घृष्ट्वा तज्जेन कल्केन लिम्पेच्चिप्प्यं पुनः पुनः ॥ ३ ॥

नखुरड्यांतील रक्त काढून शोधन करावें, आणि त्यांतील आग शांत झाल्यावर त्याजवर ऊन पाणी शिंपावें. नंतर शस्त्रानें योग्य प्रकारें छेदन करून रक्त वाहूं द्यावें. आणि व्रणाप्रमाणें रोपण चिकित्सा करावी. हळदीच्या रसांत कोखंडी भांड्यामध्यें हिरडा उगाळून त्याचा नखुरड्यावर वरचेवर लेप करावा.

काश्मर्याः सप्तभिः पत्रैः कोमलैः परिवेष्टितः ।
अंगुलीवेष्टकः पुंसां ध्रुवमाशु प्रशाम्यति ॥ ४ ॥

शिवणीचीं कोवळीं कोवळीं सात पानें घेऊन त्यांजवर गुंडाळावीं. म्हणजे मनुष्याचें अंगुलीवेष्टक (नखुडें) निश्चयानें लवकर बरें होतें.

श्लेष्मविद्रधिकल्पेन कुनखं समुपाचरेत् ।
नखकोटिप्रविष्टेन टङ्कणेन न शाम्यति ।
कुनखश्चेत्तदा शैलः सलिले प्लवतेऽपि च ॥ ५ ॥

कफजन्य विद्रधीवरील उपचार कुनखावर करावे. नखाच्या सांध्यांतून टाकणखार भरावा, म्हणजे कुनखाची शांति होते. असें न

झालें तर पर्वत पाण्यावर तरूं लागेल.

दाडिमकुसुमयवासैरभया सुश्लक्ष्णचूर्णिता लेपात् ।
नखकोटिपूतिभावं शमयति शूलं च तत्क्षणादेव ॥ ६ ॥

डाळिंबीचीं फुलें, धमासा, हिरडेदळ ह्यांचा कल्क करून त्यांचा नखाच्या सभोंवार लेप करावा. म्हणजे नखाच्या आसपासचा पिकलेला भाग शांत होतो व ठणका त्वरित रहातो.

अनुशयीचिकित्सा.

हरेदनुशयीं वैद्यः क्रियया श्लेष्मविद्रधेः ॥ १ ॥

कफजन्य विद्रधीवरील उपायांनीं अनुशयीचा नाश करावा.

विदारिकाचिकित्सा.

विदारिकायां प्रथमं जलौकायोजनं हितम् ।
पाटनं च विपक्वायां ततो व्रणविधिः स्मृतः ।
जयेद्विदारिकां लेपैः शिग्रुदेवद्रुमोद्भवैः ॥ १ ॥

विदारिकेवर प्रथम जळवा लावणें हितकारक आहे. ती पक्व झाल्यावर फाडून व्रणावरील उपचार करावे. विदारिकेवर शेवग्याची साल व देवदार ह्यांचा लेप करावा. आणि तिला जिंकावें. असें वृंदांत सांगितलें आहे.

शर्करार्बुदाची चिकित्सा.

मेदोर्बुदविधानेन साधयेच्छर्करार्बुदम् ॥ १ ॥

मेदोजन्य अर्बुदावरील उपचार शर्करार्बुदावर करून तें बरें करावें.

पाददारीचिकित्सा.

पाददार्यां शिरां प्राज्ञो मोक्षयेत्तलशोधिनीम् ।
स्नेहस्वेदोपपन्नौ तु पादौ वा लेपयेन्मुहुः ॥ १ ॥
मधूच्छिष्टवसामज्जाघृतैः क्षारविमिश्रितैः ।

पाददारी झाली असतां पायाची तलशोधिनी नांवाची शीर तोडावी आणि पायाला स्नेहन व स्वेदन करावें; किंवा मेण, वसा, मज्जा, तूप व क्षार ह्यांच्या मलमाचा वरचेवर लेप करावा.

सर्जोत्थसिन्धूद्भवयोश्चूर्णं मधुघृतप्लुतम् ।
निर्मथ्य कटुतैलाक्तं हितं पादप्रमार्जने ॥ २ ॥

राळ व सैंधेलोण ह्यांचें चूर्ण कडू तेल, तूप व मध ह्यांमध्यें खलून पायांस लावावें. तें हितकारक आहे.

मधुसिक्थकसैन्धवघृतगुडमाहिषाक्षशालनिर्यासैः ।
गैरिकसहितैर्लेपः पादस्फुटनापहः सिद्धः ॥ ३ ॥

मध, मेण, सेंधेलोण, तूप, गूळ, गुग्गुळ, राळ व सोनकाव ह्यांचा लेप फुटलेले पाय बरे करतो, हें प्रसिद्ध आहे.

उपोदिकासर्षपनिम्बमोचककारुकैर्वारुकभस्मतोयैः ।
तैलं विपक्कं लवणेन युक्तं तत्पाददारीं विनिहन्ति लेपात् ॥ ४ ॥

मयाळ, शिरस, कडुनिंबाची साल, मोचरस, काकडी व वाळुक ह्यांची राख आणि ह्यांचा काढा ह्यांमध्यें सेंधेलोण टाकून तेल सिद्ध करावें व त्याचा पायाला लेप करावा. तो पाददारीचा नाश करतो.

मदनं च तथा सिक्थं सामुद्रलवणं तथा ।
महिषीनवनीतेन संततं लेपनं हितम् ॥ १ ॥
सप्ताहात्स्फुटितौ पादौ जायेते कमलोपमौ ।

गेळफळ, मेण व मीठ, हीं औषधें म्हशीच्या लोण्यांत खलून नेहमीं लेप करावा. तो हितकारक आहे. ह्यानें फुटलेले पाय सात दिवसांत कमळाप्रमाणें होतात.

सैन्धवं चन्दनं रालं मधु सर्पिः पुरो गुडः ।
गैरिका स्फुटितौ पादौ लिप्तौ स्तः पङ्कजोपमौ ॥ २ ॥

सैंधव, चंदन, राळ, मध, तूप, गुग्गुळ, गूळ व सोनकाव ह्यांचा लेप केला असतां तो फुटलेले पाय कमळासारखे सुंदर होतात.

मदनसैन्धवगुग्गुलुगैरिकाज्यमधुरालगुडांघ्रिविलेपनात्
स्फुटितमप्यखिलं चरणद्वयं विकचतामरसप्रतिमं भवेत् ॥ ३ ॥

गेळफळ, सैंधव, गुग्गुळ, सोनकाव, तूप, मध, राळ व गूळ ह्यांचा पायांस लेप केला असतां फुटलेले पाय प्रफुल्लित कमळाप्रमाणें होतात.

कदराची चिकित्सा.

दहेत्कदरमुद्धृत्य तैलेन दहनेन वा ॥ १ ॥

कदर (कुरूप) काढून टाकून त्या ठिकाणीं तेलानें किंवा बिब्यानें चरका (डाग) द्यावा.

अलसाची चिकित्सा.

पादौ सिक्त्वाऽऽरनालेन लेपनं त्वलसे हितम् ।
पटोलकुनटीनिम्बरोचनामरिचैस्तिलैः ॥ १ ॥

कांजीनें पाय भिजवून कडु पडवळ, मनशीळ, बाळंत निंबाच्या

बिया, वंशलोचन, मिरीं व तीळ ह्यांचा लेप करावा. तो त्याजवर हितकारक आहे.

क्षुद्रास्वरससिद्धेन कटुतैलेन लेपयेत् ।
ततः कासीसकुनटीतिलचूर्णैर्विचूर्णयेत् ॥ २ ॥

अलसकावर रिंगणीच्या स्वरसानें सिद्ध केलेल्या शिरसाच्या तेलाचा लेप करावा. आणि त्याजवर हिराकस, मनशीळ व तीळ ह्यांचें चूर्ण टाकावें.

करञ्जबीजरजनीकासीसं पद्मकं मधु ।
रोचना हरितालं च लेपोऽयमलसे हितः ॥ ३ ॥

करंजाचें बीं, हळद, हिराकस, पद्मकाष्ट, मध, गोरोचन व हरताळ ह्यांचा लेप अलसावर (चिखल्यावर) हितकारक आहे.

चाईची चिकित्सा.

इन्द्रलुप्तापहो लेपो मधुना बृहतीरसः ।
गुञ्जामूलं फलं वाऽपि भल्लातकरसोऽपि वा ॥ १ ॥
लेपः सनवनीतो वा श्वेताश्वखुरजामषी ।

डोरलीमूळाचा रस मधांत मिसळून तो इंद्रलुप्तावर लावावा. गुंजेचें मूळ, फळ अथवा बिब्याच्या पाण्याचा रस लावावा. अथवा पांढऱ्या घोड्याच्या खुराची म्हणजे नखीची राख लोण्यांत खलून लावावी.

हस्तिदन्तमषीं कृत्वा छागदुग्धं रसाञ्जनम् ।
रोमाण्येतेन जायन्ते लेपात्पाणितलेष्वपि ॥ २ ॥

हस्तिदंताची राख व रसांजन शेळीच्या दुधांत खलून लावावें. म्हणजे तळहातालाही केस येतात.

तिक्तपटोलीपत्रस्वरसैर्घृष्टा शमं याति ।
चिरकालजाऽपि निरुजा नियतं दिवसत्रयेणैव ॥ ३ ॥

कडु पडवळाच्या पानांचा रस तीन दिवस घासला असतां फार दिवसांचा इंद्रलुप्ताचा विकार नाहींसा होतो.

गोक्षुरस्तिलपुष्पाणि तुल्ये च मधुसर्पिषी ।
शिरः प्रलेपितं तेन केशैः समुपचीयते ॥ ४ ॥

गोखरू व तिळाचीं फुलें हीं समभाग घेऊन समभाग तूप व मध यांत खलून डोक्यास लावावें, म्हणजे पुष्कळ केस येतात.

जातीकरञ्जवरुणकरवीराग्निपाचितम् ।
तैलमभ्यञ्जनाद्धन्यादिन्द्रलुप्तं न संशयः ॥ ५ ॥

जाईचा पाला, करंजाची साल, वायवरणा, कणेरीच्या मुळ्या व चित्रक ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें. तें लावलें असतां इंद्रलुप्ताचा नाश होतो.

स्नुहीपयः पयोऽर्कस्य मार्कवो लांगली विषम् ।
अजामूत्रं सगोमूत्रं रक्तिका सेन्द्रवारुणी ॥ ६ ॥
सिद्धार्थकस्तीक्ष्णगन्धा सम्यगेभिर्विपाचितम् ।
तैलं भवति नियमात्खालित्यव्याधिनाशनम् ॥ ७ ॥

त्रिधारी निवडुंगाचा चीक, रुईचा चीक, माका, कळलावी, बचनाग, शेळीचें मूत, गोमूत्र, गुंजा, कडु इंद्रावण, मोहऱ्या व वेखंड ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें. तें खालित्याचा (टकलाचा) नाश करितें.

दारुणाची चिकित्सा.

कार्यो दारुणके मूर्ध्नि प्रलेपो मधुसंयुतः ।
प्रियालबीजमधुककुष्ठमाषैः ससैन्धवैः ॥ १ ॥
काञ्जिकैस्तु त्रिसप्ताहं लेपो दारुणकापहः ।

दारणा झाला असल्यास मध, चारोळी, जेष्ठमध, कोष्ठ, उडीद, व सेंधेलोण ह्या औषधांचा कांजींतून लेप करावा. हा लेप एकवीस दिवस केला असतां दारुणकाचा नाश करतो.

आम्रबीजस्य चूर्णं तु शिवाचूर्णं समं द्वयम् ।
दुग्धपिष्टप्रलेपोऽयं दारुणं हन्ति दारुणम् ॥ २ ॥

आंब्याची कोय व हिरडेदळ ह्यांचें चूर्ण समभाग घेऊन दुधांत कालवून लेप करावा; तो भयंकर दारुण रोगाचा नाश करतो.

भृंगराज तेल.

भृङ्गराजरसेनैव लोहकिट्टं फलत्रिकम् ।
सारिवां च पचेत्कल्कैस्तैलं दारुणनाशनम् ।
अकालपलितं कण्डूमिन्द्रलुप्तं च नाशयेत् ॥ १ ॥

लोखंडाचें कीट, त्रिफळा, उपळसरी ह्यांचा कल्क व माक्याचा रस ह्यांजमध्यें तेल सिद्ध करावें. तें दारुणक, अकालीं पिकणारे केस, कंडू व इंद्रलुप्त ह्यांचा नाश करितें.

गुंजातेल.

गुञ्जाफलैः शृतं तैलं भृङ्गराजरसेन च।
कण्डूदारुणहृत्कुष्ठकपालव्याधिनाशनम् ॥ १ ॥

गुंजा व माक्याचा रस घालून तेल पचन करावें. तें कंडू, दारुणक रोग, कुष्ट व टक्कल ह्यांचा नाश करितें.

दुग्धेन खाखसं बीजं प्रलेपाद्दारुणं हरेत्।

खसखस दुधांत वाटून लावावी; ती दारुणाचा नाश करिते.

कण्टकारीफलरसैस्तुल्यं तैलं विपाचयेत्।
जपापुष्पद्रवैर्वाऽथ तल्लेपो दारुणप्रणुत् ॥ २ ॥

रिंगणीच्या फळाच्या रसामध्यें अथवा जासवंदीच्या फुलाच्या रसामध्ये तेल पचन करावें. तें दारुणाचा नाश करितें.

खवड्याची चिकित्सा.

नीलोत्पलस्य किञ्जल्को धात्रीफलसमन्वितः।
यष्टीमधुकयुक्तश्च लेपाद्धन्यादरुंषिकाम् ॥ १ ॥

निळ्या कमळांतील केसर, आवळकठी व जेष्ठमध ह्यांचा लेप करावा. तो खवड्याचा नाश करतो.

त्रिफलादि तेल.

त्रिफलाया रजो यष्टी मार्कवोत्पलसारिवा।
सैन्धवं पक्वमेतैस्तु तैलं हन्यादरुंषिकाम् ॥ १ ॥

त्रिफळ्याचें चूर्ण, जेष्ठमध, माका, कमळ, उपळसरी व सैंधेलोण ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें. तें अरुंषिकेचा नाश करितें.

अरुंषिकायां रुधिरेऽवसिक्ते शिराव्यधेनाथ जलौकया वा।
निम्बाम्बुसिक्ते शिरसि प्रलेपो देयश्च वर्चोरससैन्धवाभ्याम् २

खवड्यांतून रक्त येत असल्यास शीर तोडून अथवा जळवा लावून रक्त काढावें, आणि लिंबाचा रस त्यावर शिंपून घोड्याच्या लिदीच्या रसांतून सैंधव लावावें.

पुराणमथ पिण्याकं पुरीषं कुक्कुटस्य च।
मूत्रपिष्टः प्रलेपोऽयं शीघ्रं हन्यादरुंषिकाम् ॥ ३ ॥

जुनी तिळाची पेंड व कोंबड्याची विष्ठा ह्यांचा गोमूत्रांतून लेप करावा. तो खवड्याचा नाश करतो.

हरिद्रादि तेल.

हरिद्राद्वयभूनिम्बत्रिफलारिष्टचन्दनैः ।
एतत्तैलमरुंषीणां सिद्धमभ्यञ्जने हितम् ॥ १ ॥

हळद, दारुहळद, काडेचिराईत, त्रिफळा, बाळंतलिंबाची साल व चंदन ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल खवडे जाण्याकरितां डोक्यास लावण्यास फार हितकारक आहे.

खदिरारिष्टजम्बूनां त्वग्भिर्वा मूत्रसंयुतैः ।
कुटजत्वक्सैन्धवं वा लेपाद्धन्यादरुंषिकाम् ॥ २ ॥

खैर, कडूनिंब व जांभूळ यांच्या सालींचा गोमूत्रांतून लेप करावा, किंवा कुडयाची साल व सैंधव यांचा लेप करावा; म्हणजे खवडे बरे होतात.

पलिताची चिकित्सा.

अयोरजो भृङ्गराजस्त्रिफला कृष्णमृत्तिका ।
स्थितमिक्षुरसे मासं लेपनात्पलितं जयेत् ॥ १ ॥

लोखंडाचें चूर्ण, माका, त्रिफळा व काळी माती हीं औषधें उंसाच्या रसांत घालून महिनाभर ठेवावीं, आणि त्याचा केसांस लेप करावा; म्हणजे केसांचा पांढरेपणा जातो.

धात्रीफलद्वयं पथ्ये द्वे तथैकं बिभीतकम् ।
पञ्चाम्रमज्जो लोहस्य कर्षैकं च प्रदीयते ॥ २ ॥
पिष्ट्वा लोहमये भाण्डे स्थापयेदुषितं निशि ।
लेपोऽयं हन्ति न चिरादकालपलितं महत् ॥ ३ ॥

दोन आवळे, दोन हिरडे, एक बेहडा, आंब्याच्या पांच कोया, व लोखंडाचें चूर्ण एक तोळा ह्या सर्वांचें चूर्ण करून रात्रभर लोखंडाच्या भांड्यांत ठेवून तें केसास लावावें; म्हणजे अकालीं पिकलेले केस काळे होतात.

निम्बस्य तैलं प्रकृतिस्थमेव नस्यं विधेयं विधिना यथावत् ।
मासेन गोक्षीरभुजो नरस्य चिरात्प्रभूतं पलितं निहन्ति ॥ ४ ॥

कडुनिंबाच्या बियांचें तेल काढून तें नाकांत घालावें, आणि गाईचें दूध पिऊन रहावें. ह्याप्रमाणें एक महिनाभर करणाऱ्या मनुष्याचे फार दिवसाचे पांढरे केस नाहींसे होऊन काळे केस होतात.

काश्मर्यं मूलमादौ सहचरकुसुमं केतकस्यापि मूलं

लौहं चूर्णं सभृङ्गं त्रिफलजलयुतं तैलमेभिः पचेयुः ।
कृत्वा लोहस्य भाण्डे क्षितितलनिहितं स्थापयेन्मासमेकं
केशाः काशप्रकाशा अपि मधुपनिभा अस्य योगाद्भवन्ति ५
शिवणीचें मूळ, कोरांटीचीं फुलें, केवड्याचें मूळ, लोखंडाचें चूर्ण व माका हीं औषधें व त्रिफळ्याचा काढा ह्यांत लोहपात्रामध्यें तेल सिद्ध करावें. आणि तें तेल एक महिनाभर जमीनींत पुरून ठेवावें. ह्या तेलानें केस काशपुष्पाप्रमाणें पांढरे असले तरी भ्रमराप्रमाणें काळेभोर होतात.

त्रिफला नीलिकापत्रं भृङ्गराजो ह्ययोरजः ।
अविमूत्रेण संपिष्टं लेपात्कृष्णीकरं परम् ॥ ६ ॥
त्रिफळा, निळीचीं (निळंबीचीं) पानें, माका, लोखंडाचें चूर्ण, हीं औषधें मेंढीच्या मुतांत खलून त्याचा लेप करावा. तो केसांना उत्तम प्रकारचा काळेपणा आणतो.

यौवनपीटिका, न्यच्छ, वांग व नीलिका ह्यांची चिकित्सा.

यौवनपिटिकान्यच्छनीलिकाव्यङ्गशर्कराः ।
शिरावेधैः प्रलेपैश्च जयेदभ्यञ्जनैस्तथा ॥ १ ॥
तारुण्यपीटिका, न्यच्छ, नीलिका, वांग, व शर्करा हे विकार शिरावेध, लेप व अभ्यंग हे उपचार करून जिंकावे.

जातीफलं चन्दनं च मरिचैः सह पेषितम् ।
मुखलेपेन हन्त्याशु पिटिकां यौवनोद्भवाम् ॥ २ ॥
जायफळ, चंदन व मिरीं ह्यांचा लेप तारुण्यपीटिकांचा त्वरित नाश करतो.

लोध्रधान्यवचालेपस्तारुण्यपिटिकापहः ।
तद्वद्गोरोचनायुक्तं मरिचं : खलेपनात् ॥ ३ ॥
लोध्र, धने व वेखंड ह्यांचा लेप तारुण्यपीटिकांचा नाश करतो. त्याचप्रमाणें गोरोचन व मिरीं ह्यांचा लेपही तारुण्यपिटिकांचा नाश करतो.

सिद्धार्थकवचालोध्रसैन्धवैश्च प्रलेपनम् ।
गव्येन चार्जुनत्वग्वा मञ्जिष्ठा वा समाक्षिका ॥ ४ ॥
कण्टकैः शाल्मलीयैश्च क्षीरपिष्टैः प्रलेपयेत् ।
मुखे तस्यापि पिटिकाः संक्षयं यान्त्यसंशयम् ॥ ५ ॥

मोहऱ्या, वेखंड, लोध्र, व सैंधव ह्यांचा अथवा अर्जुनसादड्याच्या सालीच्या चूर्णाचा गाईच्या तुपांतून, किंवा मंजिष्ठाचा मधांतून लेप करावा. तसेंच सावरीच्या काट्यांच्या चूर्णाचा दुधांतून लेप करावा. म्हणजे तोंडावरील पुटकुळ्यांचा नाश होतो.

त्रिभुवनविजयापत्रं मूलं स्थविरस्य शिंशपा चैभिः।
उद्वर्तनं विरचितं न्यच्छव्यङ्गापहं सिद्धम् ॥ ६ ॥

भांगपत्री (भांगेचीं पानें), कळंबाचें मूळ व शिसव्याचें मूळ ह्यांच्या चूर्णाची उटी लावावी. ती न्यच्छ व वांग ह्यांचा नाश करिते.

वटांकुरा मसूराश्च प्रलेपाद्व्यङ्गनाशनाः।
व्यङ्गे मञ्जिष्ठया लेपः प्रशस्तो मधुयुक्तया ॥ ७ ॥

वडाचे अंकुर व मसुरा ह्यांचा लेप करावा. तो वांगाचा नाश करितो. वांगावर मधांतून मंजिष्ठाचा लेप करावा. तो प्रशस्त आहे.

व्यङ्गेषु चार्जुनत्वक्च मञ्जिष्ठावृषमाक्षिकैः।
लेपः सनवनीतो वा श्वेताश्वखुरजा मषी ॥ ८ ॥
व्यङ्गानां लेपनं शस्तं शशस्य रुधिरेण वा।
वरुणस्य कषायेण मुखं प्रक्षाल्य लेपयेत् ॥ ९ ॥

वांगावर अर्जुनसादड्याची साल, मंजिष्ठ व अडुळसा ह्यांच्या चूर्णाचा मधांतून लेप करावा; किंवा पांढऱ्या घोड्याच्या खुराची राख लोण्यांतून लावावी; किंवा वांगावर सशाचें रक्त लावावें. तें प्रशस्त आहे. वायवर्ण्याचा काढा करून त्यानें तोंड धुवून नंतर त्याजवर सशाच्या रक्ताचा लेप करावा.

वटस्य पाण्डुपत्राणि मालती रक्तचन्दनम्।
कुष्ठं कालीयकं लोध्रमेभिर्लेपं प्रयोजयेत् ॥ १० ॥
यौवनपिटिकानां तु व्यंगानां च विनाशनम्।

वडाचीं पांढरीं पानें, मालती, रक्तचंदन, कोष्ट, कृष्णागर व लोध्र ह्यांचा लेप करावा. तो तारुण्यपीटिका व वांग यांचा नाश करतो.

मातुलुङ्गजटा सर्पिः शिला गोशकृतो रसः ॥ ११ ॥
मुखकान्तिकरो लेपः पिटिकाव्यङ्गकालजित्।

महाळुंगाचें मूळ, तूप, मनशीळ व गाईच्या शेणाचा रस ह्यांचा लेप तोंडाला कांति देतो व पुटकुळ्या, वांग व काळ (काळा डाग) ह्यांचा नाश करतो.

जातीफलस्य लेपस्तु हरेद्व्यङ्गं च नीलिकाम् ॥ १२ ॥

जायफळाचा लेप वांग व नीलिका ह्यांचा नाश करतो.

अर्कक्षीरहरिद्राभ्यां मर्दयित्वा प्रलेपयेत् ।
मुखकार्ष्ण्यं शमं याति चिरकालोद्भवं ध्रुवम् ॥ १३ ॥

रुईचा चीक व हळद एकत्र खलून तोंडास लेप करावा, म्हणजे फार दिवसांचा तोंडाचा काळेपणा निश्चयानें जातो.

मसूरैः क्षीरसंपिष्टैर्लिप्तमास्यं घृतान्वितैः ।
सप्तरात्राद्भवेत्सत्यं पुण्डरीकदलोपमम् ॥ १४ ॥

मसूरांचें पीठ व दूध एकत्र कालवून त्यांत तूप मिसळून तोंडास लेप करावा. म्हणजे ७ दिवसांत तोंड कमलपत्राप्रमाणें तेजस्वी होतें.

कुंकुमादि तेल.

कुंकुमं चन्दनं लोध्रं पतंगं रक्तचन्दनम् ।
कालीयकमुशीरं च मञ्जिष्ठा मधुयष्टिका ॥ १ ॥
पत्रकं पद्मकं पद्मं कुष्ठं गोरोचनं निशा ।
लाक्षा दारुहरिद्रा च गैरिकं नागकेशरम् ॥ २ ॥
पालाशकुसुमं चापि प्रियंगुश्च वटांकुराः ।
मालती च मधूच्छिष्टं सर्षपाः सुरभिर्वचा ॥ ३ ॥
चतुर्गुणपयःपिष्टैस्तैरक्षमितैः पृथक् ।
पचेन्मन्दाग्निना वैद्यस्तैलं प्रस्थद्वयोन्मितम् ॥ ४ ॥
वदनाभ्यञ्जनादेतद्व्यंगं नीलिकया सह ।
तिलकं माषकं न्यच्छं नाशयेन्मुखदूषिकाम् ॥ ५ ॥
पद्मिनीकण्टकं वाऽपि हरेज्जतुमणिं तथा ।
विदध्याद्वदनं पूर्णचन्द्रमण्डलसुन्दरम् ॥ ६ ॥

केशर, चंदन, लोध्र, पतंग, रक्तचंदन, कृष्णागर, वाळा, मंजिष्ट, जेष्टमध, तमालपत्र, पद्मकाष्ट, कमळ, कोष्ट, गोरोचन, हळद, लाख, दारुहळद, सोनकाव, नाकेशर, पळसाचीं फुलें, गव्हला, वडाचे अंकूर, मालतीचीं फुलें, मेण, शिरस, एकांगी मुरा किंवा पुदिना व वेखंड हीं औषधें एक एक तोळा घेऊन चौपट दुधांत त्यांचा कल्क करावा. आणि त्यांत एकशें अठ्ठावीस तोळे तेल पचन करावें. आणि तें तोंडास लावावें. म्हणजे तें वांग, नीलिका, तीळ, माष, न्यच्छ व मुखदूषिका ह्यांचा नाश करितें.

तसेंच, पद्मिनीकंटक व जतुमणी ह्यांचाहि नाश करितें व पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें तोंड उज्वल करितें.

योगतरंगिणींतील मंजिष्टादि तेल.

मञ्जिष्टं मधुकं लाक्षा मातुलिंगं सयष्टिकम् ।
कर्षप्रमाणैरेतैस्तु तैलस्य कुडवं तथा ॥ १ ॥
आजं पयस्तु द्विगुणं शनैर्मृद्वग्निना पचेत् ।
नीलिकापिटिकाव्यंगानभ्यंगादेव नाशयेत् ॥ २ ॥
मुखं प्रसादोपचितं वलीपलितवर्जितम् ।
सप्तरात्रप्रयोगेण भवेत्कनकसंनिभम् ॥ ३ ॥

मंजिष्ट, जेष्टमध, लाख, महाळुंगाचें मूळ व ज्येष्ठमध हीं औषधें एकेक तोळा, तेल सोळा तोळे आणि शेळीचें दूध बत्तीस तोळे एकत्र करून मंदाग्नीवर तेल पचन करावें. हें मंजिष्टादि तेल अंगास लाविलें असतां नीलिका, पुटकुळ्या व वांग ह्यांचा नाश करितें. ह्यानें तोंड प्रफुल्लित होऊन त्याजवरील सुरकुत्या व केसाचा पांढरेपणा जातो. सात दिवसपर्यंत हें तेल अंगास लाविलें असतां सुवर्णासारखी अंगकांति होते.

पद्मिनीकंटकचिकित्सा.

पद्मिनीकण्टके रोगे छर्दयेन्निम्बवारिणा ।
तेनैव सिद्धं सक्षौद्रं सर्पिः पातुं प्रदापयेत् ॥ १ ॥
निम्बारग्वधकल्कैर्वा मुहुरुद्वर्तनं हितम् ।

पद्मिनीकंटक रोगामध्यें कडु लिंबाचा काढा देऊन ओकवावें. आणि त्याच काढ्यानें सिद्ध केलेलें तूप पाजावें. कडुनिंबाची व बाहव्याची साल घेऊन त्यांचा कल्क करून त्याचा वरचेवर लेप करावा. तो हितकारक आहे.

चतुर्गुणेन निम्बोत्थपत्रकाथेन गोघृतम् ॥ २ ॥
पचेत्ततस्तु निम्बस्य कृतमालस्य पत्रजैः ।
कल्कैर्भूयः पचेत्सिद्धं तत्पिबेत्पलसंमितम् ।
पद्मिनीकण्टकाद्रोगान्मुक्तो भवति नान्यथा ॥ ३ ॥

कडुनिंबाच्या पाल्याचा चौपट काढा घालून गाईचें तूप सिद्ध करावें. नंतर पुनः कडुनिंब व करंज ह्यांच्या पानांचा कल्क घालून

पुनः तूप पचन करावें, आणि तें रोज चार तोळेप्रमाणें घ्यावें. म्हणजे पद्मिनीकंटक रोगापासून मुक्त होतो. हें खोटें नाहीं.

तिलकालक, माष व जतुमणी ह्यांची चिकित्सा.

चर्मकीलं जतुमणिं माषकांस्तिलकालकान् ।
उत्कृत्य शस्त्रेण दहेत्क्षाराग्निभ्यामशेषतः ॥ १ ॥

चामकीळ, जतुमणी, माष व तीळ हे शस्त्रानें खरवडून काढून क्षारानें किंवा अग्नीनें त्या ठिकाणीं डाग द्यावा.

परिवर्तिकाचिकित्सा.

स्वेदोपनाहौ परिवर्तिकायां कृत्वा समभ्यज्य घृतेन पश्चात् ।
प्रवेशयेच्चर्म शनैः प्रविष्टे माषैः सुपिष्टैरुपनाहयेत्तम् ॥ १ ॥

परिवर्तिकेला प्रथम स्वेदन करून व पोटीस बांधून तूप लावावें. हळूहळू कातडें पुढें घ्यावें. सर्व कातडें पुढें घेतल्यावर उडदाच्या पोटीसानें त्याला शेकावें.

भावप्रकाशांतील चिकित्सा.

परिवर्तिं घृताभ्यक्तां सुस्विन्नामुपनाहयेत् ।
त्रिरात्रं पञ्चरात्रं वा वातघ्नैः शाल्वणादिभिः ॥ १ ॥
ततोऽभ्यज्य शनैश्चर्म वेशयेत्पीडयेन्मणिम् ।
प्रविष्टे चर्मणि मणौ स्वेदयेदुपनाहयेत् ।
दद्याद्वातहरान्बस्तीन्स्निग्धान्यन्नानि भोजयेत् ॥ २ ॥

परिवर्तिकेला तूप लावून स्वेदन करून तीन दिवस किंवा पांच दिवस वातनाशक अशा शाल्वणादि प्रयोगांनीं पोटिसें बांधावीं. वातनाशक असे बस्ती देऊन त्याला स्निग्ध असें अन्न जेऊं घालावें.

अवपाटिकाचिकित्सा.

स्नेहस्वेदैरिमां वैद्यश्चिकित्सेदवपाटिकाम् ॥ १ ॥

स्नेहन व स्वेदन अशा क्रियांनीं अवपाटिका जिंकावी.

निरुद्धप्रकशाची चिकित्सा.

निरुद्धप्रकशे नाडीं लौहीमुभयतोमुखीम् ।
दारवीं वा जतुकृतां घृताक्तां संप्रवेशयेत् ॥ १ ॥
परिषिञ्चेद्वसां मज्जां शिशुमारवराहयोः ।
चुक्रतैलं तथा योज्यं वातघ्नद्रव्यसंयुतम् ॥ २ ॥
त्र्यहात्स्थूलतरां सम्यङ्‌ नाडीं गर्भे प्रवेशयेत् ।

स्रोतो विवर्धयेदेवं स्निग्धमन्नं च भोजयेत् ।
भित्त्वा वा सीवनीं मुक्त्वा सद्यःक्षतवदाचरेत् ॥ ३ ॥

निरुद्धप्रकशामध्यें दोहींकडे तोंडें असलेली लोखंडाची, लाकडाची अथवा लाखेची सळई घेऊन तिला तूप चोपडून ती हळूहळू आंत घालावी आणि डुकराची व सुसरीची वसा व मज्जा शिंपावी. त्याचप्रमाणें वातनाशक द्रव्यांनीं सिद्ध केलेलें चुक्रतेल योजावें. ह्याप्रमाणें तीनतीन दिवसांनीं थोडीथोडी मोठी नळी चालवावी, व मूत्रमार्ग वाढवावा. रोग्यास स्निग्ध भोजन द्यावें. अथवा शिवण सोडून फाडून मार्ग मोकळा करून व्रणावरील उपचार करावे.

सन्निरुद्धगुदाची चिकित्सा.

संनिरुद्धगुदे तैलैः सेको वातहरैर्हितः ।
तथा निरुद्धप्रकशक्रिया वा कथिता हिता ॥ १ ॥

संन्निरुद्धगुदावर वातनाशक तेल शिंपावें. तें हितकारक आहे. अथवा निरुद्धप्रकशावरील क्रिया करावी. तीही हितकारक आहे.

अहिपूतनचिकित्सा.

तत्र संशोधनैः पूर्वं धात्रीस्तन्यं विशोधयेत् ।
त्रिफलाखदिरक्राथैर्व्रणानां क्षालनं हितम् ॥ १ ॥
शङ्खसौवीरयष्ट्याह्वैर्लेपः कार्योऽहिपूतने ।

अहिपूतनरोगाकरितां प्रथम तें मूल ज्या दाईस पीत असेल तिचे दुधाची शोधक औषधांनीं शुद्धि करावी. त्रिफळा व खैर ह्यांच्या काढ्यानें व्रण धुवावे. तें हितकारक आहे. शंख, सुरमा व जेष्टमध ह्यांचा अहिपूतनावर लेप करावा.

पटोलपत्रत्रिफलारसांजनविपाचितम् ।
पीतं घृतं नाशयति कृच्छ्रमप्यहिपूतनम् ॥ २ ॥

कडू पडवळीचीं पानें, त्रिफळा व रसांजन यांनीं सिद्ध केलेलें तूप प्यालें असतां कष्टसाध्य अहिपूतनरोगही बरा होतो.

वृषणकच्छुचिकित्सा.

सर्जाम्बुकुष्ठसैन्धवसितसिद्धार्थैः प्रकल्पितो योगः ।
उद्वर्तनेन नियतं शमयति वृषणकण्डूतिम् ॥ १ ॥

राळ, वाळा, कोष्ट, सेंधेलोण व पांढऱ्या मोहऱ्या ह्यांचा लेप

अतिशय होणाऱ्या वृषणाच्या कंडूचा नाश करतो.

भिषग्वृषणकच्छूं तु चिकित्सेत्पामरोगवत्।
अहिपूतननिर्दिष्टक्रिययाऽपि च तां हरेत् ॥ २ ॥

खरजेवरील उपचारासारखे उपचार वृषणकच्छूवर करावे. आणि अहिपूतनावरील उपचार करूनही वृषणकच्छूचा नाश करावा.

कासीसरोचनातुत्थहरितालरसाञ्जनैः।
अम्लपिष्टैः प्रलेपोऽयं मुष्ककण्ड्वहिपूतने ॥ ३ ॥

हिराकस, गोरोचन, मोरचून, हरताळ व रसांजन यांचा कांजींत लेप केल्यात वृषणकच्छू व अहिपूतन हे रोग बरे होतात.

गुदभ्रंशावर उपचार.

गुदभ्रंशे गुदं स्विन्नं स्नेहेनाक्तं प्रवेशयेत्।
प्रविष्टं रोधयेद्यत्नाद्गव्यसच्छिद्रचर्मणा ॥ १ ॥

गुद बाहेर आलें असतां त्याचें स्वेदन करून त्याला तेल लावून आंत सारावें. आणि भोंक पाडलेल्या बैलाच्या चामड्यानें बांधावें.

पद्मिन्याः कोमलं पत्रं यः खादेच्छर्करान्वितम्।
एतन्निश्चित्य निर्दिष्टं न तस्य गुदनिर्गमः ॥ २ ॥

कमळिणीचीं कोवळीं पानें जो साखरेबरोबर खातो, त्याचें गुद बाहेर येत नाहीं. हें खरोखर प्रत्यक्ष पाहिलेलें आहे.

मूषिकाणां वसाभिर्वा गुदं भ्रंशे प्रलेपयेत्।
स्विन्नमूषकमांसेन अथवा स्वेदयेद्गुदम् ॥ ३ ॥

गुद बाहेर आलें असल्यास त्याजवर उंदराची चर्बी लावून तें आंत सारावें. अथवा उंदराचें मांस उकडून त्यानें गुद शेकावें.

चांगेरीकोलदध्यम्लनागरक्षारसंयुतम्
घृतमुत्क्वथितं पेयं गुदभ्रंशरुजापहम् ॥ ४ ॥

चुका, बोरें, दहीं, चिंच, सुंठ व जवखार ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें. तें गुदभ्रंशाची पीडा दूर करितें.

वृक्षाम्लनलचांगेरीबिल्वपाठायवाग्रजम्।
तक्रेण शीलयेत्पायुभ्रंशार्तोऽनलदीपनम् ॥ ५ ॥

आमसुलें, तांबडें कमळ, चुका, बेलफळ, पहाडमूळ व जवखार ह्यांचा कल्क ताकांतून घ्यावा. तो गुदभ्रंशाची पीडा दूर करतो, व अग्नि प्रदीप्त करितो.

मूषकतेल.

मूषकान्दशमूलानि गृह्णीयादुभयं समम् ।
तयोः क्काथेन कल्केन पचेत्तैलं यथोदितम् ॥ १ ॥
अभ्यंगात्तस्य तैलस्य गुदभ्रंशो विनश्यति ।
विनश्यन्ति तथा तेन गुदशूलभगंदराः ॥ २ ॥

उंदरांचें मांस व दशमुळें समभाग घेऊन त्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. हें तेल लावलें असतां गुदभ्रंशाचा नाश होतो. त्याचप्रमाणें ह्यानें गुदशूळ व भगंदर ह्यांचाही नाश होतो.

गुदं च गव्यपयसा वेशयेदविशङ्कितः ।
दुष्प्रवेशो गुदभ्रंशो विशत्याशु न संशयः ।

गुद बाहेर आलें असतां तें लवकर आंत बसत नाहीं, ह्यांत संशय नाहीं. तथापि तें गाईचे दुधानें निःसंशय आंत सारावें.

रसाजनं विशेषेण पानालेपनयोर्हितम् ॥ ३ ॥

विशेषतः गुदभ्रंशावर रसांजन हें लेप करण्यास व पोटांत देण्यास हितकारक आहे.

सूकरदंष्ट्राची चिकित्सा.

भृंगराजकमूलस्य रजन्या सहितस्य च ।
चूर्णं तु सहसा लेपाद्वराहद्विजनाशनम् ॥ १ ॥

माक्याचें मूळ व हळद ह्यांच्या चूर्णाचा लेप करावा. तो सूकरदंष्ट्राचा नाश करतो.

राजीवमूलकल्कः पीतो गव्येन सर्पिषा प्रातः ।
शमयति शूकरदंष्ट्रं दंष्ट्रोद्भूतं ज्वरं घोरम् ॥ २ ॥

पोखरमुळाचा कल्क प्रातःकाळीं गाईच्या तुपाशीं घ्यावा. तो सूकरदंष्ट्राचा व तज्जन्य भयंकर ज्वराचाही नाश करतो.

रजनी मार्कवं मूलं पिष्टं शीतेन वारिणा ।
तल्लेपाद्धन्ति वीसर्पं वाराहदशनाव्हयम् ॥ ३ ॥

हळद व माक्याचें मूळ थंड पाण्यांत वाटून त्याचा लेप करावा. तो सूकरदंष्ट्रनामक विसर्पाचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

क्षुद्ररोगेषु सर्वेषु नानारोगानुकारिषु ।
दोषान्दूष्यानवस्थां च निरीक्ष्य मतिमान्भिषक् ॥ १ ॥

तस्य तस्य च रोगस्य पथ्यापथ्यानि सर्वशः ।
यथादोषं यथादूष्यं यथावस्थं प्रकल्पयेत् ॥ २ ॥

अनेक विकार करणाऱ्या अशा ह्या क्षुद्ररोगांमध्यें दोष, दूष्य व अवस्था पाहून बुद्धिमान् वैद्यानें त्या त्या रोगावरील पथ्यापथ्य दोष व अवस्था ह्यांना अनुसरून योजावें.

मुखरोगांचें निदान.

ओष्ठौ च दन्तमूलानि दन्ता जिह्वा च तालु च ।
गलो गलादि सकलं सप्ताङ्गं मुखमुच्यते ॥ १ ॥

ओंठ, दांतांचीं मुळें, दांत, जीभ, टाळा, गाल व गळा ह्या सात अंगांच्या समुदायाला मुख असें म्हणतात.

आनूपपिशितक्षीरदधिमाषादिसेवनात् ।
मुखमध्ये गदान्कुर्युः क्रुद्धा दोषाः कफोत्तराः ॥ २ ॥

अनूप देशांतील मांस, दूध, दहीं व उडीद इत्यादि कफकारक पदार्थांच्या सेवनानें प्रकुपित झालेले कफादि दोष तोंडांत रोग उत्पन्न करितात.

मुखरोगांची संख्या.

स्युरष्टावोष्ठयोर्दन्तमूलेषु दश षट् तथा ।
दन्तेष्वष्टौ च जिह्वायां पञ्च स्युर्नव तालुनि ॥ ३ ॥
कण्ठे त्वष्टादश प्रोक्तास्त्रयः सर्वसराः स्मृताः ।
एवं मुखामयाः सर्वैः सप्तषष्टिर्मता बुधैः ॥ ४ ॥

ओष्ठरोग आठ, दंतमूलरोग सोळा, दांताचे रोग आठ, जिभेचे पांच, टाळ्याचे नऊ, गळरोग अठरा व सर्वसर तीन ह्याप्रमाणें विद्वानांच्या मतानें एकंदर मुखरोग सदुसष्ट आहेत.

ओष्ठरोग.

पृथग्दोषैः समस्तैश्च रक्तजो मांसजस्तथा ।
मेदोजश्चाभिघातोत्थ एवमष्टौष्ठजा गदाः ॥ १ ॥

वातादि पृथक् तीन दोषांनीं तीन, त्रिदोषापासून एक, रक्तजन्य एक, मांसजन्य एक, मेदापासून एक व अभिघातापासून एक मिळून आठ प्रकारचे ओष्ठरोग आहेत.

वातिकाचें लक्षण.

कर्कशौ परुषौ स्तब्धौ कृष्णौ तीव्ररुजान्वितौ ।

दाल्येते परिपाट्येते ह्योष्ठौ मारुतकोपतः ॥ २ ॥

वातजन्य ओष्ठरोगांत ओठ कर्कश, कठीण, ताठर, काळे व तीव्र पीडादायक होतात. शिवाय ओंठ फुटतात व त्यांना भेगा पडतात.

पित्तजन्य ओष्ठरोगाचें लक्षण.

चीयेते पिटिकाभिस्तु सरुजाभिः समन्ततः।
सदाहपाकपिटिकौ पीताभासौ च पित्ततः ॥ ३ ॥

पित्तदोषानें ओठावर सर्वत्र फोड येतात. ते फार दुखतात. त्यांचा दाह होतो. ते पिकतात व पिवळे होतात.

कफजन्य ओष्ठरोगाचें लक्षण.

सवर्णाभिस्तु चीयेते पिटिकाभिरवेदनौ।
कण्डूमन्तौ कफाच्छ्वेतौ शीतलौ पिच्छिलौ गुरू ॥ ४ ॥

कफदोषानें ओठावर ओठाच्या रंगाचे फोड येतात. ते दुखत नाहींत, त्यांना कंडू असते, ते पांढरे, थंड व जड असे असतात.

त्रिदोषज ओष्ठरोगलक्षण.

सकृत्कृष्णौ सकृत्पीतौ सकृच्छ्वेतौ तथैव च।
संनिपातेन विज्ञेयावनेकपिटिकाचितौ ॥ ५ ॥

त्रिदोषजन्य ओष्ठरोगामुळें ओठ कधीं काळे, कधीं पिवळे तर कधीं पांढरे असे होतात. आणि त्यांजवर पुष्कळ फोड येतात.

रक्तजन्य ओष्ठरोगलक्षण.

खर्जूरफलवर्णाभिः पिटिकाभिर्निपीडितौ।
रक्तोपसृष्टौ रुधिरं स्रवतः शोणितप्रभौ ॥ ६ ॥

रक्तदोषामुळें ओठांवर खजूराच्या रंगाचे फोड येतात. ओठ रक्ताप्रमाणें लाल दिसतात, व त्यांतून रक्त वाहतें.

मांसज ओष्ठरोगलक्षण.

मांसदुष्टौ गुरुस्थूलौ मांसपिण्डवदुद्गतौ।
जन्तवश्चात्र मूर्छन्ति नरस्योभयतो मुखात् ॥ ७ ॥

मांसदोषामुळें ओठ जड, मोठे व मांसाच्या गोळ्याप्रमाणें वर उचललेले असून त्यांत कृमि उत्पन्न होतात.

मेदोज ओष्ठरोगलक्षण.

सर्पिर्मण्डप्रतीकाशौ मेदसा कण्डुरौ मृदू।

स्वच्छं स्फटिकसंकाशमास्त्रावं स्त्रवतो भृशम् ॥ ८ ॥

मेदोदोषापासून झालेल्या ओष्ठरोगामध्यें ओठ तुपावरील निवळी-प्रमाणें स्निग्ध व स्वच्छ दिसतात. त्यांना खाज सुटते व ते मऊ असतात. त्यांतून स्फटिकाप्रमाणें स्वच्छ असा पुष्कळ स्राव होतो.

अभिघातज ओष्ठरोगलक्षण.

क्षतजाभौ विदीर्येते पीड्येते चाभिघाततः ।
मथितौ च समख्यातावोष्ठौ कण्डूसमन्वितौ ॥ ९ ॥
क्षतावभिहतौ चापि रक्तावोष्ठौ सवेदनौ ।
भवतः सपरिस्त्रावौ रक्तपित्तप्रदूषितौ ॥ १० ॥

अभिघातानें ओष्ठाला क्षत पडल्याप्रमाणें भेगा पडतात. ओठ फाटतात, दुखतात, त्यांत गांठी होतात, व त्यांना कंडू असते. भोजानेंहि म्हटलें आहे:—ओंठांना क्षत पडलें असतां अगर आघात झाला असतां ते वेदनायुक्त व लाल होतात, आणि रक्तपित्ताच्या दोषामुळें त्यांतून स्राव होतो.

दातांच्या मुळांचे रोग.

शीतादो गदितः पूर्वं दन्तपुप्पुटकस्ततः ।
दन्तवेष्टः सौषिरश्च महासौषिर एव च ॥ १ ॥
ततः परिदरः प्रोक्तस्ततस्तूपकुशः स्मृतः ।
वैदर्भश्च ततः प्रोक्तः खलिवर्धन एव च ॥ २ ॥
अधिमांसकनामा च दन्तनाड्यश्च पञ्च च ।
दन्तविद्रधिरप्यत्र दन्तवेष्टेषु षोडश ॥ ३ ॥

शीताद, दंतपुप्पुटक, दंतवेष्ट, सौषिर, महासौषिर, परिदर, उपकुश, वैदर्भ, खलीवर्धन, अधिमांसक, पांच प्रकारच्या दंतनाडी आणि दंतविद्रधी असे हे सोळा दंतमूलरोग आहेत.

शीतादाचें लक्षण.

शोणितं दन्तवेष्टेभ्यो यत्राकस्मात्प्रवर्तते ।
दुर्गन्धीनि सकृष्णानि प्रक्लेदीनि मृदूनि च ॥ ४ ॥
दन्तमांसानि शीर्यन्ते पचन्ति च परस्परम् ।
शीतादो नाम स व्याधिः कफशोणितसंभवः ॥ ५ ॥

ज्याच्या हिरड्यांतून अकस्मात रक्त वाहतें. व त्यांतून दुर्गंधीयुक्त, काळें, ओलसर व मऊ असें मांस गळतें. एक हिरडी पिकली

तर ती दुसरीला पिकविते. ह्या विकाराला शीताद असें म्हणतात. हा कफ व रक्त दोषापासून होतो.

दंतपुप्पुटक.

दन्तयोस्त्रिषु वा यत्र श्वयथुर्जायते महान् ।
दन्तपुप्पुटको नाम स व्याधिः कफरक्तजः ॥ ६ ॥

कफ व रक्त या दोषांमुळें दोन किंवा तीन दांतांच्या हिरड्यांना मोठी सूज येते. तिला दंतपुप्पुटक असें म्हणतात.

दंतवेष्ट.

स्रवन्ति पूयं रुधिरं चला दन्ता भवन्ति च ।
दन्तवेष्टः स विज्ञेयो दुष्टशोणितसंभवः ॥ ७ ॥

रक्तदोषामुळें हिरड्यांतून पू व रक्त वहातें, व दांत हालतात, त्या व्याधीला दंतवेष्ट असें म्हणतात.

सौषिर.

श्वयथुर्दन्तमूलेषु रुजावान्कफवातजः ।
लालास्रावी सकण्डूश्च स ज्ञेयः सौषिरो गदः ॥ ८ ॥

कफवातापासून दांतांच्या मुळाशीं सूज येते, ती फार दुखते, तिजमुळें लाळ गळते, व खाज सुटते; त्याला सौषीर म्हणतात.

महासौषिर.

दन्ताश्चलन्ति वेष्टेभ्यस्तालु चाप्यवदीर्यते ।
यस्मिन्स सर्वजो व्याधिर्महासौषिरसंज्ञकः ॥ ९ ॥
सदाहो दन्तमूलेषु शोथः पित्तकफानिलात् ।
महासौषिर इत्येष सप्तरात्रान्निहन्त्यसून् ॥ १० ॥

दांत मुळापासून हालतात, टाळ्याला भेगा पडतात. हे विकार ज्यामध्यें होतात, त्याला महासौषिर असें म्हणतात. हा सात दिवसांत मारतो असें भोज म्हणतो. वात, पित्त, व कफ यांमुळें दांतांच्या मूळाजवळ दाहयुक्त भयंकर सूज येते. त्याला महासौषिर असें म्हणतात. हा सात दिवसांत मारतो.

परिदर.

दन्तमांसानि शीर्यन्ते यस्मिन्स्रवति चाप्यसृक् ।
पित्तासृक्कफजो व्याधिर्ज्ञेयः परिदरो हि सः ॥ ११ ॥

पित्त, रक्त व कफ या दोषांमुळें दांतांचें मांस सडतें, आणि त्यांतून रक्त येतें. त्याला परिदर असें म्हणतात.

उपकुश.

वेष्टेषु दाहः पाकश्च ताभ्यां दन्ताश्चलन्ति च ।
अत्यर्दिताः प्रस्रवन्ति शोणितं मन्दवेदनम् ॥ १२ ॥
आध्मायन्ते स्रुते रक्ते मुखं पूति च जायते ।
यस्मिन्नुपकुशः स स्यात्पित्तरक्तसमुद्भवः ॥ १३ ॥

दांतांच्या मुळाच्या ठिकाणीं दाह होऊन हिरड्या पिकतात. त्यामुळें दांत हालतात. आतिशय वांकडे होतात व त्यांतून मंद-वेदनायुक्त रक्त वाहतें. रक्त वाहून गेल्यावर हिरड्या पुनः फुगतात; आणि तोंडाला घाण येते. ह्या विकाराला उपकुश असें म्हणतात. हा पित्त व रक्त या दोषांमुळें होतो.

वैदर्भ.

घृष्टेषु दन्तमूलेषु संरम्भो जायते महान् ।
चलन्ति च रदा यस्मिन्स वैदर्भोऽभिघातजः ॥ १४ ॥

दांतांच्या खालच्या हिरड्या आतिशय घासल्यानें त्या ठिकाणीं मोठी सूज येते, व दांत हालतात. ह्या विकाराला वैदर्भ असें म्हणतात. हा अभिघातापासून होतो.

खलिवर्धन.

मारुतेनाधिको दन्तो जायते तीव्रवेदनः ।
खलिवर्धनसंज्ञोऽसौ संजाते रुक्प्रशाम्यति ॥ १५ ॥

वातदोषानें दांतांजवळ अधिक एक दांत उगवतो. त्यामुळें तीव्र वेदना होतात. ह्याला खलिवर्धन असें म्हणतात. तो दांत आला म्हणजे ठणका बंद होतो.

अधिमांसक.

हानव्ये पश्चिमे दन्ते महान् शोथो महारुजः ।
लालास्रावी कफकृतो विज्ञेयः सोऽधिमांसकः ॥ १६ ॥

कफदोषानें हनुवटीच्या मागें शेवटच्या दाढेच्या मुळाशीं मोठी सूज येते. तिला आतिशय ठणका असतो. त्यामुळें काळ गळते. ह्या विकाराला अधिमांसक असें म्हणतात.

पांच प्रकारच्या दंतनाडी.

दन्तमूलगता नाड्यः पञ्च ज्ञेया यथेरिताः ॥ १७ ॥

दांतांच्या मुळाशीं पांच प्रकारचे नाडीव्रण होतात. ते नाडीव्रण-निदानांतील वातादि पांच नाडींप्रमाणें जाणावे.

दन्तविद्रधि.

दन्तमांसमलैः सास्रैर्बाह्यतः श्वयथुर्महान् ।
सदाहरुक्स्रवेद्भिन्नः पूयास्रं दन्तविद्रधिः ॥ १८ ॥

दांतांच्या मुळांतील मांस व वातादि दोष व रक्त ह्यांपासून दांतांच्या आंत व बाहेर मोठी सूज येते; तिचा दाह होतो व तींत ठणका फार असतो. ती फुटली असतां तिच्यामधून रक्त व पू हीं येतात. त्या व्याधीला दंतविद्रधि असें म्हणतात.

दंतरोगांचीं नांवें व संख्या.

दालनः कथितः पूर्वं कृमिदन्तक एव च ।
प्रोक्तो भञ्जनको दन्तहर्षो वै दन्तशर्करा ॥ १ ॥
कपालिकाऽत्र कथिता श्यावदन्तक एव च ।
करालसंज्ञ इत्यष्टौ दन्तरोगाः प्रकीर्तिताः ॥ २ ॥

दालन, कृमिदंत, भंजनक, दंतहर्ष, दंतशर्करा, कपालिका, श्यावदंतक, आणि कराल असे आठ दंतरोग सांगितले आहेत.

दालनाचें लक्षण.

दीर्यमाणेष्विव रुजा यत्र दन्तेषु जायते ।
दालनो नाम स व्याधिः सदागतिनिमित्तजः ॥ ३ ॥

ज्या विकारांत दांत नेहमीं फोडल्याप्रमाणें दुखतात, त्या वात-जन्य विकाराला दालन असें म्हणतात.

कृमिदंतलक्षण.

कृष्णच्छिद्रश्चलः स्रावी ससंरम्भो महारुजः ।
अनिमित्तरुजो वातात्स ज्ञेयः कृमिदन्तकः ॥ ४ ॥

वातानें दांत काळा व छिद्रयुक्त असा होऊन हालूं लागतो. त्याच्या मुळाशीं सूज व ठणका असतो. हा कारणावांचून दुखतो, आणि यांतून स्राव होतो. ह्याला कृमिदंत असें म्हणतात.

भंजनक.

वक्त्रं वक्रं भवेद्यस्य दन्तभङ्गश्च जायते ।

कफवातकृतो व्याधिः स भञ्जनक उच्यते ॥ ५ ॥
ज्या विकारांत तोंड वांकडें होऊन दांत फुटतात, त्याला भंजनक असें म्हणतात. हा कफवातापासून होतो.

दंतहर्ष.

शीतरूक्षप्रवाताम्लस्पर्शानामसहा द्विजाः ।
यत्र स्युर्वातपित्ताभ्यां दन्तहर्षः स कीर्तितः ॥ ६ ॥
ज्या विकारांत दांताला थंड व रूक्ष असे पदार्थ, वारा व आंबट पदार्थ ह्यांचा स्पर्श सहन होत नाहीं, त्या विकाराला दंतहर्ष असें म्हणतात.

दंतशर्करा.

मलो दन्तगतो यस्तु कफश्चानिलशोषितः ।
शर्करेव खरस्पर्शा सा ज्ञेया दन्तशर्करा ॥ ७ ॥
दांतांवर उत्पन्न होणारा मळ कफ व वात यांमुळें शुष्क होतो, तो साखरेसारखा खरखरीत असतो. त्याला दंतशर्करा असें म्हणतात.

कपालिका.

कपालेष्विव दीर्यत्सु दन्तेषु समलेषु च ।
कपालिकेति विज्ञेया दन्तच्छिद्दन्तशर्करा ॥ ८ ॥
मलयुक्त दांतांच्या वरील सुकलेल्या मळामुळें दांतांच्याही कपऱ्या निघतात. त्यामुळें दांत झिजून नाहींसे होण्याचा संभव असतो. ह्या विकाराला कपालिका असें म्हणतात. (दांतांचें छेदन करणारी ही दंतशर्करा म्हटली तरी चालेल.)

श्यावदंतलक्षण.

योऽसृङ्मिश्रेण पित्तेन दग्धो दन्तस्त्वशेषतः
श्यावतां नीलतां वाऽपि गतः स श्यावदन्तकः ॥ ९ ॥
जो दांत रक्तमिश्रित पित्तानें दग्ध होऊन काळा किंवा निळा होतो, त्याला श्यावदंत म्हणतात.

कराल.

शनैः शनैः प्रकुपितो यत्र दन्ताश्रितोऽनिलः ।
करालान्विकटान्दन्तान्स करालो न सिध्यति ॥ १० ॥
दांतांच्या आश्रयानें असलेला वायु प्रकुपित होऊन हळूहळू

दांत वांकडे तिकडे करतो. त्याला कराल असें म्हणतात. तो साध्य होत नाहीं.

हनुमोक्ष.

वातेन तैस्तैर्भावैस्तु हनुसंधिर्विसंहतः ।
हनुमोक्ष इति ज्ञेयो व्याधिरर्दितलक्षणः ॥ ११ ॥
भाराभिघाताज्जन्तोश्च हनुसंधिर्विमुच्यते ।
निरस्तजिह्वः कृच्छ्रेण भाषितुं तत्र गच्छति ।
सकृच्छ्रमनिलव्याधिं हनुमोक्षं विनिर्दिशेत् ॥ १२ ॥

त्या त्या कारणांनीं कुपित झालेल्या वातानें हनुवटीचा सांधा निखळतो, त्याला हनुमोक्ष असें म्हणतात. ह्याचीं अर्दितप्रमाणें लक्षणें असतात. तंत्रांतरीं म्हटलें आहेः—ओझ्यामुळें किंवा अभिघातामुळें हनुवटीचा सांधा निखळतो. त्यामुळें जीभ ढिली पडते. म्हणून त्या मनुष्याला बोलण्याला कष्ट पडतात. हा हनुमोक्ष नांवाचा वातजन्य विकार कष्टसाध्य आहे असें समजावें.

जिव्हारोग.

वातजः पित्तजश्चापि कफजोऽलाससंज्ञकः ।
उपजिव्हिका च गदा जिह्वायां पञ्च कीर्तिताः ॥ १ ॥

वातज, पित्तज, कफज, अलास आणि उपजिव्हक असे जिभेचे पांच रोग सांगितले आहेत.

वातज जिव्हारोग.

जिह्वाऽनिलेन स्फुटिता प्रसुप्ता भवेच्च शाकच्छदनप्रकाशा ।

वातदोषानें जीभ फुटते, बधिर होते आणि सागवानाच्या पानासारखी खरखरीत होते.

पित्तज जिव्हारोग.

पित्तात्सदाहैरनुचीयते च दीर्घैः सरक्तैरपि कण्टकैश्च ॥ २ ॥

पित्तदोषानें जिभेची आग होते, आणि जिभेवर लांब व तांबडे लाल असे कांटे येतात.

कफजन्य जिव्हारोग.

कफेन गुर्वी बहुलान्विता च मांसोच्छ्रयैः शाल्मलिकण्टकाभैः ॥ ३

कफदोषानें जीभ जड होते आणि तिजवर सावरीच्या काट्या-

प्रमाणें मांसाचे अंकुर येतात.

अलास.

जिह्वातले यः श्वयथुः प्रगाढः सोऽलाससंज्ञः कफरक्तमूर्तिः ।
जिह्वां स तु स्तम्भयति प्रवृद्धो मूले च जिह्वा भृशमेति पाकम् ४

कफरक्तप्रकोपामुळें जिभेच्या तळाशीं मोठी सूज येते, तिला अलास असें म्हणतात. तो वाढला असतां जीभ ताठवितो; आणि फारच वाढला असतां मुळाशीं जीभ अतिशय पिकते.

उपजिव्हिकालक्षण.

जिह्वाग्ररूपः श्वयथुर्हि जिह्वामुन्नम्य जातः कफरक्तयोनिः ।
प्रसेककण्डूपरिदाहयुक्तः प्रकथ्यते सा उपजिह्विकेति ॥ ५ ॥

जिभेला खालीं दाबून कफ व रक्त दोषानें जिभेच्या शेंड्याच्या आकाराची सूज येते. त्यामुळें थुंकी फार येते, कंडु असतो व तिचा दाह होतो. तिला उपजिव्हिका असें म्हणतात.

तालुरोगांचीं नांवें व संख्या.

गलशुण्डीतुण्डिकेर्यध्रुवाः कच्छप एव च ।
ताल्वर्बुदश्च कथितो मांससंघात एव च ॥ १ ॥
तालुपुप्पुटनामा च तालुशोषस्तथैव च ।
तालुपाकश्च कथितास्तालुरोगा अमी नव ॥ २ ॥

गलशुंडी, तुंडिकेरी, अध्रुव, कच्छप, ताल्वर्बुद, मांससंघात, तालुपुप्पुट, तालुशोष, व तालुपाक असे हे नऊ तालुरोग सांगितले आहेत.

गलशुंडीलक्षण.

श्लेष्मासृग्भ्यां तालुमूलात्प्रवृद्धो दीर्घः शोफो ध्मातबस्तिप्रकाशः।
तृष्णाकासश्वासकृत्तं वदन्ति व्याधिं वैद्याः कण्ठशुण्डीति नाम्ना॥३

टाळ्याच्या मुळाशीं कफरक्तापासून वायूनें भरलेल्या कातड्याच्या पिशवीप्रमाणें लांबट अशी सूज येते. तिजमुळें तहान खोकला व श्वास हे विकार होतात. तिला वैद्य कंठशुंडी (गलशुंडी) असें म्हणतात.

तुंडिकेरी.

शोथः शूलस्तोददाहप्रपाकी प्रागुक्ताभ्यां तुण्डिकेरी मता तु ।

कफरक्तांपासून टाळ्याला रानकापशीच्या फळाच्या आकाराची सूज येते. तिचा दाह होतो. ती पिकते व तिच्यामध्यें टोचणी असते. तिला तुंडिकेरी असें म्हणतात.

अध्रुवलक्षण.

शोथः स्तब्धो लोहितः शोणितोत्थो ज्ञेयोऽध्रुवः सज्वरस्तीव्ररुक् च

रक्तदोषानें न हालणारी व तांबूस अशी जी टाळ्याला सूज येते, तिला अध्रुव म्हणतात. ह्यामध्यें ज्वर व तीव्र वेदना असतात.

कच्छपलक्षण.

कूर्मोत्सन्नोऽवेदनोऽशीघ्रजन्मा रोगो ज्ञेयः कच्छपः श्लेष्मणा च।

कफदोषानें टाळ्याला कासवाच्या पाठीच्या आकाराची सूज येते. तिला ठणका नसतो. ती लवकर वाढत नाहीं. तिला कच्छप असें म्हणतात.

तालवर्बुद.

पद्माकारं तालुमध्ये तु शोथं विद्याद्रक्तादर्बुदं प्रोक्तलिङ्गम् ॥ ५ ॥

टाळ्यामध्यें रक्तदोषामुळें कमळाच्या आकाराची सूज येते, तिला अर्बुद असें म्हणतात. ह्यामध्यें अर्बुदनिदानामध्यें सांगितलेल्या रक्तार्बुदाचीं लक्षणें असतात.

मांससंघात.

दुष्टं मांसं श्लेष्मणा नीरुजं च तात्वन्तःस्थं मांससंघातमाहुः।

कफदोषानें दूषित झालेलें मांस टाळ्यामध्यें सुजतें, त्याला ठणका नसतो. त्याला मांससंघात म्हणतात.

तालुपुप्पुट.

नीरुक्स्थायी कोलमात्रः कफात्स्यान्मेदोयुक्तात्पुप्पुटस्तालुदेशे ॥

कफ व मेद ह्यांपासून टाळ्यावर न दुखणारी बोराएवढी गाठ किंवा सूज येते. तिला तालुपुप्पुट असें म्हणतात.

तालुशोष.

शोषोऽत्यर्थं दीर्यते चापि तालु श्वासो वातात्तालुशोषोऽयमुक्तः।

वातामुळें टाळा शुष्क होऊन त्याला भेगा पडतात, आणि श्वास लागतो. ह्याला तालुशोष असें म्हणतात.

तालुपाक.

पित्तं कुर्यात्पाकमत्यर्थघोरं तालुन्येवं तालुपाकं वदन्ति ॥ ६ ॥

पित्तदोषानें टाळा अतिशय पिकतो, त्याला तालुपाक असें म्हणतात.

गलरोगांचीं नांवें व संख्या.

रोहिणी पंचधा प्रोक्ता कण्ठशालूक एव च।
अधिजिह्वश्च वलयोऽलासनामैकवृन्दकः ॥ १ ॥
ततो वृन्दं शतघ्नी च गिलायुः कण्ठविद्रधिः।
गलौघश्च स्वरघ्नश्च मांसतानस्तथैव च।
विदारी कण्ठदेशे तु रोगा अष्टादश स्मृताः ॥ २ ॥

पांच प्रकारची रोहिणी, कंठशालूक, अधिजिव्ह, वलय, अलास, एकवृंदक, वृंद, शतघ्नी, गिलायु, कंठविद्रधि, गलौघ, स्वरघ्न, मांसतान आणि विदारी असे हे अठरा गलरोग आहेत.

पांच रोहिणींची सामान्य संप्राप्ति.

गलेऽनिलः पित्तकफौ च मूर्छितौ प्रदूष्य मांसं च तथैव शोणितम्।
गलोपसंरोधकरैस्तथाऽङ्कुरैर्निहन्त्यसून्व्याधिरयं तु रोहिणी ॥३॥

गळ्यांमध्यें वात, पित्त व कफ हे प्रकुपित होऊन रक्त व मांस ह्यांना दूषित करून गळ्याचा रोध करणारे असे मांसाचे अंकुर उत्पन्न करितात. त्या व्याधीला रोहिणी असें म्हणतात. ही प्राणनाशक आहे.

वातज रोहिणी.

जिह्वासमन्ताद्भृशवेदनास्तु मांसांकुराः कण्ठनिरोधनाः स्युः।
सा रोहिणी वातकृता प्रदिष्टा वातात्मकोपद्रवगाढजुष्टा ॥ ४ ॥

वातज रोहिणीमध्यें जिभेच्या आसपास अत्यंत वेदना होतात. आणि घशांतील मांसाचे अंकुर घशाचा रोध करितात. हिच्यामध्यें वातजन्य उपद्रव जोराचे असतात.

पित्तज रोहिणीलक्षण.

क्षिप्रोद्गमा क्षिप्रविदाहपाका तीव्रज्वरा पित्तनिमित्तजाता।

पित्तज रोहिणी त्वरित होते. तिचा दाह व पाक लवकर होतो. आणि हिजमध्यें तीव्रज्वर असतो.

कफज रोहिणी.

स्रोतोनिरोधिन्यपि मन्दपाका गुरुस्थिरा सा कफसंभवा तु ॥५॥

जी गळ्यांतील स्रोतसांचा रोध करणारी, उशीरां पिकणारी, जड व स्थिर, अशा लक्षणांनीं युक्त असतें, तिला कफरोहिणी असें म्हणतात.

सन्निपातज रोहिणी.

गम्भीरपाकिन्यनिवार्यवीर्या त्रिदोषलिङ्गा त्रिभवा भवेत्सा ।

त्रिदोषजन्य रोहिणीचा पाक खोल असतो. ही अनिवार आहे. हिच्यामध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें असतात.

रक्तज रोहिणी.

स्फोटैश्चिता पित्तसमानलिङ्गाऽसाध्या प्रदिष्टा रुधिरात्मिका तु ॥

रक्तज रोहिणी फोडांनीं व्याप्त असते व तिच्यामध्यें पित्ताचीं सर्व लक्षणें होतात. ही रक्तज रोहिणी असाध्य आहे.

सद्यस्त्रिदोषजा हन्ति त्र्यहात्कफसमुद्भवा ।
पञ्चाहात्पित्तसंभूता सप्ताहात्पवनोत्थिता ॥ ७ ॥

त्रिदोषजन्य रोहिणी त्वरित प्राणनाश करिते. कफजन्य रोहिणी तीन दिवसांमध्यें, पित्तजन्य रोहिणी पांच दिवसांमध्यें व वातजन्य रोहिणी सात दिवसांत प्राणनाश करिते.

कंठशालूक.

कोलास्थिमात्रः कफसंभवो यो ग्रन्थिर्गले कण्टकशूकभूतः ।
खरः स्थिरः शस्त्रनिपातसाध्यस्तं कण्ठशालूकमिति ब्रुवन्ति ।

कफदोषानें घशांत बोरांतील बीएवढी गांठ होते. तिच्यावर बारीक कुसळासारखे काटे असतात. ती खरखरीत व स्थिर असते. ही शस्त्रक्रियेनें साध्य होते. हिला कंठशालूक असें म्हणतात.

अधिजिव्ह.

जिह्वाग्ररूपः श्वयथुः कफात्तु जिह्वोपरिष्टादसृजैव मिश्रात् ।
ज्ञेयोऽधिजिह्वः खलु रोग एष विवर्जयेदागतपाकमेनम् ॥ ९ ॥

कफ व रक्त दोषांनीं जिभेवर जिभेच्या अग्राप्रमाणें एक सूज येते, त्याला अधिजिव्ह असें म्हणतात. हा पिकला असतां असाध्य म्हणून वर्ज करावा.

वलय.

बलास एवाऽऽयतमुन्नतं च शोथं करोत्यन्नगतिं निवार्य ।
तं सर्वथैवाप्रतिवार्यवीर्यं विवर्जनीयं वलयं वदन्ति ॥ १० ॥

कफदोषानें गळ्यामध्यें लांबट व उंच अशी एक सूज उत्पन्न होते. तिच्या योगानें अन्नमार्ग बंद होतो. तिला वलय असें म्हणतात. ह्याजवर उपचार चालत नाहीं. हा असाध्य म्हणून सोडून द्यावा. (ह्यालाच घाटसर्प असें म्हणतात.)

अलासलक्षण.

गले तु शोथं कुरुतः प्रवृद्धौ श्लेष्मानिलौ श्वासरुजोपपन्नम् ।
मर्मच्छिदं दुस्तरमेनमाहुरलाससंज्ञं भिषजो विकारम् ॥ ११ ॥

कफ व वात हे दोष गळ्यामध्यें सूज उत्पन्न करितात. तिजमुळें श्वास व वेदना होतात. मर्मभेद करणाऱ्या ह्या दुस्तर व्याधीला अलास (बलास) असें म्हणतात.

एकवृंद.

वृत्तोन्नतोऽन्तःश्वयथुः सदाहः सकण्डुरोऽपाक्यमृदुर्गुरुश्च ।
नाम्नैकवृन्दः परिकीर्तितोऽसौ व्याधिर्बलासक्षतजप्रसूतः ॥ १२ ॥

गळ्यामध्यें उंच व वाटोळी अशी एक सूज येते. तिचा किंचित् दाह होतो, तींत कंडू असते. ती पिकत नाहीं. ती मऊ व जड असते. ह्या व्याधीला एकवृंद असें म्हणतात. हा कफ व रक्त या दोन दोषांनीं होतो.

वृंद.

समुन्नतं वृत्तममन्ददाहं तीव्रज्वरं वृन्दमुदाहरन्ति ।
तच्चापि पित्तक्षतजप्रकोपाद्विद्यात्सतोदं पवनात्मकं तु ॥ १३ ॥

गळ्यामध्यें उंच, वाटोळी व अत्यंत दाहयुक्त अशी एक सूज येते. तिच्यामुळें तीव्र ज्वर येतो. तिला वृंद म्हणतात. हा पित्त व रक्त यांचे प्रकोपामुळें होतो. वातात्मक असल्यास त्यांत टोचणी असते.

शतघ्नी.

वर्तिर्घना कण्ठनिरोधिनी या चिताऽतिमात्रं पिशितप्ररोहैः ।
अनेकरुक्प्राणहरा त्रिदोषाज्ज्ञेया शतघ्नीसदृशी शतघ्नी ॥ १४ ॥

त्रिदोषामुळें घशामध्यें लांबट व कठीण अशी सूज येते. तिच्या-

योगानें गळ्याचा रोध होतो, तिजवर मांसाचे अंकुर असतात. व अनेक प्रकारच्या वेदना असतात. ह्या शतघ्नी-(लांबट काष्ठाचें एक शस्त्र)-रूप विकाराला शतघ्नी असें म्हणतात.

गिलायु.

ग्रन्थिर्गले त्वामलकास्थिमात्रः स्थिरोऽल्परुक्स्यात्कफरक्तमूर्तिः ।
संलक्ष्यते सक्तमिवाशनं च स शस्त्रसाध्यस्तु गिलायुसंज्ञः ॥१५॥

कफरक्तामुळें गळ्यामध्यें आवळ्यांतील बीएवढी एक गांठ होते. ती कठीण असून तिच्यामध्यें अत्यंत वेदना असतात. ह्या गांठीमुळें खाल्लेलें अन्न घशांत अडकतें. हिला गिलायु असें म्हणतात. ही शस्त्रसाध्य आहे.

गलविद्रधि.

सर्वं गलं व्याप्य समुत्थितो यः शोफो रुजः सन्ति च यत्र सर्वाः ।
स सर्वदोषैर्गलविद्रधिस्तु तस्यैव तुल्यः खलु सर्वजस्य ॥ १६ ॥

जी सूज सर्व गळाभर असते व जीमध्यें सर्व प्रकारच्या वेदना असतात, त्या सर्व दोषांपासून होणाऱ्या व्याधीला गलविद्रधि म्हणतात. ह्यामध्यें त्रिदोषज विद्रधीचीं सर्व लक्षणें असतात.

गलौघ.

शोथो महानन्नजलावरोधी तीव्रज्वरो वायुगतेर्निहन्ता ।
कफेन जातो रुधिरान्वितेन गले गलौघः परिकीर्त्यतेऽसौ ॥१७॥

कफ व रक्त या दोषांनीं गळ्यामध्यें अन्नपाण्याच्या मार्गाचा अवरोध करणारी अशी मोठी सूज उत्पन्न होते. तिजमुळें तीव्रज्वर येतो आणि वायूच्या गतीला प्रतिबंध होतो. त्याला गलौघ म्हणतात.

स्वरघ्न.

यस्ताम्यमानः श्वसिति प्रसक्तं भिन्नस्वरः शुष्कविमुक्तकण्ठः ।
कफोपदिग्धेष्वनिलायनेषु ज्ञेयः स रोगः श्वसनात्स्वरघ्नः ॥ १८ ॥

कफानें वायूचा मार्ग बंद झाल्यामुळें श्वासोच्छ्वास करितांना एकसारख्या डोळ्यांपुढें आंधेऱ्या येतात किंवा मूर्च्छा येते, आवाज बसतो, घसा कोरडा होतो व कांहीं गिळतां येत नाहीं. ह्या वातजन्य रोगाला स्वरघ्न असें म्हणतात.

मांसतानलक्षण.

प्रतानवान्यः श्वयथुः सुकष्टो गलोपरोधं कुरुते क्रमेण ।
स मांसतानः कथितोऽवलम्बी प्राणप्रणुत्सर्वकृतो विकारः १९

जी सूज गळ्यामध्यें उत्पन्न होऊन पसरते, आणि अत्यंत कष्टदायक होते व जी क्रमानें गळ्याचा रोध करिते. त्या त्रिदोषापासून होणाऱ्या विकाराला मांसतान असें म्हणतात. हा प्राण घेतो.

विदारीलक्षण.

सदाहतोदं श्वयथुं प्रसक्तमन्तर्गले पूतिविशीर्णमांसम् ।
पित्तेन विद्याद्वदने विदारीं पार्श्वे विशेषात्स तु येन शेते ॥ १ ॥

गळ्याच्या आंतल्या भागीं पित्तदोषानें दाह व टोचणी ह्यांनीं युक्त आणि आरक्तवर्ण अशी मोठी सूज येते व तींतून दुर्गंधीयुक्त मांस गळूं लागतें. ह्या व्याधीला विदारी असें म्हणतात. हा विकार बहुतकरून मनुष्य ज्या एकाच कुशीवर नेहमीं निजतो त्या बाजूला विशेषतः होतो.

मुखाचे रोग.

पृथग्दोषैस्त्रयो रोगाः समस्तमुखजाः स्मृताः ॥ १ ॥

वातादि तीन दोषांपासून सर्वमुखासंबंधीं निरनिराळे तीन रोग उत्पन्न होतात.

वातिक सर्वसरलक्षण.

स्फोटैः सतोदैर्वदनं समन्ताद्यस्याऽऽचितं सर्वसरः स वातात् ।

वातजन्य सर्वसरामध्यें तोंडाला आंतून सर्वत्र फोड येतात. आणि त्यांना टोचणी असते.

पैत्तिक सर्वसरलक्षण.

रक्तैः सदाहैः पिटकैः सपीतैर्यस्याऽचितं वाऽपि स पित्तकोपात् ।

पित्तदोषामुळें दाहयुक्त, तांबूस किंवा पिवळट अशा फोडांनीं तोंड आंतून व्यापतें.

कफजन्य सर्वसर.

अवेदनैः कण्डुयुतैः सवर्णैर्यस्याऽऽचितं वाऽपि स वै कफेन ॥

कफापासून होणाऱ्या सर्वसरामध्यें तोंडाला आंतून त्वचेच्या

वर्णाचे फोड येतात. त्यांत वेदना नसतात, पण कंडू असते.

रक्तज मुखरोग.

रक्तेन पित्तोदित एक एव कैश्चित्प्रदिष्टो मुखपाकरोगः ॥ २ ॥

कित्येक वैद्य रक्त व पित्त या दोषांनीं एकच मुखरोग होतो असें म्हणतात.

मुखरोगांतील साध्यासाध्यत्व.

ओष्ठप्रकोपे वर्ज्याः स्युर्मांसरक्तत्रिदोषजाः ।
दन्तवेष्टेषु वर्ज्यौ तु त्रिलिङ्गगतिसौषिरौ ॥ १ ॥
दन्तेषु च न सिध्यन्ति श्यावदालनभञ्जनाः ।
जिह्वारोगेष्वलासस्तु तालुजेष्वर्बुदं तथा ॥ २ ॥
स्वरघ्नो वलयो वृन्दो बलासः सविदारिकः ।
गलौघो मांसतानश्च शतघ्नी रोहिणी गले ॥ ३ ॥
असाध्याः कीर्तिता ह्येते रोगा दश नवोत्तराः ।
तेषु चापि क्रियां वैद्यः प्रत्याख्याय समाचरेत् ॥ ४ ॥

ओष्ठप्रकोपापैकीं (रोगांपैकीं) मांसजन्य, रक्तजन्य व त्रिदोषजन्य ओष्ठरोग असाध्य आहेत. म्हणून ते वर्ज करावे. दांताच्या मुळांच्या रोगांपैकीं त्रिदोषज दंतनाडी व त्रिदोषजन्य महासौषिर हे असाध्य आहेत. दंतरोगांमध्यें श्याव, दंत, दालन व भंजनक हे असाध्य आहेत. जिव्हारोगामध्यें अलास व तालुरोगामध्यें तात्वर्बुद असाध्य आहेत. स्वरघ्न, वलय, वृंद, बलास, विदारिक, गलौघ, मांसतान, शतघ्नी व रोहिणी हे गलरोग असाध्य आहेत. असे हे एकोणीस रोग असाध्य आहेत. तरी त्यांजवर असाध्य म्हणून सांगून उपचार करावे.

मुखरोगांची चिकित्सा.

गलदन्तमूलदशनच्छदेषु रोगाः कफास्रभूयिष्ठाः ।
तस्मादेतेष्वसकृद्रुधिरं विस्रावयेद्दुष्टम् ॥ १ ॥

गळा, दातांचें मूळ व ओठ ह्यांचे रोग कफरक्तात्मक असतात, म्हणून ह्या रोगांत वरचेवर रक्त काढीत जावें, असें भावप्रकाशांत म्हटलें आहे.

वातजन्य ओष्ठरोगावर.

स्नेहांस्तथोष्णान्परिषेकलेपान्घृतस्य पानं रसभोजनं च ।
अभ्यञ्जनस्वेदनलेपनं तदोष्ठे विदध्यात्पवनाभिभूते ॥ १ ॥

उष्ण तेलें ओठावर शिंपावीं, उष्ण लेप करावे; तूप प्यावें; मांसरसाचें भोजन करावें. तेल लावणें, स्वेदन (शेकणें किंवा बाफारा देणें) व लेप हे उपचार वातजन्य ओष्ठरोगावर करावे.

तैलं घृतं सर्जरसं ससिक्थं रास्नागुडं सैन्धवगैरिकं च ।
पक्त्वा समांशं दशनच्छदानां त्वग्भेदहन्तृ व्रणरोपणं च ॥२॥

तेल, तूप, राळ, मेण, रास्ना, गूळ, सेंधेलोण व सोनकाव हीं औषधें समभाग एकत्र करून पचन करावीं; व तें मलम ओठास लावावें. तें त्वचेच्या भेगांचा नाश करितें व व्रण भरून आणतें.

रालं मधूच्छिष्टगुडेन पक्वं तैलं घृतं वा विनिहन्ति लेपात् ।
त्वक्कोदपारुष्यरुजोऽधरस्य पूयास्रसंस्रावमपि प्रसह्य ॥ ३ ॥

राळ, मेण व गूळ हीं औषधें समभाग घेऊन तेलांत किंवा तुपांत शिजवून मलम तयार करावें. ह्याचा लेप त्वचेचा दोष, खरखरीतपणा, ओठाची पीडा आणि रक्त व पू ह्यांचा मोठा स्राव ह्यांचा नाश करतो.

पित्तजन्य ओष्ठरोगावर.

वेधं शिराणां वमनं विरेकं तिक्तस्य पानं रसभोजनं च ।
शीताः प्रदेहाः परिषेचनं च पित्तोपसृष्टेष्वधरेषु कुर्यात् ॥ १ ॥

पित्तजन्य ओष्ठरोगावर शीर तोडणें, वमन, विरेचन, कडू रसांचें सेवन, मांसरसाचें भोजन, थंड लेप व थंड काढे व तेलें ह्यांचें सेचन, हे उपचार करावे.

कफजन्य ओष्ठरोगावर.

शिरोविरेचनं धूमः स्वेदः कवल एव च ।
हृते रक्ते प्रयोक्तव्य ओष्ठकोपे कफात्मके ॥ १ ॥

कफात्मक ओष्ठरोगावर प्रथम रक्त काढून नंतर शिरोविरेचन, धुरी, स्वेद व कवलधारण हे उपचार करावे.

मेदोजे स्वेदिते भिन्ने शोधिते कवलो हितः ।

मेदोजन्य ओष्ठरोगावर स्वेदन करावें, आणि ओठ फुटल्यावर

त्यांचें (व्रणाप्रमाणें) शोधन करून कवल धारण करावा. तो हितकारक आहे.

प्रियंगुत्रिफलालोध्रं सक्षौद्रं प्रतिसारणम् ॥ २ ॥

गव्हला, हिरडा, बेहडा, आवळकाठी व लोध्र ह्यांचें चूर्ण मधांतून ओठावर घासावें.

प्रतिसारणाचा प्रकार.

दन्तजिह्वामुखानां यच्चूर्णकल्कावलेहकैः ।
शनैर्घर्षणमंगुल्या तदुक्तं प्रतिसारणम् ॥ १ ॥
ओष्ठरोगेष्वशेषेषु दृष्ट्वा दोषमुपाचरेत् ।
तेषु व्रणत्वं यातेषु व्रणवत्समुपाचरेत् ॥ २ ॥

दांत, जीभ व तोंड ह्यांच्या ठिकाणीं चूर्ण, कल्क, अवलेह इत्यादि औषधें बोटानें घासणें ह्या क्रियेला प्रतिसारण म्हणतात. सर्व ओष्ठरोगांत रोगांतील दोष पाहून उपचार करावे. ओठावर जर व्रण झाले तर व्रणावरील उपचार करावे.

दंतमूळरोगांची चिकित्सा.

दन्तमूलसमुत्थेषु दन्तोत्थेषु गदेषु च ।
रक्तमोक्षं प्रशंसन्ति जलौकालाबुशृङ्गकैः ॥ १ ॥

दांतांच्या मुळाचे रोग व दातांचे रोग झाले असतां जळवा लावून अथवा भोपळा किंवा तुमडी लावून रक्त काढावें. हें प्रशस्त आहे असें म्हणतात.

शीतादाची चिकित्सा.

शीतादेऽस्रस्रुतिं कुर्यात्तथा गण्डूषधारणम् ।
शुण्ठीपर्पटकक्काथैः कवोष्णैश्च मुहुर्मुहुः ॥ १ ॥

शीतादरोगामध्यें रक्त काढावें, व सुंठ व पित्तपापडा ह्यांच्या काढ्यानें वरचेवर गुळण्या कराव्या, असें योगतरंगिणींत आहे.

शीतादे हृतरक्ते तु तोये नागरसर्षपान् ।
निष्काथ्य त्रिफलां चापि कुर्याद्गण्डूषधारणम् ॥ १ ॥

शीतादांतील रक्त काढून सुंठ, मोहऱ्या व त्रिफळा ह्यांचा काढा करून त्याच्या गुळण्या कराव्या, असें भावप्रकाशांत आहे.

कासीसलोध्रकृष्णामनःशिलाप्रियंगुतेजोह्वाः ।

एषां चूर्णं मधुयुक्शीतादे पूतिमांसहरम् ॥ १ ॥
तैलं घृतं वा वातघ्नं शीतादे संप्रशस्यते ।

हिराकस, लोध्र, पिंपळी, मनशीळ, गव्हला व करडकांगोणी ह्यांचें चूर्ण मधांतून दांतांस घासावें. तें शीताद रोगांतील नासक्या मांसाचा नाश करितें. वातनाशक तेल किंवा तूप शीतादावर देणें प्रशस्त आहे.

दंतपुप्पुटकाची चिकित्सा.

दन्तपुप्पुटके कार्यं तरुणे रक्तमोक्षणम् ।
सपञ्चलवणक्षारैः सक्षौद्रैः प्रतिसारणम् ॥ १ ॥

अत्यंत वाढलेल्या दंतपुप्पुटक रोगावर रक्त काढून पंचलवणें व जवखार ह्यांचें चूर्ण मधांतून त्याजवर घासावें.

दंतवेष्टाची चिकित्सा.

दन्तवेष्टे विधिः कार्यो रक्तपित्तनिबर्हणः ।
शिरोविरेकश्च हितो नस्यं स्निग्धं च भोजनम् ॥ १ ॥
विस्राविते दन्तवेष्टे व्रणं तु प्रतिसारयेत् ।
लोध्रपत्तङ्गमधुकलाक्षाचूर्णैर्मधुप्लुतैः ॥ २ ॥
गण्डूषे क्षीरिणो योज्याः सक्षौद्रघृतशर्कराः ।
चलद्दन्तस्थैर्यकरं कार्यं बकुलचर्वणम् ॥ ३ ॥

दंतवेष्टावर रक्तपित्तनाशक उपचार करावे. शिरोविरेचन, नस्य व स्निग्ध भोजन करावें. आणि रक्त व पू वाहणाऱ्या दंतवेष्टावर लोध्र, पतंग, जेष्टमध व लाख ह्यांचें चूर्ण मधांतून घासावें. गुळण्या करण्याकरितां वड, पिंपळ, उंबर वगैरे क्षीरवृक्षाच्या सालींचे काढे तूप, मध व साखर घालून द्यावे. व हलणाऱ्या दांताला बळकट करणारी बकुळीची साल चावावी.

भद्रमुस्तादि वटिका.

भद्रमुस्ताभयाव्योषविडङ्गारिष्टपल्लवैः ।
गोमूत्रपिष्टैर्गुटिकां छायाशुष्कां प्रकल्पयेत् ॥ १ ॥
तां निधाय मुखे स्वप्याच्चलदन्तातुरो नरः ।
नातः परतरं किंचिच्चलदन्तस्य भेषजम् ॥ १ ॥

नागरमोथे, हिरडेदळ, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग व कडु-लिंबाचा पाला, ह्यांचें चूर्ण करून गोमूत्रांत त्याच्या गोळ्या कराव्या

आणि त्या सावलींत वाळवाव्या. ज्याचे दांत हालत आहेत, त्यानें ह्यांतील एक गोळी तोंडांत धरून निजावें. ह्यासारखें हलणाऱ्या दांतांना दुसरें औषध नाहीं.

सहचरादि तेल.

तुलां धृतां नीलसहाचरस्य द्रोणेऽम्भसः संश्रपयेद्यथावत् ।
ततश्चतुर्भागरसे तु तैलं पचेच्छनैरर्धपलप्रमाणैः ॥ १ ॥
कल्कैरनन्ताखदिरारिमेदजम्ब्वाम्रयष्टीमधुकोत्पलानाम् ।
तत्तैलमाश्वेव धृतं मुखेन स्थैर्यं द्विजानां विदधाति सद्यः ॥ २ ॥

निळा कोरांटा चारशें तोळे घेऊन त्याचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. आणि धमासा, खैराची साल, जांभळीची साल, आंब्याची साल, जेष्टमध व कमळ ह्या औषधांचा अर्धाअर्धा तोळा कल्क घालून तेल सिद्ध करावें. हें तेल तोंडांत धरलें असतां दांताला त्वरित बळकटी आणितें.

जीरकादि चूर्ण.

जरणलवणपथ्याशाल्मलीकण्टकाना-
मनुदिनमनुघृष्टं दन्तमूलेषु चूर्णम् ।
व्रणदरणरुगस्रस्रावचाञ्चल्यशोथा-
नपनयति विवस्वानन्धकारानिवाऽऽशु ॥ १ ॥

जिरें, मीठ, हिरडेदळ, शेवरीचे कांटे, ह्यांचें चूर्ण नित्य दांतांला घासावें. सूर्य जसा अंधकाराचा नाश करतो त्याप्रमाणें दातासंबंधी व्रण, दांत फुटणें, ठणकणें, त्यांतून पू व रक्त जाणें आणि दांत हलणें ह्यांचा हें चूर्ण त्वरित नाश करितें.

कणादि चूर्ण.

कणासिन्धूत्थजरणचूर्णं तूर्णं व्यपोहति ।
घर्षणाद्दन्तचाञ्चल्यव्यथाशोथास्रसंस्रवान् ॥ १ ॥

पिंपळी, सेंधेलोण, व जिरें ह्यांचें चूर्ण दांतांला घासावें. तें दांत हलणें, ठणकणें व दातासंबंधीं सूज ह्यांचा त्वरित नाश करितें.

दशमूळादि तेल किंवा घृत.

दशमूलीकषायेण तैलं वा घृतमेव वा ।
विपक्कं केवलं शस्तं सक्षौद्रं दन्तचालने ॥ १ ॥

दशमुळांच्या काढ्यांत तेल व किंवा तूप सिद्ध करावें. तें हल-णाऱ्या दांतांला मधाशीं घेणें प्रशस्त आहे.

सौषिरचिकित्सा.

सौषिरे हृतरक्ते तु लोध्रमुस्तारसाञ्जनैः ।
सक्षौद्रैः शस्यते लेपो गण्डूषे क्षीरिणो हिताः ।

सौषिरांतील रक्त काढून त्याजवर लोध्र, नागरमोथे व रसांजन ह्यांच्या चूर्णाचा मधांतून लेप करावा. आणि वड, पिंपळ वगैरे क्षीर वृक्षांच्या सालीच्या गुळण्या कराव्या. त्या हितकारक आहेत.

परिदर व उपकुश ह्यांची चिकित्सा.

क्रियां परिदरे कुर्याच्छीतादोक्तां विचक्षणः ।
संशोध्योभयतः कार्यं शिरश्चोपकुशे तथा ॥ १ ॥

परिदरावर जाणत्या वैद्यानें शीतादावरील उपचार करावे. परि-दर व उपकुश ह्या रोगांत प्रथमतः वमनविरेचनादिकांनीं शरी-राची शुद्धि करावी. व शिरोविरेचन देऊन मस्तकशुद्धि करावी. उप-कुशावरहि असेच उपचार करावे.

काकोदुम्बरिकापत्रैर्व्रणं विस्रावयेद्भिषक् ।

काळ्या उंबराच्या पानांनीं (किंवा खरवतीच्या पानांनीं) व्रणा-चा स्राव करावा.

लवणैः क्षौद्रयुक्तैश्च सव्योषैः प्रतिसारयेत् ॥ २ ॥

सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण व सैंधेलोण मधांत खलून त्यानें वरून घासावें.

वैदर्भ, खलिवर्धन, अधिमांस व दंतविद्रधि ह्यांची चिकित्सा.

शस्त्रेणोत्कृत्य वैदर्भे दन्तमूलानि शोधयेत् ।
ततः क्षारं प्रयुञ्जीत क्रियाः सर्वाश्च शीतलाः ॥ १ ॥

वैदर्भावर शस्त्रानें खरवडून दांतांच्या मुळांचें शोधन करावें. नंतर त्याजवर क्षार लावून सर्व शीतल क्रिया करावी.

उद्धृत्याधिकदन्तं तु ततोऽग्निमवचारयेत् ।
क्रिमिदन्तकवच्चात्र विधिः कार्यो विजानता ॥ २ ॥

खलिवर्धनांत अधिक आलेला दांत उपटून काढून अग्नीनें डाग देऊन दांत उपटून काढल्यावर क्रिमिदंताप्रमाणें चिकित्सा करावी.

छित्त्वाऽधिमांसं सक्षौद्रैरेतैश्चूर्णैरुपाचरेत् ।
अधिमांसाचें छेदन करून त्याजवर पुढील चूर्ण लावावें.

वचातेजोवतीपाठास्वर्जिकायावशूकजैः ॥ ३ ॥
क्षौद्रद्वितीयपिप्पल्यः कवले चात्र कीर्तिता ।

वेखंड, करंडकांगोणी, पहाडमूळ, साज्जिखार व जवखार ह्यांचें चूर्ण मधाशीं लावावें. मोठी व बारीक पिंपळी मधाशीं तोंडांत धरावी असेंही सांगितलें आहे.

पटोलनिम्बत्रिफलाकषायश्चात्र धावनः ॥ ४ ॥

कडुपडवळ, कडुनिंबाची साल व त्रिफळा ह्यांचा काढा धुण्याकरितां घ्यावा.

विद्रध्युक्तं च विधिवद्विद्ध्याद्दन्तविद्रधौ ।
शस्त्रकर्म नरस्तत्र कुशलेनैव कारयेत् ॥ ५ ॥

दांताच्या विद्रधीवर (करटावर) विद्रधिचिकित्सेंत सांगितल्याप्रमाणें उपचार करावे. कुशल वैद्यानें त्यावर शस्त्रक्रियाही करावी.

नाडीव्रणहरं कर्म दन्तनाडीषु कारयेत् ।
यद्दन्तमध्ये जायेत नाडी दन्तं तमुद्धरेत् ॥ ६ ॥
छित्त्वा मांसानि शस्त्रेण यदि नोपरमो भवेत् ।
उद्धृत्य च दहेच्चापि क्षारेण ज्वलनेन वा ॥ ७ ॥
भिनत्त्युपेक्षिते दन्ते हनुं सास्थिगतिर्ध्रुवम् ।
उद्धृते तूत्तरे दन्ते शोणितं प्रस्रवेदति ॥ ८ ॥

दांतांसंबंधीं नाडीव्रणावर नाडीव्रणाच्या चिकित्सेंत सांगितलेले उपचार करावे. तेवढ्यानें तो दांतांचा नाडीव्रण जर बरा झाला नाहीं, तर ज्या दाताला नाडीव्रण आहे तो दांत उपटून काढून त्या ठिकाणीं क्षारानें अथवा अग्नीनें डाग द्यावा. ह्या दांताच्या अस्थिगत नाडीव्रणाची उपेक्षा केली, तर ती निश्चयानें हनुवटीचा नाश करिते.

रक्तातिसेकात्पूर्वोक्ता घोरा रोगा भवन्ति हि ।
काणः संजायते जन्तुरर्दितं तस्य जायते ॥ ९ ॥
चलमप्युत्तरं दन्तमतो नैवोद्धरेद्भिषक् ।
समूलं दशनं तस्मादुद्धरेद्भग्नमस्थि च ॥ १० ॥

वरचा दांत उपटून काढला, आणि त्यांतून रक्त फार गेलें, तर

मागें सांगितलेले (भग्नानिदानांत सांगितलेले) रक्तस्रावजन्य भयंकर रोग होतात. ज्या बाजूचा दांत काढला असेल त्या बाजूचा डोळा अंधळा होतो. त्यामुळें तो मनुष्य काणा होतो. पुढें त्याला अर्दित वायुही होतो. म्हणून वरचा दांत हलत असला तरी तो काढूं नये. आणि खालील दांत मात्र समूळ उपटून काढून तेथील भग्नास्थिही काढून टाकावें.

जात्यादि तेल.

कषायैर्जातिमदनकण्टकीस्वादुकण्टकैः ।
मञ्जिष्ठालोध्रखदिरयष्ट्याह्वैश्चापि यत्कृतम् ।
तैलं यत्साधितं तत्र हन्याद्दन्तगतां गतिम् ॥ १ ॥

जाईचा पाला, गेळफळ, वेहेकळ, गोखरू, मंजिष्ट, लोध्र, खैर व जेष्टमध ह्यांचा काढा व कल्क घालून तेल सिद्ध करावें. तें दंतनाडीचा नाश करितें.

दांतांच्या रोगांची चिकित्सा.

दन्तरोगेषु सर्वेषु शस्तो वातहरो विधिः ।
पक्कं तैलं कवोष्णं च शस्तं कवलधारणे ॥ १ ॥

सर्व दांतांच्या रोगांवर वातनाशक क्रिया करावी. कढविलेलें कोमट तेल तोंडांत भरावें. तें प्रशस्त आहे.

जयेद्विस्रावणैः स्विन्नमचलं कृमिदन्तकम् ।
तथाऽवपीडैर्वातघ्नैः स्नेहगण्डूषधारणैः ॥ २ ॥
भद्रदार्वादिवर्षाभूलेपैः स्निग्धैश्च भोजनैः ।
कृमिदन्तापहं कोष्णं हिंगु दन्ताम्बरे स्थितम् ॥ ३ ॥

न हालणाऱ्या किडक्या दांताला स्वेदन करून स्रावकारक औषधांनीं स्राव करवावा (लाळ गाळावी). तसेंच वातनाशक असे स्नेह आणि तेल यांच्या गुळण्या करवाव्या. देवदार्व्यादि गणांतील औषधांचा व वसूच्या मुळीचा लेप करावा. आणि स्निग्ध भोजन द्यावें. ऊन केलेला हिंग फडक्यांत गुंडाळून तोंडांत धरावा. तो दांतांतील कीड दूर करतो.

बृहतीभूमिकादम्बीपञ्चांगुलकण्टकारिकाक्वाथः ।
गण्डूषस्तैलयुतः कृमिदन्तकवेदनाशमकः ॥ ४ ॥

डोरलीमूळ, गोरखमुंडी, एरंडमूळ व रिंगणमूळ ह्यांचा काढा करून त्यांत तेल घालून त्याच्या गुळण्या कराव्या. त्या किडलेल्या दांताचा ठणका बंद करितात.

नीलीवायसजंघाकटुतुम्बीमूलमेकैकम् ।
संचूर्ण्य दशनविधृतं दशनक्रिमिपातनं प्राहुः ॥ ५ ॥

निळंबी, काकजंघा, व कडू भोपळा ह्या प्रत्येक वनस्पतीचें मूळ चूर्ण करून तोंडांत धरावें. तें दांतांतील किडे पाडितें असें म्हणतात.

पिष्ट्वा च सारिवापर्णं दृढं दन्तेषु धारयेत् ।
पतन्ति दन्तकीटाश्च चाञ्चल्यं हरति क्षणात् ॥ ६ ॥

उपळसरीचीं पानें घेऊन त्यांचें चूर्ण करून दांतांत बळकट धरावें, म्हणजे दांतांतील किडे पडतात व दांत हलणें बंद होतें. असें वैद्यविलासांत म्हटलें आहे.

कासीसं हिंगु सौराष्ट्री देवदारु समं जलैः ।
गुटिकां धारयेद्दन्तक्रमिशूलहरां पराम् ॥ १ ॥

हिराकस, हिंग, तुरटी व देवदार ह्यांचें समभाग चूर्ण करून पाण्यांत त्यांची गोळी करून ती दांतांत धरावी. ती कृमिजन्य शूळ नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे, असें चिकित्सासारांत आहे.

दंतहर्षचिकित्सा.

स्नेहानां कवलाः कोष्णाः सर्पिषस्त्रिवृतस्य च ।
निर्यूहाश्चानिलघ्नानां दन्तहर्षप्रमर्दनाः ॥ १ ॥

कोमट अशीं तेलें, तेडाच्या काढ्यानें व कल्कानें सिद्ध केलेलें तूप व वातनाशक औषधांचे काढे ह्यांच्या गुळण्या कराव्या. हे उपचार दंतहर्षाचा नाश करतात.

स्नैहिकोऽत्र हितो धूमो नस्यं स्नैहिकमेव च ।
रसा रसयवाग्वश्च क्षीरं संतानिका घृतम् ।
शिरोबस्तिर्हितश्चापि क्रमो यश्चानिलापहः ॥ २ ॥

ह्या दंतहर्षावर स्नेहयुक्त धुरी व स्नेहयुक्त नस्य हीं हितकारक आहेत. तसेंच मांसरसांत केलेल्या यवागू, दूध, दुधावरील साय व तूप हे पदार्थही हितकारक आहेत. आणि शिरोबस्ति व वातनाशक उपचार हितकारक आहेत.

अच्छिद्य दन्तमूलानि शर्करामुद्धरेद्भिषक् ।
लाक्षाचूर्णैर्मधुयुतैस्ततस्तां प्रतिसारयेत् ॥ ३ ॥
दन्तहर्षक्रियां चात्र कुर्यान्निरवशेषतः ।

दातांच्या मुळांचें छेदन न करितां दंतशर्करा काढून टाकावी. नंतर लाखेचें चूर्ण, मध व तूप त्या ठिकाणीं घासावें. दंतहर्षावर सांगितलेली ही सर्व क्रिया दंतशर्करेवरही करावी.

कपालिका कृच्छ्रतमा तत्राप्येषा क्रिया हिता ॥ ४ ॥

कपालिका ही अत्यंत कष्टसाध्य आहे. तथापि हीच दंतशर्करेवरील सर्व क्रिया तिजवरही हितकारक आहे.

खदिरतेल.

अरिमेदत्वचं क्षुण्णां पचेच्छतपलोन्मिताम् ।
जलद्रोणेन तत्क्वाथं गृह्णीयात्पादशेषितम् ॥ १ ॥
तैलस्यार्धाढकं दत्त्वा कल्कैः कर्षमितैः पचेत् ।
अरिमेदलवङ्गाभ्यां गैरिकागुरुपद्मकैः ॥ २ ॥
मञ्जिष्ठालोध्रमधुकैर्लाक्षान्यग्रोधमुस्तकैः ।
त्वग्जातीफलकर्पूरकंकोलखदिरैस्तथा ॥ ३ ॥
पत्तङ्गधातकीपुष्पसूक्ष्मैलानागकेशरैः ।
कट्फलेन च संसिद्धं तैलं मुखरुजं जयेत् ॥ ४ ॥
प्रदुष्टमांसं चलितं शीर्णं दन्तं च सौषिरम् ।
शीतादं दन्तहर्षं च विद्रधिं कृमिदन्तकम् ।
दन्तस्फुटनदौर्गन्ध्यं जिह्वाताल्वोष्ठजां रुजम् ॥ ५ ॥

चारशें तोळे खैराची साल कुटून दहाशें चोवीस तोळे पाण्यांत टाकून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्यांत एकशें अठ्ठावीस तोळे तेल व खैराची साल, लवंग, सोनकाव, कृष्णागर, पद्मकाष्ट, मंजिष्ट, लोध्र, जेष्टमध, लाख, वडाच्या पारंब्या, नागरमोथे, दालचिनी, जायफळ, कापूर, कंकोळ, कात, पतंग, धायटीचीं फुलें, वेलचीचे दाणे, नाकेशर, व कायफळ ह्या औषधांचा कल्क एक एक तोळा घालून तेल सिद्ध करावें. हें अरिमेदादि तेल मुखरोगांचा नाश करितें, दातांच्या मुळांच्या ठिकाणचें कुजलेलें मांस, हालणारे दांत, त्याचप्रमाणें जीर्ण झालेले दांत, सौषिर नांवाचा दंतरोग, शीताद, दंतहर्ष, दंतविद्रधि, कृमिदंत, दांत फुटणें, दुर्गंधी जीभ, टाळा व ओठ

ह्यांचे रोग ह्यांचा नाश करितें. हें तेल भावप्रकाशांतील आहे.

लाक्षादि तेल.

तैलं लाक्षारसं क्षीरं पृथक्प्रस्थमितं पचेत् ।
द्रव्यैः पलमितैरेतैः क्राथैश्चापि चतुर्गुणैः ॥ १ ॥
लोध्रकट्फलमञ्जिष्ठापद्मकेसरपद्मकैः ।
चन्दनोत्पलयष्ट्याह्वैस्तत्तैलं वदने धृतम् ॥ २ ॥
दालनं दन्तचालं च दन्तमोक्षकपालिकाम् ।
शीतादं पूतिवक्त्रं च विरुचिं विरसास्यताम् ॥ ३ ॥
हन्यादाशु गदानेतान्कुर्याद्दन्तानपि स्थिरान् ।
लाक्षादिकमिदं तैलं दन्तरोगेषु पूजितम् ॥ ४ ॥

तेल, लाखेचा काढा व दूध प्रत्येक चौसष्ट चौसष्ट तोळे; लोध्र, कायफळ, मंजिष्ट, कमळांतील केसर, पद्मकाष्ठ, पांढरा चंदन, निळें कमळ व जेष्टमध, हीं द्रव्यें चार चार तोळे घेऊन त्यांचा कल्क व तेलाच्या चौपट त्याच औषधांचा काढा घालून तेल सिद्ध करावें व तें तोंडांत धरावें. म्हणजे (दालन), दांत हलणें, दंतमोक्ष (दांत पडणें) कपालिका, शीताद, मुखदुर्गंधी, अरुचि व तोंडाचा विरसपणा, ह्या रोगांचा हें लाक्षादि तेल त्वरित नाश करितें, व दांत बळकट करितें. हें लाक्षादि तेल दंतरोगावर श्रेष्ठ आहे.

कुष्ठादि चूर्ण.

कुष्ठं दार्वी लोध्रमब्दं समङ्गा पाठा तिक्ता तेजनी पीतिका च ।
चूर्णं शस्तं घर्षणे तद्द्विजानां रक्तस्रावं हन्ति कण्डूरुजं च ॥१॥

कोष्ट, दारुहळद, लोध्र, नागरमोथे, मंजिष्ट, पहाडमूळ, कुटकी, तेजबळ व हळद ह्यांचें चूर्ण दांतास घासण्यास प्रशस्त आहे. तें दातांतील रक्तस्राव, कंडू व ठणका बंद करितें.

सौराष्ट्रीत्रिफलामदत्रुटिकृमिछिद्तुत्थपत्राङ्गकं
कासीसं खदिरस्य सारममलं मायफलं चाऽऽयसम् ।
जीमूतं च समांशकं हि सकलं संकुट्य वस्त्रे भृशं
पूतं तोययुतं रदेषु रदरुग्विच्छित्तिकृद् घृष्टकम् ॥ २ ॥

तुरटी, त्रिफळा, कस्तुरी, वेलची, वावडिंग, मोरचूत, पतंग, हिराकस, खैराचा कात, आवळकाठी, मायफळ, लोह (लोहकीट) नागरमोथे, हीं औषधें समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून पाण्यांत

कालवून दांतास घासावें. म्हणजे तें दांतांच्या रोगांचा नाश कारितें.

छिन्नया पिष्टया वारा दन्तशूलो विनश्यति ।

गुळवेलीचें चूर्ण पाण्यांत कालवून दांतास घासावें, म्हणजे दांताचा ठणका बंद होतो.

स्वेदिता रवितोयेन चलतां नाशयेद् ध्रुवम् ॥ ३ ॥

रुईच्या मुळ्यांचा काढा करून त्यानें दांत शेकावे, म्हणजे दांतांचें चलन बंद होतें.

जातिपत्रादि चूर्ण.

जातीपत्रपुनर्नवागजकणाकोरण्टकुष्ठं वचा-
शुण्ठीदीप्यहरीतकीतिलसमं श्लक्ष्णं भृशं चूर्णयेत् ।
तच्चूर्णं वदने धृतं विजयते दौर्गन्ध्यदन्तव्यथां
चाञ्चल्यत्वमतिव्रणश्वयथुरुक्कण्डूकृमिव्यापदः ॥ १ ॥

जाईचीं पानें, वसूची मुळी, गजपिंपळी, कोरांटीचा पाला, कोष्ट, वेखंड, सुंठ, ओवा, हिरडे व तीळ हीं औषधें समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करावें. हें चूर्ण तोंडांत धरावें; म्हणजे मुखदुर्गंधी, दांतांचा ठणका, दांत अतिशय हालणें, व्रण, सूज, ठणका, कंडु व कृमीची पीडा, ह्यांना जिंकतें.

फलान्यम्लानि शीताम्बु रूक्षान्नं दन्तधावनम् ।
तथाऽतिकठिनं भक्ष्यं दन्तरोगी विवर्जयेत् ॥ २ ॥

आंबट फळें, थंड पाणी, रुक्ष अन्न, दांत घासणें व अतिशय कठीण असे खाण्याचे पदार्थ, हे दंतरोग्यानें वर्ज करावे.

जिव्हारोगचिकित्सा.

जिव्हागतविकाराणां शस्तं शोणितमोक्षणम् ।
गुडूचीपिप्पलीनिम्बकवलः कटुभिः सुखः ॥ १ ॥

जिभेच्या रोगांत रक्त काढणें हें प्रशस्त आहे. गुळवेल, पिंपळी व कडुनिंबाची साल ह्यांच्या काढ्याच्या गुळण्या कराव्या किंवा चूर्ण तोंडांत धरावें. तिखट औषधांचेही कवल तोंडांत धरावे.

ओष्ठप्रकोपेऽनिलजे यदुक्तं प्राक्चिकित्सितम् ।
कण्टकेष्वनिलोत्थेषु तत्कार्यं भिषजा खलु ॥ २ ॥

मागें वातजन्य ओष्ठरोगांवर जे उपचार सांगितले आहेत, ते वातामुळें जिभेवर येणाऱ्या कांट्यांवर करावे.

पित्तजेषु विघृष्टेषु निःसृते दुष्टशोणिते ।
प्रतिसारणगण्डूषनस्यं च मधुरं हितम् ॥ ३ ॥

पित्तजन्य जिव्हारोगावर जीभ खरडावी आणि जिभेंतील वाईट रक्त काढून टाकावें. नंतर मधुर औषधांनीं जीभ घासावी व मधुर औषधांचें नस्य व गुळण्या कराव्या.

उपजिह्वां तु संलिख्य क्षारेण प्रतिसारयेत् ।
शिरोविरेकगण्डूषधूमैश्चैनामुपाचरेत् ॥ ४ ॥

उपजिव्हकामध्यें जीभ खरडून काढून क्षारानें घासावी. व शिरोविरेचन, गुळण्या व धुरी हे उपचार करावे.

व्योषक्षाराभयावह्निचूर्णमेतत्प्रघर्षणम् ।
उपजिह्वाप्रशान्त्यर्थमेभिस्तैलं च पाचयेत् ॥ ५ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार, हिरडे व चित्रकमूळ ह्यांच्या चूर्णानें जीभ घासावी. उपजिव्हकाचे शांतीसाठीं वरील सुंठ, मिरें वगैरे औषधांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें.

गृहधूमारनालेन क्वाथं समधुसैन्धवम् ।
पाणिना मर्दयेच्चाऽऽस्ये उपजिह्वाप्रशान्तये ॥ ६ ॥

घरोसा व कांजी ह्यांच्या काढ्यांत मध व सेंधेलोण घालून उपजिव्हकाचे शांतीकरितां त्यानें जीभ चोळावी.

निर्गुण्डीमुसलीकन्दं चर्वयेदुपजिह्वजित् ।

निर्गुडी व मुसळीचा कंद चावावा. तो उपजिव्हकाला जिंकतो.

काञ्चनारत्वचः क्वाथः प्रातरास्ये धृतः सुखः ।
कुर्यात्सखदिरो जिह्वादरणोन्मूलनं मुहुः ॥ ७ ॥

कांचनाची साल व खैर ह्यांचा काढा करून प्रातःकाळीं त्याच्या वरचेवर गुळण्या कराव्या. तो उपजिव्हक रोग व जिभेच्या भेगा ह्या नाहींशा करतो.

तालुरोगांची चिकित्सा.

युंज्यात्कफहरं शुण्ड्यां रसं गण्डूषधारणे ।

गळशुंडीवर कफनाशक काढ्यांचे गुळणे करावे.

कुष्ठोषणवचासिन्धुकणापाठाप्लवैः सह ॥ १ ॥
सक्षौद्रैर्भिषजा कार्यं गलशुण्डीप्रघर्षणम् ।
अंगुष्ठांगुलिसंदंशेनाऽऽकृष्य गलशुण्डिकाम् ॥ २ ॥

कोष्ट, मिरीं, वेखंड, सैंधेलोण, पिंपळी, पहाडमूळ व नागरमोथे ह्यांचें चूर्ण व मध एकत्र कालवून घ्यावें. नंतर अंगठा व बोट ह्यांनीं किंवा चिमट्यानें गलशुंडीला ओढून धरून त्या कल्कानें तिचें घर्षण करावें.

छेदयेन्मण्डलाग्रेण जिह्वोपरि तु संस्थिताम् ।
अतिच्छेदात्स्रवेद्रक्तं ततो हेतोर्म्रियेत च ॥ ३ ॥
हीनच्छेदाद्भवेच्छोथो लालास्रावो भ्रमस्तथा ।
तस्माद्वैद्यः प्रयत्नेन दृष्टकर्मा विशारदः ॥ ४ ॥
गलशुण्डीं तु संछिद्य कुर्यात्प्राप्तमिमं क्रमम् ।

मंडलाग्रानें गलशुंडी (पडजीभ) छेदन करावी. तिचें अतिशय छेदन झालें तर रक्त वाहून मरण येतें, आणि कमी छेदन झालें तर सूज येते, लाळ गळते व घेरी येते. ह्यासाठीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या कुशल वैद्यानें उत्तम प्रकारें पडजीभ कापून नंतर पुढील उपचार करावे.

पिप्पल्यतिविषाकुष्ठवचामरिचनागरैः ॥ ५ ॥
क्षौद्रयुक्तैः सलवणैस्ततस्तां प्रतिसारयेत् ।

पिंपळी, अतिविष, कोष्ट, वेखंड, मिरीं, सुंठ व सैंधेलोण ह्यांचें चूर्ण व मध एकत्र करून त्यानें कापलेल्या ठिकाणीं पडजिभेला घासावें.

तुण्डीकेर्यध्रुवे कूर्मे संघाते तालुपुप्पुटे ॥ ६ ॥
एष एव विधिः कार्यो विशेषः शस्त्रकर्मणि ।

तुंडिकेरी, अध्रुव, कूर्म, संघात व तालुपुप्पुट ह्या रोगांत शस्त्रकर्म केल्यावर विशेषेंकरून हाच उपचार करावा.

तालुपाके तु कर्तव्यं विधानं पित्तनाशनम् ॥
स्नेहस्वेदौ तालुशोषे विधिश्चानिलनाशनः ॥ ७ ॥

तालुपाकावर पित्तनाशक क्रिया करावी. तालुशोषावर स्नेहन व स्वेदन करून वातनाशक उपचार करावे.

गलरोगांची चिकित्सा.

रोहिणीनां तु साध्यानां हितं शोणितमोक्षणम् ।
वमनं धूमपानं च गण्डूषो नस्यकर्म च ॥ १ ॥

साध्य अशा रोहिणीरोगांत रक्त काढावें व वमन, धुरी देणें गुळण्या व नस्य ह्या क्रिया कराव्या.

वातजां तु हृते रक्ते लवणैः प्रतिसारयेत् ।
सुखोष्णान्स्नेहगण्डूषान्धारयेच्चाप्यभीक्ष्णशः ॥ २ ॥

वातजन्य रोहिणींतील रक्त काढून तिजवर सैंधेलोणाचें चूर्ण घासावें, आणि सुखोष्ण असे तेलाचे गुळणे वरचेवर करावे.

विस्राव्य पित्तसंभूतां सिताक्षौद्रप्रियंगुभिः ।
घर्षयेत्कवलो द्राक्षापरूषैः कथितैर्हितः ॥ ३ ॥

पित्तज रोहिणींत रक्त काढून साखर, मध व गव्हल्याचें चूर्ण वर घासावें.

आगारधूमकटुकैः कफजां प्रतिसारयेत् ।
श्वेताविडङ्गदन्तीषु तैलं सिद्धं ससैन्धवम् ॥ ४ ॥
नस्यकर्मणि दातव्यं कवलं च कफोच्छ्रये ।

वेखंड, वावडिंग व दांतीमूळ ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल सैंधव घालून कफजन्य रोहिणीमध्यें नस्य करावयास द्यावें, व त्या औषधांच्या चूर्णाचा कवल द्यावा.

पित्तवत्साधयेद्वैद्यो रोहिणीं रक्तसंभवाम् ॥ ५ ॥

रक्तजन्य रोहिणीवर पित्तजन्य रोहिणीची चिकित्सा करून ती बरी करावी.

विस्राव्य कण्ठशालूकं साधयेत्तुण्डिकेरिवत् ।
एककाले यवान्नं च भुञ्जीत स्निग्धमल्पशः ॥ ६ ॥

कंठशालूकांतील रक्त काढून तुंडिकेरीवरील उपचार करून तो बरा करावा. ह्यावर एक वेळ स्निग्ध असें सातूचें अन्न खाऊन असावें.

उपजिह्वकवच्चापि साधयेदधिजिह्वकम् ।

अधिजिव्हकावर उपजिव्हकाप्रमाणेंच उपचार करून तो बरा करावा.

एकवृन्दं तु विस्राव्य विधिं शोधनमाचरेत् ॥ ७ ॥

एकवृंदांतील रक्त काढून शोधनविधि करावा.

एकवृन्दमिव प्रायो वृन्दं च समुपाचरेत् ।

वृंदावरही एकवृंदाप्रमाणेंच उपचार करावे.

गिलायुश्चापि यो व्याधिस्तं च शस्त्रेण साधयेत् ॥

गिलायु नांवाच्या गलरोगावर शस्त्रक्रिया करून तो बरा करावा.

अमर्मस्थं सुसंपक्वं छेदयेद्गलविद्रधिम् ॥ ८ ॥

मर्म सोडून झालेला व पिकलेला विद्रधि शस्त्रानें छेदावा.

सामान्य गलरोगांची चिकित्सा.

कण्ठरोगेष्वसृङ्मोक्षैस्तीक्ष्णैर्नस्यादिकर्मभिः ।
चिकित्सकश्चिकित्सां तु कुशलोऽत्र समाचरेत् ॥ १ ॥

गलरोगावर रक्त काढणें व तीक्ष्ण नस्य देणें वगैरे उपचार कुशल वैद्यानें योजावे.

क्वाथं दद्याच्च दार्वीत्वङ्निम्बुतार्क्ष्यकलिङ्गजम् ।
हरीतकीकषायो वा हितो माक्षिकसंयुतः ॥ २ ॥

दारुहळदीची साल, कडुनिंबाची साल, रसांजन व इंद्रजव ह्यांचा काढा मध घालून द्यावा; अथवा त्रिफळ्याचा काढा मध घालून द्यावा. तो हितकारक आहे.

कटुकातिविषादारुपाठामुस्ताकलिंगकाः ।
गोमूत्रक्वथिताः पीताः कण्ठरोगविनाशनाः ॥ ३ ॥

कुटकी, अतिविष, देवदार, पहाडमूळ, इंद्रजव ह्यांचा गोमूत्रांत काढा करून प्यावा. तो गलरोगांचा नाश करतो.

मृद्वीकाकटुकाव्योषदार्वीत्वक्त्रिफला घनम् ।
पाठा रसाञ्जनं दूर्वा तेजोह्वेति सुचूर्णितम् ॥ ४ ॥
क्षौद्रयुक्तं विधातव्यं गलरोगे महौषधम् ।

मनुका, कुटकी, सुंठ, मिरें, पिंपळी, दारुहळदीची साल, त्रिफळा, नागरमोथे, पहाडमूळ, रसांजन, दूर्वा व मालकांगोणी ह्यांचें चूर्ण करून मधांत कालवून तोंडांत धरावें. हें गलरोगावर मोठें श्रेष्ठ औषध आहे.

योगास्त्वेते त्रयः प्रोक्ता वातपित्तकफापहाः ॥ ५ ॥

हे वर सांगितलेले तीन योग अनुक्रमें वात, पित्त व कफजन्य गलरोगांचे नाशक आहेत.

यवाग्रजं तेजवतीं सपाठां रसांजनं दारुनिशां सकृष्णाम् ।
क्षौद्रेण कुर्याद्गुटिकां मुखेन तां धारयेत्सर्वगलामयेषु ॥ ६ ॥

जवखार, मालकांगोणी, पहाडमूळ, रसांजन, दारुहळद व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून मधांत गोळी करून ती सर्व गलरोगांवर तोंडांत धरावी.

सर्व मुखरोगांची चिकित्सा.

वातात्सर्वसरं चूर्णैर्लवणैः प्रतिसारयेत् ।
तैलं वातहरैः सिद्धं हितं कवलनस्ययोः ॥ १ ॥

वातजन्य सर्वसरावर सेंधेलोणाचें चूर्ण घासावें. वातनाशक औषधांनीं सिद्ध केलेलें तेल गुळण्या करण्यास व नस्य करण्यास हितकारक आहे.

पित्तात्मके सर्वसरे शुद्धकायस्य देहिनः ।
सर्वपित्तहरः कार्यो विधिर्मधुरशीतलः ॥ २ ॥

पित्तात्मक सर्वसरावर वमन-विरेचनादिकांनीं देहशुद्धि करून मधुर व शीतळ असे सर्व पित्तनाशक उपचार करावे.

प्रतिसारणगण्डूषधूमसंशोधनानि च ।
कफात्मके सर्वसरे क्रमं कुर्यात्कफापहम् ॥ ३ ॥

कफात्मक सर्वसरावर प्रतिसारण (घासण्याचें औषध), गुळण्या, धुरी व शोधनकर्म (वमनादि) वगैरे सर्व कफनाशक उपचार करावे.

मुखपाके शिरावेधः शिरसश्च विरेचनम् ।
मधुमूत्रघृतक्षीरैः शीतैश्च कवलग्रहः ॥ १ ॥

मुखपाकावर शीर तोडून रक्त काढावें व शिरोविरेचन द्यावें. मध, गोमूत्र, तूप व दूध इत्यादि औषधांचे शीतळ असे कवलही (गुळण्या) द्यावे.

जातीपत्रामृताद्राक्षायासदार्वीफलत्रिकैः ।
क्वाथः क्षौद्रयुतः शीतो गण्डूषो मुखपाकनुत् ॥ २ ॥

जाईचा पाला, गुळवेल, मनुका, धमासा, दारुहळद व त्रिफळा ह्यांचा काढा करून तो थंड झाल्यावर त्यांत मध घालून त्याच्या गुळण्या कराव्या. म्हणजे मुखपाकाचा नाश होतो.

कार्यं च बहुधा नित्यं जातीपत्रस्य चर्वणम् ।

मुखपाकाच्या रोग्यानें बहुतकरून जाईचा पाला नित्य चावावा.

कृष्णजीरककुष्ठेन्द्रयवचर्वणतस्त्र्यहात् ॥ ३ ॥
मुखपाकव्रणक्लेददौर्गन्ध्यमुपशाम्यति ।

काळें जिरें (शहाजिरें), कोष्ट व इंद्रजव हीं औषधें समभाग घेऊन नित्य चावावीं. म्हणजे मुखपाक, व्रण, लाळ व दुर्गंधी ह्यांचा

तीन दिवसांत नाश होतो.

पटोलनिंबजम्ब्वाम्रमालतीनवपल्लवैः ॥ ४ ॥
पञ्चपल्लवजः श्रेष्ठः कषायो मुखधावने ।

पडवळ, जांभळी, कडुनिंब, आंबा व मालती ह्यांचीं कोंवळीं पानें आणून त्यांचा काढा करावा. हा पंचपल्लवकषाय मुखपाकाच्या रोग्याला तोंड धुण्याला फार चांगला आहे.

पञ्चवल्कलजः क्वाथस्त्रिफलासंभवोऽथ वा ॥ ५ ॥
मुखपाके प्रयोक्तव्यः सक्षौद्रो मुखधावने ।

वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी व आंबा ह्यांच्या सालीचा काढा करावा. हा पंचवल्कलांचा काढा अथवा त्रिफळ्याचा काढा मध घालून तोंड धुण्याकरितां द्यावा.

स्वरसः क्वथितो दार्व्या घनीभूतो रसक्रिया ॥
सक्षौद्रो मुखरोगासृग्दोषनाडीव्रणापहः ॥ ६ ॥

दारुहळदीच्या ताज्या ओल्या सालीचा आंगरस काढून शिजवावा. तो आटून खव्याप्रमाणें घट्ट झाला म्हणजे त्याला रसक्रिया (रसांजन) असें म्हणतात. ह्यांत मध घालून तें तोंडास लावावें, म्हणजे मुखरोग, रक्तदोष व नाडीव्रण ह्यांचा नाश होतो.

सप्तच्छदोशीरपटोलमुस्ताहरीतकीतिक्तकरोहिणीभिः ।
यष्ट्याह्वराजद्रुमचन्दनैश्च क्वाथं पिबेत्पाकहरं मुखस्य ॥ ७ ॥

सातवीण, वाळा, पडवळ, नागरमोथे, हिरडे, कुटकी, जेष्ठमध, बाहव्याची शेंग व रक्तचंदन ह्यांचा काढा करून प्यावा. तो मुखपाकाचा नाश करितो.

पटोलशुण्ठीत्रिफलाविशालात्रायन्तितिक्ताद्विनिशामृतानाम् ।
पीतः कषायो मधुना निहन्ति मुखे स्थितश्चाऽऽस्यगदानशेषान् ८

पडवळ, सुंठ, हिरडा, बेहडा, अवळकाठी, कडु वृंदावन, त्रायमाण, कुटकी, हळद, दारुहळद व गुळवेल ह्यांचा काढा मध घालून प्यावा. तो सर्व मुखरोगाचा नाश करतो.

तिला नीलोत्पलं सर्पिः शर्करा क्षीरमेव च ।
सलोध्रो दिग्धवक्त्रस्य गण्डूषो दाहनाशनः ॥ ९ ॥

तीळ, निळें कमळ, तूप, साखर, दूध व लोध्र ह्यांचा कल्क

करून त्याचा लेप करावा व गुळण्या कराव्या. म्हणजे तोंडांतील दाह शांत होतो.

हरिद्रादि तेल.

हरिद्रा निम्बपत्राणि मधुकं नीलमुत्पलम् ।
तैलमेभिर्विपक्तव्यं मुखपाकहरं परम् ॥ १ ॥

हळद, कडुनिंबाचीं पानें, जेष्टमध व निळें कमळ ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें मुखपाकाचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

जेष्टमधादि तेल.

यष्टीमधुपलमेकं त्रिंशन्नीलोत्पलस्य तैलस्य ।
प्रस्थं तद्द्विगुणपयो विधिना पक्वं तु नस्येन ॥ १ ॥
निशि वदनस्य स्रावं क्षपयति गात्रस्य दोषसंघातम् ।
वपुःस्वर्णत्वमवश्यं क्रमशोऽभ्यंगेन जन्तूनाम् ॥ २ ॥

जेष्टमध चार तोळे व निळीं कमळें तीस ह्यांचा कल्क करून त्यांत चौसष्ट तोळे तेल व एकशें अठ्ठावीस तोळे दूध घालून तेल पचन करावें. आणि तें रात्रीं नाकांत घालावें. म्हणजे मुखस्रावाचा नाश करितें. हें अंगास लाविलें असतां मनुष्याच्या शरीरांतील दोषसमुदाय दूर करून शरीर सुवर्णाप्रमाणें करतें.

खदिरादि गुटिका.

खदिरस्य तुलां तोयद्रोणे पक्त्वाऽष्टशेषिते ।
जातीकोशेन्दुपूगैश्च चातुर्जातमृगाण्डजैः ॥ १ ॥
पृथक्कर्षमितैः पिष्टैर्मेलयित्वा चणोपमाम् ।
गुटीं कृत्वा मुखे धार्या सा निहन्त्यखिलान्गदान् ॥
जिह्वोष्ठदन्तवदनगलतालुसमुद्भवान् ॥ २ ॥

चारशें तोळे खैराची साल कुटून दहाशें चोवीस तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. (तो काढा पुनः चुलीवर ठेवून दाट करावा) आणि त्यांत जायपत्री, कापूर, सुपारी, दालचिनी, तमालपत्र, नाकेशर, वेलदोड्याचे दाणे व कस्तुरी, ह्या प्रत्येकाचें चूर्ण एक एक तोळा त्यांत घालून खलून त्याच्या हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. आणि त्यांतील एक एक गोळी तोंडांत धरावी. ही खदिरादि

गुटिका जीभ, ओठ, दांत, तोंड, गळा व टाळा ह्या ठिकाणच्या सर्व रोगांचा नाश करिते.

दुसरा प्रकार.

तुल्यं खदिरसारस्य तेषां चूर्णं विनिक्षिपेत् ।
जातीकङ्कोलकर्पूरक्रमुकाणां विचक्षणः ॥
गुटिकास्तु प्रकर्तव्या मुखे स्थाप्याः सदैव हि ॥ १ ॥

जायपत्री, कंकोळ, कापूर व सुपारी ह्यांचें चूर्ण समभाग आणि सर्वांच्या बरोबरीनें खैराचा कात ह्यांच्या वरीलप्रमाणें (पाण्यांत) गोळ्या करून सदोदित एक गोळी तोंडांत धरावी.

ताम्बूलमध्यस्थितचूर्णकेन दग्धं मुखं यस्य भवेत्कथंचित् ।
तैलेन गण्डूषमसौ विदध्यादम्लारनालेन पुनः पुनर्वा ॥ २ ॥

विडा खातांना त्यांतील चुन्यानें जर तोंड भाजलें तर तेलाच्या अथवा आंबट कांजीच्या वरचेवर गुळण्या कराव्या.

पथ्यापथ्य.

स्वेदो विरेको वमनं गण्डूषः प्रतिसारणम् ।
कवलोऽसृक्स्रुतिर्नस्यं धूमः शस्त्राग्निकर्मणी ॥ १ ॥
तृणधान्यं यवा मुद्गाः कुलत्था जाङ्गलो रसः ।
बहुपत्री कारवेलं पटोलं बालमूलकम् ॥ २ ॥
कर्पूरनीरं ताम्बूलं तप्ताम्बु खदिरो घृतम् ।
कटुतिक्तो च वर्गोऽयं मित्रं स्यान्मुखरोगिणाम् ॥ ३ ॥

स्वेदन, विरेचन, वमन, गंडूष (गुळण्या), प्रतिसारण (औषध घासणें), कवल (औषधाचे गोळे घास) तोंडांत धरणें, रक्त काढणें, नस्य, धुरी, शस्त्रक्रिया व अग्निकर्म, तृणधान्य, सातु, मूग, हुलगे, जांगल प्राण्याच्या मांसाचा रस, मेथी, कारलीं, पडवळ, कोवळा मुळा, कापूर, वाळा (किंवा कापराचा वास दिलेलें पाणी), विडा, ऊन पाणी, खैर (खैराचा कात), तूप, तिखट, व कडू पदार्थ हे सर्व मुखरोग्याला पथ्यकारक आहेत.

दन्तकाष्ठं स्नानमम्लं मत्स्यमानूपमामिषम् ।
दधि क्षीरं गुडं माषं रूक्षान्नं कठिनाशनम् ॥ ४ ॥
अधोमुखेन शयनं गुर्वभिष्यन्दकारि च ।
मुखरोगेषु सर्वेषु दिवानिद्रां च वर्जयेत् ॥ ५ ॥

काडीनें दांत घासणें, स्नान, आंबट पदार्थ, मासे, अनूपदेशांतील प्राण्यांचें मांस, दहीं, दूध, गूळ, उडीद, रूक्ष अन्न, कठीण भक्ष्य, खालीं तोंड करून निजणें, जड व स्रावक पदार्थ आणि दिवसा झोंप या गोष्टी मुखरोग्यानें वर्ज कराव्या.

कर्णरोगाधिकार.

अवश्यायजलक्रीडाकर्णकण्डूयनैर्मरुत् ।
मिथ्यायोगेन शस्त्रस्य कुपितोऽन्यैश्च कोपनैः ॥ १ ॥
प्राप्य श्रोत्रशिराः कुर्याच्छूलं स्रोतसि वेगवान् ।
ते वै कर्णगता रोगा अष्टाविंशतिरीरिताः ॥ २ ॥

दहिंवरांतून अगर बर्फावरून जाणें, जलक्रीडा, कान कोरणें व शस्त्रकर्माचा दुरुपयोग करणें, ह्या कारणांनीं व ज्या योगानें वाताचा प्रकोप होतो अशा दुसऱ्या कारणांनीं प्रकुपित झालेला वायु कानांच्या शिरांत प्रवेश करून कानांत ठणका उत्पन्न करतो.

कर्णरोगांचीं नांवें व संख्या.

कर्णशूलं प्रणादश्च बाधिर्यं क्ष्वेड एव च ।
कर्णस्रावः कर्णकण्डूः कर्णगूथस्तथैव च ॥ ३ ॥
प्रतिनाहो जन्तुकर्णो विद्रधिर्द्विविधस्तथा ।
कर्णपाकः पूतिकर्णस्तथैवार्शश्चतुर्विधम् ॥ ४ ॥
तथाऽर्बुदं सप्तविधं शोफश्चापि चतुर्विधः ।
एते कर्णगता रोगा अष्टाविंशतिरीरिताः ॥ ५ ॥

कर्णशूळ, कर्णनाद, बाधिर्य, कर्णक्ष्वेड, कर्णस्राव, कर्णकंडु, कर्णगूथ, प्रतिनाह, जन्तुकर्ण, दोन प्रकारचा विद्रधि, कर्णपाक, पूतिकर्ण, चार प्रकारचे कानांतील मोड, तसेच सात प्रकारचे अर्बुद, व चार प्रकारची सूज, असे हे अठ्ठावीस कर्णरोग सांगितले आहेत.

कर्णशूळाचें संप्राप्तिपूर्वक लक्षण.

समीरणः श्रोत्रगतोऽन्यथा चरन्समन्ततः शूलमतीव कर्णयोः ।
करोति दोषैश्च यथास्वमावृतः स कर्णशूलः कथितो दुरासदः॥१॥

कानांतील वायु मार्ग सोडून संचार करीत असतां त्यास अनुकूळ अशा दोषांनीं युक्त होऊन कानांत शूळ उत्पन्न करतो. हा शांत होण्यास फार प्रयास पडतात. ह्याला कर्णशूळ असें म्हणतात.

असाध्य कर्णशूल.

मूर्छा दाहो ज्वरः कासः क्लमोऽथ वमथुस्तथा ।
उपद्रवाः कर्णशूले भवन्त्येते मारिष्यतः ॥ २ ॥

मूर्च्छा, दाह, ज्वर, खोकला, थकवा व ओकारी हे उपद्रव मरणाऱ्या कर्णशूली रोग्याला होतात.

कर्णनादलक्षण.

कर्णस्रोतःस्थिते वाते शृणोति विविधान्स्वरान् ।
भेरीमृदङ्गशङ्खानां कर्णनादः स उच्यते ॥ ३ ॥

कानांच्या स्रोतसांमधून वात शिरला असतां कानांमध्यें नगारा, मृदंग, शंख इत्यादिकांच्या आवाजासारखे नानाप्रकारचे नाद आपोआप ऐकूं येतात. ह्याला कर्णनाद म्हणतात.

बाधिर्याचें लक्षण.

यदा शब्दवहं वायुः स्रोत आवृत्य तिष्ठति ।
शुद्धः श्लेष्मान्वितो वाऽपि बाधिर्यं तेन जायते ॥ ४ ॥

जेव्हां एकटा अथवा कफयुक्त वायु शब्दवह स्रोतसांचा रोध कारितो, त्या वेळीं कानांला शब्द ऐकूं येत नाहीं; त्याला बाधिर्य असें म्हणतात.

कर्णक्ष्वेड.

वायुः पित्तादिभिर्युक्तो वेणुघोषोपमं स्वनम् ।
करोति कर्णयोः क्ष्वेडं कर्णक्ष्वेडः स उच्यते ॥ ५ ॥

पित्तादि दोषांनीं युक्त असा वायु कानांत वेळूच्या वाद्यांप्रमाणें नाद उत्पन्न करतो, त्याला कर्णक्ष्वेड असें म्हणतात.

कर्णस्राव.

शिरोभिघातादथवा निमज्जतो जले प्रपाकादथ वाऽपि विद्रधेः ।
स्रवेद्धि पूयं श्रवणोऽनिलार्दितः स कर्णजः स्राव इति प्रकीर्तितः६

डोक्यावर आघात झाल्यानें, पाण्यांत फार बुड्या मारल्यानें अथवा कानांत करट होऊन तें पिकून फुटल्यामुळें कान वायूनें पीडित होऊन त्यांतून पू वाहूं लागतो. त्याला कर्णस्राव असें म्हणतात.

कर्णकंडू.

मारुतः कफसंयुक्तः कर्णे कण्डूं करोति हि ।

कानांतील वायु कफाशीं मिळून कानांत कंडू उत्पन्न करतो.

कर्णगूथ.

पित्तोष्मशोषितः श्लेष्मा कुरुते कर्णगूथकम् ॥ ७ ॥

पित्ताच्या उष्णतेनें शुष्क झालेला कफ कानामध्यें मळ उत्पन्न करतो, त्याला कर्णगूथ असें म्हणतात.

कर्णप्रतिनाह.

स कर्णगूथो द्रवतां यदा गतो विलायितो घ्राणमुखं प्रपद्यते ।
तदा स कर्णप्रतिनाहसंज्ञितो भवेद्विकारः शिरसोऽर्धभेदकृत् ॥८॥

तो कानांतील मळ पातळ झाला म्हणजे नाकांत व तोंडांत येतो. ह्यामुळें अर्धावभेदक (अर्धें मस्तक दुखणें) विकार होतो, त्याला कर्णप्रतिनाह असें म्हणतात.

क्रिमिकर्ण.

यदा तु मूर्छन्त्यथ वाऽपि जन्तवः
सृजन्त्यपत्यान्यथ वाऽपि मक्षिकाः ।
तद्व्यञ्जनत्वाच्छ्रवणे निरुच्यते
भिषग्भिराद्यैः कृमिकर्णको गदः ॥ ९ ॥

जेव्हां कानांत किडे पडतात किंवा कानांत माशी जाऊन तिच्या-अंड्यांपासून पोरें होतात, तेव्हां त्याला वैद्य कृमिकर्ण असें म्हणतात.

पतंगादि किडे कानांत गेले असतां त्याचें लक्षण.

पतङ्गाः शतपद्यश्च कर्णस्रोतः प्रविश्य हि ।
अरतिं व्याकुलत्वं च भृशं कुर्वन्ति वेदनाम् ॥ १० ॥
कर्णो निस्तुद्यते तस्य तथा फरफरायते ।
कीटे चरति रुक्तीव्रा निष्पन्दे मन्दवेदना ॥ ११ ॥

पतंग किंवा गोम कानांत गेली असतां अस्वस्थता उत्पन्न करितात. कानांत तीव्र वेदना होतात. त्यामुळें मनुष्य व्याकुळ होतो. कान ठणकतो व घर करतो. तो किडा चालू लागला असतां तीव्र वेदना होतात आणि तो स्थिर असला म्हणजे वेदना मंद असतात.

दोन प्रकारचा कर्णविद्रधि.

क्षताभिघातप्रभवस्तु विद्रधिर्भवेत्तथा दोषकृतोऽपरः पुनः ।
स रक्तपीतारुणमस्रमास्रवेत्प्रतोदधूमायनदाहचोषवान् ॥ १२ ॥

कान कोरल्यामुळें अथवा दुसऱ्या कारणानें कानांत क्षत पडून

अथवा वातादि दोषामुळें कानांत करट होतें. त्यांतून तांबडा, पिंवळा व तांबूस असा स्राव होतो. त्यांत टोचणी असते. वाफा निघाल्या-सारख्या वाटतात, त्याचा दाह होतो व जळजळ होते. ह्याला कर्ण-विद्रधि असें म्हणतात.

कर्णपाक.

कर्णपाकस्तु पित्तेन कोथविक्लेदकृद्भवेत् ।

पित्तदोषानें कान आंतून पिकतो. त्यामुळें तो ओलसर होतो व त्याला घाण येते. त्याला कर्णपाक म्हणतात.

पूतिकर्ण.

कर्णविद्रधिपाकाद्वा जायते चाम्बुपूरणात् ।
पूयं स्रवति वा पूति स ज्ञेयः पूतिकर्णकः ॥ १३ ॥

कर्णविद्रधि, कर्णपाक अथवा कानांत पाणी जाणें ह्यांमुळें कान फुटून कानांतून पू येतो. त्याला पूतिकर्ण असें म्हणतात.

कानासंबंधी सूज, अर्बुद व अर्श ह्यांचें लक्षण.

कर्णशोथार्बुदार्शांसि जानीयादुक्तलक्षणैः ॥ १४ ॥

कानांतील सूज, कानांतील अर्बुद व कानांतील मोड (मूळव्याध) ह्यांचीं लक्षणें त्या त्या विकारांच्या निदानांत सांगितल्याप्रमाणें जाणावीं.

चार कर्णरोग.

नादोऽतिरुक्कर्णमलस्य शोषः स्रावस्तनुश्चाश्रवणं च वातात् ।

वातदोषानें कर्णनाद, ठणका, मळ शुष्क होणें, कानांतून स्राव होणें व ऐकूं न येणें हे विकार होतात.

शोथः सरागो दरणं विदाहः सपूतिपीतस्रवणं च पित्तात् ॥१५॥

पित्तामुळें कान सुजतो, लाल होतो, कानाला भेगा पडतात, आग होते आणि दुर्गंधीयुक्त व पिवळट स्राव होतो.

वैश्रुत्यकण्डूस्थिरशोथशुक्लस्निग्धस्रुतिः स्वल्परुजः कफाच्च ।

कफदोषानें भलतेंच ऐकूं येणें, कान खाजणें, कानाला कठीण सूज येणें, कानांतून पांढरा व स्निग्ध स्राव होणें व अल्प वेदना हीं लक्षणें होतात.

सर्वाणि रूपाणि च संनिपातात्स्रावश्च तत्राधिकदोषवर्णः १६

त्रिदोषांमुळें सर्व दोषांचीं लक्षणें होतात, व जो दोष अधिक असेल त्यासारखा स्रावाचा रंग असतो.

कर्णपालीरोगनिदान;–परिपोटलक्षण.

सौकुमार्याच्चिरोत्सृष्टे सहसैवातिवर्धिते ।
कर्णपाल्यां भवेच्छोथः सरुजः परिपोटवान् ॥ १ ॥
कृष्णारुणनिभः स्तब्धः स वातात्परिपोटकः ।

सावकाश वाढणारा कान एकाएकीं वाढविण्याचा प्रयत्न केल्यानें नाजूक कानाला तो सहन न होऊन कानाच्या पाळीला सूज येते. तिच्या योगानें कान स्तब्ध होतो. सुजेचा रंग काळा व तांबूस असतो व ती कठीण असते. ह्या विकाराला परिपोटक म्हणतात. हा वातदोषामुळें होतो.

उत्पात.

गुर्वाभरणसंयोगात्ताडनाद्धर्षणादपि ॥ २ ॥
शोथः पाल्यां भवेच्छ्यावो दाहपाकरुजान्वितः ।
रक्तो वा रक्तपित्ताभ्यामुत्पातः स गदो मतः ॥ ३ ॥

कानांत जड दागिना घातल्यानें, कानावर मारल्यानें किंवा कान खरवडल्यानें कानाच्या पाळीला काळसर रंगाची सूज येते. ती पिकते, तिचा दाह होतो, व ठणका लागतो. ती रक्तपित्तापासून झाली असेल तर तिचा रंग तांबूस असतो. तिला उत्पात असें म्हणतात.

उन्मंथक.

कर्णं बलाद्वर्धयतः पाल्यां वायुः प्रकुप्यति ।
कफं संगृह्य कुरुते शोथं स्तब्धमवेदनम् ।
उन्मन्थकः सकण्डूको विकारः कफवातजः ॥ ४ ॥

मुद्दाम कान वाढविण्याचा प्रयत्न केला असतां कानाच्या पाळींतील वायु प्रकुपित होऊन कफाला घेऊन वेदनारहित व कठीण अशी सूज उत्पन्न करतो. तिला खाज असते. ह्या कफवातजन्य विकाराला उन्मंथक असें म्हणतात.

दुःखवर्धन.

संवर्ध्यमाने दुर्विद्धे कण्डूदाहरुजान्वितः ।

शोथो भवति पाकश्च त्रिदोषो दुःखवर्धनः ॥ ५ ॥

बरोबर न टोचलेला कान वाढविण्याचा प्रयत्न केल्यानें कंडू, दाह व ठणका ह्यांनीं युक्त अशी सूज येते. ती पिकते. ह्या त्रिदोषज विकाराला दुःखवर्धन असें म्हणतात.

परिलेही.

कफासृक्कृमयः क्रुद्धाः सर्षपाभा विसर्पिणः ।
कुर्वन्ति पिटिकाः पाल्यां कण्डूदाहरुजान्विताः ॥ ६ ॥
कफासृक्कृमिसंभूतः स विसर्पन्नितस्ततः ।
विलिह्यात्सकलां पालीं परिलेही च स स्मृतः ।

कफरक्तापासून कानांच्या पाळीमध्यें मोहरीसारखे बारीक किडे होतात. ते कानाच्या पाळीवर फोड उत्पन्न करितात. त्यामुळें कंडू, दाह, ठणका हे विकार होतात; ते चरत चरत आसपास पसरतात, आणि कानाची पाळी खाऊन टाकतात; त्या विकाराला परिलेही असें म्हणतात.

कर्णरोगाची चिकित्सा;–कर्णपूरणविधि.

स्वेदयेत्कर्णदेशं तु किंचिन्नुः पार्श्वशायिनः ।
मूत्रैः स्नेहै रसैः कोष्णैस्तच्च श्रोत्रं प्रपूरयेत् ॥ १ ॥
कर्णं च पूरितं रक्षेच्छतं पञ्च शतानि च ।
सहस्रं वाऽपि मात्राणां श्रोत्रकण्ठशिरोगदे ॥ २ ॥

मनुष्यानें किंचित् एका कुशीवर निजून कानाचें स्वेदन करावें (वाफारा वगैरे उपचारांनीं कान शेकावा). नंतर मूत्र, तेल, किंवा वनस्पतीचा रस हीं औषधें थोडीं ऊन करून कानांत घालून कान भरावा. आणि कानाचा रोग असल्यास तें औषध शंभर मात्रांचा काल होईपर्यंत तसेंच ठेवावें. गळ्याचे रोग असल्यास पांचशें मात्रांचा काल जाईपर्यंत ठेवावें, आणि मस्तकासंबंधीं रोग असल्यास एक हजार मात्रांचा काल जाईपर्यंत तें औषध कानांत तसेंच ठेवावें.

स्वजानुनः करावर्तं कुर्याच्छोटिकया युतम् ।
एषा मात्रा भवेदेका सर्वत्रैवं विनिश्चयः ॥ ३ ॥

आपला हात आपल्या गुढघ्याभोंवतीं फिरवून चुटकी वाज-

वावी. ह्या कृत्याचा कालाला एक मात्रा म्हणतात. ह्याप्रमाणें सर्वत्र मात्रांची कालगणना करावी.

रसाद्यैः पूरणं कर्णे भोजनात्प्राक्प्रशस्यते ।
तैलाद्यैः पूरणं कर्णे भास्करेऽस्तमुपागते ॥ ४ ॥

कान वनस्पतींच्या रसादिकांनीं भरावयाचा असल्यास तो भोजनापूर्वीं भरावा, हें प्रशस्त आहे. तेलादिकांनीं कान भरावयाचा असल्यास तो दिवस मावळल्यावर भरावा.

कर्णशूले कर्णनादे बाधिर्ये क्ष्वेड एव च ।
चतुर्ष्वपि च रोगेषु सामान्यं भेषजं स्मृतम् ॥ ५ ॥
शृङ्गबेररसं क्षौद्रं सैन्धवं तैलमेव च ।
कदूष्णं कर्णयोर्धार्यमेतत्स्याद्वेदनापहम् ॥ ६ ॥

कर्णशूळ, कर्णनाद, बाधिर्य, व क्ष्वेड ह्या चार रोगांवर सामान्य उपचार म्हटला म्हणजे आल्याचा रस, मध, सैंधेलोण, व तेल अशा प्रकारचें तिखट व उष्ण औषध कानांत घालावें. तें वेदनांचा नाश करितें.

लशुनार्द्रकशिग्रूणां वारुण्या मूलकस्य च ।
कदल्याः स्वरसः श्रेष्ठः कदुष्णः कर्णपूरणे ॥ ७ ॥

लसूण, आलें, शेवगा, कडुवृंदावन, मुळा व केळ ह्यांचा रस थोडा ऊन करून कानांत घालण्याकरितां फार उत्तम आहे.

अर्कांकुरानम्लपिष्टान्सतैलाँल्लवणान्वितान् ।
संनिदध्यात्सुधाकाण्डे कोरिते मृत्स्नयाऽऽवृते ॥ ८ ॥
पुटपाकक्रियास्विन्नं पीडयेदारसागमात् ।
सुखोष्णं तद्रसं कर्णे प्रक्षिपेच्छूलशान्तये ॥ ९ ॥

रुईच्या डिऱ्या कांजी वगैरे आंबट पदार्थांत वाटून त्यांत तेल व सैंधेलोण मिसळून एक त्रिधारी निवडुंगाचें कांडें कोरून त्यांत त्याची लुगदी ठेवून पुटपाकानें भाजून पिळून रस काढावा. आणि कानाचा ठणका बंद होण्याकरितां तो रस कानांत घालावा.

अर्कस्य पत्रं परिणामपीतमाज्येन लिप्तं शिखियोगतप्तम् ।
आपीड्य तस्याम्बु सुखोष्णमेव कर्णे निषिक्तं हरतेऽतिशूलम् १०

रुईचें पिकलेलें पिवळें पान आणून त्याला तूप लावून निखाऱ्यावर ऊन करून पिळून त्याचा रस काढावा, आणि तो सुखोष्ण रस

कानांत घालावा. म्हणजे तो तीव्र शूळाचा नाश करितो.

तीव्रशूलातुरे कर्णे सरागे क्लेदवाहिनि ।
छागमूत्रं प्रशंसन्ति कोष्णं सैन्धवसंयुतम् ॥ ११ ॥

अतिशय ठणकत असून लाल झालेल्या व पू वाहणाऱ्या कानांत शेळीचें मूत ऊन करून त्यांत सैंधव घालून तें कानांत घालावें असें म्हणतात.

तैलं स्योनाकमूलेन मन्देऽग्नौ विधिना शृतम् ।
हरेदाशु त्रिदोषोत्थं कर्णशूलं प्रपूरणात् ॥ १२ ॥

टेटूच्या मुळांचा कल्क करून त्यानें विधियुक्त मंदाग्नीवर तेल सिद्ध करावें. तें तेल कानांत घातलें असतां त्रिदोषजन्य शूळाचा त्वरित नाश करितें.

हिंगुसैन्धवशुण्ठीभिस्तैलं सर्षपसंभवम् ।
विपक्कं हरतेऽवश्यं कर्णशूलं प्रपूरणात् ॥ १३ ॥

हिंग, सैंधेलोण, व सुंठ घालून शिरसाचें तेल सिद्ध करावें. तें तेल कानांत घातलें असतां कानांतील शूळाचा हटकून नाश करितें.

कर्णशूले कर्णनादे बाधिर्ये क्ष्वेड एव च ।
पूरणं कटुतैलेन हितं वातघ्नमौषधम् ॥ १४ ॥

कर्णशूळ, कर्णनाद, बाधिर्य व क्ष्वेड ह्या विकारांत वातनाशक औषध मोहरीच्या तेलासह कानांत घालावें.

अपामार्गादि तेल.

अपामार्गक्षारजले तत्कृतकल्केन साधितं तिलजम् ।
अपहरति कर्णनादं बाधिर्यं चापि पूरणतः ॥ १ ॥

आघाड्याच्या क्षाराच्या पाण्यांत आघाड्याचा कल्क घालून तिळाचें तेल सिद्ध करावें. तें कर्णनाद व बाधिर्य ह्यांचा नाश करितें.

बिल्वतेल.

गवां मूत्रेण बिल्वानि पिष्ट्वा तैलं विपाचयेत् ।
सजलं च सदुग्धं च तद्बाधिर्यहरं परम् ॥ १ ॥

बेलफळें गोमूत्रांत वाटून त्यांच्या कल्कांत दूध व पाणी घालून तेल सिद्ध करावें. तें बाधिर्याचा नाश करितें.

चार तेलें.

तैलं काञ्जिकबीजपूरकरसक्षौद्रैः समूत्रैः शृतं

स्यात्क्षौद्रार्द्रकशिग्रुमूलकदलीकन्दद्रवैर्वा समम्।
शुण्ठीतुम्बरुहिंगुभिः शृतमपि स्यात्कर्णशूलापहं
सिद्धं बिल्वगरेण साजपयसा मूत्रेण बाधिर्यजित् ॥ १ ॥

कांजी, महाळुंगाचा रस, मध व गोमूत्र ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. अथवा मध, आल्याचा रस, शेवग्याच्या मुळांचा रस व केळीच्या कांद्याचा रस हे रस समभाग घालून तेल सिद्ध करावें. तसेंच सुंठ, चिरफळें व हिंग ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करावें. तें शूळाचा नाश करितें. त्याचप्रमाणें बेलफळांतील गर, शेळीचें दूध व गोमूत्र ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें बहिरेपणाचा नाश करितें.

हिंग्वादिक्षारतैल.

हिंग्वब्ददारुमिसिमूलकभस्मभूर्ज-
त्वक्क्षारसिन्धुरुचकोद्भिदशिग्रुविश्वैः।
सस्वर्जिकाबिडवचाञ्जनमातुलुङ्ग-
रम्भारसैः समधुसूक्तमिदं विपक्कम् ॥ १ ॥
तैलं प्रसिद्धमिति तच्छ्रवणामयघ्नं
कर्णप्रणादबधिरत्वहरं नराणाम्।
भ्रूमस्तकश्रवणशष्कुलिकान्तराल-
शूलापहं चरकसुश्रुतपूजितं च ॥ २ ॥

हिंग, नागरमोथे, देवदार, बडिशेप, मुळ्याच्या काचऱ्यांची राख, भूर्ज वृक्षाच्या सालीची राख, सैंधेलोण, बिडलोण, सोरा, शेवग्याची साल, सुंठ, सज्जिखार, बिडलोण, वेखंड, रसांजन, महाळुंगाचा व केळीच्या कांद्याचा रस व मधाचें सूक्त ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. हें तेल कर्णरोगनाशाविषयीं प्रसिद्ध आहे. हें कर्णनाद, बहिरेपणा, भुवई, मस्तक, कान, कानाची पाळी ह्या ठिकाणचा शूळ व कानांच्या आंतील शूळ ह्यांचा नाश करितें. हें चरक व सुश्रुत ह्यांना मान्य आहे.

मधुसूक्त.

जम्बीराणां फलरसः प्रस्थैकः कुडवोन्मितम्।
माक्षिकं तत्र दातव्यं पिप्पली च पलोन्मिता ॥ १ ॥
घृतभाण्डे निधायैतद्धान्यराशौ विधारयेत्।
मासेन तज्जातरसं मधुसूक्तं प्रजायते ॥ २ ॥

लिंबाचा रस चौसष्ट तोळे व मध सोळा तोळे एकत्र करून त्यांत चार तोळे पिंपळीची पूड घालून तुपानें राबलेल्या भांड्यांत घालून धान्याच्या राशींत एक महिनाभर पुरून ठेवावें, आणि एक महिन्यानें काढावें. ह्याला मधुसूक्त असें म्हणतात.

दीपिकातेल.

महतः पञ्चमूलस्य काण्डान्यष्टांगुलानि च ।
क्षौमेणाऽऽवेष्ट्य संसिच्य तैलेनाऽऽदीपयेत्ततः ॥ १ ॥
यत्तैलं च्यवते तेभ्यः सुखोष्णं तेन पूरयेत् ।
ज्ञेयं तद्दीपिकातैलं कुष्ठदेवतरोस्तथा ॥ २ ॥

मोठ्या पंचमुळाच्या आठ आठ बोटें लांबीच्या काड्या आणून त्यांजवर रेशमी वस्त्र गुंडाळून त्याजवर तेल शिंपून तें पेटवावें. आणि त्यांतून पडणारें तेल घेऊन तें सोसेल अशा बेतानें ऊन ऊन कानांत घालावें. ह्याला दीपिकातेल म्हणतात. ह्याप्रमाणेंच कोष्ट व देवदार ह्यांचेंही तेल करावें.

निर्गुंड्यादि तेल.

निर्गुण्डिजातिरविभृङ्गरसोनरम्भा-
कार्पासशिग्रुसुरसार्द्रककारवेल्ल्यः ।
एषां रसे तिलभवं सविषं सुकर्ण-
बाधिर्यनादकृमिवेदनपूययुक्ते ॥ १ ॥

निर्गुडी, जाई, रुई, माका, लसूण, केळ, कापशी, शेवगा, तुळस, आलें व कारली ह्यांचा रस व बचनागाचा कल्क ह्यांमध्यें तिळाचें तेल सिद्ध कराव. तें बहिरेपणा, कर्णनाद, कृमिकर्ण, वेदना व पू ह्यांजवर योजावें.

नागरादि तेल.

नागरसैन्धवमागधिमुस्ताहिंगुवचालशुनं तिलतैलम् ।
अर्कसुपक्कपलाशरसेन कर्णरुजं बधिरं विनिहन्ति ॥ १ ॥

सुंठ, सेंधेलोण, पिंपळी, नागरमोथे, हिंग, वेखंड, लसूण ह्यांचा कल्क व रुईच्या पिकल्या पानांचा व पळसाच्या पानांचा रस ह्यामध्यें तेल पचन करावें. तें कानांतील शूळ व बहिरेपणा ह्यांचा नाश करितें.

कर्णस्राव, पूतिकर्ण व कृमिकर्ण ह्यांची चिकित्सा.

कर्णस्रावे पूतिकर्णे तथैव कृमिकर्णके ।
सामान्यं कर्म कुर्वीत योगान्वैशेषिकानपि ॥ १ ॥

कर्णस्राव, पूतिकर्ण व कृमिकर्ण ह्यांजवर सर्वसामान्य असे उपचार करावे आणि विशेष उपचारही करावे.

स्वर्जिकाचूर्णसंयुक्तं बीजपूररसं क्षिपेत् ।
कर्णस्रावरुजादाहास्तेन नश्यन्त्यसंशयम् ॥ २ ॥

सज्जीखाराचें चूर्ण व महाळुंगाचा रस कानांत घालावा. त्यानें कानांतील स्राव, ठणका व दाह ह्यांचा निःसंशय नाश होतो.

समुद्रफेनचूर्ण.

समुद्रफेनचूर्णं तु न्यस्तं श्रवणसंश्रये ।
पूयस्रावं व्रणं सान्द्रं हन्ति ध्वान्तमिवांशुमान् ॥ १ ॥

समुद्रफेनाचें चूर्ण कानांत घालावें. तें पू वाहणें, व्रण व चिकटा ह्यांचा सूर्य जसा अंधाराचा नाश करितो त्याप्रमाणें नाश करितें.

सर्जत्वक्चूर्णसंयुक्तः कार्पासीफलजो रसः ।
मधुसंमिश्रितः साधुः कर्णस्रावे प्रशस्यते ॥ २ ॥

राळेच्या झाडाच्या सालीचें चूर्ण व कापसीच्या फळाचा रस मधासह कानांत घालावा. तो कर्णस्रावावर फार चांगला आहे.

जम्ब्वाम्रपत्रं तरुणं समांशं कपित्थकार्पासफलं च सान्द्रम् ।
हृत्वा रसं तन्मधुना विमिश्रं स्रावापहं संप्रवदन्ति तज्ज्ञाः ।
एतैः शृतं निम्बकरञ्जतैलं ससार्षपं स्रावहरं प्रदिष्टम् ॥ ३ ॥

जांभळीचीं व आंब्याचीं जून पानें समभाग आणि कवठ व कापशीचें फळ ह्यांचा रस काढून मध मिळवून कानांत घालावा. तो स्रावाचा नाश करतो असें तज्ज्ञ म्हणतात. ह्याच रसामध्यें कडुनिंबाच्या बियांचें किंवा करंजाचें तेल शिरसाचे तेलासह पचन करावें. तेंही स्रावनाशक आहे असें म्हणतात.

जंब्वादि तेल.

आम्रजम्बूप्रवालानि मधुकस्य वटस्य च ।
एभिस्तु साधितं तैलं पूतिकर्णगदं हरेत् ।

आंब्याचीं व जांभळीचीं कोंवळीं पानें, मोहाचीं व वडाचीं पानें ह्यांच्या रसांत ह्यांच्याच कल्कानें तेल सिद्ध करावें. तें पूतिकर्णाचा

(फुटलेल्या कानाचा) नाश करितें.

जातीपत्ररसे तैलं विपक्वं पूतिकर्णजित् ॥ १ ॥

जाईच्या पानांच्या रसांत तेल सिद्ध करावें. तें फुटलेल्या कानाला जिंकतें.

कान धुण्याकरितां पंचकषाय.

कर्णप्रक्षालने शस्तं कवोष्णं सुरभीजलम् ।
पथ्यामलकमञ्जिष्ठालोध्रतिन्दुकवाश्च वा ॥ १ ॥

गोमूत्र अथवा तुळशीच्या पानांचा काढा कान धुण्याला प्रशस्त आहे. तसेंच हिरडे, आवळकाठी, मंजिष्ट, लोध्र व टेंभुरणी ह्यांचे काढेही कान धुण्यास प्रशस्त आहेत.

दुसरा प्रकार.

राजवृक्षादितोयेन सुरसादिजलेन वा ।
कर्णप्रक्षालनं कुर्याच्चूर्णैरेतैस्तु पूरणम् ॥ ३ ॥

राजवृक्षादि गणांतील औषधांच्या अथवा सुरसादि गणांतील औषधांच्या काढ्यानें कान धुवून त्याच औषधांचें चूर्ण कानांत घालावें.

रसांजनादि योग.

घृष्टं रसाञ्जनं नार्याः क्षीरेण क्षौद्रसंयुतम् ।
प्रशस्यते चिरोत्थे तत्स्रावे पूतिकर्णके ॥ २ ॥

फार दिवसाच्या वहाणाऱ्या फुटक्या कानावर रसांजन स्त्रीच्या दुधांत उगाळून त्यांत मध घालून घालणें प्रशस्त आहे.

कुष्ठादि तेल.

कुष्ठं हिंगुवचादारुशताह्वाविश्वसैन्धवैः ।
पूतिकर्णापहं तैलं बस्तमूत्रेण साधितम् ॥ २ ॥

कोष्ट, हिंग, वेखंड, देवदार, बडिशेप, सुंठ व सेंधेलोण ह्यांचा कल्क व शेळीचें मूत ह्यांमध्यें पचन केलेलें तेल फुटलेला कान दुरुस्त करितें.

शंबूकतेल.

शम्बूकस्य तु मांसेन कटुतैलं विपाचयेत् ।
तस्य पूरणमात्रेण कर्णनाडी प्रशाम्यति ॥ १ ॥

शिंपींतील किड्याच्या मांसानें मोहरीचें तेल पचन करावें. तें कानांत घातलें असतां कानांतील नाडीव्रण बरा होतो.

गंधकतेल.

चूर्णेन गन्धकशिलारजनीभवेन मुष्ट्यंशकेन कटुतैलपलाष्टकं तु।
धत्तूरपत्ररसतुल्यमिदं विपक्वं नाडीं जयेच्चिरभवामपि कर्णजाताम्।

गंधक, मनशीळ व हळद ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घेऊन त्यांत बत्तीस तोळे मोहरीचें तेल व तेलासमान धोतऱ्याच्या पाल्याचा रस घालून तेल सिद्ध करावें. तें फार दिवसांचा कानांतील नाडीव्रण दूर करितें.

कृमिकर्णविनाशाय कृमिघ्नीं कारयेत्क्रियाम् ।
वार्ताकधूमश्च हितः सार्षपः स्नेह एव च ॥ २ ॥

कृमिकर्णाचा नाश होण्याकरितां कृमिनाशक क्रिया करावी, वांग्याची धुरी द्यावी व मोहरीचें तेल कानांत घालावें.

पूरितं हरितालेन गव्यमूत्रयुतेन च ।
धूपने कर्णदौर्गन्ध्ये गुग्गुलुः श्रेष्ठ उच्यते ॥ ३ ॥

गोमूत्रांत हरताळ उगाळून तो कानांत घालावा. कानाची दुर्गंधी जाण्याकरितां धुरी देण्याला गुग्गुळही फार उत्तम आहे.

कृमिकर्णावर चार योग.

सूर्यावर्तकस्वरसं रसं वा सिन्धुवारजम् ।
लाङ्गलीमूलतोयं वा त्र्यूषणं वाऽपि चूर्णितम् ॥ १ ॥
एते योगास्तु चत्वारः पूरणात्कृमिकर्णके ।
कृमीन्निर्मूलयन्त्याशु शतपद्यस्त्रपादिकान् ॥ २ ॥

माक्याचा रस, निर्गुडीचा रस अथवा कळलावीच्या मुळाचा रस आणि सुंठ, मिरीं व पिंपळी ह्यांचें चूर्ण हे चार योग कानांत घातले असतां कृमींचा नाश करितात व गोम वगैरे किडयांचाही नाश करितात.

गोमाशीवर योग.

दन्तेन चर्वयेन्मूलं नन्द्यावर्तपलाशयोः ।
तल्लालापूरिते कर्णे ध्रुवं गोमक्षिकां जयेत् ॥ १ ॥

तगर व पळस ह्यांचें मूळ चावून त्याची लाळ कानांत भरावी, म्हणजे गोमाशीचा नाश होतो

कृमिकर्णावर योग.

हलिरविभक्तिव्योषानेकीकृत्य प्रकल्पयेद्वद्वा ।

वसनान्तरे रसेन श्रवणे परिपूरयेद्युक्त्या ॥ १ ॥
कर्णजलौका नियतं कृमिकीटपिपीलिकास्तथाऽन्येऽपि ।
निपतन्ति निरवशेषाः कारण्डाश्चापि मुण्डस्थाः ॥ २ ॥

कळलावी, निळा माका, आणि सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचा कल्क वस्त्रांत घेऊन युक्तीनें कानांत पिळावा, म्हणजे कानांत गेलेली जळू, कृमि, किडे, मुंग्या, वगैरे सर्व जंतु व मस्तकांतील किडे निःशेष बाहेर पडतात.

कानांतील कंडू, मळ, कर्णप्रतिनाह, कर्णविद्रधि व कर्णपाक ह्यांची चिकित्सा.

स्नेहः स्वेदोऽथ वमनं धूमं मूर्ध्नि विरेचनम् ।
विधिश्च कफहा सर्वः कर्णे कण्डूमतीष्यते ॥ १ ॥

स्नेहन, स्वेदन, वमन, धुरी, मस्तकविरेचन आणि सर्व कफनाशक उपचार हे कर्णकंडूचा नाश करितात.

प्रक्लिद्य धीमांस्तैलेन प्रविलाप्य च शोधनम् ।
कर्णगूथं तु मतिमान्भिषग्जह्याच्छलाकया ॥ २ ॥

कानांत तेल घालून कानांतील मळ ओला होऊन पातळ झाला म्हणजे सळीनें काढून टाकावा.

अथ कर्णप्रतीनाहे स्नेहस्वेदौ प्रयोजयेत् ।
ततो विरिक्तशिरसः क्रियां प्रोक्तां समाचरेत् ॥ ३ ॥

कर्णप्रतिनाहावर स्नेहन व स्वेदन करून शिरोविरेचन देऊन मस्तकशुद्धि करावी. आणि वर सांगितलेली क्रिया करावी म्हणजे कानांतील मळ काढून टाकावा.

विद्रधौ वा प्रकुर्वन्ति विद्रध्युक्तं चिकित्सितम् ।

कर्णविद्रधीवर विद्रधिचिकित्सेंत सांगितलेले उपचार करावे.

कर्णपाकस्य भैषज्यं कुर्यादतिविसर्पवत् ॥ ४ ॥

कर्णपाकावर विसर्पाप्रमाणें उपचार करावे.

कर्णशोथ, कर्णार्श व कर्णार्बुद ह्यांजवरील चिकित्सा.

चिकित्सा कर्णशोथानां तथा कर्णार्शसामपि ।
कर्णार्बुदानां कुर्वीत शोथार्शोर्बुदवद्भिषक् ॥ १ ॥

कर्णशोथ (कानाची सूज), कानांतील मोड, व कानांतील

अर्बुद ह्यांजवर त्या त्या रोगांच्या चिकित्साप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें चिकित्सा करावी.

रास्नादि गुग्गुळ.

रास्नामृतैरण्डसुराव्हविश्वं तुल्यं पुरेणोपविमृश्य खादेत् ।
वातामयी कर्णशिरोगदी च नाडीव्रणी चापि भगंदरी च ॥ १ ॥

रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार व सुंठ ह्यांचें चूर्ण करून त्यांत चूर्णाच्या बरोबरीनें गुग्गुळ घालून तो वातरोग, कर्णरोग, शिरोरोग, नाडीव्रण व भगंदर झालेल्या रोग्यांनीं खावा.

कानाच्या पाळीच्या रोगाची चिकित्सा.

पालीसंशोषणे कुर्याद्वातकर्णरुजः क्रियाम् ।
स्वेदयेद्यत्नतस्तां तु स्विन्नां संवर्धयेत्तिलैः ॥ १ ॥

कानाची पाळी शुष्क झाली असल्यास वातजन्य कर्णरोगावरील उपचार करावे, व कानाच्या पाळीचें स्वेदन करून नंतर तिळाचा कल्क लावून ती वाढवावी.

माहिषनवनीतयुतं सप्ताहं धान्यराशिपर्युषितम् ।
नवमुसलिकन्दचूर्णं वृद्धिकरं कर्णपालीनाम् ॥ २ ॥

मुसळीच्या कंदाचें चूर्ण म्हशीच्या लोण्यांत खलून सात दिवस धान्याच्या राशींत पुरून ठेवावें. नंतर तें कानाच्या पाळीवर चोळावें. तें कानाची पाळी वाढवितें.

शतावरीतेल.

शतावरीवाजिगन्धापयस्यैरण्डबीजकैः ।
तैलं विपक्वं सक्षीरं पालीं संवर्धयेत्सुखम् ॥ १ ॥

शतावरी, अश्वगंध, दुधी, व एरंडाचें बीं, ह्यांचा कल्क व दूध यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें कानाच्या पाळीची वाढ सहज करितें.

जीवनीय तेल.

शीतैर्लेपैर्जलौकाभिरुत्पातं समुपाचरेत् ।
जीवन्त्या चाश्वगन्धार्कबाकुचीबीजसैन्धवैः ॥ १ ॥
हलिनीसुरसाभ्यां च गोधाकङ्कवसान्वितम् ।
तैलं विपक्वमभ्यङ्गादुन्मन्थं नाशयेद् ध्रुवम् ॥ २ ॥

जळवा लावून रक्त काढून नंतर थंड अशा लेपानें उत्पातावर उपचार करावे. हरणदोडी, अश्वगंध, रुईची मुळी, बावच्या, सैंधे-

लोण, कळलावी, व तुळस ह्यांचा कल्क व घोरपड व बगळा ह्यांची चर्बी ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. हें तेल लावलें असतां उन्मन्थाचा नाश होतो.

दुःखवर्धनकं सिक्त्वा जम्ब्वाम्राश्वत्थपत्रजैः ।
क्वाथैस्तैलेन सुस्निग्धं तच्चूर्णैश्चावधूलयेत् ॥ ३ ॥

जांभळीचीं, आंब्याचीं व पिंपळाचीं पानें ह्यांचा काढा करून दुःखवर्धन नांवाच्या कर्णरोगावर शिंपावा. नंतर त्याजवर तेल लावून त्याच पानांचें चूर्ण वर टाकावें.

बहुशो गोमयैस्तप्तं स्वेदितं परिलेहितम् ।
घनसारैः समालिम्पेदजामूत्रेण कल्कितैः ॥ ४ ॥

परिलेहिताला तापलेल्या गाईच्या शेणानें शेकून नंतर त्याजवर शेळीच्या मुतांत चंदन उगाळून त्याचा लेप करावा.

पथ्यापथ्य.

स्वेदो विरेको वमनं नस्यं धूमः शिराव्यधः ।
गोधूमाः शालयो मुद्गा यवाश्च प्रतनं हविः ॥ १ ॥
लावो मयूरो हरिणस्तित्तिरो वनकुक्कुटः ।
पटोलं शिग्रुवार्ताकं सुनिषण्णं कठिल्लकम् ॥ २ ॥
रसायनानि सर्वाणि ब्रह्मचर्यमभाषणम् ।
उपयुक्तं यथादोषमिदं कर्णामये हितम् ॥ ३ ॥

स्वेदन, रेचन, वमन, नस्य, धुरी, शिरावेध; गहु, साळी, मूग, सातु, जुनें तूप, लावापक्षी, मोर, हरीण, तित्तिर, रानकोंबडा पडवळ, शेवगा, वांगीं, कुरडू, कारलें, (च्यवन प्राश्यादि) सर्व रसायनप्रयोग, ब्रह्मचर्य व भाषण न करणें, हें पथ्य दोषानुरूप कर्णरोगावर योजावें.

दन्तकाष्ठं शिरःस्नानं व्यायामं श्लेष्मलं गुरु ।
कण्डूयनं तुषारं च कर्णरोगी परित्यजेत् ॥ ४ ॥

काडीनें दांत घासणें, डोक्यावरून स्नान करणें, व्यायाम, कफकारक व जड पदार्थ, खाजविणें आणि दहिंवर किंवा थंडी हें कर्णरोग्यानें वर्ज करावें.

नासारोगाधिकार.

अवश्यायानिलरजोभाष्यातिस्वप्नजागरैः ।

नीचात्युच्चोपधानेन पीतेनान्येन वारिणा ॥ १ ॥
अत्यम्बुपानरमणैश्छर्दिबाष्पग्रहादिभिः ।
क्रुद्धा वातोल्बणा दोषा नासायां स्त्यानतां गताः ॥ २ ॥

थंडी, वारा, धुरळा, मोठ्यानें बोलणें, अतिशय झोप घेण्यानें, जागरण करण्यानें, अतिशय खोल किंवा उंच ठिकाणीं राहण्यानें, पिण्याच्या पाण्यांत बदल झाल्यानें, अतिशय पाणी पिण्यानें, किंवा ओकारी व डोळ्यांतील पाणी ह्यांचा वेग धारण केल्यानें वातप्रधान दोष प्रकुपित होऊन नाकामध्यें एकत्र होतात, आणि नाकासंबंधी रोग उत्पन्न करितात.

नासारोगांचीं नांवें व संख्या.

आदौ च पीनसः प्रोक्तः पूतिनासस्ततः परम् ।
नासापाकोऽत्र गणितः पूयशोणितमेव च ॥ ३ ॥
क्षवथुर्भ्रंशथुर्दीप्तः प्रतिनाहः परिस्रवः ।
नासाशोषः प्रतिश्यायाः पञ्च सप्तार्बुदानि च ॥ ४ ॥
चत्वार्यर्शांसि चत्वारः शोथाश्चत्वारि तानि च ।
रक्तपित्तानि नासायां चतुस्त्रिंशद्भिदाः स्मृताः ॥ ५ ॥

पीनस, पूतिनास, नासापाक, पूयशोणित, क्षवथु, भ्रंशथु, दीप्त, प्रतिनाह, परिस्राव, नासाशोष, पांच प्रकारचे प्रतिश्याय (पडसें), सात प्रकारचीं अर्बुदें, चार प्रकारचे अर्श (मोड), चार प्रकारचे शोथ व चार प्रकारचीं रक्तपित्तें, असे एकंदर चौतीस नासारोग आहेत.

पीनसाचें लक्षण.

आनह्यते शुष्यति यस्य नासा प्रक्लेदमायाति च धूप्यते च ।
न वेत्ति यो गन्धरसांश्च जन्तुर्जुष्टं व्यवस्येत्स तु पीनसेन ॥
तं चानिलश्लेष्मभवं विकारं ब्रूयात्प्रतिश्यायसमानलिङ्गम् ॥ ६

ज्याचें नाक चोंदतें, कोरडें पडतें, अतिशय ओलसर होतें, नाकांतून धूर निघाल्याप्रमाणें वाटतो आणि नाकाला वास व रस कळत नाहींत, त्याला पीनस झाला आहे असें समजावें. ह्या वातकफात्मक विकाराचीं लक्षणें प्रतिश्यायाप्रमाणें समजावीं.

पूतिनास.

दोषैर्विदग्धैर्गलतालुमूलात्संदूषितो यस्य समीरणस्तु ।

निरेति पूतिर्मुखनासिकाभ्यां तं पूतिनासं प्रवदन्ति रोगम् ॥७
गळा व टाळा ह्यांच्या मुळाशीं प्रकुपित झालेल्या कफादि दोषांनीं व्याप्त झालेला वायु दुर्गंधयुक्त होऊन नाकातोंडांतून बाहेर येतो, त्याला पूतिनस्य असें म्हणतात.

नासापाक.

घ्राणाश्रितं पित्तमरूंषि कुर्याद्यस्मिन्विकारे बलवांश्च पाकः ।
तं नासिकापाक इति व्यवस्येद्विक्लेदकोथावथ वाऽपि यत्र ॥८॥
ज्या विकारामध्यें नाकाचा आश्रय करून असलेलें पित्त दुष्ट होऊन नाकांत व्रण उत्पन्न करितें, आणि नाक अतिशय पिकावितें, त्याला नासापाक असें म्हणतात. ह्यामध्यें ओलसरपणा व दुर्गंधि हीं असतात.

पूयरक्त.

दोषैर्विदग्धैरथ वाऽपि जन्तोर्ललाटदेशेऽभिहतस्य तैस्तैः ।
नासा स्रवेत्पूयमसृग्विमिश्रं तं पूयरक्तं प्रवदन्ति रोगम् ॥ ९ ॥
नाकामध्यें पित्त व रक्त वाढल्यामुळें दोषांचा प्रकोप होऊन किंवा लांकूड, धोंडा इत्यादिकांचा कपाळावर आघात झाल्यामुळें नाकांतून पू व रक्त वाहतें, त्याला पूयरक्त असें म्हणतात.

दोषज क्षवथु.

घ्राणाश्रिते मर्मणि संप्रदुष्टो यस्यानिलो नासिकया निरेति ।
कफानुयातो बहुशोऽथ शब्दस्तं रोगमाहुः क्षवथुं विधिज्ञाः ॥१०॥
नाकांतील मर्माच्या आश्रयानें असलेला वायु प्रकुपित होऊन कफासहवर्तमान मोठा शब्द करीत बाहेर येतो, त्याला वैद्य क्षवथु (शिंक) असें म्हणतात.

आगंतुक शिंकेचें लक्षण.

तीक्ष्णोपयोगादतिजिघ्रतो वा भावान्कटूनर्कनिरीक्षणाद्वा ।
मूलादिभिर्वा तरुणास्थिमर्मण्युद्घाटितेऽन्यः क्षवथुर्निरेति ॥ ११ ॥
मोहरी वगैरे तीक्ष्ण पदार्थ खाणें किंवा त्यांचा वास घेणें, सूर्याकडे पहाणें अथवा शिंक उत्पन्न करणाऱ्या औषधींचें मूळ नाकांत घालणें इत्यादि कारणांनीं नाकांतील तरुणास्थीच्या मर्माला स्पर्श झाला असतां शिंक येते. तिला आगंतुक क्षवथु असें म्हणतात.

भ्रंशथु.

प्रभ्रश्यते नासिकया हि यस्य सान्द्रो विदग्धो लवणः कफस्तु ।
प्राक्संचितो मूर्धनि पित्ततप्तस्तं भ्रंशथुं रोगमुदाहरन्ति ॥ १२ ॥

पूर्वी मस्तकांत सांठून असलेला, दाट, बिघडलेला, नासका व खारट असा कफ पित्ताच्या उष्णतेनें पातळ होऊन नाकांतून बाहेर येतो. त्याला भ्रंशथु असें म्हणतात.

दीप्त.

घ्राणे भृशं दाहसमन्विते तु विनिःसरेद्धूम इवेह वायुः ।
नासा प्रदीप्तेव च यस्य जन्तोर्व्याधिं तु तं दीप्तमुदाहरन्ति १३

ज्याच्या नाकाचा आंतून दाह होतो, व नाकांतून येणारा उच्छ्वास धुराप्रमाणें उष्ण असा बाहेर येतो, त्यामुळें नाक आंतून भाजल्यासारखें वाटतें, त्याला दीप्त असें म्हणतात.

प्रतिनाह.

उच्छ्वासमार्गं तु कफः सवातो रुन्ध्यात्प्रतीनाहमुदाहरेत्तम् ।

वातासहवर्तमान कफ श्वासोच्छ्वासाचा मार्ग अडवितो, त्याला प्रतिनाह असें म्हणतात.

स्राव.

घ्राणाद्धनः पीतसितस्तनुर्वा दोषः स्रवेत्स्रावमुदाहरेत्तम् ॥ १४ ॥

नाकांतून दाट व पिवळट किंवा पांढरा व पातळ असा स्राव होतो, त्याला नासास्राव असें म्हणतात.

नासाशोष.

घ्राणाश्रिते श्लेष्मणि मारुतेन पित्तेन गाढं परिशोषिते च ।
कृच्छ्राच्छ्वसेदूर्ध्वमधश्च जन्तुर्यस्मिन्स नासापरिशोष उक्तः ॥ १५ ॥

नाकांतील कफाला वायु व पित्त ह्या दोषांनीं शुष्क केला असतां त्या मनुष्याला खालींवर श्वासोच्छ्वास करण्यास कष्ट पडतात. त्याला नाशासोष असें म्हणतात.

प्रतिश्याय (पडसें.)

एकं सद्योजनकं तद्बलवत्त्वेन चयं नापेक्षते ।

त्याचें निदान दोन प्रकारचें आहे. एक तात्काळ येणारें पडसें. ह्याला दोषसंचयाची जरूरी नसते.

चयादिक्रमशो जनकमपरम् ।
संचयादि कारणानें येणारें पडसें तें दुसरें.

न केवलं चयं प्राप्य दोषाः कुप्यन्ति देहिनाम् ।
अन्यदाऽपि हि कुप्यन्ति हेतुबाहुल्यतोरणात् ॥ १ ॥

केवळ मनुष्याच्या शरीरांतील दोष संचित होऊनच प्रकुपित होतात असें नाहीं. कारण बलवत्तर झालें असतां संचित न होतांना देखील त्यांचा प्रकोप होतो.

संचयः संचयात्प्रकोपः प्रकोपात्प्रसरः
प्रसरात्स्थानसंश्रयस्ततो व्यक्तिस्ततो भेद इति ।

त्याचप्रमाणें प्रथम दोषांचा संचय, संचयानंतर त्यांचा प्रकोप, प्रकोपानंतर त्यांचा प्रसर (संचार), नंतर स्थानाचा आश्रय, नंतर प्रगट होणें, नंतर त्यांचे भेद, असा क्रम आहे.

पडशाची संप्राप्ति.

संधारणाजीर्णरजोतिभाष्यक्रोधर्तुवैषम्यशिरोभितापैः ।
प्रजागरात्स्वप्नवाम्बुशीतावश्यायकैर्मैथुनबाष्पशोकैः ॥ १६ ॥
संस्त्यानदोषे शिरसि प्रवृद्धो वायुः प्रतिश्यायमुदीरयेत्तु ।

मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें, अजीर्ण, अतिशय धुरळा नाकांत जाणें, अतिशय बोलणें, अति रागावणें, ऋतूंत (हवेंत) बदल होणें, उन्हानें वगैरे डोकें अतिशय तापणें, जागरण, अतिशय झोप घेणें, नवें पाणी पिणें, गारठा, दहिंवर अंगावर पडणें, अति-मैथुन, डोळयांतून फार पाणी येणें, व शोक, ह्या कारणांनीं घट्ट असलेल्या मस्तकांतील दोषांनीं वायु प्रकुपित होऊन प्रतिश्याय (पडसें) उत्पन्न करतो.

पडशाची संप्राप्ति.

चयं गता मूर्धनि मारुतादयः पृथक्समस्ताश्च तथैव शोणितम् ।
प्रकुप्यमाणा विविधैः प्रकोपणैस्ततः प्रतिश्यायकरा भवन्ति हि ॥

आपापल्या ठिकाणीं संचित झालेले निरनिराळे वातादि दोष व रक्त प्रकुपित होऊन मस्तकांत शिरून पडसें उत्पन्न करतात.

पूर्वरूप.

क्षवप्रवृत्तिः शिरसोऽभिपूर्णता स्तम्भोऽङ्गमर्दः परिहृष्टरोमता।
उपद्रवाश्चाप्यपरे पृथग्विधा नृणां प्रतिश्यायपुरःसराः स्मृताः ॥

शिंक येणें, मस्तक गच्च होणें, अंग ताठणें, अंग मोडून येणें, अंगावर काटा येणें, आणि त्या त्या दोषानुरूप दुसरेही विकार होणें हीं लक्षणें मनुष्याला पडसें येण्यापूर्वीं होतात.

वातजन्य पडशाचें लक्षण.

आनद्धा पिहिता नासा तनुस्रावप्रसेकिनी।
गलताल्वोष्ठशोषश्च निस्तोदः शङ्खयोस्तथा ॥ १९ ॥
भवेत्स्वरोपघातश्च प्रतिश्यायेऽनिलात्मके।

वातात्मक पडशामध्यें नाक आवळल्यासारखें होतें व चोंदतें. नाकांतून पाण्यासारखा पातळ स्राव होतो. घसा, टाळा व ओठ ह्यांना कोरड असते. दोन्हीही आंख दुखतात, शिंका फार येतात, तोंड बेचव होतें आणि स्वर बदलतो.

पैत्तिक पडशाचें लक्षण.

उष्णः सपीतकः स्रावो घ्राणात्स्रवति पैत्तिके ॥ २० ॥
कृशोऽपि पाण्डुसंतप्तो भवेदुष्णाभिपीडितः।
नासया तु सधूमाग्निं वमतीव स मानवः ॥ २१ ॥

पित्तजन्य पडशामध्यें नाकांतून पिवळा व उष्ण असा स्राव होतो. तो रोगी कृश व फिकट दिसतो. त्याचें अंग तापतें व तो उष्णतेनें पीडित होतो; आणि नाकांतून धूर व ज्वाळा चालल्यासारखें वाटतें.

कफजन्य पडसें.

घ्राणात्कफकृतः श्वेतः कफः शीतः स्रवेद्बहुः।
शुक्लावभासः शूनाक्षो भवेद्गुरुशिरा नरः।
गलताल्वोष्ठशिरसां कण्डूभिरतिपीडितः ॥ २२ ॥

कफजन्य पडशामध्यें नाकांतून थंड, पांढरा व पुष्कळ असा कफ पडतो. या रोग्याची अंगकांति पांढरी होते व डोळे सुजतात; डोकें जड होतें, घशांत खवखवतें व टाळा, मस्तक व ओठ हीं खाजतात.

सन्निपातिक पडशाचें लक्षण.

भूत्वा भूत्वा प्रतिश्यायो योऽकस्मात्संनिवर्तते ।
संपक्को वाऽप्यपक्को वा स सर्वप्रभवः स्मृतः ॥ २३ ॥

ज्याला वरचेवर पडसें येतें, आणि तें पिको अथवा न पिको, एकदम नाहींसें होतें, त्याला सान्निपातिक पडसें म्हणतात.

दुष्ट पडशाचें लक्षण.

प्रक्लिद्यते मुहुर्नासा पुनश्च परिशुष्यति ।
पुनरानह्यते वापि पुनर्विव्रियते तथा ॥ २४ ॥
निःश्वासो वाति दुर्गन्धो नरो गन्धान्न वेत्ति च ।
एवं दुष्टप्रतिश्यायं जानीयात्कृच्छ्रसाधनम् ॥ २५ ॥

दुष्ट पडशांत एकादे वेळीं नाक ओलें असतें, तर एकादे वेळीं तें लागलेंच कोरडें होतें. वरचेवर चोंदतें व मोकळें होतें. नाकांतून दुर्गंधयुक्त श्वास वाहतो व त्याला वास कळत नाहीं. असें हें दुष्ट पडसें कष्टसाध्य आहे असें समजावें.

रक्तजन्य पडसें.

रक्तजे तु प्रतिश्याये रक्तस्रावः प्रवर्तते ।
पित्तप्रतिश्यायकृतैर्लिङ्गैश्चापि समन्वितः ॥ २६ ॥
ताम्राक्षश्च भवेज्जन्तुरुरोघातप्रपीडितः ।
दुर्गन्धोच्छ्वासवक्त्रश्च गन्धानपि न वेत्ति सः ॥ २७ ॥

रक्तजन्य पडशामध्यें नाकांतून रक्त वाहतें. ह्यामध्यें पित्तजन्य पडशाचीं लक्षणें असतात. त्या रोग्याचे डोळे लाल होतात व तो उरोघातरोगानें (उरक्षतासारखाच हा एक रोग आहे.) पीडित होतो. त्याच्या तोंडाला व श्वासोच्छ्वासाला घाण येते व त्याला वासही कळत नाहीं.

पडशाची असाध्यता.

सर्व एव प्रतिश्याया नरस्याप्रतिकारिणः ।
दुष्टतां यान्ति कालेन तदाऽसाध्या भवन्ति च ॥ २८ ॥

पडशावर उपचार करण्याची हयगय करणाऱ्या मनुष्याचीं सर्व पडशीं कालांतरानें दुष्ट होतात, आणि तीं दुष्ट झालीं म्हणजे असाध्य होतात.

पडशामध्यें कृमींची उत्पत्ति.

मूर्छन्ति क्रमयश्चात्र श्वेताः स्निग्धास्तथाऽणवः ।
क्रमिजो यः शिरोरोगस्तुल्यं तेनात्र लक्षणम् ॥ २९ ॥

असाध्य झालेल्या ह्या दुष्ट पडशामध्यें कृमि होतात. सर्वच पडशीं कफजन्य असल्यामुळें ते कृमि पांढरे, स्निग्ध व सूक्ष्म असतात. कृमिजन्य शिरोरोगांत जीं लक्षणें असतात, त्यासारखींच लक्षणें ह्यांत होतात.

पडशापासून होणारे विकार.

बाधिर्यमान्ध्यमघ्रत्वं घोरांश्च नयनामयान् ।
शोफाग्निसादकासांश्च वृद्धाः कुर्वन्ति पीनसाः ॥ ३० ॥

पडशीं फार वाढलीं असतां बहिरेपणा, अंधळेपणा, नाकाला वास न येणें, डोळ्याचे भयंकर रोग, सूज, अग्निमांद्य, खोकला व पीनस हे विकार उत्पन्न करितात.

पीनसमारभ्य प्रतिश्यायपर्यन्तं पञ्चदशोक्ताः ।
पीनसापासून प्रतिश्यायापर्यंत हे पंधरा विकार सांगितले.

बाकीचे रोग.

अर्बुदं सप्तधा शोथाश्चत्वारोऽर्शश्चतुर्विधम् ।
चतुर्विधं रक्तपित्तमुक्तं घ्राणेऽपि तद्विदुः ॥ ३१ ॥

सात प्रकारचीं अर्बुदें, चार प्रकारचे शोथ (सूज), चार प्रकारचे (मोड) आणि चार प्रकारचें रक्तपित्त असे हे रोगही पूर्वीं सांगितल्याप्रमाणेंच नाकामध्येंहीं होतात असें समजावें.

आमपीनसाचें लक्षण.

शिरोगुरुत्वमरुचिर्नासास्रावस्तनुस्वरः ।
क्षामः ष्ठीवति चाभीक्ष्णमामपीनसलक्षणम् ॥ ३२ ॥

पीनस अपक्क असला म्हणजे मस्तक जड होतें, तोंडाला चव नसते, नाकांतून पातळ स्राव होतो, आवाज बदलतो व नाकांतून वरचेवर शेंबूड येतो.

पक्क पीनसाचें लक्षण.

आमलिङ्गान्वितः श्लेष्मा घनः खेषु निमज्जति ।
स्वरवर्णविशुद्धिश्च पक्कपीनसलक्षणम् ॥ ३३ ॥

अपक्व पीनसाच्या लक्षणांनीं युक्त असा दाटलेला घट्ट कफ नाकांतून बाहेर पडतो आणि आवाज व वर्णोच्चार स्पष्ट होतो. हें हें पक्व पीनसाचें लक्षण आहे.

पीनसाची चिकित्सा.

सर्वेषु पीनसेष्वादौ निवातागारगो भवेत् ।
शिरसोऽभ्यञ्जनैः स्वेदैर्नस्यैर्मन्दोष्णभोजनैः ।
वमनैर्घृतपानैश्च तान्यथास्वमुपाचरेत् ॥ १ ॥

सर्व पीनसरोगांत प्रथमतः निर्वात स्थळीं राहावें. व मस्तकावर तेल चोपडणें, स्वेदन, नस्य, मंदोष्ण भोजन, वमन व तूप पिणें वगैरे क्रियांनीं दोषानुरूप चिकित्सा करावी.

सर्जार्जुनोदुम्बरवत्सकानां त्वचा कषायैः परिधावनेन ।
कषायकल्कैरपि चैभिरेव सिद्धं घृतं घ्राणविपाकनाशि ॥ २ ॥

राळेचा वृक्ष, अर्जुनसादडा, उंबर व कुडा, ह्या झाडांच्या सालीं-चा काढा करून त्यानें नाक धुवावें; आणि ह्याच सालींचा कल्क व काढा ह्यांमध्यें तूप सिद्ध करून तें सेवन करावें. तें पीनसाचा नाश करितें.

मरीचादि योग.

सर्वेषु सर्वकालं पीनसरोगेषु जातमात्रेषु ।
मरिचं गुडेन दध्ना भुञ्जीत नरः सुखं लभते ॥ १ ॥

सर्व ऋतूंत सर्व पीनसांवर मिऱ्याची पूड व गूळ दह्याबरोबर खावा, म्हणजे सुख होतें.

पंचमूलादियूष.

पञ्चमूलीयुतं क्षीरं किं वा स्याच्चित्रकाभया ।
सर्पिर्गुडो विडङ्गश्च यूषः पीनसशान्तये ॥ १ ॥

पंचमूळांनीं सिद्ध केलेलें दूध किंवा चित्रकमूळ व बाळहिरडे ह्यांचा काढा तूप, गूळ व वावडिंगाचें चूर्ण घालून पीनस रोगाची शांति होण्याकरितां द्यावा.

गुडादियोग.

गुडमरिचविमिश्रं पीतमाशु प्रकामं
हरति दधि नराणां पीनसं दुर्निवारम् ।

यदि तु सघृतमन्नं श्लक्ष्णगोधूमचूर्णैः
कृतमुपहरतेऽसौ तत्कुतोऽस्यावकाशः ॥ १ ॥

गूळ व मिरें ह्यांचें चूर्ण दह्यांत घालून तें दहीं यथेच्छ प्यावें-तें मनुष्याच्या दुर्निवार पीनसाचा नाश करितें. आणि त्याजवर जर गव्हाचें अन्न व तूप हें पथ्यास खालें, तर त्याला पीनस रोग होण्याला अवकाशच मिळणार नाहीं.

वेल्लगोधूमयोग.

वेल्लगोधूमभोजी च निद्राकाले च शीतलम् ।
जलं पिबति यो रोगी पीनसान्मुच्यते नरः ॥ १ ॥

गव्हाचें अन्न व मिऱ्याची पूड खाऊन निजतांना थंड पाणी पिणारा मनुष्य पीनस रोगापासून मुक्त होतो.

व्योषादिवटी.

व्योषचित्रकतालीसतिंत्तिडीकाम्लवेतसम् ।
सचव्याजाजितुल्यांशमेलात्वकपत्रपादिकम् ॥ १ ॥
व्योषादिकमिदं चूर्णं पुराणगुडमिश्रितम् ।
पीनसश्वासकासघ्नं रुचिस्वरकरं परम् ॥ २ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रकमूळ, तालीसपत्र, चिंच, अम्लवेतस, चवक व जिरें, हीं औषधें समभाग आणि वेलदोडे, दालचिनी, व तमालपत्र हीं औषधें प्रत्येकीं एक चतुर्थांश भाग, ह्या सर्वांचें चूर्ण करावें. ह्याला व्योषादिचूर्ण म्हणतात. हें आंत जुना गूळ मिसळून द्यावें. हें पीनस, श्वास व खोकला ह्यांचा नाश करितें आणि रुचि व स्वर चांगला करितें.

कट्फलादि चूर्ण व काढा.

कट्फलं पौष्करं शृङ्गी व्योषं यासश्च कारवी ।
एषां चूर्णं कषायं वा दद्यादार्द्रकजै रसैः ॥ १ ॥
पीनसे स्वरभेदे च तमके सहलीमके ।
संनिपाते कफे वाते कासे श्वासे च शस्यते ॥ २ ॥

कायफळ, पोखरमूळ, काकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, धमासा, व बडिशेप ह्यांचें चूर्ण आल्याच्या रसांतून द्यावें; किंवा ह्याच औषधांचा काढा करून द्यावा. तो पीनस, स्वरभेद, तमकश्वास, हलीमक,

सन्निपात, कफ, वात, कास, व श्वास ह्यांजवर प्रशस्त आहे.

पाठादि तेल.

पाठाद्विरजनीमूर्वापिप्पलीजातिपल्लवैः ।
एभिश्च तैलं संसिद्धं नस्यतः पीनसापहम् ॥ १ ॥

पहाडमूळ, हळद, दारुहळद, मोरवेल, पिंपळी, जाईचीं पानें ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल नाकांत घातलें असतां तें पीनसाचा नाश करितें.

षड्बिंदुघृत.

भृंगं लवंगं मधुकं च कुष्ठं सनागरं गोघृतमिश्रितं च ।
षड्बिन्दु नासास्थिगतं च पीनसं शिरोगतं रोगशतं च हन्ति

माका, लवंगा, जेष्ठमध, कोष्ट व सुंठ ह्यांचा कल्क घालून गाईचें तूप सिद्ध करावें. ह्याला षड्बिंदुघृत असें म्हणतात. हें अस्थिगत पीनस व शेकडों मस्तकरोग ह्यांचा नाश करितें.

कलिंगादि अवपीडन.

कलिंगहिंगुमरिचलाक्षास्वरसकट्फलैः ।
कुष्ठोग्राशिग्रुजन्तुघ्नैरवपीडः प्रशस्यते ॥ १ ॥

इंद्रजव, हिंग, मिरें, लाखेचा स्वरस, कायफळ, कोष्ट, वेखंड, शेवग्याची साल व वावडिंग ह्यांचा कल्क करून त्याचा रस नाकांत पिळावा.

कफघ्नमन्नं वार्ताकं कुलत्थाढकिमुद्गजाः ।
यूषाः ससैन्धवव्योषाः शस्ताश्चोष्णास्तु पीनसे ॥ २ ॥

कफनाशक अन्न, वांगीं, हुलगे, तुरी व मूग ह्यांचे यूष, त्यामध्यें सेंधेलोण आणि सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण घालून ऊन ऊन असे पीनस रोगावर देण्यास प्रशस्त आहेत.

व्याघ्री तेल.

व्याघ्रीदन्तीवचाशिग्रुसुरसाव्योषसिन्धुजैः ।
सिद्धं तैलं नसि क्षिप्तं पूतिनासागदापहम् ॥ १ ॥

रिंगणमूळ, दांतीमूळ, वेखंड, शेवग्याची साल, तुळस, सुंठ, मिरें, पिंपळी व सेंधेलोण ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल नाकांत घालावें. तें पूतिनास रोगाचा नाश करितें.

शिग्रुतेल.

शिग्रुसिंहीनिकुम्भानां बीजैः सव्योषसैन्धवैः ।
बिल्वपत्ररसे सिद्धं तैलं स्यात्पूतिनस्यनुत् ॥ १ ॥

शेवग्याचें बीं, डोरलीचें बीं, दांतीचें बीं (जेपाळ), सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचा कल्क व बेलाच्या पानांचा रस ह्यांमध्यें सिद्ध केलेलें तेल पूतिनास रोगाचा नाश करितें.

नासापाके पित्तनाशं विधानं कार्यं सर्वं बाह्यमाभ्यन्तरं च ।
हरेद्रक्तं क्षीरिवृक्षत्वचश्च योज्याः सेके सघृताश्च प्रलेपाः ॥ २ ॥

नासापाकरोगावर अंतर्बाह्य सर्व क्रिया पित्तनाशक अशी करावी. रक्त काढावें, आणि क्षीरवृक्षांच्या (वड वगैरेंच्या) सालींच्या काढ्यानें धुवावें व त्याच सालींचा तुपांतून लेप करावा.

पूयास्रे रक्तपित्तघ्नाः कषाया नावनानि च ।

पूयास्ररोगावर रक्तपित्तनाशक काढे व नस्य योजावें.

पाकदाहादिरोगेषु शीता लेपादिकाः क्रियाः ॥ ३ ॥

नासापाक व दाह ह्यांजवर लेपादि शीत उपचार करावे.

घृतगुग्गुलुमिश्रस्य सिक्थकस्य प्रयत्नतः ।
धूमं क्षवथुरोगघ्नं भ्रंशथुघ्नं च निर्दिशेत् ॥ ४ ॥

तूप, गुग्गुळ व मेण ह्यांची धुरी क्षवथु व भ्रंशथु ह्यांचा नाश करिते.

शुण्ठीकुष्ठकणाबिल्वद्राक्षाकल्ककषायवत् ।
तैलं पक्वमथाऽऽज्यं वा नस्यात्क्षवथुनाशनम् ॥ ५ ॥

सुंठ, कोष्ट, पिंपळी, बेल, द्राक्षें ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. तें तेल अथवा ह्याच औषधांनीं सिद्ध केलेलें तूप नाकांत घालावें. तें शिंका येण्याचें बंद करितें.

नस्यं हितं निम्बरसाञ्जनाभ्यां दीप्ते शिरःस्वेदनमल्पशस्तु ।
नस्ये कृते क्षीरजलावसेकाञ्शंसन्ति भुञ्जीत च मुद्गयूषैः ॥ ६ ॥

दीप्तरोगावर कडुनिंबाच्या पाल्याचा रस व रसांजन ह्यांचें नस्य करावें व मस्तक थोडें शेकावें, आणि नस्य केल्यावर दूध व पाणी एकत्र करून नाकावर शिंपावें, असें म्हणतात. ह्या दीप्तरोगावर मुगाच्या कढणाबरोबर जेवावें.

नासावनाहे कर्तव्यं पानं गव्यस्य सर्पिषः ।

नासावनाह (नासाप्रतिनाह) रोगावर गाईचें तूप प्यावें.

नासाशोषे क्षीरपानं ससितं च प्रशस्यते ॥ ७ ॥

नासाशोषावर साखर घालून दूध प्यावें. तें प्रशस्त आहे.

नासास्रावे घ्राणयोश्चूर्णमुक्तं नाड्या देयं येऽवपीडाश्च पथ्याः । तीक्ष्णान्धूमान्देवदार्वग्निकाभ्यां मांसं चाऽजं पथ्यमत्रादिशन्ति ॥

नासास्रावावर नळींतून योग्य असें चूर्ण नाकांत फुंकावें. आणि नासास्रावावर हितकारक अशा औषधांचे कल्क करून त्यांचे थेंब नाकांत सोडावें. किंवा देवदार व चित्रकमूळ ह्यांसारख्या तीक्ष्ण औषधांची धुरी योजावी. ह्या नासास्रावावर शेळीचें मांस पथ्याला द्यावें, असें म्हणतात.

पडशाचा प्रतिकार.

प्रतिश्यायेषु सर्वेषु गृहं वातविवर्जितम् ।
वस्त्रेण गुरुणोष्णेन शिरसो वेष्टनं हितम् ॥ १ ॥
बालमूलकयोर्यूषः कुलत्थोत्थश्च पूजितः ।
स्वेदोष्णं च हिमं भोज्यं पाचनाय प्रशस्यते ॥ २ ॥
ततः पक्वं कफं ज्ञात्वा हरेच्छीर्षविरेचनैः ।

सर्व प्रकारच्या पडशांच्या विकारांत राहण्यास निर्वात स्थळ असावें. जड व उबदार अशा वस्त्रानें मस्तकाला वेष्टण करावें. तें हितकारक आहे. कोंवळ्या मुळ्यांचा काढा अथवा हुलग्याचें कढण ह्याजवर घेण्यास प्रशस्त आहे. साधारण ऊन ऊन्न द्यावें. हे उपचार केल्यावर मस्तकांतील कफ पक्व झाला आहे असें पाहून तो शिरोविरेचनानें काढून टाकावा.

पिप्पल्यः शिग्रुबीजानि विडङ्गं मरिचानि च ॥ ३ ॥
अवपीडः प्रशस्तोऽयं प्रतिश्यायनिवारणः ।

पिंपळी, शेवग्याचें बीं, वावडिंग व मिरें ह्या औषधांच्या कल्काचे थेंब नाकांत घालावे. ह्याला अवपीड असें म्हणतात. हा पडशावर प्रशस्त आहे. तो पडशाचा नाश करतो.

वातिके च प्रतिश्याये पिबेत्सर्पिर्यथाक्रमम् ॥ ४ ॥
पञ्चभिर्लवणैः सिद्धं प्रथमेन गणेन च ।
रक्तपित्तोत्थयोः पेयं सर्पिर्मधुरकैः शृतम् ॥ ५ ॥
परिषेकान्प्रदेहांश्च कुर्यादपि च शीतलान् ।

हितं पित्तप्रतिश्याये पाचनार्थं घृतं पयः ॥ ६ ॥
शृङ्गबेरेण पयसा शृंगबेरमथापि वा ।

वातजन्य पडशावर पंचलवणें व विदार्यादि गणांतील औषधें ह्या औषधांनीं तयार केलेलें तूप योग्य क्रमानें प्यावें. रक्तपित्तजन्य पडशावर मधुर औषधांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें. सिंचन करण्याचे काढे व लेप शीतल करावे. पित्तजन्य पडशाचें पाचन होण्याकरितां तूप व दूध हितकारक आहे. आल्याच्या रसांतून दूध द्यावें किंवा आल्याचा रस द्यावा.

सर्पिषा भृष्टया धात्र्या शिरसो लेपतः क्षणात् ॥ ७ ॥
नासायां संप्रवृत्तं च रुधिरं च विनश्यति ।

तुपांत तळलेल्या आवळकाठीचा मस्तकावर लेप करावा. तो नाकांतून येणाऱ्या रक्ताचा क्षणांत नाश करतो.

कफजे सर्पिषा स्निग्धं तिलमाषविपक्वया ॥ ८ ॥
यवाग्वा वामयित्वा तु श्लेष्मघ्नं क्रममाचरेत् ।

कफजन्य पडशावर तीळ व उडीद घालून तयार केलेल्या कण्हेरींत तूप घालून प्यावयास देऊन ओकवावें. आणि नंतर कफनाशक क्रिया करावी.

दार्वीङ्गुदनिकुम्भैश्च किणिह्या सरलेन च ।
वर्तयोऽत्र कृता योज्या धूमपाने यथाविधि ॥ ९ ॥

दारुहळद, रिंगणीच्या फळाचा गर, जेपाळ, किन्हई व देवदार ह्या औषधांच्या चूर्णाच्या वाती (विड्या) करून त्या धूम्रपानाकरितां यथाविधि योजाव्या, असें वृंदांत सांगितलें आहे.

विडङ्गं सैन्धवं हिंगु गुग्गुलुः समनःशिलः ।
प्रतिश्याये वचायुक्तं शक्त्या धूमं पिबेन्नरः ॥ १ ॥
एतच्चूर्णं समाघ्रातं प्रतिश्यायं विनाशयेत् ।

वावडिंग, सैंधेलोण, हिंग, गुग्गुळ, मनशीळ व वेखंड ह्या औषधांचें चूर्ण करून त्यांचें शक्तीप्रमाणें पडशावर धूमपान करावें. हें चूर्ण नाकांत ओढलें असतां पडशाचा नाश करितें.

घृततैलसमायुक्तं सक्तुधूमं पिबेन्नरः ॥ २ ॥
स धूमः स्यात्प्रतिश्यायकासहिक्काहरः परः ।

तूप व तेल मिश्र केलेल्या सातूंची धुरी द्यावी. ती पडसें खोकला व उचकी यांचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

प्रतिश्याये पिबेद्धूमं सर्वं गव्यसमायुतम् ॥ ३ ॥

पडशावर सर्व प्रकारचें धूम्रपान गाईचे तुपाशीं करावें.

चातुर्जातकचूर्णं वा घ्रेयं वा कृष्णजीरकम् ।
प्रतिश्यायेषु सशिरःपीडेषु नवसागरम् ॥ ४ ॥
समानं कलिकाचूर्णं सूक्ष्मं संचूर्णितं द्वयम् ।
गुञ्जामात्रं तु तच्चूर्णं नस्यं प्रधमनं चरेत् ॥ ५ ॥
नश्यन्त्यनेन नस्येन प्रतिश्यायाशिरोरुजः ।

दालचिनी, तमालपत्र, वेलची, व नाकेशर ह्यांचें चूर्ण अथवा शहाजिऱ्याचें चूर्ण नाकांत ओढावें. ज्या पडशामध्यें डोकें दुखत आहे, त्या पडशांत नवसागर व त्याच्या समान कळीचा चुना ह्यांचें एकत्र चूर्ण करून त्यांतील एक गुंजभर चूर्ण नाकांत फुंकावें. ह्या चूर्णाच्या नस्यानें पडसें व मस्तकपीडा दूर होते.

सवचाचूर्णमाघ्राय वाससा पोटलीकृतम् ॥ ६ ॥
कारवी वस्त्रबद्धा वा प्रतिश्यायमपोहति ।

वेखंड अथवा ओवा ह्यांचें चूर्ण फडक्यांत बांधून पुरचुंडी करून ती हुंगावी. ती पडशाचा नाश करिते.

शठीतामलकीव्योषचूर्णं सर्पिर्गुडान्वितम् ॥ ७ ॥
हरेद्धोरं प्रतिश्यायं पार्श्वहृद्वस्तिशूलनुत् ।

कचोरा, भुईआवळी, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण तूप व गूळ याशीं द्यावें. तें भयंकर पडसें, व बरगड्या, हृदय व बस्ती ह्यांमधील शूळ ह्यांचा नाश करितें.

पुटपक्वं जयापत्रं तैलसैन्धवसंयुतम् ।
प्रतिश्यायेषु सर्वेषु शीलितं परमौषधम् ॥ ८ ॥

ब्राह्मीचीं पानें पुटपाकानें भाजून तेल व सेंधेलोण याबरोबर सर्व पडशावर खावीं. हें मोठें उत्तम औषध आहे.

चित्रकहरीतकी.

चत्वार्यत्र शतानि चित्रकजटायुक्पञ्चमूलामृता-
धात्रीणामुदकार्मणे त्रिभिरपां द्रोणैश्च संक्वाथयेत् ।
पादस्थे क्वथने गुडस्य च शतं पथ्याढकेनान्वितं

पक्कव्यं शृतशीतले च मधुनः प्रस्थार्धमात्रं क्षिपेत् ॥ १ ॥
व्योषस्य त्रिसुगन्धकस्य च पलान्यत्रैव षट् प्रक्षिपेत्
क्षारस्यार्धपलं रसायनमिदं संसेव्यते सर्वदा ।
शोषश्वासमलावकाशवमथुश्लेष्मप्रतिश्यायिभिः
क्षीणोरःक्षतहिक्किभिः कफशिरोरुग्भिः प्रनष्टाग्निभिः ॥२॥

चित्रकमूळ, पंचमुळें, गुळवेल व आवळकाठी हीं औषधें प्रत्येकीं चारशें तोळे घेऊन त्यांचा तीन हजार बहात्तर तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत गूळ चारशें तोळे, व हिरडे दोनशें छप्पन्न तोळे घालून त्यांचा पाक करावा. तो लेहाप्रमाणें दाट झाल्यावर उतरून निवाल्यावर त्यांत बत्तीस तोळे मध आणि सुंठ, मिरें, पिंपळी, वेलदोडे, दालचिनी व तमालपत्र, ह्या औषधांचें चूर्ण प्रत्येकीं चार चार तोळे व जवखार दोन तोळे घालावा. हें रसायन सर्वकाळ सेवन करण्यास योग्य आहे. क्षय, श्वास, मलबद्धता, ओकारी, कफजन्य पडसें, क्षीणत्व, उरःक्षत, उचकी, कफजन्य मस्तकपीडा, व आग्निमांद्य हे रोग झालेल्या रोग्यांनीं हें रसायन सर्वकाळ सेवन करावें.

चिकित्साकलिकेंतील हिंग्वादि तेल.

हिंगुव्योषविडङ्गकट्फलवचारुक्तीक्ष्णगन्धैर्युतै-
र्लाक्षाश्वेतपुनर्नवाब्दकुटजैः पुष्पोद्भवैः सौरसैः ।
इत्येभिः कटुतैलमेतदनले मन्दे समूत्रं शृतं
पीतं नासिकया यथाविधि भवेन्नासामयिभ्यो हितम् ॥१

हिंग, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, कायफळ, वेखंड, कोष्ट, शेवग्याची साल, लाख, पांढरी वसू, नागरमोथे, कुडा, मध व चिरफळें ह्यांचा कल्क व गोमूत्र ह्यांमध्यें शिरसाचें तेल मंदाग्नीनें पचन करावें. हें हिंग्वादि तेल यथाविधि नाकांतून सेवन करावें. तें नाकाच्या रोग्यांना हितावह आहे.

कृमिघ्ना ये क्रमाः प्रोक्तास्तान्वै कृमिषु योजयेत् ।
धावनानि कृमिघ्नानि भेषजानि च बुद्धिमान् ॥ १ ॥

नाकांत होणाऱ्या कृमीवर कृमिचिकित्सेंत सांगितलेले कृमिनाशक उपचार करावे व धुण्याला कृमिनाशक औषधांचा काढा योजावा.

रक्ताम्रस्वरसः शुद्धस्तक्रेण सह नस्यतः ।
तस्य पर्णानि पिष्ट्वा च बध्नीयान्नासिकामुखे ॥ २ ॥
पतन्ति कीटकाः सद्यो योगोऽयं त्रिदिनैर्हितः ।
पीनसान्मुच्यते रोगी शतशोऽनुमितं त्विदम् ॥ ३ ॥

तांबड्या आंब्याचा (रातांब्याचा) शुद्ध स्वरस ताकांतून नाकांत घालावा. आणि त्याचींच पानें वाटून नाकावर बांधावीं. म्हणजे नाकांतील किडे पडतात. हा योग तीन दिवस करावा. तो हितकारक आहे. ह्या योगाच्या सेवनानें रोगी पीनसापासून मुक्त होतो. हें शेकडों वेळां अनुभवून पाहिलें आहे.

रक्तपित्तानि शोथाश्च तथाऽर्शांस्यर्बुदानि च ।
नासिकायां स्युरेतेषां स्वं स्वं कुर्याच्चिकित्सितम् ॥ १ ॥

नाकासंबंधीं रक्तपित्तें, सूज, अर्श (मोड), अर्बुदें हे विकार जर नाकांत झाले तर त्या त्या रोगाच्या चिकित्साप्रकरणांत सांगितलेले उपचार करावे.

गृहधूमकणादारुक्षारनक्ताह्वसैन्धवैः ।
सिद्धं शिखरिबीजैश्च तैलं नासार्शसे हितम् ॥ २ ॥

घरोसा, पिंपळी, देवदार, जवखार, करंज, सैंधेलोण व आघाड्याचें बी ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करावें. तें नासार्शावर (मोडावर) हितकारक आहे.

रक्तकरवीरपुष्पं जात्यं वा तथा मल्लिकायाः ।
एतैः समं तिलतैलं नासार्शोनाशनं परम् ॥ ३ ॥

तांबड्या कणेरीचीं फुलें, जाईचीं फुलें अगर मोगऱ्याचीं फुलें ह्यांच्या कल्कानें तिळाचें तेल सिद्ध करावें. तें नाकांतील मूळव्याधीचा नाश करितें.

नासाशोफे क्षीरसर्पिःप्रधानं तैलं सिद्धं चाणु कल्केन नस्यम् ।

नाकाच्या सुजेवर दुधांत सिद्ध केलेलें तूप प्रशस्त आहे. आणि अणुकल्कानें[१] सिद्ध केलेल्या तेलाचें नस्य करावें. तेंही प्रशस्त आहे.

१. अणुकल्कानें म्हणजे अणुतेल तयार करण्याकरितां ज्या औषधांचा कल्क घेतात त्या कल्कानें. ह्या कल्कांतील औषधें वाग्भट सूत्रस्थान अध्याय विसावा, ह्यामध्यें पहावीं.

सर्पिष्पानं भोजनं लाङ्गलैश्च स्नेहस्वेदैः स्नैहिकश्चात्र धूमः ॥ ४ ॥
तूप पिणें, साळीच्या अन्नाचें भोजन व स्नेहन, स्वेदन, स्निग्ध अशीं धूम्रपानें, हे उपचार नाकाच्या सुजेवर हितकारक आहेत. असें वृंदांत आहे.

क्षारोऽर्बुदेऽर्शमांसे च क्रिया शेषेऽप्यवेक्ष्य च ।
स्थितिर्निर्वातनिलये प्रगाढोष्णीषधारणम् ।
गण्डूषो लंघनं नस्यं धूमश्छर्दिः शिराव्यधः ॥ १ ॥

अर्बुद व अर्शसंबंधीं नाकांतील मांस काढण्याकारितां क्षार लावावे. आणि बाकीच्या रोगांत रोगाची स्थिति पाहून निर्वात स्थळीं राहणें, डोक्याला आवळून पागोटें बांधणें, गुळण्या करणें, लंघन, नस्य, धुरी, वमन व शिरावेध हे उपचार करावे.

पथ्यापथ्य.

स्नेहः स्वेदः शिरोभ्यङ्गः पुराणा यवशालयः ।
कुलित्थमुद्गयोर्यूषो ग्राम्या जांगलजा रसाः ॥ १ ॥
वार्ताकं कुलकं शिग्रु कर्कोटं बालमूलकम् ।
लशुनं दधि तप्ताम्बु वारुणी च कटुत्रयम् ॥ २ ॥
कट्वम्ललवणं स्निग्धमुष्णं च लघु भोजनम् ।
नासारोगे पीनसादौ सेव्यमेतद्यथामलम् ॥ ३ ॥

तेल कानांत घालणें, पिणें वगैरे; स्वेद (वाफाऱ्यानें वगैरें शेकणें) डोक्यावर तेल घालणें, जुने सातू, व जुन्या साळी, हुलगे व मूग ह्यांचे यूष, ग्राम्य व जांगल मांसाचे रस, वांगीं, पडवळ, शेवग्याच्या शेंगा, कारलीं, कोवळे मुळे, लसूण, दहीं, ऊन पाणी, मद्य, सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण, तिखट, आंबट, खारट, स्निग्ध, उष्ण व हलकें असें भोजन हें पथ्य नासारोग व पीनस ह्या विकारांत शक्तीप्रमाणें सेवन करावें

स्नानं क्रोधं शकृन्मूत्रवातवेगाञ्छुचं द्रवम् ।
भूमिशय्यां च यत्नेन नासारोगी परित्यजेत् ॥ ४ ॥

स्नान, रागावणें, मलमूत्र व अधोवायु ह्यांचा वेग धारण करणें, शोक, द्रव पदार्थ खाणें आणि भुईवर निजणें हें नासारोग्यानें वर्ज करावें.

शिरोरोगनिदान.

धूमातपतुषाराम्बुक्रीडातिस्वप्नजागरैः ।
उत्स्वेधातिपुरोवातबाष्पनिग्रहरोदनैः ॥ १ ॥
अत्यम्बुमद्यपानेन कृमिभिर्वेगधारणैः ।
उपधानमृजाभ्यंगद्वेषाच्च प्रततेक्षणैः ॥ २ ॥
असात्म्यगन्धदुष्टान्नभाषाद्यैश्च शिरोगतैः ।
शिरोरोगास्तु जायन्ते वातपित्तकफैस्त्रिभिः ॥ ३ ॥
संनिपातेन रक्तेन क्षयेण कृमिभिस्तथा ।
सूर्यावर्तानन्तवातशङ्खकार्धावभेदकाः ।
एकादशविधस्यास्य लक्षणानि प्रचक्षते ॥ ४ ॥

धूर, ऊन, पाण्याचे तुषार आंगावर पडणें, जलक्रीडा, अतिशय निजणें, अतिशय जागरण करणें, उंच ठिकाणावरील पूर्वेचा वारा घेणें, डोळ्यांतील आसवांचा निग्रह (अवरोध) करणें, रडणें, पाणी अथवा मद्य अतिशय पिणें, कृमि, मलमूत्रादिकांचा वेग धारण करणें, उंच उशी वगैरे उशाला घेणें, डोक्यावर पाणी शिंपडणें, तेल लावणें, द्वेष करणें, एकसारखी नजर लावून पहाणें, जो वास आवडत नाहीं असा वास घेणें, दूषित अन्न खाणें, व मोठ्यानें संभाषण करणें ह्या कारणांमुळें वात, पित्त व कफ ह्या पृथक् तीन दोषांनीं तीन, त्रिदोषांपासून एक, रक्तजन्य एक, क्षयरोगामुळें एक, कृमीपासून एक, व सूर्यावर्त, अनंतवात, शंखक व अर्धावभेदक, असे चार मिळून अकरा शिरोरोग होतात. त्यांचीं लक्षणें आतां सांगतों.

सर्व एव शिरोरोगाः संनिपातसमुद्भवाः ।
औत्कर्ष्यात्कीर्तितास्ते हि दशैकश्च क्षयेण च ॥ १ ॥

सर्व शिरोरोग त्रिदोषजन्य आहेत, तथापि दोषाधिक्यावरून त्याचे दहा प्रकार सांगितले आहेत, आणि क्षयामुळें होणारा एक, मिळून अकरा शिरोरोग आहेत.

वातजन्य शिरोरोगाचें लक्षण.

यस्यानिमित्तं शिरसो रुजश्च भवन्ति तीव्रा निशि चातिमात्रम् ।
बन्धोपतापैः प्रशमश्च यत्र शिरोभितापः स समीरणेन ॥ ५ ॥

ज्याचें मस्तक कारणावांचून अतिशय दुखतें, त्यांत रात्रीं विशे-

षतः दुखतें, तें आवळून बांधलें असतां किंवा शेकलें असतां रहातें. त्याला वातजन्य शिरोरोग म्हणतात.

पैत्तिक शिरोरोग.

यस्योष्णमंगारचितं यथैव भवेच्छिरो दह्यति चाक्षिनासम् ।
शीतेन रात्रौ च भवेच्छमश्च शिरोभितापः स तु पित्तकोपात् ६

ज्याचें मस्तक पेटलेल्या निखाऱ्याप्रमाणें संतप्त होतें, नाक व डोळे ह्यांची अतिशय आग होते, शीत उपचारांनीं व रात्रीं बरें वाटतें, त्याला पित्तजन्य शिरोरोग म्हणतात.

कफजन्य शिरोरोग.

शिरो भवेद्यस्य कफोपदिग्धं गुरु प्रतिष्टब्धमथो हिमं च ।
शूनाक्षिनासावदनं च यस्य शिरोभितापः स कफप्रकोपात् ७

ज्याचें मस्तक आंतून सारविल्यासारखें वाटतें, तें जड व स्तब्ध होतें, थंड लागतें, आणि डोळे व तोंड ह्यांना सूज येते, त्याला कफजन्य शिरोरोग म्हणतात.

सन्निपातिक शिरोरोग.

शिरोभितापे त्रितयप्रवृत्ते सर्वाणि लिङ्गानि समुद्भवन्ति ॥

त्रिदोषजन्य शिरोरोग झाला असतां तिन्ही दोषांची लक्षणें होतात.

रक्तज शिरोरोग.

रक्तात्मकः पित्तसमानलिङ्गः स्पर्शासहत्वं शिरसो भवेच्च ॥८॥

रक्तजन्य शिरोरोगामध्यें पित्तजन्य शिरोरोगाचीं लक्षणें असतात आणि डोक्याला स्पर्श सहन होत नाहीं.

क्षयजन्य शिरोरोग.

वसावलासक्षतसंभवानां शिरोगतानामतिसंक्षयेण ।
क्षयप्रवृत्तः शिरसोऽभितापः कष्टो भवेदुग्ररुजोऽतिमात्रम् ॥९॥
संस्वेदनच्छर्दनधूमनस्यैरसृग्विमोक्षैश्च विवृद्धिमेति ।

क्षयरोगामुळें मस्तकांतील वसा, कफ व रक्त ह्यांचा क्षय झाला असतां, अत्यंत ठणका उत्पन्न करणारा कष्टप्रद असा मस्तकरोग होतो. तो शेकणें, वांति, धूम्रपान, नस्य व रक्त काढणें ह्या उपचारांनीं वाढतो. ह्याला क्षयजन्य शिरोरोग असें म्हणतात.

कृमिजन्य शिरोरोग.

निस्तुद्यते यस्य शिरोऽतिमात्रं संभक्ष्यमाणं स्फुटतीव चान्तः।
घ्राणाच्च गच्छेद्रुधिरं सपूयं शिरोभितापः क्रमिभिः स घोरः॥१०॥

मस्तकाला आंतून टोचल्याप्रमाणें पीडा होते. मस्तकांत कृमि खाऊं लागले असतां मस्तक फुटल्याप्रमाणें वेदना होतात, नाकांतून पुवासह रक्त येतें. हा भयंकर शिरोरोग कृमींपासून होतो.

सूर्यावर्त.

सूर्योदयं या प्रति मन्दमन्दमक्षिभ्रुवौ रुक्समुपैति गाढम्।
विवर्धते चांशुमता सहैव सूर्यापवृत्तौ विनिवर्तते च ॥ ११ ॥
शीतेन शान्तिं लभते कदाचिदुष्णेन जन्तुः सुखमाप्नुयाच्च।
सर्वात्मकं कष्टतमं विकारं सूर्यापवर्तं तमुदाहरन्ति ॥ १२ ॥

सूर्योदयापासून हळू हळू डोकें दुखण्यास आरंभ होऊन सूर्य जसा वर चढेल त्याप्रमाणें डोळे व भिवया ह्या ठिकाणीं अतिशय ठणका लागतो. आणि सूर्य जसजसा खालीं उतरत जाईल, तसतशा वेदना कमी होतात, व सूर्य मावळला असतां वेदना बंद होतात. ह्या वेदना कदाचित् थंड उपचारानें बंद होतात व कदाचित उष्ण उपचारानेंही रोग्याला सुख होतें. ह्या त्रिदोषजन्य व कष्टदायक विकाराला सूर्यापवर्त (सूर्यावर्त) असें म्हणतात.

अनंतवात.

दोषास्तु दुष्टास्त्रय एव मन्यां संपीड्य गाढं सरुजां सुतीव्राम्।
कुर्वन्ति साक्षिभ्रुवि शंखदेशे स्थितिं करोत्याशु विशेषतस्तु ॥१३
गण्डस्य पार्श्वे च करोति कम्पं हनुग्रहं लोचनजान्विकारान्।
अनन्तवातं तमुदाहरन्ति दोषत्रयोत्थं शिरसो विकारम् ॥ १४ ॥

मानेमध्यें प्रकुपित झालेले तिन्हीही दोष मानेला जखडून डोळे, भुवया व दोन्ही आंख ह्या ठिकाणीं तीव्र वेदना उत्पन्न करितात. ह्यांत विशेषतः गालाच्या बाजूस कंप होतो, हनुवटी जखडते आणि डोळ्याचे विकार होतात. ह्या त्रिदोषजन्य मस्तकविकाराला अनंतवात असें म्हणतात.

शंखक.

पित्तरक्तानिला दुष्टाः शंखदेशे विमूर्छिताः।
तीव्ररुग्दाहरोगं हि शोथं कुर्वन्ति दारुणम् ॥ १५ ॥

स शिरो विषवद्वेगान्निरुद्ध्याऽशु गलं तथा ।
त्रिरात्राज्जीवितं हन्ति शंखको नाम नामतः ॥
त्र्यहं जीवति भैषज्यं प्रत्याख्यायास्य कारयेत् ॥ १६ ॥

प्रकुपित झालेले रक्त, पित व वात हे दोष एकत्र होऊन आंखाचे ठिकाणीं तीव्र वेदना, दाह व भयंकर सूज उत्पन्न करितात. ती सूज विषाप्रमाणें अतिशय जलद वाढून मस्तक व गळा ह्यांचा रोध करिते. आणि तीन दिवसांत जीविताचा नाश करिते. ह्या विकाराला शंखक असें म्हणतात. ह्या आजाराचा रोगी तीन दिवस जगतो. तोंपर्यंत ह्याजवर उत्तम प्रकारची चिकित्सा करावी.

अर्धावभेदक.

रूक्षाशनादध्यशनात्प्राग्वातावश्यमैथुनैः ।
वेगसंधारणायासव्यायामैः कुपितोऽनिलः ॥ १७ ॥
केवलः सकफो वाऽर्धं गृहीत्वा शिरसो बली ।
मन्याभ्रूशंखकर्णाक्षिललाटार्धेषु वेदनाम् ॥ १८ ॥
शस्त्राशनिनिभां कुर्यात्तीव्रां सोऽर्धावभेदकः ।
नयनं वाऽथ वा श्रोत्रमतिवृद्धो विनाशयेत् ॥ १९ ॥

रूक्ष अन्न खाणें, आतिभोजन, जेवणावर पुनः जेवणें, पूर्वेकडील वारा घेणें, दहिंवरांत भिजणें, अतिमैथुन करणें, मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें, अतिश्रम करणें किंवा अति व्यायाम करणें, इत्यादि कारणांनीं कुपित झालेला वायु एकटाच किंवा कफासहवर्तमान बलवान होऊन अर्ध्या मस्तकांत शिरून त्या बाजूकडील मानेचा भाग, भुवई, आंख, कान, डोळा व अर्धें कपाळ ह्या ठिकाणीं तलवार वगैरे शस्त्रांच्या आघातासारख्या तीव्र वेदना उत्पन्न करितो. ह्या विकाराला अर्धावभेदक असें म्हणतात. हा फार वाढला असतां त्या त्या बाजूचा कान अथवा डोळा घालवितो.

वातज शिरोरोगांची चिकित्सा.

वातजातशिरोरोगे स्नेहस्वेदनमर्दनम् ।
पानाहारोपनाहांश्च कुर्याद्वातामयापहान् ॥ १ ॥

वातज शिरोरोगावर स्नेहन, स्वेदन व मर्दन हे उपचार करावे. वातनाशक असें अन्नपान करावें, आणि वातनाशक पेंड बांधावे.

कुष्ठमेरण्डमूलं च नागरं तक्रपेषितम् ।
कदुष्णं च शिरःपीडां भाललेपनतो हरेत् ॥ २ ॥

कोष्ठ, एरंडमूळ व सुंठ हे जिन्नस ताकांत वाटून किंचित् ऊन करून त्यांचा कपाळावर लेप करावा, म्हणजे वातजन्य मस्तकपीडा दूर होते.

रसः श्वासकुठारो यस्तस्य नस्यं विशेषतः ।
शिरःशूलं हरत्येव विधेयं नात्र संशयः ॥ ३ ॥

श्वास-चिकित्साप्रकरणांत सांगितलेला श्वासकुठार नांवाचा रस नाकांत ओढण्यास द्यावा, म्हणजे निःसंशय मस्तकशूळ बंद होतो.

देवदारु नतं कुष्ठं नलदं विश्वभेषजम् ।
सकाञ्जिकः स्नेहयुक्तो लेपो वातशिरोर्तिनुत् ॥ ४ ॥

देवदार, तगर, कोष्ठ, जटामांसी व सुंठ हीं औषधें कांजींत वाटून त्यांत तेल घालून त्याचा लेप करावा. तो वातजन्य मस्तकपीडा दूर करतो.

कुष्ठमेरण्डमूलं च लेपः काञ्जिकपेषितः ।
शिरोर्तिं वातजां हन्यात्पुष्पं वा मुचुकुन्दजम् ॥ ५ ॥

कोष्ठ व एरंडमूळ ह्यांचा कांजींतून लेप करावा, अथवा मुचकुंदाच्या फुलांच्या कल्काचा लेप करावा. तो वातजन्य मस्तकशूळाचा नाश करतो.

शिरोबस्तीचा प्रकार.

आशिरोव्यापि तच्चर्म षोडशांगुलमुच्छ्रितम् ।
तेनाऽऽवेष्ट्य शिरोऽधस्तान्माषकल्केन लेपयेत् ॥ १ ॥
निश्चलस्योपविष्टस्य तैलैः कोष्णैः प्रपूरयेत् ।
धारयेदारुजः शान्तेर्यामं यामार्धमेव वा ॥ २ ॥
शिरोबस्तिर्हरत्येष शिरोरोगं मरुद्भवम् ।
हनुमन्याक्षिकर्णार्तिमर्दितं मूर्धकम्पनम् ॥ ३ ॥
विना भोजनमेवैष शिरोबस्तिः प्रयुज्यते ।
पञ्चाहं वाऽपि सप्ताहं षडहं चैवमाचरेत् ॥ ४ ॥
ततोऽपनीतस्नेहस्तु मोचयेद्बस्तिबन्धनम् ।
शिरोललाटवदनग्रीवांसादीन्विमर्दयेत् ।
सुखोष्णेनाम्भसा गात्रं प्रक्षाल्याश्नाति यद्धितम् ॥ ५ ॥

सोळा बोटें रुंदीच्या व मस्तकाभोवतीं गुंडाळण्यास पुरेल अशा

कांबीचें एक कातडें घेऊन तें मस्तकास गुंडाळून त्याची खालची मस्तकाभोंवतीची सर्व बाजू उडदाच्या पिठानें लिंपून घ्यावी. नंतर स्थिर बसून कोमट असें तेल त्यांत भरावें आणि मस्तकपीडा बंद होईपर्यंत प्रहर अर्धाप्रहरपर्यंत तें तेल तसेंच ठेवावें. ह्याला शिरोबस्ती असें म्हणतात. हा वातजन्य मस्तकपीडा बंद करतो, आणि हनुवटी, मान, डोळे व कान ह्यांतील शूळ, अर्दितवायु व शिरःकंप ह्यांचाही नाश करतो. हा शिरोबस्ती जेवणापूर्वी द्यावा. ह्या प्रमाणें पांच दिवस, सहा दिवस किंवा सात दिवस द्यावा. मस्तकपीडा बंद झाल्यावर किंवा प्रहर अर्धा प्रहर झाल्यावर तेल काढून घेऊन चामडें सोडून टाकावें; आणि मस्तक, कपाळ, तोंड, मान, खांदे इत्यादिकांचें मर्दन करावें. नंतर सोसेल अशा ऊन पाण्यानें आंग धुवून पथ्यकारक असें भोजन करावें.

पित्तजन्य शिरोरोगाची चिकित्सा.

पित्तात्मके शिरोरोगे स्निग्धं सम्यग्विरेचयेत् ।

पित्तजन्य शिरोरोगामध्यें प्रथम स्नेहन देऊन रेचक द्यावें.

मृद्वीकात्रिफलेक्षूणां रसैः क्षीरघृतैरपि ॥ १ ॥

मनुका, त्रिफळ्याचें चूर्ण व उसाचा रस ह्यांचें रेचक द्यावें किंवा दूध व तूप यांतून रेचक द्यावें.

शर्कराक्षीरसलिलैः शिरश्च परिषेचयेत् ।
सर्पिषः शतधौतस्य शिरसा धारणं हितम् ॥ २ ॥
निमज्जनं च शिरसः शीतले शस्यतेऽम्भसि ।
कुमुदोत्पलपद्मानां शीतानां चन्दनाम्बुभिः ॥ ३ ॥
स्पर्शाः सुखाश्च पवनाः सेव्या दाहार्तिशान्तये ।

दूध, पाणी व साखर एकत्र करून डोक्यावर शिंपावें. शतधौत घृत डोक्यावर ठेवावें. थंड पाण्यांत डोकें बुडवावें. तें प्रशस्त आहे. चंद्रविकासी लहान कमळें, मोठीं कमळें, सूर्यविकासी कमळें व चंदन टाकून थंडगार केलेलें पाणी किंवा त्यांच्यावरून वाहणारा शीतळ वारा यांचें दाह व मस्तकपीडा शांत होण्याकरितां सेवन करावें.

चन्दनोशीरयष्ट्याह्वबलाव्याघ्रनखोत्पलैः ॥ ४ ॥
क्षीरपिष्टैः प्रदेहः स्याच्छृतैर्वा परिषेचनम् ।

चंदन, वाळा, जेष्टमध, चिकणामूळ, वाघनख व कमळ हीं औषधें दुधांत वाटून त्यांचा मस्तकास लेप करावा, किंवा ह्याच औषधांचा काढा डोक्यावर शिंपावा.

यष्ट्याह्वचन्दनानन्ताक्षीरसिद्धं हितं घृतम् ॥ ५ ॥
नावनं शर्कराद्राक्षामधुकैर्वाऽपि पित्तजे ।

जेष्टमध, रक्तचंदन व धमासा ह्यांचा कल्क व दूध ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें नाकांत घातलें असतां हितकारक आहे. अथवा साखर, द्राक्षें व जेष्टमध ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप पित्तजन्य शिरोरोगावर नाकांत घालावें.

धात्रीकसेरुह्रीवेरपद्मपद्मकचन्दनैः ॥ ६ ॥
दूर्वोशीरनलानां च मूलैः कुर्यात्प्रलेपनम् ।
शिरोर्तिं पित्तजां हन्याद्रक्तपित्तरुजं तथा ॥ ७ ॥

आवळकठी, कचरा (फुरडें), वाळा, कमळ, पद्मकाष्ट, चंदन, दूर्वा, काळा वाळा व देवनळ ह्यांच्या मुळ्यांच्या कल्काचा लेप करावा. तो पित्तजन्य मस्तकपीडा व रक्तपित्तजन्य मस्तकपीडा ह्यांचा नाश करतो.

रसः श्वासकुठारोऽल्पः कर्पूरः कुंकुमं नवम् ।
सिता छागीपयः सर्वं चन्दनेनानुघर्षयेत् ॥ ८ ॥
तस्य नस्यं भिषग्दद्यात्पित्तजायां शिरोरुजि ।
किं तु मस्तकशूलेषु सर्वेष्वेव हितं मतम् ।

किंचित् श्वासकुठारस, कापूर, नवें केशर, खडीसाखर व चंदन हीं सर्व औषधें शेळीच्या दुधांत उगाळून पित्तजन्य शिरोरोगावर त्यांचें नस्य द्यावें. हा प्रयोग सर्व मस्तकशूळावर हितकारक आहे.

गुडनागरकल्कस्य नस्यं मस्तकशूलनुत् ॥ ९ ॥

गूळ व सुंठ ह्यांचा कल्क नाकांत घालावा. तो मस्तकशूळाचा नाश करतो.

कफजन्य मस्तकरोगचिकित्सा.

श्लैष्मिके लंघनं रूक्षं लेपस्वेदादि कारयेत् ।

कफजन्य शिरोरोगावर लंघन करावें, आणि रुक्ष स्वेद आणि लेप करावे.

हरेणुनतशैलेयमुस्तैलागुरुदारुभिः ॥ १ ॥
मांसीरास्नोरुबूकैश्च कोष्णो लेपः कफार्तिनुत् ।

रेणुकबीज, तगर, धोंडफूल, नागरमोथे, कृष्णागर, देवदार, जटामांसी, रास्ना व एरंडमूळ ह्यांचा कोमटसा लेप कफजन्य शिरोरोगाचा नाश करतो.

शुण्ठीकुष्ठप्रपुन्नाटदेवकाष्ठैः समाहिषैः ।
मूत्रपिष्टैः सुखोष्णैश्च लेपः श्लेष्मशिरोर्तिनुत् ॥ २ ॥

सुंठ, कोष्ठ, टाकळा व देवदार हीं औषधें म्हशीच्या मुतांत वाटून त्यांचा सुखोष्ण असा लेप करावा. तो कफजन्य मस्तकशूळाचा नाश करितो.

सन्निपातिक शिरोरोगचिकित्सा.

संनिपातसमुत्थेऽत्र घृतं तैलं च बस्तयः ।
धूमनस्यशिरोरेकलेपस्वेदाद्यमाचरेत् ॥
पुराणसर्पिषः पानं विशेषेण दिशन्ति हि ॥ १ ॥

त्रिदोषजन्य मस्तकशूळावर तूप, तेल, बस्ति, धूम्रपान, नस्य, शिरोविरेचन, लेप व स्वेद इत्यादि उपाय करावे. ह्या त्रिदोषजन्य शिरोविकारांत विशेषतः जुनें तूप प्यावें, असें म्हणतात.

स्मरफलादि प्रधमन.

स्मरफलतिलपर्णीबीजसंयुक्तभूतां
कुशदलघटबीजत्वग्रजोऽर्धांशतुत्थम् ।
प्रधमनविधिना तद्दत्तमात्रं शिरोरुक्-
प्रलपनकफतन्द्रासंनिपातं निहन्यात् ॥ १ ॥

गेळफळ, तिळवणीचें बीं, नाकशिकणीचीं पानें (अथवा भूतकेशीचीं—पिशाचीं पानें), रिठ्याचें बीं व साल हीं औषधें एक एक भाग व मोरचूत अर्धा भाग ह्यांचें चूर्ण करून तें नळींतून नाकांत फुंकावें. म्हणजे तें मस्तकशूळ, बडबड, कफ, तंद्रा व सान्निपात ह्यांचा नाश करितें.

रक्तजन्य शिरोरोगचिकित्सा.

रक्तजे पित्तवत्सर्वं भोजनालेपसेवनम् ।

शीतोष्णयोश्च विन्यासो विशेषाद्रक्तमोक्षणम् ॥ १ ॥

रक्तजन्य शिरोरोगावर खाणें, पिणें, लेप वगैरे सर्व उपचार पित्तजन्य शिरोरोगावरील उपचाराप्रमाणें करावे. अतिशय शीत व अतिशय उष्ण उपचार वर्ज्य करावे आणि विशेषतः रक्तमोक्ष (रक्त काढणें) करावा.

क्षयजन्य शिरोरोगचिकित्सा.

क्षयजे क्षयनाशाय कर्तव्यो बृंहणो विधिः ।
पाने नस्ये च सर्पिः स्याद्वातघ्नैर्मधुरैः शृतम् ॥ १ ॥
योजयेत्सगुडं सर्पिर्घृतपूरांश्च भक्षयेत् ।
नावनं क्षीरसर्पिर्भ्यां पानं च क्षीरसर्पिषोः ।
क्षीरपिष्टैस्तिलैः स्वेदो जीवनीयैश्च शस्यते ॥ २ ॥

क्षयजन्य शिरोरोगामध्यें त्या त्या धातूचा क्षय दूर होण्याकरितां बृंहण (पौष्टिक) उपचार करावे. वातनाशक व मधुर अशा औषधांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें, व नाकांत घालावें. तूप व गूळ ह्यांची योजना (खाण्यांत) करावी. घीवर खावे. तूप व दूध मिसळून नाकांत घालावें व प्यावें. तीळ दुधांत वाटून अगर जीवनीय गणांतील औषधें दुधांत वाटून त्यांच्या पोथंडीनें शेकावें.

कृमिजे तु शिरोरोगे व्योषनक्ताह्वशिग्रुजैः ।
अजामूत्रेण संपिष्टैर्नस्यं कृमिहरं परम् ॥ १ ॥

कृमिजन्य शिरोरोगामध्यें सुंठ, मिरें, पिंपळी, करंजाची साल व शेवग्याची साल हीं औषधें शेळीच्या मुतांत वाटून नाकांत घालावीं (पिळावीं). हें नस्य उत्तम कृमिनाशक आहे.

विडंगादि तेल.

विडङ्गं स्वर्जिका दन्ती हिंगु गोमूत्रसंयुतम् ।
विपक्वं सार्षपं तैलं कृमिघ्नं नस्यतः स्मृतम् ॥ १ ॥

वावडिंग, सज्जीखार, दांतीमूळ व हिंग ह्यांचा कल्क व गोमूत्र ह्यांमध्यें शिरसेल पचन करावें. ह्यांचें नस्य केलें असतां मस्तकांतील कृमींचा नाश होतो.

---

१. हीं औषधें वाग्भट, सूत्रस्थान, अध्याय पंधरामध्यें पहावीं.

सूर्यावर्त व अर्धावभेदक यांची चिकित्सा.

सूर्यावर्ते शिरावेधो नावनं क्षीरसर्पिषोः ।
हितः क्षीरघृताभ्यासस्ताभ्यां सह विरेचनम् ॥ १ ॥

सूर्यावर्तावर शीर तोडावी. तूप व दूध मिसळून नाकांत घालावें. तूप आणि दूध यांचें सेवन करण्याचा परिपाठ ठेवावा व त्यांतूनच रेचकही ध्यावें.

भृङ्गराजरसश्छागक्षीरतुल्योऽर्कतापितः ।
सूर्यावर्तं निहन्त्याशु नस्येनैव प्रयोगराट् ॥ २ ॥

माक्याचा रस व शेळीचें दूध समभाग उन्हांत तापवून त्याचें नस्य करावें, म्हणजे तात्काळ सूर्यावर्ताचा नाश होतो.

शिरीषमूलकफलैरवपीडं प्रयोजयेत् ।
अवपीडो हितो वा स्याद्वचापिप्पलिभिः कृतः ॥ ३ ॥

शिरसाचें मूळ व शेंगा (फळें) वाटून त्यांचा रस नाकांत पिळावा, अथवा वेखंड व पिंपळी नाकांत पिळावी.

जाङ्गलानि च मांसानि कारयेदुपनाहनम् ।
तेनास्य शाम्यते व्याधिः सूर्यावर्तः सुदारुणः ॥ ४ ॥

जांगलमांसाच्या पेंढानें शेकावें, म्हणजे भयंकर सूर्यावर्ताचाही नाश होतो.

एष एव विधिः कार्यः कृत्स्नश्चार्धावभेदके ।
अर्धावभेदके पूर्वं स्नेहः स्वेदो हि भेषजम् ॥ ५ ॥

हेच सर्व उपचार अर्धावभेदकावरही करावे. अर्धावभेदकावर आधीं स्नेहन व स्वेदन करणें हेंच औषध आहे.

विरेकः कायशुद्धिश्च धूपः स्निग्धोष्णभोजनम् ।
विडंगानि तिलान्कृष्णान्समान्पिष्ट्वा विलेपयेत् ॥ ६ ॥
नस्यं चाथाऽऽचरेत्तस्मादर्धभेदं व्यपोहति ।

रेचक देऊन देहशुद्धि करावी, धुरी द्यावी, स्निग्ध व उष्ण असें अन्न खावें. वावडिंगें व काळे तीळ वाटून त्यांचा लेप करावा, व नाकांत औषध घालावें. म्हणजे अर्धावभेदकाचा नाश होतो.

गिरिकर्णीफलं मूलं सजलं नस्यमाचरेत् ॥ ७ ॥
मूलं वा बन्धयेत्कर्णे निहन्त्यर्धशिरोरुजम् ।

गोकर्णीचें मूळ व फळ पाण्यांत वांटून त्याचें नस्य करावें,

अथवा गोकर्णीचें मूळ कानांत बांधावें; म्हणजे अर्धशिशी राहते.

मरीचं भृंगजद्रावैर्मरिचं शालितण्डुलैः ॥ ८ ॥
अर्धशीर्षव्यथां हन्ति लेपो वा शुण्ठिवारिणा ।

मिरें माक्याच्या रसांत वांटून अथवा तांदुळाशीं सुंठीच्या काढ्यांत वाटून लेप करावा. म्हणजे अर्धशिशीची व्यथा दूर होते.

पिबेत्सशर्करं क्षीरं नीरं वा नारिकेलजम् ॥ ९ ॥
सुशीतं वाऽपि पानीयं सर्पिर्वा नस्यतस्तयोः ।

साखर घालून दूध प्यावें अथवा नारळाचें पाणी प्यावें. थंडगार पाणी अथवा तूप प्यावें, किंवा त्या दोहोंचें नस्य करावें.

सारिवाकुष्ठमधुकवचाकृष्णोत्पलैस्तथा ॥ १० ॥
लेपः सकाञ्जिकस्नेहः सूर्यावर्तार्धभेदयोः ।

उपलसरी, कोष्ट, जेष्टमध, वेखंड व निळें कमळ, हीं औषधें कांजींत वाटून त्यांत तेल घालून सूर्यावर्त व अर्धावभेदक ह्यांजवर त्यांचा लेप करावा.

सितोपलायुतं घृष्टं मदनं गोपयोन्वितम् ॥ ११ ॥
नस्यतोऽनुदिते सूर्ये निहन्त्येवार्धभेदकम् ।

गेळफळ व खडीसाखर गाईच्या दुधांत उगाळून सूर्योदयाचे आंत नाकांत घालावें, म्हणजे अर्धावभेदकाची पीडा बंद होते.

पीत्वा शशमुण्डरसं मरिचैरवचूर्णितम् ॥ १२ ॥
भोजनादौ तु सप्ताहात्सूर्यावर्तार्धभेदकौ ।
हन्ति सर्वात्मकौ शीघ्रं दुःखदौ भृशदारुणौ ॥ १३ ॥

गोरखमुंडीचा काढा मिऱ्याची पूड घालून जेवणापूर्वीं प्यावा. ह्याप्रमाणें सात दिवस करावें; म्हणजे त्रिदोषजन्य सूर्यावर्त व अर्धावभेदक हे भयंकर दुःखदायक विकार ह्यांचा त्वरित नाश होतो.

अनंतवात व शंखक ह्यांची चिकित्सा.

अनन्तवाते कर्तव्यः सूर्यावर्तहितो विधिः ।
शिराव्यधश्च कर्तव्योऽनन्तवातप्रशान्तये ॥ १ ॥
आहारश्च प्रदातव्यो वातपित्तविनाशनः ।
मधुमस्तकसंयावघृतपूरैर्विशेषतः ॥ २ ॥

अनंतवातावर सूर्यावर्तावरील उपचार करावे. अनंतवाताची

शांति होण्याकरितां शिरावेध करावा, आणि वातपित्तनाशक आहार करावा. विशेषतः मोहाचीं फळें, करंज्या, व घीवर हे पदार्थ खावे.

दार्वी हरिद्रा मञ्जिष्ठा सनिम्बोशीरपद्मकम्।
एतत्प्रलेपनं कुर्याच्छङ्खकस्य प्रशान्तये ॥ ३ ॥

दारुहळद, मंजिष्ट, कडूनिंब, वाळा व पद्मकाष्ट ह्या औषधांचा लेप शंखक रोगाची शांति होण्याकरितां करावा.

शीततोयनिषेकश्च शीतलक्षीरसेवनम् ।
कल्कैश्च क्षीरवृक्षाणां शंखके लेपनं हितम् ॥ ४ ॥

थंड पाणी शिंपडणें, थंड दूध पिणें, आणि क्षीरवृक्षांच्या (वड वगैरेच्या) सालींच्या कल्काचा लेप करणें, हे उपचार शंखकावर हितकारक आहेत.

बला नीलोत्पलं दूर्वा तिलाः कृष्णा पुनर्नवा ।
शंखकेऽनन्तवाते च लेपः सर्वशिरोर्तिनुत् ॥ ५ ॥

चिकणामूळ, निळें कमळ, दूर्वा, काळे तीळ व वसूची मुळी, ह्यांचा लेप शंखक व अनंतवात ह्यांजवर करावा. तो मस्तकाच्या सर्व पीडा बंद करतो.

एरंडमूलादि तेल.

एरण्डमूलं तगरं शताह्वा जीवन्ति रास्ना सह सैन्धवेन ।
भृङ्गं विडङ्गं मधुयष्टिका च विश्वौषधं कृष्णतिलस्य तैलम् ॥ १
अजापयस्तैलविमिश्रितं तु चतुर्गुणे भृङ्गरसे विपक्वम् ।
षड्बिन्दवो नासिकयोः प्रदेयाः सर्वान्निहन्युः शिरसो विकारान्
च्युतांश्च केशांश्चलितांश्च दन्तान्निबद्धमूलान्सुदृढीकरोति ।
सुपर्णदृष्टिप्रतिमं च चक्षुः कुर्वन्ति बाह्वोरधिकं बलं च ॥ ३ ॥

एरंडमूळ, तगर, बडीशेप, हरणदोडी, रास्ना, सेंधेलोण, माका, वावडिंग, जेष्टमध, सुंठ ह्यांचा कल्क, काळ्या तिळाचें तेल व शेळीचें दूध ह्यांत तेलाच्या चौपट माक्याचा रस घालून तेल पचन करावें. आणि ह्याचे सहा थेंब नाकांत घालावे. म्हणजे हें तेल सर्व मस्तकविकारांचा नाश करितें. गळणारे केस, ज्यांचीं मुळें सैल झालीं आहेत असे हालणारे दांत ह्यांना बळकट करितें. दृष्टि गरुडाप्रमाणें तीक्ष्ण करितें. व बाहूंचें बळ वाढवितें.

सशर्करं कुंकुममाज्यभृष्टं नस्यं विधेयं पवनासृगुत्थे ।
भ्रूशंखकर्णाक्षिशिरोर्धशूले दिनाभिवृद्धिप्रभवे च रोगे ॥ ४ ॥
पथ्याक्षधात्रीरजनीगुडूचीभूनिम्बनिम्बैः सगुडः कषायः ।
भ्रूशंखकर्णाक्षिशिरोर्धशूलं निहन्ति नासानिहितः क्षणेन ॥ ५ ॥
किं तु मस्तकशूलेषु सर्वेष्वेतद्धितं मतम् ।

साखर व केशर तुपांत खलून वातामुळें नाकांतून (मस्तकांतून) येणाऱ्या रक्तावर नाकांत घालावें. तें त्याचा आणि भुवई, आंख, कान, डोळे व अर्धे मस्तक ह्यांतील शूळाचाही क्षणांत नाश करितें. फार काय, पण सर्व प्रकारच्या मस्तकशूळांवर हें हितकारक आहे असें म्हणतात.

गुडनागरकल्कस्य नस्यं मस्तकशूलनुत् ॥ ६ ॥
नागरकल्कविमिश्रं क्षीरं नस्येन योजितं नृणाम् ।
नानादोषोद्भूतां शिरोरुजं हन्ति तीव्रतराम् ॥ ७ ॥

गूळ व सुंठ ह्यांचा कल्क मस्तकशूळाचा नाश करतो. सुंठीचा कल्क घातलेलें दूध नाकांत घालावें, म्हणजे अनेक दोषांमुळें उत्पन्न झालेली तीव्र मस्तकपीडा तें दूर करितें.

शताह्वैरण्डमूलोग्राचक्रव्याघ्रीफलैः शृतम् ।
तैलं नस्यान्मरुच्छ्लेष्मातिमिरोर्ध्वगदापहम् ॥ ८ ॥

बडिशेप, एरंडमूळ, वेखंड, तगर, रिंगणीचीं फळें ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तेल नाकांत घालावें. तें वातकफजन्य तिमिर (रातांधळ) व मानेवरील सर्व रोग ह्यांचा नाश करितें.

मयूरादि घृत.

मयूरं पक्षपादान्त्रशकृत्पित्तास्यवर्जितम् ।
जले पक्त्वा घृतप्रस्थं तस्मिन्क्षीरसमं पचेत् ॥ १ ॥
दशमूलबलारास्नामधुकैस्त्रिफलैः सह ।
मधुरैः कार्षिकैः कल्कैः शिरोरोगार्दितापहम् ॥ २ ॥
कर्णनासास्यजिह्वाक्षिगलरोगविनाशनम् ।
मयूराद्यमिति ख्यातमूर्ध्वजत्रुगदापहम् ॥ ३ ॥

मोर मारून त्याचीं पंखें, पाय, आंतडीं व मळ, पित्त व तोंड हे भाग काढून टाकून बाकीचा सर्व भाग पाण्यांत घालून शिजवावा. आणि त्यांत चौसष्ट तोळे तूप व तुपासमान दूध घालून

दशमुळें, चिकणामूळ, रास्ना, जेष्टमध, त्रिफळा व मधुर गणांतील औषधें ह्यांचा कल्क एक एक तोळा घालून तूप पचन करावें. हें मायूर घृत शिरोरोगाचा नाश करितें. त्याचप्रमाणें कान, नाक, तोंड, जीभ, डोळे व गळा ह्यांच्याही रोगांचा नाश करितें. हें मयूरादि घृत मानेच्यावरच्या रोगांचा नाश करितें.

नस्येन कलिकाचूर्णं नवसागरजं रजः ।
वातश्लेष्मभवां पीडां शिरसो हन्ति सर्वदा ॥ ४ ॥

कळीचा चुना व नवसागर ह्यांचें चूर्ण नाकांत ओढलें असतां सर्व वातकफजन्य मस्तकपीडेचा नाश करितें.

करञ्जशिग्रुबीजानि पत्रकं सर्षपत्वचा ।
सर्वेषां शीर्षरोगाणामेतच्छीर्षविरेचनम् ॥ ५ ॥

करंज व शेवगा ह्यांचें बीं, तमालपत्र, शिरसाची साल ह्यांचें चूर्ण करावें, आणि नाकांत ओढावें. सर्व मस्तकरोगावर हें शिरोविरेचन उपयुक्त आहे.

त्रिकटुकपुष्कररजनीरास्नासुरदारुसोग्रगन्धानाम् ।
क्राथः शिरोर्तिजालं नासापीतो निवारयति ॥ ६ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, पोखरमूळ, हळद, रास्ना, देवदार व वेखंड ह्यांचा काढा नाकांतून प्राशन करावा. तो मस्तकासंबंधीं रोगसमूहाचा नाश करतो.

पथ्यापथ्य.

आमिषं जाङ्गलं पथ्यं तत्र शाल्यादयोऽपि च ।
मुद्गान्माषान्कुलित्थांश्च खादेद्वा निशि केवलान् ॥
कटुकोष्णान्ससर्पिष्कानुष्णं क्षीरं पिबेत्तथा ॥ १ ॥

जांगलमांस, साळी, मूग, उडीद, हुलगे वगैरे धान्यें रात्रीं खावीं. तिखट व उष्ण असें अन्न तुपाशीं खावें व वर ऊन दूध प्यावें.

संहितेंतील पथ्यापथ्य.

स्वेदो नस्यं धूमपानं विरेको लेपः सेको लङ्घनं शीर्षबस्तिः ।
रक्तोन्मुक्तिर्वह्निकर्मोपनाहो जीर्णं सर्पिः शालयः षष्टिकाश्च ॥१
यूषो दुग्धं धन्वमांसं पटोलं शिग्रुर्द्राक्षा वास्तुकं कारवेल्लम् ।
आम्रं धात्री दाडिमं मातुलुङ्गं तैलं तक्रं काञ्जिकं नारिकेलम् २
पथ्या कुष्ठं भृङ्गराजः कुमारी मुस्तोशीरं चन्द्रिका गन्धसारः ।

कर्पूरं च ख्यातिमानेष वर्गः सेव्यो मर्त्यैः शीर्षरोगे यथास्वम् ३
स्वेद, नस्य, धूम्रपान, रेचक, लेप, शिंपडणें, लंघन, शिरोबस्ती, रक्त काढणें, डाग देणें, पेंढ बांधणें, जुनें तूप, जुन्या साळी, साठे तांदूळ, धान्यांचीं कढणें, दूध, जांगल मांस, पडवळ, शेवगा, द्राक्षें, चंदनबटवा, कारलीं, आंबा, आवळे, डाळिंब, महाळुंग, तेल, ताक, नारळ, हिरडे, कोष्ट, माका, कोरफड, नागरमोथे, चांदणें, चंदन व कापूर हें शिरोरोगावर दोषानुरूप पथ्य करावें.

अपथ्य.

क्षवजम्भामूत्रबाष्पनिद्राविड्वेगभञ्जनम् ।
दुग्धं नीरं विरुद्धान्नं विरुद्धजलमज्जनम् ॥
दन्तकाष्ठं दिवानिद्रां शिरोरोगी परित्यजेत् ॥ १ ॥

शिंक, जांभई, लघवी, डोळ्यांतील पाणी, झोप व शौच ह्यांचे वेग आवरून धरणें, दूध, पाणी, विरुद्ध अन्न, घाणेरड्या पाण्यांत बुडी मारणें, काडीनें दांत घासणें व दिवसां झोप घेणें हें शिरोरोगी मनुष्यानें वर्ज करावें.

नेत्राचें प्रमाण.

विद्याद् द्व्यंगुलबाहुल्यं स्वांगुष्ठोदरसंमितम् ।
द्व्यंगुलं सर्वतः सार्धं भिषङ्नयनमण्डलम् ॥ १ ॥

डोळ्याचा विस्तार दोन अंगुळांहून थोडा अधिक असून आंतून आंगठ्याच्या बोटाएवढा आहे आणि सर्व बाजूनें अडीच अंगुळें प्रमाणाचें डोळ्याचें बुबुळ (नेत्रमंडळ) आहे.

डोळ्याचीं अंगें.

पक्ष्मवर्त्मश्वेतकृष्णदृष्टीनां मण्डलानि तु ।
अनुपूर्वं तु ते मध्याश्चत्वारोऽन्त्या यथोत्तरम् ॥ २ ॥

पापणीचे केस, पापणी, पांढरें बुब्बुळ, काळें बुब्बुळ, आणि मध्यें एका मागें एक अशीं चार पटलें (पडदे) आहेत.

डोळ्यांचे अठ्याहत्तर रोग.

द्वादश व्याधयो दृष्ट्यां तत्रैवान्यौ गदावुभौ ।
कृष्णभागे तु चत्वारो दशैकः शुक्लभागजाः ॥ ३ ॥
वर्त्मन्येको विंशतिश्च पक्ष्मजौ द्वौ प्रकीर्तितौ ।

नव संधिषु सर्वस्मिन्नेत्रे सप्तदशोदिताः ॥ ४ ॥
एवं नेत्रे समस्ताः स्युरष्टसप्ततिरामयाः ।

दृष्टीचे रोग बारा आणि त्याच ठिकाणचे दुसरे दोन मिळून एकंदर दृष्टीचे चौदा रोग, काळ्या बुब्बुळाचे चार, पांढऱ्या बुब्बुळाचे अकरा, पापण्यांचे एकवीस, पापणीच्या केसाचे दोन, संधिगत रोग नऊ, आणि सर्व डोळ्याचे रोग सतरा मिळून डोळ्याचे एकंदर रोग अठ्याहत्तर आहेत.

सुश्रुतोक्त शहात्तर रोग.

वाताद्दश तथा पित्तात्कफाच्चैव त्रयोदश ॥ ५ ॥
रक्तात्षोडश विज्ञेयाः सर्वजाः पञ्चविंशतिः ।
बाह्यौ पुनर्द्वौ नयने रोगाः षट्सप्ततिः स्मृताः ॥ ६ ॥

वातजन्य नेत्ररोग दहा, पित्तजन्य दहा, कफजन्य तेरा, रक्तजन्य सोळा, त्रिदोषजन्य पंचवीस आणि नेत्रबाह्य रोग दोन मिळून एकंदर डोळ्याचे रोग शहात्तर सांगितले आहेत.

नेत्ररोगांचीं कारणें.

उष्णाभितप्तस्य जलप्रवेशाद्दूरेक्षणात्स्वप्नविपर्ययाच्च ।
स्वेदाद्रजोधूमनिषेवणाच्च च्छर्देर्विघाताद्वमनातियोगात् ॥ ७ ॥
द्रवान्नपानातिनिषेवणाच्च विण्मूत्रवातक्रमनिग्रहाच्च ।
प्रसक्तसंरोदनशोकतापाच्छिरोभिघातादतिमद्यपानात् ॥ ८ ॥
तथा ऋतूनां च विपर्ययेण क्लेशाभितापादतिमैथुनाच्च ।
बाष्पग्रहात्सूक्ष्मनिरीक्षणाच्च नेत्रे विकाराञ्जनयन्ति दोषाः ॥ ९ ॥

उन्हांतून तापून येऊन थंड पाण्यांत शिरणें, दूर दृष्टि करून पहाणें, जागरण करणें, डोळ्याला वाफ लागणें, डोळ्यांत धूळ अथवा धूर जाणें, वांतीचा वेग आवरून धरणें, किंवा अतिशय वांति होणें, पातळ अन्नपानाचें अतिशय सेवन करणें, मळ, मूत्र व वायु ह्यांच्या क्रमाचा वेग आवरून धरणें, अतिशय रडणें, शोक करणें किंवा संताप करणें, मस्तकावर आघात होणें, अतिशय मद्यपान करणें, त्याचप्रमाणें ऋतुसंबंधीं हवेंत बदल होणें, क्लेश, संताप व अति मैथुन करणें, डोळ्यांतील आंसवांचा अवरोध करणें आणि सूक्ष्म पदार्थ निरखून पहाणें ह्या कारणांमुळें वातादि

दोष डोळ्याचे रोग उत्पन्न करितात.

डोळ्याच्या रोगांची संप्राप्ति.

शिरानुसारिभिर्दोषैर्विगुणैरूर्ध्वमाश्रितैः ।
जायन्ते नेत्रभागेषु रोगाः परमदारुणाः ॥
नेत्रभागेषु नेत्रस्य दृष्ट्याद्यवयवेषु च ॥ १० ॥

शिरांमधून संचार करणारे दोष विगुण होऊन वर चढून मानेच्या वरील स्थानाचा आश्रय करितात. त्यामुळें डोळ्याचे ठिकाणीं नाना प्रकारचे रोग उत्पन्न होतात. ते डोळ्याच्या निरनिराळ्या भागांमध्यें व अवयवांमध्यें होतात.

दृष्टीचें लक्षण.

मसूरदलमात्रां तु पञ्चभूतप्रसादजाम् ।
खद्योतविस्फुलिङ्गाभां सिद्धां तेजोभिरव्ययैः ॥ ११ ॥
आवृतां पटलेनाक्ष्णोर्बाह्येन विवराकृतिम् ।
शीतसात्म्यां नृणां दृष्टिमाहुर्नयनचिन्तकाः ॥ १२ ॥

पंचभूतापासून झालेली मसुराच्या डाळीच्या आकाराची, काजवा किंवा विस्तवाची फुणगी ह्यांसारखी निरंतर प्रकाशित असणारी, डोळ्याच्या पटलानें वेष्टित, बाहेरून विवराप्रमाणें दिसणारी, व थंड उपचार मानवतात अशी नेत्रांत जी एक शक्ति आहे, तिला नेत्रवैद्य दृष्टि असें म्हणतात.

डोळ्यामधील चार पडदे.

तेजोजलाश्रितं बाह्यं तेष्वन्यत्पिशिताश्रितम् ।
मेदस्तृतीयं पटलमाश्रितं त्वस्थि चापरम् ।
पञ्चमांशसमं दृष्टेस्तेषां बाहुल्यमिष्यते ॥ १३ ॥

डोळ्याचें बाह्य पटल तेज व जल ह्यांच्या आश्रयानें असतें. त्याच्या आंतील दुसरें पटल मांसाच्या आश्रयानें असतें. तिसरें पटल मेदाच्या आश्रयानें असतें व चवथें पटल अस्थीच्या आश्रयानें असतें. ह्यांची जाडी दृष्टीच्या पंचमांश असते.

प्रथम पटलामधील दोषाचा स्वभाव.

प्रथमे पटले दोषो यस्य दृष्ट्यां व्यवस्थितः ।
अव्यक्तानि च रूपाणि कदाचिदथ पश्यति ॥ १४ ॥
दृष्टेरभ्यन्तरे दोषाः पटले समधिष्ठिताः ।

एकैकमनुपद्यन्ते पर्यायात्पटलान्तरम् ॥१५॥

ज्याच्या दृष्टीच्या पहिल्या पटलामध्यें दोष आहेत, त्याला पदार्थ अस्पष्ट दिसतात. दृष्टीच्या अभ्यंतरीं असलेले दोष पटलाचा आश्रय करून राहिले असतां ते क्रमानें बाकीच्या एक एक पटलाला दूषित करितात, असें विदेहाचें वचन आहे.

दुसऱ्या पटलांत गेलेल्या दोषांचा स्वभाव.

दृष्टिर्भृशं विह्वलति द्वितीयं पटलं गते ।
मक्षिकामशकान्केशान्जालकानीव पश्यति ॥ १६ ॥
मण्डलानि पताकाश्च मरीचीन्कुण्डलानि च ।
परिप्लवांश्च विविधान्वर्षमभ्रतमांसि च ।
दूरस्थानि च रूपाणि मन्यते स समीपतः ।
समीपस्थानि दूरे च दृष्टेर्गोचरविभ्रमात् ॥ १८ ॥
यत्नवानपि चात्यर्थं सूचीपाशं न पश्यति ।

दोष दुसऱ्या पटलांत गेले असतां दृष्टि अतिशय मंद होते. डोळ्यापुढें माशा, डास, केंस किंवा जाळें असल्यासारखें दिसतें. मंडळें, पताका, नानाप्रकारचीं किरणें, कुंडलें, नानाप्रकारचे पाण्यांत पोहणारे प्राणी, वर्षाव करणारे ढग व काळोख हीं नसून दिसतात. दूर असलेले पदार्थ त्याला जवळ आहेत असे दिसतात. दृष्टीच्या अटोक्याच्या भ्रांतीमुळें जवळ असलेले पदार्थ त्याला दूर आहेत असें वाटतात. आणि कितीही प्रयत्न केला तरी त्याला सुईचें छिद्र दिसत नाहीं.

तृतीय पटलांतील दोष.

ऊर्ध्वं पश्यति नाधस्तात्तृतीयं पटलं गते ॥ १९ ॥
महान्त्यपि च रूपाणि छादितानीव चाम्बरैः ।
कर्णनासाक्षिरूपाणि विकृतानीव पश्यति ॥ २० ॥

दोष तिसऱ्या पटलामध्यें गेले असतां वरच्या भागांतील पदार्थ दिसतात, खालचे दिसत नाहींत. मोठे पदार्थ असले तरी ते वस्त्रानें आच्छादिल्याप्रमाणें दिसतात. मनुष्यादिकांचीं शरीरें कान, नाक, डोळे ह्यांविरहित आहेत अशीं दिसतात.

दृष्टीचे रंग.

यथादोषं च रज्येत दृष्टिर्दोषे बलीयसि ।

दोष बलवान झाले असतां त्या दोषानुरूप तांबडी, पांढरी, पिवळी वगैरे रंगाची दृष्टि होते, म्हणजे त्या त्या रंगाचे सर्व पदार्थ आहेत असे दिसतात.

अधःस्थे तु समीपस्थं दूरस्थं चोपरिस्थिते ॥ २१ ॥
पार्श्वस्थिते पुनर्दोषे पार्श्वस्थानि न पश्यति ।
समन्ततः स्थिते दोषे संकुलानीव पश्यति ॥ २२ ॥
दृष्टिमध्यस्थिते दोषे महद् ह्रस्वं प्रपश्यति ।
दोषे दृष्टिस्थिते तिर्यगेकं वै मन्यते द्विधा ॥ २३ ॥
द्विधा स्थिते त्रिधा पश्येद्बहुधा वाऽनवस्थिते ।

दृष्टिगत दोष अधोभागीं असले तर जवळचें दिसत नाहीं. वर असले तर दूरचें दिसत नाहीं. दोष बाजूला असले तर बाजूचें दिसत नाहीं. दोष सर्व दृष्टीचया मंडळांत पसरले असले तर पदार्थ किंवा आकृति एकमेकांत मिसळल्याप्रमाणें दिसतात. दोष दृष्टीच्या मध्यभागीं असले तर मोठा पदार्थ लहान दिसतो. दोष दोन ठिकाणीं असल्यास तीन पदार्थ दिसतात आणि अनेक ठिकाणीं असल्यास एकाचीं अनेक रूपें दिसतात.

चवथ्या पटलांतील दोष.

तिमिराख्यः स वै दोषश्चतुर्थं पटलं गतः ॥ २४ ॥
रुणद्धि सर्वतो दृष्टिं लिङ्गनाश इति क्वचित् ।
अस्मिन्नपि तमोभूते नातिरूढे महागदे ॥ २५ ॥
चन्द्रादित्यौ सनक्षत्रावन्तरिक्षे च विद्युतः ।
निर्मलानि च तेजांसि भ्राजिष्णूनि च पश्यति ॥ २६ ॥
स एव लिङ्गनाशस्तु नीलिकाकाचसंज्ञितः ॥

दोष चवथ्या पटलांत गेला असतां त्याला तिमिर म्हणतात. त्या तिमिर दोषानें सर्व दृष्टि कोंडली असतां त्याला कित्येक लिंगनाश असें म्हणतात. हा अंधकारमय तिमिर नांवाचा मोठा रोग जोंपर्यंत फार वाढला नाहीं, तोंपर्यंत चंद्र, सूर्य, नक्षत्रें, आकाश, वीज, निर्मळ व तेजस्वी पदार्थ व प्रखर तेज हीं दिसतात. ह्याच लिंगनाशाला नीलिका (मोतिबिंदु) किंवा काचबिंदु असें म्हणतात.

दृष्टिरोगांचीं नांवें व संख्या.

दृष्ट्याश्रयाः षट्च षडेव रोगाः षड्लिङ्गनाशा हि भवन्ति तत्र ।

वातेन पित्तेन कफेन सर्वैं रक्तात्परिम्लाय्यभिधश्च षष्ठः ॥ २७ ॥
तथा नरः पित्तविदग्धदृष्टिः कफेन चान्यस्त्वथ धूमदर्शी ।
यो ह्रस्वजात्यो नकुलान्धसंज्ञो गम्भीरसंज्ञा च तथैव दृष्टिः २८॥

दृष्टिगत रोग बारा आहेत. त्यांत लिंगनाश सहा (सहा प्रकारचे) आहेत. वातज दृष्टिरोग, पित्तज, कफज, त्रिदोषज, रक्तज व परिम्लायी असे हे दुसरे सहा दृष्टिरोग मिळून बारा दृष्टिरोग आहेत. त्याचप्रमाणें पित्तविदग्ध दृष्टि, कफदोषानें धूमदर्शी, ऱ्हस्वजाति, नकुलांध्य व गंभीर दृष्टि हेही दृष्टिरोगाचे प्रकार आहेत.

दुसरे दोन रोग.

तत्रैवान्यौ गदौ द्वौ च संनिपातनिमित्तकौ ॥

त्यांत आणखी दोन रोग सन्निपातजन्य आहेत.

वातजन्य लिंगनाशाचें लक्षण.

वातेन खलु रूपाणि भ्रमन्तीव स पश्यति ॥ २९ ॥
आविलान्यरुणाभानि व्याविद्धानीव मानवः ॥

वातदोषानें गढूळ, तांबूस, वाकडीं तिकडीं व फिरणारीं अशीं रूपें दिसतात.

पित्तजन्य लिंगनाश.

पित्तेनाऽऽदित्यखद्योतशक्रचापतडिद्गुणान् ॥ ३० ॥
नृत्यतश्चैव शिखिनः सर्वं नीलं च पश्यति ॥

पित्तदोषानें सूर्य, काजवे, इंद्रधनुष्य किंवा वीज आपल्यापुढें चमकत आहे किंवा मोर नाचत आहे, असें दिसतें. त्याचप्रमाणें त्याला सर्वत्र निळें दिसतें.

कफजन्य लिंगनाश.

कफेन पश्येद्रूपाणि स्निग्धानि च सितानि च ॥ ३१ ॥
सलिलप्लावितानीव परिजाड्यानि मानवः ॥

कफदोषामुळें सर्व पदार्थ पांढरे व तुळतुळीत दिसतात. त्याचप्रमाणें ते पाण्यांत बुडल्याप्रमाणें बोजड दिसतात.

सन्निपातजन्य लिंगनाश.

संनिपातेन चित्राणि विप्लुतानि च पश्यति ॥ ३२ ॥
बहुधाऽपि द्विधा वाऽपि सर्वाण्येव समन्ततः ।
हीनाधिकाङ्गान्यथ वा ज्योतींष्यपि च भूयसा ॥ ३३ ॥

त्रिदोषानें पदार्थ चित्रविचित्र रंगाचे व गोंधळल्यासारखे दिस- तात. तसेंच ते एकाचे दोन, दोहोंपेक्षां अधिक अथवा सर्वत्र तेच असलेले असे दिसतात. पदार्थांचे कांहीं अवयव असून नसल्या- सारखे दिसतात व अनेक प्रकारच्या ज्योति दिसतात.

रक्तजन्य लिंगनाश.

पश्येद्रक्तेन रक्तानि तमांसि विविधानि च ।
हरितान्यथ कृष्णानि पीतान्यपि च मानवः ॥ ३४ ॥

रक्तदोषामुळें तांबूस व अंधकारमय दिसतें. त्याचप्रमाणें पदार्थ हिरवे, काळे, पिवळे असे दिसतात.

परिम्लायी.

रक्तेन मूर्छितं पित्तं परिम्लायिनमाचरेत् ।
तेन पीता दिशः पश्येदुद्यन्तमिव भास्करम् ॥ ३५ ॥
विकीर्णमाणान्खद्योतैर्वृक्षास्तेजांसि चैव हि ।

रक्तानें मिश्र झालेलें पित्त परिम्लायी नांवाचें तिमिर उत्पन्न करितें. त्यामुळें दिशा पिवळ्या दिसतात. सूर्य जवळ असल्या- सारखा दिसतो. आणि झाडें काजव्यांनीं किंवा तेजांनीं भरलेलीं दिसतात.

सहा प्रकारचे लिंगनाश.

वातादिजनितैर्नेत्रवर्णैरपि च षड्विधः ॥ ३६ ॥
लिंगनाशो निगदितो वर्णो वातादिजो यथा ।
रागोऽरुणो मारुतजः प्रदिष्टो म्लायी च नीलश्च तथैव पित्तात् ।
कफात्सितः शोणितजः सरक्तः समस्तदोषप्रभवो विचित्रः ॥३७॥

वातादि दोषांमुळें डोळ्याचे जे रंग होतात त्यांवरून सहा प्रका- रचे लिंगनाश होतात. ह्यामध्यें वातादि दोषानुरूप डोळ्याचे रंग होतात. वातानें दृष्टि तांबडी होते. पित्तानें पिवळट किंवा नील रंग, कफदोषानें पांढरी, रक्तदोषानें तांबडी आणि तिन्हीही दोषांमुळें चित्रविचित्र रंगाची होते.

दृष्टीचे विशेष रंग.

अरुणं मण्डलं वाताच्चञ्चलं परुषं तथा ।
पित्तान्मण्डलमानीलं कांस्याभं पीतमेव च ॥ ३८ ॥
श्लेष्मणा बहलं स्निग्धं शंखकुन्देन्दुपाण्डुरम् ।

चलत्पद्मपलाशस्थः शुक्लो बिन्दुरिवाम्भसः ॥ ३९ ॥
संकुचत्यातपेऽत्यर्थं छायायां विस्तृतो भवेत् ।
मृद्यमाने तु नयने मण्डलं तद्विसर्पति ॥ ४० ॥
मण्डलं तु भवेच्चित्रं लिंगनाशे त्रिदोषजे ।
प्रवालपद्मपत्राभं मण्डलं शोणितात्मकम् ॥ ४१ ॥
रक्तजं मण्डलं दृष्टौ स्थूलं काचारुणप्रभम् ।
परिम्लायिनि रोगे स्यान्म्लानं नीलं च मण्डलम् ॥४२॥
दोषक्षयात्स्वयं तत्र कदाचित्स्यात्तु दर्शनम् ।

वातदोषानें तांबूस, चंचल व कठीण असें दृष्टिमंडळ होतें. पित्तामुळें किंचित निळें व पिवळें होतें. त्यांत रक्ताचा संबंध अस-ल्यास काशाच्या रंगाचें व पिवळें होतें. कफदोषानें मोठें, स्निग्ध, व शंख, कुंद किंवा चंद्र ह्यांसारखें पांढरें होतें. तें दृष्टिमंडळ कम-ळाच्या पानावरील शुभ्र दिसणाऱ्या थेंबाप्रमाणें इकडे तिकडे सर-कतें. उन्हांत गेलें असतां संकुचित होतें. आणि सावलीमध्यें विस्तृत होतें. डोळा चोळला असतां तें इकडे तिकडे सरकतें. त्रिदोषजन्य लिंगनाशामध्यें दृष्टिमंडळ चित्रविचित्र, रक्तदोषामुळें पोवळ्याच्या मण्यासारखें किंवा कमळाच्या पाकळीसारखें तांबडें, मोठें व तांब-ड्या कांचेसारखें दिसतें. परिम्लायी रोगामध्यें दृष्टिमंडळ म्लान व निळें दिसतें. कदाचित दोषाचा आपोआप नाश झाला असतां पुनः दिसूं लागतें.

अनुक्त लक्षणें.

यथास्वं दोषलिंगानि सर्वेष्वेव भवन्ति हि ॥ ४३ ॥

ह्या सर्व तिमिररोगांमध्यें दोषानुरूप तीं तीं लक्षणें होतात.

पित्तविदग्ध दृष्टीचें लक्षण.

पित्तेन दुष्टेन गतेन वृद्धिं पीता भवेद्यस्य नरस्य दृष्टिः ।
पीतानि रूपाणि च तेन पश्येत्स वै नरः पित्तविदग्धदृष्टिः ४४

ज्याचें पित्त दूषित होऊन वाढतें त्याची दृष्टि पिवळी होते. त्या-मुळें त्याला पिवळें दिसतें. त्याला पित्तविदग्धदृष्टि असें म्हणतात.

दिवांधत्वलक्षण.

प्राप्ते तृतीयं पटलं तु दोषे दिवा न पश्येन्निशि वीक्षते सः ।
रात्रौ स शीतानुगृहीतदृष्टिः पित्तालपभावात्सकलानि पश्येत् ४५

तो पित्तदोष तिसऱ्या पटलामध्यें गेला असतां त्याला दिवसा दिसत नाहीं, रात्रीं दिसतें. कारण रात्रीच्या गारव्यामुळें पित्तदोष कमी होतो, त्यामुळें त्याला रात्रीं सर्व दिसतें.

कफविदग्ध दृष्टीचें लक्षण.

तथा नरः श्लेष्मविदग्धदृष्टिस्तान्येव शुक्लानि हि मन्यते तु ।

त्याचप्रमाणें कफदोषानें दृष्टि बिघडली असतां त्याला सर्व पदार्थ पांढरे दिसूं लागतात.

रातांधळें.

त्रिषु स्थितो यः पटलेषु दोषो नक्तान्ध्यमापादयति प्रसह्य ४६
दिवा च सूर्यानुगृहीतदृष्टिः पश्येत्तु रूपाणि कफाल्पभावात् ।

जो कफदोष तिन्हीही पटलें व्यापतो, तो मनुष्याला रात्रीचे समयीं अंधत्व आणतो. त्यामुळें त्याला रात्रीं दिसत नाहीं आणि दिवसा सूर्याच्या उष्णतेमुळें कफदोष कमी होत असल्यामुळें त्याला दिसूं लागतें.

धूमदर्शी लक्षण.

शोकज्वरायासशिरोभितापैरभ्याहता यस्य नरस्य दृष्टिः ४७
धूम्रांस्तु यः पश्यति सर्वभावान्स धूमदर्शीति नरः प्रदिष्टः ।

शोक, ज्वर, आयास व मस्तकपीडा ह्यांच्या संयोगानें ज्या मनुष्याची दृष्टि बिघडते, त्याला सर्व पदार्थ धुरकट दिसूं लागतात. त्याला धूमदर्शी असें म्हणतात.

ऱ्हस्वजाति.

यो वासरे पश्यति कष्टतोऽथ रूपं महच्चापि निरीक्षतेऽल्पम् ॥
रात्रौ पुनर्यः प्रकृतानि पश्येत्स ह्रस्वजात्यो मुनिभिः प्रदिष्टः ।

जो मनुष्य दिवसा सर्व मोठे पदार्थ लहान आहेत असें पहातो, व रात्रीं ते त्याला लहान मोठे न दिसतां जसेच्या तसे दिसतात. त्याला ऱ्हस्वदृष्टि असें म्हणतात.

दृष्टिमध्यस्थिते दोषे महद् ह्रस्वं हि पश्यति ।
रात्रौ पित्ताल्पभावाच्च तानि रूपाणि पश्यति ॥

दृष्टीमध्यें दोष असतां मनुष्याला मोठे पदार्थ लहान दिसतात. आणि रात्रीं पित्त कमी झाल्यामुळें ते दिसावे तेस दिसतात.

नकुलांध्य.

विद्योतते यस्य नरस्य दृष्टिर्दोषाभिपन्ना नकुलस्य यद्वत् ॥ ४९ ॥
चित्राणि रूपाणि दिवा स पश्येत्स वै विकारो नकुलांध्यसंज्ञः ।

ज्या मनुष्याची दृष्टि दोषयुक्त झाल्यामुळें मुंगसाच्या डोळ्याप्रमाणें चमकते, त्या मनुष्याला दिवसा नाना प्रकारचीं चित्रविचित्र रूपें दिसतात. त्याला नकुलांध्य असें म्हणतात.

गंभीरदृष्टिलक्षण.

दृष्टिर्विरूपा श्वसनोपसृष्टा संकोचमभ्यन्तरतस्तु याति ॥ ५० ॥
रुजावगाढा च तमक्षिरोगं गम्भीरिकेति प्रवदन्ति वृद्धाः ।

जी दृष्टि वायूनें विकृत होऊन संकोच पावून आंत ओढिली जाते व जींत ठणका असतो. त्या दृष्टीला गंभीरदृष्टि म्हणतात.

लिंगनाश.

बाह्यौ पुनर्द्वाविह संप्रतिष्ठौ निमित्ततश्चाप्यनिमित्ततश्च ॥ ५१ ॥

एक सनिमित्तक व दुसरा अनिमित्तक, असा दोन प्रकारचा लिंगनाश सांगितला आहे.

निमित्ततस्तत्र शिरोभितापाज्ज्ञेयस्त्वभिष्यन्दनिदर्शनः सः ।

मस्तक संतप्त झाल्यामुळें लिंगनाश होतो, त्याला सनिमित्तक लिंगनाश असें म्हणतात. त्यांत डोळे आल्याचीं लक्षणें प्रथम होतात.

अनिमित्तकाचें लक्षण.

सुरर्षिगन्धर्वमहोरगाणां संदर्शनेनापि च भास्करस्य ॥ ५२ ॥
हन्येत दृष्टिर्मनुजस्य तस्य स लिङ्गनाशस्त्वनिमित्तसंज्ञः ।

देव, ऋषि, गंधर्व किंवा महासर्प दृष्टीस पडल्यामुळें किंवा प्रखर सूर्याकडे पहाण्यानें मनुष्याची दृष्टि एकदम नाहींशी होते, त्याला अनिमित्तक लिंगनाश असें म्हणतात.

तत्राक्षि विस्पष्टमिवावभाति वैदूर्यवर्णा विमला च दृष्टिः ॥ ५३ ॥

ह्यामध्यें डोळे स्पष्ट दिसतात व दृष्टि वैडूर्य मण्याप्रमाणें स्वच्छ दिसते.

काळ्या बुबुळाचे विकार.

यत्सव्रणं शुक्रमथाव्रणं च पाकात्ययश्चाप्यजका तथैव ।
चत्वार एते नयनामयास्तु कृष्णप्रदेशे नियता भवन्ति ॥ ५४ ॥

सव्रणशुक्र (फूल), अव्रणशुक्र (फूल), पाकात्यय व अजका हे चार रोग काळ्या बुबुळावर नियमानें होतात.

सव्रण-शुक्र (फुलाचें) लक्षण.

निमग्नरूपं तु भवेद्धि कृष्णे सूच्येव विद्धं प्रतिभाति यद्वै ।
स्रावं स्रवेदुष्णमतीव यच्च तत्सव्रणं शुक्रमुदाहरन्ति ॥ ५५ ॥
रक्तराजिनिभं कृष्णे छिन्नाभं यत्र लभ्यते ।
सूच्यग्रेणेव तच्छुक्रमुष्णाश्रुस्रावि तद्व्रणम् ॥

डोळ्याच्या काळ्या बुबुळावर खोल गेलेलें व मध्यें सुईनें वेध केल्याप्रमाणें दिसणारें जें शुक्र त्याला सव्रण शुक्र असें म्हणतात. ह्यांतून दूषित स्राव होतो. विदेहानेंही म्हटलें आहे:—काळ्या बुबुळावर तांबड्या मोहरीएवढें व सुईनें वेध केल्याप्रमाणें दिसणारें जें शुक्र त्याला सव्रण शुक्र म्हणतात. ह्यांतून उष्ण स्राव होतो.

साध्यासाध्यलक्षण.

दृष्टेः समीपे न भवेत्तु यच्च न चावगाढं न च संस्रवेच्च ।
अवेदनं वा न च युग्मशुक्रं तत्सिद्धिमायाति कदाचिदेव ॥ ५६

जें शुक्र अगदीं दृष्टिसमीप नसतें, जें फार खोल गेलेलें नसतें, ज्यांतून स्राव होत नाहीं, ज्यांत वेदना नसतात, व जीं जोडीनें दोन नसतात, अशा प्रकारचें शुक्र कदाचित् साध्य होतें.

अव्रण शुक्रलक्षण.

स्यन्दात्मकं कृष्णगतं तु शुक्रं शंखेन्दुकुन्दप्रतिमावभासम् ।
वैहायसाभ्रप्रतनुप्रकाशं तं चाव्रणं साध्यतमं वदन्ति ॥ ५७ ॥

डोळे आल्यामुळें काळ्या बुबुळावर होणारें, शंख, कुंदाचें फूल किंवा चंद्र ह्यांसारखें पांढरें दिसणारें, अथवा आकाशांतील ढगाप्रमाणें पांढरें दिसणारें जें शुक्र त्याला अव्रण शुक्र असें म्हणतात. तें सुखसाध्य आहे.

कष्टसाध्य लक्षण.

गम्भीरजातं बहुलं च शुक्रं चिरोत्थितं चापि वदन्ति कृच्छ्रम् ।

जें खोल गेलेलें, जाड व फार दिवसाचें शुक्र असतें, तें कष्टसाध्य असतें.

असाध्यत्व.

विच्छिन्नमध्यं पिशितावृतं वा चलं शिरासूक्ष्ममदृष्टिकृच्च ॥५८॥
द्वित्वग्गतं लोहितमन्ततश्च चिरोत्थितं चापि विवर्जनीयम् ।

ज्याचा मध्यभाग विच्छिन्न झाला आहे, किंवा जें मांसानें आच्छादित झालें आहे, जें हालतें, शिराजालामुळें जें लहान दिसतें, जें दृष्टि नाहींशी करितें, जें दोन पटलांपर्यंत गेलें असून सभोंवार तांबूस दिसतें व ज्याला फार दिवस झाले आहेत तें अव्रण शुक्र देखील असाध्य म्हणून सोडावें.

दुसरें असाध्य लक्षण.

उष्णाश्रुपातः पिटिका च नेत्रे यस्मिन्भवेन्मुद्गनिभं च शुक्रम् ५९
तदप्यसाध्यं प्रवदन्ति केचिदन्यच्च वा तित्तिरिपक्षतुल्यम् ।

ज्या शुक्रांत डोळ्यांतून कढत पाणी येतें, डोळ्यांत बारीक बारीक फोड येतात व फूल मुगाएवढें असतें, अशा फुलाला देखील असाध्य म्हणतात, असें कित्येकांचें मत आहे. जें शुक्र तित्तिर-पक्ष्याच्या पंखाच्या रंगाचें असतें, तें देखील असाध्य असतें.

अक्षिपाकात्यय.

श्वेतः समाक्रामति सर्वतो हि दोषेण यस्यासितमण्डलं तु ॥६०॥
तमक्षिपाकात्ययमक्षिकोपं सर्वात्मकं वर्जयितव्यमाहुः ।

ज्याच्या काळ्या बुबुळावर दोषामुळें सर्वत्र पांढरा वर्ण येतो, त्याला अक्षिपाकात्यय असें म्हणतात. तो त्रिदोषात्मक आहे. हा वर्ज्य करावा असें म्हणतात.

अजकाजात.

अजापुरीषप्रतिमो रुजावान्सलोहितो लोहितपिच्छिलाश्रु ॥६१॥
विगृह्य कृष्णं प्रचयोऽभ्युपैति तं चाजकाजातमिति व्यवस्येत् ।

काळ्या बुबुळावर शेळीच्या वाळलेल्या लेंडीसारखा किंचित् तांबूस, ठणकणारा व ज्या योगानें डोळ्यांतून तांबूस व बुळबुळीत असे अश्रु वहातात असा एक उंच ढीग उत्पन्न होतो, त्याला अजकाजात (वडस) असें म्हणतात. ह्याबद्दल विदेह म्हणतो:-

कृष्णेक्षणोद्भवे शुष्कच्छगलीविट्समप्रभम् ।
सान्द्रपिच्छलरक्तास्रं द्वित्वग्गं वाजकेति सा ॥ ६२ ॥

काळ्या बुबुळावर शेळीच्या वाळलेल्या लेंडीप्रमाणें जो एक उंचवटा येतो, ज्यामुळें दाट, बुळबुळीत व तांबूस असे अश्रु वाहतात व तो दोन पटलांपर्यंत खोल गेलेला असतो, त्याला अजका असें म्हणतात.

पांढऱ्या बुबुळावरील रोग.

प्रस्तारिशुक्लक्षतजाधिमांस-
स्नाय्वर्मसंज्ञाः खलुः पञ्च रोगाः ॥ ६३ ॥
स्याच्छुक्तिका सार्जुनपिष्टकाख्या
जालं शिराणां पिटिकाश्च तासाम् ।
रोगा बलासग्रथितेन सार्ध-
मेकादशोक्ताः खलु शुक्लभागे ॥ ६४ ॥

प्रस्तारी, शुक्ल, रक्तज, अधिमांसज व स्नायुजन्य असे अर्मरोग पांच आहेत. व शुक्तिका, अर्जुन, पिष्टक, शिराजाल, शिराजन्य पीटिका व बलासग्रथित असे हे पांढऱ्या बुब्बुळावरील अकरा रोग सांगितले आहेत.

प्रस्तारी अर्माचें लक्षण.

प्रस्तारि तनु विस्तीर्णं श्यावं रक्तनिभं सिते ।

प्रस्तारी अर्म पातळ, पसरलेलें, काळसर व तांबडें अशा प्रकारचें पांढऱ्या बुब्बुळावर असतें.

शुक्लार्म.

सश्वेतं मृदु शुक्लार्म शुक्ले तद्वर्धते चिरात् ॥ ६५ ॥

पांढऱ्या बुबुळावर पांढऱ्या रंगाचें व मृदु असें जें अर्म होतें, त्याला शुक्लार्म (पांढरा वडस) असें म्हणतात. हें फार दिवस वाढत असतें.

रक्तार्म.

पद्माभं मृदु रक्तार्म यन्मांसं चीयते सिते ।

पांढऱ्या बुबुळावर तांबड्या कमळाच्या पाकळीसारखें जें मांस वाढतें, त्याला रक्तार्म असें म्हणतात.

अधिमांसार्म.

पृथु मृद्वधिमांसार्म बहलं च यकृन्निभम् ॥ ६६ ॥

जें अर्म पसरलेलें, मऊ, मोठें व यकृताप्रमाणें असतें, त्याला अधिमांसार्म म्हणतात.

स्नायुवर्म.

स्थिरं प्रस्तारि मांसाढ्यं शुष्कं स्नाय्वर्म पञ्चमम् ।

जें अर्म कठीण, पसरणारें, पुष्कळ मांसानें युक्त असतें, त्याला पांचवें स्नायुवर्म असें म्हणतात. हें शुष्क असतें.

शुक्तिका.

श्यावाः स्युः पिशितनिभास्तु बिन्दवो ये
शुक्त्याभास्त्वसितसिताः स शुक्तिसंज्ञः ।

पांढऱ्या बुबुळावर मांसासारखे दिसणारे शिंपीसारखे काळसर पांढरे जे ठिपके असतात, त्यांना शुक्तिका असें म्हणतात.

अर्जुन (आहिरा).

एको यः शशरुधिरोपमश्च बिन्दुः
शुक्लस्थो भवति तदर्जुनं वदन्ति ॥ ६७ ॥

पांढऱ्या बुबुळावर सशाच्या रक्ताप्रमाणें लाल असा जो एकच ठिपका होतो, त्याला अर्जुन (आहिरा) असें म्हणतात.

पिष्टक.

श्लेष्ममारुतकोपेन शुक्ले मांसं समुन्नतम् ।
पिष्टवत्पिष्टकं विद्धि मलाक्तादर्शसंनिभम् ॥ ६८ ॥

कफवातांच्या प्रकोपामुळें पांढऱ्या बुबुळावर जें पिठाप्रमाणें पांढरें उंच मांस वाढतें, त्याला पिष्टक असें म्हणतात. ह्याचा रंग मळकट आरशाप्रमाणें असतो.

शिराजाल.

जालाभः कठिनशिरो महान्सरक्तः
संतानः स्मृत इह जालसंज्ञितस्तु ।

पांढऱ्या बुबुळावर कठीण, उंच व रक्तासारखें लाल असें जें शिरांचें जाळें होतें त्याला शिराजाल किंवा जाल असें म्हणतात.

शिराजपीटिका.

शुक्लस्थाः सितपिटिकाः शिरावृता या
स्ता ब्रूयादसितसमीपजाः शिराजाः ॥ ६९ ॥

पांढऱ्या बुबुळावर शिरांनीं व्यापिलेल्या ज्या पांढऱ्या पुळ्या काळ्या बुबुळानजीक होतात. त्यांना शिराजपिटिका असें म्हणतात.

बलासग्रथित.

कांस्याभोऽमृदुरथ वारिबिन्दुकल्पो
विज्ञेयो नयनसिते बलाससंज्ञः ॥ ७० ॥

पांढऱ्या बुबुळावर काशाच्या रंगासारखा किंचित पिवळा आणि पांढरा, मऊ असा पाण्याचे थेंबाप्रमाणें दिसणारा वर उचललेला जो ग्रंथिरूप शोथ उत्पन्न होतो, त्याला बलास (बलासग्रथित) असें म्हणतात.

पापण्या व पापण्यांचे केस ह्यांचे रोग.

उत्सङ्गिन्यथ कुम्भीका पोथकी वर्त्मशर्करा ।
तथाऽर्शोवर्त्म शुष्कार्शस्तथैवाञ्जननामिका ॥ ७१ ॥
बहलं वर्त्म यच्चापि तथोक्तो वर्त्मबन्धकः ।
क्लिष्टवर्त्म तथा वर्त्मकर्दमः श्याववर्त्म च ॥ ७२ ॥
प्रक्लिन्नवर्त्म चाक्लिन्नवर्त्म वातहतं च तत् ।
वर्त्मार्बुदं निमेषश्च शोणितार्शस्तथैव च ॥ ७३ ॥
लगणो बिसवर्त्मापि कुञ्चनं नाम तत्परम् ।
एकविंशतिरित्येते विकारा वर्त्मसंश्रयाः ॥ ७४ ॥

उत्संगपिटिका, कुंभिका, पोथकी, वर्त्मशर्करा, अर्शोवर्त्म, शुष्कार्श, अंजननामिका, बहलवर्त्म, वर्त्मबंधक, क्लिष्टवर्त्म, वर्त्मकर्दम, श्याववर्त्म, प्रक्लिन्नवर्त्म, अक्लिन्नवर्त्म, वातहत-वर्त्म, वर्त्मार्बुद, निमेष, शोणितार्श, लगण, बिसवर्त्म आणि कुंचन असे हे एकवीस विकार पापण्यांच्या आश्रयानें होतात.

उत्संगपिटिका.

अभ्यन्तरमुखी ताम्रा बाह्यतो वर्त्मनश्च या ।
सोत्सङ्गोत्सङ्गपिटिका सर्वजा स्थूलकण्डुरा ॥ ७५ ॥

डोळ्याच्या पापणीला आंतल्या बाजूस तोंड असलेली आणि पापणीच्या बाहेरच्या बाजूस तांबडी दिसणारी, व वर उचललेली अशी जी पीटिका असते, तिला उत्संगपीटिका असें म्हणतात. हिला खाज फार असते.

कुंभिका.

वर्त्मान्तःपिटिका ध्माता भिद्यन्ते च स्रवन्ति च।
कुम्भीकाबीजसदृशाः कुम्भीकाः संनिपातजाः ॥ ७६ ॥

पापणीच्या आंतल्या बाजूस बऱ्याच पुटकुळ्या होतात. त्या फुटून वाहतात, पुनः भरतात व पुनः फुटतात. त्या कुंभिका नांवाच्या वेलीच्या फळांतील बीच्या आकाराच्या असतात म्हणून त्यांना कुंभिका असें म्हणतात. त्या त्रिदोषज आहेत.

पोथकी.

स्राविण्यः कण्डुरा गुर्व्यो रक्तसर्षपसंनिभाः।
रुजावत्यश्च पिटिकाः पोथक्य इति संज्ञिताः ॥ ७७ ॥

पापणीच्या आंतल्या बाजूस तांबड्या शिरसाच्या आकाराच्या पुळ्या होतात. त्यांतून स्राव होतो. त्यांना कंडु सुटते. त्यामुळें पापण्या जड होतात व त्यांत ठणका असतो. त्यांना पोथकी असें म्हणतात.

वर्त्मशर्करा.

पिटिकाभिः सुसूक्ष्माभिर्घनाभिरभिसंवृता।
पिटिका या खरा स्थूला वर्त्मस्था वर्त्मशर्करा ॥ ७८ ॥

बारीक व दाट अशा पुळ्यांनीं व्यापलेल्या ज्या मोठ्या व खरखरीत पुळ्या होतात, त्यांना वर्त्मशर्करा असें म्हणतात.

अर्शोवर्त्म.

एर्वारुबीजप्रतिमाः पिटिका मन्दवेदनाः॥
श्लक्ष्णाः खराश्च वर्त्मस्थास्तदर्शोवर्त्म कीर्त्यते ॥ ७९ ॥

पापणीच्या आंतील बाजूस किंवा बाहेर वाळकांतील बींसारख्या गुळगुळीत किंवा खरखरीत ज्या पुटकुळ्या होतात, त्यांना अर्शोवर्त्म असें म्हणतात. ह्यांत मंदवेदना असतात. तसेंच निमी म्हणतोः—

नीरुजा कठिना वर्त्मपक्ष्मान्ते बाह्यगाऽपि वा।
पिटिका संनिपातेन तदर्शोवर्त्म कीर्तयेत् ॥

पापणीच्या केसाजवळ न दुखणाऱ्या, कठीण व पापणीच्या बाहेरच्या अंगासही होणाऱ्या ज्या पुटकुळ्या होतात, त्यांना अर्शोवर्त्म म्हणतात. त्या सन्निपातज आहेत.

शुष्कार्श.

दीर्घांकुरः खरः स्तब्धो दारुणोऽभ्यन्तरोद्भवः ।
व्याधिरेषोऽभिविख्यातः शुष्कार्शो नाम नामतः ॥ ८० ॥

पापणीच्या आंतल्या बाजूस खरखरीत, कठीण आणि अतिशय टोचणारा असा एक लांबट अंकुर येतो, त्याला शुष्कार्श असें म्हणतात.

अंजननामिका.

दाहतोदवती ताम्रा पिटिका वर्त्मसंभवा ।
मृद्वी मन्दरुजा सूक्ष्मा ज्ञेया साऽञ्जननामिका ॥ ८१ ॥

दाह, टोंचणी ह्यांनीं युक्त अशी एक तांबडी पुटकुळी पापणीवर होते; ती मऊ असते, तिला वेदना फार असतात, आणि ती लहान असते. तिला अंजननामिका असें म्हणतात.

बहलवर्त्म.

वर्त्मोपचीयते तस्य पिटिकाभिः समन्ततः ।
सवर्णाभिः स्थिराभिश्च विद्याद्बहलवर्त्म तत् ॥ ८२ ॥

डोळ्याच्या पापणीच्या आसमंतात् त्वचेच्या रंगासारख्या व कठीण अशा पुटकुळ्या येतात. त्यांला बहलवर्त्म असें म्हणतात.

वर्त्मबंधक.

कण्डुरेणाल्पतोदेन वर्त्मशोफेन मानवः ।
असमं छादयेदक्षि यत्रासौ वर्त्मबन्धकः ॥ ८३ ॥

ज्यांत कंडु व अल्प टोचणी आहे अशी सूज पापणीला येते. तीमुळें डोळ्याची पापणी मिटत नाहींशी होते. त्या रोगाला वर्त्मबंधक असें म्हणतात.

क्लिष्टवर्त्म.

मृद्वल्पवेदनं ताम्रं यद्वर्त्म सममेव च ।
अकस्माच्च भवेद्रक्तं क्लिष्टवर्त्मेति तद्विदुः ॥ ८४ ॥

डोळ्याच्या दोन्हीही पापण्या मृदु होऊन एकदम तांबड्या लाल होतात. आणि त्यांत वेदना कमी होतात. त्याला क्लिष्टवर्त्म असें म्हणतात. तसेंच निमिम्हणतो:-

श्लेष्मा दुष्टेन रक्तेन क्लिष्टमांसगतः समम् ।
बन्धुजीवनिभं वर्त्म क्लिष्टमांसं तदुच्यते ।

कफ हा दुष्ट रक्ताशीं मिळून दूषित झालेल्या मांसांत शिरून दुपारीच्या फुलाप्रमाणें पापणी लाल करतो, त्याला क्लिष्टमांस असें म्हणतात.

वर्त्मकर्दम.

क्लिष्टं पुनः पित्तयुतं शोणितं विदहेद्यदा ।
तदा क्लिन्नत्वमापन्नमुच्यते वर्त्मकर्दमम् ॥ ८५ ॥

क्लिष्टवर्त्म झालें असून वाढलेल्या पित्तासह रक्त त्याचा दाह करितें. त्यामुळें तें ओलसर चिखलाप्रमाणें होतें. त्याला वर्त्मकर्दम असें म्हणतात.

श्याववर्त्म.

वर्त्म यद्बाह्यतोऽन्तश्च श्यावं शूनं च जायते ।
तदाहुः श्याववर्त्मेति वर्त्मरोगविशारदाः ॥ ८६ ॥

पापण्या आंतून व बाहेरून काळसर व सुजल्यासारख्या होतात त्याला वैद्य श्याववर्त्म असें म्हणतात. तसेंच निमि म्हणतोः—

दुष्टं श्लेष्मानिलात्पित्तं वर्त्मनोश्चीयते यदा ।
अग्निदग्धनिभं श्यावं श्याववर्त्मेति तद्विदुः ॥ ८७ ॥

कफवातामुळें दूषित झालेलें पित्त पापणीमध्यें संचित होऊन अग्नीनें दग्ध झाल्याप्रमाणें पापण्या काळचा करितें. त्याला श्याववर्त्म असें म्हणतात.

प्रक्लिन्नवर्त्म.

अरुजं बाह्यतः शूनं वर्त्म यस्य नरस्य च ।
प्रक्लिन्नवर्त्म तद्विद्यात्क्लिन्नमत्यर्थमन्ततः ॥ ८८ ॥

ज्या मनुष्याच्या पापण्या बाहेरून सुजतात व कडेला अतिशय ओलसर असतात, त्याला प्रक्लिन्नवर्त्म असें म्हणतात.

अक्लिन्नवर्त्म.

यस्य धौतान्यधौतानि संबध्यन्ते पुनः पुनः ।
वर्त्मान्यपरिपक्वानि विद्यादक्लिन्नवर्त्म तत् ॥ ८९ ॥

ज्याच्या पापण्या धुतल्या अगर न धुतल्या तरी चिकटतात, त्या विकाराला अक्लिन्नवर्त्म असें म्हणतात. ह्या विकारांत पापण्या पिकत नाहींत.

वातहतवर्त्म.

विमुक्तसंधि निश्चेष्टं वर्त्म यस्य निमील्यते ।
तद्वातनिहतं वर्त्म जानीयादक्षिचिन्तकः ॥ ९० ॥

वातदोषानें पापण्यांचीं संधिबंधनें ढिलीं होऊन त्यांची उघडझाप बंद होते, त्यामुळें त्या मिटूनच राहतात. त्याला वातहतवर्त्म असें म्हणतात.

वर्त्मार्बुद.

वर्त्मान्तरस्थं विषमं ग्रन्थिभूतमवेदनम् ।
आचक्षतेऽर्बुदमिति सरक्तमविलम्बितम् ॥ ९१ ॥

पापणीच्या आंतील बाजूस वेदनारहित व बाहेरूनही वर उचललेली एक गांठ येते, तिला वर्त्मार्बुद असें म्हणतात. हें लाल असतें व जलद होतें.

निमेष.

निमेषिणीः शिरा वायुः प्रविष्टः संधिसंश्रयः ।
संचालयति वर्त्मानि निमेषः स न सिध्यति ९२ ॥

डोळ्याच्या सांध्याच्या आश्रयानें असणारा वायु पापण्यांची उघडझाप करणाऱ्या (निमेष करणाऱ्या) शिरांमध्यें शिरून पापण्या हालवूं लागतो, त्याला निमेष असें म्हणतात. हा असाध्य आहे.

शोणितार्शाचें लक्षण.

वर्त्मस्थो यो विवर्धेत लोहितो मृदुरंकुरः ।
तद्रक्तजं शोणितार्शश्छिन्नं वाऽपि विवर्धते ॥ ९३ ॥

पापण्यांच्या आंतील बाजूस लाल व मृदु असा एक मोड येतो त्याला शोणितार्श असें म्हणतात. तो रक्तजन्य आहे. तो छाटून काढला तरी पुनः वाढतो. तसेंच विदेह म्हणतो:—

वायुः शोणितमादाय शिराणां प्रमुखस्थितः ।
जनयत्यंकुरं ताम्रं वर्त्मनि च्छिन्नरोहिणम् ॥
तच्छोणितार्शोऽसाध्यं स्याद्रक्तस्राव्यथ रक्तजम् ॥९४॥

वायु रक्तासहवर्तमान डोळ्याच्या प्रमुख शिरांमध्यें शिरून पापणीवर तांबडा मोड उत्पन्न करतो. तो कापून काढला तरी वाढतो. त्याला शोणितार्श असें म्हणतात. तो असाध्य आहे. ह्यांतून

रक्त वाहत असल्यास त्याला रक्तजन्य शोणितार्श असें म्हणतात.

लगण.

अपाकी कठिनः स्थूलो ग्रन्थिर्वर्त्मभवोऽरुजः ।
सकण्डूः पिच्छिलः कोलप्रमाणो लगणः स्मृतः ॥ ९५ ॥

पापणीवर न पिकणारी, कठीण, मोठी व न दुखणारी अशी गांठ येते. तिला कंडु असते, ती बुळबुळीत असते आणि तिचा आकार बोरासारखा असतो. तिला लगण असें म्हणतात.

बिसवर्त्म.

त्रयो दोषा बहिः शोथं कुर्युश्छिद्राणि वर्त्मनाम् ।
प्रस्रवन्त्यन्तरुदकं बिसवद्बिसवर्त्म तत् ॥ ९६ ॥

त्रिदोषामुळें पापणीवर बाहेरच्या बाजूस सूज येते. तिला बारीक भोकें पडून त्यांतून कमळांतील बिसाप्रमाणें पाणी येतें. म्हणून त्यास बिसवर्त्म असें म्हणतात.

कुंचन.

वाताद्या वर्त्मसंकोचं जनयन्ति मला यदा ।
तदा द्रष्टुं न शक्नोति कुञ्चनं नाम तद्विदुः ॥ ९७ ॥

जेव्हां वातादि दोष पापण्यांचें आकुंचन करितात, व त्यामुळें मनुष्याला पहातां येत नाहीं, तेव्हां त्याला कुंचन असें म्हणतात.

पक्ष्मरोगांचीं नावें.

प्रक्ष्मकोपः पक्ष्मशातो रोगौ द्वौ पक्ष्मसंश्रयौ ॥

पक्ष्मकोप व पक्ष्मशात असे दोन रोग पापण्यांच्या केंसाच्या आश्रयानें होतात.

पक्ष्मकोप.

प्रचालितानि वातेन पक्ष्माण्यक्षि विशन्ति हि ।
असिते सितभागे च मूलकोशात्पतन्त्यपि ॥ ९८ ॥
घृष्यन्त्यक्षि मुहुस्तानि संरम्भं जनयन्ति च ।
पक्ष्मकोपः स विज्ञेयो व्याधिः परमदारुणः ॥ ९९ ॥

वातानें पापणीचे केस वाकडे होऊन उरफाटे डोळ्यांत शिरतात. ते काळ्या व पांढऱ्या बुबुळाला टोचतात, वरचेवर घासतात व त्यांना सूज उत्पन्न करितात. ह्या भयंकर व्याधीला पक्ष्मकोप असें म्हणतात.

पक्ष्मशात.

वर्त्मपक्ष्माशयगतं पित्तं रोमाणि शातयेत् ।
कण्डूं दाहं च कुरुते पक्ष्मशातं तमादिशेत् ॥ १०० ॥

पापणीच्या केसाच्या मुळांशीं कुपित झालेलें पित्त पापण्यांच्या केसांना झडवितें आणि कंडु व दाह उत्पन्न करितें. त्याला पक्ष्मशात असें म्हणतात.

डोळ्याचे सहा संधि.

पक्ष्मवर्त्मगतः संधिर्वर्त्मशुक्लगतोऽपरः ।
शुक्लकृष्णगतस्त्वन्यः कृष्णदृष्टिगतोऽपि च ।
ततः कनीनिकागतः षष्ठश्चापांगसंश्रितः ॥ १०१ ॥

पापण्या व त्यांचे केंस ह्यांमधील सांधा, पापण्या व पांढरें बुबुळ ह्यांमधील सांधा, पाढरें बुबुळ व काळें बुबुळ ह्यांमधील सांधा, काळें बुबुळ व दृष्टिमंडळ ह्यांमधील सांधा, दृष्टिमंडळ व कनीनिका (डोळ्यांतील बाहुली) ह्यांमधील सांधा व सहावा डोळ्याच्या बाहेरील कोपऱ्याचा (अपांगाचा) सांधा, असे डोळ्यांत सहा सांधे आहेत.

संधिगत रोग.

पूयालसः सोपनाहः स्रावाश्चत्वार एव च ।
पर्वणीकाऽलजी जन्तुग्रन्थिः संधौ नवाऽऽमयाः ॥१०२॥

पूयालस, उपनाह, चार प्रकारचे स्राव, पर्वणिका, अलजी व जंतुग्रंथि असे हे नऊ संधिरोग आहे.

पूयालस.

पक्वः शोथः संधिजो यः सतोदः स्रवेत्पूयं पूति पूयालसाख्यः ।

डोळ्याच्या सांध्याच्या ठिकाणीं सूज येऊन ती पिकते. त्यांत टोचणी असते आणि त्यांतून घाणेरडा पू येतो, त्याला पूयालस असें म्हणतात.

उपनाह.

ग्रन्थिर्नाल्पो दृष्टिसंधावपाकी कण्डूप्रायो नीरुजश्चोपनाहः ॥१०३

दृष्टीच्या सांध्यावर एक मोठी गांठ येते. ती पिकत नाहीं, तिला ठणका नसतो आणि कंडु असते, तिला उपनाह असें म्हणतात.

स्रावांची संप्राप्ति.

गत्वा संधीनश्रुमार्गेण दोषाः कुर्युः स्रावाँल्लक्षणैः स्वैरुपेतान् ।
तं हि स्रावं नेत्रनाडीति चैके तस्या लिंगं कीर्तयिष्ये चतुर्धा ॥१०

अश्रुवह स्रोतसांतून वातादि दोष डोळ्याच्या सांध्यामध्यें येऊन आपआपल्या लक्षणांनीं युक्त असा स्राव उत्पन्न करितात, त्या स्रावाला कोणी नेत्रनाडी असें म्हणतात. त्याच्या चार प्रकारांचें लक्षण सांगतों:—

पैत्तिक स्राव.

हरिद्राभं पीतमुष्णं जलं वा पित्तस्रावः संस्रवेत्संधिमध्यात् ॥

हळदीसारखें पिवळें व उष्ण असें पाणी डोळयाच्या सांध्यांमधून वाहतें, त्याला पैत्तिक स्राव असें म्हणतात.

श्लेष्मस्राव.

श्वेतं सान्द्रं पिच्छिलं यः स्रवेत्तु श्लेष्मस्रावोऽसौ विकारः प्रदिष्टः।

पांढरा, दाट व बुळबुळित असा जो स्राव होतो, त्याला श्लेष्मस्राव असें म्हणतात.

सन्निपातस्राव.

शोथः संधौ संस्रवेद्यस्तु पक्वः पूयं स्रावः सर्वजः संमतः सः ।

डोळयाच्या सांध्यावर सूज येऊन ती पिकते. आणि तिजमधून पू वाहतो. त्याला त्रिदोषज स्राव असें म्हणतात.

रक्तस्राव.

रक्तस्रावः शोणिताद्यो विकारो गच्छेद्दुष्टं तत्र रक्तं प्रभूतम् ॥ १०६

रक्तदोषामुळें डोळयाच्या सांध्यामधून जो स्राव होतो, त्यांतून पुष्कळसें दूषित रक्त वाहतें.

पर्वणी व अलजी.

ताम्रा तन्वी दाहपाकोपपन्ना रक्ताऽज्ञेया पर्वणी वृत्तशोफा ।

डोळयाच्या काळया व पांढऱ्या बुबुळाच्या सांध्यावर तांबूस, लहान व दाहयुक्त असून पिकणारी व वाटोळी अशी सूज येते, तिला पर्वणी म्हणतात.

जाता संधौ कृष्णशुक्लेऽलजी स्यात्तस्मिन्नेव व्याहृता पूर्वलिङ्गैः ॥

वरील पर्वणीच्याच जागीं एक अलजी नांवाची पीटिका होते,

तिचीं लक्षणें मागें सांगितलेल्या अलजीपीटिकेप्रमाणें असतात.

जंतुग्रंथि.

जन्तुग्रन्थौ वर्त्मनः पक्ष्मणश्च कण्डूं कुर्युर्जन्तवः संधिजाताः ।
नानारूपा वर्त्मशुक्लान्तसंधौ चरन्त्यन्तर्लोचनं दूषयन्तः ॥ १०८ ॥

पापण्या व पापण्यांचे केस ह्यांच्या सांधींत उत्पन्न झालेले नानाप्रकारचे जंतु पापण्या व पांढरें बुबुळ ह्यांच्या सांधींत गांठी व कंडु उत्पन्न करितात. हे जंतु डोळ्याच्या आंतील भागांत संचार करितात व डोळा बिघडवितात. ह्या विकाराला जंतुग्रंथि म्हणतात.

सर्व डोळ्याचे रोग.

स्यन्दाश्चतुष्का इह संप्रदिष्टाश्चत्वार एवेह तथाऽधिमन्थाः ।
पाकः सशोथः स च शोथहीनो हताधिमन्थोऽनिलपर्ययश्च ॥ १ ॥
शुष्काक्षिपाकस्त्विह कीर्तितश्च तथाऽन्यतोवात उदीरितश्च ।
दृष्टिस्तथाऽम्लाध्युषिता शिराणामुत्पातहर्षौ च समस्तनेत्रे ॥ २
एवं समस्तनेत्रे स्युरामया दश सप्त च ।
तेषामिह पृथग्वक्ष्ये यथावल्लक्षणान्यपि ॥ ३ ॥

चार प्रकारचे अभिष्यंद, चार प्रकारचे अधिमंथ, सशोथ पाक, शोथहीन पाक, हताधिमंथ, वातपर्याय, शुष्काक्षिपाक, अन्यतोवात, अम्लाध्युषित, शिरोत्पात व शिराप्रहर्ष ह्याप्रमाणें सर्व डोळ्याचे रोग सतरा आहेत. त्यांचीं अनुक्रमानें लक्षणें सांगतों.

चार अभिष्यंद.

वातात्पित्तात्कफाद्रक्तादभिष्यन्दश्चतुर्विधः ।
प्रायेण जायते घोरः सर्वनेत्रामयाकरः ॥ ४ ॥

सर्व नेत्ररोगाला कारणीभूत असा अभिष्यंद वातजन्य, पित्तजन्य, कफजन्य व रक्तजन्य असा चार प्रकारचा आहे.

वातजन्य अभिष्यंद.

निस्तोदनस्तम्भनरोमहर्षसंघर्षपारुष्यशिरोभितापाः ।
विशुष्कभावः शिशिराश्रुता च वाताभिपन्ने नयने भवन्ति ॥ ५

वातापासून डोळे आले असतां टोचणी, डोळे ताठणें, अंगावर रोमांच उभे राहणें, डोळे खुपणें, डोळे रूक्ष होणें, डोकें संतप्त होणें, डोळ्याच्या कोपऱ्यांतून पू न येणें व डोळ्यांतून थंड पाणी

येणें हीं लक्षणें होतात.

पैत्तिक अभिष्यंद.

दाहप्रपाकौ शिशिराभिनन्दा धूमायनं बाष्पसमुद्भवश्च ।
उष्णाश्रुता पीतकनेत्रता च पित्ताभिपन्ने नयने भवन्ति ॥ ६ ॥

पैत्तिक अभिष्यंद (डोळे येणें) यामध्यें डोळ्याची आग, पापण्यांच्या कडांभोंवतीं बारीक बारीक पिकलेले फोड येणें, डोळ्याला गार पदार्थापासून बरें वाटणें, डोळ्यांतून धूर निघाल्यासारखें वाटणें, डोळ्यांतून वाफा येणें, डोळ्यांतून कढत पाणी येणें, आणि डोळे पिवळे होणें हीं लक्षणें होतात.

कफजन्य अभिष्यंदाचें लक्षण.

उष्णाभिनन्दा गुरुताऽक्षिशोथः कण्डूपदेहावतिशीतता च ।
स्रावो बहुः पिच्छिल एव चापि कफाभिपन्ने नयने भवन्ति ॥

कफजन्य अभिष्यंदामध्यें डोळ्याला उष्ण उपचार बरे वाटतात, डोळे जड होतात, सुजतात, खाजतात, त्यांना चिपडे येतात, ते अतिशय गारठतात, त्यांतून बुळबुळित व पुष्कळ स्राव होतो. हीं लक्षणें होतात.

रक्तजन्य अभिष्यंद.

ताम्राश्रुता लोहितनेत्रता च राज्यः समन्तादतिलोहिताश्च ।
पित्तस्य लिङ्गानि च यानि तानि रक्ताभिपन्ने नयने भवन्ति ॥८॥

डोळ्यांतून लाल पाणी येणें, डोळे लाल होणें, डोळ्याभोंवतीं तांबड्या शिरा उमटणें, आणि पित्तजन्य अभिष्यंदाचीं सर्व लक्षणें असणें हीं लक्षणें रक्तजन्य अभिष्यंदामध्यें होतात.

अभिष्यंदापासून अधिमंथाची उत्पत्ति.

वृद्धैरेतैरभिष्यन्दैर्नराणामक्रियावताम् ।
तावन्तस्त्वधिमन्थाः स्युर्नयने तीव्रवेदनाः ॥ ९ ॥

अभिष्यंदावर (आलेल्या डोळ्यावर) जर कांहीं उपचार केले नाहींत, तर ते वाढून त्यापासून अभिष्यंदाइतकेच (चार प्रकारचे) अधिमंथ होतात. त्यामुळें तीव्र वेदना होतात.

अधिमंथाचें सामान्य लक्षण.

उत्पाट्यत इवात्यर्थं तथा निर्मथ्यतेऽपि च ।

शिरसोऽर्धं तु तं विद्यादधिमन्थं स्वलक्षणैः ॥ १० ॥

अधिमंथामध्यें डोळे उकलून काढल्याप्रमाणें डोळ्यांत वेदना होतात, व मस्तकाच्या अर्ध्या भागांत घुसळल्याप्रमाणें पीडा होते. ह्या विकाराला अधिमंथ म्हणतात. ह्यांत त्या त्या वातादि दोषांचीं-हीं लक्षणें असतात.

हन्याद्दृष्टिं श्लैष्मिकः सप्तरात्राद्याधिर्घोरो रक्तजः पञ्चरात्रात्।
षड्रात्राद्वा वातिको वै निहन्यान्मिथ्याचारात्पैत्तिकः सद्य एव॥

ह्या अधिमथांवर तात्काळ उपचार केले नाहींत तर कफजन्य अधिमंथानें सात दिवसांत दृष्टीचा नाश होतो. रक्तजन्य अधिमंथानें पांच दिवसांत, वातजन्य अधिमंथानें सहा दिवसांत व पित्त-जन्य अधिमंथानें दृष्टीचा तत्काळ नाश होतो.

सशोथ नेत्रपाक.

कण्डूपदेहाश्रुयुतः पक्वोदुम्बरसंनिभः।
संरम्भी पच्यते यस्तु नेत्रपाकः सशोथकः ॥ १२ ॥

डोळ्याला सूज येऊन ती पक्व झाली असतां डोळे खाजतात. पिचपिचित होतात. त्यांतून पाणी येतें व ते पिकलेल्या उंबरा-प्रमाणें लाल होतात. ह्याला सशोथ नेत्रपाक असें म्हणतात.

अशोथ नेत्रपाक.

शोथहीनानि लिङ्गानि नेत्रपाके त्वशोथके।

सुजेवांचून बाकीचीं सर्व लक्षणें अशोथ नेत्रपाकामध्यें असतात.

हताधिमंथ.

उपेक्षणादक्षि यदाऽधिमन्थो वाताधिकः शोषयति प्रसह्य ॥ १३ ॥
रुजाभिरुग्राभिरसाध्य एष हताधिमन्थः खलु नाम रोगः ॥ १४ ॥

वातजन्य अधिमंथाची उपेक्षा केली असतां तो डोळा शोषून टाकतो. ह्यामध्यें तीव्र वेदना होतात. हा असाध्य आहे. ह्याला हताधिमंथ असें म्हणतात.

वातपर्ययलक्षण.

वारं वारं च पर्येति भ्रुवौ नेत्रे च मारुतः।
रुजाभिः सह तीव्राभिः स ज्ञेयो वातपर्ययः ॥ १५ ॥

ज्यांत वायु वरचेवर भुवईंत शिरतो व पुनः डोळ्यांत शिरतो, तीव्र वेदना असतात, त्याला वातपर्यय म्हणतात.

शुष्काक्षिपाकलक्षण.

यत्कूणितं दारुणरूक्षवर्त्म संदह्यते चाविलदर्शनं यत् ।
सुदारुणं यत्प्रतिबोधने च शुष्काक्षिपाकोपहतं तदक्षि ॥ १६ ॥

ज्या विकारांत डोळे मिटलेले असून त्यांच्या पापण्या कठीण व रूक्ष होतात, त्यांची अतिशय आग होते, दृष्टि गढूळ होते, आणि डोळे उघडण्याला फार प्रयास पडतात, त्याला शुष्काक्षिपाक असें म्हणतात.

अन्यतोवातलक्षण.

यस्यावटूकर्णशिरोहनुस्थो मन्यागतो वाऽप्यनिलोऽन्यतो वा ।
कुर्याद्रुजं वै भ्रुवि लोचने च तमन्यतोवातमुदाहरन्ति ॥ १७ ॥
मन्यानामन्तरे वायुरुत्थितः पृष्ठतोऽपि वा ।
करोति भेदं निस्तोदं शङ्खे चाक्ष्णोर्भ्रुवोस्तथा ॥
तमाहुरन्यतोवातं रोगं दृष्टिविदो जनाः ॥ १८ ॥

मानेचा मागचा भाग, कान, मस्तक, हनुवटी व मान ह्या ठिकाणचा किंवा अन्य ठिकाणचा वायु भुवई किंवा नेत्र ह्यांमध्यें येऊन ठणका उत्पन्न करतो, त्याला अन्यतोवात म्हणतात. विदेहानें-ही म्हटलें आहे:—मानेच्या मागच्या शिरांतील अथवा पाठीमधील वायु निघून आंख, भुवया व डोळे ह्या ठिकाणीं टोंचणी व ठणका उत्पन्न करतो, त्याला नेत्रवैद्य अन्यतोवात असें म्हणतात.

अम्लाध्युषित.

श्यावं लोहितपर्यन्तं सर्वमक्षि प्रपच्यते ।
सदाहशोथं सास्रावमम्लाध्युषितमम्लतः ॥ १९ ॥

डोळ्यामध्यें काळसर व भोंवतालीं तांबूस होऊन पक्क होतो. त्यांत अत्यंत दाह असतो. सूज येते व डोळ्यांतून पाणी येतें. ह्या रोगाला अम्लाध्युषित असें म्हणतात. हा रोग अतिशय आंबट पदार्थ खाण्यानें होतो.

शिरोत्पात.

अवेदना वाऽपि सवेदना वा यस्याक्षिराज्यो हि भवन्ति ताम्राः ।

मुहुर्विरज्यन्ति च याः स तादृग्व्याधिः शिरोत्पात इति प्रदिष्टः ॥

ज्याच्या डोळ्यांतील शिरा तांबड्या होतात, ज्यांत वेदना असतात अगर नसतात, आणि त्या शिरा वरचेवर अधिकच लाल होतात, त्याला शिरोत्पात म्हणतात.

शिराप्रहर्ष.

मोहाच्छिरोत्पात उपेक्षितस्तु जायेत रोगः स शिराप्रहर्षः ।
ताम्राभमस्रं स्रवति प्रगाढं तथा न शक्नोत्यभिवीक्षितुं च ॥ २१ ॥

अज्ञानामुळें शिरोत्पाताची उपेक्षा केली असतां शिराप्रहर्ष होतो. त्यामुळें डोळ्यांतून तांबडें लाल रक्त पुष्कळ वाहतें व डोळ्याला पहाण्याची शक्ति नसते.

डोळ्याच्या रोगाचें सामलक्षण.

उदीर्णवेदनं नेत्रं रागशोफसमन्वितम् ।
घर्षनिस्तोदशूलाश्रुयुक्तमामान्वितं विदुः ॥ २२ ॥

अतिशय ठणका, लाली, सूज, डोळ्यांत रेती गेल्याप्रमाणें खुपणें, टोचणी, वेदना व डोळ्यांतून पाणी येणें, हीं लक्षणें नेत्ररोग आमावस्थेंत असला म्हणजे होतात.

डोळ्याच्या रोगाचें निरामलक्षण.

मन्दवेदनता कण्डूः संरम्भाश्रुप्रशान्तता ।
प्रसन्नवर्णता चाक्ष्णोर्निरामस्य च लक्षणम् ॥ २३ ॥

वेदना कमी होणें, कंडू, सूज, पाणी येण्याचें बंद होणें व डोळे स्वच्छ होणें हीं लक्षणें आमरहित नेत्ररोगाचीं (पक्व नेत्ररोगाचीं) आहेत.

नेत्ररोगाची चिकित्सा.

सेको दिनानि चत्वारि लङ्घनं भोजने रसः ।
स्वादुस्तिक्तश्च लेपश्च बाष्पः स्वेदनमेव च ॥ १ ॥
एतानि नेत्ररोगाणां सामानां पाचनानि हि ।

डोळ्यावर चार दिवस सेक (शिंपडणें) करावा. लंघन, मांसरसाचें भोजन, मधुर व कडू औषधांचा लेप, वाफारा देऊन स्वेदन करणें, हे उपचार साम नेत्ररोगाचें पाचन करितात.

अञ्जनं सर्पिषः पानं कषायं गुरुभोजनम् ।
नेत्ररोगेषु सामेषु स्नानं च परिवर्जयेत् ॥ २ ॥

अंजन, तूप पिणें, काढा, जड अन्न सेवन करणें, व स्नान हे उपचार साम नेत्ररोगामध्यें वर्ज करावे.

अक्षिकुक्षिभवा रोगाः प्रतिश्यायव्रणज्वराः ।
पञ्चैते पञ्चरात्रेण रोगा नश्यन्ति लंघनात् ॥ ३ ॥

डोळ्याचे रोग, कुशींतील रोग, पडसें, व्रण व ज्वर हे पांच रोग पांच दिवस लंघन केलें असतां नष्ट होतात.

षट्सप्ततिर्लोचनजा विकारास्तेषामभिष्यन्दसमुद्भवानाम् ।
श्लेष्माश्रयत्वादिह लंघनं प्राक्प्रशस्यते मुद्गरसौदनं च ॥ ४ ॥

शहात्तर नेत्ररोग आहेत, ते रोग अभिष्यंदापासून कफाच्या आश्रयानें होतात. म्हणून त्यांजवर प्रथम लंघन करावें; आणि नंतर मुगाचें कढण व भात खावा.

अञ्जनं पूरणं क्वाथपानमामे न शस्यते ।
आचतुर्थाद्दिनादाममभिष्यन्देऽपि लोचनम् ॥ ५ ॥

अंजन, पूरण (पातळ औषध डोळ्यावर ओतून डोळा भरणें) व काढा घेणें हें आम नेत्ररोगांत प्रशस्त नाहीं. अभिष्यंद (डोळे येणें) ह्या विकारामध्यें चार दिवस होईपर्यंत डोळे आमावस्थेंत असतात.

गण्डूषांजननस्यादिहीनानां कफकोपतः ।
षट्सप्ततिर्नेत्ररोगा दुःसहाः स्युरुपेक्षिताः ॥ ६ ॥

गंडूष (गुळण्या), अंजन व नस्य इत्यादि उपचार जो कधीं करीत नाहीं, त्याला त्या उपेक्षेमुळें दुःसह असे शहात्तर नेत्ररोग होतात.

सेक आश्च्योतनं पिण्डी बिडालस्तर्पणं तथा ।
पुटपाकोऽञ्जनं चैभिः कल्पैर्नेत्रमुपाचरेत् ॥ ७ ॥

सेक (शिंपडणें), आश्च्योतन (फडक्यांतून औषधाचे थेंब डोळ्यांत पिळणें), पोथंडी, लेप, तर्पण (डोळ्यांभोंवतीं पाळ करून त्यांत औषध भरणें), पुटपाक व अंजन ह्या प्रयोगांनीं नेत्ररोगावर उपचार करावे.

दृष्टिरोगांची चिकित्सा.

वर्जयेदुपसर्गोत्थां गम्भीरां ह्रस्वसंज्ञिताम् ।

काचांस्तु यापयेत्सर्वान्नकुलान्ध्यं तथैव च ॥ १ ॥
तिमिरं नेत्ररोगेषु कष्टं तद्यत्नतो हरेत् ।
मूलं दृष्टिविनाशस्य तिमिरं समुदाहृतम् ।
ऋषिभिस्तूदितं तस्मात्तस्य कुर्याच्चिकित्सितम् ॥ २ ॥

उपसर्गजन्य दृष्टिरोग (प्रथम एक रोग होऊन त्यांत झालेला) गंभीरदृष्टि, ऱ्हस्वदृष्टि, सर्व प्रकारचे कांचरोग, व नकुलांध्य ह्यांचें यापन (सतत उपचारानें वाढूं न देणें) करावें. नेत्ररोगांत तिमिर हें कष्टसाध्य आहे, तें यत्नानें जिकावें. तिमिर हें दृष्टिनाशाला मूळ कारण आहे, असें ऋषींनी सांगितलें आहे. म्हणून त्याजवर प्रयत्नानें चिकित्सा करावी.

वातिक तिमिरचिकित्सा.

स्निग्धानि नस्यांजनशोधनानि पाकाः पुटानामथ तर्पणं च ।
घृतस्य पानान्यथ बस्तिकर्म कुर्यादभीक्ष्णं तिमिरेऽनिलोत्थे १

वातजन्य तिमिरांत स्निग्ध अंजनें, नस्यें व रेचकें हे उपचार करावे. पुटपाक, तर्पण, घृतपान व बस्तिकर्म हेही उपचार वरचेवर करावे.

दशमूलादिकं पक्वं घृतं दुग्धचतुर्गुणम् ।
त्रिफलाकल्कसंयुक्तं तिमिरे वातजे पिबेत् ॥ २ ॥
रास्नाफलत्रयक्वाथे दशमूलरसे शृतम् ।
कल्केन जीवनीयानां घृतं तिमिरनाशनम् ॥ ३ ॥

दशमुळांचा काढा, चौपट दूध व त्रिफळ्याचा कल्क घालून तूप सिद्ध करावें, आणि तें वातजन्य तिमिरावर प्यावें. रासना, त्रिफळा व दशमुळें ह्यांचा काढा व जीवनीय गणांतील औषधांचा कल्क ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तेंही तिमिराचा नाश करितें.

वातिके तिमिरे पक्वं दशमूलीरसे घृतम् ।
त्रिवृच्चूर्णसमायुक्तं विरेकार्थे प्रयोजयेत् ॥ ४ ॥

वातजन्य तिमिरावर दशमूळांच्या काढ्यामध्यें तेडाचें चूर्ण घालून तूप सिद्ध करावें. तें वातजन्य तिमिरावर रेच होण्याकरितां योजावें.

त्रिफलादशमूलानां निर्यूहं दुग्धमिश्रितम् ।
गन्धर्वतैलसंयुक्तं प्रयुञ्जीत विरेचनम् ॥ ५ ॥

त्रिफळा व दशमुळें ह्यांच्या काढ्यांत दूध व एरंडेल तेल घालून रेच होण्याकरितां योजावें.

पैत्तिक तिमिरचिकित्सा.

शीतांजनाश्चोतनतर्पणैश्च नस्यैर्विरेकैर्मृदुभिर्घृतैश्च ।
तिक्तप्रधानैस्तिमिरं निहन्यात्पित्तात्मकं शोणितमोक्षणैश्च ॥१॥

शीतल असें अंजन, आश्चोतन व तर्पण, तसेंच मृदु व कडू औषधांनीं सिद्ध केलेल्या तुपाचें नस्य व रेचक आणि रक्त काढणें ह्या उपचारांनीं पित्तजन्य तिमिराचा नाश करावा.

तिमिरे पित्तजे सर्पिर्जीवनीयवराशृतम् ।
पाययित्वा शिरां विध्येत्सितैलाकुम्भसैन्धवैः ॥ २ ॥
चूर्णैर्माक्षिकसंयुक्तै रेचनं कारयेन्नरः ।

पित्तजन्य तिमिरावर त्रिफळा व जीवनीय गणांतील औषधें ह्यांचा काढा व कल्क ह्यांनीं सिद्ध केलेलें तूप पाजून शीर तोडावी. व खडीसाखर, वेलदोडे, तेड व सैंधेलोण ह्यांचें चूर्ण मधाशीं देऊन रेच करावे.

बलाशतावरीवीरासिताशैलेयकैः पचेत् ॥ ३ ॥
त्रिफलासहितं सर्पिस्तिमिरघ्नमनुत्तमम् ।

चिकणामूळ, शतावरी, भुईआवळी, खडीसाखर, धोंडफूल व त्रिफळा ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें उत्तम तिमिरनाशक आहे.

सारिवात्रिफलोशीरमुक्ताचन्दनपद्मकैः ।
पिष्टं वर्तीकृतं हन्ति पित्तोत्थं तिमिरं नृणाम् ॥ ४ ॥

उपळसरी, त्रिफळा, वाळा, मोती, चंदन व पद्मकाष्ट ह्यांच्या चूर्णाची वात करून ती डोळ्यांत फिरवावी. ती पित्तजन्य तिमिराचा नाश करिते.

श्लैष्मिक तिमिरचिकित्सा.

तीक्ष्णानि नस्याञ्जनशोधनानि पाकः पुटानामपतर्पणं च ।
घृतानि वासात्रिफलापटोलसंज्ञानि कुर्यात्तिमिरे कफोत्थे ॥१॥

कफजन्य तिमिरावर तीक्ष्ण अशीं नस्यें, अंजनें व शोधनें योजावीं. पुटपाक व अपतर्पण (कर्षण) असे उपचार करावे व

वासाघृत, पटोलादिघृत व त्रिफलाघृत हीं घृतें योजावीं.

कफोद्भवे वराचव्यश्टते क्राथे शृतं हविः।
पाययित्वा शिरां विध्येद्रेचनं तिमिरे भिषक् ॥ २ ॥

कफजन्य तिमिरावर त्रिफळा व चवक ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप पाजून शीर तोडावी.

यूथी पथ्या कणा शुण्ठी कुसुम्भस्याम्बुनिर्झरः।

जुई, हिरडा, पिंपळी, सुंठ व करड्याचीं फुलें ह्यांचा झऱ्याच्या पाण्यांत काढा करून तो रेच होण्याकरितां द्यावा.

गोमूत्रक्वथिता शुण्ठी त्रिवृत्सिद्धा विरेचनम् ॥ ३ ॥

गोमूत्र व नळीच्या तेडाचा काढा ह्यांत सुंठ शिजवून ती रेच होण्याकरितां द्यावी.

नस्यं मरीचयष्ट्याह्वविडङ्गामरदारुभिः।

मिरें, ज्येष्टमध, वावडिंग व देवदार ह्यांचें चूर्ण करून त्याचें अथवा ह्या औषधांचा काढा व कल्क ह्यांत सिद्ध केलेल्या तुपाचें नस्य द्यावें.

नेपालत्रिफलाशङ्खकान्ताव्योषं च पेषितम्।
वर्तीकृतं बलासोत्थमञ्जनं तिमिरापहम् ॥ ४ ॥

तांबें, त्रिफळा, शिंप, व सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांच्या चूर्णाची वात करावी आणि ती डोळ्यांत फिरवावी. ती कफजन्य तिमिराचा नाश करिते.

सान्निपातिक तिमिरचिकित्सा.

संसर्गे सन्निपाते च यथादोषोदयक्रियाम्।

द्विदोषजन्य तिमिरावर व त्रिदोषजन्य तिमिरावर त्या त्या दोषानुरूप क्रिया करावी.

धात्रीरसांजनक्षौद्रसर्पिर्भिस्तु रसक्रिया ॥ १ ॥
पित्तानिलाक्षिरोगघ्नी तैमिर्यपटलापहा।

आवळकाठी, रसांजन, मध व तूप ह्यांचें लेहासारखें औषध करून तें डोळ्यांत घालावें. तें वातपित्तजन्य नेत्ररोग, तिमिर व पडदा ह्यांचा नाश करितें.

दद्यादुशीरनिर्यूहे चूर्णितं कणसैन्धवम् ॥ २ ॥
तच्छृतं सघृतं भूयः पचेत्क्षौद्रं घने ततः।

शीते चास्मिन्हितमिदं सर्वजे तिमिरे हितम् ॥ ३ ॥

वाळयाच्या काढ्यांत पिंपळी व सैंधेलोण घालून तो द्यावा. त्याच काढ्यांत तूप पचन करून तें पावसाळ्यांत व हिवाळ्यांत मध घालून प्यावें. तें त्रिदोषजन्य तिमिरावर हितकारक आहे.

वातपित्तकफसंनिपातजां नेत्रयोर्बहुविधामपि व्यथाम् ।
शीघ्रमेव जयति प्रयोजितः शिग्रुपल्लवरसः समाक्षिकः ॥ ४ ॥

शेवग्याच्या पाल्याचा रस मध घालून डोळ्यांत घालावा. तो वात, पित्त, कफ व सन्निपातजन्य अशा सर्व प्रकारच्या रोगांचा नाश करतो.

तिमिरावर सामान्य उपचार.

अंजनाचा प्रकार.

अथ संपक्वदोषस्य प्राप्तमञ्जनमाचरेत् ।
अंजनं क्रियते येन तद्द्रव्यं चाञ्जनं मतम् ॥ १ ॥

तिमिराचे दोष पक्व झाले आहेत असें पाहून अंजनाचे उपचार करावे. ज्या द्रव्याचें अंजन करितात त्यालाही अंजन असें म्हणतात. तें असें—

गुटिकारसचूर्णानि त्रिविधान्यञ्जनानि तु ।
कुर्याच्छलाकयाऽगुल्या हीनानि च यथोत्तरम् ॥ २ ॥

गुटिका, रस व चूर्ण असे अंजनाचे तीन प्रकार आहेत. अंजन करावयाचें तें सळईनें किंवा बोटानें करावें. वर सांगितलेले अंजनाचे तीन प्रकार उत्तरोत्तर योग्यतेनें हीन आहेत.

स्नेहनं रोपणं चापि लेखनं तत्त्रिधा पृथक् ।

स्नेहन, रोपण व लेखन असे अंजनाचे आणखी तीन भेद आहेत.

मधुरं स्नेहसंपन्नमञ्जनं स्नेहनं मतम् ॥ ३ ॥
कषायातिक्तरसयुक्तस्नेहं रोपणं स्मृतम् ।
अञ्जनं क्षारतीक्ष्णाम्लरसैर्लेखनमुच्यते ॥ ४ ॥

मधुर व स्निग्ध असें जें अंजन त्याला स्नेहन अंजन म्हणतात. तुरट व कडू असून स्निग्ध असणारें जें अंजन त्याला रोपण अंजन म्हणतात; व क्षार, तिखट व आंबट या रसांनीं युक्त असें जें अंजन त्याला लेखन अंजन असें म्हणतात.

हरेणुमात्रां कुर्वीत वर्तिं तीक्ष्णाञ्जने भिषक् ।
प्रमाणं मध्यमे सार्धं द्विगुणं तु मृदौ भवेत् ॥ ५ ॥

तीक्ष्णांजनाला रेणुकबीजाइतकी मात्रा द्यावी. मध्यम अंजनाला दिढीनें द्यावी आणि मृदु अंजनाला दुप्पट द्यावी.

रसक्रिया तूत्तमा स्यात्रिविडङ्गमिता हिता ।
मध्यमा द्विविडङ्गा सा हीना त्वेकविडङ्गिका ॥ ६ ॥

रसक्रिया म्हणजे लेहासारख्या औषधांची मात्रा तीन वावडिंगां-एवढी असावी. ती उत्तम. दोन वावडिंगांइतकी मध्यम, व एक वावडिंगाइतकी ती कनिष्ट समजावी.

शलाकाः स्नेहने चूर्णे चतस्रः प्राहुरञ्जने ।
रोपणे तास्तु तिस्रः स्युस्ते उभे लेखने स्मृते ॥ ७ ॥

स्निग्ध व चूर्ण अशा अंजनाला सळई चार वेळ फिरवावी. रोपण अंजनाला ती तीन वेळ फिरवावी आणि लेखन अंजनाला ती दोन वेळ फिरवावी.

मुखयोः कुञ्चिता श्लक्ष्णा शलाकाऽष्टांगुलोन्मिता ।
अश्मजा धातुजा वा स्यात्कलायपरिमण्डला ॥ ८ ॥

सळई टोकाकडे बारीक केलेली, बोथट व गुळगुळीत व आठ अंगुळें लांब असावी. सळई करावयाची ती दगडाची अथवा धातूची असून तिचा घेर (परीघ) वाटाण्याइतका असावा.

सुवर्णरजतोद्भूता शलाका स्नेहने स्मृता ।
ताम्रलोहाश्मसंजाता शलाका लेखने मता ॥
अंगुलिस्तु मृदुत्वेन रोपणे कथिता बुधैः ॥ ९ ॥

स्निग्ध अंजनाला सळई सोन्याची किंवा रुप्याची असावी. लेखन अंजनाला तांबें, लोखंड किंवा दगड ह्यांची असावी. आणि अंगुली म्हणजे बोट हें मृदु असल्यामुळें रोपण अंजनाला योग्य आहे असें विद्वानांनीं सांगितलें आहे.

अंजनाची शलाका.

त्रिफलाभृङ्गशुण्ठीनां रसैस्तद्वच्च सर्पिषा ।
गोमूत्रमध्वजाक्षीरैः सिक्तो नागः प्रतापितः ॥ १ ॥

तच्छलाका हरत्येव सकलान्नयनामयान् ।

त्रिफळ्याचा रस, काढा, माक्याचा रस, सुंठीचा काढा, तूप, गोमूत्र, मध व शेळीचें दूध ह्या प्रत्येकामध्यें शिसें तापवून पातळ करून सात सात वेळ बुडवावें. नंतर त्याची सळई करावी. ती सर्व नेत्ररोगांचा नाश करिते.

कृष्णभागादधः कुर्यादपाङ्गं यावदञ्जनम् ॥ २ ॥
प्रथमं सव्यमञ्जीयात्पश्चाद्दक्षिणमंजयेत् ।
शलाकया सांजनया न च तन्नयनं स्पृशेत् ॥ ३ ॥
हेमन्ते शिशिरे वाऽपि मध्याह्नेऽञ्जनमिष्यते ।
पूर्वाह्ने वाऽपराह्ने वा ग्रीष्मे शरदि चेष्यते ॥ ४ ॥
वर्षास्वनभ्रे नात्युष्णे वसन्ते च सदैव हि ।
प्रातः सायं च तत्कुर्यान्न च कुर्यात्सदैव हि ॥ ५ ॥

अंजन करावयाचें तें काळ्या बुबुळाच्या खालीं डोळ्याच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत करावें. प्रथम डाव्या डोळ्यांत अंजन करून नंतर उजव्या डोळ्यांत करावें. अंजनाचें औषध सळईवर घेऊन ती सळई अशा रीतीनें डोळ्यांत फिरवावी कीं, त्या सळईचा स्पर्श डोळ्यास होणार नाहीं (म्हणजे त्या सळईच्या स्पर्शानें डोळ्यास इजा होणार नाहीं.) हेमंत ऋतु व शिशिर ऋतु यांत दोन प्रहरीं अंजन करावें. ग्रीष्म ऋतु व शरद ऋतु ह्यांमध्यें सकाळीं किंवा संध्याकाळीं करावें. वर्षाऋतूंत ज्या वेळीं आतिशय ढग नाहींत व फार ऊनही नाहीं, अशा वेळीं अंजन करावें आणि वसंत ऋतूंत तें सर्व काळ (केव्हांही) करावें.

श्रान्ते प्ररुदिते भीते पीतमद्ये नवज्वरे ।
अजीर्णे वेगघाते च नांजनं संप्रशस्यते ॥ ६ ॥

दमलेला, आतिशय रडत असलेला, भ्यालेला, मद्यप्राशन केलेला, नवज्वर झालेला, अजीर्ण झालेला व मलमूत्रादिकांचा वेग ज्यानें आवरून धरला आहे असा अशा मनुष्याला अंजन करूं नये.

सौवीरमंजनं नित्यं हितमक्ष्णोः प्रयोजयेत् ।
पञ्चरात्रेऽष्टरात्रे वा स्रावणार्थं रसांजनम् ॥ ७ ॥

सुरमा हा डोळ्याला हितकारक आहे. म्हणून तो नेहमीं डोळ्यांत घालावा. अथवा डोळ्यांतून पाणी निघून जाण्याकरितां पांच दिव-

सांनीं किंवा आठ दिवसांनीं डोळ्यांत रसांजन घालावें.

मुक्तादि महा अंजन.

मुक्ताकर्पूरकाचागुरुमरिचकणासैन्धवं सैलवालं
शुण्ठीकङ्कोलकांस्यत्रपुरजनिशिलाशङ्खनाभ्यभ्रतुत्थम् ।
दक्षाण्डत्वक्क साक्षक्षतजयुतशिवाक्रीतकं राजवर्तं
जातीपुष्पं तुलस्याः कुसुममभिनवं बीजमस्यास्तथैव ॥ १ ॥
पूतीकनिम्बांजनभद्रमुस्तं सताम्रसारं रसगर्भयुक्तम् ।
प्रत्येकमेषां खलु माषकैकं पलेन पिष्यान्मधुनाऽतिसूक्ष्मम् ॥२॥
भवन्ति रोगा नयनाश्रिता ये नितान्तमात्रोपचिताश्च तेषाम् ।
विधीयते शान्तिरवश्यमेव मुक्तादिनाऽनेन महांजनेन ॥ ३ ॥

मोती, कापूर, काच, अगर, मिरें, पिंपळी, सेंधेलोण, एलवालुक (हें कायफळासारखें असून त्याला कोष्टासारखा वास असतो. हें कोंकणांत असतें. ह्याला कोकिंजन म्हणतात.) सुंठ, कंकोळ, काशाचें भस्म, वंगभस्म, हळद, मनशीळ, शंखभस्म, अभ्रकभस्म, मोरचूत, कोंबड्याच्या अंडयाचीं टरफलें, बेहेडे, पोंवळें, हिरडे, जेष्टमध, राजावर्त (खेटी), जाईचीं फुलें, तुळशीच्या ताज्या मंजिरा व बीं, करंजाची बीं, कडु निंबाची बीं, रसांजन, नागरमोथे, तांब्याचें सत्व (ताम्रभस्म) व हिंगूळ, हीं औषधें प्रत्येकीं मासा मासा घेऊन चार तोळे मधांत त्यांचा अतिशय बारीक खल करावा. ह्याला मुक्तादि महांजन म्हणतात. ह्यानें अत्यंत वाढलेल्या डोळ्यांच्या रोगाची शांति होते.

नयनशाण नांवाचें अंजन.

कणा सलवणोषणा सहरसांजना सांजना
सरित्पतिकफः शिफा सितपुनर्नवासंभवा ।
रजन्यरुणचन्दनं मधुकतुत्थपथ्या शिला
अरिष्टदलशाबरस्फटिकशङ्खनाभीन्दवः ॥ १ ॥
इमानि तु विचूर्णयेन्निबिडवाससा शोधयेत्
ततोऽयसि विमर्दयेत्समधुताम्रखण्डेन तत् ।
इदं मुनिभिरीरितं नयनशाणनामांजनं
करोति तिमिरक्षयं पटलपुष्पनाशं बलात् ॥ २ ॥

पिंपळी, सैंधव, मिरें, रसांजन, सुरमा, समुद्रफेस, वसूची मुळी,

हळद, रक्तचंदन, जेष्टमध, मोरचूत, हिरडे, मनशीळ, लिंबाचीं पानें, लोध्र, तुरटी (स्फटिक), शंखभस्म, व कापूर ह्या सर्वांचें चूर्ण करून तें जाड वस्त्रानें गाळून घ्यावें. नंतर तें लोखंडाच्या खलांत घालून त्यांत मध मिसळून तें तांब्याच्या बत्त्यानें वगैरे बारीक खलावें. हें नयनशाण नांवाचें अंजन मुनींनीं सांगितलें आहे. हें तिमिर, पडदा व फूल ह्यांचा नाश करितें.

चंद्रोदया वर्ति.

शंखनाभिर्बिभीतस्य मज्जा पथ्या मनःशिला ।
पिप्पली मरिचं कुष्ठं वचा चेति समांशकम् ॥ १ ॥
छागक्षीरेण संपिष्य वर्टीं कुर्याद्यवोन्मिताम् ।
हरेणुमात्रां संघृष्य जलेनांजनमाचरेत् ॥ २ ॥
तिमिरं मांसवृद्धिं च काचं पटलमर्बुदम् ।
रात्र्यन्धं वार्षिकं पुष्पं वर्तिश्चन्द्रोदया हरेत् ॥ ३ ॥

शंखामधील गाठ, बेहड्यांतील बी, हिरडे, मनशीळ, पिंपळी, मिरें, कोष्ट व वेखंड, हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून त्यांचा शेळीच्या मुतांत खल करून त्यांच्या जवाएवढ्या गोळ्या कराव्या, आणि त्या पाण्यांत उगाळून त्यांचा वाटाण्याएवढा थेंब डोळ्यांत घालावा. म्हणजे तिमिर, मांसवृद्धि (वडस), काच, पडदा, अर्बुद, रातांधळें व एक वर्षाचें फूल, ह्यांना ही चंद्रोदया वर्ति जिंकते.

चंद्रप्रभा वर्ति.

रजनी निम्बपत्राणि पिप्पली मरिचानि च ।
विडङ्गं भद्रमुस्तं च सप्तमी त्वभया स्मृता ॥ १ ॥
अजामूत्रेण संपिष्य छायायां शोषयेद्वटी ।
वारिणा तिमिरं हन्ति गोमूत्रेण तु पिष्टिकाम् ॥ २ ॥
मधुना पटलं हन्ति नारीक्षीरेण पुष्पकम् ।
एषा चन्द्रप्रभा वर्तिः स्वयं रुद्रेण निर्मिता ॥ ३ ॥

हळद, कडुलिंबाचीं पानें, पिंपळी, मिरें, वावडिंग, नागरमोथे, हिरडे, ह्यांचा शेळीच्या मुतांत खल करून गोळ्या करून त्या सावलींत वाळवाव्या. ही चंद्रप्रभा नांवाची वर्ति पाण्यांत उगाळून डोळ्यांत घातली असतां तिमिराचा नाश करिते. गोमूत्रांतून घातली असतां

पिष्टिकेचा नाश करिते. मधांतून घातली असतां पडद्याचा नाश करिते व स्त्रीच्या दुधांतून घातली असतां फुलाचा नाश करिते. ही चंद्रप्रभा वर्ति स्वतः रुद्रानें निर्माण केली आहे.

शशिकला वर्ति.

रसकजलजनाभिः पौरतुत्थं समांशं
वसनगलितमेतन्निम्बुनीरेण पिष्टम् ।
हरति शशिकलैतद्वर्तिरभ्यंजिताक्ष्णो-
स्तिमिरकुसुमकण्डूस्रावरागार्मपिल्लान् ॥ १ ॥

कलखापरी, शंखाच्या आंतील गांठ, रक्तबोळ व मोरचूत ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्याचें लिंबाच्या रसांतून डोळ्यांत अंजन करावें. ही शशिकला वर्ति तिमिर (अंधत्व), फूल, कंडु, स्राव, लाली, वडस व पिल्ल (जुनाट नेत्ररोग) ह्यांचा नाश करिते.

लोचनशूलघ्नी पोटली.

कृतलाजसुराष्ट्रजाहिफेनं रुचिरं नागजगालवोत्थचूर्णम् ।
सुकुमार्युदकेन शुल्बपात्रे मृदितं दृष्टिरुजं जयेत्पटस्थम् ॥ १ ॥

लाह्या, तुरटी, अफू, गोरोचन, शेंदूर, व लोध्र ह्यांचें चूर्ण करून तांब्याच्या पात्रांत कोरफडीच्या रसांत खलून फडक्यावर ठेवून पोथंडी करून डोळ्यावर ठेवावी. ती डोळ्याचा ठणका दूर करिते.

---

१. हरीतकी वचा कुष्टं पिप्पली मरिचानि च ।
बिभीतकस्य मज्जा च शंखनाभिर्मनःशिला ॥
सर्वमेतत्समं कृत्वा गव्यक्षीरेण पेषयेत् ।
नाशयेत् तिमिरं कंडुं पटलान्यर्बुदानि च ॥
अपि त्रिवार्षिकं शुक्रं मासैकेन च नाशयेत् ।
अधिकानि च मांसानि रात्र्यंधत्वं तथैव च ॥
वर्तिश्चंद्रोदया नाम नृणां दृष्टिविशोधिनी ॥

हिरडे, वेखंड, कोष्ठ, पिंपळी, मिरें, बेहड्यांतील बी, शंखामधील गांठ व मनशीळ हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचा गाईच्या दुधांत खल करून वातीसारख्या लांबट गोळ्या कराव्या. ही चंद्रोदया वर्ति तिमिर, कंडु, पडदा व अर्बुद ह्यांचा नाश करिते. तीन वर्षांचें जरी जुनें शुक्र (फूल) असलें, तरी तें एक महिन्यांत नाश पावतें. अधिमांस व रातांधळें ह्यांचाहि नाश होतो. ही चंद्रोदया नांवाची वात दृष्टीचें शोधन करिते. (ले. प्र. व.)

नयनामृत.

रसेन्द्रभुजगौ तुल्यौ तयोर्द्विगुणमंजनम् ।
सूततूर्यांशकर्पूरमंजनं नयनामृतम् ॥ १ ॥
तिमिरं पटलं काचं शुक्रमर्मार्जुनानि च ।
क्रमात्पथ्याशिनो हन्ति तथाऽन्यानपि दृग्गदान् ॥ २ ॥

पारा व शिसें समभाग, त्या दोहोंच्या दुप्पट सुरमा, पाऱ्याच्या चतुर्थांश कापूर ह्या सर्वांचें बारीक चूर्ण करावें. ह्याला नयनामृत म्हणतात. हें पथ्य करणाऱ्याचे तिमिर, पडदा, काचबिंदु, फूल, वडस, अहिरा, हे रोग व दुसरेही नेत्ररोग ह्यांचा नाश करितें.

कुसुमिका वर्ति.

तिलपुष्पाण्यशीतिः स्युः षष्टिः पिप्पलितण्डुलाः ।
जात्याः कुसुमपञ्चाशन्मरिचानि च षोडश ॥ १ ॥
सूक्ष्मपिष्टा जलैर्वर्तिः कृता कुसुमिकाभिधा ।
तिमिरार्जुनशुक्राणां नाशिनी मांसवृद्धिनुत् ॥
एतस्याश्चाञ्जने मात्रा प्रोक्ता सार्धहरेणुका ॥ २ ॥

तिळाचीं फुलें ऐशीं, पिंपळींतील दाणे साठ, जाईचीं फुलें पन्नास व मिरें सोळा, हीं औषधें पाण्यांत बारीक वाटून गोळी करावी. हिला कुसुमिका वर्ति असें म्हणतात. ही तिमिर, अहिरा व फूल ह्यांचा नाश करिते, व मांसवृद्धीचा नाश करिते. हिच्या अंजनाचें प्रमाण दीड रेणुकबीजाइतकें आहे.

दार्व्यादि अंजन.

दार्वीवरामधुकमम्भासि नारिकेले
पक्त्वाऽष्टभागपरिशिष्टरसं पुनस्तम् ।
सान्द्रं विपाच्य शशिसैन्धवमाक्षिकाढ्यं
युञ्ज्याद्व्रणार्तितिमिरार्तिषु पित्तजेषु ॥ १ ॥

दारुहळद, त्रिफळा व जेष्टमध, ह्यांचा सोळापट नारळाच्या रसांत अष्टमांश काढा करावा. नंतर पुनः तो काढा आटवून दाट करावा. व त्यांत कापूर, सैंधव आणि मध घालावा. हें दार्व्यादि अंजन डोळ्याच्या व्रणाचा ठणका, व पित्तजन्य तिमिराचा ठणका ह्यांजवर योजावें.

शंखादिवटी.

शंखस्य भागाश्चत्वारस्तदर्धेन मनःशिला ।
मनःशिलार्धं मरिचं मरिचार्धेन पिप्पली ॥ १ ॥
सर्वमेकत्र संमर्द्य गुटिकां कारयेत्ततः ।
वारिणा तिमिरं हन्ति चार्बुदं हन्ति मस्तुना ।
पिच्चटं मधुना हन्ति स्त्रीक्षीरेण तथाऽऽर्जुनम् ॥ २ ॥

शंख चार भाग, मनशीळ दोन भाग, मिरें एक भाग, पिंपळी अर्धा भाग, ह्या सर्वांचा पाण्यांत खल करून गोळी करावी. ही पाण्यांत उगाळून डोळ्यांत घातली असतां तिमिराचा नाश करिते. दह्याच्या निवळींतून घातली असतां अर्बुदाचा नाश करिते. मधांतून पिच्चटाचा (चिपडाचा) नाश करिते आणि स्त्रीच्या दुधांतुन अहिऱ्याचा नाश करिते.

पुनर्नवादि अंजन.

दुग्धेन कण्डूं क्षौद्रेण नेत्रस्रावं च सर्पिषा ।
पुष्पं तैलेन तिमिरं कांजिकेन निशान्धताम् ।
पुनर्नवा हरत्याशु भास्करस्तिमिरं यथा ॥ १ ॥

वसूची मुळी दुधांत उगाळून डोळ्यांत घातली असतां कंडूचा नाश करिते. मधांतून घातली असतां डोळ्यांतून पाणी येतें त्याचा नाश करिते. तुपांतून फुलाचा नाश करिते. आणि सूर्य जसा अंधकाराचा नाश करतो तसाही तेलांतुन तिमिराचा, व कांजींतुन रातांधळ्याचा नाश करिते.

गुडूच्यादि अंजन.

गुडूचीस्वरसः कर्षः क्षौद्रं स्यान्माषकोन्मितम् ।
सैन्धवं क्षौद्रतुल्यं स्यात्सर्वमेकत्र मर्दयेत् ॥ १ ॥
अंजयेन्नयनं तेन पिल्लार्मतिमिरं जयेत् ।
काचं कण्डूं लिङ्गनाशं शुक्लकृष्णगतान्गदान् ॥ २ ॥

गुळवेलीचा रस एक तोळा, मध एक मासा व सैंधलोण एक मासा ह्या सर्वांचा एकत्र खल करावा आणि डोळ्यांत अंजन करावें. तें पिल्ल, वडस, तिमिर ह्यांना जिंकतें. तसेंच काचबिंदु, कंडु, लिंगनाश व पांढऱ्या आणि काळ्या बुबुळाचे रोग ह्यांनाही जिंकतें.

कतकफलादि अंजन.

कतकस्य फलं घृष्ट्वा मधुना नेत्रमंजयेत् ।
ईषत्कर्पूरसहितं तत्स्यान्नेत्रप्रसादनम् ॥ १ ॥

निवळीची बीं मधांत उगाळून त्यांत किंचित् कापूर घालून अंजन करावें. तें डोळे स्वच्छ करितें.

दुसरा प्रकार.

कतकस्य फलं शङ्खं सैन्धवं त्र्यूषणं सिता ।
फेनो रसांजनं क्षौद्रं विडङ्गानि मनःशिला ।
सर्वमेतत्समं कृत्वा नारीक्षीरेण पेषयेत् ॥ १ ॥
तिमिरं पटलं काचमर्मशुक्रं व्यपोहति ।
कण्डूक्लेदार्बुदान्हन्ति मलं वा सुसुखावति ॥ २ ॥

निवळीचें बी, शंख, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, खडीसाखर, समुद्रफेस, रसांजन, मध, वावडिंग, मनशीळ, ह्या सर्वांचा स्त्रीच्या दुधांत खल करावा आणि अंजन करावें. म्हणजे तें तिमिर, पडदा, काच, वडस, फूल, कंडु, ओलसरपणा, अर्बुद व मळ ह्यांचा नाश करितें. हें फार सुखावह आहे.

पिप्पल्यादि अंजन.

पिप्पलीत्रिफलालाक्षालोध्रकं च ससैन्धवम् ।
भृङ्गराजरसे घृष्टं गुटिकांजनमिष्यते ॥ १ ॥
अर्मं सतिमिरं काचं कण्डूं शुक्रं तथाऽर्जुनम् ।
अंजनं नेत्रजान्रोगान्निहन्त्येव न संशयः ॥ २ ॥

पिंपळी, त्रिफळा, लाख, लोध्र व सेंधेलोण ह्यांचा माक्याच्या रसांत खल करून गोळी करून तिचें अंजन करावें. हें अंजन अर्म, तिमिर, काच, कंडु, शुक्र (फूल), अहिरा व इतर नेत्ररोग ह्यांचा नाश करितें.

गुंजामूलादि अंजन.

गुंजामूलं बस्तमूत्रेण पिष्टं निघृष्टा वा वारिणा भद्रमुस्ता ।
आन्ध्यं सद्यस्तैमिरं हन्ति पुंसामत्युद्गाढं नेत्रयोरंजनेन ॥ १ ॥

गुंजेचें मूळ बोकडाच्या मुतांत उगाळून डोळ्यांत घालावें अथवा नागरमोथा पाण्यांत उगाळून घालावा. हीं अंजनें अंधत्व व अत्यंत वाढलेलें तिमिर ह्यांचा त्वरित नाश करितात.

तुलस्यादि अंजन.

तुलस्या बिल्वपत्रस्य रसो ग्राह्यः समांशकः ।
ताभ्यां तुल्यं पयो नार्यास्त्रितयं कांस्यपात्रके ॥ १ ॥
गजवल्या दृढं मर्द्यं ताम्रेण प्रहरं पुनः ।
कज्जलत्वं समुत्पाद्य तेनांजितविलोचनः ।
सद्यो नेत्ररुजं हन्ति सशूलां पाकसंभवाम् ॥ २ ॥

तुळशीचीं पानें व बेलाचीं पानें ह्यांचा रस समभाग घेऊन दोहोंच्या समान स्त्रीचें दूध त्यांत घालून काशाच्या भांड्यांत लोखंडाच्या बत्त्यानें प्रहरभर खल करावा. नंतर पुनः तांब्याच्या बत्त्यानें (अथवा तांब्याच्या पात्राच्या बुडानें) प्रहरभर खल करावा. तें काजळासारखें झालें म्हणजे त्याचें डोळ्यांत अंजन करावें. हें अंजन नेत्रपाकासंबंधी ठणक्याचा त्वरित नाश करितें.

काढे.

वासा घनं निम्बपटोलपत्रं तिक्तामृताचन्दनवत्सकत्वक् ।
कलिङ्गदार्वीदहनं सनागरं भूनिम्बधात्री ह्यभया बिभीतकम् १
तथा यवक्काथमथाष्टमांशं पिबेदिमं पूर्वदिने कषायकम् ।
तैमिर्यकण्डूपटलार्बुदं च शुक्रं तथा सव्रणमव्रणं च ।
दाहं सरागं सरुजं सपिल्लं हन्यात्समस्तानपि नेत्ररोगान् ॥२॥

अडुळसा, नागरमोथे, कडुनिंबाचीं पानें, कडुपडवळीचीं पानें, कुटकी, गुळवेल, रक्तचंदन, कुड्याची साल, इंद्रजव, दारुहळद, चित्रकमूळ, सुंठ, काडेचिराईत, आवळकाठी, हिरडे व बेहडे ह्यांचा काढा व सातूचा अष्टमांश काढा प्रातःकाळीं प्राशन करावा. तो तिमिर, कंडु, पडदा, अर्बुद, सव्रण व अव्रण शुक्र, दाह, लाली, ठणका व पिल्ल ह्या सर्व नेत्ररोगांचा नाश करतो.

त्रिफलादि काढा.

अयःस्थं त्रिफलाक्काथं सर्पिषा सह योजितम् ।
भुक्तोपरि पिबेत्सायं मासेनान्धोऽपि पश्यति ॥ १ ॥

लोखंडाच्या भांड्यांत केलेला त्रिफळ्याचा काढा रात्रीं जेवल्यावर तूप घालून प्यावा. ह्याप्रमाणें एक महिनाभर केलें असतां आंधळ्याला देखील दिसूं लागतें.

चित्रकादि काढा.

चित्रकमूलत्रिफलापटोलयवसाधितं पिबेदम्भः ।
सघृतं निशि चक्षुष्यं तिमिरं च विशेषतो हन्ति ॥ १ ॥

चित्रकमूळ, त्रिफळा, कडू पडवळ व सातू ह्यांचा काढा रात्रीं तूप घालून प्यावा. तो डोळ्याला हितकारक असून विशेषतः तिमिराचा नाश करितो.

त्रिफलाचूर्ण.

त्रिफलात्वचमायसं च चूर्णं समयष्टीमधुकं त्रिसप्तरात्रम् ।
मधुना सह सर्पिषा दिनान्ते पुरुषो निष्परिहारमाददीत ॥१॥
तिमिरार्बुदरक्तराजिकण्डूक्षणदान्ध्यामयदाहशूलतोदान् ।
पटलं च सशुक्लकाचपिल्लं शमयत्येव निषेवितः प्रयोगः ॥ २ ॥
न च केवलमेव लोचनानां विहितो रोगनिबर्हणाय योगः ।
दशनश्रवणोर्ध्वजत्रुजानां प्रशमे हेतुरयं महामयानाम् ॥ ३ ॥
गुदजानि भगंदरप्रमेहान्सहकुष्टानि हलीमकं किलासम् ।
पलितानि विनाशयेत्तथाऽग्निं चिरनष्टं कुरुते रविप्रचण्डम् ॥४
प्रमदाभिरयं जराधिरूढः स्फुटचन्द्राभरणासु यामिनीषु ।
सुरतानि पदे पदे निषेवेत्पुरुषो योगमिमं निषेवमाणः ॥ ५ ॥
स्मृतिविक्रमबुद्धिशक्तियुक्तः शरदां जीवति वै शतं समग्रम् ६
सुखेन नीलोत्पलचारुगन्धिना शिरोरुहैरञ्जनमेचकप्रभैः ।
भवेत्तु गृध्रस्य समानलोचनश्चिरं नरो वर्षशतं तु जीवति ॥७

त्रिफळा तीन भाग, दालचिनी तीन भाग, लोहभस्म तीन भाग व ज्येष्ठमध तीन भाग ह्यांचें चूर्ण करून तें एकवीस दिवसपर्यंत तूप व मध यांशीं नित्य सायंकाळीं जेवणानंतर द्यावें. तें तिमिर, अर्बुद, शिरोत्पात, कंडु, रातांधळें, दाह, शूळ, टोचणी, पडदा, पांढरा सारा, काचबिंदु व पिल्लरोग ह्यांचा नाश करितें. हा योग केवळ डोळ्यांचे रोग नाहींसे होण्याकरितांच सांगितला आहे असें नाहीं. हा योग दांत, कान व मानेच्यावरचे सर्व रोग वगैरे महान् रोगांचें शमन करण्याला देखील उपयोगी आहे. हा योग मूळव्याध, भगंदर, प्रमेह, कुष्ठें, हलीमक, किलासकुष्ट व पलित (केस पांढरे होणें) ह्यांचा नाश करितो आणि फार दिवसपर्यंत मंद झालेल्या जठराग्नीला सूर्याप्रमाणें प्रखर करतो. ह्या योगाचें सेवन करणारा

वृद्ध पुरुषही चांदण्या रात्रीं अनेक तरुण स्त्रियांशीं पावलोंपावलीं रत होऊं शकतो, आणि स्मरणशक्ति, पराक्रम, बुद्धि व शक्ति ह्यांनीं युक्त असा होत्साता पूर्ण शंभर वर्षें वांचतो. त्याचें तोंड निळ्या कमळाप्रमाणें सुंदर व सुवासिक होतें. केस काजळाप्रमाणें काळेभोर होतात. आणि दृष्टि गिधाडाच्या दृष्टीप्रमाणें दूरदर्शी होते.

सप्तामृतलोह.

मधुकात्रिफलाचूर्णं लोहचूर्णं समं लिहेत् ।
मधुसर्पिर्युतं सम्यग्गव्यक्षीरं पिबेदनु ॥ १ ॥
छर्दिं सतिमिरां शूलमम्लपित्तं ज्वरं क्लमम् ।
आनाहं मूत्रसङ्गं च शोथं चैव निहन्ति हि ॥ २ ॥

ज्येष्टमध, त्रिफळा व लोहभस्म ह्यांचें समभाग चूर्ण करून तें तूप व मधाशीं घेऊन त्याजवर गाईचें दूध प्यावें; म्हणजे ओकारी, अंधत्व, शूळ, अम्लपित्त, ज्वर, थकवा, आनाह, मूत्रावरोध व सूज ह्यांचा तें नाश करतें.

शतावर्यादि चूर्ण.

शतावरी सूर्यसमा प्रदेया एला तथा रावणमूर्धतुल्या ।
देयं विडङ्गं वसुभिः समानमृतोः समं चाऽऽमलकास्थिबीजम् १
विष्णोर्भुजैस्तुल्यगुणं मरीचं तद्विक्रमैर्मागधिका प्रदेया ।
चूर्णं समध्वाज्यकमर्धकर्षमक्ष्यामयानां विनिवारणार्थम् ॥ २ ॥
कण्डूं सधूमं तिमिरं सुघोरमर्माणि काचं पटलं त्रिदोषम् ।
ये चापरे रक्तभवा विकारास्तेषामयं चूर्णवरो निहन्ता ॥ ३ ॥

शतावरी बारा भाग, वेलदोडे दहा भाग, वावडिंग आठ भाग, आवळ्याचें बीं सहा भाग, मिरें चार भाग व पिंपळी तीन भाग, ह्यांचें चूर्ण करून तें अर्धा तोळा चूर्ण डोळ्याचे रोग बरे होण्याकरितां तूप व मध यांशीं द्यावें. तें कंडू, धुरकट दिसणें, तिमिर, भयंकर वडस, काचबिंदु, त्रिदोषजन्य पटल (पडदा) आणि दुसरे रक्तजन्यविकार ह्यांचा नाश करितें.

दुसरें त्रिफलादि चूर्ण.

लिह्यात्सदा वा त्रिफलां सुचूर्णितां घृतगाढां तिमिरेऽथ पित्तजे।
समीरणे तैलयुतां कफात्मके मधुप्रगाढां विदधीत युक्तितः ॥ १ ॥

पित्तजन्य तिमिरावर नेहमीं त्रिफळ्याचें चूर्ण तुपाशीं द्यावें.

वातजन्य तिमिरावर तें तिळाच्या तेलांतून द्यावें, आणि कफजन्य तिमिरावर तें युक्तीनें मधांतून द्यावें.

बिभीतघृत.

बिभीतकशिवाधात्रीपटोलारिष्टवासकैः ।
पक्कमेभिर्घृतं सर्वानक्षिरोगान्व्यपोहति ॥ १ ॥

बेहडा, हिरडा, आवळकठी, कडु पडवळ, कडुनिंबाचीं पानें व अडुळसा ह्यांचा काढा व कल्क घालून विधियुक्त तयार केलेलें तूप नेत्ररोगाचा नाश करितें.

त्रिफलादि घृत.

त्रिफलाया रसप्रस्थं प्रस्थं भृङ्गरसस्य च ।
वृषस्य च रसप्रस्थं शतावर्याश्च तत्समम् ॥ २ ॥
अजाक्षीरं गुडूच्याश्च आमलक्या रसं तथा ।
प्रस्थं प्रस्थं समाहृत्य सर्वैरेभिर्घृतं पचेत् ॥ ३ ॥
कल्कः कणासिताद्राक्षात्रिफला नीलमुत्पलम् ।
मधुकं क्षीरकाकोली मधुपर्णी निदिग्धिका ॥ ४ ॥
तत्साधु सिद्धं विज्ञाय शुभे भाण्डे निधापयेत् ।
ऊर्ध्वपानमधःपानं मध्ये पानं च शस्यते ॥ ५ ॥
यावंतो नेत्रजान्रोगान्पानादेवापकर्षति ।
सरक्ते रक्तदुष्टे च रक्ते वा विस्रुते तथा ॥ ६ ॥
नक्तान्ध्ये तिमिरे काचे नीलिकापटलार्बुदे ।
अभिष्यन्देऽधिमन्थे च पक्ष्मकोपे सुदारुणे ॥ ७ ॥
नेत्ररोगेषु सर्वेषु दोषत्रयकृतेष्वपि ।
परं हितमिदं प्रोक्तं त्रिफलाद्यं महाघृतम् ॥ ८ ॥

त्रिफळ्याचा काढा चौसष्ट तोळे, माक्याचा रस चौसष्ट तोळे, अडुळशाचा रस चौसष्ट तोळे, शतावरीचा रस चौसष्ट तोळे, शेळीचें दूध चौसष्ट तोळे, गुळवेलीचा रस चौसष्ट तोळे व आवळ्याचा रस चौसष्ट तोळे ह्याप्रमाणें सर्वांचे रस चौसष्ट तोळे घेऊन त्यांत चौसष्ट तोळे तूप व पिंपळी, खडीसाखर, द्राक्षें, त्रिफळा, निळें कमळ, जेष्टमध, क्षीरकाकोली, शिवण व रिंगणमूळ ह्यांचा कल्क घालून तें तूप सिद्ध करावें आणि तें चांगल्या भांड्यांत भरून ठेवावें. हें तूप जेवणापूर्वीं, जेवणानंतर व मध्यंतरींही द्यावें. म्हणजे तें सर्व नेत्र-

रोगांचा नाश करितें. रक्तजन्य रोग, दूषित रक्ताचे रोग, रक्तस्राव, रातांधळ, तिमिर (अंधत्व), काचबिंदु, नीलिका, पडळ, अर्बुद, अभिष्यंद (डोळे येणें), अधिमंथ, भयंकर पक्ष्मकोप आणि सर्व प्रकारचे त्रिदोषजन्य असे देखील नेत्ररोग ह्यांजवर हें त्रिफलादि महाघृत फार उपयोगी व हितकारक आहे.

दुसरें त्रिफलादि घृत.

शतमेकं हरीतक्या द्विगुणं च बिभीतकम् ।
चतुर्गुणं त्वामलकं वृषमार्कवयोः समम् ॥ १ ॥
चतुर्गुणोदकं दत्वा शनैर्मृद्वग्निना पचेत् ।
भागं चतुर्थं संरक्ष्य क्वाथं तमवतारयेत् ॥ २ ॥
शर्करा मधुकं द्राक्षा मधुयष्टी निदिग्धिका ।
काकोली क्षीरकाकोली त्रिफला नागकेशरम् ॥ ३ ॥
पिप्पली चन्दनं मुस्तं त्रायमाणा तथोत्पलम् ।
घृतप्रस्थं समं क्षीरं कल्कैरेतैः शनैः पचेत् ॥ ४ ॥
हन्यात्सतिमिरं काचं नक्तान्ध्यं शुक्रमेव च ।
तथा स्रावं च कण्डूं च श्वयथुं च कषायताम् ॥ ५ ॥
कलुषत्वं च नेत्रस्य विद्वर्त्मपटलान्वितम् ।
बहुनाऽत्र किमुक्तेन सर्वान्नेत्रामयान्हरेत् ॥ ६ ॥
यस्य चोपहता दृष्टिः सूर्याग्निभ्यां प्रपश्यतः ।
तस्मै तद्भेषजं प्रोक्तं मुनिभिः परमं हितम् ॥ ७ ॥
मार्जितं दर्पणं यद्वत्परां निर्मलतां व्रजेत् ।
तद्वदेतेन पीतेन नेत्रं निर्मलतामियात् ।

हिरडे शंभर, बेहडे दोनशें, आवळकठी चारशें तोळे, अडुळशाचीं पानें चारशें तोळे, माक्याचीं पानें चारशें तोळे, यांचा चौपट पाणी घालून चतुर्थांश काढा करावा. नंतर खडीसाखर, मोहाचीं फुलें, द्राक्षें, ज्येष्टमध, रिंगणमूळ, काकोली, क्षीरकाकोली, त्रिफळा, नागकेशर, पिंपळी, रक्तचंदन, नागरमोथे, त्रायमाण व कमळ ह्यांचा कल्क आणि चौसष्ट तोळे तूप ह्यांत तुपासमान दूध व वरील काढा घालून तूप सिद्ध करावें. हें तिमिर, काच, रातांधळ, फूल, स्राव, कंडू, सूज, डोळ्याचा गढूळपणा, कलुषितपणा, मळ, पापण्यांचे रोग, पडळ, फार काय सांगावें, सर्व नेत्ररोगांचा नाश करितें.

अग्नीमुळें किंवा सूर्याच्या तेजानें ज्यांना अंधत्व आलें आहे, त्यांना हें तूप फार हितकारक आहे, असें मुनींचें मत आहे. धुतलेला आरसा जसा अत्यंत निर्मळ होतो त्याप्रमाणें ह्या तुपाच्या सेवनानें डोळे निर्मळ होतात.

वारिद्रोणद्वयं चात्र वृषमार्कवयोस्तुले ॥ ८ ॥

ह्या प्रयोगांत काढा करितांना पाणी दोन मण (वीसशें अठ्ठे-चाळीस तोळे) व अडुळसा आणि माका प्रत्येकीं चारशें चारशें तोळे ह्याप्रमाणें योजना करावी.

लघु त्रिफलाघृत.

त्रिफलाक्वाथकल्काभ्यां सपयस्कं घृतं शृतम् ।
तिमिराण्यचिराद्धन्यात्पीतमेतन्निशामुखे ॥ १ ॥

त्रिफळ्याचा काढा, कल्क व दूध ह्यांमध्यें विधियुक्त तूप सिद्ध करावें, आणि तें संध्याकाळीं सेवन करावें. हें तिमिराचा त्वरित नाश करितें.

भृंगराज तेल.

भृङ्गप्रस्थं तैलात्कुडवं तथा पलं च मधुकस्य ।
क्षीरप्रस्थविपक्कं गतमपि चक्षुर्निवर्तयते ॥ १ ॥

माक्याचा रस चौसष्ट तोळे, तेल सोळा तोळे व जेष्टमधाचा कल्क चार तोळे ह्या सर्वांचें मिश्रण करून त्यांत दूध चौसष्ट तोळे घालून विधियुक्त तेल सिद्ध करावें. ह्या तेलानें डोळे गेलेले देखील येतात.

धावन.

स्नानं कृष्णतिलैश्चापि चक्षुष्यमनिलापहम् ।

काळे तीळ वाटून अंगाला लावून स्नान करावें. तें डोळ्याला हितकारक व वातनाशक आहे.

मधुकामलकस्नानं पित्तघ्नं तिमिरापहम् ॥ १ ॥

जेष्टमध व आवळकाठी ह्यांचा कल्क अंगास लावून स्नान करावें तें तिमिर व पित्त यांचें नाशक आहे.

वचाद्यैः स्नानमिच्छन्ति श्लेष्मघ्नं तिमिरापहम् ।

वचादि गणांतील औषधांच्या काढ्यानें स्नान करावें. तें तिमिर

व कफ यांचें नाशक आहे.

आमलैः सततं स्नानं परं दृष्टिबलावहम् ॥ २ ॥

आवळकाठी अंगास लावून सतत स्नान करावें. तें दृष्टीला अत्यंत बलदायक आहे.

त्रिफलायाः कषायस्तु धावनान्नेत्ररोगजित् ।
कवलान्मुखरोगघ्नः पानतः कामलापहः ॥ ३ ॥

त्रिफळ्याच्या काढ्यानें डोळे धुतले असतां तें नेत्ररोगाला जिंकतें. त्याच काढ्याच्या गुळण्या कराव्या. त्या मुखरोगाचा नाश करितात. आणि तोच काढा (त्रिफळ्याचा काढा) प्राशन केला असतां तो काविळीचा नाश करितो.

भुक्त्वा पाणितलं घृष्ट्वा चक्षुषोर्यदि दीयते ।
अचिरेणैव तद्वारि तिमिराणि व्यपोहति ॥ ४ ॥

जेवण झाल्यावर आंचवून ते ओले हात तसेच एकमेकावर घासून त्या हाताचें पाणी डोळ्यास लावावें. तें तिमिराचा त्वरित नाश करितें.

काचबिंदूची चिकित्सा.

काचे रक्तं जलौकाभिर्हृत्वा पूर्वोक्तमाचरेत् ।

काचबिंदूवर जळवा लावून रक्त काढून नंतर पूर्वोक्त सेकांजनादि क्रिया करावी.

शाणार्धं मरिचं द्वौ च पिप्पल्यर्णवफेनयोः ॥ १ ॥
शाणार्धं सैन्धवाच्छाणा नव सौवीरकाञ्जनात् ।
पिष्टं सुसूक्ष्मं चित्रायां चूर्णाञ्जनमिदं शुभम् ॥ २ ॥
कण्डूकाचकफार्तानां मलानां च विशोधनम् ॥ ३ ॥

मिरें दीड मासा. पिंपळी व समुद्रफेस दोन दोन मासे, दीड मासा सैंधेलोण, व सत्तावीस मासे सुरमा ह्या सर्वांचें चित्रानक्षत्रावर बारीक चूर्ण करून ठेवावें. ह्याला चूर्णांजन असें म्हणतात. हें कंडु, काच, कफजन्य नेत्ररोग ह्यांचा नाश करितें व दोषांची शुद्धि करितें.

समेषशृंग्यञ्जनभागसंमितः शंखोऽञ्जनात्काचमलं व्यपोहति ॥ १ ॥

मेढशिंगी व सुरमा एक एक भाग आणि शंख दोन भाग ह्यांचें बारीक चूर्ण करावें. तें कांचबिंदूसंबंधीं दोषाचा नाश करितें.

शिलासैन्धवकासीसशंखव्योषरसांजनैः ।
सक्षौद्रैः काचशुक्रार्मतिमिरघ्नी रसक्रिया ॥ २ ॥

मनशीळ, सैंधेलोण, हिराकस, शंख, सुंठ, मिरें, पिंपळी व रसांजन ह्यांचें चूर्ण करून तें मधांत खलून त्याचें अंजन करावें. तें कांचबिंदु, फूल, वडस, तिमिर ह्यांचा नाश करितें ह्याला रसक्रिया (लेहासारखें औषध) असें म्हणतात.

पित्तविदग्ध दृष्टीची चिकित्सा.

रसांजनं घृतक्षौद्रतालीसस्वर्णगैरिकैः ।
गोशकृद्रससंयुक्तं पित्तोपहतदृष्टये ॥ १ ॥

रसांजन, तूप, मध, तालीसपत्र व सोनकाव ह्यांचें चूर्ण करून तें गाईच्या शेणाच्या रसांत कालवून त्याचें पित्तविदग्ध दृष्टीवर अंजन करावें.

काश्मरीपुष्पमधुकदार्वीलोध्ररसांजनैः ।
सक्षौद्रमंजनं कुर्यात्पित्तव्याधिप्रशान्तये ॥ २ ॥

शिवणीचीं फुलें, जेष्टमध, दारुहळद, लोध्र व रसांजन ह्यांचें चूर्ण करून तें मधांत खलून पित्तजन्य नेत्रविकाराचें शमन होण्याकरितां त्याचें डोळ्यांत अंजन करावें.

श्लेष्मविदग्ध दृष्टीची चिकित्सा.

हरेणुमगधाबीजमज्जानां यकृदन्वितम् ।
शकृद्रसेनांजनं वा श्लेष्मोपहतदृष्टये ॥ १ ॥

रेणुकबीज व पिंपळींतील बी ह्यांचें चूर्ण शेळीच्या पित्तांत अथवा शेळीच्या लेंड्यांच्या रसांत खलून कफजन्य विकाराचे दृष्टीवर अंजन करावें.

दिवांध व रात्र्यंध ह्यांची चिकित्सा.

नलिनोत्पलकिंजल्कगैरिकं सयकृद्रसम् ।
गुटिकांजनमेतस्य दिनरात्र्यन्धयोर्हितम् ॥ १ ॥

कमळ, निळें कमळ, कमळांतील केसर, सोनगेरु व शेळीचें पित्त ह्यांचा एकत्र खल करून गोळी करून तिचें अंजन करावें. तें दिवांधत्व व रातांधळ ह्यांजवर हितकारक आहे.

नदीजशङ्खत्रिकटून्रसांजनं मनःशिला द्वे च निशे गवां शकृत् ।
सचन्दनेयं गुटिकाशु कृत्वा प्रशस्यते रात्रिदिने न पश्यताम् २

नदींतील शंख, सुंठ, मिरें, पिंपळी, रसांजन, मनशीळ, हळद, दारुहळद, गाईचें शेण व रक्तचंदन ह्यांचा खल करून गोळी करावी. ही दिवांध व रात्र्यंध ह्यांजवर प्रशस्त आहे.

सूर्यादिदर्शनैर्दग्धे तत्र शीतं प्रयोजयेत् ।
हेमघृष्टं घृतोपेतमंजनं चोपशस्यते ॥ ३ ॥

सूर्याकडे पाहाण्यानें अंधत्व आलें असल्यास थंड उपचार करावे, आणि तुपांत सोनें उगाळून तें डोळ्यांत घालावें.

रातांधळाची चिकित्सा.

रसांजनं हरिद्रे द्वे मालती निम्बपल्लवाः ।
गोशकृद्रससंयुक्ता वटी नक्तान्ध्यनाशिनी ॥ १ ॥

रसांजन, हळद, दारुहळद, मालतीचीं फुलें व कडुनिंबाचीं पानें हीं औषधें गाईच्या शेणाच्या रसांत खलून गोळी करावी. ती रातांधळाचा नाश करिते. ह्या गोळीचें अंजनाचें प्रमाण दीड वाटाण्याइतकें आहे.

एतस्याश्चांजने मात्रा प्रोक्ता सार्धहरेणुका ।
कणा छागयकृन्मध्ये पक्वा तद्रसपेषिता ॥ २ ॥

पिंपळी शेळीच्या पित्तांत शिजवून त्या पित्तामध्येंच वाटावी. ती रातांधळाचा त्वरित नाश करिते. त्याचप्रमाणें मधांत मिरें उगाळून त्यांचें अंजन करावें. तेंही रातांधळाचा नाश करितें.

अचिराद्धन्ति नक्तान्ध्यं तद्वत्सक्षौद्रभूषणम् ।
करंजपद्मकिंजल्कचन्दनोत्पलगैरिकैः ॥ ३ ॥

करंजाची बीं, कमळांतील केशर, चंदन, निळें कमळ व सोनकाव ह्यांचा गाईच्या शेणाच्या रसांत खल करून अंजन करावें. तें रातांधळावर हितकारक आहे.

गोशकृद्रससंपिष्टैर्नक्तान्ध्ये हितमंजनम् ।
रसांजनं शिला दारु जातीपत्ररसो मधु ॥ ४ ॥

रसांजन, मनशीळ, दारुहळद, जाईच्या पाल्याचा रस व मध ह्यांचें अंजन उत्तम प्रकारें योजिलें असतां रातांधळाला जिंकतें.

नक्तान्धतां जयेदेतदंजनं साधु योजितम् ।
मालतीपत्रक्षौद्रं च निशाद्वयरसांजनैः ॥ ५ ॥

नक्तान्ध्यमंजनं हन्यात्कृष्णा वा गोमयान्विता ।
दध्ना घृष्टं मरीचं वा राज्यन्धांजनमुत्तमम् ॥ ६ ॥

मालतीचीं पानें, मध, हळद, दारुहळद व रसांजन, ह्यांचें अंजन रातांधळाचा नाश करितें. पिंपळी गाईच्या शेणाच्या रसांत उगाळून अंजन करावें. तेंही रातांधळाचा नाश करितें. दह्यांत मिरें उगाळून अंजन करावें. तें रातांधळावर उत्तम आहे.

नकुलांधाची चिकित्सा.

वचा त्रिवृच्चन्दनकुण्डली च भूनिम्बनिम्बौ रजनी सवासा ।
प्रस्थं जलस्य कथिताष्टभागं पिबेत्सुजीर्णे नकुलान्ध्यरोगे ॥१॥

वेखंड, तेड, रक्तचंदन, गुळवेल, काडेचिराईत, कडुनिंब, हळद, व अडुळसा, हीं औषधें एक एक तोळा व पाणी चौसष्ट तोळे ह्यांचा अष्टमांश काढा करून फार जुनाट अशा नकुलांध्य रोगावर द्यावा.

काळया बुबुळाच्या रोगांची चिकित्सा.

व्रणशुक्रप्रशान्त्यर्थं षडङ्गं गुग्गुलुं पचेत् ।
शिरसश्चाहरेद्रक्तं जलौकाभिश्च लोचनात् ॥ १ ॥

व्रणशुक्राच्या शमनार्थ षडंगगुग्गुळ द्यावा, आणि जळवा लावून मस्तकांतील व डोळ्यांतील रक्त काढावें.

ससैन्धवं त्रिवृत्काथे त्रीन्वारान्पाचयेद्घृतम् ।
पीत्वा शुक्रेषु सर्वेषु शीघ्रं कुर्याच्छिराव्यधम् ॥ २ ॥

तेडाच्या काढ्यांत सैंधवासुद्धां तूप घालून तीन वेळ पचन करावें व तें तूप पाजून नंतर त्वरित शीर तोडावी.

जेष्टमधादि आश्चोतन.

यष्ट्याह्वदार्व्युत्पलपद्मलाक्षाप्रपौण्डरीकं नलदाम्बुना च ।
आश्चोतनं स्त्रीपयसा विपक्वं निहन्ति तत्सव्रणदाहशुक्रम् ॥१॥

जेष्टमध, दारुहळद, निळें कमळ, पांढरें कमळ, लाख, पुंडरीकवृक्षाची साल, जटामांसी व वाळा ह्यांचें चूर्ण करून तें स्त्रीच्या दुधांत शिजवून त्याचें आश्चोतन (डोळ्यांत थेंब) करावें. तें दाह व व्रण यांनीं युक्त अशा शुक्राचा (फुलाचा) नाश करितें.

लामज्जकादि अंजन.

लामज्जकोत्पलसितासारिवाचन्दनद्वयैः ।

कार्षिकैः सारिवाप्रस्थं काथयेत्सलिलाढके ॥ १ ॥
पादशेषं परिस्राव्य पचेदादर्विलेपनात् ।
भाजने लोहशैले वा प्रातस्तत्सायमञ्जनम् ॥ २ ॥
प्रधानमेतच्छुक्रघ्नं व्रणशुक्रं शमं नयेत् ।
श्यामामूलकषायं वा मधुना व्रणशुक्रिणाम् ॥ ३ ॥

काळा वाळा, निळें कमळ, खडीसाखर, उपळसरी, तांबडा व पांढरा चंदन हीं औषधें एक एक तोळा व उपळसरीच्या मुळ्या चौसष्ट तोळे ह्यांचा दोनशें छप्पन्न तोळे पाण्यांत काढा करावा. तो चवथाई उरल्यावर गाळून घेऊन पुनः पळीला लागेल असा दाट होईपर्यंत लोखंडाच्या अथवा दगडाच्या भांड्यांत शिजवावा, व सकाळ संध्याकाळ ह्याचें अंजन करावें. हें फुलाचा नाश करण्याविषयीं श्रेष्ठ आहे. हें व्रणशुक्राचा नाश करितें. किंवा उपळसरीच्या मुळाचा काढा मध घालून व्रणशुक्रावर द्यावा.

चंदनादि वर्ति.

चन्दनं गैरिकं लाक्षा मालती कलिकान्विता ।
व्रणशुक्रहरी वर्तिः शोणितस्य प्रसादनी ॥ १ ॥

रक्तचंदन, सोनकाव, लाख व मालतीच्या कळ्या ह्यांची वातीप्रमाणें गोळी करावी. ती व्रणशुक्राचा नाश करिते, आणि रक्ताला स्वच्छ करिते.

अव्रण शुक्राची चिकित्सा;-आश्चोतन.

जात्याः प्रवालं मधुकं च सर्पिर्भृष्टं सुखोष्णाम्बुसुशीतलं च ।
आश्चोतनं शुक्रहरं प्रदिष्टं शुक्रापहं स्त्रीपयसा महार्हम् ॥१॥

जाईचीं पानें व जेष्टमध तुपांत तळून त्यांचें चूर्ण करून ऊन पाण्यांत अथवा थंड पाण्यांत टाकून त्याचें आश्चोतन करावें. तें शुक्र (फूल) याचें नाशक आहे. तसेंच तें स्त्रीच्या दुधांतून केलें असतां फार चांगलें आहे.

धात्रीफलादि सेचन.

धात्रीफलं निम्बकपित्थपत्रं यष्ट्याह्वलोध्रं खदिरं तिलाश्च ।
क्काथः सुशीतो नयनेऽभिषिक्तः सर्वप्रकारं विनिहन्ति शुक्रम् १

आवळकाठी, निंबाचीं पानें, कवठाचीं पानें, जेष्टमध, लोध्र,

खैराची साल व तीळ ह्यांचा काढा थंड झाल्यावर डोळ्यावर शिंपावा. तो सर्व प्रकारच्या फुलाचा नाश करितो.

वाती.

पलाशपुष्पस्वरसैर्बहुशः परिभाविता ।
करञ्जबीजवर्तिस्तु दृष्टेः पुष्पं व्यपोहति ॥ १ ॥

पळसाच्या फुलाच्या रसाच्या पुष्कळशा भावना करंजाच्या बियांना देऊन त्यांच्या वातीसारख्या गोळ्या कराव्या. त्या फुलांचा नाश करितात.

समुद्रफेनसिन्धूत्थशंखदक्षाण्डवल्कलैः ।
शिग्रुबीजयुतैर्वर्तिः शुक्रादीन्शस्त्रवल्लिखेत् ॥ २ ॥

समुद्रफेस, सैंधेलोण, शंख, कोंबड्याच्या अंड्याचीं टरफलें, व शेवग्याचें बीं ह्यांची वात फूल इत्यादि विकारांचें शस्त्राप्रमाणें छेदन करिते.

चंद्रोदया वर्ति.

रसाञ्जनं सशैलेयं कुंकुमं समनःशिलम् ।
शंखं सश्वेतमरिचं शर्करा चेति सप्तमम् ॥ १ ॥
एषा चन्द्रोदया नाम वर्तिर्वैदेहनिर्मिता ।
हन्यात्पिल्लं च कण्डूं च शुक्रं सतिमिरार्बुदम् ॥ २ ॥

रसांजन, दगडफूल, केशर, मनशीळ, शंख, पांढरीं मिरीं व साखर ह्यांच्या वातीप्रमाणें गोळ्या कराव्या. ह्या गोळीला चंद्रोदया वर्ति म्हणतात. ही जनकानें सांगितली आहे. ही पिल्ल, कंडू, शुक्र, तिमिर व अर्बुद ह्यांचा नाश करिते.

अंजन.

वटक्षीरेण संयुक्तं मुख्यं कर्पूरजं रजः ।
क्षिप्रमञ्जनतो हन्ति कुसुमं तु द्विमासिकम् ॥ १ ॥

वडाच्या चिकांत कापूर खलून डोळ्यांत घालावा. तो दोन महिन्यांच्या फुलाचा नाश करितो.

संघृष्य पिप्पलीचूर्णं सफेनं कांस्यभाजने ।
सक्षौद्रं सैन्धवोपेतमञ्जनं शुक्रनाशनम् ॥ २ ॥

पिंपळीचें चूर्ण, समुद्रफेस, मध व सेंधेलोण हीं औषधें काशाचे भांड्यांत घोटून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. तें फुलाचा नाश करितें.

ताप्यं मधुकसारो वा बीजं चाक्षस्य सैन्धवम् ।
मधुनाऽञ्जनयोगाः स्युश्चत्वारः शुक्रनाशनाः ॥ ३ ॥

सुवर्णमाक्षिक, जेष्टमधाचें सत्व, बेहडयांतील बी, अथवा सेंधेलोण ह्या प्रत्येकाचें मधांतून अंजन करावें. हे चार योग फुलाचा नाश करितात.

कुक्कुटाण्डकपालानि शंखः काचोऽथ चन्दनम् ।
सैन्धवार्धांशसंयुक्तमञ्जनं शुक्रलेखनम् ॥ ४ ॥

कोंबड्याच्या अंड्याची टरफलें, शंख, काच व चंदन हीं सर्व समभाग व अर्धा भाग सैंधव ह्यांचें अंजन फूल खरडून काढतें.

लोहादि गुग्गुळ.

अयश्च यष्टीत्रिफलाकणानां चूर्णानि तुल्यानि पुरेण नित्यम् ।
सर्पिर्मधुभ्यां सह भक्षितानि सर्वाणि शुक्राणि निहन्ति शीघ्रम् १

लोहभस्म, जेष्टमध, त्रिफळा व पिंपळी ह्यांचें चूर्ण समभाग व सर्वांच्या बरोबर गुग्गुळ ह्यांचा एकत्र खल करून गोळ्या कराव्या. हा लोहादि गुग्गुळ तूप व मध यांशीं घ्यावा. तो सर्व फुलांचा त्वरित नाश करितो.

पटोलादि घृत.

पटोलं कटुकादार्वीनिम्बवासाफलत्रिकम् ।
दुरालभां पर्पटकं त्रायन्तीं च पलोन्मिताम् ॥ १ ॥
प्रस्थमामलकानां च क्वाथयेन्नल्वणेऽम्भसि ।
तेन पादावशेषेण घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २ ॥
कल्कैर्भूनिम्बकुटजमुस्तयष्ट्याह्वचन्दनैः ।
सपिप्पलीकैस्तत्सिद्धं चक्षुष्यं शुक्रयोजितम् ॥ ३ ॥
घ्राणकर्णाक्षिवर्त्मत्वङ्मुखरोगव्रणापहम् ।
कामलाज्वरवीसर्पगण्डमालापहं परम् ॥ ४ ॥

कडु षडवळ, कुटकी, दारुहळद, कडुनिंबाची साल, अडुळसा, त्रिफळा, धमासा, पित्तपापडा व त्रायमाण हीं औषधें चार चार तोळे, आवळकाठी चौसष्ट तोळे ह्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. आणि त्यांत चौसष्ट तोळे तूप व काडेचिराइत, कुड्याची साल, नागरमोथे, जेष्टमध, चंदन व पिंपळी ह्या औषधांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें डोळ्याला हितावह

आहे. हें फुलावर योजावें. शिवाय हें नाक, कान, डोळे, पापण्या, त्वचा व मुख ह्यांचे रोग व व्रण ह्यांचा नाश करितें. हें कावीळ, ज्वर, विसर्प व गंडमाळा ह्यांचा नाश करण्याविषयींही उत्तम आहे.

कृष्णादि तेल.

कृष्णाविडङ्गमधुयष्टिकासिन्धुजन्म-
विश्वौषधैः पयसि सिद्धमिदं छगल्याः ।
तैलं व्रणं तिमिरशुक्रशिराक्षिवर्त्म-
पाकात्ययाञ्जयति नस्यविधौ प्रयुक्तम् ॥ १ ॥

पिंपळी, वावडिंग, जेष्टमध, सैंधेलोण व सुंठ ह्यांचा कल्क व शेळीचें दूध ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें. आणि त्याचें नस्य करावें, म्हणजे तें तिमिर, फूल, शिरोत्पात, व पाकात्यय हे रोग बरे करितें.

अक्षिपाकात्ययचिकित्सा.

एर्वारु पुण्डरीकं च गवां क्षीरावशेषितम् ।
रागाश्रुवेदनां हन्यादक्षिपाकात्ययं तथा ॥ १ ॥

वाळूक व पुंडरीक वृक्षाची साल दुधांत शिजवून तें दूध डोळ्यावर शिंपावें. तें डोळ्याची लाली, अश्रु, वेदना व अक्षिपाकात्यय ह्यांचा नाश करितें.

अजकाची चिकित्सा.

मूर्धाक्षिकर्णभ्रूभंगशंखचर्माश्रिताऽजका ।
जायते व्यथते नेत्रं मथ्यमानमिवान्तरा ॥ १ ॥
उष्णमश्रु स्रवत्यक्षि दूषितं क्रियते भृशम् ।
असाध्यरोगसंभूतां दृष्टिजां च विवर्जयेत् ॥ २ ॥

मस्तक, डोळे, कान, भुवई, गाल, आंख व त्वचा ह्यांच्या आश्रयानें अजका होते. त्यामुळें घुसळल्याप्रमाणें व्यथा होते. डोळ्यांतून ऊन पाणी येतें. डोळा दूषित होऊन अतिशय ओलसर (चिकचिकित) होतो. ही अजका दृष्टीच्या असाध्य रोगापासून होते. ती असाध्य म्हणून वर्ज करावी.

स्वयं प्रवृद्धां कठिनां चिरकालोत्थितामपि ।
साध्यरोगसमुत्पन्नां कृष्णजां त्वजकां जयेत् ॥ ३ ॥

आपोआप उत्पन्न झालेली, कठीण व साध्य अशा रोगापासून झालेली अजका (वडस) फार दिवसाची असली तरी काळ्या

बुबुळावर असतां ती बरी करावी.

अजकायां शिरां मुक्त्वा त्रिवृच्चूर्णैर्विरेचयेत् ।
घृतं वातहरैः सिद्धमजकायां प्रयोजयेत् ।
सेके पाने तथाऽभ्यङ्गे भोज्ये दृष्टिविदां वरः ॥ ४ ॥

अजकेवर शीर तोडून नंतर तेडाचें चूर्ण देऊन रेच करवावे. वातनाशक औषधांनीं सिद्ध केलेलें तूप अजकेवर शिंपडण्यांत, पिण्यांत, अंगाला लावण्यांत व जेवणांत योजावें.

पक्ववटपत्रपुटके निधाय मांसं धवलकर्कटकान् ।
पुटवह्निदह्य बद्ध्वा तद्रससेको जयेदजकाम् ॥ ५ ॥

वडाच्या पिकलेल्या पानांत पांढऱ्या खेकड्याचें मांस घालून पुटपाकाप्रमाणें उकडून तें फडक्यांत बांधून त्याचा रस डोळ्यांत पिळावा. तो अजकेचा नाश करतो.

गवामस्थित्वचं कांस्ये विनिर्घृष्य सुखाम्बुना ।
पूरयेदक्षि तेनाऽऽशु प्रशाम्यत्यजकामयः ॥ ६ ॥

गाईचीं हाडें व त्वचा कांशाच्या भांड्यांत ऊन पाण्यांत कुसकरून त्या पाण्यानें डोळे भरावे. म्हणजे अजकेचा त्वरित नाश होतो.

अङ्गारपक्वशम्बूकरसेनाऽऽश्चोतनाञ्जनम् ।
कर्पूरचूर्णयुक्तेन शाम्यते त्वजकामयः ॥ ७ ॥

शिंपींतील किडा निखाऱ्यावर भाजून त्याचा रस काढून त्यांत कापराचें चूर्ण घालून तो रस डोळ्यांत घालावा; म्हणजे अजकेचा नाश होतो.

सैन्धवं वाजिपादं च गोरोचनसमायुतम् ।
शेलुत्वग्रससंयुक्तं पूरणं चाजकापहम् ॥ ८ ॥

सैंधेलोण, घोड्याचा खूर, गोरोचन व भोंकरीच्या सालीचा रस ह्यांचा एकत्र खल करून तो रस डोळ्यांत घालावा.

शशकादि घृत.

शशकस्य कषाये तु घृतप्रस्थं विपाचयेत् ।
कल्कं दद्यात्तु सक्षीरं यथोक्तान्कर्षसंमितान् ॥ १ ॥
सारिवा मधुकं लाक्षा चन्दनं नीलमुत्पलम् ।
बला चातिबला चैव मृणालं पत्रकं तथा ॥ २ ॥
कार्षिकं सविषं लोध्रं जीवनीयगणान्वितम् ।

घृतमेतत्प्रयोक्तव्यं पाने नस्ये च पूरणे ॥ ३ ॥
अजकामर्जुनं काचं पटलं शुक्रमेव च ।
तथाऽक्षिरोगान्सकलान्वातपित्तोत्तराञ्जयेत् ॥ ४ ॥

ससा मारून त्याचा काढा करून त्यांत चौसष्ट तोळे तूप आणि उपलसरी, जेष्टमध, लाख, चंदन, निळें कमळ, चिकणामूळ, पेटारीचें मूळ, कमळ, तमालपत्र, बचनाग, लोध्र व जीवनीय गणांतील औषधें ह्यांचा कल्क एक एक तोळा व दूध हीं घालून तूप सिद्ध करावें. हें तूप पिणें, नाकांत घालणें व डोळ्यांत भरणें ह्यांमध्यें योजावें. म्हणजे तें अजका, अहिरा, काच, पटल, शुक्र व त्याचप्रमाणें वातपित्तजन्य नेत्ररोग ह्यांचा नाश करितें.

शुक्लगतरोगचिकित्सा.

प्रस्तार्यर्माथ स्नाय्वर्म तथैवार्माधिमांसकम् ।
लोहितार्म सशुक्लार्म शुक्लप्राप्तानि वेदयेत् ॥ १ ॥
अर्मवाच्यं दधिनिभं नीलं रक्तमथापि वा ।
धूसरं तनु यच्चाऽऽशु शुक्रवत्समुपाचरेत् ॥ २ ॥

प्रस्तारी अर्म, स्नाय्वर्म, अधिमांसक अर्म, रक्तार्म व शुक्लार्म हीं अर्में पांढऱ्या बुबुळावर होतात. जें अर्म दह्यासारखें असतें, तसेंच जें निळें, तांबडें, धुरकट व पसरट असतें, त्याजवर फुलाप्रमाणें चिकित्सा करावी.

कृष्णादि पुटपाक.

कृष्णालोहरजस्ताम्रशंखविद्रुमसिन्धुजैः ।
समुद्रफेनकासीसस्रोतोजदधिमस्तुभिः ॥
लेखने वा कृते तस्य परं धारणमिष्यते ॥ १ ॥

पिंपळी, लोहभस्म, ताम्रभस्म, शंख, पोवळें, सेंधेलोण, समुद्रफेस, हिराकस, शिसें, व सुरमा ह्यांचा दह्याच्या पाण्यांत खल करून अंजन करावें. हें उत्तम लेखन आहे.

पिपल्यादि गुटिका.

पिप्पलीत्रिफलालाक्षालोहचूर्णं ससैन्धवम् ।
भृङ्गराजरसे पिष्टं गुटिकाञ्जनमिष्यते ॥ १ ॥
अर्मं सतिमिरं काचं कण्डूं शुक्रमथार्जुनम् ।
अजकां नेत्ररोगांश्च हन्याान्निरवशेषतः ॥ २ ॥

पिंपळी, त्रिफळा, लाख, लोहचूर्ण व सैंधेलोण ह्यांचे चूर्णाचा माक्याच्या रसांत खल करून त्याची गोळी करावी. हिचें अंजन केलें असतां ती वडस, काच, तिमिर, कंडु, फूल, अहिरा, अजका (वडसाचा एक प्रकार) व इतर नेत्ररोग ह्यांचा निःशेष नाश करिते.

मरिचादि लेप.

संचूर्ण्य मरिचाक्षे च रजन्या रसमर्दिते ।
लेपनादर्मणां नाशं करोत्येष प्रयोगराट् ॥ १ ॥

मिरें व बेहडे ह्यांचें चूर्ण करून हळदीच्या रसांत (काढ्यांत) घोटून त्याचा वडसावर लेप करावा. तो वडसाचा नाश करितो.

पुष्पाक्षादि रसक्रियालेह.

पुष्पाक्षताक्ष्यर्जसितोदधिफेनशंख-
सिन्धूत्थगैरिकाशिलामरिचैः समांशैः ।
पिष्टैस्तु माक्षिकरसेन रसक्रियेयं
हन्त्यर्मकाचतिमिरार्जुनवर्त्मरोगान् ॥ १ ॥

जस्ताचें फूल, सुरमा, रसांजन, खडीसाखर, समुद्रफेस, शंख, सैंधव, सोनकाव, मनशीळ, व मिरें ह्यांचें चूर्ण करून तें मधांत कालवून त्याचें अंजन करावें. तें वडस, काचबिंदु, तिमिर, अहिरा व पापण्यांचे रोग ह्यांचा नाश करितें.

क्रिया शुक्रामये कार्या पित्ताभिष्यन्दजिच्छुभा ।
बलासाह्वयपिष्टे तु कार्यं शोणितमोक्षणम् ॥ २ ॥
कफाभिष्यन्दजित्सर्वं क्रमं कुर्याद्विचक्षणः ।

पांढऱ्या बुबुळाच्या रोगावर पित्ताभिष्यंदावरील चिकित्सा करावी. बलासपिष्टावर रक्त काढावें व कफजन्य अभिष्यंदावरील सर्व क्रिया करावी.

अञ्जनं कट्फलव्योषबीजपूररसाञ्जनैः ॥ ३ ॥

कायफळ, सुंठ, मिरें, पिंपळी, महाळुंग व रसांजन ह्यांचें अंजन करावें.

अर्जुने शर्करामस्तुक्षौद्रैराश्चोतनं हितम् ।

अहिऱ्यावर दह्यावरील पाणी, खडीसाखर व मध एकत्र करून त्याचें अंजन करावें.

शंखः क्षौद्रेण संयुक्तः कतकः सैन्धवेन वा ।
सितयाऽर्णवफेनो वा पृथगञ्जनमर्जुने ॥ ४ ॥

मधांतून शंख अथवा निवळीची बी आणि सेंधेलोण किंवा खडीसाखर व समुद्रफेस या प्रत्येकाचें अर्जुन्यावर अंजन करावें.

पापण्या व त्यांचे केस ह्यांची चिकित्सा.

उत्सङ्गिनी बहलकर्दमवर्त्मनी च
श्यावं च यच्च पठितं त्विह अर्शवर्त्म ।
क्लिष्टं च पोथकियुतं खलु वर्त्म यच्च
कुम्भीकिनी च सह शर्करया च लेख्याः ।
श्लेष्मोपनाहलगणं च बिसं च भेद्या
ग्रन्थिश्च यः क्रिमिकृतोऽञ्जननामिका च ॥ १ ॥

उत्संगिनी, बहलवर्त्म, कर्दमवर्त्म, श्याववर्त्म, अर्शोवर्त्म, पोथकी (खुपऱ्या), कुंभिका व वर्त्मशर्करा ह्यांचें लेखन करावें. श्लेष्मोपनाह, लगण व बिसवर्त्म ह्यांचें भेदन करावें. व क्रिमिग्रंथि व अंजननामिका ह्यांचेंही भेदन करावें.

स्विन्नां भित्त्वा विनिष्पीड्य भिन्नामंजननामिकाम् ।
शिलैलानतसिन्धूत्थैः सक्षौद्रैः प्रतिसारयेत् ।
रसांजनमधुभ्यां वा भित्त्वा शस्त्रेण वर्त्मवित् ।
प्रतिसार्यांजनैर्युञ्ज्यादुष्णैर्दीपशिखोद्भवैः ॥ ३ ॥
स्वेदयेद् घृष्टयांऽगुल्या हरेद्रक्तं जलौकया ।
करे संघृष्य दुर्वर्ण्यमंजयेल्लोचने मुहुः ॥ ५ ॥
द्वित्रिवाराञ्शमयति कण्डूदोषान्वितांजनम् ।

फुटलेल्या अंजननामिकेचें प्रथम स्वेदन करून, फोडून, पिळून काढून तिजवर मनशीळ, वेलदोडे, कोष्ट, सैंधव, व मध ह्या औषधांनीं प्रतिसारण करावें (घासावें), किंवा शस्त्रानें फोडून रसांजन व मध ह्यानें घासावें. ह्याप्रमाणें प्रतिसारण करून दिव्याच्या काजळानें युक्त अशीं उष्ण अंजनें घालावीं. अंजननामिकेचें स्वेदन करून बोटानें घासून जळवा लावून रक्त काढावें. कोष्ट (दुर्वर्ण्य) तळहातावर घासून त्याचें वरचेवर डोळ्यांत अंजन करावें. ह्याप्रमाणें दोन तीन वेळ केलें असतां कंडु व पाक ह्यांसह अंजननामिकेचा नाश होतो.

रसांजनं व्योषयुतं सपिष्टं वटकीकृतम् ॥ ५ ॥
कण्डूपाकान्वितं हन्ति नूनमंजननामिकाम् ।

रसांजन, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून, गोळी करून तिचें डोळ्यांत अंजन करावें, म्हणजे अंजननामिकेचा नाश होतो.

रोचनाक्षारतुत्थानि पिप्पल्यः क्षौद्रमेव च ॥ ६ ॥
प्रतिसारणमेकैकं भिन्ने लगण इष्यते ।
निमेषं नाशमायाति सर्पिस्तेन च पूरणम् ॥ ७ ॥

लगण फुटला असतां त्याजवर गोरोचन, जवखार, मोरचूत, पिंपळी, व मध ह्यांपैकीं एकाएकाचें प्रतिसारण (घासणें) केलें तरी हितकर आहे. तुपाचें पूरण करावें, म्हणजे निमेषरोगाचा नाश होतो.

स्वेदयित्वा बिसग्रन्थिच्छिद्राण्यस्य निराश्रयेत् ।
पक्वं भित्त्वा तु शस्त्रेण सैन्धवेन प्रपूरयेत् ॥ ८ ॥

बिसवर्त्माच्या गाठीचें स्वेदन करून छिद्रें मोकळीं करावीं. आणि ती पिकली असतां फोडून तींत सैंधवाचें चूर्ण भरावें.

क्लिन्नवर्त्मचिकित्सा.

आलदारुवचाः पिष्ट्वा सुरसापत्रवारिणा ।
छायाशुष्का कृता वर्तिः क्लिन्नवर्त्मनिवारणी ॥ १ ॥

हरताळ, देवदार व वेखंड ह्यांचें चूर्ण करून त्याचा तुळशीच्या रसांत खल करावा आणि गोळी करावी व ती सावलींत वाळवावी. ती क्लिन्नवर्त्माचा नाश करिते.

रसांजनं सर्जरसो जातीपुष्पं मनःशिला ।
समुद्रफेनो लवणं गैरिकं मरिचानि च ॥ २ ॥
एतत्समांशं मधुना पिष्ट्वा प्रक्लिन्नवर्त्मनि ।
अंजनं क्लेदकण्डूघ्नं पक्ष्मणां च प्ररोहणम् ॥ ३ ॥

रसांजन, राळ, जाईचीं फुलें, मनशीळ, समुद्रफेस, सैंधेलोण, सोनकाव, व मिरें ह्यांचा मधांत खल करून त्याचें क्लिन्नवर्त्मावर डोळ्यांत अंजन करावें. तें ओलसरपणा व कंडु ह्यांचा नाश करितें, आणि पापण्यांचे गेलेले केस उत्पन्न करितें.

पिल्ल.

पित्तश्लेष्मप्रकोपेण वर्त्मान्तः संप्रकुप्यते ।
नाम्नाऽतिलोमशं वाऽपि विक्लिष्टं पिल्लमेव च ॥ १ ॥

वर्त्मावलेख्यं बहुशस्तद्वच्छोणितमोक्षणम् ।
पुनः पुनर्विरेकं च पिल्लरोगातुरो भजेत् ॥ २ ॥

कफपित्ताच्या प्रकोपानें पापण्यांचा आंतील बाजूस क्षोभ होतो. त्याला अतिक्लोमश, विक्लिष्ट किंवा पिल्ल असें म्हणतात. त्याजवर पापणीचें बरेच वेळां लेखन करावें व रक्त काढावें. तसेंच पिल्ल-रोगावर वरचेवर विरेचन द्यावें.

पिल्ली स्निग्धो वमेत्पूर्वं क्रियाव्यवसृतेऽसृजि ।
शिलारसांजनव्योषगोपित्तैर्वर्तिरंजनम् ॥ ३ ॥

पिल्लरोगामध्यें प्रथम विधिपूर्वक रक्त काढून, स्नेहन देऊन, नंतर वमन द्यावें. आणि मनशीळ, रसांजन, सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांच्या चूर्णाचा गाईच्या पित्तांत खल करून लांबट गोळी करून तिचें अंजन करावें. तें पिल्लाचा नाश करितें.

पिल्लघ्नं छागमूत्रेण भावितं देवदारु च ।

देवदाराच्या चूर्णाला शेळीच्या मुताच्या भावना द्याव्या व त्याचें अंजन करावें. तें पिल्लनाशक आहे.

हरितालवचादारुसुरसारसपेषितम् ॥ ४ ॥
अभयारससंपिष्टं तगरं पिल्लनाशनम् ।

हरताळ, वेखंड व देवदार ह्यांचा तुळशीच्या रसांत खल करून त्याचें अंजन करावें. त्याचप्रमाणें हिरड्याच्या काढ्यांत तगराचें चूर्ण खलून त्याचें अंजन करावें. तें पिल्लाचा नाश करितें.

ताम्रपात्रे गुहामूलं सिन्धूत्थं मरिचान्वितम् ॥ ५ ॥
आरनालेन संघृष्टमंजनं पिल्लनाशनम् ।

साळवण किंवा पिटवण ह्यांचें मूळ, सैंधेलोण व मिरें ह्यांचें चूर्ण तांब्याच्या भांड्यांत कांजीमध्यें घोटून त्याचें अंजन करावें. तें पिल्लाचा नाश करितें.

तुत्थकस्य पलं श्वेतमरिचानि च विंशतिः ॥ ६ ॥
त्रिंशता कांजिकपलैः पिष्ट्वा ताम्रे निधापयेत् ।
पिल्लानपिल्लान्कुरुते बहुवर्षोत्थितानपि ।
उत्सेकेनोपदेहेन कण्डूशोथांश्च नाशयेत् ॥ ७ ॥

मोरचूत चार तोळे व पांढरीं मिरें वीस ह्यांचें चूर्ण करून एकशें-वीस तोळे कांजींत घालून, तांब्याच्या भांड्यांत ठेवावें, व त्याचें

अंजन करावें. तें फार वर्षांचे पिल्लरोगाचा नाश करितें. त्याचप्रमाणें ह्याचा डोळ्यावर लेप करावा, अथवा हें औषध डोळ्यावर शिंपावें, म्हणजे कंडु व सूज ह्यांचा नाश करितें.

पापण्यांच्या केंसाची चिकित्सा.

रक्षन्नक्षि दहेत्पक्ष्म तप्तलोहशलाकया ।
पक्ष्मकोपे पुनर्नैव कदाचिद्रोमसंभवः ॥ १ ॥
पुष्पकासीसचूर्णं वा सुरसारसभावितम् ।
ताम्रे दशाहं तद्योज्यं पक्ष्मशातनलेपनम् ॥ २ ॥

डोळा संभाळून त्याला स्पर्श न होऊं देतां तापलेल्या लोखंडाच्या सळईनें पापण्यांच्या केंसाच्या ठिकाणीं डाग द्यावा. म्हणजे पुनः उलटे केस येत नाहींत. किंवा हिराकसाच्या चूर्णाला तुळशीच्या रसाची भावना देऊन तें औषध दहा दिवसपर्यंत तांब्याच्या भांड्यांत ठेवून गळणाऱ्या पापण्याच्या केसाचे ठिकाणीं लावावें.

पूयालसचिकित्सा.

पूयालसे शिरां भित्त्वा लेपोपनाहकर्मभिः ।
नेत्रपाकविधिं कुर्यात्परमुक्तांजनं हितम् ॥ १ ॥

पूयालसावर शीर तोडून नेत्रपाकावरील लेप व पोटीस वगैरे उपचार करून नंतर मागें सांगितलेलीं अंजनें करावीं.

आर्द्रकस्वरसैर्घृष्टं सिन्धुकासीससंमितम् ।
छायाशुष्कां वटीं कुर्यात्पूयाख्ये हितमंजनम् ॥ २ ॥

सेंधेलोण व हिराकस समभाग घेऊन त्यांचा आल्याच्या रसांत खल करून गोळी करावी, व तिचें अंजन करावें. तें पूयालसावर हितकारक आहे.

उपनाह व अलजी ह्यांची चिकित्सा.

हितोपनाहे त्वलजे पिप्पलीमधुसैन्धवैः ।
विलिखेन्मण्डलाग्रेण छेदयेद्वा समन्ततः ॥ १ ॥

उपनाह व अलजी यांवर प्रथम मंडलाग्रानें सभोंवार छेदन करून पिंपळी व सेंधेलोण ह्यांच्या चूर्णानें लेखन करावें.

स्राव.

स्रावेषु त्रिफलाक्वाथं यथादोषं प्रयोजयेत् ।

क्षौद्रेणाऽज्येन पिप्पल्या मिश्रं विध्येच्छिरां तथा ॥ १ ॥
स्रावावर त्रिफळ्याचा काढा दोषानुरूप मध, तूप किंवा पिंपळीचें चूर्ण घालून योजावा व शीर तोडावी.

पथ्याक्षधात्रीफलमध्यबीजैस्त्रिद्व्येकभागैर्विदधीत वर्तिम्।
तयाऽजयेद्स्रमतिप्रवृद्धमक्ष्णोर्हरेत्कष्टमपि प्रकोपम् ॥ २ ॥
हिरड्यांतील बी तीन भाग, बेहड्यांतील बी दोन भाग आणि आवळकाठींतील बी एक भाग ह्यांची लांबट वात करून त्याचें अंजन करावें; म्हणजे अत्यंत क्षुब्ध होऊन वाहणाऱ्या कष्टसाध्य अशा डोळ्यांतील रक्तस्रावाचा नाश होतो.

कार्पासीफलजम्ब्वाम्रजलैर्घृष्टं रसांजनम्।
मधुयुक्तं चिरोत्थं च चक्षुःस्रावमपोहति ॥ ३ ॥
कापशीचें फळ जांभळीच्या व आंब्याच्या पानांच्या रसांत वाटून त्यांत मध घालून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. तें फार दिवसांच्या डोळ्याच्या स्रावाचा (नेत्रनाडीचा—लासुराचा) नाश करितें.

पर्वणी.

पर्वणीपिटिकां संधिभागे छिन्द्यादसंशयम्।
हितमाश्चोतनं तत्र योजयेन्मधुसैन्धवैः ॥ १ ॥
पर्वणी नांवाच्या पुळीचा सांध्यावर छेद करून त्याजवर मध व सैंधेलोण एकत्र करून लावावें.

क्रिमिग्रंथि.

त्रिफलामृतकासीससैन्धवैः सरसांजनैः।
रसक्रिया कृमिग्रन्थौ भिन्ने स्यात्प्रतिसारणम् ॥ १ ॥
त्रिफळा, पिंपळी, हिराकस, सैंधेलोण, व रसांजन ह्यांचें लेहाप्रमाणें पातळ औषध करून तें कृमिग्रंथि फुटल्यावर वर घासावें.

सेकविधि.

सेकस्तु सूक्ष्मधाराभिः सर्वस्मिन्नयने हितः।
मीलिताक्षस्य मर्त्यस्य प्रदेयश्चतुरंगुलः ॥ १ ॥
सर्वोऽपि स्नेहनो वाते रक्ते पित्ते च रोपणः।
लेखनश्च कफे कार्यस्तत्र मात्राऽधुनोच्यते ॥ २ ॥
डोळे मिटून सर्व डोळ्यावर चार अंगुळें उंचीवरून बारीक धार धरून औषध शिंपावें. वातजन्य रोगावर स्निग्ध औषध शिंपावें.

रक्तजन्य व पित्तजन्य नेत्ररोगावर रोपण औषध शिंपावें. आणि कफजन्य रोगावर लेखन औषध शिंपावें. त्याच्या कालाचें प्रमाण सांगतों.

षड्वाक्शतैः स्नेहनेषु चतुर्भिश्चैव रोपणे ।
वाक्शतैश्च त्रिभिः कार्यः सेको लेखनकर्मणि ।
कार्यस्तु दिवसें सेको रात्रौ वाऽऽत्ययिके गदे ॥ ३ ॥

सहाशें गुरु अक्षरें उच्चारण्याला जो काळ लागतो, तितका वेळ स्नेहन सेक करावा. चारशें गुरु अक्षरें उच्चारण्याचा जो काळ, तितका वेळ रोपण सेक करावा आणि तीनशें गुरु अक्षरें मोजण्याचा जो काळ तितका वेळ लेखन सेक करावा. औषध शिंपण्याचा प्रयोग दिवसा करावा आणि रोगाचा फार जोरच असेल तर रात्रीं करावा.

आश्चोतनविधि.

अथ त्वाश्चोतनं कार्यं निशायां न कथंचन ।
उन्मीलितेऽक्ष्णि दृङ्मध्ये बिन्दुभिर्द्व्यंगुलाङ्कितम् ॥ १ ॥
बिन्दवोऽष्टौ लेखनेषु स्नेहने दश बिन्दवः ।
रोपणे द्वादश प्रोक्तास्ते शीते कोष्णरूपिणः ॥ २ ॥
उष्णे च शीतरूपाः स्युः सर्वत्रैवैष निश्चयः ।

आश्चोतन करणें (डोळ्यांत औषधांचे थेंब सोडणें) तें रात्रीं केव्हांही करूं नये. औषधाचे थेंब डोळ्यांत सोडावयाचे ते डोळे उघडून त्यांत दोन बोटें उंचीवरून सोडावे. तें हितकारक आहे. लेखन कर्मासाठीं औषधांचे आठ थेंब डोळ्यांत सोडावे. स्नेहन औषधाचे दहा थेंब सोडावे व रोपण औषधाचे बारा थेंब सोडावे. थंडीपासून होणाऱ्या विकारांत कोमट थेंब सोडावे, आणि उष्णविकारामध्यें ते थंड सोडावे. सर्व क्रियेमध्यें अशीच योजना करावी.

वाते तिक्तं तथा स्निग्धं पित्ते मधुरशीतलम् ॥ ३ ॥
तिक्तोष्णरूक्षं च कफे क्रमादाश्चोतनं हितम् ।
आश्चोतनानां सर्वेषां मात्रा स्याद्वाक्शतोन्मिता ॥ ४ ॥
निमेषोन्मेषणं पुंसामंगुल्योश्छोटिकाऽथ वा ।
गुर्वक्षरोच्चारणं वा वाङ्मात्रेयं स्मृता बुधैः ॥ ५ ॥

वातजन्य विकारावर कडू व स्निग्ध आश्चोतन करावें. पित्तजन्य विकारांत मधुर व थंड असें आश्चोतन करावें. व कडू, ऊष्ण व रूक्ष असें आश्चोतन कफविकारामध्यें करावें. तें हितकारक

आहे. सर्व आश्चोतनांचा काळ दोनशें गुरु अक्षरें उच्चारण्याच्या काळाइतका आहे. डोळ्याची उघडझाप होण्याचा जो काळ, अंगुलीनें चुटकी वाजविण्याचा जो काळ किंवा एक गुरु अक्षर उच्चारण्याचा जो काळ त्या काळाला वाङ्मात्रा (सेकंद) असें म्हणताता.

पिंडिकाविधि.

पिण्डी कवलिका प्रोक्ता बध्यते वस्त्रपट्टकैः
नेत्राभिष्यन्दयोग्या सा व्रणेष्वपि निगद्यते ॥ १ ॥

औषधाची फडक्यांत पोथंडी करितात, त्याला पिंडिका अथवा कवलिका असें म्हणतात. ती आलेल्या डोळ्यावर व व्रणावर योजण्याला योग्य आहे.

बिडालकविधि.

बिडालको बहिर्लेपो नेत्रे पक्ष्मविवर्जिते ।
तस्य मात्रा परिज्ञेया मुखलेपविधानवत् ॥ १ ॥

डोळ्याच्या बाहेरच्या बाजूस पापण्या सोडून जो सभोंवार लेप (ओढा) करितात, त्याला बिडालक असें म्हणतात. त्याचा काल मुखलेपनाच्या कालाइतका समजावा.

तर्पणविधि.

अथ तर्पणकं वच्मि नेत्रतृप्तिकरं परम् ।
यच्चक्षुः परिशुष्कं च नेत्रं कुटिलमाविलम् ॥ १ ॥

---

१. मुखलेपविधानासंबंधीं पुढील श्लोक आनंदाश्रमांतील प्रतीच्या टीपेंत आहे तोः—

अंगुलस्य चतुर्थांशो मुखलेपः कनिष्ठकः ॥
मध्यमस्तु त्रिभागः स्यादुत्तमोऽर्धांगुलो भवेत् ॥
स्थितिकालोऽपि तस्योक्तो यावत्कल्को न शुष्यति ।
तेनापि गुणहीनः स्यात्तथा दूषयति च्छविम् ॥

तोंडावर लेप करणें तो चवथाई अंगुळ जाडीचा केला असतां कनिष्ठ, तिसरा हिस्सा केला असतां मध्यम, आणि अर्धांगुळ जाडीचा लेप उत्तम समजावा. हा लेप लावल्यापासून वाळला नाहीं तोंपर्यंत ठेवावा. वाळूं लागतांच काढून टाकावा. कारण तो वाळल्यावर गुणहीन होतो, व त्वचेची कांति दूषित करतो.

शीर्णपक्ष्मशिरोत्पातकृच्छ्रोन्मीलनसंयुतम् ।
तिमिरार्जुनशुक्राद्यैरभिष्यन्दाधिमन्थकैः ॥ २ ॥
शुष्काक्षिपाकशोथाभ्यां युतं वातविपर्ययैः ।
तन्नेत्रं तर्पणे योज्यं नेत्ररोगविशारदैः ॥ ३ ॥
दुर्दिनात्युष्णशीतेषु चिन्तायासभ्रमेषु च ।
अशान्तोपद्रवे चाक्षिण तर्पणं न प्रशस्यते ॥ ४ ॥

डोळ्याला प्रसन्नता आणणारा असा तर्पणविधि आतां सांगतों. जे डोळे सुकल्यासारखे झाले आहेत, तसेंच जे वाकडे झाले आहेत गढूळ झाले आहेत, ज्यांच्या पापण्याचे केस गळले आहेत, व ज्यांच्या डोळ्यांना शिरोत्पात, कृच्छ्रोन्मीलन, तिमिर, अर्जुन (अहिरा), शुक्र (फूल) वगैरे रोग, तसेंच अभिष्यंद, अधिमंथ, शुष्काक्षिपाक, शोथ व वातविपर्यय हे विकार झाले आहेत, अशा डोळ्याचें नेत्र-वैद्यांनीं तर्पण करावें. ज्या दिवशीं अभ्रें वगैरे येऊन हवा कुंद झाली असेल व हवेंत अतिशय उष्णता किंवा अतिशय थंडी असेल, अशा वेळीं आणि जेव्हां नेत्ररोग्याला काळजी, आयास, भ्रम हे विकार असतील व डोळ्याचे इतर उपद्रव शांत झाले नसतील, अशा प्रसंगीं तर्पण करणें प्रशस्त नाहीं.

वातातपरजोहीने देशे चोत्तानशायिनः ।
आधारौ माषचूर्णेन क्लिन्नेन परिमण्डलौ ॥ ५ ॥
समौ दृढावसंबाधौ कर्तव्यौ नेत्रकोशयोः ।
पूरयेद् घृतमण्डेन विलीनेन सुखोदकैः ॥ ६ ॥
अथ वा शतधौतेन सर्पिषा क्षीरजेन वा ।
निमज्जन्त्यक्षिपक्ष्माणि यावता तावदेव हि ॥ ७ ॥
पूरयेन्मीलिते नेत्रे तत उन्मीलयेच्छनैः ।
धारयेद्वर्त्मरोगेषु वाङ्मात्राणां शतं बुधः ॥ ८ ॥
स्वच्छे कफे संधिरोगे मात्रापञ्चशतं हितम् ।
शुक्ले च षट्शतं कृष्णरोगे सप्तशतं मतम् ॥ ९ ॥
दृष्टिरोगेष्वष्टशतमधिमन्थे सहस्रकम् ।
सहस्रं वातरोगेषु धार्यमेवं हि तर्पणम् ॥ १० ॥
एकाहं वा त्र्यहं वापि पञ्चाहं चेष्यते परम् ।
तर्पणात्तृप्तिलिङ्गानि नेत्रस्यैतानि लक्षयेत् ॥ ११ ॥

वारा, ऊन किंवा धुरळा नसेल अशा ठिकाणीं रोग्याला उताणें

निजवून डोळ्याच्या खालीं सभोंवार सारखें व बळकट व डोळ्याला बाधा होणार नाहीं अशा बेताचें आळें करून त्यांत तुपाची निवळ घातलेलें सोसेल असें ऊन पाणी भरावें. अथवा शतधौत केलेल्या तुपानें किंवा दुधावरील काढलेल्या लोण्याच्या तुपानें भरावें. आळें भरावयाचें तें पापण्यांचे केस त्यांत बुडतील अशा बेतानें भरावें. आळीं भरतांना डोळे मिटावेत. नंतर ती भरल्यावर हळुहळु डोळे उघडावे. हें आळ्यांत भरलेलें औषध पापण्यांचे रोग असल्यास शंभर वाङ्मात्रा धारण करावें. कफ दूषित झाला नाहीं अशा संधिगत रोगांत पांचशें वाङ्मात्रा (सेकंद) औषध धारण करावें. तें हितकारक आहे. पांढऱ्या बुबुळाच्या रोगावर सहाशें वाङ्मात्रा, काळ्या बुबुळाच्या रोगावर सातशें वाङमात्रा, दृष्टीच्या रोगावर आठशें वाङ्मात्रा, अधिमंथावर एक हजार वाङ्मात्रा, आणि वातरोगावर एक हजार वाङ्मात्रा तर्पण औषध धारण करावें. तर्पण करावयाचें तें एक दिवस, तीन दिवस किंवा पराकाष्ठा पांच दिवस करावें. तर्पण औषधानें तृप्ति झाल्याचें लक्षण पुढें सांगितल्याप्रमाणें समजावें.

सुखस्वप्नावबोधत्वं वैशद्यं वर्णपाटवम् ।
निर्वृतिर्व्याधिशान्तिश्च क्रियालाघवमेव च ॥ १२ ॥

सुखानें झोंप लागणें व जागें होणें, डोळे स्वच्छ होणें, डोळ्याचा रंग उजळ होणें, व्याधीचें निवारण व शमन होणें आणि कार्यांत डोळ्याला हलकेपणा वाटणें हें डोळ्याचें उत्तम प्रकारें तर्पण झाल्याचें लक्षण आहे.

अथ साश्रु गुरु स्निग्धं नेत्रं स्यादतितर्पितम् ।

डोळ्यांतून पाणी येणें, डोळे जड होणें, व डोळ्याला अतिशय स्निग्धपणा असणें हें अतितर्पणाचें लक्षण आहे.

रूक्षमस्राविलं रूक्षं नेत्रं स्याद्धीनतर्पितम् ।

डोळ्याला रूक्षपणा, डोळे लाल होणें, व गढूळ होणें, हें हीन (विधियुक्त न झालेल्या) तर्पणाचें लक्षण आहे.

रूक्षस्निग्धोपचाराभ्यामेतयोः स्यात्प्रतिक्रिया ॥ १३ ॥

अतितर्पण झालेल्या डोळ्यावर रूक्ष उपचार करावे; आणि हीन तर्पण झालेल्या डोळ्यावर स्निग्ध उपचार करावे.

सेक.

एरण्डत्वक्पत्रमूलैः शृतमाजं पयो हितम् ।
सुखोष्णं सेचनं नेत्रे वाताभिष्यन्दनाशनम् ॥ १ ॥

एरंडाचीं पानें, साल व मुळ्या घालून शेळीचें दूध पचन करावें, आणि तें सोसेल असें ऊन ऊन डोळ्यावर शिंपावें. तें वातजन्य अभिष्यंदाचा नाश करितें.

परिषेके हितं नेत्रे पयः कोष्णं ससैन्धवम् ।
रजनीदारुसिद्धं वा सैन्धवेन समन्वितम् ।
वाताभिष्यन्दशमनं हितं मारुतपर्यये ॥ २ ॥

सैंधेलोण घालून कोमट केलेलें दूध डोळ्यावर शिंपण्याला हितकारक आहे. तें वाताभिष्यंदाचा नाश करितें. अथवा देवदार व हळद घालून सिद्ध केलेल्या दुधांत सैंधेलोण घालून तें कोमट दूध डोळ्यांवर शिंपण्याला हितकारक आहे. तें वाताभिष्यंदाची शांति करितें व वातपर्यायावरही तें हितकारक आहे.

आश्चोतन.

बिल्वादिपञ्चमूलेन बृहत्येरण्डशिग्रुभिः ।
काथश्चाऽऽश्चोतनं कोष्णो वाताभिष्यन्दनाशनः ॥ १ ॥

बेलमूळ वगैरे मोठीं पंचमुळें व डोरलीमूळ, एरंडमूळ व शेवग्याचें मूळ, ह्यांचा काढा करून त्या कोमटशा काढ्याचें आश्चोतन करावें. तें वातजन्य अभिष्यंदाचा नाश करितें.

अम्बुपिष्टैर्निम्बपत्रैस्त्वचं लोध्रस्य पेषयेत् ।
प्रताप्य वह्निना पिष्ट्वा तद्रसो नेत्रपूरणात् ।
वातोत्थं रक्तपित्तोत्थमभिष्यन्दं विनाशयेत् ॥ २ ॥

लोध्राची साल व कडुनिंबाचा पाला पाण्यांत वाटून ऊन करून फडक्यांत धरून त्या रसाचे डोळ्यांत थेंब सोडावे. ते वातजन्य व रक्तपित्तजन्य अभिष्यंदाचा नाश करितात.

पिंडिका.

वाताभिष्यन्दशान्त्यर्थं स्निग्धोष्णा पिण्डिका भवेत् ।

एरण्डपत्रमूलत्वक्‌निर्मिता वातनाशिनी ॥ १ ॥

वातजन्य अभिष्यंदाची शांति होण्याकरितां एरंडाचीं पानें, एरंडमूळ व एरंडाची साल हीं एकत्र वाटून (त्यांत तूप किंवा तेल घालून) स्निग्ध अशी पुरचुंडी करावी.

अंजन.

हरिद्रा मधुकं पथ्या देवदारु च पेषयेत् ।
आजेन पयसा श्रेष्ठमभिष्यन्दे तदञ्जनम् ॥ १ ॥

हळद, ज्येष्ठमध, हिरडा व देवदार हीं शेळीच्या दुधांत बारीक वाटून त्याचें डोळयांत अंजन करावें. तें वाताभिष्यंदावर उत्तम आहे.

सेक.

चन्दनारिष्टपत्राणि यष्टीदार्व्यास्ससैन्धवैः ।
पिष्ट्वाऽम्भसा भवेत्सेकः पित्ते क्षौद्रसमन्वितः ॥ १ ॥

रक्तचंदन, कडुनिंबाचीं पानें, ज्येष्ठमध, दारुहळद व सैंधेलोण हीं औषधें पाण्यांत वाटून त्यांच्या पाण्यांत मध घालून तें पित्ताभिष्यंदावर डोळ्यावर शिंपावें.

आश्चोतन.

निम्बस्य पत्रैः परिलिप्य लोध्रं स्वेदोऽग्निना चूर्णमथापि कल्कम् ।
आश्चोतनं मानुषदुग्धमिश्रं पित्तास्रवातापहमग्र्यमुक्तम् ॥ १ ॥

लोध्राच्या सालीवर कडुनिंबाचीं पानें वाटून त्यांचा लेप करावा, आणि ती साल उकडून काढावी. नंतर तिचा कल्क अथवा चूर्ण करून त्यांत स्त्रीचें दूध मिसळून त्याचें आश्चोतन करावें. तें रक्तपित्तज व वातज अभिष्यंदाचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

द्राक्षामधुकमञ्जिष्ठाजीवनीयैः शृतं पयः ।
प्रातराश्चोतनं पथ्यं दाहशूलाक्षिरागजित् ॥ २ ॥

द्राक्षें, ज्येष्ठमध, मंजिष्ठ व जीवनीय गणांतील औषधें घालून शिजविलेलें दूध सकाळीं आश्चोतनाकरितां योजावें. तें हितकारक असून दाह, शूळ व डोळ्याची लाली ह्यांचा नाश करितें.

पित्ताभिष्यन्दनाशाय धात्रीपिण्डी सुखावहा ।
महानिम्बदलोद्भूता पिण्डिका पित्तनाशिनी ॥ १ ॥

आवळकाठीच्या चूर्णाची किंवा बकाणनिंबाच्या पानांची वडी करून ती पित्ताभिष्यंदामध्यें डोळ्यावर ठेवावी.

बिडालक.

पैत्तिके चन्दनानन्तामंजिष्ठाभिर्बिडालकः ।
कार्यः सपद्मयष्ट्याह्वमांसीकालीयकैस्तथा ॥ १ ॥

रक्तचंदन, उपलसरी, मंजिष्ट, पद्मकाष्ट, ज्येष्टमध, जटामांसी व दारुहळद ह्यांचा बिडालक (ओढा) घालावा.

चन्दनं मधुकं लोध्रं जातीपुष्पाणि गैरिकम् ।
प्रलेपो दाहरोगघ्नस्तोदाभिष्यन्दनाशनः ॥ २ ॥

चंदन, ज्येष्टमध, लोध्र, जाईचीं फुलें व सोनकाव ह्यांचा लेप दाह व लाली यांचा नाशक आहे. तसेंच तो टोचणी व अभिष्यंद ह्यांचाही नाश करितो.

श्लेष्मिक अभिष्यंदचिकित्सा.

कफजे लङ्घनं स्वेदो नस्यं तिक्तातिभोजनम् ।
तीक्ष्णैः प्रधमनं कुर्यात्तीक्ष्णैश्चैवोपनाहनम् ।
रूक्षतीक्ष्णविरेकैश्च मलं सम्यग्विनिर्हरेत् ॥ १ ॥

कफजन्य अभिष्यंदावर लंघन, स्वेदन, नस्य व कडु रसाचें भोजन करावें. तीक्ष्ण औषधांचें चूर्ण नाकांत फुंकावें. तीक्ष्ण औषधांच्या पोटिसानें शेकावें. रूक्ष व तीक्ष्ण अशा रेचकानें योग्य रीतीनें दोष काढून टाकावे.

सेक (शिंपण्याचें औषध).

निम्बार्कपत्रसंपक्कं लोध्रं भागचतुष्टयम् ।
धूपः सर्पिः पयोभागैः कफे सेकः सुखाम्बुना ॥ १ ॥

कडुनिंबाचीं पानें व रुईचीं पानें ह्यांमध्यें लोध्र उकडून काढून तो चार भाग घेऊन त्यांत एक भाग तूप व एक भाग दूध घालून वाटून कल्क करून त्याची धुरी डोळ्यास द्यावी. किंवा तो कल्क ऊन पाण्यांत घालून त्या पाण्यानें डोळ्यावर धार धरावी.

आश्चोतन.

ससैन्धवं लोध्रमथाऽऽज्यभृष्टं सौवीरपिष्टं सितवस्त्रबद्धम् ।
आश्चोतनं तन्नयनस्य कुर्यात्कण्डूं च दाहं च रुजं च हन्यात् १

सैंधेलोण व लोध्र ह्यांचें चूर्ण तुपांत तळून कांजींत वाटून पांढऱ्या फडक्यांत पोथंडी करून तिनें डोळ्यांत थेंब सोडावे. ते कंडू, दाह व ठणका ह्यांचा नाश करितात.

पिंडिका.

शिग्रुपत्रकृता पिण्डी श्लेष्माभिष्यन्दहारिणी ।

शेवग्याच्या पाल्याची वडी करून डोळ्यावर ठेवावी. ती कफजन्य अभिष्यंदाचा नाश करिते.

शुण्ठीनिम्बदलैः पिण्डी सुखोष्णा स्वल्पसैन्धवा ।
धार्या चक्षुषि संयोगाच्छोथकण्डूव्यथाहरा ॥ १ ॥

सुंठ व निंबाचीं पानें वाटून त्यात थोडें सैंधव घालून त्याची लाथंबी करून डोळ्यावर ठेवावी. ती सूज, कंडू व ठणका ह्यांचा नाश करिते.

बिडालक.

रसांजनेन वा लेपः पथ्याविश्वदलैरपि ।
वचाहरिद्राविश्वैर्वा तथा नागरगैरिकैः ॥ १ ॥

रसांजनाचा डोळ्यासभोंवार लेप करावा. अथवा हिरडे व सुंठ ह्यांच्या कल्काचा लेप करावा. किंवा वेखंड, हळद व सुंठ ह्यांचा अगर सुंठ व सोनकाव ह्यांचा लेप करावा.

स्वेदन.

फणिज्जकास्फोतकपित्थबिल्वधत्तूरभङ्गार्जुनपत्रयोगैः ।
स्वेदं विदध्यादथ वा प्रलेपं सलोध्रशुण्ठीसुरदारुकुष्ठैः ॥१॥

पांढरा मरवा, पांढरी उपलसरी, कवठ, बेल, धोतरा, भांग व अर्जुनसादडा ह्यांचीं पानें आणून त्यांचा स्वेद द्यावा; अथवा लोध्र, सुंठ, देवदार व कोष्ट ह्यांचा लेप करावा.

सामान्य उपचार.

वल्कलं पारिजातस्य तैलसैन्धवकांजिकम् ।
कफजाक्षिजशूलघ्नं तरुघ्नं कुलिशं यथा ॥ १ ॥

पारिजातकाची साल, तेल, सैंधेलोण व कांजी ह्यांचें मिश्रण कफजन्य डोळ्याच्या ठणक्याचा, वज्र जसें वृक्षाचा नाश करितें, त्याप्रमाणें नाश करितें.

सौवीरं सैन्धवं तैलं मूर्वामूलं तथैव च ।
कांस्यपात्रे विघृष्टं स्यादक्ष्णोः शूलनिवारणम् ॥ २ ॥

कांजी, सैंधेलोण, तेल व मोरवेलाचें मूळ ह्यांचा काशाचा पात्रांत खल करून डोळ्यावर लेप करावा. तो ठणक्याचें निवारण करितो.

सलवणकटुतैलं कांजिकं कांस्यपात्रे
निहितमुपलघृष्टं धूपितं गोमयाग्नौ ।
सघनकफकोपं छागदुग्धावसिक्तं
जयति नयनशूलं स्रावशोथं सरागम् ॥ ३ ॥

सैंधेलोण, मोहरीचें तेल व कांजी हीं एकत्र करून काशाच्या भांड्यांत दगडाच्या वरयानें घोटून तें गाईच्या शेणीच्या अग्नीवर टाकून त्याची धुरी डोळ्यावर द्यावी. आणि नंतर शेळीचें दूध डोळ्यावर शिंपावें. म्हणजे डोळ्याचा ठणका, स्राव, सूज व लाली दूर होते.

स्यन्दाधिमन्थे क्रममाचरेच्च सर्वेषु चैतेषु सदा प्रशस्तम् ॥४

सर्व अभिष्यंद व अधिमंथ ह्यांजवर हा विधि करावा. तो नेहमीं प्रशस्त आहे.

रक्तजन्य अभिष्यंदाची चिकित्सा.

त्रिफलालोध्रयष्टीभिः शर्कराभद्रमुस्तकैः ।
पिष्टैः शीताम्बुना सेको रक्ताभिष्यन्दनाशनः ॥ १ ॥

त्रिफळा, लोध्र, ज्येष्टमध, साखर, देवदार व नागरमोथे हीं औषधें थंड पाण्यांत वाटून तें पाणी पिळून घेऊन त्या पाण्याची डोळ्यावर धार धरावी. ती रक्तजन्य अभिष्यंदाचा नाश करिते.

आश्च्योतन.

स्त्रीस्तन्याश्च्योतनं नेत्रे रक्तपित्तानिलार्तिजित् ।
क्षीरसर्पिर्घृतं वाऽपि रक्तपित्तरुजं जयेत् ॥ १ ॥
लोध्रचूर्णं घृते घृष्टं रुजमाश्च्योतनैर्हरेत् ।
शर्करात्रिफलाचूर्णमिदमाश्च्योतनं परम् ॥ २ ॥

स्त्रीचे दुधाची डोळ्यावर धार धरावी. ती रक्तपित्त व वात यांसंबंधीं पीडेला जिंकते. तसेंच दूध व तूप अथवा नुसतें तूप रक्तपित्तसंबंधीं पीडेला जिंकतें. लोध्राचें चूर्ण तुपांत वाटून डोळ्यांत

पिळावें. तें ठणका बंद करितें. साखर व त्रिफळ्याचें चूर्ण ह्यांचें आश्चोतनही फार उत्तम आहे.

अंजन.

श्रीपर्णीपाटलाधात्रीधातकीतिल्वकार्जुनात् ।
पुष्पाण्यथ बृहत्याश्च बिम्बीलोध्रं च तुल्यशः ॥ १ ॥
मञ्जिष्ठं चापि मधुना पिष्ट्वाऽपीक्षुरसेन वा ।
रुधिरस्यन्दशान्त्यर्थमेतदञ्जनमिष्यते ॥ २ ॥

साळवण, पाडळ, आवळकाठी, धायटीचीं फुलें, लोध्र, अर्जुनसादडा, डोरलीचीं फुलें, तोंडली, लोध्र व मंजिष्ट हीं समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून मधांत किंवा उंसाच्या रसांत वाटून तें रक्ताभिष्यंदाच्या शमनार्थ डोळ्यांत घालावें.

वासादि काढा.

आटरूषाभयानिम्बधात्रीमुस्तकमूलकैः ।
रक्तस्रावं कफं हन्ति चक्षुष्यं वासकादिकम् ॥ १ ॥

अडुळसा, हिरडा, कडुनिंब, आवळकाठी, नागरमोथे व मुळा ह्या औषधांचा हा वासकादि काढा रक्तस्राव व कफ ह्यांचा नाश करितो. हा डोळ्याला हितकारक आहे.

अधिमंथ व अन्यतोवात ह्यांची चिकित्सा.

अधिमन्थेषु सर्वेषु ललाटे व्यधयेच्छिराम् ।
अशान्ते सर्वथा मन्थे भ्रुवोरुपरि दाहयेत् ॥ १ ॥
अभिष्यन्देषु याः प्रोक्ताश्चतुर्ष्वपि प्रतिक्रियाः ।
ताः सर्वा अधिमन्थेषु प्रयोज्याश्च भिषग्वरैः ॥ २ ॥

सर्व अधिमंथांत कपाळाची शीर तोडावी. कोणत्याहि उपचारानें जर अधिमंथ शांत झाला नाहीं, तर भुवईच्या वर डाग द्यावा. चारी प्रकारच्या अभिष्यंदांवर जे उपचार सांगितले आहेत, ते सर्व वैद्यांनीं अधिमंथावर करावे.

सर्व एव विधिः सर्वमन्थादिष्वपि चेष्यते ।
तथा चाप्यन्यतोवाते सामान्यो वक्ष्यते विधिः ॥ ३ ॥

सर्व प्रकारचे सेकलेपादि उपचार सर्व अधिमंथावर प्रशस्त आहेत. त्याचप्रमाणें अन्यतोवाताबरील सामान्य उपचार सांगतों.

यष्टीं गुडूचीं त्रिफलां सदार्वीमक्ष्यामये सर्वभवे पिबेद्वा।
आश्चोतनं सान्द्ररसेन दार्व्याः शस्तं सदा क्षौद्रयुतं नराणाम्.४

जेष्टमध, गुळवेल, त्रिफळा व दारुहळद ह्यांचा काढा सन्निपातिक नेत्ररोगावर प्यावा. अगर दारुहळदीच्या दाट अशा काढ्यांत मध घालून त्याचें आश्चोतन करावें. तें चांगलें आहे.

गुडूचीत्रिफलाक्वाथो मधुना सह योजितः।
पीतः सर्वाक्षिरोगघ्नः कृष्णाचूर्णविचूर्णितः ॥ ५ ॥

गुळवेल व त्रिफळा ह्यांचा काढा मध व पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा. तो डोळ्याच्या सर्व विकारांचा नाश करितो.

प्रपौण्डरीकयष्ट्याह्वदार्वीलोध्रैः सचन्दनैः।
एरण्डाम्बुयुतैः सेकैः सर्वनेत्ररुजापहः ॥ ६ ॥

पुंडरीक वृक्षाची साल, ज्येष्टमध, दारुहळद, लोध्र व रक्तचंदन ह्यांचा काढा व एरंडमुळाचा काढा एकत्र करून त्याची डोळ्यावर धार धरावी. ती सर्व डोळ्याच्या विकारांचा नाश करिते.

श्वेतलोध्रं घृते भृष्टं चूर्णितं ताप्यतुत्थकम्।
कृष्णाम्बुना विमृदितं सेकः शूलहरः परः ॥ ७ ॥

पांढरा लोध्र तुपांत तळून त्याचें चूर्ण करून घ्यावें. तें चूर्ण व सुवर्णमाक्षिक व मोरचूत ह्यांचा पिंपळीच्या काढ्यांत खल करून तो काढा डोळ्यावर शिंपावा. तो डोळ्याचा ठणका नष्ट करण्याविषयीं फार उत्तम आहे.

यष्टीगैरिकसिन्धूत्थदार्वीतार्क्ष्यैः समांशकैः।
जलपिष्टैर्बहिर्लेपः सर्वनेत्रामयापहः ॥ ८ ॥

ज्येष्टमध, सोनकाव, सेंधेलोण, दारुहळद व रसांजन ह्यांचें चूर्ण पाण्यांत वाटून त्याचा बाहेरून डोळ्यावर लेप करावा. तो सर्व नेत्ररोगांचा नाश करितो.

दग्ध्वा ससैन्धवं लोध्रं मधूच्छिष्टयुते घृते।
पिष्टमञ्जनलेपाभ्यां सद्यो नेत्ररुजापहम् ॥ ९ ॥

सेंधेलोण व लोध्र जाळून त्यांची राख करून ती राख मेण व तूप ह्यांत खलून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. व त्याचाच डोळ्यावर लेप करावा. तो तात्काळ नेत्ररोगाचा नाश करितो.

लोहस्य पात्रे संघृष्टो रसो निम्बुफलोद्भवः ।
किंचिद्धनो बहिर्लेपान्नेत्रव्याधिं व्यपोहति ॥ १० ॥

लिंबाचा रस लोखंडाच्या भाड्यांत घालून घोटावा, आणि तो थोडा दाट झाला म्हणजे त्याचा डोळ्याच्या बाहेर लेप करावा. म्हणजे नेत्रविकाराचा नाश होतो.

निम्बस्य चोदुम्बरवल्कलस्य एरण्डयष्टीमधुचन्दनस्य ।
पिण्डो विधेयो नयनप्रकोपे कफेन पित्तेन समीरणेन ॥११॥

कडु निंबाचा पाला, उंबराची साल, एरंडाची साल, जेष्टमध व रक्तचंदन ह्यांची वडी करावी. ती वात, पित्त अथवा कफजन्य नेत्रप्रकोपाचा नाश करिते.

नेत्रशोथ व नेत्रपाक ह्यांची चिकित्सा.

जलौकापातनं श्रेष्ठं नेत्रपाके विरेचनम् ।
शिराव्यधं वा कुर्वीत सेकलेपौ च शुक्रवत् ॥ १ ॥

नेत्रपाकावर जळवा लावून रक्त काढावें व रेचक द्यावें. किंवा फुलावरील विधीप्रमाणें शिरावेध, सेक व लेप हे उपचार करावे.

बिभीतकशिवाधात्रीपटोलारिष्टवासकैः ।
क्काथो गुग्गुलुसंयुक्तः शोथशूलाक्षिरोगनुत् ॥ २ ॥

बेहडा, हिरडा, आवळकाठी, कडुपडवळ, कडुलिंबाचा पाला व अडुळसा ह्यांचा काढा गुग्गुळ घालून प्यावा. तो सूज, शूळ व इतर नेत्ररोग ह्यांचा नाश करितो.

वातपर्यय व शुष्काक्षिपाक ह्यांची चिकित्सा.

वाताभिष्यन्दवच्चात्र वातमारुतपर्यये ।
अनेनैव विधानेन भिषक्चैवाभिसाधयेत् ॥ १ ॥
पूर्वं तत्र हितं सर्पिः क्षीरं वाऽप्यथ भोजनम् ।
परिषेको हितं नेत्रे पयः कोष्णं ससैन्धवम् ॥ २ ॥
रजनीदारुसिद्धं वा सैन्धवेन समन्वितम् ।
वाताभिष्यन्दशमनं हितं मारुतपर्यये ॥ ३ ॥

वाताभिष्यंदाप्रमाणेंच वातपर्ययावर उपचार करावे. वातपर्ययावर प्रथम तूप किंवा दूध प्यावें आणि डोळ्यावर सेंधेलोण घालून कोमट केलेलें दूध शिंपावें. अथवा हळद व देवदार टाकून शिज-

विलेकें दूध सैंधव घालून शिंपावें. तें वाताभिष्यंदाचें शमन करितें; व वातपर्ययावरही तें हितकारक आहे.

शुष्काक्षिपाके च सदा इदं सेचनकं हितम् ।
सैन्धवं दारु शुण्ठी च मातुलुङ्गरसे घृतम् ॥ ४ ॥

महाळुंगाच्या रसांत सैंधेलोण, देवदार व सुंठ ह्यांचें चूर्ण व तूप घालून त्याचें सिंचन करावें. तें शुष्काक्षिपाकावर हितकर आहे.

स्तन्योदकाभ्यां कुर्वीत शुष्कपाके तदञ्जनम् ।

स्त्रीच्या दुधांत निमे पाणी मिसळून त्याचें शुष्काक्षिपाकावर अंजन करावें.

शुष्काक्षिपाके हविषः पानमक्ष्णोश्च तर्पणम् ॥
घृतेन जीवनीयेन नस्यं तैलेन योजयेत् ॥ ५ ॥

शुष्काक्षिपाकावर तूप प्यावें आणि जीवनीय गणांतील औषधांनीं सिद्ध केलेल्या तुपानें डोळ्याचें तर्पण करावें. आणि त्याच औषधांनीं सिद्ध केलेल्या तेलानें नस्यही करावें.

अम्लाध्युषित.

तिक्तस्य सर्पिषः पानं बहुशश्च विरेचनम् ।
अम्लाध्युषितशान्त्यर्थं कुर्याल्लेपान्सुशीतलान् ॥ १ ॥

अम्लाध्युषिताच्या शमनार्थ तिक्तकघृत प्यावें. पुष्कळसें रेचक द्यावें व शीतळ असे लेप करावे.

बिल्वकं त्रिफलां सर्पिर्जीर्णं वा केवलं पिबेत् ।
शिराव्यधं विना कार्यः पित्तस्यन्दहरो विधिः ॥ २ ॥

बेलफळ व त्रिफळा ह्यांनीं सिद्ध केलेलें अथवा केवळ जुनें तूप प्यावें. व शिरावेधाखेरीज पित्ताभिष्यंदावरील सर्व उपचार करावे.

शिरोत्पात व शिराहर्ष ह्यांजवरील चिकित्सा.

शिरोत्पातं शिराहर्षमन्यांश्चास्रभवान्गदान् ।
स्निग्धस्य कोष्णेनाऽऽज्येन शिरावेधैः शमं नयेत् ॥ १ ॥

शिरोत्पात, शिराहर्ष व इतर रक्तविकार यांवर कोमट तूप पाजून स्नेहन देऊन शिरावेध करून त्यांचें शमन करावें.

सर्पिः क्षौद्रं चाञ्जनं स्याच्छिरोत्पातस्य भेषजम् ।
तद्वत्सैन्धवकासीसं स्तन्यपिष्टं च पूजितम् ॥ २ ॥

शिरोत्पातावर तूप व मध ह्यांचें अंजन करावें. तें शिरोत्पातावर गुणकारी आहे. त्याचप्रमाणें सेंधेलोण व हिराकस दुधांत खलून तें डोळ्यांत घालावें. तें हितकारक आहे.

शिराहर्षेऽञ्जनं कार्यं फाणितं मधुसंयुतम् ।
मधुना तार्क्ष्यशैलं च कासीसं वा समाक्षिकम् ॥ ३ ॥

शिराहर्षावर मध व काकवी मिसळून त्याचें अंजन करावें. तसेंच मधांतून मोरचूत अथवा मधांतून हिराकस डोळ्यांत घालावा.

वेतसाम्लं स्तन्ययुतं फाणितं तु ससैन्धवम् ।
पित्ताभिष्यन्दशमनं विधिं चात्रापि योजयेत् ॥ ४ ॥

अम्लवेतस स्त्रीच्या दुधांतून डोळ्यांत घालावा. किंवा सेंधेलोण मिसळून काकवी घालावी. पित्तजन्य अभिष्यंदावरील उपचारही ह्या शिराहर्षावर करावे.

सर्व नेत्ररोगचिकित्सा.

स्रवत्यश्रु च यन्नेत्रं वृतं लोहितराजिभिः ।
निमेषोन्मेषणाशक्तं सशल्यं तं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

ज्या डोळ्यांतून पाणी वाहतें, डोळ्याच्या सभोंवार लाल शिरा उमटतात आणि डोळा उघडझाप करण्यास अशक्त होतो, त्या डोळ्यांत कांहीं तरी शल्य गेलें आहे म्हणून समजावें.

नेत्रे त्वभिहते कुर्याच्छीतमाश्चोतनं हितम् ।
पुनर्नवामूलकल्कात्पिण्डी लेपे कुचन्दनम् ॥
अन्तः स्त्रीस्तन्यसेकश्च रक्तमोक्षश्च शस्यते ॥ २ ॥
दृष्टिप्रसादजननं विधिमाशु कुर्यात्
स्निग्धैर्हिमैश्च मधुरैश्च तथा प्रयोगैः ।

अभिघात झालेल्या डोळ्यावर थंड असें आश्चोतन करावें. तें हितकारक आहे. वसूच्या मुळीच्या कल्काची पिंडी (वडी) डोळ्यावर ठेवावी व रक्तचंदनाचा लेप करावा. डोळ्यांत स्त्रीचें दूध घालावें आणि रक्त काढावें. तें प्रशस्त आहे. स्निग्ध, थंड व मधुर अशा औषधांनीं दृष्टि स्वच्छ होईल असे उपचार त्वरित करावे.

स्वेदाग्निधूमभयशोकरुजादितापै-
रभ्याहतामपि तथैव भिषक्चिकित्सेत् ॥ ३ ॥

स्वेद, अग्नि, धूर, भय, शोक, पीडा इत्यादिकांनीं बिघडलेल्या डोळ्यावर देखील हींच वरील औषधें योजावीं.

सूर्यार्चिराशाम्बरविद्युतादिविलोकनेनोपहतेक्षणस्य ।
संतर्पणं स्निग्धहिमादि कार्यं सायं निषेव्यस्त्रिफलाप्रयोगः ॥४॥

सूर्यतेज, मोकळ्या दिशा, आकाश, व वीज ह्यांजकडे पहाण्यानें दृष्टि बिघडली असतां स्निग्ध व थंड अशा औषधांनीं डोळ्याचें तर्पण करावें. व रात्रीं त्रिफळा घ्यावा.

निशाब्दत्रिफलादार्वी सितामधुसमन्विता ।
अभिघाताक्षिशूलघ्नं नारीक्षीरेण पूरणम् ॥ ५ ॥

हळद, नागरमोथे, त्रिफळा आणि दारुहळद ह्यांचें चूर्ण तूप व मध यांशीं घ्यावें. स्त्रीचे दुधानें मागें सांगितलेल्या विधीनें नेत्राचें पूरण करावें. तें अभिघातजन्य नेत्रशूळाचा नाश करितें.

शाबरं मधुकं तुल्यं घृतभृष्टं सुचूर्णितम् ।
छागक्षीरोत्थितं सेकः पित्तरक्ताभिघातजित् ॥ ६ ॥

लोध्र व जेष्टमध हे समभाग घेऊन तुपांत तळून त्यांचें चूर्ण करून शेळीच्या दुधांत घालून तें दूध डोळ्यांवर शिंपावें. तें पित्तजन्य व रक्तजन्य अभिघाताचा नाश करितें.

क्षौद्राश्वलालासंघृष्टैर्मरिचैर्नेत्रमञ्जयेत् ।
अतिनिद्रा शमं याति तमः सूर्योदयादिव ॥ १ ॥

मध व घोड्याची लाळ ह्यांमध्यें मिरें उगाळून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. सूर्योदयानें जसा अंधकाराचा नाश होतो, त्याप्रमाणें ह्यानें अतिनिद्रेचा नाश होतो.

जातीपुष्पं प्रवालं च मरिचं कटुका वचा ।
सैन्धवं बस्तमूत्रेण पिष्टं तन्द्राघ्नमंजनम् ॥ २ ॥

जाईचीं फुलें, प्रवाळ, मिरें, कुटकी, वेखंड व सैंधव ह्यांचा बोकडाच्या मुतांत खल करून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. तें तंद्रानाशक आहे.

नेत्ररोगावर भीमसेनी कापूर.

सुधांशोर्वसुभागाः स्युरेलाभागद्वयं तथा ।
चन्दनं चाब्धिफेनं च बीजं कतकसंभवम् ॥ १ ॥
रसांजनं भद्रमुस्तं प्रत्येकं कर्षसंमितम् ।

सर्वं दुग्धे विमर्द्याथ पिण्डं गोधूमपिष्टवत् ॥ २ ॥
कृत्वा पात्रे निधायाथ क्षिपेत्पात्रं तथोपरि ।
अधः प्रज्वालयेद्दीपं वर्त्याऽङ्गुष्ठसमानया ॥ ३ ॥
एवं प्रहरपर्यन्तं वन्हिं कुर्याच्च युक्तितः ।
पात्रस्योपरिभागं तु शीतलं रक्षयेद्बुधः ॥ ४ ॥
सदाऽर्द्रचैलखण्डेन शीतलेन च वारिणा ।
स्वाङ्गशीतं ततो ज्ञात्वा पश्चात्कर्पूरमाहरेत् ॥ ५ ॥
स्फटिकाकारमत्यच्छं श्वेतहीरमणिप्रभम् ।
भीमसेनाख्यकर्पूरमौषधेषु प्रयोजयेत् ॥ ६ ॥

कापूर आठ भाग, वेलदोडे दोन भाग, चंदन, समुद्रफेस, निवळीचें बीं, रसांजन व नागरमोथे, हीं औषधें प्रत्येकीं तोळा तोळा ह्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून गाईच्या दुधांत मळून कणकीसारखा गोळा करून तो एका भांड्यांत ठेवून त्याजवर दुसरें भांडें पालथें घालून खालील भांड्याच्या बुडाशीं आंगठ्यासारखी वात करून तिचा दिवा लावावा. ह्याप्रमाणें एक प्रहरभर दिव्याची आंच द्यावी. वरील भांड्याचा वरचा भाग थंड पाण्याच्या फडक्याची घडी ठेवून व वरचेवर त्याजवर थंड पाणी घालून थंड राखावा. प्रहरानंतर भांडें स्वांगशीत झाल्यावर वरील भांड्याला लागलेला कापूर काढून घ्यावा. तो स्वच्छ स्फटिकाप्रमाणें किंवा पांढऱ्या हिऱ्याप्रमाणें उज्वळ असतो. ह्याला भीमसेनी कापूर म्हणतात. हा औषधांत योजावा.

पथ्यापथ्य.

आश्चोतनं लंघनमंजनं च स्वेदो विरेकः प्रतिसारणं च ।
प्रपूरणं नस्यमसृग्विमोक्षः शस्त्रक्रिया लेपनमाज्यपानम् ॥ १ ॥
सेको मुनीष्टा तिमिरघ्नपूजा मुद्गा यवा लोहितशालयश्च ।
कौम्भं हविर्वन्यकुलत्थयूषः पेया विलेपी सुरणं पटोलम् ॥ २ ॥
वार्ताककर्कोटककारवेल्लं नवीनमोचं नतमूलकं च ।
पुनर्नवामार्कवकाकमाचीपत्तूरशाकानि कुमारिका च ॥ ३ ॥
कुस्तुम्बुरुः शीरकमाणिमन्थौ रोध्रं वरा क्षौद्रमुपानहश्च ।
नारीपयश्चन्दनमिन्दुखण्डं तिक्तानि सर्वाणि लघूनि चापि ॥४
विजानता पथ्यमिदं प्रयुक्तं यथामलं नेत्रगदं निहन्ति ।

आश्चोतन, कंधन, अंजन, स्वेदन, रेचक, प्रतिसारण, नेत्रपूरण, नस्य, रक्त काढणें, शस्त्रक्रिया, लेप, तूप पिणें, सेक (शिंपणें), मुनिसेवा, सूर्याची आराधना, मूग, सातु, तामसाळ, (मातीच्या) घागरींतील तूप, रान–(पिवळ्या) हुलग्याचा यूष, पेज, कण्हेरी, सुरण, पडवळ, वांगीं, करटोली (काटली), कारलीं, हिरवें केळें, कोवळा मुळा, वसू, माका, कांगोणी, पत्तूर (जळपिंपळी, शालिंच) कोरफड, कोथिंबीर, शीरक (वंशपत्री, गवत), सैंधेलोण, लोध्र, त्रिफळा, मध, जोडा पायांत घालणें, स्त्रीचें दूध, चंदन, कापूर, खडीसाखर, कडू व पचनाला हलके असे सर्व पदार्थ हें पथ्य दोषानुरूप योजिलें असतां नेत्ररोगाचा नाश करितें.

क्रोधं शुचं मैथुनमश्रुवायुविण्मूत्रनिद्रावमिवेगरोधम् ॥ ५ ॥
सूक्ष्मेक्षणं दन्तविघर्षणं च स्नानं निशाभोजनमातपं च ।
प्रजल्पनं छर्दनमम्बुपानं मधूकपुष्पं दधिपत्रशाकम् ॥ ६ ॥
कालिङ्गपिण्याकविरूढकानि मत्स्यं सुरा मांसमजाङ्गलं च ।
ताम्बूलमम्लं लवणं विदाहि तीक्ष्णं कटूष्णं गुरु चान्नपानम् ।
नरो न सेवेत हिताभिलाषी सर्वेषु रोगेषु दृगाश्रयेषु ॥ ७ ॥

राग, शोक, मैथुन, अश्रु, वायु, मळ, मूत्र, झोंप व ओकारी ह्यांचे वेग आवरून धरणें, बारीक नजरेनें पहाणें, दांत घासणें, स्नान, रात्रीं जेवण, ऊन घेणें, फार बोलणें, ओकाऱ्या काढणें, पाणी पिणें, मोहाचीं फुलें, दहीं, पालेभाज्या, कलिंगडें, तिळकुट (पेंड), मोड आलेलीं धान्यें, मासे, मद्य, जांगल मांसाखेरीज इतर मांस, विडा, आंबट, खारट व विदाही पदार्थ, तीक्ष्ण, तिखट, उष्ण व जड असें अन्नपान ह्यांचें सेवन बरें होऊं इच्छिणाऱ्या नेत्ररोग्यानें करूं नये.

शालितण्डुलगोधूममुद्गसैन्धवगोघृतम् ।
गोपयश्च सिता क्षौद्रं पथ्यं नेत्रगदे स्मृतम् ॥ ८ ॥

साळीचे तांदूळ, गहू, मूग, सैंधेलोण, गाईचें तूप, गाईचें दूध, खडीसाखर व मध हें नेत्ररोगावर पथ्य सांगितलें आहे.

सर्वं शाकमचक्षुष्यं चक्षुष्यं शाकपञ्चकम् ।
जीवन्ती वास्तु मत्स्याक्षी मेघनादः पुनर्नवा ॥ ९ ॥

सर्व भाज्या नेत्रविकाराला अपथ्यकारक आहेत. त्यांत पांच भाज्या मात्र पथ्यकारक आहेत त्याः—हरणदोणी, चंदनबटवा, मत्स्याक्षी (जळपिंपळी), तांदुळजा व दसू ह्या होत.

माषारनालकटुतैलजलावगाह-
क्षुद्राक्षुरैश्च सुरतैर्निशि जागरैश्च।
शाकाम्लमत्स्यदधिफाणितवेसवारै-
श्चक्षुः क्षयं व्रजति सूर्यविलोकनाच्च ॥ ५ ॥

उडीद, कांजी, शिरसाचें तेल, पाण्यांत बुडणें, चांगेरी (चुका), वस्तऱ्यानें डोक्यास घर्षण होणें, मैथुन, रात्रीं जागरण करणें, भाज्या, आंबट पदार्थ, मासे, दहीं, काकवी, सांबारें आणि सूर्याकडे पहाणें ह्यांपासून दृष्टीचा नाश होतो.

स्त्रीरोगाधिकार.

प्रदराचें निदान.

विरुद्धमद्याध्यशनादजीर्णाद्गर्भप्रपातादतिमैथुनाच्च ।
यानाध्वशोकादतिकर्षणाच्च भाराभिघाताच्छयनाद्दिवा च १॥
तं श्लेष्मपित्तानिलसंनिपातैश्चतुष्प्रकारं प्रदरं वदन्ति ॥ २॥

विरुद्ध अन्न खाणें, मद्यपान करणें, जेवणावर पुनः जेवण करणें, अजीर्ण, गर्भपात, अति मैथुन, वाहनावर बसून जाणें, मार्ग चालणें, इत्यादिकांनीं, लंघनादि कृशत्व आणणाऱ्या उपायांनीं, ओझीं वाहण्यानें, गर्भाशयावर आघात झाल्यानें आणि दिवसा झोंप घेतल्यानें वात, पित्त, कफ व त्रिदोष ह्यांपासून चार प्रकारचा प्रदर होतो.

प्रदराचें सामान्य लक्षण.

असृग्दरं भवेत्सर्वं साङ्गमर्दं सवेदनम् ॥

सर्व प्रदरांमध्यें अंग दुखणें व शूळ हीं लक्षणें असतात.

कफजन्य प्रदराचें लक्षण.

आमं सपिच्छप्रतिमं सपाण्डु पुलाकतोयप्रतिमं कफात्तु ॥

कफदोषामुळें अपक्व, बुळबुळीत, पांढरा व तिळकुटाच्या पाण्याप्रमाणें दिसणारा असा प्रदराचा स्राव होतो.

पित्तजन्य प्रदर.

सपीतनीलासितरक्तमुष्णं पित्तार्तियुक्तं भृशवेगि पित्तात् ॥३॥

पिवळा, निळा, काळा, तांबडा, उष्ण व पित्तजन्य वेदनांनीं युक्त असा प्रदराचा स्राव पित्तजन्य प्रदरांत होतो.

वातजन्य प्रदरलक्षण.

रूक्षारुणं फेनिलमल्पमल्पं वातात्सतोदं पिशितोदकाभम् ॥

रूक्ष, तांबूस, फेसाळ, थोडथोडा, ठणक्यानें युक्त व मांसाच्या पाण्याप्रमाणें असा स्राव वातजन्य प्रदरांत होतो.

सन्निपातिक प्रदराचें लक्षण.

सक्षौद्रसर्पिर्हरितालवर्णं मज्जप्रकाशं कुणपं त्रिदोषम् ।
तं चाप्यसाध्यं प्रवदंति तज्ज्ञा न तत्र कुर्वीत भिषक्चिकित्साम् ॥

मध, तूप किंवा हरताळीच्या रंगासारखा, मज्जेच्या रंगासारखा व प्रेतगंधी असा स्राव त्रिदोषापासून होतो. हा असाध्य आहे, असें तज्ज्ञ म्हणतात. म्हणून त्याजवर उपचार करूं नये.

रक्तस्रावजन्य उपद्रव.

तस्यातिवृत्तौ दौर्बल्यं भ्रमो मूर्छा मदस्तृषा ।
दाहः प्रलापः पाण्डुत्वं तन्द्रा रोगाश्च वातजाः ॥ ५ ॥

रक्त फार गेलें असतां अशक्तपणा, भ्रम, मूर्च्छा, उन्मत्तपणा, तहान, दाह, बडबड, शरीरावर पांढरेपणा, तंद्रा आणि वातजन्य इतर विकार हीं लक्षणें होतात.

असाध्य प्रदराचें लक्षण.

शश्वत्स्रवन्तीमास्रावं तृषादाहज्वरान्विताम् ।
दुर्बलां क्षीणरक्तां च तामसाध्यां विवर्जयेत् ॥ ६ ॥

जिला एकसारखा प्रदराचा स्राव होत आहे, व तहान, दाह आणि ज्वर हे विकार आहेत; जी अशक्त होऊन जिचें रक्त क्षीण झालें आहे, अशी प्रदर रोगाची स्त्री असाध्य समजावी.

शुद्धार्तवाचें लक्षण.

मासान्निष्पिच्छदाहार्ति पञ्चरात्रानुबन्धि च ।
नैवातिबहु नात्यल्पमार्तवं शुद्धमादिशेत् ॥ ७ ॥

जें आर्तव बुळबुळीत नसून दाह व शूळ ह्यांनीं विरहित असतें. तसेंच प्रत्येक महिन्यांतून एकदां पांच दिवसपर्यंत नियमित असतें, व जें अतिशय किंवा थोडें नसतें; त्याला शुद्धार्तव म्हणतात.

शशासृक्प्रतिमं यच्च यद्वा लाक्षारसोपमम् ।
तदार्तवं प्रशंसन्ति यच्चाप्सु न विरज्यते ॥ ८ ॥

त्याचप्रमाणें जें सशाच्या रक्ताप्रमाणें किंवा लाक्षारसाप्रमाणें, (अळित्याप्रमाणें) लाल असतें, आणि ज्या आर्तवानें भिजलेलें वस्त्र धुतलें असतां त्याचा डाग रहात नाहीं, तें आर्तव शुद्ध आहे, असें समजावें.

प्रदराची चिकित्सा.

दध्ना सौवर्चलाजाजीमधुकं नीलमुत्पलम् ।
पिबेत्क्षौद्रयुतं नारी वातासृग्दरशान्तये ॥ १ ॥

संचळ, जिरें, जेष्टमध व निळें कमळ ह्यांचें चूर्ण मध घालून वातजन्य प्रदर शांत होण्याकरितां घ्यावें.

नागरं मधुकं तैलं सिता दधि च तत्समम् ।
खजेनोन्माथितं पीतं वातप्रदरनाशनम् ॥ २ ॥

सुंठ, जेष्टमध, तिळाचें तेल, खडीसाखर, व सर्वांच्याबरोबर दहीं घालून रवीनें घुसळून घ्यावें. तें वातजन्य प्रदराचा नाश करितें.

एलामंशुमतीं द्राक्षामुशीरं तिक्तरोहिणीम् ।
चन्दनं कृष्णलवणं सारिवालोध्रसंयुतम् ॥ ३ ॥
वातासृग्दरशान्त्यर्थं पिबेद्दध्ना सहाङ्गना ।
पित्तासृग्दरशान्त्यर्थं सक्षौद्रं ललना पिबेत् ॥ ४ ॥

वेलदोडे, साळवण, द्राक्षें, वाळा, कुटकी, चंदन, पादेलोण, उपळसरी, व लोध्र ह्यांचें चूर्ण वातजन्य प्रदराची शांति होण्याकरितां दह्याशीं घ्यावें. आणि पित्तजन्य प्रदराची शांति होण्याकरितां मधाशीं चाटावें.

वासकस्य गुडूच्या वा रसं किं वा वरीभवम् ।
मधुकं कर्षमेकं तु चतुष्कर्षां सितां तथा ।
तण्डुलोदकसंपिष्टं लोहिते प्रदरे पिबेत् ॥ ५ ॥

अडुळशाचा, गुळवेलीचा, किंवा शतावरीचा रस अथवा जेष्टमधाचें चूर्ण एक तोळा व खडीसाखर चार तोळे तांदुळाच्या धुवणांतून रक्तजन्य प्रदरावर घ्यावी.

प्रदरं हन्ति बलाया मूलं दुग्धेन संयुतं पीतम् ।

चिकण्याचें मूळ दुधांत वाटून घ्यावें. तें प्रदराचा नाश करितें.

कुशवाट्यालकमूलं तण्डुलसलिलेन रक्ताख्यम् ॥ ६ ॥

पांढरा दर्भ व लहान चिकणा ह्यांचें मूळ तांदुळाच्या धुवणांतून प्यावें. तें रक्तप्रदराचा नाश करितें.

बलाकङ्कतिकाख्या या तस्या मूलं सुचूर्णितम् ।
लोहितप्रदरे खादेच्छर्करामधुसंयुतम् ॥ ७ ॥

मुद्रिकेचें मूळ कुटून त्याचें चूर्ण करून तें चूर्ण रक्तप्रदरावर तूप व मध यांशीं खावें.

मद्यैर्निम्बगुडूच्योश्च रोहितस्याथ वा रसम् ।
कफप्रदरनाशाय पिबेद्वा मलयूरसम् ॥ ८ ॥

कडुनिंबाच्या पाल्याचा रस, गुळवेलीचा रस अथवा रक्तरोहिड्याचा रस किंवा काळ्या उंबराचा रस कफजन्य प्रदराच्या शांतीकरितां मधाशीं प्यावा.

काकजंघामूलरसं मधुना सह भामिनी ।
सलोध्रचूर्णमापीय कफप्रदरकं जयेत् ॥ ९ ॥

लोध्राचें चूर्ण व मध घालून कांगोणीचा रस प्यावा. तो कफजन्य पदराला जिंकतो.

पथ्यामलकविभीतकविश्वौषधदारुरजनीनाम् ।
सक्षौद्रलोध्रचूर्णः क्काथो हन्त्येष सर्वजं प्रदरम् ॥ १० ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ व दारुहळद, ह्यांचा काढा मध व लोध्राचें चूर्ण घ.लून घ्यावा. तो सर्व प्रदरांचा नाश करितो.

रसाञ्जनं तण्डुलकस्य मूलं क्षौद्रान्वितं तण्डुलतोयपीतम् ।
असृग्दरं सर्वभवं निहन्ति श्वासं सुभार्गी सह नागरेण ॥ ११ ॥

रसांजन व तांदुळजाचें मूळ मध घालून तांदुळाच्या धुवणांतून प्यावें. तें सर्वदोषजन्य प्रदराचा नाश करितें. आणि त्यांत भारंगमूळ व सुंठ ह्यांचें चूर्ण घालून घेतलें असतां श्वासाचाही नाश होतो.

अशोकवल्कलक्काथशृतं दुग्धं सुशीतलम् ।
यथाबलं पिबेत्प्रातस्तीव्रासृग्दरनाशनम् ॥ १२ ॥

अशोकाची साल घालून शिजविलेलें दूध थंड झाल्यावर प्रातःकाळीं शक्तिमानाप्रमाणें प्यावें. तें तीव्र रक्तप्रदराचा नाश करितें.

समुद्धृत्य कुशमूलं पेषयेत्तण्डुलाम्बुना ।
एतत्पीत्वा त्र्यहं नारी प्रदरात्परिमुच्यते ॥ १३ ॥

दर्भाचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून तीन दिवस प्यावें. म्हणजे स्त्री प्रदरापासून मुक्त होते.

क्षौद्रयुक्तं फलरसं काकोदुम्बरजं पिबेत् ।
असृग्दरविनाशाय सशर्करपयोन्नभुक् ॥ १४ ॥

रक्तप्रदराचा नाश होण्याकरितां दूधभात व साखर हें पथ्य करून काळ्या उंबराच्या फळाचा रस मध घालून द्यावा.

मलयूफलचूर्णस्य शर्करासहितस्य च ।
मधुना मोदकं कृत्वा खादेत्प्रदरनाशनम् ॥ १५ ॥

काळ्या उंबराच्या फळांचें चूर्ण व साखर ह्यांच्या मधांत गोळ्या करून खाव्या. त्या प्रदराचा नाश करितात.

दार्वीरसाञ्जनवृषाब्दकिरातबिल्व-
भल्लातकैरवकृतो मधुना कषायः ।
पीतो जयत्यतिबलं प्रदरं सशूलं
पीतासितारुणविलोहितनीलशुक्लम् ॥ १६ ॥

दारुहळद, रसांजन, अडुळसा, नागरमोथे, काडे चिराईत, बेलफळ व बिब्बा ह्यांचा काढा करून तो मध घालून द्यावा. तो अत्यंत बलाढ्य असा शूलयुक्त, पिवळा, काळा, तांबूस, लाल, निळा व पांढरा अशा प्रदराचा नाश करितो.

भूम्यामलकमूलं तु पीतं तण्डुलवारिणा ।
द्वित्रैरेव दिनैर्नार्याः प्रदरं दुस्तरं जयेत् ॥ १७ ॥

भुईआवळीचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून प्यावें. तें दोन तीन दिवसांत दुस्तर प्रदराचा नाश करितें.

शुण्ठीतिरिण्टयोश्चूर्णं भुक्तं सघृतशर्करम् ।
प्रबलं प्रदरं हन्ति नार्या वा कुटजाष्टकम् ॥ १८ ॥

सुंठ व लोध्र ह्यांचें चूर्ण तूपसाखरेंतून प्यावें. तें बलाढ्य प्रदराचा नाश करितें. किंवा कुटजाष्टकाचें चूर्ण द्यावें. तेंही प्रदराचा नाश करितें.

धातक्याश्च तथा पूगीकुसुमानां पिबेच्छतम् ।
नाशयेत्प्रदरं सद्यस्त्रिदिनाद्योषितां ध्रुवम् ॥ १९ ॥

धायटीचीं फुलें व सुपारीचीं फुलें (किंवा मोचरस) ह्यांचा काढा करून प्यावा. तो तीन दिवसांत प्रदराचा नाश करितो.

आखोः पुरीषं पयसा निपीय वह्नेर्बलादेकमहर्द्व्यहं वा ।
स्त्रियस्त्र्यहं वा प्रदरं स्रवन्त्यः प्रसह्य पारं परमाप्नुवन्ति ॥२०॥

जठराग्नीच्या शक्तीच्या मानाप्रमाणें उंदराच्या लेंड्यांचें चूर्ण एक, दोन अथवा तीन दिवस प्यावें. म्हणजे अत्यंत वाढलेल्या प्रदरापासून स्त्री मुक्त होते.

अशोकवल्कलं पिष्ट्वा सतार्क्ष्यं तण्डुलाम्भसा ।
सक्षौद्रं तद्रसं पीत्वा प्रदरान्मुच्यतेऽङ्गना ॥ २१ ॥

अशोकाची साल व रसांजन तांदुळाच्या धुवणांत वाटून त्यांचा रस काढून तो मध घालून प्यावा. म्हणजे स्त्री प्रदरापासून मुक्त होते.

शुचिस्थाने व्याघ्रनख्या मूलमुत्तरदिग्भवम् ।
नीतमुत्तरफल्गुन्यां कटिबद्धं हरेदसृक् ॥ २२ ॥

पवित्र जाग्यांतील वाघाटीचें उत्तरेकडील मूळ उत्तरानक्षत्रावर काढून आणून कमरेस बांधावें. म्हणजे तें रक्तस्राव बंद करितें.

पुष्यानुगचूर्ण.

पाठा रसाञ्जनं मुस्तं मज्जा जम्ब्वाम्रयोस्तथा ।
अम्बष्ठकी शिलोद्भेदं समङ्गा पद्मकेसरम् ॥ १ ॥
बिल्वं मोचरसं लोध्रं केशरं गैरिकं तथा ।
विश्वौषधं कट्फलं च मरिचं रक्तचन्दनम् ॥ २ ॥
कट्वङ्गं धातकी द्राक्षाऽनन्ता मधुकमर्जुनम् ।
वत्सकातिविषा चेति पुष्येणोद्धृत्य बुद्धिमान् ॥ ३ ॥
तुल्यभागानि सर्वाणि सूक्ष्माणि च विचूर्णयेत् ।
तच्चूर्णं माक्षिकोपेतं पीतं तण्डुलवारिणा ॥ ४ ॥
जयेदर्शांस्यतीसारं तथा रक्तप्रवाहिकाम् ।
बालानां क्रिमिरोगांश्च योनिदोषांश्च योषितम् ॥ ५ ॥
रजोदोषी तथा सर्वान्प्रदरान्दुस्तरानपि ।
पीतनीलारुणश्वेतान्सर्वानेव विनाशयेत् ।
चूर्णं पुष्यानुगं नाम पूर्वमात्रेयभाषितम् ॥ ६ ॥

पहाडमूळ, रसांजन, नागरमोथे, जांभळांतील व आंब्यांतील बी, वासनवेलीचें मूळ, पाषाणभेद, लाजाळू, कमळांतील केसर, बेलफळ, मोचरस, लोध्र, नागकेशर, सोनकाव, सुंठ, कायफळ, मिरें, रक्तचंदन, टेंटुमूळ, धायटी, द्राक्षें, उपलसरीचें मूळ, ज्येष्टमध, अर्जुनसादडा, कुड्याची साल व अतिविष हीं औषधें पुष्य,

नक्षत्रावर आणून समभाग घेऊन चूर्ण करावें. आणि तें मध घालून तांदुळाच्या धुवणांतून प्यावें. म्हणजे तें मूळव्याध, अतिसार, रक्तप्रवाहिका (तांबडी आंव), मुलांचा जंताचा विकार, स्त्रियांचे योनिदोष, आर्तवदोष, सर्व प्रकारचे दुस्तर प्रदर, पिंवळा, निळा, तांबूस, पांढरा वगैरे सर्व रंगांचेही प्रदर ह्यांचा नाश करितें. हें पुष्यानुग चूर्ण आत्रेयांनीं सांगितलें आहे.

जीरकावलेह.

जीरकं प्रस्थमेकं तु क्षीरं ह्याढकमेव च ।
प्रस्थार्धं लोध्रघृतयोः पचेन्मन्देन वह्निना ॥ १ ॥
लेहीभूतेऽथ शीतेऽत्र सिताप्रस्थं विनिक्षिपेत् ।
चातुर्जातकणाविश्वमजाजी मुस्तवालकम् ॥ २ ॥
दाडिमं रसजं धान्यं रजनी पटवासकम् ।
वंशजं च तवक्षीरी प्रत्येकं शुक्तिसंमितम् ॥ ३ ॥
जीरकस्यावलेहोऽयं प्रमेहप्रदरापहः ।
ज्वराबल्यारुचिश्वासतृष्णादाहक्षयापहः ॥ ४ ॥

जिऱ्याचें चूर्ण चौसष्ट तोळे, दूध पांचशें बारा तोळे, लोध्राचें चूर्ण चौसष्ट तोळे, व तूप चौसष्ट तोळे ह्या सर्वांचें मंदाग्नीवर पचन करावें. तें लेहासारखें दाट झाल्यावर खालीं उतरून, थंड झाल्यावर त्यांत चौसष्ट तोळे खडीसाखरेचें चूर्ण घालावें. आणि दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर, पिंपळी, सुंठ, जिरें, नागरमोथे, वाळा, डाळिंब, रसांजन, धने, हळद, सालरुंड, वंशलोचन व तवकील ह्या औषधांचें चूर्ण दोनदोन पळें घालून तो लेह ढवळून ठेवावा. हा जीरकादि अवलेह प्रमेह व प्रदर ह्यांचा नाश करितो. व ज्वर, अशक्तपणा, अरुचि, श्वास, तहान, दाह व क्षय ह्यांचाही नाश करितो.

निष्कमैन्द्रयवं चूर्णं सिताद्विगुणितं भवेत् ।
उषितेन जलेनैव पीतं प्रदरनाशनम् ॥ ५ ॥

इंद्रजवाचें चूर्ण चार मासे घेऊन त्यांत तितकीच खडीसाखर घालून शिळ्या पाण्यांतून द्यावें. म्हणजे प्रदराचा नाश होतो.

मुद्गादि घृत.

मुद्गमाषस्य निर्यूहे रास्नाचित्रकमुस्तकैः ।
सिद्धं सपिप्पलीबिल्वैः सर्पिः श्रेष्ठमसृग्दरे ॥ १ ॥

मूग व उडीद ह्यांच्या काढ्यांत रास्ना, चित्रकमूळ, नागरमोथे, पिंपळी व बेलफळ ह्यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें रक्तप्रदराचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

शाल्मली घृत.

शाल्मलीपुष्पनिर्यासः पृश्निपर्णी तथैव च ।
काश्मरी चन्दनं चैषां कल्केन स्वरसेन वा ॥ १ ॥
गव्यं पचेद् घृतप्रस्थं तत्सिद्धं तरुणी पिबेत् ।
सर्वप्रदरनाशाय बलवर्णाग्निवर्धनम् ॥ २ ॥

मोचरस, पिठवण, शिवणमूळ व रक्तचंदन ह्यांचा कल्क अथवा स्वरस घालून तूप सिद्ध करून तें सर्व प्रदरांचा नाश होण्याकरितां स्त्रीनें प्यावें. तें शक्ति, कांति व जठराग्नि ह्यांनाही वाढवितें.

शीतकल्याणक घृत.

कुमुदं पद्मकोशीरं गोधूमो रक्तशालयः ।
मुद्गपर्णी पयस्या च काश्मरी मधुयष्टिका ॥ १ ॥
बलातिबलयोर्मूलमुत्पलं तालमस्तकम् ।
विदारी शतपुष्पी च शालपर्णी सजीवका ॥ २ ॥
त्रिफला त्रापुसं बीजं प्रत्यग्रं कदलीफलम् ।
एषामर्धपलान्भागान् गव्यक्षीरं चतुर्गुणम् ॥ ३ ॥
पानीयं द्विगुणं दत्त्वा घृतप्रस्थं विपाचयेत् ।
प्रदरे रक्तगुल्मे च रक्तपित्ते हलीमके ॥ ४ ॥
अरोचके ज्वरेऽजीर्णे पाण्डुरोगे मदे भ्रमे ।
तरुणी स्वल्पपुष्पा वा या च गर्भं न विंदति ॥ ५ ॥
अहन्यहनि च स्त्रीणां भवति प्रीतिवर्धनम् ।
शीतकल्याणकं नाम परमुक्तं रसायनम् ॥ ६ ॥

तांबडें कमळ, पद्मकाष्ठ, वाळा, गहू, तामसाळ, रानमूग, क्षीरकाकोली, शिवणमूळ, जेष्टमध, चिकणामूळ, पेटारीचें मूळ, निळें कमळ, ताडाचें फळ, भुईकोहाळा, बडिशेप, साळवण, जीवक, त्रिफळा, काकडीचें बीं आणि केळीचें जून फळ हीं औषधें दोन दोन तोळे घेऊन त्यांचा कल्क करून त्याच्या चौपट तूप व

तुपाच्या चौपट दूध आणि दुप्पट पाणी घालून तूप सिद्ध करावें. आणि प्रदर, रक्तगुल्म, रक्तपित्त, हलीमक, अरोचक, ज्वर, अजीर्ण, पांडुरोग, मद (उन्माद) व भ्रम ह्यांजवर द्यावें. जी अल्पार्तवा आहे व जिला गर्भ राहत नाहीं, त्यांना हें नेहमीं हितकारक आहे. हें शीतकल्याणक नांवाचें घृत उत्तम रसायन आहे.

रक्तपित्ताधिकारोक्तं कूष्माण्डखण्डं च प्रदरे देयम् ॥

रक्तपित्ताच्या चिकित्साप्रकरणांत सांगितलेला कूष्मांडावलेह हाही प्रदरावर द्यावा.

प्रदरारि रस.

रसं गन्धं सीसं मृतमिति समं तैस्तु रसजं
समानं सर्वैः स्यात्तुलितमपि लोध्रं वृषरसैः ।
दिनं पिष्टं नाम्ना प्रदररिपुरेषोऽपहरति
द्विवल्लः क्षौद्रेण प्रदरमपि दुःसाध्यमपि च ॥ १ ॥

पारा, गंधक व शिशाचें भस्म समभाग, सर्वांच्या बरोबरीनें रसांजन आणि त्या सर्वांच्या बरोबरीनें लोध्राचें चूर्ण ह्यांचा अडुळशाच्या पानाच्या रसांत खल करून तो दोन वालप्रमाणें मधांतून द्यावा. म्हणजे हा प्रदरारि रस दुःसाध्य अशा प्रदराचा नाश करितो.

बोलपर्पटीरस.

सूतगन्धकसुकज्जलिकायाः पर्पटी समयुता समभागम् ।
बोलचूर्णविहितं प्रतिवाप्यं स्याद्रसोऽयमसृगामयहारी ॥ १ ॥
वल्लयुग्मयुगुलं प्रतिदेयं शर्करामधुयुतः किल दत्तः ।
रक्तपित्तगुदजास्रुतियोनिस्रावमाशु विनिवारयतीशः ॥ २ ॥

पारा व गंधक ह्यांची कज्जली करून लोखंडाच्या कढईत पर्पटीप्रमाणें पातळ झाल्यावर त्यांत रक्तबोळाचें चूर्ण मिसळून केळीच्या पानावर विधियुक्त ओतून पर्पटी तयार करावी. ही रक्तप्रदराचा नाश करिते. ही साखर व मध ह्यांतून चार वालप्रमाणें द्यावी, म्हणजे रक्तपित्त, शौचावाटे पडणारें रक्त आणि योनिस्राव ह्यांचा नाश करिते.

सोमरोगाची निदानपूर्वक संप्राप्ति.

स्त्रीणामतिप्रसंगाद्वा शोकाच्चापि श्रमादपि ।

अतिसारकयोगाद्वा गरदोषात्तथैव च ॥ १ ॥
आपः सर्वशरीरस्थाः क्षुभ्यन्ति प्रस्रवन्ति च ।
तस्यास्ताः प्रच्युताः स्थानान्मूत्रमार्गं व्रजन्ति हि ॥ २ ॥

अतिमैथुन, शोक, श्रम, अतिसार व विषबाधा ह्यांच्या योगानें स्त्रियांच्या शरीरांतील जलधातु क्षुब्ध होऊन स्थानापासून स्रवतो, आणि मूत्रमार्गानें बाहेर पडतो.

त्याचें लक्षण.

प्रसन्ना विमलाः शीता निर्गन्धा नीरुजः सिताः ।
स्रवन्ति चातिमात्रं ताः सा न शक्नोति दुर्बला ॥ ३ ॥
वेगं धारयितुं तासां न विन्दति सुखं क्वचित् ।
शिरःशिथिलता तस्या मुखं तालु च शुष्यति ॥ ४ ॥
मूर्छा जृम्भा प्रलापश्च त्वग्रूक्षा चातिमात्रतः ।
भक्ष्यैर्भोज्यैश्च पेयैश्च न तृप्तिं लभते सदा ॥ ५ ॥
संधारणाच्छरीरस्य ता आपः सोमसंज्ञिताः ।
ततः सोमक्षयात्स्त्रीणां सोमरोग इति स्मृतः ॥ ६ ॥
तस्मात्सोमक्षयाद्देहो निश्चेष्टश्च भवेत्सदा ।
स एव सरुजः सोमो मूत्रेण स्रवते मुहुः ॥ ७ ॥
सोमलक्षणसंसृष्टः कालातिक्रान्तयोगतः ।
सोमक्रान्तिक्रमेणैव स्रवन्मूत्रमभीक्ष्णशः ॥
मूत्रातिसार इत्येव तमाहुर्बलनाशनम् ॥ ८ ॥

हा जलधातु स्वच्छ, निर्मळ, थंड, गंधरहित, शूलरहित व पांढरा असा असून अतिशय स्रवतो. तो आवरून धरण्याचें सामर्थ्य स्त्रीमध्यें नसतें, आणि त्यामुळें तिला सुख वाटत नाहीं. तिचें डोकें जड होतें. तोंड व टाळा ह्यांना कोरड असते. मूर्च्छा, जांभई, बडबड, त्वचेला अतिशय रुक्षपणा, भक्ष्य, भोज्य किंवा पेय ह्यांपैकीं कोणत्याही पदार्थानें तिला समाधान वाटत नाहीं. हा जलधातु स्त्रियांच्या शरीराचें धारण करितो, म्हणून त्याला सोम असें म्हणतात. त्याचाच क्षय होत असतो, म्हणून ह्या विकाराला सोमरोग असें म्हणतात. ह्या सोमक्षयामुळें देह चलनवलनाला असमर्थ होतो. तो सोम शूलयुक्त असा मूत्रमार्गानें वरचेवर स्रवतो व सोमरोगाचीं सर्व लक्षणें होऊन फार दिवस होतात. त्यामुळें सोमाच्या रंगाप्रमाणेंच मूत्र

पुष्कळसें वाहूं लागतें. तेव्हां या बलनाशक विकाराला मूत्रातिसार म्हणतात.

सोमरोगाची चिकित्सा.

कदलीनां फलं पक्वं धात्रीफलरसं मधु।
शर्करासहितं खादेत्सोमधारणमुत्तमम् ॥ १ ॥

पिकलेलें केळें व आवळ्याचा रस, मध व साखर घालून खावा: तो उत्तम प्रकारें सोमधारण करितो.

माषचूर्णं समधुकं विदारीमधुशर्कराम् ।
पयसा पाययेत्प्रातः सोमधारणमुत्तमम् ॥ २ ॥

उडदाचें पीठ, जेष्टमध व भुईकोहळा ह्याचें चूर्ण मध व साखर घालून दुधाशीं सकाळीं द्यावें. तें उत्तम सोमधारण करितें.

जलेनाऽऽमलकीबीजकल्कं समधुशर्करम् ।
पिबेद्दिनत्रयेणैव श्वेतप्रदरनाशनम् ॥ ३ ॥

आवळ्याच्या बियांचा कल्क मध व साखर घालून पाण्याशी द्यावा. तो पांढऱ्या प्रदराचा नाश करितो.

तक्रौदनाहाररता संपिबेन्नागकेशरम् ।
त्र्यहं तक्रेण संपिष्टं श्वेतप्रदरनाशनम् ॥ ४ ॥

नाकेशराचें चूर्ण ताकांतून तीन दिवस प्यावें, व ताकभाताचें पथ्य करावें. म्हणजे तीन दिवसांत पांढऱ्या प्रदराचा नाश होतो.

चूर्णं तु पटवासस्य तिलतैलेन लेहयेत् ।
सप्तरात्रेण योषाणां श्वेतप्रदरनाशनम् ॥ ५ ॥

सांखरुंडाचें चूर्ण तिळाच्या कल्काशीं चाटावें. तें सात दिवसांत पांढऱ्या प्रदराचा नाश करितें.

मूत्रातिसाराची चिकित्सा.

स एव सरुजः सोमः स्रवेन्मूत्रेण चेन्मुहुः ।
तत्रैलापत्रचूर्णेन पाययेत्तरुणीं सुराम् ॥ १ ॥

तोच सोम मूत्रांतून शूलानें युक्त वरचेवर जाऊं लागला असतां वेलदोडे व तमालपत्र ह्यांचें चूर्ण मद्यांतून द्यावें.

तालकन्दं च खर्जूरं मधुकं च विदारिकाम् ।
सितामधुयुतां खादेन्मूत्रातीसारनाशनम् ॥ २ ॥

ताडाचा कंद, खारीक, ज्येष्टमध व भुईकोहळा ह्यांचें चूर्ण, मधाशीं व साखरेशीं द्यावें. तें मूत्रातिसाराचा नाश करितें.

चक्रमर्दकमूलं तु संपिष्टं तण्डुलाम्बुना ।
प्रभातसमये पीतं जलप्रदरनाशनम् ॥ ३ ॥

टाकळ्याचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून सकाळीं प्यावें. तें सोमरोगाचा नाश करितें.

कदलीकंदघृत.

कदलीकन्दनिर्यासद्रोणे शतपलान्वितम् ।
कदलीकुसुमं पक्वं क्वाथं पादावशेषितम् ॥ १ ॥
घृतप्रस्थं पयस्तुल्यं पिप्पल्येलालवङ्गकम् ।
कपित्थस्य फलं मांसी कदलीकन्दचन्दनम् ॥ २ ॥
न्यग्रोधादिगणैः सार्धं सर्वान्वारिसमुद्भवान् ।
सर्वं समं कर्षमात्रं कल्कीकृत्य पचेच्छनैः ॥ ३ ॥
घृतं क्वाथं च कल्कं च पक्त्वा चैवावतारयेत् ।
प्रातःकाले पिबेन्नित्यं सेवयेत्कर्षमात्रकम् ॥ ४ ॥
सोमरोगं हरेद्दाहं मूत्रकृच्छ्राश्मरीं तथा ।
प्रमेहान्विंशतिं हन्यात्प्रमेहगजकेसरी ॥ ५ ॥
मूत्रातिसारमप्यन्यं व्याधिं विध्वंसयेद् ध्रुवम् ।
कदलीकन्दनामेदं घृतं सर्वरुजापहम् ॥ ६ ॥

केळीच्या कांद्याचा रस वीसशें अठ्ठेचाळीस तोळे काढून त्यांत पिकलेलें केळफूल चारशें तोळे घालून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्यांत चौसष्ट तोळे तूप, चौसष्ट तोळे दूध, पिंपळी, वेलदोडे, लवंग, कंवठातील गर, जटामांसी, केळीचा कांदा, चंदन, न्यग्रोधादि गणांतील औषधें, व सर्व प्रकारचीं कमळें ह्या औषधांचा कल्क एक एक तोळा घालून मंदाग्नीवर तूप पचन करावें. तूप तयार झाल्यावर काढून घेऊन रोज सकाळीं एक एक तोळा तूप खावें. म्हणजे तें सोमरोग, दाह, मूत्रकृच्छ्र, मूतखडा व वीस प्रकारचे प्रमेह ह्यांचा नाश करितें. हें तूप प्रमेहरूप हत्तीला सिंहाप्रमाणें आहे. हें मूत्रातिसाराचाही नाश करितें. हें कदलीकंद नांवाचें घृत सर्व प्रकारच्या मूत्रसंबंधीं पीडा दूर करितें.

कूष्मांडादि रस.

कूष्माण्डपत्रस्वरसैः पक्वं पारदनिष्ककम् ।
द्विनिष्कं गन्धकं कृत्वा ज्वलने कज्जलीकृतः ॥
असौ समरिचः सोमरोगातिसृतिनाशनः ॥ १ ॥

कोहळ्याच्या पानांच्या रसांत तीन मासे पारा दोलायंत्रानें शिजवून तो काढून घेऊन त्यांत सहा मासे शुद्ध गंधक घालून अग्नीवर कढईंत दोन्ही मिश्र होऊन कज्जली होईपर्यंत पक्व करून (पर्पटी करून) ठेवावी, व ती मिऱ्याच्या चूर्णाबरोबर द्यावी. ती सोमरोग व मूत्रातिसार ह्यांचा नाश करिते.

योनिव्यापद्रोगाचें निदान.

विंशतिर्व्यापदो योनेर्निर्दिष्टा रोगसंग्रहे ।
मिथ्याचारेण ताः स्त्रीणां प्रदुष्टेनाऽऽर्तवेन च ॥
जायन्ते बीजदोषाच्च दैवाद्वा शृणु ताः पृथक् ॥ १ ॥

वीस प्रकारचे योनिरोग रोगसंग्रहांत (रोगगणनेंत) सांगितले आहेत. ते स्त्रियांना अनियमित आहार-विहारादिकांनीं व आर्तव-दोषानें होतात. त्याचप्रमाणें ते पुरुषाच्या शुक्रदोषामुळें किंवा दैव-योगानें आपोआपही होतात.

रोगयुक्त योनींचीं नांवें.

उदावर्ता तथा वन्ध्या विप्लुता च परिप्लुता ।
वातला योनिरुग्ज्ञेया वातदोषेण पञ्चधा ॥ २ ॥
पञ्चधा पित्तदोषेण तत्राऽऽदौ लोहितक्षया ।
प्रस्रंसिनी वामिनी च पुत्रघ्नी पित्तला तथा ॥ ३ ॥
अत्यानन्दा कर्णिनी च चरणानन्दपूर्विका ।
अतिपूर्वाऽपि सा ज्ञेया श्लेष्मला च कफादिमाः ॥ ४ ॥
षण्ढ्यण्डिनी च महती सूचीवक्त्रा त्रिदोषिणी ।
पञ्चैता योनयः प्रोक्ताः सर्वदोषप्रकोपतः ॥ ५ ॥

उदावर्ता, वंध्या, विप्लुता, परिप्लुता व वातला अशी वातदोषानें योनि पांच प्रकारची आहे. लोहितक्षया, प्रस्रंसिनी, वामिनी, पुत्रघ्नी व पित्तला अशी पित्तदोषानें पांच प्रकारची आहे. अत्यानंदा, कर्णिनी, चरणानंदपूर्विका, अतिपूर्वा, व श्लेष्मला, अशी कफदो-

षानें पांच प्रकारची आहे. व षंढी, अंडिनी, महती, सूचीवक्त्रा व त्रिदोषिणी अशी पांच प्रकारची त्रिदोषजन्य योनि आहे.

त्यांचें लक्षण.

या फेनिलमुदावर्ता रजः कृच्छ्रेण मुञ्चति ।
सा तु योनिः कफेनैवमार्तवं च विमुञ्चति ॥ ६ ॥

जीमधून फेसयुक्त आर्तव कष्टानें येतें, तिला उदावर्ता म्हणतात. ती कफदोषामुळें अशा प्रकारचें आर्तव सोडते.

वन्ध्या नष्टार्तवा ज्ञेया विप्लुता नित्यवेदना ।

जिचें आर्तव नष्ट झालें आहे, तिला वंध्या म्हणतात; आणि जीमध्यें सतत वेदना असतात, तिला विप्लुता म्हणतात.

परिप्लुतायां भवति ग्राम्यधर्मेण रुग्भृशम् ॥ ७ ॥

परिप्लुता योनीमध्यें ग्राम्यधर्मानें (मैथुनानें) अत्यंत वेदना होतात.

वातला कर्कशा स्तब्धा शूलनिस्तोदपीडिता ।
चतसृष्वपि चाऽऽद्यासु भवन्त्यनिलवेदनाः ॥ ८ ॥

वातला योनि खरखरीत, ताठर व ठणका व टोचणी ह्यांनीं युक्त असते. पहिल्या चार प्रकारच्या योनिरोगांत वातजन्य पीडा होतात.

सदाहं क्षीयते रक्तं यस्यां सा लोहितक्षया ।

जीमधून दाहयुक्त रक्त वाहतें, तिला लोहितक्षया असें म्हणतात.

प्रस्रंसिनी स्रंसते च क्षोभिता दुष्प्रजायिनी ॥ ९ ॥

जी योनी स्थानापासून निसटून बाहेर येते, तिला प्रस्रंसिनी म्हणतात; व जिला प्रसवकाळीं फार कष्ट होतात, तिला क्षोभिता असें म्हणतात.

सवातमुद्गिरेद्बीजं वामिनी रजसा युतम् ।

वामिनी ही वातयुक्त असें शुक्र आर्तवासह बाहेर टाकते.

स्थितं स्थितं हन्ति गर्भं पुत्रघ्नी रक्तसंक्षयात् ॥ १० ॥

रक्त क्षीण झाल्यामुळें राहिलेला गर्भ जीमध्यें ठरत नाहीं, तिला पुत्रघ्नी म्हणतात.

अत्यर्थं पित्तला योनिर्दाहपाकज्वरान्विता ।
चतसृष्वपि चाऽऽद्यासु पित्तलिङ्गोच्छ्रयो भवेत् ॥ ११ ॥

ज्या योनीमध्यें दाह, फोड व ज्वर हे विकार फार असतात, तिला पित्तला असें म्हणतात. ह्यापैकीं देखील पहिल्या चार प्रकारच्या लोहितक्षयादि योनिरोगांत पित्तदोषाचीं लक्षणें असतात.

अत्यानन्दा न संतोषं ग्राम्यधर्मेण गच्छति ।

अत्यानंदा नांवाच्या योनिरोगांत अतिमैथुनानेंही समाधान वाटत नाहीं.

कर्णिन्यां कर्णिका योनौ श्लेष्मासृग्भ्यां प्रजायते ॥ १२ ॥

कर्णिनी नांवाच्या योनिरोगांत योनीमध्यें कफरक्तापासून एक कर्णिका (गांठ) उत्पन्न होते.

मैथुने चरणा पूर्वं पुरुषादतिरिच्यते ।
बहुशश्चातिचरणा तयोर्बीजं न विन्दति ॥ १३ ॥

चरणा अथवा आनंदपूर्विका नांवाची योनि मैथुनसमयीं पुरुषापूर्वीं द्रवते. व पुष्कळ मैथुनानें देखील जी पुरुषानंतर द्रवते, तिला अतिचरणा म्हणतात. ह्या दोन्हीही बीज ग्रहण करीत नाहींत.

श्लेष्मला पिच्छिला योनिः कण्डूग्रस्ताऽतिशीतला ।
चतसृष्वपि चाऽऽद्यासु श्लेष्मलिङ्गोच्छ्रयो भवेत् ॥ १४ ॥

श्लेष्मला योनि बुळबुळित, कंडुयुक्त व अति थंड असते. ह्यापैकीं पहिल्या चार योनिरोगांत कफदोषाचीं लक्षणें अधिक असतात.

अनार्तवाऽस्तनी षण्ढी खरस्पर्शा च मैथुने ।

षंढी योनि ही आर्तवरहित असून त्या स्त्रीला स्तन नसतात, व ती मैथुनसमयीं खरखरीत असते.

अतिकायगृहीतायास्तरुण्या अण्डिनी भवेत् ॥ १५ ॥

एकाद्या स्थूळ पुरुषानें अल्प वयाच्या स्त्रीशीं मैथुन केलें असतां त्या स्त्रीची योनि बाहेर येऊन अंडाप्रमाणें लोंबूं लागते. तिला अंडिनी असें म्हणतात.

विवृता तु महायोनिः सूचीवक्त्राऽतिसंवृता ।
सर्वलिङ्गसमुत्थाना सर्वदोषप्रकोपजा ॥ १६ ॥
चतसृष्वपि चाऽऽद्यासु सर्वलिङ्गनिदर्शनम् ।
पञ्चासाध्या भवन्तीह योनयः सर्वदोषजाः ॥ १७ ॥

जी योनि फार पसरलेली असते, तिला विवृता असें म्हणतात;

आणि जी अति संकुचित असते तिला संवृता असें म्हणतात. त्रिदोषज योनीमध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात. ह्यांपैकीं पहिल्या चार योनिरोगांत त्रिदोषाचीं लक्षणें असतात. ह्या त्रिदोषजन्य पांच योनि असाध्य आहेत.

योनिकंदाचें निदान.

दिवास्वप्नादतिक्रोधाद्व्यायामादतिमैथुनात् ।
क्षताच्च नखदन्ताद्यैर्वाताद्याः कुपिता मलाः ॥ १ ॥
पूयशोणितसंकाशं लकुचाकृतिसंनिभम् ।
जनयन्ति यदा योनौ नाम्ना कन्दं तु योनिजम् ॥ २ ॥

दिवसा निजणें, अति रागावणें, व्यायाम व अति मैथुन ह्या कारणांनीं व नखें, दांत ह्यांच्या योगानें योनींत जखम झाल्यामुळें वातादि दोष योनीमध्यें कुपित होऊन पू व रक्त ह्यांच्यासारखी लिंबाएवढी एक गांठ उत्पन्न कारितात. तिला योनिकंद म्हणतात.

रूक्षं विवर्णं स्फुटितं वातिकं तं विनिर्दिशेत् ।

जो कंद रूक्ष, फिक्कट व भेगा पडलेला असतो त्याला वातजन्य योनिकंद असें म्हणावें.

दाहरागज्वरयुतं विद्यात्पित्तात्मकं तु तम् ॥ ३ ॥

दाह, लाली व ज्वर ह्यांनीं युक्त असा जो योनिकंद, त्याला पित्तज योनिकंद म्हणावें.

नीलपुष्पप्रतीकाशं कण्डूमन्तं कफात्मकम् ।

जो निळ्या फुलाप्रमाणें असून कंडुयुक्त असतो, त्याला कफजन्य योनिकंद असें म्हणतात.

सर्वलिङ्गसमायुक्तं संनिपातात्मकं वदेत् ॥ ४ ॥

तिन्हीही दोषांचीं मिश्र लक्षणें असलीं म्हणजे त्याला त्रिदोषज योनिकंद म्हणतात.

योनिव्यापदरोगांची चिकित्सा;—वंध्याचिकित्सा.

आर्तवादर्शने नारी मत्स्यान्सेवेत नित्यशः ।
कांजिकं च तिलान्माषानुदश्विच्च तथा दधि ॥ १ ॥

जिचें आर्तव नष्ट झालें आहे, तिनें नित्य मासे खावे. त्याचप्रमाणें कांजी, तीळ, उडीद, ताक व दहीं खावें.

पीतं ज्योतिष्मतीपत्रराजिकोग्रासनं त्र्यहम् ।
शीतेन पयसा पिष्टं कुसुमं जनयेद् ध्रुवम् ॥ २ ॥

करडकांगोणीचीं पानें, मोहऱ्या, वेखंड व असाणा ह्यांचें चूर्ण थंड दुधांतून तीन दिवस घ्यावें, म्हणजे निश्चयानें विटाळ येतो.

सगुडः श्यामतिलानां क्वाथः पीतः सुशीलितो नार्या ।
जनयति कुसुमं सहसा गतमपि सुचिरं निरातङ्कम् ॥ ३ ॥

काळ्या तिळाचा काढा थंड झाल्यावर गूळ घालून प्यावा. तो नष्ट झालेलें स्त्रियांचें आर्तव त्रासावांचून पुनः लवकर उत्पन्न करितो.

तिलशेलुकारवीणां क्वाथं पीत्वा नष्टरजा महिला ।
सगुडं शिशिरं त्रिदिनाज्जनयति कुसुमं न संदेहः ॥ ४ ॥

काळे तीळ, भोकरीची साल व बडीशेप ह्यांचा काढा थंड झाल्यावर गूळ घालून तीन दिवस प्यावा. तो विटाळ उत्पन्न करितो, ह्यांत संशय नाहीं.

इक्ष्वाकुबीजदन्तीचपलागुडमदनकिण्वयावशूकैः ।
सस्नुक्क्षीरैर्वर्तिर्योनिगता कुसुमसंजननी ॥ ५ ॥

कडू भोपळ्याच्या बिया, दंतीबीज (जेपाळ), पिंपळी, गूळ, गेळफळ, सुराबीज, जवखार व त्रिधारी निवडुंगाचा चीक ह्यांची वात करून योनींत ठेवावी; म्हणजे ती विटाळ उत्पन्न करिते.

वंध्या स्त्रीला गर्भदायक औषध.

बला सिता सातिबला मधूकं वटस्य शृङ्गं गजकेशरं च ।
एतन्मधुक्षीरघृतैर्निपीय वन्ध्या सुपुत्रं नियतं प्रसूते ॥ १ ॥

चिकणामूळ, खडीसाखर, मुद्रांची मुळी, जेष्टमध, वडाच्या डिऱ्या, नाकेशर (पुन्नाग केशर) ह्यांचें चूर्ण दूध, तूप व मध ह्यांजबरोबर प्यावें; म्हणजे वांझेला उत्तम पुत्र होतो.

अश्वगन्धाकषायेण सिद्धं दुग्धं घृतान्वितम् ।
ऋतुस्नाताऽङ्गना प्रातः पीत्वा गर्भं दधाति हि ॥ २ ॥

ऋतुस्नात स्त्रीनें (चवथ्या दिवसापासून) अश्वगंधाच्या काढ्यांत सिद्ध केलेलें दूध तूपांतून प्रातःकाळीं प्यावें, म्हणजे गर्भधारणा होते.

पुष्योद्धृतं लक्ष्मणाया मूलं दुग्धेन कन्यया ।
पिष्टं पीत्वा ऋतुस्नाता गर्भं धत्ते न संशयः ॥ ३ ॥

पुष्य नक्षत्रावर लक्ष्मणा वनस्पतीचें मूळ आणून कुमारीच्या

हातानें दुधांत वाटून ऋतुस्नात स्त्रीनें प्यावें. म्हणजे तिला गर्भ-धारणा होते ह्यांत संशय नाहीं.

कुरण्टमूलं धातक्याः कुसुमानि वटांकुराः ।
नीलोत्पलं पयोयुक्तमेतद्गर्भप्रदं ध्रुवम् ॥ ४ ॥

कोरांटीचें मूळ, धायटीचें फूल, वडाचे अंकुर व निळें कमळ ह्यांचें चूर्ण दुधांतून घ्यावें. तें गर्भदायक आहे.

याऽबला पिबति पार्श्वपिप्पलं जीरकेण सहितं हिताशना ।
श्वेतया विशिखपुंखया युतं सा सुतं जनयतीह नान्यथा ॥५॥

पारोसा पिंपळ, जिरें व पांढऱ्या उन्हाळीचें मूळ दुधांत वांटून जी स्त्री प्राशन करिते व पथ्यानें राहते, तिला मुलगा होतो. हें अन्यथा नाहीं.

पत्रमेकं पलाशस्य पिष्ट्वा दुग्धेन गर्भिणी ।
पीत्वा पुत्रमवाप्नोति वीर्यवन्तं न संशयः ॥ ६ ॥

गर्भिणी स्त्रीनें एक पळसाचें पान दुधांत वाटून नित्य प्यावें. म्हणजे तिला पराक्रमी पुत्र होतो.

शूकरशिम्बीमूलं मध्यं वा दधिफलस्य सपयस्कम् ।
पीत्वाऽथोभयलिङ्गीबीजं कन्यां न सूते स्त्री ॥ ७ ॥

कुहिलीचें मूळ अथवा कवठामधील गर दुधाशीं पिणाऱ्या स्त्रीला नपुंसक अथवा कन्यासंतति होत नाहीं (म्हणजे मुलगा होतो.)

क्षीरेण श्वेतबृहतीमूलं नासापुटे पिबेत् ।
पुत्रार्थं दक्षिणा नासा वामया कन्यकार्थिनी ॥ ८ ॥

पांढऱ्या रिंगणीचें मूळ दुधांत वाटून, जिला मुलगा व्हावा अशी इच्छा असेल तिनें उजव्या नाकपुडीनें प्यावें; आणि जिला मुलगी व्हावी अशी इच्छा असेल तिनें डाव्या नाकपुडीनें प्यावें.

लक्ष्मणा क्षीरसंयुक्ता नस्ये पाने प्रदाप्यताम् ।
तेन साऽपि लभेद्गर्भं पुत्रो विद्याधरो भवेत् ॥ ९ ॥
वामनाड्या भवेत्कन्या पुत्रो दक्षिणया भवेत् ।

लक्ष्मणा नामक वनस्पती दुधांत वाटून नाकानें प्राशन करावयास द्यावी, म्हणजे त्या स्त्रीला गर्भ राहतो. आणि तिला बुद्धिमान पुत्र होतो. डाव्या नाकपुडीनें प्याल्यानें कन्या होते, व उजव्या नाकपुडीनें प्याल्यानें पुत्र होतो.

रक्तेऽधिके भवेत्कन्या पुत्रः शुक्रेऽधिके भवेत् ॥ १० ॥
शुक्रशोणितमिश्रेण भवेद्योऽसौ नपुंसकः ।

गर्भाधानकालीं आर्तव अधिक झालें तर कन्या होते व शुक्र अधिक झालें तर मुलगा होतो. आणि शुक्रार्तवाच्या समान मिश्रणानें नपुंसक होतो.

एरण्डस्य तु बीजानि मातुलुङ्गस्य चैव हि ।
सर्पिषा परिपिष्टानि पिबेद्गर्भप्रदानि च ॥ ११ ॥

महाळुंगाच्या बिया व एरंडाच्या बिया तुपांत वाटून प्राशन कराव्या, म्हणजे गर्भ राहतो.

लङ्काकारं लक्ष्मणायाश्च मूलं कण्ठे बद्धं सर्पिषा नस्ययोगात् ।
पीत्वा सूते पुत्रमत्यन्तवीर्यं पश्चादन्यानप्यमन्दाङ्गयष्टिः ॥ १२॥

लक्ष्मणा नांवाच्या वनस्पतीच्या मुळीच्या, लाकाच्या (एक प्रकारचें धान्य) आकाराच्या कांचऱ्या करून गळ्यांत बांधाव्या व तीच मुळी तुपांत उगाळून नाकानें प्यावी. म्हणजे त्या स्त्रीला पराक्रमी पुत्र होतो व शरीराला शिथिलपणा न येतां तिला आणखीही मुलगे होतात.

तिलतैलदुग्धफाणितदधिघृतमेकत्र पाणिना मथितम् ।
पीतं सपिप्पलीकं जनयति पुत्रं परं महिला ॥ १३ ॥

तिळाचें तेल, दूध, काकवी, दही व तूप हे जिन्नस एकत्र करून, हातानें घुसळून सारखें करून, त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून प्यावें. म्हणजे त्या स्त्रीला उत्तम प्रकारचा पुत्र होतो.

एकस्य मातुलुंगस्य बीजानि सकलान्यपि ।
ऋत्वन्ते दुग्धपिष्टानि पीत्वाऽऽप्नोत्यबला सुतम् ॥ १४ ॥

सबंद एका महाळुंगांतील बिया दुधांत वाटून ऋतुस्नात झाल्यावर चवथे दिवशीं प्राशन कराव्या, म्हणजे त्या स्त्रीला गर्भ रहातो.

फलघृत.

मञ्जिष्ठा मधुकं कुष्ठं त्रिफला शर्करा बला ।
मेदे पयस्या काकोली मूलं चैवाश्वगन्धजम् ॥ १ ॥
अजमोदा हरिद्रे द्वे प्रियंगुः कटुरोहिणी ।
उत्पलं कुमुदं लाक्षा काकोल्यौ चन्दनद्वयम् ॥ २ ॥
एतेषां कार्षिकैर्भागैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ।

शतावरीरसं क्षीरं घृताद्देयं चतुर्गुणम् ॥ ३ ॥
सर्पिरेतन्नरः पीत्वा स्त्रीषु नित्यं वृषायते ।
पुत्राञ्जनयते वीरान्मेधाढ्यान्प्रियदर्शनान् ॥ ४ ॥
या चैवास्थिरगर्भा स्यात्पुत्रं वा जनयेन्मृतम् ।
अल्पायुषं वा जनयेद्या च कन्यां प्रसूयते ॥ ५ ॥
योनिरोगे रजोदोषे परिस्रावे च शस्यते ।
प्रजावर्धनमायुष्यं सर्वग्रहनिवारणम् ॥ ६ ॥
नाम्ना फलघृतं ह्येतदश्विभ्यां परिकीर्तितम् ।
अनुक्तं लक्ष्मणामूलं क्षिपन्त्यत्र चिकित्सकाः ॥ ७ ॥
जीवद्वत्सैकवर्णाया घृतं त्वत्र प्रयुज्यते ।
आरण्यगोमयेनेह वह्निज्वाला च दीयते ॥ ८ ॥

मंजिष्ट, जेष्टमध, कोष्ट, त्रिफळा, खडीसाखर, चिकणामूळ, मेदा, महामेदा, सूर्यफुलाची मुळी, कावळी, अश्वगंध, अजमोदा, हळद, दारुहळद, गव्हला, कुटकी, निळें कमळ, तांबडें कमळ, लाख, काकोली, क्षीरकाकोली आणि तांबडा व पांढरा चंदन ह्या औषधांचा कल्क एक एक तोळा, तूप चौसष्ट तोळे, शतावरीचा रस व दूध तुपाच्या चौपट ह्याप्रमाणें जिन्नस एकत्र करून चुलीवर ठेवून तूप पचन करावें. हें तूप पुरुषानें घेतलें असतां त्याला कामोद्दीपन होतें. ह्याच्या सेवनानें पराक्रमी, बुद्धिमान व सुंदर पुत्र होतात. जिला गर्भ ठरत नाहीं, किंवा मुलगे होऊन मरतात, अगर अल्पायु संतति होते, व जिला पुष्कळ मुलीच होतात, तिला व योनिरोग, आर्तव-दोष व प्रदर ह्यांजवर हें प्रशस्त आहे. हें तूप संततीची वाढ करणारें, आयुष्यवर्धक व सर्व ग्रह (पूतनादि) पीडा निवारण करणारें आहे. हें फलघृत नांवाचें तूप पूर्वीं अश्विनीकुमारांनीं सांगितलें होतें. ह्याच्या पाठांत न सांगितलेलें असें लक्ष्मणामूळ कित्येक वैद्य ह्यांत घालितात. ज्या गाईचीं वासरें जिवंत आहेत अशा एकवर्ण गाईचें तूप ह्या प्रयोगांत घेतात. आणि गाईच्या रानशेणीचा अग्नि देतात.

गर्भनिवारण.

पिप्पलिविडंगटङ्कणसमचूर्णं या पिबेत्पयसा ।
ऋतुसमये न हि तस्या गर्भः संजायते क्वापि ॥ १ ॥

पिंपळी, वावडिंग व टाकणखार ह्यांचें समभाग चूर्ण ऋतुकाळीं

दुधाशीं घ्यावें, म्हणजे त्या स्त्रीला केव्हांही गर्भ रहात नाहीं.

आरनालपरिपेषितं त्र्यहं या जपाकुसुममत्ति पुष्पिणी ।
सत्पुराणगुडमुष्टिसेविनी सा दधाति न हि गर्भमंगना ॥ २ ॥

जी ऋतुमती स्त्री ऋतुकाळीं तीन दिवस जासवंदीचीं फुलें कांजींतून खाऊन चार तोळे जुना गूळ खाते, तिला गर्भधारण होत नाहीं.

तैलाविलं सैन्धवखण्डमादौ निधाय रण्डा निजयोनिमध्ये ।
नरेण सार्धं रतिमातनोति या सा न गर्भं लभते कदाचित् ॥ ३

तिळाच्या तेलांत बुडविलेला सैंधेलोणाचा खडा प्रथम योनींत ठेवून नंतर पुरुषाशीं रत होणाऱ्या विधवा स्त्रीला गर्भधारणा होत नाहीं.

तण्डुलीयकमूलानि पिष्ट्वा तण्डुलवारिणा ।
ऋत्वन्ते तु त्र्यहं पीत्वा वन्ध्याः कुर्वन्ति योषितः ॥ ४ ॥

तांदुळजाचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून ऋतुमती स्त्रीनें चवथे दिवसापासून तीन दिवस प्यावें, म्हणजे ती स्त्री वंध्या होते.

धूपिते योनिरन्ध्रे तु निम्बकाष्ठैश्च युक्तितः ।
ऋत्वन्ते रमते या स्त्री न सा गर्भमवाप्नुयात् ॥ ५ ॥

रजोदर्शनानंतर कडुनिंबाच्या लाकडाची धुरी योनीस देऊन रमणाऱ्या स्त्रीला गर्भ रहात नाहीं.

तालीसगैरिके पीते बिडालपदमात्रके ।
शीताम्बुना चतुर्थेऽह्नि वन्ध्या नारी प्रजायते ॥ ६ ॥

तालीसपत्र व सोनकाव ह्यांचें चूर्ण चवथे दिवशीं थंड पाण्याशीं एक तोळाभर प्यावें, म्हणजे ती स्त्री वंध्या होते.

ग्राह्यं कृष्णचतुर्दश्यां धत्तूरस्य च मूलकम् ।
कटौ बद्ध्वा रमेत्कान्तं न गर्भः संभवेत्क्वचित् ॥ ७ ॥
मुक्तेन लभते गर्भं पुरा नागार्जुनोदितम् ।
तन्मूलचूर्णं योनिस्थं न गर्भः संभवेत्क्वचित् ॥ ८ ॥

वद्य चतुर्दशीला काळ्या धोतऱ्याचें मूळ काढून आणून तें कमरेंत बांधून रत होण्याऱ्या स्त्रीला केव्हांही गर्भ राहात नाहीं. व ती मुळी सोडून टाकून रत झाल्यास गर्भ राहतो, असें पूर्वीं नागार्जुनानें सांगितलें आहे. त्या धोतऱ्याच्या मुळाचें चूर्ण योनींत ठेविलें असतां केव्हांही गर्भ राहत नाहीं. *

---

१. गर्भधारणेस प्रतिबंध करणें म्हणजे भ्रूणहत्येचें पातक आहे. असें

गर्भपातनविधि.

गृञ्जबीजं टङ्कत्रितयं तावच्च दाडिमीमूलम् ।
तुवरीटङ्कद्वितयं सिन्दूरं टङ्कयुगुलं च ॥ १ ॥
संमर्द्य खल्वमध्ये तोयेनैतान्निपीय गर्भवती ।
रण्डा योषिद्गर्भं वेश्या वा पातयत्याशु ॥ २ ॥

गाजराचें बी, टाकणखार व डाळिंबीचें मूळ, दुसरें–तुरटी व टाकणखार आणि तिसरें–शेंदूर व टाकणखार हीं तीन औषधें खलामध्यें खलून पाण्यांतून प्यावीं. म्हणजे विधवा किंवा वेश्या यांचा त्वरित गर्भपात होतो.

निर्गुण्डीद्रवसंपिष्टं चित्रमूलं मधुप्लुतम् ।
कर्षं पीत्वा स्रवत्याशु गर्भं रण्डाकुलोद्भवम् ॥ ३ ॥

निर्गुंडीच्या पाल्याच्या रसांत चित्रकमूळ एक तोळाभर वाटून मध घालून प्यावें, म्हणजे विधवेचा त्वरित गर्भपात होतो.

काण्डमेरण्डपत्रस्य योनावष्टांगुलं क्षिपेत् ।
चतुर्मासोद्भवो गर्भः स्रवत्येव हि तत्क्षणात् ॥ ४ ॥

एरंडाच्या पानाचा आठ बोटें लांबीचा देठ योनींत ठेवला असतां चार महिन्याचा गर्भ त्वरित पडतो.

देवालये तु यच्चूर्णं कर्षैकं तोयपेषितम् ।
पिबेद्गर्भवती नारी गर्भः स्रवति तत्क्षणात् ॥ ५ ॥

देवळाचा जुनाट चुना एक तोळाभर पाण्याशीं गर्भिणीनें प्यावा. म्हणजे क्षणांत गर्भपात होतो.

आलोड्य काञ्जिकैर्घोटीपुरीषं वस्त्रगालितम् ।
ससिंधूग्रासुरीतैलविषमागतगर्भनुत् ॥ ६ ॥

घोडीची लीद कांजींत कोळून ती कांजी वस्त्रगाळ करून घेऊन

असून हीं औषधें सांगण्याचा उद्देश असा दिसतो कीं, आमचे इकडे स्त्रियानां मुलें होण्यास थोडा उशीर झाला कीं, लागलेच त्या मुलें होण्याकरितां औषधोपचाराचा प्रयत्न करूं लागतात. ती संधी साधून त्यांचा द्वेष करणाऱ्यापैकीं कोणीं त्यांना मूल न व्हावें अशा दुष्ट बुद्धीनें फसवून वरील प्रकारचीं औषधें देण्याचा प्रयत्न करितील, तर त्याबद्दलची माहिती असली म्हणजे तपास करून तशा औषधांचा परिणाम आपल्यावर होऊं न देण्याविषयीं सावध राहतां यावें, ह्या हेतूनें हे प्रयोग सांगितले आहेत.

त्यांत, सैंधेलोण वेखंड व मोहरीचें तेल घालून प्यावयास द्यावें. म्हणजे तें आडव्या येणाऱ्या गर्भाचा पात करितें. *

योनिरोगांची चिकित्सा.

तासु योनिषु चाऽऽद्यासु स्नेहादिक्रम इष्यते ।
वस्त्यभ्यङ्गपरीषेकप्रलेपाः पिचुधारणम् ॥ १ ॥

त्यांत पहिल्या वातिक योनिरोगामध्यें स्नेहनादि उपचार करावे. बस्ती (उत्तरबस्ती), अभ्यंग (तेल लावणें), परिषेक(शिंपणें), लेप व पिचु-(औषधी तेलाचा बोळा) धारण हे उपचार करावे.

नतवार्ताकिनीकुष्ठसैन्धवामरदारुभिः ।
तिलतैलं पचेन्नारी पिचुं तस्य विधारयेत् ॥ २ ॥
विप्लुतायां सदा योनौ व्यथा तेन प्रशाम्यति ।

तगर, डोरली, कोष्ट, सैंधेलोण व देवदार ह्या औषधांचा कल्क घालून तयार केलेल्या तिळाच्या तेलाचा बोळा विप्लुता नांवाच्या योनींत धारण करावा; म्हणजे त्यानें व्यथा शांत होते.

वातलां कर्कशां स्तब्धामल्पस्पर्शां तथैव च ॥ ३ ॥
कुम्भीस्वेदैरुपचरेदन्तर्वेश्मनि संवृते ।
धारयेद्वा पिचुं योनौ तिलतैलस्य सा सदा ॥ ४ ॥

वातला, कर्कशा, स्तब्धा व अल्पस्पर्शा अशा योनीला कुंभिस्वेद देऊन उपचार करावे. जी आंतून संकुचित झाली आहे त्या योनींच्या स्त्रीनें नेहमीं तिळाच्या तेलाचा बोळा धारण करावा.

रास्नाश्वगन्धावृषकैर्योनिशूलहरं पयः ।
गुडूचीत्रिफलादन्तीक्वाथैश्च परिषेचनम् ॥ ५ ॥

रास्ना, अश्वगंध व पाषाणभेद ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध योनिशूळाचा नाश करितें. तसेंच गुळवेल, त्रिफळा व दांतीमूळ ह्यांच्या काढयानें योनीवर सेचन करावें.

---

१. गर्भपातकारक हीं जीं औषधें सांगितलीं आहेत तीं केवळ विपरीत रीतीनें बाहेर येणाऱ्या गर्भाचा सुखानें लवकर पात व्हावा ह्या हेतूनें सांगितलीं आहेत, हें शेवटच्या प्रयोगावरून स्पष्ट होतेंच आहे. तथापि ही मुद्दाम सूचना दिली आहे कीं, विनाकारण कोणीं हे प्रयोग करूं नयेत. कारण त्यांपासून जिवास अपाय होण्याचा संभव आहे.

बिल्वमार्कवजं बीजकल्कं मद्येन पाययेत् ।
तेन योनिगतं शूलमाशु शाम्यति योषिताम् ॥ ६ ॥

बेलफळ व माका ह्यांचें बीं मद्यांत वाटून प्यावें. त्यानें स्त्रियांचा योनिशूळ त्वरित शांत होतो.

उपकुञ्चिकां पिप्पलीं च मदिरां लाभतः पिबेत् ।
सौवर्चलेन संयुक्तं योनिशूलनिवारणम् ॥ ७ ॥

कलौंजी जिरें (कडू कारळे), पिंपळी व मद्य ह्यांपैकीं मिळतील ते जिन्नस घेऊन पादेलोणाशीं खावे. म्हणजे योनिशूळाचें निवारण होतें.

पिच्छलानां च योनीनां सेकाभ्यङ्गपिचुक्रियाः ।
शीताः पित्तहराः कार्याः स्नेहनार्थं घृतानि च ॥ ८ ॥

पित्तजन्य योनिरोगावर सेक, अभ्यंग व पिचुधारण वगैरे क्रिया शीत व पित्तनाशक अशा कराव्या व स्नेहनाकरितां तूप योजावें.

प्रस्रंसिनीं घृताभ्यक्तां क्षीरस्विन्नां प्रवेशयेत् ।
विधाय वेसवारेण ततो बन्धं समाचरेत् ॥ ९ ॥

प्रस्रंसिनी योनीला तूप लावून, ऊन दुधानें स्वेदन करून नंतर आंत सारून, ठिकाणीं बसवून, वर वेशवार लावून ती बांधावी.

वेसवार.

शुण्ठीमरीचकृष्णाभिर्धान्यकाजाजिदाडिमैः ।
पिप्पलीमूलसंयुक्तैर्वेसवारः स्मृतो बुधैः ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळीं, धने, जिरें, डाळिंब व पिंपळमूळ ह्यांच्या चूर्णाला वेसवार असें म्हणतात.

धात्रीरसं सितायुक्तं योनिदाहे पिबेत्सदा ।
सूर्यकान्ताभवं मूलं पिबेद्वा तण्डुलाम्बुना ॥ २ ॥

योनिदाहावर नेहमीं आवळयाचा रस साखर घालून प्यावा. अथवा सूर्यफुलाच्या मुळया तांदळाच्या धुवणांतून वाटून प्याव्या.

योन्यां तु पूयस्राविण्यां शोधनद्रव्यनिर्मितैः ।
सगोमूत्रैः सलवणैः पिण्डैः संपूरणं हितम् ॥ ३ ॥

ज्या योनींतून पू येतो, अशा योनींत व्रणशोधक औषधें, गोमूत्र आणि सैंधव हीं एकत्र वाटून त्यांचा गोळा करून योनींत ठेवावा. तो हितकारक आहे.

पिचवश्च घृताभ्यक्ताश्चन्दनाम्भःसमुत्थिताः ।
योनौ स्थाप्याः स्त्रिया दाहकृच्छ्रपाकप्रशान्तये ॥ ४ ॥

योनिदाह, मूत्रकृच्छ्र व योनिपाक ह्यांची शांति होण्याकरितां चंदनाच्या काढ्यांत भिजवून तूप लावलेला बोळा योनींत ठेवावा.

योन्यां बलासजुष्टायां सर्वं रूक्षोष्णमौषधम् ।
तैलं सीधु यवान्नं च पथ्यारिष्टं च योजयेत् ॥ ५ ॥

कफदोषजन्य योनिरोगांत रूक्ष व उष्ण औषधोपचार करावे. तेल, सीधु (कांजीचा एक भेद) सातूचें अन्न व हिरड्याचें अरिष्ट ह्यांचीही योजना करावी.

गुडूचीत्रिफलादन्तीक्वथितोदकधारया ।
योनिं प्रक्षालयेत्तेन ततः कण्डूः प्रशाम्यति ॥ ६ ॥

गुळवेल, त्रिफळा व दांतीमूळ ह्यांच्या काढ्याच्या पाण्याची धार धरून योनि धुवावी; म्हणजे कंडू शांत होते.

मुद्गपुष्पं सखदिरं पथ्याजातीफलं तथा ।
वृकीपूगं च संचूर्ण्य वस्त्रपूतं क्षिपेद्भगे ॥ ७ ॥
योनिर्भवति संकीर्णा न स्रवेच्च जलं ततः ।

मुगाचीं फुलें, कात, हिरडे, जायफळ, पहाडमूळ, सुपारी ह्यांचें चूर्ण वस्त्रगाळ करून योनींत घालावें. म्हणजे ती शुष्क होते, व तींतून स्राव होत नाहीं.

कपिकच्छूभवं मूलं क्वाथयेद्विधिनाऽम्भसा ॥ ८ ॥
योनिः संकीर्णतां याति क्वाथेनानेन धावनात् ।

कुहिलीच्या मुळांचा विधियुक्त काढा करून त्यानें योनि धुवावी, म्हणजे ती शुष्क होते.

पिप्पल्या मरिचैर्माषैः शताह्वाकुष्ठसैन्धवैः ॥ ९ ॥
वर्तिस्तुल्या प्रदेशिन्या धार्या योनिविशोधिनी ।

पिंपळी, मिरें, उडीद, बडीशेप, कोष्ट व सेंधेलोण ह्यांची बोटा-एवढी वात करून ती योनींत ठेवावी. ती योनीचें शोधन करिते.

सुरामण्डोत्थितो धार्यः पिचुर्योनौ कफात्मनि ॥ १० ॥
कण्डूपैच्छिल्यसंस्रावशैथिल्यविनिवृत्तये ।

कफदोषजन्य योनिरोगांत कंडू, बुळबुळीतपणा, स्राव आणि

शिथिलपणा हीं जाण्याकरितां मद्याच्या निवळींत भिजविलेला बोळा योनींत धरावा.

सुगन्धानां पदार्थानां कल्कचूर्णैः शृतैः कृतः ॥ ११ ॥
योनौ दौर्गन्ध्यशमनः पूयपैच्छिल्यभाजि च ।

सुगंधी पदार्थांचे कल्क, चूर्ण व काढे ह्यांचे बोळे योनीची दुर्गंधी नाहींशी करितात. पू व बुळबुळीतपणा ह्यांचाही ते नाश करितात.

संनिपातसमुत्थायां कार्या योन्यां यदा क्रियाः ॥ १२ ॥
साधारणा दशांघ्रीश्रीमदाक्काथपिचुर्हितः ।

सन्निपातज योनिदोषावर जी क्रिया करावयाची ती तिन्हीही दोषांवरील करावी. आणि दशमुळें, बेलफळ व धायटीचीं फुलें ह्यांच्या काढ्यांत कापूस भिजवून तो योनींत ठेवावा. तो हितकारक आहे.

जीरकद्वितयं कृष्णा सुषवी सुरभिर्वचा ॥ १३ ॥
वासकं सैन्धवं चापि यवक्षारो यवानिका ।
एषां चूर्णं घृते किंचिद्भृष्ट्वा खण्डेन मोदकम् ॥ १४ ॥
कृत्वा खादेद्यथावह्नि योनिरोगाद्विमुच्यते ।

जिरें, शहाजिरें, पिंपळी, कलौंजी जिरें (कडुकारळे), तुळस, वेखंड, अडुळसा, सेंधेलोण, जवखार, ओवा ह्यांचें चूर्ण तुपांत थोडें तळून खडीसाखर घालून त्यांचे मोदक करावे. आणि अग्निबळ पाहून ते भक्षण करावे. म्हणजे योनिरोगापासून मुक्तता होते.

मूषकक्काथसंसिद्धतिलतैलकृतः पिचुः ।
नाशयेद्योनिरोगांस्तान्धृतो योनौ न संशयः ॥ १५ ॥

उंदराचे मांसाचा पाण्यांत काढा करून त्यांत तिळाचें तेल सिद्ध करावें आणि त्याचा बोळा योनींत धारण करावा. म्हणजे तो योनिरोगाचा नाश करितो.

त्रिफलादि घृत.

त्रिफलां द्वौ सहचरौ गुडूचीं सपुनर्नवाम् ।
शुकनासां हरिद्रे द्वे रास्नामेदाशतावरीः ॥ १ ॥
कल्कीकृत्य घृतप्रस्थं पचेत्क्षीरे चतुर्गुणे ।
तत्सिद्धं पाययेन्नारीं योनिरोगप्रशान्तये ॥ २ ॥

त्रिफळा, निळी व पिंवळी कोरांटी, गुळवेल, वसू, शुकनासा, (शिवण), हळद, दारुहळद, रास्ना, मेदा, शतावरी, ह्यांचा कल्क

व तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें, आणि तें योनिरोगाच्या शांतीकरितां स्त्रियांनीं घ्यावें.

योनिकंदाची चिकित्सा.

गैरिकाम्रास्थिजठररजन्यञ्जनकट्फलाः ।
पूरयेद्योनिमेतेषां चूर्णैः क्षौद्रसमन्वितैः ॥ १ ॥

सोनकाव, आंब्यांतील कोय, हळद, रसांजन, कायफळ, यांचें चूर्ण मधांत कालवून तें योनींत घालावें.

त्रिफलायाः कषायेण सक्षौद्रेण च सेचयेत् ।
प्रमदा योनिकन्देन व्याधिना परिमुच्यते ॥ २ ॥

त्रिफळ्याचा काढा करून त्यांत मध घालून त्यानें सिंचन करावें; म्हणजे योनिकंदापासून स्त्रीची मुक्तता होते.

आखोर्मांसं सपदि बहुधा सूक्ष्मखण्डीकृतं तत्
तैले पाच्यं द्रवति नियतं यावदेतेन सम्यक् ।
तत्तैलाक्तं वसनमनिशं योनिभागे दधाना
सत्यं व्रीडाजनकमबला योनिकन्दं निहन्ति ॥ ३ ॥

उंदराचें ताजें मांस आणून त्याचे तुकडे करून ते तेलांत कढवावे. नंतर त्या तेलांत फडकें भिजवून तें योनींत धारण करावें. तें स्त्रियांना लाज उत्पन्न करणाऱ्या योनिकंदाचा नाश करितें.

गर्भस्राव व पात ह्यांचें निदान.

भयाभिघातात्तीक्ष्णोष्णपानाशननिषेवणात् ।
गर्भे पतति रक्तस्य सशूलं दर्शनं भवेत् ॥ १ ॥

भय, आघात, तीक्ष्ण व ऊष्ण पदार्थ खाणें-पिणें, ह्या कारणांनीं गर्भपात होतो. त्या वेळीं प्रथम शूलयुक्त रजोदर्शन होतें.

स्राव व पात ह्यांचा काळ.

आचतुर्थात्ततो मासात्प्रस्रवेद्गर्भविद्रवः ।
ततः स्थिरशरीरस्य पातः पञ्चमषष्ठयोः ॥ २ ॥

चार महिनेपर्यंत गर्भ द्रवावस्थेंत असतो, म्हणून त्याचा स्राव होतो. नंतर तो स्थिर होतो. त्या स्थिर गर्भाचा पात पांचव्या किंवा सहाव्या महिन्यांत होतो.

गर्भपाताला दृष्टांत.

गर्भोऽभिघातविषमाशनपीडनाद्यैः ।

पक्कं द्रुमादिव फलं पतति क्षणेन ॥ ३ ॥

जसें वृक्षावरील पक्क फळ थोड्याशा आघातानें क्षणांत पडतें, तसा आघातानें किंवा विषम भोजनादिकांनीं गर्भाचा पात होतो.

भावप्रकाशांतील गर्भाचे उपद्रव.

प्रस्रंसमाने गर्भे स्याद्दाहः शूलश्च पार्श्वयोः ।
पृष्ठे रुक्प्रदरानाहौ मूत्रसङ्गश्च जायते ॥ १ ॥

गर्भाचा स्राव व्हावयाचा असतां कुशीमध्यें दाह व शूळ होतो. पाठ दुखते, रक्तस्राव होतो, पोट फुगतें व लघवीचा अवरोध होतो.

गर्भाच्या स्थानांतरामुळें होणारे उपद्रव.

स्थानात्स्थानान्तरं तस्मिन्प्रयात्यपि च जायते ।
आमपक्वाशयादौ तु क्षोभः पूर्वेऽप्युपद्रवाः ॥ १ ॥

गर्भ आपलें स्थान सोडून दुसरीकडे गेला असतां आमाशय, पक्वाशय इत्यादिकांचा क्षोभ होतो. आणि पूर्वी जे उपद्रव सांगितले तेही होतात.

मूढगर्भाचें निदान.

मूढं करोति पवनः खलु मूढगर्भं
शूलं च योनिजठरादिषु मूत्रसङ्गम् ।

वायूच्या प्रकोपानें गति बंद झाल्यामुळें गर्भ वांकडा होतो, त्याला मूढगर्भ असें म्हणतात. हा योनि व पोट ह्यांमध्यें शूळ व मूत्रावरोध हे विकार करितो.

भुग्नोऽनिलेन विगुणेन ततः स गर्भः
संख्यामतीत्य बहुधा समुपैति योनिम् ॥ १ ॥

विगुण झालेल्या वायूनें वांकडा झालेला गर्भ अनेक प्रकारांनीं योनीच्या द्वाराशीं येतो.

त्याचे आठ प्रकार.

द्वारं निरुद्ध्य शिरसा जठरेण कश्चित्
कश्चिच्छरीरपरिवर्तनकुब्जदेहः ।
एकेन कश्चिदपरस्तु भुजद्वयेन
तिर्यग्गतो भवति कश्चिदवाङ्मुखोऽन्यः ॥ १ ॥
पार्श्वापवृत्तिगतिरेति तथैव कश्चित्
इत्यष्टधा भवति गर्भगतिः प्रसूतौ ॥ २ ॥

एखादा गर्भ मस्तकानें योनिद्वार बंद करून येतो. एखादा पोटानें बंद करून येतो. एखादा अंग दुमडून कुबड्यासारखा ढुंगणाकडून येतो. एखादा एकच हात बाहेर काढून येतो, दुसरा दोन हात बाहेर काढून येतो. एखादा अडसराप्रमाणें सपशेल आडवा येतो. एखादा खालीं तोंड करून येतो, आणि एखादा कुशीकडे दुमडून योनिद्वाराकडे येतो. ह्याप्रमाणें प्रसूतिकाळीं मूढगर्भाच्या आठ गति संभवतात.

सुश्रुतोक्त दुसरे आठ प्रकार.

कश्चिद्वाभ्यां सक्थिभ्यां योनिमुखं प्रपद्यते ॥ १ ॥
कश्चिदाभुग्नैकसक्थिथारेतरेण सक्थ्ना ॥ २ ॥
कश्चिदाभुग्नसक्थिशरीरः स्फिग्देशेन तिर्यग्गतः ॥ ३ ॥
कश्चिदुदरपार्श्वपृष्ठानामन्यतमेन योनिद्वारं पिधायावतिष्ठते॥ ४ ॥
अन्तःपार्श्वापवृत्तशिराः कश्चिदेकेन बाहुना ॥ ५ ॥
कश्चिदाभुग्नशिरा बाहुद्वयेन ॥ ६ ॥
कश्चिदाभुग्नमध्यो हस्तपादशिरोभिः ॥ ७ ॥
कश्चिदेकेन सक्थ्ना योनिद्वारं प्रतिपद्यतेऽपरेण पायुमिति ॥ ८॥

एखादा दोन मांड्यांनीं योनिद्वाराकडे येतो. एखादा एक मांडी वाकडी करून दुसरी मांडी योनिद्वाराकडे करून येतो. एखादा मांड्या व अंग वांकवून ढुंगणानें आडवा योनिद्वाराकडे येतो. एखादा पोट, कुशी, किंवा पाठ ह्यांपैकीं एखाद्या किंवा दुसऱ्याच अवयवानें योनिद्वार आच्छादून येतो. एखादा कुशींत मुंडकें अडकवून एकच हात बाहेर काढून येतो. एखादा डोकें वाकवून दोन हात बाहेर काढून येतो. एखादा मध्यभाग वाकवून हात, पाय व डोकें योनिद्वाराकडे आणून येतो. एखादा एका मांडीनें योनिद्वाराचा व दुसऱ्या मांडीनें गुदद्वाराचा रोध करून येतो.

दुसऱ्या चार गति.

संकीलकः प्रतिखुरः परिघोऽथ बीज-
स्तेषूर्ध्वबाहुचरणैः शिरसा च योनौ ।
सङ्गी च यो भवति कीलकवत्सकीलो
दृश्यैः खुरैः प्रतिखुरः स हि कायसङ्गी ॥

गच्छेद्भुजद्वयशिराः स च बीजकाख्यो
योनौ स्थितः स परिघः परिघेण तुल्यः ॥ १ ॥

संकीलक, प्रतिखुर, परीघ व बीज अशा मूढगर्भाच्या आणखी चार गति आहेत. त्यांत जो गर्भ हातपाय वर करून डोक्यानें योनिद्वाराकडे येतो व खिळ्याप्रमाणें राहतो, त्याला कीलक मूढगर्भ असें म्हणतात. ज्या गर्भाचे हातपाय खुराप्रमाणें योनिद्वाराकडे येऊन बाकी सर्व शरीर आंत अडकून राहतें, त्याला प्रतिखुर असें म्हणतात. जो दोन्ही हात व डोकें योनिद्वाराशीं आणून अडकून राहतो, त्याला बीजक म्हणतात. आणि जो गर्भ परिघाप्रमाणें (आडसराप्रमाणें) योनिद्वाराकडे येतो त्याला परिघ असें म्हणतात.

परिघ

योनिमावृत्य यस्तिष्ठेत्परिघो गोपुरं यथा ।
तथाऽन्तर्गर्भमायान्तं विद्यात्परिघसंज्ञितम् ॥ १ ॥

परिघाचें लक्षण भोजानेंही सांगितलें आहे. तें असें—गोपुराच्या ठिकाणचा परीघ ज्याप्रमाणें द्वाराचा रोध करून राहतो, त्याप्रमाणें योनिद्वाराशीं येऊन राहणाऱ्या गर्भाला परीघ म्हणतात.

असाध्य गर्भाचें व गर्भिणीचें लक्षण.

अपविद्धशिरा या तु शीतांगी निरपत्रपा ।
नीलोद्धतशिरा हन्ति सा गर्भं स च तां तथा ॥ १ ॥

जिला आपलें मस्तक सावरण्याची शक्ति नाहीं, जिचें अंग थंड झालें आहे, जिची लाज नाहींशी झाली आहे, व जिच्या कुशीवर निळ्या शिरा दिसूं लागल्या आहेत, अशी गर्भिणी गर्भाला व गर्भ तिला ह्याप्रमाणें परस्पर मारतात.

मृतगर्भाचें लक्षण.

गर्भास्पन्दनमावीनां प्रणाशः श्यावपाण्डुता ।
भवेदुच्छ्वासपूतित्वं शूलश्चान्तर्मृते शिशौ ॥ १ ॥

पोटांत गर्भाचें चलनवलन बंद होणें, वेणा बंद होणें, गर्भिणीच्या अंगाला काळिमा व पांढुरकी येणें, तिच्या श्वासाला दुर्गंधी येणें व पोटास फुगोटी येणें हीं लक्षणें पोटांत गर्भ मृत झाला असतां होतात.

गर्भाच्या मरणाचें कारण.

मानसागन्तुभिर्मातुरुपतापैः पृथग्विधैः ।
गर्भो व्यापद्यते कुक्षौ व्याधिभिश्च प्रपीडितः ॥ १ ॥

गर्भाच्या आईच्या मानसिक किंवा आगंतुक त्रासामुळें (विकारामुळें) अगर ती रोगानें पीडल्यामुळें पोटामध्यें गर्भ मरतो.

गर्भिणीचें दुसरें असाध्य लक्षण.

योनिसंवरणं सङ्गः कुक्षौ मक्कल एव च ।
हन्युः स्त्रियं मूढगर्भो यथोक्ताश्चाप्युपद्रवाः ॥ १ ॥

योनिसंवरण (एक रोग), गर्भ कुशींत अडकून राहणें, मक्कल शूळ आणि वर सांगितलेले दुसरे उपद्रव हे ज्यांत झाले आहेत असा मूढगर्भ गर्भिणीला मारतो.

योनिसंवरणलक्षण.

वातलान्यन्नपानानि ग्राम्यधर्मं प्रजागरम् ।
अत्यर्थं सेवमानाया गर्भिण्या योनिमार्गगः ॥ २ ॥
मातरिश्वा प्रकुपितो योनिद्वारस्य संवृतिम् ।
कुरुते रुद्धमार्गत्वात्पुनरन्तर्गतोऽनिलः ॥ ३ ॥
निरुणद्ध्याशयद्वारं पीडयन्गर्भसंस्थितिम् ।
निरुद्धवदनोच्छ्वासो गर्भश्चाऽऽशु विपद्यते ॥ ४ ॥
उच्छ्वासरुद्धहृदयां नाशयत्यथ गर्भिणीम् ।
योनिसंवरणं नाम व्याधिमेनं प्रचक्षते ।
अन्तकप्रतिमं घोरं नाऽरभेत चिकित्सितुम् ॥ ५ ॥

वातल अशीं अन्नपानें, मैथुन व जागरण ह्यांच्या अति प्रसंगानें गर्भिणीच्या योनिमार्गांतील वायु प्रकुपित होऊन योनिद्वाराचें आकुंचन करतो; व पुनः गर्भाशयांत प्रवेश करून गर्भाशयाच्या द्वाराचा रोध करून त्या ठिकाणच्या गर्भाला पीडित करतो आणि

---

१ गर्भिणी सप्तमान्मासादुपरिष्टान्निषिध्यते ॥
संप्राप्ते त्वष्टमे मासि मैथुने परिवर्जयेत् ॥

सातव्या महिन्यापासून गर्भिणी स्त्री मैथुनाला अयोग्य आहे. आणि आठवा महिना लागल्यावर तर मैथुन वर्जच करावें. (हा श्लोक लेखी प्रतींत आहे. तो रात्रिचर्या प्रकरणांत देणें राहिला म्हणून तो येथें मुद्दाम दिला आहे.)

त्या त्या तोंडाचा व श्वासोच्छ्वासाचा रोध करतो. त्यामुळें गर्भ नाश पावतो. गर्भाच्या नाशामुळें हृदय व श्वासोच्छ्वास ह्यांचा रोध झालेल्या गर्भिणीलाही तो मारतो. ह्या विकाराला योनिसंवरण असें म्हणतात. ह्या कृतांतरूप व्याधीवर चिकित्सा करूं नये.

विकृताविकृत गर्भलक्षण.

ऋतुस्नाता तु या नारी स्वप्ने मैथुनमावहेत् ।
आर्तवं वायुरादाय कुक्षौ गर्भं करोति हि ॥ १ ॥
मासि मासि विवर्धेत गर्भिण्या गर्भलक्षणम् ।
कललं जायते तस्या वर्जितं पैतृकैर्गुणैः ॥ २ ॥

जी ऋतुस्नात स्त्री स्वप्नामध्यें मैथुनास प्रवृत्त होते, तिचें आर्तव वायूकडून गर्भाशयांत जाऊन गर्भ उत्पन्न करितें. तो गर्भ प्रतिमासीं वाढत असतो. त्या गर्भिणीला गर्भारपणाचीं सर्व लक्षणें होतात. त्यामध्यें पितृबीजाचे धर्म नसल्यामुळें तें नुसतें कलल होऊन राहतें.

सर्पवृश्चिककूष्माण्डविकृताकृतयश्च ये ।
गर्भाश्चेति त्रयश्चैव ज्ञेयाः पापकृतो भृशम् ॥ ३ ॥

साप, विंचू, कोहळा (कूष्मांड) ह्यांसारखे विकृताकृतीचे तीन प्रकारचे हे गर्भ पापकर्मामुळें होतात, असें सुश्रुतांत म्हटलें आहे.

गर्भस्रावाची व गर्भपाताची चिकित्सा.

गुर्विण्या गर्भतो रक्तं स्रवेद्यदि मुहुर्मुहुः ।
तन्निरोधाय सा दुग्धमुत्पलादिशृतं पिबेत् ॥ १ ॥

गर्भिणीच्या गर्भापासून जर वरचेवर रक्तस्राव होऊं लागला तर तो बंद होण्याकरितां तिनें उत्पलादि गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें दूध प्यावें.

उत्पलादि गण.

उत्पलं नीलमारक्तं कह्लारं कुमुदं तथा ।
श्वेताम्भोजं च मधुकमुत्पलादिरयं गणः ॥ १ ॥
संशीलितो हरत्येव दाहं तृष्णां हृदामयम् ।
रक्तपित्तं च मूर्छां च तथा छर्दिमरोचकम् ॥ २ ॥

निळें कमळ, तांबडें कमळ, लहान पांढरें कमळ, चंद्रविकासी पांढरें कमळ, पांढरें मोठें कमळ व मधुक जातीचें कमळ ह्याला उत्पलादि गण म्हणतात. ह्याचें सेवन केलें असतां दाह, तहान,

हृदयाचा विकार, रक्तपित्त, मूर्च्छा, ओकारी व अरुचि ह्यांचा नाश करतो.

लज्जालुर्धातकीपुष्पमुत्पलं मधु लोध्रकम् ।
जलस्थया स्त्रिया पीतं गर्भपातं निवारयेत् ॥ ३ ॥

लाजाळू, धायटीचीं फुलें, कमळाचीं फुलें, मध व लोध्र ह्यांचा काढा कमळाचा कल्क घालून प्यावा. तो गर्भपातनिवारण करितो.

पतन्तं स्तम्भयेद्गर्भं कुलालकरमृत्तिका ।
मधुच्छागीपयःपीता किं वा श्वेताऽपराजिता ॥ ४ ॥

कुंभाराच्या हाताची माती शेळीचें दूध व मध ह्यांतून प्यावी. किंवा पांढऱ्या गोकर्णीची मुळी प्यावी. हे दोन्हीही योग गर्भाचें स्तंभन करितात. (गर्भ पडूं देत नाहींत.)

पारावतमलः पीतस्त्र्यहं ताम्बूलवारिणा ।
गर्भिणीगर्भतो रक्तं स्तम्भयेन्निरुपद्रवम् ॥ ५ ॥

पारव्याची विष्ठा तीन दिवस विड्याच्या पानाच्या रसांतून प्यावी. ती गर्भिणीच्या गर्भापासून वहाणाऱ्या रक्ताचें पीडा न करितां स्तंभन करितें.

शर्कराबिसतिलं समांशकं माक्षिकेण सह भक्ष्यते यदा ।
नास्ति गर्भपतनोद्भवं भयं पापभीतिरिव तीर्थसेवया ॥ ६ ॥

साखर, कमळांतील केशर व तीळ हे समभाग वाटून मधाशीं भक्षावे. म्हणजे तीर्थसेवनानें जशी पापाची भीति नाहींशी होते, त्याप्रमाणें यामुळें गर्भपाताचें भय रहात नाहीं.

कङ्कतीमूलमाबद्धं कुमारीसूत्रकैः समैः ।
कटिदेशे नितम्बिन्या गर्भपातं निवारयेत् ॥ ७ ॥

कुमारीनें कातलेल्या सुताचे सम धागे घेऊन त्यांनीं करंडीचें मूळ गर्भिणीच्या कमरेंत बांधावें. तें गर्भपाताचें निवारण करितें.

वेणुग्रन्थिकुलत्थानां हरिद्राजनितं शृतम् ।
देयं न्यूनदिने पाते गर्भिणीनां भिषग्वरैः ॥ ८ ॥

वेळूच्या गांठी, हुलगे व हळकुंड ह्यांचा काढा करून तो अकालीं गर्भपात होणाऱ्या स्त्रीस द्यावा.

ह्रीबेरातिविषामुस्तामोचशक्रैः शृतं जलम् ।
दद्याद्गर्भे प्रचलिते प्रदरे कुक्षिरुज्यपि ॥ ९ ॥

वाळा, अतिविष, नागरमोथे, मोचरस व इंद्रजव ह्यांचा काढा गर्भाचें चलन, प्रदर व कुशींतील गर्भसंबंधीं शूल ह्यांजवर द्यावा.

प्रतिमासीं द्यावयाचीं औषधें.

मधुकं शाकबीजं च पयस्या सुरदारु च ।
अश्मन्तकः कृष्णतिलास्ताम्रवल्ली शतावरी ॥ १ ॥
वृक्षादनी पयस्या च लता चोत्पलसारिवा ।
अनन्ता सारिवा रास्ना पद्मा मधुकमेव च ॥ २ ॥
बृहतीद्वयकाश्मर्यक्षीरिशृंगास्त्वचो घृतम् ।
पृश्निपर्णी बला शिग्रुः श्वदंष्ट्रा मधुपर्णिका ॥ ३ ॥
शृंगाटकं बिसं द्राक्षा कसेरुमधुकं सिता ।
सप्तैतान्पयसा योगानर्धश्लोकसमापितान् ॥ ४ ॥
क्रमात्सप्तसु मासेषु गर्भे स्रवति योजयेत् ।

१.जेष्टमध, सागाचें बीं, क्षीरकाकोली व देवदार; २. आपटा, काळे तीळ, मंजिष्ट, व शतावरी; ३. वांडगूळ, क्षीरकाकोली, गव्हला, कमळ, व उपलसरी; ४. धमासा, उपलसरी, रास्ना, मंजिष्ट, व जेष्ट-मध; ५. रिंगणमूळ, डोरलीमूळ, शिवणीचें मूळ, भुईकोहळा, शिंगाडे, दालचिनी, व तूप; ६; पिठवण, चिकणामूळ, गोखरू, व शिवण; ७. शिंगाडे, कमळांतील केशर, द्राक्षें, कचरा, जेष्टमध, व खडीसाखर ह्याप्रमाणें अर्ध्या अर्ध्या श्लोकानें सांगितलेले हे सात योग अनुक्रम पहिल्या महिन्यापासून सात महिन्यांपर्यंत गर्भपाताचा संभव असतां दुधाशीं योजावे. (म्हणजे त्यांचा दुग्धावशेष काढा करून द्यावा

कपित्थबिल्वबृहतीपटोलेक्षुनिदिग्धजैः ॥ ५ ॥
मूलैः शृतं प्रयुञ्जीत क्षीरं मासे तथाऽष्टमे ।

कवठ, बेल, डोरली, पडवळ, ऊंस व रिंगणी ह्यांच्या मुळ्य टाकून शिजविलेलें दूध आठव्या महिन्यांत गर्भपात होण्याचा संभव असतां द्यावें.

नवमे मधुकानन्तापयस्यासारिवाः पिबेत् ॥ ६ ॥

नवव्या महिन्यांत जेष्टमध, धमासा, क्षीरकाकोली व उपलसरि ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध द्यावें.

क्षीरं शुण्ठीपयस्याभ्यां सिद्धं स्याद्दशमे हितम् ।
सक्षीरा वा हिता शुण्ठी मधुकं सुरदारु च ॥ ७ ॥

सुंठ व क्षीरकाकोली ह्या औषधांनीं शिजविलेलें दूध दहाव्या महिन्यांत हितकारक आहे. किंवा सुंठ, जेष्टमध व देवदार ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध दहाव्या महिन्यांत द्यावें.

क्षीरिकामुत्पलं दुग्धं समङ्गामूलकं शिवाम् ।
पिबेदेकादशे मासि गर्भिणी शूलशान्तये ॥ ८ ॥

दुधी, कमळ, मंजिष्टाचें मूळ व आवळकाठी ह्यांचें चूर्ण अकराव्या महिन्यांत गर्भसंबंधी शूळ शांत होण्याकरितां दुधांतून द्यावें.

सिताविदारिकाकोलीक्षीरिकाश्च मृणालिकाः ।
गर्भिणी द्वादशे मासि पिबेच्छूलघ्नमौषधम् ।
एवमाप्यायते गर्भस्तीव्रा रुक्चोपशाम्यति ॥ ९ ॥

खडीसाखर, भुईकोहाळा, क्षीरकाकोली, दुधी व कमळाचे देठ हीं औषधें बाराव्या महिन्यांत गर्भसंबंधी शूळ शांत होण्याकरितां गर्भिणीनें प्यावीं. ह्या उपचारानें गर्भ वृद्धिगत होतो व गर्भसंबंधी तीव्र पीडा शांत होते.

दुसरा प्रकार.

चलनं प्रथमे मासि गर्भस्य यदि जायते ।
औषधं च तदा देयं विचक्षणभिषग्वरैः ॥ १ ॥
मृद्वीका ज्येष्ठिका चैव चन्दनं रक्तचन्दनम् ।
गवां च पयसा पेयं स्थिरता जायते ध्रुवम् ॥ २ ॥

पहिल्या महिन्यांत जर गर्भाचें चलन होईल, तर तो स्थिर होण्याकरितां पुढील औषध द्यावें:—मनुका, जेष्टमध, व पांढरा व तांबडा चंदन ह्या औषधाचें चूर्ण करून गाईच्या दुधाशीं द्यावें.

नीलोत्पलं सवालं च शृङ्गाटं च कसेरुकम् ।
शीततोयेन पिष्ट्वा तु क्षीरेणाऽऽलोड्य तत्पिबेत् ॥ ३ ॥
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति ।

निळें कमळ, वाळा, शिंगाडे व कचरा हीं औषधें थंड पाण्यांत वाटून दुधांत कोळून प्यावीं; म्हणजे गर्भ पडत नाहीं, व शूळही शांत होतो.

द्वितीये मासि गर्भस्य चलनं च भवेद्यदि ॥ ४ ॥
पयसा च तदा पेयं मृणालं नागकेशरम् ।

दुसऱ्या महिन्यांत गर्भपात होऊं लागला असतां कमळाचे देठ व नाकेशर दुधाशीं प्यावें.

तगरं कमलं बिल्वं कर्पूरेण समन्वितम् ॥ ५ ॥
अजाक्षीरेण तत्पिष्ट्वा क्षीरेणाऽऽलोड्य पूर्ववत् ।

तगर, कमळ, बेलफळ व कापूर हीं औषधें शेळीच्या दुधांत वाटून दुधांतून प्यावीं.

तृतीये मासि चलनं जायते गर्भजं यदि ॥ ६ ॥
पयसाऽऽलोडितं पेयं शर्करानागकेशरम् ।

तिसऱ्या महिन्यांत गर्भपात होऊं लागला तर साखर व नाकेशर ह्यांचें चूर्ण दुधांतून द्यावें.

पद्मकं चन्दनं चैव वालकं पद्मनालकम् ॥ ७ ॥
पिष्ट्वा शीतेन तोयेन क्षीरेणाऽऽलोड्य तत्पिबेत् ।
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति ॥ ८ ॥

पद्मकाष्ट, चंदन, वाळा व कमळाचे देठ हीं औषधें थंड पाण्यांत वाटून दुधांतून प्यावीं; म्हणजे गर्भ पडत नाहीं, व शूलही शांत होतो.

यदि गर्भस्य चलनं चतुर्थे मासि जायते ।
तृष्णाशूलविदाहैश्च ज्वरेण च निपीडनम् ॥ ९ ॥
क्षीरं च कदलीमूलमुत्पलं वालकं तथा ।
आलोड्य समभागेन पिबेद्रोगोपशान्तये ॥ १० ॥

जर चवथ्या महिन्यांत गर्भपात होऊं लागेल, तर तहान, शूल व दाह ह्यांची पीडा होते. त्याजवर केळीचें मूळ, कमळ व वाळा हीं औषधें समभाग दुधांत वाटून रोगशांतीसाठीं प्यावीं.

पञ्चमे मासि गर्भस्य चलनं कुत्रचिद्भवेत् ।
दध्ना च मधुना पेयं दाडिमीपत्रचन्दनम् ॥ ११ ॥

कदाचित् पांचव्या महिन्यांतही गर्भपात होण्याचा संभव असतो. म्हणून दहीं व मध ह्यांतून डाळिंबाचीं पानें व चंदन प्यावा.

नीलोत्पलं मृणालं च कौन्तीक्षीरीं तथैव च ।
केशरं पद्मकं चैव तोयेनाऽऽलोड्य तत्पिबेत् ॥ १२ ॥
एवं न पतते गर्भः स च शूलः प्रशाम्यति ।

निळें कमळ, कमळाचा देठ, रेणुकबीज, भुईकोहळा, नाकेशर

व पद्मकाष्ट हीं औषधें पाण्यांत वाटून प्यावीं. म्हणजे गर्भ पडत नाहीं, व शूल शांत होतो.

षष्ठे मासि तु गर्भस्य चलता जायते यदा ॥ १३ ॥
गैरिका गोमयं भस्म कृष्णा मृत्स्ना तथैव च ।
एतेषां साधितं प्राज्ञभिषजा चामृतं तदा ॥ १४ ॥
पेयं शीतं परं साकं सितया चन्दनेन च ।

सहाव्या महिन्यांत जर गर्भ हालूं लागेल तर सोनकाव, गाईच्या शेणाचें भस्म व काळी माती घालून तयार केलेलें पाणी साखर व चंदनाचें चूर्ण घालून प्यावें.

सप्तमे मासि गर्भस्य चलनं जायते यदा ॥ १५ ॥
उशीरं गोक्षुरघनः समङ्गा नागकेशरम् ।
सपद्मकं समधुना पाययेच्च विचक्षणः ॥ १६ ॥

सातव्या महिन्यांत जर गर्भ हालूं लागेल तर वाळा, गोखरू, नागरमोथे, मंजिष्ट, नाकेशर व पद्मकाष्ठ ह्यांचें चूर्ण मधाबरोबर प्यावयास द्यावें.

अष्टमे मासि चलनं गर्भस्य यदि जायते ।
लोध्रमागधिकाचूर्णं मधुना पयसा पिबेत् ।

आठव्या महिन्यांत जर गर्भाचा पात होऊं लागेल तर लोध्र व पिंपळीचें चूर्ण मध व दूध एकत्र करून त्यांतून प्यावयास द्यावें.

नवमे सुप्रसूतिः स्यादेवं गर्भस्य पोषणम् ॥ १७ ॥

नवव्या महिन्यांत उत्तम प्रसूति होते. ह्याप्रमाणें गर्भपोषणाचा प्रकार आहे.

गर्भपाताच्या उपद्रवाची चिकित्सा.

स्निग्धशीताः क्रियास्तेषु दाहादिषु समाचरेत् ।

गर्भिणीच्या दाहादि विकारांवर स्निग्ध व शीत उपचार करावे.

कुशकाशोरुबूकाणां मूलैर्गोक्षुरकस्य च ॥ १ ॥
शृतं दुग्धं सितायुक्तं गर्भिण्याः शूलहृत्परम् ।

दर्भ, लहानदर्भ, एरंड, गोखरू, ह्यांचीं मुळें टाकून शिजविलेलें दूध गर्भिणीचा शूल नष्ट करण्याविषयीं उत्तम आहे.

श्वदंष्ट्रामधुकद्राक्षाम्लानैः सिद्धं पयः पिबेत् ॥ २ ॥
शर्करामधुसंयुक्तं गुर्विणीवेदनापहम् ।

गोखरू, जेष्टमध, द्राक्षें व आवळकाटी ह्यांनीं सिद्ध केलेलें दूध साखर व मध घालून प्यावें. तें गर्भिणीच्या वेदना शांत करितें.

मृत्कोष्ठगारिकागेहसंभवा नवमृत्तिका ॥ ३ ॥
समङ्गा धातकीपुष्पं गैरिकं च रसाञ्जनम् ।
तथा सर्जरसश्चैतान्यथालाभं विचूर्णयेत् ॥ ४ ॥
तच्चूर्णं मधुना लिह्यान्नारी प्रदरशान्तये ।

कुंभारणीच्या घराची नवी माती, मंजिष्ट, धायटीचीं फुलें, सोनकाव, रसांजन व राळ हीं औषधें मिळतील तशीं घेऊन चूर्ण करून तें मधाशीं चाटावें. म्हणजे गर्भिणीचा प्रदराचा विकार शांत होतो. किंवा कचरा, कमळ व शिंगाडे ह्यांचा कल्क दुधाबरोबर प्यावा, म्हणजे प्रदर शांत होतो.

कसेरूत्पलशृङ्गाटकल्कं वा पयसा पिबेत् ॥ ५ ॥
पक्वं वचारसोनाभ्यां हिंगुसौवर्चलान्वितम् ।
आनाहेषु पिबेद् दुग्धं गुर्विणी सुखिनी भवेत् ॥ ६ ॥

वेखंड व लसूण टाकून दूध शिजवावें, आणि त्यांत हिंग व पादेलोण घालून गर्भिणीच्या आनाह-(पोट फुगणें) रोगावर द्यावें. म्हणजे गर्भिणीला सुख होतें.

तृणपञ्चकमूलानां कल्केन विपचेत्पयः ।
तत्पयो गुर्विणी पीत्वा मूत्रसङ्गाद्विमुच्यते ॥ ७ ॥

तृणपंचमूळांनीं सिद्ध केलेलें दूध प्यालें असतां गार्भिणीची मूत्रावरोधापासून सुटका होते.

शालीक्षुकुशकाशैः स्याच्छरेण तृणपञ्चकम् ।
एषां शृतं तृषादाहपित्तासृङ्मूत्रसंगहृत् ॥ ८ ॥

साळीचें मूळ, उंसाचें मूळ, कुश जातीच्या दर्भाचें मूळ, कसईचें मूळ व शर (रामबाण) जातीच्या गवताचें मूळ ह्याला तृणपंचमूळ म्हणतात. ह्याचा काढा तहान, दाह, पित्त, रक्त, व मूत्रावरोध ह्यांचा नाश करितो.

कसेरुशृंगाटकपद्मकोत्पलं समुद्रपर्णीमधुकं सशर्करम् ।
सशूलगर्भस्रुतिपीडिताऽबला पयोविमिश्रं पयसाऽन्नभुक्पिबेत् ॥९

कचरा, शिंगाडे, कमळ, निळें कमळ, रानमूग, जेष्टमध आणि साखर ह्यांचें चूर्ण, जिचा शूलयुक्त गर्भस्राव होत असेल तिनें दुधा-

तून प्यावें; व दूधभात खाऊन रहावें.

गर्भिणीच्या रोगांची चिकित्सा.

मधूकचन्दनोशीरसारिवायष्टिपद्मकैः ।
शर्करामधुसंयुक्तः कषायो गर्भिणीज्वरे ॥ १ ॥

मोहाचीं फुलें, रक्तचंदन, वाळा, उपलसरी, जेष्टमध व पद्मकाष्ठ ह्यांचा काढा मध घालून गर्भिणीच्या ज्वरावर द्यावा.

चन्दनं सारिवालोध्रमृद्वीकाशर्करान्वितम् ।
क्वाथं कृत्वा प्रदद्याच्च गर्भिणीज्वरशान्तये ॥ २ ॥

रक्तचंदन, उपलसरी, लोध्र व मनुका; ह्यांचा काढा साखर घालून गर्भिणीचा ज्वर शांत होण्याकरितां द्यावा.

पयस्यासारिवापाठातोयतोयदनागरैः ।
शृतं शीतं पिबेद्वारि गर्भिणीज्वरवारणम् ॥ ३ ॥

दुधी, उपलसरी, पहाडमूळ, वाळा, नागरमोथे व सुंठ ह्याचा काढा थंड करून प्यावा. तो गर्भिणीच्या ज्वराचें निवारण करितो.

मृद्वीका पद्मकोशीरश्रीपर्णी चन्दनं तथा ।
मधुकं च पयस्या च सारिवामलकं तथा ॥ ४ ॥
पित्तज्वरहरः क्वाथो गर्भिणीनां प्रशस्यते ।

मनुका, पद्मकाष्ट, वाळा, शिवण व रक्तचंदन, ह्यांचा काढा; तसाच जेष्टमध, दुधी, उपलसरी आणि आंवळकाठी ह्यांचा काढा पित्तज्वरनाशक असून गर्भिणीला देण्यास प्रशस्त आहे.

पीतं विश्वमजाक्षीरैर्नाशयेद्विषमज्वरम् ॥ ५ ॥

सुंठ शेळीच्या दुधांतून घेतली असतां तीही विषमज्वराचें निवारण करिते.

ह्रीबेरारलुरक्तचन्दनबलाधान्याकवत्सादनी
मुस्तोशीरयवासपर्पटविषाक्वाथं पिबेद्गुर्विणी ।
नानावर्णरुजातिसारकगदे रक्तस्रुतौ वा ज्वरे
योगोऽयं मुनिभिः पुरा निगदितः सूत्यामयेषूत्तमः ॥ ६

वाळा, टेटुमूळ, रक्तचंदन, चिकणामूळ, धने, बांडगूळ, नागरमोथे, काळा वाळा, धमासा, पित्तपापडा व अतिविष ह्यांचा काढा करून तो गर्भिणीला द्यावा. तो अनेक रंगांचा अतिसार, रक्तस्राव,

ज्वर ह्यांचा नाश करितो. हा योग पूर्वी ऋषींनीं सांगितला आहे. व तो सूतिकारोगावर उत्तम आहे.

ज्वरातिसारे गर्भिण्याः शस्तं सामे सशोणिते ।
समंगामधुकं लोध्रं फाणितं शर्करान्वितम् ॥ ७ ॥

गर्भिणीच्या आमरक्तयुक्त ज्वरातिसारावर लाजाळू, जेष्टमध व लोध्र ह्यांचा काढा काकवी व साखर घालून द्यावा. तो प्रशस्त आहे.

प्रवाहिकायां गर्भिण्याः शस्तं सामे सशोणिते ।
आम्रजम्बूत्वचः क्वाथैर्लेहयेल्लाजसक्तुकम् ॥ ८ ॥
अनेन लीढमात्रेण गर्भिणी ग्रहणीं जयेत् ।

गर्भिणीच्या आमरक्तयुक्त प्रवाहिकेवर आंब्याच्या व जांभळीच्या साल्यांतून भाताच्या लाह्यांचें पीठ चाटावयास द्यावें. हें चाटलें असतां गर्भिणीची संग्रहणीही जाते.

शुण्ठीबिल्वकषायं तु यवसक्तुसमन्वितम् ॥ ९ ॥
गर्भिणीं पाययेद्वैद्यश्छर्द्यतीसारनाशनम् ।

सुंठ व बेलफळ ह्यांचा काढा भाजलेल्या सातूचें पीठ घालून गर्भिणीला पाजावा. तो गर्भिणीच्या ओकारीचा नाश करतो.

पृश्निपर्णीबलावासानिर्यूहो रक्तपित्तजित् ॥ १० ॥
गर्भिण्याः कामलाशोफश्वासकासज्वरापहः ।

पिठवण, चिकणामूळ व अडुळसा ह्यांचा काढा गर्भिणीच्या रक्तपित्ताचा नाश करितो, आणि गर्भिणीची कावीळ, सूज, श्वास, कास व ज्वर ह्यांचाही नाश करितो.

कुस्तुम्बरीणां कल्कं तु तण्डुलोदकसंयुतम् ॥ ११ ॥
पिबेत्सशर्करं हृद्यं गर्भिणीच्छर्दिवारणम् ।

धन्याचा कल्क तांदुळाच्या धुवणांतून साखर घालून प्यावा. तो हृदयाला हितकारक असून गर्भिणीच्या ओकारीचें निवारण करणारा आहे.

बिल्वमज्जा च लाजाम्बु पिबेच्छर्दिषु गर्भिणी ॥ १२ ॥

गर्भिणीनें ओकारी राहण्याकरितां कोवळ्या बेलफळांतील गर घालून भाताच्या लाह्यांचें पाणी प्यावें.

भार्ङ्गीशुण्ठीकणाचूर्णं गुडेन श्वासकासनुत् ।

भारंगमूळ, सुंठ व पिंपळी ह्यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें. तें गर्भिणीच्या श्वासाचा व खोकल्याचा नाश करितें.

अजमोदा नागरं च पिप्पली जीरकं समम् ॥ १३ ॥
तच्चूर्णं सगुडक्षौद्रं गर्भिण्या वह्निदीपनम् ।

ओवा, सुंठ, पिंपळी व जिरें ह्यांचें समभाग चूर्ण गूळ व मध घालून द्यावें. तें गर्भिणीच्या जठराग्नीला प्रदीप्त करितें.

बिल्वाग्निमन्थपक्वं वा पाटल्या नागरेण वा ॥ १४ ॥
सिद्धमम्बु पिबेच्छीतं गर्भिणी वातरोगनुत् ।

बेलाचें मूळ व टाकळीचें मूळ ह्यांचा काढा अथवा पाडळमूळ व सुंठ ह्यांचा काढा थंड झाल्यावर द्यावा. तो गर्भिणीच्या वातरोगाचा नाश करितो.

चन्दनं मधुकोशीरं नागपुष्पं तिलास्तथा ॥ १५ ॥
अजशृंगी च मञ्जिष्ठा रविमूलं पुनर्नवा ।
श्रेष्ठः शोफहरो लेपो गर्भिणीनां विशेषतः ॥ १६ ॥

चंदन, जेष्टमध, वाळा, नागकेशर, तीळ, मेढशिंगी, मंजिष्ट, रुईचें मूळ व वसूची मुळी ह्यांचा लेप विशेषतः गर्भिणीच्या सुजेचा नाश करितो.

सलाची चिकित्सा.

गर्भो वातेन संशुष्को नोदरं पूरयेद्यदि ।
सा बृंहणीयैः संसिद्धं दुग्धं मांसरसं पिबेत् ॥ १ ॥

वातदोषानें शुष्क झालेला गर्भ वाढेनासा झाला तर त्या गर्भिणीनें पौष्टिक औषधांनीं सिद्ध केलेलें दूध व मांसरस प्यावा.

शुक्रार्तवमजातांगं प्रत्यंगं मारुतार्दितम् ।
त्यक्तं जीवेन तत्तस्मात्कथितं चावतिष्ठते ॥ २ ॥
शुक्रार्तवार्द्रको वायुरुदराध्मानकृद्भवेत् ।
कदाचिच्चेत्तदाध्मानं स्वयमेवाऽऽपतेत्तराम् ॥ ३ ॥
नैगमेयेन गर्भोऽयं हृतो लोकध्वनिस्तथा ।
स चापि गर्भो भवति लोके नागोदराह्वयः ।
धान्यकुट्टनमुख्या स्याच्चिकित्सा तूभयोरपि ॥ ४ ॥

ज्याचे अवयव शुक्र व आर्तव ह्यांच्या मिश्रणानें झालेले नाहींत व प्रत्येक अवयव वायूनें पीडलेला आहे, असा गर्भ निर्जी-

वत्वामुळें (त्यांत जीवांश नसल्यामुळें) कढलेल्या स्थितींत (बुद्बु-दावस्थेंत—कललस्वरूपांत) राहतो. आणि शुक्र व आर्तव ह्यांच्या संयोगानें आर्द्र झालेला वायु पोट फुगवितो (वृद्धिंगत करितो.) जर कदाचित् तें पोट जिरलें तर गर्भ नैगमेयानें (ग्रहानें किंवा पि-शाच्यानें) नेला असें लोक म्हणतात. अशा गर्भाला लोकांत नागो-दर (सल) असें म्हणतात. ह्या दोन्हीही प्रकारच्या गर्भांवर धान्य कांडणें वगैरे उपचार मुख्यतः करावे.

प्रसूत होण्याचे महिने.

नवमे दशमे मासि नारी गर्भं प्रसूयते ।
एकादशे द्वादशे वा ततोऽन्यत्र विकारतः ॥ १ ॥

नवव्या, दहाव्या, अकराव्या किंवा बाराव्या महिन्यांत स्वभा-वतः स्त्री प्रसूत होते. ह्यांवाचून इतर महिन्यांत प्रसूत झाली तर ती कांहीं तरी विकारामुळें झाली असें समजावें.

प्रसूति होत नसल्यास उपचार.

वातेन गर्भसंकोचात्प्रसूतिसमयेऽपि या ।
गर्भं न जनयेन्नारी तस्याः शृणु चिकित्सितम् ॥ १ ॥
कुट्टयेन्मुशलेनैषा कृत्वा धान्यमुलूखले ।
विषमं चाऽऽसनं यानं सेवेत प्रसवार्थिनी ॥ २ ॥

वातानें गर्भ संकुचित झाल्यामुळें जी स्त्री प्रसूत होत नाहीं, तिला उपचार सांगतों. त्या स्त्रीनें उखळांत धान्य घेऊन मुसळानें कांडावें; किंवा ज्यानें गर्भास चलन मिळेल अशा घोडे वगैरे वाह-नांवर बसून प्रवास करावा.

प्रसूतिविलंबावर उपचार.

प्रसवस्य विलम्बे तु धूपयेदभितो भगम् ।
कृष्णसर्पस्य निर्मोकैस्तथा पिण्डीतकेन वा ॥ १ ॥

प्रसवाला वेळ लागला तर योनीला सापाच्या कातीची अथवा तगराची धुरी द्यावी.

तन्तुना लांगलीमूलं बध्नीयाद्धस्तपादयोः ।
कळलावीची मुळी सुतांत बांधून हातांत व पायांत बांधावी.

सुवर्चलां विशल्यां वा धारयेदाशु सूतये ॥ २ ॥

सुवर्चला (हिमालयांत प्रसिद्ध आहे. हिचीं पानें कमळाच्या पानासारखीं असून हीमधून पिवळा चीक निघतो) किंवा विशल्या- कळलावी ह्या औषधी लवकर प्रसूत होण्याकरितां धारण कराव्या.

कृष्णा वचा चापि जलेन पिष्टा सैरण्डतैला खलु नाभिलेपात् ।
सुखप्रसूतिं कुरुतेऽङ्गनानां निपीडितानां बहुभिः प्रमादैः ॥ ३ ॥

काळें वेखंड पाण्यांत उगाळून त्यांत एरंडतेल घालून नाभीवर लेप करावा; म्हणजे प्रसवकाळीं अनेक चुका होऊन जिला अत्यंत पीडा झाली आहे, ती लवकर प्रसूत होते.

मातुलुङ्गस्य मूलं तु मधुकैः संयुतं तथा ।
घृतेन सहितं पीत्वा सुखं नारी प्रसूयते ॥ ४ ॥

महाळुंगाचें मूळ व जेष्टमध ह्यांचें चूर्ण तुपांतून घेतलें असतां स्त्री सुखानें प्रसूत होते.

इक्षोरुत्तरमूलं निजतनुमानेन तन्तुना बद्ध्वा ।
कटिविषये गर्भवती सुखेन सूतेऽविलम्बितेनापि ॥ ५ ॥

उंसाचें उत्तरेकडील मूळ आणून तें स्त्रीच्या उंचीइतक्या लांबी- च्या सुतांत बांधून स्त्रीच्या कमरेंत बांधावें. म्हणजे ती स्त्री सुखानें लवकर प्रसूत होते.

तालस्य चोत्तरं मूलं स्वप्रमाणेन तन्तुना ।
बद्ध्वा कट्यां तु नियतं सुखं नारी प्रसूयते ॥ ६ ॥

ताडाचें उत्तरेकडील मूळ आणून तें स्त्रीच्या उंचीइतक्या सुतांत बांधून कमरेंत बांधावें. म्हणजे स्त्री निश्चयेंकरून लवकर प्रसूत होते.

प्रत्यक्पुष्प्याः पारिभद्रस्य यद्वा मूलं यद्वा काकजङ्घासमुत्थम् ।
कट्यां बद्धं योषितां संप्रसूतिं योगे युक्त्या संहृतं साधु कुर्यात् ७

पांढऱ्या आघाड्याचें, कडूलिंबाचें किंवा काकजंघेचें मूळ विधि- युक्त रीतीनें आणून कमरेंत बांधावें. म्हणजे सुखानें स्त्री प्रसूत होते.

इहामृतं च सोमश्च चित्रभानुश्च भामिनि ।
उच्चैःश्रवाश्च तुरगो मन्दिरे निवसन्तु ते ॥ ८ ॥

इदममृतमपां समुद्धृतं वै तव लघु गर्भमिमं विमुञ्चतु स्त्रि ।
तदनलपवनार्कवासवास्ते सह लवणाम्बुधरैर्दिशन्तु शान्तिम् ९

मुक्ताः पाशा विपाशाश्च मुक्ताः सूर्येण रश्मयः ।

मुक्तः सर्वभयाद्गर्भ एहि मा चिर मा चिरम् स्वाहा ॥१०॥
जलं च्यावनमन्त्रेण सप्तवाराभिमंत्रितम् ।
पीत्वा प्रसूयते नारी दृष्ट्वा चोभयत्रिंशकम् ॥ ११ ॥

"हे भामिनी, ह्या तुझ्या घरांत अमृत, सोम, चित्रभानु व उच्चैः-श्रवा नांवाचा घोडा हे वास करोत. हे स्त्रिये, हें पाण्यापासून काढलेलें अमृत तुझ्या गर्भाला लवकर मोकळा करो. तो अग्नि, वायु सूर्य, इंद्र हे क्षारसमुद्रासह तुला शांति देवोत. पाशविपाश मोकळे झाले. सूर्यानें किरणशलाका सोडल्या! हे गर्भा, सर्व भयापासून तूं मुक्त आहेस! ये. उशीर नको. उशीर नको. स्वाहा" ह्या मूळ च्यवन मंत्रानें सात वेळ पाणी मंत्रून प्यालें असतां स्त्री प्रसूत होते. किंवा उभयत्रिंशक यंत्राकडे स्त्रीस पहाण्यास लावावें. म्हणजे ती लवकर प्रसूत होते.

कलारसाष्टभिः पक्षदिगष्टादशभिः क्रमात् ।
अर्कैश्च भुवनैर्वेदैरुभयत्रिंशकं भवेत् ॥ १२ ॥

उभयत्रिंशक यंत्र म्हणजे एकाखालीं एक किंवा एकापुढें एक ह्याप्रमाणें नऊ घरांचें-एक चौरस रेषात्मक यंत्र काढावें. आणि त्यांत सोळा, सहा व आठ; दोन, दहा व अठरा, बारा, चौदा, व चार अशा क्रमानें अंक मांडावे. म्हणजे उभयत्रिंशक यंत्र होतें.

१६	६	८
२	१०	१८
१२	१४	४

१६	२	१२
६	१०	१४
८	१८	४

हिमवद्दक्षिणे पार्श्वे सुरसा नाम यक्षिणी ।
तस्या नूपुरशब्देन विशल्या भव गर्भिणी ॥ १३ ॥
इमं श्लोकं पठित्वा तु क्षिपेदक्षतपञ्चकम् ।
गर्भिण्युपरि सद्यः सा गर्भं मुञ्चति गर्भिणी ॥ १४ ॥

हिमालयाच्या दक्षिण भागीं सुरसा नांवाची यक्षिणी आहे. तिच्या नूपुराच्या शब्दानें हे गर्भिणी, तूं विशल्या (शल्यरहित) हो.

हा मूळ श्लोक म्हणून अक्षता मंत्रून गर्भिणीवर टाकाव्या, म्हणजे ती लवकर प्रसूत होते.

मूढगर्भाची चिकित्सा.

याभिः संकटकाले वैद्यैर्नार्यः प्रसाविताः सम्यक् ।
लब्धं यशः समग्रास्ता एवातः क्रियाः कुर्युः ॥ १ ॥

ज्या क्रियेनें या संकटांतून स्त्री उत्तमरीतीनें प्रसूत होऊन आपल्याला यश मिळेल ती क्रिया अशा वेळीं वैद्यानें योजावी.

गर्भे जीवति मूढं तु गर्भं यत्नेन निर्हरेत् ।
हस्तेन सर्पिषाऽक्तेन योनेरन्तर्गतेन सा ॥
मृते तु गर्भे गर्भिण्या योनौ शस्त्रं प्रवेशयेत् ॥ २ ॥
शस्त्रशास्त्रार्थविदुषी लघुहस्ता भयोज्झिता ।
सचेतनं तु शस्त्रेण न कथंचन दारयेत् ॥ ३ ॥
स दार्यमाणो जननीमात्मानं चापि मारयेत् ।
नोपेक्षेत मृतं गर्भं मुहूर्तमपि पण्डितः ॥
स चाऽऽशु जननीं हन्ति प्रभूतान्नं यथा पशुम् ॥ ४ ॥

जर गर्भ जिवंत असेल तर हाताला तूप लावून, हळूच हात योनींत नेऊन प्रयत्नानें तो मूढगर्भ काढावा. आणि गर्भ मृत झाला असेल तर शस्त्रविद्येंत कुशल असलेल्या हलक्या हाताच्या विदुषीनें भय सोडून (निर्भयपणानें) योनींत शस्त्र घालून गर्भाचें छेदन करून तो बाहेर काढावा. गर्भ जिवंत असेल तर केव्हांहि त्याचें छेदन करूं नये. जिवंत गर्भाचें छेदन केलें असतां तो स्वतःला व आईलाही मारतो. शहाण्या वैद्यानें मृत गर्भ छेदन करून काढण्याविषयीं दोन घटका देखील विलंब करूं नये. कारण अतिशय खालेलें अन्न जसें पशूला मारतें, त्याप्रमाणें तो मृत गर्भ आईला मारतो.

छेदनप्रकार.

यद्यदङ्गं हि गर्भस्य योनौ सज्जति तद्भिषक् ।
सम्यग् विनिर्हरेच्छित्त्वा रक्षेन्नारीं प्रयत्नतः ॥ १ ॥
एवं निर्हृतशल्यां तां सिञ्चेदुष्णेन वारिणा ।
ततोऽभ्यक्तशरीराया योनौ स्नेहं निधापयेत् ॥
एवं मृद्वी भवेद्योनिस्तच्छूलं चोपशाम्यति ॥

जो जो अवयव योनिद्वारांत असेल तो तो छेदन करून उत्तम प्रकारें काढावा, आणि मोठ्या प्रयत्नानें स्त्रीला वांचवावी. ह्याप्रमाणें शल्य (मृतगर्भ) काढून टाकल्यावर तिच्या अंगावर ऊन पाणी शिंपावें. नंतर अंगास तेल लावून योनींतही तेल घालावें. म्हणजे योनि मृदु होऊन ठणकाही बंद होतो.

प्रसूत स्त्रीच्या योनिव्रणाची चिकित्सा.

तुम्बीपत्रं तथा लोध्रं समभागं तु पेषयेत् ।
तेन लेपो भगे कार्यः शीघ्रं स्याद्योनिरक्षता ॥ १ ॥

कडू भोपळ्याचीं पानें व लोध्र समभाग घेऊन, वाटून योनीस लेप करावा. म्हणजे जखम लवकर भरून येते.

पलाशोदुम्बरफलं तिलतैलसमन्वितम् ।
योनौ प्रलिप्तं मधुना गाढीकरणमुत्तमम् ॥ २ ॥

पळसाचें व उंबराचें फळ तिळाच्या तेलांत वाटून, त्यांत मध घालून योनीस लेप करावा. म्हणजे ती संकुचित होते.

प्रसूता वनिता वृद्धकुक्षिह्रासाय संपिबेत् ।
प्रातर्मथितसंमिश्रां त्रिःसप्ताहात्कणाजटाम् ॥ ३ ॥

प्रसूत झालेल्या स्त्रीचें पोट जर मोठें दिसत असेल तर तिला २१ दिवसपर्यंत सकाळीं ताकांतून पिंपळमुळाचें चूर्ण द्यावें.

वंगसेनांतील उपाय.

आसुरीहिंगुसिन्धूत्थं काञ्जिकेनावलोडितम् ।
गर्भाशये मृतं गर्भं पातयेत्पानयोगतः ॥ १ ॥

मोहऱ्या, हिंग व सेंधेलोण कांजींत वाटून प्यालें असतां गर्भाशयांतील मृत गर्भाचा पात होतो.

आलोड्य काञ्जिकैर्घोटीपुरीषं वस्त्रगालितम् ।
ससिन्धूग्रासुरीतैलं विषमागतगर्भनुत् ॥ २ ॥

कांजीमध्यें घोडीची लीद कोलून, ती वस्त्रगाळ करून, त्यांत सेंधेलोण, वेखंड व मोहरीचें तेल घालून पाजावें. तें आडव्या येणाऱ्या गर्भाला बाहेर काढतें.

परूषकाशिफालेपः स्थिरामूलकृतोऽथ वा ।
नाभिबस्तिभगाद्येषु मूढगर्भापकर्षणः ॥ ३ ॥

फालशाच्या मुळीचा अथवा साळवणीचे मूळाचा नाभी, ओटी-पोट व योनि ह्यांजवर लेप करावा. तो मूढगर्भाला—आडव्या येणाऱ्या गर्भाला—बाहेर काढतो.

प्रसूत स्त्रीला होणारे वारेचे उपद्रव.

प्रसूताया न पतिता जठरादपरा यदि ।
तदा सा कुरुते शूलमाध्मानं वह्निमन्दताम् ॥ १ ॥

प्रसूत झालेल्या स्त्रीच्या पोटांतील वार जर लवकर पडली नाहीं तर ती शूळ, पोट फुगणें व अग्निमांद्य हे विकार उत्पन्न करिते.

तिची चिकित्सा.

केशवेष्टितयांऽगुल्या तस्याः कण्ठं प्रघर्षयेत् ।

जिची वार पडली नाहीं तिच्या घशांत बोटाला केस गुंडाळून घासावें.

निर्मोककटुकालाबुकृतवेधनसर्षपैः ॥ १ ।
चूर्णितैः कटुतैलाक्तैर्धूपयेदभितो भगम् ।

सापाची कात, कडू भोपळा, कडू दोडका व मोहऱ्या ह्यांचें चूर्ण मोहरीच्या तेलांत वाटून त्याची योनीला व आसपासच्या भागाला धुरी द्यावी.

लाङ्गलीमूलकल्केन पाणिपादतलानि हि ।
प्रलिम्पेत्सूतिका योषिदपरापातनाय वै ॥ २ ॥

वार पडण्याकरितां कळलावीच्या मुळीचा कल्क स्त्रीच्या तळहाताला व तळपायाला लिंपावा.

हस्तं छिन्ननखं स्निग्धं सूतीयोनौ शनैः क्षिपेत् ।
अपरां तेन हस्तेन जनयित्री विनिर्हरेत् ॥ ३ ॥

हाताचीं नखें काढून त्याला तूप लावून, बाळंतिणीच्या योनींत तो हात हळूच घालून सुईणीनें हळूच वार काढून घ्यावी.

सूतिकारोगाधिकार.

पृथिव्यां पतिते वत्से योनौ पिण्डनमिष्यते ।
अप्रवेशो यथा वायोस्तथा संरक्षणक्रिया ॥ ४ ॥

बालक जमिनीवर पडतांच (तेल लावून) योनीचें हळुहळू मर्दन करणें प्रशस्त आहे. आणि जेणेंकरून वायूचा आंत प्रवेश होणार

नाहीं अशी संरक्षणाची क्रिया करावी.

वायुः प्रकुपितः कुर्यात्संरुध्य रुधिरं च्युतम् ।
सूताया हृच्छिरोबस्तिशूलं मक्कलसंज्ञितम् ।

वाताचा प्रकोप झाला असतां तो रक्ताचा अवरोध करून मक्कल नांवाचा शूल उत्पन्न करतो. बाळंतिणीच्या हृदयांत, मस्तकांत व बस्तींत जो शूळ होतो, त्याला मक्कलशूळ असें म्हणतात.

मक्कलाची चिकित्सा.

संचूर्णितं यवक्षारं पिबेत्कोष्णेन वारिणा ।
सर्पिषा वा पिबेन्नारी मक्कलस्य निवृत्तये ॥ १ ॥

मक्कलशूलाचें निवारण होण्याकरितां जवखाराचें चूर्ण करून तें कोमट पाण्यांतून अथवा तुपांतून घ्यावें.

पिप्पली पिप्पलीमूलं मरिचं गजपिप्पली ।
नागरं चित्रकं चव्यं रेणुकैलाजमोदिकाः ॥ २ ॥
सर्षपो हिंगु भार्गी च पाठेन्द्रयवजीरकाः ।
महानिम्बश्च मूर्वा च विषा तिक्ता विडङ्गकम् ॥ ३ ॥
पिप्पल्यादिगणो ह्येष कफमारुतनाशनः ।
गुल्मशूलज्वरहरो दीपनश्चाऽऽमपाचनः ॥ ४ ॥
क्वाथमेषां पिबेन्नारी लवणेन समन्वितम् ।
मक्कलशूलगुल्मघ्नं कफानिलहरं परम् ॥ ५ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, गजपिंपळी, सुंठ, चित्रकमूळ, चवक, रेणुकबीज, वेलदोडे, अजमोदा, मोहऱ्या, हिंग, भारंगमूळ, पहाडमूळ, इंद्रजव, जिरें, बकाण्या निंबाची साल, मोरवेल, अतिविष, कुटकी व वावडिंग ह्या औषधीसमुदायाला पिप्पल्यादि गण म्हणतात. हा कफ व वात ह्यांचा नाश करितो. गुल्म, शूळ व ज्वर ह्यांचा नाश करितो. हा अग्निदीपकही असून आमाचें पाचन करितो. ह्या औषधांचा काढा करून सैंधेलोण घालून प्यावा. तो मक्कलशूळ व गुल्म ह्यांचा नाश करितो. हा उत्तम प्रकारचा कफवातनाशक आहे.

त्रिकटुकचातुर्जातककुस्तुम्बरुचूर्णसंयुक्तम् ।
खादेद्गुडं पुराणं नित्यं नारी मक्कलदलनाय ॥ ६ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर,

व धने ह्यांचें चूर्ण मक्कलशूळाचा नाश करण्याकरितां नित्य जुन्या गुळाबरोबर घ्यावें.

शोणं बोलं सघृतं सगुडं गुटकीकृतं गिलितम् ।
मक्कलाभिधशूलं हन्ति समूलं सशोणितातङ्कम् ॥ ७ ॥

रक्तबोळ तूप व गुळाशीं गोळी करून गिळावा. तो रक्तविकारासह मक्कलशूळाचा समूळ नाश करितो.

हिंगु शुद्धं ससर्पिष्कं भुक्तं मक्कलशूलनुत् ॥ ८ ॥

शुद्ध हिंग तुपाशीं घ्यावा. तो मक्कलशूळाचा नाश करितो.

बाळंतिणीचें पथ्य.

प्रसूता युक्तमाहारं विहारं च समाचरेत् ।
व्यायामं मैथुनं क्रोधं शीतसेवां च वर्जयेत् ॥ १ ॥

बाळंतिणीनें योग्य असा आहार व विहार करावा. व्यायाम, मैथुन, राग व थंड पदार्थांचें सेवन वर्ज करावें.

मिथ्याचारात्सूतिकाया यो व्याधिरुपजायते ।
स कृच्छ्रसाध्योऽसाध्यो वा भवेत्पथ्यं समाचरेत् ॥ २ ॥

बाळंतिणीच्या अव्यवस्थित वागण्यानें जो विकार होतो, तो कष्टसाध्य किंवा असाध्य होतो. म्हणून तिनें पथ्यानें असावें.

सूतिकारोगनिदान.

मिथ्योपचारात्संक्लेशाद्विषमाजीर्णभोजनात् ।
सूतिकायास्तु ये रोगा जायन्ते दारुणाश्च ते ॥ १ ॥

प्रकृतीला न मानवणाऱ्या अशा आहारादि उपचारांनीं, दोषप्रकोप होईल अशा खाण्यापिण्यानें, परस्परविरुद्ध गुणाचें अन्न खाण्यानें व अजीर्ण झालें असून त्याजवर जेवल्यानें बाळंतिणीला जे रोग होतात ते फार भयंकर असतात.

अङ्गमर्दो ज्वरः कम्पः पिपासा गुरुगात्रता ।
शोफः शूलातिसारौ च सूतिकारोगलक्षणम् ॥ २ ॥

अंग मोडल्यासारखें वाटणें (अंग दुखणें), ज्वर, अंग कांपणें, तहान लागणें, अंग जड होणें, सूज, शूळ (पोटांत दुखणें) व अतिसार हें बाळंतरोगाचें लक्षण आहे.

ज्वरादिकाचें विशेष निदान.

ज्वरातीसारशोथाश्च शूलानाहबलक्षयाः ।
तन्द्रारुचिप्रसेकाद्या वातश्लेष्मसमुद्भवाः ॥ ३ ॥
कृच्छ्रसाध्या हि ते रोगाः क्षीणमांसबलाश्रिताः ।
ते सर्वे सूतिकानाम्ना रोगास्ते चाप्युपद्रवाः ॥ ४ ॥

ज्वर, अतिसार, सूज, शूळ, आनाह, अशक्तपणा, ग्लानि, अरुचि व मळमळणें हे विकार व दुसरे वातकफजन्य विकार होतात. जिचें मांस व बळ क्षीण झालें आहे, त्या बाळंतिणीचे हे रोग कष्टसाध्य होतात. ह्या सर्वांना सूतिकारोग (बाळंतरोग) असें म्हणतात. ह्यांपैकीं एखादा वाढलेला असून, बाकीचे त्याचे अंगभूत असतात.

बाळंतरोगाची चिकित्सा.

सूतिकारोगशान्त्यर्थं कुर्याद्वातहरीं क्रियाम् ।
दशमूलकृतं क्वाथं कोष्णं दद्याद् घृतान्वितम् ॥ १ ॥

बाळंतरोगाच्या शमनार्थ वातनाशक उपचार करावे. दशमुळांचा कोमट काढा तूप घालून द्यावा.

अमृतानागरसहचरभद्रोत्कटमूलकं जलदः ।
शृतशीतं मधुयुक्तं शमयत्यचिरेण सूतिकातङ्कम् ॥ २ ॥

गुळवेल, सुंठ, कोरांटीची मुळी, देवदार, तिरकांडे गवताचें मूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, गोखरूमूळ, साळवण, पिटवण व नागरमोथे ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो बाळंतरोगाचा शीघ्र नाश करितो.

देवदार्वादि काढा.

देवदारु वचा कुष्ठं पिप्पली विश्वभेषजम् ।
भूनिम्बः कट्फलं मुस्तं तिक्ता धान्यं हरीतकी ॥ १ ॥
गजकृष्णा च दुःस्पर्शा गोक्षुरो धन्वयासकः ।
बृहत्यातिविषा छिन्ना कर्कटी कृष्णजीरकम् ॥ २ ॥
समभागान्वितैरेतैः सिन्धुरामठसंयुतम् ।
क्वाथमष्टावशेषं तु प्रसूतां पाययेत्स्त्रियम् ॥ ३ ॥
शूलकासज्वरश्वासमूर्च्छाकम्पशिरोर्तिभिः ।
युक्तं प्रलापतृड्दाहतन्द्रातीसारवान्तिभिः ॥ ४ ॥

निहन्ति सूतिकारोगं वातपित्तकफोद्भवम् ।
कषायो देवदार्वादिः सूतायाः परमौषधम् ॥ ५ ॥

देवदार, वेखंड, कोष्ट, पिंपळी, सुंठ, काडेचिराईत, कायफळ, नागरमोथे, कुटकी, धने, बाळहिरडे, गजपिंपळी, रिंगणमूळ, गोखरू, धमासा, डोरलीमूळ, अतिविष, गुळवेल, काकडशिंगी व शहाजिरें हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा अष्टमांश काढा करून तो हिंग व सेंधेलोण घालून द्यावा. तो शूळ, खोकला, ज्वर, श्वास, मूर्च्छा, कंप, मस्तकपीडा, बडबड, तहान, दाह, ग्लानि, अतिसार व ओकारी ह्या विकारांनीं युक्त व त्रिदोषजन्य बाळंतरोगाचा नाश करितो. हा देवदार्वादि काढा बाळंतिणीला उत्तम औषध आहे.

निर्गुंड्यादि काढा.

संयोजितो दलितया कणया कवोष्णो
निर्गुण्डिकालशुननागरजः कषायः ।
पीतो निहन्ति कफमारुतकोपजातं
सूत्यामयं सकलमेव सुदुस्तरं च ॥ १ ॥

निर्गुंडीचें मूळ, लसूण, व सुंठ ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. तो दुस्तर अशा कफवातजन्य सर्व बाळंतरोगांचा नाश करितो.

सहचरादि काढा.

सहचरकुलत्थपुष्करदारुनिशादारुवेतसक्काथः ।
पीतः सहिंगुलवणः शमयति शूलज्वरौ सूत्याः ॥ १ ॥

कोरांटीचें मूळ, हुलगे, पोखरमूळ, दारुहळद, देवदार व वेत ह्यांचा काढा हिंग व सेंधेलोण घालून प्यावा. तो बाळंतिणीच्या शूलाचा व ज्वराचा नाश करितो.

पंचमूळादि काढा.

पञ्चमूलस्य वा क्वाथं तप्तलोहेन संगतम् ।
सूतिकारोगनाशाय पिबेद्वा तद्युतां सुराम् ॥ १ ॥

पंचमूळांचा काढा (साळवण, पिटवण, रिंगणमूळ, डोरलीमूळ व सराट्याचें मूळ ह्यांचा काढा) तापविलेलें पोलाद बुडवून अथवा

त्या काढ्यांत मद्य मिसळून बाळंतरोगाचा नाश होण्याकरितां द्यावा.

पंचजीरक पाक.

जीरकं स्थूलजीरश्च शतपुष्पाद्वयं तथा ।
यवानी चाजमोदा च धान्यकं मेथिकाऽपि च ॥ १ ॥
शुण्ठी कृष्णा कणामूलं चित्रकं हपुषाऽपि च ।
विदारीफलचूर्णं तु कुष्ठं कम्पिल्लकं तथा ॥ २ ॥
एतानि पलमात्राणि गुडं पलशतं मतम् ।
क्षीरं प्रस्थद्वयं दद्यात्सर्पिषः कुडवं तथा ॥ ३ ॥
पञ्चजीरकपाकोऽयं प्रसूतानां प्रशस्यते ।
युज्यते सूतिकारोगे योनिरोगे ज्वरे क्षये ॥
कासे श्वासे पाण्डुरोगे कार्श्ये वातामयेषु च ॥ ४ ॥

शहाजिरें, मोठें जिरें, बडिशेप, बाळंतशेप, ओवा, अजमोदा, धने, मेथ्या, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, शेरणी, भुईकोहळ्याचें चूर्ण, कोष्ट व कपिला हीं औषधें चार चार तोळे आणि गूळ चारशें तोळे, दूध एकशें अठ्ठावीस तोळे व तूप सोळा तोळे ह्या प्रमाणानें सर्व जिन्नस घेऊन विधियुक्त पाक करावा. हा पंचजीरक पाक बाळंतिणींना प्रशस्त आहे. हा बाळंतरोग, योनिरोग, ज्वर, क्षय, खोकला, श्वास, पांडुरोग, कृशत्व आणि वातरोग ह्यांजवर योजावा.

सौभाग्यशुंठीपाक.

आज्यस्याञ्जलियुग्ममत्र पयसः प्रस्थद्वयं खण्डतः
पञ्चाशत्पलमत्र चूर्णितमथ प्रक्षिप्यते नागरम् ।
प्रस्थार्धं गुडवद्विपाच्य विधिना मुष्टित्रयं धान्यकान्
मिस्याः पञ्चपलं पलं क्रिमिरिपोः साजाजिजीरादपि ॥१॥
व्योषाम्भोददलोरगेन्द्रसुमनःसद्राविडीनां पलं
पक्वं नागरखण्डसंज्ञकमिदं सौभाग्यदं योषिताम् ।
तृट्छर्दिज्वरदाहशोषशमनं सश्वासकासापहं
प्लीहव्याधिविनाशनं क्रिमिहरं मन्दाग्निसंदीपनम् ॥ २ ॥

तूप बत्तीस तोळे, दूध एकशें अठ्ठावीस तोळे, खडीसाखर दोनशें तोळे व सुंठ बत्तीस तोळे ह्याप्रमाणें हे जिन्नस घेऊन सुंठीचें चूर्ण करून गुडपाकाच्या पद्धतीनें ती पाकांत टाकून पाक तयार करावा. आणि बारा तोळे धने, वीस तोळे बडिशेप, चार तोळे वावडिंग,

चार तोळे मोठें जिरें, चार तोळे शहाजिरें, ह्याशिवाय सुंठ, मिरें, पिंपळी, नागरमोथे, तमालपत्र, नाकेशर व वेलची हीं औषधेंही प्रत्येकीं चार चार तोळे घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यांत टाकून पाक तयार करावा. ह्याला नागरखंडपाक असें म्हणतात. हा स्त्रियांना सौभाग्यदायक आहे. हा तहान, ओकारी, ज्वर, दाह व शोष ह्यांचें शमन करितो. आणि श्वास, खोकला, पांथरी व कृमि ह्यांचा नाश करून मंदाग्नीचें दीपन करितो.

दुसरा प्रकार.

नागरं कणशः कृत्वा प्रस्थमात्रं भिषग्वरः ।
अजादुग्धाढकद्वंद्वे विपचेन्मन्दवह्निना ॥ १ ॥
घनीभूते तु पयसि तस्माच्छुण्ठीं समुद्धरेत् ।
अतिसूक्ष्मं विनिष्पिष्य शोषयेदातपे खरे ॥ २ ॥
घृतमानीं समावाप्य तद्दुग्धं तु पुनः पचेत् ।
यावत्पिण्डत्वमायाति ततस्तत्र विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
चातुर्जातं तुगावेल्लं धान्यकं जीरकद्वयम् ।
मिशिमाकल्कं शुण्ठीं लवङ्गं च शतावरीम् ॥ ४ ॥
तालमूलीत्रिकटुकं कपिकच्छुं च षट्कटु ।
जातीफलं जातिपत्रीं शृङ्गाटं वृद्धदारुकम् ॥ ५ ॥
त्रिवृतां पद्मबीजं च त्रिफलां च बलात्रयम् ।
जलं सेव्यं वाजिगन्धाचन्दनागरुकारवीः ॥ ६ ॥
कक्कोलमजगन्धां च द्राक्षामाक्षोटवारिजे ।
अजमोदं च बादामं नारीकेलगतं तथा ॥ ७ ॥
कर्पूरमभ्रकं लोहं वङ्गं ताम्रं शिलाजतु ।
स्वर्णमाक्षिकमप्येतत्प्रत्येकं कर्षमात्रकम् ॥ ८ ॥
चूर्णीकृत्य क्षिपेत्तत्र पाणिभ्यां मर्दयेद् दृढम् ।
ततः खण्डतुलां पक्त्वा तथा तच्च क्रियां चरेत् ॥ ९ ॥
खण्डनागरकं नाम्ना भैषज्यमिदमुत्तमम् ।
यथाबलमिदं खादेत्प्रातः सायं च भेषजम् ॥ १० ॥
स्त्रीणामातिहितं नात्र पथ्यापथ्यविचारणा ।
क्षये पाण्डौ ज्वरे कासे श्वासे मन्दानले तथा ॥ ११ ॥
संग्रहण्यां रक्तगुल्मे प्रदरे सोमरोगके ।
दुग्धक्षये मूत्रकृच्छ्रे कामलायां गलग्रहे ॥ १२ ॥
पित्तरोगेषु सर्वेषु वातपित्तगदेषु च ।

सूतिकापवनव्याधौ शस्तमेतन्न संशयः ॥ १३ ॥
अश्विभ्यां पूर्वमुदितः सेव्यो योगोऽयमुत्तमः ।
एषा सौभाग्यदा शुण्ठी स्त्रीणां पुत्रप्रदा शुभा ॥ १४ ॥

चौसष्ट तोळे सुंठीचें चूर्ण करून पांचशें बारा तोळे शेळीच्या दुधांत दोलायंत्रानें मंदाग्नीवर तें पचन करावें. दूध घट्ट होत आल्यावर त्यांतून सुंठ काढून घ्यावी. नंतर गंधाप्रमाणें अतिशय बारीक वाटून ती कडक उन्हांत वाळवावी. आणि ती बत्तीस तोळे तुपांत घालून एकत्र खरून ठेवावी. नंतर पुनः ती सुंठ काढून घेऊन राहिलेलें दूध आटवून त्याचा खवा करून त्यांत ती सुंठ व दालचिनी, तमालपत्र, वेलची, नाकेशर, वंशलोचन, वावडिंग, धने, जिरें, शहाजिरें, बाडिशोप, अक्कलकाला, सुंठ, लवंग, शतावरी, मुसळी, सुंठ, मिरें, पिंपळी, कवचबीज, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक सुंठ, मिरें, जायफळ, जायपत्री, शिंगाडे, वरधारा, तेड, कमलाक्ष, हिरडा, आवळकाठी, लहान व मोठ्या चिकण्याचें मूळ, पेटारीचें मूळ, वाळा, काळा वाळा, अश्वगंध, चंदन, कृष्णागर, मेथी, कंकोळ, मेढशिंगी, द्राक्षें, अक्रोड, कमळाचीं फुलें, अजमोदा, बदामबीज, खोबरें, कापूर, अभ्रकभस्म, लोहभस्म, वंगभस्म, ताम्रभस्म, शिलाजित व सुवर्णमाक्षिकभस्म, हीं औषधें एक एक तोळा घेऊन चूर्ण करून त्यांत टाकून हातानें मळून सारखें करून चारशें तोळे खडीसाखरेच्या पाकांत टाकून विधियुक्त पाक करावा. हा नागरखंड नामक पाक उत्तम औषध आहे. हें शक्तिमानाप्रमाणें सकाळ संध्याकाळ खावें. हें स्त्रियांना अत्यंत हितकारक आहे. ह्याजवर पथ्यापथ्याचा विचार करण्याचें कारण नाहीं (ह्याला पथ्य नाहीं). क्षय, पांडुरोग, ज्वर, खोकला, श्वास, अग्निमांद्य, संग्रहणी, रक्तगुल्म, प्रदर, सोमरोग, दूध न येणें (दुग्धक्षय), मूत्रकृच्छ्र, कामला, गलग्रह, सर्व पित्तरोग, सर्व वातपित्तजन्य रोग आणि बाळंतवात (बाळंतरोग) ह्यांजवर हें प्रशस्त आहे. हा उत्तम योग पूर्वीं अश्विनीकुमारांनीं सांगितला आहे. ह्याचें सेवन करावें. ही सौभाग्यदायक सुंठ (सौभाग्यसुंठ) स्त्रियांना पुत्रदायक व शुभकारक आहे.

तिसरा प्रकार.

नागरस्य पलान्यष्टौ घृतस्य पलविंशतिम् ।
क्षीराढकेन संयुक्तां खण्डस्यार्धतुलां पचेत् ॥ १ ॥
शताह्वाजीरकव्योषत्रिसुगन्धियवानिकाः ।
कारवीमिसिचव्याग्निमुस्तानां च पलं पलम् ॥ २ ॥
लेहीभूतमिदं सिद्धं घृतभाण्डे निधापयेत् ।
तद्यथाग्निबलं खादेत्सूतिका तु विशेषतः ॥ ३ ॥
बल्यं वर्ण्यं तथाऽऽयुष्यं वलीपलितनाशनम् ।
वयसः स्थापनं हृद्यं मन्दाग्नेर्दीपनं परम् ॥ ४ ॥
आमवातप्रशमनं सौभाग्यकरमुत्तमम् ।
मक्कलशूलशमनं सूतिकारोगनाशनम् ॥ ५ ॥

सुंठ बत्तीस तोळे, तूप ऐशीं तोळे, दूध दोनशें छपन्न तोळे, आणि खडीसाखर दोनशें तोळे ह्यांचा पाक करून बडिशेप, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, ओवा, बाळंतशेप, मेथी, चवक, चित्रक व नागरमोथे या औषधांचें चार चार तोळे चूर्ण त्यांत घालून लेहाप्रमाणें पाक झाल्यावर तो तुपानें राबलेल्या भांड्यांत ठेवावा; आणि तो अग्निबळ पाहून स्त्रियांनीं व विशेषतः बाळंतस्त्रियांनीं खावा. हा शक्तिवर्धक, कांतिकारक, आयुष्यवर्धक, वलीपलितनाशक, तारुण्यदायक, हृद्य व मंदाग्नीचें उत्तम प्रकारें दीपन करणारा आहे. शिवाय आमवातनाशक, सौभाग्यकारक, मक्कलशूलनाशक व बाळंतरोगनाशकही आहे.

प्रतापलंकेश्वर रस.

एकेन्दुचन्द्रानलवार्धिदन्तीकलैकभागं क्रमशो विमिश्रम् ।
सूताभ्रगन्धोषणलोहशङ्खवन्योत्पलाभस्मविषं च पिष्टम् ॥ १ ॥
प्रसूतिवातेऽनिलदन्तबन्धे सार्द्राम्भसा वल्लमनुष्य लिह्यात् ।
वातामये श्लेष्मगदेऽर्शसि स्यात्पुरामृतार्द्रात्रिफलायुतोऽयम् २
सशृङ्गबेरद्रव एष हन्ति ससंनिपातं ज्वरमुग्ररूपम् ।
निजानुपानैर्निजपथ्ययुक्तः सर्वातिसारान् ग्रहणीविकारान् ३
प्रतापलङ्केश्वरनामधेयः सूतः प्रयुक्तो गिरिराजपुत्र्या ॥ ४ ॥

पारा एक भाग, अभ्रकभस्म एक भाग, गंधक एक भाग, मिरें तीन भाग, लोहभस्म चार भाग, शंखभस्म आठ भाग, रान शेणी-

ची राख सोळा भाग आणि बचनाग एक भाग ह्यांचा एकत्र खल करून प्रसूतिवात व वातानें दातखिळी बसणें ह्या विकारांवर एक वालभर आल्याच्या रसांतून घ्यावा. वातरोग, कफरोग, मूळव्याध ह्यांजवर गुग्गुळ, गुळवेल, आलें व त्रिफळा ह्यांजबरोबर घ्यावा. हा आल्याच्या रसाशीं घेतला असतां सन्निपातजन्य उग्र ज्वराचा नाश करतो. त्या त्या रोगाच्या अनुपानाशीं देऊन त्या त्या रोगावरील पथ्य केलें असतां सर्व अतिसारांचा व संग्रहणींचा नाश करितो. हा प्रतापलंकेश्वर रस पार्वतीनें योजिला आहे.

बाळंतपणाची नियमावधि.

सर्वतः परिशुद्धा स्यात्स्निग्धपथ्याऽल्पभोजना ।
स्वेदाभ्यङ्गपरा नित्यं भवेन्मासमतन्द्रिता ॥ १ ॥

बाळंतिणीनें सर्व प्रकारें स्वच्छता राखावी. स्निग्ध पथ्य करावें; आहार अल्प करावा; रोज शेक घ्यावा व रोज अंगास तेल लावावें. ह्याप्रमाणें एक महिनाभर सावधगिरीनें वागावें.

प्रसूता सार्धमासान्ते दृष्टे वा पुनरार्तवे ।
सूतिकानामहीना स्यादिति धन्वन्तरेर्मतम् ॥ २ ॥
उपद्रवैर्विशुद्धां च विज्ञाय वरवर्णिनीम् ।
ऊर्ध्वं चतुर्भ्यो मासेभ्यः परिहारं विसर्जयेत् ॥ ३ ॥

बाळंतिणीला दीड महिना होईपर्यंत तिला बाळंतीणच समजावी. किंवा ती पुन्हा ऋतुमती होईपर्यंत तिला बाळंतीण समजावी. ती ऋतुमती झाल्यावर तिचें बाळंतपण संपलें असें धन्वन्तरीचें मत आहे. प्रसूतीसंबंधीं सर्व विकार जाऊन तिची प्रकृति शुद्ध झाली व तिच्या अंगावर चांगली कांति आली असें जाणून चार महिन्यानंतर तिनें बाळंतपणांतील उपचार सोडावे.

स्तनरोगाची निदानपूर्वक चिकित्सा.

सक्षीरौ चाप्यदुग्धौ वा दोषः प्राप्य स्तनौ स्त्रियाः ।
रक्तं मांसं च संदूष्य स्तनरोगाय कल्पते ॥ १ ॥

स्तनामध्यें दूध असो अथवा नसो, वातादि दोष स्तनामध्यें शिरून रक्त व मांस ह्यांना दूषित करून स्तनरोग उत्पन्न करितात.

स्तनरोगांचीं लक्षणें.

पञ्चानामपि तेषां हि रक्तजं विद्रधिं विना ।
लक्षणानि समानानि बाह्यविद्रधिलक्षणैः ॥ २ ॥

रक्तविद्रधीवांचून बाकीच्या पांचही बाह्यविद्रधींची व स्तनविद्रधींचीं लक्षणें समानच असतात.

स्तनरोगचिकित्सा.

शोथं स्तनोत्थितमवेक्ष्य भिषग्विदध्या-
द्यद्विद्रधावभिहितं बहुधा विधानम् ।
आमे विदह्यति तथैव गते च पाकं
यस्याः स्तनौ सततमेव च निर्गृहीतौ ॥ १ ॥
पित्तघ्नानि सुशीतानि द्रव्याण्यत्र प्रयोजयेत् ।
जलौकाभिर्हरेद्रक्तं तत्स्तनावुपनाहयेत् ॥ २ ॥
लेपो विशालामूलेन हन्ति पीडां स्तनोत्थिताम् ।
निशाकनककल्काभ्यां लेपः प्रोक्तः स्तनार्तिहा ॥ ३ ॥
लेपान्निहन्ति मूलं स्तनरोगं वन्ध्यकर्कोट्याः ।
निर्वाप्य तप्तलोहं सलिले तद्वा पिबेत्तत्र ॥ ४ ॥

स्तनावर सूज आलेली पाहून विद्रधीला जी योग्य ती चिकित्सा बहुतेक करावी. विद्रधि अपक्व असतां ज्यामध्यें दाह होतो आणि पक्व झाल्यावर ज्यामध्यें स्तन जखडल्यासारखे होतात, अशा स्तनविद्रधीवर पित्तनाशक व शीतळ अशीं औषधें योजावीं. जळवा लावून रक्त काढावें आणि पोटिसानें शेकावें. कडू वृंदावनाच्या मुळीचा स्तनावर लेप करावा. तो स्तनाची पीडा दूर करतो. हळद व धोत्र्याची मुळी ह्यांचा कल्क स्तनाच्या पीडेचा नाश करितो. वांझ कर्टोलीच्या गड्डयाचा लेप स्तनरोगाचा नाश करितो. स्तनरोगावर पोलाद तापवून पाण्यांत बुडवून तें पाणी प्यावें.

क्षीरदोषाची चिकित्सा.

रक्तप्रसादो मधुरः पक्काहारनिमित्तजः ।
कृत्स्नदेहात्स्तनौ प्राप्तः स्तन्यमित्याभिधीयते ॥ १ ॥
गुरुभिर्विविधैरन्नैर्दुष्टैर्दोषैः प्रदूषितम् ।
क्षीरं धात्र्याः कुमारस्य नानारोगाय कल्पते ॥ ३ ॥

पक्व आहारापासून उत्पन्न होणारा व मधुर असा सर्व देहांतून

स्तनामध्यें संचित झालेला असा जो रक्तप्रसाद (दूध), त्याला स्तन्य असें म्हणतात. माधवानें म्हटलें आहे:–नाना प्रकारच्या जड अन्नापासून दूषित झालेल्या वातादि दोषांनीं दूषित झालेलें दाईचें दूध बालकाला अनेक प्रकाराचे रोग उत्पन्न करितें.

कषायं सलिलप्लावि स्तन्यं मारुतदूषितम् ।

तुरट व पाण्यावर तरणारें जें दूध तें वातदोषानें दूषित झालेलें आहे असें समजावें.

कट्वम्ललवणं पीतराजिमत्पित्तसंज्ञितम् ॥ ३ ॥

तिखट, आंबट, खारट असें असून ज्यावर पिवळ्या रेषा दिसतात तें दूध पित्तदोषानें दूषित झालेलें आहे असें समजावें.

कफदुष्टं घनं तोये निमज्जति सुपिच्छिलम् ।

कफदोषानें दूषित झालेलें दूध दाट असून पाण्यांत टाकलें असतां बुडतें.

द्विलिङ्गं द्वंद्वजं विद्यात्सर्वलिङ्गं त्रिदोषजजम् ॥ ४ ॥

ज्यामध्यें दोन दोषांचीं लक्षणें आहेत तें द्वंद्वज आणि ज्यामध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें आहेत तें त्रिदोषज आहे असें समजावें.

विकाररहित दुधाचें लक्षण.

अदुष्टं चाम्बुनि क्षिप्तमेकीभवति पाण्डुरम् ।
मधुरं चाविवर्णं च तत्प्रसन्नं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

जें दूध निर्दोष असतें, तें पाण्यांत टाकलें असतां पाण्यांत मिसळतें. जें पांढरें असतें, मधुर असतें व ज्याचा रंग चांगला असतो, तें दूध स्वच्छ असें समजावें.

त्याची चिकित्सा.

तत्र वातात्मके स्तन्ये दशमूलीं त्र्यहं पिबेत् ।
वातव्याधिहरं सर्पिः पीत्वा मृदु विरेचयेत् ॥ १ ॥

त्यांत वातजन्य दूषित दूध निर्दोष होण्याकरितां दशमुळांचा काढा तीन दिवस प्यावा. वातनाशक तूप पाजून मृदु रेचक द्यावें.

पित्तदुष्टेऽमृताभीरुपटोलं निम्बचन्दनम् ।
धात्री कुमारश्च पिबेत्क्वाथयित्वा सशर्करम् ॥ २ ॥

पित्तानें दूषित झालेल्या दुधावर गुळवेल, शतावरी, कडू पड-

वळ, वाळंतलिंबाची साल व रक्तचंदन ह्यांचा काढा करून त्यांत साखर घालून दाईला व मुलाला पाजावा.

कफदुष्टे घृतं पेयं यष्टीसैन्धवसंयुतम् ।
राठपुष्पैः स्तनौ लिम्पेच्छिशोश्च दशनच्छदौ ॥ ३ ॥
सुखमेवं वमेद्बालः कफकोपश्च शाम्यति ।
द्वंद्वदुष्टं द्वियोगाभ्यां पूर्वोक्ताभ्यां विशोधयेत् ॥ ४ ॥

कफानें दूषित झालेल्या दुधावर दाईला जेष्टमधाचें चूर्ण व सैंधेलोण घालून तूप पाजावें, आणि दाईच्या स्तनास गेळफळाच्या फुलाचा लेप करावा व मुलाच्या ओठासही करावा. ह्या योगानें मुलाला सुखानें वांति होते व कफप्रकोपाचें शमन होतें. द्वंद्वदोष-जन्य दुधाच्या दोषावर वर सांगितलेल्या दोन दोन दोषांवरील योगांची योजना करून दूध शुद्ध करावें.

स्तन्ये त्रिदोषसंदुष्टे शकृदामं जलोपमम् ।
नानावर्णरुजं चार्धविबद्धमुपवेश्यते ॥ ५ ॥
पाठा मूर्वा च भूनिम्बदारुशुण्ठीकलिङ्गकाः ।
सारिवाघनतिक्ताख्यं तच्च स्तन्यविशोधनम् ॥ ६ ॥

दूध त्रिदोषानें दुष्ट झालें असतां मुलाला आमयुक्त, पाण्यासारखें अनेक रंगाचें व शूल-(मुरडा) युक्त व अर्धवट बांधीव असें शौचास होतें. तें त्रिदोषदूषित दूध शुद्ध होण्याकरितां पहाडमूळ, मोरवेल, काडेचिराईत, देवदार, सुंठ, इंद्रजव, उपलसरी, नागरमोथे व कुटकी ह्या औषधांचा काढा दाईस द्यावा. तो स्तन्यदोषनाशक आहे.

दूध वाढण्यास उपाय.

भूमिकूष्माण्डमूलस्य क्षीरपिष्टस्य या रसम् ।
पिबेत्सशर्करं तस्याः क्षीरं बहु विवार्धते ॥ १ ॥

भुईकोहळ्याच्या मुळ्या दुधांत वांटून त्यांचा रस काढून त्यांत साखर घालून तो जी स्त्री पिते, तिला पुष्कळ दूध येतें.

शतावरी क्षीरपिष्टा पीता स्तन्यविवर्धनी ।

शतावरी दुधात वांटून प्यावी. तीही दूध वाढविते.

कवोष्णं कणया पीतं क्षीरं क्षीरविवर्धनम् ॥ २ ॥

कोमट दूध, पिंपळीचें चूर्ण (व साखर) टाकून प्यावें. तेंही दूध वाढवितें.

वनकार्पासिकेक्षूणां मूलं सौवीरकेण वा ।
विदारिकन्दं सुरया पिबेद्वा स्तन्यवर्धनम् ॥ ३ ॥

रानकापशीच्या व उंसाच्या मुळ्या कांजींत वांटून प्याव्या; किंवा भुईकोहळ्याचें चूर्ण मद्यांतून प्यावें. तें दूध वाढवितें.

वज्रकांजिक.

पिप्पली पिप्पलीमूलं चव्यं शुण्ठी यवानिका ।
जीरके द्वे हरिद्रे द्वे बिडं सौवर्चलं तथा ॥ १ ॥
एतैरेवौषधैः पिष्टैरारनालं विपाचयेत् ।
तद्यथाग्निबलं पीत्वा प्रसूता सुखमश्नुते ॥ २ ॥
आमवातहरं वृष्यं कफघ्नं वातनाशनम् ।
तद्वज्रकाञ्जिकं नाम्ना स्त्रीणामग्निविवर्धनम् ॥
मक्कल्लशूलशमनं परं क्षीरविवर्धनम् ॥ ३ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, सुंठ, ओंवा, जिरें, शहाजिरें, हळद, दारुहळद, बिडलोण व पादेलोण ह्या औषधांचें चूर्ण कांजींत घालून ती शिजवावी. ही कांजी अग्निबल पाहून सेवन केली असतां बाळंतिणीला सुख होतें. ही आमवातनाशक, वृष्य, कफनाशक व वातनाशक आहे. हिला वज्रकांजिक असें म्हणतात. ही स्त्रियांचा अग्नि प्रदीप्त करिते व मक्कलशूलाचा नाश करिते. ही दूध वाढविण्याविषयीं फार उत्तम आहे.

पथ्यापथ्य.

यत्पथ्यं यदपथ्यं च रक्तपित्तेषु कीर्तितम् ।
प्रदरेऽपि यथादोषं तत्तु नारी हाजि त्यजेत् ॥ १ ॥

रक्तपित्ताच्या विकारांत जें पथ्य किंवा अपथ्य सांगितलें आहे तें दोषानुरूप स्त्रीनें प्रदराच्या विकारांत वर्ज करावें.

वातव्याधिमतां पथ्यापथ्यं च यदुदीरितम् ।
योनिव्यापत्सु सर्वासु तद्विद्यात्तु यथामलम् ॥ २ ॥

वातव्याधीवर जें पथ्यापथ्य सांगितलें आहे तेंच दोषमानाप्रमाणें सर्व योनिव्यापद्रोगांमध्येंही आहे असें जाणावें.

शालयः षष्टिका मुद्रा गोधूमा लाजसक्तवः ।

नवनीतं घृतं क्षीरं रसाला मधुशर्करा ।
पनसं कदलं धात्री द्राक्षाम्लं स्वादु शीतलम् ॥ ३ ॥
कस्तूरी चन्दनं माला कर्पूरमनुलेपनम् ।
चन्द्रिका स्नानमभ्यङ्गः मृदुशय्या हिमानिलः ॥ ४ ॥
संतर्पणं प्रियाश्लेषो विहाराश्च मनोरमाः ।
प्रियंकरं चान्नपानं गर्भिणीनां हितं सदा ॥ ५ ॥

साठचा साळी, मूग, गहू, लाह्या, सातु, लोणी, तूप, दूध, श्रीखंड, मधाची साखर, फणस, केळें, आवळे, द्राक्षांचा आंबट रस, गोड व शीतळ पदार्थ, कस्तुरी व चंदन ह्यांची उटी, फुलांच्या माळा, कापूराची उटी, चांदणें, स्नान, अंगाला तेल लावणें, मऊ बिछाना, शीतळ वारा, तृप्तिदायक खाणेंपिणें, प्रियकराचें आलिंगन, मनाला आनंददायक असे विहार (खेळ) व आवडणारें असें अन्न-पान, हें गर्भिणीला नेहमीं पथ्यकारक आहे.

स्वेदनं वमनं क्षारं कदन्नं विषमाशनम् ।
अपथ्यमिदमुद्दिष्टं गुर्विणीनां महर्षिभिः ॥ ६ ॥

स्वेदन (शेकणें), ओकारी, क्षारपदार्थ, वाईट आणि शिळें अन्न व विषम भोजन गर्भिणीला अपथ्य म्हणून महर्षींनीं सांगितलें आहे.

सूतिकाख्येषु रोगेषु वातश्लेष्मोद्भवेषु च ।
तत्र रोगानुकल्पेन पथ्यापथ्यानि निर्दिशेत् ॥ ३ ॥

बाळंतरोगावर व वातकफजन्य रोगावर रोगानुरूप पथ्यापथ्याची योजना करावी.

बालरोगाधिकार.

धात्र्यास्तु गुरुभिर्भोज्यैर्विषमैर्दोषलैस्तथा ।
दोषा देहे प्रकुप्यन्ति ततः स्तन्यं प्रदुष्यति ॥ १ ॥
मिथ्याहारविहारिण्या दुष्टा वातादयस्त्रयः ।
दूषयन्ति पयस्तेन जायन्ते व्याधयः शिशोः ॥ २ ॥

दाईनें (मुलाला पाजणाऱ्या स्त्रीच्या) जड अन्न सेवन केल्यानें, विषम भोजनानें, व दोषल अन्नसेवनानें, तिच्या शरीरांतील वातादिक दोष कुपित होऊन स्तनांतील दूध दूषित करितात. ह्याप्रमाणें मिथ्या म्हणजे अव्यवस्थित आहारविहार करणाऱ्या दाईचे वातादि दोष प्रकुपित होऊन तिचें दूध दूषित करितात. त्यामुळें मुलाला

रोग उत्पन्न होतात.

वातदुष्टं शिशुः स्तन्यं पिबन्वातगदातुरः ।
क्षामस्वरः कृशाङ्गः स्याद्बद्धविण्मूत्रमारुतः ॥ ३ ॥

वातदूषित दूध प्यालें असतां मुलाला वातजन्यरोग होतात. त्यामुळें त्याचा स्वर दीन होतो, अंग कृश होतें, मळ मूत्र व वायु ह्यांचा अवरोध होतो.

स्विन्नो भिन्नमलो बालः कामलापित्तरोगवान् ।
तृष्णालुरुष्णसर्वांगः पित्तदुष्टं पयः पिबन् ॥ ४ ॥

पित्तरोगामुळें मुलाला घाम येतो, व त्याचा मळ पातळ होतो. त्याला कावीळ होते, तहान लागते व त्याचें सर्व अंग ऊन होतें. हीं लक्षणें पित्तदोषानें दूषित झालेलें दूध प्याल्यानें होतात.

कफदुष्टं पिबन्क्षीरं लालालुः श्लेष्मरोगवान् ।
निद्रार्दितो जडः शूनवक्त्राक्षश्छर्दनः शिशुः ॥

कफदोषानें दूषित असें दूध प्याल्यानें मुलाला लाळ फार येते. कफजन्य रोग होतात. त्याला झोंप फार येते. अंग जड होतें. डोळ्याला व तोंडाला सूज येते व तें ओकतें.

मुलांच्या वेदना जाणण्याचा उपाय.

शिशोस्तीव्रामतीव्रां च रोदनाल्लक्षयेद्रुजम् ॥ १ ॥

बालकाच्या मोठ्यानें किंवा हळू रडण्यावरून त्याला होत असलेल्या तीव्र किंवा कमी पीडा जाणाव्या.

कुकूणकलक्षण.

कुकूणकः क्षीरदोषाच्छिशूनामेव वर्त्मनि ।
जायते तेन तन्नेत्रं कण्डूरं च स्रवेन्मुहुः ॥ १ ॥
शिशुः कुर्याल्ललाटाक्षिकण्ठनासावघर्षणम् ।
शक्तो नार्कप्रभां द्रष्टुं न वर्त्मोन्मीलनक्षमः ॥ २ ॥

दुधाच्या दोषामुळें मुलांच्या डोळ्याला कुकूणक नांवाचा व्याधि होतो. त्यामुळें त्या मुलाचे डोळे खाजतात, व डोळ्यांतून वरचेवर पाणी येतें. मूल डोळे, कपाळ, गळा व नाक या ठिकाणीं घर्षण करितें. त्याच्यानें सूर्याच्या तेजाकडे पाहवत नाहीं. आणि त्याला डोळे उघडतां येत नाहींत.

पारिगर्भिक.

मातुः कुमारो गर्भिण्याः स्तन्यं प्रायः पिबन्नपि ।
श्वासाग्निसादवमथुतन्द्राकासारुचिभ्रमैः ॥ १ ॥
युज्यते कोष्ठवृद्ध्या च तमाहुः पारिगर्भिकम् ।
रोगं परिभवाख्यं च तत्र युञ्जीत दीपनम् ॥ २ ॥

गर्भिणी आईचें स्तनपान करणाऱ्या मुलाला श्वास, अग्निमांद्य, ओकारी, ग्लानि, ओकला, अरुचि व भ्रम (घेरी येणें) हीं लक्षणें होतात. त्याचें पोट मोठें होतें. त्याला पारिगर्भिक असें म्हणतात. ह्याजवर अग्निदीपक क्रिया करावी. (ह्या पारिगर्भिकालाच 'मूल ऐनरकें' असें म्हणतात.)

तालुकंटक.

तालुमांसे कफः क्रुद्धः कुरुते तालुकंटकम् ।
तेन तालुप्रदेशस्य निम्नता मूर्ध्नि जायते ॥ १ ॥
तालुपातः स्तनद्वेषः कृच्छ्रात्पानं शकृद् द्रवम् ।
तृडक्षिकण्ठास्यरुजो ग्रीवादुर्धरता वमिः ॥ २ ॥

मुलाच्या टाळूच्या मांसाच्या ठिकाणीं कफ दूषित झाला असतां तो तालुकंटक नांवाचा रोग उत्पन्न करितो. त्यामुळें मस्तकाचे ठिकाणीं टाळूला खळगा पडतो. टाळा (तोंडांतील) खालीं येतो. तें मूल स्तन पीत नाहीं. प्यालें तर मोठ्या कष्टानें पितें. त्याला मळ पातळ होतो, तहान लागते; त्याचे डोळे, घसा व तोंड हीं दुखतात. त्याला मान सांवरत नाहीं आणि तें ओकतें.

महापद्म.

विसर्पस्तु शिशोः प्राणनाशनो बस्तिशीर्षजः ।
पद्मवर्णो महापद्मरोगो दोषत्रयोद्भवः ॥ १ ॥
शङ्खाभ्यां हृदयं याति हृदयाच्च गुदं व्रजेत् ।

लहान मुलाला त्रिदोषापासून बस्ती व मस्तक यांच्या ठिकाणीं तांबड्या वर्णाचा एक विसर्प उत्पन्न होतो. तो प्राणनाशक आहे. त्याला महापद्मविसर्प असें म्हणतात. हा आंखापासून हृदयापर्यंत पसरत येतो आणि हृदयापासून गुदापर्यंत जातो.

क्षुद्ररोगे च कथिते अजगल्ल्यहिपूतने ॥ २ ॥

क्षुद्ररोगप्रकरणामध्यें सांगितलेले अजगल्लिका आणि अहिपूतन हे रोग मुलास होतात.

मुलांचे दुसरे विकार.

ज्वराद्या व्याधयः सर्वे महतां ये पुरेरिताः ।
बालदेहेऽपि ते तद्वज्ज्ञेयाः स्युः कुशलैरिह ॥ १ ॥

मागें जे ज्वरादि मोठ्यांचे व्याधि सांगितले आहेत, ते सर्व मुलांना होतात. ते कुशल वैद्यानें त्या त्या लक्षणांवरून ओळखावे.

दांत येण्याच्या वेळचे रोग.

दन्तोद्भेदः शिशोः सर्वरोगाणां कारणं स्मृतः ।
विशेषाज्ज्वरविड्भेदकासच्छर्दिशिरोरुजाम् ।
अभिष्यन्दस्य पोथक्या विसर्पस्य च जायते ॥ १ ॥

दांत बाहेर पडणें हें मुलांच्या सर्व रोगांना कारण आहे. त्यांत विशेषतः ज्वर, मलभेद, खोकला, ओकारी, मस्तक दुखणें, डोळे येणें, खुपऱ्या व विसर्प हे रोग होतात.

बालग्रहाचीं लक्षणें.

बालग्रहा अनाचारात्पीडयन्ति शिशुं यतः ।
तस्मात्तदुपसर्गेभ्यो रक्षेद्बालं प्रयत्नतः ॥ १ ॥

ज्या अर्थी अनाचारामुळें बालग्रह हे मुलांना पीडा करितात, त्या अर्थी त्यांच्या त्या पीडेपासून मुलाचें प्रयत्नानें संरक्षण करावें.

बालग्रहांचीं नांवें.

स्कन्दग्रहस्तु प्रथमः स्कन्दापस्मार एव च ।
शकुनी रेवती चैव पूतना गन्धपूतना ॥ १ ॥
पूतना शीतपूर्वा च तथैव मुखमण्डिका ।
नवमो नैगमेयश्च प्रोक्ता बालग्रहा अमी ॥ २ ॥

पहिला स्कंद ग्रह; पुढें स्कंदापस्मार, शकुनी, रेवती, पूतना, गंधपूतना (अंधपूतना), शीतपूतना, मुखमंडिका व नैगमेय, असे नऊ ग्रह सांगितले आहेत.

बालग्रहाच्या बाधेचें सामान्य लक्षण.

क्षणादुद्विजते बालः क्षणात्त्रस्यति रोदिति ।
नखैर्दन्तैर्दारयति धात्रीमात्मानमेव च ॥ १ ॥
ऊर्ध्वं निरीक्षते दन्तान्खादेत्कूजति जृम्भति ।

भ्रुवौ क्षिपति दन्तोष्ठं फेनं वमति चासकृत् ॥ २ ॥
क्षामोऽति निशि जागर्ति शूनांगो भिन्नविट्स्वरः ।
मांसशोणितगन्धिश्च न चाश्नाति यथा पुरा ॥ ३ ॥
दुर्बलो मलिनांगश्च नष्टसंज्ञोऽपि जायते ।
सामान्यग्रहजुष्टानां लक्षणं समुदाहृतम् ॥ ४ ॥

लहान मुलांस ग्रहांची बाधा झाली असतां तें क्षणामध्यें उद्विग्न होतें, क्षणांत भितें; रडतें; नखांनीं व दांतांनीं दाईला (आईला) ओरबडतें किंवा चावतें. तसेंच आपल्यालाही ओरबडतें व चावतें. डोळे वर करून पाहतें, दांत खातें, कुजबुजतें, जांभया देतें, भोंवया चढवितें, दांतओठ खातें, वरचेवर तोंडाला फेंस आणितें व अतिशय दीन होतें. त्याला रात्रीं झोंप येत नाहीं. अंगाला सूज येते. त्याचा स्वर बदलतो व मळ पातळ होतो. त्याच्या आंगाला मांसाची व रक्ताची घाण येते. पूर्वींप्रमाणें तें खात पीत नाहीं. तें अशक्त होतें. त्याचें आंग मळीण होतें, व तें बेशुद्धही होतें. हें ग्रहबाधा झालेल्या मुलाचें सामान्य लक्षण सांगितलें.

स्कंदग्रहाचें लक्षण.

एकनेत्रस्य गात्रस्य स्रावः स्यन्दनकम्पनम् ।
ऊर्ध्वदृष्ट्या निरीक्षेत वक्रास्यो रक्तगन्धिकः ॥ १ ॥
दन्तान्खादति वित्रस्तः स्तन्यं नैवाभिनन्दति ।
स्कन्दग्रहगृहीतानां रोदनं चाल्पमेव च ॥ २ ॥

स्कंदापस्माराची बाधा झालेल्या मुलाच्या एका डोळ्यांतून पाणी येतें व एका बाजूचें अंग कांपतें. तें मूल डोळे वर करून पाहतें. त्याचें तोंड वांकडें होतें. त्याच्या अंगाला रक्ताची घाण येते. तें दांत खातें, त्रासतें, आईला पीत नाहीं आणि थोडें रडतें. हीं स्कंदरोगाची बाधा झालेल्या मुलाचीं लक्षणें आहेत.

स्कंदापस्मार ग्रहाचें लक्षण.

नष्टसंज्ञो वमेत्फेनं संज्ञावानतिरोदिति ।
पूयशोणितगन्धित्वं स्कन्दापस्मारलक्षणम् ॥ १ ॥

मूल बेशुद्ध होतें. तोंडाला फेंस आणितें. शुद्धीवर आल्यानंतर

अतिशय रडतें आणि त्याच्या अंगाला पू व रक्त यांची घाण येते. हें स्कंदापस्मार ग्रहाचें लक्षण आहे.

शकुनी ग्रहाचें लक्षण.

स्रस्तांगो भयचकितो विहंगगन्धिः
सास्रावव्रणपरिपीडितः समन्तात् ।
स्फोटैश्च प्रचिततनुः सदाहपाकै-
र्विज्ञेयो भवति शिशुः क्षतः शकुन्या ॥ १ ॥

मुलाचें अंग गळल्यासारखें होतें. मूल भयचकीत होतें. पक्ष्याच्या अंगासारखी त्याच्या अंगाला घाण येते. त्याच्या सर्व अंगावर व्रण उत्पन्न होऊन ते वाहतात आणखी नवे नवे फोड उत्पन्न होऊन ते पिकतात व त्यांचा दाह होतो. अशीं हीं लक्षणें शकुनी ग्रहामध्यें होतात.

रेवती ग्रहाचें लक्षण.

व्रणैः स्फोटैश्चितं गात्रं पङ्कगन्धं स्रवेदसृक् ।
भिन्नवर्चा ज्वरी दाही रेवतीग्रहलक्षणम् ॥ १ ॥

रेवतीग्रहानें पीडलेल्या मुलाचें अंग व्रणांनीं व फोडांनीं व्याप्त होतें व त्यांतून चिखलाच्या घाणीप्रमाणें घाण येणारें रक्त वाहतें. मळ पातळ होतो, ज्वर येतो आणि दाह होतो. हीं रेवती ग्रहाचीं लक्षणें आहेत.

पूतनाग्रहलक्षण.

अतीसारो ज्वरस्तृष्णा तिर्यक्प्रेक्षणरोदनम् ।
नष्टनिद्रस्तथोद्विग्नो ग्रस्तः पूतनया शिशुः ॥ १ ॥

अतिसार, ज्वर, तहान, तिरवें पाहणें, रडणें, झोंप न येणें व उद्विग्न होणें हीं पूतनाग्रहाची बाधा झालेल्या मुलाचीं लक्षणें आहेत.

गंधपूतनेचें लक्षण.

छर्दिः कासो ज्वरस्तृष्णा वसागन्धोऽतिरोदनम् ।
स्तन्यद्वेषोऽतिसारश्च गन्धपूतनया भवेत् ॥ १ ॥

ओकारी, खोकला, ज्वर, तहान, अंगाला चरबीप्रमाणें घाण येणें, अतिशय रडणें, अंगावर न पिणें व अतिसार हीं लक्षणें गंधपूतनेच्या बाधेनें होतात.

शीतपूतनालक्षण.

वेपते कासते क्षीणो नेत्ररोगो विगन्धिता ।
छर्द्यतीसारयुक्तश्च शीतपूतनया शिशुः ॥ १ ॥

शीतपूतना ग्रहानें पीडित झालेलें मूल कांपतें व खोकतें, क्षीण होतें. त्याला डोळ्याचे रोग होतात. त्याच्या अंगाला घाण येते व ओकारी आणि अतिसार हीं लक्षणें होतात.

मुखमंडनिकालक्षण.

प्रसन्नवर्णवदनः शिराभिरभिसंवृतः ।
मूत्रगन्धिश्च बह्वाशी मुखमण्डनिकाग्रहे ॥ १ ॥

मुखमंडनिकाग्रहानें पिडलेल्या मुलाचें तोंड व अंगकांति सुप्रसन्न दिसते. त्याच्या अंगावर शिरा उमटतात. त्याच्या अंगाला मुताची घाण येते व तें फार खातें. हीं लक्षणें मुखमंडनिकेच्या बाधेमुळें होतात.

नैगमेय ग्रहलक्षण.

छर्दिः स्यन्दनकण्ठास्यशोषो मूर्छा विगन्धिता ।
ऊर्ध्वं पश्येद्दशेद्दन्तान्नैगमेयग्रहं वदेत् ॥ १ ॥

ओकारी, अंग कांपणें, गळा व तोंड ह्यांना शोष, मूर्च्छा, अंगाला घाण येणें, वर पहाणें व दांत खाणें, हीं लक्षणें नैगमेयग्रहाच्या बाधेमुळें होतात.

स्नताक्षश्च स्तनद्वेषी मुह्यते चानिशं मुहुः ।
तं बालमचिराद्धन्ति ग्रहः संपूर्णलक्षणः ॥ २ ॥

ज्याचे डोळे गळल्यासारखे झाले आहेत, जो पीत नाहीं व जो एकसारखा रात्रंदिवस वरचेवर मूर्च्छित होतो, अशा मुलाला सर्व लक्षणांनीं युक्त असा ग्रह मारतो.

बालरोगाची चिकित्सा.

भैषज्यं पूर्वमुद्दिष्टं महतां यज्ज्वरादिषु ।
तदेव कार्यं बालानां किं तु दाहादिकं विना ॥ १ ॥
अग्निदाहक्षारवमनविरेचनशिराव्यधादिकं विनेत्यर्थः ।
महाकष्टे चोत्पन्ने वमनविरेकाद्यपि दद्यात् ।
विरेकबस्तिवमनान्यृते कुर्याच्च नात्ययात् ।
त एव दोषा दूष्याश्च ज्वराद्या व्याधयश्च ते ।

अतस्तदेव भैषज्यं मात्रा त्वस्य कनीयसी ॥ १ ॥

ज्वरादि रोगांवर मोठ्या माणसांना जीं औषधें सांगितलीं आहेत, तीं दाहादि क्रियेवांचून सर्व मुलांना द्यावीं. दाहादि क्रियेवांचून म्हणजे अग्नीनें डागणें, क्षारादिकांनीं डागणें, वमन, विरेचन, व शिरावेध ह्यावांचून बाकीचे उपाय करावे. आणि अतिशय कष्ट होत असल्यास वमनविरेचनही द्यावें. सुश्रुतानेंही असेंच म्हटलें आहे कीं, अत्यवस्थेखेरीज मुलाला वमन, विरेचन व बस्ती हे उपचार करूं नयेत. जे रोग, दोष व दूष्यें थोरांना असतात तेच रोग, दोष व दूष्यें मुलांना होतात. म्हणून तेंच औषध मुलांना योजावें. त्याचें प्रमाण मात्र अल्प असावें.

कनिष्ठ मात्रेचें प्रमाण.

विडंगफलमात्रं तु जातमात्रस्य भेषजम् ।
अनेनैव प्रमाणेन मासि मासि प्रवर्धयेत् ॥ १ ॥

अगदीं नुकत्या झालेल्या मुलाला वावडिंगाएवढें औषध द्यावें. आणि ह्याच प्रमाणानें प्रतिमहिन्यास औषधाचें प्रमाण वाढवावें.

अन्यग्रंथांतून दुसरें प्रमाण.

प्रथमे मासि बालाय देया भैषज्यरक्तिका ।
अवलेह्या तु कर्तव्या मधुक्षीरसिताघृतैः ॥ १ ॥
एकैकां वर्धयेत्तावद्यावत्संवत्सरो भवेत् ।
तदूर्ध्वं माषवृद्धिः स्याद्यावत्षोडश वत्सराः ॥ २ ॥
ततः स्थिरा भवेत्तावद्यावद्वर्षाणि सप्ततिः ।
ततो बालकवन्मात्रा ह्रासनीया शनैः शनैः ॥ ३ ॥
चूर्णकल्कावलेहानामियं मात्रा प्रकीर्तिता ।
कषायस्य पुनः सैव विज्ञातव्या चतुर्गुणा ॥ ४ ॥
क्षीरपस्य शिशोर्देयमौषधं क्षीरसर्पिषा ।
धात्र्यास्तु केवलं देयं न क्षीरेणापि सर्पिषा ॥ ५ ॥

पहिल्या महिन्यांत मुलाला एक गुंजभर औषध द्यावें. जें औषध द्यावयाचें तें मध, दूध, खडीसाखर (खडीसारेचा पाक) व तूप ह्यांतून चाटावयास येईल असें करून द्यावें. आणि एक वर्ष होईपर्यंत (प्रत्येक महिन्याला) एक एक गुंज वाढवीत जावें. एक

वर्षापुढें सोळा वर्षांपर्यंत प्रत्येक वर्षाला एक एक मासा ह्या प्रमाणानें औषधाचें प्रमाण वाढवावें. त्यानंतर म्हणजे सोळाव्या वर्षापासून सत्तर वर्षांपर्यंत तेंच प्रमाण (म्हणजे एक तोळ्याचें प्रमाण) कायम ठेवावें. त्यानंतर म्हणजे सत्तर वर्षांच्या पुढें, लहान मुलाला ज्याप्रमाणें वाढवीत आणावयास सांगितलें आहे, त्या प्रमाणानें हळूहळू कमी करीत आणावें. हें प्रमाण चूर्ण, कल्क, अवलेह ह्यांचें सांगितलें आहे. काढ्याचें प्रमाण ह्याच्या चौपट असावें. जें मूल दुधावर आहे, त्याला औषध दुधांतून अथवा तुपांतून द्यावें. मूल पिणाऱ्या दाईला तें औषध तसेंच द्यावें, दुधांतून किंवा तुपांतून देऊं नये.

ज्वराची चिकित्सा.

सर्वं निवार्यते बाले स्तन्यं नैव निवार्यते ।
मात्रया लंघयेद्धात्रीं शिशोरेतद्धि लंघनम् ॥ १ ॥
क्षीरादस्यौषधं धात्र्याः क्षीरान्नादस्य चोभयोः ॥ १ ॥
अन्नादस्य तु बालस्य योजयेत्कुशलो भिषक् ।

मुलाला सर्व वर्ज करितां येतें, पण आईच्या अंगावर पिण्याचें वर्ज्य करूं नये. क्रमानें दाईला (मूल पाजणाऱ्या बाईला) लंघन द्यावें, म्हणजे मुलालाही लंघन होतें. दूध पिणाऱ्या मुलाला द्यावयाचें औषध त्या मुलाला पाजणाऱ्या दाईला द्यावें. अन्न व दूध हे दोन्हीही खाणाऱ्या मुलाला औषध द्यावयाचें तें मुलास व दाईस दोघांसही द्यावें. आणि कुशल वैद्यानें केवळ अन्न खाणाऱ्या मुलाच औषध योजावें. (दाईस देऊं नये)

भद्रमुस्तादि काढा.

भद्रमुस्ताभयानिम्बपटोलमधुकैः कृतः ।
क्वाथः कोष्णः शिशोरेष निःशेषज्वरनाशनः ॥ २ ॥

नागरमोथे, बाळहिरडे, कडुनिंबाच्या काड्या, कडु पडवळ व ज्येष्टमध ह्यांचा काढा मुलांच्या सर्व ज्वरांचा नाश करितो.

एलाम्रास्थिकटुत्रिकत्रिफलिकावेल्लाब्दशृङ्गीविषा-
लोध्रं धातकिचित्रकाल्हपुषाबिल्वाजमोदाः समाः ।
वस्वंशा तुरगी जया नृपलवा सर्वैः समांशा सिता
बालानां ज्वरकार्श्यकासशमनश्चूर्णोऽतिसारं जयेत् ॥ ३ ॥

वेलदोडे, आंब्यांतील कोय, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकठी, वावडिंग, नागरमोथे, काकडशिंगी, अतिविष, लोध्र, धायटीचीं फुलें, चित्रकमूळ, धने, शेरणी, बेलफळ व अजमोदा हीं औषधें समभाग; अश्वगंध आठ भाग, भांग सोळा भाग, आणि साखर सर्व चूर्णासमान घालावी. हें चूर्ण मुलांचा ज्वर, कृशत्व व खोकला ह्यांचें शमन करितें, आणि अतिसाराला जिंकतें.

जिभेला लेप.

बालो योऽचिरजातः स्तन्यं गृह्णाति नो तदा तस्य ।
सैन्धवधात्रीमधुघृतपथ्याकल्केन घर्षयेज्जिह्वाम् ॥ १ ॥

नुकतेंच जन्मास आलेलें मूल जर आईला पीत नसेल तर सेंधेलोण, आवळकठी, मध, तूप व बाळहिरडे ह्यांचा कल्क त्याच्या जिभेला चोळावा.

पलंकषादि धूप.

पलंकषा वचा कुष्ठगजचर्माविचर्म च ।
निम्बस्य पत्रं क्षौद्रेण सार्धमुक्तं तु धूपनम् ।
ज्वरवेगं निहन्त्याशु बालकानां विशेषतः ॥ १ ॥

गुग्गुळ, वेखंड, कोष्ठ, हत्तीचें कातडें, मेंढराचें कातडें व कडुनिंबाचा पाला ह्यांच्या चूर्णांत मध मिळवून त्याची धुरी द्यावी. ही धुरी विशेषतः बालकाच्या ज्वराचा नाश करिते.

मूर्वादि उद्वर्तन.

मूर्वानिशासर्षपरामसेनश्वेतासमंगाम्बुदकारवीणाम् ।
छागीपयोभिः सह पेषितानामुद्वर्तनं स्याज्ज्वरजिच्छिशूनाम् १

मोरवेल, हळद, मोहऱ्या, काडेचिराईत, वेखंड, लाजाळु, वाळा व बडीशेप हीं औषधें शेळीच्या दुधांत वाटून अंगास लावावीं. हें उटणें बालकांच्या ज्वराला जिंकतें.

अतिसार व संग्रहणी ह्यांची चिकित्सा.

घनकृष्णारुणाशृङ्गीचूर्णं क्षौद्रेण संयुतम् ।
शिशोर्ज्वरातिसारघ्नं कासं श्वासं वमिं हरेत् ॥ १ ॥

नागरमोथे, पिंपळी, मंजिष्ठ व सुंठ ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें मुलाचा ज्वर, अतिसार, खोकला, श्वास व ओकारी ह्यांचा

नाश करितें.

लोध्रेण पिप्पली बाला बालकातिसृतौ हितः ।
श्रीरसो माक्षिकयुतो धातकीकुसुमैः समम् ॥ २ ॥

लोध्र व बारीक पिंपळी ह्यांचें चूर्ण बालकाच्या अतिसारावर हितकारक आहे. विशेष धूप (श्रीरस;–सुरूचा डिंक) व धायटीचीं फुलें ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें अतिसाराचा नाश करितें.

बिल्वं च पुष्पाणि च धातकीनां जलं सलोध्रं गजपिप्पली च ।
क्वाथावलेहौ मधुना विमिश्रौ बालेषु योज्यावतिसारितेषु ॥३॥

कोंवळें बेलफळ, धायटीचीं फुलें, वाळा, लोध्र व गजपिंपळी ह्यांचा काढा मध घालून द्यावा. अथवा ह्यांचें चूर्ण मधांतून लेहासारखें बालकाच्या अतिसारावर चाटावयास द्यावें.

समङ्गाधातकीलोध्रसारिवाभिः शृतं जलम् ।
दुर्धरेऽपि शिशोर्देयमतीसारे समाक्षिकम् ॥ ४ ॥
विडङ्गान्यजमोदा च पिप्पलीतण्डुलानि च ।

मंजिष्ठ, धायटीचीं फुलें, लोध्र व उपळसरी ह्यांचा काढा अशाही बालकाच्या अतिसारावर मध घालून द्यावा.

एषामालिह्य चूर्णानि सुखतप्तेन वारिणा ॥ ५ ॥

वावडिंग, ओवा व पिंपळींतील बी ह्यांचें चूर्ण मुलाच्या आमातिसारावर ऊन पाण्याशीं द्यावें.

आमे प्रवृत्तेऽतीसारे कुमारं पाययेद्भिषक् ।
मोचारसं समङ्गा च धातकी पद्मकेसरम् ।
पिष्टैरेतैर्यवागूः स्याद्रक्तातीसारनाशिनी ॥ ६ ॥

मोचरस, मंजिष्ठ, धायटीचीं फुलें व कमळांतील केसर ह्यांचें चूर्ण टाकून तयार केलेली यवागू म्हणजे कण्हेरी रक्तातिसाराचा नाश करिते.

नागरातिविषामुस्तवालकेन्द्रयवैः शृतम् ।
कुमारं पाययेत्प्रातः सर्वातीसारनाशनम् ॥ १ ॥

सुंठ, अतिविष, नागरमोथे, वाळा व इंद्रजव ह्यांचा काढा बालकाच्या सर्व अतिसारांचा नाश करितो.

लाजाः सयष्टिमधुका शर्करा क्षौद्रमेव च ।

तण्डुलोदकयोगेन क्षिप्रं हन्ति प्रवाहिकाम् ॥ २ ॥

लाह्या व ज्येष्टमध ह्यांचें चूर्ण मध व साखर मिसळून तांदुळाच्या धुवणांतून द्यावें. तें प्रवाहिकेचा त्वरित नाश करितें.

लोध्रेन्द्रयवधान्याकधात्रीह्रीबेरमुस्तकम् ।
मधुना लेहयेद्बालं ज्वरातीसारनाशनम् ॥ १ ॥

लोध्र, इंद्रजव, धने, आवळकठी, वाळा व नागरमोथे ह्यांचें चूर्ण मुलाला मधाशीं चाटवावें; तें ज्वरातिसाराचा नाश करितें.

रजनी सरला दारु बृहती गजपिप्पली ॥ २ ॥
पृश्निपर्णी शताव्हा च लीढा माक्षिकसर्पिषा ।
दीपनी ग्रहणीं हन्ति मारुतार्तिं सकामलाम् ।
ज्वरातीसारपाण्डुत्वं बालानां सर्वरोगनुत् ॥ ३ ॥

हळद, सरळ देवदार, डोरलीमूळ, गजपिंपळी, पिठवण, बडिशेप, ह्यांचें चूर्ण तूप-मधाशीं द्यावें. तें अग्नीचें दीपन करितें व संग्रहणी, वातजन्य पीडा व कावीळ ह्यांचा नाश करितें. त्याचप्रमाणें ज्वर, अतिसार, पांडुरोग व बालकाचे सर्व रोग ह्यांचा नाश करितें.

कासरोगचिकित्सा.

पौष्करातिविषाशृङ्गीमागधीधन्वयासकैः ।
कृतं चूर्णं तु सक्षौद्रं शिशूनां पञ्चकासजित् ॥ १ ॥

पोखरमूळ, अतिविष, काकडशिंगी, पिंपळी व धमासा, ह्यांचें चूर्ण बालकाच्या पांच प्रकारच्या खोकल्यांला जिंकतें.

मुस्तकादि स्वरस.

मुस्तकातिविषावासाकणाशृङ्गीरसं लिहन् ।
मधुना मुच्यते बालः कासैः पञ्चभिरुच्छ्रितैः ॥ १ ॥

नागरमोथे, अतिविष, अडुळसा, पिंपळी व काकडशिंगी ह्यांचा रस मध घालून घेतला असतां अतिशय वाढलेल्या पांचही खोकल्यांपासून तो मुलाला मुक्त करितो.

व्याघ्रीकुसुमादि अवलेह.

व्याघ्रीकुसुमसंजातकेसरैरवलेहिका ।
मधुना चिरसंजाताच्छिशोः कासान्व्यपोहति ॥ १ ॥

रिंगणीच्या फुलांतील केसराचें चूर्ण मधाशीं मुलांस चाटवावें. तें मुलांच्या फार दिवसांच्या खोकल्याचा नाश करितें.

कासश्वासचिकित्सा.

धान्यं शर्करया युक्तं तण्डुलोदकसंयुतम् ।
पानमेतत्प्रदातव्यं कासश्वासापहं शिशोः ॥ १ ॥

धने व साखर ह्यांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांतून मुलास पाजावें. तें लहान मुलाच्या श्वासाचा व खोकल्याचा नाश करितें.

द्राक्षादि चूर्ण.

द्राक्षावासाभयाकृष्णाचूर्णं क्षौद्रेण सर्पिषा ।
लीढं श्वासं निहन्त्याशु कासं च तमकं तथा ॥ १ ॥

मनुका, बाळहिरडे व पिंपळी ह्यांचें चूर्ण तूप आणि मध ह्यांशीं द्यावें. तें श्वास, कास व तमकश्वास ह्यांचा नाश करितें.

दुरालभादि लेह.

दुरालभाकणाद्राक्षापथ्याः क्षौद्रेण लेहयेत् ।
त्रिरात्रं पंचरात्रं वा कासश्वासहरः शिशोः ।

धमासा, पिंपळी, द्राक्षें व हिरडे ह्यांचें चूर्ण तीन किंवा पांच दिवस मधाशीं चाटावें. तें लहान मुलांचा श्वास आणि खोकला हे रोग दूर करितें.

तुगा च क्षौद्रसंलीढा कासश्वासौ शिशोर्जयेत् ॥ १ ॥

वंशलोचन मधाशीं चाटवावें. तें लहान मुलाच्या श्वासाचा व खोकल्याचा नाश करितें.

उचकी व ओकारी ह्यांजवर.

चूर्णं कटुकरोहिण्या मधुना सह योजयेत् ।
हिक्कां प्रशमयेत्क्षिप्रं छर्दिं चापि चिरोत्थिताम् ॥ १ ॥

कुटकीचें चूर्ण मधाशीं चाटवावें. म्हणजे उचकी व फार दिवसांची ओकारी बंद होते.

आम्रास्थिलाजासिन्धूत्थं सक्षौद्रं छर्दिनुद्भवेत् ।

आंब्याची कोय, भाताच्या लाह्या व सेंधेलोण ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें ओकारीचा नाश करितें.

घनशृंगिविषाणां च चूर्णं हन्ति समाक्षिकम् ।
वान्तिं ज्वरं तथा योगो मधुनाऽतिविषारजः ॥ २ ॥

नागरमोथे, काकडाशिंगी व अतिविष ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें.

तें ज्वर व ओकारी ह्यांचा नाश करितें. त्याचप्रमाणें अतिविषाचें चूर्णही मधाशीं द्यावें. तेंही ओकारी व ज्वर ह्यांचा नाश करितें.

दुधाच्या ओकारीवर.

पीतं पीतं वमेद्यस्तु स्तन्यं तं मधुसर्पिषा ।
द्विवार्ताकीफलरसं पंचकोलं च लेहयेत् ।
पिप्पली पिप्पलीमूलं चव्यचित्रकनागरम् ॥ १ ॥

जें मूल अंगावर प्यालें कीं लागलेंच ओकतें, त्याला कोहळ्याचा रस, तूप, मध व पंचकोलाचें चूर्ण हें एकत्र करून चाटवावें. पंचकोल म्हणजे पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक व नागरमोथे ह्यांना पंचकोल म्हणतात.

तहानेवर.

ह्रीबेरशर्कराक्षौद्रं लीढं तृष्णाहरं परम् ।

वाळ्याचें चूर्ण मध व खडीसाखरेशीं द्यावें. तें तहान घालविण्याविषयीं फार उत्तम आहे.

आनाह व शूल ह्यांजवर.

घृतेन सिन्धुविश्वैलाहिंगुभांर्गीरजो लिहन् ।
आनाहं वातिकं शूलं हन्यात्तोयेन वा शिशोः ॥ १ ॥

सैंधेलोण, सुंठ, वेलदोडे, हिंग व भारंगमूळ ह्यांचें चूर्ण तुपाशीं अथवा पाण्याशीं चाटवावें. तें आनाह व वातजन्य शूळ ह्यांचा नाश करितें.

रेचन.

पिष्ट्वा गन्धर्वबीजानि त्वाखुविण्निम्बुवारिणा ।
नाभौ गुदे वा लेपेन शिशूनां रेचनं परम् ॥ १ ॥

एरंड्याच्या बिया व उंदराच्या लेंड्या लिंबाच्या रसांत वाटून त्यांचा बेंबीवर व गुदाचे ठिकाणीं लेप करावा. म्हणजे मुलाला उत्तम प्रकारें जुलाब होतात.

इन्दुलोचननेत्राणि शिखिभागं हि योजयेत् ।
तृटिगन्धकमुर्दाडशतपुष्पा विचूर्णिताः ॥ २ ॥
माषद्वयं गवां दुग्धैः सेवयेद्दिनपंचकम् ।
रेचयेन्मृत्तिकां शुद्धां शिशूनां हितमौषधम् ॥ ३ ॥

वेलदोड्याचे दाणे एक भाग, गंधक दोन भाग, मुरदाडशिंगी

दोन भाग आणि बडीशेप तीन भाग ह्या सर्वांचें एके जागीं चूर्ण करून तें रोज दोन मासे प्रमाणें गाईच्या दुधांतून पांच दिवस द्यावें. ह्या योगानें निवळ मातीचे रेच होतात. हें मुलांना फार हितकारक आहे.

मूत्राघातावर.

कणोषणसिताक्षौद्रसूक्ष्मैलासैन्धवैः कृतः ।
मूत्रग्रहे प्रयोक्तव्यः शिशूनां लेह उत्तमः ॥ १ ॥

पिंपळी, मिरें, खडीसाखर, मध, बारीक वेलची आणि सैंधेलोण ह्यांचें लेहासारखें चाटण करावें. तें लहान मुलांच्या मूत्रावरोधावर उत्तम आहे.

कृशत्वावर.

यथा तु दुर्बलो बालः खादन्नपि च वन्हिमान् ।
विदारीकन्दगोधूमयवचूर्णं घृतप्लुतम् ॥ १ ॥
खादयेत्तदनु क्षीरं शृतं समधुशर्करम् ।

ज्या मुलाचा अग्नि प्रदीप्त असून व तें चांगलें खात पीत असूनही रोड (दुर्बळ) होतें, त्याला भुईकोहाळा, गहू व सातू ह्यांचें चूर्ण तुपाशीं खावयास देऊन वर मध व खडीसाखर घालून दूध पिण्यास द्यावें.

सौवर्णं सुकृतं चूर्णं कुष्ठं मधु घृतं वचा ॥ २ ॥

सोन्याचें अति सूक्ष्म चूर्ण, कोष्ट, वेखंड, तूप व मध एकत्र करून चाटवावें.

मत्स्याक्षकः शंखपुष्पी मधुसर्पिः सकाञ्चनम् ।

मत्स्याक्षी (जळपिंपळी), शंखपुष्पी, तूप व मध ह्यांच्या कल्कांत सोन्याचें चूर्ण मिश्र करून द्यावें.

अर्कपुष्पी घृतं क्षौद्रं चूर्णितं कनकं वचा ॥ ३ ॥

सूर्यफुलाचें मूळ, तूप, मध, सोन्याचा चूर व वेखंड हीं एकत्र करून द्यावीं.

सहेमचूर्णं कैडर्यं श्वेतदूर्वा घृतं मधु ।

सोन्याचा चूर, करंजाची साल, पांढऱ्या दूर्वा, तूप व मध हें एकत्र करून चाटवावें.

चत्वारोऽभिहिताः प्राश्या अर्धश्लोकसमापनाः।
कुमाराणां वपुर्मेधाबलपुष्टिकराः स्मृताः॥ ४॥

हे अर्ध्या अर्ध्या श्लोकानें सांगितलेले चार योग मुलाला द्यावे. ते लहान मुलाचें शरीर पुष्ट करून बुद्धि व शक्ति वाढवितात.

लाक्षादि तेल.

लाक्षारससमं तैलं मस्तुन्यथ चतुर्गुणे।
रास्नाचन्दनकुष्ठाब्दवाजिगन्धानिशायुतैः॥ १॥
शताह्वादारुयष्ट्याह्वमूर्वातिक्ताहरेणुभिः।
संसिद्धं ज्वररक्षोघ्नं बलवर्णकरं शिशोः॥ २॥

लाखेच्या काढ्याच्या समान तेल व दह्यावरील पाणी चौपट आणि रास्ना, चंदन, कोष्ट, नागरमोथे, अश्वगंध, हळद, बडीशेप, देवदार, ज्येष्टमध, मोरवेल, कुटकी व रेणुकबीज ह्यांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें. तें मुलांची ग्रहबाधा व ज्वर ह्यांचा नाश करितें आणि शक्ति व कांति वाढवितें.

अश्वगंधादि घृत.

पादकल्केऽश्वगन्धायाः क्षीरेऽष्टगुणिते पचेत्।
घृतं देयं कुमाराणां पुष्टिकृद्बलवर्धनम्॥ १॥

तुपाच्या चवथाई अश्वगंधाचा कल्क व तुपाच्या आठपट दूध घालून तूप पचन करावें. तें बालकाला द्यावें. तें त्याला पुष्ट करितें व शक्ति आणितें.

सप्तच्छदार्कच्छदनक्तमालमूलैस्तुरंगारिजटासमेतैः।
उत्सादिताङ्गः पशुमूत्रपिष्टैर्हीबेरमुण्डीसलिलाभिषिक्तः॥ १॥
दिने दिने याति शिशुः प्रवृद्धिं पतिः क्षपाणामिव शुक्लपक्षे।

सातवीण, सूर्यफूल, करंज व कणेर ह्यांच्या मुळ्यांचें चूर्ण करून तें गोमूत्रांत वाटून मुलाच्या अंगास लावावें. आणि वाळा व गोरखमुंडी हीं औषधें टाकून तापविलेल्या पाण्यानें त्याला स्नान घालावें. म्हणजे चंद्र जसा शुक्ल पक्षांत वाढत जातो, त्याप्रमाणें तें मूल वाढतें म्हणजे पुष्ट होतें.

सुजेवर.

मुस्तकूष्माण्डबीजानि भद्रदारुकलिंगकान्।
पिष्ट्वा तोयेन संलिम्पेल्लेपोऽयं शोथहृच्छिशोः॥ १॥

नागरमोथे, कोहळ्याच्या बिया, देवदार व इंद्रजव हीं औषधें पाण्यांत वाटून त्यांचा मुलाच्या सुजेवर लेप करावा; तो मुलाच्या सूजेचा नाश करितो.

बेंबीच्या सुजेवर.

मृत्पिण्डेनाग्नितप्तेन क्षीरसिक्तेन सोष्मणा।
स्वेदयेदुत्थितां नाभिं शोथस्तेनोपशाम्यति ॥ १ ॥

मातीचें ढेंकूळ विस्तवांत तापवून त्याजवर दूध शिंपून जी वाफ निघेल त्या वाफेनें मुलाची बेंबी शेकावी. म्हणजे बेंबीची सूज शांत होते.

नाभिपाकावर.

नाभिपाके निशालोध्रप्रियंगुमधुकैः शृतम्।
तैलमभ्यञ्जने शस्तमेभिश्चात्रावधूलनम् ॥ १ ॥
दुग्धेन च्छागशकृता नाभिपाकेऽवचूर्णनम्।
त्वक्चूर्णैः क्षीरिणा वाऽपि कुर्याच्चन्दनरेणुना ॥ २ ॥

हळद, लोध्र, गव्हला व जेष्टमध ह्यांच्या काढ्यानें व कल्कानें यथाविधि तेल सिद्ध करून तें तेल मुलाची बेंबी पिकली असतां तिजवर लावावें व तिजवर त्याच औषधांचें चूर्ण टाकावें. अथवा शेळीच्या लेंडया दुधांत वाटून लेप करून त्याजवर वड, पिंपळ वगैरे क्षीरी वृक्षांच्या सालींचें चूर्ण टाकावें. अथवा चंदनाचें चूर्ण तिजवर टाकावें.

गुदपाकावर.

गुदपाके तु बालानां पित्तघ्नीं कारयेत्क्रियाम्।
रसांजनं विशेषेण पानलेपनयोर्हितम्।

बालकांच्या गुदपाकावर पित्तनाशक क्रिया करावी. विशेषतः पिण्याला व लेप करण्याला रसांजन द्यावें. तें हितकारक आहे.

शंखयष्ट्यञ्जनैश्चूर्णं शिशूनां गुदपाकनुत् ॥ १ ॥

शंख, जेष्टमध व रसांजन ह्यांचें चूर्ण बालकांच्या गुदपाकाचा नाश करितें.

अहिपूतनकावर.

शंखसौवीरयष्ट्याह्वैर्लेपो देयोऽहिपूतने ॥ १ ॥

शंख, सुरमा व जेष्टमध ह्यांचा अहिपूतनावर लेप करावा.

पारिगर्भकावर.

पारिगर्भिकरोगे तु युज्यते वह्निदीपनम्।

पारिगर्भकावर अग्निदीपक औषधांची योजना करितात.

व्रण, विसर्प, फोड व ज्वर ह्यांजवर.

पटोलत्रिफलारिष्टहरिद्राक्वथितं पिबेत्
क्षतवीसर्पविस्फोटज्वराणां शान्तये शिशोः ॥ १ ॥

कडू पडवळ, त्रिफळा, कडू लिंब व हळद ह्यांचा काढा मुलांचे व्रण, विसर्प, विस्फोट व ज्वर शांत होण्याकरितां प्यावा.

शिबें, खरूज व विचर्चिका ह्यांजवर.

गृहधूमनिशाकुष्ठराजिकेन्द्रयवैः शिशोः।
लेपस्तक्रेण हन्त्याशु सिध्मपामाविचर्चिकाः ॥ १ ॥

घरोसा, हळद, कोष्ट, मोहऱ्या व इंद्रजव ह्यांचा ताकांतून लेप करावा. तो मुलांच्या शिब्याचा, खरजेचा व विचर्चिकेचा त्वरित नाश करितो.

मुखस्राव व पाक ह्यांजवर.

सारिवातिललोध्राणां कषायो मधुकस्य च।
संस्राविणि मुखे शस्तो धावनार्थं शिशोः सदा ॥ १ ॥

उपलसरी, तीळ, लोध्र व जेष्टमध ह्यांचा काढा ज्या मुलाच्या तोंडांतून लाळ गळते त्याचें तोंड धुण्याकारितां नेहमीं योजावा.

मुखपाके तु बालानामाम्रसारमयोरसः।
गैरिकं क्षौद्रसंयुक्तं भेषजं सरसाञ्जनम् ॥ २ ॥

बालकांच्या मुखपाकावर आंब्याचा डिंक, मंडूर, सोनकाव व रसांजन हीं औषधें मधांतून लावावीं.

दार्वीयष्ट्यऽभयाजातीपत्रक्षौद्रैस्तु धावनम्।
अश्वत्थत्वग्दलक्षौद्रैर्मुखपाके प्रलेपनम् ॥ ३ ॥

दारुहळद, जेष्टमध, हिरडेदळ व जाईचीं पानें ह्यांच्या काढ्यानें तोंड धुवावें, व पिंपळाची साल व पानें मधांत वाटून मुखपाकावर लावावीं.

रडण्यावर.

पिप्पलीत्रिफलाचूर्णं घृतक्षौद्रपरिप्लुतम् ।
बालो रोदिति यस्तस्मै लेढुं दद्यात्सुखावहम् ॥ १ ॥

पिंपळी व त्रिफळा ह्यांचें चूर्ण, जें मूल रडतें त्याला तूप व मध यांतून चाटवावें. तें सुखावह आहे.

तालुकंटकावर.

हरीतकीवचाकुष्ठकल्कं माक्षिकसंयुतम् ।
पीत्वा कुमारः स्तन्येन मुच्यते तालुकण्टकात् ॥ १ ॥

बाळहिरडे, वेखंड व कोष्ट ह्यांचें चूर्ण मधांत कालवून अंगावरच्या दुधांतून मुलास पाजावें. म्हणजे मूल तालुकंटकापासून मुक्त होतें.

तालुपाकावर.

तालुपाके यवक्षारमधुभ्यां प्रतिसारणम् ॥ १ ॥

तालुपाकावर जवखार मधांतून घासावा.

कुकुणकावर.

फलत्रिकं लोध्रपुनर्नवे च सशृङ्गबेरं बृहतीद्वयं च ।
आलेपनं श्लेष्महरं सुखोष्णं कुकूणके कार्यमुदाहरन्ति १

त्रिफळा, लोध्र, पुनर्नवा, आलें, रिंगणमूळ, डोरलीमूळ, ह्यांचा सुखोष्ण असा लेप कुकुणकावर करावा. तो कफनाशक आहे.

डोळ्यावर.

व्योषं सभृङ्गं च मनःशिलालं करञ्जबीजं च सुपिष्टमेतत् ।
कण्डूवर्दितानामथ वर्त्मनां तु श्रेष्ठं शिशूनां नयने विदध्यात् १

सुंठ, मिरें, पिपळी, माका, मनशीळ, हरताळ व करंजाचें बी, ह्यांचें बारीक चूर्ण ज्यांच्या पापण्या खाजतात, अशा मुलांच्या डोळ्यांत घालावें.

दांत बाहेर पडण्याच्या विकारावर.

दन्तपालीं तु मधुना चूर्णेन प्रतिसारयेत् ।
धातकीपुष्पपिप्पल्योर्धात्रीफलरसेन वा ॥ १ ॥

धायटीचीं फुलें व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून तें मधांतून अथवा आवळ्याच्या रसांतून मुलांच्या दांताच्या हिरड्यांस घासावें.

दन्तोत्थानभवा रोगाः पीडयन्ति च बालकम् ।
जाते दन्ते हि शाम्यन्ति यतस्तद्धेतुका गदाः ॥ २ ॥

दांत येण्यामुळें होणारे रोग बालकांना फार पीडा देतात. ते ज्या अर्थी दांत येण्यामुळेंच होतात, त्या अर्थी ते दांत आल्यावर शांत होतात.

प्राचीगतं पाण्डुरसिन्दुवारमूलं शिशूनां गलके निबद्धम् ।
हिनोति दन्तोद्भववेदनां च निःशेषमेकाण्डकुरण्ड एव ॥ ३ ॥

पांढऱ्या निर्गुडीचें पूर्व बाजूचें मूळ विधियुक्त आणून मुलाच्या गळ्यांत बांधावें; तें दांत येण्यासंबंधीं सर्व विकारांचा नाश करितें. मुलाचें एकच अंड फुगतें त्याचा व कुरंटरोगाचाही तें नाश करितें.

यस्ताम्रचूडविहंगोभयपार्श्वपक्ष-
पुच्छैर्गवाज्यसहितैः कृतधूपनाङ्गः ।
आरभ्य जन्मदिवसाद्दिनसप्तकं हि
बालस्य तस्य न कुतश्चन भीतिरस्ति ॥ ४ ॥

कोंबड्याच्या दोन्ही बाजूंच्या पंखाचीं पिसें व गाईचें तूप ह्यांची धुरी मूल जन्मल्या दिवसापासून सात दिवसपर्यंत त्याच्या सर्व अंगाला द्यावी. म्हणजे त्या मुलाला कोठें कशाचीही (ग्रहांची वगैरे) भीति नसते.

सामान्य ग्रहबाधेची चिकित्सा.

सहामुण्डीनिकोदीच्यकाथस्नानं ग्रहापहम् ।

शेवती, मुंडी व वाळा ह्यांच्या काढ्यानें मुलास स्नान घालावें. तें ग्रहबाधेचा नाश करितें.

सप्तच्छदाभयानिशाचन्दनैश्चानुलेपनम् ॥ १ ॥

सातवीण, हिरडा, हळद व चंदन ह्यांचा अंगास लेप करावा.

धुरी.

सर्पत्वग्लशुनं मूर्वा सर्षपारिष्टपल्लवाः ।
बिडालविडजालोममेषशृङ्गीवचा मधु ॥
धूपः शिशोर्ज्वरघ्नोऽयमशेषग्रहनाशनः ॥ १ ॥

सापाची कात, लसूण, मोरवेल, मोहऱ्या, कडुलिंबाचीं पानें, मांजराची विष्ठा, शेळीचे केस, मेढशिंगी, वेखंड व मध ह्यांची धुरी बालकाचा ज्वर व सर्व प्रकारची ग्रहबाधा ह्यांचा नाश करिते.

बालरोगावर पर्पटीरस.

रसं गन्धं समं शुद्धं तयोः कृत्वा तु कज्जलीम् ।
लोहदर्व्यां घृताक्तायामाधाय कदलीदलैः ॥ १ ॥
छादयेदुपरिन्यस्तगोमयैर्बदरीन्धनात् ।
शिखिनः कोमलादेव विधेया रसपर्पटी ॥ २ ॥
पर्पट्या द्विगुणो जीरः सूर्यांशो रामठः स्मृतः ।
दीयते मधुना तेषां शिशोर्गुञ्जाचतुष्टयम् ॥ ३ ॥
श्लेष्मपित्तानिलश्वासकासपीनसपाण्डुताः ।
प्लीहाग्निसादशूलानि हन्यादस्य ज्वरं जवात् ॥ ४ ॥

शुद्ध पारा व शुद्ध गंधक समभाग घेऊन त्यांची कज्जली करून लोखंडाच्या पळींत थोडें तूप घालून त्यांत ती कज्जली घालून ती पातळ होतांच केळीच्या पानांवर ओतावी; आणि वर दुसरें पान घालून त्यावर गाईचें शेण दडपावें. ही पर्पटी बोरीच्या लाकडाच्या निखाऱ्यावर मंदाग्नीनें तयार करावी. नंतर त्या पर्पटीच्या दुप्पट जिरें व बारावा हिस्सा हिंग तिजमध्यें मिसळून मुलाला चार गुंजा-पर्यंत मधांतून द्यावी. ती कफ, पित्त, वात, श्वास, खोकला, पीनस, पांडुरोग, पांथरी, अग्निमांद्य, शूळ व ज्वर ह्या रोगांचा त्वरित नाश करिते.

अष्टमंगल घृत.

वचा कुष्टं तथा ब्राह्मी सिद्धार्थकमथापि च ।
सारिवा सैन्धवं चैव पिप्पली घृतमष्टकम् ॥ १ ॥
सिद्धं घृतमिदं मेध्यं पिबेत्प्रातर्दिने दिने ।
दृढस्मृतिः क्षिप्रमेधाः कुमारो बुद्धिमान्भवेत् ॥ २ ॥
न पिशाचा न रक्षांसि न भूता न च मातरः ।
प्रभवन्ति कुमाराणां पिबतामष्टमङ्गलम् ॥

वेखंड, कोष्ट, ब्राह्मी, मोहऱ्या, उपलसरी, सेंधेलोण, पिंपळी व तूप ह्या औषधांच्या कल्कानें व काढ्यानें विधियुक्त तूप सिद्ध करावें. हें बुद्धिवर्धक आहे. हें रोज प्रातःकाळीं प्यावें. हें स्मरण-शक्तीला दृढ करणारें व बुद्धि तीव्र करणारें आहे. ह्याच्या सेवनानें मुलगा बुद्धिमान् होतो. हें अष्टमंगल घृत सेवन करणाऱ्या मुलाला पिशाच्च, राक्षस, भूत व मातृका (षष्ठीदेवता;–सटवाई) ह्यांची

बाधा होत नाहीं.

बलिशान्तीष्टिकर्माणि कार्याणि ग्रहशान्तये ॥ ३ ॥

बालग्रहाच्या शांतीकरितां बली, शांति, होम वगैरे करावे.

स्कंदग्रहबाधेची चिकित्सा.

स्कन्दग्रहोपसृष्टस्य कुमारस्य प्रशस्यते ।
वातघ्नद्रुमपत्राणां क्वाथेन परिषेचनम् ॥ १ ॥

स्कंदग्रहाची बाधा झालेल्या मुलाला एरंडाच्या पानाच्या काढ्यानें स्नान घालावें.

देवदारुणि रास्नायां मधुरेषु गणेषु च ।
सिद्धं सर्पिश्च सक्षीरं पातुमस्मै प्रदापयेत् ॥ २ ॥

देवदार, रास्ना व मधुर गणांतील औषधें ह्यांनीं सिद्ध केलेलें तूप दुधांतून प्यावयास द्यावें.

सर्षपाः सर्पनिर्मोको वचा काकादनी घृतम् ।
उष्ट्राजाविगवां चापि रोम्णामुद्धूपनं भवेत् ॥ ३ ॥

शिरस, सापाची कात, वेखंड, तांबड्या गुंजेच्या मुळ्या, तूप व उंट, शेळी, मेंढी व गाय ह्यांचे केस ह्यांची धुरी द्यावी.

सोमवल्लीमिन्द्रवृक्षं बृहतीबिल्वजे शमीम् ।
मृगादन्याश्च मूलानि ग्रथितानि विधारयेत् ॥ ४ ॥

सोमवल्ली (रानशेर), पांढरा कुडा, डोरलीची मुळी, बेलाची मुळी, शमीची मुळी व कवंडळाची मुळी ह्या मुळ्या सुतांत बांधून धारण कराव्या.

रक्तानि माल्यानि तथा पताका रक्तांश्च गन्धान्विविधांश्च भक्ष्यान् ।
घण्टां च देवाय बलिं निवेद्य सकुक्कुटं स्कन्दग्रहाभिधाय ॥ ५ ॥

तांबडीं फुलें, तांबड्या पताका, तांबडें गंध, नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ यांचा घंटा व कोंबडा ह्यांसह स्कंददेवाला बळी निवेदन करावा.

स्नानं त्रिरात्रं निशि चत्वरेषु कुर्यात्परं शान्तिपदैर्निवेद्य ।
गायत्रिपूताभिरथाद्भिरग्निं प्रज्वालयेद्वाऽऽहुतिभिश्च धीमान् ॥६॥

तीन दिवस स्नान घालावें, व चवथे दिवशीं नैवेद्य देऊन शांति करावी. गायत्री मंत्रानें मंतरलेलें पाणी अंगावर शिंपावें. व अग्नि प्रज्वलित करून आहुति देऊन होम करावा.

रक्षामतः प्रवक्ष्यामि बालानां पापनाशिनीम् ।
अहन्यहनि कर्तव्या याभिरद्भिरतन्द्रितैः ॥ ७ ॥

बालकाची पीडा नाश करणारी अशी रक्षा (ग्रहस्तुति) आतां सांगतों. ती प्रतिदिवशीं वैद्यानें स्मरणपूर्वक करावी.

तपसां तेजसां चैव यशसां वपुषां तथा ।
निधानं योऽव्ययो देवः स ते स्कन्दः प्रसीदतु ॥ ८ ॥
ग्रहसेनापतिर्देवो देवसेनापतिर्विभुः
देवसेनारिपुहरः पातु त्वां भगवान्गुहः ॥ ९ ॥
देवदेवस्य महतः पावकस्य च यः सुतः ।
गङ्गोमाकृत्तिकानां च स ते शर्म प्रयच्छतु ॥ १० ॥
रक्तमाल्याम्बरधरो रक्तचन्दनभूषितः ।
रक्तदिव्यवपुर्देवः पातु त्वां क्रौञ्चसूदनः ॥ ११ ॥

तप, तेज, यश व शरीर ह्यांचें स्थान असा जो स्कंद देव तो तुजवर प्रसन्न असो. ग्रहसेनापति, देवसेनापति व देवसेनेच्या शत्रूचा नाश करणारा असा जो प्रभु देव भगवान गुह (स्कंद) तो तुझें रक्षण करो. देवाचाही देव असा जो महापावक (अग्नि) त्याचा आणि गंगा, उमा व कृत्तिका ह्यांचा मुलगा (असा जो स्कंद) तो तुला सुख देवो. तांबडीं फुलें व तांबडीं वस्त्रें धारण करणारा, तांबडें गंध लावून शरीर भूषित करणारा, आरक्तवर्ण व दिव्य शरीर आहे ज्याचें, असा हा क्रौंचासुराचा वध करणारा स्कंददेव तुझें रक्षण करो.

स्कंदापस्माराची चिकित्सा.

बिल्वः शिरीषो गोलोमी सुरसादिश्च यो गणः ।
परिषेके प्रयोक्तव्यः स्कन्दापस्मारशान्तये ॥ १ ॥

बेल, शिरसवृक्ष, पाथरी आणि सुरसादि गणांतील औषधें ह्यांचा काढा करून त्यानें स्कंदापस्मार ग्रहाची पीडा शांत होण्याकरितां मुलास स्नान घालावें.

सुरसादि गण.

सुरसा श्वेतसुरसा पाठा फञ्जी फणिज्झकः ।

---

१ मूळांत 'अद्भिः' ह्या ठिकाणीं 'भिषग्भिः' असें पाठांतर आहे, त्याप्रमाणें अर्थ केला आहे.

सौगन्धिकं भूस्तृणकं राजिका श्वेतबर्बरी ॥ २ ॥
कट्फलं खरपुष्पा च कासमर्दश्च शल्लकी ।
विडङ्गमथ निर्गुण्डी कर्णिकार उदुम्बरः ॥ ३ ॥
बला च काकमाची च तथा च विषमुष्टिका ॥ ४ ॥
कफक्रिमिहरः ख्यातः सुरसादिरयं गणः ।
अष्टमूत्रे विपक्कं च तैलमभ्यञ्जने हितम् ॥ ५ ॥

तुळस, पांढरी तुळस, पहाडमूळ, फांज, पांढरा मरवा, रोहिस गवत, पाणल्व्हाळा, मोहरी, पांढरी रानतुळस, कायफळ, रानतुळस, कासविंदा, साळईचा वृक्ष, वावडिंग, निर्गुडी, बाहवा, उंबर, चिकणा, कांगोणी व कुचला ह्याला सुरसादि गण म्हणतात. हा कफ व कृमि ह्यांचा नाश करितो. ह्या गणांतील औषधें व आठ प्रकारचीं गोमूत्रें ह्यांमध्यें तेल सिद्ध करून तें अंगास लावावें.

मूत्राष्टक.

गोजाविमहिषाश्वानां खरोष्ट्रकरिणां तथा ।
मूत्राष्टकमिति ख्यातं सर्वशास्त्रेषु संमतम् ॥ १ ॥

गाय, शेळी, मेंढी, म्हैस, घोडी, गाढव, उंट व हत्ती ह्या आठ जनावरांच्या मूत्रांना मूत्राष्टक असें म्हणतात. हें सर्व शास्त्रांना संमत आहे.

क्षीरिवृक्षकषायेण काकोल्यादिगणेन च ।
विपक्कव्यं घृतं पश्चाद्दातव्यं पयसा सह ॥ २ ॥

क्षीरी वृक्षांच्या सालींचा काढा व काकोल्यादि गण ह्या औषधांनीं तूप पचन करावें आणि तें दुधांतून द्यावें.

काकोल्यादि गण.

काकोली क्षीरकाकोली जीवको ऋषभस्तथा ।
ऋद्धिर्वृद्धिस्तथा मेदा महामेदा गुडूचिका ॥ १ ॥
मुद्गपर्णी माषपर्णी पद्मकं वंशरोचना ।
शृङ्गी प्रपौण्डरीकं च जीवन्ती मधुयष्टिका ॥ २ ॥
द्राक्षा चेति गणो नाम्ना काकोल्यादिरुदीरितः ।
स्तन्यकृद् बृंहणो वृष्यः पित्तरक्तानिलापहः ॥ ३ ॥

काकोली, क्षीरकाकोली, जीवक, ऋषभक, ऋद्धि, वृद्धि, मेदा, महामेदा, गुळवेल, रानमूग, रानउडीद, पद्मकाष्ठ, वंशलोचन,

काकडशिंगी, पुंडरीकवृक्ष, जीवंती, जेष्टमध व द्राक्षें ह्या गणाला काकोल्यादि गण म्हणतात. हा दूध उत्पन्न करणारा, पौष्टिक व वृष्य असून, पित्त, रक्त व वात ह्यांचा नाश करणारा आहे.

उत्सादनं वचाहिंगुयुक्तमत्र प्रकीर्तितम् ।
गृध्रोलूकपुरीषाणि केशा हस्तिनखो घृतम् ॥ १ ॥
वृषभस्य च रोमाणि योज्यान्युद्धूपने सदा ।

वेखंड व हिंग ह्यांची अंगास उटी लावावी. गिधाड व घुबड ह्यांची विष्ठा, केस (गुंतवळ), हत्तीचीं नखें, तूप व बैलाचे केस, ह्यांची धुरी द्यावी.

अनन्ताकुक्कुटीबिम्बीमर्कटाश्चापि धारयेत् ॥ २ ॥

धमासा, शेवरी, तोंडली आणि कुहिली ह्यांच्या मुळ्या धारण कराव्या.

पक्वान्यामानि मांसानि प्रसन्नं रुधिरं पयः ।
भूतौदनं निवेद्याथ स्कन्दापस्मारिणं वटे ॥ ३ ॥

पक्व व अपक्व मांस, स्वच्छ रक्त, दूध व दहीं (किंवा दहीं-भात) ह्यांचा बळी वडाच्या झाडाखालीं द्यावा.

चतुष्पथे कारयेच्च स्नानं तेन ततः पठेत् ।

त्या बालकाला चवाठ्यावर स्नान घालून पुढील मंत्र म्हणावा.

स्कन्दापस्मारसंज्ञो यः स्कन्दस्य दयितः सखा ।
विशाखः स शिशोरस्य शिवायास्तु शुभाननः ॥ ४ ॥

स्कंदाचा जो प्रिय सखा, ज्याला स्कंदापस्मार हें नांव आहे, तो शुभानन विशाख (हेंही त्याचें नांवच आहे.) ह्या बालकाचें कल्याण करो.

शकुनि ग्रहाच्या बाधेची चिकित्सा.

शकुनीग्रहजुष्टस्य कार्यं वैद्येन जानता ।
वेतसाम्रकपित्थानां क्वाथेन परिषेचनम् ॥ १ ॥

शकुनी ग्रहाची बाधा झालेल्या मुलाला वेत, आंबा व कवठ ह्यांच्या सालीच्या काढ्यानें स्नान घालावें.

ह्रीबेरमधुकोशीरसारिवोत्पलपद्मकैः ।
लोध्रप्रियंगुमञ्जिष्ठागैरिकैः प्रदिहेच्छिशुम् ॥ २ ॥

वाळा, जेष्टमध, काळा वाळा, उपळसरी, निळें कमळ, पद्म-काष्ट, लोध्र, गव्हला, मंजिष्ट व सोनकाव ह्या औषधींचा मुलाच्या अंगास लेप करावा.

स्कन्दग्रहोक्तधूपाश्च हिता अत्र भवन्ति हि।
स्कन्दापस्मारशमनं घृतमत्रापि पूजितम्॥ ३ ॥

स्कंद ग्रहाच्या चिकित्साप्रकरणांत जी धुरी सांगितली आहे, तीच ह्या ग्रहाच्या बाधेंतही द्यावी; आणि स्कंदापस्माराच्या शमनार्थ जें तूप सांगितलें आहे, तेंच ह्या ठिकाणीं योजावें.

शतावरीमृगेर्वारुनागदन्तीनिदिग्धिकाः।
लक्ष्मणां सहदेवीं च बृहतीं चापि धारयेत्॥ ४ ॥

शतावरी, घोडेवृंदावन, नागाळी, रिंगणी, लक्ष्मणा (पांढरी रिंगणी) सहदेवी व डोरली ह्यांच्या मुळ्या धारण कराव्या.

तिलतण्डुलकं माला हरितालं मनःशिला।
बलिरेषां करंजे तु निवेद्यो नियतात्मना॥ ५ ॥

व्रतस्थ राहून तीळ, तांदूळ, फुलांच्या माळा, हरताळ व मनशीळ ह्यांचा करंजाच्या झाडाखालीं बळी द्यावा.

निकुम्भोक्तेन विधिना स्नापयेत्तं ततः पठेत्।

निकुंजामध्यें (वेलीच्या मंडपांत किंवा गुहेंत) त्या मुलाला स्नान घालून पुढील मंत्र म्हणावा.

अन्तरिक्षचरा देवी सर्वालंकारभूषिता।
अयोमुखी सूक्ष्मतुण्डा शकुनी ते प्रसीदतु॥ ६ ॥
दुर्दर्शना महाकाया पिंगाक्षी भैरवस्वरा।
लम्बोदरी शंकुकर्णी शकुनी ते प्रसीदतु॥ ७ ॥

अंतरिक्षांत संचार करणारी, सर्व अलंकारांनीं विभूषित, अधोमुखी व सूक्ष्मतुंडा अशी देवी शकुनी तुला प्रसन्न असो. दुर्दर्शना, महाकाया, पिंगाक्षी, भैरवस्वरा, लंबोदरी व शंकुकर्णी (ह्या नांवाची) शकुनी देवी तुला प्रसन्न असो.

रेवती ग्रहबाधेची चिकित्सा.

अश्वगन्धाऽजशृंगी च सारिवाऽथ पुनर्नवा।

१. मूळांतील 'निकुंभोक्तेन' ह्या ठिकाणीं 'निकुंजे च' असें पाठांतर आहे, तें बरोबर दिसल्यावरून त्याप्रमाणें अर्थ दिला आहे.

सहा विदारी होतासां क्वाथेन परिषेचनम् ॥ १ ॥

अश्वगंध, मेढशिंगी, उपळसरी, पुनर्नवा, शेवती व भुईकोहळा, ह्यांचा काढा त्या मुलाच्या अंगावर शिंपावा (स्नान घालावें).

तैलमभ्यञ्जने कार्यं कुष्ठे सर्जरसे तथा ।
पलंकषाया नलदे तथा गौरकदम्बके ॥ २ ॥

कोष्ट, राळ, गुग्गुळ, जटामांसी व पांढरा कदंब ह्यांच्या काढ्यानें व कल्कानें तेल सिद्ध करावें व तें अंगास लावावें.

धवाश्वकर्णककुभशल्लकीतिन्दुकेषु च ।
काकोल्यादिगणे वापि सिद्धं सर्पिः पिबेच्छिशुः ॥ ३ ॥

धावडा, राळेचा वृक्ष, अर्जुनसादडा, साळईचा वृक्ष व टेंभुरणी ह्या औषधांनीं किंवा काकोल्यादि गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें तूप मुलास पाजावें.

कुलित्थाः शंखचूर्णं च प्रदेहः पूर्वगन्धिकः ।

हुलगे, शंखाचें चूर्ण व सर्वगंध[1] ह्यांची अंगास उटी लावावी.

गृध्रोलूकपुरीषाणि यवान्यवफलो घृतम् ॥ ४ ॥
संध्ययोरुभयोः कार्यमेतदुद्धूपनं शिशोः ।

गिधाड व घुबड ह्यांची विष्ठा, सातु, वेळूचें बी व तूप ह्यांची, सकाळ संध्याकाळ मुलास धुरी द्यावी.[2]

रेवतीग्रहाची चिकित्सा.

शुक्ला सुमनसो लाजाः पयः शाल्योदनं दधि ॥ ५ ॥
बलिर्निवेद्यो गोतीर्थे रेवत्यै प्रयतात्मना ।
स्नानं धात्रीकुमाराभ्यां संगमे कारयेद्भिषक् ॥ ६ ॥

पांढरीं फुलें, लाह्या, दूध, भात व दही ह्यांचा रेवती ग्रहाला, गाई येण्याजाण्याच्या रस्त्यावर (गोतीर्थाचे ठिकाणीं) बली द्यावा. आणि दाई व मूल ह्यांना संगमावर स्नान घालावें.

नानाशस्त्रधरा देवी चित्रमाल्यानुलेपना ।
चलत्कुण्डलिनी श्यामा रेवती ते प्रसीदतु ॥ ७ ॥

---

१ 'पूर्वगंधिकः' ह्या ठिकाणीं 'सर्वगंधिकः' असें पाठांतर आहे. त्याला धरून अर्थ दिला आहे.

२ वायवर्णा, कडुलिंब, पांढरा एरंड, आपटा किंवा पुत्रजीववृक्ष ह्यांचें धारण करावें. (हा मजकूर अवश्य वाटल्यावरून सुश्रुतांतून घेतला आहे.)

अनेक शस्त्रें धारण करणारी, चित्रविचित्र फुलें व गंध अंगास लेपन करणारी, व जिच्या कानांतील कुंडलें हालत आहेत अशी श्यामवर्ण देवी रेवती तुला प्रसन्न असो. (हा मंत्र म्हणावा.)

उपासते यां सततं देव्यो विविधभूषणाः ।
लम्बा कराला विनता तथैव बहुपुत्रिका ॥
रेवती शुष्कनासा च तुभ्यं देवी प्रसीदतु ॥ ८ ॥

अनेक प्रकारचीं भूषणें धारण करणाऱ्या लंबा, कराला, विनता, व त्याचप्रमाणें बहुपुत्रिका ह्या देवी जिची सतत उपासना करतात ती शुष्कनासा रेवती देवी तुला प्रसन्न होवो. (हा मंत्र म्हणावा.)

पूतना ग्रहबाधेची चिकित्सा.

कपोतवङ्का स्योनाको वरुणः पारिभद्रकः ।
आस्फोता चैव योज्याः स्युर्बालानां परिषेचने ॥ १ ॥

ब्राम्ही, दिंडा, वायवर्णा, लिंब, व पांढरी गोकर्णी ह्या औषधांच्या काढ्यानें मुलास स्नान घालावें (काढा अंगावर शिंपावा.)

नवा पयस्या गोलोमी हरितालं मनःशिला ।
कुष्ठं सर्जरसश्चैव तैलार्थे कल्क इष्यते ॥ २ ॥

वेखंड, दुधी, पाथरी, हरताळ, मनशीळ, कोष्ट व राळ ह्यांच्या कल्कानें तेल सिद्ध करून तें अंगास लावण्यास योजावें.

हितं घृतं तुगाक्षीर्या संसिद्धं मधुनाऽपि च ।
कुष्ठतालीसखदिराः स्यन्दनोऽर्जुन एव च ॥ ३ ॥

वंशलोचन व मध ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप मुलास पाजण्यास हितकारक आहे.

पनसः ककुभश्चापि मज्जानो बदरस्य च ।
कुक्कुटास्थि घृतं चापि धूपनं सह सर्षपैः ॥ ४ ॥

कोष्ट, तालीसपत्र, खैर, टेंभुरणी, चंदन, फणस, अर्जुनसादडा, बोरांतील बिया, कोंबड्याचीं हाडें, मोहऱ्या व तूप ह्यांची धुरी द्यावी.

काकादनीं चित्रफलां बिम्बीं गुञ्जां च धारयेत् ।

१. 'नानाशस्त्र' ह्या ठिकाणीं 'नानावस्त्र' असें पाठांतर आहे.

२. मूळांत 'नवा' ह्या ठिकाणीं 'वचा' हें पाठांतर आहे. तें योग्य दिसल्यावरून त्याला धरून अर्थ केला आहे.

माकडांगोणी, शिवलिंगी, तोंडली व गुंजा ह्यांचें धारण करावें.

मत्स्यौदनं बलिं दद्यात्कृशरां पललं तथा ॥ ५ ॥
शरावसंपुटे कृत्वा तस्यै शून्ये गृहे भिषक् ।

मासे घालून केलेला भात, खिचडी व मांस ह्यांचा पूतनेला ओस घरामध्यें परळांतून बळी द्यावा.

उत्सृष्टान्नाभिषिक्तस्य शिशोः स्नपनमिष्यते ॥ ६ ॥

देवाला अभिषेक केलेल्या पाण्यानें मुलाला स्नान घालावें.

कुष्ठतालीसखदिरं चन्दनं स्यन्दनं तथा ।
देवदारु वचा हिंगु कुष्ठं गिरिकदम्बकः ॥
एला हरेणवश्चापि योज्या उद्धूपने सदा ॥ ७ ॥

कोष्ट, तालीसपत्र, खैर, चंदन, टेंभुरणी, देवदार, वेखंड, हिंग, कोष्ट, गिरिकदंब, वेलदोडे व रेणुकबीज ह्यांची धुरी द्यावी.

मलिनाम्बरसंवीता मलिना रूक्षमूर्धजा ।
शून्यागाराश्रया देवी दारकं पातु पूतना ॥ ८ ॥

मलीन वस्त्र धारण करणारी व जिचें मस्तक मलिन, रुक्ष आहे अशी ओस घरांत वास करणारी पूतनादेवी मुलाचें रक्षण करो.

गंधपूतनाग्रहबाधेची चिकित्सा.

तिक्तद्रुमाणां पत्रेषु क्वाथः कार्योऽभिषेचने ॥ १ ॥

कडु वनस्पतींच्या पानांचा काढा मुलाला स्नान घालण्याकरितां (अंगावर शिंपडण्याकरितां) द्यावा.

पंचतिक्तक गण.

बिल्वः पटोलः क्षुद्रा च गुडूची वासकस्तथा ।
विसर्पकुष्ठनुत्ख्यातो गणोऽयं पञ्चतिक्तकः ॥ १ ॥

बेल, पडवळ (कडु पडवळ), रिंगणी, गुळवेल, व अडुळसा ह्या पांच औषधींला पंचतिक्तक गण असें म्हणतात. हा विसर्प व कुष्ट ह्यांचा नाश करितो.

पिप्पली पिप्पलीमूलं वर्गो मधुरकोऽपि च ।
शालिपर्णीबृहत्यौ च घृतार्थं समाहरेत् ॥ २ ॥

---

१. "उत्सृष्टान्नाभिषिक्तस्य" ह्या ठिकाणीं "उच्छिष्टेनाभिषेकेण" असा पाठ आहे, त्याप्रमाणें अर्थ दिला आहे.

पिंपळी, पिंपळमूळ, मधुर वर्गांतील औषधें, साळवण, डोरलीमूळ व रिंगणमूळ हीं औषधें समभाग घेऊन त्यांमध्यें यथाविधि तूप सिद्ध करावें, व तें मुलास पाजावें.

सर्वगन्धैः प्रदेहश्च गात्रे चाक्ष्णोश्च शीतलैः ।

सर्वगंधाचा[१] (सर्व सुगंधी द्रव्यांचा) अंगास लेप करावा, आणि शीतळ औषधांचा डोळ्यास लेप करावा.

पुरीषं कौक्कुटं केशाश्चर्म सर्पभवं तथा ॥ ३ ॥
जीर्णं च वीक्ष्याधोवासो धूपनायोपकल्पयेत् ।

कोंबड्याची विष्ठा, केस, सापाची कात व जुन्या घोंगड्याचा तुकडा ह्यांची धुरी द्यावी.

कुक्कुटीं मर्कटीं बिम्बीमनन्तां चापि धारयेत् ॥ ४ ॥

देवडांगरी, करंज, तोंडली व उपलसरी ह्यांचें धारण करावें.

मांसमन्नं तथा पक्कं शोणितं च चतुष्पथे ।
निवेद्यमन्तश्च गृहे शिशोः स्नपनमिष्यते ॥ ५ ॥

मांस, पक्क अन्न व रक्त ह्यांचा चवाठ्यावर बळी द्यावा. आणि मुलाला अंतर्गृहांत (माजघरांत) स्नान घालावें.

कराला पिङ्गला मुण्डा काषायाम्बरसंवृता ।
देवी बालमिमं प्रीता रक्षताद्गन्धपूतना ॥ ६ ॥

कराला, पिंगला, मुंडा, कषायांबरसंवृता व प्रीता (ह्या नांवाची) देवी गंधपूतना हें बालक रक्षण करो.

शीतपूतना ग्रहाची चिकित्सा.

गोमूत्रं बस्तमूत्रं च मुस्तामसरदारु च ।
कुष्ठं च सर्वगन्धांश्च तैलार्थमवचारयेत् ॥ १ ॥

गोमूत्र, शेळीचें मूत, नागरमोथे, देवदार, कोष्ठ व सर्वगंध हीं द्रव्यें तेल सिद्ध करण्याकरितां घ्यावीं.

रोहिणीनिम्बखदिरपलाशककुभत्वचः ।
निष्क्वाथ्य तस्मिन्निष्काथे सक्षीरे विपचेद् घृतम् ॥ २ ॥

कुटकी, कडुनिंब, खैर, पळस व अर्जुनसादडा ह्यांच्या सालींचा काढा करून तो काढा व दूध ह्यांमध्यें तूप पचन करावें.

---

१. केशर, कृष्णागर, कापूर, कस्तुरी आणि चंदन ह्या औषधींना सर्वगंध असें म्हणतात.

गृध्रोलूकपुरीषाणि वस्तगन्धामहित्वचम् ।
निंबपत्राणि च तथा धूपनार्थं समाहरेत् ॥ ३ ॥

गिधाड व घुबड ह्यांची विष्ठा, तिळवळ, सापाची कात व कडूनिंबाचीं पानें यांची धुरी द्यावी.

धारयेदपि गुञ्जां च बलां काकादनीं तथा ।

गुंजा, चिकणा व मालकांगोणी ह्या वनस्पती धारण कराव्या.

नद्यां मुद्गौदनैश्चापि तर्पयेच्छीतपूतनाम् ॥ ४ ॥
जलाशयान्ते बालस्य स्नपनं चोपदिश्यते ।

मुगाच्या अन्नाचा (डाळीच्या खिचडीचा) शीतपूतनेला बळी द्यावा. आणि जलाशयाच्या कांठीं मुलाला स्नान घालावें.

देव्यै देयश्चोपहारो वारुणी रुधिरं तथा ॥ ५ ॥

मद्य व रक्त ह्यांचा शीतपूतनेला उपहार द्यावा.

मुद्गौदनाशिनी देवी सुराशोणितपायिनी ।
जलाशयरता नित्यं पातु त्वां शीतपूतना ॥ ६ ॥

मुगाचें अन्न खाणारी, मद्य व रक्त प्राशन करणारी व जलाशयांची आवड असणारी देवी शीतपूतना नित्य तुझें रक्षण करो.

मुखमंडनिकाचिकित्सा.

कपित्थबिल्वतर्कारीवासागन्धर्वहस्तकाः ।
कुबेराक्षी च योज्यास्तु बालानां परिषेचने ॥ १ ॥

कवठ, बेल, टाकळी, अडुळसा, एरंड व गजग्याची वेल ह्यांचा काढा अंगावर शिंपण्याकरितां योजावा (काढ्यानें स्नान घालावें.)

स्वरसैर्भृङ्गवृक्षाणां तथैव हयगन्धया ।
तैलं वचां च संयोज्य पचेदभ्यञ्जने शिशोः ॥ २ ॥

माक्याचा स्वरस, अश्वगंध व वेखंड ह्या औषधांनीं तेल सिद्ध करावें. तें मुलाच्या अंगास लावण्यास हितकारक आहे.

वचा सर्जरसं कुष्ठं सर्पिश्चोद्धूपने हितम् ।
वर्णकं चूर्णकं माल्यमंजनं पारदं तथा ॥ ३ ॥
मनःशिलां चोपहरेद्गोष्ठमध्ये बलिं ततः ।
पायसं सपुरोडाशं तद् बल्यर्थमुपाहरेत् ।
मन्त्रपूताभिरद्भिश्च तत्रैव स्नपनं हितम् ॥ ४ ॥

वेखंड व राळ व तूप ह्यांची धुरी द्यावी, अंगाला लावावयाची

उटी (वर्णक), चुना, फुलें, सुरमा (काजळ), पारा, व मनशीळ ह्यांचा गोठ्यामध्यें बळी द्यावा. ह्याशिवाय दूधपोळी किंवा होम-द्रव्यांतील शेष (पुरोडाश) ह्यांचाही बळी द्यावा; आणि मंतर-लेल्या पाण्यानें गोठ्यांतच मुलाला स्नान घालावें.

पाणी मंतरण्याचा मंत्र.

अलंकृता कामवती सुभगा कामरूपिणी ।
गोष्ठमध्यालयरता पातु त्वां मुखमण्डिका ॥ १ ॥

अलंकृता, कामवती, सुभगा, कामरूपिणी व गोठ्यांत राहणारी अशी मुखमंडिका तुला रक्षण करो. ह्या मंत्रानें पाणी मंत्रून द्यावें.

नैगमेयग्रहबाधेची चिकित्सा.

बिल्वाग्निमन्थपूतीकैः कार्यं स्यात्परिषेचनम् ।

बेल, टाकळी व करंज ह्यांचा काढा मुलाच्या अंगावर शिंपावा. (त्या काढ्यानें स्नान घालावें.)

प्रियंगुसरलानन्ताशतपुष्पाकुटंनटैः ॥ १ ॥
पचेत्तैलं सगोमूत्रं दधिमस्त्वम्लकाञ्जिकैः ।

गव्हला, सरळ देवदार, धमासा, बडिशेप व नागरमोथे, हीं औषधें, व गोमूत्र, दह्यावरील पाणी व आंबट कांजी ह्यांमध्यें यथा-विधि तेल सिद्ध करावें, व तें अंगास लावावें.

वचां वयस्थां जटिलां गोलोमीं चापि धारयेत् ॥ २ ॥

वेखंड, गुळवेल, जटामांसी व पाथरी ह्यांचें धारण करावें.

उत्सादनं हितं चात्र स्कन्दापस्मारनाशनम् ।

स्कंदापस्मारावरील उटणींही ह्यांमध्यें योजावीं.

कमठोलूकगृध्राणां पुरीषाणि पितृग्रहे ॥ ३ ॥
धूपः सुप्ते जने कार्यो बालस्य हितमिच्छता ।

माणसांना झोंप लागल्यावर नव्या घरामध्यें त्या मुलाला माकड, गिधाड व घुबड ह्यांचा विष्ठेची धुरी द्यावी.

तिलतण्डुलकं माल्यं भक्ष्यांश्च विविधानपि ॥ ४ ॥
कौमारभृत्यमेषाय प्लक्षमूले निवेदयेत् ।

---

१. 'कमठ' ह्या ठिकाणीं 'मर्कट' हा पाठ सयुक्तिक दिसल्यावरून त्याप्रमाणें अर्थ दिला आहे.

तीळ, तांदुळ, फुलें व अनेक प्रकारचीं भक्ष्यें ह्यांचा नैगमेयग्रहाला पिंपरणीच्या झाडाखालीं बळी द्यावा.

अधस्तात्क्षीरवृक्षस्य स्नपनं चोपदिश्यते ॥ ५ ॥

क्षीर वृक्षाच्या (वड वगैरे झाडांच्या) खालीं त्या मुलाला स्नान घालावें.

अजाननश्चलन्विभ्रूः कामरूपी महायशाः ।
बालं पालयिता देवो नैगमेयोऽभिरक्षतु ॥ ६ ॥

अजानन, चलविभ्रू, कामरूपी व महायश, हीं नांवें ज्याला आहेत असा रक्षण करणारा नैगमेय देव मुलांचें रक्षण करो.

उत्फुल्लिकालक्षण.

आध्मानवातसंफुल्लो दक्षकुक्षिः शिशोर्भवेत् ।
उत्फुल्लिका सा विख्याता श्वासश्वयथुसंकुला ॥ १ ॥

आध्मान वातामुळें (मुलाचें पोट फुगून) मुलाची उजवी कूस उंच दिसूं लागते, तिला उत्फुल्लिका असें म्हणतात. तीमध्यें श्वास व सूज हीं लक्षणें असतात.

तिची चिकित्सा.

निःसारयेज्जलौकाभी रक्तं च जठरात्तदा ।

पोटाला जळवा लावून रक्त काढावें.

कर्कोटनागरामेककङ्कोलातिविषाभवम् ॥ १ ॥
चूर्णं दुग्धेन संमिश्रं पाययेन्मातरं भिषक् ।
धात्रीं वा पाययेत्सद्यः क्षीरदोषनिवारणम् ॥ २ ॥

कर्टोली, सुंठ, नागरमोथे, कंकोळ, अतिविष व बाळहिरडे ह्यांचें चूर्ण दुधांतून मुलाच्या आईस द्यावें. किंवा मुलाच्या दाईस द्यावें. तें क्षीरदोषांचें (दुधासंबंधीं दोषांचें) निवारण करितें.

अग्निना स्वेदयेद्वाऽपि दाहयेच्च शलाकया ।
जठरे बिन्दुकाकारं पृष्ठभागे यथा ध्रुवम् ॥ ३ ॥

अग्नीनें शेकावें किंवा सळईनें पोटावर वाटोळा बिंदुमात्र डाग द्यावा, व त्याचप्रमाणें पाठीकडेही द्यावा.

बिल्वमूलकं नीरदो वृकी त्रैफलं तथा सिंहिकाद्वयम् ।
गौडमिश्रितं क्वाथितं समं पाययेच्छिशुं फुल्लिकापहम् ॥४॥

बेलाचें मूळ, नागरमोथे, पहाडमूळ, त्रिफळा, रिंगणी व डोरली

ह्यांचा काढा गूळ घालून द्यावा. तो उत्फुल्लिकेचा नाश करितो.

पिप्पली ग्रन्थिकं विश्वा त्रायमाणा च दार्विका ।
पथ्येभपिप्पली भार्गी लवंगं टङ्कणस्तथा ॥ ५ ॥
कुमारीवालपथ्ये च सैन्धवस्त्वाजवारिणा ।
घर्षितं पाययेत्प्रातर्द्विटङ्कं फुल्लिकापहम् ॥ ६ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ, त्रायमाण, दारुहळद, हिरडा, गजपिंपळी, भारंगमूळ, लवंग, टाकणखार, कोरफड, बाळहिरडे व सैंधेलोण ह्यांचा शेळीच्या मुतांत खल करून सकाळच्या प्रहरीं हें औषध सहा मासे प्रमाणें द्यावें. हें उत्फुल्लिकानाशक आहे.

पथ्यापथ्य.

यत्पथ्यं यदपथ्यं च नृणामुक्तं ज्वरादिषु ।
तत्तद्विधेयमौचित्याद्वालानां तेषु जानता ॥ १ ॥
पूर्वं पथ्यमपथ्यं च मन्दाग्नौ यत्प्रकीर्तितम् ।
औचित्याद्योजयेज्ज्ञाते बालानां पारिगर्भिके ॥ २ ॥
आगन्तून्मादवातानां पथ्यापथ्यं यदीरितम् ।
औचित्याद्योजयेत्तत्र बालेषु ग्रहरोगिषु ॥ ३ ॥

ज्वरादि विकारांवर जें पथ्यापथ्य सांगितलें आहे, तें पथ्यापथ्य योजना करून बालकाला सांगावें. पूर्वी मंदाग्नीवर जें पथ्यापथ्य सांगितलें आहे तेंच मुलांच्या पारिगर्भिक रोगावर उचित समजून योजावें. आगंतुक, उन्माद वगैरे वातरोगावर जें पथ्यापथ्य सांगितलें आहे, तेंच पथ्यापथ्य बालकाला उचित अशी योजना करून बालग्रहावर सांगावें.

विषाधिकार.

स्थावरं जङ्गमं चैव द्विविधं विषमुच्यते ।
दशाधिष्ठानमाद्यं तु द्वितीयं षोडशाश्रयम् ॥ १ ॥

स्थावर व जंगम असें दोन प्रकारचें विष सांगितलें आहे. त्यांत प्रहिल्याचे १० प्रकार आहेत आणि दुसऱ्याचे १६ प्रकार आहेत.

स्थावर विषाचे दहा प्रकार.

मूलं पत्रं फलं पुष्पं त्वक्क्षीरं सार एव च ।
निर्यासो धातवः कन्दः स्थावरस्याऽऽश्रया दश ॥ १ ॥

मूलविषं करवीरादि । पत्रविषं विषपत्रिकादि ।
फलविषं कर्कोटकादि । पुष्पविषं वेत्रादि ।
त्वक्सारनिर्यासविषाणि करम्भादीनि ।
क्षीरविषं स्नुह्यादि । धातुविषं हरतालादि ।
कन्दविषं वत्सनाभसक्तुकादि ॥

मूळ, पत्र, फळ, फूल, साल, चीक, डिंक, झाडाचा नार, धातु, व कंद हीं स्थावर विषाचीं दहा आश्रयस्थानें आहेत. तीं अशीं–मूळविष म्हणजे कण्हेर वगैरे; पत्रविष म्हणजे विषपत्रकादि (विषारी पानाचें झाड); फलविष म्हणजे कडुदोडका वगैरे; फूलविष म्हणजे वेत वगैरे; साल, डिंक व नार इत्यादि विष म्हणजे किन्हई वगैरे; चीकविष म्हणजे त्रिधारी निवडुंग वगैरे; धातुविष म्हणजे हरताल वगैरे व कंदविष म्हणजे बचनाग वगैरे समजावीं.

जंगमविषाचीं सोळा आश्रयस्थानें.

दृष्टिनिःश्वासदंष्ट्राश्च नखमूत्रमलानि च ।
शुक्रं लाला स्पर्शो मुखसंदंशश्च विशर्धितम् ॥
गुदास्थिपित्तशूकादि दश षड् जङ्गमाश्रयाः ॥ १ ॥
दृष्टिनिःश्वासविषा दिव्याः सर्पास्तक्षकादयः ।
दंष्ट्राविषा भौमाः सर्पाः । नखविषा
मार्जारमकरव्याघ्रादयः, ते दंष्ट्राविषा अपि ।
मूत्रपुरीषविषा गृहगोधिकादयः
शुक्रविषाः सर्पलालनादयो मूषिकाः ।
लालाविषा वरटयुच्चटीलिंगादयः ।
स्पर्शविषा लूतादयः । मुखसंदंशविषा मक्षिकादयः ।
विशर्धितगुदवातविषाश्चित्रशीर्षादयः ।
विशर्धितं नाम पायुकृतकुत्सितशब्दः ।
अस्थिविषाः सर्पादयः । पित्तविषा नकुलमत्स्यादयः ।
शूकविषा वृश्चिकभ्रमरादयः ।
एतेषां च सुश्रुते कल्पस्थाने विस्तारो द्रष्टव्यः ।

दृष्टि, श्वासोच्छ्वास, दाढा, नख, मूत्र, मल, शुक्र, लाळ, स्पर्श, तोंडाचा चावा, अपानवायु, गुद, अस्थि, पित्त, शूक (कुसळकाय), हीं सोळा जंगम विषांचीं आश्रयस्थानें आहेत. जसें:–दृष्टि व श्वासोच्छ्वास यांच्या ठिकाणीं विष असणारे प्राणी म्हणजे आकाशांतील

तक्षकादि सर्प; दाढेच्या विषाचे प्राणी म्हणजे जमीनीवरील सर्प; नखाचें विषाचे प्राणी म्हणजे मांजर, सुसर, वगैरे; ह्यांच्या दाढेंतही विष असतें. मलमूत्राच्या ठिकाणीं विष असणारे प्राणी पाल वगैरे; शुक्राच्या ठिकाणीं विष असणारे प्राणी म्हणजे उंदीर वगैरे; लाळे-मध्यें विष असणारे प्राणी म्हणजे गांजणी, इंगळी वगैरे; स्पर्शाच्या ठिकाणीं विष आहे असे प्राणी कोळी वगैरे; तोंडाच्या ठिकाणीं विष आहे असे प्राणी माशा वगैरे; अपानवायूच्या ठिकाणीं व गुदाच्या ठिकाणीं विष आहे असे प्राणी म्हणजे चित्रशीर्ष (एक विषारी किडा) वगैरे; अस्थींच्या ठिकाणीं विष आहे असे प्राणी म्हणजे सर्पादिक; पित्ताचे ठिकाणीं विष असणारे प्राणी म्हणजे मुंगूस, मासे वगैरे. शूकविषाचे प्राणी म्हणजे विंचू, भुंगे वगैरे. ह्यांची सविस्तर माहिती सुश्रुताच्या कल्पस्थानामध्यें पहावी.

स्थावरजंगम विषांचीं सामान्य लक्षणें.

स्थावरं तु ज्वरं हिक्कां दन्तहर्षं गलग्रहम् ।
फेनच्छर्द्यरुचिश्वासं मूर्छां च कुरुते विषम् ॥ १ ॥
निद्रां तन्द्रां क्लमं दाहं सकम्पं रोमहर्षणम् ।
शोफं चैवातिसारं च कुरुते जङ्गमं विषम् ॥ २ ॥

स्थावर विषापासून ज्वर, उचकी, दांत शिवशिवणें, गळा धरणें, तोंडाला फेंस येणें, ओकारी, अरुचि, श्वास व मूर्छा हे विकार होतात आणि जंगम विषापासून झोंप, ग्लानि, थकवा, दाह, कांपरें, अंगावर काटा येणें सूज व अतिसार हे विकार होतात.

अन्नांतून विष घालणारांचीं लक्षणें.

इंगितज्ञो मनुष्याणां वाक्चेष्टामुखवैकृतैः ।
जानीयाद्विषदातारमेतैर्लिंगैश्च बुद्धिमान् ॥ १ ॥
न ददात्युत्तरं पृष्टो विवक्षुर्मोहमेति च ।
अपार्थं बहु संकीर्णं भाषते मूढवत्तदा ॥ २ ॥
अगुंलीः स्फोटयेदुर्वीं विलिखेत्प्रहसेदपि ।
वेपथुश्चास्य भवति त्रस्तश्चान्योन्यमीक्षते ॥ ३ ॥
विवर्णवक्त्रो ध्यामस्तु नखैः किंचिच्छिनत्त्यपि ।
वर्तते विपरीतं च विषदाता विचेतनः ॥ ४ ॥

आलभेतासकृद्दीनः करणे च शिरोरुहान् ।
निर्यियासुरपद्वारैर्वीक्षते च पुनः पुनः ॥ ५ ॥

मनुष्याच्या मनांतील अभिप्राय जाणणाऱ्या बुद्धिमान वैद्यानें बोलणें, चालणें, मुखचर्या यांच्या पुढील लक्षणांवरून विष देणारा मनुष्य ओळखावा. विष देणारा मनुष्य विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देत नाहीं. बोलूं लागला तर त्याला कांहीं आठवत नाहीं असें होतें. ज्यांत कांहीं अर्थ नाहीं असें मूर्खासारखें निरर्थक व संदिग्ध बोलतो. उगीचच हसतो, बोटें मोडतो व भुईवर रेघोट्या ओढीत बसतो. त्याला कंप सुटतो. भयभीत होऊन तो हिकडे तिकडे पाहतो. त्याचे तोंडाची कांति बदलते. तो लज्जित होऊन नखांनीं कांहीं तरी कुरतडीत असतो. कांहीं तरी वेडेवांकडे चाळे करितो. व तो मोहित होतो. गरिबासारखा होऊन वरचेवर डोक्याचे केंस धरतो. व तेथून वरचेवर चोरून पळून जाण्याची इच्छा करितो.

स्थावर विषाचीं विशेष लक्षणें.

उद्वेष्टनं मूलविषैः प्रलापो मोह एव च ।
जृम्भणं वेपनं श्वासो ज्ञेयं पत्रविषेण च ॥ १ ॥
मुष्कशोथः फलविषैर्दाहोऽन्नद्वेष एव च ।
भवेत्पुष्पविषैश्छर्दिराध्मानं श्वास एव च ॥ २ ॥
त्वक्सारनिर्यासविषैरुपयुक्तैर्भवन्ति हि ।
आस्यदौर्गन्ध्यपारुष्यशिरोरुक्कफसंस्रवाः ॥ ३ ॥
फेनागमः क्षीरविषैर्विड्भेदो गुरुजिह्वता ।
हृत्पीडनं धातुविषैर्मूर्च्छा दाहश्च तालुनि ।
प्रायेण कालघातीनि विषाण्येतानि निर्दिशेत् ॥ ४ ॥

मूलविषापासून हातापायाला गोळे येणें, बडबड हे विकार होतात पत्रविषापासून जांभया येणें, अंग कांपणें व श्वास हे विकार होतात. फलविषापासून अंड सुजणें, दाह, अन्नद्वेष हे विकार होतात. पुष्पविषापासून ओकारी, पोट फुगणें व श्वास हे रोग होतात. त्वचा, नार व डिंक यांच्या विषापासून तोंडाला घाण, अंगाला खरखरीतपणा, कपाळ दुखणें व तोंडांतून कफाचा स्राव होणें हे विकार होतात. क्षीरविषापासून तोंडाला फेंस, मळ पातळ होणें व जीभ जड

होणें हे विकार होतात. धातुविषापासून हृदयामध्यें दुखणें, मूर्छा व टाळ्याच्या ठिकाणीं दाह होणें हीं लक्षणें होतात. हीं सर्व विषें प्रायः कालांतरानें प्राणनाश करणारीं आहेत.

कंदविषाचें कार्य.

कन्दजान्युग्रवीर्याणि यान्युक्तानि त्रयोदश।
सर्वाण्येतानि कुशलैर्ज्ञेयानि दशभिर्गुणैः ॥ १ ॥
स्थावरं जङ्गमं वाऽपि कृत्रिमं चापि यद्विषम्।
सद्यो निहन्ति तत्सर्वगुणैश्च दशभिर्युतम् ॥ १ ॥

जीं तेरा कंदविषें सांगितलीं आहेत, त्यांचे गुण फार तीव्र आहेत. हीं सर्व विषें पुढील दहा गुणांवरून ओळखावींत. स्थावर, जंगम व कृत्रिम हीं जीं विषें आहेत तीं ह्या दहा गुणांनीं तात्काळ प्राण्याचा नाश करितात.

विषाचे दहा गुण.

रूक्षमुष्णं तथा तीक्ष्णं सूक्ष्ममाशु व्यवायि च।
विकाशि विशदं चापि लघ्वपाकि च ते दश ॥ १ ॥

रुक्ष, उष्ण, तीक्ष्ण, सूक्ष्म, आशुकारी, व्यवायी, विकाशी, विशद आणि लघु हे त्यांचे दहा गुण आहेत.

त्या गुणांनीं विषाचें कार्य.

तद्रौक्ष्यात्कोपयेद्वायुमौष्ण्यात्पित्तं सशोणितम्।
तैक्ष्ण्यान्मतिं मोहयाति मर्मबन्धांश्छिनत्ति हि ॥ २ ॥
शरीरावयवान्सौक्ष्म्यात्प्रविशेद्विकरोति च।
आशुत्वादाशु तद्धन्ति व्यवायात्प्रकृतिं हरेत् ॥ ३ ॥
विकाशित्वात्क्षपयति दोषान्धातून्मलानपि।
अतिरिच्येत वैशद्याद्दुश्चिकित्स्यं च लाघवात्।
दुर्जरं चाविपाकित्वात्तस्मात्क्लेशयते चिरम् ॥ ४ ॥

तें रुक्षपणामुळें वायूचा प्रकोप करितें; उष्णतेनें रक्तासह पित्ताचा प्रकोप करितें; तीक्ष्णपणामुळें बुद्धीला मोहित करितें व मर्मबंधनांना तोडून टाकतें; सूक्ष्मपणामुळें शरीराच्या अवयवांमध्यें शिरून विकार करितें; आशुकारित्वामुळें जलद प्राणनाश करितें; व्यवायीपणामुळें प्रकृतींत बदल करितें; विकाशीपणामुळें दोष, धातु व

मळ यांचा क्षय करितें; विशदपणामुळें अतिशय रेच करितें; लघुत्वामुळें त्यावर उपचार करणें कठीण आहे. त्यांचा पाक होत नसल्यामुळें त्याचें पचन होत नाहीं. म्हणून तें फार दिवस पीडा देतें.

विषदिग्ध शस्त्राच्या जखमेचें लक्षण.

सद्यः पाकं याति यस्य क्षतं तत्स्रवेद्रक्तं पच्यते चाप्यभीक्ष्णम्।
कृष्णीभूतं क्लिन्नमत्यर्थपूति क्षतान्मांसं शीर्यते यस्य चापि ॥ १ ॥
तृष्णा मूर्च्छा ज्वरदाहौ च यस्य दिग्धाविद्धं तं मनुष्यं व्यवस्येत्
लिंगान्येतान्येव कुर्यादमित्रैर्दत्तः क्ष्वेडो वा व्रणे यस्य चापि ॥२॥

विषारी शस्त्रानें झालेला व्रण तात्काळ पिकतो, त्यांतून रक्तस्राव होतो. ती जखम वरचेवर पिकते; ती काळी पडते; ओलसर होते; तिला अतिशय घाण येते; तिच्यामधून मांस गळतें; तहान, मूर्छा, ज्वर, दाह हीं लक्षणें होतात. अशा मनुष्याला विषारी शस्त्रापासून जखम झाली आहे असें समजावें. त्याचप्रमाणें साध्या व्रणामध्यें-ही शत्रूनें विष घातलें असतां हींच लक्षणें होतात.

जंगम विषाचीं कार्यें.

वातपित्तकफात्मानो भोगिमण्डलिराजिलाः।
यथाक्रमं समाख्याता द्व्यन्तरा द्वंद्वरूपिणः ॥ १ ॥

भोगी सापाचें विष वातदोषप्रधान असतें. मंडळी सापाचें विष पित्तदोषप्रधान असतें; आणि राजिल सापाचें विष कफदोषप्रधान असतें. ह्या जातींपैकीं दोन दोन मिश्र जातींपासून होणाऱ्या सापाच्या विषामध्यें त्या त्या दोनदोन दोषांचीं मिश्र लक्षणें असतात.

सर्पदंशाचीं लक्षणें.

दंशो भोगिकृतः कृष्णः सर्ववातविकारकृत्।

भोगी सापानें केलेला दंश काळा असून वातसंबंधीं सर्व लक्षणें त्यांत असतात.

पीतो मण्डलिजः शोथो मृदुः पित्तविकारवान् ॥ १ ॥

मंडली सापानें केलेला दंश पिवळा असून मृदु असतो; आणि पित्तदोषासंबंधीं सर्व लक्षणें त्यांत असतात.

राजिलोत्थो भवेद्दंशः स्थिरशोथश्च पिच्छिलः।
पाण्डुः स्निग्धोऽतिसान्द्रासृक्सर्वश्लेष्मविकारकृत् ॥ २॥

राजिल सापाच्या दंशाच्या ठिकाणीं कठिण सूज येते व तो ओलसर असतो. त्याचा रंग पांढरा असतो व तो दंश दिसण्यांत स्निग्ध दिसतो. त्यांतून अतिशय घट्ट असें रक्त वाहतें; आणि त्यामध्यें कफदोषाचीं सर्व लक्षणें असतात.

सर्पदंशाचें असाध्यत्व.

अश्वत्थदेवायतनश्मशानवल्मीकसंध्यासु चतुष्पथेषु ।
याम्ये च पित्र्ये परिवर्जनीया ऋक्षे नरा मर्मसु ये च दष्टाः ॥१
दर्वीकराणां विषमाशु हन्ति सर्वाणि चोष्णे द्विगुणीभवन्ति २

पिंपळ, देवालय, स्मशान, वारूळ व चवाठा ह्या ठिकाणीं, संध्याकाळीं, भरणीनक्षत्रावर व मर्मस्थानीं झालेल्या नागाच्या दंशाचें विष त्वरित प्राणनाश करितें. हीं सर्व विषें उष्ण उपचारानें दुप्पट वाढतात.

दर्वीकर सापाचें लक्षण.

रथांगलाङ्गलच्छत्रस्वस्तिकांकुशधारिणः ।
ज्ञेया दर्वीकराः सर्पाः फणिनः शीघ्रगामिनः ॥ १ ॥

ज्यांच्या अंगावर चक्र, नांगर, छत्र, स्वस्तिक किंवा अंकुश हीं चिन्हें आहेत, व ज्यांना फणी आहे, त्यांना दर्वीकर (नाग) असें म्हणतात. ते शीघ्रगामी असतात.

त्वरित मारक विष.

अजीर्णपित्तातपपीडितेषु बालेषु वृद्धेषु बुभुक्षितेषु ।
क्षीणे क्षते मेहिनि कुष्ठजुष्टे रूक्षेऽबले गर्भवतीषु चापि ॥ १ ॥
शस्त्रक्षते यस्य न रक्तमस्ति राज्यो लताभिश्च न संभवन्ति ।
शीताभिरद्भिश्च न रोमहर्षो विषाभिभूतं परिवर्जयेत्तम् ॥ २ ॥

अजीर्ण, पित्तदोष व ऊन ह्यांनीं पिडलेले; बाल, वृद्ध, भुकेलेले, क्षीण झालेले, व्रणरोगानें पीडलेले, प्रमेह झालेले, कुष्ट झालेले, रूक्ष, अशक्त, गर्भिणी स्त्रिया, ज्यांना शस्त्रानें जखम झाली असतां त्यांतून रक्त येत नाहीं असे, ज्यांना चाबूक वगैरे मारका असतां वळ उठत नाहीं असे, ज्यांच्या अंगावर गार पाणी टाकलें असतां अंगावर रोमांच येत नाहींत, अशा विषबाधा झालेल्या मनुष्यांना असाध्य समजून वर्ज करावें.

जिह्मं मुखं यस्य च केशशातो नासावसादश्च सकण्ठभंगः ।
कृष्णश्च रक्तः श्वयथुश्च दंशे हन्वोः स्थिरत्वं च स वर्जनीयः ३

ज्याचे तोंड वांकडें झालें आहे, केस गळताहेत, नाक वांकडें झालें आहे, मान सावरत नाहीं, दंशाच्या ठिकाणीं लाल व काळी सूज आहे, व ज्याची हनुवटी हालत नाहीं त्याला वर्ज करावें.

दुसरें असाध्य लक्षण.

वर्तिर्घना यस्य निरेति वक्त्राद्रक्तं स्रवेदूर्ध्वमधश्च यस्य ।
दंष्ट्रानिपातांश्चतुरश्च पश्येद्यस्यापि वैद्यः परिवर्जयेत्तम् ॥ ४ ॥

ज्याचा तोंडांतून अतिशय दाट लाळ येते, ज्याच्या तोंडांतून व शौचावाटे वगैरे रक्त येतें; आणि ज्याला चार दांत लागले आहेत त्याला वर्ज करावें.

उन्मत्तमत्यर्थमुपद्रुतं वा हीनस्वरं वाऽप्यथवा विवर्णम् ।
सारिष्टमत्यर्थमवेगिनं च त्यजेन्नरं तत्र न कर्म कुर्यात् ॥ ५ ॥

जो अतिशय उन्मत्त झाला आहे, किंवा ज्याला विषाचे सर्व उपद्रव झाले आहेत, ज्याचा स्वर क्षीण झाला आहे किंवा ज्याच्या अंगाचा रंग बदलला आहे, ज्याचीं मरणचिन्हें दिसून येत आहेत, ज्याच्या विषाच्या लहरी बंद झाल्या आहेत, अशा मनुष्याला वर्ज करावा. त्याजवर उपचार करूं नयेत.

दूषीविष.

जीर्णं विषघ्नौषधिभिर्हतं वा दावाग्निवातातपशोषितं वा ।
स्वभावतो वा गुणविप्रहीनं विषं हि दूषीविषतामुपैति ॥ १ ॥

जें विष जुनें झालें आहे किंवा औषधादिकांच्या संस्कारांनीं तें मारलें आहे, दावाग्नि, वारा व ऊन ह्यांनीं शुष्क झालें आहे किंवा स्वभावतःच जें गुणहीन आहे असें विष दूषीविषत्व पावतें; म्हणजे त्याला दूषीविष असें म्हणतात.

दूषीविषाचें कार्य.

वीर्याल्पभावान्न निपातयेत्तत्कफान्वितं वर्षगणानुबन्धि ।
तेनार्दितो भिन्नपुरीषवर्णो विगन्धवैरस्ययुतः पिपासी ॥ १ ॥
मूर्छाभ्रमं गद्गदवाग्वमिश्च विचेष्टमानोऽरतिमाप्नुयाद्वा ॥ २ ॥

दूषीविष हें कफदोषयुक्त झाल्यामुळें हीनवीर्य होतें. त्या कारणानें

तें पचन न होतां किती एक वर्षे पोटांत तसेंच राहतें. ह्या दूषीविषानें पीडलेला मनुष्य हीनवर्ण होतो. त्याला शौचास पातळ होतें. त्याचें तोंड विरस होतें व त्याला दुर्गंधी येते. त्याला तहान लागतें. मूर्च्छा, घेरी येणें, अस्पष्ट बोलणें व ओकारी हे विकार होतात. तो वेडेवाकडे चाळे करितो आणि त्याला चैन पडत नाहीं.

स्थानविशेषावरून दूषी विषाचें लक्षण.

आमाशयस्थे कफवातरोगी पक्काशयस्थेऽनिलपित्तरोगी ।
भवेत्समुद्धस्तशिरोरुहाङ्गो विलूनपक्षस्तु यथा विहङ्गः ॥ १ ॥

आमाशयांत विष राहिलें असतां कफवातजन्य विकार होतात. पक्काशयांत राहिलें असतां वातपित्तजन्य विकार होतात. व त्याच्या अंगावरील व डोक्याचे केस गळतात. त्यामुळें तो पंख उपटलेल्या पक्ष्याप्रमाणें भुंडा दिसतो.

धातुगत दूषीविषाचें लक्षण.

स्थितं रसादिष्वथ तद्यथोक्तान्करोति धातुप्रभवान्विकारान् ।
कोपं च शीतानिलदुर्दिनेषु यात्याशु पूर्वं शृणु तस्य रूपम् ॥ १ ॥

रसादि धातूंच्या ठिकाणीं राहिलेलें विष त्या त्या धातूसंबंधीं विकार उत्पन्न करितें; आणि गारठा, वादळ, किंवा आकाश ढगानें व्याप्त झालें असतां तें प्रकोप पावतें. त्याचें पूर्वरूप सांगतों, ऐक.

पूर्वरूप.

निद्रा गुरुत्वं च विजृम्भणं च विश्लेषहर्षावथ वाऽङ्गमर्दः ।
ततः करोत्यन्नमदाविपाकावरोचकं मण्डलकोठजन्म ।
मांसक्षयं पाणिपदाक्षिशोथं मूर्छां तथा छर्दिमथातिसारम् १ ॥
दूषीविषं श्वासतृषाज्वरांश्च कुर्यात्प्रवृद्धिं जठरस्य चापि ॥२॥

झोंप, आंगाला जडत्व, जांभया येणें, आंग गळल्यासारखें वाटणें, आंगावर शहारे येणें, आंग दुखणें हे विकार होतात. व त्यानंतर अन्न खाल्लें असतां त्याचा कैफ येणें, अन्न पचन न होणें, अरुचि, अंगावर मंडलें किंवा गांधी उठणें, आंगांतील मांसाचा क्षय होणें, हातपाय व डोळे यांना सूज येणें, मूर्च्छा, ओकारी अतिसार, श्वास, तहान, ज्वर आणि पोट मोठें होणें हे विकार दूषीविषापासून होतात.

दूषीविषाचे विकार.

उन्मादमन्यज्जनयेत्तथाऽन्यदानाहमन्यत्क्षपयेच्च शुक्रम् ।
गाद्गद्यमन्यज्जनयेच्च कुष्ठं तांस्तान्विकारांश्च बहुप्रकारान् ॥ १ ॥

एखादें दूषीविष उन्माद उत्पन्न करितें; एखादें पोट फुगवितें; एखादें शुक्राचा नाश करितें; एखाद्यापासून बोबडेपणा उत्पन्न होतो, व एखाद्यापासून कुष्ठ उत्पन्न होतें. याप्रमाणें तें तें दूषी विष दोषभेदानुरूप अनेक प्रकारचे विकार करितें.

दूषीविषाची व्याख्या.

दूषितं देशकालान्नदिवास्वापैरभीक्ष्णशः ।
यस्मात्संदूषयेद्धातूंस्तस्माद्दूषीविषं स्मृतम् ॥ १ ॥

दूषीविष देश, काल, अन्न व दिवसा झोंप घेणें या कारणांनीं धातूंना दूषित करितें, म्हणून त्याला दूषीविष असें म्हणतात.

दूषीविषाचे साध्यादि प्रकार.

साध्यमात्मवतः सद्यो याप्यं संवत्सरोषितम् ।
दूषीविषमसाध्यं स्यात्क्षीणस्याहितसेविनः ॥ १ ॥

जो आपलें मन ताब्यांत ठेवितो, त्याचें दूषीविष तात्काळ उपाय केले असतां साध्य होतें. त्याला एक वर्ष होऊन गेल्यावर तें याप्य होतें आणि जो क्षीण आहे व अपथ्य करणारा आहे त्याचें दूषीविष असाध्य असतें.

कृत्रिम विषाचे दोन प्रकार.

एकं सविषं दूषीविषसंज्ञम् । अपरमविषं तदेव गरसंज्ञम् ।
संयोगजं च द्विविधं द्वितीयं विषमुच्यते ।
दूषीविषं तु सविषमविषं गर उच्यते ॥ १ ॥

एक सविष द्रव्य असतें, त्याला दूषीविष असें म्हणतात. दुसरें असतें तें हीनविष असतें; त्याला गर असें म्हणतात. तसेंच कश्यपसंहितेमध्यें म्हटलें आहे कीं, दुसरें संयोगजन्य विष दोन प्रकारचें सांगितलें आहे. दूषीविष हें विषयुक्त असतें, आणि गरांत विष नसतें.

दूषीविष व गर.

सौभाग्यार्थाः स्त्रियः स्वेदरजोनानाङ्गजान्मलान् ।

शत्रुप्रयुक्तांश्च गरान्प्रयच्छन्त्यन्नमिश्रितान् ॥१ ॥

पतीनें आपल्यावर प्रेम करावें, या हेतूनें स्त्रिया आपले स्वेद-आर्तवादि शारीरिक मळ अन्नामधून पुरुषास देतात, किंवा शत्रूला वश होऊन विषमिश्रित पदार्थ अन्नांतून खावयास देतात, त्याला गर असें म्हणतात.

गराचें कार्य.

तैः स्यात्पाण्डुः कृशोऽल्पाग्निर्गरश्चास्योपजायते ।
मर्मप्रधमनाध्मानं हस्तयोः शोथसंभवः ॥ १ ॥
जठरं ग्रहणीरोगो यक्ष्मा गुल्मः क्षयो ज्वरः ।
एवंविधस्य चान्यस्य व्याधेर्लिङ्गं च जायते ॥ १ ॥

ज्याच्या पोटामध्यें गर गेलें आहे, त्याला त्यापासून शरीर पांढरें फटफटीत होणें, कृशत्व, अग्निमांद्य, मर्मस्थानीं पीडा, हातांला सूज, उदर, संग्रहणी, क्षय, गुल्म, धातुक्षय, व आणखीही दुसऱ्या-व्याधींचीं लक्षणें होतात.

लूतांची उत्पत्ति, संख्या, व्याख्या व जाती.

यस्माल्लूनं तृणं प्राप्ता मुनेः प्रस्वेदबिन्दवः ।
तेभ्यो जातास्ततो लूता इति ख्यातास्तु षोडश ॥ १ ॥
विश्वामित्रो नृपवरः कदाचिदृषिसत्तमः ।
वसिष्ठं कोपयामास गत्वाऽऽश्रमपदं किल ॥ २ ॥
कुपितस्य मुनेस्तस्य ललाटात्स्वेदबिन्दवः ।
अपतन्दर्शनादेव ह्यधस्तात्तीव्रवर्चसः ॥ ३ ॥
लूने तृणे महर्षेस्तु धेन्वर्थे संभृतेऽपि च ।
ततो जातास्त्विमा घोरा नानारूपा महाविषाः ॥ ४ ॥
तासामष्टौ कष्टसाध्या वर्ज्यास्तावत्य एव हि ॥ ५ ॥
तत्र त्रिमण्डलाप्रभृतयः कष्टसाध्याः ।
सौवर्णिकाप्रभृतयोऽष्टावसाध्याः ।

कामधेनूकरितां कापलेल्या गवतावर, रागावलेल्या वसिष्ठ मुनीं-च्या कपाळाचे स्वेदबिंदु पडले. त्यामुळें त्या ठिकाणीं जे विषारी कीटक उत्पन्न झाले त्यांना लूता असें म्हणतात. लूता १६ प्रकार-च्या आहेत. ह्यांत सुश्रुतही असेंच म्हणतो कीं, विश्वामित्र राजानें वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत जाऊन त्यांना राग आणिला. त्यामुळें

रागावलेल्या त्या महातेजस्वी ऋषींच्या कपाळापासून घामाचे थेंब गाईकारितां कापलेल्या गवतावर पडले. त्यापासून ह्या नाना प्रकारच्या भयंकर महा विषारी अशा लूता उत्पन्न झाल्या. त्यांपैकीं आठ कष्टसाध्य आहेत आणि आठ असाध्य आहेत. त्या वर्ज्य कराव्या. त्यांत त्रिमंडलादि लूता कष्टसाध्य आहेत, आणि संवर्णिकादि आठ असाध्य आहेत.

दंशाचें सामान्य लक्षण.

ताभिर्दष्टे दंशशोथः प्रवृत्तिः क्षतजस्य च ।
ज्वरो दाहोऽतिसारश्च गदाः स्युश्च त्रिदोषजाः ॥ १ ॥
पिटिका विविधाकारा मण्डलानि महान्ति च ।
शोथा महान्तो मृदवो रक्ताः श्यावाश्चलास्तथा ।
सामान्यं सर्वलूतानामेतद्दंशस्य लक्षणम् ॥ २ ॥

त्यांनीं चावलेल्या ठिकाणीं सूज येते; त्यांतून रक्त वाहतें; ज्वर, दाह, अतिसार व त्रिदोषजन्य विकार होतात. अनेक आकाराचे फोड व मोठमोठीं मंडलें अंगावर उठतात. मऊ, तांबडी व काळसर आणि पसरणारी अशी सूज येते. हें सर्व लूतांच्या दंशाचें सामान्य लक्षण सांगितलें आहे.

कष्टसाध्य लूतांचे दंशाचें लक्षण.

दंशमध्ये तु यत्कृष्णं श्यावं वा जालकावृतम् ।
दग्धाकृति भृशं पाकक्लेदशोथज्वरान्वितम् ।
दूषीविषाभिर्लूताभिस्तद्दष्टमिति निर्दिशेत् ॥ १ ॥

त्रिमंडलादि लूतांनीं केलेला दंश मध्यभागीं काळसर, निळा व त्यांत जाळीं बनलेला असा असतो. तो भाजल्यासारखा असतो, व लवकर पिकतो. तसेंच त्यांत ओलसरपणा असतो. आणि त्यामुळें ज्वर येतो. या लक्षणांनीं युक्त असा दंश विषारी लूतांनीं केला आहे असें समजावें.

असाध्य लूतांचें लक्षण

शोथाः श्वेताः सिता रक्ताः पीता वा पिटिका ज्वरः ।
प्राणान्तिको भवेद्दाहः श्वासो हिक्का शिरोग्रहः ॥ १ ॥

प्राणहारक लूतांच्या दंशाच्या ठिकाणीं सूज येते. पांढरे, काळे,

तांबडे व पिवळे असे फोड येतात. ज्वर येतो, भयंकर दाह होतो. आणि श्वास, उचकी व मस्तक दुखणें हे विकार होतात.

उंदराच्या विषाचें लक्षण.

आदंशाच्छोणितं पाण्डु मण्डलानि ज्वरोऽरुचिः।
रोमहर्षश्च दाहश्चाप्याखुदूषीविषार्दिते ॥ १ ॥

विषारी उंदीर चावला असतां दंशाच्या सर्व भागांतून पांढरें रक्त निघतें. अंगावर मंडळें उठतात. ज्वर येतो. व अरुचि, अंगावर काटा येणें आणि दाह हीं लक्षणें होतात.

उंदराच्या विषाचें कार्य.

मूर्छांगशोथवैवर्ण्यक्लेदशब्दाश्रुतिज्वराः।
शिरोगुरुत्वं लालाऽसृक्छर्दिश्चासाध्यमूषकात् ॥ १ ॥

मूर्छा, अंगावर सूज येणें, कांतीचा पालट होणें, दंशाच्या ठिकाणीं ओलसरपणा, ऐकूं न येणें, ज्वर, डोकें जड होणें, लाळ गळणें व रक्ताची वांति होणें हीं लक्षणें असाध्य उंदराच्या दंशापासून होतात.

सरडाच्या दंशाचें लक्षण.

कार्ष्ण्यं श्यावत्वमथवा नानावर्णत्वमेव च।
मोहोऽथ वर्चसो भेदो दष्टस्य कृकलासकैः ॥ १ ॥

सरडा चावला असतां दंशाच्या ठिकाणीं काळा, निळा किंवा अनेक प्रकारचा रंग येतो, मूर्छा येते व मळ पातळ होतो.

विंचवाचे दंशाचें लक्षण.

दहत्यग्निरिवाऽऽदौ तु भिनत्तीवोर्ध्वमाशु च।
वृश्चिकस्य विषं याति पश्चाद्दंशेऽवतिष्ठति ॥ १ ॥

विंचू चावला असतां त्या ठिकाणीं विस्तवानें भाजल्याप्रमाणें आग होते व लवकरच विष वर चढूं लागतें. तें फोडल्याप्रमाणें वेदना करीत चढूं लागतें. आणि नंतर खालीं उतरून दंशापाशीं (त्या ठिकाणीं) येऊन राहतें.

असाध्य विंचवाच्या दंशाचें लक्षण.

दष्टोऽसाध्यस्तु हृद्घ्राणरसनोपहतो नरः।
मांसैः पतद्भिरत्यर्थं वेदनार्तो जहात्यसून् ॥ १ ॥

ज्याच्या हृदय, नाक व जीभ यांच्या क्रिया बंद झाल्या आहेत असा विंचू चावलेला मनुष्य असाध्य समजावा. त्याचप्रमाणें ज्याच्या दंशांतून मांस गळतें आहे व जो वेदनांनीं व्याकुळ झाला आहे असा रोगी प्राणास मुकतो.

कणभदंशाचें लक्षण.

विसर्पः श्वयथुः शूलं ज्वरश्छर्दिरथापि वा।
लक्षणं कणभैर्दष्टे दंशश्चैवावशीर्यते ॥ १ ॥

कणभाचा, (एक प्रकारची माशी) दंश झाला असतां विसर्प, सूज, शूळ, ज्वर आणि वांति हीं लक्षणें होतात व दंशाची जागा कुजते.

इंगळीच्या दंशाचें लक्षण.

हृष्टलोमोच्चिटिङ्गेन स्तब्धलिङ्गो भृशार्तिमान्।
दष्टः शीतोदकेनेव सिक्तान्यङ्गानि मन्यते ॥ १ ॥

इंगळी चावली असतां आंगावर शहारे येतात. लिंग ताठतें, अत्यंत वेदना होतात, आणि दंशाच्या ठिकाणीं व सर्व अंगावर थंड पाणी ओतल्यासारखें वाटतें.

विषारी बेडकाच्या दंशाचें लक्षण.

एकदंष्ट्रार्दितः शूनः सरुजः पीतकः सतृट्।
सनिद्रश्छर्दिमान्दष्टो मण्डूकैः सविषैर्भवेत् ॥ १ ॥

विषारी बेडूक चावला असतां त्याचा एकच दांत उठतो, व त्यामुळें सूज येते. त्या ठिकाणीं ठणका असतो. दंशाच्या ठिकाणीं पिंवळटपणा असतो. तहान लागते, झोंप येते व ओकारी येते.

माशांच्या विषाचें लक्षण.

मत्स्यास्तु सविषाः कुर्युर्दाहं शोथं ज्वरं तथा ॥ १ ॥

विषारी मासे चावल्यापासून दाह, सूज आणि ज्वर हीं लक्षणें होतात.

जळवांच्या विषाचें कार्य.

कण्डूं शोथं ज्वरं कुर्युः सविषास्तु जलौकसः ॥ १ ॥

कंडू, सूज आणि ज्वर हीं लक्षणें विषारी जळवांपासून होतात.

पालीच्या विषाचें कार्य.

विदाहं श्वयथुं तोदं स्वेदं च गृहगोधिका ॥ १ ॥

दाह, सूज, टोंचणें आणि घाम हीं लक्षणें पालीच्या विषापासून होतात.

गोमेच्या विषाचें लक्षण.

दंशे स्वेदं रुजां दाहं कुर्याच्छतपदीविषम् ।

गोम (घोण) चावली असतां त्या ठिकाणीं घाम, ठणका आणि दाह हीं लक्षणें होतात.

डांस चावल्याचें लक्षण.

कण्डूमान्मशकैरीषच्छोथः स्यान्मन्दवेदनः ॥ १ ॥

डांस चावला असतां त्या ठिकाणीं खाज उठते, किंचित् सूज येते व मंद वेदना होतात.

डांसाच्या दंशाचें असाध्य लक्षण.

असाध्यकीटसदृशमसाध्यमशकक्षतम् ॥ १ ॥

विषारी किड्याच्या दंशानें झालेल्या जखमेचें जें असाध्य लक्षण असतें, तेंच विषारी डांसाच्या दंशाचेंही समजावें.

विषारी माशीच्या दंशाचें लक्षण.

सद्यःप्रस्राविणी श्यावा दाहमूर्छाज्वरान्विता ।
पिटिका माक्षिकादंशे तासां तु स्थगिकासुहृत् ॥ १ ॥

विषारी माशी चावली असतां त्या ठिकाणीं तात्काळ पुटकुळी येते. आणि तीमधून लागलाच स्राव होतो. तिजपासून दाह, मूर्च्छा व ज्वर हीं लक्षणें होतात. ह्या विषारी माशांमध्यें स्थगिका नांवाची माशी प्राणहारक आहे.

जनावरांच्या विषाचें कार्य.

चतुष्पाद्भिर्द्विपाद्भिर्वा नखदन्तक्षतं च यत् ।
शूयते पच्यते वाऽपि स्रवति ज्वरयत्यपि ॥ १ ॥

चार पायांच्या (वाघ वगैरे) व दोन पायांच्या (वानर वगैरे) जनावरांच्या नखाच्या किंवा दांताच्या योगानें झालेली जखम सुजते, पिकते किंवा वाहते; आणि त्यामुळें ज्वर देखील येतो.

कुत्र्याच्या विषाचें लक्षण.

प्रभ्रान्तस्तापयुक्तः श्वसनकसनवान्पीतदृक्पीतमूत्रः
सोन्मादो बुक्कमानो दशति च मनुजं योऽतिकालक्रमेण ।
वर्षाकाले विषार्तः प्रभवति विकलोऽसाध्यतामाप्नुयाच्च
प्रायो वातप्रधानोऽखिलमलकलितः सारमेयेण दष्टः ॥ १ ॥

कुत्रें चावलें असतां तो मनुष्य भांबावल्यासारखें करतो. त्याला ज्वर येतो. श्वास व खोकला हे विकार होतात. त्याचे डोळे व लघवी हीं पिवळीं होतात. पुष्कळ काळ लोटला असतां त्याला उन्माद होतो. तो कुत्र्याप्रमाणें भुंकतो. मनुष्याला चावतो. कुत्र्याच्या विषाची बाधा झालेला मनुष्य पावसाळ्यांत व्याकुळ होतो व तो असाध्य होतो. तो प्रायः वातप्रधान अशा त्रिदोषांनीं व्यापतो.

विष उतरलेल्या मनुष्याचें लक्षण.

प्रसन्नदोषं प्रकृतिस्थधातुमन्नाभिकामं सममूत्रविट्कम् ।
प्रसन्नवर्णेन्द्रियचित्तचेष्टं वैद्योधिगच्छेदविषं मनुष्यम् ॥ १ ॥

ज्याचे वातादि दोष शांत झाले आहेत, रसरक्तादि धातु शुद्ध व योग्य स्थितींत आहेत, ज्याला भूक चांगली लागते, मलमूत्रादि साफ होतात, ज्याचीं इंद्रियें व मन हीं प्रसन्न आहेत व शरीरकांति प्रसन्न झाली असून उद्योग करण्यास हुषारी वाटत आहे, अश मनुष्याचें विष उतरलें आहे म्हणून समजावें.

स्थावर विषांची चिकित्सा.

स्थावरेण विषेणाऽऽर्तं नरं यत्नेन वामयेत् ।
वमनेन समं नास्ति यतस्तस्य चिकित्सितम् ॥ १ ॥

स्थावर विषानें पीडिलेल्या मनुष्याला प्रयत्न करून ओकवावें. कारण त्याला वमनासारखा दुसरा उत्तम उपायच नाहीं.

वमन.

तिक्तकोशातकीक्वाथं पिबेन्मध्वाज्यसंयुतम् ।
कटुकालाबुमूलं वा तत्पत्रं वा पिबेज्जलैः ॥ १ ॥
तत्क्षणाद्वमनाद्धन्ति विषयोगाद्विमुच्यते ।

कडुदोडक्याचा काढा मध व तूप घालून प्यावा. तसेंच कडु भोपळ्याचें मूळ अथवा पानें पाण्यांत वाटून प्यावीं. म्हणजे ओकारी.

मुळें तत्क्षणांत विषाचा नाश होऊन विषप्रयोगापासून मनुष्याची सुटका होते.

विषमत्यर्थमुष्णं च कथितं मुनिभिर्यतः ॥ २ ॥
अतः सर्वविषे प्रोक्तः परिषेकस्तु शीतलः ।

ज्या अर्थीं विष हें अत्यंत उष्ण आहे असें मुनींनीं सांगितलें आहे त्या अर्थीं त्याजवर थंड पाणी वगैरे शीतळ पदार्थ शिंपावे.

औष्ण्यात्तैक्ष्ण्याद्विशेषेण विषं पित्तं प्रकोपयेत् ॥ ३ ॥
वमितं सेचयेत्तस्माच्छीतलेन जलेन च ।
पाययेन्मधुसर्पिभ्यां विषघ्नं भेषजं द्रुतम् ॥ ४ ॥
भोक्तुमम्लरसं दद्याच्चर्वयेन्मरिचानि च ।
यस्य यस्य च दोषस्य पश्येल्लिंगानि भूरिशः ।
तस्य तस्यौषधैः कुर्याद्विपरीतगुणैः क्रियाम् ॥ ५ ॥

उष्ण व तीक्ष्ण गुणामुळें विष हें पित्ताचा प्रकोप करितें. म्हणून वांति झाल्याबरोबर त्या मनुष्याच्या अंगावर थंड पाणी शिंपावें, व तूप आणि मध ह्यांमधून विषनाशक औषध त्वरित पाजावें. त्याला वांति झाल्यावर पिण्याला आंबट रस द्यावे आणि मिरीं चावावयास द्यावीं; आणि ज्या ज्या दोषांचीं लक्षणें दिसून येतील त्या त्या लक्षणांच्या उलट उपचार करावे.

लेप.

मूलत्वक्पत्रपुष्पाणि बीजं चेति शिरीषतः ।
गवां मूत्रेण संपिष्टं लेपाद्विषहरं परम् ॥ १ ॥

शिरसाचीं मुळें, साल, पानें, व बीं हीं गोमूत्रांत वाटून त्याचा लेप करावा. तो उत्तम प्रकारचा विषनाशक आहे.

जंगमविषचिकित्सा.

कार्याः सद्यः सर्पदष्टे मणिमंत्रौषधक्रियाः ।
अचिन्त्यो हि प्रभावोऽस्ति मणिमंत्रौषधस्य यत् ॥ १ ॥

ज्या अर्थीं मणी, मंत्र व औषधी ह्यांचा प्रभाव अचिंत्य आहे, त्या अर्थीं सर्पदंश होतांच तात्काळ मणी, मंत्र आणि औषधी यांचे उपचार करावे.

तण्डुलीयकमूलं तु पीतं तण्डुलवारिणा ।
तक्षकेणापि दष्टं हि निर्विषं कुरुते नरम् ॥ २ ॥

तांदुळजाचें मूळ तांदळाच्या धुवणांत वाटून पाजावें; म्हणजे तक्षक चावला असला तरी क्षणांत त्याच्या विषाचा नाश होतो.

घृतमधुनवनीतं पिप्पलीशृंगवेरं
मरिचमपि च दद्यात्सप्तमं सैन्धवं च।
यदि भवति सरोषं तक्षकेणापि दष्टोऽगद-
मिह खलु पीत्वा निर्विषस्तत्क्षणेन ॥ ३ ॥

तूप, मध, लोणी, पिंपळी, आलें, मिरीं हीं सहा, आणि सैंधेलोण सातवें ह्यांचा अगद प्यावयास दिला असतां रागावलेला साप चावला असला तरी त्याचें विष क्षणांत नाहींसें होतें.

मूलं तण्डुलवारिणा पिबति यः प्रत्यंगिरासंभवं
निष्पिष्टं शुचिभद्रयोगदिवसे तस्याहिभीतिः कुतः।
दर्पादेव फणी यदा दशति तं मोहान्वितो मूलतः
स्थाने तत्र तदैव याति नियतं वक्त्रं यमस्याचिरात् ॥४॥

शुभ दिवस व शुभयोग पाहून जो मनुष्य प्रत्यंगिरेचें मूळ तांदुळाच्या धुवणांत वाटून पितो, त्याला सापाची भीति कोठून येईल? (अर्थात् त्याला सापाची भीति नाहीं.) जर कदाचित् त्याला रागाच्या सपाट्यांत साप चावलाच, तर त्या सापाला मूर्च्छा येते, व त्याच ठिकाणीं तो थोड्या वेळांत मृत्यु पावतो.

शिरीषपुष्पस्वरसे सप्ताहं मरिचं सितम्।
भावितं सर्पदष्टानां पाने नस्याञ्जने हितम् ॥ ५ ॥

पांढऱ्या मिऱ्यांला शिरसाच्या फुलाच्या रसाच्या सात दिवस भावना द्याव्या. नंतर तीं मिरें साप चावलेल्या मनुष्यास प्राशनार्थ द्यावीं. त्याचें नस्य करावें व अंजनही करावें. तें हितकारक आहे.

दंशोपरि निबध्नीयात्तत्क्षणाच्चतुरंगुलम्।
क्षौमादिभिर्वेणिकया सिद्धैर्मंत्रैश्च मंत्रयेत् ॥ ६ ॥
अम्बुवत्सेतुबन्धेन स्तभ्यते विषमं विषम्।

सर्पदंश होतांच तात्काळ त्या दंशाच्या वर चार अंगुळांवर रेशमाच्या गोफानें बांधावें, आणि सिद्धमंत्रानें त्याजवर मंत्र घालावा. म्हणजे बांध घालून पाणी आडविल्याप्रमाणें विषाचा प्रतिबंध होतो.

नक्तमालफलव्योषबिल्वमूलनिशाद्वयम् ॥ ७ ॥
सौरसं पुष्पमाजं वा मूत्रं बोधनमञ्जनम्।

करंजाचें बी, सुंठ, मिरें, पिंपळी, बेलाचें, मूळ, हळद, दारुहळद, चिरफळाचीं फुलें व शेळीचें मूत ह्यांचें अंजन साप चावलेल्या मनुष्याला शुद्धीवर आणतें.

वन्ध्याककोंटकीमूलं छागमूत्रेण भावितम् ॥ ८ ॥
नस्यं काञ्जिकसंपिष्टं विषोपहतचेतसः ।

वांझकटोंलीच्या मुळाला शेळीच्या मुताची भावना देऊन तें मूळ कांजींत वाटून सर्पदंशानें बेशुद्ध झालेल्या मनुष्याच्या नाकांत घालावें.

श्वेतामूलं शमीमूलमीश्वरीमूलमेव च ॥ ९ ॥
आदालिका तथा पाठा पृथग्दष्टकबान्धवाः ।

पांढऱ्या गोकर्णीचें मूळ, शमीचें मूळ, शिवालिंगीचें मूळ, आदालिका व पहाडमूळ ही एक एक वनस्पती दंश झालेल्या मनुष्याला बंधूप्रमाणें साहाय्य करणारी आहे.

कुलीकमूलनस्येन कालदष्टोऽपि जीवति ॥ १० ॥

कुलीकाच्या मुळाचें नस्य केलें असतां कालसर्प चावला असला तरी तो मनुष्य जगतो.

जलेन जांगलीकन्दं नस्यं सर्पविषापहम् ।
वारिणा टङ्कणं पीतमथवाऽर्कस्य मूलकम् ॥ ११ ॥

जांगलीचा कांदा (कापूरकाचरीचा कांदा) पाण्यांत उगाळून त्याचें नस्य करावें. तें सापाच्या विषाचा नाश करितें. त्याचप्रमाणें टाकणखार पाण्यांतून प्यावा किंवा रुईचें मूळ पाण्यांत उगाळून प्यावें. तें सापाच्या विषाचा नाश करितें.

धुरी.

कपोतविण्मर्त्यशिरोरुहाणि
सगोविषाणं शिखिपिच्छकाग्रम् ।
यवस्य धान्यस्य तुषाश्च बीजं
कार्पासजं वाऽप्युषिताश्च मालाः ॥ १ ॥
इत्यौषधीभिः परिकल्पितोत्तमो
धूपोऽगदः स्याद् भुजगैरमुक्तः ।
गृहे विधेयः कुशलैरनेन
नश्यन्ति सर्पाश्च तथाऽऽखवश्च ॥ २ ॥

पारव्याची विष्ठा, मनुष्याच्या डोकीचे केस, गाईचें शिंग, मोराच्या पिसाचे शेंडे, सातूचा कोंडा, कापसाचें बी व शिळ्या फुलांच्या माळा, ह्या औषधांची धुरी दिली असतां तो मनुष्य सापाच्या विषापासून मुक्त होतो. ह्या अगदाची घरामध्यें धुरी करावी म्हणजे साप व उंदीर नाहींसे होतात.

सातलाफलफेनेनांजनं कृत्वा सर्पविषं नश्यति ।

शिकेकाईच्या फळाच्या फेसाचें अंजन करावें. म्हणजे सापाचें विष उतरतें.

मंत्र.

ॐ फ्लुः सर्पकुलाय स्वाहा, अनेन मंत्रेण सप्तवारम-
भिमंत्रितां मृत्तिकां गृहमध्ये क्षिपेत्सर्पाः पलायन्ते ।

'ॐ फ्लुः सर्पकुलाय स्वाहा' ह्या मंत्रानें मंतरलेली माती घरांत टाकावी. म्हणजे साप पळून जातात.

कालवज्राशनी रस.

पारदं गन्धकं तुत्थं टङ्कणं रजनी समम् ।
देवदाल्या द्रवैर्मर्द्यं दिनं शुष्कं तु भक्षयेत् ।
कालवज्राशनिर्नाम रसः सर्वविषापहः
नरमूत्रं पिबेच्चानु कालदष्टोऽपि जीवति ॥ २ ॥

पारा, गंधक, मोरचूत, टाकणखार व हळद हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा देवडांगरीच्या रसांत एक दिवस खल करून वाळल्यावर हा रस सेवन करावा. हा कालवज्राशनि नांवाचा रस सर्व विषांचा नाश करितो. हा रस देऊन त्याजवर मनुष्याचें मूत पाजावें. म्हणजे कालसर्प चावला असला तरी जगतो.

दूषीविषचिकित्सा.

दूषीविषार्तं सुस्विन्नमूर्ध्वं चाऽधश्च शोधितम् ।
पाययेदगदं मुख्यमिमं दूषीविषापहम् ॥ १ ॥

दूषीविषाची बाधा झालेल्या मनुष्याला वमन-विरेचनानें शोधन करून मुख्यतः दूषीविषनाशक अगद पाजावा.

पिप्पली धान्यकं मांसी लोध्रमेला सुवर्चिका ।
मरिचं वालकं चैला तथा कनकगैरिकम् ।
क्षौद्रयुक्तः कषायोऽयं दूषीविषमपोहति ॥ २ ॥

पिंपळी, धने, जटामांसी, लोध्र, वेलदोडे, सज्जिखार, मिरीं, वाळा, निळीचें बीं व सोनकाव ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो दूषीविषाचा नाश करितो.

कृत्रिम विषाची चिकित्सा.

कृत्रिमं तु विषं ख्यातं पक्षान्मासाद्विबाधते ।
आलस्यं कुरुते जाड्यं कासश्वासौ बलक्षयम् ॥ १ ॥
रक्तस्रावो ज्वरः शोफः पीतचक्षुश्च लक्षयेत् ।

कृत्रिम विष पंधरा दिवसांनीं किंवा महिन्यानें पीडा करितें. तें आळस, जडत्व, खोकला, श्वास, अशक्तपणा, रक्तस्राव, ज्वर, सूज व डोळे पिवळे होणें हे विकार करितें.

शर्कराचूर्णसंयुक्तं चूर्णं ताप्यसुवर्णयोः ॥ २ ॥
लेहः प्रशमयत्युग्रं नानायोगकृतं विषम् ।

सुवर्णभस्म व सुवर्णमाक्षिक ह्यांचें मिश्रण साखरेशीं चाटावयास द्यावें. तें अनेक योगांनीं बनविलेल्या विषाचा नाश करितें.

पुत्रजीवस्य मज्जां च निष्कमात्रां गवां पयैः ॥ ३ ॥
पिष्ट्वा चोग्रं गरं हन्यान्नानायोगकृतं विषम् ।

पुत्रजीवाच्या फळांतील बियांचें तीन मासे चूर्ण गाईच्या दुधांतून द्यावें. तें उग्र गराचा व अनेक योगांनीं बनविलेल्या विषाचा नाश करितें.

गृहधूमं जलैः पिष्ट्वा तण्डुलीमूलतुल्यकम् ॥ ४ ॥
कल्काच्चतुर्गुणं चाऽऽज्यं घृतात्क्षीरं चतुर्गुणम् ।
घृतशेषं पचेत्सर्वं पिबेत्सर्वगरापहम् ॥ ५ ॥

घरोसा व तांदुळजाच्या मुळाचें चूर्ण समभाग घेऊन त्यांचा कल्क करून त्याच्या चौपट तूप व तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें. तें तूप सर्व गरांचा नाश करितें.

पारावतामिषसटीपुष्कराह्वशृतं हिमम् ।
गरतृष्णारुजाकासश्वासहिध्माज्वरापहम् ॥ ६ ॥

पारव्याचें मांस, कचोरा व पोखरमूळ ह्यांचा काढा थंड झाल्यावर प्यावा. तो गर, तहान, शूळ, कास, श्वास, उचकी व ज्वर ह्यांचा नाश करितो.

गरनाशन रस.

शुद्धसूतं मृतं स्वर्णं संशुद्धं हेममाक्षिकम् ।
त्रयाणां गन्धकं तुल्यं मृद्यात्कन्याद्रवैर्दिनम् ॥ १ ॥
तच्छुष्कं ससितक्षौद्रं माषैकं लेहयेत्सदा ।
वह्निमूलं शृतं क्षीरैरनु स्याद्गरनाशनम् ॥ २ ॥

शुद्धपारा, सुवर्णभस्म व शुद्ध सुवर्णमाक्षिक, हीं तीन औषधें समभाग आणि तिहींच्याबरोबर शुद्ध गंधक घेऊन त्यांचा कोरफडीच्या रसांत एक दिवस खल करावा. वाळल्यावर एक मासाभर मध व खडीसाखर यांबरोबर सेवन करावा. आणि त्याजवर चित्रकमूळ घालून शिजविलेलें दूध प्यावें. म्हणजे गराचा नाश होतो.

नखदंतविषचिकित्सा.

पिचुमन्दशमीवटकल्कयुतं क्थितं जलमाशु विलोडनतः ।
नखदन्तविषाणि निहंति नृणां विषमाण्यखिलान्यपि सत्यमिदम्

कडु निंबाची साल, शमीची साल व वडाच्या पारंब्या ह्यांच्या कल्काचा काढा करून त्यानें व्रण धुतले असतां सर्व नखदंतसंबंधी विषांचा नाश होतो, हें खरें आहे.

उंदराच्या बिषाची चिकित्सा.

आगारधूममञ्जिष्ठारजनीलवणोत्तमैः ।
लेपो जयत्याखुविषं कोशातक्यथवा सिता ॥ १ ॥

घरोसा, मंजिष्ट, हळद, आणि सेंधेलोण ह्यांचा लेप उंदराच्या विषाचा नाश करितो. किंवा कडुदोडका व साखर ह्यांचा लेपही उंदराच्या विषाचा नाश करितो.

उरगेण विनिर्मुक्तनिर्मोकधूमसेवनात् ।
पथ्याशी त्रिदिनं धूमो भवेदाखुविषापहः ॥ २ ॥

सापाच्या कातीची धुरी तीन दिवस घेऊन पथ्य करावें. म्हणजे उंदराच्या विषाचा नाश होतो.

कुष्ठं वचामदनकोशवतीफलेन
संयोजितं तदिति चूर्णमिदं चतुर्णाम् ।
गोमूत्रपीतमखिलाखुविषं निहन्ति
कोशातकीक्कथनमापिबतोऽथ वाऽपि ॥ ३ ॥

कोष्ट, वेखंड, गेळफळ व कडू दोडका ह्या चार औषधांचें चूर्ण

गोमूत्रांतून प्यावें. तें सर्व उंदराच्या विषांचा नाश करितें. किंवा तुसत्या कडू दोडक्याचा काढा प्यावा. तोही उंदराच्या विषाचा नाश करितो.

तुलसीरसेन गोदन्तशिलाभ्यां क्षुरेण
प्रच्छिद्य लेपः कार्यो विषं नश्यति ॥

उंदराच्या दंशावर फासण्या टाकून त्याजवर गाईचा दांत व मनशीळ ह्यांचा तुळशीच्या रसांत लेप करावा. म्हणजे विषाचा नाश होतो.

अथ वा चित्रकमूलचूर्णं तैले विपाच्य मस्तके क्षुरेण
प्रच्छिद्य शिरसि ब्रह्मरन्ध्रे मर्दनं कृत्वाऽऽखुविषं नश्यति ॥

किंवा चित्रकमूळ तेलांत टाकून तेल कढवावें. नंतर मस्तकावरील टाळूवरचे केस काढून त्या ठिकाणीं फासण्या टाकून त्या ठिकाणीं तें तेल चोळावें. म्हणजे उंदराच्या विषाचा नाश होतो.

चिञ्चाफलसमायुक्तं गृहधूमं पलार्धकम् ।
पुराणाज्येन सप्ताहं लिहेदाखुविषं हरेत् ॥ १ ॥

चिंचेचा गर व दोन तोळे घरोसा जुन्या तुपांतून सात दिवस खावा. तो उंदराच्या विषाचा नाश करितो.

रस.

रसं गन्धं विषं चैव त्र्यूषणं टङ्करोहिणी ।
पुनर्नवारसैर्मर्द्यं गोमूत्रे च द्विगुञ्जकम् ॥ १ ॥
पिबेदाखुविषार्तानां सर्वं हरति तद्विषम् ।
विषदष्टोद्भवानन्यान्हन्यादाखुविषान्तकः ॥ २ ॥

पारा, गंधक, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, टाकणखार, कुटकी, ह्यांचा पुनर्नव्याच्या रसांत खल करून दोन गुंजांप्रमाणें गोमूत्रांतून उंदराच्या विषानें पीडलेल्या मनुष्याला द्यावा. तो सर्व विषाचा नाश करितो. हा आखुविषांतक रस दुसऱ्याही विषदंशाच्या विकारांचा नाश करितो.

रसगन्धनिशाबन्धुगृहधूपशिरीषजम् ।
बीजं दिनकरक्षीरैर्मर्दयित्वा विलेपयेत् ।
विशेषान्मूषकविषं हन्यादन्यान्विषोद्भवान् ॥ ३ ॥

पारा, गंधक, हळद, दुपारीचें बी, घरोसा व शिरसाचें बी ह्यांचा रुईच्या चिकांत खल करून त्यांचा दंशावर लेप करावा. तो विशे-

षतः उंदराच्या विषाचा नाश करितो. आणि दुसऱ्याही विषजन्य दंशांचा नाश करितो.

विंचवाच्या विषाची चिकित्सा.

जीरकस्य कृतः कल्को घृतसैन्धवसंयुतः ।
सुखोष्णो मधुना लेपो वृश्चिकस्य विषं हरेत् ॥ १ ॥

जिऱ्याच्या कल्कांत तूप व सैंधव घालून सुखोष्ण असा मधाशीं लेप करावा. तो विंचवाच्या विषाचा नाश करितो.

गन्धमाघ्राय मृदितं सूर्यावर्तदलस्य तु ।
वृश्चिकेन नरो विद्धः क्षणाद्भवति निर्विषः ॥ २ ॥

निळ्या माक्याचा पाला हातावर चोळून त्याचा वास घ्यावा. म्हणजे क्षणांत विंचवाचें विष उतरतें.

यः कासमर्दपत्रं वदने निक्षिप्य कर्णफूत्कारम् ।
मनुजो ददाति शीघ्रं जयति विषमाशु वृश्चिकानां सः॥१॥

जो मनुष्य कासविंद्याचें पान चावून विंचू चावलेल्या मनुष्याच्या कानांत फुंकतो, तो विंचवाच्या विषाला त्वरित जिंकतो.

अजाक्षीरेण संपिष्टा शिरीषफलमिश्रिता ।
उपकुल्या विषं हन्ति वृश्चिकस्य प्रलेपतः ॥ १ ॥

शिरसाचें फळ व पिंपळी शेळीच्या दुधांत वाटून त्याचा विंचू चावलेल्या ठिकाणीं लेप करावा. तो विंचवाच्या विषाचा नाश करितो.

कार्पासपत्रैः संपिष्टैराज्यलेपो विषापहः ।
वृश्चिकस्याथ वा वत्सनागलेपः प्रशस्यते ॥ २ ॥

कापशीचीं पानें तुपांत वाटून लेप करावा, अथवा बचनागाचा लेप करावा. तो विंचवाचें विष नष्ट करण्याविषयीं प्रशस्त आहे.

मनःशिलाकुष्ठकरंजबीजशिरीषकाश्मीरभवैः समांशैः ।
विनिर्मितास्ये विधृता च लिप्ता संहारिणी वृश्चिकवैकृतस्य॥३

मनशीळ, कोष्ट, करंजाचें बी, शिरसाचें बी व शिवणीचें बी ह्यांची गोळी करून तोंडांत धरावी व दंशाच्या ठिकाणीं त्याचा लेप करावा. ही विंचवाच्या विषासंबंधीं विकाराचा नाश करिते.

मातुलुङ्गस्य मूलं तु रविवारे समुद्धरेत् ।
उत्तराभिमुखेनैव ह्रीमन्त्रोच्चारणात्स्पृशेत् ॥ ४ ॥
वामांगे दक्षिणे दष्टे वामदष्टे च दक्षिणे ।

सप्तधा मार्जनेनैव विषं वृश्चिकजं हरेत् ॥ ५ ॥

महाळुंगाच्या झाडाचें मूळ रविवारीं ऱ्हीं मंत्राचा उच्चार करून झाडाला स्पर्श करून काढून आणावें. नंतर डाव्या बाजूला विंचू चावला असला तर उजव्या बाजूवरून आणि उजव्या बाजूस चावला असेल तर डाव्या बाजूवरून तें सात वेळ झाडावें म्हणजे विंचवाचें विष उतरतें.

श्वेतं पुनर्नवामूलं रविवारे समुद्धरेत् ।
कार्पासमूलं चर्वित्वा विषं वृश्चिकजं हरेत् ॥ ६ ॥

पांढऱ्या वसूची मुळी व कापशीची मुळी रविवारीं काढून आणून चावून खावी. ती विंचवाच्या विषाचें हरण करिते.

ग्राह्यं हंसपदीमूलं प्रातरादित्यवासरे ।
मुखैस्तन्निष्कृतिः कर्णे विषं वृश्चिकजं हरेत् ॥ ७ ॥

रविवारीं तांबड्या लाजाळूची मुळी आणून ती तोंडानें चावून कानांत घालावी. ती विंचवाच्या विषाचें हरण करिते.

मंत्रविधि.

ॐ क्षः फट् स्वाहाः । अनेन मन्त्रेणापो मार्जयेत् ।

'ॐ क्षः फट् स्वाहा' ह्या मंत्रानें पाणी शिंपावें.

मंत्र.

आदित्यरथवेगेन विष्णुबाणबलेन च ।
गरुडपक्षनिपातेन भूम्यां गच्छ महाविष ॥ १ ॥

सूर्यरथाच्या वेगानें, विष्णूच्या बाणाच्या सामर्थ्यानें, व गरुडाच्या पंखाच्या ताडनानें हे महाविषा! तूं भूमीमध्यें जा.

पानीयपिष्टजेपालकल्कलेपेन सर्वथा ।
विषं वृश्चिकविद्धस्य भस्मीभवति तत्क्षणात् ॥ २ ॥

जेपाळाचें बी पाण्यांत उगाळून त्याचा लेप करावा, म्हणजे विंचवाच्या विषाचा क्षणांत नाश होतो.

नवसागरहरिताले पिष्टे तोयेन लेपनाद्दंशे ।
तत्क्षणमेव हि जयतो वृश्चिकविद्धस्य दुर्धरक्ष्वेडम् ॥ ३ ॥

नवसागर व हरताळ पाण्यांत वाटून दंशावर लेप करावा. तो विंचवाच्या दुर्धर विषाचा तत्काळ नाश करतो.

उल्लीपाषाणमादाय निम्बुनीरेण संयुतम् ।
दंशस्थाने लेपनं स्याद्विषं वृश्चिकजं हरेत् ॥ ४ ॥

लिंबाच्या रसांत सोमल उगाळून त्याचा दंशाचे ठिकाणीं लेप करावा. तो विंचवाच्या विषाचा नाश करितो.

किडे-जळवादिकांच्या विषाची चिकित्सा.

कटभ्यर्जुनशैरीषशेलुक्षीरिद्रुमत्वचाम् ।
कषायकल्कचूर्णाः स्युः कीटलूताव्रणापहाः ॥ १ ॥

पांढरी किन्हई (किंवा पांढरी गोकर्णी) अर्जुनसादडा, शिरस, भोकर, व क्षीरी वृक्षांच्या सालीं ह्यांचा काढा, कल्क, व चूर्ण हे योग किडे व लूता (कोळी वगैरे) ह्यांच्या दंशानें झालेल्या व्रणांचा नाश करितात.

वचाहिंगुविडङ्गानि सैन्धवं गजपिप्पली ।
पाठाप्रतिविषाव्योषं कश्यपेन विनिर्मितम् ॥ २ ॥
दशांगमगदं पीत्वा सर्वकीटविषं जयेत् ।
कीटदष्टक्रियाः सर्वाः समानाः स्युर्जलौकसाम् ॥ ३ ॥

वेखंड, हिंग, वावडिंग, सैंधेलोण, गजपिंपळी, पहाडमूळ, अतिविष, सुंठ, मिरें व पिंपळी हा कश्यपानें सांगितलेला दशांग अगद प्याला असतां सर्व किड्यांच्या विषाचा नाश होतो. किड्याच्या दंशावर जे उपचार सांगितले आहेत, ते सर्व जळवाच्याही दंशावर सारखे उपयोगी आहेत.

गांजणीच्या विषाची चिकित्सा.

मरीचं नागरोपेतं सिन्धुसौवर्चलान्वितम् ।
फणिवल्लीरसैर्लेपाद्धन्ति तद्धरटीविषम् ॥ १ ॥

मिरें, सुंठ, सैंधेलोण व पादेलोण ह्यांचा विड्याच्या पानांच्या रसांतून लेप केला असतां गांजणीचें विष नाश पावतें.

लूताविषाची चिकित्सा.

रजनीद्वयमञ्जिष्ठापतङ्गगजकेसरैः ।
शीताम्बुपिष्टैरालेपः सद्यो लूताविषापहः ॥ १ ॥

हळद, दारुहळद, मंजिष्ट, पतंग व नाकेशर हीं औषधें थंड पाण्यांत वाटून त्याचा लेप करावा. तो लूतांच्या (कोळयांच्या) विषाचा नाश करितो.

गिरिकर्णीद्वयं शेलुः पाटला द्वे पुनर्नवे ।
कपित्थश्च शिरीषश्च लेपो लूताविषापहः ॥ २ ॥

दोन्ही गोकर्णी (पांढरी व काळी), भोकरी, पाडळ, दोन्ही वसू (पांढरी व तांबडी), कवठ व शिरस ह्यांच्या सालीचा लेप लूताविषाचा नाशक आहे.

बेडकाच्या विषाची चिकित्सा.

शिरीषबीजैः कुलिशद्रुमस्य क्षीरेण पिष्टैः कृतलेपनानाम् ।
विषं विनाशं व्रजति क्षणेन मण्डूकदंशप्रभवं नराणाम् ॥ १ ॥

शिरसाचें बीं निवडुंगाच्या चिकांत वाटून त्याचा दंशावर लेप करावा. म्हणजे बेडकाचें विष तत्काळ उतरतें.

भृंगी माशाच्या विषाची चिकित्सा.

कृष्णवेत्रस्य निष्काथे कल्को घृतविमिश्रितः ।
भृङ्गीमत्स्यविषं हन्ति धूमो वा बर्हिपक्षजः ॥ १ ॥

काळ्या वेताच्या काढ्यांत त्याचाच कल्क व तूप घालून तो द्यावा. तो भृंगी माशाच्या विषाचा नाश करितो. किंवा मोराच्या पंखाची धुरी द्यावी. तीही भृंगीमाशाच्या विषाचा नाश करिते.

गोमेच्या विषाची चिकित्सा.

लेपः प्रदीपतैलस्य खर्जूरविषनाशनः ।
हरिद्राद्वयलेपो वा सगैरिकमनःशिलः ॥ १ ॥

कढविलेल्या तेलाचा लेप करावा; तो गोमेच्या विषाचा नाश करतो. अथवा हळद व दारुहळद ह्यांचा मनशीळ व सोनकाव मिसळून लेप करावा. तोही गोमेच्या विषाचा नाश करतो.

भ्रमरविषचिकित्सा.

नागरं गृहकपोतपुरीषं बीजपूरकरसो हरितालम् ।
सैन्धवं च विनिहन्ति विलेपादाशु भृङ्गजनितं विषमेतत् ॥ १

सुंठ, कबुतराची विष्ठा, हरताळ व सैंधेलोण, हीं औषधें महाळुंगाच्या रसांत खलून त्याचा लेप करावा. तो भुंग्याच्या विषाचा त्वरित नाश करतो.

मुंग्यादिकांच्या विषाची चिकित्सा.

पिपीलिकाभिर्दष्टानां मक्षिकामशकैस्तथा ।
गोमूत्रेण वरालेपः कृष्णवल्मीकमृत्कृतः ॥ १ ॥

मुंग्या, माशा अथवा डास चावले असतां गोमूत्रांतून त्रिफळा व वारुळाची माती लावावी.

माशीच्या विषाची चिकित्सा.

सोमवल्कोऽश्वकर्णश्च गोजिह्वा हंसपद्यपि ।
रजन्यौ गैरिकं लेपो मक्षिकापिटकापहः ॥ १ ॥

रिठा, राळेचा वृक्ष, पाथरी, तांबडी लाजाळू, हळद, दारुहळद व सोनकाव यांचा लेप माशीच्या विषानें उठणाऱ्या फोडांचा नाश करितो.

कुत्र्याच्या विषाची चिकित्सा.

काकोदुम्बरिकामूलं धत्तूरफलसंयुतम् ।
पीतं तण्डुलतोयेन सारमेयविषापहम् ॥ १ ॥

काळ्या उंबराचें मूळ व धोतऱ्याचें फळ हीं दोन औषधें तांदुळाच्या धुवणांत वाटून प्यावीं. हा योग कुत्र्याच्या विषाचा नाश करितो.

पारस्करफलं सेव्यं क्रमवृद्धं दिने दिने ।
सारमेयविषं हन्ति मासेन न हि संशयः ॥ २ ॥

कुचल्याची बी दररोज वाढत्या प्रमाणांत खावी, म्हणजे ती एक महिन्यानें कुत्र्याच्या विषाचा नाश करिते, ह्यांत संशय नाहीं.

पिष्ट्वाऽपामार्गमूलं तु कर्षैकं मधुना लिहेत् ।

आघाड्याच्या मुळ्यांचें चूर्ण एक तोळा प्रमाणानें मधांतून द्यावें.

श्वदंष्ट्राजं विषं हन्यात्कुमारीदलसैन्धवम् ॥ ३ ॥
दंशस्थाने बन्धयेत्तु त्रिदिनान्ते सुखावहम् ॥ ४ ॥

कोरफडीच्या पातीवर सैंधेलोण घालून ती कुत्रें चावल्याठिकाणीं तीन दिवस बांधावी; म्हणजे सुख वाटतें.

कस्तूरीबब्बूलपत्ररसो गोघृते पाने देयः ।
अथवा शतावरीमूलरसो गोदुग्धेन
सह पाने देयः शुनो विषं नश्यति ॥

कस्तूरी व बाभळीच्या पानाचा रस हीं गाईचे तुपाशीं द्यावीं. अथवा शतावरीरस गाईच्या दुधांतून पिण्यास द्यावा. म्हणजे कुत्र्याचें विष नाश पावतें.

श्वानदंष्ट्राविषं हन्ति लेपात्कुक्कुटविष्ठया ।

कोंबड्याची विष्ठा दंशावर लावावी. तीही कुत्र्याच्या विषाचा नाश करिते.

गुडतैलार्कदुग्धं वा लेपाच्छ्वानविषं हरेत् ॥ ५ ॥

गूळ, तेल व रुईचा चीक ह्यांचा लेप करावा; तोही कुत्र्याच्या विषाचा नाश करितो.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाची चिकित्सा.

तैलं तिलानां पललं गुडं च क्षीरं तथाऽऽर्कं सममेव पीतम् ।
आलर्कमुग्रं विषमाशु हन्ति सद्योभवं वायुरिवाभ्रवृन्दम् ॥१॥

तिळाचें तेल, तिळकूट, गूळ व रुईचा चीक हे जिन्नस समभाग घेऊन प्राशन करावे. म्हणजे वायु जसा मेघसमूहाचा नाश करितो, तद्वत् हा योग पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाचा तत्काळ नाश करितो.

विषाची सामान्य चिकित्सा.

सैन्धवं मरिचं तुल्यं निम्बबीजं समीकृतम् ।
मधुसर्पिर्युतं हन्ति विषं स्थावरजंगमम् ॥ १ ॥

सेंधेलोण, मिरें व कडुनिंबाच्या बिया समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून तें तूप व मध यांशीं खावें. तें स्थावर व जंगम विषाचा नाश करितें.

अगारधूमो महिषाक्षयुक्तः सवाजिगन्धानततण्डुलीयः ।
गोमूत्रपिष्टोऽप्यगदो निहन्ति विषाणि च स्थावरजंगमानि ॥२॥

घरोसा, गुग्गुळ, अश्वगंध, तगर व तांदुळजाचें मूळ ह्यांचें चूर्ण गोमूत्रांतून द्यावें. हा अगद स्थावरजंगम विषांचा नाश करितो.

मयूरपिच्छेन च तण्डुलीयकं काकाण्डयुक्तं प्रपिबेदनल्पम् ।
विषाणि च स्थावरजंगमानि सोपद्रवाण्यप्यचिरेण हन्ति ३॥

मोराचीं पिसें, तांदुळजाचें मूळ व बकाणनिंबाच्या बिया ह्यांचें चूर्ण बरेंचसें प्राशन करावें. तें उपद्रवयुक्त अशा स्थावर-जंगम विषांचा उपद्रवांसह त्वरित नाश करितें.

प्राचेतस चूर्ण.

सप्तपर्णात्कुटजात्सनिम्बाद्दामयोशीरनतानि ताप्यम् ।
रोध्रं विदध्यान्नवमं नवांगं प्राचेतसं चूर्णमुदाहरन्ति ॥ १ ॥

लोहेऽथहैमे त्वथ राजते वा
स्थितं सदा सद्मनि भूपतीनाम् ।
क्षौद्रेण लीढं सचराचराणि
विषाणि हन्याद् भुवि मानवानाम् ॥ २ ॥

सातविणीची साल, कुडयाची साल, कडुनिंबाची साल, नागरमोथे, कोष्ट, वाळा, तगर, सुवर्णमाक्षिक व लोध्र ह्या नऊ जिनसांच्या चूर्णाला नवांग प्राचेतस चूर्ण म्हणतात. हें चूर्ण लोहपात्रांत, सुवर्णपात्रांत किंवा रौप्यपात्रांत घालून राजे लोकांनीं राजवाड्यांत ठेवून मधाशीं द्यावें. तें ह्या पृथ्वीवरील मनुष्याच्या स्थावर-जंगम सर्व विषांचा नाश करितें.

श्लेष्मातकत्वक्क्षवकं गुडूची नृपद्रुमत्वग्बृहतीद्वयं च ।
एषोऽगदः सर्वविषाणि हन्यादास्तीकनाम्ना मुनिना प्रदिष्टः ३

भोकरीची साल, नाकशिंकणी (किंवा पांढरा आघाडा), गुळवेल, बाहव्याची साल, रिंगणमूळ व डोरलीमूळ, ह्यांचें चूर्ण करावें. हा अस्तिक मुनीनें सांगितलेला अगद सर्व विषांचा नाश करितो.

कृकलासपदं यस्तु सितवस्त्रेण वेष्टयेत् ।
बाहौ बद्ध्वा विषं हन्ति विषं भुक्त्वा न बाधते ॥ ४ ॥

सरड्याचा पाय पांढऱ्या वस्त्रांत गुंडाळून दंडांत बांधावा. तो विषाचा नाश करितो. व विष खाल्लें असतां त्याची बाधा होत नाहीं.

यः पिबति पुष्यदिवसे जलपिष्टं सितपुनर्नवामूलम् ।
तत्संनिधौ न वर्षं वृश्चिकभुजगाः प्रसर्पन्ति ॥ ५ ॥

जो मनुष्य पुष्य नक्षत्राच्या दिवशीं पांढऱ्या घेटुळीची मुळी पाण्यांत उगाळून पितो, त्याच्याजवळ एक वर्षभर विंचू किंवा साप हे येत नाहींत.

मसूरं निम्बपत्राभ्यां पिबेन्मेषगते रवौ ।
अब्दमेकं न भीतिः स्याद्विषार्तस्य न संशयः ॥ ६ ॥

सूर्य मेष राशीवर असतां कडुलिंबाचीं पानें व मसुरा एकत्र त्याचें प्राशन करावें; म्हणजे विषार्ताला एक वर्षभर करून भीति नसते.

गरुडांजन.

सूतं चूर्णमगारधूममलं प्रत्येकगद्याणकं
धत्तूरस्य रसेन मर्दितमलं पश्चाच्छतं भास्करम् ।

जेपालं मरिचं चतुःशतयुतं वातारिबीजंलस-
युक्तं षष्टिसु खल्विदं दृढतरैर्जम्बीरनीरैर्वरैः ॥ १ ॥
कुर्यान्माषवदाकृतिं च वटिकां छायासु शुष्कीकृतां
रात्र्यन्धं ग्रहसर्पसंधिसकलं शीतज्वरं दुर्धरम् ।
सन्नेत्रांजनमात्रकं च भुवने चाजीर्णदोषापहं
नश्यन्ति प्रबलं महागुणयुतं श्रीपूज्यपादोदितम् ॥२॥

पारा, कळीचा चुना व घरोसा हीं औषधें सहा सहा मासे ह्यांचा धोतऱ्याच्या रसांत खल करून नंतर स्फटिक शंभर, जेपाळाच्या बिया चारशें, मिरें चारशें आणि एरंड्याच्या बिया साठ ह्यांचा इड-निंबाच्या रसांत खल करून त्याच्या उडदाएवढ्या गोळ्या करून सावलींत वाळवाव्या. ह्याचें अंजन केलें असतां तें रातांधळ, ग्रह-बाधा, सर्पदंश, संधिरोग, दुर्धर शीतज्वर, व अजीर्णदोष ह्यांचा नाश करितें. हें महागुणयुक्त अंजन श्रीपूज्यपादानें सांगितलें आहे.

मृत्युच्छर्दिघृत.

अभयां रोचनां कुष्ठमर्कपुष्पं तथोत्पलम् ।
नलवेतसमूलानि गरलं सुरसां तथा ॥ १ ॥
सकलिङ्गांसमंजिष्ठामनन्तां च शतावरीम् ।
शृङ्गाटकं समङ्गां च पद्मकेसरमित्यपि ॥ २ ॥
कल्कीकृत्य पचेत्सर्पिः पयो दद्याच्चतुर्गुणम् ।
सम्यक्पक्वेऽवतीर्णे च शीते तस्मिन्विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
सर्पिस्तुल्यं भिषक् क्षौद्रं कृतरक्षं निधापयेत् ।
विषाणि हन्ति दुर्गाणि गरदोषकृतानि च ॥ ४ ॥
स्पर्शाद्धन्ति विषं सर्वं गरैरुपहतत्वचम् ।
संयोगजं तमः कण्डूं मांससादं विसंज्ञताम् ॥ ५ ॥
नाशयेदञ्जनाभ्यङ्गपानबस्तिषु योजितम् ।
सर्पकीटाखुलूतादिदष्टानां विषहृत्परम् ॥ ६ ॥

हिरडे, वंशलोचन, कोष्ठ, रुईचें फूल, कमळ, देवनळ, वेताचें मूळ, बचनाग, तुळस, इंद्रजव, मंजिष्ट, उपलसरी, शतावरी, शिंगाडे, काजाळू, कमळांतील केसर ह्यांचा कल्क करून त्यांत चौपट तूप व तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें. तें तयार झाल्यावर खालीं उतरून ठेवावें. नंतर तें थंड झाल्यावर त्यांत तुपाच्या

बरोबरीनें मध घालून जपून ठेवावें. हें तूप गरदोषापासून होणाऱ्या दुर्धट विषबाधेचा नाश करितें. गरदोषानें ज्याची त्वचा बिघडली आहे त्याच्या अंगाला हें लावलें असतां सर्व विषांचा नाश करितें. अंजन, अभ्यंग, प्राशन व बस्ती ह्या क्रमानें योजना केली असतां हें औषध संयोगानें झालेलें विष, डोळ्यापुढें अंधारी येणें, कंडू, मांसक्षय, व अग्निष्टपणा ह्यांचा नाश करितें. व साप, किडे, कोळी वगैरे प्राण्यांच्या दंशानें होणाऱ्या विषाचा नाश करण्याविषयीं हें फार उत्तम आहे.

पथ्यापथ्य.

शालयः षष्टिकाश्चैव कोरदूष्यप्रियंगवः ।
मुद्गा हरेणवस्तैलं सर्पिश्चापि नवं क्वचित् ॥ १ ॥
वार्ताकं कुलकं धात्री जीवन्ती तण्डुलीयकम् ।
भोजनार्थं विषार्तानां हितं पटुषु सैन्धवम् ॥ २ ॥

साठ्या साळी, हरीक, राळे, मूग, वाटाणे, तेल (क्वचित ताजें तूप), वांगीं, पडवळ, आवळे, हरणदोडी, तांदुळजा व सैंधेलोण हें विषरोग्याला पथ्य सांगितलें आहे.

विरुद्धाध्यशनक्रोधक्षुद्भयायासमैथुनम् ।
वर्जयेद्विषमुक्तोऽपि दिवा स्वप्नं विशेषतः ॥ ३ ॥

विरुद्ध अन्न, जेवण करून त्याजवर लागलीच जेवणें, रागावणें, क्षुधा आवरून धरणें, भीति, आयास, मैथुन व विशेषतः दिवसा निजणें हें विषरोग्यानें तरी वर्ज करावेंच, पण विषबाधेंतून मुक्त झालेल्या रोग्यानेंही तें वर्ज करावें.

वाजीकरण द्रव्याचें लक्षण.

यद्द्रव्यं पुरुषं कुर्याद्वाजीवत्सुरतक्षमम् ।
तद्वाजीकरमाख्यातं मुनिभिर्भिषजां वरैः ॥ १ ॥

जें द्रव्य मनुष्याला घोड्याप्रमाणें सुरतसामर्थ्य देतें, त्याला वाजीकरण द्रव्य असें म्हणतात, असें वैद्यश्रेष्ठ मुनींनीं सांगितलें आहे.

नपुंसकत्वाचें लक्षण.

क्लीबः स्यात्सुरताशक्तस्तद्भावः क्लैब्यमुच्यते ।
तच्च सप्तविधं प्रोक्तं निदानं तस्य कथ्यते ॥ १ ॥

जो मैथुनाला असमर्थ असतो त्याला नपुंसक असें म्हणतात. त्यांसंबंधीं जो धर्म त्याला नपुंसकत्व असें म्हणतात. तें नपुंसकत्व सात प्रकारचें आहे. त्याचें निदान आतां सांगतों.

तैस्तैर्भावैरहृद्यैस्तु रिरंसोर्मनसि क्षते ।
ध्वजः पतत्यतो नृणां क्लैब्यं समुपजायते ॥ २ ॥

रत होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाला त्या त्या अप्रिय गोष्टींनीं मनास धक्का बसला असतां त्याच्या ध्वजाचा भंग होतो, (लिंगोत्थान होत नाहीं). त्यामुळें त्याला नपुंसकत्व येतें.

द्वेष्यस्त्रीसंप्रयोगाच्च क्लैब्यं तन्मानसं स्मृतम् ।

आपणाशीं द्वेष करणाऱ्या स्त्रीशीं समागम केला असतां जें नपुंसकत्व येतें, त्याला मानसिक क्लैब्य असें म्हणतात.

कटुकाम्लैः सलवणैरतिमात्रोपसेवितैः ॥ ३ ॥
पित्ताच्छुक्रक्षयो दृष्टः क्लैब्यं तस्मात्प्रजायते ।

तिखट, आंबट, खारट, अशा प्रकारचे पदार्थ फार खाण्यानें पित्तप्रकोप होऊन धातूचा क्षय होतो. त्यामुळेंही नपुंसकत्व येतें.

अतिव्यवायशीलो यो न च वाजीक्रियारतः ॥ ४ ॥
ध्वजभंगमवाप्नोति स शुक्रक्षयहेतुकः ।

अति मैथुन करणाऱ्या पुरुषानें वाजीकरणप्रयोगांचें सेवन केलें नाहीं तर शुक्रक्षय होऊन त्याला नपुंसकत्व येतें.

महता मेढ्ररोगेण चतुर्थी क्लीबता भवेत् ॥ ५ ॥

चवथें नपुंसकत्व शिस्नाला एकादा मोठा रोग झाल्यामुळें येतें.

वीर्यवाहिशिराछेदान्मेहनानुन्नतिर्भवेत् ।

वीर्यवाहक शिरांचा छेद झाला असतां त्यानेंही नपुंसकत्व येतें.

बलिनः क्षुब्धमनसो निरोधाद् ब्रह्मचर्यतः ॥ ६ ॥
षष्ठं क्लैब्यं स्मृतं तत्तु शुक्रस्तम्भनिमित्तकम् ।

ज्या बलवान मनुष्याचें मन कामवासनेनें क्षुब्ध झालें आहे, त्यानें त्या वासनेचा रोध करून ब्रह्मचर्य धारण केलें असतां जें नपूंसकत्व येतें, तें शुक्रस्तंभापासून होणारें सहावें होय.

जन्मप्रभृति यत्क्लैब्यं सहजं तद्धि सप्तमम् ॥ ७ ॥

जें नपुंसकत्व जन्मापासून असतें, त्याला सहज नपुंसकत्व म्हणतात. तें सातवें. असे नपुंसकत्वाचे सात प्रकार आहेत.

असाध्य नपुंसकत्व.

असाध्यं सहजं क्लैब्यं मर्मच्छेदाच्च यद्भवेत् ।
साध्यानामवशिष्टानां कार्यो वाजीकरो विधिः ॥ १ ॥

जन्मतः असलेलें नपुंसकत्व व (शुक्रवह) मर्माचें छेदन झाल्यामुळें जें होतें तें, हीं दोन्हीं नपुंसकत्वें असाध्य आहेत. बाकीच्या राहिलेल्या साध्य नपुंसकत्वावर वाजीकरण उपचार करावे.

नपुंसकत्वाची चिकित्सा.

क्लैब्यानामिह साध्यानां कार्यो हेतुविपर्ययः ।
मुख्यं चिकित्सितं यस्मान्निदानपरिवर्जनम् ॥ १ ॥

रोगाला जें कारण त्याचा त्याग करणें हीच ज्या अर्थीं मुख्य चिकित्सा आहे त्या अर्थीं साध्य अशा नपुंसकत्वावर हेतुविपरीत चिकित्सा करावी.

वाजीकरणाचा विधि.

नरो वाजीकरान्योगान्सम्यक्शुद्धो निरामयः ।
सप्तत्यन्तं प्रकुर्वीत वर्षादूर्ध्वं तु षोडशात् ॥ १ ॥

निरोगी मनुष्यानें (अंतर्बाह्य) देहशुद्धि करून वयाच्या सोळाव्या वर्षापासून पुढें व सत्तर वर्षांपर्यंत वाजीकरणाचें सेवन करावें.

न चैव षोडशादर्वाक्सप्तत्याः परतो न च ।
आयुष्कामो नरः स्त्रीभिः संयोगं कर्तुमर्हति ॥ २ ॥

ज्याला आयुष्याची इच्छा आहे अशा मनुष्यानें सोळा वर्षांच्या आंत व सत्तर वर्षांच्या पुढें स्त्रीसंग करणें योग्य नाहीं.

क्षयवृद्ध्युपदंशाद्या रोगाश्चातीव दुर्जयाः ।
अकालमरणं च स्याद्भजतः स्त्रियमन्यथा ॥ ३ ॥
स्त्रीभजनविधिर्विस्तरतो रात्रिचर्यायां लिखितोऽस्ति तत्र द्रष्टव्यः

ह्या नियमाविरुद्ध स्त्रीसंग केला असतां क्षय, अंडवृद्धि, उपदंश वगैरे दुर्जय रोग होतात व अकालीं मृत्युही येतो. स्त्रीसेवनप्रकार मागें रात्रिचर्याप्रकरणांत सविस्तर सांगितला आहे, तेथें तो पहावा.

विलासिनामर्थवतां रूपयौवनशालिनाम् ।
नराणां बहुभार्याणां विधिर्वाजीकरो हितः ॥ ४ ॥
स्थविराणां रिरंसूनां स्त्रीणां वाल्लभ्यमिच्छताम् ।
योषित्प्रसङ्गात्क्षीणानां क्लीबानामल्परेतसाम् ॥ ५ ॥
हिता वाजीकरा योगाः प्रीत्यपत्यबलप्रदाः ।
एतेऽपि पुष्टदेहानां सेव्याः कालाद्यपेक्षया ॥ ६ ॥

धनवान, विलासी, रूप व तारुण्य ह्यांनीं संपन्न व ज्याला पुष्कळ स्त्रिया आहेत अशा पुरुषाला वाजीकरण विधि हितकारक आहे. त्याचप्रमाणें वृद्ध असून रत्याकांक्षा करणारे व स्त्रियांच्या प्रेमाची इच्छा करणारे, स्त्रीसंगानें क्षीण झालेले, तसेंच नपुंसक व धातुक्षीण अशा स्त्रीपुरुषांना वाजीकरणप्रयोग हितकारक आहेत. हा प्रीति, अपत्य व बल देणारा आहे. देशकालादिकांचा विचार करून हें पुष्ट मनुष्यानें देखील सेवन करावें.

वाजीकरण द्रव्यें.

भोजनानि विचित्राणि पानानि विविधानि च ।
वाचः श्रोत्राभिरामाश्च त्वचः स्पर्शसुखास्तथा ॥ १ ॥
यामिनी सेन्दुतिलका कामिनी नवयौवना ।
गीतं श्रोत्रमनोहारि ताम्बूलं मदिरा स्रजः ॥ २ ॥
गन्धा मनोज्ञा रूपाणि चित्राण्युपवनानि च ।
मनसश्चाप्रतीघातो वाजीकुर्वन्ति मानवम् ॥ ३ ॥

नाना प्रकारचीं पक्वान्नें, नाना तऱ्हेचे पेय पदार्थ, कानाला समाधान देणारी वाणी, त्वचेला सुखदायक असे (आलिंगनादि) स्पर्श, चंद्रयुक्त रात्र, नूतन यौवन प्राप्त झालेली स्त्री, कानाला मंजुळ लागणारें असें गाणें, विडा, मद्य, फुलांचे हार, मनाला उत्साह उत्पन्न करणारे सुवासिक पदार्थ व चित्रें, चित्रविचित्र फूलझाडांच्या बागा, आणि मनाला कोणत्याही प्रकारचा धक्का नसणें (मन सुप्रसन्न असणें) हे उपचार मनुष्याला वाजीकरण करितात.

पायस.

गवां विरूढवत्सानां सिद्धं पयसि पायसम् ।
तथा गोधूमचूर्णं च सितामधुघृतान्वितम् ।
भुक्त्वा हृष्यति जीर्णोऽपि दश दारान्व्रजत्यपि ॥ १ ॥

जिचा वत्स मोठा झाला आहे, अशा गाईच्या दुधाची तयार केलेली (आटीव) खीर, तसेंच तूप, मध व खडीसाखर ह्यांनीं मिश्र केलेला गव्हाचा रवा हें खाऊन वृद्धाला देखील कामवासना होते, व तो दहा स्त्रियांशीं समागमही करतो.

रसाला (श्रीखंड)

दध्नोऽर्धाढकमीषदम्लमधुरं खण्डस्य चन्द्रद्युतेः
प्रस्थं क्षौद्रपलं पलं च हविषः शुण्ठ्याश्चतुर्माषकान्।
तद्वन्माषचतुष्टयं मरिचतः कर्षं लवंगं तथा
धृत्वा शुक्लपटे शनैः करतलेनोन्मथ्य विस्रावयेत् ॥ १ ॥
मृद्भाण्डे मृगनाभिचन्दनरसस्पृष्टेऽगुरूद्धूपिते
कर्पूरेण सुगन्धितं तदखिलं संलोड्य संस्थापयेत्।
स्वस्यार्थे मथुरेश्वरेण रचिता ह्येषा रसाला स्वयं
भोक्तुं मन्मथदीपनी सुखकरी कान्तेव नित्यं प्रिया ॥२॥

किंचित् आंबटमधुरसें दहीं एकशें अठ्ठावीस तोळे, खडीसाखर चौसष्ट तोळे, मध चार तोळे, तूप चार तोळे, सुंठ चार मासे, मिरें चार मासे, लवंग एक तोळा, ह्यांपैकीं चूर्ण करावयाच्या सर्व जिनसांचें चूर्ण करून ते सर्व जिन्नस व दहीं ह्यांतून कस्तुरी व चंदन लावलेल्या व कृष्णागराची धुरी दिलेल्या एका मातीच्या भांड्यांत जाड व स्वच्छ फडक्यावर घालून तळहातानें मर्दन करून गाळावें. नंतर त्याला कापुराचा वास लावून ठेवावें. ही रसाळा (श्रीखंड) श्रीकृष्णानें स्वतःला खाण्याकरितां तयार केली होती. ही कामोद्दीपक व कांतेप्रमाणें नित्य प्रियकर अशी आहे.

शतावर्यादि चूर्ण.

शतावरीनागबलाविदारीत्रिकण्टकैरामलकीफलान्वितैः।
विचूर्णितैः पञ्चभिरेकशः पृथक्प्रकल्पितैर्वा घृतमाक्षिकप्लुतैः १
इति प्रयोगाः षडिमे भिषग्वरैरुदीरिताः शर्करया समन्विताः।
नृणां मदान्धप्रमदोपसर्पिणां प्रधानधातोरतिरेककारणम् ॥२॥

शतावरी, मोठ्या चिकण्याचें मूळ (गांगेरुकी), भुईकोहाळा, गोखरू व आवळकाठी हीं पांच औषधें एकत्र चूर्ण करून अथवा प्रत्येकाचें वेगळें चूर्ण करून तूप-मधांतून द्यावीं. हे सहा योग

साखरेशीं घ्यावे. हे कामांध झालेल्या प्रमदांशीं समागम करूं इच्छि-णाऱ्या पुरुषांना अत्यंत शुक्रवृद्धि करण्याला उपयोगी आहेत.

मुसल्यादि चूर्ण.

मुसलिकोकिलगोक्षुरचूर्णकं शशिविलोचनराममितं पचेत् ॥
पयसि प्रातरिदं यदि कोष्णके सितया टङ्कषट्कया तु तत् ।
त्रिगुणसप्तदिनं परिभक्षयञ्शतवया अपि कांक्षति कामिनीम् ॥
किमिह चित्रमुदित्वरयौवनः शशिमुखीं शयनान्न जिहासति ॥२॥

सफेतमुसळी एक तोळा, तालीमखाना दोन तोळे आणि गोखरू तीन तोळे ह्यांचें चूर्ण कोमट दुधांतून दीड तोळा साखरेशीं एकवीस दिवस घ्यावें. म्हणजे शंभर वर्षांच्या वृद्धालाही कामवासना होते. मग तरुण पुरुष चंद्रवदना तरुणीला शयनसमयीं जिंकणार नाहीं यांत आश्चर्य नाहीं.

वानरी गुटिका.

बीजानि हि कपिकच्छोः कुडवमितानि स्वेदयेच्छनकैः ।
प्रस्थे गोभवदुग्धे दुग्धं यावद्धवेद्गाढम् ॥ १ ॥
त्वग्रहितानि च कृत्वा सूक्ष्मं संपेषयेत्तानि ।
पिष्टिकायाः सुवटिकाः कृत्वा गव्ये पचेदाज्ये ॥ २ ॥
द्विगुणितशर्करया ता वटिकाः संपक्वया लेप्याः ।
वटिका माक्षिकमध्ये मज्जनयोग्येऽखिलाः स्थाप्याः ॥३॥
पञ्चटङ्कमितास्तास्तु प्रातः सायं च भक्षयेत् ।
अनेन शीघ्रद्रावी यो यश्च स्यात्पतितध्वजः ॥ ४ ॥
सोऽपि प्राप्नोति सुरते सामर्थ्यमति वाजिवत् ।
नानेन सदृशं किंचिद् द्रव्यं वाजीकरं परम् ॥ ५ ॥

कुहिलीचें बी (कवचबीज) सोळा तोळे आणून चौसष्ट तोळे गाईच्या दुधांत दूध आटेपर्यंत शिजवावें. नंतर त्या बिया काढून त्यांचीं टरफलें काढून वाटाव्या, आणि त्यांच्या गोळ्या करून त्या तुपांत तळून काढाव्या. नंतर त्या गुटिकांच्या वजनाच्या दुप्पट साखर घेऊन तिचा पाक करून त्यांत त्या गोळ्या टाकून त्या पाकाचा त्या गोळ्यांवर लेप होईपर्यंत पचन करावा. नंतर त्या गोळ्या पुनः मधांत संपूर्ण बुडेपर्यंत घालून ठेवाव्या; आणि त्यांतून सव्वा तोळ्याची गोळी सकाळसंध्याकाळ भक्षण करावी. ह्यांच्या

सेवनानें, ज्याचा शीघ्र वीर्यपात होतो व जो नपुंसक आहे त्याला देखील सुरतसमयीं घोड्याप्रमाणें सामर्थ्य येतें. ह्यासारखें उत्तम वाजीकरण द्रव्य दुसरें नाहीं.

बस्ताण्डसिद्धे पयसि भावितानसकृत्तिलान् ।
यः खादेत्समुपागच्छेत्स्त्रीणां शतमपूर्ववत् ॥ १ ॥

बोकडाचें अंड टाकून शिजविलेल्या दुधाच्या भावना तिळाला वरचेवर देऊन ते तीळ जो खातो तो नव्याप्रमाणेंच शंभर स्त्रियांशीं समागम करूं शकतो.

पिप्पलीलवणोपेते बस्ताण्डे घृतसाधिते ।
कच्छपस्याथ वा खादेत्तत्तु वाजीकरं भृशम् ॥ २ ॥

बोकडाचें अथवा कासवाचें अंड तुपांत तळून पिंपळी व सैंधेलोण घालून खावें. तें अत्यंत वाजीकरण आहे.

शतावरीगोक्षुरकाश्वगन्धापुनर्नवानागबला मुसल्या ।
घृतेन खण्डेन तु भक्षणीयाः क्षीणा नरा नागबला भवन्ति ॥ ३

शतावरी, गोखरू, अश्वगंध, पुनर्नवा, गांगेरुकी व मुसळी, ह्यांचें चूर्ण तूप व खडीसाखरेशीं घ्यावें. म्हणजे क्षीण मनुष्य हत्तीप्रमाणें सामर्थ्यवान होतात.

विदारीकन्दचूर्णं तु घृतेन पयसा नरः ।
उदुम्बरसमं खादन्वृद्धोऽपि तरुणायते ॥ ४ ॥

भुईकोहळ्याचें चूर्ण तूप व दूध ह्यांशीं उंबराच्या फळाइतकें खावें. म्हणजे वृद्ध मनुष्यही तरुण होतो.

सितामधुघृतं क्षीरं पलाण्डुरससंयुतम् ।
पिबेन्नरो भवेत्कामी वृद्धोऽपि तरुणायते ॥ ५ ॥

खडीसाखर, तूप, मध व दूध ह्यांमध्यें कांद्याचा रस घालून प्यावा, म्हणजे कामवासना होते व वृद्धही तरुणाप्रमाणें होतो.

गोक्षुरचूर्ण.

शमयति गोक्षुरचूर्णं छागक्षीरेण साधितं समधु ।
भुक्तं क्षपयति षाण्ढ्यं यज्जनितं कुप्रयोगेण ॥ १ ॥

गोखरूचें चूर्ण दुधांत शिजवून मध घालून घ्यावें. तें कुप्रयोगानें (मुष्टिताडनादिकांनीं) आलेल्या नपुंसकत्वाचा नाश करितें.

अमृतभल्लातक.

भल्लातकानां पवनोत्थितानां तरुच्युतानां च यदाढकं स्यात् ।
घृष्टेष्टिकाचूर्णकणैर्जलैश्च प्रक्षाल्य संशोष्य च मारुतेन ॥ १ ॥
शुष्काणि तानि द्विदलीकृतानि विपाचयेदप्सु चतुर्गुणासु ।
तत्पादशेषं पुनरेव शीतं क्षीरेण तुल्येन विपाचयेत्तत् ॥ २ ॥
तदर्धया शर्करया विमिश्र्य पश्चात्खजेनोन्मथनं विधाय ।
सत्र्यूषणं त्रैफलचन्द्रमांसीत्रिवृच्च वांशीखदिरामृतं च ॥ ३ ॥
सचन्दनाकल्लकणाकबाबं सदेवपुष्पं मुसलीद्वयं च ।
कंकोलमोचाह्वयदीप्ययुग्मं नतं समातङ्गकणा विदारी ॥ ४ ॥
जातीफलं मुस्तकजातिपत्री कुबेरजीरागरुसाब्धिशोषम् ।
मेदाद्वयं लोहरसेन्द्रवङ्गमभ्रं तथा कुंकुमकं च कर्षम् ॥ ५ ॥
तत्सप्तरात्रादतिजातवीर्यं सुधारसादप्यधिकं वदन्ति ।
प्रातः प्रबुद्धः कृतदेवकार्यो मात्रां भजेत्सात्म्यशरीरयोग्याम् ६
न चानुपाने परिहार्यमस्ति न चाऽऽतपे नाध्वनि मैथुने च ।
यथेष्टचेष्टो विचरेत्प्रयोगान्नरो भवेत्काञ्चनराशिगौरः ॥ ७ ॥
अनेन मेधानरसिंहवीर्यो दृढेन्द्रियो व्याधिगतः सुबुद्धिः ।
दन्ता विशीर्णाः पुनरेव दिव्याः केशाश्च शुभ्राः पुनरेव कृष्णाः ॥
नीलाञ्जनालिप्रतिमा भवन्ति त्वचो विशीर्णाः पुनरेव भव्याः ।
विशीर्णकर्णांगुलिनासिकोऽपि कृम्यर्दितो भिन्नगलोऽपि कुष्ठी ॥९
शुष्कः पुनः स्याद्गतमूलशाखस्तरुर्यथा भाति नवाम्बुसिक्तः ।
बृहस्पतेरप्यधिको हि बुद्ध्या ग्रन्थं विशालं च नवं करोति ॥१०॥
गृह्णाति सद्यो न च विस्मृतिं च करोति कल्पायुरनल्पवीर्यम् ।
कुर्वन्निमं कल्पमनल्पबुद्धिर्जीवन्नरो वर्षशतं सुखी स्यात् ॥ ११ ॥

वाऱ्यानें झाडावरून पडलेले बिब्बे दोनशें छप्पन्न तोळे आणून विटकराच्या पुडीनें घासून पाण्यानें स्वच्छ धुऊन वाऱ्यावर कोरडे झाल्यावर त्यांचे दोन दोन तुकडे करावे. व त्यांचा चौपट पाण्यांत चतुर्थांश काढा करून तो थंड झाल्यावर त्यांत त्या काढ्याच्या बरोबरीनें दूध घालून पुनः शिजवावें. नंतर त्यांत त्याच्या निम्यानें साखर घालून रवीनें घुसळावें. आणि सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कापूर, जटामांसी, तेड, वंशलोचन, कात, डुक-रकंद, चंदन, अक्कलकाढा, पिंपळी, नाकेशर, लवंग, पांढरी व काळी मुसळी, कंकोळ, मोचरस, ओवा, अजमोदा, तगर, गजपिंपळी, भुईकोहाळा, जायफळ, नागरमोथे, जायपत्री, गजग्यांतील बीं,

जिरें, कृष्णागर, समुद्रफेन, मेदा, महामेदा, लोहभस्म, पारदभस्म, वंगभस्म, अभ्रकभस्म, व केशर हीं औषधें एक एक तोळा घेऊन चूर्ण करून त्यांत घालून सात दिवसपर्यंत (भांड्याचें तोंड बांधून) ठेवावें. हें अमृतापेक्षांही गुणांनीं अधिक आहे. हें प्रातःकाळीं उठल्यावर देवाचें पूजन वगैरे करून आपल्या शरीरप्रकृतीच्या मानानें योग्य तितक्या प्रमाणांत सेवन करावें. ह्याला अनुपानाची गरज नाहीं. ऊन, मार्गक्रमण, व मैथुन सोडण्याची जरूर नाहीं. हें सेवन करीत यथेच्छ वागावें. ह्या प्रयोगाच्या सेवनानें मनुष्य सुवर्णराशीप्रमाणें गौरवर्ण होतो. ह्याच्या सेवनानें मनुष्य बुद्धिमान, नरसिंहाप्रमाणें पराक्रमी, इंद्रियांनीं बळकट, निरोगी व सद्बुद्धि असा होतो. गळलेले दांत पुनः दिव्य असे येतात. पांढरे केस काजळाप्रमाणें काळे व नीलवर्ण होतात. झडलेली त्वचा पुनः भव्य अशी येते. ज्याचे कान, अंगुळी व नाक हीं गळकीं आहेत किंवा कृमींनीं खाल्लीं आहेत आणि घसा फुटला आहे, असा कुष्टी मनुष्य ह्या रसायनाच्या सेवनानें, मुळें व डाहळ्या वाळून शुष्क झालेला वृक्ष जसा पाणी घातल्यानें नवा ताजा टवटवीत दिसतो, त्याप्रमाणें सर्वांगसंपन्न व तरुण होतो. तो बुद्धीनें बृहस्पतीपेक्षांही अधिक होतो, आणि मोठाले नवे ग्रंथ करितो. त्याला तात्काळ ग्रहण करण्याची शक्ति येते व त्याचें पुनः विस्मरण होत नाहीं. हें रसायन कल्पपर्यंत आयुष्य व अमोघवीर्य देतें. जो बुद्धिवान मनुष्य ह्या कल्पाचें सेवन करितो तो शंभर वर्षें सुखानें राहतो.

केशरपाक.

व्योषं चतुर्जातफलत्रिकं च लवंगकृष्णागुरुचन्दनं च ।
इक्षूरबीजं करहाटकं च जातीफलं मर्कटिकाफलं च ॥ १ ॥
शाल्मल्यनिर्यासबलाश्वगन्धागोक्षूरबीजं मुसली कमिघ्नम् ।
समुद्रशोषं विषपञ्जरं च पुष्पं सुजात्युद्भवकंकबीजम् ॥ २ ॥
सर्वं समं योज्य सुकुंकुमं च सुचूर्णितं विंशतिभागयुक्तम् ।
कस्तूरिकाषोडशभागचूर्णं खण्डं चतुर्भागयुतं विपक्वम् ॥ ३ ॥
वंगं रसेन्द्रं गगनं सुलोहं कान्तं हि ताम्रं रविभागयुक्तम् ।

दलानि हेम्नो द्विशतानि दत्त्वा तथैव देयानि च राजतानि ।
एकत्र सर्वं विनिधाय वैद्यो जयाष्टभागं विदधीत लेहम् ॥ ४ ॥
जातीफलप्रमाणेन भक्षयेत्प्रातरुत्थितः ।
वीर्यवृद्धिं करोत्येष सर्वव्याधिविनाशनः ॥ ५ ॥
शतं च रमते स्त्रीणां कामतुल्यो भवेन्नरः ।
सर्वान्वातामयान्हन्ति प्रवृद्धं वातशोणितम् ॥ ६ ॥
अस्थिरोगं शिरोरोगं संधिरोगं च नाशयेत् ।
अस्य सेवनमात्रेण वृद्धोऽपि तरुणायते ॥ ७ ॥
धन्यं यशस्करं सम्यगायुरारोग्यवर्धनम् ।
काश्मीरकावलेहोऽयं बलकान्तिविवर्धनः ॥ ८ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, नाकेशर, हिरडा, बेहडा, आवळकाठी, लवंग, कृष्णागर, चंदन, तालिमखाना, सोन्याचा वर्ख, जायफळ, कवचबीज, मोचरस, चिकणामूळ, अश्वगंध, गोखरू, मुसळी, वावडिंग, समुद्रशोष, विषपंजर, (कुचला-शुद्ध), जाईचीं फुलें, चंदनाचें बी किंवा कंकोळ हीं सर्व औषधें समभाग; आणि केशर वीस भाग, कस्तुरी सोळा भाग, व ह्यां सर्वांच्या चौपट खडीसाखर घेऊन त्यांचा पाक करावा. आणि वंगभस्म, पारदभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, कांतभस्म, व ताम्रभस्म हीं दोन दोन भाग (बारा भाग), सोन्याच्या वर्खाचीं पानें दोनशें आणि रौप्यवर्खाचीं पानें दोनशें हीं औषधें व आठ भाग भांगेचें चूर्ण त्यांत घालून लेहाप्रमाणें पाक करून प्रातःकाळीं उठून रोज जायफळाएवढा खावा. हा पाक वीर्याची वृद्धि करितो. सर्व व्याधींचा नाश करितो. ह्याच्या सेवनानें मनुष्य मदनाप्रमाणें सुंदर होऊन शंभर स्त्रियांशीं रत होतो. हा सर्व वातरोगांचा नाश करितो. वाढलेल्या वातरक्ताचाही नाश करितो. अस्थिरोग, शिरोरोग व संधिरोग ह्यांचा नाश करितो. ह्या पाकाच्या सेवनानें वृद्धही तरुण होतो. हा केशरावलेह धनप्राप्ति करून देणारा, यशस्कर, उत्तम प्रकारें आयुष्य व आरोग्य देणारा व बलकांति वाढविणारा आहे.

रतिवृद्धिकर मोदक.

गोक्षुरेक्षुरबीजानि वाजिगन्धा शतावरी ।

मुशली वानरीबीजं यष्टी नागबला बला ॥ १ ॥
एषां चूर्णं दुग्धसिद्धं गव्येनाऽऽज्येन भर्जितम् ।
सितया मोदकं कृत्वा भक्ष्यं वाजीकरं परम् ॥ २ ॥

गोखरू, तालिमखाना, अश्वगंध, शतावरी, मुसळी, कवचबीज, जेष्टमध, नागबला व चिकणामूळ ह्यांचें चूर्ण दुधांत शिजवून तुपांत तळून साखर मिसळून त्याचे लाडू करून भक्षण करावे. ते उत्तम वाजीकरण आहेत.

चूर्णादष्टगुणं क्षीरं घृतं चूर्णसमं स्मृतम् ।
सर्वतो द्विगुणं खण्डं खादेदग्निबलं यथा ॥ ३ ॥
वाजीकराणि भूरीणि संगृह्य रचितो यतः ।
तस्माद्बहुषु योगेषु योगोऽयं प्रवरो मतः ॥ ४ ॥

चूर्णाच्या आठपट दूध घेऊन त्यांत चूर्ण टाकून तें आटवावें; आणि चूर्णसमान तूप घेऊन त्यांत तें तळून घ्यावें. साखर सर्वांच्या दुप्पट घालावी आणि अग्निबल पाहून सेवन करावें. ज्या अर्थी हा गोक्षुरादि मोदक पुष्कळ वाजीकरण द्रव्यें योजून तयार केला आहे, त्या अर्थीं पुष्कळ वाजीकरणयोगांत हा श्रेष्ठ आहे.

रतिवल्लभ पूगपाक.

पूगं दक्षिणदेशजं दशपलोन्मानं भृशं कर्तयेत्
तच्छिन्नं जलयोगतो मृदुतरं संकुट्य चूर्णीकृतम् ।
तच्चूर्णं पटशोधितं वसुगुणे गोशुद्धदुग्धे पचेद्
गव्याज्यांजलिसंयुतेऽतिनिबिडे दद्यात्तुलार्धां सिताम् १
पक्कं तज्ज्वलनात्क्षितिं प्रति नयेत्तस्मिन्पुनः प्राक्षिपेद्
दद्यात्तत्तदुदीरयामि बहुला दृष्ट्वाऽऽदरात्संहिताः ।
एला नागबला बला सचपला जातीफलं लिंगिता
जातीपत्रकपत्रपत्रकयुगं तच्च त्वचा संयुतम् ॥ २ ॥
विश्वावीरणवारिवारिदवरा वांशी वरी वानरी
द्राक्षा सेक्षुरगोक्षुराऽथ महती खर्जूरिका क्षीरिका ।
धान्याकं सकसेरुकं समधुकं शृङ्गाटकं जीरकं
पृथ्वीकाऽथ यवानिका वरटिका मांसी मिसी मेथिका ३
कन्देष्वत्र विदारिऽकाथ मुशली गन्धर्वगन्धा तथा
कर्चूरं करिकेसरं समरिचं चारस्य बीजं नवम् ।
बीजं शाल्मलिसंभवं करिकणा बीजं च राजीवनं
श्वेतं चन्दनमत्र रक्तमपि च श्रीसंज्ञपुष्पैः समम् ॥ ४ ॥

सर्वं चेति पृथक्पृथक्पलमितं संचूर्ण्य तत्र क्षिपेत्
सूतं वङ्गभुजंगलोहगगनं सन्मारितं स्वेच्छया ।
कस्तूरीघनसारचूर्णमपि च प्राप्तं तथा प्रक्षिपेत्
पश्चादस्य तु मोदकान्विरचयेद् बिल्वप्रमाणानथ ॥ ५ ॥
तान्भुक्त्वाऽति सदा यथानलबलं भुंजीत नाम्लं रसं
पूर्वस्मिन्नशिते गते परिणतिं प्राग्भोजनाद्भक्षयेत् ।
नित्यं श्रीरतिवल्लभाख्यकमिमं यः पूगपाकं भजेत्
स स्याद्वीर्यविवृद्धिवृद्धमदनो वाजीव शक्तो रतौ ॥ ६ ॥
दीप्ताग्निर्बलवान्वलीविरहितो हृष्टः सुपुष्टः सदा
वृद्धो योऽपि युवेव सोऽपि रुचिरः पूर्णेन्दुवत्सुन्दरः ७

दक्षिण देशांतील सुपारी चाळीस तोळे घेऊन ती अगदीं बारीक कातरावी. नंतर तिला थोडें पाणी लावून कुटून चूर्ण करावें. तें वस्त्रगाळ करून आठपट गाईच्या दुधांत पचन करावें. दूध आट-ल्यावर तें सर्व सोळा तोळे तुपांत तळून घ्यावें आणि दोनशें तोळे साखरेच्या पाकांत घालून पाक तयार करावा. मग तो चुलीवरून खालीं उतरून त्यांत वेलदोडे, गांगेरुकी, चिकणामूळ, पिंपळी, जायफळ, शिवलिंगीचें बीं, जायपत्री, तमालपत्र, तालीसपत्र, दालचिनी, सुंठ, काळा वाळा, नागरमोथे, हिरडा, बेहडा, आव-ळकाठी, वंशलोचन, शतावरी, कवचबीज, काळीं द्राक्षें, तालिम-खाना, गोखरू, मोठी खारीक, तवकील, धने, कचरा, जेष्ठमध, शिंगाडे, जिरें, वसूची मुळी, ओवा, करडयाचें बीं, जटामांसी, बडिशेप, मेथी, भुईकोहाळा, मुसळी, अश्वगंध, कचोरा, नाकेशर, मिरें, चारोळी, शेवरीचें बीं, गजपिंपळी, कमलाक्ष, तांबडा व पांढरा चंदन, व लवंग हीं औषधें चार चार तोळे प्रमाणें घेऊन चूर्ण करून घालावीं. आणि पारदभस्म, वंगभस्म, नागभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, कस्तुरी व भीमसेनी कापूर हीं योग्य प्रमा-णांत घालून त्या पाकाचे बेलफळाएवढे लाडू बांधावे. तो अग्नि-बल पाहून खावा व त्याजवर फार आंबट खाऊं नये. पूर्वीं खालेलें अन्न पचन झाल्यावर पुनः जेवणापूर्वीं हा खावा. हा रतिवल्लभ नांवाचा पूगपाक जो नित्य सेवन करितो, त्याची वीर्यवृद्धि होते.

तो वृद्ध असला तरी मदनाप्रमाणें सुंदर होऊन सुरतप्रसंगीं घोड्याप्रमाणें सामर्थ्यवान होतो. त्याचा अग्नि प्रदीप्त होतो व तो बलवान होतो. त्याच्या अंगावरील सुरकुत्या जाऊन तो पुष्ट व हर्षयुक्त होतो. तो वृद्ध असला तरी तरुणाप्रमाणें सतेज व पूर्ण चंद्राप्रमाणें सुंदर होतो.

कामेश्वर मोदक.

एतस्मिन्रतिवल्लभे यदि पुनः सम्यक्खुरासानिका
धत्तूरस्य च बीजमर्ककरभः पाथोधिशोषस्तथा ।
सन्माजूफलकं तथा खसफलं त्वक्चापि निक्षिप्यते
चूर्णार्धा विजया तथा स हि भवेत्कामेश्वरो मोदकः ॥१॥

ह्या रतिवल्लभ पूगपाकामध्यें खुरासनी ओवा, धोतऱ्याचें बी, अक्कलखारा, वाळा, समुद्रफेन, मायफळ, खसखस (किंवा पोस्त) व दालचिनी ह्यांचें चूर्ण आणि सर्व चूर्णाच्या निम्यानें भांग हीं घातलीं असतां त्यासच कामेश्वर मोदक म्हणतात.

आम्रपाक.

पक्वाम्रस्य रसद्रोणे सितामाढकसंमिताम् ।
घृतं प्रस्थमितं दद्यान्नागरस्य पलाष्टकम् ॥ १ ॥
मरिचं कुडवोन्मानं पिप्पलीं द्विपलोन्मिताम् ।
सलिलस्याऽऽढकं दत्त्वा सर्वमेकत्र कारयेत् ॥ २ ॥
पचेत्तन्मृन्मये पात्रे दारुदर्व्या प्रचालयेत् ।
चूर्णान्येषां क्षिपेत्तत्र घनीभूतेऽवतारिते ॥ ३ ॥
धान्याकं जीरकं चित्रं पत्रकं मुस्तकं त्वचम् ।
बृहज्जीरकमप्यत्र ग्रन्थिकं नागकेशरम् ॥ ४ ॥
एलां पत्रीं लवङ्गं च पृथग्जातीफलं पलम् ।
सिद्धशीते प्रदद्याच्च मधुनः कुडवद्वयम् ॥ ५ ॥
भक्षयेद्भोजनादर्वाक्पलमात्रमिदं नरः ।
अथवा नियता नात्र मात्रा खादेद्यथानलम् ॥ ६ ॥
मानवः सेवनादस्य वाजिवत्सुरते भवेत् ।
समर्थो बलवान्पुष्टो हृष्टो नित्यं निरामयः ॥ ७ ॥
ग्रहणीं नाशयेदेष क्षयं श्वासमरोचकम् ।
अम्लपित्तं च पित्तं तु कुष्ठं वै पाण्डुतामपि ॥ ८ ॥

पिकलेल्या आंब्याचा रस दहाशें चोवीस तोळे काढून त्यांत खडीसाखर दोनशें छपन्न तोळे, तूप चौसष्ट तोळे, सुंठ बत्तीस

तोळे, मिरीं सोळा तोळे व पिंपळी आठ तोळे ह्यांचें चूर्ण आणि पाणी दोनशें छप्पन्न तोळे घालून मातीच्या भांड्यांत पाक करावा. वरचेवर लाकडाच्या पळीनें ढवळावें. लेहाप्रमाणें पाक झाल्यावर खालीं उतरून त्यांत पुनः धने, जिरें, चित्रकमूळ, तमालपत्र, नागरमोथे, दालचिनी, मोठें जिरें, पिंपळमूळ नाकेशर, वेलदोडे, पत्री, लवंग व जायफळ ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालून मध बत्तीस तोळे घालावा. म्हणजे हा आम्रपाक तयार झाला. हा भोजनापूर्वीं चार तोळेप्रमाणें खावा. अथवा असा नियमित न खातां अग्निबलाप्रमाणें कमी जास्त खावा. ह्याचे सेवनानें मनुष्य सुरतसमयीं घोड्याप्रमाणें समर्थ होतो. तो बलवान, पुष्ट, हर्षयुक्त व नित्य निरोगी असतो. हा आम्रपाक संग्रहणी, क्षय, श्वास, अरुचि, अम्लपित्त, पित्त, कुष्ट व पांडुरोग ह्यांचा नाश करितो.

कामाग्निसंदीपन मोदक.

कर्षो रसो गन्धकमभ्रकं च द्विक्षारचित्रं लवणानि पञ्च ।
शटी यवानीद्वयकीटहारी तालीसपत्राणि परं विषं च ॥ १ ॥
जीरं चतुर्जातलवङ्गजातीफलं च कर्षत्रयमेवमन्यत् ।
सुवृद्धसर्वं कटुकत्रयं च तथा चतुष्कर्षमिदं निबोध ॥ २ ॥
धान्याकयष्टीमधुकं कसेरुपलं पृथक्पञ्चपलं विदारी ।
दन्ती कणा चातिबलात्मगुप्ताबीजं तथा गोक्षुरकस्य बीजम् ३
सबीजपूरेन्द्ररजः समानं समा सिता क्षौद्रयुतं च तुल्यम् ।
कर्षैकमिन्दोरथ मोदकं च कामाग्निसंदीपनमेनमाहुः ॥ ४ ॥

वृष्यं तथा परतरं सतपं सदीप्य-
मानं निषेव्य मनुजः प्रमदासहस्रम् ।
गच्छेन्न लिंगं शिथिलत्वमेति
नागाधिपं विजयते बलतः प्रमत्तः ॥ ५ ॥
वातानशीतिमथ पित्तभवांश्च रोगान्
श्लेष्मोत्थविंशतिरुजः परमाग्निमान्द्यम् ।
दूर्वारकामलभगंदरपाण्डुरोगान्
मेहातिसारकृमिहृद्ग्रहणीविकारान् ॥ ६ ॥
कासज्वरश्वसनयक्ष्मकफप्रतिश्या-
शूलामवातसहिताश्च रुजः समस्ताः ।
हत्वा गदान्बहुविधांस्तदपत्यकारी

सर्वत्र पथ्यमथ सर्वसुखप्रदायी ।
बल्यं वलीपलितहारि रसायनं स्याद्
मूलं तदेव कथितं परमं पवित्रम् ॥ ७ ॥

पारा, गंधक, अभ्रकभस्म, जवखार, सज्जीखार, चित्रकमूळ, पंचलवणें, कचोरा, ओवा, अजमोदा, वावडिंग, तालीसपत्र, शुद्ध बचनाग, जिरें, दालचिनी, तमालपत्र, वेलची, नाकेशर, लवंग व जायफळ हीं औषधें एक एक तोळा; सुंठ, मिरें व पिंपळी तीन तीन तोळे; धने, जेष्ठमध व कचरा हीं औषधें चार चार तोळे; व भुईकोहळ्याचें चूर्ण वीस तोळे; दांतीमूळ, पिंपळी, पेटारीचें व कुहिलीचें बीं, गोखरू, महाळुंगाचें बीं, व इंद्रजव हीं औषधें तोळा तोळा; ह्या सर्वांच्या बरोबरीनें पिठीसाखर व मध आणि एक तोळा कापूर घालून सर्व एकत्र मळून लाडू करावे. ह्यांना कामाग्निसंदीपन मोदक म्हणतात. हा वृष्य व नेहमीं कामोद्दीपन करणारा आहे. ह्याच्या सेवनानें मनुष्य नित्य हजारों स्त्रियांशीं रत होऊं शकतो. त्याचे लिंगाला शैथिल्य येत नाहीं. तो आपल्या सामर्थ्यानें मत्त होऊन गजेंद्रालाहि जिंकतो. हा ऐशीं वातजन्य रोग, चाळीस पित्तरोग, वीस कफरोग, अत्यंत अग्निमांद्य, दुर्निवार कावीळ, भगंदर, पांडुरोग, प्रमेह, अतिसार, संग्रहणी, खोकला, ज्वर, श्वास, यक्ष्मा, कफजन्य पडसें, शूळ, आमवात, वगैरे नानाप्रकारचे सर्व रोग ह्यांचा नाश करून टाकतो. हा संततिकारक आहे. ह्याजवर आपणास सुखकारक असे सर्व आहारविहार करावे. हें रसायन बलकारक, वलीपलितनाशक व पवित्र आहे असें सांगितलें आहे.

शतावरी घृत.

घृताच्छतावरीगर्भक्षीरे दशगुणे पचेत् ।
शर्करापिप्पलीक्षौद्रयुक्तं तद्वृष्यमुच्यते ॥ १ ॥

तुपाच्या दसपट शतावरीच्या मुळ्यांचा रस घालून तूप तयार करून तें साखर, मध व पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें. तें वृष्य आहे.

लघु अश्वगंधघृत.

कल्केन वाजिगन्धाया विपचेद् घृतमुत्तमम् ।
चतुर्गुणमजाक्षीरं दत्त्वोद्धृत्याथ शीतले ।

--६६ यो. र.

सितां समां प्रदायाद्याद्बलपुष्टिविवृद्धये ॥ १ ॥

अश्वगंधाच्या कल्काच्या चौपट तूप व तुपाच्या चौपट शेळीचें दूध घालून तूप पचन करावें. नंतर तूप तयार होऊन थंड झाल्यावर त्यांत त्या तुपाच्या बरोबरीनें साखर घालून तें बल व पुष्टि ह्यांची वाढ होण्याकरितां सेवन करावें.

चंदनादि तेल.

द्रव्याणि चन्दनादेस्तु चन्दनं रक्तचन्दनम् ।
पतङ्गमथ कालीयागरुकृष्णागुरूणि च ॥ १ ॥
देवद्रुमः ससरलः पद्मकं क्रमुकोऽपि च ।
कर्पूरो मृगनाभिश्च लता कस्तूरिकाऽपि च ॥ २ ॥
सिंहकः कुंकुमं गव्यं जातीफलकमेव च ।
जातीपत्री लवङ्गं च सूक्ष्मैला महती तथा ॥ ३ ॥
कङ्कोलफलकं त्वक्च पद्मकं नागकेसरम् ।
वालकं च तथोशीरं मांसी दारु सिताऽपि च ॥ ४ ॥
मुरा कर्चूरकश्चापि शैलेयं भद्रमुस्तकम् ।
रेणुकाश्च प्रियंगुश्च श्रीवासो गुग्गुलुस्तथा ॥ ५ ॥
लाक्षा नखश्च रालश्च धातकीकुसुमं तथा ।
ग्रन्थिपर्णं च मञ्जिष्ठा तगरं सिक्थकस्तथा ॥ ६ ॥
एतानि शाणमानानि कल्कीकृत्य शनैः पचेत् ।
तैलं प्रस्थमितं सम्यगेतत्पात्रे शुभे क्षिपेत् ॥ ७ ॥
अनेनाभ्यक्तगात्रस्तु वृद्धोऽशीतिसमोऽपि यः ।
सुखी भवति शुक्राढ्यः स्त्रीणामत्यन्तवल्लभः ॥ ८ ॥
वन्ध्याऽपि लभते गर्भं षण्ढोऽपि तरुणायते ।
अपुत्रः पुत्रमाप्नोति जीवेच्च शरदां शतम् ॥ ९ ॥
चन्दनादि महातैलं रक्तपित्तं क्षयं ज्वरम् ।
दाहं प्रस्वेददौर्गन्ध्यं कुष्ठं कण्डूं विनाशयेत् ॥ १० ॥

चंदनादि तेलांतील द्रव्यें, पांढरा व तांबडा चंदन, पतंग, पिवळा चंदन, कृष्णागर, देवदार, सरळ देवदार, पद्मकाष्ठ, सुपारी, कापूर, कस्तुरी, लताकस्तुरी (मुसकदाण) शिलारस, केशर, गाईचें तूप, जायफळ, जायपत्री, लवंग, बारीक वेलदोडे, मोठे वेलदोडे, कंकोळ, दालचिनी, कमळ, नाकेशर, वाळा, काळा वाळा, जटामांसी, देवदार, खडीसाखर, एकांगी मुरा, कचोरा, धोंडफूल, नागरमोथा,

रेणुकबीज, गव्हला, विशेष धूप, गुग्गुळ, लाख, नखला, राळ, धायटीचें फूल, गठोना, मंजिष्ठ, तगर व मेण हीं औषधें तीनतीन मासे घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत चौसष्ठ तोळे तेल घालून चांगल्या भांड्यांत तें तेल सिद्ध करावें. ह्या तेलानें नित्य अभ्यंग करणारा मनुष्य ऐंशीं वर्षांचा असला तरी सुखी व वीर्यवान होऊन स्त्रियांना अत्यंत प्रिय होतो. वांझेला गर्भधारणा होते. षंढ तरुणाप्रमाणें कामी होतो, व निपुत्रिकाला पुत्र होतो व तो शंभर वर्षें वांचतो. हें चंदनादि महातेल रक्तपित्त, क्षय, ज्वर, दाह, घाम, दुर्गंधी, कुष्ठ व कंडू ह्यांचा नाश करितें.

महासुगंधी तेल.

कर्पूरागुरुचोपपत्रनलिकालाक्षाशठीधातकी-
पुष्पैः सप्तदलैलवालुसरलैः शैलेयमांसीप्लवैः ।
एलाकुंकुमरोचनादमनकैः श्रीवासजातीफलैः
कङ्कोलक्रमुकोच्चटामदमुराकान्तालवङ्गामयैः ॥ १ ॥
वालोशीरहरेणुकामलयजस्थौणेयचण्डानखै-
र्जातीकोशकुलीरपद्मकनतैः स्पृक्कान्वितैः पालिकैः ।
लाक्षायोजनवल्लिलोध्रसलिलैस्तैलं विपाच्याऽऽढकं
तैलाभ्यक्ततनुर्जरन्नपि भवेत्स्त्रीणां परं वल्लभः ॥ २ ॥
शुक्राढ्यो द्युतिमाननल्पतनयः षण्ढोऽपि रत्युत्सुको
वन्ध्या गर्भवती भवेदपि तथा वृद्धाऽपि सूते सुतम् ।
कण्डूस्वेदविचर्चिकामलहरं दौर्गन्ध्यकुष्ठापह-
मश्विभ्यां परिकीर्तितं बहुगुणं तैलं सुगन्धं महत् ॥ ३ ॥

कापूर, कृष्णागर, दालचिनी, तमालपत्र, गुलछबू, लाख, कचोरा, धायटी, सातविणीचीं फुलें, एलावालुक (कोष्ठासारखें एक सुवासिक द्रव्य), सरळ देवदार, घोंडफूल, जटामांसी, नागरमोथे, वेलदोडे, केशर, गोरोचन, दवणा, विशेष धूप, जायफळ, कंकोळ, सुपारी, गुंजा, कस्तूरी, मुरा, गव्हला, लवंग, कोष्ठ, वाळा, काळा वाळा, रेणुकबीज, चंदन, थुणेर, गठोना, नखला, जायपत्री, काकडशिंगी, पद्मकाष्ठ, तगर व पाच, हीं औषधें चार चार तोळे घेऊन त्यांचा कल्क व लाख, मंजिष्ठ व लोध्र, ह्यांचा काढा ह्यांत

दोनशें छपन्न तोळे तेल पचन करावें. ह्या तेलाच्या अभ्यंगानें जरठ देखील स्त्रियांना अत्यंत प्रिय होतो. आणि वीर्यवान, कांतिमान व पुष्कळ संततिमान होतो. षंढाला देखील रतिक्रीडा करण्याची उत्सुकता येते. वांझ स्त्री गर्भिणी होते. आणि वृद्ध स्त्रियांना देखील पुत्र होतो. आणि हें कंडू, स्वेद, विचर्चिका, अंगाचा मळ, दुर्गंधी व कुष्ठ ह्यांचा नाश करितें. हें अत्यंत गुणकारक महासुगंधी तेल अश्विनीकुमारांनीं सांगितलें आहे.

पंचबाणरस.

सूताभ्रलोहोरगवङ्गशङ्खकपर्दिकाश्चैव समं विधाय ।
सूतार्धभागं कनकस्य दद्याद्वारत्रयं क्षीरविभावितं तत् ॥ १
पोस्तैस्तथा भावितमेकविंशद्वारं तथा यष्टिसुवर्णकानाम् ।
लवङ्गकाकलकरविश्वजातीफलत्रिकं कोलकचन्दनानाम् ॥ २ ॥
एषां द्रवैर्भावय सप्तवारं पृथक्तथैकं मृगनाभिकायाः ।
रसोऽयमुक्तः परमेश्वरेण श्रीपञ्चबाणो रतिशक्तिको नृणाम् ॥३
एतस्मादधिकं च नास्ति भुवने वीर्याधिकं धीप्रद-
मायुष्कान्तिकरं हितं वसुमतां नृणामुदारात्मनाम् ।
आज्ञासिद्धमिदं रसायनवरं बल्यं वयःस्थापनं
मेहप्लीहजलोदराश्मरिरुजापस्मारविध्वंसनम् ॥ ४ ॥

पारदभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, नागभस्म, वंगभस्म, शंखभस्म व कपर्दिकाभस्म हीं भस्में समभाग व सुवर्णभस्म पारदभस्माच्या निम्यानें घेऊन सर्वांचा एकत्र खल करून त्याला तीन दिवस दुधाच्या भावना द्याव्या. त्याचप्रमाणें पोस्ताच्या काढ्याच्या एकवीस भावना द्याव्या. जेष्टमध व धोतऱ्याचें बीं ह्यांच्या काढ्याच्या प्रत्येकीं एकवीस भावना द्याव्या. नंतर लवंग, अक्कलकारा, सुंठ, जायफळ व त्रिफळा ह्यांच्या काढ्याच्या सात सात भावना द्याव्या. आणि त्यानंतर कस्तुरीची एक भावना द्यावी. हा पंचबाणरस परमेश्वरानें सांगितला आहे. हा मनुष्याला कामवासना व शक्ति देतो. ह्यापेक्षां अधिक गुण देणारें, वीर्यानेंही अधिक, बुद्धिदायक, आयुष्य वाढविणारें, कांतिदायक, ह्या पृथ्वीवरील उदार बुद्धीच्या लोकांना हितकारक असें दुसरें रसायन नाहीं. हें श्रेष्ठ रसायन

सिद्धिदायक, शक्तिवर्धक, आयुष्याला बळकटी देणारें व प्रमेह, पांथरी, जलोदर, मूत्रखडा, शूळ व अपस्मार ह्यांचें नाशक आहे.

चंद्रोदय रस.

पलं मृदु स्वर्णदलं रसेन्द्रपलाष्टकं षोडश गन्धकस्य ।
शोणैस्तु कार्पासभवैः प्रसूनैः सर्वं विमर्द्याथ कुमारिकाभिः ॥ १
तत्काचकुम्भे निहितं सुगाढे मृत्कर्पटैस्तद्दिवसत्रयं च ।
पचेत्क्रमाग्नौ सिकताख्ययन्त्रे ततो रसः पल्लवरागरम्यः ॥ २ ॥
सौवर्णमेतत्सकलामयघ्नं सर्वेषु योगेषु च योजनीयम् ।
निगृह्य चैतस्य पलं पलानि चत्वारि कर्पूररजस्तथैव ॥ ३ ॥
जातीफलं चोषणमिन्द्रपुष्पं कस्तूरिकाया इह शाण एकः ।
चन्द्रोदयोऽयं कथितोऽस्य माषो भुक्तोऽहिवल्लीदलमध्यवर्ती४
मदोद्धतानां प्रमदाशतानां गर्वाधिकत्वं श्लथयत्यवश्यम् ।
शृतं घनीभूतमतीव दुग्धं मृदूनि मांसानि समण्डकानि ।
माषान्नमिष्टानि रसेऽत्र पथ्यमानन्ददायीन्यपराणि चात्र ॥ ५ ॥

वलीपलितनाशनस्तनुभृतां वयःस्तम्भनः
समस्तगदखण्डनः प्रचुररोगपञ्चाननः ।
गृहे च रसराडयं भवति यस्य चन्द्रोदयः
स पञ्चशरदर्पितो मृगदृशां भवेद्वल्लभः ॥ ६ ॥

सोन्याचा वर्ख चार तोळे, पारा बत्तीस तोळे व गंधक चौसष्ट तोळे ह्यांची कज्जली करून तिचा तांबड्या कापशीच्या फुलाच्या रसांत खल करावा. नंतर तिचा पुनः कोरफडीच्या रसांत खल करावा, नंतर ती कज्जली चांगलें जाड मातकापड केलेल्या कांचेच्या कुपींत भरून वालुकायंत्रांत ठेवून त्याला क्रमानें तीन दिवस अग्नि द्यावा. म्हणजे कोवळ्या पालवीप्रमाणें लाल असा रस तयार होतो. हा सर्वरोगनाशक सुवर्णयुक्त रस सर्व योगांत योजावा. हा रस चार तोळे व कापूर, जायफळ, मिरें व लवंग हीं चारचार तोळे आणि कस्तूरी तीन मासे ह्या सर्वांचा एकत्र खल करून ठेवावा. ह्याला चंद्रोदय रस म्हणतात. ह्यांतील एक मासा रस विड्याच्या पानांतून खावा. ह्याप्रमाणें हा रस जो मनुष्य सेवन करितो, तो मदविव्हल अशा शेंकडों स्त्रियांच्या गर्वाचें हरण करतो. अतिशय आटविलेलें दूध, मृदु मांस, मंड, मिष्ट अशीं उडदाचीं पक्वान्नें आणि दुसरे

आनंददायक उपचार हे ह्या रसावर पथ्य योजावें. हा रस सेवन करणाऱ्या मनुष्याच्या वलीपलित रोगाचा नाश करितो; हा आयुष्य स्थिर करतो. सर्व रोगांचा नाश करतो. हा पुष्कळ रोगांला सिंहाप्रमाणें आहे. हा चंद्रोदय रस ज्याच्या घरीं संग्रहाला आहे, तो कामांध होत्साता स्त्रियांना प्रिय होतो.

वृद्धपुष्पधन्वा रस.

कनकहरजकान्तं ताप्यकं वृद्धिभावं
द्विजकुवलययष्टीशाल्मलीनागवल्ल्यः ।
घृतमधुपयखण्डं पुष्पधन्वा द्विवल्लो
रमयति बहुकान्ता दीर्घमायुर्बली स्यात् ॥ १ ॥

सुवर्णभस्म, पारदभस्म, कांतभस्म व सुवर्णमाक्षिकभस्म हीं भस्में क्रमवृद्धीनें घेऊन त्यांना पांढरीं कमळें, जेष्टमध, शेवरीची साल व विड्याचीं पानें ह्यांच्या रसाची एक एक भावना द्यावी. म्हणजे हा पुष्पधन्वा रस तयार झाला. हा तूप, मध, दूध व खडीसाखर यांतून दोन वालप्रमाणें घेतला असतां तो मनुष्य अनेक स्त्रियांशीं रत होतो; आणि दीर्घायुषी व बलवान होतो.

लघुपुष्पधन्वा रस.

हरजभुजगलोहान्यभ्रकं च त्रिभागं
कनकविजययष्टीशाल्मलीनागवल्ल्यः ।
सितमधुघृतदुग्धैः सेवितो वीर्यवृद्धी
रमयति बहुकान्ता पुष्पधन्वा रसः स्यात् ॥ १ ॥

पारदभस्म, नागभस्म व लोहभस्म हीं भस्में एकेक भाग आणि अभ्रकभस्म तीन भाग ह्यांचा एकत्र खल करून त्याला धोत्र्याचें बीं, भांग, जेष्टमध, शेवरीची साल व नागवेलीचीं पानें ह्यांच्या रसाची एकेक भावना द्यावी. म्हणजे हा लघुपुष्पधन्वा रस तयार झाला. हा खडीसाखर, मध, तूप व दूध ह्यांशीं सेवन केला असतां वीर्यवृद्धि करितो. मग तो मनुष्य पुष्कळ स्त्रियांशीं रमतो.

मदनकामदेव रस.

तारं वज्रं सुवर्णं च ताम्रसूतकगन्धकम् ।
लोहं क्रमविवृद्धानि कुर्यादेतानि मात्रया ॥ १ ॥

विमर्द्य कन्यकाद्रावैर्न्यस्येत्काचमये घटे ।
विमुद्य पिठरीमध्ये धारयेत्सैन्धवैर्भृते ॥ २ ॥
वह्निं शनैः शनैः कुर्याद्दिनैकं तु तदुद्धरेत् ।
स्वांगशीतं च संचूर्ण्य भावयेदर्कदुग्धकैः ॥ ३ ॥
अश्वगन्धा च काकोली वानरी मुसली क्षुरा ।
त्रिवारं च रसैर्भाव्यं शतावर्याश्च भावयेत् ॥ ४ ॥
कस्तूरीव्योषकर्पूरं कंकोलैलालवङ्गकम् ।
पूर्वचूर्णादष्टमांशमेतच्चूर्णं विमिश्रयेत् ॥ ५ ॥
सर्वैः समां शर्करां च दत्त्वा शाणोन्मितं पिबेत् ।
गोदुग्धद्विपानेनैव मधुराहारसेवकः ॥ ६ ॥
अस्य प्रभावात्सौन्दर्यं बलं तेजो विवर्धते ।
तरुणी रमयेद्वृद्धो न च हानिः प्रजायते ॥ ७ ॥

रौप्यभस्म, अभ्रकभस्म, सुवर्णभस्म, ताम्रभस्म, पारा, गंधक व लोहभस्म हीं औषधें क्रमवृद्धीचे प्रमाणांत घेऊन त्याचा कुमारीच्या रसांत खल करून कांचेच्या कुपींत भरून तोंड बंद करून सेंधेलोण भरलेल्या मातीच्या कपालांत ती कुपी ठेवून एक दिवसपर्यंत मंद अग्नि द्यावा. मग स्वांगशीत झाल्यावर काढून त्याचें चूर्ण करून त्याला रुईच्या चिकाची एक भावना द्यावी. नंतर अश्वगंध, काकोली, कुहिलीचें बीं, मुसळी व तालीमखाना ह्यांच्या रसांच्या तीन तीन भावना द्याव्या. आणि नंतर शतावरीच्या रसाच्या तीन भावना द्याव्या. नंतर कस्तुरी, सुंठ, मिरें, पिंपळी, कापूर, कंकोळ, वेलदोडे व लवंग ह्यांचें समभाग चूर्ण करून तें वरील चूर्णाच्या आठव्या हिश्शानें त्यांत मिसळावें. आणि सर्वांच्या बरोबरीनें साखर मिसळून रोज तीन मासेप्रमाणें गाईच्या आठ तोळे दुधांतून प्राशन करावें आणि त्याजवर मधुर आहार करावा. ह्याच्या प्रभावानें सौंदर्य, तेज व बल वाढतें. वृद्धही तरुण स्त्रीशीं रत झाला असतां त्याला थकवा येत नाहीं.

महाराजवटी रस.

बीजं भ्रल्लातरोर्विधाय बहुधा खण्डं त्रियामोषितं
छागे दुग्धवरेऽथ शुष्कमथ तद्गन्धेन तिथ्यंशिना ।
युक्तं काचघटीयुतं हुतभुजो योगेन च त्वान्ततः

सत्त्वं तस्य निगृह्य काचघटिते भाण्डे सुखं स्थापयेत् १
तत्तैलं वल्लमात्रं तु ताम्बूलीपत्रगं चरेत् ।
क्षिप्त्वा तत्र रसं वल्लमंगुल्यग्रेण मर्दयेत् ॥ २ ॥
युक्त्या तां कज्जलीं भुक्त्वा ताम्बूलं शीलयेदनु ।
शाकाम्लं माषषट्कादिवर्जितं पथ्यमाचरेत् ॥ ३ ॥
अनेन योगराजेन षण्ढोऽपि पुरुषायते ।
अपूर्ववच्छतं गच्छेद्वनितानां मदोद्धतम् ॥ ४ ॥
वलीपलितविध्वंसी योगोऽयं क्षयकुष्ठजित् ।
वातपित्तकफातङ्कहस्तिपञ्चाननः परम् ।
नास्त्यनेन समं लोके किंचिदन्यद्रसायनम् ॥ ५ ॥

पळसाचें ('वृद्धतरोः' असा पाठभेद आहे त्यावरून) अथवा वरधारेचें बीं आणून तुकडे करून ते तुकडे शेळीच्या दुधांत तीन प्रहर भिजत ठेवावे. नंतर काढून वाळवून त्यांचें चूर्ण करून त्यांत १५ पट शुद्ध गंधक मिळवून कांचेच्या कुपींत भरून तें वालुकायंत्रांत युक्तीनें अग्नीवर पचन करावें. म्हणजे त्या कुपींत तळाशीं तेल राहून वर गंधकाचें सत्व लागतें. मग तें काढून कुपींत भरून ठेवावें. त्या तेलापैकीं एक वालभर तेल विडयाच्या पानावर घेऊन त्यांत एक वालभर शुद्ध पारा घालून बोटानें मर्दन करून युक्तीनें ती कज्जली खाऊन वर विडा खावा. ह्याजवर भाज्या, व उडीद वगैरे वावडे पदार्थ वर्ज करून पथ्य करावें. ह्या योगाच्या सेवनानें षंढाला देखील पुरुषत्व येतें. आणि तो पहिल्याप्रमाणें मदाविव्हल अशा शंभर स्त्रियांशीं रमतो. हा योग वलीपलित, क्षय व कुष्ट ह्यांना जिंकतो. हा वात, पित्त व कफ ह्यांसंबंधी रोगरूप हत्तीला सिंहाप्रमाणें आहे. ह्या लोकांत ह्याच्यासारखें दुसरें रसायन नाहीं.

पूर्णेंदु रस.

शाल्मल्युत्थैर्द्रवैर्मर्द्यं पक्षैकं शुद्धसूतकम् ।
यामद्वयं पचेच्चापि वस्त्रे बद्ध्वाऽथ मर्दयेत् ॥ १ ॥
दिनैकं शाल्मलीद्रावैर्मर्दयित्वा वटीकृतम् ।
वेष्टयेन्नागवल्ल्याऽथ निक्षिपेत्काचभाजने ॥ २ ॥
भाजनं शाल्मलीद्रावैः पूर्णं यामद्वयं पचेत् ।
वालुकायन्त्रमध्ये तु द्रवे जीर्णे समुद्धरेत् ॥ ३ ॥

द्विगुञ्जं भक्षयेत्प्रातर्नागवल्लीदलान्तरे ।
मुसलीं ससितां क्षीरं पलैकं पाययेदनु ॥ ४ ॥
रसः पूर्णेन्दुनामाऽयं सम्यग्वीर्यकरो भवेत् ।
कामिनीनां सहस्रैकं नरः कामयते ध्रुवम् ॥ ५ ॥

शुद्ध पारा शेवरीच्या साळीच्या रसांत पंधरा दिवस खलावा. नंतर त्याच रसांत तो दोन प्रहरपर्यंत दोलायंत्रानें पचन करून पुनः शेवरीच्याच रसांत एक दिवस खल करून त्याची गोळी करावी. व तिजवर नागवेलीचीं पानें वेष्टून काचेच्या भांड्यांत ती गोळी ठेवावी. आणि त्यांत शेवरीचा रस भरून तें भांडें वालुकायंत्रांत ठेवून दोन प्रहरपर्यंत अग्नीवर त्याचें पचन करावें. आणि तो रस आटल्यावर ती गोळी काढून घ्यावी व त्यांतील दोन गुंजा रस विड्याच्या पानांतून रोज खावून त्याजवर चार तोळे दूध मुसळीचें चूर्ण व साखर घालून घ्यावें. हा पूर्णेंदुरस उत्तम वीर्यकारक आहे. ह्याच्या सेवनानें पुरुष एक हजार स्त्रियांशीं रत होऊं शकतो.

रसभस्मयोग.

खर्परे धारयेद्गन्धं तैलवद्वह्निना क्षणम् ।
ततस्तस्मिन्क्षिपेत्सूतं तत्समानं ततः परम् ॥ १ ॥
घर्षयेल्लोहदर्व्याऽथ यावज्ज्वलति वह्निना ।
खर्परस्यान्तरं वह्निर्यदा ज्वलति केवलम् ॥ २ ॥
अथो वह्निं तदा मन्दं विधाय घट्टयेत्पुनः ॥
लोहदर्व्या भवेद्यावद्भस्म तत्स्फटिकोपमम् ॥ ३ ॥
तदादाय प्रयोक्तव्यं रोगेषु सकलेष्वपि ।
अग्निमान्द्यं च षाण्ढ्यं च कासश्वासभगंदराः ॥ ४ ॥
व्रणाश्च विविधाः सर्वे वलयः पालितानि च ।
नश्यन्त्यनेन योगेन सत्यं शिववचोदितम् ॥ ५ ॥

प्रथमतः गंधक शुद्ध खापरांत (परळांत) घालून विस्तवावर ठेवावा. तो तेलाप्रमाणें पातळ झाल्यावर क्षणभर तसाच ठेवून नंतर त्यांत त्या गंधकाइतकाच शुद्ध पारा घालून लोखंडाच्या पळीनें त्यांत ज्वाळा होऊं लागेपर्यंत घोटावें. ज्वाळा होऊं लागली असतां खालील अग्नि मंद करून पुनः स्फटिकाप्रमाणें शुभ्र असें पाऱ्याचें भस्म होईपर्यंत घोटावें. नंतर तें भस्म घेऊन सर्व रोगांत योजावें.

ह्या योगानें अग्निमांद्य, षंढत्व, खोकला, श्वास, भगंदर, नानाप्रकारचे व्रण, अंगावरील सुरकुत्या व केसांचा पांढरेपणा हे रोग नाश पावतात, असें शिवाचें सत्य वचन आहे.

ध्वजवृद्धीकरण.

क्षौद्रं क्षुद्रातगरमरिचैः पिप्पलीसैन्धवाभ्यां
प्रत्यक्पुष्पीयवतिलगुडश्वेतसिद्धार्थमाषैः ।
श्लक्ष्णीभूतैर्भवति मिलितं वाजिगन्धासनाथैः
श्रोणीश्रोत्रभुजकचशिरःशेफसां वृद्धिकारी ॥ १ ॥

मध, रिंगणमूळ, तगर, मिरें, पिंपळी, सैंधव, पांढरा आघाडा, जव, तीळ, गूळ, पांढऱ्या मोहऱ्या व उडीद ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मधांत कालवून त्यांत अश्वगंधाचें चूर्ण मिसळून लेप केला असतां त्यायोगें श्रोणी (ढुंगण), कान, दंड, केस, मस्तक व लिंग ह्यांची वृद्धि होते.

सकुष्ठमातङ्गबलाबलानां वचाश्वगन्धागजपिप्पलीनाम् ।
तुरङ्गशत्रोर्नवनीतयोगाल्लेपेन लिङ्गं मुशलत्वमेति ॥ २ ॥

कोष्ट, नागबला, चिकणामूळ, वेखंड, अश्वगंध, गजपिंपळी व कणेरीचें मूळ ह्यांचा लोण्यांतून लिंगास लेप केला असतां लिंग मुसळाप्रमाणें मोठें होतें.

मैथुनाचीं आठ अंगें.

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्यभाषणम् ।
संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिर्वृत्तिरेव च ॥ १ ॥
एतन्मैथुनमष्टांगं प्रवदन्ति मनीषिणः ।
विपरीतं ब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणम् ॥ २ ॥

प्रियकर अशा स्त्रीचें स्मरण करणें, तिच्याशीं भाषण करणें, क्रीडा करणें, तिजकडे पहाणें, तिच्याशीं गुप्त स्थानीं संभाषण करणें, तिच्या संबंधाच्या कल्पना करणें, तिजविषयींचा हर्ष व तिची प्राप्ति हीं मैथुनाचीं आठ अंगें आहेत, असें विद्वानांचें मत आहे. आणि ह्याच्या उलट जीं आठ लक्षणें त्याला ब्रह्मचर्य म्हणतात.

कामेश्वर रस.

जातीफलं च सौराष्ट्री कृष्णधत्तूरबीजकम् ।

जातीपुष्पमफेनं च नागं हिंगुलमेव च ॥ १ ॥
एतानि समभागानि खसक्काथेन मर्दयेत् ।
गुञ्जामात्रां च वटिकां सितया सह भक्षयेत् ॥
नाम्ना कामेश्वरः प्रोक्तो रमते कामिनीशतम् ॥ २ ॥

जायफळ, अक्कलकारा, काळ्या धोतऱ्याचें बीं, जाईचीं फुलें, अफू, बचनाग व हिंगूळ हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा खसखशीच्या काढ्यांत खल करावा. आणि गुंजेएवढ्या गोळ्या करून साखरेशीं खाव्या. ह्याला कामेश्वर रस म्हणतात. ह्याच्या सेवनानें मनुष्य शंभर स्त्रियांशीं रमतो.

वंगेश्वर रस.

रसं वंगसमं कृत्वा चतुर्भागं च गन्धकम् ।
कुमारीरससंयुक्तं दिनमेकं तु मर्दयेत् ॥ १ ॥
मन्दमध्यमतीव्राग्निवालुकायंत्रगं पचेत् ।
अश्वगन्धामृतासारमोचारसशतावरीः ॥ २ ॥
गोक्षूरधात्री कूष्मांडी वाराही पत्रमागधी ।
त्रिफला कर्कटी मुस्ता यष्टीमधुसमन्वितम् ॥ ३ ॥
सर्वसाम्यं सितायुक्तं चूर्णं कर्षार्धसंयुतम् ।
गुञ्जाचतुष्टयां मात्रां गोक्षीरमनुपानतः ॥ ४ ॥
प्रातरुत्थाय सेवेत लवणाम्लं च वर्जयेत् ।
बहुमूत्रं मूत्रकृच्छ्रं रक्तमूलप्रमेहकम् ॥ ५ ॥
मधुमेहं नष्टशुक्रं नष्टलिंगं च नाशयेत् ।
सर्वमेहप्रशमनो वंगेश्वर इति स्मृतः ॥ ६ ॥

शुद्ध पारा व शुद्ध कथील एकेक भाग घेऊन एकत्र करून त्यांत चार भाग गंधक घालून त्याचा कोरफडीच्या रसांत एक दिवस खल करावा. आणि काचकुपींत भरून वालुकायंत्रांत क्रमानें मंद, मध्यम व प्रखर अग्नीनें तो पचन करावा. नंतर अश्वगंध, गुळवेलीचें सत्व, मोचरस, शतावरी, गोखरू, आवळकाठी, भुईकोहाळा, डुकरकंद, तमालपत्र, पिंपळी, त्रिफळा, काकडशिंगी, नागरमोथे व जेष्टमध हीं सर्व औषधें समभाग व सर्वांच्या बरोबरीनें खडीसाखर ह्यांचें चूर्ण करून तें चूर्ण अर्धा तोळा व वरील रस चार गुंजा गाईच्या दुधांतून प्रातःकाळीं द्यावा व पथ्याला मीठ व आंबट पदार्थ वर्ज

करावे. म्हणजे बहुमूत्र, मूत्रकृच्छ्र, रक्तमूळव्याध, प्रमेह, मधुमेह, नष्टवीर्यत्व, व नपुंसकत्व ह्यांचा नाश करितो. सर्व प्रमेहांचा नाश करणाऱ्या ह्या रसाला वंगेश्वर असें म्हणतात.

शतावर्यश्वगन्धा च वानरी मुशली तथा ।
गोकण्टो शर्कराक्षीरं पिबेन्नष्टेन्द्रियो नरः ॥ १ ॥
तिलगोक्षुरचूर्णेन साधितं छागलं पयः ।
पीत्वा सशर्कराक्षौद्रं शीघ्रं गच्छति षण्ढता ॥ २ ॥

शतावरी, अश्वगंध, कवचबीज, मुसळी व गोखरू ह्यांचें, चूर्ण ज्याला षंढत्व आलें आहे त्यानें दूधसाखरेंतून घ्यावें. काळे तीळ व गोखरू ह्यांचें चूर्ण करून तें शेळीच्या दुधांत शिजवून साखर व मध घालून घ्यावें. म्हणजे तत्काळ नपुंसकत्व दूर होतें.

सेवाति गोक्षुरचूर्णं छागक्षीरेण साधितम् ।
शर्करामधुसंयुक्तं शीघ्रं गच्छति षण्ढता ॥ ३ ॥

गोखरूचें चूर्ण शेळीच्या दुधांत लापशीसारखें शिजवून त्यांत मध व साखर घालून घ्यावें. म्हणजे त्वरित षंढत्व दूर होतें.

सिन्दूरं कनकं बीजं विजया क्षुरबीजकैः ।
जातीफलं जातिपत्रीं कटुशिग्रुमफेनकम् ॥ ४ ॥
समुद्रशोषसंयुक्तं लवंगं च तथैव च ।
विजयारसनैर्मर्द्यं याममेकं प्रशस्यते ॥ ५ ॥
बदरीबीजमात्रं तु स्त्रीशतं रमते मुदा ।

रससिंदूर, धोतऱ्याचें बीं, भांग, तालिमखाना, जायफळ, जायपत्री, कडू शे ग्याचें बीं, अफू, समुद्रशोष व लवंग ह्या सर्वांचा भांगेच्या रसांत एक प्रहरभर खल करावा. आणि त्याची बोरांतील बीएवढी गोळी करून रोज घ्यावी. म्हणजे त्यायोगें आनंदानें शंभर स्त्रियांशीं रत होतां येतें.

---

१. इक्षुर गोक्षुर मर्कटबीज मुसली शतावरी डिकम् ।
घृतमधुसेवित नित्यं रमते रमणीशतं नित्यम् ॥

अर्थः—तालिमखाना, गोखरु, कवचबीज, मुसळी, शतावरि व शेवरीचा डिंक ह्यांचें चूर्ण तूपमधाशीं नित्य घेतलें असतां नित्य शंभर स्त्रियाशीं रमण्याचें सामर्थ्य येतें.

(आनंदाश्रमांतील प्रतीवरून).

अब्धिशोषं च सिद्धार्थांश्चतुर्वल्लमितान् पृथक् ॥ ६ ॥
अर्धशिष्टं च तद्दुग्धं सायंकाले पिबेन्नरः ।
बिन्दुपातं न कुरुते वाजीकरणमुत्तमम् ॥ ७ ॥

समुद्रशोष व मोहऱ्या चार चार वालप्रमाणें घेऊन चूर्ण करून दुधांत टाकून तें दूध निम्में आटवून संध्याकाळीं घ्यावें. म्हणजे वीर्यपात होत नाहीं. हा योग उत्तम वाजीकरण आहे.

रसभस्मयोग.

शुद्धं सूतं द्विधा गन्धं लोहपात्रेऽग्निसंस्थिते ।
आर्द्रन्यग्रोधदण्डेन चालयेद्भस्मतां नयेत् ॥
रक्तिकाद्वितयं भुक्तं रेतःपुष्टिकरं परम् ॥ १ ॥

शुद्ध पारा एक भाग व शुद्ध गंधक दोन भाग लोखंडाच्या भांड्यांत घालून अग्नीवर ठेवून वडाच्या ओल्या लांकडानें घोंटून त्यांचें भस्म करावें; आणि तें दोन गुंजा घ्यावें. हें उत्तम धातु-पौष्टिक आहे.

वीर्यस्तंभवटी.

जातीफलं लवंगं च जातीपत्रं सकुंकुमम् ।
सूक्ष्मैला चाहिफेनं च त्वाकारकरभं तथा ॥ १ ॥
प्रत्येकं कर्षमात्राणि कर्पूरं शाणमात्रकम् ।
नागवल्लीदलरसैर्वटी चणकसंनिभा ।
वीर्यसंस्तम्भिनी ह्येषा बलवर्णाग्निदीपनी ॥ २ ॥

जायफळ, लवंग, जायपत्री, केशर, बारीक वेलदोडे, अफू, व अक्कलकारा, हीं औषधें एक एक तोळा आणि कापूर तीन मासे, ह्यांचा नागवेलीच्या पानांच्या रसांत खल करावा, आणि त्याच्या हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ही गुटिका वीर्यस्तंभन करिते, बल व कांति वाढविते आणि अग्नीचें दीपन करिते.

कवचबीजपाक.

निस्तुषं वानरीबीजं कृत्वा विंशत्पलानि च ।
त्रिंशत्पलां सितां दत्त्वा घृतं दत्त्वा पलाष्टकम् ॥ १ ॥
दुग्धाढकसमायुक्तं मृदुना वह्निना पचेत् ।
यावद्दर्वीप्रलेपः स्यात्तन्मध्ये चूर्णितं क्षिपेत् ॥ २ ॥
जातीफलं त्रिकटुकं त्रिगन्धं देवपुष्पकम् ।

अकल्करं जातिपत्री कोकिलाबीजकेसरम् ॥ ३ ॥
पुनर्नवा पले द्वे च मुसली साहिफेनकम् ।
पारदं लोहचूर्णं च त्वभ्रकं च पलार्धकम् ॥ ४ ॥
चन्दनागरुकस्तूरीकर्पूरं शाणमात्रकम् ।
पलार्धं भक्षयेत्तत्तु क्रमाद्वीर्यबलप्रदम् ॥ ५ ॥

टरफलें काढून टाकलेलें कवचबीज ऐशीं तोळे, साखर एकशें वीस तोळे, तूप बत्तीस तोळे व दूध दोनशें छप्पन्न तोळे, ह्यांचा विधियुक्त पाक करावा. तो पळीला चिकटण्यासारखा दाट झाला म्हणजे त्यांत जायफळ, सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, लवंग, अक्कलखारा, जायपत्री, तालिमखाना, नाकेशर व वसूची मुळी हीं औषधें आठ आठ तोळे; मुसळी, अफू, पारदभस्म, लोहभस्म व अभ्रकभस्म हीं औषधें दोन दोन तोळे; चंदन, कृष्णागर, कस्तूरी, व कापूर हीं औषधें तीन तीन मासे घालून ढवळून सारखा करून ठेवावा. आणि दोन दोन तोळे या प्रमाणानें खावा. म्हणजे क्रमानें शुक्र वाढतें व शक्ति येते.

रसविकारावरील योग.

जनितविविधदाहे शीततोयाभिषेको
मलयजघनसारो लेपनं मन्दवातः ।
तरुणदधिसिताक्तं नारिकेलीफलाम्भो
मधुरशिशिरपानं शीतमन्यच्च शस्तम् ॥ १ ॥
सौभाग्यमेघनादांघ्रिसितामधुकचन्दनम् ।
तुषोदकेन पातव्यं सर्वस्मिन् रसवैकृते ॥ २ ॥
छर्द्यां चेक्षुरसो देयः कपित्थं वा सितान्वितम् ।
कुमारीगिललेपश्च सर्वाङ्गेण प्रशस्यते ॥ ३ ॥

रसविकारामुळें अत्यंत दाह होत असल्यास थंड पाणी अंगावर शिंपावें. चंदन व कापूर ह्यांचा लेप करावा. हळूहळू वारा द्यावा. घट्ट दहीं साखर घालून द्यावें. नारळाच्या फळांतील पाणी प्यावें. आणि दुसरीं थंड व मधुर अशीं पेयें व थंड उपचार हे प्रशस्त आहेत. टाकणखार, तांदुळजाच्या मुळ्या, खडिसाखर, जेष्टमध आणि चंदन ह्यांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांतून सर्व रसविकारांत पाजावें.

क्षीरं मधुसितोपेतं क्वाथो वाऽमृतबिन्दुकः ।
उपचारा अमी सर्वे प्रशस्ता रसतापिनाम् ।
रसदाहे भवेत्सर्वं पित्तज्वरभिषग्जितम् ॥ ४ ॥

ओकारी असल्यास उंसाचा रस द्यावा. किंवा साखर घालून कवठाचा गर द्यावा. सर्व अंगावर कोरफडीचा गर लावावा (लेप करावा). मध व खडीसाखर घालून दूध द्यावें किंवा ' अमृतबिंदु ' नांवाचा काढा द्यावा. हे सर्व उपचार रसजन्य दाहामुळें पीडिलेल्या मनुष्यास प्रशस्त आहेत. रसदाहावर पित्तज्वरावरील उपचार करावे.

रससार.

मुक्ताविद्रुमवङ्गभूतिसहितं वल्लं पृथक् स्वर्णकम्
छिन्नासत्वतुगासितानवनितं चाऽऽलोड्य संभक्षयेत् ।
संजाते तृषि नारिकेलसलिलं तत्कालिकं प्राशयेत्
सर्वस्मिन् रसवैकृते च गदितं ह्येतच्च योगामृते ॥ १ ॥

मौक्तिक भस्म, प्रवाळभस्म, वंगभस्म, सुवर्णभस्म, गुळवेलीचें सत्व, व वंशलोचन हीं औषधें एक एक वाल प्रमाणें घेऊन त्यांत खडीसाखर व लोणी घालून खावीं. तहान लागली असतां नारळाचें ताजें पाणी प्यावें. योगामृत नांवाच्या ग्रंथांत सर्व रसविकारांवर हेंच औषध सांगितलें आहे.

सर्वस्मिन् रसवैकृते हि शिशिरं स्वेच्छाम्बुपानादिकम्
देयं तापशमाय दाडिमतरोरग्राणि दूर्वाशिफाः ।
संपेष्यामलया ददीत च तदा स्वेच्छावशेन त्यजे-
द्यावत्पूर्वबलं भवेत्पटुतरं तावत्स्त्रियं न स्पृशेत् ॥ २ ॥

सर्व रसविकारांवर दाहशांतीकरितां यथेच्छ थंड पाणी पिणें वगैरे थंड उपचार करावे. डाळिंबाचीं कोवळीं पानें व दूर्वांच्या मुळ्या आवळकाठीबरोबर (आवळ्याबरोबर) वाटून द्याव्या. हे उपचार आपल्याला नकोसे झाल्यावर सोडावे. आणि पूर्वीप्रमाणें सामर्थ्य येईपर्यंत स्त्रीसंग मात्र करूं नये.

यष्टीपटोलनिष्क्वाथो मधुना मधुरीकृतः ।
तीव्रपित्तज्वरोन्मादनाशनो रसदाहजित् ॥ ३ ॥

ज्येष्ठमध व पडवळ ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो तीव्र

पित्तज्वर, उन्माद व रसायन सेवन केल्यामुळें होणारा दाह जिंकतो.

छिन्नायष्टीघनोशीरधान्यपर्पटचन्दनैः।
रसदाहं जयेत्क्वाथो खण्डवंशीकसंयुतः ॥ ४ ॥

गुळवेल, जेष्टमध, नागरमोथे, वाळा, धने, पित्तपापडा व चंदन ह्यांचा काढा खडीसाखर व वंशलोचन घालून द्यावा. तो रसायन-संबंधीं दाहाला जिंकतो.

चन्दनोदीच्यशीतैश्च क्वाथः खण्डोपलान्वितः।
रसदाहं जयत्याशु पित्तज्वरहरः परः ॥ ५ ॥

चंदन, वाळा व पित्तपापडा (अथवा तांबूस-पांढरें असें कमळ) ह्यांचा काढा खडीसाखर घालून द्यावा. तो रसायनसंबंधीं दाहाला जिंकतो; आणि तो पित्तज्वरनाशाविषयीं फार उत्तम आहे.

दूर्वा सोत्पलकिञ्जल्कमञ्जिष्ठाशैलवालुकम्।
सितासितमुशीरं च मुस्तं चन्दनपद्मकम् ॥ ६ ॥
तत्समं च भवेत्क्षीरं घृतप्रस्थं विपाचयेत्।
जीवकर्षभकौ मेदा महामेदा तथैव च ॥ ७ ॥
काकोली क्षीरकाकोली मृद्वीका मधुकं तथा।
मुद्गपर्णी माषपर्णी विदारी रक्तचन्दनम् ॥ ८ ॥
शर्करामधुसंयुक्तं सिद्धं विप्लावयेद् घृतम्।
रक्तपित्तविकारेषु वातरक्तगदेषु च ॥ ९ ॥
क्षीणशुक्रे प्रदातव्यं वाजीकरणमुत्तमम्।
अङ्गदाहं शिरोदाहं ज्वरं पित्तसमुद्भवम् ॥ १० ॥

दूर्वा, निळें कमळ, कमळांतील केसर, मंजिष्ट, भोकरीची साल, काकडी, वाळा, काळा वाळा, नागरमोथे, चंदन व पद्मकाष्ठ हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा काढा करून त्या काढ्याच्या समान दूध व चौसष्ट तोळे तूप ह्यांमध्यें जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, काकोली, क्षीरकाकोली, मनुका, जेष्टमध, रानमूग, रानउडीद, भुईकोहळा व रक्तचंदन ह्यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. आणि तें मध व साखरेशीं रक्तपित्त व वातरक्त ह्यांजवर द्यावें. तसेंच हें धातुक्षीणतेवरही द्यावें. हें उत्तम वाजीकरण आहे. हें अंगदाह, शिरो-दाह व पित्तजन्य ज्वर ह्यांचा नाश करितें.

विकारो यदि जायेत पारदान्मलसंयुतात्।

गन्धकं सेवयेत्तत्र शोधितं विधिपूर्वकम् ॥ ११ ॥

अशुद्ध पाऱ्यापासून जर कांहीं विकार झाले, तर विधिपूर्वक शुद्ध केलेला गंधक सेवन करावा.

गन्धकं माषयुग्मं च नागवल्लीदलैः सह ।
खादयेत्पारदग्रस्तो दोषशान्तिस्तदा भवेत् ॥ १२ ॥

ज्यानें अशुद्ध पारा भक्षण केला असेल, त्यानें दोन मासे शुद्ध गंधक विड्याच्या पानांतून खावा. म्हणजे खाल्लेल्या पाऱ्याचे दोष नाश पावतात.

दुसरा प्रकार.

लाक्षाकूष्माण्डखण्डांश्च तुलसीं शतपुष्पिकाम् ।
लवङ्गं वत्सनागं च गन्धकेन समात्रकम् ॥ १ ॥
कर्षमात्रं पयो भुक्तं सर्वं तत्र पृथक्पृथक् ।
सर्वयोगोत्तरासाध्यः सूतदोषविकारनुत् ॥ २ ॥

लाख, कोहळ्याचे तुकडे, तुळस, बडीशेप, लवंग, बचनाग व गंधक हीं सर्व औषधें मिळवून एक करून दुधांतून खावीं. म्हणजे सर्व प्रकारच्या रसदोषनाशक योगानें बरे न झाल्यामुळें असाध्य ठरलेले पाऱ्याच्या दोषासंबंधीं विकार नाश पावतात.

तिसरा प्रकार.

नागवल्लीरसप्रस्थं भृङ्गराजरसं तथा ।
तुलस्याश्च रसं प्रस्थं छागदुग्धं समांशकम् ॥ १ ॥
मर्दनं सर्वगात्रेषु यामयुग्मं दिनत्रयम् ।
स्नानं शीतलतोयेन सूतदोषप्रशान्तये ॥ २ ॥

पाऱ्याच्या दोषाच्या शांतीकरितां नागवेलीच्या पानाचा रस चौसष्ट तोळे, माक्याचा रस चौसष्ट तोळे, तुळशीचा रस चौसष्ट तोळे आणि शेळीचें दूध सर्व रसांच्या समान ह्यांचें एकत्र मिश्रण करून तें मिश्रण सर्व शरीराला मर्दन करून जिरवावें. ह्याप्रमाणें तीन दिवस करून थंड पाण्यानें स्नान करावें. म्हणजे रसविकार दूर होतात.

रसायनलक्षण.

यज्जराव्याधिविध्वंसि वयसः स्तम्भनं तथा ।
चक्षुष्यं बृंहणं वृष्यं भेषजं तद्रसायनम् ॥ १ ॥

जें औषध म्हातारपण व रोग ह्यांचा नाश करितें, आयुष्य स्थिर करितें, तसेंच डोळ्याला हितकारक, पौष्टिक व कामोद्दीपक असतें, त्याला रसायन म्हणतात.

रसायनाचें फळ.

दीर्घमायुः स्मृतिं मेधामारोग्यं तरुणं वयः ।
देहेन्द्रियबलं कान्तिं नरो विन्देद्रसायनात् ॥ १ ॥

रसायनापासून मनुष्याला दीर्घायुष्य, स्मरणशक्ति, धारणाशक्ति, आरोग्य, तारुण्य, देह व इंद्रियें ह्यांना शक्ति व कांति प्राप्त होतात.

त्याचा विधि.

पूर्वे वयसि मध्ये वा मनुष्यस्य रसायनम् ।
प्रयुञ्जीत भिषक्प्राज्ञः स्निग्धशुद्धतनोः सदा ॥ १ ॥

बुद्धिवान वैद्यानें नेहमीं मनुष्याच्या पूर्ववयांत अथवा मध्यवयांत देह स्निग्ध व शुद्ध करून रसायन देण्यास आरंभ करावा.

नाविशुद्धशरीरस्य युक्तो रासायनो विधिः ।
आभाति वाससि क्लिष्टे रङ्गयोग इवाऽऽहितः ॥ २ ॥

देहशुद्धि केल्यावांचून रसायनविधीस आरंभ करूं नये. कारण मळक्या वस्त्रावर रंग दिला असतां तो जसा व्यर्थ होतो, तसा तो रसायनविधि हितकारक होत नाहीं

त्याचीं उदाहरणें.

शीतोदकं पयः क्षौद्रं घृतमेकैकशो द्विशः ।
त्रिशः समस्तमथ वा प्राक्पीतं स्थापयेद्वयः ॥ १ ॥

थंड पाणी, दूध, मध व तूप यांतून कोणतेही जिन्नस एक एक, दोन दोन, तीन तीन किंवा सर्व मिश्र करून सकाळीं जेवणापूर्वी घेतले असतां आयुष्य स्थिर करितात (तारुण्य कायम राखतात).

मण्डूकपर्ण्याः स्वरसः प्रभाते प्रयोज्य यष्टीमधुकस्य चूर्णम् ।
रसो गुडूच्यास्तु समूलपुष्प्याः कल्कः प्रयोज्यः खलु शंखपुष्प्याः ॥
आयुःप्रदान्यामयनाशनानि बलाग्निवर्णस्वरवर्धनानि ।
मेध्यानि चैतानि रसायनानि मेध्या विशेषेण च शंखपुष्पी ३
विशेषेण तुगाक्षीर्या पिप्पल्या लवणेन च ।
त्रिफला सितया वाऽपि युक्ता सिद्धं रसायनम् ॥ ४ ॥

ब्राह्मीचा स्वरस, जेष्टमधाचें चूर्ण, गुळवेलीचा स्वरस, फुलें व मुळ्या ह्यांसह शंखपुष्पीचा स्वरस हा प्रत्येक प्रयोग नित्य प्रातःकाळीं सेवन करावा. हे प्रयोग आयुष्यदायक, रोगनाशक, बल, अग्नि, वर्ण व स्वर ह्यांची वृद्धि करणारे व धारणाशक्ति देणारे असे आहेत. त्यांत शंखपुष्पी ही विशेष बुद्धिवर्धक आहे. विशेषतः वंशलोचन, पिंपळी व सेंधेलोण ह्यांच्या चूर्णाबरोबर किंवा खडीसाखरेबरोबर त्रिफळा द्यावा. तो रसायन आहे, हें सिद्ध आहे.

सिन्धूत्थशर्कराशुण्ठीकणामधुगुडैः क्रमात् ।
वर्षादिष्वभया प्राश्या रसायनगुणैषिणा ॥ ५ ॥

रसायनाच्या गुणाची इच्छा करणारानें सेंधेलोण, साखर, सुंठ, पिंपळी, मध व गूळ (जुना) ह्या सहा औषधांपैकीं क्रमानें प्रत्येक औषधाबरोबर अनुक्रमें वर्षाऋतु आदिकरून सहा ऋतूंमध्यें हिरडा सेवन करावा.

हिरड्याचीं अनुपानें.

ग्रीष्मे तुल्यगुडां सुसैन्धवयुतां मेघावनद्धाम्बरे
सार्धं शर्करया शरद्यमलया शुण्ठ्या तुषारागमे ।
पिप्पल्या शिशिरे वसन्तसमये क्षौद्रेण संयोजितां
राजन्भुंक्ष्व हरीतकीमिव गदा नश्यन्तु ते शत्रवः ॥१॥

ग्रीष्म ऋतूंत समभाग गुळाशीं, वर्षाऋतूंत सेंधेलोणाशीं, शरद्ऋतूंत साखर व आवळकाठीचें चूर्ण ह्यांजबरोबर, हेमंतऋतूंत सुंठीबरोबर, शिशिर ऋतूंत पिंपळीबरोबर आणि वसंत ऋतूंत मधाशीं हिरडा सेवन कर. म्हणजे हे राजा, त्या हिरड्याच्या सेवनानें तुझे रोगरूपी शत्रु नाश पावोत.

पुनर्नवस्यार्धपलं नवस्य पिष्टं पिबेद्यः पयसाऽर्धमासम् ।
मासद्वयं तत्त्रिगुणं समां वा जीर्णोऽपि भूयः स पुनर्नवः स्यात् ।

ताज्या पुनर्नव्याचें चूर्ण करून तें दोन तोळे चूर्ण दुधाबरोबर जो मनुष्य पंधरा दिवस, दोन महिने, सहा महिने अथवा वर्षभर सेवन करितो, तो वृद्ध असला तरी पुनः नवा (तरुण) होतो.

ये मासमेकं स्वरसं पिबन्ति दिने दिने भृङ्गरजःसमुत्थम् ।
क्षीराशिनस्ते बलवीर्ययुक्ताः समाः शतं जीवनमाप्नुवन्ति ॥३

जे प्रतिदिवशीं माक्याचा रस पिऊन नुसत्या दुधावर राहतात, ते बलवीर्ययुक्त असें शंभर वर्षांचें आयुष्य प्राप्त करून घेतात.

शतावरी मुण्डिनिका गुडूची सहस्तिकर्णी सहतालुमुली ।
एतानि कृत्वा समभागयुक्तान्याज्येन किंवा मधुनाऽवलिह्यात् ४
जरारुजामृत्युवियुक्तदेहो भवेन्नरो वीर्यबलादियुक्तः ।
विभाति देवप्रतिमः स नित्यं प्रभामयो भूरिविवृद्धबुद्धिः ॥५॥

शतावरी, मुंडी (गोरखमुंडी), गुळवेल, हस्तिकर्णी व मुसळी ह्या औषधी समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून तें चूर्ण तुपाशीं अथवा मधाशीं चाटावें. म्हणजे तो मनुष्य जरा, रोग व मृत्यु ह्यांपासून मुक्त होऊन बल व वीर्य यांनीं युक्त असा होतो. तो देवाप्रमाणें नित्य तेजःपुंज दिसतो, व त्याची बुद्धि फारच वाढते.

पीताऽश्वगन्धा पयसाऽर्धमासं घृतेन तैलेन सुखाम्बुना वा ।
कृशस्य पुष्टिं वपुषो दधाति नरस्य सस्यस्य यथाऽम्बुवृष्टिः ६

पंधरा दिवसपर्यंत दुधाशीं अथवा तूप, तेल किंवा ऊन पाणी ह्यांशीं अश्वगंध द्यावा. म्हणजे ज्याप्रमाणें पाण्याचा वर्षाव धान्याची वृद्धि करतो, त्याप्रमाणें तो कृश मनुष्याच्या देहाला पुष्ट करतो.

शिशिरे चाश्वगन्धायाः कन्दचूर्णं पयोन्वितम् ।
मासमत्ति समध्वाज्यं स वृद्धोऽपि युवा भवेत् ॥ ७ ॥

शिशिरऋतूंमध्यें एक महिनाभर जो मनुष्य अश्वगंधाचें चूर्ण, तूप, मध व दूध ह्यांजबरोबर घेतो तो वृद्ध असला तरी तरुण होतो.

घृतामलकशर्करातिलपलाशबीजानि यः
समानि शयनस्थितो मधुयुतानि खादेन्निशि ।
वलीपलितवर्जितस्तरुणनागतुल्यो बली
बृहस्पतिसमः पुमान्भवति सोऽचिरेण ध्रुवम् ॥ ८ ॥

तूप, आवळकाठी, साखर, तीळ व पळसाचें बीं ह्यांचें समभाग चूर्ण रात्रीं निजतांना जो मनुष्य खातो, तो लवकरच वलीपलित-वर्जित असा तरुण व हत्तीप्रमाणें सामर्थ्यमान होतो. व निश्चयानें बृहस्पतीसारखा बुद्धिमान होतो.

असिततिलविमिश्रान्पल्लवान्भक्षयेद्यः
सततमिह पयोशी भृङ्गराजस्य मासम् ।

भवति च चिरजीवी व्याधिभिर्मुक्तदेहो
भ्रमरसदृशकेशः कामचारी मनुष्यः ॥ १ ॥

काळे तीळ व माक्याचीं पानें एकत्र करून एक महिनाभर सतत खाऊन जो दुधावर राहतो, तो निरोगी व चिरंजीव होतो. त्याचे केस काळे होतात. व तो इच्छेनुरूप पाहिजे त्या ठिकाणीं गमन करूं शकतो.

ससितया वचयाऽमलकैरथ त्रिफलया त्वथ वा घृतमिश्रया ।
कनकलोहरजः सदलंकृतं परमिदं हि रसायनमिष्यते ॥ १ ।

आवळकाठी, वेखंड व खडीसाखर ह्यांजबरोबर किंवा तूप व त्रिफळ्याचें चूर्ण ह्यांजबरोबर सोन्याचा वर्ख व लोहभस्म एकत्र करून घ्यावें. तें फार उत्कृष्ट रसायन आहे.

धात्रीतिलान्भृंगरजोविमिश्रान्ये भक्षयेयुर्मनुजाः क्रमेण ।
ते कृष्णकेशा विमलेन्द्रियाश्च निर्व्याधयोऽप्या मरणाद्भवेयुः ॥

आवळकाठी, तीळ व माक्याचें चूर्ण एकत्र करून जे मनुष्य खातात त्यांचे केस काळे होतात, इंद्रियें निर्मळ होतात, आणि ते व्याधिरहित व मृत्युरहित होतात.

पञ्च भल्लातकांश्छित्त्वा शोधयेद्विधिवज्जले ।
कषायं तं पिबेच्छीतं घृतेनाक्तोष्ठतालुकम् ॥ २ ॥
पञ्चवृद्ध्या पिबेद्यावत्सप्ततिं ह्रासयेत्ततः ।
जीर्णेऽद्यादोदनं शीतं घृतक्षीरोपसंहितम् ॥ ३ ॥
एतद्रसायनं मेध्यं वलीपलितनाशनम् ।
कुष्ठार्शःक्रिमिदोषघ्नं दुष्टशुक्रविशोधनम् ॥ ४ ॥

पांच बिब्बे कातरून त्यांचा विधिवत् पाण्यांत काढा करून तो काढा थंड झाल्यावर ओठाला व टाळ्याला तूप लावून प्यावा. ह्याप्रमाणें रोज पांच पांच बिब्बे वाढवीत सत्तरपर्यंत वाढवावे व त्याच क्रमानें उतरत आणावे. काढा जिरल्यावर थंड झालेला भात तूप व दूध घालून खावा. हें रसायन बुद्धिवर्धक व वलीपलितनाशक आहे. तसेंच कुष्ठ, मूळव्याध व क्रमि हे रोग नाश करणारें व दूषित शुक्राचें शोधन करणारें आहे.

गुडूच्यपामार्गविडङ्गशंखिनीवचाभयाशुण्ठिशतावरीः समाः ।
घृतेन लीढ्वा प्रकरोति मानवं त्रिभिर्दिनैः श्लोकसहस्रधारिणम्

गुळवेल, आघाडा, वावडिंग, शंखपुष्पी, वेखंड, हिरडा, सुंठ व शतावरी ह्यांचें चूर्ण तुपाशीं तीन दिवस चाटावें, म्हणजे हजार श्लोक पाठ करण्याची शक्ति बुद्धीमध्यें येते.

ब्राह्मीवचाभयावासापिप्पल्यो मधुसैन्धवम् ।
अस्य प्रयोगात्सप्ताहात्किंनरैः सह गीयते ॥ २ ॥
हन्त्यम्लपित्तवमनारुचिदाहमोह-
खालित्यमेहतिमिरार्मसशुक्रदोषान् ।
भुक्त्वा नरः सततमामलकीरसेन
वृद्धोऽपि तेन च भवेत्तरुणीरिरंसुः ॥ ३ ॥

ब्राह्मी, वेखंड, हिरडा, अडुळसा, पिंपळी, मध व सैंधेलोण ह्या प्रयोगाच्या सेवनानें सात दिवसांमध्यें किन्नरासारखा स्वर होतो. हें चूर्ण नित्य आवळ्याच्या रसांतून घेतलें असतां तें अम्लपित्त, ओकारी, अरुचि, दाह, मोह, टक्कल, प्रमेह, तिमिर, वडस व फूक ह्यांचा नाश करितें आणि वृद्ध देखील तरुणीशीं रत होण्याची इच्छा करूं लागतो.

लोहगुग्गुळ.

अयः पलं गुग्गुलुरत्र योज्यः पलत्रयं व्योषपलानि पञ्च ।
पलानि चाष्टौ त्रिफलारजश्च कर्षं लिहन्यात्त्यमरत्वमेव ॥ १ ॥

लोहभस्म चार तोळे, गुग्गुळ बारा तोळे, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण वीस तोळे व त्रिफळ्याचें चूर्ण बत्तीस तोळे एकत्र करून एक तोळा चूर्ण सेवन करावें, म्हणजे अमरत्व येतें.

गंधकरसायन.

शुद्धो बलिर्गोपयसा विभाव्यस्ततश्चतुर्जातगुडूचिकाभिः ।
पथ्याक्षधात्र्यौषधभृङ्गराजैर्भाव्योऽष्टवारं पृथगार्द्रकेण ॥ १ ॥
शुद्धे सितां योजय तुल्यभागां रसायनं गन्धकराजसंज्ञम् ।
कर्षोन्मितं सेवितमेति मर्त्यो वीर्यं च पुष्टिं दृढदेहवह्निम् ॥ २ ॥
कण्डूं च कुष्ठं विषदोषमुग्रं मासद्वयेनेह जयेत्प्रयोगः ।
घोरातिसारं ग्रहणीगदं च हरेच्च रक्तं दृढशूलयुक्तम् ॥ ३ ॥
जीर्णज्वरे मेहगणे प्रकृष्टं वातामयानां हरणे समर्थम् ।
प्रजाकरं केशमतीव कृष्णं करोति चेद्भक्षति चार्धवर्षम् ॥ ४ ॥
रसायनं पर्वतजात्मबीजं क्षाराम्लतैलादिकराजिवर्जम् ।
ससोमरोगं सहमुष्कवृद्धिं हरेच्च वै गन्धकराजयोगः ॥ ५ ॥

हरति सकलरोगान्गन्धकाख्यः प्रयोगो
मृतसदृशनराणां प्राणदो दीर्घमायुः ।
तदनु विहितयोगो भस्मसूतं सहेम
रमयति त्रिदशानां देहदीप्तिं सुरूपाम् ॥ ६ ॥
वीर्यस्य वृद्धिं दृढदेहवह्निमशीतिवातान्विनिहन्ति कुष्ठम् ।
प्रमेहदुष्टोदररोगजालं विशेषतो हन्ति तु सन्निपातम् ॥ ७ ॥
दोषज्वरं राजरुहं प्रमेहं पाण्डुक्षयश्वासगुदांकुरादीन् ।
एतान्हि रोगान्विनिहन्ति शीघ्रं रसायनं जल्पितमीश्वरेण ॥ ८

शुद्ध गंधक गाईच्या दुधांत आठ दिवस खलावा. नंतर दालचिनी, तमालपत्र, वेलची व नागकेशर ह्यांचा काढा, गुळवेलीचा काढा, त्रिफळा, सुंठ ह्यांचा काढा व माक्याचा रस ह्या प्रत्येकाच्या काढ्याच्या त्याला आठ आठ भावना द्याव्या. आणि शेवटीं आल्याच्या रसाच्या आठ भावना द्याव्या. ह्याला गंधकराज रसायन असें म्हणतात. हें समभाग साखर आंत घालून घ्यावें. हें रसायन एक तोळा, भर सेवन केलें असतां मनुष्याला वीर्य, पुष्टि, देहाची बळकटी व जठराग्नीची प्रदीप्तता हीं प्राप्त होतात. कंडू, कुष्ट व विषदोष, ह्यांना तर ह्या रसायनाचा प्रयोग दोन महिन्यांत जिंकतो. भयंकर अतिसार, संग्रहणी व अत्यंत शूलयुक्त रक्तस्राव ह्यांचा यानें नाश होतो. आणि जीर्णज्वर, प्रमेहसमुदाय व अत्यंत वाढलेले वातरोग ह्यांचा नाश करण्यालाही हें समर्थ आहे. हें सहा महिने सेवन केलें असतां केस काळे करितें, आणि संतति देतें. ह्या गंधकरसायनाला मीठ, आंबट पदार्थ, तेल, व मोहऱ्या वर्ज कराव्या. हें रसायन, सोमरोग व अंडवृद्धि ह्यांचा नाश करितें. हा गंधकाचा प्रयोग सर्व रोगांचा नाश करितो. मृतवत् मनुष्याला प्राण व दीर्घ आयुष्य देतो. ह्या रसायनाबरोबर पारदभस्म व सुवर्ण सेवन केलें असतां देवाप्रमाणें सुंदर अशी शरीरकांति होते. वीर्यवृद्धि होते, शरीर बळकट होतें; अग्नि प्रदीप्त होतो; ऐशीं प्रकारचे वातरोग व कुष्ट ह्यांचा नाश करितें. प्रमेह, दूषी विष, उदररोगांचा समुदाय ह्यांचा नाश करितें आणि विशेषतः सन्निपाताचा नाश करितें. दोषी ज्वर, राजयक्ष्मा, प्रमेह, पांडुरोग, क्षय, श्वास व मूळव्याध ह्या रोगांचा

त्वरित नाश करितें. हें रसायन ईश्वरानें सांगितलें आहे.

तेलें.

एरण्डतैलमथ निम्बफलास्थितैल-
मेतद्रसायनमनामयकायकारि ।
ज्योतिष्मतीफलपलाशफलोद्भवं वा
तैलं वलीपलितहारि भिषक्प्रदिष्टम् ॥ १ ॥

एरंडेल व कडूनिंबाच्या बियांचें तेल हें रसायन असून शरीर निरोगी करितें. त्याचप्रमाणें करडकांगोणीचें तेल अथवा पळसाचे बियांचें तेल वलिपलितनाशक आहे, म्हणून वैद्यांनीं सांगितलें आहे.

न केवलं दीर्घमिहायुरश्नुते रसायनं यो विविधं निषेवते ।
गतिं सदेवर्षिनिषेवितां शुभां प्रपद्यते ब्रह्म तथैव चाक्षयम् ॥ २ ॥

जो नानाप्रकारचीं रसायनें सेवन करितो तो केवळ दीर्घ आयुष्यच प्राप्त करून घेतो असें नाहीं. तो देव, ऋषि इत्यादिकांचा मार्ग आक्रमण करूं शकतो व अक्षय ब्रह्मपदाला पावतो.

रोगानुसार औषधांचीं अनुपानें.

कैराताम्बुदपर्पटं ज्वरगदे तक्रं ग्रहण्यामथा-
तीसारे कुटजः कृमौ कृमिरिपुर्दुर्नामकेऽरुष्करम् ।
पाण्डौ किट्टमथ क्षये गिरिजतु श्वासे तु भाङ्गर्यौषधं
मेहे त्वामलकं क्षये तृषि जलं संतप्तहेमान्वितम् ॥ १ ॥
शूले हिंगु करञ्जमामपवने तैलं रुबोर्मूत्रयुक्
श्रेष्ठा प्लीहि कणा विषे शुकतरुः कासे तु कण्टारिका ।
वातव्याधिषु गुग्गुलुश्च लशुनः स्याद्रक्तपित्ते वृषोऽ-
पस्मारे तु वचा सवागथगरे हेमोदरे रेचनम् ॥ २ ॥
वातास्त्रे तु गुडूचिकाऽर्दितगदे माषेण्डरी मेदसि
क्षौद्राम्भः प्रदरे तिरीटमरुचौ लुङ्गो व्रणेऽय्यः पुरः ।
शोके मद्यमथाम्लपित्तरुजि तु द्राक्षाऽथ कृच्छ्रे वरी
कूष्माण्डाम्बु दृगामये तु त्रिफलोन्मादे पुराणं घृतम् ॥ ३
कुष्ठे खादिरसारवार्यथ पयो निद्राक्षये माहिषं
श्वित्रे बाकुचिफलयजीर्णरुजि तु स्वापो भये तोषणम् ।
छर्दौ लाजमधूर्ध्वजत्रुविकृतौ नस्यं सतीक्ष्णौषधं
शूले पार्श्वभवे तु पुष्करजटा मूर्छासु शीतो विधिः ॥४॥
कार्श्ये मांसरसोऽश्मरीषु गिरिभिद्गुल्मेषु शिग्रुत्वचा

मोक्षोऽस्रस्य तु विद्रधौ जतुरसैर्हिध्मासु नस्यं हितम् ।
दाहे शीतविधिर्भगंदरगदे तूर्वीलताश्वास्थिनी
घृष्टे रासभलोहितैः स्वरगदे मध्वन्वितं पौष्करम् ॥ ५ ॥

काडेचिराईत, नागरमोथे व पित्तपापडा ज्वरावर; ताक संग्रहणीवर; कुडा अतिसारावर; वावडिंग जंतावर; मूळव्याधीवर बिब्बा; पांडुरोगावर मंडूर; क्षयावर शिलाजित; श्वासावर भारंगी; प्रमेहावर आवळे व क्षयावरही आवळे; तृषेवर सोनें तापवून बुडविलेलें पाणी; शूलावर हिंग व करंज; आमपाचनाला गोमूत्रांतून एरंडेल व त्रिफळा; पांथरीवर पिंपळी, विषावर शिरीषवृक्ष, खोकल्यावर रिंगणी, वातव्याधीवर गुग्गुळ व लसूण; रक्तपित्तावर अडुळसा, अपस्मारावर वेखंड; गरविषावर टाकणखार; मेह व उदर ह्यांजवर रेचन; वातरक्तावर गुळवेल; अर्दित वायूवर उडदाच्या शेंगोळ्या (वडे); मेदावर मध व पाणी; प्रदरावर लोध्र; अरुचीवर महाळुंग; व्रणावर त्रिफळा व गुग्गुळ; शोकावर मद्य; आम्लपित्तावर द्राक्षें; मूत्रकृच्छ्रावर शतावरी व कोहाळ्याचा रस; दृष्टिरोगावर त्रिफळा; उन्मादावर जुनें तूप; कुष्ठावर खदिरसाराचा काढा; निद्रानाशावर म्हशीचें दूध; पांढऱ्या कोडावर बावच्या; अजीर्णावर झोंप; भयावर आनंद देणें; ओकारीवर भाताच्या लाह्या व मध; मानेच्या वरच्या रोगावर तीक्ष्ण औषधांनीं युक्त असें नस्य, कुशींतील शूळावर पोखरमूळ, मूर्च्छेवर थंड उपचार; कृशत्वावर मांसरस; मूतखड्यावर पाषाणभेद, गुल्मावर शेवग्याची साल; विद्रधीवर रक्त काढणें, उचकीवर लाक्षारसाचें (अळित्याचें) नस्य, दाहावर शीत उपचार; भगंदरावर दानवें व कुत्र्याचें हाड गाढवाच्या रक्तांत उगाळून लेप; आणि स्वरभेदावर मधाशीं पोखरमूळ, अशी हीं अनुपानें हितकारक आहेत.

यत्किंचिदौषधं वैद्यैर्देयं रोगानुपानतः ।
तत्तद् गुणकरं ज्ञेयमनुपानबलादिह ॥ १ ॥

सर्व रोगांचीं अनुपानें.

त्या त्या रोगाचें अनुपान योजून त्यांतून वैद्यानें औषध दिलें

असतां तें औषध अनुपानाच्या बळानें ते ते गुण करितें.

ग्रंथकाराची प्रार्थना.

यावद्व्योमनि बिम्बमम्बरमणेरिन्दोश्च विद्योतते
यावत्सप्त पयोधयः सगिरयस्तिष्ठन्ति पृष्ठे भुवः ।
यावच्चावनिमण्डलं फणिपतेरास्ते फणामण्डले
तावत्सद्भिषजः पठन्तु परितः श्रीयोगरत्नाकरम् ॥ २ ॥

जोंपर्यंत सूर्याचें व चंद्राचें बिंब आकाशामध्यें प्रकाशत आहे. जोंपर्यंत सात समुद्र पर्वतासहवर्तमान ह्या पृथ्वीवर स्थिर आहेत, व जोंपर्यंत हें भूमंडळ नागराज शेषाच्या फणिमंडळावर आहे, तोंपर्यंत हा योगरत्नाकर ग्रंथ सर्वत्र सद्वैद्य पठण करोत.

समाप्त